महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका

सत्यमेव जयते

महाराष्ट्र विधानसभा
मार्गदर्शिका

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
२०२२

महाराष्ट्र विधानसभा

मार्गदर्शिका

एचबी १५९९—१

प्रस्तावना

राज्याच्या हीरक महोत्सवाच्या पूर्वसंध्येस म्हणजेच दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी अस्तित्वात आलेल्या चौदाव्या महाराष्ट्र विधानसभेतील सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत.

महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार तयार करण्यात आलेली 'महाराष्ट्र विधानसभा मार्गदर्शिका' ही पुस्तिका आपल्या हाती सोपविताना मला अत्यंत आनंद होत आहे.

अनेक चळवळी, आंदोलने, हुतात्म्यांचे बलिदान, हालअपेष्टा सोसून मोठ्या कष्टाने स्वातंत्र मिळविलेल्या आपल्या भारत देशाने यावर्षी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी (७५ वर्ष) वर्षात पदार्पण केले असून, भारतीय संविधानाला ७२ वर्ष झाली आहेत.

समाजाचा, राज्याचा एकंदरीतच देशाच्या उन्नतीचा अखंड ध्यास घेऊन आपल्या स्वकर्तृत्वाने देशालाच नव्हे तर अखिल मानवजातीला ललामभूत ठरून सर्वांना अभिमान वाटणाऱ्या थोर ऐतिहासिक आणि सामाजिक सदावंदनीय लोकोत्तर व्यक्तींचा समृद्ध वारसा लाभलेल्या, देशाला पथदर्शी ठरलेल्या अनेकविध सामाजिक संस्थांचे, चळवळींचे व कायद्यांचे उगमस्थान असणाऱ्या, आपल्या वैभवशाली वारशाची जपणूक करून सतत प्रगतीपथावर उज्ज्वल वाटचाल करताना देशात सातत्याने अग्रक्रमावर असणारे आणि संसदीय लोकशाहीची पताका डौलाने फडकविणाऱ्या महाराष्ट्र राज्याने आपल्या स्थापनेचा हीरक महोत्सव दिनांक ०१ मे, २०२० रोजी साजरा केला.

विधानमंडळाच्या सदस्यांना, विशेषतः नव्याने प्रथमच निवडून आलेल्या सदस्यांना विधानसभेच्या कामकाजाविषयी प्राथमिक स्वरुपाची माहिती मिळावी आणि सभागृहाचे कामकाज कसे चालते याची ढोबळमानाने कल्पना असावी हा या मार्गदर्शिकेचा मुख्य हेतू आहे. सदस्यांना सभागृहात कामकाज करताना मार्गदर्शिकेमधील सभागृहाची रचना, कामकाज व कार्यपध्दती, विविध संसदीय आयुधे, विधिविधान, वित्तीय कामकाज, विशेषाधिकार, विधानमंडळ समित्या, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, ग्रंथालय, संगणकीय व्यवस्था, सदस्यांना मिळणाऱ्या विविध सोयी सुविधा तसेच संसदीय सभ्याचार, रितीरिवाज व शिष्टाचार इत्यादी अनेक विषयांबाबतची एकत्रित माहिती अत्यंत उपयोगी व उद्‌बोधक ठरेल, अशी मला आशा आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व महाराष्ट्र राज्याचा हीरक महोत्सव या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या घटनांचे औचित्य साधून, भारताच्या घटना समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी (१) मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६, (२) गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ व (३) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेल्या एकूण तीन ऐतिहासिक भाषणांचा तसेच घटना समितीच्या दिनांक ०५, ०६, ०८ व ०९ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश यांचा समावेश या पुस्तिकेत करण्यात आला आहे. डॉ.आंबेडकरांची ही तीन समृध्द भाषणे वाचकांना आजही उपयुक्त, उद्‌बोधक आणि मार्गदर्शक ठरतील अशी मला आशा आहे. त्याचप्रमाणे आपल्या राष्ट्राच्या नियतीचा ठेवा असणारा हा अनमोल दस्ताऐवज तयार करण्यासाठी कुशाग्र बुध्दीच्या विविध दिग्गज आणि नामवंतांनी कसे भगीरथ प्रयत्न केले याचीही आपणांस कल्पना येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली तीन्ही भाषणे मराठीत भाषांतरीत करतांना इंग्रजी वाक्‌प्रचार, म्हणी, शब्दार्थांसाठी शक्यतोवर चपखल पर्यायी शब्दयोजना करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आला असून भाषणे पुरेपूर

निर्दोष होतील याकडे लक्ष पूरविण्यात आले आहे. अभ्यासकांना काही शंका उद्‌भवल्यास घटना समिती संदर्भातील भाषणे भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचा त्यांनी अवश्य अभ्यास करावा. तथापि, यामध्ये काही उणीव राहिली असल्यास पुढील आवृत्तीत दूर करण्यात येईल.

नवनिर्वाचित सदस्यांना मार्गदर्शिकेच्या स्वरुपातील हे प्रकाशन अधिकाधिक उपयुक्त ठरावे यादृष्टीने विधानसभा मार्गदर्शिकेत 'भारतीय राज्यघटनेचा प्रारंभ', काही संसदीय आयुधे, 'संसदीय सभ्याचार, रितीरिवाज, संकेत व शिष्टाचार आचारसंहिता', मध्यंतरीच्या कालावधीत विधिमंडळात नव्याने अस्तित्वात आलेल्या समित्या तसेच या सचिवालयातील काही कक्ष, याचबरोबर काही परिशिष्टांचा नव्याने समावेश करण्यात आला असून, यामध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या दिनांक २२ ते २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनापर्यंतची सांख्यिकीय माहिती सर्वसाधारणपणे या प्रकाशनात समाविष्ट करण्यात आली आहे.

या मार्गदर्शिकेत शक्य तेवढी अचूक व अद्यायावत माहिती देण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात आला आहे. सभागृहाचे प्रचलित अधिकृत नियम वा निदेश, संविधान व संबंधित विविध अधिनियम यांतील तरतुदींशी एखादी विसंगती या मार्गदर्शिकेत आढळल्यास, संबंधित प्रकाशनातील अधिकृत तरतुदी ग्राह्य समजल्या जातील. यास्तव सदस्यांनी या महत्वाच्या प्रकाशनांचा देखील बारकाईने अभ्यास करणे इष्ट आहे.

विधानसभा मार्गदर्शिका या पुस्तिकेचे संकलन, संपादन व रचना अथकपणे परिश्रमपूर्वक तयार करण्यासाठी श्री. सुनिल झोरे, अवर सचिव (समिती), तसेच सी.पी.ए./जनसंपर्क कक्षातील श्री.प्रदिप टिबे, सहायक कक्ष अधिकारी, श्री. महेश जगताप, लिपिक-टंकलेखक तसेच श्री. अजय पुरारकर, नाईक यांचे अनमोल सहकार्य लाभले त्याबाबत ते प्रशंसेस पात्र असून, त्याबद्दल त्यांचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करणे आवश्यक वाटते.

विधानसभा मार्गदर्शिकेची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही विधायक सूचना, सुधारणा असल्यास त्याचे देखील स्वागतच केले जाईल आणि त्यांची निश्चितच यथायोग्य दखल घेतली जाईल.

सभागृहाचे कामकाज करताना सदस्यांना हे प्रकाशन उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

विधान भवन,
मुंबई- ४०० ०३२
दिनांक १० डिसेंबर २०२१.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले

भारतीय राज्यघटनेचा प्रारंभ

		पृ.क्र.
१.	राज्यघटनेसंबंधी....	१
२.	१९३५ च्या कायद्याचा जनक - लॉर्ड बटलर	७
३.	काही महत्त्वाचा तपशील	८
४.	भारतीय घटना समितीची राज्यनिहाय सदस्य संख्या	९
५.	घटना समितीच्या अंतर्गत समित्या	११
६.	घटना समितीची अधिवेशने	११
७.	राज्यघटनेचे सांस्कृतिक अंतरंग	१२
८.	घटना समितीच्या कामकाजाचा पहिला दिवस-दिनांक ०९ डिसेंबर, १९४६	१५
९.	पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीस सादर केलेला 'उद्दिष्ट ठराव'	१६
१०.	उद्देशिका	१८
११.	PREAMBLE	१९
१२.	भारतीय राज्यघटना : चर्चा आणि मंजुरी	२०
१३.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ रोजी केलेले भाषण	२१
१४.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर गुरुवार, दिनांक ०४ नोव्हेंबर, १९४८ रोजी केलेले भाषण	२७
१५.	घटना समितीच्या शुक्रवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश	४३
१६.	घटना समितीच्या शनिवार, दिनांक ०६ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश	४८
१७.	घटना समितीच्या सोमवार, दिनांक ०८ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश	५२
१८.	घटना समितीच्या मंगळवार, दिनांक ०९ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश	५६
१९.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेले शेवटचे भाषण	६०

प्रकरण दुसरे

पृ.क्र.

महाराष्ट्र विधानसभेचा थोडक्यात इतिहास ७५

प्रकरण तिसरे

सभागृहाची रचना, कामकाज व कार्यपद्धती

१. सभागृहाची सदस्य संख्या/मुदत ८५

२. सभागृहाची अधिवेशने (समन्स/अधिसूचना/कार्यावली व दिनदर्शिका) ८६

३. अधिवेशन संस्थगित करणे व पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा ८७

४. सभागृहाची वेळ व बैठकीचा कालावधी ८८

५. सदस्यांचा हजेरीपट ८८

६. सभागृहातील आसन व्यवस्था ८९

७. नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी ८९

८. पक्षांतराच्या कारणावरून निरर्हता ९०
(Disqualification on Ground of Defection)

९. अस्थायी अध्यक्षांची नेमणूक (Appointment of Pro tem□Speaker) ९३

१०. विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक ९३

११. सभागृहातील गणपूर्ती (Quorum) ९४

१२. राज्यपालांचे अभिभाषण (Governor's Address) ९५

१३. दिवसाच्या कामकाजाचा क्रम (Order of Business for the Day) ९६

१४. सभागृहाची कार्यक्रमपत्रिका ९७

१५. नवीन मंत्र्यांचा/सदस्यांचा परिचय ९८

१६. सभाध्यक्ष तालिका (Panel of Chairmen) ९९

१७. विविध महामंडळे व स्वायत्त संस्थाचे अहवाल सभागृहासमोर ठेवणे ९९

१८. चौकशी अहवाल ९९

१९. हरकतीचा मुद्दा (Point of Order) १००

२०. व्यक्तींविरुद्ध मानहानीकारक वा अपमानास्पद अभिकथन १००
(Allegation against a Person)

२१. वैयक्तिक स्पष्टीकरणे (Personal Explanations) १०२

२२. मतमोजणी (Division of Motion - डिव्हीजन) १०२

२३. महा-अधिवक्ता (Advocate General) यांची विधिमंडळ सभागृहातील उपस्थिती .. १०३

प्रकरण चौथे

विविध संसदीय आयुधे (Parliamentary Devices)

		पृ.क्र.
२४.	प्रश्नोत्तरे	१०४
२५.	तारांकित प्रश्न	१०५
२६.	अल्पसूचना प्रश्न	१०६
२७.	अतांरांकित प्रश्न	१०७
२८.	कोणते प्रश्न स्वीकृत होतात ?	१०७
२९.	प्रश्न अस्वीकृत केंव्हा होतात ?	१०८
३०.	प्रश्न विचारताना सदस्यांनी घ्यावयाची दक्षता	१०९
३१.	बॅलट	११०
३२.	प्रश्न सूची	१११
३३.	सभागृहातील प्रश्न पद्धती	१११
३४.	अधिक माहिती	११२
३५.	पुनरीक्षित उत्तर	११२
३६.	खाजगी सदस्यांस उद्देशून प्रश्न	११२
३७.	प्रस्ताव (Motion)	११२
३८.	स्थगन प्रस्ताव (Adjournment Motion)	११४
३९.	लक्षवेधी सूचना (Calling Attention)	११७
४०.	अर्धा-तास चर्चा (प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवणारी तसेच सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींसंबंधी (सर्वसाधारण)	११८
४१.	अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion)	१२१
४२.	अंतिम आठवडा प्रस्ताव (Last Week Motion)	१२१
४३.	मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (No Confidence Motion)	१२२
४४.	मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (Confidence Motion)	१२३
४५.	अध्यक्षांना /उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा प्रस्ताव (Motion for Removal of Speaker/Dy.Speaker)	१२४
४६.	ठराव (Resolution)	१२७

पृ.क्र.

४७. अशासकीय ठराव १२७
(Private Member's Resolution /Non-Official Resolution)

४८. शासकीय ठराव (Government Resolution) १२८

४९. सांविधिक प्रस्ताव (Statutory Motions) १३०

५०. मंत्र्यांचे निवेदन (Statement by a Minister) १३०

५१. अभिनंदनपर प्रस्ताव (Motion of Congratulation) १३०

५२. शोक प्रस्ताव (Motion of Condolence) १३०

५३. विनंती अर्ज (Petitions) १३१

५४. अशासकीय विधेयके (Private Member's Bills/Non-Official Bills) १३१

५५. औचित्याचा मुद्दा (Point of Propriety) १३२

प्रकरण पाचवे

विधिविधान (Legislation)

५६. शासकीय विधेयके (Government Bills) १३३

५७. राज्य विधानमंडळाने विविध विषयांवरील संमत केलेले महत्त्वाचे अधिनियम १३५

५८. अध्यादेश (Governor's Ordinances) १६०

५९. संविधान सुधारणेचे अनुसमर्थन (संमती देणे) १६०
(Ratification of Amendment to the Constitution)

प्रकरण सहावे

वित्तीय कामकाज (Financial Business)

६०. अर्थसंकल्पीय प्रक्रिया १६१

६१. अर्थसंकल्प (Annual Financial Statement - *Budget*) १६२

६२. अर्थसंकल्पाची रचना (एकत्रित निधी, आकस्मिकता निधी व लोक लेखा) १६३

६३. लेखानुदान (Vote on Account) १६७

६४. अर्थसंकल्पीय भाषण १६८

६५. अर्थसंकल्पयीय प्रकाशने १६८

६६. पूरक मागण्या (Supplementary Demands) १७९

६७. अधिक खर्चाच्या मागण्या (Excess Demands) १७९

६८. अर्थसंकल्पावरील चर्चा १८०

पृ.क्र.

६९. चर्चारोध (Guillotine) १८१

७०. कपात सूचना (Cut Motions) १८२

७१. कपात सूचना देण्यासंबंधीचे संकेत १८३

७२. म.वि.स. नियम-२५६ खालील प्रस्ताव (कपात सूचना) तयार करण्याबाबतचे अनुदेश १८४

७३. पूरक मागण्या/लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या/ अतिरिक्त मागण्या १८६

७४. लेखानुदान / विनियोजन अधिनियम १८७

७५. विनियोजन विधेयकावरील चर्चेवेळी उपस्थित करावयाचे मुद्दे १८७

७६. स्थूल मागण्या १८८

७७. खर्चाचे पूरक विवरणपत्र / अधिक खर्चाचे विवरणपत्र १८८

७८. नवीन खर्च १८९

प्रकरण सातवे

विशेषाधिकार (Privileges)

७९. विशेषाधिकार १९०

८०. मूळ विशेषाधिकार १९१

८१. विशेषाधिकारांची आवश्यकता १९१

८२. विशेषाधिकारांबाबत निकष १९१

८३. भारतीय संविधानातील विशेषाधिकार संदर्भातील अन्य तरतुदी १९२

८४. विविध अधिनियम व नियमांमधील तरतुदी १९२

८५. विशेषाधिकार भंग १९३

८६. सभागृहाचा अवमान १९४

८७. विशेषाधिकाराचे प्रश्न १९४

८८. सदस्यांना अटक, स्थानबध्दता, सुटका इ. १९५

८९. सभागृहाचे विशेषाधिकार व फौजदारी कार्यवाही १९५

प्रकरण आठवे

समिती पद्धती

		पृ.क्र.
९०.	समिती पध्दती	१९६
९१.	महाराष्ट्र विधानमंडळाच्या तदर्थ समित्या	२००

प्रकरण नववे

९२.	**विधानमंडळ समित्या**	२०२
	(अ) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या	
	१ अंदाज समिती	२०४
	२ लोकलेखा समिती	२३७
	३ सार्वजनिक उपक्रम समिती	२६५
	४ पंचायत राज समिती	२७६
	५ रोजगार हमी योजना समिती	२९५
	६ उप विधान समिती	३२५
	७ अनुसूचित जाती कल्याण समिती	३३१
	८ अनुसूचित जमाती कल्याण समिती	३३८
	९ विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती	३५२
	१० महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती	३५५
	११ इतर मागासवर्ग कल्याण समिती	३६४
	१२ अल्पसंख्याक कल्याण समिती	३७०
	१३ मराठी भाषा समिती	३७४
	(ब) दोन्ही सभागृहांच्या स्वतंत्र समित्या	
	१४ कामकाज सल्लागार समिती	३७९
	(Business Advisory Committee- BAC)	
	१५ विशेषाधिकार समिती	३८१
	१६ विनंती अर्ज समिती	३८६
	१७ आश्वासन समिती	३८९
	१८ नियम समिती	४००

पृ.क्र.

१९ अशासकीय विधेयके व ठराव समिती (Committee on Private Member's Bills and Resolutions) ४०१

२० सदस्य अनुपस्थिती समिती ४०४

(क) अधिनियमानुसार संयुक्त समित्या

२१ सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत संयुक्त समिती ४०८

२२ माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत संयुक्त समिती ४०८

(ड) तद्‌र्थ स्वतंत्र समित्या

२३ सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत समिती ४०९

(ई) तद्‌र्थ संयुक्त समित्या

२४ ग्रंथालय समिती ४१२

२५ आमदार निवास व्यवस्था समिती ४१२

२६ आहार व्यवस्था समिती ४१३

२७ धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणेसंदर्भात समिती (Joint Ad Hoc Committee on Inspection of Charitable Private Hospitals) ४१४

२८ महाराष्ट्र विधीमंडळ 'एड्‌स' चर्चापीठ (Maharashtra Legislature's Forum on AIDS) ४१९

२९ वातावरणीय बदलासंदर्भातील समिती (Joint Ad Hoc Committee on Climate change) ४२१

३० आमदार निवास येथील निवास व आहार व्यवस्था याबाबत उच्चाधिकार समिती व उप समिती (High Power Committee on Management of Hostel and Catring Services for Members of the Maharashtra Legislature) ४२५

प्रकरण दहावे

९३. राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा (Commonwealth Parliamantary Association – CPA—Maharashtra Branch) ४२९

प्रकरण अकरावे

पृ.क्र.

९४. पीठासीन अधिकाऱ्यांची परिषद, सचिवांची परिषद (All India Presiding Officers' Conference - AIPOC and Conference of Secretaries) ४४०

प्रकरण बारावे

९५. ग्रंथालय व संदर्भ सेवा ४४१

९६. संगणकीय व्यवस्था ४४६

प्रकरण तेरावे

९७. अनुवाद तथा संपादन (Transalation *cum* Editing) ४५०

९८. प्रतिवेदन (Reporting) ४५१

९९. फीतध्वनी मुद्रण व्यवस्था (Audio-Video Recording) ४५२

१००. टंकलेखन (Typing) ४५२

१०१. वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र ४५३

१०२. महिला तक्रार निवारण समिती ४५९

प्रकरण चौदावे

१०३. सभागृहातील ध्वनिक्षेपण, भाषांतर व मतदान यंत्रणा ४६२

१०४. ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक कक्ष (Mic Oprator *cum* Mechanic) ४६६

प्रकरण पंधरावे

१०५. सुरक्षा व्यवस्था ४६९

१०६. अग्निशमन व्यवस्था ४७३

प्रकरण सोळावे

विधिमंडळाच्या सदस्यांकरिता विविध सोयी व सुविधा

१०७. विद्यमान सदस्यांना ओळखपत्र, मार्ग प्रवासपत्र/ बॅज व्यवस्था ४७६

१०८. लेखन सामग्री पुरवठा व्यवस्था ४७६

१०९. अधिवेशन कालावधीत, सदस्यांना सभागृहात त्यांचेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाव्दारे (पिजन होल) विविध कागदपत्रे, प्रकाशने पुरविणे इ.व्यवस्था ४७७

११०. निवास,वाहन,वैद्यकीय सोयी इ.व्यवस्था ४७७

१११. पोस्ट ऑफिस, स्टेट बँक इ.व्यवस्था ४७८

११२. विद्यमान / माजी सदस्य व त्यांच्या कुटुंबियांसाठी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती ४७८

पृ.क्र.

११३. मा.सदस्यांचे स्वीय सहाय्यकांना ओळखपत्र व्यवस्था ४७९

११४. माजी सदस्यांना ओळखपत्र व्यवस्था ४७९

११५. माजी सदस्यांसाठी निवृत्ती वेतन/कुटुंबवेतन ४७९

११६. गॅलरी प्रवेशपत्रिका ४८०

११७. वृत्तपत्र प्रतिनिधींना वार्ताहर गॅलरीत प्रवेश ४८०

प्रकरण सतरावे

११८. महत्त्वाची प्रकाशने ४८२

१ संक्षिप्त अहवाल ४८२

२ सदस्यांसाठी पत्रके (बुलेटिन्स) प्रकाशने ४८२

(अ) पत्रक भाग-१

(ब) पत्रक भाग-२

प्रकरण अठरावे

११९. संसदीय सभ्याचार, रितीरिवाज, संकेत व शिष्टाचार आचारसंहिता ४८४

परिशिष्टे

१. विधानमंडळ सचिवालय कार्यालय व्यवस्था ५०३

२. विधानमंडळाचे दूरध्वनी क्रमांक ५१२

३. राज्यपाल (बॉम्बे प्रेसिडेंसी, मुंबई प्रांत व महाराष्ट्र राज्य) (सन १६६२ ते २०२१) ५२१

४. मुख्यमंत्री (सन १९३७ ते २०२१) ५२७

५. विधानपरिषद सभापती (सन १९३७ ते २०२१) ५२९

६. विधानसभा अध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) ५३०

७. विधानसभा अस्थायी अध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) ५३१

८. विधानपरिषद उप सभापती (सन १९३७ ते २०२१) ५३२

९. विधानसभा उपाध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) ५३३

१०. विधानपरिषद विरोधी पक्षनेते (सन १९३७ ते २०२१) ५३४

११. विधानसभा विरोधी पक्षनेते (सन १९३७ ते २०२१) ५३५

१२. महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव / प्रधान सचिव (सन १९३७ ते २०२१) ५३७

१३. विधानसभा गठीत व विसर्जित केल्याचा दिनांक (सन १९५२ ते २०२०) ५३८

		पृ.क्र.
१४.	विधानसभा अधिवेशनातील बैठकींची एकूण संख्या (सन १९६१ ते २०२१)	५४०
१५.	xEEEEEEEEE(Nagpur Agreement) (दिनांक २८ सप्टेंबर, १९५३)	५४८
१६.	महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचा कालावधी व बैठकींची एकूण संख्या (सन १९६० ते २०२१)	५५०
१७.	मा. राज्यपालांचे अभिभाषण व अभिभाषणावरील चर्चा (सन १९५२ ते २०२१)	५५३
१८.	नविन विधानसभा अस्तित्वात आल्याचे वर्ष/प्रथम अधिवेशनाचा कालावधी/ अध्यक्षांची निवडणूक (सन १९५७ ते २०२१)	५५६
१९.	अर्थसंकल्पाबाबत वर्षनिहाय माहिती-सन १९८५ पासून	५५८
२०.	पूरक मागण्यांबाबत वर्षनिहाय माहिती-सन १९८५ पासून	५६९
२१.	संविधान सुधारणा संदर्भातील विधानसभा सभागृहात मांडण्यात आलेल्या ठरावांची यादी - सन १९७१ पासून	५७९
२२.	विधानसभा सदस्यांना निलंबित केल्याबाबतची माहिती - सन १९६४ पासून	५८३
२३.	मान्यवरांच्या अभिनंदनाचे प्रस्ताव-सन १९६९ पासून	६१३
२४.	विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त मान्यवरांचे शोक प्रस्ताव-सन १९४८ पासून	६१८
२५.	महाराष्ट्र विधानसभा नवनिर्वाचित सदस्यांद्वारे शपथ/दृढकथन-नमुना	६२५
२६.	विधानमंडळ सदस्यांचे वेतन/भत्ते आणि इतर सुविधा	६३०
२७.	अखिल भारतीय पीठासीन अधिकारी (AIPOC) व सचिव परिषद- सन १९२१ ते २०२१	६३४
२८.	महाराष्ट्र विधानसभा - पक्षनिहाय सदस्य संख्या(दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीनुसार)	६३८
२९.	विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम सन-२०२२	६३९

श्री. नरहरी झिरवाळ
मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा

श्री. राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय



विधान भवन, मुंबई - विद्युत रोषणाईतील इमारत

(२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन, १ मे - महाराष्ट्र राज्य स्थापना दिन व १५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन
प्रतिवर्षी या तीन दिवशी विधान भवन इमारत विद्युत रोषणाईत झळाळून निघते.)

विधान भवन - नागपूर

प्रकरण पहिले

भारतीय राज्यघटनेचा प्रारंभ

(१) राज्यघटनेकडे वाटचाल....

भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून १५ ऑगस्ट, १९४७ रोजी मुक्त झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने आपली राज्यघटना बनवली व २६ जानेवारी, १९५० पासून भारत सार्वभौम गणराज्य म्हणून जगाच्या नकाशावर झळकू लागला.

ईस्ट इंडिया कंपनीने भारतात व्यापार करण्यासाठी इंग्लंडच्या राणीकडून सनद मिळविली व अनेक राजकीय उलाढाली आणि भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करून एका शतकात बराच मुलूख बळकाविला. यामुळे साहजिकच ब्रिटिश सरकारचे कंपनीच्या कारभाराकडे लक्ष वेधले आणि त्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश संसदेने १७७३ साली ' रेग्युलेटिंग ॲक्ट ' संमत केला. या ॲक्ट अन्वये ब्रिटिश संसदेने भारतात दखल घेण्यास प्रारंभ करून कंपनीने जिंकलेल्या मुलखाच्या कारभाराची जबाबदारी स्वत:कडे घेतली. मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन सत्ताकेंद्रांचे एकीकरण करून बंगालच्या गव्हर्नरला, गव्हर्नर जनरलचे अधिकार देण्यात आले आणि मुंबई व मद्रास प्रांतांच्या गव्हर्नरांवर देखरेख ठेवण्याची कामगिरी त्यांच्याकडे सोपविली. गव्हर्नर जनरल यांच्या मदतीसाठी चार सभासदांचे कार्यकारी मंडळ नेमण्यात आले व कार्यकारी मंडळाच्या बहुमतानुसार कारभार करण्याचे बंधन घालण्यात आले.

कंपनीच्या कारभारावर ब्रिटिश संसदेचे नियंत्रण हळूहळू वाढू लागले. ब्रिटिश संसदेने १७८४ चे इंडिया बिल मंजूर करून भारताच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्याकडे घेण्यास सुरुवात केली. चार्टर ॲक्ट्स नुसार व्यापारासाठी कंपनीला दिलेल्या सनदांची मुदत १७९३ साली संपल्यामुळे ब्रिटिश संसदेने ती मुदत वीस वर्षांनी वाढवून दिली. यानंतर १८१३, १८३३ व १८५३ मध्ये कंपनीला नव्या सनदा देण्यात आल्या. ब्रिटिशांच्या धोरणामुळे देशात असंतोष निर्माण होऊन १८५७ मध्ये पहिले स्वातंत्र्ययुद्ध झाले. यानंतर भारतातील शासनाची सर्व सूत्रे ब्रिटिश संसदेने आपल्या हाती घेतली. यासाठी १८५८ मध्ये कायदा मंजूर करून ब्रिटिश राजसत्तेचा प्रतिनिधी म्हणून व्हाइसरॉयची नेमणूक करण्यात आली. याचवेळी इंग्लंडच्या राणीने एक जाहीरनामा काढून जनतेच्या धार्मिक बाबतीत सरकार कोणतीही ढवळाढवळ करणार नाही व सर्वांना समानतेने वागविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. भारतातील कारभारावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्याकडे सोपवून त्यांना मदत करण्यासाठी पंधरा सभासदांचे कौन्सिल नेमण्यात आले.

यानंतर १८६१ चा कौन्सिल ॲक्ट हा राज्यघटनेच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. यामुळे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल अस्तित्त्वात येऊन कामकाजाचा श्रीगणेशा सुरू झाला. १८९२ या महत्त्वाच्या व दूरगामी स्वरुपाच्या कौन्सिल ॲक्टनुसार सदस्य संख्या वाढवण्यात आली व मध्यवर्ती कौन्सिलवर सभासद निवडून देण्याची तरतूद करण्यात येऊन सरकारी अंदाजपत्रकावर चर्चा करण्याचा व सार्वजनिक हिताचे प्रश्न विचारण्याचा अधिकार सदस्यांना प्राप्त झाला. १८९५ मध्ये अद्याप अज्ञात असलेल्या एका व्यक्तीने " The Constitution of India Bill " ब्रिटिश संसदेला सादर केले. त्यातील १६ व्या कलमात भाषण-स्वातंत्र्य, मोफत शिक्षणाचा

अधिकार इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. १९०८ मध्ये ब्रिटिश संसदेने जो कायदा मंजूर केला तो मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा म्हणून प्रसिद्ध आहे. या कायद्याच्या तरतूदीनुसार मध्यवर्ती असेंब्ली व प्रांतिक कायदेमंडळात सदस्य संख्या निश्चित करण्यात आली. १९१७ मध्ये लॉर्ड मॉंटेग्यू व व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड या दोघांनी देशात सर्वत्र हिंडून सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार ब्रिटिश संसदेने १९१९ मध्ये कायदा मंजूर करून प्रांतिक कायदेमंडळात द्विदल राज्यपद्धतीचा स्वीकार करण्यात आला व अनेक सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांचे खरे स्वरुप उघडकीस आल्यानंतर देशात सर्वत्र प्रतिकूल प्रतिक्रिया उमटल्यामुळे १९१९ च्या कायद्यातील तरतूदीनुसार याबाबतच्या यशापयशाची चौकशी करण्यासाठी नोव्हेंबर, १९२७ कमिशन नेमल्याची घोषणा करण्यात आली. सायमन कमिशनचा अहवाल संसदेमध्ये येण्यापूर्वीच हिंदी जनतेच्या प्रतिनिधींची बैठक लंडन येथे बोलाविण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. सायमन कमिशनचा अहवाल १९३० मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालातील शिफारशीनुसार लंडन येथे पहिली गोलमेज परिषद १९३० मध्ये बोलाविण्यात आली. या परिषदेसाठी काँग्रेसने आपले प्रतिनिधी पाठविण्याचे नाकारले. १९३१ मध्ये गांधी-आर्यविन करार होऊन कायदेभंगाच्या चळवळीतील सर्व राजकीय पुढाऱ्यांची मुक्तता करण्यात आली. १९३१ मध्ये झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी काँग्रेसने म. गांधी यांना आपला एकमेव प्रतिनिधी म्हणून पाठविले. यानंतर १९३२ मध्ये तिसरी गोलमेज परिषद भरविण्यात आली यातील चर्चेच्या अनुरोधाने नवीन कायदा करण्याचे ठरविण्यात आले. हा नवा कायदा १९३५ चा कायदा म्हणून प्रसिद्ध आहे. १९ ऑगस्ट, १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर करण्यात आला. याचा निषेध म्हणून म. गांधींनी येरवडा तुरूंगात प्राणांतिक उपोषणास सुरुवात केली. त्यांच्या उपोषणामुळे देशात सर्वत्र चिंतेचे वातावरण पसरले व या प्रश्नावर तोड काढण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. शेवटी म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अन्य नेते यांच्यामध्ये एक करार झाला तो करार 'पुणे करार' म्हणून प्रसिद्ध आहे. १९३५ च्या कायद्यानुसार मध्यवर्ती सरकारची व्यवस्था फेडरल (संघराज्य) पद्धतीनुसार ठरविण्यात येऊन प्रांतांचा समावेश आवश्यक व संस्थानिकांचा समावेश ऐच्छिक ठेवण्यात आला.

१९३९ मध्ये सुरू झालेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धात हिंदी जनतेचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्स भारतात आले. त्यांनी सादर केलेली (त्रिमंत्री) योजना भारतातील सर्व पुढाऱ्यांनी फेटाळून लावली. १९४० साली लाहोरच्या अधिवेशनात मुस्लिम लीगने पाकिस्तान मागणीबाबत ठराव केला. क्रिप्स योजना नाकारल्यानंतर ०८ ऑगस्ट, १९४२ रोजी गोवालिया टँक, मुंबई येथे काँग्रेसच्या बैठकीत ' चले जाव ' चा ठराव मंजूर करण्यात आला. १९४५ पर्यंत देशाच्या राजकीय परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. १४ जून, १९४५ रोजी व्हॉइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी सिमला येथे सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांची बैठक बोलवून आपली योजना सादर केली. मुस्लिम लीगच्या मागणीमुळे परिषद असफल झाली. याच सुमारास इंग्लंडमध्ये निवडणूका होऊन श्री. ॲटली यांच्या नेतृत्त्वाखाली मजूर पक्षाचे सरकार अधिकारावर आले.

फेब्रुवारी, १९४६ मध्ये मुंबईत नौदलाचे जे बंड झाले त्यामुळे अखेर ब्रिटिश सरकारला आपले राज्य कोसळते आहे हे एकदाचे पटले आणि याचा परिपाक म्हणून ब्रिटिश संसदेने लॉर्ड पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स व अलेक्झांडर या ब्रिटिश मंत्रीमंडळातील तीन सदस्यांचा समावेश असलेले एक शिष्टमंडळ कॅबिनेट मिशन-त्रिमंत्री मंडळ-योजना सादर करण्यासाठी भारतात २३ मार्च, १९४६ रोजी पाठविले. सदर मंडळाने १६ मे, १९४६ रोजी एक योजना सुचविली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्त्वाखाली ०२ सप्टेंबर, १९४६ रोजी हंगामी सरकार बनविण्यात आले. इंग्लंडचे पंतप्रधान श्री. ॲटली यांनी २० फेब्रुवारी, १९४७ रोजी भारत सोडण्याची घोषणा केली व २४ मार्च, १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन व्हॉइसरॉय व गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आले. सर्व नेत्यांशी वाटाघाटी केल्यानंतर ०३ जून, १९४७ रोजी भारताची फाळणी करण्याची योजना जाहीर करण्यात आली. याबाबत ०४ जुलै, १९४७ रोजी ब्रिटिश संसदेमध्ये "Indian Independenace Act" विधेयक मांडण्यात येऊन १८ जुलै, रोजी संमत करण्यात आले. हाच भारतीय स्वातंत्र्याचा कायदा म्हणून ओळखण्यात येतो. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत व पाकिस्तान अशी दोन राज्ये स्थापित करण्याची व्यवस्था या कायद्यात नमूद करण्यात आली. दोन्ही राज्यांनी आपापली घटना तयार करावी, हिंदी संस्थानांवरील ब्रिटिशांची हुकूमत नष्ट करण्यात यावी व संस्थानांना भारतात अगर पाकिस्तानात सामील होण्याची अथवा स्वतंत्र राहण्याची तरतूद करण्यात आली. अशा रितीने १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

स्वातंत्र्याच्या उषःकालाचे स्वागत करण्यासाठी दिनांक १४ ऑगस्ट, १९४७ च्या मध्यरात्री घटना समितीची बैठक भरली. पंडित जवाहरलाल नेहरु यांचे या प्रसंगीचे भाषण हे हृदयाला जास्तीत जास्त भिडणाऱ्या व समयोचीत अशा त्यांच्या भाषणांपैकी एक होते, आणि ते करताना त्यांनी एक अमर असा वाक्यप्रयोग निर्माण केला :—

"दीर्घ काळापूर्वी आम्ही स्वतःला भवितव्यतेशी एका संकेताने बांधून घेतले होते, आणि आता त्या संकेताची पूर्ती करण्याची वेळ आली आहे; संपूर्णपणे नव्हे, पुरेपूर माप भरुन नव्हे, तरीही पुष्कळच भरीवपणे आम्ही ती पूर्ती करणार आहोत. बरोबर मध्यरात्रीचा टोला पडेल तेव्हा, ज्या वेळी जग झोपते त्या वेळी भारत जागे होऊन चैतन्य व स्वातंत्र्य यांनी रसरसलेले असेल. असा एक क्षण येतो की जेव्हा आपण जुन्यातून नव्यात प्रवेश करतो; आणि असा क्षण इतिहासात क्वचित्च येतो की, जेव्हा एका युगाचा अंत होतो, आणि जेव्हा दीर्घ काळ दडपल्या गेलेल्या एका राष्ट्राच्या आत्म्याला आविष्काराचा वाव सापडतो. या पवित्र क्षणी भारताच्या सेवेप्रीत्यर्थ व त्याच्या जनतेसाठी आणि त्याहून विशाल अशा मानवतेसाठी स्वतःला वाहून घेण्याची आपण शपथ घेणे उचित होईल."

भारतासाठी संविधान तयार करण्यास घटना समिती बनविण्यात यावी ही कल्पना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २७ व २८ डिसेंबर, १९३६ ला फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात विस्ताराने मांडली. त्यानंतरच्या काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात याबाबत पाठपुरावा करण्यात आला. १९४६ मध्ये ब्रिटिश सरकारने पाठविलेल्या शिष्टमंडळाच्या योजनेत यास मान्यता देण्यात आली. प्रांतिक कायदेमंडळातर्फे घटना समितीचे प्रतिनिधी निवडून घटना समितीने ब्रिटिश सरकारच्या देखरेखीखाली घटना तयार करावी असे त्या योजनेत नमूद केले होते.

तत्कालीन भारत सरकारमध्ये एक सुधारणा खाते म्हणून राजकीय सुधारणांचे काम पाहणारे खाते अस्तित्त्वात होते. पुढे संस्थानांच्या सामिलीकरणात ज्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली ते व्ही.पी. मेनन (वापाल पणगुन्नी मेनन) या खात्याचे मुख्य चिटणीस होते. त्यांच्याकडे सचिवालयाची रचना प्रस्तावित करण्याचे व सुधारणा खात्यातील भारतीय नागरी सेवेतील (I.C.S.) कुशाग्र बुद्धीचे अधिकारी बेनेगल नरसिंग राव यांच्याकडे घटना समितीच्या कार्यालयाची रचना करण्याचे काम सोपविण्यात आले. भारतीय राज्यघटनेसाठी १२ वर्षे घटनात्मक

कायद्यांचा अभ्यास करून जानेवारी, १९४६ मध्ये त्यांनी 'Outline of new Constitution' या शीर्षकाचे एक टिपण तयार केले होते. ऑक्टोबर, १९४७ मध्ये राव यांनी घटनेचा प्राथमिक आराखडा घटना समितीला सादर केला. घटनेतील महत्त्वाच्या तरतूदी काय असाव्या या विषयीची एक प्रश्नावली राव यांनी तयार केली. प्रत्येक बाबी संबंधी अमेरिका, स्विर्झलँड, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका या देशांच्या घटनेत काय व्यवस्था आहे याची तुलनात्मक माहिती देऊन तयार केलेली ही प्रश्नपत्रिका घटना समितीच्या व प्रांतिक विधिमंडळाच्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आली होती. अगदी घटना समितीच्या कामकाजास प्रारंभ होताना अध्यक्षांची निवड कशी व्हावी इथपासून ते घटनेत दुरुस्ती करण्याची काय पद्धत असावी इथपर्यंत सर्व बाबींसंबंधी त्यांनी अभ्यासपूर्ण टिपणी तयारी केली तसेच संघराज्यासाठी करावयाची घटना व राज्यांसाठी करावयाची घटना या दोन्हींचे वेगवेगळे मसुदे राव यांनी तयार केले. त्यांना घटना समितीचे प्रारुपक एस.एन. मुखर्जी यांनी मदत केली. हे मसुदे घटना समितीने त्यासाठी नेमलेल्या समित्यांसमोर विचारांसाठी सादर केले. त्या अगोदर राव यांनी घटना समितीच्या अध्यक्षांच्या सूचनेवरून अमेरिका, कॅनडा, आयर्लंड आणि ब्रिटन या देशांना भेट देऊन तेथील न्यायाधीश व घटनातज्ञ यांच्याबरोबर त्या-त्या देशांतील राज्यघटना व अनुषंगीक बाबींसंबंधी चर्चा करून अनुभव जाणून घेतले. भारताची राज्यघटना तयार होत असतानाच १९४६ मध्ये ब्रम्हदेशचे नेते जनरल आँग सॉन दिल्ली येथे आले असताना त्यांनी घटना तयार होण्याच्या प्रक्रियेबद्दल कुतुहल दाखवले व बी.एन. राव यांच्या समवेत चर्चा केली. ब्रम्हदेशाच्या राज्यघटनेचा पहिला मसुदा सुद्धा राव यांनीच केलेला होता.

राज्यघटना हा देशाच्या कारभारासाठीचा मूलभूत कायदा (Basic Law) असतो. राज्यघटना नागरीकांना अधिकार प्रदान करते, राजकीय संस्था आणि राज्यकारभाराच्या अंगांना अधिकार देते आणि मर्यादा सुद्धा घालते. इतर कायदे आणि राज्यघटना यांच्यात महत्त्वाचा फरक असा की, इतर कायद्यांची वैधता राज्यघटनेच्या आधारे तपासली जाते, इतर कायदे सहज परिवर्तनीय असतात, राज्यघटना अनेक पिढ्यांना नियमित करणारी एक, तुलनेने अधिक शाश्वत गोष्ट असते. म्हणूनच १३ व्या शतकात ब्रॅक्टनने लिहून ठेवले आहे की, 'The king shall not be subject to men, but to God and the law since law makes the king.' थॉमस पेनने आपल्या *Rights of Man* या ग्रंथात असे म्हटले आहे की, राज्यघटना देशाची संपत्ती असते, जे राज्य करतात त्यांचीच फक्त ती संपत्ती नसते. राज्य करणारे बदलतात घटना मात्र अनेक राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करू शकते. १७३३ मध्ये बोलिंगब्रूकने केलेली राज्यघटनेची एक व्याख्या के.सी.व्हिअर यांनी आपल्या *Modern Constitutions* या ग्रंथात उद्धृत केली आहे. 'By Constitution, we mean...That assemblage of laws, Institutions and Customs, derived from certain fixed principles of reason...That compose the general system, according to which the community hath agreed to be governed.'

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आल्यानंतर भारतात खऱ्या अर्थाने संसदीय कामकाज पद्धतीला सुरुवात झाली. संसदीय कार्य पद्धतीचा मूळ गाभा म्हणजे **जनतेचे सार्वभौमत्त्व** हा आहे. जनतेचे सार्वभौमत्त्व हे भारतीय संविधानाच्या उद्देशिका/प्रस्ताविकेमध्ये (Preamble) दृगोचर झालेले आहे.

संसदीय कामकाज पद्धतीच्या अभ्यासकाला राज्यघटनेची प्रस्तावना एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. राज्यघटनेच्या उद्देशिकेत संपूर्ण घटनेचे सार अंतर्भूत आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता व दर्जाची समानता ही चर्तु:सुत्री हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. संविधानातील प्रत्येक तरतुदीचा बारकाईने अभ्यास केल्यास या मूल्यांवर आधुनिक भारतीय समाजरचनेचे जडणघडण झालेले दिसते.

संसदीय लोकशाही कार्यपद्धती आपल्या देशाला नवीन नाही. पुरातन काळात सभा, परिषदा, गणराज्ये अस्तित्त्वात होतीच. एवढेच नव्हे तर महाभारत काळात सुद्धा मथुरेत असणारी यादवांची सत्ता म्हणजे गणराज्याचा एक उत्कृष्ट नमुनाच होय. याचबरोबर अलेक्झांडरच्या काळात ग्रीस मध्ये नगरराज्य ही संकल्पना अस्तित्त्वात होती मौर्य, गुप्त यांच्या साम्राज्यात देखील याचा उगम आपल्याला पहावयास मिळतो.

समाजातील विविध समस्या, तंटे यांचे निवारण गावाच्या चावडीवर पंचाच्या माध्यमातून होत होते. 'पाचामुखी परमेश्वर' हा त्या काळातील परवलीचा शब्द होता. मात्र "कायद्याचे राज्य" (Rule of Law) ही संकल्पना आपण ब्रिटीशांकडून घेतली आहे. प्राध्यापक ए.वी.डायसी या तत्त्ववेत्याने १८८५ साली ही संकल्पना खऱ्या अर्थाने विकसित केली. कायद्याची सर्वोच्चता, कायद्यापुढे समानता व घटनाधिष्ठीत मूल्यांचे पालन (Supremacy of Law, Equality before Law and Predominance of Legal Spirit) ही त्याची तत्त्वे जगन्मान्य आहेत. ही तत्त्वे आपल्या राज्यघटनेच्या विविध तरतुदींमध्ये प्रकर्षाने आढळून येतात. किंबहुना, कायद्यापुढे समानता व कायद्याचे राज्य ही संसदीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत.

ब्रिटीश संसदेला लोकशाहीची जननी (Mother of Democracy) असे म्हटले जाते. संसदीय लोकशाहीच्या उगमाचा अभ्यास करावयाचा झाल्यास ब्रिटीश प्रथा, परंपरा, राजेशाही, संसदेने राजाविरुद्ध केलेला अधिकारासाठीचा संघर्ष, मॅग्नाकार्टा, वेगवेगळे कायदे याचा तौलानिक अभ्यास करणे गरजेचे आहे.

ब्रिटीश लोकशाहीला फार मोठा इतिहास आहे. ब्रिटीश राज्यघटना अलिखित स्वरुपाची आहे. तथापि, लोकशाहीची पाळेमुळे ब्रिटनमध्ये घट्ट रुजलेली आहेत. ब्रिटनमध्ये सुद्धा लोकशाही खऱ्या अर्थाने विकसित होण्यासाठी कित्येक शतके उजाडावी लागली. मॅग्नाकार्टा-१२१५, हेबिअस कार्पस कायदा-१६७९, बील ऑफ राईट १६८९, सेटलमेंट कायदा-१७०१, रिफार्म कायदा-१८३२, १८६७, १८८४, म्युनिसिपल कॉर्पोरेशन कायदा-१८७२, ज्युडिकेचर कायदा-१८७३, १८७६, स्थानिक स्वराज्य कायदा-१८८८, १९२९, १९७४ रिप्रेझेंटेशन ऑफ पिपल ॲक्ट-१९१८, समान मतदानाचा १९२८ चा कायदा, स्टॅट्यूट ऑफ वेस्ट मिनिस्टर कायदा-१९३१ इ. महत्त्वाच्या कायद्यांच्या माध्यमातून ब्रिटीश संसदीय पद्धती विकसित झाली.

ब्रिटीश घटनेचे गाढे अभ्यासक प्राध्यापक डब्ल्यू.बी.मुन्रो यांनी असे विधान केले आहे की, *" The British Constitution is a complex amalgam of institutions, principles and practices. It is a composite of Charters and statutes, of judicial decisions, of common law, of prudence usages and traditions. It is not one document but hundreds of them. It is not derived from one source bent from several..... It is a child of wisdom and chance. "*

भारतीय संसदीय प्रणाली ही ब्रिटीश संसदीय पद्धतीवरुन घेतलेली आहे. ब्रिटीश संसदेचा थोडक्यात मागोवा घेतल्यास असे दिसून येते की, सुमारे १३ व्या शतकात 'संसदे'ला प्रारंभ झाला. तत्पूर्वी राजाकडे अनियंत्रित व अमर्याद सत्ता होती व राज्याऐवजी राजा सार्वभौम आहे असे प्रतिपादन करण्यात येत होते. राजाच्या अनिर्बंध अधिकारांविरुद्ध उठाव करण्यात आला आणि सन १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा-ज्याला स्वातंत्र्याचा जाहीरनामा असे संबोधले जाते-त्यावर जॉन राजाने सही केली. जनतेने हक्क प्राप्तीसाठी राजाकडे अर्ज केला होता. मॅग्नाकार्टा व इतर पाच करार असे मिळून ब्रिटीशांना स्वातंत्र्याची सनद मिळाली. या करारामुळे इंग्लंडमध्ये लोकप्रतिनिधीचा कारभार सुरू झाला नाही, पण राजाच्या सत्तेला थोडाफार आळा बसला. पार्लमेंटचे पहिले अधिवेशन १२६५ मध्ये भरले व मर्यादित स्वरुपात का होईना पण लोकप्रतिनिधींचा कारभार सुरू झाला. पहिले अधिवेशन भरविण्याचे कामी सायमन डी. मॉंटफर्ड यांनी पुढाकार घेतला होता. सरदार, जहागिरदार व शहरांचे प्रतिनिधी यांची बैठक बोलाविण्याचा सल्ला त्यानेच राजाला दिला होता व राजालाही खर्चासाठी मंजुरी घेण्यासाठी या लोकांची अनुमती हवी होती. या पहिल्या अधिवेशनात सर्वसाधारण लोकांचे प्रतिनिधी नव्हते, त्यांना १४ व्या शतकामध्ये पार्लमेंटमध्ये प्रथमतः स्थान मिळाले.

पार्लमेंटचे क्षेत्र सुरुवातीस मर्यादित होते. पण राजसत्तेशी लढा देऊन पार्लमेंटने आपले अधिकार वाढवून घेतले. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात पार्लमेंटला सार्वभौम स्वरुप प्राप्त झाले. या लढ्यात पार्लमेंट, राजाकडून एकेक अधिकार मिळवित होते तर दुसरीकडे लोकांचे मताधिकार वाढवून पाया अधिक व्यापक करीत होते. ब्रिटीश संसदेला ८०० वर्षाची प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक विधिमंडळाची जननी म्हणून हे पार्लमेंट मानले जात आहे व सर्व लोकशाही देशांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरत आहे.

ब्रिटीश कॅबिनेट पद्धती ही सुद्धा जगातील एक आगळीवेगळी पद्धती असून, संसदीय लोकशाही या कॅबिनेट पद्धतीचा गाभा आहे. ही पद्धती विकसित करण्यास १८ वे शतक उजाडावे लागले. हॅनोवर राजाच्या कारकिर्दीमध्ये या कॅबिनेट पद्धतीचा उगम झालेला आढळून येतो. सर रॉबर्ट वालपोल, रॉबर्ट पिल, पामर्स स्टोन आणि क्लॅड स्टोन या ब्रिटीश पंतप्रधानांचे या बाबत फार मोठे योगदान आहे.

घटना समितीमध्ये स्वतंत्र भारतासाठी कोणती राज्य पद्धती स्वीकारावी यावर घटनाकारांनी साधक-बाधक चर्चा करुन, सखोल विचारमंथन केले. त्यांनी विविध लोकशाही देशांचा व राज्य पद्धतींचा सखोल अभ्यास केला. अमेरीका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स, आयर्लंड इ. देशांच्या राज्य पद्धतीचे सूक्ष्म अवलोकन केले. अमेरिकेमधील संघराज्यात्मक व अध्यक्षीय लोकशाही पद्धत, ब्रिटनमधील संसदीय लोकशाही यांचा तौलानिक अभ्यास करून भारताला कोणती पद्धती अधिक योग्य राहील याचा उहापोह केला.

अमेरिकन अध्यक्षीय पद्धतीमध्ये अध्यक्ष हा थेट जनतेद्वारे निवडला जातो व तो अमेरिकन संस्थेला जबाबदार नसतो. अमेरिकन संसद निवडून आलेल्या अध्यक्षाला अविश्वास प्रस्तावाच्या माध्यमातून काढू शकत नाही. सत्ता विभाजनाचा सिद्धांत व संघराज्यात्मक कार्यपद्धती ही अमेरिकन राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. संसद, कार्यकारी प्रशासन व न्याय मंडळे ही स्वतंत्र असून स्थिर शासनाच्या संकल्पनेवर अमेरिकन घटना आधारित आहे.

मात्र घटनाकारांनी भारतासाठी या अध्यक्षीय शासन पद्धतीऐवजी संसदीय शासन पद्धती सुयोग्य मानली. या पद्धतीला जबाबदार शासन पद्धती असे म्हणता येईल. अमेरीकेमध्ये अध्यक्ष कार्यकारी असून भारतात हे अधिकार संसदेला आहेत. या पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकारी प्रशासन हे संसद/विधिमंडळाला जबाबदार आहे. संसदेप्रती कार्यकारी प्रशासनाचे उत्तरदायित्त्व हा संसदीय कार्यपद्धतीचा गाभा आहे. या संबंधीच्या विवक्षित तरतुदी संविधानामध्ये केलेल्या आहेत. लोकनियुक्त शासनाला त्याच्या सर्व धोरणांबाबत संसदेला जाब द्यावा लागतो. एकप्रकारे संसद व विधिमंडळे ही लोकनियुक्त सभागृहे कार्यकारी प्रशासनावर नियंत्रण ठेवतात. म्हणूनच जोपर्यंत मंत्रिमंडळाला संसद वा विधिमंडळात बहुमत असते तोपर्यंतच मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकते, अन्यथा मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. सामूहिक जबाबदारीच्या तत्त्वावर मंत्रिमंडळ काम करते.

असे जरी असले तरी भारतीय राज्यघटना ही अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती व ब्रिटीश संसदीय पद्धती यांचे उत्तम मिश्रण आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये मूलभुत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, संसदीय शासन प्रणाली, संघराज्यात्मक पद्धती, सत्ता विभाजनाचा सिद्धांत, कायद्याचे-राज्य इत्यादी तत्त्वांचा समावेश केलेला असून ही सर्व तत्त्वे ब्रिटीश संसदीय पद्धती, अमेरिकन संघराज्यात्मक पद्धती, आयर्लंडची राज्यघटना, कॅनडा व ऑस्ट्रेलियाची राज्यघटना यांवरून घेतलेली आहे. शिवाय १९३५ चा भारत सरकारचा कायदा हा भारतीय राज्यघटनेचा आधार आहे, कारण या कायद्याप्रमाणे ब्रिटीशांनी प्रथमच संघराज्यात्मक पद्धती भारतात अवलंबिली होती. या कायद्याचा उगम बघणे यासंदर्भात महत्त्वाचे आहे. याबाबत विवेचन पुढे करण्यात आले आहे.

(२) १९३५ च्या कायद्याचा जनक-लॉर्ड बटलर

चर्चिल, ईडन व मॅकमिलन यांनी पंतप्रधानपद सोडल्यावर तिन्ही वेळा ब्रिटीश हुजूर पक्षीय नेते लॉर्ड बटलर यांचे नाव त्या पदासाठी होते, पण तिन्ही वेळा त्यांची संधी हुकली. तशी ती हुकल्यानंतर जे पंतप्रधान झाले त्यांच्या मंत्रीमंडळात बटलर होते. आपली वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व्यक्तिगत वैमनस्य वाढविण्यासाठी वा पक्षात फूट पाडण्यासाठी वापरू नये असे त्यांचे मत होते. लहानपणीच त्यांना शारीरिक दुखापत झाली होती व म्हणून पहिल्या महायुद्धाच्या वेळी त्यांना सैन्यात दाखल होता आले नाही. यामुळे कशासाठीही प्राणपणाने लढण्याची त्यांची वृत्तीच हरपली होती असे इनॉक पॉवेल यांनी त्यांच्या बद्दलच्या मृत्यु लेखात म्हटले आहे. एक पंतप्रधान पद सोडले तर बटलर यांनी परराष्ट्र, अर्थ, गृह व शिक्षण अशी सर्व महत्त्वाची खाती अतिशय कौशल्याने हाताळली. किंबहुना १९४४ साली त्यांनी संयुक्त मंत्रीमंडळात असतांना जे शिक्षणविषयक विधेयक मांडले त्यामुळे ब्रिटनच्या शैक्षणिक जीवनात क्रांती झाली. त्यांच्या या कामगीरीचा गौरव, मजुर व लिबरल दोन्ही विरोधी पक्ष करीत आले आहे. ते जवळ-जवळ २७ वर्षे निरनिराळ्या मंत्री पदांवर होते. गृहमंत्री या नात्यांने त्यांनी पोलीस दलात सुधारणा घडून आणल्या. शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामगीरीचा गौरव, विल्सन यांचे मजूरपक्षीय मंत्रीमंडळ आले तेव्हा १९६४ साली केम्ब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी महाविद्यालयाचे मास्टर हे पद देऊन करण्यात आला. ही मुदत संपल्यानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक, पदवीधर यांनीच प्रचंड मतांनी त्यांना पुन्हा निवडून दिले. तथापि भारतीयांना बटलर यांची ओळख राहील ते १९३५ च्या कायद्याचे जनक म्हणून, हे जनकत्त्व कायदेशीररीत्या बोलावयाचे झाले तर त्यांच्याकडे पूर्णतः जाणार नाही. पण व्यवहारतः ते जाते. त्यावेळी भारतमंत्री होते सर सॅम्युअल होअर व बटलर त्यांचे दुय्यम मंत्री होते. बटलर यांचा जन्म हिंदुस्थानात अटक येथे झाला होता. त्यांचे

वडील पूर्वीच्या मध्य प्रांताचे गव्हर्नर होते व दुसरे नातेवाईक हरकोर्ट बटलर हे उत्तर प्रदेश (तेव्हाचा संयुक्त प्रांत) याचे गव्हर्नर होते. म्हणून भारतातील परिस्थिती बटलर यांना चांगली माहिती होती. गोलमेज परिषदेनंतर ब्रिटीश सरकारने श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली व विधेयक चिकित्सा समितीकडे धाडण्याचे ठरविले. चर्चिल यांनी तेथपासूनच विरोध सुरू केला. पार्लमेंट व बाहेर हुजूर पक्षाचे व्यासपीठ या दोन्ही ठिकाणी चर्चिल यांनी जितकी अडवणूक करता येईल तितकी केली. मजूर पक्ष नाराज होता. कारण ३५ च्या विधेयकाने वसाहतीचे स्वराज्य दिले नव्हते. हे विधेयक फार मोठे होते. त्याची कलमे ४७३ व परिशिष्टे १६. त्यावर चर्चाही प्रदीर्घ झाली. कॉमन्सच्या इतिवृत्ताची (हॅन्सार्ड) चार हजार पृष्ठे भरली. एकूण दीड कोटी शब्द या इतिवृत्तात आहेत. भारतमंत्र्यांना ६०० भाषणे द्यावी लागली व १५ हजार प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. श्वेतपत्रिका, चिकित्सा समितीचा अहवाल व विधेयक यावर चर्चा करण्यात कॉमन्सची अडीच वर्षे गेली. सरकारच्या वतीने बटलर या प्रत्येक पातळीवर आघाडीवर होते. चर्चिल यांच्या हालचालींना तोंड देण्यात त्यांचा पुढाकार होता. म्हणून सॅम्युअल होअर हे भारतमंत्री असले तरी ३५ च्या कायद्याचे जनकत्त्व बटलर यांच्याकडे जाते. इतक्या दीर्घकालीन चर्चेवरून त्यांच्या चिकाटीची कल्पना येऊ शकते. ३५ चा कायदा यशस्वी झाला असे नव्हे. पण प्रांतिक स्वायत्तेचा नवा प्रयोग सुरू झाला. या कायद्यात संघराज्याची योजना अभिप्रेत होती. ती अंमलात येण्यापूर्वी दुसरे महायुद्ध सुरू झाले व ही योजना बारगळली. तथापि ३५ च्या कायद्याचे वैशिष्ट्य हे की, १९४७ साली स्वातंत्र्याचे विधेयक तयार करतांना त्याचा आधार घेतला गेलाच; पण स्वतंत्र भारताच्या घटनेने या कायद्यातील अनेक महत्त्वाच्या तरतूदी स्विकारल्या. त्यांनी आपल्या आत्मचरित्रास ' आर्ट ऑफ द पॉसिबल ' असे नाव दिले आहे. राजकारण हे शक्यतेच्या कलेत ते मोडीत. हुजूर पक्षातील उदारमतवादी प्रवृत्तीचे ते प्रतिनिधी होते. अत्युच्च अधिकारपद हुकले पण त्यांनी जे करून दाखविले ते विसरण्याजोगे नाही. (साभार)

(३) काही महत्त्वाचा तपशील :-

स्वतंत्र भारताच्या घटनेचा मसुदा तयार करण्याचे ऐतिहासिक कार्य घटना समितीने जवळपास तीन वर्षात (२ वर्षे ११ महिने १८ दिवस) पूर्ण केले. या काळात समितीची अकरा अधिवेशने झाली आणि यामध्ये १६६ दिवस कामकाज झाले. यापैकी ११४ दिवस घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय झाला.

'कॅबिनेट मिशन' ने शिफारस केलेल्या योजनेनुसार प्रांतिक विधानसभांच्या सदस्यांनी अप्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींचा समावेश घटना समितीच्या रचनेनुसार त्यामध्ये करण्यात आला. समितीची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे असणार होती : (१) प्रांतिक विधानसभांतर्फे निवडून आलेले २९२ सदस्य (२) भारतातील संस्थानांचे प्रतिनिधी ९३ आणि (३) मुख्य आयुक्तांच्या अंमलाखाली असलेल्या प्रांतांचे प्रतिनिधी ४.

अशा प्रकारे घटना समितीची सदस्य संख्या ३८९ राहणार होती. तथापि, ३ जून, १९४७ रोजीच्या माऊंटबॅटन योजनेनुसार झालेल्या फाळणीमुळे पाकिस्तानसाठी स्वतंत्र घटना समिती स्थापन करण्यात आली. परिणामी भारताच्या घटना समितीची सदस्य संख्या २९९ झाली. ज्यामध्ये सर्वपक्षीय १५ कर्तृत्ववान महिला सदस्यांचा समावेश होता. ही संख्या २९९ अशी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे फाळणीमुळे काही संस्थानांच्या सदस्यांचे अस्तित्त्वच संपुष्टात आले.

संविधान सभेवर सदस्यांचे निर्वाचन प्रांतीय विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्यांद्वारे करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई विधानमंडळातून निर्वाचित होऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी बंगाल विधानमंडळातून श्री. जोगेंद्रनाथ मंडल आणि इतर अनुसूचित जातींच्या सदस्यांच्या पाठिब्यांवर संविधान सभेत प्रवेश मिळविला.

बंगालच्या विभाजनाचा परिणाम म्हणून डॉ.आंबेडकर संविधानसभेचे सदस्य राहिले नाहीत. संविधानसभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांना पाठविलेल्या ३० जून, १९४७ च्या पत्रात डॉ. आंबेडकरांची संविधानसभेवर त्वरित निवड व्हावी असे सुचविले. त्यांनी लिहिले 'अन्य बाबी सोबतच आम्हाला असे आढळून आले की, डॉ.आंबेडकरांनी संविधानसभेत आणि ज्या विविध समित्यांवर त्यांची नियुक्ती झाली होती त्या विविध समित्यांवर त्यांनी जे कार्य केले, त्यांनी जे योगदान दिले ते एवढे श्रेष्ठ दर्जाचे आहे की आम्ही त्यांच्या सेवांपासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निर्वाचित झाले होते. आणि त्या प्रांतांचे विभाजन झाल्यामुळे आता ते संविधानसभेचे सदस्य राहीले नाहीत. १४ जुलैपासून सुरू होणाऱ्या संविधानसभेच्या सत्रात त्यांनी उपस्थित रहावे याविषयी मी आतूर आहे. म्हणून त्यांचे त्वरित निर्वाचन होणे अगत्याचे आहे." त्यानुसार १९४७ च्या जुलै महिन्यात डॉ. आंबेडकर संविधानसभेवर पुननिर्वाचित झाले. त्यानंतर लगेच १५ ऑगस्ट, १९४७ ला स्वांतत्र्यदिनी प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना मंत्रिमंडळात सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले. डॉ. आंबेडकरांनी ते निमंत्रण स्वीकारले आणि ते भारताचे प्रथम विधीमंत्री झाले. २९ ऑगस्ट रोजी संविधानसभेने एकमताने त्यांची संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. १ नोव्हेंबर, १९४९ ला संविधानसभेत खालीलप्रमाणे सदस्य होते.

मुंबई-बालचंद्र महेश्वर गुप्ते, के. एम. मुंशी, श्रीमती हंसा मेहता, नरहर विष्णू गाडगीळ, हरी विनायक पाटस्कर, एस. निजलिंगप्पा, डॉ. बी. आर. आंबेडकर, एस. के. पाटील, जॉसिफ अल्बान डीसूजा, रामचंद्र मनोहर नलवा, कन्हैयालाल नानाभाई देसाई, आर. आर. दिवाकर, केशवराव मारुतीराव जेठे, शंकरराव देव, खंडूभाई कासनजी देसाई, जी. वी. मावलंकर, बाल गंगाधर खेर, वल्लभभाई जे. पटेल, एम. आर. मसानी, अब्दूलकादर मुहम्मद शेख व ए. ए. खान हे होते.

(४) भारतीय घटना समितीची राज्यनिहाय सदस्य संख्या -३१ डिसेंबर, १९४७ रोजीनुसार

प्रांत-२२९

अ.क्र.	प्रांत	सदस्य संख्या
१.	मद्रास	४९
२.	मुंबई	२१
३.	पश्चिम बंगाल	१९
४.	संयुक्त प्रांत	५५
५.	पूर्व पंजाब	१२
६.	बिहार	३६
७.	मध्य प्रांत आणि बेरार	१७
८.	आसाम	८
९.	ओरिसा	९
१०.	दिल्ली	१
११.	अजमेर-मेरवाडा	१
१२.	कूर्ग	१
	एकूण	**२२९**

अ.क्र.	राज्य	सदस्य संख्या
	भारतीय संस्थाने-७०	
१.	अलवार	१
२.	बडोदा	३
३.	भोपाळ	१
४.	बिकानेर	१
५.	कोचीन	१
६.	ग्वाल्हेर	४
७.	इंदूर	१
८.	जयपूर	३
९.	जोधपूर	२
१०.	कोल्हापूर	१
११.	कोटा	१
१२.	मयूरभंज	१
१३.	म्हैसूर	७
१४.	पतियाळा	२
१५.	रेवा	२
१६.	त्रावणकोर	६
१७.	उदयपूर	२
१८.	सिक्कीम आणि कूच बिहार गट	१
१९.	त्रिपुरा, मणिपूर आणि खासी संस्थाने गट	१
२०.	उत्तर प्रदेश संस्थाने गट	१
२१.	पूर्व राजपुताना संस्थाने गट	३
२२.	मध्य भारत संस्थाने गट (बुंदेलखंड आणि माळवा यांच्यासहित)	३
२३.	पश्चिम भारत संस्थाने गट	४
२४.	गुजरात संस्थाने गट	२
२५.	दक्षिण आणि मद्रास संस्थाने गट	२
२६.	पंजाब संस्थाने गट-१	३
२७.	पूर्वेकडील संस्थाने गट-१	४
२८.	पूर्वेकडील संस्थाने गट-२	३
२९.	उर्वरित संस्थाने गट	४
	एकूण	**७०**
	एकत्रित सदस्य संख्या	**२२९ + ७० = २९९**

(५) घटना समितीच्या अंतर्गत समित्या :—

१. कार्यपद्धती नियम समिती-राजेंद्र प्रसाद

२. सुकाणू समिती-राजेंद्र प्रसाद

३. अर्थ आणि कर्मचारी समिती-राजेंद्र प्रसाद

४. अधिकार पत्र समिती-अल्लाडी कृष्णस्वामी अय्यर

५. सभागृहाची समिती-बी. पट्टाभी सीतारामय्या

६. सभागृह कामकाजक्रम समिती-कन्हय्यालाल मुन्शी

७. राष्ट्रध्वज तदर्थ समिती-राजेंद्र प्रसाद

८. घटना कायदेमंडळ कार्य समिती-जी. व्ही. मावळंकर

९. संस्थाने समिती-जवाहरलाल नेहरू

१०. मूलभूत हक्क, अल्पसंख्यांक आणि आदिवासी तसेच वर्जित प्रदेश सल्लागार समिती-वल्लभभाई पटेल.

११. अल्पसंख्याक उप समिती-हरेंद्र कुमार मुखर्जी

१२. मूलभुत हक्क उप समिती-जे. बी. कृपलानी

१३. ईशान्य सीमावर्ती आदिवासी प्रदेश आणि आसाम, वर्जित तसेच अंशतः वर्जित प्रदेश उप समिती-गोपीनाथ बार्डोलोई

१४. वर्जित आणि अंशतः वर्जित (आसामखेरीज) प्रदेश उप समिती-ए. व्ही. ठक्कर

१५. केंद्रीय अधिकार समिती-जवाहरलाल नेहरू

१६. केंद्रीय घटना समिती-जवाहरलाल नेहरू

१७. मसुदा समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(६) घटना समितीची अधिवेशने :—

घटना समितीची बैठक १४ ऑगस्ट, १९४७ च्या रात्री उशिरा घटना सभागृहात सुरू झाली आणि मध्यरात्री बाराच्या ठोक्याला समितीने स्वतंत्र भारताच्या मध्यवर्ती कायदे मंडळाचे स्वरूप धारण केले.

घटना समितीने २९ ऑगस्ट, १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारतासाठी घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी मसुदा समितीची स्थापना केली. घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करतांना समितीसमोर आलेल्या ७६३५ सुधारणांपैकी २४७३ सुधारणा मांडण्यात आल्या, त्यांच्यावर चर्चा झाली आणि त्या निकालात काढण्यात आल्या.

भारताची घटना २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी स्वीकृत करण्यात आली आणि या दस्तऐवजावर संविधान सभेच्या सन्माननीय सदस्यांनी २४ जानेवारी, १९५० रोजी स्वाक्षऱ्या केल्या. घटनेवर २९९ पैकी प्रत्यक्षात २८४ सदस्यांनी अशा स्वाक्षऱ्या केल्या. त्यादिवशी घटनेवर स्वाक्षऱ्या होत असताना बाहेर मात्र वरूणराजाने जलधारांची बरसात करून एकप्रकारे या पवित्र कार्याला शुभशकुनच केला.

भारताची राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आली. त्या दिवशी मध्यवर्ती कायदेमंडळाचे अस्तित्त्व संपुष्टात येऊन; १९५२ मध्ये नविन संसद घटीत होईपर्यंत त्याचे रूपांतर भारताच्या हंगामी संसदेत झाले.

घटना समितीची अधिवेशने

पहिले अधिवेशन	९-२३ डिसेंबर, १९४६
दुसरे अधिवेशन	२०-२५ जानेवारी, १९४७
तिसरे अधिवेशन	२८ एप्रिल-२ मे, १९४७
चौथे अधिवेशन	१४-३१ जुलै, १९४७
पाचवे अधिवेशन	१४-३० ऑगस्ट, १९४७
सहावे अधिवेशन	२७ जानेवारी, १९४८
सातवे अधिवेशन	४ नोव्हेंबर, १९४८ ते ८ जानेवारी, १९४९
आठवे अधिवेशन	१६ मे-१६ जून, १९४९
नववे अधिवेशन	३० जुलै-१८ सप्टेंबर, १९४९
दहावे अधिवेशन	६-१७ ऑक्टोबर, १९४९
अकरावे अधिवेशन	१४-२६ नोव्हेंबर, १९४९

(समितीची आणखी एक बैठक २४ जानेवारी १९५० रोजी झाली. याप्रसंगी सन्माननीय सदस्यांनी भारतीय घटनेच्या दस्तऐवजावर सह्या केल्या.)

(७) राज्यघटनेचे सांस्कृतिक अंतरंग :—

भारतीय राज्यघटनेची रचना अतिशय परिश्रमपूर्वक सिध्द झाली असून, राज्यघटनेचा खर्डा/मसुदा त्यावेळच्या संविधान सभागृहात म्हणजेच संसदेच्या आजच्या मध्यवर्ती सभागृहात दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटना

समितीकडून स्विकारण्यात आला. राज्यघटनेतील अनुच्छेद क्रमांक ५, ६, ७, ८, ९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७९, ३८०, ३८८, ३९१, ३९२, ३९३ आणि ३९४ दिनांक २६ नोव्हेंबर, १९५० रोजी लागू करण्यात आले; राज्यघटनेतील उर्वरित अनुच्छेद २६ जानेवारी, १९५० रोजी पासून अंमलात आले. रावी नदीच्या काठावर लाहोर येथे काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ३१ डिसेंबर, १९२९ रोजी भारताचा तिरंगा फडकावला आणि त्याच अधिवेशनात २६ जानेवारी, १९३० रोजी ' पूर्ण स्वराज्य ' ची घोषणा देण्यात आली होती त्याची आठवण आणि सन्मान म्हणून २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आणली गेली. घटना समितीने १६६ दिवस कामकाज केले. भारताचे संविधान निर्माण करण्याच्या कामकाजासाठी सुमारे रुपये ६४ लाख इतका खर्च झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ' घटना समितीने सूचविलेली भारतीय राज्यघटना संमत करावी ' असा एक ओळीचा मांडलेला प्रस्ताव चर्चेअंती टाळ्यांच्या गजरात संमत करण्यात आला.

भारतीय संविधान हे संविधानाच्या नावाने तयार झालेले आहे. जगातील अन्य देशांचे संविधान हे ' इन द नेम ऑफ गॉड ' इत्यादी नावाने तयार झालेले आहे. भारतीय राज्यघटनेत तसे झालेले नाही, हे आपल्या राज्यघटनेचे अनोखे व महत्वाचे वैशिष्ट्य आहे. भारतीय राज्यघटना ही आम्ही भारतीय लोक, आम्ही असे ठरवतो, हा देश प्रजासत्ताक, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष करतो, समता, बंधुता देतो अशी मांडणी राज्यघटनेत असून, राज्यघटना आम्ही निर्माण करतो आणि आम्हाला देतो आणि त्याचा आम्ही स्विकार करतो अशी आपली राज्यघटना आहे.

भारतीय राज्यघटना म्हणजे, भारताचा सर्वोच्च व पायाभूत कायदा (Legal basis) आहे. राज्यघटना म्हणजे केवळ नियम व कायदेशीर भाषा यांचा दस्ताऐवज नसून प्रत्यक्षात हा भारताच्या सांस्कृतिक-सामाजिक वाटचालीचाही मूलाधार ठरणार आहे, हे ओळखूनच भारतीय संस्कृतीची प्रतीके ठरणाऱ्या अनेक चित्रांचा समावेश राज्यघटनेच्या अधिकृत प्रतीमध्ये करण्यात आलेला आहे.

राज्यघटनेच्या हस्तलिखित प्रतीमध्ये प्रथम पृष्ठावर सारनाथ येथील अशोक स्तंभावर असलेले चार दिशांचा वेध घेणाऱ्या चार सिंहांचे भारताचे राजचिन्ह विराजमान आहे. शांतिनिकेतनचे कलाचार्य नंदलाल बोस यांचे आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त शिष्य व वॉश पेंटींग या कलाप्रकारातील अग्रणी दिनानाथ भार्गव (१ नोव्हेंबर, १९२७ - २४ डिसेंबर, २०१६) यांनी मिनिएचर (miniature) स्वरुपातील सदर राजचिन्ह चितारले असून, ' सत्यमेव जयते ' *(Truth alone triumphs)* हे बोधवाक्य ' मुंडक ' उपनिषदातून घेण्यात आलेले आहे. राजचिन्हाचे सदर पृष्ठ अजंठा लेण्यातील चित्रकला तसेच बाग म्युरल्स या कलाप्रकाराने सुशोभित करण्यात आले आहे.

राज्यघटनेची उद्देशिका (PREAMBLE) असलेले पृष्ठ, शांतिनिकेतन मध्ये कलेचे शिक्षण घेतलेले जबलपूरचे व्यौहार राममनोहर सिन्हा यांनी तयार केले. उद्देशिकेचे हे अत्यंत महत्वाचे सुंदर कलाकुसर असलेले पृष्ठ तयार करण्याअगोदर सिन्हा यांनी अजंठा व वेरुळ लेणी, सांची, सारनाथ, बाग, बदामी व महाबलीपूरम येथे वारंवार

संशोधनात्मक भेटी दिल्या आणि पद्म, नंदी, ऐरावत, व्याघ्र, अश्व, हंस व मयूर यांचा पारंपरिक प्रतिकात्मक आकृतिबंधाचा समावेश असलेले उद्देशिकेचे अनमोल पृष्ठ सिन्हा यांच्या स्वाक्षरींसह अंतिमरित्या तयार झाले.

भारतीय घटनेच्या मसुद्यास मंजूरी मिळाल्यानंतर, भारताचे संविधान अंतिम छपाईस पाठविण्यापूर्वी पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी दिल्लीचे रायजादा ब्रिजबिहारी नारायण यांचे सुपुत्र प्रेम बिहारी नारायण रायजादा (सक्सेना) (जन्म १७ डिसेंबर, १९०१) यांना भारताचे संविधान हा प्राथमिक दस्ताऐवज इंग्रजी कर्सिव्ह लिपीमध्ये *(Flowing Italic Style)* लिहिण्यासाठी विनंती केली आणि त्यासाठी ते किती मोबदला घेतील अशी विचारणा केली. यावर प्रेम बिहारी रायजादा यांनी आपण या कामासाठी मोबदला घेणार नाही *(Not a Single Penny)* परंतु संविधानाच्या प्रत्येक हस्तलिखित पृष्ठावर मी माझे नाव लिहू इच्छितो व शेवटच्या पृष्ठावर माझ्या आजोबांच्या नावासह मी माझे नाव लिहू इच्छितो अशी परवानगी मागितली, यास भारत सरकारने मंजूरी दिली. (राज्यघटनेच्या *हस्तलिखित प्रतीमध्ये शेवटच्या पृष्ठावर Calligraphed by Prem Behari Narain Raizada (Saxena) s/o Shree Brij Behari Narain Raizada of Delhi c/o Mes. Goven Bros. (Rampur) Ltd. Rampur.* असे नमूद करण्यात आले आहे.) संविधनाची हस्तलिखित प्रत तयार करण्यासाठी प्रेम बिहारी रायजादा यांना संविधान सभागृहातील एक दालन देण्यात आले नंतर हेच दालन ' कॉन्स्टीट्युशन क्लब ऑफ इंडिया ' या नावाने प्रसिध्द झाले.

एकूण २२ विभाग, ३९५ कलमे (अनुच्छेद), ८ परिशिष्टे, सुमारे १,१७,३६९ इतकी शब्दसंख्या व २५१ पृष्ठे असलेली राज्यघटनेची मूळ इंग्रजी भाषेतील प्रत एकूण १३ किलो वजनाची आहे. प्रेमबिहारी नारायण रायजादा यांनी जगातील सर्वात अधिक लांबीची हाताने लिहिलेल्या राज्यघटनेच्या इंग्रजी आवृत्तीच्या सुंदर हस्तलिखिताचे काम दिनांक २८ नोव्हेंबर, १९४९ ते एप्रिल, १९५० या पाच महिन्यांच्या कालावधीत पूर्ण केले. बर्मिंगहॅम, इंग्लंड येथून मागविण्यात आलेल्या सेल्युलस आधारित न चिकटणाऱ्या ४५.७ सें.मी. X ५८.४ सें.मी. (१६ इंच रुंद व २२ इंच लांब) या आकारातील साधारणपणे एक हजार वर्ष टिकणाऱ्या पार्चमेंट कागदावर लिहिण्यात आली आहे. राज्यघटना लिहिण्यासाठी बर्मिंगहॅम, इंग्लंड येथून खास आयात करण्यात आलेल्या ३०३ क्रमांकाच्या नीबचा वापर करण्यात आला व त्यासाठी एकूण ४३२ वुडन होल्डर पेन नीब वापरण्यात आले.

राज्यघटनेच्या इंग्रजी भाषेतील सुलेखन हस्तलिखित प्रती बरोबरच हिंदी भाषेत अनुवाद केलेली सुलेखन (कॅलिग्राफीक) प्रत सुध्दा तयार करण्यात आली होती. हिंदी भाषेतील २६४ पृष्ठे असलेली व सुमारे १४ किलो वजन असलेली सुलेखन प्रत वसंत कृष्ण वैद्य यांनी तयार केली होती. हिंदी भाषेतील प्रतीसाठी कागद ' हँडमेड पेपर रिसर्च सेंटर, पुणे ' येथे तयार करण्यात आला होता.

संविधानाची हस्तलिखित प्रत कलाचार्य नंदलाल बोस व कला भवन शांतिनिकेतन मधील अन्य कलाकारांनी सुशोभित केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरवातीला भारताचा सांस्कृतिक इतिहास दर्शविणारी, बोस व त्यांच्या शिष्यांनी रेखाटलेली रेखाचित्रे आहेत. सुंदर हस्ताक्षरांत लिहून तयार झालेली पाने सुशोभित व चमकदार करण्याचे

काम शांतिनिकेतनमधील सुप्रसिध्द कलाकार नंदलाल बोस यांनी चार वर्षात पूर्ण केले. मोहेंजोदाडो कालखंडापासून सुरु होणाऱ्या भारतीय इतिहासातील, वैदिक व पौराणिक कालखंडांतील आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रसंगांची रेखाचित्रे काढली. एकूण २११ पानांमध्ये कला आणि इतिहास यांचे एकत्रित सादरीकरण करण्याच्या कौशल्यपूर्ण कामगिरीसाठी त्या काळात नंदलाल बोस व सहकाऱ्यांना रुपये २१००० एवढ्या रकमेचा मोबदला देण्यात आला होता.

प्रेम बिहारी रायजादा यांनी अत्यंत सुबक इंग्रजी कर्सिव्ह लिपीमध्ये एकहाती तयार केलेली, त्या कालावधीतील २८४ सदस्यांच्या मूळ स्वाक्षऱ्या असलेली ही अत्यंत मौल्यवान प्रत डेराडूनच्या ' सर्व्हे ऑफ इंडिया ' च्या शासकीय छापखान्यात फोटोलिथोग्राफिक तंत्रज्ञानाने *(Photolithographic Techniques)* विशेष प्रकारे छापण्यात आली. (सुरुवातीस राज्यघटनेच्या १००० प्रती छापण्यात आल्या होत्या) या प्रतीचे प्रत्येक पृष्ठ भारतीय ढंगाच्या सुंदर वेलबुट्टी बॉर्डरने तसेच अनेक रंगी छपाईने सुशोभित आहे. काळ्या रंगातील चामड्यामध्ये बांधणी करण्यात आलेल्या सदर सचित्र आवृत्तीच्या पानांवर चारही बाजूंच्या मोकळ्या जागांमध्ये खऱ्या सोन्याच्या वर्खाचा मुलामा देण्यात आला आहे.

सुंदर इंग्रजी व हिंदी हस्ताक्षरांत लिहिलेल्या, सुशोभित केलेल्या भारतीय राज्यघटनेच्या दोन्ही सचित्र मूळ प्रती संसद भवन, नवी दिल्ली येथील ग्रंथालयात विशिष्टपणे नियंत्रित करण्यात आलेल्या बंद पेटीत कडेकोट बंदोबस्तात सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या आहेत.

राज्यघटनेच्या इंग्रजी व हिंदी भाषेतील मुळ हस्तलिखित सचित्र प्रती, पुढील अनेक वर्षांसाठी टिकाऊपणा, तापमानातील बदल व वातावणातील दाब या कारणांस्तव संपूर्ण वर्षभर २०°C (अ/-२°C) तापमान व ३०% (+/-५%) सापेक्ष आर्द्रता नियंत्रित करण्यात आलेल्या आणि १८० सें.मी. × १८० सें.मी. × ३०५ सें.मी. या आकारात तयार केलेल्या विशेष संरक्षित तिजोरी सदृश्य कक्षामध्ये, नॅशनल फिजिकल लॅबोरॅटरी *(CSIR-National Physical Laboratory)* नवी दिल्ली या संस्थेने मार्च, १९९४ मध्ये अमेरिकेच्या गेट्टी कंजर्वेशन संस्थेच्या *(GCI)* मदतीने तयार केलेल्या ५५ सें.मी. रुंद, ७० सें.मी. लांब व २५ सें.मी. उंच या आकारातील आणि ९६,२५० सें.मी.३ असे एकूण अंतर्गत घनफळ असलेल्या आणि ४०-५०% सापेक्ष आर्द्रतेसह १% पेक्षा कमी ऑक्सिजन असे नियंत्रित करण्यात आलेल्या हेलियम, नायट्रोजन आणि विशिष्ट रसायनयुक्त पारदर्शी दोन काचेच्या पेट्यांमध्ये जनतेच्या प्रदर्शनार्थ ठेवण्यात आल्या आहेत.

(८) घटना समितीच्या कामकाजाचा पहिला दिवस-दिनांक ९ डिसेंबर, १९४६

भारताच्या घटना समितीची पहिली बैठक नवी दिल्ली येथे ९ डिसेंबर, १९४६ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता घटना सभागृह *(आता संसदेचे मध्यवर्ती सभागृह)* येथे सुरू झाली. या ऐतिहासिक प्रसंगासाठी हे सभागृह खास सजविण्यात आले होते. त्यामुळे त्याला विलोभनीय रूप प्राप्त झाले होते. सभागृहाचे सुंदर छत आणि भिंती यांच्यावर सोडण्यात आलेल्या विजेच्या दिव्यांमुळे या सभागृहाला एक आगळी झळाळी प्राप्त झाली होती.

घटना समितीचे सन्माननीय सदस्य भारावलेल्या मन:स्थितीत असूनही विजयी भावनेने अध्यक्षीय आसनासमोर असलेल्या अर्धवर्तुळाकार रांगांमध्ये स्थानापन्न झालेले होते ज्यायोगे अध्यक्ष आणि त्यांच्यात थेट संपर्क होऊ

शकणार होता. अर्धवर्तुळाकार उतार असणारी सभागृहातील छोट्या पायऱ्या-पायऱ्यांची जमीन हिरव्या गालिच्यांनी आच्छादित करून सदस्यांच्या बसण्याच्या बाकांवर सोडण्यात आलेल्या विजेच्या माळांमुळे वातावरणात काहीसा उबदारपणा जाणवत होता. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत बैठका सुखावह व्हाव्यात यासाठी सभागृह उबदार ठेवण्याची वेगळी व्यवस्था करण्यात आली होती.

सुशोभित केलेल्या पहिल्या रांगेत पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना अबुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, आचार्य जे. बी. कृपलानी, डॉ. राजेंद्र प्रसाद, श्रीमती सरोजिनी नायडू, श्री. हरेकृष्ण मेहताब, पंडित गोविंद वल्लभ पंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. शरत चंद्र बोस, श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी आणि श्री.एम. असफ अली स्थानापन्न झाले होते. या बैठकीला उपस्थित असलेल्या २०७ प्रतिनिधींमध्ये नऊ महिलांचा समावेश होता.

घटना समितीचे हंगामी अध्यक्ष डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांचा परिचय आचार्य कृपलानी यांनी करून देण्याने उद्‌घाटनाचे सत्र सकाळी ११ वाजता सुरू झाले. डॉ. सिन्हा आणि मान्यवरांचे स्वागत करताना आचार्य कृपलानी म्हणाले, "*आपण प्रत्येक शुभकार्याचा आरंभ ईश्वरी आशीर्वादाने करत असतो. त्यानुसार आज आपण हाती घेतलेले कार्य सुरळीत पार पडण्यासाठी डॉ. सिन्हा यांनी ते प्राप्त करावेत अशी मी त्यांना प्रार्थना करतो. डॉ. सिन्हा यांनी आता अध्यक्षस्थान ग्रहण करावे अशी मी आपणा सर्वांच्या वतीने त्यांना विनंती करतो.*"

टाळ्यांच्या कडकडाटात अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर डॉ. सिन्हा यांनी विविध राष्ट्रांकडून आलेले शुभेच्छा संदेश वाचून दाखविले. अध्यक्षांचे उद्‌घाटनपर भाषण आणि उपाध्यक्षांची नामनियुक्ती पार पडल्यानंतर सदस्यांना त्यांनी आपला परिचय करून देण्याची औपचारिक विनंती करण्यात आली. पहिल्या दिवसाच्या सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये सर्व २०७ सदस्यांनी आपला परिचय देऊन अभिलेख पत्रावर *(Register)* स्वाक्षऱ्या केल्या.

घटना सभागृहात ३० फूट उंच असलेल्या दर्शक दीर्घेत *(Galleries)* उपस्थित असलेले वृत्तपत्रांचे प्रतिनिधी आणि निमंत्रित यांनी हा अविस्मरणीय सोहळा आपल्या अनिमिष नेत्रांनी अनुभवत या घटनेचे साक्षीदार ठरले. आकाशवाणी दिल्ली केंद्राने *(All India Radio-Delhi)* या संपूर्ण कामकाजाचे वृत्तांकन थेट प्रक्षेपित करून याचे यथास्थित चित्र सर्वांसमोर उभे केले.

घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ रोजी झाली तेव्हा डॉ. सच्चिदानंद सिन्हा हे हंगामी अध्यक्ष म्हणून स्थानापन्न झाले होते. त्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद घटना समितीचे अध्यक्ष झाले आणि त्यानंतर ते भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती झाले. कलकत्ता विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि बंगालमधील एक नामवंत ख्रिश्चन विद्वान, प्रा. हरेंद्र कुमार मुखर्जी घटना समितीचे उपाध्यक्ष झाले. घटना समितीच्या अल्पसंख्याक समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

(९) पंडित जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीस १३ डिसेंबर, १९४६ रोजी पुढीलप्रमाणे 'उद्दिष्ट ठराव' सादर केला :—

राज्यघटनेची उद्देशिका (PREAMBLE) म्हणजे राज्यघटनेचे ओळखपत्र असून, आत्मा आहे आणि राज्यघटनेचे अविभाज्य अंग आहे. घटनासमितीत झालेले पहिले महत्त्वाचे कामकाज म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टांसंबंधीचा ठराव. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी राज्यघटनेशी उद्दिष्टे निश्चित करण्याचा ठराव मांडला. या उद्दिष्टांच्या ठरावात राज्यघटनेची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरुन गेली. यामुळे भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक, स्वायत्तता

असलेल्या प्रांतांनी मिळून बनलेले संघराज्य असणार होते. भारतातील सर्व नागरीकांना राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय देण्याचे मागासवर्गीयांना व अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. संघराज्यात्मक रचना, नागरीकांना मूलभूत अधिकार, धर्मनिरपेक्ष शासन, विकासाची समान संधी व अल्पसंख्य आणि मागासवर्गीयांना विशेष संरक्षण या चारही महत्त्वाच्या गोष्टी या पहिल्याच दिशादर्शक ठरावात मान्य करण्यात आल्या होत्या. हा ठराव काँग्रेस कार्यकारिणीने २० नोव्हेंबर, १९४६ रोजी संमत केला होता. एका अर्थाने हा ठराव म्हणजे भारताच्या पुढील वाटचालीचे स्वरुप निश्चित करणारा ठराव होता. सदर ठराव २२ जानेवारी, १९४७ रोजी एकमताने संमत करण्यात आला होता. भारतीय राज्यघटनेचे प्रास्ताविक आणि घटनेच्या तिसऱ्या भागातील मूलभूत हक्क आणि चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वे ही सर्व उद्दीष्टांच्या या ठरावातील धोरणाचा परिपाक आहेत.

१. भारत एक स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक असून त्याच्या भावी शासनासाठी घटना तयार करण्याचा दृढ आणि गांभीर्यपूर्वक निश्चय ही घटना समिती घोषित करत आहे;

२. ज्याअर्थी, विद्यमान ब्रिटिश शासित भारत, भारतीय संस्थाने, या दोहोंच्या बाहेर असणारा भूप्रदेश आणि राज्ये तसेच स्वतंत्र, सार्वभौम भारतात सामील होऊ इच्छिणारी संस्थाने व भूप्रदेश हे एकत्रितपणे भारत म्हणून गणले जातील; आणि

३. ज्याअर्थी, उपरनिर्दिष्ट भूप्रदेश, त्यांच्या विद्यमान सीमांसह अथवा घटना समिती निश्चित करेल त्यानुसार किंवा त्यानंतर घटनेच्या कायद्यानुसार, स्वायत्त एकक म्हणून दर्जा धारण करतील आणि कायम राखतील, तसेच उर्वरित एकत्रित अधिकार आणि सरकार तसेच प्रशासन यांचे सर्व अधिकार आणि कर्तव्ये यांचे वहन करतील; तथापि केंद्र सरकारला प्रदान केलेला अथवा नेमून दिलेला अधिकार आणि कर्तव्ये तसेच केंद्राचे अध्याज्ञपत *(Inherent)* अथवा प्रदत्त *(Implied)* अधिकार यांचा असे अधिकार आणि कर्तव्ये यांना अपवाद असेल; आणि

४. ज्याअर्थी, सार्वभौम स्वतंत्र भारताचे तसेच त्याचे घटनात्मक घटक आणि शासनाची अंगे यांचे सर्व अधिकार आणि सत्ता भारताच्या जनतेकडून प्राप्त झाले आहेत; आणि

५. ज्याअर्थी, भारताच्या सर्व जनतेला सामाजिक-आर्थिक-राजकीय न्याय: संधी-दर्जा-कायदा याबाबतची समानता; विचार-अभिव्यक्ती-श्रद्धा-विश्वास-उपासना- व्यवसाय- संघटन-कृती यांबाबतचे स्वातंत्र्य यांची कायदे आणि सार्वजनिक नीतिमत्तेच्या मर्यादेत हमी देण्यात येईल आणि ते प्राप्त करून देण्यात येतील; आणि

६. ज्याअर्थी, अल्पसंख्यांक, मागास आणि आदिवासी विभाग तसेच पददलित आणि इतर मागासवर्गांना पुरेसे संरक्षण पुरविण्यात येईल; आणि

७. ज्याअर्थी, प्रजासत्ताकाच्या प्रांतांची अखंडत्त्वता तसेच जमीन, पाणी आणि हवा यांच्यावरील सार्वभौम प्रभुत्त्व न्याय आणि सुसंस्कृत देशांचे कायदे यांच्या अनुसार कायम राखण्यात येईल; आणि

८. ही प्राचीन भूमी जगातील आपले हक्काचे आणि सन्मानाचे स्थान ग्रहण करत असून विश्वशांती तसेच मानव जातीचे कल्याण साध्य करण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी संपूर्णत: आणि स्वयंप्रेरणेने हातभार लावत आहे.

हा ठराव घटना समितीने २२ जानेवारी, १९४७ रोजी एकमताने स्वीकृत केला.

(१०) उद्देशिका (PREAMBLE) :—

भारताचे संविधान (CONSTITUTION OF INDIA)

उद्देशिका (PREAMBLE)

(दिनांक १ डिसेंबर, २००७ रोजीनुसार)

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक [१]**[सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य]** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;

दर्जाची व संधीची **समानता** ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व [२][राष्ट्राची एकता आणि एकात्मता] यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून ;

आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

---

१. "[illegible] (सुधारणा) अधिनियम, १९७६" कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकूराऐवजी घातले (३ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

(11) PREAMBLE :—

THE CONSTITUTION OF INDIA

PREAMBLE

(as on 1st December 2007)

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a [1][SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC] and to secure to all its citizens :

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;

and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the [2][unity and integrity of the Nation];

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

---

1. Subs. by the Constitution (Forty-second Amendment) Act, 1976, s.2, for " SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC " (w.e.f. 3rd January 1977).

2. Subs. by s. 2, ibid., for "unity of the nation" (w.e.f. 3rd January 1977).

(१२) भारतीय राज्यघटनाः चर्चा आणि मंजुरी :—

भारताच्या घटना समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी (१) मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६, (२) गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ व (३) शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ अशी एकूण तीन ऐतिहासिक भाषणे केली.

या पुस्तिकेत समावेश असलेल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समिती समोर केलेल्या तीन भाषणांपैकी मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ व शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेली ही दोन भाषणे, महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सन २००२ मध्ये प्रकाशित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे या खंडांमधून घेण्यात आली आहेत. याबद्दल त्यांचे आभार. उर्वरित गुरुवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजीचे भाषण स्वतंत्ररित्या भाषांतरीत करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली तीन्ही भाषणे भाषांतरीत करताना इंग्रजी वाक्यप्रचार, म्हणी, शब्दार्थांसाठी शक्यतोवर चपखल शब्दयोजना करण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आला असून भाषणे पुरेपूर निर्दोष होतील याकडे लक्ष पूरविण्यात आले आहे. तथापि यामध्ये काही उणीव राहिली असल्यास पुढील आवृत्तीत दूर करण्यात येईल. अभ्यासकांना काही शंका उद्‌भवल्यास घटना समिती संदर्भातील भाषणे भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचा अवश्य अभ्यास करावा. या संदर्भात विधायक सूचना, सुधारणा यांचे निश्चितच स्वागत केले जाईल.

भारताच्या घटना समितीने तयार केलेला आपल्या घटनेचा मसुदा हा आपणा सर्वांसाठी एक पवित्र दस्तऐवज आहे. मसुदा समितीने मंजूर केलेला घटनेचा मसुदा देशाला सादर करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की *'या घटनेची अंमलबजावणी करणारे नेतृत्त्व आणि नोकरशहा कशा भावनेने ही घटना अंमलात आणतात आणि आपल्या समोरील महाकाय समस्यांबाबत काय भूमिका स्वीकारतात यावर या घटनेतील संकल्पनांना मूर्त स्वरूप देणे अखेर अवलंबून राहणार आहे.'*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही भाषणे आपणां सर्वांना आजही उपयुक्त, उद्‌बोधक आणि मार्गदर्शक अशी आहेत. त्याचप्रमाणे आपल्या राष्ट्राच्या नियतीचा ठेवा असणारा हा अनमोल दस्तऐवज तयार करण्यासाठी विविध नामवंत व्यक्तींनी कसे भगीरथ प्रयत्न केले याचीही आपणांस कल्पना येईल.

भारतीय घटना समितीची बैठक गुरूवार दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी नवी दिल्ली येथे घटना सभागृहात झाली.

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी समितीसमोर अभिभाषण केले. समितीचे कामकाज कसे चालावे, कामकाजाचे स्वरूप कसे असेल याबाबतचे विवेचन त्यांनी केले. यानंतर चर्चेला सुरूवात झाली.

दुपारच्या सत्रात अध्यक्षांनी डॉ. आंबेडकर यांना आपला प्रस्ताव मांडण्याची सूचना केली. त्यानुसार डॉ. आंबेडकर यांनी घटनेचा मसुदा घटना समितीच्या विचारार्थ सादर केला.

घटनेचा मसुदा घटना समितीस सादर केल्यानंतर याच दिवशी या मसुद्यावर थोडक्यात सर्वसाधारण चर्चा झाली. या चर्चेस घटनेचे प्रथम वाचन म्हटले जाते. द्वितीय वाचन १५ नोव्हेंबर, १९४८ रोजी सुरू झाले. घटनेच्या द्वितीय वाचनात घटना खंडशः विचारात घेण्यात आली. सदर चर्चा १७ ऑक्टोबर, १९४९ रोजी समाप्त झाली.

घटना समितीची यांनंतरची बैठक १४ नोव्हेंबर, १९४९ रोजी तृतीय वाचनासाठी सुरू झाली. ती २६ नोव्हेंबर १९४९ रोजी समाप्त होऊन घटना मंजूर झाल्याचे घोषित करण्यात आले. तद्‌नंतर समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी केली.

(१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६ रोजी केलेले भाषण :—

"अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती

या देशाला एक होण्यापासून परावृत्त करु शकणार नाही"...

संविधान सभेच्या कामकाजाला ९ डिसेंबर, १९४६ पासून सुरुवात झाली. संविधान सभेवर एकूण २९६ सदस्य निवडून आले होते. त्यापैकी २०७ सदस्यांनी कामकाजात भाग घेतला. ८९ सदस्य अनुपस्थित होते. किंबहुना त्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला होता हे म्हणणे संयुक्तिक होईल. या सदस्यांमध्ये बहुतांश मुस्लिम लीग आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी होते.

दिनांक १३ डिसेंबर, १९४६ ला संविधानाचे साध्य आणि उद्दीष्ट सांगणारा ठराव पं. जवाहरलाल नेहरु यांनी मांडला. हात वर करून नेहमीच्या सर्वसाधारण पद्धतीने नव्हे तर सर्वांनी उभे राहून गांभीर्याने ठराव पारित करावा अशी अपेक्षा त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. श्री. पुरुषोत्तम टंडन यांनी ठरावाला अनुमोदन देणारे भाषण केले.

डॉ. एम. आर. जयकर यांनी पं. नेहरुंच्या ठरावाला दुरुस्ती जोडणारा ठराव मांडला. त्यांच्या मते भारताला एक स्वतंत्र, लोकशाहीवादी, सार्वभौमराज्य निर्माण करण्यासाठी, संविधानाला त्या संदर्भात आकार देण्यासाठी मुस्लिम लीग आणि भारतीय संस्थानिकांच्या प्रतिनिधींच्या सहकार्याची गरज आहे. जेणेकरुन या ठरावाला एक शक्ती प्राप्त होईल. त्यासाठी वरील दोन संघटनांचे प्रतिनिधी, जर त्यांची इच्छा असेल, तर ते सहभागी होईपर्यंत या ठरावावरील चर्चा पुढे ढकलण्यात यावी.

काही अपवाद वगळता अनेक सदस्यांनी डॉ. जयकरांच्या दुरुस्तीला कडाडून विरोध केला. कोणत्याही परिस्थितीत चर्चा स्थगित होता कामा नये अशी त्यांची भूमिका होती.

या पार्श्वभूमीवर संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बोलण्यासाठी पुकारले. हा दिवस होता मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९४६. संविधान सभेचे कामकाज सुरू झाल्याच्या ९ व्या दिवशी डॉ. आंबेडकरांचे सभेपुढे पहिले भाषण झाले. डॉ. जयकरांप्रमाणेच डॉ. आंबेडकर सभागृहाचा रोष ओढवून घेतील आणि त्यांच्या रोषाला पात्र होतील असे अनेकांना वाटले. परंतु प्रत्यक्षात घडले ते अनपेक्षित. या प्रसंगाचे वर्णन करताना सभेचे एक सदस्य आणि प्रत्यक्षदर्शी श्री. न. वि. गाडगीळ म्हणतात 'त्यांचे भाषण इतके मुत्सद्याला शोभणारे होते. इतके कटुतेशिवाय, इतके प्रामाणिकपणे आव्हान देणारे होते की, संपूर्ण सभागृह मतिगुंग झाल्याप्रमाणे ऐकत होते. प्रचंड उत्साहाने सर्व सदस्यांनी त्यांच्या भाषणाचे स्वागत केले. सभागृहाच्या लॉबीमध्ये त्यांचे अभिनंदन करण्यासाठी सर्वांनी त्यांना गराडा घातला."

या प्रसंगाचे वर्णन करताना डॉ. आंबेडकरांचे एक चरित्रकार श्री. धनंजय कीर लिहितात, 'एक मोठ्या डोक्याची खंबीर हनुवटीची, लंबवर्तुळाकार, गंभीर नि तेजस्वी चर्येची आणि उत्तम पोषाखातील भरदार व्यक्ती जयकरांच्या सूचनेला पाठिंबा देण्यास उभी राहिली. ती व्यक्ती म्हणजे डॉ. भीमराव आंबेडकर. ते काँग्रेसचे कट्टर विरोधक. त्यांनी काँग्रेसच्या मतप्रणालीची नि नेत्यांची जाहीर नि खाजगीरित्या अनेक वेळा टर उडविली होती. साहजिकच घटना समितीतील सर्व सभासदांच्या नजरा त्या वक्त्याकडे खेचल्या गेल्या. आंबेडकरांनी सर्व सभासदांवर आपली नजर एकदा फिरविली, प्रत्येक सभासदाला वाटले की, जयकारांच्या ठरावाला पाठिंबा देऊन जयकरांबरोबरच आंबेडकरही आपली पत-प्रतिष्ठा घालवून बसणार. काँग्रेसचे नेते हे राष्ट्रातील कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुमशक्तीचे प्रतीक त्यांच्याविरुद्ध बोलणे म्हणजे स्वतःच्या लौकिक जीवनाची इतिश्री करून घेण्यासारखे होते. काँग्रेसचे सभासद आपल्या कट्टर शत्रुला पाणी पाजावयास आतूर झाले होते.

राष्ट्रातील महान नेते आपल्या अवती-भवती बसलेले आहेत याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. त्यांच्या विरोधकांनी त्यांच्याविषयी अनेक गोष्टी ऐकल्या होत्या. प्रत्यक्ष भाषण ऐकण्याचा तो पहिलाच प्रसंग होता. डॉ. आंबेडकरांनी गंभीर स्वरात अन् वक्तृत्त्वपूर्ण भाषेत आपल्या भाषणास मोठी आत्मविश्वासाने सुरुवात केली."

ते म्हणाले,

अध्यक्ष महोदय, आपण या ठरावावर बोलण्यासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे. काही असो, आपल्या या निमंत्रणाने मी आश्यर्चचकित झालो आहे हे कबूल करावे लागेल. मी या अपेक्षेत होतो की, माझ्याही आधी २०-२२ वक्ते भाषण करणार असल्यामुळे माझा क्रम लागलाच तर तो उद्या लागेल. आज मी कुठलीही तयारी करून न आल्यामुळे उद्या बोलणे मला अधिक आवडले असते. आजच्या प्रसंगी मला माझे विचार पूर्णपणे व्यक्त करण्यासाठी पूर्ण तयारीनिशी बोलणे आवडले असते. शिवाय आपण माझ्याकरिता दहा मिनिटाचा अवधी निश्चित केला आहे. या मर्यादित चौकटीत आपल्या पुढील प्रस्तुत ठरावाला मी कसा न्याय देऊ शकेन हे मला कळत नाही. तरीही या संदर्भातील माझी मते शक्यतितक्या थोडक्या शब्दात मांडण्याचा मी प्रयत्न करीन.

अध्यक्ष महोदय, ज्या ठरावावर कालपासून चर्चा सुरू आहे त्याची स्पष्टपणे दोन भागात विभागणी होते. एक भाग वादग्रस्त असून दुसरा वादातीत आहे. या ठरावातील परिच्छेद ५ ते ७ संबंधित भाग हा वादातीत आहे. या परिच्छेदात भारताच्या भावी राज्यघटनेची उद्दिष्टे नमूद केली आहेत. मला हे नमूद करावेच लागेल की, पं. जवाहरलाल नेहरुंसारख्या नामांकित समाजवाद्याने मांडलेला हा ठराव वादातीत असला तरी मला अत्यंत निराशाजनक वाटतो. माझी त्यांच्याकडून अशी अपेक्षा होती की, ठरावातील या भागात त्यांनी जे काही मांडले त्यापेक्षा ते कितीतरी पुढे जातील. इतिहासाचा अभ्यासक या नात्याने ठरावातील हा भाग कुठल्याही परिस्थितीत त्यात समाविष्ट होणारच नाही याची मी काळजी घेतली असती. ठरावातील तो भाग वाचताना फ्रांसच्या संविधान सभेने उद्घोषित केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यातील एका कलमाची आठवण होते. प्रत्यक्षात चारशे पन्नास वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही मानवी हक्कांचा जाहीरनामा व त्यातील अंतर्भूत तत्त्व आपल्या मानसिकतेचा अविभाज्य भाग झालेला आहे असे जर मी म्हटले तर ते योग्यच होईल. मी तर असे म्हणेन की, जगातील कोणत्याही सुसंस्कृत भागातील आधुनिक माणसाच्याच मानसिकतेचा तो अविभाज्य भाग झाला आहे असे नाही, तर खूप सनातनी, विचारात व सामाजिक संरचनेत खूप पुराणमतवादी असलेल्या आपल्या देशातसुद्धा या तत्त्वांची वैधता नाकारणारा कदाचितच कुणी आढळू शकेल. या ठरावात त्याची पुनरावृत्ती करणे म्हणजे शुद्ध पांडित्य दर्शविण्याचाच प्रकार होय. ही तत्त्वे आपल्या निष्कलंक दृष्टिकोनाचा अविभाज्य भाग झालेली आहेत. त्यामुळे आपल्या उद्दिष्टांचा भाग म्हणून या तत्त्वांची पुन्हा घोषणा करणे अनावश्यक ठरते. या ठरावात दुसऱ्याही काही उणीवा आहेत. मला असे दिसते की ठरावातील प्रस्तुत भागात काही हक्कांची स्पष्टपणे तरतूद असली तरी उपाययोजनेचा मात्र त्यात उल्लेख नाही. आपणा सर्वांना जाणीव आहेच की, लोकांच्या हक्कांवर गदा येत असेल तेव्हा ते परत मिळविण्याची तरतूद असल्याशिवाय ते निरर्थक ठरतात. मला यात अशा उपाययोजनांची पूर्ण उणीव भासते. कोणत्याही माणसाचे जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्ता कायदेशीर कार्यवाहीशिवाय हिरावून घेता येणार नाही. हे सर्वसामान्य सूत्रही मला या ठरावात कुठेही आढळत नाही. मूलभूत हक्कांची तरतूद ही कायदा व नीतिमत्तेच्या मर्यादेत करण्यात आली आहेत. स्वाभाविकतः कायदा कायदा म्हणजे काय, नीतिमत्ता म्हणजे काय हे त्यावेळचे शासन ठरविल आणि जेव्हा एक राज्यकर्ते एक दृष्टिकोन स्वीकारतील तर दुसरे दुसरा दृष्टिकोन स्वीकारतील. तत्कालीन राज्यकर्त्यांवर जर हा निर्णय सोपविण्यात आला तर, अशा वेळी मूलभूत अधिकारांची नेमकी स्थिती काय राहील हे सांगता येत नाही. महोदय, या ठरावात आर्थिक, सामाजिक व राजकीय न्यायाची तरतूद करण्यात आली आहे. जर या ठरावामागे वास्तवता आणि प्रामाणिकपणा असेल,

ज्याबद्दल मला तिळमात्र शंका नाही, हा ठराव मांडणाऱ्यांनी राज्याला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय ज्याद्वारे प्रत्यक्षात देता येईल अशी स्पष्ट तरतूद या ठरावात करायला हवी होती. या पार्श्वभूमीवर माझी अशी अपेक्षा होती की देशात आर्थिक व सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीसाठी शेतीच्या व उद्योगाच्या अर्थव्यवस्था राष्ट्रीयीकरणाची तरतूद ठरावात करणे आवश्यक होते. समाजवादी अर्थव्यवस्था असल्याशिवाय भविष्यातील कोणतेही सरकार देशात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय कसा देवू शकेल हे मला समजत नाही. म्हणून या बाबींच्या स्पष्ट उल्लेखांना व्यक्तिशः माझी हरकत नसली तरी मला हा ठराव काहीसा निराशाजनक वाटतो. प्रस्तुत ठरावावरील एवढी माझी निरिक्षणे व्यक्त केल्यानंतर हा प्रश्न मी इथेच संपवितो.

आता मी ठरावाच्या पहिल्या भागाकडे वळतो. यात पहिल्या चार परिच्छेदांचा समावेश होतो. या सभागृहात आतापर्यंत झालेल्या चर्चेवरुन हा भाग वादग्रस्त झाल्याचे दिसून येते. ठरावात उपयोजिलेला 'प्रजासत्ताक' हा शब्द वादाचा केन्द्रबिंदु असल्याचे जाणवते. 'सार्वभौमत्त्व लोकांमधून निर्माण होते.' ह्या परिच्छेद चार मधील विधानाभोवती हा वाद केन्द्रित झालेला आहे. मुस्लिम लीगच्या अनुपस्थितीत सभेने या ठरावावर चर्चा करणे संयुक्तिक होणार नाही, या माझे मित्र डॉ. जयकर यांनी काल उपस्थित केलेल्या मुद्यातून हा वाद निर्माण झाला आहे. महोदय, या महान देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक भविष्यकालीन संरचनेबद्दल व उज्ज्वल भवितव्याबद्दल माझ्या मनात तिळमात्रदेखील शंका नाही. आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. आपण एक दुसऱ्यांविरुद्ध लढणाऱ्या छावण्यांचा समूह आहोत आणि मी तर यापुढेही जावून हेही मान्य करेन की, बहुशः अशाच एका छावणीचा मी ही एक नेता आहे. परंतु महोदय, हे सर्व खरे असले तरी मला पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करु शकणार नाही (प्रचंड टाळ्या). विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंध झाल्याशिवाय राहणार नाही याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नाही (हर्षध्वनी). आज जरी मुस्लिम लीग भारताच्या फाळणीसाठी प्रयत्नशील असला तरी एकसंध भारतच त्यांच्याहीसाठी हिताचा आहे, असा विचार स्वतः मुस्लिम एक दिवस करायला लागतील हे सांगताना मला जराही संकोच वाटत नाही (हर्षध्वनी व प्रचंड टाळ्या).

अंतीम ध्येयाबाबत, माझ्या मते आपल्यापैकी कुणीही भीती बाळगण्याचे कारण नाही. याबाबत कुणालाही शंका असू नये. आपली अडचण ही अंतीम भविष्याबाबतची नाही. आज एकसंघ नसलेल्या समाजातील लोकांनी एकत्रितपणे एकसंधत्त्वाकडे नेणाऱ्या मार्गाने कसा प्रवास करता येईल. याचा निर्णय घेणे ही आपली खरी अडचण आहे. आपली अडचण अंतीम ध्येयाबाबत नाही, सुरुवात कशी करावी याबाबत आहे. म्हणूनच अध्यक्ष महोदय, मी असा विचार केला असता की, स्वखुशीने आपले मित्र होण्याकरिता प्रत्येक पक्षाचे मन वळवण्यासाठी, या देशातील, जे अजूनही पूर्वग्रहाने मुख्य प्रवाहात सामील होण्यास तयार झाले नाहीत, अशा घटकांना सामील करून घेण्यासाठी काही सवलती द्याव्या लागल्यात तर त्या देण्याचा उच्च दर्जाचा मुत्सद्दीपणा बहुसंख्यांक असलेल्या पक्षांनी दाखवावा, यासाठी मी हे आवाहन करीत आहे. लोकांच्या मनात भीती निर्माण होईल अशा शब्दांना व घोषणांना आपण दूर ठेवू या. आपल्या विरोधकांचे पूर्वग्रह लक्षात घेऊन त्यांना काही सवलती देऊ या, त्यांना सोबत घेऊ या, जेणेकरुन आपण ज्या मार्गावरुन वाटचाल करीत आहोत त्या मार्गावर ते स्वखुशीने येऊन मिळतील. या मार्गावर जर आम्ही सर्वांनी दीर्घकाळ वाटचाल केली तर तीच आम्हाला निश्चितपणे ऐक्याकडे

घेऊन जाईल. मी इथे डॉ. जयकरांच्या उपसूचनेस पाठिंबा देतो तो एवढ्यासाठीच की, आपल्या सर्वांना याची जाणीव झाली पाहिजे, आपण बरोबर असू की चूक, आपण घेत असलेली भूमिका आपल्या कायदेशीर अधिकाराशी सुसंगत असो वा नसो, १६ मे किंवा ६ डिसेंबरच्या निवेदनाशी ती जुळणारी असो किंवा नसो ते सर्व बाजूला ठेवू या. कायदेशीर बाजूपेक्षाही हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. हा प्रश्न कायद्याचा मुळी नाहीच. कायद्याच्या सर्व बाबी आपण दूर ठेवू या आणि असा प्रयत्न करु या की, जेणेकरुन जे लोक आज सोबत यायला तयार नाहीत ते येतील. ते येतील अशी परिस्थिती आपण निर्माण करु या. असे माझे आवाहन आहे.

या सभागृहात जी चर्चा सुरू आहे त्यात दोन प्रश्न विचारार्थ मांडण्यात आलेत. त्या प्रश्नांचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला की, मी त्यांची नोंद करून ठेवली आहे. त्यापैकी एक प्रश्न माझे मित्र बिहारचे प्रधानमंत्री यांनी काल या सभागृहात केलेल्या भाषणात उपस्थित केला. त्यांच्या मते मुस्लिम लीगला संविधान सभेत सहभागी होण्यासाठी प्रस्तुत ठराव कसा प्रतिबंध करु शकतो ? आज माझे मित्र डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी एक दुसरा प्रश्न उपस्थित केला. तो प्रश्न म्हणजे कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावाशी प्रस्तुत ठराव विसंगत आहे काय ? महोदय, हे दोनही प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत व त्यांची उत्तरे, नव्हे स्पष्ट उत्तरे दिली गेली पाहिजेत. मला असे ठामपणे वाटते की, प्रस्तुत ठरावातून काही निष्पन्न होण्याचा उद्देश असो वा नसो, हा थंड डोक्याने घेतलेला निर्णय असो वा नसो, ही निव्वळ आकस्मिक घटना असो किंवा नसो, पण या ठरावाचा निश्चित परिणाम मुस्लिम लीगला संविधान सभेच्या बाहेर ठेवण्यातच होणार आहे. या संदर्भात ठरावातील परिच्छेद क्रमांक ३ कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो, जो माझ्या मते अतिशय अर्थपूर्ण व महत्त्वाचा आहे. परिच्छेद क्रमांक ३ मध्ये भारताच्या भावी राज्यघटनेचा विचार अंतर्भूत आहे. प्रस्तुत ठराव मांडणाऱ्याला यात काय अभिप्रेत आहे हे मला माहीत नाही. परंतु मी हे गृहीत धरतो की, प्रस्तुत ठराव संमत झाल्यावर तो संविधान सभेला परिच्छेद ३ च्या चौकटीत संविधानाच्या निर्मितीसाठी निर्देशक राहील. परिच्छेद ३ काय म्हणतो ? परिच्छेद ३ असे म्हणतो की, या देशात राज्यसंस्थेचे दोन प्रकार राहतील. एक खालच्या स्तरावर स्वायत्त प्रांत किंवा राज्ये किंवा असे इतर भाग जे अखंड भारतात सामील होऊ इच्छितात ते असतील. हे स्वायत्त घटक पूर्ण अधिकारयुक्त राहतील. त्यांना उर्वरित अधिकार सुद्धा राहतील. घटक प्रांतांच्या वरच्या स्तरावर संघराज्य राहील. त्याला काही बाबतीत कायदे करण्याचा, अंमलबजावणी करण्याचा आणि प्रशासनाचा अधिकार राहील. ठरावाचा हा भाग वाचत असताना एकत्रिकरणाच्या संकल्पेनेचा संदर्भ, तसेच एका बाजूला असलेले केन्द्र सरकार व दुसऱ्या बाजूला असलेली प्रांत सरकारे यांच्यामध्ये दुवा साधणारी मधली व्यवस्था मला कुठे आढळत नाही. कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावाच्या पार्श्वभूमीवर हा परिच्छेद वाचल्यावर किंवा काँग्रेसने वर्धेच्या अधिवेशनात पारित केलेल्या ठरावाच्याही पार्श्वभूमीवर, प्रांतांच्या एकत्रिकरणाच्या संकल्पनेचा संदर्भ मला कुठेही आढळत नाही. यामुळे मी फार आश्चर्यचकित झालो आहे, हे मला कबूल करावेच लागेल. व्यक्तिशः असे गट करण्याची कल्पनाच मला मान्य नाही (ऐका...ऐका). मला मजबूत केंद्र सरकार आवडते (ऐका...ऐका). १९३५ च्या भारत सरकार कायद्याने निर्माण केलेल्या केन्द्र सरकारपेक्षाही अधिक मजबूत केन्द्र सरकार मला हवे आहे. परंतु महोदय, माझ्या या मतांना, सदिच्छांना सद्यःस्थितीत कुठेही स्थान असल्याचे दिसत नाही. आपण खूप दूरवर प्रवास केला आहे. या देशात १५० वर्षाच्या प्रशासकीय व्यवस्थेतून निर्माण झालेले मजबूत केन्द्र सरकार जे माझ्या दृष्टीने अत्यंत कौतुकास्पद, आदरयुक्त व आश्रयस्थान होते. मी जर असे म्हटले की त्याला खिळखिळे करण्याची

संमती काँग्रेस पक्षाने ज्या कारणांमुळे दिली ती काँग्रेसलाच माहित. या भूमिकेचा त्याग केल्यानंतर आणि आम्हाला मजबूत केन्द्र सरकार नको ही भूमिका घेतल्यानंतर घटक राज्ये आणि केन्द्र सरकार यांना जोडणारी मधली उपसंघराज्याची व्यवस्था स्वीकारल्यानंतर, परिच्छेद ३ मध्ये एकत्रिकरणाच्या योजनेचा उल्लेख का केला नाही हे मला जाणून घ्यायचे आहे. एकत्रिकरणाशी संबंधित कलमांचा अर्थ लावण्यात काँग्रेस पक्ष, मुस्लिम लीग व ब्रिटिश सरकार यांचे एकमत नाही हे मी नीट समजू शकतो. परंतु मी हा नेहमीच विचार केलेल्या बाबतीत माझी चूक होत आहे. हे जर कुणी मला निदर्शनास आणून दिले तर दुरुस्ती करण्यास मी तयार आहे. निदान काँग्रेस पक्षाने हे मान्य केले होते की, विविध गटांमध्ये विभागलेल्या राज्यांनी जर संघ किंवा उपसंघराज्याला मान्यता दिली तर या प्रस्तावाला काँग्रेस विरोध करणार नाही. काँग्रेसचे हेच मनोगत असावे असा मला विश्वास आहे. माझा प्रश्न हा आहे की, ठराव मांडणाऱ्या व्यक्तीने त्याला आणि त्याच्या पक्षाला मान्य असलेल्या प्रांतांच्या एकत्त्वाचा किंवा प्रांतांच्या एकत्रिकरणाचा उल्लेख ठरावात का केला नाही ? या ठरावातून संघाच्या कल्पनेला पूर्णतः का वगळण्यात आले आहे ? मला याचे उत्तर दिसत नाही. कोणतेही असो ! म्हणून मला असे म्हणायचे आहे की, बिहारचे पंतप्रधान आणि डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी उपस्थित केलेले दोन प्रश्न–१६ मे च्या प्रस्तावाशी प्रस्तुत ठराव कसा विसंगत आहे किंवा या संविधान सभेत मुस्लिम लीगच्या प्रवेशाला हा ठराव कसा प्रतिबंध करतो—याचे उत्तर हा परिच्छेद ३ आहे. मुस्लिम लीग निश्चितपणे याचा फायदा घेईल आणि आपल्या सततच्या अनुपस्थितीचे समर्थन करील. महोदय, माझे मित्र डॉ. जयकर यांनी सदर ठरावावरील निर्णय पुढे ढकलण्यात यावा यासाठी काल केलेला युक्तीवाद, त्यांना न दुखवता, मी असे म्हणेन की काहीसा कायदेशीपणाचाच होता. त्यांच्या युक्तिवादाचा आधार होता की तुम्हाला असे करण्याचा अधिकार आहे का ? संविधान सभेच्या कामकाजाशी संबंधित कॅबिनेट मिशनच्या विधानातील काही भाग त्यांनी वाचून दाखविला. त्यांच्या युक्तिवादातील मुख्य मुद्दा असा होता की, या ठरावावर निर्णय घेण्यासाठी या संविधान सभेने जी कार्यपद्धती अवलंबिली आहे ती कॅबिनेट मिशनच्या विधानातील अंतर्भूत कार्यपद्धतीशी पूर्णतः विसंगत आहे. महोदय, मी हा मुद्दा थोड्या वेगळ्या पद्धतीने मांडू इच्छितो, तो असा की, हा ठराव सरळसरळ मंजूर करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार तुम्हाला आहे किंवा नाही हे मी तुम्हाला विचारीत नाही. शक्य आहे की हा अधिकार तुम्हाला असेलही. मी विचारीत असलेला प्रश्न असा की असे करणे तुमच्यासाठी दूरदर्शीपणाचे होईल काय ? तुमच्यासाठी हे शहाणपणाचे होईल काय ? अधिकार ही एक गोष्ट आहे. शहाणपणा ही सर्वस्वी वेगळी गोष्ट आहे. या सभागृहाने याचा निर्णय घेताना विचार करावा की, हे शहाणपणाचे होईल काय ? हे मुत्सेद्देगिरीचे ठरेल काय ? या घडीला असे करणे दूरदर्शीपणाचे ठरेल काय ? मी हे उत्तर देवू इच्छितो की हे दूरदर्शीपणाचे होणार नाही व शहाणपणाचे ठरणार नाही. काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यातील वाद मिटविण्यासाठी पुन्हा एकदा प्रयत्न करावा असे मी सुचवितो. हा प्रश्न एवढा जीवनमरणाचा व इतका महत्त्वाचा आहे की एका किंवा दुसऱ्या पक्षाच्या प्रतिष्ठेच्या आधारावर तो कधीही सुटणारा नाही याची मला खात्री आहे. राष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना लोकांची प्रतिष्ठा, नेत्यांची प्रतिष्ठा तसेच पक्षाची प्रतिष्ठा नगण्य असते. कोणत्याही गोष्टीपेक्षा राष्ट्राचे भवितव्य अधिक महत्त्वाचे असते. याचे कारण, या संविधान सभेने एकदिलाने काम करण्यासाठीच हे हितावह होईल असे नाही, तर मुस्लिम लीगने काही निर्णय घेण्यापूर्वी तिची प्रतिक्रिया सुद्धा संविधान सभेला कळू शकेल. एवढ्याचसाठी मी डॉ. जयकरांच्या उपसूचनेस पाठिंबा देत आहे. आपण जर उताविळपणाने वागलो तर भविष्यात

त्याचा काय परिणाम होईल याचा सुद्धा आपण विचार केला पाहिजे. या सभागृहावर ज्या काँग्रेस पक्षाचा ताबा आहे त्याच्या मनात याबाबत काय योजना आहेत हे मला माहीत नाही. याविषयी ते विचार करीत आहेत काय हे वर्तविण्याचा मला अधिकार नाही. याबाबत त्यांचेजवळ कोणते उपाय आहेत, त्यांचे कोणते डावपेच आहेत हे मला माहित नाही. परंतु निर्माण झालेल्या या प्रश्नाचा, एक त्रयस्थ म्हणून विचार करताना मला असे वाटते की, याबाबतचे भवितव्य ठरविण्याचे केवळ तीनच मार्ग आहेत. एका पक्षाने दुसऱ्या पक्षापुढे शरणागती पत्करणे हा एक मार्ग, शांततामय वाटाघाटीतून उपाय शोधून काढणे हा दुसरा मार्ग आणि तिसरा मार्ग म्हणजे उघड संघर्ष. महोदय, संविधान सभेच्या काही सदस्यांकडून मी असे ऐकत आहे की, ते संघर्ष करण्याच्या तयारीत आहेत. देशातील राजकीय पेचप्रसंग युद्धाच्या मार्गाने सोडविण्याचा विचार या देशातील कोणत्याही व्यक्तीने करावा या कल्पनेनेच मी भयभीत झालो आहे. हे मी कबूल करतो. देशातील किती लोक या कल्पनेच्या पाठिशी आहेत हे मला माहित नाही. माझ्या मते बऱ्याच लोकांचा याला पाठिंबा आहे. याचे कारण कोणत्याही परिस्थितीत त्यांच्यातील बहुसंख्यांकांचा पाठिंबा, असे युद्ध ब्रिटिशांच्या विरुद्ध होईल असे त्यांना वाटते म्हणून आहे असे मला वाटते. परंतु महोदय, ज्या युद्धाचा याठिकाणी विचार होत आहे, जे लोकांच्या मनात आहे, ते युद्ध स्थानिक, मर्यादित आणि फक्त ब्रिटिशांपुरतेच सीमित ठेवता येईल काय ? ब्रिटिशाव्यतिरिक्त आणखी कुणाबरोबर लढावं लागणार नसेल तर अशा प्रकारच्या डावपेचांना माझा फारसा विरोध असण्याचे कारण नाही. पण हे युद्ध केवळ ब्रिटिशांच्या विरुद्ध होईल काय ? कोणताही संकोच न बाळगता या सभागृहाला मी शक्य तितक्या स्पष्ट शब्दात सांगू इच्छितो की, जर या देशात युद्ध झाले आणि या युद्धाचा संबंध आपल्यासमोर उभ्या टाकलेल्या प्रश्नांशी असेल तर युद्ध ब्रिटिशांविरुद्धचे असणार नाही, ते युद्ध मुसलमानांच्या विरुद्ध असेल. त्यातही आणखी वाईट म्हणजे हे युद्ध ब्रिटिश आणि मुसलमान यांच्या संयुक्त आघाडी विरुद्ध असेल. होऊ घातलेले युद्ध ज्याप्रकारे होण्याची मला भीती आहे. त्यापेक्षा वेगळ्या प्रकारे होईल असे वाटत नाही. महोदय, अमेरिकेसोबत झालेल्या तडजोडप्रसंगी बर्कनी केलेल्या महत्त्वपूर्ण भाषणातील एक परिच्छेद या सभागृहाला मी वाचून दाखवू इच्छितो. सभागृहातील वातावरण निवळण्यासाठी त्याचा काही प्रमाणात उपयोग होऊ शकेल असा मला विश्वास वाटतो. आपणास माहित आहे की, अमेरिकेतील बंडखोर वसाहतीवर ताबा मिळविण्यासाठी ब्रिटिश लोक प्रयत्नशील होते. त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना आपल्या अधिपत्त्याखाली आणण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न होता. वसाहतींना जिंकून त्यांच्यावर ताबा मिळविण्याच्या योजनेला विरोध करताना बर्क म्हणाले.

"महोदय, मला हे सांगण्याची परवानगी द्या की, केवळ बळाचा वापर हा तात्पुरताच असतो. काही काळाकरिताच त्याच्यामुळे सत्ता गाजवता येईल. परंतु त्यामुळे पुन्हा त्यांना अधिपत्याखाली ठेवण्यासाठी बळाचा वापर करण्याच्या गरजेला कायमचे दूर करता येणार नाही. ज्या राष्ट्राला कायमचे अधिपत्याखाली ठेवावयाचे आहे त्यावर अशा पद्धतीने शासन करता येत नाही.

माझा दुसरा आक्षेप बळाच्या परिणामकारकतेच्या अनिश्चिततेबाबत आहे. बळाच्या वापरातून नेहमीच दहशत निर्माण होईल असे नाही आणि सुसज्ज सैन्य म्हणजे विजय नव्हे. जर तुम्हाला यश मिळाले नाही तर मग कोणताही मार्ग शिल्लक राहात नाही. वाटाघाटी अपयशी ठरल्यावर फक्त बळाचा वापर उरतो. परंतु बळाचा वापरही अपयशी ठरला तर वाटाघाटीच्या आशाच उरत नाहीत. दयेच्या मोबदल्यात कधी-कधी सत्ता व अधिकार मिळवता येतात. परंतु शक्तिपात व पराभूत झालेल्या हिंसेला भीक म्हणून सत्ता व अधिकार कधीही मागता येत नाही.....

बळाच्या वापराला माझा पुढचा आक्षेप असा आहे की, प्रयत्नांची पराकाष्ठा करून तुम्ही जे मिळवाल त्याला तुम्ही हानी पोचवाल. तुम्ही जे मिळविता ते त्याच्या मूळ स्वरुपात मिळत नसते. ते अवमूल्यन झालेले, रसातळास गेलेले, उजाड झालेले आणि नाश पावलेल्या स्वरुपात असते.'

हे बहुमोल शब्द आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष घातक होईल.

हिंदू-मुस्लिम समस्या बळाचा वापर करून सोडविण्याची योजना जर कुणाच्या मनात असेल, दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यासाठी युद्धांचा अवलंब करून मुसलमानांना शरणागती पत्करायला लावून संविधानाच्या अधिपत्त्याखाली आणावयाचे असेल, त्यांच्या संमतीशिवाय तयार झालेल्या संविधानास शरण जाण्यासाठी त्यांना बाध्य करण्यात येत असेल तर या देशाला नेहमीसाठी याच प्रयत्नातून गुंतून राहावे लागेल. एकदा मिळालेला विजय हा कायमस्वरुपी असणार नाही.

मी आतापर्यंत जेवढा वेळ घेतला त्यापेक्षा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही आणि पुन्हा बर्कला उद्‌घृत करून मी माझ्या भाषणाचा समारोप करीन. बर्कने असे कुठेतरी म्हटले आहे की, "सत्ता देणे सोपे आहे, शहाणपण देणे कठीण आहे." या सभेला प्राप्त झालेल्या सार्वभौम अधिकाराचा वापर शहाणपणाने करण्याची आपली तयारी आहे, हे आपण आपल्या आचरणाने सिद्ध करु या. देशातील सर्व घटकांना आपल्या सोबत नेण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. एकतेकडे जाण्याचा याशिवाय दुसरा मार्ग नाही. याबाबत आपल्या मनात कुठलीही शंका असता कामा नये."

(संदर्भ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-३, १९४६ ते १९५६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सन २००२.)

(१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी केलेले भाषण :—

भारताच्या घटना समितीची बैठक **गुरूवार, दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८** रोजी नवी दिल्ली येथील घटना सभागृहात सकाळी अकरा वाजता सुरू झाली. माननीय अध्यक्ष (सन्माननीय डॉ.राजेंद्र प्रसाद) बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

घटनेच्या मसुद्याविषयक प्रस्ताव

माननीय अध्यक्ष : आता आपण चर्चेला आरंभ करावा असे मला वाटते. माननीय डॉ.आंबेडकर यांनी आपला प्रस्ताव सादर करावा अशी विनंती मी करतो.

माननीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर (मुंबई : सर्वसाधारण) :— माननीय अध्यक्ष महोदय, मसुदा समितीने मंजूर केलेला घटनेचा मसुदा आता मी सादर करतो आणि तो विचारात घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडतो.

घटना समितीने २९ ऑगस्ट, १९४७ रोजी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार मसुदा समितीची नियुक्ती करण्यात आली होती. केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय घटना समिती, प्रांतिक घटना समिती तसेच मूलभूत हक्क-

अल्पसंख्याक-सीमावर्ती प्रदेश सल्लागार समिती आदींच्या अहवालांवर घटना समितीने घेतलेल्या निर्णयांना अनुसरून भारतासाठी एक घटना तयार करण्याची जबाबदारी मसुदा समितीवर सोपविण्यात आली होती.

घटना समितीने असे निर्देश दिले होते की, काही बाबतीत १९३५ च्या भारत सरकार कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यात यावे. मसुदा समितीने केलेले बदल आणि सुचवलेले पर्याय यांचा संदर्भ माझ्या २१ फेब्रुवारी, १९४८ च्या पत्रात देण्यात आला असून तेवढे अपवाद वगळता मसुदा समितीला देण्यात आलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन झाल्याचे आढळेल अशी मला आशा आहे.

मसुदा समितीने तयार केलेला घटनेचा मसुदा हा एक मौलिक दस्तऐवज आहे. त्यात ३१५ कलमे आणि आठ परिशिष्टे आहेत. या मसुद्याएवढी तपशीलवार घटना इतर कोणत्याही देशात करण्यात आलेली नसेल हे मान्य करावेच लागेल. या घटनेचे अध्ययन ज्यांनी केलेले नसेल त्यांना तिची गुणवैशिष्ट्ये आणि ठळक वैशिष्ट्ये समजणे दुरापास्त होईल.

घटनेचा मसुदा जनतेसमोर गेले आठ महिने आहे. या मसुद्यातील तरतुदींवरील प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी मित्रमंडळी, टीकाकार आणि विरोधक यांना पुरेसा अवधी मिळाला होता. त्यापैकी काही प्रतिक्रिया गैरसमज आणि घटनेच्या कलमांचे अपुरे आकलन यांच्यावर आधारित आहेत असे मी म्हणू शकतो. परंतु टीका झालेली असून या टीकेला उत्तर देणे क्रमप्राप्त आहे.

हा मसुदा विचारात घेण्याचा ठराव सादर करताना या दोन कारणांमुळे या घटनेच्या वैशिष्ट्यांकडे आपले लक्ष वेधणे आणि टीकेला उत्तर देणे मी आवश्यक समजतो.

याबाबत बोलण्यापूर्वी घटना समितीचे नियुक्त केलेल्या तीन समित्यांचे अहवाल मी आपणाला सादर करू इच्छितो : (१) मुख्य आयुक्त शासित प्रांत समितीचा अहवाल (२) केंद्र आणि राज्य आर्थिक संबंध तज्ञ समितीचा अहवाल आणि (३) आदिवासी प्रदेश सल्लागार समितीचा अहवाल. हे अहवाल विलंबाने आल्यामुळे घटना समिती त्यांवर विचार विनिमय करू शकली नसली, तरी त्यांच्या प्रती समितीच्या सदस्यांना वितरित करण्यात आल्या आहेत. हे अहवाल आणि त्यांच्या शिफारशी यांवर मसुदा समितीने विचारविनिमय केलेला असल्याने ते सभागृहाला सादर करणे युक्त ठरणार आहे.

आता मी मुख्य प्रश्नाकडे वळतो. एखाद्या घटनेची प्रत संविधान अभ्यासकाच्या हाती दिल्यास दोन प्रश्न तो हमखास विचारेल. पहिला प्रश्न म्हणजे या घटनेत कोणत्या स्वरूपाचे सरकार अभिप्रेत आहे आणि दुसरा प्रश्न म्हणजे या घटनेचे स्वरूप काय आहे ? कारण कोणत्याही घटनेला या दोन कळीच्या प्रश्नांचा परामर्श घ्यावाच लागतो. यापैकी पहिल्या प्रश्नावर मी आता बोलणार आहे.

प्रस्तावित घटनेत भारतीय संघराज्याच्या केंद्रस्थानी असणाऱ्यासाठी राष्ट्रपती असे संबोधन वापरण्यात येईल. या संबोधनामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोळयासमोर येतील. परंतु नामसाधर्म्य सोडल्यास अमेरिकेतील सरकार आणि भारतातील प्रस्तावित सरकारचे स्वरूप यांच्यात काहीही साम्य नाही. अमेरिकेतील शासन प्रणालीला अध्यक्षीय शासन प्रणाली म्हणतात. आपल्या प्रस्तावित घटनेत संसदीय लोकशाहीचा प्रस्ताव आहे. या दोन्ही प्रणाली मूलतःच भिन्न आहेत.

अमेरिकेतील अध्यक्षीय प्रणालीत अध्यक्ष हेच शासनाचे प्रमुख असतात. प्रशासनाचे सर्व अधिकार त्यांच्या हाती असतात. आपल्या प्रस्तावित घटनेत राष्ट्रपतींचे स्थान ब्रिटिश घटनेतील राजाच्या स्थानासमान आहे. ते राष्ट्रप्रमुख असतील परंतु शासन यंत्रणेचे (कार्यपालिका) प्रमुख नसतील. ते राष्ट्राचे प्रतिनिधित्त्व करतील परंतु त्याचे प्रशासन करणार नाहीत. ते राष्ट्राचे प्रतीक असतील, ज्यायोगे राष्ट्राचे निर्णय घोषित करण्यात येतील असे शोभेचे स्थान त्यांना देण्यात येईल. अमेरिकन प्रणालीत अध्यक्षांच्या हाताखाली विविध विभागांचे सचिव असतात. त्याच धर्तीवर भारताच्या राष्ट्रपतींच्या हाताखाली विविध विभागांच्या प्रशासनाचे प्रमुख असणारे मंत्री असतील. मात्र येथेही या दोहोंत एक मूलभूत फरक राहणार आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांवर त्यांच्या कोणत्याही सचिवाचा सल्ला मानण्याचे बंधन नसते. भारताचे राष्ट्रपती मात्र सर्वसाधारणपणे आपल्या मंत्र्यांचा सल्ला मानतील. भारताच्या राष्ट्रपतींना मंत्र्यांच्या सल्ल्याविरूद्ध अथवा मंत्र्यांच्या सल्ल्याविना कोणतीही कृती करता येणार नाही. अमेरिकेचे अध्यक्ष कोणत्याही सचिवाला कधीही बडतर्फ करू शकतात. मात्र संसदेतील बहुमत जोपर्यंत मंत्र्यांच्या पाठी आहे तोपर्यंत भारताच्या राष्ट्रपतींना असे करण्याचा अधिकार नसेल.

अमेरिकेची अध्यक्षीय प्रणाली कार्यपालिका आणि विधिपालिका (काँग्रेस) या दोहोंवर आधारलेली आहे. म्हणजेच अध्यक्ष अथवा त्यांचे सचिव काँग्रेसचे सदस्य नसतात. मात्र आपल्या प्रस्तावित घटनेला हे तत्त्व मान्य नाही. भारतीय संघराज्याचे मंत्री संसदेचे सदस्य असतील. केवळ संसद सदस्यच मंत्री होऊ शकतील. मंत्र्यांना अन्य संसद सदस्यांप्रमाणेच अधिकार असतील; म्हणजे ते संसदेत बसू शकतील, चर्चेत भाग घेऊ शकतील आणि मतदान करू शकतील. दोन्ही प्रणाली लोकशाहीवर आधारित असून त्यापैकी कोणती एक निवडायची हा निर्णय अत्यंत कठीण होता. लोकशाहीतील कार्यपालिकेला दोन अटी पूर्ण कराव्या लागतात : (१) ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे, आणि (२) ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि, या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करू शकणारी प्रणाली दुर्दैवाने आजवर विकसित झालेली नाही. आपल्याला एकतर अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्त्व असलेली प्रणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्त्व परंतु कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिकी आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य परंतु कमी उत्तरदायित्त्व आहे. याउलट ब्रिटिश प्रणालीत अधिक उत्तरदायित्त्व परंतु कमी स्थैर्य आहे. याचे कारण स्पष्ट आहे.

अमेरिकी प्रणालीतील कार्यपालिका संसदबाह्य आहे. याचा अर्थ असा की आपल्या अस्तित्त्वासाठी ही कार्यपालिका काँग्रेसमधील (विधिपालिकेमधील) बहुमतावर अवलंबून नसते. परंतु ब्रिटिश प्रणालीतील कार्यपालिका संसदेतील बहुमतावर आपल्या अस्तित्त्वासाठी अवलंबून असते. नेमक्या याच कारणास्तव अमेरिकी काँग्रेस कार्यपालिका बडतर्फ करू शकत नाही. मात्र संसदीय प्रणालीतील सरकारला संसदेतील बहुमत गमावता क्षणीच राजीनामा द्यावा लागतो. या दृष्टीकोणातून पाहता संसदबाह्य कार्यपालिका संसदेवर अवलंबून नसल्याने विधिपालिकेप्रती कमी जबाबदार असण्याची प्रवृत्ती आढळते तर याउलट संसदीय प्रणालीतील कार्यपालिकेत अधिक जबाबदारीची प्रवृत्ती आढळते कारण ती संसदेतील बहुमतावर अवलंबून असते. या दोन्ही प्रणालींमध्ये जबाबदारीच्या जाणीवेखेरीज आणखी एक फरक आहे. तो म्हणजे त्यांनी जबाबदारी कशी पार पाडली, याचा लेखाजोखा घेण्याचा आणि तो घेणाऱ्या यंत्रणेचा संसदेतर प्रणालीमध्ये, *उदा.* अमेरिका, हा लेखाजोखा निश्चित कालावधीनंतर घेण्यात येतो आणि तो मतदारांमार्फत घेण्यात येतो. संसदीय प्रणाली असलेल्या इंग्लंडमध्ये कार्यपालिकेचा लेखाजोखा दररोज आणि नियत कालावधीनंतर घेतला जात असतो. दैनंदिन लेखाजोखा संसद सदस्य प्रश्न विचारून, ठरावांच्या

माध्यमातून, अविश्वास ठराव, स्थगन प्रस्ताव आणि भाषणांवरील चर्चेच्याद्वारे घेत असतात. नियतकालिक लेखाजोखा मतदार निवडणुकांच्या माध्यमातून दर पाच वर्षांनी किंवा त्यापूर्वी घेत असतात. अमेरिकेत अस्तित्त्वात नसलेला जबाबदारीचा दैनंदिन लेखाजोखा अधिक प्रभावी मानला जातो आणि भारतासारख्या देशाला जास्त गरजेचा समजण्यात येतो. प्रस्तावित घटनेत कार्यपालिकेसाठी संसदीय प्रणालीची शिफारस करताना अधिक स्थैर्यापेक्षा अधिक उत्तरदायित्त्वाला पसंती देण्यात आली आहे.

आतापर्यंत मी प्रस्तावित घटनेतील शासन प्रणालीबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. आता मी दुसऱ्या प्रश्नाकडे, म्हणजे घटनेच्या स्वरूपाबद्दल बोलणार आहे.

इतिहासाला दोन प्रमुख प्रकारच्या घटना ज्ञात आहेत-एकात्मिक आणि संघराज्यात्मक. एकात्मिक घटनेची दोन वैशिष्ट्ये आहेत : (१) मध्यवर्ती राज्यसत्तेचे सर्वश्रेष्ठत्त्व आणि (२) दुय्यम राज्यसत्तांच्या सार्वभौमत्त्वाचा अभाव. याउलट संघराज्यात्मक घटनेची दोन वैशिष्ट्ये म्हणजे : (१) मध्यवर्ती राज्यसत्ता आणि दुय्यम राज्यसत्ता यांचे सहअस्तित्त्व आणि (२) प्रत्येक सत्ता आपापल्या निर्देशित क्षेत्रात सार्वभौम असणे. वेगळ्या शब्दांत असे म्हणता येईल की संघराज्य म्हणजे दुहेरी राज्यसत्तेची स्थापना. प्रस्तावित घटना संघराज्यात्मक स्वरूपाची आहे कारण तिच्या अंतर्गत दुहेरी राज्यसत्ता स्थापन करण्यात येणार आहे. प्रस्तावित घटनेच्या अंतर्गत केंद्रस्थानी मध्यवर्ती राज्यसत्ता असेल आणि तिच्याभोवती राज्ये असतील. घटनेने निर्देशित केलेल्या क्षेत्रांमध्ये या दोन्ही सत्तांना सार्वभौम अधिकार देण्यात येतील. ही दुहेरी राज्यसत्ता अमेरिकी घटनेच्या धर्तीवर आहे. अमेरिकी प्रणालीसुद्धा दुहेरी राज्यसत्तेची असून तिच्यात मध्यवर्ती सरकार आणि राज्ये आहेत; प्रस्तावित घटनेतही मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे अशीच तत्सम रचना आहे. अमेरिकी घटनेत मध्यवर्ती सरकार केवळ राज्यांचा संघ नाही आणि राज्यांनाही केवळ प्रशासकीय घटक अथवा मध्यवर्ती सरकारच्या यंत्रणा असे स्थान दिलेले नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावित भारतीय घटना म्हणजे केवळ राज्यांचा संघ नाही आणि राज्ये म्हणजेही मध्यवर्ती सरकारचे प्रशासकीय घटक अथवा प्रतिनिधी नव्हेत. भारतीय आणि अमेरिकी घटनांमधील साम्य येथे समाप्त होते. त्यांचे परस्परांपासून वेगळेपण दाखवणारे फरक आणखी मूलभुत आणि ठळक आहेत.

अमेरिकी संघराज्य आणि भारतीय संघराज्य यांच्यात दोन प्रमुख फरक आहेत. अमेरिकेत दुहेरी राज्यसत्तेप्रमाणे दुहेरी नागरिकत्त्वाचाही अवलंब करण्यात येतो. अमेरिकेत देशाच्या नागरिकत्त्वाप्रमाणेच राज्याचेही नागरिकत्त्व असते. अमेरिकी घटनेला करण्यात आलेल्या चौदाव्या दुरूस्तीनंतर हा दुहेरी नागरिकत्त्वाचा जाच मोठ्या प्रमाणात नाहीसा झाला आहे. कारण या दुरूस्तीमुळे अमेरिकी नागरिकांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण काढून घेण्यास राज्यांना मनाई करण्यात आली आहे. तथापि, श्री.विल्यम अँडरसन यांनी विशद केल्यानुसार मतदानाचा अधिकार, सार्वजनिक पद धारण करणे आणि अन्य काही राजकीय विषयांमध्ये राज्ये आपल्या नागरिकांना अनुकूल ठरू शकेल अशा प्रकारे भेदभाव करू शकतात आणि करतातही. हा पक्षपात काही प्रकरणी याच्याही पुढे जातो. एखाद्या राज्यात किंवा स्थानिक प्रशासन संस्थेत नोकरी मिळवण्यासाठी बहुतेक प्रसंगी स्थानिक रहिवासी अथवा नागरिक असणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे कायदा अथवा वैद्यकीय व्यवसायाचा परवाना मिळविण्यासाठी राज्यातील निवास अथवा नागरीकत्त्व बहुदा वारंवार आवश्यक असते. तसेच ज्या व्यवसायांसाठी सार्वजनिक नियंत्रण कठोर असणे जरूरीचे असते अशा म्हणजे मद्यविक्री, समभाग किंवा रोखे विक्रीबाबत अशा अटी ग्राह्य धरण्यात आल्या आहेत.

प्रत्येक राज्याला आपापल्या क्षेत्रात काही अधिकार असून आपल्या नागरिकांना विशेष लाभ देण्यासाठी त्यांचा वापर करण्यात येतो. एकप्रकारे त्या-त्या राज्यातील वन्य प्राणी आणि मासे यांच्यावर संबंधित राज्याचे स्वामित्त्व असते. इतर राज्यांमधून येणाऱ्या नागरिकांकडून शिकार आणि मासेमारी परवाना देताना आपल्या राज्यातील नागरिकांपेक्षा अधिक शुल्क घेण्याची प्रथा आहे. तसेच राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमधून अनिवासी अर्जदारांना अधिक शिक्षण शुल्क आकारण्यात येते तर राज्यातील रूग्णालये आणि मनोरूग्ण उपचार केंद्रांमध्ये आणीबाणीची अवस्था वगळता केवळ राज्यातील निवासींनाच दाखल करून घेण्यात येते.

थोडक्यात म्हणजे एखादे राज्य आपले नागरिक किंवा निवासी यांना देत असलेले अनेक अधिकार अनिवासींना कायदेशीररित्या नाकारू शकते अथवा नाकारते किंवा निवासींपेक्षा अधिक कठोर अटी लादून अनिवासींना उपलब्ध करते. राज्यातील नागरिकांना देण्यात येणारे हे लाभ राज्य नागरिकत्त्वाचे खास अधिकार असतात. एकंदरीत पाहता एखाद्या राज्याचे नागरिक आणि इतर लोकांच्या अधिकारात बरीच तफावत असते. फिरस्ता आणि तात्पुरता रहिवासी प्रत्येक ठिकाणी हा खास भेदभाव अनुभवत असतो.

प्रस्तावित भारतीय घटनेत दुहेरी राज्यसत्ता असून त्यामध्ये एकच नागरिकत्त्व देण्यात आलेले आहे. संपूर्ण भारतासाठी एकच नागरिकत्त्व असणार आहे. ते भारतीय नागरिकत्त्व असेल. राज्य नागरिकत्त्व ठेवण्यात आलेले नाही. प्रत्येक भारतीयाला, तो कोणत्याही राज्याचा निवासी असला तरी, नागरिकत्त्वाचे समान अधिकार आहेत.

प्रस्तावित घटनेत भारत आणि अमेरिकी यांच्या दुहेरी राज्यसत्ता संकल्पनेत आणखी एक फरक आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती घटना आणि राज्यांच्या घटना यांच्यातील दुवा सैल आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती आणि राज्य सरकार यांच्या संबंधांबाबत 'ब्राईस' म्हणतो :—

> *"एकाच भूखंडावर एक मोठी इमारत असावी, तिच्याभोवती अनेक छोट्या इमारती असाव्यात आणि या सर्व इमारती परस्परांपासून भिन्न दिसाव्यात तसेच मध्यवर्ती अथवा राष्ट्रीय सरकार आणि राज्य सरकारे यांचे आहे....."*

अमेरिकेतील राज्य सरकारे मध्यवर्ती सरकारपेक्षा किती भिन्न आहेत ? या भिन्नतेची कल्पना पुढील वस्तुस्थितीवरून येऊ शकेल :—

१. *सरकारचे प्रजासत्ताक हे स्वरूप कायम राखून प्रत्येक राज्याला आपली घटना तयार करण्याचे स्वातंत्र्य अमेरिकेत आहे.*

२. *मध्यवर्ती सरकारपासून कोणत्याही राज्याच्या नागरिकांना आपली घटना बदलण्याचा कायमस्वरूपी स्वतंत्रपणे अधिकार आहे.*

पुनश्च एकवार 'ब्राईस' च्या शब्दांत सांगायचे म्हणजे :—

> *"(अमेरिकेतील) कोणतेही राज्य त्याच्या घटनेमुळे राष्ट्रकुल म्हणून अस्तित्त्वात असते आणि सर्व राज्यसत्ता-विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका-घटनेची निर्मिती असून घटनेच्या आधीन असते."*

हे भारताच्या प्रस्तावित घटनेला लागू पडणार नाही. कोणत्याही राज्याला (निदान खंड एक मधील) स्वत:ची घटना तयार करण्याचा अधिकार नसेल. मध्यवर्ती घटना आणि राज्यांची घटना एकाच चौकटीत असेल आणि त्यातून कोणालाही बाहेर पडता येणार नाही, तसेच या चौकटीतच त्यांना काम करावे लागेल.

आतापर्यंत मी अमेरिकी संघराज्य आणि प्रस्तावित भारतीय संघराज्य यांच्यातील फरक दाखविला आहे. परंतु प्रस्तावित भारतीय संघराज्याची काही खास वैशिष्ट्ये केवळ अमेरिकी संघराज्यच नव्हे तर इतर सर्व संघराज्यांपेक्षा वेगळेपण अधोरेखित करतात. अमेरिकेसह सर्व संघराज्यीय प्रणाली संघराज्याच्या कठोर चौकटीत बंदिस्त आहेत. परिस्थिती कशीही असो, या चौकटीचे स्वरूप अथवा आकार बदलत नाहीत. ही प्रणाली कदापि एकात्मिक होऊ शकत नाही. याउलट आपली प्रस्तावित घटना काळ आणि परिस्थिती यांच्या गरजेनुसार एकात्मिक आणि संघराज्यात्मक अशी दोन्ही रूपे धारण करू शकते. सर्वसामान्य परिस्थितीत संघराज्यात्मक प्रणाली म्हणून ती अंमलात असावी अशी रचना केलेली आहे. परंतु युद्धकाळात ती एकात्मिक प्रणाली असल्यासारखी काम करू शकेल अशी व्यवस्था केलेली आहे.

एकदा भारताच्या राष्ट्रपतींनी कलम २७५ च्या तरतुदीनुसार आपले अधिकार वापरून उद्घोषणा केली की संपूर्ण चित्र बदलते आणि आपली प्रणाली एकात्मिक होऊन जाते. मध्यवर्ती सरकारला इच्छा असल्यास उद्घोषणेद्वारा पुढील बाबी साध्य करता येतात : (१) राज्य सूचीत असलेल्यांसह कोणत्याही विषयावर कायदा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेणे (२) राज्यांच्या अखत्यारीत असलेल्या विषयांबाबत त्यांनी आपले कार्यकारी अधिकार कशाप्रकारे वापरावे याबाबतचे निर्देश देण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे, (३) कोणत्याही कारणासाठी कोणत्याही अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे आणि (४) घटनेच्या अर्थविषयक तरतुदी स्थगित करण्याचे अधिकार स्वत:कडे घेणे. अशाप्रकारे स्वत:चे रूपांतर एकात्मिक राज्यसत्तेत करण्याचे अधिकार इतर कोणत्याही संघराज्यात अस्तित्त्वात नाहीत. आपली प्रस्तावित घटना आणि आपल्याला ज्ञात असलेली इतर सर्व संघराज्ये यांच्यात हा फरक आहे.

प्रस्तावित भारतीय संघराज्य आणि इतर संघराज्ये यांच्यात हा एकमेव फरक नाही. संघराज्यात्मकतेचे वर्णन "दुर्बल नाही परंतु क्षीण" शासकीय प्रणाली असे करण्यात येते. संघराज्याच्या दोन दुर्बलता मानण्यात येतात. पहिली म्हणजे कठोरता आणि दुसरी म्हणजे अधिनियमबद्धता. हे दोष संघराज्यात्मकतेमध्ये अंगभूत आहेत याबाबत दुमत नाही. संघराज्याची घटना केवळ लिखितच असू शकते आणि लिखित घटना केवळ कठोरच असू शकते. संघराज्यात्मक घटना म्हणजे मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे यांच्यातील सार्वभौमत्त्वाची घटनाविषयक कायद्याने केलेली विभागणी आणि अशा विभागणीचे दोन अटळ परिणाम :- (१) राज्यांवर सोपवलेल्या क्षेत्रांमध्ये मध्यवर्ती सरकारने आक्रमण करणे किंवा याउलट घडणे म्हणजे घटनेचा भंग आणि (२) असा भंग झाल्यास त्याबाबतचा निवाडा न्यायपालिकेने देणे. संघराज्यात्मकतेचे हे स्वरूप असल्याने अमेरिकेच्या घटनेत याचा प्रकर्षाने प्रत्यय येतो.

संघराज्यात्मक प्रणालीतील अंगभूत कठोरता आणि अधिनियमबद्धता यांच्यामुळे होणारी हानी कमी करण्याचा प्रयत्न नंतरच्या काळात संघराज्यात्मकतेचा स्वीकार केलेल्या राष्ट्रांनी केलेला आहे. यासंदर्भात ऑस्ट्रेलियाचे उदाहरण उद्बोधक ठरेल. आपले संघराज्य कमी कठोर करण्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या घटनेत पुढील उपायांचा अवलंब करण्यात आला आहे.:–

१. संसदेला सामाईक कायदे करण्याचा व्यापक अधिकार आणि विशेष कायदे करण्याचा थोडा अधिकार, आणि

२. घटनेच्या काही कलमांना तात्पुरती मुदत देणे आणि 'संसदेने अन्यथा तरतूद' करेपर्यंत ती कलमे अंमलात आणणे.

यावरून असे स्पष्ट होईल की अमेरिकी काँग्रेसच्या अधिकारात नसलेल्या अनेक गोष्टी ऑस्ट्रेलियाच्या संसदेला ऑस्ट्रेलियाच्या घटनेनुसार करता येतील. या गोष्टी करायच्या असल्यास अमेरिकी सरकारला सर्वोच्च न्यायालयाचा आसरा घ्यावा लागेल आणि असे अधिकार वापरण्यासाठी आवश्यक ते तत्त्व शोधून काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची क्षमता, कल्पकता आणि तयारी यांच्यावर अवलंबून रहावे लागेल.

कठोरता आणि अधिनियमबद्धता यांच्या बंधनांवर मात करण्यासाठी आपल्या प्रस्तावित घटनेत ऑस्ट्रेलियातील तरतुदींचा वापर ऑस्ट्रेलियापेक्षाही फार अधिक प्रमाणात करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाच्या घटनेप्रमाणे या प्रस्तावित घटनेतही समवर्ती सूचीमधील विषयांची यादी मोठी आहे. ऑस्ट्रेलियाच्या समवर्ती सूचीत ३९ विषय आहेत. आपल्या प्रस्तावित घटनेत असे ३७ विषय आहेत. ऑस्ट्रेलियाच्या घटनेच्या धर्तीवर प्रस्तावित घटनेतील सहा कलमे तात्पुरत्या स्वरूपाची असून संसदेच्या इच्छेनुसार कालानुरूप तरतुदींचा समावेश करण्यासाठी मूळ तरतुदी कोणत्याही वेळी प्रसंगानुरूप कधीही बदलता येतील. ऑस्ट्रेलियाच्या घटनेपुढे जाणारे प्रस्तावित घटनेतील सर्वात मोठे पाऊल म्हणजे संसदेला विशेष (Exclusive) कायदे करण्याचा देण्यात आलेला अधिकार. विशेष कायदे करण्याचा ऑस्ट्रेलियाच्या संसदेचा अधिकार तीन बाबींपुरता मर्यादित असून प्रस्तावित घटनेत असा अधिकार ९१ बाबींबाबत असावा असे सुचविण्यात आले आहे. स्वभावतः कठोर असलेल्या संघराज्यात्मक प्रणालीत प्रस्तावित घटनेने अशा प्रकारे शक्य असलेली कमाल लवचिकता आणलेली आहे.

प्रस्तावित घटना ऑस्ट्रेलियाच्या घटनेचे अनुकरण करते अथवा तिचे मोठ्या प्रमाणावर अनुकरण करते एवढेच म्हणणे पुरेसे होणार नाही. येथे या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे की संघराज्यात्मक प्रणालीतील कठोरता आणि अधिनियमबद्धता टाळण्यासाठी अभिनव मार्गाचा अवलंब करण्यात आलेला असून हे प्रस्तावित घटनेचे वैशिष्ट्य अन्यत्र कोठेही सापडणार नाही.

पहिले म्हणजे निव्वळ प्रांतिक विषयांबाबतचे फायदे सर्वसामान्य काळात करण्याचा संसदेला दिलेला अधिकार. मी २२६, २२७ आणि २२९ या कलमांचा उल्लेख करत आहे. एखादा विषय राज्यांच्या अखत्यारीत असला आणि तरीही त्याबाबतचा अधिकार केंद्राने वापरावा असा प्रस्ताव वरिष्ठ सभागृहाने २/३ बहुमताने मंजूर केल्यास आणि असा विषय केवळ प्रांतिक महत्त्वाचा न राहता राष्ट्रीय महत्त्वाचा बनल्यास कलम २२६ अंतर्गत संसद अशा विषयावर कायदा करू शकेल. राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात संसदेला असाच अधिकार कलम २२७ अन्वये देण्यात आला आहे. याच अधिकाराचा वापर करण्यास प्रांतांची संमती असल्यास कलम २२९ अंतर्गत संसदेला तसे करता येईल. यापैकी अखेरची तरतूद ऑस्ट्रेलियाच्या घटनेत असली तरी पहिल्या दोन तरतुदी म्हणजे प्रस्तावित घटनेची वैशिष्ट्य आहेत.

कठोरता आणि अधिनियमबद्धता टाळण्यासाठी केलेला दुसरा उपाय म्हणजे घटनादुरूस्ती सुलभ व्हावी म्हणून केलेली तरतूद. घटना दुरूस्तीविषयक तरतुदींची विभागणी घटनेत दोन गटांमध्ये करण्यात आली आहे. एका गटात पुढील कलमे ठेवण्यात आली आहेत. (अ) केंद्र आणि राज्ये यांच्यातील कायदे करण्याबाबतच्या अधिकारांची विभागणी (ब) राज्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व, आणि (क) न्यायालयांचे अधिकार. अन्य सर्व कलमे दुसऱ्या गटात ठेवण्यात आली आहेत. दुसऱ्या गटातील कलमांनी घटनेचा मोठा भाग व्यापला आहे आणि संसदेतील दुहेरी बहुमताने ती दुरूस्ती करता येतील. याचा अर्थ असा की संसदेच्या प्रत्येक सभागृहात उपस्थित सदस्यांपैकी दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसेल इतक्या उपस्थितीने आणि मतदानाने तसेच प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येपैकी बहुमताने या कलमांच्या दुरूस्तीस राज्यांची संमती आवश्यक नसेल. केवळ पहिल्या गटातील कलमांच्या दुरूस्तीसाठी जादा सुरक्षा म्हणून राज्यांची संमती आवश्यक आहे.

त्यामुळे भारतीय संघराज्य कठोरता आणि अधिनियमबद्धता या दोषांनी ग्रस्त होणार नाही असे कोणालाही सहजपणे म्हणता येईल. या संघराज्याचे वैशिष्ट्य म्हणजे हे लवचिक संघराज्य आहे.

इतर संघराज्यांपेक्षा वेगळेपण दाखवणारे आणखी एक खास वैशिष्ट्य प्रस्तावित भारतीय संघराज्यात आहे. एखादे संघराज्य स्वाभाविकतः स्वतंत्र विधिपालिका, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्या अधिकार विभाजनामुळे कायदे, प्रशासन आणि न्यायिक संरक्षण यांच्याबाबतीत विविधतापूर्ण असते. एका मर्यादेपर्यंत या वैविध्यामुळे फरक पडत नाही. स्थानिक गरजा आणि स्थानिक परिस्थिती यांच्यानुसार सरकारचा सत्ता वापरण्याचा प्रयत्न म्हणून त्याचे स्वागतही करता येईल. परंतु ही विविधता एका मर्यादेपलिकडे गेल्यास निर्नायकी निर्माण करू शकते आणि अनेक संघराज्यांमध्ये असा गोंधळ निर्माण झालेला आहे. भारतात २० राज्ये निर्माण झाली आणि विवाह, घटस्फोट, वारसा हक्क, कौटुंबिक नातेसंबंध, करार, हानी, गुन्हे, वजने आणि मापे, धनादेश आणि बिले, बँकिंग आणि वाणिज्य आदींबाबत २० वेगवेगळे कायदे झाले, न्याय मागण्याच्या २० प्रक्रिया निर्माण झाल्या आणि २० प्रशासकीय पद्धती असल्या तर काय गोंधळ माजेल याचा केवळ विचारच केलेला बरा. यामुळे केवळ राष्ट्रच दुर्बल होत नसून एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर करणाऱ्या नागरिकांबाबतही असहिष्णु होते, कारण एका राज्यात कायदेशीर असणारी बाबी दुसऱ्या राज्यात बेकायदा असल्याचे त्याला आढळते. घटनेच्या मसुद्याने साधने आणि पद्धती यांच्यात एकात्मता आणण्याचा प्रयत्न केला आहे ज्यायोगे भारतात एकाच वेळी संघराज्य असेल आणि देशाचे ऐक्य टिकवण्यासाठी आवश्यक मूलभूत बाबींमध्ये समानता असेल. मसुदा समितीने तीन साधनांचा अवलंब केलेला आहे.:—

१. एकच न्याययंत्रणा

२. दिवाणी आणि गुन्हेगारी विषयक मूलभूत कायद्यांमध्ये समानता, आणि

३. महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळण्यासाठी सामाईक अखिल भारतीय नागरी सेवा.

संघराज्यात अंगभूत असणाऱ्या दुहेरी राज्यसत्तेचा तर्कशुद्ध परिणाम म्हणजे दुहेरी न्याय यंत्रणा, कायदे आणि नागरी सेवा यांचे द्वैत. अमेरिकेत मध्यवर्ती न्याययंत्रणा आणि राज्यांच्या न्याययंत्रणा भिन्न आणि एकमेकांपासून स्वतंत्र असतात. भारतीय संघराज्य म्हणजे दुहेरी प्रणाली असली तरी त्यात दुहेरी न्याययंत्रणा अजिबात असणार नाही. उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय येथे एकच एकात्म न्याययंत्रणा असेल जिचे अधिकारक्षेत्र घटनाविषयक, दिवाणी अथवा फौजदारी अशा सर्व प्रकारच्या दाव्यांना लागू राहील आणि त्याबाबतचे उपाय ही न्याययंत्रणा उपलब्ध करील. दाद मागण्याच्या प्रक्रियेतील भिन्नता समाप्त करण्यासाठी असे करण्यात आले आहे. कॅनडा हा एकमेव देश याबाबतीत प्रस्तावित घटनेच्या निकट आहे. ऑस्ट्रेलियातील पद्धत केवळ समान दिसते.

नागरी जीवन आणि उद्योग-व्यवसाय यांच्या पायाभूत कायद्यांमधील सर्व भिन्नता नाहीशी करण्याची काळजी घेण्यात आली आहे. नागरी प्रक्रिया संहिता, गुन्हेगारी प्रक्रिया संहिता, पुरावा कायदा, मालमत्ता हस्तांतरण कायदा, विवाह-घटस्फोट-वारसाहक्क कायदा आदींचा समावेश समवर्ती सूचीत करण्यात आला आहे ज्यायोगे संघराज्यात्मक प्रणालीला धक्का न लावता आवश्यक त्या एकसमानतेचे जतन करता येईल.

संघराज्यात्मक प्रणालीतील दुहेरी राज्यसत्तेत मी म्हटल्याप्रमाणे दुहेरी सेवा सर्व संघराज्यांमध्ये आढळते. मध्यवर्ती नागरी सेवा आणि राज्य नागरी सेवा अशी रचना सर्व संघराज्यांमध्ये असते. भारतीय संघराज्यातही दुहेरी राज्यसत्ता व दुहेरी सेवा असेल परंतु त्यास एक अपवाद असेल. प्रशासनाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक देशात मोक्याची म्हणता येतील अशी काही पदे प्रशासनात असतात. काही प्रशासनाच्या विशाल आणि गुंतागुंतीच्या यंत्रणेत अशी पदे ओळखणे सोपे नसू शकेल. परंतु अशा मोक्याच्या पदांवर नेमलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचा दर्जा अवलंबून असतो याबाबत शंका नसावी. आपल्या सुदैवाने संपूर्ण देशासाठी समाईक असणाऱ्या सनदी सेवा यंत्रणेचा वारसा आपल्याला प्राप्त झाला आहे आणि अशा महत्त्वाच्या पदांची माहिती आपल्याला आहे. राज्यांचा राज्यस्तरीय सनदी सेवा निर्माण करण्याचा अधिकार काढून न घेता घटनेत केलेल्या तरतुदीनुसार देशात एक भारतीय नागरी सेवा असेल. जिच्यात पूर्णतः राष्ट्रीय स्तरावर भरती करण्यात येईल, समान अर्हता असेल, वेतनमान समान असेल आणि देशभरातील या महत्त्वाच्या पदांवर केवळ याच सेवेतील अधिकारी नेमता येतील.

प्रस्तावित संघराज्याची ही खास वैशिष्ट्ये आहेत. आता मी टीकाकारांनी याबाबत काय म्हटले आहे याचा परामर्श घेतो.

असे म्हटले गेले आहे की प्रस्तावित घटनेत काहीच नवीन नाही, त्यातील जवळपास निम्मा भाग १९३५ च्या भारत सरकार कायद्याची नक्कल आहे आणि उर्वरित भाग इतर देशांच्या घटनांमधून उसना घेण्यात आला आहे, अगदी थोडा अंश अस्सल आहे. जगाच्या इतिहासात या घटकेला तयार करण्यात आलेल्या घटनेत नवे काय असू शकते, असा प्रश्न यासंदर्भात विचारता येईल. पहिली लिखित घटना लिहिण्याला शंभरावर वर्षे होऊन गेली आहेत. त्यानंतर अनेक देशांनी आपल्या घटना लिखित स्वरूपात शब्दबद्ध केल्या आहेत. घटनेचा आवाका काय असावा याचा निर्णय घेऊन बराच काळ लोटला आहे. त्याचप्रमाणे घटनेची मूलभूत तत्त्वे काय असावीत याबाबतही जगभर मान्यता मिळालेली आहे. ही वस्तुस्थिती पाहता सर्व घटना त्यांच्या प्रमुख तरतुदींबाबत एकसारख्याच दिसणार. त्यात जर नाविन्य असलेच तर ते एवढेच असेल की एवढ्या उशीरा तयार केलेल्या घटनेतील बदल आधीचे दोष दूर करणारे असतील आणि त्या देशाच्या गरजा पूर्ण करणारी ही घटना असेल.

प्रस्तावित घटनेच्या अपुऱ्या अभ्यासामुळेच इतर देशांच्या घटनांची सहीसही नक्कल केल्याचा आरोप झाला आहे अशी मला खात्री आहे. प्रस्तावित घटनेत नवीन काय आहे हे मी दाखवून दिले आहे. मला असे नक्की वाटत आहे की मसुदा समितीने आपली जबाबदारी पार पाडताना अशी आंधळी नक्कल आणि गुलामी वृत्तीचे अनुकरण केलेले नाही, ही बाब इतर घटनांचे अभ्यासक आणि या प्रश्नाकडे तटस्थ वृत्तीने पाहण्यास तयार असणारे सर्वजण मान्य करतील.

प्रस्तावित घटनेत १९३५ च्या भारत सरकार कायद्यातील तरतुदींचा बराच भाग घेतला असल्याच्या आरोपाबाबत मी क्षमायाचना करणार नाही. उसने घेण्याची लाज वाटण्याची गरज नाही. हे कोणत्याही प्रकारचे वाङ्मय चौर्य नाही. घटनेच्या मूलभूत तत्त्वांवर कोणाचाही मालकी हक्क नसतो. माझी खंत एवढीच आहे की १९३५ च्या भारत सरकार कायद्यातून घेतलेल्या तरतुदी बव्हंशी प्रशासकीय तपशीलासंबंधीच आहेत. घटनेत प्रशासकीय

तपशीलाला स्थान नसावे हे मला मान्य आहे. हा समावेश घटनेत त्यांचा समावेश करण्याचे टाळण्याचा एखादा मार्ग मसुदा समितीला सापडावा अशी मला फार इच्छा आहे. परंतु या समावेशाच्या समर्थनार्थ हे जरूर म्हणावे लागेल. ग्रीसमधील इतिहासकार 'ग्रोटे' म्हणतो :–

"*स्वतंत्र आणि त्याचबरोबर शांततामय सरकार असण्यासाठी अनिवार्य अट म्हणजे घटनात्मक नैतिकतेचा प्रसार कोणत्याही एका वर्गातील बहुतांश सदस्यांमध्ये होणे पर्याप्त ठरणार नाही, तो प्रत्येक सदस्यापर्यंत झाला पाहिजे, कारण एखादा सामर्थ्यवान परंतु अडेलतट्टू अल्पसंख्य गट आपली स्वतःची प्रगती घडवण्याएवढा सक्षम नसला तरी तो स्वतंत्र संस्थेचे कामकाज अव्यवहार्य करून टाकू शकेल.*"

'घटनात्मक नैतिकता' या शब्दप्रयोगाद्वारे 'ग्रोटे'ला असे म्हणायचे आहे की "घटनेच्या ढाच्याबद्दल असीम आदरभाव, या ढाच्यानुसार कार्य करणाऱ्या सत्तेचे आज्ञापालन मात्र त्याचबरोबर मुक्तपणे बोलण्याची सवय, निश्चित कायद्याच्या मर्यादेत कृती आणि त्याचेवळी या सत्तेच्या कामकाजाबद्दल अनिर्बंध टीका करतानाच पक्षीय स्पर्धेच्या कटुपणातही प्रत्येक नागरिकाच्या हृदयातील असा आत्मविश्वास की त्याच्याएवढा घटनेच्या ढाच्याबद्दलचा आदरभाव त्याच्या विरोधकांमध्येही वसत आहे." (टाळ्यांचा कडकडाट)

लोकशाही घटनेचे कामकाज शांततेने होण्यासाठी घटनात्मक नैतिकतेचा प्रसार होण्याची आवश्यकता सर्वांनाच मान्य असली तरी त्याबरोबर संलग्न दोन बाबी सर्वसाधारपणे दुर्देवाने लक्षात घेतल्या जात नाहीत. पहिले म्हणजे घटनेच्या स्वरूपाबरोबर प्रशासनाच्या स्वरूपाचे निकटचे नाते असते. घटनेच्या स्वरूपाला साजेसे स्वरूपच प्रशासनाचे असले पाहिजे. दुसरे म्हणजे घटनेचे स्वरूप न बदलता तिचे विकृतीकरण करणे बिलकुल शक्य आहे. प्रशासनाचे स्वरूप बदलून ते घटनेच्या आत्म्याशी विसंगत करून आणि प्रतिकूल करून असे विकृतीकरण होऊ शकते. त्यामुळे हे स्पष्ट आहे की 'ग्रोटे' ने वर्णन केल्याप्रमाणे जेथे लोकांमध्ये घटनात्मक नैतिकतेचा पुरेपुर प्रसार झाला असेल तेथेच प्रशासकीय तपशील घटनेतून गाळून विधिमंडळाने तो ठरवावा असा धोका पत्करता येतो. प्रश्न असा आहे की असा घटनात्मक नैतिकतेचा प्रसार झाल्याचे आपण गृहित धरू शकतो काय? घटनात्मक नैतिकता म्हणजे नैसर्गिक भावना नव्हे. तिची जोपासना करावी लागते. आपल्या लोकांनी हे अजून शिकायचे आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. मूलतः लोकशाहीवादी नसलेल्या भारतीय भूमीत लोकशाही ही केवळ सजावट आहे.

अशा परिस्थितीत प्रशासनाचे स्वरूप सुचविण्यासाठी विधिमंडळावर विश्वास टाकणे सूज्ञपणाचे ठरणार नाही. घटनेत या तपशीलाचा समावेश करण्याचे हे समर्थन आहे.

प्रस्तावित घटनेवर होणारी दुसरी टीका म्हणजे तिच्या कोणत्याही भागातून प्राचीन भारतीय राजप्रणाली दृग्गोचर होत नाही. भारतात प्राचीन काळी अस्तित्त्वात असलेल्या हिंदु राज्यपद्धतीवर नवी घटना आधारित असायला हवी होती आणि पाश्चिमात्य सिद्धांत या नव्या घटनेत सम्मिलीत करण्याऐवजी ग्रामपंचायत आणि जिल्हा पंचायत यांचा आधार घेऊन ती तयार करायला हवी होती; याखेरीज आणखीही काहीजण आहेत आणि त्यांनी टोकाची भूमिका घेतली आहे. त्यांना कोणतेही मध्यवर्ती अथवा प्रांतिक सरकार नको आहे. भारतभर ग्राम सरकारे त्यांना हवी आहेत. बुद्धीवादी भारतीयांचे ग्रामीण समाजाबद्दलचे प्रेम करूण नसले तरी अमर्याद जरूर आहे. (हंशा !)

हे प्रेम 'मेटकाफ' याने या ग्राम सरकारांवर उधळलेल्या स्तुतीसुमनांपोटी प्रामुख्याने निर्माण झाले आहे. ही ग्रामीण सरकारे म्हणजे छोटी प्रजासत्ताक राज्ये असून त्यांना लागणारे जवळपास सर्व काही त्यांच्याच परिसरात उपलब्ध असते आणि परराज्यांशी संबंध ठेवण्याची त्यांना बव्हंशी गरज नसते, अशा शब्दांत 'मेटकाफ' याने त्यांचे वर्णन केले आहे. भारतीय जनतेचे जतन होण्यासाठी इतर कोणत्याही कारणापेक्षा या ग्राम समुहांचे अस्तित्त्व कारणीभूत ठरले, असे सांगताना 'मेटकाफ' म्हणतो की, या दरम्यान झालेली प्रत्येक क्रांती आणि प्रत्येक बदल यांना हे ग्राम समूह सामोरे गेले; तसेच त्यांची समाधानी वृत्ती, स्वातंत्र्याचा आणि मुक्ततेचा उपभोग यांना ही रचना साह्यभूत ठरली. इतर काहीही टिकत नसताना ग्राम समूह टिकले हे निःसंशय; परंतु देशाचा कारभार आणि नियती यांच्याबाबत या ग्राम समुहांचा सहभाग किती अल्प आहे याचा विचार त्यांच्याबद्दल अभिमान बाळगणारे करत नाहीत; आणि का ? देशाच्या भाग्यनिर्मितीत त्यांचा सहभाग कितपत होता याचे वर्णन करताना 'मेटकाफ' म्हणतो :

"*एकामागून एक राजघराणी कोसळतात. क्रांतिमागून क्रांती येते. हिंदू, पठाण, मुगल, मराठा, शीख, इंग्रज हे आळीपाळीने शासक होतात. पण ग्राम समूह आहे तसाच राहतो. परचक्र आले असता ते शस्त्रे धारण करतात आणि स्वसंरक्षण करतात. शत्रुपक्षाचे सैन्य देशातून जाते. मात्र ग्राम समूह आपली गुरे आपल्या तटबंदीत जमा करतात आणि या सैन्याला विनातक्रार पार होऊ देतात.*"

ग्राम समुहांनी आपल्या देशाच्या इतिहासात अशी भूमिका पार पाडली आहे. हे ठाऊक असताना त्यांच्याबाबत काय अभिमान बाळगायचा? सर्व प्रकारच्या उलथापालथीनंतरही ते बचावले आहेत ही वस्तुस्थिती आहे. माझी अशी धारणा आहे की अर्थातच खालच्या आणि स्वार्थी पातळीवर या ग्राम प्रजासत्ताकांनी भारताचे वाटोळे केले आहे. त्यामुळे प्रांतवाद आणि जातीयवाद यांचा धिक्कार करणारे खेड्यांची तळी उचलून धरत असल्याचे मला आश्चर्य वाटते. स्थानिक डबके, अज्ञानाची गुहा, संकुचित मनोवृत्ती आणि जातीयवाद म्हणजेच खेडे नाही काय? प्रस्तावित घटनेत खेडे हा घटक न धरता प्रत्येक व्यक्ती या एककाचा स्वीकार केल्याबद्दल मला आनंद आहे.

अल्पसंख्याकांना सुरक्षा पुरविल्याबद्दलही प्रस्तावित घटनेवर टीका होत आहे. याबाबतची कोणतीही जबाबदारी मसुदा समितीची नाही. घटना समितीच्या निर्णयाचे याबाबतीत अनुकरण करण्यात आले आहे. माझ्यापुरते बोलायचे झाल्यास घटना समितीने अल्पसंख्याकांसाठी या सुरक्षा उपाययोजनांची तरतूद करण्याची सूज्ञ कृती केली आहे. या देशात बहुसंख्य आणि अल्पसंख्य हे दोघे चुकीच्या मार्गाने गेले आहेत. अल्पसंख्याकांचे अस्तित्त्व बहुसंख्याकांनी नाकारणे चुकीचे आहे. त्याचप्रमाणे अल्पसंख्याकांनी स्वतःचे स्थायीकरण करणे तेवढेच चूक आहे.

याबाबत दुहेरी उद्दिष्ट साध्य करणारा तोडगा काढणे जरूरीचे आहे. याचा आरंभ अल्पसंख्याकांचे अस्तित्त्व मान्य करून व्हायला हवा. तो असाही असला पाहिजे की एके दिवशी बहुसंख्य आणि अल्पसंख्य यांना परस्परात विलीन होणे शक्य व्हावे. घटना समितीने प्रस्तावित केलेला तोडगा स्वागतार्ह म्हटला पाहिजे कारण त्याच्यातून हे दुहेरी उद्दिष्ट साध्य होत आहे. अल्पसंख्य संरक्षणाविरूद्ध धर्मांध भूमिका घेणाऱ्या कट्टरवाद्यांना मी दोन गोष्टी सांगू इच्छितो. पहिली म्हणजे अल्पसंख्याक ही एक स्फोटक शक्ती असून तिचा उद्रेक झाल्यास राष्ट्रीय ढाचा उध्वस्त होऊन जाईल. युरोपचा इतिहास या वस्तुस्थितीचा पर्याप्त आणि भयानक पुरावा आहे. दुसरी म्हणजे भारतातील अल्पसंख्याकांनी आपले अस्तित्त्व बहुसंख्याकांच्या हाती सोपवणे मान्य केले आहे. आयर्लंडची फाळणी

टाळण्यासाठी चालू असलेल्या वाटाघाटीमध्ये 'कार्सन' यास उद्देशून 'रेडमंड' म्हणाला, "*प्रॉटेस्टंट अल्पसंख्याकांसाठी हवी ती सुरक्षा उपाययोजना माग, परंतु अखंड आयर्लंड कायम राहू दे* " त्याला 'कार्सन'चे प्रत्युत्तर होते, "*खड्ड्यात जाऊ दे, ती उपाययोजना, तुमची राजवटच आम्हाला नको.*" भारतातील कोणत्याही अल्पसंख्य समाजाने अशी भूमिका घेतलेली नाही. त्यांनी निष्ठापूर्वक बहुसंख्याकांची राजवट स्वीकारलेली आहे; जी मूलतः धार्मिक बहुसंख्याकांची आहे, राजकीय बहुसंख्याकांची नव्हे. अल्पसंख्याकांविरूद्ध भेदभाव होणार नाही हे आपले कर्तव्य असल्याचे बहुसंख्याकांनी समजून घेतले पाहिजे. अल्पसंख्याक राहतील की नाहीसे होतील हे बहुसंख्याकांच्या या सवर्यींवर अवलंबून असले पाहिजे. अल्पसंख्याकांविरूद्ध भेदभाव करण्याची बहुसंख्याकांची संवय ज्या क्षणाला नाहीशी होईल त्या क्षणी अल्पसंख्याकांना आपले अस्तित्त्व ठेवण्याचे कारण उरणार नाही. ते नाहीसे होतील.

प्रस्तावित घटनेचा सर्वात टीकाग्रस्त भाग म्हणजे मूलभूत हक्कांबाबतचा (FUNDATMENTAL RIGHTS) या हक्कांची व्याख्या करणाऱ्या कलम १३ बद्दल असे म्हटले गेले आहे की त्यात अपवाद एवढ्या संख्येने आहेत की त्यांनी अधिकारांनाच स्वाहा करून टाकले आहे. ही एक प्रकारची फसवणूक असल्याचीही टीका झाली आहे. टीकाकारांच्या मते मूलभूत अधिकार निरंकुश असल्याखेरीज ते मूलभूत अधिकार होऊ शकत नाहीत; आपल्या युक्तिवादाचा आधार म्हणून ते अमेरिकी घटना आणि या घटनेच्या पहिल्या दहा दुरूस्त्यांमधील अधिकार सनद (BILL OF RIGHTS) यांचा आश्रय घेतात. अमेरिकेच्या अधिकार सनदेतील मूलभूत अधिकार वास्तव आहेत कारण त्यांच्यावर कोणत्याही मर्यादा नाहीत आणि त्यांना कोणतेही अपवाद केलेले नाहीत.

मूलभूत अधिकारांबाबतची सर्व टीका चुकीच्या कल्पनेवर आधारलेली आहे हे सांगण्यास मला खेद होत आहे. पहिले म्हणजे मूलभूत अधिकार आणि इतर अधिकार यांच्यात फरक दाखवू पाहणारी टीका तर्कशुद्ध नाही. मूलभूत अधिकार निरंकुश असतात आणि इतर अधिकार निरंकुश नसतात हे म्हणणे चुकीचे आहे. दोहोंमधील खरा फरक असा आहे की इतर अधिकार दोन्ही बाजूंच्या करारांमधून निर्माण झालेले असतात तर मूलभूत अधिकार ही कायद्याची देणगी आहे. मूलभूत अधिकार ही राष्ट्राने दिलेली देणगी असल्यामुळे राष्ट्र त्याबाबत निश्चिती करू शकत नाही हे म्हणणे तर्कसंगत नाही.

दुसरे म्हणजे अमेरिकेतील मूलभूत अधिकार निरंकुश आहेत हे म्हणणे चुकीचे आहे. अमेरिकी घटना आणि घटनेचा मसुदा यांच्यातील भूमिकेतील फरक आहे तो स्वरूपाचा, मूळ गाभ्याचा नव्हे. अमेरिकेतील मूलभूत अधिकार निरंकुश नाहीत ही बाब वादातीत आहे. प्रस्तावित घटनेतील प्रत्येक अपवादाच्या समर्थनार्थ अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या किमान एका निर्णयाचा संदर्भ देता येईल. प्रस्तावित घटनेच्या कलम १३ मध्ये भाषण स्वातंत्र्यावर घातलेल्या बंधनाच्या समर्थनार्थ अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाच्या किमान एका निर्णयाची पुनरूक्ती येथे करणे पुरेसे ठरावे. हिंसक परिवर्तन घडावे या उद्देशाने केलेल्या वक्तव्यांबद्दल शिक्षेची तरतूद असणाऱ्या न्यूयॉर्क राज्यातील 'गुन्हेगारी निर्णायकी' कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या 'गिटलो विरूद्ध न्यूयॉर्क' खटल्यात अमेरिकी सर्वोच्च न्यायालय म्हणते :-

"*घटनेने भाषण आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य दिलेले असले तरी जबाबदारी न स्वीकारता आपणाला हवे ते काहीही बोलण्याचा अथवा छापण्याचा निरंकुश अधिकार त्यामुळे प्राप्त होत नाही हे फार पुर्वीच प्रस्थापित झालेले मूलभूत तत्त्व असून त्यायोगे भाषेचा अनिर्बंध आणि बेलगाम वापर करण्याचा परवानाही मिळत नाही अथवा या स्वातंत्र्याचा गैरवापर करणाऱ्यांना शिक्षा करण्यावर प्रतिबंध येत नाही.*"

त्यामुळे अमेरिकी घटनेतील मूलभूत अधिकार निरंकुश आहेत, परंतु प्रस्तावित घटनेत ते तसे नाहीत हे म्हणणे चुकीचे आहे.

असा युक्तिवाद करण्यात येतो की मूलभूत अधिकार निश्चित करायचे असले तर हे निश्चितीकरण घटनेतच करण्यात यावे, जसे ते अमेरिकी घटनेत करण्यात आले आहे आणि ज्या ठिकाणी ते करण्यात आलेले नसेल तेथे ते निश्चित करण्याचे काम सर्व अनुषंगिक बाबी विचारात घेऊन न्याययंत्रणेवर सोपविण्यात यावे. मला सांगण्यास खेद होतो की, हे सर्व अमेरिकी घटनेबद्दलच्या गैरसमजातून घडत नसल्यास; ती पूर्णपणे चुकीच्या पद्धतीने सादर करण्यामधून घडत आहे. अमेरिकी घटना असे काहीही करत नाही. अमेरिकी नागरिकांना हमी देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारांवर अमेरिकी घटनेने एक बाब वगळता-*एकत्र जमण्याचा अधिकार*-स्वतःहून कोणतेही बंधन घातलेले नाही. त्याचप्रमाणे अमेरिकी घटनेने मूलभूत अधिकारांवर बंधन घालणे न्याययंत्रणेवर सोपविल्याचे म्हणणेही बरोबर नाही. अशी बंधने घालण्याचा अधिकार अमेरिकी काँग्रेसला (संसदेला) आहे. टीकाकार गृहित धरत असल्यापेक्षा वस्तुस्थिती मात्र निराळी आहे.

अमेरिकेत घटनेने दिलेले मूलभूत अधिकार निरंकुश होते हे खरे आहे. तथापि लवकरच काँग्रेसला असे आढळून आले की या मूलभूत अधिकारांवर निर्बंध घालून त्यांचे निश्चितीकरण करणे अनिवार्य आहे. या निर्बंधांच्या घटनात्मकतेचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयासमोर आला तेव्हा असा युक्तिवाद करण्यात आला की घटनेने अमेरिकी काँग्रेसला असा कोणताही अधिकार दिलेला नाही. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने "पोलिसी अधिकार" हा सिद्धांत शोधून काढला आणि निरंकुश मूलभूत अधिकाराच्या समर्थकांचा प्रतिवाद करताना असे म्हटले की प्रत्येक राष्ट्राचे "पोलिसी अधिकार" अंगभूत असतात आणि ते घटनेने राष्ट्रावर हेतुपूर्वक सोपविण्याची आवश्यकता नसते. मी यापूर्वीच संदर्भ दिलेल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालय म्हणते :—

> "*सार्वजनिक कल्याणाला प्रतिकूल, सार्वजनिक नीतिमत्ता भ्रष्ट करू पाहणारी, गुन्हेगारीला चिथावणी देणारी अथवा सार्वजनिक शांतता बिघडवणारी वक्तव्ये या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन करणाऱ्यांना आपले पोलिसी अधिकार वापरून राष्ट्र शिक्षा करू शकते; याबाबत आता प्रश्न करता येणार नाही.*"

घटनेत मूलभूत अधिकार निरंकुश स्वरूपात समाविष्ट करायचे आणि आपल्या सर्वोच्च न्यायालयाने पोलिसी अधिकारांच्या सिद्धांताचा शोध लावून संसदेची सुटका करायची, असा मार्ग स्वीकारण्याऐवजी प्रस्तावित घटनेत राष्ट्रालाच मूलभूत अधिकारांवर थेट बंधने घालण्याची अनुमती दिली आहे. दोन्हींच्या परिणामात काहीही फरक नाही. एकाने जे अप्रत्यक्षरित्या केले ते दुसरा प्रत्यक्षपणे करत आहे. दोन्ही ठिकाणी मूलभूत अधिकार निरंकुश नाहीत.

प्रस्तावित घटनेत मूलभूत अधिकारांच्या नंतर 'मार्गदर्शक तत्त्वे' (DIRECTIVE PRINCIPLES) येतात. संसदीय लोकशाहीसाठी तयार केलेल्या घटनेचे हे आगळे वैशिष्ट्य आहे. संसदीय लोकशाहीसाठी तयार केलेली आणि अशी तत्त्वे समाविष्ट असलेली अन्य अशी एकमेव घटना स्वतंत्र आयर्लंड या राष्ट्राची आहे. या मार्गदर्शक तत्त्वांवरही टीका करण्यात आली आहे. ही तत्त्वे म्हणजे केवळ पवित्र घोषणा आहेत, असे म्हटले गेले आहे. त्यांना कोणतीही अनिवार्यता नाही (असेही म्हटले आहे). अशी टीका अर्थातच उथळ आहे. तसे घटनेतच अनेकप्रकारे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

मार्गदर्शक तत्त्वांना कायद्याचे कोणतेही बळ नाही, असे म्हटले गेले आहे. ही टीका मला मान्य आहे. परंतु त्यांना बिलकुल अनिवार्यता नाही हे मात्र मान्य करण्यास मी तयार नाही. त्याचप्रमाणे ती कायद्याने अनिवार्य नसल्याने निरूपयोगी आहेत, हे सुद्धा मी मान्य करणार नाही.

ब्रिटिश सरकारने १९३५ च्या कायद्यानुसार वसाहती आणि भारत यांचे गव्हर्नर-जनरल आणि गव्हर्नर्स यांच्यासाठी जारी केलेले सूचनापत्र आणि प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वे एकसारखी आहेत. प्रस्तावित घटनेनुसार ही मार्गदर्शक तत्त्वे राष्ट्रपती आणि राज्यांचे राज्यपाल यांच्यासाठी जारी करावयाची आहेत. या सूचनापत्रांचा मजकूर घटनेच्या चौथ्या सूचीमध्ये आढळेल. मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे सूचनापत्राचे केवळ अन्य नामाभिधान होय. फरक एवढाच आहे की या सूचना विधिपालिका आणि कार्यपालिका यांच्यासाठी आहेत. मला वाटते याचे स्वागत झाले पाहिजे. शांतता, सुव्यवस्था आणि सुशासन यांच्यासाठी ज्या-ज्या ठिकाणी सत्ता देण्यात आलेली असेल त्या-त्या ठिकाणी या सत्तेचे नियंत्रण करणाऱ्या सूचना देणे आवश्यक आहे.

घटनेच्या मसुद्यात प्रस्तावित केल्यानुसार या सूचनांचा समावेश घटनेत करणे अन्य एका कारणासाठी समर्थनीय आहे. प्रस्तावित घटना देशाचे प्रशासन करण्यासाठी फक्त एका यंत्रणेची तरतूद करत आहे. इतर काही देशांत घडल्याप्रमाणे एखादा विशिष्ट पक्ष सत्तारूढ करण्याचा हा छुपा प्रयत्न नव्हे. या पद्धतीने लोकशाहीची परीक्षा पार करायची असेल तर सत्तेवर कोण येणार याचा निर्णय लोकांवरच सोपवावा लागेल. परंतु सत्तेवर कोणीही आले तरी त्यांना ही सत्ता मनास येईल तशी वापरण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही. सत्तेचा वापर करताना त्यांना मार्गदर्शक तत्त्वे असे नामाभिधान असलेल्या या सूचनांचा आदर करावाच लागेल. त्यांना त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यांचा भंग केल्याबद्दलचा जाब त्यांना न्यायालयात द्यावा लागणार नाही. परंतु निवडणुकीच्या काळात त्यांना मतदारांना निश्चितच याचे उत्तर द्यावे लागेल. उजव्या शक्ती जेव्हा सत्ता काबीज करण्याचे कपट करतील तेव्हा या मार्गदर्शक तत्त्वांचे मूल्य किती महान आहे याचा अधिक चांगला प्रत्यय येईल.

या मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर अनिवार्यता नसल्याने त्यांचा घटनेत समावेश करण्याला विरोध करणे हा युक्तिवाद होऊ शकत नाही. या तत्त्वांना घटनेत कोठे स्थान द्यावयाचे याबाबत मतभिन्नता असू शकते. सकारात्मक बंधन असलेल्या तरतुदींच्या दरम्यान असे बंधन नसणाऱ्या तरतुदी समाविष्ट करणे काहीसे चमत्कारिक असल्याचे मला मान्य आहे. राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्यासाठीचे सूचनापत्र समाविष्ट असलेल्या तिसऱ्या (अ) आणि चौथ्या सूचीत त्यांचे योग्य स्थान आहे असे माझे मत आहे. कारण मी म्हटल्याप्रमाणे विधिपालिका आणि कार्यपालिका यांनी आपल्या अधिकारांचा वापर कसा करावा याबाबतच्या खरे तर त्या सूचना आहेत. परंतु ही बाब केवळ स्थान देण्याची आहे.

मध्यवर्ती सरकार फारच सामर्थ्यवान असल्याचे काही टीकाकारांनी म्हटले आहे. इतरांनी म्हटले आहे की ते आणखी सामर्थ्यशाली असले पाहिजे. प्रस्तावित घटनेत समतोल साधण्यात आला आहे. केंद्राला सत्ता नाकारली तरी सामर्थ्यवान होण्यापासून केंद्राला रोखणे अत्यंत कठीण आहे. आधुनिक जगातील परिस्थिती अशी आहे की सत्तेचे केंद्रीकरण अटळ आहे. अमेरिकेतील मध्यवर्ती सरकारचा विस्तार घटनेने त्यास अत्यंत मर्यादित सत्ता देऊनही एवढा झाला आहे की त्यामुळे राज्यांची सरकारे झाकोळून आणि झाकली गेली आहेत. हे आधुनिक परिस्थितीमुळे घडले आहे. भारत सरकारच्या बाबतीत हीच परिस्थिती असणार आहे. हे अनिवार्य आहे आणि

कोणी काहीही केले तरी केंद्र अधिकाधिक सामर्थ्यशाली होण्यापासून त्याला रोखता येणार नाही. याउलट ते अधिक सामर्थ्यशाली होण्याच्या प्रवृत्तीला आपण विरोध केला पाहिजे. त्याला पचेल त्यापेक्षा जास्त खाणे देता येणार नाही. त्याच्या वजनानुसारच त्याचे सामर्थ्य असले पाहिजे. ते आपल्याच भारामुळे कोसळेल एवढे सामर्थ्यशाली करणे ही घोडचूक ठरेल.

केंद्र आणि प्रांतांच्या दरम्यान एक प्रकारचे घटनात्मक नाते तर केंद्र आणि संस्थाने यांच्या दरम्यान अन्य प्रकारचे घटनात्मक नाते असल्याबद्दल प्रस्तावित घटनेवर टीका करण्यात आली आहे. केंद्रीय सूचीतील संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि दळणवळण हे विषय सोडता संपूर्ण यादी स्वीकारण्याचे बंधन संस्थानांवर नाही. समवर्ती सूचीतील विषयही स्वीकारण्याचे बंधन त्यांच्यावर नाही. प्रस्तावित घटनेतील राज्य सूची स्वीकारायचीही त्यांच्यावर सक्ती नाही. त्यांना स्वतःची घटना समिती स्थापन करण्याची आणि स्वतःची घटना तयार करण्याचे स्वातंत्र्य आहे. हे सर्व अत्यंत दुर्दैवी आणि असमर्थनीय आहे. ही विसंगती देशाच्या कार्यक्षम कारभाराला धोका निर्माण करू शकेल. ही विसंगती अस्तित्त्वात असेपर्यंत अखिल भारतीय स्वरूपाच्या विषयांबाबतच्या केंद्राच्या सत्तेच्या परिणामकारकतेत घट होऊ शकते. कारण प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक प्रकरणी जी वापरता येत नाही ती सत्ताच नव्हे. युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास महत्त्वाच्या अधिकारांवर अशा मर्यादा येण्याने संपूर्ण राष्ट्रजीवनाला धोका निर्माण होऊ शकतो. यामध्ये सर्वात वाईट बाब म्हणजे प्रस्तावित घटनेनुसार भारतातील संस्थाने आपले स्वतःचे लष्कर बाळगू शकतील. माझ्या मते ही तरतूद अत्यंत प्रतिगामी आणि हानिकारक असून तिच्यामुळे भारताचे ऐक्य भंग पावू शकेल आणि केंद्र सरकार उलथून टाकले जाऊ शकेल. मसुदा समिती या तरतुदीला बिलकुल अनुकूल नव्हती असे मी नमूद करणे अस्थानी ठरणार नाही. केंद्राबरोबरच्या घटनात्मक संबंधांबाबत प्रांत आणि संस्थाने यांच्यात समानता असावी अशी समितीच्या सदस्यांची तीव्र इच्छा होती. दुर्देवाने याबाबतीत सुधारणा करण्यासाठी ते काहीही करू शकले नाहीत. त्यांच्यावर घटना समितीच्या निर्णयांचे बंधन होते आणि घटना समितीवर दोन वाटाघाटी समित्यांच्या कराराचे बंधन होते.

परंतु जर्मनीत जे काही घडले त्यावरून आपणास धीर यायला हरकत नाही. बिस्मार्कने १८७० मध्ये स्थापना केलेले जर्मन साम्राज्य संमिश्र राष्ट्र होते आणि त्यात २५ घटक होते. त्यापैकी २२ घटकांमध्ये राजेशाही होती आणि ३ घटकांमध्ये शहरी प्रजासत्ताक होते. आपणास ठाऊक आहे की कालांतराने हा भेद नाहीसा होऊन जर्मनी एक देश बनला, त्यातील सर्व लोक जर्मन झाले आणि देशात एकच घटना अस्तित्त्वात राहिली. जर्मनीपेक्षा भारतातील संस्थानांच्या सामिलीकरणाची प्रक्रिया फारच वेगवान असणार आहे. आपल्याकडे १५ ऑगस्ट १९४७ रोजी ६०० संस्थाने अस्तित्त्वात होती. संबंधित प्रांतांमधील विलिनीकरणामुळे, परस्पर विलिनीकरणामुळे अथवा केंद्रशासित भूप्रदेश म्हणून केंद्राने ताबा घेतल्याने आता सक्षम म्हणता येतील अशी २५-३० संस्थानेच उरली आहेत. ही प्रक्रिया आणि प्रगती अत्यंत जलद आहे. ज्याप्रकारे भारतीय प्रांत राष्ट्राचे पूर्ण घटक बनले आहेत त्याप्रमाणे या संस्थानिकानी ही त्यांचे अनुकरण करावे असे आवाहन मी करीत आहे. त्यायोगे भारताला आवश्यक असणारे सामर्थ्य ते देऊ शकतील. त्यामुळे स्वतःची घटना समिती स्थापन करून स्वतःची वेगळी घटना तयार करण्याचा त्यांचा त्रास वाचेल आणि त्यांच्यासाठी मौल्यवान असणारे काहीही त्यांना गमवावे लागणार नाही. मला अशी आशा आहे की माझे आवाहन व्यर्थ जाणार नाही आणि ही घटना मंजूर होण्यापूर्वी प्रांत आणि भारतीय संस्थाने यांच्यातील भेद आपण नाहीसा करू शकू.

प्रस्तावित घटनेच्या कलम एक मधील भारत या शब्दाचे वर्णन 'राज्यांची संघटना' असे केल्याबद्दल काही टीकाकारांनी आक्षेप घेतला आहे. असे म्हटले गेले आहे की योग्य शब्दप्रयोग संघराज्य असा असावा. दक्षिण आफ्रिका हे एकात्मिक राष्ट्र असून त्याचे वर्णन संघटना असे करण्यात आले आहे हे खरे आहे. परंतु कॅनडा हे संघराज्य असून त्याचे वर्णन संघटना असे करण्यात आले आहे. म्हणजे भारताची घटना संघराज्यात्मक असली आणि त्याचे वर्णन संघटना असे केले तरी शब्दप्रयोगाचा कोणताही गैरवापर होत नाही. मात्र महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, संघटना या शब्दाचा वापर जाणीवपूर्वक करण्यात आला आहे. कॅनडाच्या घटनेत "संघटना" हा शब्द का वापरण्यात आला हे मला माहित नाही. मात्र मसुदा समितीने तो का वापरला हे मी सांगू शकतो.

मसुदा समितीला हे स्पष्ट करायचे होते की भारत हे एक संघराज्य राहणार असले तरी भारतीय संस्थानांनी केलेल्या करारातून या संघराज्याची निर्मिती झालेली नाही आणि अशा करारातून संघराज्याची निर्मिती झालेली नसल्याने कोणत्याही संस्थानाला या संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार राहणार नाही. संघराज्य ही संघटना असल्याने ती अविनाशी आहे. राष्ट्र आणि लोक वेगवेगळ्या राज्यांमध्ये प्रशासकीय सुविधेसाठी विभागले असले तरी संपूर्ण देश एकात्म आहे, त्याचे नागरीक एक आहेत, त्यांच्यावरील "सार्वभौम शक्तीचा" उगम एकच आहे. राज्यांना फुटून निघायचा अधिकार नाही आणि संघराज्य अविनाशी आहे हे प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकी जनतेला नागरी युद्ध करावे लागले. एखाद्या कलहाला किंवा कयासाला संधी देण्यापेक्षा ही बाब आरंभीच स्पष्ट केलेली बरी असे मसुदा समितीला वाटले.

घटना मसुद्याच्या टीकाकारांनी घटना दुरूस्तीबाबतच्या तरतुदींवर कटु शब्दांत हल्ला केला आहे. घटनेच्या मसुद्यातील या तरतुदींमुळे घटना दुरूस्ती करणे कठीण होईल असे म्हटले गेले आहे. किमान काही वर्षे तरी घटना दुरूस्ती साध्या बहुमताने शक्य व्हावी असे सुचविण्यात आले आहे. हा युक्तिवाद अत्यंत चलाख आणि चाणाक्ष आहे. हा युक्तिवाद असा आहे की घटना समितीची निवड प्रौढ मताधिकार तत्त्वावर झालेली नसली आणि भावी संसद या तत्त्वावर निवडून येणार असली तरी घटना साध्या बहुमताने मंजूर करण्याचा अधिकार समितीला देण्यात असूनही हा अधिकार भावी संसदेला मात्र नाकारण्यात आला आहे. घटनेच्या मसुद्यातील विसंगती म्हणून या मुद्याचा वापर करण्यात आला आहे. त्याचा प्रतिवाद मी करणे आवश्यक आहे कारण तो निराधार आहे. प्रस्तावित घटना दुरूस्त करण्याबाबतच्या तरतुदी किती सुलभ आहेत हे समजण्यासाठी अमेरिकेची आणि ऑस्ट्रेलियाची घटना वाचली पाहिजे. त्यांच्या तुलनेत प्रस्तावित घटनेतील तरतुदी अत्यंत सोप्या असल्याचे आढळेल. एखादी परिषद भरवून किंवा सार्वमत घेण्यासारख्या जटिल आणि कठीण प्रक्रिया प्रस्तावित घटनेने नाहीशा केलेल्या आहेत. दुरूस्तीचे अधिकार प्रांतिक आणि केंद्रीय विधिमंडळांना देण्यात आले आहेत. काही अगदी थोड्या विशिष्ट तरतुदींच्या दुरूस्तीसाठी-*ज्या अगदी थोड्या आहेत*-राज्य विधिमंडळांची मान्यता आवश्यक ठेवण्यात आली आहे. घटनेची इतर सर्व कलमे दुरूस्त करण्याचा अधिकार संसदेकडे ठेवण्यात आला आहे. त्यात एवढेच बंधन ठेवण्यात आले आहे की अशी दुरूस्ती करताना प्रत्येक सभागृहात उपस्थित सदस्यांचे दोन-तृतीयांश पेक्षा कमी नसेल एवढे बहुमत आणि मतदान असले पाहिजे आणि प्रत्येक सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येपैकी बहुमत असले पाहिजे. घटना दुरूस्त करण्यासाठी यापेक्षा सोपी प्रक्रिया सापडणे अवघड आहे.

दुरूस्ती विषयक प्रक्रिया विसंगत असल्याची टीका घटना समिती आणि या घटनेनुसार निवडण्यात येणारी संसद यांच्या भूमिकांबाबतच्या गैरसमजुतीमधून निर्माण झाली आहे. घटना तयार करणाऱ्या समितीचा कोणताही

पक्षीय हेतु नाही. एक चांगली आणि काम करू शकणारी घटना देण्यापलीकडे या समितीला काहीही साध्य करावयाचे नाही. घटनेच्या कलमांवर विचारविनिमय करताना एखादी बाब खास करून मंजूर करून घेण्यावर समितीचा डोळा नव्हता. भावी संसदेची बैठक घटना समिती म्हणून झाल्यास तिचे सदस्य पक्षीय भूमिकेतून वावरतील आणि त्यांच्या पक्षांची धोरणे पुढे जावी यासाठी घटना दुरूस्त करण्याचा प्रयत्न करतील; कारण घटनेचे एखादे कलम त्यांच्या मार्गात अडथळा बनल्याने संसदेत अशी धोरणे मंजूर करून घेणे त्यांना शक्य झाले नसेल. संसदेला नाराजीचे काहीतरी कारण असेल, परंतु घटना समितीला असे कोणतेही कारण नाही. घटना समिती आणि भावी संसद यामध्ये हा फरक आहे. हे यावरून स्पष्ट होईल की, मर्यादित जनादेशावर निवडण्यात आलेल्या घटना समितीवर साध्या बहुमताने घटना मंजूर करण्याबाबत विश्वास ठेवता येतो परंतु घटना दुरूस्तीबाबत तसाच विश्वास प्रौढ मताधिकाराचा कौल घेऊन निवडून आलेल्या संसदेवर ठेवता येत नाही.

मसुदा समितीने तयार केलेल्या घटनेच्या मसुद्यावरील सर्व टीकेला मी यथार्थ उत्तर दिलेले आहे असा मला विश्वास आहे. गेले आठ महिने ही घटना जनतेसमोर असलेल्या काळात याबाबतचे कोणतेही महत्त्वाचे मतप्रदर्शन अथवा टीका यांचा परामर्श घेण्याचे माझ्याकडून राहून गेले असावे असे मला वाटत नाही. मसुदा समितीने तयार केलेली घटना स्वीकारायची की ती मंजूर करण्यापूर्वी त्यात बदल करावयाचा हे आता घटना समितीने ठरवावयाचे आहे.

मात्र हे मला नमूद करायचे आहे की, घटनेवर भारतातील काही प्रांतिक विधानसभांनी चर्चा केली आहे. मुंबई, मध्य प्रांत, पश्चिम बंगाल, बिहार, मद्रास आणि पूर्व पंजाब येथे त्याविषयी चर्चा झाली आहे. काही प्रांतिक विधानसभांमध्ये घटनेच्या अर्थविषयक तरतुदींना गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत हे खरे आहे. मद्रासमध्ये कलम २२६ ला आक्षेप घेण्यात आला. हे अपवाद वगळता कोणत्याही प्रांतिक विधानसभेने घटनेच्या कलमांना गंभीर हरकत घेतलेली नाही. कोणतीही घटना परिपूर्ण नसते आणि खुद्द मसुदा समितीने घटनेचा मसुदा सुधारण्यासाठी काही दुरूस्त्या सुचविल्या आहेत. परंतु प्रांतिक विधानसभांमधील झालेल्या चर्चेने असे म्हणण्याचे धैर्य मला प्राप्त झाले आहे की मसुदा समितीने तयार केलेली घटना या देशात आरंभ करण्याएवढी नक्कीच चांगली आहे. मला असे वाटते की ही घटना काम करू शकेल, ही घटना लवचिक आहे आणि शांततेच्या तसेच युद्धाच्या काळात देश एकसंघ ठेवण्याएवढी ती नक्कीच समर्थ आहे. मला असे खरोखरच म्हणावेसे वाटते की नव्या घटनेच्या अमलामुळे परिस्थिती बिघडली तर आपली घटना वाईट आहे हे कारण त्यासाठी नसेल. आपल्याला असे म्हणावे लागेल की मानव भ्रष्ट होता. महोदय, मी ठराव सादर करतो.

(मूळ भाषण http://164.100.47.132/LssNew/constituent/vol 7p1.html या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

(१५) भारताच्या घटना समितीच्या शुक्रवार, दिनांक ५ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश :—

(डॉ.आंबेडकर यांच्या भाषणानंतर घटना समितीच्या सदस्यांनी घटनेच्या मसुद्यावर आपले विचार मांडले. डॉ.आंबेडकर यांनी आणि मसुदा समितीने केलेल्या कामाची प्रशंसा केली. या भाषणांचे काही अंश-संपादक)

घटना समितीची बैठक **शुक्रवार, दिनांक ५ नोव्हेंबर, १९४८ रोजी,** सकाळी दहा वाजता, घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सुरू झाली. माननीय अध्यक्ष (सन्माननीय डॉ.राजेंद्र प्रसाद) अध्यक्षस्थानी होते.

श्री. फ्रँक अँथनी (मध्य प्रांत आणि बेरारः सर्वसाधारण) : माननीय अध्यक्ष महोदय, डॉ. आंबेडकर सभागृहात हजर नसले तरी आपल्या घटनेच्या मसुद्याचा पाया असलेल्या तत्त्वांबाबत त्यांनी केलेल्या संतुलित आणि ओघवत्या विश्लेषणाबद्दल किमान एक वकील म्हणून त्यांचे अभिनंदन मी केले पाहिजे. या घटनेच्या मसुद्याबद्दल आपली काहीही वेगवेगळी मते असली तरी मला असे वाटते की अन्य कोणत्याही कारणाने नाही तरी आकाराने ही घटना अतिविशाल आहे हे मान्य करावे लागेल. एवढा विस्तृत दस्तऐवज तयार करण्यासाठी मसुदा समितीच्या सदस्यांनी केलेले अमर्याद श्रम आणि कौशल्याचा वापर यांच्यासाठी या सदस्यांना खास धन्यवाद न देणे आपल्यासाठी बालिशपणा ठरेल असेही मला ठामपणे वाटते.....

डॉ. आंबेडकर यांनी अल्पसंख्याकांच्या वतीने याबाबतच्या तरतुदींचा गौरव करताना व्यक्त केलेल्या भावनेला मी दुजोरा देतो. मला ठाऊक आहे की अल्पसंख्याक अथवा त्यांच्या समस्यांबद्दल बोलणे (भारताच्या आताच्या अनुभवानंतर) हा नकोसा विषय आहे. आणि मी ते करणारही नाही. अल्पसंख्याक विषयी या तरतुदींची तरफदारी मला यासाठी करायची नाही की त्या सल्लागार समितीने आधीच स्वीकारलेल्या आहेत. या तरतुदी काँग्रेस पक्षाने स्वीकारल्या आहेत, घटना समितीने सुद्धा स्वीकारल्या आहेत. या अडचणीच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षाने घेतलेल्या वास्तववादी आणि मुत्सद्दी भूमिकेबद्दल मी काँग्रेसला धन्यवाद दिले पाहिजेत आणि या पक्षाचे अभिनंदनही केले पाहिजे.

सरदार पटेल यांच्या अत्यंत वास्तववादी आणि मुत्सदी भूमिकेसाठी त्यांचे मुद्दाम आभार मानले पाहिजेत. या देशात अल्पसंख्याक आहेत या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येणार नाही अथवा त्यापासून पळ सुद्धा काढता येणार नाही. परंतु ज्याप्रकारे काँग्रेसने या प्रश्नाकडे पाहण्यास आरंभ केला आहे त्याचे अनुकरण आपण केल्यास या देशात दहा वर्षांत अल्पसंख्याकांची समस्याच उरणार नाही अशी मला खात्री आहे. हे राष्ट्र खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्र व्हावे आणि असे कमीतकमी काळात घडावे अशी इच्छा नसणारी एकही अल्पसंख्यांक जमात नाही असे; महोदय, निदान मला तरी वाटते. यावर आपण विश्वास ठेवा आणि यावर आपण विश्वास ठेवायलाच पाहिजे की, या उद्दिष्ट प्राप्तीत या देशातील कोणत्याही अल्पसंख्यांक गटाला सर्वात मोठी हमी लाभणार आहे. डॉ.आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे आपण या विषयावर सुवर्णमध्य गाठला आहे. यास अल्पसंख्याकही साह्यभूत झाले आहेत....

महोदय, अखेरीस मला असे म्हणायचे आहे की ते उद्दिष्ट आपण पूर्णपणे साध्य करणे या छापील घटनेतील लिखित शब्दांवर अवलंबून न राहता आपल्यासमोरील प्रचंड समस्यांना आपले नेते आणि प्रशासक काय भावनेने सामोरे जातात आणि आपण या घटनेतील भावना प्रत्यक्षात कशी आणतो यावर ते अवलंबून राहणार आहे, आपला विश्वास असलेल्या आदर्शांची पूर्तता कितपत होते यावर त्याचे मोजमाप होणार आहे.

श्री. कृष्णचंद्र शर्मा (संयुक्त प्रांतः सर्वसाधारण) : डॉ. आंबेडकर यांनी सभागृहाला सादर केलेली सुगठित योजना, त्यांनी उपसलेले कष्ट आणि कालचे त्यांचे जोमदार आणि ओघवते भाषण यांच्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याच्या सभागृहाच्या आल्हाददायी कार्यात मी सहभागी होत आहे.

महोदय, आपली घटना लोकशाहीवादी आहे. लोकशाहीत सरकारचाही समावेश असतो. घटना म्हणजे केवळ साध्य नव्हे. घटना काही उद्दिष्टांसाठी तयार करण्यात येते; साधारणपणे लोकांचे भले व्हावे, राष्ट्राचे स्थैर्य आणि व्यक्तीची वाढ तसेच विकास ही ती उद्दिष्टे होत. भारतात जेव्हा आपण व्यक्तीची वाढ आणि विकास असे म्हणतो तेव्हा त्याची स्वयंअनुभूती, स्वयंविकास आणि स्वयंसाध्यता आपणास अभिप्रेत असते. आपण जेव्हा लोकांचा विकास असे म्हणतो तेव्हा समर्थ आणि एकसंघ राष्ट्र असा अर्थ आपण अभिप्रेत धरतो.....

महोदय, घटनेबद्दल विचार करताना आपण या वस्तुस्थितीची नोंद घेतली पाहिजे की ती लोकांची, लोकांनी केलेली आणि लोकांसाठी आहे. लोकशाहीत लोकांचे एकत्रित शहाणपण एखादा राजा, जुलुमी हुकूमशहा अथवा लोकांचा एखादा गट यांच्यापेक्षा श्रेष्ठ असते. याखेरीज लोकांचे कल्याण हे सर्वश्रेष्ठ मंगल असण्यावर लोकशाहीचा भर असतो. हे साध्य करण्यापुरतेच राजकीय संस्थांचे समर्थन करता येते, त्यांचा भपका आणि देखावा यांच्यामुळे नव्हे. ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे असल्याने आपल्याला सादर करण्यात आलेली घटना व्यक्तीची स्वयंअनुभूती, स्वयंविकास आणि स्वयंसाध्यता यांच्या शक्यतेसह भारत एक समर्थ एकसंघ राष्ट्र बनवू शकेल काय याचा निवाडा आपल्याला करायचा आहे.

श्री. टी. टी. कृष्णम्माचारी (मद्रासः सर्वसाधारण) : माननीय अध्यक्ष महोदय, या सभागृहात डॉ. आंबेडकर यांचे भाषण अत्यंत काळजीपूर्वक ऐकणाऱ्यांपैकी मी एक आहे. हा घटनेचा मसुदा तयार करण्याच्या कामी त्यांनी किती मेहनत घेतली आणि त्यात कसा उत्साह ओतला याची मला पूर्ण जाणीव आहे. त्याचप्रमाणे मसुदा समितीला या कामाकडे कसे लक्ष पुरवावे लागले याचीही मला कल्पना आहे. आपण नामनियुक्त केलेल्या सात सदस्यांपैकी एकाने सभागृहाचा राजीनामा दिला आणि त्याजागी दुसऱ्याची निवड करण्यात आली हे सभागृहाला ज्ञात आहे. एका सदस्याचे निधन झाले आणि ती जागा भरण्यात आली नाही. एक सदस्य अमेरिकेत होता तर दुसरा राष्ट्राच्या कारभारात गुंतला होता आणि या दोन्ही जागाही रिक्त राहिल्या. एक-दोघे दिल्लीपासून दूर होते आणि बहुधा प्रकृतीच्या कारणांमुळे ते हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी ज्या परिस्थितीत ही कामगिरी पार पाडली त्याबद्दल निःसंशय त्यांची प्रशंसा करतानाच आपण त्यांचे ऋणीही आहोत. तथापि, माझा मुद्दा असा आहे की या प्रश्नाकडे संपूर्ण समितीने लक्ष द्यावयास हवे होते तेवढे लक्ष दिलेले नाही. या सभागृहाचे सदस्य आणि सर्वसामान्य लोक यांनी सुचवलेल्या विविध दुरूस्त्यांवर चर्चा करण्यासाठी केंद्रीय अधिकार समिती, केंद्रीय घटना समिती आणि प्रांतिक घटना समिती अथवा या समित्यांचे सदस्य आणि काही निवडक मंडळींनी भेटावे असे आपण ठरविल्याचे घटना समिती सचिवालयाने मला आणि इतर काही जणांना एप्रिलमध्ये कळवले होते. त्यानुसार एप्रिल महिन्यात दोन दिवस बैठक पार पाडली. आणि या बैठकीत चांगले कामकाज झाले. यापैकी काही दुरूस्त्या स्वीकारण्याचे डॉ.आंबेडकर यांनी मान्य केल्याचे दिसत आहे. परंतु यानंतर या समितीबद्दल मात्र काहीही ऐकिवात आलेले नाही.

यानंतर मसुदा समिती, निदान डॉ.आंबेडकर आणि श्री.माधवराव यांची बैठक होऊन त्यात या दुरूस्त्यांवर विचार झाला आणि काही सूचना करण्यात आल्या. परंतु तांत्रिकदृष्ट्या ही मसुदा समितीची बैठक बहुधा नव्हती. यासंदर्भात आपल्या निर्णयाबद्दल मी प्रश्न करणार नसलो तरी एखाद्या समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर तिचे अस्तित्त्व समाप्त होते हे मान्य होईल आणि आपण मसुदा समितीची फेररचना केल्याचे मला स्मरत नाही.....

श्री. विश्वनाथ दास (ओरिसा : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ.आंबेडकर यांनी घटना समितीसमोर केलेल्या घटनेच्या प्रतिभाशाली विश्लेषणाबद्दल मी आरंभीच त्यांना धन्यवाद देणे आवश्यक समजतो. या सभागृहाला सादर केलेली घटना तयार करण्यासाठी त्यांच्या सहकाऱ्यांनी सहा महिने केलेल्या अथक परिश्रमांबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.....

मसुदा समितीने सतत खपून आकार आणि रूप दिलेल्या घटना विधेयकावर आज आपण विचारविनिमय करत असून भारताला एक योग्य सार्वभौम घटना देण्यासाठी आपल्या इच्छेनुसार त्यात आपल्याला बदल करायचे आहेत. डॉ.आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वंदन करतानाच तुमच्या सल्लागारांचेही साजेसे अभिनंदन मला केले पाहिजे.....

श्री. लोकनाथ मिश्रा (ओरिसा : सर्वसाधारण) : ..... महोदय भारताच्या सार्वभौमत्त्वाचे प्रतिनिधित्त्व करणारी आणि आपल्या स्वातंत्र्याला आकार, रूप आणि प्रतिष्ठा देणारी ही घटना समिती आपल्या भवितव्याची पालक ठरणाऱ्या घटनेवर येथे विचारविनिमय करीत आहे. त्यादृष्टीने आपल्या नेत्यांनी भरपूर परिश्रम घेऊन तयार केलेल्या घटनेच्या मसुद्यावर आता आपण चर्चा करणार आहोत.

महोदय, माझा पहिला मुद्दा असा आहे की, डॉ.आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिभाशाली, उद्‌बोधक, स्पष्ट आणि ओघवत्या भाषणाद्वारे घटनेच्या मसुद्याचे संपूर्ण विश्लेषण केले आहे.....

.....डॉ.आंबेडकर यांच्या भाषणावर प्रकाश टाकण्यासाठी मी जरा जास्त वेळ घेतला असता. त्यांच्या ज्ञानाला, धैर्याला मी वंदन करतो, त्यांच्या भाषणाच्या स्पष्टतेसमोर मी नतमस्तक आहे. परंतु एवढा विद्वान, भारताचा एवढा महान सुपुत्र भारताबद्दल मात्र एवढा अनभिज्ञ असावा याचे मला आश्चर्य वाटते. डॉ.आंबेडकर निःसंशय घटनेच्या मसुद्याचा आत्मा आहेत आणि या मसुद्यात त्यांनी अगदी अभारतीय असे काही दिलेले आहे. त्यांनी कितीही प्रतिवाद केला तरी हा मसुदा म्हणजे पश्चिमेची गुलामी, नक्कल नव्हे तर गुलामी शरणागती आहे, असा अभारतीय या शब्दाचा अर्थ आहे.

काजी सय्यद करीमुद्दीन (मध्य प्रांत आणि बेरारः मुस्लीम) : माननीय अध्यक्ष महोदय, भारताच्या घटनेच्या मसुद्यावर विचारविनिमय करण्यासाठी प्रस्ताव सादर केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांचे मी अभिनंदन करतो. त्यांचे भाषण विलक्षण होते आणि त्यांचे नाव भविष्यात महान घटनाकार म्हणून नोंदले जाईल अशी मला खात्री आहे.....

प्रा. के. टी. शाह (बिहार : सर्वसाधारण) : महोदय, या सभागृहास सादर करण्यात आलेल्या अत्यंत विस्तृत घटनेबद्दल मसुदा समिती आणि तिचे अध्यक्ष यांच्या अभिनंदनाच्या सांघिक गायनात मलाही सहभागी व्हायचे आहे. मला विशेषकरून कायदामंत्र्यांचा सन्मान करायचा आहे तो त्यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत घटनेची ठळक वैशिष्ट्ये आपल्या विचारार्थ सादर करण्यासाठी केलेल्या भाषणाबद्दल. त्यांनी आपल्याला विचारप्रवृत्त करणाऱ्या संकल्पना देताना काही बाबी समाविष्ट का केल्या आहेत आणि इतर काही बाबी विवक्षित प्रकारे का समाविष्ट केल्या आहेत याची कारणेही दिली आहेत.....

पंडित लक्ष्मीकांत मैत्रा (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : महोदय, माझे सन्माननीय स्नेही आणि जुने सहकारी डॉ.आंबेडकर यांच्या कालच्या महान भाषणाबद्दल मी आरंभीच त्यांचे अभिनंदन न केल्यास मी कर्तव्यात

चुकलो असे म्हणावे लागेल. घटनात्मक प्रस्तावांना निश्चित आकार देण्यासाठी त्यांनी केलेले अफाट परिश्रम आणि खर्ची घातलेला एवढा प्रचंड वेळ यांबद्दल हे सभागृह कृतज्ञता प्रकट करत आहे.....

श्री. रामनारायण सिंग (बिहार : सर्वसाधारण) : महोदय, हे घटना विधेयक सादर करण्याची संधी मिळालेले माझे सन्माननीय स्नेही डॉ.आंबेडकर यांचे मी अभिनंदन करतो आणि या प्रस्तावाचे समर्थन करतो.....

डॉ. पंजाबराव देशमुख (मध्य प्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : महोदय, प्रस्तावित घटनेवर माझे विचार व्यक्त करण्याची संधी मला दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. वेळ मर्यादित असल्याने माझी निरीक्षणे अत्यंत ढोबळ असणार आहेत. विविध कलमांवर विचार होताना दुर्दैवाने मी येथे उपस्थित नसेन. त्यामुळे हा मोजका वेळ मिळाल्याबद्दल मी अधिकच कृतज्ञ आहे.

माझे सन्माननीय स्नेही डॉ. आंबेडकर यांचे भाषण अत्युकृष्ट होते आणि येथे सादर झालेल्या मसुद्यावरील प्रभावी समालोचन होते. डॉ. आंबेडकर नामांकित वकील असल्याचे सर्वज्ञात असून या मसुद्यावर त्यांनी सक्षम युक्तिवाद केला असे मला वाटते. त्यांना वाव मिळाला असता तर त्यांनी कदाचित घटनेला वेगळा आकार दिला असता. आपण प्रशासन एका दिवसात बदलू शकत नाही असे ते म्हणाले तेव्हा त्यांनी आपली अडचण पूर्णपणे मान्य केली असे मला वाटते. आणि प्रस्तुत घटनेचे थोडक्यात वर्णन करणे शक्य झाल्यास विद्यमान प्रशासनास ती साजेशी करण्यात आली आहे.....

श्री. एस. नागप्पा : माननीय उपाध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे सन्माननीय अध्यक्ष आणि सदस्य यांचे अभिनंदन करण्यात आधीच्या वक्त्यांबरोबर मी सहभागी होत आहे. सर्व समस्यांचे सर्व पैलू आणि विविध समित्यांचे सर्व अहवाल यांचा एकत्रित विचार करण्याची काळजी त्यांनी घेतलेली आहे.....

महोदय, आपण अगदी नुकतेच स्वातंत्र्य प्राप्त केलेले असल्याने समर्थ केंद्रीय सरकारचा मी एक पुरस्कर्ता आहे. हे स्वातंत्र्य दृढ करण्यासाठी आणि ते चिरंतन टिकावे म्हणून आपल्याला पुरेसा अवधी हवा आहे. केंद्रीय सरकार समर्थ असावे यासाठी दुसरेही कारण आहे. आपण आताच धार्मिक आणि जातीय अशा अनेक कारणांमुळे विभाजित झालेलो आहोत. आता प्रांतिक आधारावर आपले विभाजन व्हायला नको. म्हणून सर्व प्रांतांचे ऐक्य करून आणखी एकी निर्माण करण्यासाठी समर्थ केंद्र असणे देशहिताचे आहे.

समर्थ केंद्र का असावे याचे आणखी एक कारण मी सांगणार आहे. काही लोकांचे असे म्हणणे आहे की युद्धाची मनोवृत्ती असलेले समर्थ केंद्र असावे. अशी मनोवृत्ती असावी असे मला बिलकुल वाटत नाही. अहिंसक आणि सत्याचे उपासक असल्याचे प्रशिक्षण आपल्याला देण्यात आले आहे. ही आपली तत्त्वे आहेत. असे असताना केंद्र युद्धखोर मनोवृत्तीचे असणे संभवत नाही.

आपला अहवाल आणि घटनेचा मसुदा सादर करताना डॉ. आंबेडकर म्हणाले की घटनेची रचना संघराज्यात्मक आहे पण स्वरूप एकात्मिक आहे. महोदय, या प्रकारची घटना विशेषतः या घडीला आपल्याला आवश्यक आहे असा मला विश्वास आहे. त्यांनी भारत सरकार कायद्यातून उसनवारी केल्याचे आपल्याला सांगण्यात आले होते. आपल्याला चांगले दिसते त्याचे आपण अनुकरण करतो. आपल्या प्रथा आणि संस्कृती यांना उपयुक्त आणि साजेसे इतर घटनांमध्ये आढळल्यास त्याचा अंगीकार करणे गैर नाही.

या घटनेत अल्पसंख्याकांसाठी चांगल्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. याचा मला आनंद आहे आणि अल्पसंख्याकांचे हितरक्षण करण्यासाठी या सभागृहात परतलेले प्रतिनिधीही आनंदी आहेत. यासाठी बहुसंख्याक समाजाचे आपण अभिनंदन केले पाहिजे. अल्पसंख्याकांना काही विशेषाधिकार मान्य केल्याबद्दल आपण बहुसंख्याक समाजाचे अभिनंदन केले पाहिजे.....

महोदय, मी पुनश्च एकवार डॉ. आंबेडकर यांना हा घटनेचा मसुदा तयार करण्याचे कष्ट घेतल्याबद्दल धन्यवाद देत आहे. ही कामगिरी अत्यंत जटिल आहे यात शंका नाही, परंतु त्यांनी ती अत्यंत यशस्वीपणे आणि एवढया अल्पावधीत पार पाडली आहे.

(१६) भारताच्या घटना समितीच्या शनिवार, दिनांक ६ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश :—

घटना समितीची बैठक **शनिवार दिनांक ६ नोव्हेंबर, १९४८ रोजी,** सकाळी दहा वाजता, घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ. हिरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.

श्री. अरूण चंद्र गुहा (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय.... आता घटनेच्या मसुद्याकडे. मसुदा समिती आपल्या कक्षेबाहेर गेली आहे. घटना समितीने आखून दिलेल्या प्रमुख तत्त्वांपलिकडे आपल्याला सादर करण्यात आलेली घटना गेली आहे. या संपूर्ण घटनेच्या मसुद्यात काँग्रेसचा दृष्टीकोन अथवा गांधीवादी राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोन कोठेही आढळत नाही. विद्वान डॉ.आंबेडकर यांना आपल्या प्रदीर्घ विद्वत्ताप्रचुर भाषणात गांधीजी किंवा काँग्रेस यांचा संदर्भ देण्याची एकही संधी सापडली नाही. यात आश्चर्यकारक काहीच नाही कारण संपूर्ण घटनेत खास करून काँग्रेसचे आदर्श आणि काँग्रेसची विचारधारा यांचा अभाव आहे. आपण घटना तयार करतो तेव्हा ती केवळ एक राजकीय रचना आपण करत नसतो, केवळ एक प्रशासकीय यंत्रणा उभी करत नसतो तर राष्ट्राच्या समाजिक आणि आर्थिक भवितव्यासाठी ही रचना असते....

डॉ. आंबेडकर हे विद्वान प्राध्यापक असून त्यांची विद्वता आणि क्षमता मी मान्य करतो. घटनेचा मसुदा ही प्रामुख्याने त्यांची निर्मिती आहे असे मला वाटते. मूलभूत अधिकारांबाबत आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ.आंबेडकर यांनी पराभौतिक चर्चा सुरू केली. त्यांनी एका नव्या संज्ञेचा परिचय करून दिला आहे. महोदय, जगात कोणताही अधिकार अनिर्बंध नसतो अशी माझी भावना आहे. प्रत्येक अधिकाराबरोबर एक बंधन येते; बंधनाशिवाय कोणताही अधिकार असू शकत नाही.....

माननीय उपाध्यक्ष (डॉ. हिरेन कुमार मुखर्जी) : पुढील वक्त्याला भाषणासाठी पाचारण करण्यापूर्वी माझ्याकडे ४० इच्छुक वक्त्यांची नावे आली आहेत. हा विषय एवढा तातडीचा आणि महत्त्वाचा आहे की प्रत्येकाला या घटनेच्या मसुद्यावर मतप्रदर्शन करण्याची संधी लाभावी असे मला वाटते. म्हणून मी घालून दिलेली दहा मिनिटांची कालमर्यादा कोणत्याही वक्त्याने ओलांडू नये असे आवाहन मी करतो.

श्री. टी. प्रकाशम (मद्रास : सर्वसाधारण) : मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांनी सादर केलेला घटनेचा मसुदा हा एक फार विशाल दस्ताऐवज आहे. त्यांनी आणि या कामगिरीबरोबर संलग्न असणाऱ्यांनी अपार मेहनत घेतली असणार. घटना समितीचे पाच ते सहा सदस्य गळणे आणि त्यांच्या जागा रिकाम्या राहणे

यांमुळे निर्माण झालेल्या अडचणीतही डॉ. आंबेडकर कसे काम करत होते याचे स्पष्टीकरण माझे स्नेही सन्माननीय श्री.टी.टी.कृष्णम्माचारी यांनी केले आहे.....

डॉ. जोसेफ अल्बान डिसोझा (मुंबई : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष, या महान देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात असा ऐतिहासिक क्षण कधी आला नसेल अथवा येणारही नाही जेव्हा या सन्माननीय सभागृहात आपल्या घटनेचा मसुदा एक स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही भारतीय प्रजासत्ताकाच्या निर्मितीसाठी कलमवार आणि तपशीलवार चर्चिला जाईल. या क्षणाची गरज आहे आपल्या वैयक्तिक सद्विवेकबुद्धीबाबत अंतर्मुख होण्याची; गरज आहे, बंधुभावाची आणि सहकार्याची ज्यायोगे शांतता, सांमजस्य आणि सदिच्छा हे आपल्या व्यक्तिगत आणि सामूहिक अस्तित्त्वाची गुणवैशिष्ट्ये ठरतील, गरज आहे व्यापक दृष्टीकोनाची ज्यायोगे या घटनात्मक रचनेबाबतचे गुंतागुंतीचे आणि अवघड प्रश्न या राष्ट्राची भरभराट आणि प्रगती यांच्या संदर्भात तपासता येतील आणि अखेर गरज आहे. 'शेजाऱ्यांवर प्रेम करा' या सिद्धांताचा मुक्तपणे आणि निस्वार्थी भावनेने अवलंब करण्याची, ज्यायोगे राष्ट्राच्या सर्वपरी हिताच्या दृष्टीने मूलभूत धोरणाविषयक निर्णयांवर भावनिक, भावुक, संकुचित घटकांचा प्रभाव पडणार नाही.

बहुतेक अनेक प्रत्यक्षात प्रत्येक वक्त्याने माझ्यापूर्वी बोलताना घटनेचा मसुदा ही एक श्रेष्ठ कामगिरी असल्याचे मान्य केले आहे. सन्माननीय डॉ.आंबेडकर आणि त्यांच्या मसुदा समितीने अनेक महिन्यांच्या परिश्रमानंतर हा स्मरणीय दस्तऐवज सादर केला आहे. ही कामगिरी विशेषज्ञांची आहे, ती अथपासून इतिपर्यंत तौलनिक, वेचक आणि कार्यक्षम स्वरूपाची आहे.....

श्री. के. संतानम (मद्रास : सर्वसाधारण) : ..... मसुदा समितीने उत्तम कामगिरी केली असली तरी टीकेच्या दोन मुद्यांपासून तिची सुटका होणार नाही. या घटना समितीने खुल्या अधिवेशनात मंजूर केलेल्या काही महत्त्वाच्या तरतुदी मसुदा समितीने स्वत:च्या जबाबदारीवर बदलल्या आहेत.....

श्री. आर. के. सिधवा (मध्य प्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, एक सक्षम आणि निष्णात वकील या नात्याने डॉ.आंबेडकर यांनी घटनेचा मसुदा या सभागृहात अत्यंत सुबोध पद्धतीने सादर करून बाह्य जगताला आणि या सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांना प्रभावित केले असले तरी घटनेचे मूल्यमापन करण्याचा तो निकष नाही. या देशातील लोकशाहीसाठी ही घटना तयार केलेली आहे आणि डॉ.आंबेडकर यांनी स्थानिक प्राधिकरणे तसेच खेडी यांच्याकडे दुर्लक्ष करून लोकशाहीची मूळ कल्पनाच नकारात्मक केली आहे....

श्री.जयनारायण व्यास (जोधपूर) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ. आंबेडकर आणि त्यांचे सहकारी तसेच टंकलेखक आणि कागदपत्रांच्या नकला करणारे अशा सर्वांचे आपल्यासमोर असलेली विशाल घटना तयार करण्याच्या परिश्रमांबद्दल आभार मानले पाहिजेत. हा मसुदा अत्यंत विशाल असून त्यात अनेक गोष्टींचा समावेश केलेला आहे.....

श्री. बी. ए. मंडलोई (मध्यप्रांत आणि बेरार : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत घटना मसुद्याच्या गुणवैशिष्ट्यांचे विवेचन केले आहे. सरकारचे स्वरूप काय राहणार आणि देशाची घटना काय आहे, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आणि

त्यांनी असे स्पष्ट केले की, समर्थ केंद्र आणि संसदीय प्रणालीत एकच न्याययंत्रणा आणि मूलभूत हक्कांबाबत समानता असेल. ते असेही म्हणाले की स्थैर्यापेक्षा जबाबदारीवर अधिक भर देण्यात आला आहे. शांततेच्या आणि युद्धकाळातही ती पुरेशी शक्तिशाली असेल. घटनेच्या मसुद्यावर करण्यात आलेल्या विविध टीकेचा परामर्श त्यांनी घेतला असून त्यांचे भाषण घटनेवर पूर्ण प्रकाश टाकणारे आहे असे माझे मत आहे. केंद्रीय अधिकार समिती, प्रांतिक घटना समिती, सल्लागार समिती आणि अल्पसंख्याक समिती आदींच्या अहवालांवर मसुदा समितीने तयार केलेला घटनेचा मसुदा आधारित आहे. घटना समितीने आपल्या पहिल्याच अधिवेशनात आपल्या घटनेच्या उद्दिष्टांबाबत एक ठराव मंजूर केला. हा ठराव आपले आदरणीय नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडला आणि तो एकमताने मंजूर करण्यात आला. त्या मूलभूत ठरावावर-*म्हणजे उद्दिष्ट ठरावावर*-आपली घटना आधारित असल्याचे आपणाला निश्चित करायचे आहे. त्यात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांना मान्यता देण्यात आली आहे. मसुदा घटना त्या उद्दिष्ट ठरावाच्या अनुसार आहे आणि त्यामुळे तिने आपले उद्दिष्ट साध्य केले आहे असे आपण म्हणू शकतो.

आपला देश आणि आपले राष्ट्र यांच्या उद्देशाच्या कसोटीवर आपली घटना उतरते का हे तपासण्याचा आणखी एक मार्ग आहे. आपले स्वातंत्र्य, आपली लोकशाही, सर्वधर्मभावाचे सरकार यांचे या घटनेमार्फत जतन होईल का, ही ती कसोटी आहे. त्यादृष्टीने पाहिले तर ही घटना आपला हेतू साध्य करते असे माझे मत आहे.....

महोदय, संपूर्ण जगातील सुसंस्कृत राष्ट्रांच्या घटनांच्या तौलनिकतेमधून आपली घटना विकसित झाली आहे. आपल्या देशाची हितासाठी आवश्यक ते सर्व चांगले मुद्दे गरजेनुसार बदल करून घेण्यात आले आहेत. ही घटना आपण विश्वासपूर्वक आणि प्रामाणिकपणे अंमलात आणली तर मला अशी खात्री आहे की आपला देश संपन्न आणि समर्थ होईल, सुखी होईल आणि आपण केवळ आपण आपले स्वातंत्र्य जतन करणार नसून आपले राष्ट्रपिता, आपले दिवंगत नेते यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणू शकू. त्यांनी म्हटले होते की त्यानंतर भारताचे स्थान असे असेल की त्यायोगे अन्य परतंत्र राष्ट्रे स्वतंत्र होतील आणि संपूर्ण जगात शांतता आणि भरभराट नांदेल.

महोदय, एवढे बोलून डॉ.आंबेडकर यांनी मांडलेला प्रस्ताव सभागृहाने मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

पंडित बाळकृष्ण शर्मा (संयुक्त प्रांत : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष आणि माननीय कायदामंत्र्यांचे अभिनंदन इतक्या मित्रांनी केले आहे की या घटनेच्या मसुद्याबद्दल मी पुनश्च तशाच भावना प्रकट करणे म्हणजे पुनरूक्ती भासेल. परंतु विद्वान कायदामंत्र्यांना मी माझे नम्र आणि आदरपूर्ण अभिनंदन अपर्ण न केल्यास माझ्या कर्तव्यात कसूर करणे ठरेल. ज्या अत्यंत ओघवत्या शैलीत त्यांनी हा घटनेचा मसुदा आपल्या विचारार्थ सादर केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

अनेक मित्रांनी आणि टीकाकारांनी येथे येऊन आपल्या घटनेवर काही आरोप केले आहेत. ही घटना अत्यंत भलीमोठी बोजड असल्याची टीका वारंवार करण्यात आली आहे. या आकारमानाकडे खुद्द ठरावकर्त्यानेच निर्देश केला आहे. इतर देशांची पोटकलमे आणि उपकलमे आपण विचारात घेतल्यास आपली घटना नक्कीच

जाडजूड आहे. आपल्या घटनेत ३१५ कलमे आहेत तर महोदय, ब्रिटीश उत्तर अमेरिका म्हणजेच कॅनडाच्या घटनेत फक्त १४७, राष्ट्रकुल ऑस्ट्रेलियाच्या घटनेत सुमारे १२८, दक्षिण आफ्रिका संघराज्याच्या घटनेत १५३, आयरिश घटनेत फक्त ६३, अमेरिकेच्या घटनेत २८, सोव्हिएत संघराज्याच्या घटनेत १४६, स्विस संघराज्याच्या घटनेत १२३, जर्मन राष्ट्राच्या घटनेत १८१ आणि जपानच्या घटनेत १०३ कलमे आहेत. या घटनांकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास असे आढळेल की यापैकी कोणत्याही घटनेत २०० पेक्षा जास्त कलमे नसून आपल्या घटनेत मात्र ३१५ कलमे आहेत.

टीकाकारांनी या आकारमानाबद्दल बरीच चर्चा केली आहे. परंतु आपला मोठा देश ३३ कोटींचा आहे आणि जगातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास एक-पंचमांश लोकांसाठी ही घटना आपण तयार करत असल्याचे विसरता कामा नये. त्यामुळे आपली घटना विशाल असल्याचे आश्चर्य वाटायला नको.....

महोदय, आपल्या देशाच्या स्वतःच्या समस्या आहेत. जगातील इतर कोणत्याही देशात आपल्या सारखी संस्थाने नाहीत. आजच्या लोकशाही तत्त्वांबरोबर या साऱ्या घटकांची सुसंगती साधणे आपल्या घटनाकारांनी मोजकी कलमे समाविष्ट करूनही त्यांना हे शक्य झाले नसल्यास त्यात आश्चर्यकारक असे काहीही नाही. त्यामुळे आपली घटना जाडजूड असल्याचा आरोप मला थिल्लरपणाचा वाटतो.....

पंडित ठाकुरदास भार्गव : .....मी इंग्रजीत बोलावे असा आग्रह अनेक मित्रांनी केल्याने त्यांच्या इच्छेचा मी आदर करतो. हिंदीत मी अधिक सहजपणे बोलू शकतो ही वस्तुस्थिती असली तरी सभागृहाच्या सर्व सदस्यांना माझे म्हणणे समजावे अशी मला इच्छा आहे.

महोदय, मसुदा समितीवर झालेल्या प्रशंसेच्या वर्षावात मलाही सहभागी होण्याची इच्छा असली तरी विनाआक्षेप मी तसे करू शकत नाही. येथे काही मित्रांनी केलेल्या तक्रारी पाहता मसुदा समितीने आपल्याला अपेक्षित असणारे केलेले नाही अशी माझी भावना आहे. काही सदस्य अनुपस्थित होते, काही सहभागी झाले नाहीत तर काहींनी पूर्ण विचार केला नाही..... या घटनेने भारताच्या खऱ्या आत्म्याचे प्रतिनिधित्त्व केलेले नाही आणि खेड्यांच्या स्वायत्ततेची पूर्ण तरतूद या घटनेत नाही आणि या कॅमेऱ्यात (मसुदा घटनेची प्रत दाखवत) अनेक लोकांना हव्या असलेल्या भारताचे चित्र नाही. मसुदा समितीला गांधीजींचे मन जाणता आले नाही, या कॅमेऱ्यात भारतातील कोट्यवधी जनतेचे प्रतिबिंब दिसावे अशी इच्छा असणाऱ्यांचे मन समजले नाही. तथापि, डॉ. आंबेडकर यांचे परिश्रम, मेहनत आणि क्षमता यांची प्रशंसा करण्यावाचून मला राहवत नाही. या सभागृहासमोर त्यांनी व्यक्त केलेल्या सर्वच भावना मला मान्य नसल्या तरी त्यांच्या भाषणासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.

महोदय, मला असे वाटते की या घटनेचा आत्मा तिच्या उद्देशिकेत (PREAMBLE) असून 'बंधुभाव' हा शब्द त्यात समाविष्ट केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांच्या प्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. महोदय, मला आता या उद्देशिकेची कसोटी संपूर्ण घटनेला लावायची आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या घटनेत सापडू शकले, हा आदर्श आपण या घटनेत आणू शकलो तर ही घटना चांगली आहे अशी माझी भूमिका आहे.

प्रा. शिब्बनलाल सक्सेना (संयुक्त प्रांतः—सर्वसाधारण) : .....माननीय उपाध्यक्ष महोदय, आपल्या घटनेच्या मसुद्यातील आधारभूत तत्त्वांवर चर्चा करण्यासाठी आज आपल्याला सांगण्यात आले आहे. सर्वप्रथम मी आपणासमोर ही घटना प्रस्तावित करणाऱ्या विद्वान डॉक्टरांचे अभिनंदन करतो. त्यांचे भाषण मी अनेकदा वाचले असून

घटनेवर प्रकाश टाकणारी ही महाकृती आहे असे मला वाटते. घटनेच्या मसुद्याची यापेक्षा समर्थ वकिली करता आली नसती असे मला वाटते.....

.....अखेरीस मी मसुदा समितीला एक अत्त्युत्तम घटना दिल्याबद्दल धन्यवाद देतो. मी केलेल्या सूचनांवर घटना दुरूस्तीच्या प्रसंगी विचार होईल अखेर आपल्या देशाच्या घटनेत त्यांना स्थान लाभेल अशी मला आशा आहे. महोदय, एवढे बोलून सभागृहाने हा प्रस्ताव स्वीकारावा अशी शिफारस मी करतो.

श्री. सारंगधर दास (ओरिसा संस्थाने) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आधीच्या सर्व वक्त्यांप्रमाणे मी सुद्धा मसुदा समिती आणि विशेषकरून समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांचे त्यांनी केलेल्या परिश्रमांबद्दल आभार मानतो. त्याचबरोबर त्यांच्या भाषणातील काही बाबी मला मान्य नाहीत.....

श्री. आर. आर. दिवाकर (मुंबई : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, माझ्या आधी बोललेल्या सन्माननीय सदस्यांनी पुरेसा तपशील मांडला असून त्याची पुनरूक्ती करण्यात सभागृहाचा वेळ घ्यावा असे मला वाटत नाही. आपल्या देशाला नवीन घटना देण्याच्या बेतात आपण असताना माझ्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले काही मुद्दे मी मांडणार आहे. मला स्पष्ट करायची असणारी एक बाब म्हणजे आपल्या समोर असणारा घटनेचा मसुदा ही एक महाकृती असून आपण सर्वांनी मसुदा समिती आणि या सभागृहात याबाबतचा प्रस्ताव मांडणारे समितीचे अध्यक्ष यांचे अभिनंदन आपण यापूर्वीच केले आहे. माझ्या मते मसुदा समितीने केवळ घटना समितीचे निर्णय शब्दबद्ध केलेले नसून त्यापेक्षाही बरेच काही केले आहे. मी असे म्हणेन की समितीने निर्णयांचे पुनर्विलोकन केले आहे, काही निर्णयांचे पुनर्लेखन केले आहे आणि बहुधा अनेक निर्णयांची पुनर्रचना केली आहे. प्राप्त परिस्थितीत तसे करणे अनिवार्य असू शकले तरी आपण घटनेचा मसुदा विचारात घेताना आणि आपल्या दुरूस्त्या देण्याबाबत विचार करत असताना घटना समितीचे सदस्य म्हणून आपल्याला या वस्तुस्थितीची जाणीव असणे आवश्यक आहे....

(१७) भारताच्या घटना समितीच्या सोमवार, दिनांक ८ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश :—

घटना समितीची बैठक **सोमवार दिनांक ८ नोव्हेंबर, १९४८ रोजी,** सकाळी दहा वाजता, घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ.हरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.

महबूब अली बेग साहिब बहादूर (मद्रास : मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, डॉ.आंबेडकर यांचे विश्लेषण आणि समीक्षा अत्यंत ओघवती, आधिकारीक आणि उद्‌बोधक तसेच स्पष्टीकरणात्मक होती. हा प्रस्ताव या सभागृहाच्या विचारार्थ मांडताना त्यांनी केलेल्या अभूतपूर्व भाषणाबद्दल त्यांचा गौरव न करणे अशक्य आहे, अगदी त्यांची मते मान्य नसली तरी.....

श्री. झेड. एच. लॅरी (संयुक्त प्रांत : मुस्लीम) : ..... या तरतुदींचे मूल्यमापन करताना आपण दोन गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पहिली म्हणजे या ठरावाचे सादरकर्ते, अर्थातच डॉ.आंबेडकर यांनी कबूल केलेल्या काही बाबी आणि दुसरी म्हणजे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गेल्या १५ महिन्यांत लोकशाहीच्या क्रियान्वयनाचा आपला अनुभव. घटनेच्या मसुद्याचा पाया असणारा ठराव सभागृहाने मंजूर केला तेव्हा आपणास असा कोणताही

अनुभव नव्हता, जो आता आहे. सन्माननीय सादरकर्त्यांनी दिलेली पहिली कबुली मी त्यांच्याच शब्दांत मांडतोः *'मूलतः लोकशाहीवादी नसलेल्या भारतीय भूमीत लोकशाही ही केवळ सजावट आहे..... प्रशासनाचे स्वरूप सुचवण्यासाठी विधिमंडळांवर विश्वास टाकणे सूज्ञपणाचे ठरणार नाही.'* मी आदरपूर्वक सांगतो की त्यांचे म्हणणे मुख्यतः बरोबर आहे.

श्री. हुसेन इमाम (बिहार : मुस्लीम) : .....मसुदा समितीच्या अध्यक्षांची परिस्थिती कठीण असल्याचे मला नमूद केले पाहिजे. सोव्हिएत घटनेची नक्कल न केल्याबद्दल त्यांच्यावर डाव्यांनी हल्ला केला आहे तर ग्रामपंचायत हे एकक न मानल्याबद्दल उजव्यांनी. भारतीय लोकांच्या सर्व व्याधींसाठी घटनेने काहीतरी द्यावे अशी इच्छा करणाऱ्या आमच्या मित्रांच्या मनात गोंधळ आहे. अन्न आणि वस्त्र पुरविणे हा घटनेचा भाग नव्हे. या उद्दिष्टाची एकही तरतूद घटनेत नसल्याबद्दल या घटना समितीच्या एका अत्यंत आदरणीय सदस्याने खेद व्यक्त केला. मला असे म्हणावयाचे आहे की, घटना ज्या देशात क्रियान्वित व्हायची, त्या देशाच्या गरजांवर घटना आधारित असते. आपल्या परिस्थितीजन्य वैशिष्ट्यांचा परामर्श ही घटना घेते की नाही हे आपणास पहायचे आहे.....

बेगम ऐजाज रसूल (संयुक्त प्रांत : मुस्लीम) : महोदय, घटनेच्या मसुद्याचे सुस्पष्ट आणि उद्‌बोधक विवेचन केल्याबद्दल सन्माननीय डॉ. आंबेडकर यांचे मी अभिनंदन करते. डॉ. आंबेडकर आणि मसुदा समिती यांच्यावर सोपविलेली कामगिरी सामान्य नव्हती आणि म्हणून आपण त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

घटना तयार करण्यासमवेत संलग्न होणे हा मी माझा एक मोठा बहुमान समजते. या प्रसंगाच्या गांभीर्याची मला जाणीव आहे. दोन शतकांच्या गुलामीनंतर भारत वेठबिगारीच्या अंधःकारातून स्वातंत्र्याच्या प्रकाशात प्रवेश करत आहे आणि आज या ऐतिहासिक क्षणी आपण येथे स्वतंत्र भारतासाठी घटना तयार करण्यासाठी एकत्र झालो आहोत. या प्रचंड उपखंडात निवास करणाऱ्या ३० कोटी लोकांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थान निश्चितीबरोबर आपले भवितव्य ही घटना आखून देणार आहे. येथे राहणाऱ्या लोकांच्या गरजा, संस्कृती आणि बुद्धिमत्ता यांना साजेशी सर्वोत्तम व्यवस्था कशी विकसित करायची याबाबतच्या आपल्या जबाबदारीची पूर्ण जाणीव ठेवून ही कामगिरी आपल्याला सुरू करायची आहे.....

.....ग्राम पद्धतीबाबत डॉ.आंबेडकर यांनी केलेल्या मतप्रदर्शनावर येथे बरीच टीका झाली आहे. महोदय, त्यांचे म्हणणे मला पूर्णपणे मान्य आहे. नागरिकांच्या हक्कांबाबत आधुनिक प्रवृत्ती कोणत्याही सत्ता एकवटण्याविरूद्ध असून ग्राम पंचायती अत्यंत हुकूमशाही स्वरूपाच्या असू शकतात.....

महोदय, कोणताही लिंगभेद करण्यात येणार नाही ही वस्तुस्थिती एक महिला म्हणून मला अतिशय समाधानकारक वाटते. घटनेच्या मसुद्यात अशी तरतूद करणे अत्यंत इष्ट असून नव्या घटनेनुसार महिला समान संधीबाबत आश्वस्त राहू शकतील अशी मला खात्री आहे.

डॉ. मनमोहन दास (पश्चिम बंगाल : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आपले प्रतिभावान कायदामंत्री आणि मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांनी या सभागृहास घटनेचा मसुदा सादर करून काही दिवस लोटले आहेत. या काही दिवसांत घटनेच्या मसुद्यावर या सभागृहाच्या विभिन्न सदस्यांनी कडाडून टीका केली आहे. घटनेचा मसुदा मंजूर करण्याबाबत या सभागृहाची सक्षमता आणि अधिकृतता, वैधता यांच्यावर

प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्या काही मोजक्या सदस्यांचा अपवाद वगळता बाकी सर्व सदस्यांनी याबाबत एकमताने निर्णय दिला आहे. आरंभ करण्यासाठी या घटनेच्या मसुद्यातील काही कलमे आणि उपकलमे यांच्यात काही बदल करून, काही भर घालून आणि काही वगळून या सर्वांनी मान्य केली आहे. या घटनेचे अत्यंत आश्वासक असे वैशिष्ट्य म्हणजे एक नागरिकत्त्व. मसुदा समितीच्या अध्यक्षांनी म्हटल्याप्रमाणे-घटनेच्या मसुद्याने आपल्याला एक नागरिकत्त्व, म्हणजे भारताचे नागरिकत्त्व दिलेले आहे. हे वैशिष्ट्य अमेरिकी घटनेत आढळत नाही. प्रांतवादाच्या या घटकेला, जेव्हा प्रत्येक प्रांत शेजारच्या प्रांतावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहे, जेव्हा आपण शेजारच्या प्रांताची सहानुभूती आणि सदिच्छा गमावलेली आहे, अशा प्रसंगी हे वैशिष्ट्य अतिशय आश्वासक आहे.

ही घटना मंजूर झाल्यानंतर भारतभर समान अधिकार आणि समान विशेषाधिकार देणारे, एकच नागरिकत्त्व प्रदान करणारे कलम मंजूर झाल्यानंतर शेजारी प्रांतांचे दरवाजे आपल्यासाठी खुले होतील हे जाणवून मला, विशेषतः पश्चिम बंगालचा सदस्य म्हणून अभिमान वाटत आहे कारण त्यायोगे पूर्व पाकिस्तानातील आपल्या दुर्देवी बांधवांना आपल्या शेजारील प्रांतांमध्ये श्वास घेण्यापुरती जागा मिळू शकेल.....

श्री. व्ही. आय. मुनिस्वामी पिलाई (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, या सन्माननीय सभागृहाला घटनेचा मसुदा मंजूर करण्यासाठी सादर करणाऱ्या मसुदा समितीचे परिश्रम आणि तिने दिलेली सेवा यांची या सभागृहातील अथवा बाहेरीलही कोणी हेटाळणी करू शकणार नाही. या महान उपखंडाच्या उत्थानासाठी मसुदा समितीने जगातील विविध घटनांचे मनन करून आवश्यक त्या तरतुदी संकलित केल्याबद्दल भावी पिढीला या मसुदा समितीचा निश्चितच अतिशय अभिमान वाटेल....

या मोजक्या निरीक्षणांसह मसुदा समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी या सभागृहाला सादर केलेल्या घटनेच्या मसुद्यासाठी दिलेल्या महत्तम योगदानाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि हा प्रस्ताव स्वीकृत करावा अशी शिफारस करतो.

श्रीमती दक्षायनी वेलायुधान (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, आता घटनेचा मसुदा आपल्यासमोर सर्वसाधारण चर्चेसाठी असल्याने आपण मला याबाबतचा माझा दृष्टीकोन व्यक्त करण्याची अनुमती द्यावी ही विनंती. नूतन भारताच्या सर्वसाधारण मर्यादेत मसुदा समितीच्या प्रतिभाशाली आणि निष्णात अध्यक्षांनी आपले कर्तव्य उत्तमप्रकारे पार पाडले आहे. मला असे वाटते की सत्तांतराच्या व्यापक तत्त्वांपलिकडे त्यांना इच्छा असली तरी ते जाऊ शकले नसते आणि त्यामुळे माझी अशी भावना आहे की त्यांच्यावर करण्यात आलेली टीका पूर्णपणे असहिष्णु आणि अस्थानी आहे. यात कोणताही दोष असलाच तर आणि मला वाटते की तो आहे- तो येथे उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचा आहे, घटना तयार करण्यासाठी येथे पाठविण्यात आलेल्यांचा आहे आणि स्वातंत्र्यासाठी कष्ट सोसलेल्या कोट्यावधी मुक्या जनतेने मोठ्या आशेने ज्यांच्यावर जबाबदारी सोपवून या सभागृहात पाठविले, त्यांचा आहे. तथापि, याचा अर्थ असा नव्हे की या मसुद्यात टीकास्पद असे काहीही मला दिसलेले नाही.....

श्री.देशबंधु गुप्ता (दिल्ली) : अध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर यांचे अभिनंदन सभागृहातील विविध सदस्यांनी केले असले तरी मी त्यांचे अभिनंदन करू शकत नसल्याबद्दल दिलगीर आहे.....

श्री.गोकुळभाई दौलतराम भट्ट (मुंबई संस्थाने) : ..... मला हे म्हणायचे होते. दिल्ली आणि इतर भूप्रदेशांबद्दल माझी अशी विनंती आहे की दिल्ली ही राजधानी असल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन तिला विशेष दर्जा देण्यात यावा. याबाबतीत लाला देशबंधु गुप्ता यांच्याबरोबर मी सहमत आहे. परंतु अजमेर-मारवाड, कुर्ग, पंतपिपलोदा यांसारखे छोटे भूप्रदेश प्रांतांमध्ये विलीन करावेत. डॉक्टर साहेबांना माझे हे निवेदन आहे. ते स्वतः एक प्रकांड विद्वान असून हा देश म्हणजे सुद्धा विद्वतेची भूमी आहे असे त्यांनी समजावे. त्यांनी या घटनेत भारताच्या आत्म्याला स्थान द्यावे असे माझे आवाहन आहे...

ग्यानी गुरमुखसिंह मुसाफिर (पूर्व पंजाबःशीख) : अध्यक्ष महोदय, मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर कोणत्याही अभिनंदनास पात्र नाहीत असे माझे मित्र सन्माननीय श्री.देशबंधु गुप्ता यांच्याप्रमाणे मी म्हणू शकत नाही. अनेक बाबींसाठी विविध कारणांनी ते अभिनंदनास पात्र आहेत आणि ही पहिली घटना तयार करण्यासाठी समितीने केलेले परिश्रम खचित प्रशंसनीय आहेत. असे असूनही एखाद्याला एखादी चूक आढळल्यास तिची नोंद ते समजूतदारपणे घेतात....

रेव्हरंड जे. जे. एम. निकोल्स-रॉय (आसाम : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, हा घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी स्वीकारलेल्या प्रचंड जबाबदारीबद्दल डॉ.आंबेडकर आणि मसुदा समितीच्या अन्य सदस्यांचा सन्मान करण्यासाठी सहभागी होणे खरोखर हे मोठे सौभाग्याचे आहे. हे सर्वजण आपल्या विशेष धन्यवादास पात्र आहेत....

सहाव्या सूचीत स्वायत्त जिल्हे असे नामाभिधान देण्यात आलेल्या आसाम मधील डोंगरी जिल्ह्यांसाठी स्वायतत्ता प्रदत्त जिल्हा परिषदा निर्माण करण्याचा मसुदा स्वीकारल्याबद्दल मी मसुदा समितीला खास धन्यवाद देतो.

श्री. मोहम्मद इस्माईल साहिब (मद्रास : मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ...घटनेचा मसुदा विचारात घेण्यासाठीच्या प्रस्तावावर या सभागृहात डॉ.आंबेडकर यांनी केलेले भाषण खरोखर अत्यंत महान आहे. स्पष्टता, आर्जव, प्रभाव आणि तर्कशुद्धता यांच्या निकषांवर यापेक्षा चांगले भाषण करता येईल असे मला वाटत नाही. त्यांचे हार्दिक अभिनंदन परंतु या भाषणात त्यांनी सांगितलेले सर्वच मान्य आहे असेही नाही....

श्री. अलादी कृष्ण अय्यर (मद्रास : सर्वसाधारण) : महोदय, घटनेच्या मसुद्याबद्दल थोडे बोलण्यापूर्वी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिभावान आणि प्रभावी भाषणाबद्दल, घटनेच्या तत्त्वांबद्दल त्यांनी केलेल्या स्पष्टीकरणाबद्दल त्यांच्या करण्यात आलेल्या प्रशंसेत मी सुद्धा सहभागी होत आहे... तथापि, भारतातील ग्रामीण समुहांबद्दल माझ्या सन्माननीय स्नेह्यांनी प्रकट केलेल्या ; "लोकशाही म्हणजे भारतीय भूमीवरील सजावट आहे" या त्यांच्या निरीक्षणाबद्दलची माझी ठाम प्रतिकूलता मला व्यक्त केलीच पाहिजे...

घटनेच्या मसुद्याबद्दल माझे मत मांडण्यापूर्वी माझे सन्माननीय स्नेही श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांनी मसुदा समिती आणि तिच्या सदस्यांच्या सहभागाबाबत नोंदविलेल्या निरीक्षणांबाबत माझी भूमिका स्पष्ट करणे ही माझी वैयक्तिक आणि सभागृहाप्रतीची जबाबदारी समजतो. माझी प्रकृती ठीक नसतानाही समितीचा सदस्य म्हणून तिच्या अनेक बैठकांमध्ये मी सक्रियपणे सहभागी झालो आणि बैठकांना हजर राहण्यास असमर्थ असतानाही माझ्या सहका-यांच्या विचारार्थ टिपणे आणि सूचना पाठविल्या. घटनेचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर प्रकृतीच्या

कारणास्तव मी समितीच्या कोणत्याही कामकाजात सहभागी होऊ शकलो नाही आणि घटनेचा मसुदा दुरूस्तीसाठी करण्यात आलेल्या कोणत्याही सूचनांच्या श्रेयावर मी दावा करू शकत नाही...

.....घटनेच्या मसुद्याच्या संक्षिप्त अवलोकनावरून सदस्यांना हे पटेल की ही घटना लोकशाहीवादी सरकारच्या सच्च्या तत्त्वांवर आधारित असून वाढ आणि विस्तार यांना आवश्यक असणारी तत्त्वे घटनेतच समाविष्ट आहेत; तसेच जगातील सर्वाधिक प्रगत लोकशाही घटनांना अनुसरून ती आहे. घटना म्हणजे अखेर आपण तिचा कसा वापर करतो यावर सारे अवलंबून आहे, याचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे. याचे सर्वात उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिकेची घटना, जी अंतिमतः विविध राज्यांनी मंजूर केली तेव्हा तिच्याबद्दल किमान उत्साह होता. परंतु ही घटना काळाच्या कसोटीवर उतरली असून उर्वरित लोकशाही जगतात आदर्श घटना म्हणून मानली जाते.....

पंडित गोविंद मालवीय : महोदय, अन्य काहीही बोलण्यापूर्वी हा घटनेचा मसुदा आपल्याला सादर करण्याच्या कृतीबद्दल आपण सर्वजण, मसुदा समिती, तिचे मेधावी प्रज्ञावान अध्यक्ष आणि आमचे स्नेही डॉ.आंबेडकर यांचे मी हार्दिक अभिनंदन करू इच्छितो. त्यांच्यासमोरची समस्या कठीण होती आणि ती त्यांनी अतिशय उत्तम प्रकारे हाताळली आहे. घटनेच्या मसुद्यातील अनेक बाबी काहीशा वेगळ्या असाव्यात अशी इच्छा असू शकते, परंतु कोठेही काहीही निर्माण केले तरी त्याबद्दल असेच वाटू शकते.....

(१८) भारताच्या घटना समितीच्या मंगळवार, दिनांक ९ नोव्हेंबर, १९४८ रोजी झालेल्या बैठकीतील भाषणांचे काही अंश :—

घटना समितीची बैठक **मंगळवार, दिनांक ९ नोव्हेंबर, १९४८ रोजी,** सकाळी दहा वाजता, घटना सभागृह, नवी दिल्ली येथे सुरू झाली. माननीय उपाध्यक्ष (डॉ.हरेन कुमार मुखर्जी) अध्यक्षस्थानी होते.

श्री. आर. शंकर (त्रावणकोर) : महोदय, सर्वप्रथम घटनेच्या मसुदा रचनाकारांनी अत्यंत कार्यक्षमतेने आपले कर्तव्य पार पाडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन मी केले पाहिजे; आणि घटनेच्या मसुद्यातील तत्त्वांचे आपल्यासमोर अतिशय तरल आणि स्पष्ट विवेचन केल्याबद्दल डॉ.आंबेडकर यांचे विशेषकरून अभिनंदन केले पाहिजे. घटना मसुद्याच्या तपशीलात जाण्याचा माझा उद्देश नसून या घटनेसंबंधी एक-दोन बाबींवरच मी बोलणार आहे. घटनेचा मसुद्याची सर्वात प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे अत्यंत शक्तिशाली केंद्र आणि काहीसे दुर्बल परंतु एकरूप घटक सर्व संस्थानांनी आणि प्रांतांनी एकाच मार्गाने जाणे शक्य व्हावे अशी मनोभूमिका संस्थानांच्या प्रतिनिधींनी स्वीकारावी असे कळकळीचे आवाहन डॉ.आंबेडकर यांनी केले आणि कालांतराने संस्थाने आणि प्रांत यांच्यात कोणताही भेद न ठेवता संघराज्याचे एकरूप घटक बनावे...

श्री. एम. अनंतशयनम अय्यंगार (मद्रास : सर्वसाधारण) : महोदय, मसुदा समितीने सादर केलेल्या घटनेच्या मसुद्याबाबत मूलभूत महत्त्वाचे आक्षेप घेण्यात आले आहेत. आपली प्राचीन संस्कृती अथवा परंपरा प्रतिबिंबित करणारे या घटनेत काहीही नसल्याचे मला मान्य आहे. पश्चिमेतील काही जुन्या घटनांचे-*पश्चिमेकडील काही आधुनिक घटनांचेही नव्हे*-तुकडे जोडून आणि भारत सरकार कायदा, १९३५ याची प्रतिकृती वापरून ही गोधडी तयार केली आहे हे सत्य आहे. हे एकत्र करण्यात आल्याचेही खरे आहे. यासाठी डॉ.आंबेडकर जबाबदार

नाहीत; घटनेच्या या स्वरूपाला फक्त आपणच जबाबदार आहोत. आपल्या प्राचीन संस्कृतीची स्मृती जागृत होईल असा ठसा या घटनेवर आपण उमटवला पाहिजे याचा विचार आपण केला नाही. डॉ.आंबेडकर यांच्यापेक्षा हा दोष आपला अधिक आहे...

श्री. रोहिणी कुमार चौधरी (आसाम : सर्वसाधारण) : महोदय, या अतीव महत्त्वाच्या चर्चेत सहभागी होण्याची संधी मला दिल्याबद्दल मी आपल्या प्रती कृतज्ञ आहे. परंतु पुढे बोलण्यापूर्वी मसुदा समितीचे सदस्य, समितीचे आदरणीय अध्यक्ष आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आमच्या गरीब आसाम प्रांताची आपल्या तारूण्यात सेवा करणारे आणि ज्यांचे आजही प्रेमाने आणि कृतज्ञतेने स्मरण करण्यात येते असे आपले घटनाविषयक सल्लागार यांना मी अभिवादन करू इच्छितो.....

श्री. एल. कृष्णस्वामी भारती (मद्रास : सर्वसाधारण) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ...घटनेच्या मसुद्याच्या विद्वत्तापूर्ण आणि प्रतिभावान विवेचनाबद्दल डॉ.आंबेडकर या सभागृहाच्या अभिनंदनास पात्र आहेत. मसुद्यातील तरतुदींसाठी ते अभिनंदनपात्र नाहीत कारण त्या तरतूदी त्यांच्या नाहीत हे स्पष्ट कारण आहे. सन्माननीय सदस्यांना स्मरत असेल की, घटनेच्या मसुद्यातील बहुतेक पोटकलमांवर या सभागृहात चर्चा आणि वादविवादानंतर निर्णय झाला होता. मसुदा समितीने सम्मिलित करण्यासाठी अगदी मोजक्या बाबी ठेवण्यात आल्या होत्या. मात्र त्यांची संगतवार रचना करण्याच्या परिश्रमांबद्दल सभागृह त्यांना धन्यवाद देईल....

श्री. विश्वंभर दयाल त्रिपाठी (संयुक्त प्रांत : सर्वसाधारण) : महोदय, ...थेट विषयावरच बोलायचे म्हणजे मसुदा समितीचे सदस्य आणि अध्यक्ष यांनी घेतलेले परिश्रम तसेच घटनेची योग्यता यांच्यासाठी त्यांचे अभिनंदन करणे ही केवळ औपचारिकता आहे. मी ही औपचारिकता पाळणार नाही. त्यांनी परिश्रम केले आहेत आणि या घटना समितीमध्ये आपण निश्चित केलेल्या तत्त्वांच्या आधारे त्यांनी आपल्यासमोर घटनेचे पूर्ण रूप उभे केले आहे यात संशय नाही. घटनेच्या मसुद्यात लक्षणीय गुणविशेषता आहे याचीही मला जाणीव आहे. त्यांनी विविध देशांच्या घटनांचा बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यातून निवड करण्याचा प्रयत्न करून आपल्या देशाच्या गरजांच्या अनुसार त्यांचे अनुयोजन केले आहे, याबाबतही संशय नाही. घटनेच्या मसुद्याची ही प्रमुख गुणविशेषता आहे. एका शब्दात म्हणजे ही घटना 'सनातन' आहे.....

श्री. एस. व्ही. कृष्णमूर्ती राव (म्हैसूर) : माननीय उपाध्यक्ष, घटनेच्या मसुद्यावर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे. मसुदा समिती आणि समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांचा बहुमान करणाऱ्या सदस्यांच्या आवाजात मी सहभागी होत आहे.

एकात्मिक आणि संघराज्यात्मक अशा दोन्ही प्रकारच्या विविध लोकशाही घटनांचे सर्वोत्तम अनुभव एकत्र करण्याचा प्रयत्न घटनेच्या मसुद्यात करण्यात आला आहे. अर्थातच कोणतीही घटना परिपूर्ण नसते आणि या सभागृहाची अंतिम संमती प्राप्त होण्यापूर्वी या घटनेलाही काही बदलांचा स्वीकार करावा लागेल.....

श्री. एन. माधव राव (ओरिसा संस्थाने) : माननीय उपाध्यक्ष, या चर्चेत सहभागी होण्याचा माझा हेतू नव्हता. परंतु चर्चेच्या ओघात घटनेच्या मसुद्यातील केवळ काही तरतुदींवरच नव्हे तर मसुदा समितीच्या कार्यपद्धतीबद्दल अनेक शेरे मारण्यात आले. समितीची कृती अथवा कृतीचा अभाव याबाबतच्या कथित दोषांवर टीका करण्यात

आली. ही टीका ज्या गैरसमजांवर आधारलेली आहे, त्याबाबत काल श्री. अलादी कृष्णस्वामी अय्यर समितीच्या वतीने बोलले आणि श्री. सादुल्ला लवकरच बोलतील, ज्यायोगे त्यांचे निराकरण होईल. समितीच्या एका मोठ्या वर्गात असे गैरसमज असल्यास ते दूर करण्यामधील माझा वाटा समितीचा एक सदस्य आणि जेव्हा मी या समितीत सामील झालो तेंव्हा तिच्या अनेक बैठकांमध्ये सहभागी झाल्याच्या नात्याने मी उचलावा असे मला वाटले.

घटनेचा मसुदा सर्व बाबींची पूर्तता करत नाही किंवा आपणाला वैयक्तिकरित्या आवडले असते अशा प्रकारेही करत नाही हे खरे आहे. उदाहरणार्थ, सन्माननीय सदस्यांनी असे निदर्शनास आणले आहे की घटनेनुसार गोवधबंदी केलेली नाही, मूलभूत अधिकारांबाबत अत्यधिक तपशील आहे, राष्ट्रपित्याचा आणि राष्ट्रध्वज तसेच राष्ट्रगीत यांचा संदर्भ नाही. त्याचप्रमाणे दोन सन्माननीय सदस्यांनी बरोबर निरीक्षण नोंदवले आहे की घटनेच्या मसुद्यात देवाचा उल्लेख नाही. आपणा प्रत्येकाच्या लाडक्या कल्पना असतात; परंतु इतर संदर्भात अशा कल्पना अंतर्मूल्यामुळे कितीही योग्य अथवा मौल्यवान वाटल्या तरी त्या आपल्या हेतुबरोबर निगडीत असल्याखेरीज आणि घटना समितीने स्वीकारल्याखेरीज त्यांचा समावेश घटनेत करता येणार नाही.

या मसुद्यावर गांधीवादी तत्त्वज्ञानाची मोहर नाही आणि १९३५ च्या भारत सरकार कायद्यासह इतर काही तरतुदी परदेशी सामग्रीतून उसनवार करण्यात आल्या असल्या तरी प्राचीन भारतीय राज्यव्यवस्थेतील कोणतेही घटक या वस्त्रात विणलेले नसल्याच्या कारणावरून अनेक वक्त्यांनी टीका केली आहे.

लष्कर बरखास्त करणे, कायदेमंडळे नाकारणे अशी पावले उचलून गांधीवादी आदर्शांचे तर्कशुद्ध पालन करण्यास आमचे गांधीवादाचे अनुयायी मित्र तयार आहेत का? आम्हाला निश्चित आधारावर असे सांगण्यात आले आहे की विधिमंडळांचे कामकाज म्हणजे वेळेचा अपव्यय असे गांधीजी समजत असत; आपली न्याययंत्रणा मोडीत काढून तिच्या ठिकाणी एखादी साधी आणि अनौपचारिक न्यायदान व्यवस्था आणण्यास ते तयार आहेत का? कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याला आणि सार्वजनिक कार्यकर्त्याला दरमहा ५०० रुपयांवर किंवा जी काही मर्यादा अंतिमतः ठरविण्यात आली त्यापेक्षा जास्त वेतन मिळू नये असा आग्रह ते धरणार आहेत काय ? हे सर्व करता येईल आणि करावे असा विश्वास असणारे काही काँग्रेस नेते मला माहित आहेत. परंतु घटना समितीने गेल्यावेळी निश्चित केलेल्या घटनेबद्दल आता आपण बोलत आहोत....

सय्यद मुहम्मद सादुल्ला (आसाम : मुस्लीम) : माननीय उपाध्यक्ष महोदय, ...मसुदा समिती स्वयंभू नाही. माझी आठवण बरोबर असल्यास तिची निर्मिती या सभागृहाच्या ऑगस्ट, १९४७ मधील ठरावान्वये झाली आहे. त्यावेळी गंभीर आजार झाल्याने त्या अधिवेशनास मी हजर राहू शकलो नव्हतो. परंतु कामकाजाच्या इतिवृत्तावरून मला असे दिसते आहे की उद्दिष्ट ठराव चौकटीच्या मर्यादेत मसुदा समितीला घटना तयार करण्यास सांगण्यात आल्याने आता येथे ऐकलेल्या टीकेस आम्हास सामोरे जावे लागेल. ही शक्यता त्या काळातही सूज्ञ मंडळींना जाणवली होती आणि मुंबई प्रांताचे विद्वान मुख्यमंत्री श्री. (बाळासाहेब) खेर यांनी अधिकृत ठरावाला एक दुरूस्ती सुचवल्यानंतर हा निर्देश आपणाला देण्यात आला होता.....

मी, आता श्री. खेर यांच्या भाषणातूनच वाचून दाखवतो. ही मसुदा समिती स्थापन करण्याबाबतच्या मूळ ठरावाला दुरूस्ती सुचवताना त्यावेळी श्री.खेर म्हणाले, की " *घटनाविषयक सल्लागारांनी या घटना समितीने यापूर्वीच घेतलेले निर्णय सम्मिलित करून तयार केलेल्या भारतीय घटनेच्या मसुद्याची छाननी करण्याची जबाबदारी मसुदा समितीवर सोपवावी; तसेच संलग्न सर्व विषय आणि घटनेत जे विषय येणे आवश्यक असतील असे विषय समाविष्ट करावेत आणि मसुदा समितीने फेररचित केलेला मसुदा घटना समितीच्या विचारार्थ सादर करावा.* "

.....ही दुरूस्ती सभागृहाने स्वीकारली होती. सन्माननीय श्री.खेर यांच्या या सभागृहातील स्वीकृत दुरूस्तीनंतर आम्ही आमचे अधिकारक्षेत्र ओलांडून बरेच पुढे गेलो आहोत असे घटना समितीच्या सदस्यांनी म्हणणे योग्य नाही.....

माननीय उपाध्यक्ष : आपण विषयाला धरून पुढे जाऊ या.

सय्यद मुहम्मद सादुल्ला : .....सन्माननीय सदस्यांना मी कसे सांगू की आम्ही परिश्रम केले, प्रयत्नांची शर्थ केली, तिन्ही खंडांमधील प्राचीन आणि प्रचलित अशा घटनांचा धांडोळा एक मसुदा बनविण्यासाठी घेतला. त्याचे वर्णन केवळ एक गोधडी म्हणून करण्यात आले आहे. परंतु ज्यांच्याकडे कला आहे, हस्तकौशल्यावर ज्यांचे प्रेम आहे त्यांना निश्चित ठाऊक आहे की तुकडे एकत्र करूनही सुंदर अभिरचना, आवडेल अशी रूपरेखा निर्माण करता येते. आमच्या मसुद्यामध्ये त्रुटी असल्या तरी या सभागृहातील चर्चेकरिता आधार होण्यासाठी एक शक्य तेवढा पूर्ण दस्तऐवज देण्याचा, संपूर्ण चित्र या सन्माननीय सभागृहासमोर, उभे करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. घटना या विषयावर हाच शब्द अंतिम आहे अथवा त्यातील तरतुदींमध्ये काहीही न्यून नाही किंवा ही कलमे बदलता येणार नाहीत असे दावे मसुदा समितीने कधीही केलेले नाहीत. या सन्माननीय सभागृहासमोर अंतिम मंजुरीसाठी हा मसुदा ठेवण्यात आल्यावरूनच असे दिसते की आमची बांधीलकी एका अथवा दुसऱ्याही धोरणाला नाही.

.....विविध समित्यांच्या शिफारशींबाबत जेथे आमचे मतभेद होते अथवा या सन्माननीय सभागृहाच्या स्वीकृत तत्त्वांमधील एखादा शब्द इकडेतिकडे बदलायचे साहस आम्ही केले त्या-त्या ठिकाणी तळटीपेत आम्ही पुरेसा संकेत दिला आहे ज्यायोगे तेथे नकळत काहीही समाविष्ट करता येणार नाही. याकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यात येत आहे कारण यापूर्वीच स्वीकृत तत्त्वे अथवा समित्यांच्या शिफारशी यापासून मसुदा समितीला दूर गेलेल्या विषयांवर लक्ष केंद्रीत करता यावे.

(श्री. सादुल्ला यांच्या भाषणानंतर खालीलप्रमाणे प्रस्ताव मतास टाकण्यात आला-संपादक)

माननीय उपाध्यक्ष : " प्रश्न असा आहे की, घटना समितीच्या २९ ऑगस्ट, १९४७ रोजीच्या ठरावाला अनुसरून नियुक्त केलेल्या मसुदा समितीने तयार केलेला भारताच्या घटनेचा मसुदा आता घटना समितीने विचारात घ्यावा. "

प्रस्ताव संमत झाला.

त्यानंतर घटना समितीची बैठक सोमवार १५ नोव्हेंबर, १९४८ रोजीच्या दहा वाजेपर्यंत तहकूब झाली.

(१९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या घटना समितीसमोर शुक्रवार, दिनांक २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी केलेले शेवटचे भाषण :—

"राजकीय पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले,

तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही."

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ ला संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन त्यादिवशी भारताचे संविधान संमत झाले. त्याच्या एक दिवस आधी म्हणजे २५ नोव्हेबर, १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार या शब्दांनी ज्यांचा सार्थ गौरव होतो, यांचे संविधान सभेत शेवटचे भाषण झाले.

संविधान निर्माणासाठी त्यांना किती परिश्रम घ्यावे लागले याची प्रचिती पुढील वृत्तांतावरुन येईल.

"चालू महिन्याच्या १७ तारखेस घटना समितीचे कामकाज तहकूब होईल असा अंदाज आहे. घटना सभा स्थगिती झाल्यास काही दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण विश्रांती घ्यावी लागेल. विश्रांतीसाठी सौ. माईसाहेबांच्या समवेत डॉ. बाबासाहेब बहुतकरुन काश्मिरला जातील असा रंग दिसतो.

संविधान सभेचे कामकाम चालू असता, डॉक्टरसाहेब रोज १२/१२, १४/१४ तास कामात व्यग्र असतात. येत्या वर्षाअखेर म्हणजे ३१ डिसेंबर, १९४९ चे आत त्यांना सर्व घटना पास करून घ्यावयाची आहे. कारण नवी घटना, २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात यावी असा सर्वाचा संकल्प आहे."

संविधान निर्मितीतील त्यांच्या योगदानाबद्दल आणि कर्तत्त्वाबद्दल संविधान सभेच्या बहुतेक सदस्यांनी आणि वृत्तपत्र क्षेत्रातील या संबंधातील जाणकारांनी त्यांची मुक्तकंठाने स्तुति केली. त्यातील काहींचे उद्‌गार पुढीलप्रमाणे—

"आर के. सिधवा- हे सर्वोत्तम संविधान आहे. हे लोकांना सांगणे मी माझे कर्तव्य समजतो आणि संविधान सभेचा प्रत्येक सदस्य हे सांगेल अशी माझी अपेक्षा आहे. आपल्यात कितीही मतभेद असले तरी या संविधानाचा आपल्याला अभिमान आहे. आणि आपण जगाला हे जाहीर करु या जेणेकरुन जगाला ही जाणीव होईल की हा दस्तावेज संदर्भ घेण्यायोग्यतेचा आहे. २६ जानेवारी १९५० या ऐतिहासिक दिवशी आपण लोकसत्ताक सार्वभौम राज्य होऊ आणि त्या दिवशी या संविधानाला कायद्याचे स्वरुप प्राप्त होईल याचा मला अभिमान वाटतो."

"पंडित ठाकूरदास भार्गव- मसुदा समिती आणि विशेषतः तिचे अध्यक्ष यांच्याप्रती आपण सर्वांनी कोणत्या शब्दात कृतज्ञता व्यक्त करावी हे मला कळत नाही. कायेदविषयक कुशाग्र बुद्धी, अथक परिश्रम, अत्युच्च दर्जाचे कौशल्य, दुर्दम्य आत्मविश्वास, आधुनिकतेशी संलग्नता या गुणांनी युक्त मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी या संविधान सभेच्या माध्यमातून नेतृत्त्व केले आणि या संदर्भात निर्माण झालेल्या सर्व गुंतागुंतीच्या प्रश्नांची सोडवणूक केली."

"बेगम ऐझाज रसूल- संविधानाचे भारतीय जनतेच्या आशा-आकाक्षांना मूर्त स्वरुप दिले आहे. शब्द योजना, अंतर्भूत तरतुदीच्या निकषावर संविधानाचे मूल्यमापन होणार असेल तर जगातील संविधानात आपले संविधान श्रेष्ठ दर्जा प्राप्त योग्यतेचे आहे. आणि त्याबद्दल आपल्याला असलेला अभिमान न्यायोचित आहे. नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल मी डॉ. आंबेडकर आणि मसूदा समितीचे सदस्य यांचे अभिनंदन करते."

धर्मनिरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचं महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. धर्म-निरपेक्षतेच आग्रही प्रतिपादन हे आपल्या संविधानाच पावित्र्य आहे आणि त्याचा आम्हास गर्व आहे. मला पूर्ण विश्वास आहे. ही धर्मनिरपेक्षता नेहमी जोपासली जाईल आणि कलंकित केली जाणार नाही. भारतातील लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा त्याशिवाय विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील."

संविधान सभेच्या दैनंदिन कामकाजाचा वृत्तांत दिल्ली तसेच बाहेरील वृत्तपत्रांना देण्याचे काम **जे.पी. चतुर्वेदी** या प्रसिद्ध पत्रकाराकडे सोपविले होते. चतुर्वेदी हे भारतीय पत्रकारितेच्या चळवळीचे जनक समजले जातात. संविधान निर्मितीच्या कार्यातील डॉ. आंबेडकरांच्या योगदानाविषयी ते म्हणतात. "त्या काळात त्यांना जवळून पाहण्याचा सन्मान मला लाभला. डॉ. आंबेडकरांना कोणीही आव्हान देणे अशक्य होते. ते जगातील सर्वच संविधानांचे अधिकारी विद्वान होते. त्यांचेशी चर्चा करायला मिळणे म्हणजे बौद्धिक मेजवानी होती व मला ही संधी मिळत असे.

दलितांच्या आणि शोषितांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेला संघर्षच केवळ प्रामुख्याने, मुख्यत्त्वेकरुन सांगितला जातो. परंतु भारतीय नवीन प्रजासत्ताकाच्या पायाभरणीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबाबत काहीच उल्लेख केला जात नाही. आधुनिक मनू म्हणून त्यांना संबोधिले जाते. ज्या समाजातून त्यांचा उदय झाला त्यांच्या हितासाठी वेगळ्या कायद्यांना निर्धारित करण्याचाच केवळ त्यांनी प्रयत्न केला असे नव्हे तर त्यांनी नवीन कायदा दिला. भारतात बाल्यावस्थेत असलेल्या लोकशाहीला त्यांनी संविधानाच्या रुपानी कायदा दिला. संविधान निर्माण करणाऱ्या संविधान सभेतील पितामंहांची जेव्हा आपण आठवण करतो त्यावेळेस आपण हे विसरता कामा नये की भारताच्या संविधान सभेत डॉ. आंबेडकर हे सर्वात उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. ते ज्यांनी वर्तमान संविधानाची प्रत्यक्षात रचना केली. भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या उत्क्रांतीला सुव्यवस्थित करण्यासाठी तसेच देशाची अखंडता सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांचे विचार दिशा दिग्दर्शीत करतील."

सुप्रसिद्ध घटनातज्ञ **एस. व्ही. पायली** यांनी म्हटले आहे. "डॉ. आंबेडकरांनी आपल्या सोबत विद्वता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा व वक्तृत्त्व आणि अनुभव पणास लावले. अतिशय क्लिष्ट अशा प्रकारच्या प्रश्नावर देखील अतिशय दुर्लभ अशी त्याची पकड होती आणि आपली मते अशावेळी अतिशय प्रभावीपणे तितकेच सुलभपणे ते मांडीत. जगातील सर्व सुधारलेल्या राष्ट्राच्या घटनात्मक कायद्यांचे व त्यांचे अंमलबजावणीचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. तसेच १९३५ च्या कायद्याचे बारकावेही त्यांना माहित होते. घटनेचा मसुदा चर्चिला जात असताना उद्‌भवलेल्या कोणत्याही टीकेला ते स्पष्ट आणि सुटसुटीतपणे स्पष्टीकरण देत. त्यांनी उत्तरे दिल्यानंतर सदस्यांच्या मनातील संदेह, गोधळ, असंदिग्धपणा यांचे ढग नाहीसे होत. तर्कस्पष्ट युक्तिवाद, प्रभावी आणि सर्वांना समजणारे स्पष्टीकरण कोणत्याही मुद्याला तात्काळ प्रतिवाद करून वाद संपुष्टात आणण्याची हातोटी त्यांच्याशिवाय अन्य कोणत्याही सदस्यात नव्हती. हे सारे करीत असताना विरोधकाने एखादा रास्त मुद्दा मांडला तर तो समजून घेऊन स्विकारण्याचा उदारपणा देखील त्यांच्यात होता. म्हणूनच त्यांना आधुनिक मनू अथवा भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणतात, ते साजेसेच आहे."

बंगालच्या फाळणीमुळे तिथून निवडून आलेल्या काही सदस्यांचे संविधान सभेचे सदस्यत्त्व संपुष्टात आले होते. त्यात डॉ. आंबेडकरांचाही समावेश होता. तेव्हा पर्यंतच्या त्यांच्या कार्यावरुन संविधान सभेला त्यांच्यातील

घटनातज्ञाची तसेच त्यांच्या मार्गदर्शनाची व सहकार्याची नितांत गरज भासायला लागली होती. हे **डॉ. राजेंद्र प्रसाद** यांनी मुबई प्रांताचे तत्कालीन प्रधानमंत्री श्री.बी.जी. खेर यांना ३० जून १९४७ रोजी लिहिलेल्या पत्रावरुन दिसून येईल. ते आपल्या पत्रात लिहितात "दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार न करता आम्हाला असे वाटायला लागले आहे की, डॉ. आंबेडकरांचे संविधान सभा तसेच ज्या विविध समितीवर त्यांची नियुक्ती झाली होती त्यातील कार्य एवढे बहुमोल आहे की, आम्ही त्यांच्या योगदानापासून वंचित राहू इच्छित नाही. ते बंगालमधून निवडून आले होते. त्या प्रांताच्या फाळणीनंतर त्यांचे संविधान सभेवरील सदस्यत्त्व संपुष्टात आले. संविधान सभेचे पुढील सत्र दिनांक १४ जुलै पासून सुरू होत आहे. ते त्यात सहभागी व्हावेत यासाठी मी उत्सुक आहे. म्हणून ताबडतोब त्यांची निवड करण्यात यावी", त्याप्रमाणे जुलै, १९४७ ला मुंबई प्रांतातून डॉ. आंबेडकरांची संविधान सभेवर नव्याने निवड झाली.

त्यांची निवड किती सार्थ होती हे संविधान सभेचे अध्यक्ष **डॉ. राजेंद्र प्रसाद** यांनी २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान संमत करताना केलेल्या शेवटच्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या प्रती ज्या भावना व्यक्त केल्या त्यावरुन दिसून येईल. **डॉ. राजेंद्र प्रसाद** म्हणतात "या खूर्चीत बसून संविधान सभेच्या कार्याचे मी प्रत्येक दिवशी निरीक्षण करीत आलो आहे. संविधान सभेच्या मसुदा-समिती वरील सभासदांनी किती उत्साहाने, चिकाटीने, निष्ठेने कार्य पार पाडले हयाची खरी जाणीव अन्य कोणापेक्षाही मला अधिक आहे. विशेषतः त्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची क्षिती न बाळगता ते काम तडीस नेले आहे (टाळया). मसुदा समितीवर आणि तिच्या अध्यक्षपदी त्यांची निवड करण्याचा जो निर्णय आपण घेतला त्यांच्याइतका अचूक निर्णय दुसरा कोणताही घेतला नाही. त्यांनी आपल्या निवडीची यथार्थता पटवून दिली. इतकेच नव्हे तर त्यांनी जे हे कार्य केले त्याला एक प्रकारचा तेजस्वीपणा आणला. या संदर्भात समितीच्या इतर सदस्यांमध्ये भेदभाव करणे योग्य होणार नाही. मला माहीत आहे की तिच्या अध्यक्षांप्रमाणेच त्या सर्वांनी आस्थेने तसेच एकनिष्ठेने कार्य केले आहे आणि राष्ट्राच्या धन्यवादास ते पात्र आहेत."

"डॉ. आंबेडकरांचा त्यानंतर देश परदेशात गौरव होत राहिला. चिरंतन स्मरणात राहावे असे महत्त्वाचे राष्ट्रकार्य त्यांनी करून दाखविले होते. आंबेडकरांनी घटनेद्वारे अस्पृश्यतेचे कायमचे उच्चाटन केले होते. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ह्या श्रेष्ठ मानवी मूल्याचे अधिष्ठान भारतीय जीवनात प्रस्थापित केले होते." ह्यामुळे जगातील एक थोर घटनापंडित म्हणून त्यांना किर्ती लाभली. सुप्रसिद्ध राज्यशास्त्रतज्ञ आणि ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठांचे माजी नामवंत प्राध्यापक अर्नेस्ट वार्कर यांनी १९५१ साली आपला "प्रिन्सिप्रल्स ऑफ सोशल अँड पोलिटिकल थिअरी" हा अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला. तो त्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेस (प्रीअॅम्बल) अर्पण केला आहे. ग्रंथाच्या प्रस्ताविकात ते म्हणतात, "माझ्या प्रस्तुत ग्रंथांचे विचारसार ह्या उद्देश पत्रिकेत समाविलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना ह्या श्रेष्ठ मानवी मूल्याचा अंगीकार केला ह्याचा मला अभिमान वाटतो.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांच्या कर्तृत्त्वाचा यापरता मोठा गौरव तो कोणता असणार ! लक्ष वेधणारी अद्वितीय व्यक्ती.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण जवळ जवळ ५५ मिनिटे चालले होते. त्यावेळी घटना समितीच्या भव्य हॉलमध्ये गंभीर शांतता पसरली होती. सर्व गॅलऱ्या भरगच्च झाल्या होत्या तरी, कोणाच्या श्वासाची अगर

हातापायाची हालचाल देखील कळून येत नव्हती. उत्कृष्ट वुलन सुट पेहरलेल्या, दुरुन धिप्पाड दिसणाऱ्या आणि मधून मधून श्रोत्यांकडे दृष्टीक्षेप करणाऱ्या एकाच व्यक्तीकडे सर्व प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित झाले होते. आणि ती व्यक्ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत."

डॉक्टर साहेबांच्या भाषणाच्या सुरुवातीस व शेवटी जो टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. त्यांचेवर टाळ्यांच्या रुपाने गौरवाची वृष्टीच होत होती. भाषणाच्या शेवटी तर ज्यांनी त्यांनी डॉक्टर साहेबांशी हस्तांदोलन करून त्यांना धन्यवाद दिले."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, "महोदय, संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ ला झाली. त्याकडे पाहता आतापर्यंत २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवसांचा कालखंड लोटलेला आहे. या कालखंडात संविधान सभेची एकूण ११ सत्रे पार पडतील. या ११ सत्रांपैकी ६ सत्रे उद्दिष्टपूर्तीचा ठराव पारित करणे आणि मूलभूत हक्क, केंद्रीय संविधान, केंद्राचे अधिकार, प्रांतिक संविधान, अल्पसंख्याक या समित्यांच्या अहवालावर आणि अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमाती यावर विचार-विनियम करण्यासाठी खर्ची पडली. सात, आठ, नऊ, दहा आणि अकरा ही सत्रे मसुदा संविधानाच्या विचार विनिमयार्थ उपयोगात आणली गेली. संविधान सभेच्या या अकरा सत्राचे प्रत्यक्ष कामकाजाचे १६५ दिवस होतात. त्यापैकी मसुदा संविधानाच्या विचारार्थ सभेने ११४ दिवस उपयोगात आणले.

संविधान सभेने २९ ऑगस्ट, १९४७ रोजी मसुदा समितीची निवड केली. तिची पहिली बैठक ३० ऑगस्टला झाली. ३० ऑगस्ट पासून १४१ दिवस चाललेल्या कामकाजादरम्यान ती समिती संविधान मसुदा तयार करण्याच्या कामात व्यस्त होती. संविधान सल्लागारांनी मसुदा समितीकडे कामकाजासाठी आराखडा दिला तेव्हा मसुदा संविधानात २४३ अनुच्छेद आणि १३ परिशिष्टे समाविष्ट होती. मसुदा समितीने संविधान सभेला सादर केलेल्या पहिल्या मसुदा संविधानात ३१५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे याचा समावेश होता. विचार विनियमाच्या शेवटच्या टप्प्यात मसुदा संविधानातील अनुच्छेदांची संख्या वाढून ३८६ झाली. तिच्या अंतीम स्वरुपात मसुदा संविधानात ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टांचा समावेश आहे. मसुदा संविधानात दुरुस्ती करण्यासाठी अंदाजे ७,६३५ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यापैकी २,४७३ दुरुस्त्या सभागृहात प्रत्यक्ष विचारार्थ सादर करण्यात आल्या.

मी या वस्तुस्थितीचा उल्लेख एवढयासाठी करतो आहे की, एकावेळी असे म्हटले जात होते की, आपले काम पूर्ण करण्यासाठी समितीने प्रदीर्घ कालावधी घेतला आहे. ती संथपणे काम करीत आहे आणि जनतेच्या पैशाची उधळपट्टी करीत आहे. रोम जळत असताना निरो फिडल वाद्य वाजवित बसला होता अशी स्थिती असल्याचे बोलले जात होते. या आक्षेपात काही तथ्य आहे काय ? इतर देशातील संविधान सभांनी त्यांचे संविधान निर्माण करण्यासाठी किती काळ घेतला ते पाहू या. काही उदाहरणे घेऊ या. अमेरिकेच्या सभेची बैठक २५ मे, १७८७ ला झाली आणि चार महिन्यात म्हणजे १७ सप्टेंबर, १७८७ ला तिने आपले काम पूर्ण केले. कॅनडाच्या संविधान सभेची पहिली बैठक १० ऑक्टोबर, १८६४ ला झाली आणि मार्च १८६७ मध्ये संविधानाचे कायद्यात रुपांतर झाले यासाठी २ वर्षे ५ महिन्यांचा कालावधी लागला. ऑस्ट्रेलियाच्या संविधान निर्मितीचे कामकाज मार्च १८९१ ला सुरू झाले आणि ९ जुलै, १९०० ला कायद्याचे रुप प्राप्त झाले त्यासाठी त्यांना ९ वर्षे लागली. दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मितीच्या कार्याला ऑक्टोबर १९०८ मध्ये सुरुवात झाली. आणि २० सप्टेंबर, १९०९ रोजी संविधानाची परिणती कायद्यात झाली. एक वर्षाच्या परिश्रमात हे घडून आले आहे.

हे खरे आहे की, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या सभेने घेतलेल्या कालावधीपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला. परंतु कॅनडाच्या संविधान सभेपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला नाही आणि ऑस्ट्रेलियाच्या सभेपेक्षा खूपच कमी वेळ घेतला आहे. कोणी किती वेळ घेतला याची तुलना करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांची संविधाने आपल्यापेक्षा फारच लहान आहेत. मी सांगितल्याप्रमाणे, आपल्या संविधानात ३९५ परिच्छेद आहेत तर अमेरिकन संविधानात केवळ ७ आहेत. त्यातील पहिल्या चार अनुच्छेदांची विभागणी २१ उपविभागात झाली आहे. कॅनडाच्या संविधानात १४७, ऑस्ट्रेलियाच्या संविधानात १२८ आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधानात १५३ अनुच्छेद आहेत. दुसरी लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी की, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मात्यांना संविधान दुरुस्तीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. सादर करण्यात आलेल्या स्वरुपातच त्या संमत झाल्या. दुसरीकडे आपल्या संविधान सभेला २,४७३ दुरुस्त्यांचा विचार करावा लागला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता दिरंगाईचा आरोप मला बराचसा निराधार वाटतो आणि इतके कठीण काम इतक्या अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या सभेने स्वतःचे अभिनंदन केल्यास काही वावगे होणार नाही.

मसुदा समितीने केलेल्या कामाच्या दर्जाकडे पाहाताना **श्री. नाझीरुद्दीन अहमद** यांना ती पूर्णतया नाकारणे हे आपले कर्तव्य आहे असे वाटते. त्यांच्या मते मसुदा समितीने केलेले कार्य हे केवळ नाकारण्यायोग्यच आहे असे नव्हे तर ते निश्चितपणे त्याहीपेक्षा खालच्या दर्जाचे आहे. मसुदा समितीने केलेल्या कार्याबद्दल स्वतःचे मत व्यक्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे आणि श्री. नाझीरुद्दीन यांनाही आहे. मसुदा समितीच्या कोणत्याही सभासदापेक्षा आपण अधिक बुद्धिमान आहोत असे श्री. नाझीरुद्दीन अहमद यांना वाटते. मसुदा समिती त्यांच्या या दाव्याला आव्हान करू इच्छित नाही. याउलट संविधान सभेला ते मसुदा समितीवर नियुक्त करण्याच्या योग्यतेच आहेत असे वाटले असते तर आपल्यात त्यांचे स्वागत करण्यात मसुदा समितीला आनंदच वाटला असता. संविधान निर्मितीच्या योगदानात जर त्यांना काही स्थान मिळाले नाही तर तो निश्चितपणे मसुदा समितीचा दोष नाही.

मसुदा समितीवरील स्वतःचा रोष व्यक्त करण्यासाठी नाझीरुद्दीन अहमद यांनी तिला नवीन नाव दिले आहे. ते मसुदा समितीला भरकटणारी समिती असे म्हणतात. हा टोमणा दिल्याबद्दल नाझीरुद्दीन यांना निश्चितच आनंद होत असेल यात शंका नाही. परंतु त्यांना याची स्पष्ट जाणीव दिसत नाही की अनियंत्रितपणे वाहत जाणे आणि वाहताना नियंत्रण ठेवणे यात फरक आहे. परिस्थितीवर नियंत्रण असल्याशिवाय मसुदा समिती कधीही वाहत गेली नाही. मासा गळाला लागणार नाही अशा ठिकाणी केवळ ती गळ टाकून बसली नव्हती. जो मासा तिला पकडायचा होता, तो ज्या ठिकाणी मिळेल, अशाच ठिकाणी ती पाण्यात गळ टाकून बसली होती. अधिक चांगले शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वाहवत जाणे नव्हे. हे करण्यामागे मसुदा समितीचे अभिनंदन करण्याचा नाझीरुद्दीन अहमद यांचा उद्देश नसला तरी, त्यांनी मसुदा समितीचे अभिनंदन केले आहे असेच मी समजतो. मसुदा समितीने दोषपूर्ण वाटणाऱ्या दुरुस्त्या बाजूला सारुन त्याऐवजी तिला योग्य वाटणाऱ्या दुरुस्त्या स्वीकारण्याचा प्रामाणिकपणा आणि धैर्य जर दाखविले नसते तर ती आपल्या कर्तव्यापासून ढळली व प्रतिष्ठेच्या खोट्या समजाला बळी पडली म्हणून ती दोषी ठरली असती. ही जर चूक असेल तर अशा चुका निःसंकोचपणे मान्य करून त्या दुरुस्त करण्यासाठी मसुदा समितीने पुढाकार घेतला याचा मला आनंद आहे.

एकमेव सदस्याचा अपवाद वगळता संविधान सभेच्या सदस्यांनी मसुदा समितीने केलेल्या कार्याचा गौरवच केला याचा मला आनंद वाटतो. मसुदा समितीने घेतलेल्या परिश्रमाला उस्फूर्तपणे स्वीकारुन त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केल्यामुळे मसुदा समितीला आनंद होईल याची मला खात्री आहे. संविधान सभेचे सदस्य आणि मसुदा समितीचे माझे सहकारी यांनी माझ्यावर जो अभिनंदनाचा वर्षाव केला त्यामुळे मी इतका सद्‌गदित झालो आहे की त्याच्या प्रति माझी कृतज्ञता पूर्णतः व्यक्त करण्यासाठी माझ्याजवळ पुरेसे योग्य शब्द नाहीत. संविधान सभेत येताना अनुसूचित जातींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यापलिकडे माझी दुसरी मोठी आकांक्षा नव्हती. यापेक्षा अधिक जबाबदारीचे कार्य करण्यासाठी मला आमंत्रित करण्यात येईल याची पुसटशी सुद्धा कल्पना मला नव्हती. सभेने मसुदा समितीवर माझी निवड केली तेव्हा मला फार आश्चर्य वाटले. मसुदा समितीने तिच्या अध्यक्षपदी माझी निवड केली तेव्हा तर माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. मसुदा समितीत माझे मित्र सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्यासारखी माझ्यापेक्षा अधिक मोठी चांगली आणि अधिक योग्य माणसे होती. माझ्यावर इतका विश्वास व्यक्त करून आणि जबाबदारी सोपवून त्यांनी माझी निवड केली आणि देशाची सेवा करण्याची मला संधी दिली यासाठी मी संविधान सभा आणि मसुदा समितीच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो (हर्षध्वनी).

मला देण्यात आलेले श्रेय केवळ माझे नाही. संविधान सभेचे घटनात्मक सल्लागार **सर बी.एन. राव** ज्यांनी मसुदा समितीच्या विचारार्थ संविधानाचा कच्चा मसुदा तयार केला, त्यांचाही यात अंशतः वाटा आहे. श्रेयाचा काही वाटा मसुदा समितीच्या सदस्यांचाही आहे. मी सांगितल्याप्रमाणे ही समिती १४१ दिवस कार्यरत होती आणि तिची, नवीन सूत्रे शोधून काढण्याची कल्पकता आणि विचाराच्या विविध मुद्यांना सामवून घेण्याच्या सहनशक्तीशिवाय संविधान निर्मीतीचे हे अवघड कार्य यशस्वीरित्या पूर्णत्त्वास गेले नसते. श्रेयाचा मोठा वाटा संविधानाचा आराखडा तयार करणारे प्रमुख **श्री. एस. एन. मुखर्जी** यांच्याकडेही जातो. गुंतागुंतीच्या प्रस्तावांना सर्वात सोप्या आणि स्पष्ट कायदेशीर स्वरुपात परिवर्तित करण्याची तसेच कठोर परिश्रम घेण्याची त्यांची क्षमता कदाचितच कोणात आढळेल. समितीला लाभलेली ती एक ठेव आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय संविधानाच्या पूर्णत्त्वासाठी सभेला आणखी बरीच वर्षे लागली असती. श्री. मुखर्जी यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा उल्लेख करणे मला टाळताच येणार नाही. किती कठीण काम त्यांनी केले आहे. किती कठोर परिश्रम त्यांनी घेतले आहेत. कधीकधी मध्यरात्रीपर्यंत ते राबले आहेत याची मला जाणीव आहे. त्यांचे प्रयत्न आणि त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचे आभार मानतो (हर्षध्वनी).

संविधान सभा जर विविध घटकांचा विस्कळीत समुदाय राहिली असती तर सिमेंटचा उपयोग न करता तयार केलेला रस्ता, जिथे इकडे काळा दगड तर तिकडे पांढरा दगड याप्रमाणे प्रत्येक सदस्य आणि प्रत्येक गट हा स्वतःतच एक कायदा असता. तर अशा स्थितीत मसुदा समितीला तिचे काम करणे फार अवघड झाले असते. गोंधळाशिवाय त्या ठिकाणी काहीच दिसले नसते. समितीतील काँग्रेस पक्षाच्या या शिस्तीमुळेच मसुदा समितीला संविधानातील प्रत्येक अनुच्छेद आणि प्रत्येक दुरुस्तीच्या भवितव्याची खात्री असल्यामुळे, संविधान सादर करणे सुकर झाले. त्यामुळे मसुदा संविधान सभेमध्ये सुगमरित्या पारित होण्याचे श्रेय काँग्रेस पक्षाला सुद्धा द्यावे लागेल.

जर सर्व सदस्यांनी पक्ष शिस्तीला घट्ट बांधून घेतले असते तर संविधान सभेचे कामकाज खूपच निरस झाले असते. पक्ष शिस्तीच्या ताठरतेमुळे या सभेचं रुपांतर होय बा च्या समुहात झाले असते. सुदैवाने त्यात बंडखोरही होते. त्यात **श्री. कामत, डॉ. पी. एस. देशमुख, श्री. सिधवा, प्रा. सक्सेना आणि पं. ठाकुरदास भार्गव** यांचा समावेश होता. त्यांच्या सोबतच **प्रा. के. टी. शाह आणि पं. हदयनाथ कुंझरु** यांचा उल्लेख मी केलाच पाहिजे. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे बहुधा सैद्धांतिक होते. मी त्यांच्या सूचनांचा स्वीकार करू शकलो नाही याचा अर्थ त्यांच्या सुचनांचे मूल्य कमी होते, समितीच्या कामकाजात जिवंतपणा आणण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व कमी होते, असे नाही. मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्याशिवाय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या स्पष्टीकरणाची संधी मला मिळाली नसती. जी संविधान पारित करण्याच्या तांत्रिक बाबीपेक्षा आधिक महत्त्वाची आहे.

आणि शेवटी अध्यक्ष महोदय, या सभेचे कामकाज ज्या पद्धतीने आपण हाताळले त्यासाठी मी आपले आभार मानायलाच हवे. या सभेच्या कामकाजात ज्या सदस्यांनी भाग घेतला. त्यांना आपण जी आपुलकीची आणि सन्मानाची वागणूक दिली ती कधीही विसरता येणार नाही. मसुदा समितीने आणलेल्या काही दुरुस्त्या केवळ तांत्रिक स्वरुप असण्याच्या आधारावर काही प्रसंगी नाकारण्याचा प्रयत्न झाला. ते क्षण माझ्यासाठी फारच चिंताजनक होते. संविधान निर्मितीच्या कार्याला पराभूत करण्याच्या उद्देशाने पुढे आणलेल्या कायद्याच्या ताठरपणाला आपण परवानगी दिली नाही. यासाठी विशेषत्त्वाने मी आपला आभारी आहे.

संविधानाचे जेवढे समर्थन करता येणे शक्य होते तेवढे माझे मित्र **सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर** आणि **श्री. टी. टी. कृष्णमाचारी अय्यर** यांनी केले आहे. त्यामुळे संविधानाच्या गुणवत्तेविषयीच्या चर्चेत मी शिरु इच्छित नाही. कारण माझ्या मते, संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णतः संविधानाच्या स्वरुपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करून देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वतःच्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते संवैधानिक मार्गाचा अवलंब करतील की क्रांतीकारी मार्गाचा अवलंब करतील? त्यांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज नाही. आणि म्हणून भारतीय लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल.

साम्यवादी पक्ष आणि समाजवादी पक्ष या दोन घटकांकडून संविधानावर मोठया प्रमाणात नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. ते संविधानाच्या प्रती नापसंती का व्यक्त करतात? खरोखर संविधान वाईट आहे म्हणून ते नापसंती व्यक्त करतात काय? निश्चितपणे नाही असे मी म्हणतो. साम्यवादी पक्षाला कामगारांच्या हुकुमशाही तत्त्वांवर आधारलेले संविधान हवे आहे. हे संविधान सांसदीय लोकशाहीवर आधारित असल्यामुळे ते संविधानाचा निषेध करतात. समाजवाद्यांना दोन गोष्टी हव्या आहेत. पहिली गोष्ट त्यांना हवी आहे ती अशी की, ते जर सत्तारुढ झाले तर मोबदला न देता खाजगी संपत्तीचे राष्ट्रीयीकरण किंवा सामाजीकरण करण्याचे संविधानाने

त्यांना स्वातंत्र्य दिलेच पाहिजे. समाजवाद्यांना पाहिजे असलेली दुसरी गोष्ट अशी की, संविधानातील मुलभूत अधिकार निरपेक्ष आणि कोणत्याही निर्बंधाशिवाय असावे जेणेकरुन त्यांच्या पक्षाला सत्ता प्राप्त करण्यात अपयश आले तर, केवळ अनिर्बंध टीका करण्याचेच नव्हे तर राज्य उलथून पाडण्याचेही स्वातंत्र्य त्यांना हवे आहेत.

प्रामुख्याने या दोन कारणांमुळे संविधानावर टीका करण्यात येत आहे. संसदीय लोकशाहीचे तत्त्व हाच केवळ राजकीय लोकशाहीचा आदर्श प्रकार आहे असे मी मानत नाही. मोबदला न देता खाजगी संपत्ती ताब्यात घेण्याचे तत्त्व इतके पवित्र आहे की, त्यापासून फारकतच घेता येत नाही असे मी म्हणत नाही. मुलभूत अधिकार हे कधीही अनिर्बंध असू शकत नाहीत आणि त्यावर घातलेले निर्बंध केंव्हाही उठविता येत नाहीत, असेही मी म्हणत नाही. मला सांगायचे ते हे की, संविधानातील अंतर्भुत मते ही आजच्या पिढीची आहेत किंवा प्रस्तुत विधान जर तुम्हाला अतिशयोक्तीपूर्ण वाटत असेल तर मी म्हणेन की, संविधान सभेच्या सभासदाची ती मते आहेत. संविधानात त्यांचा अंतर्भाव केल्याबद्दल मसुदा समितीला, दोष का देण्यात यावा? मी म्हणतो की, संविधान सभेच्या सभासदांवर सुद्धा हे दोषारोपण का करण्यात यावे? अमेरिकेच्या संविधान निर्मिती प्रक्रियेत अतिशय महत्त्वाची भुमिका बजावणारा अमेरिकेतील मुत्सद्दी जेफरसन, यांनी काही भारदस्त, अतिमहत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. जे संविधान निर्मात्यांना कधीही नजरेआड करणे परवडण्यासारखे नाही. एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, ते असे की : "प्रत्येक पिढी, बहुसंख्यांकाच्या इच्छेप्रमाणे स्वताःला बांधून घेण्याचा अधिकार असलेल्या एका स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे आहे. येणाऱ्या पिढीला कोणी बंदिस्त करु शकत नाही, जसे दुसऱ्या राष्ट्रातील लोकांना करता येत नाही."

दुसऱ्या एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, ते असे की : "देशहितासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना स्पर्श करता येणार नाही किंवा त्यात फेरबदल करता येणार नाही. त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना उत्तरदायी धरता येणार नाही कारण लोकांच्या हिताची जबाबदारी विश्वस्तपणे ज्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी त्यांना काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत. कदाचित सत्तेचा दुरुपयोग करणारा राज्यशाहीविरुद्ध हे परिणामकारक प्रावधान असू शकेल परंतु ही कल्पना राष्ट्राच्या दृष्टीने मात्र अतिशय असंमजसपणाची आहे. तरी आपले कायदेपंडीत आणि धर्मगुरु हे तत्त्व सामान्यतया बिंबविण्याचा प्रयत्न करतात आणि समजतात की, आपली मागची पिढी आपल्यापेक्षा अधिक मुक्तपणे भूतलावर वावरत होती. आपल्याला बदल करता येणार नाही असे अपरिवर्तनीय कायदे लादण्याचा तिला अधिकार होता. त्याचप्रमाणे भावी पिढीला बदलविता येणार नाही असे कायदे आपण केले आणि ते भावी पिढीवर लादले तर वास्तवात हे जग मेलेल्यांचे असेल. जिवंत लोकांचे असणार नाही."

जेफरसनने जे सांगितले आहे, ते केवळ सत्यच नाही तर ते निखळ सत्य आहे, हे मी मान्य करतो. त्याबद्दल दुमत होऊ शकत नाही. जेफरसनने सांगितलेल्या तत्त्वाकडे संविधान सभेने पाठ फिरविली असती तर तिच्यावर निश्चितपणे दोषारोपण करता आले असते, निषेधसुद्धा करता आला असता. परंतु मी विचारतो, असे आहे का ? वस्तुस्थिती याउलट आहे. एखाद्याने केवळ संविधान दुरुस्ती प्रावधानाचाच पडताळा घ्यावा. कॅनडाचा संविधानात दुरुस्ती करण्याचा लोकांचा अधिकार जसा नाकारला गेला आहे तसे संविधान सभेने आपल्या संविधानात

अंतिमतेचे आणि बिनचुकतेचे शिक्कामोर्तब केलेले नाही किंवा अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाप्रमाणे घटना दुरुस्ती असाधारण शर्ती आणि अटींच्या पूर्ततेवर अवलंबून ठेवला नाही. याउलट संविधान दुरुस्तीसाठी आपल्या संविधान सभेने अतीशय सुलभ पद्धतीची तरतूद केली आहे. संविधानावर टीका करण्याऱ्या कोणत्याही टीकाकाराला मी असे आव्हान देतो की, आपल्यासारखी अवस्था असणाऱ्या, जगातील कोणत्याही देशाच्या संविधान सभेने दुरुस्तीसाठी असे प्रावधान केल्याचे सिद्ध करावे. संविधानाप्रति असंतुष्ट असणाऱ्यांना केवळ २/३ बहुमत प्राप्त करावे लागेल आणि प्रौढ मतदान पद्धतीने निवडलेल्या संसदेत त्यांच्या बाजूने २/३ बहुमतही ते प्राप्त करु शकत नसतील तर संविधानावरील त्यांचा असंतोष हा सर्वसाधारण जनतेचा असंतोष आहे असे मानता येणार नाही.

संविधानाशी संबंधित अशा एका महत्त्वपूर्ण मुद्याच्या संदर्भात मी आता बोलू इच्छितो सत्तेचे वाजवीपेक्षा जास्त केंद्रीकरण करण्यात आले असून प्रांतांना नगरपरिषदांच्या पातळीवर आणले आहे अशी एक गंभीर तक्रार करण्यात येते. हे स्पष्ट आहे की, हा दृष्टिकोन केवळ अतिशयोक्तीपूर्णच आहे असे नव्हे तर संविधानाला नेमके काय घडवून आणायचे आहे याबाबतच्या गैरसमजावर तो आधारलेला आहे. केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध लक्षात घेण्यासाठी ज्या मूलभूत तत्त्वांवर ते आधारित असतात ते लक्षात घेणे आवश्यक आहे. संघराज्यतत्त्वाचे मूलभूत तत्त्व असे आहे की, विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्या सत्तेची केंद्र आणि राज्यातील विभागणी ही केन्द्राच्या कोणत्या कायद्यानी करावयाची नसून ती संविधानानेच केलेली असते. आपल्या संविधानांतर्गत केलेली असते. संविधान हेच करीत असते. आपल्या संविधानांतर्गत असणारी राज्य त्यांच्या विधिविषयक किंवा कार्यकारी अधिकारांसाठी कोणत्याही प्रकारे केंद्रावर अवलंबून नाहीत. या संदर्भात केंद्र आणि राज्ये समान पातळीवर आहेत. अशा संविधानाला केंद्रीभूत म्हणण्यात यावे हे समजणे अवघड आहे. असे असू शकेल की, दुसऱ्या कोणत्याही संघराज्य संविधानात आढळणार नाही इतके, विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळाचे व्यापक क्षेत्र, संविधानाने केंन्द्राला दिलेले आहे. असेही शक्य असू शकेल की, शेषाधिकार राज्यांना न देता केंद्राला देण्यात आले आहेत. परंतु ही वैशिष्ट्ये म्हणजे संघराज्याची मूलतत्त्वे नव्हेत. मी सांगितल्याप्रमाणे संघराज्याची प्रमुख ओळख म्हणजे केंद्र आणि घटकांमध्ये विधीमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या सत्तेची संविधानाने केलेली विभागणी होय. हे तत्त्व आपल्या संविधानात अंतर्भूत आहे. याबाबत कोणतीही चूक असू शकत नाही. म्हणून राज्यांना केंद्राच्या अधिकारात ठेवण्यात आले आहे, असे म्हणणे चुकीचे होईल. या विभागणीची सीमा केंद्राला स्वतःच्या इच्छेने बदलविता येणार नाही. न्यायपालिकेला सुद्धा नाही. यासंदर्भात असे योग्यच म्हटले गेले आहे की,

"न्यायालयांना सुधारणा करता येईल. पण एकाच्या जागी दुसरे आणता येणार नाही. जुन्या अन्वयार्थात सुधारणा घडवून नवीन युक्तिवाद ते करू शकतील. नवीन दृष्टिकोन पुढे ठेवता येतील. अल्पमताच्या फरकाने दिलेले निर्णय ते बदलवू शकतात परंतु त्यांना पार करता येणार नाहीत. अशा सीमारेषा आहेत. अधिकाराच्या निश्चित वाटपात ते नव्याने फेरबदल करू शकत नाहीत. अस्तित्त्वात असलेल्या अधिकाराची व्याप्ती ते वाढवू शकतील, पंरतु एका सत्तेला दिलेला अधिकार निःसंशयपणे दुसऱ्याला देता येणार नाही."

संघीय पद्धतीला पराभूत करणारा केंद्रीकरणाचा हा पहिला आरोप निश्चितच निष्प्रभ ठरतो.

दुसरा आरोप असा की, राज्यावर कुरघोडी करण्याचा केन्द्राला अधिकार देण्यात आला आहे. हा आरोप मान्य केलाच पाहिजे. परंतु अशा कुरघोडी करण्याच्या अधिकारांच्या तरतुदी असल्यामुळे संविधानाचा निषेध करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात घेतल्याच पाहिजे. त्यापैकी पहिली गोष्ट अशी की, कुरघोडी करण्याचे अधिकार संविधानाच्या सर्वसाधारण वैशिष्ट्यांचा भाग नाहीत. त्यांचा उपयोग आणि अंमल निःसंदिग्धपणे आणीबाणीच्या काळापुरताच सीमित ठेवला आहे. दुसरी विचारात घेण्याची बाब अशी की, आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर कुरघोडी करण्याचे अधिकार केंद्राला देण्याचे आपण टाळू शकतो का? आणीबाणीच्या काळातसुद्धा असे कुरघोडीचे अधिकार केंन्द्राला असण्याचे समर्थन ज्यांना मान्य नाही, त्यांना या विषयाच्या मुळाशी असलेल्या समस्येची स्पष्ट कल्पना दिसत नाही. "द राऊंड टेबल" या प्रसिद्ध मासिकाच्या डिसेंबर, १९३५ च्या अंकात ही समस्या एका लेखकाने इतक्या स्पष्टपणे विशद केली आहे की त्यातील काही भाग उद्‌घृत करण्यासाठी मला दिलगिरी व्यक्त करण्याची गरज वाटत नाही. लेखक म्हणतो :

> "राजकीय व्यवस्था या अधिकार आणि कर्तव्ये यांच्यातील गुंतागुंत असून, जी अंतिमतः नागरिकांनी कुणाच्या किंवा कोणत्या सत्तेच्या प्रति आपली निष्ठा व्यक्त करावी, या प्रश्नाशी निगडित असते. सामान्य परिस्थितीत हा प्रश्न निर्माण होत नाही. कायदा सुरळीतपणे अंमलात येत असतो. एका क्षेत्रात एका सत्तेचा तर दुसऱ्या क्षेत्रात दुसऱ्या सत्तेचा आदेश मानून माणूस आपले व्यवहार करीत असतो. पंरतु संकटसमयी कुणाचा आदेश मानायचा याबाबत संघर्ष निर्माण होऊ शकतो आणि अशा प्रसंगी मात्र अंतिम निष्ठेचे विभाजन होऊ देता कामा नये हे स्पष्ट आहे. निष्ठेसंबंधीचा निर्णय हा अंतिमतः कायद्याच्या न्यायालयीन अन्वयार्थावर घेता येवू शकणार नाही. कायदा हा वस्तुस्थितीशी सुसंगत असायलाच हवा अन्यथा तो अगदीच निष्प्रभ ठरेल. जेव्हा सर्व शिष्टाचार बाजूला ठेवले जातात. त्यावेळी उघड प्रश्न असा की नागरिकांच्या शेष निष्ठेवर कुणाची सत्ता असावी, केंद्राची की घटकराज्यांची ?"

या समस्येवरील उपाय या प्रश्नाचे उत्तर कोण कसे देतो यावर अवलंबून असून तोच खरा प्रश्न आहे. आणीबाणीच्या प्रसंगी नागरिकांची शेष निष्ठा ही घटक राज्यांसोबत न राहता केंद्रासोबत असावी. बहुसंख्य लोक या मताचे असतात याबद्दल शंका असू नये. कारण सामाईक उद्दिष्टपुर्तीसाठी आणि देशाच्या एकूणच हितसंबधांच्या जपणुकीसाठी केंद्र सरकारच कार्यरत असते. यासाठीच आणीबाणीच्या काळात केंद्राला जादा अधिकार देण्याचे समर्थन निहित आहे, आणि सरतेशेवटी आणीबाणीचे अधिकार केंद्राला देण्यामागे राज्यांवर कोणते उत्तरदायित्त्व येते? एवढेच की, आणीबाणीच्या काळात स्वतःचे स्थानिक हितसंबंध जोपासण्यासोबतच, राज्यांनी एकूण राष्ट्राचे मत आणि हितसंबंध विचारात घ्यावे. ही समस्या ज्यांना नीटपणे कळलेली नाही तेच याविरूद्ध तक्रार करतील.

याठिकाणी मी माझे भाषण संपविले असते, परंतु माझे मन देशाच्या भवितव्याबाबत इतके चिंताग्रस्त आहे की, त्यासंबंधातील माझी मते व्यक्त करण्यासाठी या प्रसंगाचा मी उपयोग करावा असे मला वाटते. २६ जानेवारी, १९५० ला भारत एक स्वतंत्र राष्ट्र होईल (हर्षोल्लास). त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेविल की पुन्हा गमावून बसेल? हा विचार माझ्या मनात प्रथम उभा राहतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की त्याने असलेले स्वातंत्र्य एकदा गमावले आहे. तो पुन्हा दुसऱ्यांदा ते गमाविल का? भवितव्याबाबतचा हाच विचार मला सर्वाधिक चिंताग्रस्त करतो. भूतकाळात भारताने केवळ आपले स्वातंत्र्य गमावले असे नव्हे तर ते देशातील काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले

गेले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते. महम्मद बीन कासीमने सिंध प्रांतावर आक्रमण केले त्यावेळी दहार राजाच्या सैनिक अधिकाऱ्यांनी महम्मद बीन कासीमच्या हस्तकांकडून लाचा स्वीकारल्या आणि आपल्या राजाच्या बाजुने लढण्याचे नाकारले. महम्मद घोरीला भारतावर आक्रमण करण्याचे निमंत्रण देणारा जयचंद होता. आणि त्याने त्याला पृथ्वीराज विरूद्ध लढण्यासाठी स्वत:च्या आणि सोळंकी राजांच्या मदतीचे आश्वासन दिले. जेव्हा शिवाजी हिंदुंच्या मुक्तीसाठी लढत होता त्यावेळी इतर मराठा सरदार आणि रजपूत राजे मोगल सम्राटांच्या बाजुने युद्ध लढत होते. जेव्हा शीख राज्यकर्त्यांचा नि:पात करण्याचा प्रयत्न इंग्रज करीत होते तेव्हा त्यांचा प्रमुख सेनापती गुलाबसिंग शांत बसला आणि शिखांचे राज्य वाचविण्यासाठी त्याने शिखांना मदत केली नाही. १८५७ ला भारतातील बहुतांश भागांनी इंग्रजांच्या विरूद्ध स्वातंत्र्ययुद्धाची घोषणा केली. तेंव्हा शीख बघ्याच्या भूमिकेतून त्या घटनेकडे पाहात राहिले.

इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रुंसोबतच भिन्न आणि परस्पराविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. ह्या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की, देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहित नाही. परंतु एवढे मात्र निश्चित की, जर पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले. तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही, आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरूद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे (हर्षध्वनी).

२६ जानेवारी, १९५० ला भारत एक लोकसत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल. तोच विचार माझ्या मनात येतो, ह्या लोकसत्ताक संविधानाचे काय होणार? हा देश ते अबाधित ठेवण्यासाठी समर्थ राहील की पुन्हा तो ते गमावून बसेल. माझ्या मनात येणारा हा दुसरा विचार आहे, आणि पहिल्याप्रमाणेच तो मला चिंतातूर करणारा आहे.

भारताला लोकशाही म्हणजे काय हे माहित नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता आणि जिथे कुठे राजेशाही असेलच तर ती एकतर निवडलेली किंवा सीमित असायची. त्या प्रणाली कधीही अनिर्बंध नव्हत्या. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे संघ हे दुसरे काही नसून संसदच होते तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादिबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधीमंडळाच्या नियमावधीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत.

ही लोकसत्ताक पद्धती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमावणार काय? मला माहित नाही. परंतु भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की, लोकशाही प्रदीर्घकाळापर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे. जिथे लोकशाही हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरूप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.

केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्त्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णतः दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपुर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते "लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्यांच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्यांच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणे करून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील." संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओ कॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, 'कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणतीही स्त्री स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही. कोणतीही स्त्री स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही." इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्त किंवा व्यक्तीपूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी की, केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे. जो स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे

म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्त्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. तो त्रयीचा एक संघ निर्माण करतात. ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्त्व निर्माण करणे होय. स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्त्वाला मारक ठरेल. बंधुत्त्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्त्वात राहाणार नाहीत. त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णतः अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करूनच आपण सुरूवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्राला आपला भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी, १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील. परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारीत राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्त्वाचे तत्त्व मान्य करणे ही होय. बंधुत्त्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्त्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्त्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करून देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे. हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांगितलेल्या गोष्टीवरून कळून येईल.

ब्राईसच्याच शब्दात मी उद्‌घृत करू इच्छितो. ती घटना अशी "काही वर्षापूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रैवार्षिक अधिवेशनात त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करून त्यात सर्व लोकांसाठी असलेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यु इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले, हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशिर्वाद दे उत्स्फुर्तपणे ते त्या दिवशी मान्य करण्यात आले. या वाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला धर्मपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी ' राष्ट्र ' या शब्दावर आक्षेप घेतले, त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे तो शब्द गाळण्यात आला आणि ' हे प्रभो या संयुक्त राज्यांना आशिर्वाद दे ' या शब्दांचा स्वीकार करण्यात आला.

ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्त्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते, जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना " भारतीय लोक " या शब्दाची चीड येत असे. 'भारतीय राष्ट्र' म्हणणे ते पसंत करीत असत. मी या मताचा आहे की, आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्त्वात नाही ते अस्तित्त्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल, त्यानंतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचे महत्त्व आम्हाला कळेल आणि आमच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणत्या मार्गाचा आणि उपायांचा अवलंब करावा याचा आम्ही गांभीर्याने विचार करू शकू.

या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे, अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट, त्या समाजजीवनात विभागणी करतात त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातींमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्त्व वास्तवात पाहवयास मिळेल. बंधुत्त्वाशिवाय असलेली समता आणि स्वतंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरासारखा केवळ बाह्य देखावा असेल.

आपल्यासमोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना त्या कदाचित फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात राजकीय सत्ता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्यस्थानी असलेले प्राणी झाले आहेत. हे कोणालाही नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधीपासूनच वंचित ठेवले असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्त्वही कळणार नाही इतका त्यांचा निःपात केला आहे. हे पददलित वर्ग त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वतःच राज्य करण्यासाठी ते आतूर झाले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुद्ध होण्याइतपत वाढू देता कामा नये. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. तो निश्चितपणे विनाशकारी दिवस असेल. अब्राहम लिंकन यांनी समर्पकरित्या म्हटल्याप्रमाणे, दुभंगलेले घर अधिक काळपर्यंत टिकू शकत नाही. त्यांच्या आकांक्षाच्या पूर्तीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करून देता येईल तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे. त्यांच्या स्वतंत्र्याच्या रक्षणार्थ आणि त्याच्या लोकसत्ताक संरचना टिकून राहण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बुंधुत्त्व प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे. त्यामुळेच त्यांच्यावर मी इतका भर दिला आहे.

मी सभागृहाला अधिक थकवू इच्छित नाही. स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. अनुचित घटना

घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे. आपले लोक सुद्धा नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत. लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येवू लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे. आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पहिजेत की जेणेकरून लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधन्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही. "

(संदर्भ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग-३, १९४६ ते १९५६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, सन २००२.)

*****

प्रकरण दुसरे

महाराष्ट्र विधानसभेचा थोडक्यात इतिहास

पार्श्वभूमी :—

महाराष्ट्र विधिमंडळाला देशात आगळी-वेगळी अशी प्रतिष्ठा लाभली आहे. अनेकविध क्षेत्रांत देशपातळीवर नेतृत्त्व देणारे नेते या विधानमंडळाने राष्ट्राला दिले आहेत. या नेत्यांनी संसदीय लोकशाही आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणाद्वारे सबळ प्रशासनाचा वस्तुपाठ इतरांना घालून दिला आहे आणि त्यायोगे अनेक उत्तम परंपरा, संकेत व आदर्श निर्माण केले आहेत.

भूतपूर्व मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक दिनांक २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉर्ज रसेल क्लार्क हे त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

१८६२ ते १९३७ या पंच्याहत्तर वर्षाच्या विधानमंडळाच्या प्रदीर्घ वाटचालीत सर्वश्री जगन्नाथ ऊर्फ नाना शंकर शेठ, जमशेदजी जीजीभॉय, सर माधवराव विंचुरकर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, नेक नामदार गोपाळ कृष्ण गोखले व डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर असे दिग्गज सन्माननीय सदस्य म्हणून लाभले, ज्यांनी आपल्या महान कर्तृत्त्वाने आणि सर्वंकष कामगिरीने या विधानमंडळाला उच्चस्तर व तहहयात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

भारताच्या घटनात्मक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Govt. of India Act, 1935) अस्तित्त्वात आला, ज्यात संघराज्यात्मक शासन पद्धती (Federal form of Govt.) स्वीकारण्यात आली होती. तसेच, प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती. या कायद्यान्वये विधानसभा व विधानपरिषद असे नामाभिधान देऊन दोन सभागृहे मुंबई प्रांतात, १९३७ मध्ये अस्तित्त्वात आली.

विधानसभेचे पहिले अधिवेशन :—

१९३५ च्या कायद्यानुसार जुलै, १९३७ मध्ये १७५ सदस्य असलेली विधानसभा [*मतदारसंघ :- सर्वसामान्य-११५, मुस्लीम-२९, महिला-०६, ॲंग्लो-इंडियन-०२, युरोपीयन-०३, भारतीय ख्रिश्चन-०३, व्यापार व उद्योग यांच्या संस्था-०७, जमीनदार-०२, कामगार संघ-०७, विद्यापीठ (त्या वेळी फक्त मुंबई विद्यापीठच होते.)-०१ यातील सर्वसामान्य जागांपैकी १५ जागा अनुसुचित जाती, ०७ जागा मराठा व एक जागा आदिवासी यांच्यासाठी राखीव होती.*] प्रथमतः अस्तित्त्वात आली. मतदानाचा अधिकार २१ वर्षांवरील व्यक्तीला जरी होता, तरी ती व्यक्ती या नियमाखाली दिलेले कर, भाडे, शेतसारा इ. भरणारी व कमीत कमी व्हर्‌नॅक्युलर फायनल पर्यंत तरी शिकलेली असावी अशी अट होती. पुण्याच्या गणेशखिंडीवर असलेल्या 'गव्हर्नरस् हाऊस' येथे बाळासाहेब खेर व मंत्रीमंडळातील ०६ सदस्यांचा शपथविधी दिनांक १९ जुलै, १९३७ रोजी पार पडला. शपथविधी झाल्यानंतर मंत्रीमंडळाचे सर्व सदस्य कॉंग्रेस कचेरीत आले व तेथे त्यांनी तिरंगी ध्वजाला प्रथम मानवंदना दिली. विधानसभेचे

पहिले अधिवेशन १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले होते. गव्हर्नर यांनी रावबहादूर गणेश कृष्ण चितळे यांची हंगामी स्पीकर *(Protem Speaker)* म्हणून नियुक्ती केली होती. मंत्रीमंडळाच्या सदस्यांना मिरवणुकीने कौन्सिल हॉलवर आणले गेले. त्या दिवशी पुण्यातील कौन्सिल हॉलला जाहीरसभेचे स्वरुप प्राप्त झाले होते. लोकांच्या उत्साहाला उधाण आले होते. विधिमंडळाच्या कामकाजाची शिस्त व संकेत मोडले जात होते. शेकडो प्रेक्षकांनी सभागृहात प्रवेश मिळविला होता. तर, प्रचंड जनसमुदाय सभागृहाबाहेर जमला होता. या ऐतिहासिक व अभूतपूर्व प्रसंगाचे चित्रीकरण " प्रभात फिल्म " या कंपनीने केले होते. दिनांक १९ व २० जुलै, १९३७ रोजी सदस्यांचा शपथविधी पार पाडला. विधानसभेच्या अध्यक्षांची तसेच उपाध्यक्षांची निवड दिनांक २१ जुलै, १९३७ रोजी झाली. गणेश वासुदेव मावळंकर आणि नारायण गरुराव जोशी हे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून अविरोध निवडून आले. सदस्यांनी शपथ घेतल्यानंतरही स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग सदस्यांनी स्वीकारला होता. त्या दिवशी सर्व सदस्यांनी " वंदे मातरम् " गंभीर वातावरणात गायिले. तो क्षण स्वातंत्र्याच्या ऊर्मीचा विलोभनीय असा अविष्कार होता. या महत्त्वाच्या घटनेचे औचित्य साधून १९८८ साली विधानसभेचा सुवर्ण महोत्सव तर सन २०१२ मध्ये अमृत महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. बाळासाहेब खेर यांनी भारतीयांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आणि राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती स्थापन करण्याचा पहिला ऐतिहासिक ठराव २१ सप्टेंबर, १९३७ रोजी मांडला व तो एकमताने संमत करण्यात आला.

विधानसभेतील महत्त्वाच्या घटना :—

विधानसभेत २१ सप्टेंबर, १९३७ रोजी घटना समितीचा ठराव मांडण्यात आला. तसेच २५ ऑक्टोबर, १९३९ रोजी भारतीय जनतेला विश्वासात न घेता ब्रिटीश सरकारने भारताला युद्ध राष्ट्र म्हणून घोषीत केले, याचा निषेध ठराव मांडण्यात आला. नोव्हेंबर, १९३९ मध्ये ब्रिटिश शासनाच्या या धोरणाच्या निषेधार्थ मंत्रीमंडळाने राजीनामा दिल्यामुळे जवळजवळ सहा वर्षे विधानसभा अस्तित्त्वात नव्हती. यामुळे १९३५ च्या कायद्यातील ६३ कलमाखाली राज्यपालांचे अधिराज्य येथे होते. दिनांक १७ ऑगस्ट, १९३७ रोजी अर्थ मंत्री, अण्णासाहेब लठ्ठे यांनी पहिला अर्थसंकल्प सादर केला. तसेच १९ ऑक्टोबर, १९४८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सदस्यांना उद्देशून गव्हर्नर राजा महाराजा सिंह यांनी पहिले अभिभाषण केले. विधानमंडळाच्या इतिहासातील हे पहिलेच अभिभाषण होय. औद्योगिक संबंधाविषयीचा कायदा *(Industrial Relation Act.)* यावरील विधेयकाच्या चर्चेच्या वेळी सुप्रसिद्ध कामगार नेते भाई श्रीपाद अमृत डांगे यांनी जवळजवळ सहा तास भाषण करून एक ऐतिहासिक विक्रम केला. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ०६ ऑक्टोबर, १९४९ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉल मध्ये एका खास अधिवेशनात विधानमंडळाच्या सदस्यांना उद्देशून भाषण केले. हा एक अभूतपूर्व असाच प्रसंग म्हटला पाहिजे. कारण देशाच्या पंतप्रधानांनी कोणत्याही राज्याच्या विधानमंडळ सदस्यांना उद्देशून भाषण करण्याचा हा देशाच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग होता. यावेळी विधानमंडळाची खास बैठक रात्रौ १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. पंतप्रधानांचे भाषण रात्रौ ११.४० वाजता संपल्यानंतर ही खास बैठक स्थगित करण्यात आली. विधानसभेची नियमित बैठक त्या दिवशी सकाळी ०८.०० ते १०.३० वाजेपर्यंत भरली होती.

स्वातंत्र्य मिळाल्यावर पहिले अधिवेशन १० सप्टेंबर, १९४७ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्ये सुरू झाले. सदस्यांना पुन्हा शपथ घ्यावी लागली कारण पूर्वी घेतलेली शपथ ही इंग्लंडच्या राजाला तसेच भारताच्या बादशहाला उद्देशून होती व आता सर्वांनी स्वतंत्र भारताला उद्देशून शपथ घेतली. भारतीय राज्यघटना दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आल्यावर विधानसभेचे पहिले अधिवेशन दिनांक १७ फेब्रुवारी, १९५० रोजी सुरू झाले. यावेळी सुद्धा सदस्यांना स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागली. १९४६ च्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांना अशाप्रकारे एकूण तीन वेळा सदस्यत्वाची शपथ घ्यावी लागली.

भारतीय राज्यघटना २६ जानेवारी, १९५० रोजी अंमलात आल्यानंतर घटनेतील तरतुदीप्रमाणे विधानसभा अस्तित्त्वात आली. घटनेच्या अनुच्छेद १७० मध्ये विधानसभेच्या रचनेसंबंधी तरतुदी आहेत. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य विधानसभा, राज्य पुनर्रचनेनंतर १९५७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तत्कालीन मुंबई राज्य द्विभाषिक विधानसभा व मुंबई राज्य पुनर्रचनेनंतर १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतरची महाराष्ट्र राज्याची पहिली विधानसभा अस्तित्त्वात आली. त्यानंतर १९६२, १९६७, १९७२, १९७८, १९८०, १९८५, १९९०, १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४ व नुकत्याच पार पडलेल्या २०१९ च्या निवडणूकीत चौदावी महाराष्ट्र विधानसभा अस्तित्त्वात आली आहे. (भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये १७ फेब्रुवारी ते ९ जून, १९८० व २८ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर, २०१४ तसेच १२ ते २३ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीमध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.)

महाराष्ट्रातील विधान भवने

पुणे येथील विधान भवन :—

१९३५ च्या कायद्यान्वये निर्माण झालेल्या विधानसभेचे पहिले अधिवेशन दिनांक १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील १८७० मध्ये बांधलेल्या कौन्सिल हॉलमध्ये भरले होते व स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे पहिले अधिवेशन दिनांक १० सप्टेंबर, १९४७ रोजी पुण्याच्या कौन्सिल हॉलमध्येच भरले होते. भारताची राज्यघटना अंमलात आल्यावर जानेवारी, १९५२ मध्ये विधानसभेच्या प्रौढ मतदानाद्वारे ३१६ जागांसाठी प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या. या नवीन विधानसभेचे अधिवेशन मात्र दिनांक ३ मे, १९५२ रोजी सुरू झाले. नवीन विधानसभेच्या अधिवेशनाच्या आधी १५ ते ३१ जानेवारी, १९५२ पर्यंत जुन्या विधानसभेचेच अधिवेशन झाले. सन १९३८ मध्ये दिनांक १७ ऑगस्ट ते १७ नोव्हेंबर, १९३८ या कालावधीत चार महिने चाललेले अधिवेशन ६२ दिवसांचे झाले. यात ३६९ तास ४५ मिनिटे कामकाज झाले. एवढे प्रदीर्घ काळ चाललेले अधिवेशन हे विधानमंडळाच्या आजवरच्या इतिहासातील पहिलेच अधिवशेन आहे. पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये १९३७ ते १९५५ पर्यंत विधानसभेची एकूण १३ अधिवेशने झाली. त्यानंतर नागपूर करारातील तरतुदीनुसार नागपूर येथील विधान भवनात १९६० पासून दरवर्षी हिवाळी अधिवेशन घेतले जाते व १९६२-६३ चा अपवाद वगळता ते अव्याहतपणे सुरू आहे. सन १९५२-१९५७ या विधानसभेतील पुणे विधानभवनातील शेवटचे अधिवेशन दिनांक १७ ऑगस्ट ते ०१ ऑक्टोबर, १९५५ पर्यंत ३४ दिवसांचे झाले यात १९२ तास ३५ मिनिटे कामकाज झाले. विधिमंडळाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त दिनांक १७ फेब्रुवारी, १९८९ रोजी *(सुवर्ण महोत्सवाचा सांगता समारंभ २१ ऑक्टोबर, १९८९ रोजी झाला.)* व

अमृत महोत्सवाचे औचित्य साधून दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ रोजी चर्चासत्राचे/परिसंवादाचे आयोजन पुणे विधानभवन येथे करण्यात आले होते.

मुंबई येथील जुने विधान भवन :—

मुंबई बंदरामध्ये येणाऱ्या जहाजांवरील खलाशांसाठी बांधण्यात येणाऱ्या " रॉयल अल्फ्रेड सेलर्स होम " या इमारतीची पायाभरणी तत्कालीन ड्युक ऑफ एडींबरो यांच्या शुभहस्ते १७ मार्च, १८७० रोजी करण्यात येऊन या इमारतीचे उद्घाटन भारताचे तत्कालीन व्हॉइसराय लॉर्ड लेटॉन यांच्या शुभहस्ते १८७६ मध्ये करण्यात आले. मुंबई येथील जुन्या विधान भवनाची इमारत १८७६ साली दर्यावर्दी लोकांच्या उपयोगासाठी " खलाशीगृह " म्हणून बांधण्यात आली होती. जून, १९२८ मध्ये शासनाने हे खलाशीगृह समितीला रुपये ४,४४,३७५/- इतकी रक्कम अदा करून ताब्यात घेतले. सदर इमारतीमध्ये आवश्यक असलेल्या बदलांसाठी रुपये २,५९,८८९/- इतकी रक्कम खर्च करून त्याचे विधान भवनात रुपांतर करण्यात आले. दिनांक १८ फेब्रुवारी, १९२९ रोजी मुंबईचे तत्कालीन राज्यपाल मेजर जनरल सर फेड्रिक साईक यांच्या शुभहस्ते या इमारतीचे उद्घाटन झाले. दिनांक १९ जुलै, १९३७ ते २५ एप्रिल, १९८१ पर्यंत जुन्या विधान भवनात विधानसभेची ७१ अधिवेशने झाली. दिनांक २५ एप्रिल, १९८१ पासून नवीन विधान भवनामध्ये अधिवेशने भरविण्यात येऊ लागली.

जुने विधान भवन - मुंबई

कौन्सिल हॉल - पुणे

मुंबई येथील जुने विधान भवनाचे छायाचित्रपुणे येथील कौन्सिल हॉलचे छायाचित्र

मुंबई येथील नवीन विधान भवन :—

मुंबई येथील नवीन विधान भवन इमारतीचा पायाभरणी समारंभ २७ मे, १९७४ रोजी आयोजित करण्यात आला होता. सर्वंसाधारणपणे १२,९२५ स्क्वे.मी. एवढे क्षेत्र व्यापलेल्या आणि साधारणपणे रुपये १० कोटी इतका खर्च करण्यात आलेल्या, प्रेक्षक गॅलरीसह विधानसभा व विधानपरिषद आणि मध्यवर्ती सभागृह अशी एकूण तीन सभागृहे तसेच मंत्री/राज्यमंत्री यांची दालने असलेली पाच मजल्यांची इमारत आणि वीस मजल्यांची प्रशासकीय इमारत यांचा समावेश असलेल्या या नवीन विधान भवनाच्या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते दिनांक १९ एप्रिल, १९८१ रोजी झाले. ही वास्तू म्हणजे वास्तुशिल्पाचे एक मनोहारी रुप आहे. दिनांक २ मार्च १९८१ रोजी जुन्या विधान भवनामध्ये सुरू झालेले विधानसभेचे अधिवेशन दिनांक २५ एप्रिल, १९८१ पासून नवीन विधान भवनच्या नवीन इमारतीमध्ये सुरू झाले. या नवीन वास्तुमधील विधानसभेची ती पहिली बैठक होय.

नागपूर येथील विधान भवन :—

नागपूर शहर केवळ भौगोलिक कारणामुळेच नव्हे तर सांस्कृतिक, ऐतिहासिक, औद्योगिक, साहित्यिक, राजकीय आणि सामाजिक घडामोडींमुळे अग्रेसर ठरले आहे. सन १८५३ मध्ये ब्रिटीश सरकारने नागपूरकर भोसले यांचे राज्य खालसा करून नागपूर प्रांत घोषित केला. या प्रदेशांचा कारभार पाहण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने कमिशनरची नियुक्ती केली. १८५७ च्या उठावानंतर प्रशासनात मोठे फेरबदल झाले. १८३१ मध्ये नागपूर प्रांताला मध्यप्रांत जोडण्यात आला व नागपूरला मध्यप्रांताची राजधानी करण्यात आली. १९०३ मध्ये मध्यप्रांताला, वऱ्हाड प्रांत जोडण्यात आला आणि त्यानंतर मध्यप्रांत व बेरार (सीपी अँड बेरार) स्थापन झाला. १९३५ च्या कायद्यानुसार विधिमंडळाची निर्मिती झाली. १९५० मध्ये राज्यघटना लागू झाल्यानंतर सीपी अँड बेरार चे नामाभिधान मध्यप्रदेश असे झाले. १९५६ च्या राज्य पुनर्रचनेनुसार ०१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व त्यात विदर्भात प्रांत समाविष्ट करण्यात आला. नागपूर करारानुसार विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला घेण्याबाबत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी धोरणविषयक एक निवेदन सभागृहांना सादर केले. (नागपूर करार– Nagpur Agreement (दिनांक २८ सप्टेंबर, १९५३) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक-१५** मध्ये दर्शविण्यात आली आहे.) त्यासंबंधीच्या प्रस्तावावर विधानपरिषदेत १२ ऑगस्ट, १९६० तर विधानसभेत १७ ऑगस्ट, १९६० रोजी प्रदीर्घ चर्चा झाली आणि वर्षांतून विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे घेण्याचे निश्चित झाले आणि १९६० पासून महाराष्ट्र विधानमंडळाची अधिवेशने नागपूर येथे भरू लागली. [महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनातील बैठकींची एकूण संख्या (सन १९६१ ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक १४** तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचा कालावधी व बैठकींची संख्या (सन १९६० ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक १६** मध्ये दर्शविण्यात आली आहे.] तत्पूर्वी विदर्भ भाग १९५६ पर्यंत मध्यप्रदेश राज्यात समाविष्ट होता व नागपूर हे मध्यप्रदेश राज्याचे राजधानीचे ठिकाण होते.

नागपुरातील अनेक देखण्या पुरातन वास्तुंपैकी एक असलेली, इंग्रजी 'ई' या मुळाक्षराच्या आकारातील सोनेरी सॅन्ड स्टोन, लाल रंगाच्या विटा आणि चुन्याच्या वापरातून निर्माण झालेली विधानभवनाची डौलदार दुमजली जुनी इमारत पूर्वी कौन्सिल हॉल म्हणून ओळखली जात होती. या वास्तुच्या बांधकामाचा पायाभरणी

शुभारंभ चार्लेस बॅरॉन हार्डिंग्ज ऑफ पेन्सहर्स्ट, व्हाईसराय ॲन्ड गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया यांचे शुभहस्ते मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, १९१२ रोजी झाला. इमारतीचे डिझाइन तेव्हांचे प्रसिद्ध वास्तुशिल्पकार थॉमस मॉन्टेक्यू यांनी तयार केले होते. मॉन्टेक्यू यांनीच तयार केलेल्या भारत सरकारच्या दिल्लीतील टेम्पररी कौन्सिल चेम्बरच्या इमारतीवर ते आधारीत होते. १९१६-१७ मध्ये या इमारतीसाठी तेव्हा ५.५० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली होती (सध्या विधान भवन ८.८६ एकर एवढ्या क्षेत्रावर आहे) व यासाठी रुपये ३३,३५० इतकी रक्कम अदा करण्यात आली. विधान भवन इमारतीचे बांधकाम सुरू होते त्याच वेळी थॉमस यांनीच डिझाईन केलेल्या जीपीओ, पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ आणि कृषी प्रयोगशाळा या इमारतींचे सुद्धा बांधकाम सुरू होते. विधान भवन ही इमारत १९१९ मध्ये बांधून पूर्ण करण्यात आली व यासाठी त्यावेळी एकूण रुपये ५,४७,५०८ इतका खर्च आला.

नागपूर येथील कौन्सिल हॉल इमारतीमध्ये तत्कालीन मध्यप्रदेश राज्याच्या विधानसभेची अधिवेशने भरत असत. नागपूरातील उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या उद्घाटनाचा कार्यक्रम ०६ जानेवारी, १९३६ रोजी याच इमारतीत झाला होता तर ३० जुलै, १९३७ मध्ये काँग्रेसचे तत्कालीन नेते डॉ एन.बी.खरे यांच्या शपथविधी सोहळ्याची साक्षीदारसुद्धा ही इमारत आहे. महाराष्ट्र विधानसभेचे पहिले नागपूर अधिवेशन दिनांक १० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर, १९६० या कालावधीत येथे संपन्न झाले होते.

केवळ १२० सदस्य बसण्याची क्षमता असलेले नागपूर येथील पूर्वीचे विधानसभा सभागृह व तात्पुरती बसण्याची सोय असलेले विधानपरिषद सभागृह यामुळे सदस्यांना अडचणी, असुविधा व गैरसोईना तोंड द्यावे लागले तरीही, १९६० सालापासून केवळ १९६२-६३ सालचा अपवाद वगळता (चीन व पाकिस्तान यांनी देशावर आक्रमण केल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती) सातत्याने नागपूर येथे प्रतिवर्षी हिवाळी अधिवेशन घेतले जात आहे. १९९३ मध्ये नागपूर येथील विधान भवनाच्या विस्तारीत इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. ११ डिसेंबर, १९९३ रोजी तत्कालीन दिवंगत राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते या विस्तारीत इमारतीतील नवीन सभागृहाचे उद्घाटन झाले व तेथे विधानसभेच्या बैठका भरू लागल्या व पूर्वीच्या विधानसभा सभागृहात विधानपरिषदेच्या बैठका घेण्यात येऊ लागल्या.

नागपूरमध्ये सदस्यांच्या निवासाकरिता बांधलेल्या प्रशस्त आमदार निवासामुळे सदस्यांची व त्याचबरोबर अन्य अभ्यागतांचीही सोय होऊ शकते. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेमार्फत राज्यातील विद्यापीठांच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयांच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरिता अभ्यासवर्ग दरवर्षी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत घेतला जातो.

महाराष्ट्र विधानमंडळाचा सुवर्ण महोत्सव (Golden Jubilee) :—

महाराष्ट्र विधानसभेने आपल्या कार्याची उज्वल परंपरा उत्तरोत्तर दृढमूल केली आहे. महाराष्ट्र विधानसभेला १९८७ साली ५० वर्षे पूर्ण झाली. विधानसभेचा सुवर्ण महोत्सव समारोह १९८८ साली साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या संसदीय इतिहासातील या अतिशय महत्त्वपूर्ण घटनेचे औचित्य साधून विधानपरिषदेच्या सुवर्णमहोत्सवाच्या पहिल्या कार्यक्रमाचे उद्घाटन तत्कालीन उप राष्ट्रपती मा. श्री. शंकर दयाळ शर्मा यांचे शुभहस्ते दिनांक १८ जानेवारी, १९८८ रोजी झाले. या समारंभास लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष श्री.बलराम जाखड तसेच सलग १८ वर्षे इतक्या दीर्घकाळ विधानपरिषदेच्या सभापतीपदी राहिलेले मा. श्री. वि. स. पागे हे

उपस्थित होते. महाराष्ट्र विधानसभेच्या सुवर्ण महोत्सवाचे उद्घाटन शनिवार, दिनांक ०३ सप्टेंबर, १९८८ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या शुभहस्ते मुंबई येथे झाले. लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बलराम जाखड हे या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून तर महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष म्हणून श्री.शंकरराव जगताप हे उपस्थित होते. या समारंभासाठी भारताच्या सर्व राज्यांतील विधानसभांचे अध्यक्ष/प्रतिनिधी तसेच, केंद्रीय मंत्री, लोकसभेचे अध्यक्ष इ. मान्यवर व नामवंत संसदपटू आवर्जून उपस्थित होते आणि या निमित्ताने संसदीय विषयांवर चर्चा, परिसंवाद इ. आयोजित करण्यात आले होते.

सुवर्ण महोत्सवानिमित्त महाराष्ट्र विधानमंडळाच्या ऐतिहासिक संसदीय परंपरेच्या गौरवशाली महान इतिहासाचा समावेश असलेली स्मरणिका (पूर्वार्ध व उत्तरार्ध) प्रकाशित करण्यात आली होती. महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव समितीने " महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव स्मृति ग्रंथ " भाग १ व २ हा अनमोल संदर्भमूल्य असलेला ग्रंथ सप्टेंबर, १९८८ मध्ये व स्मरणिका ऑक्टोबर, १९८९ मध्ये प्रकाशित केली होती. तसेच, राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने " लोकराज्य " या पाक्षिकाचा दिनांक १६ डिसेंबर, १९८८ चा अंक मराठी व इंग्रजी भाषेमध्ये " विधिमंडळ सुवर्ण महोत्सव विशेषांक " म्हणून प्रसिद्ध केला होता. या सर्व प्रकाशनांद्वारे विधानसभेच्या गौरवशाली इतिहासाची व कर्तृत्त्वशाली परंपरेची माहिती जनतेसमोर सादर केली आहे.

याचबरोबर विधानसभेचे माजी अध्यक्ष व तत्कालीन विद्यमान खासदार मा. श्री. शरद दिघे यांनी लिहिलेल्या " लॉ ऑफ पार्लमेंटरी प्रिव्हीलेजेस " या पुस्तकाचे, विधानमंडळाचे माजी सचिव मा. श्री. एस. एच. बेळवडी यांनी लिहिलेल्या " महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेम्ब्ली फिफ्टी इयर्स (१९३७-८७) इटस् जेनेसिस्, ग्रोथ ॲन्ड वर्क " या पुस्तकाचे व विधानमंडळाचे तत्कालीन सचिव श्री. व्ही. एम. सुब्रमण्यम यांनी लिहिलेल्या " फिफ्टी इयर्स ऑफ लेजिस्लेटिव्ह कौन्सिल ऑफ महाराष्ट्र " या पुस्तकाचे प्रकाशन सुवर्णमहोत्सवानिमित्त करण्यात आले.

महाराष्ट्र विधानमंडळाचा अमृत महोत्सव (Platinum Jubilee) :—

महाराष्ट्र विधीमंडळाला देशात एक आगळी वेगळी प्रतिष्ठा लाभली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आतापर्यंत सर्वच क्षेत्रांत राज्याला याचबरोबर देशालासुद्धा नेतृत्त्व देणारे अनेक दिग्गज नेते महाराष्ट्राने दिले आहेत. या सर्वच नेत्यांनी आपल्या कर्तृत्त्वाने व झळाळणाऱ्या कामगिरीने भारतीय लोकशाहीची प्रतिष्ठा तर उंचावलीच परंतु राज्याला आणि पर्यायाने देशाला सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रक्रम मिळवून दिला. समाजमनाचा अचुक मागोवा घेऊन त्यानुरुप कायदे करून राज्यातील सर्व जनतेचे जीवनमान उंचवणे आणि त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यामध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे स्थान व योगदान हे अनन्यसाधारण असे आहे.

१९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यानुसार (Govt. of India Act, 1935) संघराज्यात्मक शासनपद्धती (Federal form of Govt.) स्वीकारल्यामुळे प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली होती. या कायद्यामुळे मुंबई प्रांतात विधानसभा व विधानपरिषद अशी दोन सभागृहे जुलै, १९३७ मध्ये अस्तित्त्वात आली. मुंबई प्रांताच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची पहिली बैठक दिनांक २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भरली होती. १९३५ च्या कायद्यानुसार अस्तित्त्वात आलेल्या व २९ सदस्य असलेल्या विधानपरिषदेचे पहिले अधिवेशन २० जुलै, १९३७ रोजी तसेच १७५ सदस्य असलेल्या विधानसभेचे पहिले अधिवेशन १९ जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरले होते. तत्कालीन गव्हर्नरांनी श्री.गणेश कृष्ण चितळे यांची विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून (Protem Speaker) नियुक्ती केली होती. याच विधानसभेच्या अधिवेशनात

दिनांक २१ जुलै, १९३७ रोजी श्री.गणेश वासुदेव मावळंकर, अध्यक्ष म्हणून व श्री.नारायण गुरुराव जोशी हे उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडुन आले होते. तसेच दिनांक २२ जुलै, १९३७ रोजी विधानपरिषदेचे सभापती म्हणून श्री.मंगळदास पक्वासा व उप सभापती म्हणून श्री.रामचंद्र सोमण हे निवडून आले होते. हे पाहाता दिनांक १९ जुलै, २०११ रोजी महाराष्ट्र विधानसभेला व दिनांक २० जुलै, २०११ रोजी विधानपरिषदेला ७४ वर्षे पूर्ण झाली.

संसदीय लोकशाहीची पताका मोठ्या डौलाने फडकत ठेवणाऱ्या ओजस्वी ऐतिहासिक संसदीय परंपरेच्या महाराष्ट्र विधानमंडळाचा गौरवशाली अमृतमहोत्सव (Platinum Jubilee) १९ जुलै, २०११ ते २० जुलै, २०१२ या कालावधीत भव्य प्रमाणात साजरा करण्यात यावा असा मा.पीठासीन अधिकारी यांनी तत्त्वत: निर्णय घेतला. त्याबरहुकुम मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री व अन्य मान्यवरांचा समावेश असलेल्या अमृत महोत्सवी कार्यकारी समितीची एक उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत जुलै, २०११ मध्ये अमृत महोत्सवी वर्षाच्या शुभारंभाचा भव्य सोहळा महामहीम राष्ट्रपती आदरणीय प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावा व समारोप जुलै, २०१२ मध्ये मा.पंतप्रधान यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथे आयोजित करण्यात यावा. त्याचप्रमाणे अमृत महोत्सवीवर्षाच्या समारंभांचे स्वरुप भव्य दिव्य असावे, या कार्यक्रमाची अत्यंत नियोजनबद्ध व सुयोग्य आखणी करण्यात यावी, या समारंभांमध्ये आम जनतेला अधिकाअधिक सहभागी करून घ्यावे असा निर्णय घेण्यात आला. या कार्यक्रमांना लोकसभेच्या अध्यक्षा, विधिमंडळाचे सर्व विद्यमान व माजी सदस्य, महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री, भारतातील अन्य राज्यांमध्ये विद्यमान राज्यपाल पद भूषविणारे महाराष्ट्रातील मान्यवर, देशातील सर्व राज्य विधानमंडळांचे मा.पीठासीन अधिकारी व प्रधान सचिव/सचिव, जिल्हापरिषदांचे अध्यक्ष, महापौर, पंचायत समित्यांचे सभापती व महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रातील मान्यवर यांना निमंत्रित करण्यात यावे. अमृत महोत्सवीवर्षात विविध उद्‌बोधक परिसंवाद, चर्चासत्रे व व्याख्यानांचे आयोजन करण्यात यावे. तसेच, विधानमंडळाच्या अमृत महोत्सवी वाटचालीचा आढावा घेणारे प्रदर्शन भरवण्यात यावे. विधानमंडळाच्या दैदीप्यमान अमृत महोत्सवी वाटचालीचा आढावा घेणारा ग्रंथ, विधानमंडळाच्या अमृत महोत्सवी वाटचालीतील नामवंत सदस्यांच्या विचारप्रवर्तक भाषणांचे संकलन व आजी/माजी सदस्यांकडून मागविलेल्या विधानमंडळ संदर्भातील आठवणींचे संकलन असलेली स्मरणिका अशा तीन ग्रंथाचे प्रकाशन महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात आले होते.

महाराष्ट्र विधानमंडळाचा अमृतमहोत्सव उद्‌घाटन सोहळ्याचा अविस्मरणीय कार्यक्रम मंगळवार, दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, महाराष्ट्राचे राज्यपाल मा. श्री. के. शंकर नारायणन्, ओरिसा, त्रिपुरा, पंजाब व झारखंड या राज्यांतील तत्कालीन मा.राज्यपाल, महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री/राज्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेते, मा. उप सभापती, विधानपरिषद, मा. उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र शासनाचे मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, संसद सदस्य, देशांतील राज्यांतील मा. पीठासीन अधिकारी व विधिमंडळाचे प्रधान/सचिव, विविध देशांचे मुंबई येथील राजदूत, वाणिज्यदूत तसेच प्रतिष्ठित व अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, अभ्यागत, मान्यवर व निमंत्रित उपस्थित राहिले होते.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सवानिमित्त " विशेष पाकीट " (Special Cover) महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते प्रकाशित करावे असा प्रस्ताव केंद्र शासनाच्या भारतीय डाक विभागाकडून या सचिवालयास प्राप्त झाला होता. यासंदर्भात महाराष्ट्र विधानमंडळाच्या मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार भारतीय डाक विभागाच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली होती. अमृतमहोत्सवाच्या उद्घाटन सोहळयाप्रसंगी दिनांक १८ ऑक्टोबर,२०११ रोजी महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते सदर विशेष पाकीटाचे (Special Cover) प्रकाशन करण्यात आले.

मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार तसेच या संदर्भात गठित करण्यात आलेल्या अमृत महोत्सव समन्वय समितीने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृत महोत्सवानिमित्त उपस्थित राहिलेल्या महामहिम राष्ट्रपती, महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, महाराष्ट्र विधानमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा. मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्रीय केंद्रीय मंत्री/राज्यमंत्री, अन्य राज्यांतील मा. राज्यपाल, राज्यमंत्री मंडळातील मंत्री/ राज्यमंत्री, अन्य राज्यातील मा.पीठासीन अधिकारी व प्रधान सचिव/सचिव तसेच महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान/ माजी सदस्य याचबरोबर दिवंगत सदस्यांचे कुटुंबिय, अन्य मान्यवर व अतिमहत्त्वाच्या व्यक्ती यांना या प्रसंगी विशेषरित्या तयार करण्यात आलेले स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते विधानमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी व विद्यमान सदस्य यांच्या विधिमंडळाच्या कामकाजाच्या आठवणींचा संग्रह असलेला " स्मृतिगंध " व विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील माजी व विद्यमान सदस्य यांनी सभागृहात केलेल्या निवडक भाषणांचा संग्रह असलेला " नोंदी " हे दोन ग्रंथ तसेच टेबल व भिंतीवरील दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले व उपस्थित सर्व मान्यवरांना या ग्रंथांच्या प्रती वितरीत करण्यात आल्या.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अमृतमहोत्सव उद्घाटन सोहळयाचे निमित्ताने बुधवार, दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधानभवन, मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री तसेच अन्य मान्यवरांच्या सन्मानीय उपस्थितीत एकूण ०७ महत्त्वाच्या विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सदर परिसंवादात सर्वसाधारणपणे एकूण ३२ मान्यवर/तज्ञ वक्ते यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र विधिमंडळाचे अमृतमहोत्सवी वर्ष तसेच स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शुक्रवार, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१२ रोजी विभागीय स्तरावर विधान भवन (कौन्सिल हॉल), पुणे येथे महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री/राज्यमंत्री, उप मुख्यमंत्री, राज्य मंत्रीमंडळातील मंत्री/राज्यमंत्री, विधिमंडळाचे सदस्य व अन्य मान्यवर यांच्या सन्मानीय उपस्थितीत परिसंवाद व स्व. यशवंतराव चव्हाण आणि स्व.वसंतराव नाईक यांच्या जीवनावरील चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

*****

विधानसभा सभागृह - विधान भवन, मुंबई

विधानसभा सभागृह - विधान भवन, नागपूर

मध्यवर्ती सभागृह - विधान भवन, मुंबई
(विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या संयुक्त बैठकीत
महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल यांचे अभिभाषण या सभागृहात होते.)

प्रकरण तिसरे

सभागृहाची रचना, कामकाज व कार्यपद्धती

१. सभागृहाची सदस्य संख्या व मुदत :-

महाराष्ट्र विधानसभेचे एकूण २८९ सदस्य असून त्यातील २८८ सदस्य; राज्यातील २८८ मतदारसंघाचे प्रतिनिधी म्हणून प्रौढ मतदान पद्धतीने सार्वत्रिक निवडणूकीद्वारे निवडून येतात. या २८८ मतदारसंघापैकी २३४ सर्वसाधारण मतदारसंघ असून ५४ मतदारसंघ राखीव आहेत. राखीव मतदारसंघात २९ अनुसूचित जातींकरिता आणि २५ अनुसूचित जमातींकरिता राखीव आहेत. तसेच, घटनेतील अनुच्छेद ३३३ मधील तरतुदीनुसार राज्यातील अँग्लो इंडियन समाजाचा प्रतिनिधी म्हणून त्या समाजाचा एक सदस्य राज्यपालांद्वारे नामनियुक्त करण्यात येतो, घटनेतील अनुच्छेद १७२ मधील तरतुदीनुसार नवीन सभागृह अस्तित्त्वात आल्यानंतर ज्या तारखेला सभागृहाची पहिली बैठक घेण्यात येते त्या तारखेपासून ५ वर्षे सभागृहाची मुदत असते. मात्र, त्याच अनुच्छेदातील अन्य तरतुदीनुसार विधानसभा मुदत संपण्यापूर्वी विसर्जित होऊ शकते किंवा ठराविक काळासाठी ही मुदत वाढविली जाऊ शकते. मुदत वाढविली न गेल्यास वरीलप्रमाणे पाच वर्षाचा कालावधी संपल्याबरोबर सभागृहाचे अस्तित्त्व संपुष्टात येते. (महाराष्ट्र विधानसभा–पक्षनिहाय सदस्य संख्या (दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीनुसार) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक २८** मध्ये दर्शविण्यात आली आहे).

या संदर्भात खालील माहिती सदस्यांसाठी उद्‌बोधक ठरेल.

१९७८ मध्ये निवडलेली महाराष्ट्र विधानसभा संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये ९ जून, १९८० रोजी बरखास्त करण्यात आली होती. तद्‌नंतर ३० जून, १९८० रोजी नवीन विधानसभा गठित करण्यात आली. या विधानसभेची मुदत २९ जून १९८५ रोजी संपणार होती. तथापि, ८ मार्च, १९८५ रोजी विधानसभा बरखास्त करण्यात आली व नवीन विधानसभा दिनांक १८ मार्च, १९८५ रोजी गठित करण्यात आली. १९८५-९० च्या विधानसभेची मुदत १७ मार्च १९९० पर्यंत होती. तथापि, ३ मार्च, १९९० रोजी विधानसभा बरखास्त करण्यात आली. १९९०-९५ ची नवीन विधानसभा १९ मार्च, १९९० रोजी गठीत करण्यात आली. सदर विधानसभेची दिनांक १८ मार्च, १९९५ रोजी मुदत संपणार होती. ही विधानसभा दिनांक १४ मार्च, १९९५ रोजी बरखास्त करण्यात आली. १९९५-१९९९ ची नवीन विधानसभा दिनांक २२ मार्च, १९९५ रोजी अस्तित्त्वात आली व ती दिनांक १५ जुलै, १९९९ रोजी मुदतपूर्व बरखास्त करण्यात आली व दिनांक २० ऑक्टोबर, १९९९ रोजी दहावी विधानसभा अस्तित्त्वात आली.

अकराव्या विधानसभेसाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २००४ रोजी सार्वत्रिक निवडणूका घेण्याचे जाहीर झाले होते त्याप्रमाणे त्या घेण्यात आल्या. दिनांक १६ ऑक्टोबर, २००४ रोजी निकाल जाहीर करण्यात आले. सन २००४-२००९ ची अकरावी विधानसभा दिनांक ०४ नोव्हेंबर, २००४ रोजी घटीत करण्यात आली. मा. मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २००४ रोजी व इतर मंत्री व राज्यमंत्री यांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २००४ रोजी मंत्रीपदाची शपथ घेतली. विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीकरिता दिनांक ४ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर, २००४ या कालावधीत विधानसभेचे अधिवेशन बोलाविण्यात आले होते. सन २००४-२००९ ची अकरावी विधानसभा दिनांक ४ नोव्हेंबर, २००४ रोजी अस्तित्त्वात आली व सदरहू विधानसभेची मुदत दिनांक ३ नोव्हेंबर, २००९ पर्यंत होती.

बाराव्या विधानसभेसाठी दिनांक १३ ऑक्टोबर, २००९ रोजी मतदान व दिनांक २२ ऑक्टोबर, २००९ रोजी मतमोजणी करण्यात येऊन निकाल जाहीर करण्यात आले. मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री व अन्य मंत्री/ राजयमंत्री यांनी दिनांक ७ नोव्हेंबर, २००९ रोजी मंत्रीपदाची शपथ घेतली. तथापि, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१० रोजी मा. मुख्यमंत्री यांनी राजीनामा दिल्यामुळे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० रोजी मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री व अन्य मंत्री/राज्यमंत्री यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. सन २००९-२०१४ ची बारावी विधानसभा दिनांक २५ ऑक्टोबर, २००९ रोजी घटीत करण्यात आली. बारावी विधानसभा दिनांक ९ नोव्हेंबर, २००९ रोजी अस्तित्त्वात आली. विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीकरिता दिनांक ९ ते ११ नोव्हेंबर, २००९ या कालावधीत विधानसभेचे अधिवेशन बोलाविण्यात आले होते. सदरहू विधानसभेची मुदत दिनांक ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी पर्यंत होती. परंतु, सदर विधानसभा दिनांक २८ सप्टेंबर, २०१४ रोजी मुदतपूर्व बरखास्त करण्यात आली.

तेराव्या विधानसभेसाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१४ रोजी सार्वत्रिक निवडणूका घेण्याचे जाहीर झाले होते त्याप्रमाणे त्या घेण्यात आल्या. दिनांक १९ ऑक्टोबर, २०१४ रोजी निकाल जाहीर करण्यात आले. सन २०१४-२०१९ ची तेरावी विधानसभा दिनांक २१ ऑक्टोबर, २०१४ रोजी घटीत करण्यात आली. मा. मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री व अन्य मंत्री/राज्यमंत्री यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ रोजी मंत्रीपदाची शपथ घेतली. विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीकरिता दिनांक १० ते १२ नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत विधानसभेचे अधिवेशन बोलाविण्यात आले होते. सन २०१४-२०१९ ची तेरावी विधानसभा दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी अस्तित्त्वात आली व सदरहू विधानसभेची मुदत दिनांक ९ नोव्हेंबर, २०१९ रोजी पर्यंत होती.

(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये १७ फेब्रुवारी ते ९ जून, १९८० व २८ सप्टेंबर, ते ३१ ऑक्टोबर, २०१४ तसेच १२ ते २३ नोव्हेंबर, २०१९ या कालावधीमध्ये राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती.)

सध्या अस्तित्त्वात असलेल्या चौदाव्या विधानसभेसाठी दिनांक २१ ऑक्टोबर, २०१९ रोजी सार्वत्रिक निवडणूका घेण्याचे जाहीर झाले होते त्याप्रमाणे त्या घेण्यात आल्या. दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ रोजी निकाल जाहीर करण्यात आले. सुरुवातीस मा. मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१९ रोजी मंत्रीपदाची शपथ घेतली. तथापि, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१९ रोजी मा. मुख्यमंत्री यांनी राजीनामा दिल्यामुळे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ रोजी मा. मुख्यमंत्री व अन्य मंत्री यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली तसेच मा.उप मुख्यमंत्री व अन्य मंत्री/राज्यमंत्री यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी मंत्रीपदाची शपथ घेतली. विधानसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधीकरिता दिनांक २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९ या कालावधीत विधानसभेचे अधिवेशन बोलाविण्यात आले होते. सन २०१९-२०२४ ची चौदावी विधानसभा दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ रोजी अस्तित्त्वात आली व सदरहू विधानसभेची मुदत दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी पर्यंत आहे.

२. सभागृहाची अधिवेशने (आवाहनपत्र -समन्स *(Summon)* /अधिसूचना/कार्यावली व दिनदर्शिका) :-

राज्यपाल स्वत:स योग्य वाटेल अशा वेळी व ठिकाणी बैठक भरविण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या सभागृहास किंवा दोहोंपैकी प्रत्येक सभागृहास वेळोवेळी अभिनिमंत्रित करतात. परंतु एका अधिवेशनातील शेवटची बैठक व

आगामी अधिवेशनातील पहिल्या बैठकीसाठी नेमून दिलेली तारीख या दरम्यान सहा महिन्यांचे अंतर पडता कामा नये अशी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४(१) मध्ये तरतूद आहे. त्यानुसार महाराष्ट्र विधानसभेची खालीलप्रमाणे वर्षातून सर्वसाधारण तीन अधिवेशने होतात :—

(१) पहिले अधिवेशन – अर्थकसंल्पीय अधिवेशन फेब्रुवारी-मार्च दरम्यान.

(२) दुसरे अधिवेशन – पावसाळी अधिवेशन जून-जुलै-ऑगस्ट दरम्यान.

(३) तिसरे अधिवेशन – हिवाळी अधिवेशन नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान.

संयुक्त महाराष्ट्र अस्तित्त्वात यावा म्हणून झालेल्या " नागपूर करारा " तील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्यावेळी घेतलेल्या निर्णयानुसार दोन्ही सभागृहांचे एक अधिवेशन दरवर्षी नागपूर येथे आयोजित करण्यात येते व सर्वसाधारणपणे ते हिवाळी अधिवेशन असते.

प्रत्येक अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात " वंदे मातरम " या गीताने होते. तसेच प्रत्येक अधिवेशनाचा समारोप " जन गण मन " या राष्ट्रगीताने होतो.

संविधानाच्या अनुच्छेद १७४ अन्वये विधानसभेच्या अधिवेशनाचा दिनांक, वेळ व स्थळ सूचित करणारा राज्यपालांचा आदेश संसदीय कार्य विभागामार्फत या सचिवालयास प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार रीतसर आवाहनपत्र (समन्स), अधिवेशनाची दिनदर्शिका तसेच अधिवेशनात होणाऱ्या कामकाजाची कार्यावली सदस्यांना पाठविण्यात येते. तसेच, कामकाजाची अंतिम कार्यावली देखील सदस्यांना नंतर पाठविण्यात येते.

३. अधिवेशन संस्थगित करणे व पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा :-

अधिवेशनाची तारीख आगाऊ घोषित करण्याची वैशिष्ट्यपूर्ण प्रथा आपल्या राज्यात असून त्याप्रमाणे प्रत्येक अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पुढील अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात येते.

संविधानाच्या अनुच्छेद १७४ (२) (क) अन्वये राज्यपालांना, विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित करण्याचा अधिकार आहे. हा आदेश, सर्वसाधारणपणे, अधिवेशनाच्या शेवटी पीठासीन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतो आणि पीठासीन अधिकारी, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अधिवेशनाचा समारोप करताना विधानमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्याचे जाहीर करतात. यासंबंधीत घोषणेचा मसुदा पुढीलप्रमाणे असतो :—

विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत घोषणा

" सभागृहासमोरील कामकाज आता संपले आहे. "

राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, महाराष्ट्राचा राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४ खंड (२), उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून याद्वारे ——(वार), दिनांक —— रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे. "

यानुसार विधानसभेचे अधिवेशन आता संस्थगित झाल्याचे मी जाहीर करतो.

विधानसभेच्या पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

" राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन ——(वार), दिनांक ——— रोजी, विधान भवन, मुंबई/नागपूर येथे घेण्यात यावे. "

अशी घोषणा विधानसभेचे अध्यक्ष, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अधिवेशनाचा समारोप करण्यापूर्वी सभागृहात करतात.

अपवाद-मुदत संपत आलेल्या विधानसभेचे शेवटचे अधिवेशन -

सर्वसाधारणपणे विधानसभा अस्तित्त्वात आल्यानंतर, होणाऱ्या प्रत्येक अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पुढील अधिवेशनाची तारीख व ठिकाण घोषित करण्यात येते. तथापि, विधानसभेची मुदत संपुष्टात येत असतांना होणाऱ्या शेवटच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पुढील अधिवेशनाची तारीख व ठिकाण घोषित करण्यात येत नाही. (Adjournment□sine die)

त्यानुसार तेराव्या विधानसभेच्या शेवटच्या अधिवेशनात शेवटच्या दिवशी म्हणजे दिनांक ०२ जुलै, २०१९ रोजी फक्त **अधिवेशन संस्थगित** *(Adjournment sine die)* करण्याची घोषणा करण्यात आली. पुढील अधिवेशनासंबंधीची घोषणा करण्यात आली नाही.

४. सभागृहाची वेळ व बैठकीचा कालावधी (म.वि.स. नियम ४) :-

विधानसभेची बैठक सोमवार ते शुक्रवार अशी पाच दिवस भरते आणि शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतात.

सभागृहाची बैठक सकाळी ११-०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ६.०० वाजता समाप्त होते. *(तथापि त्या-त्या दिवशी सभागृहासमोरील कामकाज पाहता मा.अध्यक्ष यांचे अनुमतीने सभागृहाची विशेष बैठक सभागृहाच्या नियमित बैठकीअगोदर सर्वसाधारणपणे १ ते २ तास अगोदर आयोजित करण्यात येते. तसेच सभागृहाची दैनंदिन बैठक साधारणत: सायंकाळी ०६-०० स्थगित होते, परंतु एखादे वेळी; सभागृहासमोरील एकंदरीत कामकाज लक्षात घेता सभागृहाची वेळ " सभागृहासमोरील कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे " अशी मा.अध्यक्ष घोषणा करतात.)*

५. सदस्यांचा हजेरीपट (म.वि.स. नियम ३११) :-

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाला हजर राहणाऱ्या विधानसभा सदस्यास हजेरीपटावर दररोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी विधानसभा सभागृहाच्या बाहेरील लॉबीत टॉवर ब्लॉकच्या उद्‌वाहनाजवळील प्रवेशद्वाराशेजारी सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर हजेरीपट ठेवण्यात येतो व तो त्या ठिकाणी बैठक संपेपर्यंत असतो. सन २००७ च्या हिवाळी सत्रापासून या हजेरीपटावर लक्ष ठेवून सदस्यांना त्यांच्या नावासमोर असलेल्या मोकळ्या जागेत स्वाक्षरी करताना मार्गदर्शन करण्यासाठी या सचिवालयातील दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.

६. सभागृहातील आसन व्यवस्था :-

(अ) प्रत्येक सदस्याने नेमून दिलेल्या जागेवरुनच सभागृहाच्या कामकाजात भाग घेतला पाहिजे आणि अशी मान्य संसदीय प्रथा आहे. विधानसभा सभागृहातील सदस्यांसाठी करण्यात येणारी आसन व्यवस्था ही सर्वसाधारणपणे मा.अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे केली जाते. प्रचलित पद्धतीनुसार सभागृहातील सत्तारुढ पक्षाच्या सदस्यांसाठी मा.अध्यक्षांच्या उजव्या हाताच्या बाजूकडील जागा निश्चित केलेली असते. त्यातील पहिल्या दोन किंवा तीन रांगा मंत्रिमंडळातील सदस्यांसाठी असतात. पहिले आसन मुख्यमंत्र्यासाठी असते. विरोधी पक्षाच्या/गटाच्या सदस्यांकरिता अध्यक्षांच्या डाव्या हाताच्या बाजूकडील जागा निश्चित केलेली असते. त्या बाजूकडील पहिल्या आसनावर विधानसभेचे उपाध्यक्ष व दुसऱ्या आसनावर विरोधी पक्षनेते बसतात. सत्तारुढ पक्षाच्या तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांकरिता त्या-त्या पक्षाची सदस्यसंख्या विचारात घेऊन आसन समूह ठरवून देण्यात येतात आणि आपल्या आसन समूहातील जागा संबंधित पक्षांकडून त्या-त्या सदस्यांना नेमून देण्यात येतात. आपल्या पक्षाच्या/गटांच्या सदस्यांना ठराविक आसन क्रमांक नेमून देण्याची जबाबदारी संबंधित पक्ष/गट यांनी पूर्ण करावयाची असून त्या प्रमाणे नेमून देण्यात आलेल्या आसनांची माहिती पक्ष कार्यालयाकडून अध्यक्षांना कळविण्यात येते.

(ब) कोरोना महामारीच्या कालावधीत दोन्ही सभागृहांतील करण्यात आलेली आसन व्यवस्था :-

फेब्रुवारी, २०२० मध्ये कोरोना विषाणू महामारीचे संपूर्ण जगभरामध्ये संक्रमण सुरू झाले. कोरोना विषाणू पासून बचाव करण्यासाठी अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनांपैकी सामाजिक अंतर राखणे हा एक उपाय होता. कोरोना महामारीच्या कालावधीमध्ये विधान भवन, मुंबई येथे महाराष्ट्र विधिमंडाळाची अधिवेशने पार पडली. विधिमंडळाचे अधिवेशन कालावधीत सुरक्षात्मक उपाययोजना म्हणून विधानसभा सभागृहात व विधानपरिषद सभागृहात सुरक्षित अंतर राखण्याच्या दृष्टीने मा. सदस्यांना आसनस्थ होण्यासाठी प्रत्येकी एक आसन सोडून बैठकीसाठी आसन व्यवस्था करण्यात आली. बदललेल्या परिस्थितीमुळे विधानसभा सभागृहातील सर्व सदस्यांची आसन व्यवस्था करण्याकरिता आसन व्यवस्था पुरेशी नसल्यामुळे मा. पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार प्रेक्षक गॅलरी, विद्यार्थी गॅलरी तसेच अधिकारी गॅलरी येथे एक आसन सोडून मा.सदस्यांसाठी आसन व इतर तद्नुषंगीक तांत्रिक व्यवस्था करण्यात आली. तसेच अधिवेशन कालावधीत विधानपरिषद सभागृहामध्ये सुध्दा सुरक्षित अंतर राखण्याच्या दृष्टीने मा. पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार मा.सदस्यांना आसनस्थ होण्यासाठी प्रत्येकी एक आसन सोडून बैठकीसाठी आसन व्यवस्था करण्यात आली.

७. नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी (म.वि.स. नियम १६) :-

सदस्यांनी शपथ घेण्याची पद्धत इंग्लंडमधील पद्धतीनुसार स्वीकारण्यात आली. इंग्लंडमध्ये सुरुवातीस सभासदांना शपथ घ्यावी लागत असे. ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही अशा सभासदांनी या पद्धतीविरुद्ध चळवळ केली. यामध्ये चार्लस ब्रॅडलॉ यांचा पुढाकार होता. संसदेमध्ये निवडून आल्यानंतर त्यांनी शपथ घेण्यास नकार दिला. या नकाराबद्दल संसदेने शिक्षा म्हणून त्यांचे सभासदत्त्व रद्द केले. या प्रकाराची दोन-तीन वेळा पुनरावृत्ती झाली आणि शेवटी १८८० मध्ये संसदेने शपथेऐवजी प्रतिज्ञा करण्याची मुभा सभासदांना दिली. आपल्या देशात शपथ घेण्याची पद्धत कायद्यात तरतूद नसतानासुद्धा १८५३ पासून सुरू झाली व ती १९२० पर्यंत चालू होती. त्या काळात सभासदांना एकनिष्ठ राहण्याची व आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडण्याची वेगवेगळी शपथ

घ्यावी लागत असे. मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यान्वये या प्रथेस कायदेशीर स्वरुप देण्यात आले, पण दोनऐवजी एकच शपथ घेण्याची तरतूद केली. १९३५ च्या कायद्यात त्यात कसलाही बदल करण्यात आला नाही व या प्रथेचा संविधानाच्या अनुच्छेद १८८ मध्ये अंतर्भाव करण्यात आला. आपल्या देशातील शपथविधीचा कार्यक्रम इंग्लंडपेक्षा थोडा भिन्न आहे.

सभागृहात स्थान ग्रहण करण्यापूर्वी शपथ घेणे वा गंभीरपणे प्रतिज्ञा करणे ही सदस्यांसाठी अत्यावश्यक बाब आहे अन्यथा अशा सदस्याला सभागृहाच्या कामकाजात भाग घेता येणार नाही तसेच, मतदानसुद्धा करता येणार नाही.

प्रत्येक नवनिर्वाचित किंवा नामनियुक्त सदस्याला सभागृहात आपले स्थान ग्रहण करण्यापूर्वी शपथ घेण्याचे वा गंभीरपणे प्रतिज्ञा करण्याचे संविधानातील तरतुदीनुसार (अनुच्छेद १८८) बंधनकारक असून, त्यासाठी शपथेचा नमूना देखील संविधानाने ठरवून दिलेला आहे. नवीन विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीचे एक किंवा दोन दिवस अशा शपथविधीसाठी निश्चित करण्यात येतात. शपथविधीसाठी येतांना सदस्यांनी, निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेले निवडणूक प्रमाणपत्र बरोबर आणणे आवश्यक आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर आपले प्रमाणपत्र, त्यांनी नेमणूक केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना सादर करावे. सदस्यांनी मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्या भाषेत शपथ घेणार आहोत हे सूचित करावे. म्हणजे त्यांच्या शपथविधीसाठी त्या भाषेतील शपथेचा विहित नमूना उपलब्ध करून देणे सुलभ होते. याबाबत सर्व सदस्यांना तपशीलवार सूचना वेगळ्या देण्यात येतात. सर्वसाधारणपणे मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतून किंवा मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने आपल्या मातृभाषेतून सदस्य शपथ घेतात किंवा गंभीरपणे प्रतिज्ञा करतात.

शपथविधीसाठी सर्वसाधारणपणे अवलंबिण्यात येणाऱ्या प्रथेनुसार, सर्वप्रथम सभागृहाने अध्यक्षांची निवड करेपर्यंत सदस्यांना शपथ देण्यासंबंधातील मा.राज्यपालांनी नियुक्त केलेल्या व्यक्ती, सभागृहाचे नेते (मुख्यमंत्री) व विरोधी पक्षनेते, (विरोधी पक्षनेते यांची घोषणा झाली असेल तर) तद्नंतर मंत्रिमंडळातील सदस्य (मंत्रिमंडळाच्या यादीप्रमाणे), महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून असलेले माजी अध्यक्ष/उपाध्यक्ष, माजी मुख्यमंत्री, माजी उप मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील माजी मंत्री (कार्यकाळानुसार), माजी विरोधी पक्षनेते, महिला सदस्य, सन्माननीय सदस्यांची ज्येष्ठतेनुसार व वर्णानुक्रमानुसार यादी, प्रथम निवडून आलेल्या सदस्यांच्या आडनावाच्या मराठी वर्णानुक्रमानुसार इतर सर्व सदस्यांना शपथविधीसाठी पाचारण करण्यात येते. नेमून दिलेल्या जागेवर जाऊन शपथ घेतल्यावर अध्यक्षांशी हस्तांदोलन करून वा त्यांना अभिवादन करून, सदस्य शपथ पुस्तिकेत स्वाक्षरी करतात व त्यानंतर आपल्या जागेवर स्थानापन्न होतात. शपथविधीसाठी नेमून दिलेल्या दिवशी जे सदस्य काही कारणास्तव शपथ घेऊ शकत नाहीत त्यांना सभागृहाच्या बैठकीच्या कोणत्याही दिवशी अध्यक्षांना पूर्वसूचना देऊन, शपथ घेता येते. तसेच पोट-निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्याला, अध्यक्षांना पूर्वसूचना देऊन शपथ घेता येते. (महाराष्ट्र विधानसभा नवनिर्वाचित सदस्यांद्वारे शपथ / दृढकथन–नमुनाबाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक २५** मध्ये दर्शविण्यात आली आहे).

८. पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता (Disqualification on Ground of Defection) :-

संविधानाच्या ५२ व्या सुधारणेन्वये [(संविधान (५२ वी सुधारणा) अधिनियम, १९८५)] संविधानाच्या अनुच्छेद १०१, १०२, १९० व १९१ मध्ये सुधारणा करण्यात आली असून संविधानात पक्षांतराच्या कारणावरून निरर्ह होण्यासंबंधी १० वी अनुसूची समाविष्ट करण्यात आली आहे व संविधानाच्या ९१ व्या सुधारणेनुसार [(संविधान (९१ वी सुधारणा) अधिनियम, २००३)] संविधानाच्या दहाव्या अनुसूचीत सुधारणा करण्यात आली आहे.

पक्षांतर म्हणजे सर्वसाधारणपणे संसद अथवा विधानमंडळ सदस्याने त्याचा मूळचा पक्ष सोडून अन्य पक्षात प्रवेश करणे होय. सन १९६७ मध्ये भारतातील काही राज्यात संमिश्र सरकारे स्थापन झाली. मात्र ही सरकारे अल्पावधीतच कोसळली याचे कारण अनेक सदस्यांनी पक्षांतर करणे हे होते. सन १९६७ ते १९७२ या काळात देशभरातील ४,००० लोकप्रतिनिधींपैकी सुमारे २,००० लोकप्रतिनिधींनी पक्ष बदलला होता. या काळात काही सदस्यांनी तर पाचवेळा पक्ष बदलला होता. याचा परिणाम म्हणजे या संबंधात एक उच्चस्तरीय समिती नेमण्याचा अशासकीय ठराव लोकसभेत दिनांक ८ डिसेंबर, १९६७ रोजी संमत करण्यात आला. श्री.यशवंतराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल दिनांक २८ फेब्रुवारी, १९६९ रोजी संसदेला सादर केला. यानुसार तयार केलेले घटनादुरुस्ती विधेयक दिनांक १६ मे, १९७३ रोजी संसदेत मांडण्यात आले. परंतु त्याचे कायद्यात रुपांतर होण्यापूर्वीच लोकसभेचे विसर्जन झाले. पुढील लोकसभेमध्ये दिनांक २८ ऑगस्ट, १९७८ रोजी हे विधेयक पुन्हा मांडण्याच्या वेळी सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी विरोध केल्यामुळे ते सादर झाले नाही. सन १९८४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अधिवेशनाच्या प्रारंभी मा. राष्ट्रपतींनी केलेल्या भाषणामध्ये पक्षांतरास आळा घालण्यासाठी कायदा करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक २४ जानेवारी, १९८५ रोजी लोकसभेत संविधान सुधारणा विधेयक मांडण्यात आले व ते संमत झाले. ही सुधारणा दिनांक १ मार्च, १९८५ पासून अंमलात आली. याप्रमाणे ५२ वी संविधान सुधारणा अधिनियम, १९८५ अन्वये संविधानाच्या अनुच्छेद १०१, १०२, १९० व १९१ मध्ये सुधारणा करण्यात आली व संविधानात पक्षांतराच्या कारणावरुन निरर्ह होण्यासंबंधी १० वी अनुसूची समाविष्ट करण्यात आली त्यात सर्वसाधारणपणे अशा तरतुदी आहेत की, कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य असलेल्या सदस्याने त्या राजकीय पक्षाचे सदस्यत्त्व स्वेच्छेने सोडून दिले अथवा त्या राजकीय पक्षाच्या निदेशाविरुद्ध पूर्वपरवानगी न घेता सभागृहात मतदान केले तर तो सदस्य सभागृहाचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह (Disqualify) होईल. तथापि, मतदानापासून १५ दिवसांच्या आत अशा राजकीय पक्षाने सदस्याचे मतदानाचे कृत्य क्षमापित केल्यास वरील तरतूद लागू होणार नाही.

५२ व्या संविधान सुधारणा विधेयकाद्वारे समाविष्ट करण्यात आलेल्या दहाव्या अनुसूचीत अशीही तरतूद होती की, पक्षांतराच्या कारणावरुन येणारी निरर्हता पक्ष फुटीच्या बाबतीत म्हणजे विधानमंडळ पक्षापैकी किमान एक तृतीयांश सदस्यांनी वेगळा गट स्थापन केल्यास लागू होणार नाही. तसेच अशी निरर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत सुद्धा लागू होणार नाही.

अनेक प्रसारमाध्यमांनी या तरतुदीसंबंधात प्रतिकूल मत व्यक्त केले होते. तसेच, पक्षांतरविरोधी अधिनियमातील ही तरतूद घाऊक पक्षांतराला प्रोत्साहन देत असून वैयक्तिक पक्षांतर बेकायदेशीर ठरविणारी असल्यामुळे अनेक विचारवंतांनी/जनतेने त्याबाबत टीका केली होती. या तरतुदीमुळे अनेक राज्यातील सरकारे अस्थिर झाल्याचा आक्षेपदेखील घेण्यात येत होता, ही वस्तुस्थिती लक्षात घेता व पक्षांतर विरोधी अधिनियम अधिक मजबूत करण्याकरिता संसदेने ९१ वी संविधान सुधारणा अधिनियम, २००३ संमत केला. या दुरुस्तीनुसार भारताच्या संविधानाच्या दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ३ (पक्षांतराच्या कारणावरुन येणारी निरर्हता पक्ष फुटीच्याबाबत लागू नाही) वगळण्यात आला असून इत:पर घाऊकरित्या पक्षांतर करणाऱ्यांना देखील पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हतेस सामोरे जावे लागणार आहे. पक्षांतराच्या कारणावरुन येणारी निरर्हता पक्ष फुटीच्या बाबतीत म्हणजे विधानमंडळ पक्षापैकी किमान दोन तृतीयांश सदस्यांनी वेगळा गट स्थापन केल्यास लागू होणार नाही. तसेच अशी निरर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत सुद्धा लागू होणार नाही.

भारताचे संविधान (५२ वी दुरुस्ती) अधिनियम, १९८५ मधील दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ८ अन्वये तयार करण्यात आलेले महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता) नियम, १९८६.

महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता) नियम, १९८६ यातील नियम ४(२) अन्वये संविधानाच्या अनुच्छेद १८८ अन्वये शपथ घेऊन विधानसभेत सदस्यांनी पद ग्रहण करण्यापूर्वी सचिवांकडे आपले निवडणूक प्रमाणपत्र व नमुना तीनमध्ये असल्याप्रमाणे तपशिलाचे विवरण व प्रतिज्ञापत्र (खाली दिलेल्या नमुना तीनप्रमाणे) सादर करणे आवश्यक आहे तसेच, नियम ३ (१) नुसार प्रत्येक विधानमंडळ पक्षाचा नेता, पक्ष अस्तित्त्वात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत नियम ३ मधील तरतुदीप्रमाणे पक्षाने प्राधिकृत केलेल्या त्या-त्या पक्षाच्या सदस्यांची नावे व पत्ते याबाबतची माहिती माननीय अध्यक्षांना पुरवतील. त्यानुसार सर्व विधानसभा सदस्यांची एकत्रित पक्षनिहाय यादी करता येईल व नियम ५ (१) व (२) अन्वये नमुना चार मध्ये नोंदवहीत नोंद करता येईल व प्रत्येक सदस्याच्या संबंधातील माहितीची नोंदवहीत स्वतंत्र पानावर नोंद करण्यात येईल.

महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता) नियम, १९८६ यातील नियम ६ अन्वये एखादा सदस्य अपात्र झाला आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी माननीय अध्यक्षांना विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विधानसभा सदस्य
(पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता) नियम, १९८६
नमुना तीन

(नियम ४ पहा)

(१) सदस्याचे नाव .. ..

(२) वडिलांचे/पतीचे नाव .. ..

(३) कायमचा पत्ता .. ..

(४) *निवडणुकीचा/**नामनिर्देशनाचा दिनांक .....

(५) खालील दिनांकास असल्याप्रमाणे पक्ष संलग्नीकरण–

(एक) निवडणुकीच्या/नामनिर्देशनाच्या दिनांकास .....

(दोन) या नमुन्यावर सही केल्याच्या दिनांकास .....

प्रतिज्ञापन

मी, ... याद्वारे प्रतिज्ञापित करतो/करते की, वर दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे.

वरील माहितीमध्ये कोणताही बदल होईल त्याप्रसंगी, मी अध्यक्षांना तात्काळ माहिती देण्याची हमी देत आहे.

दिनांक : सदस्याची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा.

---

* निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणुकीचे प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक

** नामनियुक्त सदस्यांसाठी

अलिकडच्या काळात पक्षांतर विरोधी अधिनियमाखाली मा. अध्यक्षांनी दिलेले काही महत्त्वाचे निर्णय :

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९१ (२) व दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) अन्वये पक्षांतराच्या कारणावरुन तत्कालीन मा. अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ४ जून, २००२ रोजी सर्वश्री. नारायण पवार, नरसिंग गुरुनाथ पाटील, शिवाजीराव नाईक, विनय कोरे व गंगाराम ठक्करवाड यांना निरर्ह ठरविले. दिनांक ५ जून, २००२ रोजी श्री. शिरीषकुमार कोतवाल व दिनांक ७ जून, २००२ रोजी श्री. डेसमंड येटस् (नामनियुक्त) यांना निरर्ह ठरविले.

दरम्यानच्या काळात मा. राज्यपालांनी निरर्ह ठरविण्यात आलेले नामनियुक्त सदस्य श्री. डेसमंड येटस् यांच्या जागी श्री. व्हिक्टर फ्रेटास यांची नेमणूक केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या ज्या सदस्यांना निरर्ह ठरविण्यात आले होते त्यापैकी (१) श्री. नारायण पवार (२) श्री. नरसिंग पाटील (३) श्री. शिवाजीराव नाईक (४) श्री. शिरीषकुमार कोतवाल (५) श्री. गंगाराम ठक्करवाड व (६) श्री. डेसमंड येटस् हे सदस्य उच्च न्यायालयात गेले असता त्यांच्या याचिकेवर निर्णय देताना उच्च न्यायालयाने मा. अध्यक्षांचा निर्णय वैध ठरविला होता. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध या सदस्यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील अर्ज केला होता. त्या अपील याचिकेवर निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने जैसे थे परिस्थिती कायम ठेवावी तसेच, संबंधित सदस्यांना सभागृहात बोलता येणार नाही तसेच मतदानात भाग घेता येणार नाही असे अंतरिम आदेश दिले होते व संबंधित अपील अर्ज पुन:श्च सुनावणीसाठी तीन आठवड्याचे आत घेण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार त्या अपील अर्जावरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०१ सप्टेंबर, २००४ रोजीच्या आदेशान्वये सर्वोच्च न्यायालयाने वरीलपैकी क्रमांक १ ते ५ वरील सदस्यांचे अपील अर्ज खारीज (dismissed) केले आहेत.

मात्र श्री. डेसमंड येट्स यांच्या जागी श्री. व्हिक्टर फ्रेटास यांची नेमणूक केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या दिनांक १३ डिसेंबर, २००२ रोजीच्या आदेशाद्वारे मान्यता दिली.

९. अस्थायी अध्यक्षांची नेमणूक (Appointment of Protem Speaker) :-

जेव्हा विधानसभा नव्याने अस्तित्त्वात येते तेव्हा विधानसभेच्या अध्यक्षांची निवडणूक होईपर्यंत त्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १८० (१) अन्वये राज्यपाल, नवनिर्वाचित सदस्यांपैकी सर्वात ज्येष्ठ सदस्यांची अस्थायी अध्यक्ष (Protem Speaker) म्हणून नेमणूक करतात. अशा अध्यक्षांना राज्यपालांकडून सदस्यत्त्वाची शपथ देण्यात येते. त्यानंतर अस्थायी अध्यक्ष, नवनिर्वाचित सदस्यांना शपथ देणे व अध्यक्षांची निवडणूक यासंबंधात कामे पार पाडतात. (महाराष्ट्र विधानसभा अस्थायी अध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक ०७** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

१०. विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक (म.वि.स. नियम ६ व ७) :-

इंग्लंडमध्ये १३७७ मध्ये सर थॉमस हंगरफोर्ड यांची पहिल्यांदा पार्लमेंटचे स्पीकर म्हणून निवड झाली. हाऊस ऑफ कॉमन्सच्या तक्रारी मांडण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली होती. पार्लमेंटकडून आपली कामे करून घ्यावयाची असल्यास स्पीकर हा आपला माणूस असावा असा प्रयत्न राजाने करणे अपरिहार्य होते.

त्यामुळे साहजिकच स्पीकरवर सदस्यांचा विश्वास नसे आणि त्याला तारेवरची कसरत करावी लागे. एकीकडे सभागृहाचा त्यावर अविश्वास तर सभागृहात जे असंयमी सदस्य बोलत असत त्याबद्दल राजा त्यास जबाबदार धरत असे. कित्येक प्रसंगी राजाचा रोष स्पीकरला ओढवावा लागून एका स्पीकरांना आपला प्राणही गमवावा लागला होता. १७२० पासून, आधुनिक स्वरुपात हे पद दिसू लागले आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्पीकर निःपक्षपाती असावा असा संकेत सुरू झाला. अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची कामे पार पाडण्यासाठी उपाध्यक्ष निवडण्यात येतात. इंग्लंडमध्ये १८५५ पासून चेअरमन ऑफ वेज अँड मीन्स यांना अध्यक्षांच्या गैरहजेरीत निवडण्यास सुरुवात झाली. आपल्याकडे सुरुवातीस गव्हर्नर जनरल यांना व्हाइस प्रेसिडेंट यांची नेमणूक करण्याचा अधिकार होता.

आपल्या देशात अध्यक्षपदाची सुरुवात १८५४ पासून सुरू झाली. त्या काळी गव्हर्नर जनरल हेच विधिमंडळाचे अध्यक्ष असत. ही व्यवस्था १९२० पर्यंत होती. १९२४ मध्ये " प्रेसिडेंट " ची (Speaker) निवड सदस्यांतर्फे झाली. नवीन सदस्यांचा शपथविधी झाल्यानंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात येते. अध्यक्षांच्या निवडीचा दिवस मा.राज्यपालांकडून निश्चित करण्यात येतो व त्याबाबत सर्व सदस्यांना सूचना देण्यात येते. त्याप्रमाणे कोणीही सदस्य विहित प्रपत्रातील नामनिर्देशनपत्र भरुन दुसऱ्या सदस्यांचे अध्यक्षपदाकरिता नाव सुचवू शकतो. मात्र, त्यासाठी आणखी एका सदस्याने अनुमोदन देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या सदस्यांचे नाव सुचविण्यात आले असेल त्याच्याकडून; आपण निवडून आल्यास अध्यक्ष म्हणून काम करण्याची आपली तयारी असल्याचे लेखी कबुलीपत्र नामनिर्देशन पत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे. नामनिर्देशनपत्रे निवडणुकीसाठी नेमून देण्यात आलेल्या दिवसाच्या आदल्या दिवशी दुपारी १२.०० वाजेपर्यंत विधानसभेच्या सचिवांना सादर करावयाची असतात. नामनिर्देशनपत्रांची छाननी वगैरे औपचारिक बाबी रीतसर झाल्यानंतर एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र असल्यास सभागृहाच्या नियमावलीत दिलेल्या पद्धतीनुसार निवडणूक घेण्यात येते. नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यास निवडणूकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिवशी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आपली उमेदवारी मागे घेता येते. निवडणूक होऊन मतमोजणी झाल्यानंतर निवड जाहीर करण्यात येते. अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या सदस्यास मुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते अध्यक्षांच्या आसनाकडे नेतात व हंगामी अध्यक्षांकडून त्यांनी आसन ग्रहण केल्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहाचे पुढील कामकाज सुरू होते. [प्रकरण तिसरे, मुद्दा क्रमांक-१०, पृष्ठ क्रमांक-९३ व ९४, विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक यासंदर्भातील म.वि.स. नियम ६ व ७ याबाबत (अद्ययावत स्थिती) दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग चार-क, असाधारण क्रमांक-५६ अनुसार प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना (*NOTIFICATION*) मा. सदस्यांनी कृपया पहावी.]

विधानसभेच्या उपाध्यक्षांच्या निवडीसाठी देखील वर नमूद केल्याप्रमाणेच पद्धती अवलंबिण्यात येते. मात्र विधानसभा नियम ७ अन्वये या निवडणूकीची तारीख विधानसभा अध्यक्ष ठरवितात. (महाराष्ट्र विधानसभा, अध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक ०६** तसेच विधानसभा उपाध्यक्ष (सन १९३७ ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक ०९** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

(११) सभागृहातील गणपूर्ती (Quorum-कोरम) **(म.वि.स. नियम ४९) :-**

सभागृहाची बैठक बोलाविल्यानंतर ती सुरू करण्यासाठी सभासद विशिष्ट संख्येत उपस्थित असणे आवश्यक आहे. १६४९ मध्ये ब्रिटिश संसदेने चाळीस सदस्यांची उपस्थिती कामकाज सुरू करण्यास किंवा चालू ठेवण्यास आवश्यक मानली तेव्हापासून आजतागायत हा संकेत पाळण्यात येत आहे.

सभागृहाच्या नियमावलीप्रमाणे विधानसभेसाठी **एकूण सदस्य-संख्येच्या एक-दशांश म्हणजेच २९ एवढी सदस्य संख्या गणपूर्तीसाठी आवश्यक आहे.** सभागृहात कोणत्याही वेळी गणपूर्तीसाठी आवश्यक किमान सदस्य

संख्या असणे अत्यावश्यक असते. सभागृहात किमान सदस्य संख्या उपस्थित नसल्याचे निदर्शनास आणले गेल्यास सभागृहाचे कामकाज गणपूर्ती होईपर्यंत तहकूब करणे अपरिहार्य ठरते. अशा वेळी नियमावलीतील तरतुदीनुसार **सभागृहाची घंटा सतत १० मिनिटे वाजविण्यात येते.** त्यापूर्वीच गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सदस्य सभागृहात उपस्थित झाल्यास घंटा थांबविण्यात येते. सतत १० मिनिटे घंटा वाजल्यानंतरही गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सदस्य सभागृहात उपस्थित न झाल्यास सभागृहाची बैठक काही काळ स्थगित करण्यात येते. अशा रीतीने स्थगित झालेली बैठक ठराविक वेळेनंतर जेव्हा पुन्हा भरते, त्यावेळीदेखील आवश्यक गणपूर्ती न झाल्यास सभागृहाची त्या दिवसाची बैठक दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात येते.

(१२) राज्यपालांचे अभिभाषण (Governor's Address) **(म.वि.स. नियम ५९ व ६०) :-**

" राज्यपालांचे अभिभाषण " ही बाब संसदीय लोकशाही व्यवस्थेमधील अतिशय पवित्र (Solemn) गंभीर स्वरुपाची बाब आहे. राज्य प्रमुखाचे (Head of the State) अभिभाषण ही गौरवशाली परंपरा असून त्याचा आब व मानमरातब राखणे हे सर्वांचे कर्तव्य आहे.

संविधानाच्या अनुच्छेद १७६ (१) खालील तरतुदीनुसार, विधानसभेसाठी झालेल्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या तसेच प्रत्येक वर्षीच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला एकत्र आलेल्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांपुढे राज्यपाल अभिभाषण करतात आणि त्यांना कोणत्या कारणासाठी अभिनिमंत्रित करण्यात आले या संबंधीच्या कारणांची माहिती विधानमंडळाला देतात. राज्यपालांचे अभिभाषण विधान भवनाच्या (मुंबई) चौथ्या मजल्यावरील मध्यवर्ती सभागृहात (सेंट्रल हॉल) होते.

राज्यपालांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या शासकीय/अशासकीय कार्यक्रम/समारंभासंदर्भात अंगीकारावयाच्या राजशिष्टाचाराबाबत सन २०१५ मध्ये राष्ट्रपती कार्यालयाने राज्यपाल कार्यालयाला पाठविलेल्या निदेश पुस्तिकेत, मा.राज्यपालांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना उद्देशून करावयाच्या अभिभाषणाच्या वेळी अंगीकारावयाचे राजशिष्टाचार विहित करण्यात आले आहेत.

सदर सूचनांनुसार मा.राज्यपाल महोदयांचे विधान भवन येथे आगमन झाल्यावर त्यांचे स्वागत मा.मुख्यमंत्री, विधानपरिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष, इतर मान्यवर व विधानमंडळाचे प्रधान सचिव/सचिव करतात. त्यानंतर विधानभवनाच्या प्रवेशद्वाराजवळ त्यांना राष्ट्रीय मानवंदना (National Salute) देण्यात येते व तद्नंतर महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव/सचिव, विधानपरिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष, मा.राज्यपालांचे दोन परिसहायक (Aide-de-camp-ADC), मा.संसदीय कार्य मंत्री, मा.मुख्यमंत्री, राज्यपालांचे सचिव, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन अशा क्रमाने मिरवणूक तयार होऊन ती मुख्य इमारतीतील उद्वाहनाने मध्यवर्ती सभागृहामध्ये प्रस्थान करते. मिरवणूक मध्यवर्ती सभागृहात व्यासपीठालगतच्या प्रवेशमार्गाने प्रवेश करून व्यासपीठाकडे जाते. मिरवणुकीतील अधिकारी हे व्यासपीठाच्या खालील बाजूस त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या आसनांवर स्थानापन्न होतात. राज्यपालांचे आगमन होण्यापूर्वी सर्व सदस्य सभागृहात उपस्थित असतात. राज्यपालांचे सभागृहात आगमन झाल्यानंतर ते आपले आसन ग्रहण करीपर्यंत सभागृहात उपस्थित असलेले सर्व सदस्य त्यांच्या स्थानी उठून उभे राहतात. मध्यवर्ती सभागृहातील पहिल्या दोन रांगांमधील आसने मुख्यमंत्री, विधानसभेचे उपाध्यक्ष व

विधानपरिषदेचे उप सभापती, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, पक्षनेते, पक्ष प्रमुख तसेच अन्य मंत्रीमहोदय यांचेसाठी राखून ठेवण्यात येतात. बाकीचे सदस्य आपापल्या इच्छेनुसार सभागृहात इतरत्र बसतात. राज्यपालांच्या आगमनासंबंधी तसेच तद्नुषंगिक अन्य बाबींची सविस्तर माहिती सर्व सदस्यांना वेगवेगळ्या पत्रकांद्वारे कळविण्यात येते.

मा.राज्यपालांचे अभिभाषण सुरू होण्यापूर्वी व अभिभाषण संपल्यानंतर राष्ट्रगीत लावण्यात येते. त्यावेळी सभागृहातील सर्व उपस्थित त्यांच्या जागी उभे राहतात. अभिभाषण संपल्यानंतर पुर्वीच्या क्रमाने मिरवणूक तयार होऊन मुख्य प्रवेशद्वाराकडे प्रयाण करते. तिथे मा.मुख्यमंत्री, विधानपरिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष, इतर मान्यवर व विधानमंडळाचे प्रधान सचिव/सचिव मा. राज्यपालांना निरोप देतात.

मा.राज्यपालांच्या अभिभाषणात, नजिकच्या भूतकाळात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा आढावा घेतलेला असतो. तसेच, आगामी वर्षातील शासनाची धोरणे व कार्यक्रम, विशेष करून राज्य शासनाच्या धोरणांचे स्थूल स्वरुप व हाती घ्यावयाची महत्त्वाची विधिविधाने सूचित केलेली असतात. अभिभाषण चालू असताना कोणाही सदस्याला सभागृहाबाहेर जाता येत नाही. त्यात अडथळे निर्माण करता येत नाहीत. तसेच, त्याबाबत कोणताही हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

अभिभाषण झाल्यानंतर सर्वसाधारणपणे २० मिनिटांच्या विश्रांतीनंतर दोन्ही सभागृहांच्या वेगवेगळ्या बैठका भरतात. त्यावेळी सभागृहांचे प्रधान सचिव/ सचिव अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवतात. या अभिभाषणाबद्दल राज्यपालांचे आभार मानणारा ठराव सत्तारुढ पक्षाच्या एका सदस्याकडून मांडला जातो व सदरहू सदस्य अभिभाषणातील मुद्यांचा उल्लेख करून शासनाने हाती घेतलेल्या योजना व त्यामुळे होणारी फलनिष्पत्ती याचा उहापोह करून शासकीय ध्येयधोरणांना पाठींबा देतात. प्रस्तावास अनुमोदन देणारे सदस्य देखील भाषण करून प्रस्तावाच्या बाजूने आपली मते व्यक्त करतात. अभिभाषणांवरील आभारप्रदर्शक ठरावावरील चर्चेसाठी सर्वसाधारणपणे दोन दिवस नेमून देण्यात येतात. त्यावेळी सदस्यांना अभिभाषणात समाविष्ट असलेल्या विविध विषयांची चर्चा करण्याची संधी मिळते. तसेच ज्या विषयांना सभागृहात वाचा फोडावयाची असते, परंतु ज्यांचा अभिभाषणात उल्लेख नसतो त्याबाबत उपसूचना (सुधारणा) मांडून नापसंती व्यक्त करण्याची संधी म.वि.स. नियम ६१ अन्वये सर्व सदस्यांना मिळते. (मा. राज्यपालांचे अभिभाषण व अभिभाषणावरील चर्चा (सन १९५२ ते २०२१) बाबतची माहिती **परिशिष्ट क्रमांक १३ व १७** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

परंतु कोणत्याही सदस्याला, दहापेक्षा अधिक सुधारणांची नोटीस पाठविण्यास परवानगी देण्यात येत नाही (म.वि.स. नियम ६१).

१३. दिवसाच्या कामकाजाचा क्रम (Order of Business for the Day) **:-**

विधानसभेमध्ये प्रत्येक दिवशी करावयाच्या कामकाजासंबंधातील बाबी दर्शविणारा दिवसाच्या कामकाजाचा क्रम सर्व सदस्यांना शक्यतोवर आदल्या दिवशीची बैठक संपण्यापूर्वी वितरीत करण्याचा प्रयत्न केला जातो. मा. अध्यक्षांनी म.वि.स. नियम १५ (२) अन्वये अन्यथा निदेश दिला नसेल तर सभागृहाच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील बाबी ठराविक अग्रक्रमाने दर्शविल्या जातात.

१४. सभागृहाची कार्यक्रमपत्रिका (निदेश क्रमांक १) :-

सभागृहात दररोज होणारे कामकाज अध्यक्षांनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, पुढील क्रमवारीनुसार होते :-

(एक) : शपथ घेणे किंवा गांभीर्यपूर्वक दृढकथन करणे.

(दोन) : प्रश्न (अल्पसूचना प्रश्नांसह)

(तीन) : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(चार) : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

(पाच) : मंत्र्यांचा परिचय.

(सहा) : अभिनंदनपर प्रस्ताव.

(सात) : शोक प्रस्ताव.

(आठ) : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

(नऊ) : सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे.

(दहा) : पुरवणी मागण्या सादर करणे.

(अकरा) : अतिरिक्त मागण्या सादर करणे.

(बारा) : राज्यपालांकडून आलेले संदेश कळविणे.

(तेरा) : विधानपरिषदेकडून आलेले संदेश कळविणे.

(चौदा) : विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(पंधरा) : विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(सोळा) : सभागृहाच्या सदस्यांची अटक, स्थानबद्धता, किंवा सुटका,याबाबत दंडाधिकारी किंवा इतर प्राधिकाऱ्यांकडून आलेले संदेश.

(सतरा) : विविध समित्यांचे अहवाल सादर करणे.

(अठरा) : अशासकीय विधेयके व ठराव यासंबंधीच्या समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व त्यास संमती देण्याबाबतचा प्रस्ताव.

(एकोणीस) : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करणे व समितीच्या शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव.

(वीस) : महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १८१ अन्वये समितीपुढे सादर करण्यात आलेला पुरावा सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(एकवीस) : विनंती-अर्ज सादर करणे.

(बावीस) : विशेषाधिकार भंगाचे प्रश्न.

(तेवीस) : नियम ९७ अन्वये प्रस्ताव (स्थगन प्रस्ताव).

(चोवीस) : लक्षवेधी सूचना.

(पंचवीस) : पुरवणी मागण्यांवर चर्चा.

(सव्वीस) : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(सत्तावीस) : अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

(अठ्ठावीस) : अतिरिक्त मागण्यांवर चर्चा.

(एकोणतीस) : सभागृहाच्या बैठकीस सदस्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यासंबंधीची अध्यक्षांची घोषणा.

(तीस) : सभागृहातील सदस्यांचे राजीनामे, सभाध्यक्ष-तालिकेवर नामनिर्देशन, समित्या, इत्यादींसारख्या विविध विषयांसंबंधी अध्यक्षांची घोषणा.

(एकतीस) : अध्यक्षांनी दिलेले निर्णय किंवा केलेल्या घोषणा.

(बत्तीस) : म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्रीमहोदयांचे निवेदन.

(तेहतीस) : म.वि.स. नियम ४८ अन्वये सदस्यांचे वैयक्तिक निवेदन.

(चौतीस) : माजी मंत्र्यांनी आपल्या राजीनाम्याच्या स्पष्टीकरणार्थ केलेले वैयक्तिक निवेदन.

(पस्तीस) : समित्यांच्या निवडणूकीचा प्रस्ताव.

(छत्तीस) : विधेयकासंबंधातील चिकित्सा/संयुक्त समितीचा व विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता मुदतवाढीसंबंधीचा प्रस्ताव.

(सदतीस) : अध्यक्षांना/उपाध्यक्षांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव.

(अडतीस) : मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव.

(एकोणचाळीस) : अल्पकालीन चर्चा.

(चाळीस) : विशेष हक्क समितीच्या अहवालावर विचार करणे.

(एक्केचाळीस) : विधेयके किंवा अहवाल/ वैधानिक प्रस्ताव, अंतिम आठवडा प्रस्ताव इत्यादींसारखे प्रस्ताव यावरील चर्चा.

(बेचाळीस) : अर्धा-तास चर्चा.

(१५) नवीन मंत्र्यांचा परिचय/ सदस्यांचा परिचय/ पोट निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांचा परिचय :-

सभागृहाच्या नेत्याकडून नवीन मंत्र्यांचा परिचय/ सदस्यांचा परिचय/ पोट निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांचा परिचय सभागृहात वेळोवेळी करून दिला जातो.

(१६) सभाध्यक्ष तालिका : (Panel of Chairmen) **(म.वि.स. नियम ८) :—**

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत सभागृहांचे कामकाज चालविण्यासाठी अध्यक्षांना महाराष्ट्र विधानसभा नियम ८ खालील तरतुदीनुसार विधानसभेच्या सदस्यांमधून चाराहून जास्त नाहीत इतक्या सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित करता येते.

(१७) विविध महामंडळे व स्वायत्त संस्थांचे अहवाल सभागृहासमोर ठेवणे :—

राज्य शासनाच्या अखत्यारीतील सार्वजनिक उपक्रमांचे/महामंडळांचे/विद्यापीठांचे वार्षिक व लेखे अहवाल संबंधित अधिनियमातील तरतूदी अन्वये सभागृहासमोर ठेवण्यात येतात. तसेच मा. अध्यक्ष/मा.सभापती यांच्या अनुमतीने असे वार्षिक व लेखे अहवाल विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतात.

(१८) चौकशी अहवाल :—

शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी आयोगाचे अहवाल चौकशी आयोग अधिनियम, १९५२ खालील तरतुदीनुसार सभागृहासमोर ठेवण्यात येतात. अशा काही अहवालांवर सभागृहात चर्चा आयोजित करण्यात येते.

सभागृहात खालील चौकशी अहवालांवर चर्चा झाली :-

अ.क्र.	विषय	अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचा दिनांक	अहवालावर सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
१	मुंबईत डिसेंबर, १९९२ व जानेवारी, १९९३ मध्ये झालेल्या जातीय दंगली व दिनांक १२ मार्च, १९९३ रोजी घडविण्याची आलेल्या बॉम्बस्फोटांची मालिका यांची चौकशी करण्यासाठी नेमलेला चौकशी आयोग.	६ ऑगस्ट १९९८	७ ऑगस्ट १९९८
२	घाटकोपर, मुंबई येथे दिनांक ११ जुलै, १९९८ रोजी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याची झालेली विटंबना, पोलीस गोळीबार यांची चौकशी करण्यासाठी नेमलेला चौकशी आयोग.	३० डिसेंबर, १९९८	३० डिसेंबर, १९९८
३	दिनांक २३ नोव्हेंबर, १९९४ रोजी नागपूर येथील मॉरिस महाविद्यालयाच्या (जूने) जवळ गोवारी मोर्चामध्ये झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी नेमलेला चौकशी आयोग.	३० डिसेंबर, १९९८	३० डिसेंबर, १९९८

(१९) हरकतीचा मुद्दा (Point of Order) **(म.वि.स.नियम ५०) :—**

सभागृहात विशिष्ट वेळी सुरू असलेल्या कामकाजाच्या संदर्भात सदस्यांना हरकतीचा मुद्दा (Point of Order) उपस्थित करता येतो. मात्र तो सभागृहाच्या नियमाचा अर्थ वा त्यांची अंमलबजावणी यांच्याशी किंवा सभागृहाच्या कामकाजासंबंधी, संविधानाच्या तरतुदींशी संबंधित असला पाहिजे तसेच अध्यक्षांनी त्याची दखल घेण्यायोग्य असला पाहिजे. हरकतीचा मुद्दा निकषात बसतो किंवा कसे हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार अध्यक्षांना आहे. त्यावर अध्यक्षांना वाटल्यास संबंधित सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अध्यक्ष आपला निर्णय देतात. अध्यक्षांचा याबाबतचा निर्णय अंतिम असतो व त्यावर चर्चा करता येत नाही. हरकतीचा मुद्दा मान्य होऊन त्यावर बोलणे म्हणजे एक प्रकारे सभागृहासमोरील संपूर्ण कामकाज स्थगित करणे होय. (The Point of order when raised has the effect of suspending the proceedings before the House.) त्यामुळे या हक्काचा वापर करतांना सदस्यांनी अत्यंत काळजीपूर्वक राहिले पाहिजे.

(२०) व्यक्तीविरुद्ध मानहानीकारक वा अपमानास्पद अभिकथन (Allegation against a Person) **(म.वि.स.नियम ३५) :—**

ज्या सदस्यास एखाद्या व्यक्तीवर मानहानीकारक किंवा अपराधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या सदस्याने सायंकाळी ५ वाजेपर्यंत अध्यक्षांस व तसेच चौकशी करून उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यास आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुद्ध मानहानीकारक किंवा अपराधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन करता येणार नाही. मात्र असे विधान/अभिकथन सभागृहाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे किंवा त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून काहीही साध्य होणार नाही असे अध्यक्षांना वाटल्यास सदस्यांना असे विधान करण्यास अध्यक्षांकडून अनुमती दिली जात नाही.

घटनादत्त अधिकारानुसार सभागृहात सदस्यांना भाषण स्वातंत्र्याचा (Freedom of Speech) अधिकार आहे. हा सदस्यांचा विशेषाधिकार आहे. तथापि, हा अधिकार नियम/संविधानातील तरतुदींच्या अधीन राहून वापरावयाचा आहे. सभागृहात या आधारे टीका व आरोप करावयाचे असल्यास सदस्यांनी याबाबत अत्यंत काळजीपूर्वक राहिले पाहिजे. ज्या वस्तुस्थितीच्या/कागदपत्राच्या आधारावर आरोप करावयाचे आहेत त्याचा तपशील, त्याप्रित्यर्थ पुरावे व त्याच्या सत्यतेसंबंधी सदस्यांनी खात्री करून घेतली पाहिजे. याची संपूर्ण जबाबदारी सदस्यांची असते. सदस्यांनी अशा आरोपासंबंधी संपूर्ण चौकशी करणे अभिप्रेत आहे. (A member has to be careful while making an allegation. He has to satisfy himself that the source is reliable and the allegation is based on facts. In effect he is required to make *prima-facie* investigation into the matter before he writes to the Speaker or the Minister and more so, before he speaks in the House.)

मात्र असे विधान सभागृहाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे किंवा त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून काहीही साध्य होणार नाही असे अध्यक्षांना वाटल्यास सदस्यांना असे विधान करण्यास मा.अध्यक्षांकडून अनुमती दिली जात नाही. मा.अध्यक्ष/मंत्री महोदय यांना पूर्वसूचना देऊनच या नियमान्वये आरोप करता येतात व पूर्वसूचना देण्याची संपूर्ण जबाबदारी सदस्यांची आहे.

मा. सदस्यांनी, मा. मंत्री/राज्यमंत्री यांचेवर म.वि.स. नियम ३५ अन्वये अपराधारोपाच्या स्वरूपाचे अभिकथन करण्यासंबंधी मा. अध्यक्षांकडे मागितलेल्या अनुमती संदर्भातील वानगीदाखल उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत :-

(१) मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २००२ रोजीच्या दोन पत्रांद्वारे म.वि.स.नियम ३५ अन्वये राज्यमंत्री श्री. नवाब मलिक तसेच श्री. विजयकुमार गावित यांचेवर अपराधारोपाच्या स्वरुपाचे अभिकथन करण्यासंबंधी अनुमती मागितली होती. परंतु नियमान्वये सूचना आदल्या कामकाजाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत देणे गरजेचे असताना देखील उपरोक्त दोन्ही सूचना आदल्या दिवशी रात्रौ ०८.४५ वाजता कार्यालयास प्राप्त झाल्या. तसेच सूचनेसोबत आवश्यक ती कागदपत्रेही जोडलेली नव्हती. त्यामुळे आरोपासंबंधी तपासणी किंवा शहानिशा करण्यास वाव नव्हता. तसेच हा नियम अंतर्भूत करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ज्या सदस्यांवर आरोप करावयाचा असतो त्याला त्या संबंधात संपूर्ण माहिती, कागदपत्रे, अभिलेख उपलब्ध करून देणे हा होय. अन्यथा, त्याच्यावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही (Denial of natural justice) ही वस्तुस्थिती लक्षात घेता सदरहू दोन्ही सूचना नियमांची पूर्तता करीत नसल्यामुळे अस्वीकृत करण्यात आल्या.

(२) श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे महाराष्ट्र विधानसभेमध्ये सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहात दिनांक २८ जून, २०१९ रोजी होणाऱ्या चर्चेच्या अनुषंगाने म.वि.स नियम ३५ अन्वये श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मा. महसूल व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेवर अपराधारोपाच्या स्वरूपाचे अभिकथन करण्यासंबंधी अनुमती मागितली होती. परंतु नियमान्वये सूचना आदल्या कामकाजाच्या दिवशी म्हणजेच दिनांक २७ जून, २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत देणे गरजेचे असताना देखील सायंकाळी ०६-४० वाजता या कार्यालयात प्राप्त झाली. तसेच म.वि.स. नियम ३५ अन्वये करावयाच्या आरोपात्मक अभिकथनाची संपूर्ण जबाबदारी घेत असल्याचे सूचनेत नमूद करण्यात आले नाही. त्याचप्रमाणे ज्या सदस्यांवर आरोप करावयाचा असतो त्याला आरोपांबाबत संपूर्ण माहिती, कागदपत्रे, अभिलेखे उपलब्ध करून देणे हे आवश्यक आहे अन्यथा त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने या सूचनेची प्रत संबंधित मा. मंत्री यांना माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित केल्याचे सूचनेत नमूद केलेले दिसून येत नाही. सूचनेसोबत मा.सदस्यांनी पुराव्यादाखल (१) उप संचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या अपिलाची प्रत (२) तत्कालीन गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ च्या कलम ३४ खाली पारित केलेले पुनर्विलोकन आदेश. (३) मा. महसूल मंत्री, श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांच्याकडे झालेल्या सुनावणीची व निर्णयाची प्रत जोडलेली होती. मा. महसूल मंत्र्यांनी त्यांना असलेल्या अर्धन्यायिक (Quasi-judicial) अधिकारांचा वापर करून आदेश दिलेला आहे. मा. महसूल मंत्र्यांनी त्या विभागाचे मंत्री या नात्याने प्रकरण हाताळलेले असून या संदर्भात कुठेही गैरव्यवहार झाल्याचे तसेच पदाचा दुरुपयोग केल्याचे सकृतदर्शनी उपलब्ध कागदपत्रांवरून कुठेही दिसून येत नाही अथवा अन्यथा सिद्धही होत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा सखोल विचार करता सदर सूचना ही म.वि.स. नियम ३५ चे निकष पूर्ण करीत नसल्यामुळे अस्वीकृत करण्यात आली.

(२१) वैयक्तिक स्पष्टीकरणे (Personal Explanations) **(म.वि.स. नियम ४८) :—**

कोणत्याही सदस्यांस कोणत्याही वेळी एखाद्या विषयाबाबत सभागृहात वैयक्तिक स्पष्टीकरण (त्यावेळी सभागृहासमोर त्यासंबंधीचा प्रश्न नसला तरीही) करावयाचे असल्यास अध्यक्षांच्या परवानगीने तसे करता येते. मात्र वैयक्तिक स्पष्टीकरणाद्वारे त्यांना कोणताही वादग्रस्त मुद्दा उपस्थित करता येत नाही तसेच अशा स्पष्टीकरणावर कोणतीही चर्चा होत नाही.

(२२) मतमोजणी (Division of Motion) **(डिव्हीजन) (म.वि.स. नियम ४१) :—**

कोणत्याही विषयावर किंवा प्रस्तावावर सभागृहाचा निर्णय मिळवावयाचा असल्यास तो विषय सभागृहाच्या मताला टाकण्यात येतो. त्यासाठी चर्चा संपल्यानंतर अनुकूल असतील त्यांनी "होय" ("Yes") म्हणावे व प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" ("No") म्हणावे अशी घोषणा अध्यक्ष करतात. आवाजी मतदानानुसार अनुकूल किंवा प्रतिकूल मतदान झाले आहे असे अध्यक्षांना वाटेल त्याप्रमाणे ते "होय" ("Ayes") चे बहुमत किंवा "नाही" ("Noes") चे बहुमत असे दोन वेळा घोषित करून आपला निर्णय जाहीर करतात. निर्णय जाहीर होण्यापूर्वी तो मतमोजणी व्हावी (डिव्हिजन) अशी एखाद्या सदस्यांने विनंती केल्यास अध्यक्ष ती विनंती मान्य करतात. मात्र अशी विनंती विनाकारण करण्यात येत आहे असे अध्यक्षांना वाटल्यास ती अमान्य करण्याचे त्यांना अधिकार आहेत. मतमोजणीची मागणी मान्य झाल्यास पाच मिनिटे किंवा अध्यक्षांना वाटल्यास दहा मिनिटांकरिता अखंडपणे सभागृहात घंटा वाजविण्यात येते. (अशाच कारणांकरिता विधानपरिषदेकडे वाजणारी घंटा अखंडपणे न वाजता सुरू झाल्यानंतर क्षणभर थांबून पुन्हा अशा खंडित पद्धतीने ठरलेल्या मुदतीकरिता वाजते.)

सदस्यांनी दोन्ही सभागृहांच्या बाबतीतील हा फरक लक्षात ठेवणे आवश्यक आहे. विधान भवनाच्या परिसरात कोठेही असलेल्या सदस्यांना मतदानासाठी सभागृहात जाता यावे म्हणून ही घंटा सर्वत्र ऐकू येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. घंटा सुरू झाल्यानंतर सभागृहाच्या आतील लॉबीत सदस्यांखेरीज इतर व्यक्ती असल्यास त्यांना ताबडतोब बाहेर जावे लागते. घंटा वाजणे बंद झाल्याबरोबर सभागृहाचे सर्व दरवाजे बंद करण्यात येतात व यानंतर मतमोजणी पूर्ण होईपर्यंत सभागृहाच्या आत वा बाहेर कोणीही जाऊ शकत नाही. तसेच घंटा वाजली नाही किंवा ती ऐकू आली नाही असे वा अन्य स्वरूपाचे हरकतीचे मुद्देदेखिल उपस्थित करता येत नाहीत. तद्नंतर उपस्थित सदस्यांना मतमोजणीसाठी आपल्या जागी उभे राहण्यास सांगण्यात येते. दोन्ही बाजूने मतदान करणाऱ्या सभासदांची संख्या मोजल्यानंतर अध्यक्ष निकाल जाहीर करतात. मतमोजणीची मागणी करणाऱ्या सदस्यांनी विनंती केल्यास त्यांच्या बाजूने मतदान करणाऱ्या सदस्यांची नावे नोंदविण्यात येतात. त्याचप्रमाणे दोन्ही पक्षांच्या सदस्यांना लॉबीमध्ये जाऊन मतनोंदणी करता येते. त्याकरिता सदस्यांना "होय" लॉबी/ "नाही" लॉबीमध्ये जाऊन मत नोंदविण्यात सांगण्यात येते. मतमोजणीसाठी कोणती पद्धत अवलंबावयाची हे ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. **सध्या प्रत्येक सदस्य जागेवर उभे राहून स्वतः संख्या मोजतो. त्या आधारे मतगणना केली जाते.**

(२३) महा अधिवक्ता (Advocate General) **यांची विधिमंडळ सभागृहातील उपस्थिती व त्यांचे कायदेशीर मत जाणून घेणे :—**

राज्यघटनेच्या अनुच्छेद १७७ नुसार राज्याचे महा अधिवक्ता यांना राज्याच्या विधानसभेत, किंवा विधानपरिषद असलेल्या राज्याच्या बाबतीत, दोन्ही सभागृहांत, सभागृहांच्या कोणत्याही संयुक्त बैठकीत आणि ज्या समितीत त्यांचे नाव सदस्य म्हणून घातलेले असेल, अशा कोणत्याही समितीत भाषण करण्याचा आणि अन्यथा त्यांच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क असेल तथापि, त्यांना मतदान करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

When taking part in the Proceedings of the Houses, the Advocate General, cannot be cross-examined on the views expressed by him. However, members may be permitted to ask few questions to seek clarification on some points. No discussion is permissible on the statement made by the Advocate General in the House.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत काही विशेष प्रसंगी राज्याचे तत्कालिन महा अधिवक्ता सभागृहाला कायदेशीर मत देण्यासाठी उपस्थित होते. या संदर्भातील वानगीदाखल काही मोजकी उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) महाराष्ट्र विधिमंडळाचे नागपूर येथील सन, १९६४ चे तिसरे हिवाळी अधिवेशन दिनांक १८ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर, १९६४ या कालावधीत झाले होते. या अधिवेशन कालावधीत दिनांक ०९ डिसेंबर, १९६४ रोजी राज्याचे तत्कालिन महा अधिवक्ता श्री. एच. एम. सिरवाई हे विधानसभा सभागृहात आपले कायदेशीर मत देण्यासाठी उपस्थित होते. उत्तर प्रदेश विधिमंडळ व न्यायमंडळ यांच्यामधील संघर्षासंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर विधानसभेत चर्चा झाली. राज्यघटनेनुसार या देशातील विधिमंडळाला संसदीय लोकशाहीमध्ये कोणत्या प्रकारचे हक्क आहेत आणि त्यांचे कार्यक्षेत्र काय आहे तसेच उच्च न्यायालयाच्या शक्ती आणि त्यांचे कार्यक्षेत्र काय आहे, या संदर्भात कायदेशीर मत देण्यासाठी राज्याचे तत्कालिन महा अधिवक्ता यांनी आपले मत विधानसभा सभागृहात मांडले.

(२) महाराष्ट्र विधिमंडळाचे सन, २००४ चे दुसरे पावसाळी अधिवेशन दिनांक २४ मे ते ११ जून, २००४ या कालावधीत मुंबई येथे झाले होते. या अधिवेशन कालावधीत दिनांक ०३ जून, २००४ रोजी राज्याचे तत्कालिन महा अधिवक्ता श्री. जी. ई. वाहनवटी हे विधानपरिषद सभागृहात आपले कायदेशीर मत देण्यासाठी उपस्थित होते. विधानपरिषद सभागृहात दिनांक ०२ जून, २००४ रोजी अतिरिक्त संकल्पाची कागदपत्रे सभागृहाला देण्याबाबत, वार्षिक वित्तिय विवरणपत्र हे अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करताना द्यावयास पाहिजे व तो घटनात्मक अधिकार आहे. अशी कागदपत्रे न दिल्यास घटनाभंग होतो असे मत काही सदस्यांनी मांडले. त्यावर राज्याचे महा अधिवक्ता यांना सभागृहात पाचारण करून त्यांचेकडून मत घ्यावे अशी मागणी सदस्यांनी केली होती. या संदर्भात कायदेशीर मत देण्यासाठी राज्याचे तत्कालिन महा अधिवक्ता यांनी आपले मत विधानपरिषद सभागृहात मांडले.

*****

प्रकरण चौथे

विविध संसदीय आयुधे

(२४) प्रश्नोत्तरे :—

ब्रिटिश संसदेचे कामकाज विशिष्ट नियमानुसार चालत असे. सभागृहात एखादा प्रस्ताव किंवा उपसूचना असल्याशिवाय सभासदास बोलण्याची परवानगी नसे. सभागृहासमोर आलेल्या विषियांवर त्यास फक्त एकदा बोलण्याची संधी मिळत असे. एखाद्या घटनेची माहिती पाहिजे असल्यास त्यास 'कागदपत्र हजर करण्या'- संबंधी प्रस्ताव मांडावा लागे. असा प्रस्ताव मांडला जात असताना अनेक वेळा संबंधित खात्यांच्या मंत्र्यास उपस्थित राहण्याचे बंधन नसे. यामुळे माहिती मिळण्यासाठी बराच कालावधी लागे. इंग्लंडच्या दक्षिणेकडील देशाशी व्यापार करण्याच्या उद्देशाने अस्तित्त्वात आलेल्या एका कंपनीचे १७२०-२१ मध्ये दिवाळे वाजले व भागधारक असलेल्या असंख्य कुटुंबाना त्यामुळे जबरदस्त आर्थिक फटका बसला. ब्रिटिश संसदेत त्यावेळी प्रचलित असलेल्या कामकाजाच्या नियमाविरुद्ध अर्ल ऑफ कौपर यांनी ०९ फेब्रुवारी, १७२१ रोजी तत्कालीन पंतप्रधान संडरलॅन्ड यांना लॉर्ड्सच्या सभागृहात प्रश्न विचारला तोच विधिमंडळात विचारलेला पहिला प्रश्न ठरला व त्याच प्रश्नामुळे प्रश्नोत्तराची पद्धत जन्मास येऊन विकसित झाली. भारतात १८६१ च्या कौन्सिल ॲक्टनुसार कामकाजास प्रांरभ झाला आणि भारतीय कायदेमंडळात १८९४ मध्ये पहिला प्रश्न विचारण्यात आला.

कार्यकारी प्रशासन यंत्रणेवर (Executive Administration) देखरेख ठेवण्यासाठी (Surveilance) जगातील प्रातिनिधिक संसदीय लोकशाही पद्धत अस्तित्त्वात असणाऱ्या (Representative Parliamentary Democracy) देशात "प्रश्न" या संसदीय आयुधाचा प्रभावीपणे वापर करण्याचे तंत्र विकसित झाले आहे.

लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजाविण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसद/ विधानमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टीने प्रशासनिक कामकाजासंबंधी माहिती प्राप्त करून घेणे (to seek information) हा संसद/विधानमंडळ सदस्यांचा अधिष्ठीत (Inherent) व अनिर्बंध (unfettered) स्वरूपाचा अधिकार आहे.

प्रश्नोत्तराचा तास म्हणजे संसदीय कामकाज पद्धतीमधील सर्वात महत्तवाचा घटक आहे. लोकप्रतिनिधी व मा. मंत्री यांच्यामध्ये प्रत्यक्ष प्रश्नोत्तरांद्वारे चर्चा होत असल्याने व त्या चर्चेचे प्रतिबिंब संपूर्ण राज्यात वृत्तपत्राद्वारे व अन्य प्रसार माध्यमांद्वारे ठळकपणे उमटत असल्यामुळे प्रश्नोत्तरांच्या तासाला अनन्यसाधारण महत्तव आहे.

विधानसभेच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. ह्याबाबतची पद्धती विधानसभा नियमावलीतील नियम क्रमांक ६८ ते ९३ यामध्ये विस्ताराने दिली आहे. राज्यातील जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तसेच राज्याच्या शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनातील उणिवा दूर करून घेण्यासाठी किंवा या उणिवा शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी तथा शासनाची भूमिका समजावून घेण्यासाठी प्रश्नोत्तरे पद्धतीचा उपयोग होतो. पर्यायाने या प्रश्नोत्तरामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत वा कार्यवाहीबाबत तसेच त्यातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने माहिती मिळते असे म्हणणे अप्रस्तुत होणार नाही.

विधानसभेच्या प्रश्न या आयुधाकरिता QIS (Question Information System) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, या संगणकीय प्रणालीद्वारे सदस्यांकडून प्रश्न सूचना स्वीकारणे, प्रश्न सूचना कार्यवाहीत घेणे, सादर करणे, प्रश्न सूचना संबंधित मंत्रालयीन विभागास पाठविणे, विभागाकडून उत्तरे स्वीकारणे, प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट काढणे, तारांकित प्रश्नोत्तरांची यादी तयार करणे इ. सर्व कामकाज करण्यात येते. अशा प्रकारे प्रश्न या आयुधावर संपूर्णतः ऑनलाईन पद्धतीने कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

विधानमंडळात जे प्रश्न विचारले जातात त्यांचे तीन प्रकार असतात :–

(अ) तारांकित प्रश्न

(ब) अल्पसूचना प्रश्न

(क) अतारांकित प्रश्न

(२५) तारांकित प्रश्न :-

ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तरे दिली जातात, अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात. म.वि.स. नियम ७२ (१) नुसार सदस्यांना तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत यादृष्टीने त्यांच्याकडे विधानमंडळ सचिवालयातर्फे अधिवेशनाच्या साधारणतः ४५ दिवस अगोदर तारांकित प्रश्नांचा **'चक्रानुक्रम'** (Roation Order) विधानसभा **पत्रक भाग दोनद्वारे** माहितीसाठी पाठविण्यात येतो तसेच विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येतो व त्याबाबत सर्व सदस्यांना लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येते. राज्य शासनातील सर्व मंत्री महोदयांना त्यांच्या अधीन असलेल्या विभागाशी संबंधित प्रश्नांना सभागृहात उत्तरे देणे सोयीचे व्हावे यादृष्टीने चक्रानुक्रमात सर्व मंत्र्यांची सर्वसाधारणपणे पाच गटात गटवार विभागणी केली जाते व एकाच मंत्र्याला विधानसभा/ विधानपरिषदेत एकाच दिवशी प्रश्नोत्तरासाठी उपस्थित रहावे लागणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येते. अशा प्रकारच्या गटवार विभागणीत गरजेनुसार वेळोवेळी बदल केला जातो. निरनिराळ्या मंत्र्यांकडे असलेल्या विभागासंबंधीचे तारांकित प्रश्न तोंडी उत्तराकरिता कोणत्या दिनांकास घेण्यात येतील, तो दिनांक चक्रानुक्रमात दिलेला असतो. याप्रमाणे आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांसाठी पाच गट तयार केलेले असतात. चक्रानुक्रमात (१) गट क्रमांक, (२) गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री, (३) प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक, (४) प्रश्नाची सूचना विधानमंडळ सचिवालयात मिळण्याचा अखेरचा दिनांक, तसेच मंत्र्यांचे नाव व त्यांच्या अधिनस्त असलेले विभाग यासंबंधीचे विवरण इत्यादी बाबी दर्शविलेल्या असतात. अधिवेशन कालावधीत दर आठवड्याला सोमवारपासून शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठकी असतात त्या प्रत्येक दिवशी सुरूवातीचा एक तास नियमानुसार तारांकित प्रश्नोत्तरांसाठी उपलब्ध असतो (म.वि.स. नियम १७). उपरोक्त एका-एका गटातील मंत्र्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांसंबंधीच्या तारांकित प्रश्नोत्तरांची मुद्रित यादी सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वी दोन तास अगोदर सदस्यांना सभागृहात वितरित करण्यात येते. अधिवेशन कालावधीत एखाद्या दिवशी काही कारणास्तव सभागृहाची बैठक न झाल्यास त्या दिवसाची तारांकित प्रश्नोत्तराची यादी दुसऱ्या दिवशी किंवा मा.अध्यक्ष यांनी नेमून दिलेल्या लगतच्या पुढील उपलब्ध दिवशी प्रश्नोत्तराच्या तासानंतर विधिमंडळ सचिवांकडून सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते.

तारांकित प्रश्नाच्या उत्तरावर मा.अध्यक्षांच्या परवानगीने सदस्यांना संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांस पुरवणी प्रश्न विचारुन अधिक खुलासा वा स्पष्टीकरणही प्राप्त करून घेता येते. कोणत्याही सदस्याला एका दिवसाकरिता पाच तारांकित प्रश्न उपस्थित करता येतात, त्यापैकी कमाल तीन तारांकित स्वीकृत प्रश्नांचा तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समावेश करता येतो. सभागृहात आपल्या तारांकित प्रश्नांची उत्तरे कोणत्या अग्रक्रमाने हवीत तो क्रमही तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांनी नमूद करणे आवश्यक आहे. असा क्रम नमूद केला नसेल तर त्या दिवसाकरिता त्या सदस्यांचे प्रश्न ज्या क्रमाने विधानमंडळ सचिवालयाकडे प्राप्त झालेले असतील त्याच क्रमाने त्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत दर्शविण्यात येतात **(म.वि.स. नियम ७७ (३)).** अध्यक्षांना योग्य वाटल्यास, तारांकित प्रश्नांची सूचना देणाऱ्या सदस्यास प्रश्नाला तोंडी उत्तरच का हवे, ह्याची कारणे थोडक्यात नमूद करण्यास सांगता येते आणि त्या कारणांचा विचार केल्यानंतर त्या प्रश्नांचा समावेश तारांकित किंवा अतारांकित प्रश्नांच्या यादीत करण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतात **(म.वि.स. नियम ७३).** तारांकित प्रश्नाचे उत्तर ज्या दिनांकास हवे असेल **त्याच्या ३० दिवस अगोदर** अशा प्रश्नांची सूचना मा.सदस्यांकडून विधानमंडळ सचिवालयास QIS या संगणकीय प्रणालीद्वारे मिळणे आवश्यक आहे. **(म.वि.स. नियम ७४)** तसेच सदर प्रश्न देताना सदस्यांनी कोणत्या मंत्र्याला उद्देशून प्रश्न विचारला आहे हे देखील त्या सूचनेत नमूद करणे आवश्यक आहे.

(२६) अल्पसूचना प्रश्न :-

एखाद्या सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नाचे उत्तर मा.सदस्यांना ताबडतोब पाहिजे असल्यास सदस्यांनी त्याबाबत QIS या संगणकीय प्रणालीद्वारे सूचना दिली पाहिजे. अशी सूचना अधिवेशनाच्या किंवा स्थगित केलेल्या अधिवेशनाच्या **प्रारंभापूर्वी ७ दिवसांच्या** अगोदरची नसावी **(म.वि.स नियम ८६ (१)).** अल्पसूचना प्रश्नावर तारांकित प्रश्नाप्रमाणे पुरवणी प्रश्न विचारता येतो. असे प्रश्न तातडीने उपस्थित झालेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर असले पाहिजेत. अल्पसूचना प्रश्नाची सूचना देताना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे, याचे स्पष्टीकरणही सूचनेमध्ये नमूद करणे आवश्यक असते व त्यानंतर ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे तो थोडक्यात व मुद्देसूदपणे विचारणे आवश्यक आहे. अल्पसूचना प्रश्नाद्वारे विचारलेली माहिती बृहन्मुंबईच्या हद्दीतील माहितीसंबंधी असल्यास, **प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत व ती माहिती बृहन्मुंबईच्या बाहेरील असल्यास १४ दिवसांच्या आत** प्रश्नाचे उत्तर देणे विभागास आवश्यक आहे **(म.वि.स. नियम ८६ (४)).** असा प्रश्न मा.अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधित मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते. संबंधित मंत्री तयार असल्यास व त्यास मा.अध्यक्ष महोदयांनी अनुमती दिल्यास मंत्र्यांना सोईस्कर असेल अशा कोणत्याही दिवशी सदरहू अल्पसूचना प्रश्न त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात समाविष्ट करण्यात येतो. असा प्रश्न त्या दिवासाच्या कामकाजामध्ये तारांकित प्रश्नोत्तरांच्या अगोदर सभागृहात उपस्थित करण्यात येतो व त्यावर तारांकित प्रश्नाप्रमाणेच अनुपूरक प्रश्नोत्तरे होतात.

(२७) अतारांकित प्रश्न :-

जेव्हा सदस्यांना त्यांच्या प्रश्नांना फक्त लेखी स्वरुपात माहितीवजा किंवा विस्तृत आकडेवारी अशा स्वरुपाची उत्तरे हवी असतील अशा वेळी मा.सदस्य अतारांकित प्रश्नांची सूचना देऊ शकतात. अशा प्रश्नांची सूचना देण्याकरिता कोणताही कालावधी विहीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे अतारांकित प्रश्नाच्या सूचना मा.सदस्य वर्षभरात सत्र व निःसत्र कालावधीत केव्हाही देऊ शकतात. मा.अध्यक्षांनी स्वीकृत केलेले अतारांकित प्रश्न शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविल्यानंतर, प्रश्न विभागाला मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्याचे उत्तर संबंधित विभागाने देणे आवश्यक आहे. **(म.वि.स. नियम ७२ (२))** विभागाकडून प्राप्त झालेली प्रश्नांची उत्तरे विधानमंडळ सचिवालयामार्फत संकलित केली जातात व ५० प्रश्नोत्तरांची प्रत्येकी एक यादी याप्रमाणे मुद्रीत करून सदर यादी 'अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी' या शीर्षकाखाली समाविष्ट करून सचिवांकडून सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते. तद्नंतर निःसत्र कालावधीत प्रत्येक १५ दिवसांनी किंवा दर महिन्याला सदरहू प्रश्नोत्तरांची यादी मा.अध्यक्षांना सादर केल्यानंतर, मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार सदस्यांना विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येतात व तसे सदस्यांना लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येते.

जे प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नांच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्यामुळे उत्तरीत होऊ शकले नाहीत असे प्रश्न अतारांकित समजले जातात व त्यांची उत्तरे त्या दिवसाच्या विधानसभेच्या कार्यवाहीत छापली जातात (म.वि.स. नियम ८०).

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी सचिव सभागृहाच्या पटलावर ठेवतात.

(२८) कोणते प्रश्न स्वीकृत होतात ? :-

तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम सदस्यांना पाठविण्यात आल्यानंतर तारांकित प्रश्नांची सूचना विधानमंडळ सचिवालयाकडे सदस्य पाठवित असतात. तारांकित प्रश्न स्वीकृत होण्यासाठी जो प्रश्न विचारला जातो त्या प्रश्नातील विषयाबाबत राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार असणे, प्रश्नाधीन विषय सार्वजनिक महत्त्वाचा व तातडीचा असणे, प्रश्नाधीन विषय संबंधित मंत्र्याच्या अधिकारकक्षेतील असणे व प्रश्नाला वस्तुस्थितीचा आधार असणे आवश्यक आहे.

राज्य शासनाची जबाबदारी, विविध अधिनियम व नियमांद्वारे राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या अधिकाराच्या व मर्यादेच्या अनुषंगाने आजमावली जाते.

विद्यापीठे, स्वायत्त संस्था यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंबंधी तसेच राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या विषयासंबंधीचे प्रश्न स्वीकृतीचे वेळी तत्संबंधी करण्यात आलेल्या कायद्यातील तरतुदी, शासनाचे नियंत्रण वा जबाबदारी व संबंध ह्यांचा परामर्श घेऊन सार्वजनिक महत्त्वही लक्षात घेतले जाते.

राज्य लोकसेवा आयोग, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्य शेती महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, खादी

ग्रामोद्योग मंडळ यासारख्या स्वतंत्र, स्वायत्त व वैधानिक संस्था यासंबंधीच्या प्रश्नांच्या स्वीकृतीच्या वेळी त्या-त्या बाबतीतील उपरोक्त संस्थावरील शासनाचे नियंत्रण, जबाबदारी व संबंध आदी बाबी विचारात घेतल्या जातात. उच्च न्यायालय व धर्मादाय आयुक्त यांच्या कक्षेतील विषयाबाबत राज्य शासनाची जबाबदारी येत नसल्यामुळे तसेच न्यायिक प्रक्रियेच्या संदर्भात शासनाने हस्तक्षेप करणे उचित नाही म्हणून सर्वसाधारणपणे उच्च न्यायालय तसेच धर्मादाय आयुक्त यांच्या संदर्भातील प्रश्न स्वीकारले जात नाहीत.

केंद्र शासन पुरस्कृत काही योजना राज्य शासनाकडे राबविण्यासाठी दिल्या असतील तर त्याबाबतचे प्रश्न (उदा. राज्य कामगार विमा योजना) त्या विषयाबाबत राज्य शासनाची असलेली जबाबदारी आणि नियंत्रण याचा विचार करून प्रश्न स्वीकृत अगर अस्वीकृत केले जातात.

सर्वसाधारणतः व्यक्तिगत तक्रारींच्या स्वरुपाचे प्रश्न अस्वीकार्य ठरतात. परंतु, व्यक्तिगत स्वरुपाच्या प्रश्नांत सार्वजनिक महत्त्व असेल किंवा एखादे तत्त्व किंवा धोरण समाविष्ट असेल तर प्रश्न स्वीकारतेवेळी मा.अध्यक्षांकडून वेगळा विचार केला जाऊ शकतो.

काही प्रश्न सभागृहापुढे येण्याच्या दृष्टीने गौण सार्वजनिक महत्त्वाचे असतात. अशा प्रश्नांच्या बाबतीत अध्यक्षांनी प्रश्नाधीन बाब गौण सार्वजनिक महत्त्वाची म्हणून सदस्यांनी प्रथम संबंधित मंत्रिमहोदयांकडे जाऊन दाद मागावी असे आदेश दिले असतील तर अशा प्रश्नांच्या बाबतीत प्रथम सदस्यांनी मंत्र्याकडे जाऊन त्याबाबत दाद मागावी लागते. याबाबत सदस्यांना माहिती देण्यासंबंधी शासनाद्वारे विविध विभागांना सूचनाही दिल्या गेलेल्या आहेत. सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशानुसार मंत्र्यांकडे सदर प्रकरण नेल्यावरही दाद लागली नाही तर अशा प्रश्नावर अध्यक्षांना स्वीकृतीबाबत फेरविचार करता येतो.

एखाद्या अधिवेशनासाठी स्वीकृत झालेले तारांकित वा अल्पसूचना प्रश्न तसेच इतर सूचना अधिवेशनाच्या समाप्तीनंतर व्यपगत होतात (म.वि.स. नियम २०). पुढील अधिवेशनासाठी वाटल्यास, सदस्य अशा प्रश्नांची फेरसूचना देऊ शकतात.

(२९) प्रश्न अस्वीकृत केव्हा होतात ? :-

आपले प्रश्न अध्यक्षांनी अस्वीकृत करु नयेत असे सदस्यांना वाटणे स्वाभाविक आहे. तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांनी खालील गोष्टींचे पथ्य पाळल्यास सदस्यांचे प्रश्न स्वीकृत होण्यास मदत होईल. साधारणतः प्रश्न अस्वीकृत होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

(१) प्रश्नोक्त विषयाबाबत राज्य शासनाची प्रामुख्याने जबाबदारी नसेल तर,

(२) प्रश्नाला वस्तुस्थितीचा आधार नसेल तर,

(३) प्रश्न फारच सर्वसाधारण स्वरुपाचा क्षुल्लक, वादात्मक, प्रश्नोत्तर मर्यादेच्या दृष्टीने व्यापक, अकालिक (प्रिमॅच्युअर), संदिग्ध व कायद्याबाबत शासनाचे मत विचारणारा, तसेच सूचनात्मक वा वृत्तपत्रातील बातम्यांचा पडताळा पाहणारा असेल तर,

(४) प्रश्नाधीन विषय व्यक्तिगत स्वरुपाचा असेल तर,

(५) प्रश्नाधीन विषयाचे स्वरुप मूलतः गोपनीय असेल तर,

(६) प्रश्नाधीन विषय केंद्र शासनाच्या, उच्च न्यायालयाच्या, राज्य लोकसेवा आयोगाच्या, मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या, जिल्हा परिषदेच्या, महानगरपालिकेच्या, नगरपरिषदेच्या, अधिकार क्षेत्रातील असेल व त्यास राज्य शासन जबाबदार नसेल तर, तसेच प्रश्नाधीन विषय राज्य परिवहन महामंडळ नियंत्रित मर्यादित कंपन्या यांच्या दैनदिन अंतर्गत कारभारासंबंधी असेल तर, प्रश्नाधीन विषय विश्वस्त (ट्रस्ट), स्वायत्त (ऑटोनॉमस), वैधानिक (स्टॅच्युटरी) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असेल तर,

(७) प्रश्नामध्ये विचारलेली माहिती शासनाने प्रकाशित केलेले संदर्भ ग्रंथ, अहवाल इत्यादींमध्ये प्रकाशित झाली असून ती सहज उपलब्ध होण्यासारखी असेल तर,

(८) प्रश्नामध्ये विचारलेली माहिती पूर्वी विचारलेल्या प्रश्नोत्तरामध्ये समाविष्ट झालेली असेल तर,

(९) प्रश्नातील माहिती अध्यक्षांच्या अखत्यारितील विधानमंडळ सचिवालयासंबंधी व विधानमंडळाच्या कोणत्याही समिती समोरील विषयासंबंधात असेल तर,

(१०) न्यायप्रविष्ट बाबींबाबत प्रश्न विचारला असेल तर,

(११) अल्प-सूचना प्रश्नाला तातडी नसेल तर,

(३०) प्रश्न विचारताना सदस्यांनी घ्यावयाची दक्षता :—

सदस्यांना प्रश्नाची सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग व प्रत्येक विभागाकडे सोपविलेले विषय याबाबतची माहिती असलेल्या 'महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडे सोपविलेले विषय' या पुस्तिकेच्या प्रती सदस्यांना वितरीत करण्यात येतात, त्याचा त्यांनी प्रश्न देताना अवश्य उपयोग करावा. प्रत्येक प्रश्न हा शासनाच्या एकाच विभागाशी संबंधित असावा, त्यात एकापेक्षा अधिक विषय आणू नयेत. तो सुस्पष्ट, सुसंबद्ध, मुद्देसूद व सुटसुटीत असावा आणि प्रश्नाची सूचना मा.सदस्यांकडून विधानमंडळ सचिवालयास QIS या संगणकीय प्रणालीद्वारे मिळणे आवश्यक आहे.

कोणत्याही प्रश्नाची सूचना देताना, आपल्या प्रश्न सूचनेत खालील बाबींचा प्रामुख्याने उल्लेख करून प्रश्न सूचना दिल्यास त्यांचे प्रश्न गुणवत्तेवर स्वीकृत होऊ शकतात.

उदा. (१) प्रश्नात उल्लेखित निवेदन कोणी, कोणास व केव्हा दिले याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

(२) प्रश्नाधीन घटना नक्की कोणत्या गावात/तालुक्यात/जिल्ह्यात आणि निश्चित केव्हा घडली आहे याचा दिनांकासह उल्लेख असावा.

(३) प्रश्नाद्वारे निश्चित कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे तो कालावधी प्रश्नसूचनेत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्नामध्ये उल्लेखित मागणी अथवा तक्रार 'शासनाकडे केली आहे' असा उल्लेख केला जातो. प्रश्न स्वीकृत होण्यासाठी प्रश्नात उल्लेखित मागणी अथवा तक्रार कोणी, नक्की केव्हा म्हणजे कोणत्या दिनांकास आणि शासनाच्या निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

(५) एखाद्याप्रश्नात गैरव्यवहार/भ्रष्टाचार याबाबत उल्लेख केला असल्यास या गैरव्यवहाराचे/भ्रष्टाचाराचे स्वरुप काय आहे, त्यामध्ये गुंतलेले कर्मचारी/अधिकारी कोण आहेत, गैरव्यवहार/भ्रष्टाचाराबाबत कोणी केव्हा तक्रार केली अथवा घटना केव्हा उघडकीस आली, त्यामध्ये अंदाजे किती रक्कमेचा गैरव्यवहार/भ्रष्टाचार झाला आहे इत्यादीबाबत स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. सदस्यांनी आपल्या प्रश्न सूचनेत उक्त बाबींचा प्रामुख्याने उल्लेख केला नसल्यास प्रश्नाचे स्वरुप (तारांकित प्रश्न, अल्प सूचना प्रश्न, अतारांकित प्रश्न) निश्चित करण्यासाठी सदस्यांकडून साधारणतः खालील मुद्द्यांबाबत खुलासा मागविण्यात येतो :–

(१) आपली नक्की तक्रार काय आहे?

(२) प्रश्न विचारण्यामागे आपला निश्चित हेतू कोणता आहे?

(३) प्रश्नाचे तोंडीच उत्तर आपणास का हवे आहे?

(४) प्रश्न नक्की कोणत्या गावातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील आहे?

(५) प्रश्नाधीन माहिती निश्चित कोणत्या कालावधीची हवी आहे?

(६) प्रश्नाधीन घटना केव्हा घडली आहे?

(७) नियम ७० (२) अन्वये प्रश्नावरील विधानाच्या सत्यतेबाबत आपण जबाबदारी घेण्यास तयार आहात काय?

(८) प्रश्नाधीन मागणी कोणी, केव्हा व शासनाकडे म्हणजे निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे?

(९) प्रश्नाधीन माहिती पूर्वी दिलेल्या उत्तरात समाविष्ट असल्यास सदरहू प्रश्नाबाबत आपला आग्रह आहे काय? असल्यास, कोणत्या मुद्द्यांबाबत? इत्यादी.

एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत सदस्यांकडून काही खुलासा मागविला असेल आणि सदस्यांकडून त्या खुलाशाचे उत्तर आले नाही किंवा उत्तर इतक्या उशिराने आले असेल की, ते विचारात घेता येणे आणि जो प्रश्न स्वीकृत करण्यात आला तर समुचित दिनांकाच्या प्रश्नांच्या यादीत समाविष्ट करणे शक्य नसेल तर, असे प्रश्न व्यपगत ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. (नियम ८५)

(३१) बॅलट :-

अधिवेशनात प्रश्नोत्तरासाठी नेमून दिलेल्या प्रत्येक आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलट त्यापूर्वीच्या **आठवड्यातील सोमवारी संध्याकाळी ४.०० वाजता** QIS या संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात येते. सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास, त्याच्या आधीच्या आठवड्यातील कामकाजाच्या शेवटच्या दिवशी संध्याकाळी ४.०० वाजता सदस्यनिहाय बॅलट घेण्यात येते. यासंबंधात सदस्यांना **पत्रक भाग दोन द्वारे व लघुसंदेशाद्वारे** (SMS) आगाऊ माहिती दिली जाते.

(३२) प्रश्न सूची :-

एखाद्या विशिष्ट दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये आपला प्रश्न कोणत्या क्रमांकावर आहे याबाबत सदस्यांना पूर्वकल्पना यावी तसेच त्या संबंधित दिवशी त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहावे, चर्चेत भाग घेता यावा, तसेच अनुपूरक प्रश्नाद्वारे अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नाच्या संदर्भातील पूर्वतयारी करता यावी यासाठी प्रश्नोत्तराच्या दिनांकाच्या आदल्या दिवशी संबंधित तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रश्नांचा अनुक्रमांक, प्रश्न क्रमांक, प्रश्न विचारणारे सदस्य व प्रश्नाचा विषय इत्यादी माहिती समाविष्ट असलेली प्रश्नसूची मा.सदस्यांना वितरित केली जाते तसेच विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येते.

"प्रत्येक दिवसाच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील प्रश्न बॅलटद्वारे ठरवलेल्या प्राथम्यक्रमांनुसार दर्शविण्यात येतात."

(३३) सभागृहातील प्रश्न पद्धती :-

विधानसभेच्या कामकाजाच्या कार्यक्रमपत्रिकेत प्रश्नोत्तरे या शीर्षकाखाली :–

(१) अल्प-सूचना प्रश्न,

(२) तारांकित प्रश्न,

(३) सुधारीत व पुनरीक्षित उत्तर,

(४) अधिक माहिती,

(५) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी.

अशा पद्धतीने प्रश्नोत्तरासंबंधातील बाबींचा क्रम दर्शविण्यात आलेला असतो. सुरुवातीला अल्प सूचना प्रश्न असल्यास ते घेण्यात येतात व त्यानंतर तारांकित प्रश्न घेण्यात येतात. यादीतील प्रश्न सदस्यांनी दिलेल्या अग्रक्रमानुसार पहिली, दुसरी व तिसरी अशा फेऱ्यामधून घेण्यात येतात. एका दिवसाची सर्व प्रश्नांची उत्तरे एका यादीत छापलेली असतात. ज्या प्रश्नांची उत्तरे शासनाकडून उशीरा आलेली असतात ती चक्रमुद्रित स्वरुपात सदस्यांना वितरीत करण्यात येतात. प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वी दोन तास अगोदर सदस्यांना पुरविण्यात येते. प्रश्न पद्धती महाराष्ट्र विधानसभा नियमावलीत नियम क्रमांक ८२, ८४, ८६, ८८, ९० व ९१ मध्ये दर्शविलेली आहे. तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमानुसार पुकारले जातात. त्यावेळी ज्या सदस्यांचे नाव पुकारण्यात आले असेल तो सदस्य जागेवर उभा राहून फक्त प्रश्न क्रमांक वाचतो. त्यानंतर संबंधित मंत्री "प्रस्तुत केल्याप्रमाणे" किंवा "यथास्थिती छापल्याप्रमाणे" किंवा "वितरीत केल्याप्रमाणे" वा "सुधारणा केल्याप्रमाणे" असे उच्चारतात त्यानंतर त्या प्रश्नावर अनुपूरक प्रश्न विचारण्यात येतात. अध्यक्षांनी अनुपूरक प्रश्न विचारण्यासाठी ज्या सदस्याला परवानगी दिली असेल त्यानेच अनुपूरक प्रश्न विचारावयाचे असतात. प्रश्न मुद्देसूद व थोडक्यात विचारला जाणे अभिप्रेत असते. प्रश्न पुकारला गेल्यानंतर एखादा सदस्य अनुपस्थित असेल तर प्रश्न यादीतील संपूर्ण प्रश्न म्हणजे तिन्ही फेऱ्या झाल्यानंतर व प्रश्नोत्तराचा कालावधी शिल्लक असल्यास घेण्यात येतो. अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांना अध्यक्षांकडे पूर्वसूचना देऊन आपल्याऐवजी दुसऱ्या सदस्यास प्रश्न

विचारण्याचा अधिकार देता येतो. तथापि, असे प्रश्न तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील तिसरी फेरी झाल्यानंतर वेळ उपलब्ध असल्यास पुकारले जातात. प्रत्येक सदस्याच्या कमाल ३ तारांकित स्वीकृत प्रश्नांचा तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत असल्यामुळे, प्रश्नोत्तराच्या एका यादीत सदस्यांचे त्या दिवसासाठी तीन प्रश्न असल्यास त्या यादीत प्रश्नांच्या तीन फेऱ्या दर्शविण्यात येतात.

(३४) अधिक माहिती :-

एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी मंत्र्यांनी अधिक माहिती सभागृहात देण्यासंबंधीचे आश्वासन दिले असेल अथवा मा.अध्यक्षांनी मंत्र्यांना अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्याचा निदेश दिला असेल तर, त्याप्रमाणे सभागृहासमोर अधिक माहिती ठेवण्यात येते. अधिक माहितीवर पुन्हा अनुपूरक प्रश्न विचारले जात नाहीत.

(३५) पुनरीक्षित उत्तर :-

प्रश्नोत्तराच्या वेळी एखाद्या प्रश्नाचे दिले गेलेले उत्तर बरोबर नाही असे निदर्शनास आले वा आणले तर त्यांचे सुधारित उत्तर वा उत्तराची दुरुस्ती सभागृहासमोर ठेवण्यात येते. अशा प्रश्नावर पुन्हा अनुपूरक प्रश्न विचारले जात नाहीत.

कोणताही प्रश्न सहसा राखून ठेवला जात नाही. तथापि, एखादा प्रश्न ठेवण्यात आल्यास, सदरहू प्रश्न मा.अध्यक्ष निदेश देतील त्या दिवशी तो उत्तरासाठी पुन्हा घेण्यात येतो आणि दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात सदरहू प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात चर्चेसाठी सर्वप्रथम दर्शविण्यात येतो.

(३६) खाजगी सदस्यास उद्देशून प्रश्न :-

एखाद्या सदस्याने विधेयकाची किंवा प्रस्तावाची सूचना दिलेली असल्यास त्यासंबंधी माहिती मिळविण्याकरिता अशा सदस्यास उद्देशून प्रश्न विचारण्यासाठी सूचना देता येते. [म.वि.स. नियम ९३ (१)] अशा प्रश्नोत्तराची पद्धती अध्यक्ष ठरवितात.

(३७) प्रस्ताव-(म.वि.स. नियम २३ अन्वये) :-

सभागृहामध्ये त्रिस्तरीय कामकाज चालते. वैधानिक (विधिविधान), आर्थिक (अंदाजपत्रक, पुरवणी मागण्या इ.) व सर्वसाधारण टिकात्मक (प्रस्ताव, ठराव इ.) त्यादृष्टीने विविध विषयांवर विचारविनिमय (Deliberation) करणे हे विधानसभेचे महत्त्वाचे कार्य आहे. किंबहुना विचारविनिमयातून निष्कर्ष काढणे (Decision through Deliberations) हा संसदीय लोकशाहीचा गाभा आहे. या दृष्टीने सभागृहात विविध विषयांवर चर्चा करणे/ विचार करणे या बाबीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सभागृहात प्रतिनिधीत्त्व करणारे सदस्य निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालीचे तसेच समाजातील विविधस्तराचे प्रतिनिधीत्त्व करतात. तथापि, प्रत्येक सदस्यांचे मत घेऊन त्याआधारे सभागृहाचे एकमत होणे कठीण असते. एखाद्या विषयावर सभागृहाचे मत अजमावण्यासाठी तसेच त्याबाबत निर्णय जाणून घेण्यासाठी सदस्यांमार्फत त्यांचे मत व अपेक्षा प्रदर्शित करणारा प्रस्ताव सभागृहासमोर

विचारार्थ आणला जातो. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन वा अन्यथा सभागृहाने तो स्वीकारल्यास, तो प्रस्ताव सभागृहाचे मत वा इच्छा म्हणून समजला जातो. सभागृहाचे मत अजमाविण्यासाठी कोणताही विषय सभागृहासमोर प्रस्तावाच्या माध्यमातून येणे अत्यावश्यक आहे. सार्वजनिक हिताच्या बाबीसंबंधी चर्चा, अध्यक्षांच्या संमतीने आणलेल्या प्रस्तावाव्यतिरिक्त करता कामा नये अशी स्पष्ट तरतूद नियमात आहे.

प्रस्तावावरील चर्चेचे सर्वसाधारणपणे चार भाग असतात :-

(१) प्रस्ताव मांडणे (Moving the Motion)

(२) प्रश्न मा. अध्यक्षांनी सभागृहासमोर ठेवणे (Processing the Question)

(३) चर्चा (Discussion)

(४) मतदान व सभागृहाचा निर्णय (Voting and Decision of House)

सर्वसाधारणपणे प्रस्तावाचे तीन भाग असतात :-

(१) मूळ प्रस्ताव (Substantive motion)

(२) बदली प्रस्ताव (Substitute motion)

(३) अंगभूत प्रस्ताव (Subsidiary motion)

महाराष्ट्र विधानसभा नियमात अंतर्भूत केल्याप्रमाणे सभागृहात विविध प्रस्तावांद्वारे वेगवेगळे विषय हाताळले जातात. या प्रस्तावांबाबतचे नियम व निकष वेगवेगळे आहेत. या संदर्भातील उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) अध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव (म.वि.स. नियम ११ अन्वये)

(२) अभिनंदनपर किंवा शोक प्रस्ताव (म.वि.स. नियम १४ अन्वये)

(३) विश्वासदर्शक प्रस्ताव (म.वि.स. नियम २३ अन्वये)

(४) अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये)

(५) मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (म.वि.स. नियम ९५ अन्वये)

(६) स्थगन प्रस्ताव (म.वि.स. नियम ९७ अन्वये)

(७) अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये)

(८) समिती नियुक्त करण्यासंबंधातील प्रस्ताव (म.वि.स. नियम १९४ अन्वये)

(९) संविधिक प्रस्ताव (म.वि.स. नियम २९० अन्वये)

(१०) अंतिम आठवडा प्रस्ताव (म.वि.स. नियम २९२ अन्वये)

(११) सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा (म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(३८) स्थगन प्रस्ताव (Adjournment Motion) **(महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वये) :-**

सर्वसाधारणपणे सभागृहाचे कामकाज, कामकाजपत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबींप्रमाणे चालते. परंतू बऱ्याच वेळा राज्यात अशी काही गंभीर व तातडीची परिस्थिती निर्माण होते की, त्याबाबतची तातडीने दखल घेणे शक्य होत नाही याचे कारण प्रश्न, ठराव, प्रस्ताव वा इतर संसदीय आयुधांच्या संदर्भात विधानसभा नियमातील तरतुदींमुळे याबाबत अगोदर पूर्वसूचना देणे आवश्यक/बंधनकारक असते. आकस्मिकरित्या उद्‌भवणाऱ्या परिस्थितीमुळे अशा बाबी सभागृहात तातडीने चर्चेला येणे अतिशय आवश्यक असते. कारण राज्यात जनतेच्या हिताच्या दृष्टीने तातडीने उद्‌भवलेल्या घटनेचे पडसाद लोकनियुक्त सभागृहात उमटणे हे लोकशाही राज्यव्यवस्थेत अपरिहार्य आहे. उदा. राज्यात अचानक झालेला भूकंप व त्यात मोठ्या प्रमाणात मृत्यू पावलेल्यांची संख्या, एखादा मोठा बस अपघात होऊन त्यात अनेक माणसे मृत्युमूखी पडणे, पोलीस कोठडीत झालेला मृत्यू, पोलीस गोळीबारात झालेला मृत्यू, बॉम्बस्फोट अशा या सर्व अचानक घडलेल्या बाबींचे/घटनांचे प्रतिबिंब त्याच दिवशी सभागृहात उमटणे आवश्यक असते व त्यासाठी सभागृहासमोरील सर्व कामकाज बाजूला सारुन अशा विषयांवर चर्चा करण्यासाठी"स्थगन प्रस्ताव' या संसदीय आयुधाचा वापर केला जातो. या आयुधाचा मुख्य उद्देश अतिशय तातडीच्या व नुकत्याच घडलेल्या बाबींकडे/घटनांकडे सभागृहासमोरील नियमित कामकाज बाजूला सारुन सभागृहाचे लक्ष वेधणे हा आहे. संसदीय कार्यपद्धतीमध्ये या संसदीय आयुधाचे स्वरुप शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे (Censure Motion) निंदाव्यंजक अशा स्वरुपाचे असल्याचे मानले जाते. त्यामुळे या आयुधाचा वापर अतिशय काटेकोरपणे व गांभीर्याने करण्याची निकड आहे. तसेच अतिशय असाधारण तातडीची व गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याखेरीज व शासनाचे अपयश असल्याखेरीज या आयुधाचा वापर करणे योग्य होणार नाही. ही बाब मुद्दाम सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

विधानसभा नियमात नियम ९७ अन्वये यासंबंधातील तरतुदी केलेल्या आहेत. तातडीच्या म्हणजे नुकत्याच घडलेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या एखाद्या विशिष्ट विषयावर सभागृहासमोर असलेले सर्व विहित कामकाज बाजूला करून चर्चा करण्यासाठी जो प्रस्ताव मांडावयाचा असतो त्याला स्थगन प्रस्ताव असे म्हणतात. सभागृहाची नियमित बैठक सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर AMOIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे (WEB PORTAL) **संपूर्णतः ऑनलाईन** (Online) पद्धतीने स्वीकारण्यात येतात. तसेच सदर सूचनेची प्रत मा. अध्यक्ष, विधानसभा व संबंधित मंत्री यांनाही देणे आवश्यक आहे. ऑफलाईन पद्धतीने आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.

सभागृहात हा प्रस्ताव मांडण्यापूर्वी अध्यक्षांची त्यास अनुमती मिळणे आवश्यक आहे. ज्या प्रस्तावांना अध्यक्ष अनुमती नाकारतात अशा प्रस्तावांबाबत अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास त्या प्रस्तावांच्या सूचना सभागृहात वाचून निर्णय देतात. एखाद्या सूचनेमध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती सुस्पष्ट होत नसेल तर त्या संबंधातील अधिक माहिती त्त्वरित मिळविण्यासाठी अध्यक्ष त्या विषयाबाबतचा निर्णय राखून ठेवतात व अधिक माहिती प्राप्त झाल्यावर त्याबाबत आपला निर्णय जाहीर करतात. तसेच ज्या सूचना स्थगन प्रस्तावाच्या निकषांत बसत नाही परंतु तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या असतात त्याबाबत सभागृहात निवेदन करण्याचे निदेश देखील अध्यक्ष संबंधित मंत्र्यांना देऊ शकतात. ज्या सदस्याच्या प्रस्तावाला संमती देण्यात येते त्या सदस्याने सभागृहाच्या

अनुमतीसाठी प्रस्ताव मांडल्यानंतर २९ सदस्य उभे राहिल्यास 'सभागृहाची अनुमती आहे' किंवा २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास 'सभागृहाची अनुमती नाही' असे अध्यक्ष जाहीर करतात.

तद्नंतर सभागृहाच्या त्या बैठकीचे शेवटचे दोन तास उपलब्ध असताना सभागृहासमोर असलेले विहित कामकाज बाजूला सारुन त्या स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरू होते. त्यावेळी प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्याने भाषण केल्यानंतर अध्यक्ष प्रस्ताव प्रस्तुत करतात.

इतर सदस्यांच्या भाषणानंतर संबंधित मंत्री चर्चेला उत्तर देतात. प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांने उत्तर दिल्यावर चर्चा समाप्त होते. अध्यक्षांनी परवानगी दिल्यास प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्याने उत्तर दिल्यानंतर मंत्री पुन्हा भाषण करु शकतात. अशा वेळी मंत्र्यांनी भाषण केल्यास त्यानंतर चर्चा समाप्त होते. त्यानंतर अध्यक्ष प्रस्ताव मतास टाकतात. **प्रस्तावावरील चर्चा व मतदान नेमून दिलेल्या दोन तासांच्या मुदतीत समाप्त झाले नाही तर, त्यानंतर त्या प्रस्तावासंबंधी मतदान घेता येत नाही. प्रस्तावावरील चर्चा संपल्यावर सभागृहासमोरील त्या दिवसाचे उरलेले इतर कामकाज करता येते.**

अलिकडील काही वर्षात विधानसभेमध्ये मान्य झालेले काही महत्त्वाचे स्थगन प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) दिनांक ११ जुलै, २००६ रोजी मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या प्रथमश्रेणी डब्यांमधून झालेल्या सलग सात भीषण बॉम्बस्फोटात एकूण १७८ व्यक्ती मृत्यूमुखी पडणे व ४०० हून अधिक प्रवासी गंभीररीत्या जखमी होणे-दिनांक १२ जुलै, २००६ रोजी पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान दुसरा व शेवटचा दिवस (गिलोटीन) चर्चारोध असतानाही मा. अध्यक्षांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपवादात्मक बाब म्हणून सूचनेस अनुमती दिली व त्यावर चर्चा झाली.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पास जैतापूरवासियांचा असलेला प्रखर विरोध, त्यातून दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजी जैतापूरवासियांनी केलेल्या आंदोलनावर पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबार, पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ७ व्यक्ती जखमी होणे, तसेच श्री. तरबेज अब्दुल्ला सायेकर या आंदोलकाचा झालेला मृत्यू, पोलिसांच्या लाठीमारात महिला व पुरुष आंदोलक गंभीररित्या जखमी होणे त्यामध्ये काहींची प्रकृती चिंताजनक असणे, यामुळे त्या परिसरात दिवसेंदिवस वाढत असलेली चिंताजनक व प्रक्षोभक परिस्थिती (दिनांक १९ एप्रिल,२०११ रोजी चर्चा झाली.)

(३) दिनांक १३ जुलै, २०११ रोजी मुंबईतील दादर, झवेरी बाजार व ऑपेरा हाऊस या तीन ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटात २३ व्यक्ती मृत्यूमुखी पडणे व १२० व्यक्ती जखमी होऊन करोडो रुपयांची झालेली वित्तहानी, सदर बॉम्बस्फोटांमध्ये इंडिया मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेचा हात असल्याचा गृह विभागाने संशय व्यक्त करणे, आर्थिक राजधानी असलेले मुंबई शहर दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर पहिल्यापासून असतांनाही सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने घेतलेल्या निर्णयाची / घोषणांची अंमलबजावणी झालेली नसणे, हल्ल्यातील आरोपींचा तात्काळ शोध घेण्यास पोलिस यंत्रणेस अपयश आल्यामुळे जनतेमध्ये पसरलेली असुरक्षिततेची व संतापाची भावना (दिनांक २६ जुलै,२०११ रोजी चर्चा झाली.)

(४) दिनांक २५ जुलै, २०११ रोजी पंढरपूरवरुन शेगांवला निघालेली श्री गजानन महाराजांची पालखी दिंडी, पारनेरवरुन लालवाडीकडे जाताना जालना- अंबड रस्त्यावर दिंडीतील वारकऱ्यांच्या अंगावर भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने धडक दिल्याने ११ वारकऱ्यांचा जागीच मृत्यू होऊन १८ गंभीर जखमी होणे,या घटनेनंतर संतापलेल्या जमावाने कंटेनरसह आठ वाहनांना पेटवून देणे, जमावाला काबूत आणण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दोघांचा मृत्यू होणे (दिनांक २७ जुलै,२०११ रोजी चर्चा झाली.)

(५) दिनांक ९ ऑगस्ट, २०११ रोजी मावळ तालुक्यातील (जि.पुणे) पवना धरणातून बंद जलवाहिनीद्वारे पिंपरी-चिंचवडला पाणी नेण्याच्या विरोधात मावळ तालुक्यातील सर्वपक्षीय कार्यकर्ते व शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या आंदोलनावर पोलीसांनी केलेल्या लाठीमार व गोळीबारात ४ आंदोलक जागीच ठार होणे व शंभरहून अधिक आंदोलक गंभीररित्या जखमी होणे, या घटनेमुळे परिसरात निर्माण झालेले प्रचंड तणावाचे वातावरण, त्यामुळे नागरिकांमध्ये उसळलेली संतापाची लाट (दिनांक १० ऑगस्ट,२०११ रोजी चर्चा झाली.)

(६) चोरीच्या किरकोळ गुन्ह्यात अटकेत असलेल्या २२ वर्षीय विनोद मधुकर सावकारे, (रा. महिंदळे, ता.भडगांव) या आरोपीने दिनांक २२ जुलै, २०१२ रोजी भडगांव (जि.जळगांव) पोलीस ठाण्यामधील कोठडीत प्लॅस्टिकच्या पट्टीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस येणे, ही आत्महत्या नसून पोलीसांच्या मारहाणीत मृत्यु झाल्याच्या आरोप त्याच्या नातेवाईकांनी करणे (दिनांक २४ जुलै, २०१२ रोजी चर्चा झाली.)

(७) ठाणे महानगरपालिका हद्दीतील शिळफाटा परिसरातील मुंब्रा जवळील लकी कंपाऊंड भागात असलेली सात मजली अनधिकृत इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत १० रहिवाशी ठार तर ५० पेक्षा अधिक व्यक्ती जखमी होणे, ठाणे, कळवा, मुंब्रा, उल्हासनगर, नवी मुंबई येथील असंख्य अनधिकृत इमारती धोकादायक स्थितीत असून त्यामधील रहिवाशांना सुरक्षित स्थळी पर्यायी जागा देऊन त्या इमारती पाडण्याची निर्माण झालेली आवश्यकता (दिनांक ५ एप्रिल, २०१३ रोजी चर्चा झाली.)

(८) दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी घाटकोपर, मुंबई येथील दामोदर पार्क जवळील साई दर्शन इमारत कोसळून १७ व्यक्तींचा मृत्यू होऊन अनेकजण गंभीर जखमी झाल्याची घडलेली घटना-(दिनांक २६ जुलै, २०१७ रोजी चर्चा झाली.)

(९) दिनांक २ जुलै, २०१९ रोजी मालाडमध्ये घरावर भिंत कोसळून १२ व्यक्तींचा मूत्यू व १३ व्यक्ती जखमी झाल्याची घटना (दिनांक २ जुलै, २०१९ रोजी चर्चा झाली.)

तसेच उपोषण, सत्याग्रह, अन्य राज्यात घडलेल्या घटना, मोर्चे, धरणे, लाठीमार, बंद, संप, न्यायप्रविष्ट बाबी, आंदोलने, आत्महत्या हे स्थगन प्रस्तावाचे विषय होऊ शकत नाहीत. तसेच राज्यपालांच्या अभिभाषणाच्या दिवशी, विभागांच्या मागण्यांवर चर्चारोध (Guillotine) असलेल्या दिवशी किंवा ज्या दिवशी अविश्वासदर्शक प्रस्तावावर सभागृहात चर्चा असेल त्या दिवशी स्थगन प्रस्ताव चर्चेला घेता येत नाही.

(३९) लक्षवेधी सूचना (Calling Attention) **(महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये) :-**

सन १९५८ मध्ये "लक्षवेधी सूचने" संबंधीची तरतूद नियमात करण्यात आली. त्या अगोदर एखादी महत्त्वाची व तातडीची बाब सभागृहासमोर उपस्थित करण्यासाठी स्थगन प्रस्तावाचे संसदीय आयुध उपलब्ध होते. तथापि, या आयुधाचे एकंदर स्वरुप हे एक प्रकारे शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे (Censure Motion) असे होते. त्यामुळे तातडीच्या आकस्मिक कारणासाठी स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त एखाद्या स्वतंत्र आयुधाची निकड ध्यानात घेऊन लक्षवेधी सूचनेचा नियमात समावेश करण्यात आला.

आधुनिक संसदीय कामकाज पद्धतीमध्ये "लक्षवेधी सूचने" चा सभागृहाच्या कामकाज पद्धतीमधील समावेश ही संपूर्णपणे भारतीय संकल्पना (Purely an Indian Innovation) आहे.

या आयुधाच्या माध्यमातून प्रशासनातील उणिवा शासनाच्या लक्षात आणून देणे, त्याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही ही देखील सभागृहापुढे निवेदनाद्वारे आणून देणे व या माध्यमातून शासनावर अंकुश ठेवणे, इत्यादी उद्दिष्टे साध्य करता येतात.

निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी जी सूचना दिली जाते तिला लक्षवेधी सूचना म्हणतात. सूचनेत उल्लेखिलेली घटना कधी घडली त्या तारखेचा उल्लेख करणे अत्यावश्यक असते. घटना नुकतीच घडली असे मोघम लिहून चालणार नाही. सदस्यांना लक्षवेधी सूचना MOIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे संपूर्णतः ऑनलाईन (Online) पद्धतीने सत्र सुरू होण्यापूर्वी **पाच** दिवसांहून (सुट्टीचे दिवस वगळून) अगोदर नव्हे (अध्यक्षांच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २००९ च्या आदेशानुसार) अशा पद्धतीने सकाळी ११.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठवावयाच्या असतात. पाच दिवसांपूर्वी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जात नाहीत. तसेच अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ऑनलाईन (online) पद्धतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठीचा अंतिम दिवस असेल. मा.अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार ऑनलाईन (Online) पद्धतीने स्वीकारण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांवरील मा.सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येतात.

सभागृहाच्या कार्यक्रमपत्रिकेवर सर्वसाधारणपणे तीन मान्य झालेल्या लक्षवेधी सूचना दर्शविण्यात येतात. नियमात झालेल्या बदलाप्रमाणे लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यासाठी ३० मिनिटांपेक्षा अधिक वेळ उपलब्ध असणार नाही त्याप्रमाणे प्रत्येक सूचनेला १० मिनिटे वेळ देण्यात येतो. सभागृहात सूचना मांडल्यानंतर संबंधित मंत्री त्या विषयी निवेदन करतात. निवेदनाच्या प्रती जर अगोदर सदस्यांना वितरीत करण्यात आल्या असतील तर मंत्रिमहोदय फक्त "निवेदन वितरीत केल्याप्रमाणे" असे सभागृहात निवेदीत करतात. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर सभागृहात चर्चा होत नाही. परंतु अधिक स्पष्टीकरणासाठी सदस्यांना एक-दोन प्रश्न विचारण्याची मुभा असते. ज्या सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिली असेल त्या सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळाल्यावरच अध्यक्षांनी परवानगी दिल्यास इतर सदस्यांना प्रश्न विचारता येतात. अनेक सदस्यांनी एकाच विषयावर लक्षवेधी सूचना दिली असेल, तर त्या सर्व सदस्यांची नावे, त्यांनी दिलेल्या सूचना कार्यालयात ज्या क्रमाने प्राप्त झाल्या असतील त्या क्रमाने त्या लक्षवेधी सूचनेस जोडली जातात. ज्या सदस्याने प्रथम सूचना दिली असेल व तो गैरहजर असेल तर दुसऱ्या क्रमांकावरील सदस्य सूचना मांडू शकतात. सर्वच सदस्य गैरहजर असल्यास

सूचनेवर निवेदन/चर्चा होत नाही. वरीलप्रमाणे कार्यक्रमपत्रिकेवरील तिन्ही लक्षवेधी सूचनांवर कार्यवाही होते. विधानसभेचे अधिवेशन समाप्त होण्याच्या दिवशी अशा कोणत्याही बाबी अनिर्णित राहिल्यास संबंधित मंत्री त्या संबंधात त्यांनी करावयाची निवेदने विधानसभेच्या पटलावर ठेवतात.

(४०) अर्धा-तास चर्चा (Half an hour Discussion) **(म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

संसदीय आयुधांपैकी "अर्धा-तास चर्चा" हे लोकसभा/राज्यसभा व देशातील विविध राज्य विधानमंडळामध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. विधानसभा नियमामध्ये सन १९७० पूर्वी फक्त प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेची तरतूद होती.

तद्‌नंतर सन १९७०-७१ साली नियमात बदल करून या चर्चेची व्याप्ती वाढविण्यात आली. त्यामुळे प्रश्नाव्यतिरिक्त इतर सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावरसुद्धा चर्चा उपस्थित करणे सुलभ झाले.

प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवणारी अर्धा-तास चर्चा या संसदीय आयुधाकरिता QIS व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चा या आयुधाकरिता SMOIS ही संगणकीय आज्ञावली या सचिवालयातर्फे विकसित करण्यात आली आहे. सदर दोन्ही आज्ञावलींद्वारे सदस्यांकडून अर्धा-तास चर्चेची सूचना स्वीकारणे, सूचना कार्यवाहीत घेणे, सादर करणे, स्वीकृत अर्धा-तास चर्चेची सूचना विभागास पाठविणे, स्वीकृत सूचनांचे सदस्यनिहाय बॅलट काढणे इ. संदर्भात सर्व कामकाज संबंधित कक्षांकडून करण्यात येते. (प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवणारी अर्धा-तास चर्चा याबाबतची कार्यवाही **'ब'** कक्षाकडून तसेच सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर (सर्वसाधारण) अर्धा तास चर्चा याबाबतची कार्यवाही **'फ'** कक्षाकडून करण्यात येते.)

"महाराष्ट्र विधानसभा नियम ९४" अन्वये अर्धा-तास चर्चेची सूचना देताना खालील गोष्टींकडे सदस्यांनी लक्ष पुरविणे आवश्यक आहे :-

(अ) प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेसंबंधीच्या विधानसभा नियमांतील तरतुदी

(१) अर्धा-तास चर्चेची सूचना प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेली असेल तर ती अलिकडच्या प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेल्या बाबींवर असणे आवश्यक आहे.

(२) सदर बाब सार्वजनिक महत्त्वाची असली पाहिजे.

(३) प्रश्नाधीन बाबीसंबंधात राज्य शासनाची जबाबदारी असणे आवश्यक आहे.

(४) विधानसभा सभागृहात प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर सदस्यांना अर्धा-तास चर्चेची सूचना QIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे देता येते. अशी सूचना गुणवत्तेनुसार स्वीकृत करण्यात आल्यास ती आठवड्यातील **प्रत्येक मंगळवारी** कामकाजाच्या दिवशी विधानसभेच्या बैठकीच्या शेवटी ठेवण्यात येते.

(५) मा. सदस्यांना अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करावयाची असेल तर ज्या दिवशी अशी बाब उपस्थित करावयाची असेल, त्या दिवसाच्या अगोदर तीनपेक्षा कमी नसतील इतके दिवस,

मा. सदस्यांनी तशी सूचना QIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे दिली पाहिजे आणि त्यांना जे मुद्दे उपस्थित करावयाचे असतील ते मुद्दे थोडक्यात सूचनेमध्ये नमूद केले पाहिजेत, तसेच अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्याची कारणे नमूद करणारे एक स्पष्टीकरणात्मक टीपण सदर सूचनेबरोबर देणे आवश्यक आहे. अशा सूचनेला कमीत कमी दोन सदस्यांनी अनुमोदन म्हणून (QIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे) पाठिंबा दिला असणे गरजेचे आहे (नियम ९४ (२) (अ)). अध्यक्षांस संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या संमतीने त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही बाबतीत सूचनेची मुदत कमी करता येईल किंवा सूचना अनावश्यक ठरविता येईल. परंतु सूचना देणारा सदस्य अनुपस्थित असल्यास त्या सूचनेस अनुमोदन देणाऱ्या कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस सुरुवात करता येईल.

(६) **प्रश्नातून उद्‌भवणारी अर्धा-तास चर्चा ही दर मंगळवारी त्या दिवसाच्या कामकाजाच्या शेवटी ठेवण्यात येते. तसेच इतर बाबीतून उद्‌भवलेल्या (सर्वसाधारण) सूचना गुरुवारी सभागृहाच्या बैठकीत मांडण्यात येतात व त्यावर चर्चा करण्यात येते.** जर मंगळवार रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात प्रश्नातून उद्‌भवणारी सूचना दर्शविण्यात आली नसेल, तर त्या दिवशी इतर बाबीतून उद्‌भवणारी चर्चा दर्शविण्यात येते. **एका दिवशी फक्त दोनच अर्धा-तास चर्चेच्या सूचना** ठेवण्यात येतात. स्वीकृत सूचनांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी QIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे सदस्यनिहाय बॅलट काढण्यात येते व त्यानुसार सूचना दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येतात. परंतु एखाद्या विवक्षित दिवशी चर्चेकरीता मांडण्यात आलेली कोणतीही बाब त्या दिवशी निकालात काढण्यात आली नसेल तर ती बाब सदस्यांची तशी इच्छा असेल त्याखेरीज कोणत्याही पुढील दिवशी मांडण्यात येणार नाही. सदस्यांची तशी इच्छा असेल तेव्हा त्या बाबीचा लगतपुढील उपलब्ध दिवसासाठीच्या बॅलटमध्ये समावेश करण्यात येईल.

(७) मंगळवार रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येणाऱ्या प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या स्वीकृत सूचनांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलट आदल्या दिवशी म्हणजे सोमवारी सकाळी १०.३० वाजता QIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे काढण्यात येते. सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास, बॅलट त्याच्या आधीच्या आठवड्यातील कामकाजाच्या शेवटच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता काढण्यात येते. याबाबत सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे व लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.द्वारे) आगाऊ माहिती दिली जाते.

(८) सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्यांवर संबंधित सदस्य संक्षिप्त निवेदन करतात व त्यावर संबंधित मंत्री उत्तरादाखल निवेदन करतात. त्यानंतर सदस्यांना वा अन्य काही पूर्वसूचना दिलेल्या सदस्यांना माहिती मिळविण्याच्या दृष्टीने दोन-तीन प्रश्न विचारण्याची अध्यक्ष परवानगी देऊ शकतात. अर्धा-तास चर्चेची व्याप्ती ही मर्यादित असते. तीस मिनिटांत दोन अर्धा-तास चर्चा उपस्थित करावयाच्या असतात.

(ब) सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चेसंबंधीच्या तरतुदी

(१) अर्धा-तास चर्चेची सूचना सार्वजनिक महत्त्वाची असणे आवश्यक आहे.

(२) राज्य शासनाची जबाबदारी असली पाहिजे.

(३) अर्धा-तास चर्चेची सूचना देताना कोणत्या मुद्यांवर चर्चा उपस्थित करावयाची आहे, ते मुद्दे सुस्पष्टपणे पण थोडक्यात देण्यात यावेत. तसेच ते मुद्दे कसे उद्‌भवतात यासंबंधी स्पष्टीकरणात्मक टिप्पणी देणे आवश्यक आहे. तसेच सूचनेस अन्य किमान दोन सदस्यांनी अनुमोदक म्हणून पाठिंबा देणे गरजेचे आहे. परंतु सूचना देणारा सदस्य अनुपस्थित असल्यास त्या सूचनेस अनुमोदन देणाऱ्या कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस सुरुवात करता येईल.

(४) सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीतून उद्‌भवलेल्या (सर्वसाधारण) सूचना गुरुवार रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येतात. जर मंगळवार रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात प्रश्नातून उद्‌भवणारी सूचना दर्शविण्यात आली नसेल तर त्या दिवशीही इतर बाबीतून उद्‌भवणारी अर्धा-तास चर्चा दर्शविण्यात येते. एका दिवशी फक्त दोनच अर्धा-तास चर्चेच्या सूचना दर्शविण्यात येतात. दोनपेक्षा अधिक सूचना मान्य झाल्या असल्यास त्या सूचनांचे सदस्यनिहाय बॅलट काढण्यात येते व त्यानुसार पहिल्या दोन स्वीकृत सूचना कार्यक्रम पत्रिकेवर (वेळेच्या दृष्टीने त्या सूचना ज्या क्रमाने मिळालेल्या असतील त्या क्रमाने) दर्शविण्यात येतात. परंतु एखाद्या विवक्षित दिवशी चर्चेकरिता मांडण्यात आलेली कोणतीही बाब त्या दिवशी निकालात काढण्यात आली नसेल तर ती बाब सदस्यांची तशी इच्छा असेल त्याखेरीज कोणत्याही पुढील दिवशी मांडण्यात येणार नाही. सदस्यांची तशी इच्छा असेल तेव्हा त्या बाबीचा लगत पुढील उपलब्ध दिवसासाठीच्या बॅलटमध्ये समावेश करण्यात येईल.

(५) सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्यांवर संबंधित सदस्य संक्षिप्त निवेदन करतात व त्यावर संबंधित मंत्री उत्तरदाखल निवेदन करतात. त्यानंतर सदस्यांना वा अन्य काही पूर्वसूचना दिलेल्या सदस्यांना माहिती मिळविण्याच्या दृष्टीने दोन-तीन प्रश्न विचारण्याची अध्यक्ष परवानगी देऊ शकतात. अर्धा-तास चर्चेची व्याप्ती ही मर्यादित असते. तीस मिनिटांत दोन अर्धा-तास चर्चा उपस्थित करावयाच्या असतात. त्यामुळे सिमित व्याप्तीचे विषय या माध्यमातून उपस्थित करणे योग्य ठरते. उदा.एखाद्या गावातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न, विशिष्ट गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न, राज्यव्यापी विषय या माध्यमातून उपस्थित करणे संयुक्तिक नाही. कारण त्यासाठी ठराव, प्रस्ताव, अल्पकालीन चर्चा इत्यादी जास्त व्याप्ती असलेली अन्य संसदीय आयुधे उपलब्ध असल्याने सदस्यांनी त्यांचा वापर करणे अपेक्षित आहे.

(६) अध्यक्षांनी दिलेले पुनरिक्षित निदेश क्रमांक १८ मध्ये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यासाठी कोणत्याही सदस्याला विधानसभेच्या एका अधिवेशनासाठी २५ स्वीकृत सूचनांची मर्यादा घालण्यात आली असून अधिवेशन सुरू होण्यापूर्वी १५ दिवसांहून

अगोदर नव्हे अशा दिनांकापासून अशा सूचना स्वीकारण्यात येतात. तसेच अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीच्या शेवटच्या आठवड्यातील सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्या बॅलट पूर्वी कामकाजाच्या पुर्ण ३ दिवस अगोदर सूचना स्विकारण्यात येत नाहीत.

(४१) अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion) **(म.वि.स. नियम १०१ अन्वये):-**

निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक महत्त्वाचे संसदीय आयुध सदस्यांना उपलब्ध आहे. सन १९५८ मध्ये या चर्चेची तरतूद नियमांत करण्यात आली. त्यापूर्वी निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यासाठी स्थगन प्रस्तावाव्यतिरिक्त दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता. तथापि, स्थगन प्रस्तावाला निंदा-व्यंजक (Censure Motion) प्रस्तावाचे स्वरुप असल्यामुळे तसेच अशा प्रस्तावाला अगदी अपवादात्मक परिस्थितीतच मान्यता मिळत असल्यामुळे हा मार्ग सदस्यांना उपलब्ध होऊ शकत नव्हता. अल्पकालीन चर्चेची उपयुक्तता तातडीच्या बाबी उपस्थित करण्यासाठी फार मोठी आहे. या चर्चेला जास्तीत-जास्त अडीच तास वेळ असल्यामुळे तातडीने सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना विशेषत: विरोधी पक्षाच्या सदस्यांना एक जादा संधी मिळते. या चर्चेच्या वेळी सभागृहासमोर औपचारिक प्रस्ताव नसल्यामुळे यावर मतदान होत नाही. त्यामुळे चर्चेला संमती देताना शासनालासुद्धा फारसे अडचणीचे होत नाही. परिणामी अल्पकालीन चर्चेचे आयुध सदस्यांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त व समाधानकारक असे सिद्ध झाले आहे.

निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या एखाद्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या सदस्यास म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना देता येते. अशा प्रकारच्या सूचना विधानसभेचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी तीन दिवस अगोदर (सुट्टीचे दिवस वगळून) द्यावयाच्या असतात. तीन दिवसांपूर्वी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जात नाहीत. ही सूचना देतेवेळी ज्या बाबींवर चर्चा उपस्थित करावयाची आहे. ती बाब तसेच त्यासंबंधीची स्पष्टीकरणात्मक टिप्पणी त्या सूचनेस जोडली पाहिजे तसेच या सूचनेवर इतर दोन सदस्यांच्या त्या सूचनेच्या पुष्ठ्यर्थ (अनुमोदक) सह्या घेतलेल्या असाव्यात. सूचना मान्य झाल्यानंतर ती बाब विधानसभेत लवकर उपस्थित करता येईल इतकी निकडीची व पुरेशी महत्त्वाची आहे अशी अध्यक्षांची खात्री झाल्यानंतर सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन, कामकाज सल्लागार समितीमध्ये विचार करून त्या सूचनेच्या चर्चेसाठी तारीख ठरविण्यात येते. या सूचनेवर जास्तीत-जास्त अडीच तास चर्चा होते. त्यावेळी सूचना देणारे सदस्य थोडक्यात आपले भाषण करतात. त्यानंतर संबंधित मंत्री त्यास संक्षिप्त उत्तर देतात. इतर सदस्यांना देखील अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने चर्चेत भाग घेता येतो.

(४२) अंतिम आठवडा प्रस्ताव (Last Week Motion) **(म.वि.स. नियम २९२ अन्वये) :-**

सन १९७१ मध्ये विधानसभा नियमामध्ये या प्रस्तावासंबंधीच्या तरतुदींचा समावेश करण्यात आला. सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्यांना ही एक अतिरिक्त संधी उपलब्ध आहे. या प्रस्तावाची तुलना (Analogous) ब्रिटीश संसदेच्या शेवटच्या आठवड्यातील प्रस्ताव किंवा सुट्टीचे स्थगन प्रस्ताव (Holiday Adjournment Motion) यांच्याशी करण्यात येते. या प्रस्तावाचा उद्देश म्हणजे सभागृह स्थगित होण्यापूर्वीच्या

निकटच्या कालावधीतील अडचणी, समस्या/प्रश्न सभागृहासमोर (Grievances before adjournment) आणणे हा आहे.

या प्रस्तावाद्वारे राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यापक सार्वजनिक महत्त्वाचे विषय म्हणजे राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महागाई, पिण्याच्या पाण्याची राज्यव्यापी समस्या, अवर्षण/दुष्काळ, टंचाई, अवकाळी पाऊस, शेतकऱ्यांचे विविध प्रश्न इत्यादी विषय सभागृहासमोर मांडता येतात.

अध्यक्ष, सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन, अशा पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा घडवून आणण्यासाठी अधिवेशनातील शेवटच्या आठवड्यातील एक दिवस नेमून देतात. त्यासाठी तीन दिवस अगोदर प्रस्तावाची लेखी सूचना देता येईल. सूचना स्विकारण्यापूर्वी अध्यक्ष ज्या विभागाशी तो प्रस्ताव संबंधित असेल त्या विभागाच्या मंत्र्यांचे विचार समजावून घेतात. संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या संमतीने अध्यक्षांना त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही प्रकरणी सूचनेचा कालावधी कमी करता येतो किंवा सूचना अनावश्यक असल्याचे ठरविता येते.

अध्यक्ष, कोणत्याही दिवशी चार पेक्षा अधिक नसतील इतक्या बाबी चर्चेसाठी ठेऊ शकतात. चर्चेसाठी कोणते प्रस्ताव घ्यावयाचे याकरीता हे प्रस्ताव कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्यात येतात. चर्चेच्या वेळी प्रस्ताव देणारे सदस्य प्रथम भाषण करतात व तद्नंतर इतर सदस्यांनाही अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेत भाग घेता येतो. त्यानंतर संबंधित मंत्री त्यास उत्तरे देतात. या प्रस्तावावर मतदान होत नाही.

(४३) मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (No Confidence Motion)

(म.वि.स. नियम ९५ अन्वये) :—

संसदीय शासन व्यवस्थेमध्ये लोकसभा किंवा विधानसभेचा विश्वास असेपर्यंतच केंद्रीय/राज्य मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळ सामुहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते. ज्याक्षणी विधानसभेने मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त केला, त्याचक्षणी मंत्रीमंडळाला राजीनामा देणे भाग पडते. (The Council of Minister remains in office as long as it enjoys the confidence of Lok Sabha/Legislative Assembly. The moment it expresses a lack of confidence in the Council of Ministers, the Government is constitutionally bound to resign.) मंत्रीमंडळावर विधानसभेचा विश्वास आहे किंवा नाही हे ठरविणे या प्रस्तावाचे उद्दिष्ट आहे.

मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणाऱ्या किंवा एखाद्या विशिष्ट बाबतीतील मंत्रीमंडळाच्या धोरणाविषयी नापसंती व्यक्त करणाऱ्या प्रस्तावाची लेखी सूचना सदस्याने देणे आवश्यक असते.

विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना असा प्रस्ताव अध्यक्षांनी स्वीकृत (Admit) केल्यास, प्रस्ताव स्वीकृत केल्यापासून दोन दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमतील त्या दिवशी प्रश्नोत्तरानंतर व त्या दिवसाच्या कामकाजाच्या यादीतील बाबींवर कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी प्रस्ताव मांडण्याची परवानगी मागता येते. मात्र विधानसभेचे अधिवेशन चालू नसताना असा प्रस्ताव दिल्यास तो मांडण्याची परवानगी विधानसभेचे अधिवेशन सुरू झाल्यापासून दोन दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमतील त्या दिवशी मागणे आवश्यक असते.

सदस्यांनी प्रस्ताव मांडण्यास अनुमती मागितल्यानंतर अध्यक्ष तो प्रस्ताव वाचून दाखवितात व सभागृहात २९ किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य उभे राहिल्यास सदर प्रस्ताव मांडण्यास परवानगी आहे असे जाहीर करून व त्या दिवसापासून तीन दिवसाहून आधीचा नाही व सात दिवसाहून उशिरा नाही अशा अध्यक्ष नेमून देतील त्या दिवशी तो सभागृहात विचारात घेण्यात येईल असे अध्यक्ष जाहीर करतात. २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास विधानसभेची परवानगी नाही असे अध्यक्ष जाहीर करतात. प्रस्तावावर चर्चा होऊन मा.मुख्यमंत्र्यांचे उत्तर होते. तद्नंतर मतदानाद्वारे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येतो.

अलिकडील कालावधीत खालील अविश्वास प्रस्तावावर चर्चा झाली :—

(१) ही विधानसभा मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करीत आहे.-प्रस्ताव दिनांक ४ ऑगस्ट, १९८९ रोजी मांडण्यासाठी अनुमती मागितली व दिनांक १० ऑगस्ट, १९८९ रोजी चर्चा झाली.

(२) ही विधानसभा मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करीत आहे.-प्रस्ताव दिनांक २८ नोव्हेंबर, १९९४ रोजी मांडण्यासाठी अनुमती मागितली व त्याच दिवशी चर्चा झाली.

(३) मंत्रीमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्ताव तत्कालीन विरोधी पक्ष नेता श्री.रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी म.वि.स नियम ९५ अन्वये दि.२० जुलै, २००६ रोजी दिला होता. दि.२१ जुलै, २००६ रोजी सदरहू अविश्वासदर्शक प्रस्तावावर सभागृहात निर्णय होणेअगोदरच मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात थेट विश्वासदर्शक प्रस्ताव मांडून तो अनुकूल १५३ व प्रतिकूल ० असा मान्य झाला. परिणामी म.वि.स. नियम ४५ (प्रस्तावाची पुनरावृत्ती) अन्वये मंत्रीमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्तावाची सूचना व्यपगत करण्यात आली. सूचना व्यपगत झाल्यामुळे याबाबत कुठलाही पत्रव्यवहार/कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) तत्कालीन विरोधी पक्ष नेता श्री रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी दिनांक ६ डिसेंबर २००६ रोजी म.वि.स नियम ९५ अन्वये "मंत्रीमंडळावर अविश्वासदर्शक प्रस्ताव" दिला होता. त्यानंतर दिनांक ७ डिसेंबर २००६ रोजीच्या पत्रान्वये सदरहू प्रस्ताव सभागृहात मागे घेण्यात आल्यामुळे याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(४४) मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव (विश्वासदर्शक प्रस्ताव) -

(Confidence Motion) **(म.वि.स. नियम २३ अन्वये) :-**

संसदीय शासन व्यवस्थेमध्ये लोकसभा किंवा विधानसभेचा विश्वास असेपर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. मंत्रीमंडळ सामुहिकरित्या विधानसभेस जबाबदार असते. विधानसभेमध्ये मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करता यावे हे या प्रस्तावाचे उद्दिष्ट आहे. **विश्वासदर्शक प्रस्तावासंबंधी नियमात विशिष्ट अशी तरतूद नाही. तथापि, त्यासाठी नियम २३ या प्रस्ताव विषयक नियमातील खालील तरतुदींचा वापर करण्यात येतो.**

"ज्या बाबतीत विधानसभेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय अध्यक्ष, एखादा सदस्याने मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील."

मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्यासाठी प्रस्तावाची लेखी सूचना देणे आवश्यक असते. प्रस्ताव महाराष्ट्र विधानसभा नियम २३ (२) प्रमाणे ज्या कसोट्या नियमात नमूद करण्यात आल्या आहेत त्या सर्व कसोट्यांची पुर्तता करणारा असावा लागतो. प्रस्तावाची सूचना अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर या प्रस्तावावर चर्चा केव्हा घ्यावयाची व चर्चेला किती वेळ द्यावा याबाबतचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये घेण्यात येतो. प्रस्तावावर चर्चा होऊन मुख्यमंत्र्यांचे आभार प्रदर्शक भाषण होते व नंतर मतदानाद्वारे या प्रस्तावावर निर्णय घेण्यात येतो.

अलिकडील कालावधीत खालील प्रस्तावावर चर्चा झाली :-

(१) मा.मुख्यमंत्री, श्री.मनोहर जोशी यांच्या मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक ७ डिसेंबर, १९९५ रोजी प्रस्ताव बहुमताने संमत झाला.

(२) मा.मुख्यमंत्री, श्री.नारायण राणे यांच्या मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक १७ फेब्रुवारी, १९९९ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(३) मा.मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख यांच्या मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत- दिनांक १३ जून,२००२ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(४) मा.मुख्यमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे यांच्या मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक २२ जानेवारी, २००३ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(५) मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्या मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबत - दिनांक २१ जुलै, २००६ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(६) मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी श्री. हरिभाऊ बागडे, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्यावर विश्वास व्यक्त करण्याबाबत-दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(४५) अध्यक्षांना/उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव (Motion for Removal of Speaker/ Dy.Speaker) **(संविधान अनुच्छेद १७९ तसेच म.वि.स. नियम ११ अन्वये) :—**

संविधानाच्या अनुच्छेद १७९ अन्वये अध्यक्षांना वा उपाध्यक्षांना त्यांच्या पदावरुन दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याकरीता १४ दिवसांची सूचना द्यावी लागते. सूचनेची मुदत संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर असा प्रस्ताव अध्यक्ष विधानसभेला वाचून दाखवितात व जे सदस्य प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यास अनुकूल असतील त्यांना आपापल्या जागेवर उभे राहण्याची विनंती करतात आणि जर २९ किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य उभे राहिल्यास प्रस्ताव मांडण्यास अनुमती दिली आहे व अनुमती दिल्यापासून ७ दिवसांहून उशिरा नाही अशा अध्यक्ष ठरवतील त्या दिवशी प्रस्ताव विचारात घेतला जाईल असे अध्यक्ष जाहीर करतील. जर २९ पेक्षा कमी सदस्य उभे राहिले तर उक्त प्रस्ताव मांडण्यास विधानसभेची अनुमती नाही असे अध्यक्ष जाहीर करतात.

अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचे काही महत्त्वाचे प्रस्ताव :-

(१) श्री.निहाल अहमद यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक १० एप्रिल, १९८७ रोजी तत्कालीन अध्यक्ष (श्री.शंकरराव जगताप) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता व तो माहे जून, १९८७ च्या अधिवेशनात दिनांक २५ जून, १९८७ रोजी अनुमतीसाठी व त्याच दिवशी एका दिवसाच्या चर्चेसाठी ठेवण्यात आला व त्यावर चर्चा व मतदान होऊन प्रस्ताव अनुकूल ५४ व प्रतिकूल ११५ असा असंमत झाला.

(२) श्री.रोहिदास पाटील व इतर वि.स.स. यांनी दिनांक २८ जुलै, १९९८ रोजी तत्कालीन अध्यक्ष (श्री.दत्ताजी नलावडे) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु विधानसभा बरखास्तीपर्यंत सदर प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही.

(३) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे यांनी सन १९९९ च्या चतुर्थ अधिवेशनात दिनांक १५ डिसेंबर, १९९९ रोजी तत्कालीन अध्यक्ष (श्री.अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु ती मागे घेण्यात आल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री.नारायण राणे व इतर वि.स.स. यांनी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी दिनांक २० एप्रिल, २००० रोजी तत्कालीन मा.अध्यक्ष (श्री.अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यानंतर तो दिनांक २८ जुलै, २००० रोजी सभागृहात अनुमतीसाठी मांडण्यात आला परंतु प्रस्तावाच्या बाजूने एकही सदस्य उभा न राहिल्यामुळे प्रस्ताव बारगळला होता.

(५) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे व इतर वि.स.स. यांनी दिनांक १० ऑगस्ट, २००० रोजी तत्कालीन मा. अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता. परंतु दिनांक ११ डिसेंबर, २००० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मागे घेण्यात आला.

(६) सन २००१ च्या प्रथम अधिवेशनात तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे व इतर वि.स.स. यांनी दि. १६ मार्च, २००१ रोजी तत्कालीन मा. अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु यासंदर्भात सभागृहाचे नेते आणि विरोधी पक्षनेते यांच्याबरोबर मा. अध्यक्षांच्या दालनात चर्चा होवून सदरहू प्रस्तावासंबधी पुढे कोणत्याही प्रकारचा आग्रह नाही असे विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्यामुळे अविश्वासाचा प्रस्ताव बारगळला.

(७) नि:सत्र कालावधीत म्हणजे दिनांक ८ जून, २००२ रोजी तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. नारायण राणे व इतर वि.स.स. यांनी तत्कालीन मा. अध्यक्ष (श्री. अरुण गुजराथी) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती परंतु दिनांक २९ जुलै, २००२ रोजी सूचना मागे घेत असल्याचे पत्र मा. अध्यक्षांना दिल्यामुळे प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(८) दिनांक ६ डिसेंबर, २००६ रोजी (सन २००६ चे तृतीय अधिवेशन) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी मा. अध्यक्ष (श्री. बाबासाहेब कुपेकर) यांचेविरुद्ध नियम ११ अन्वये प्रस्ताव दिला होता परंतु, दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी सूचना मागे घेत असल्याचे पत्र (सभागृहात विधिमंडळाच्या प्रधान सचिवांकडे) दिल्यामुळे प्रस्तावावर पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(९) सन २०१३ च्या तृतीय अधिवेशनात तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता सर्वश्री. एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स यांनी नियम ११ अन्वये मा. अध्यक्ष (श्री. दिलीप वळसे-पाटील) यांचेविरुद्ध दिनांक १८ डिसेंबर, २०१३ रोजी प्रस्ताव दिला होता परंतु तो मांडण्यात आला नाही.

(१०) सन २०१६ च्या द्वितीय अधिवेशनात तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील व इतर वि.स.स. यांनी नियम ११ अन्वये मा. अध्यक्ष (श्री. हरिभाऊ बागडे) यांचेविरुद्ध दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी प्रस्ताव दिला होता. परंतु दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी अधिवेशन संस्थगित झाल्यामुळे त्या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

(११) सन २०१८ च्या प्रथम अधिवेशनात तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील व इतर वि.स.स. यांनी नियम ११ अन्वये मा. अध्यक्ष (श्री. हरिभाऊ बागडे) यांचेविरुद्ध दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी प्रस्ताव दिला परंतु श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. विरोधी पक्ष नेता यांनी सदर प्रस्तावावर गटनेते तसेच मा. सदस्य यांच्याशी एकत्र चर्चा केल्यानंतर हा प्रस्ताव मांडू इच्छित नाही असे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी सभागृहात सांगितले.

उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचे काही महत्त्वाचे प्रस्ताव :-

(१) श्री.गुलाबराव पाटील व इतर वि.स.स. यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, १९७८ रोजी तत्कालीन मा.उपाध्यक्षांना (श्री.गरुड) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्तावावर दिनांक ५ एप्रिल, १९७९ रोजी सभागृहात चर्चा व मतदान झाले व प्रस्ताव अनुकूल १८३ व प्रतिकूल ० असा संमत झाला.

(२) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री.नारायण राणे व इतर वि.स.स. यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २००० रोजी तत्कालीन मा.उपाध्यक्षांना (श्री.प्रमोद शेंडे) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. परंतु उक्त प्रस्ताव दिनांक ११ डिसेंबर, २००० च्या पत्रान्वये मागे घेण्यात आला होता.

(३) श्री.बाळा नांदगांवकर व इतर वि.स.स. यांनी दिनांक १ जुलै, २००२ रोजी तत्कालीन मा.उपाध्यक्षांना (श्री.प्रमोद शेंडे) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्ताव दिनांक २९ जुलै, २००२ च्या पत्राद्वारे मागे घेण्यात आला होता.

(४) श्री.गोपीनाथ मुंडे, वि.स.स. व इतर वि.स.स. यांनी दिनांक १४ डिसेंबर, २००५ रोजी तत्कालीन मा. उपाध्यक्षांना (श्री.प्रमोद शेंडे) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला असता तो स्वीकृत करण्यात आला होता. दिनांक १३ मार्च, २००६ रोजी सदरहू प्रस्ताव सभागृहात मागे घेण्यात आला होता.

(५) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री.रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी दिनांक २० जुलै, २००६ रोजी तत्कालीन मा.उपाध्यक्षांना (श्री.प्रमोद शेंडे) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला आहे. सदरहू प्रस्ताव विधानसभा कामकाज सल्लागार समितीपुढे ठेवण्याबाबत निदेश झालेले होते. त्यानंतर दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव मागे घेण्यात आला.

(६) तत्कालीन मा. विरोधी पक्ष नेता श्री. रामदास कदम व इतर वि.स.स. यांनी दिनांक ३ एप्रिल, २००८ रोजी तत्कालीन मा. उपाध्यक्षांना (श्री.प्रमोद शेंडे) पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव दिला होता. उक्त प्रस्ताव दिनांक २४ एप्रिल, २००८ रोजीच्या पत्रान्वये मागे घेण्यात आला. (या प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.)

(४६) ठराव (Resolution) **:-**

ठराव हे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. सार्वजनिक हिताच्या बाबींवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक उपयुक्त माध्यम सदस्यांना उपलब्ध आहे. सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सभागृहाचे मत जाणून घेणे अथवा शिफारस करणे या उद्देशाने सदस्यांना सभागृहात ठरावाच्या स्वरुपात प्रस्ताव मांडून शासनाच्या एखाद्या कृतीविषयी, ध्येय धोरणाविषयी मत व्यक्त करता येते तसेच लक्ष वेधता येते. ठराव हा एक मूळ प्रस्तावच (Substantive Motion) आहे. ठराव सार्वजनिक महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करण्याच्या कारणासाठी अभिप्राय जाहीर करण्याच्या किंवा शिफारशीच्या स्वरुपात असेल किंवा सरकारचे एखादे कृत्य किंवा धोरण यासंबंधी सभागृहाने पसंती किंवा नापसंती नमूद करण्याच्या किंवा संदेश पोहोचविण्याच्या किंवा उपाययोजना करण्याबद्दल शिफारस / आग्रह किंवा विनंती करण्याच्या स्वरुपात असेल, किंवा सरकारने विचारात घ्यावयाच्या एखाद्या गोष्टीकडे किंवा परिस्थितीकडे लक्ष वेधण्याच्या स्वरुपात असेल, किंवा अध्यक्षांस उचित वाटेल अशा वैधानिक प्रस्तावाव्यतिरिक्त इतर स्वरुपात असेल.

ठरावाचे खालीलप्रमाणे तीन भाग असतात :-

(१) अशासकीय ठराव (Non-Official Resolution)

(२) शासकीय ठराव (Government Resolution)

(३) वैधानिक ठराव (Statutory Resolution)

(४७) अशासकीय ठराव (Private Member's Resolution /Non-Official Resolution) **(म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

महाराष्ट्र विधानसभा नियम १२ अन्वये सभागृहाच्या शुक्रवारच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्यात येतात. अशासकीय कामकाजाचे दोन प्रकार आहेत. (अ) अशासकीय विधेयक आणि (ब) अशासकीय ठराव. यामुळे कामकाजपत्रिकेवर पहिल्या शुक्रवारी अशासकीय ठराव तर त्या पुढील शुक्रवारी अशासकीय विधेयके याप्रमाणे या दोन्ही संसदीय आयुधांसाठी आळीपाळीने वेळ दिला जातो. (याबाबतचा अंतिम निर्णय विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात येतो.)

जर एखाद्या शुक्रवारी सभागृहाची बैठक भरणार नसेल तर अध्यक्ष त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाजासाठी अडीच तासांचा वेळ नेमून देऊ शकतात. जी तारीख अशासकीय ठरावांच्या चर्चेसाठी नेमून दिलेली असेल त्या तारखेपूर्वी ३० दिवस आधी ठराव मांडू इच्छिणाऱ्या सदस्यांनी त्यांच्या ठरावांची सूचना देणे आवश्यक आहे. सदस्यांना ROIS या संगणकीय आज्ञावलीद्वारे ऑनलाईन (Online) पद्धतीने एका अधिवेशनासाठी जास्तीत-जास्त पाच ठराव देता येतात. परंतु त्यांनी दिलेल्या ठरावांपैकी काही ठराव अध्यक्षांनी अमान्य केल्यास त्याऐवजी सदस्य दुसरे ठराव देऊ शकतात.

तद्नंतर असे सर्व ठराव त्यांचा पारस्परिक अग्रक्रम ठरविण्यासाठी बॅलटमध्ये समाविष्ट करण्यात येतात व पाचपेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची नावे बॅलटद्वारे निवडली जातात. कामकाजपत्रिकेवर चर्चेकरीता पहिले तीन ठराव दर्शविण्यात येतात. परंतु पहिल्या तीन ठरावांपैकी एखाद्या सदस्याची ठराव मांडण्याची इच्छा नसल्यास त्यापुढील ठरावाचा कामकाजपत्रिकेमध्ये समावेश करण्यात येतो. दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये कोणत्याही सदस्याच्या नावावर एकापेक्षा जास्त ठराव दर्शविण्यात येत नाही.

(४८) शासकीय ठराव (Government Resolution) **(म.वि.स. नियम ११० अन्वये) :-**

महाराष्ट्र विधानसभा नियम ११० अन्वये ज्या ठरावाची सूचना मंत्री किंवा महाअधिवक्ता (Advocate General) यांनी दिलेली असेल त्याला शासकीय ठराव म्हणतात. या ठरावाला नियम १०६ चे उपबंध लागू असणार नाहीत. अशा ठरावाच्या बाबतीत सात दिवसांची सूचना देणे आवश्यक आहे.

अलिकडील कालावधीत खालीलप्रमाणे शासकीय ठराव संमत करण्यात आले आहेत :-

(१) मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी सन २०१० च्या द्वितीय अधिवेशनात दिनांक २३ जुलै, २०१० रोजी "महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा.३५) याच्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये अधिसूचना काढून चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" या नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्याबाबत असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(२) मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांनी सन २०१० च्या तृतीय अधिवेशनात दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी "मानवी अवयव प्रतिरोपण अधिनियम, १९९४ मध्ये सुधारणा करणेबाबत" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(३) मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सन २०११ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी "महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत हा प्रदेश केंद्रशासित करावा" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(४) मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सन २०११ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभे करण्यासाठी चैत्यभूमी,

दादर येथील एन.टी.सी.च्या मालकीची साडेबारा एकर जागा केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास विनामूल्य उपलब्ध करून द्यावी," असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(५) मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सन २०१२ च्या द्वितीय अधिवेशनात दिनांक १२ जुलै, २०१२ रोजी "महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत हा प्रदेश केंद्रशासित करावा" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(६) मा.संसदीय कार्य मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सन २०१२ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० च्या पोट-कलम (२) मधील परंतुकानुसार उक्त अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीतील "इमारत व दळणवळणे" या शीर्षकाखालील नोंद ५० मधील "तीन प्रमुख रस्ते" हा खंड वगळण्याबाबत" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(७) मा. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१६ च्या चतुर्थ अधिवेशनात "(अ) छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई" याचा नामविस्तार "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई" असा करण्यात यावा, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे केंद्र शासनास करीत आहे; (ब) "छत्रपती शिवाजी टर्मिनस" या रेल्वेस्थानकाचा नामाविस्तार "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस" असा करण्यात यावा, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे केंद्र शासनास करीत आहे. व (क) "एल्फीन्स्टन रोड" या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून "प्रभादेवी" असे करण्यात यावे, अशी शिफारस, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे केंद्र शासनास करीत आहे' असे ठराव मांडले व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आले.

(८) मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१७ चे चतुर्थ अधिवेशनात शिर्डी येथील शिर्डी विमानतळाचे नाव बदलून "श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ" असे करण्याबाबत ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(९) मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१८ चे प्रथम अधिवेशनात कोल्हापूर येथील विमानतळाचे नाव बदलून "छत्रपती राजाराम महाराज विमानतळ" असे करण्याबाबत ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(१०) मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी सन २०१९ चे द्वितीय अधिवेशनात "महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी अधिवेशनात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील तरतुदीनुसार सदर प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचनेचा मसुदा विधानसभा सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर करण्यास अनुमती देण्याबाबत" असा ठराव मांडला व त्यावर सभागृहात चर्चा होऊन ठराव संमत करण्यात आला.

(४९) सांविधिक प्रस्ताव (Statutory Motions) **(म.वि.स. नियम २९० अन्वये) :-**

संविधान व अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने हा प्रस्ताव मांडला जातो म्हणून या प्रस्तावाला सांविधिक प्रस्ताव असे म्हणतात. (Motion tabled in pursuance of a provision in the Constitution or Act of Legislature) हा प्रस्ताव मंत्री अथवा अशासकीय सदस्य यांना मांडता येतो. अध्यादेश नापसंतीचा प्रस्ताव, मा.अध्यक्ष, उपाध्यक्षांना पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव ही या प्रस्तावाची उदाहरणे आहेत. या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम २९० मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

'ज्या कोणत्याही सदस्याची सांविधिक प्रस्ताव मांडण्याची इच्छा असेल, तो ज्या अन्वये सदरहू प्रस्ताव केला जात असेल तो परिनियम किंवा अधिनियमिती यात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त किंवा संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या मताविषयी खात्री करून घेऊन अध्यक्ष अन्यथा निदेश देतील त्याव्यतिरिक्त, पूर्ण दहा दिवसांची नोटीस देईल व त्या नोटिशीबरोबर नियोजित प्रस्तावाची प्रत सादर करील.'

(५०) मंत्र्यांचे निवेदन (Statement by a Minister) **(म.वि.स. नियम ४७ अन्वये) :-**

एखाद्या मंत्र्यास अध्यक्षांची परवानगी घेऊन सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बाबींवर सभागृहात निवेदन करता येते. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करण्याची परवानगी देता येत नाही. परंतु सदर निवेदनाच्या संबंधात आणखी माहिती प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने प्रश्न विचारण्याची सदस्यांना परवानगी देता येते.

(५१) अभिनंदनपर प्रस्ताव (Motion of Congratulation) **(म.वि.स. नियम १४ अन्वये) :-**

विधिमंडळाच्या सभागृहाचे कामकाज, सर्वसाधारणपणे कामकाज पत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबींप्रमाणे चालते. सभागृहाच्या बैठकीस प्रारंभ होण्यापूर्वी अध्यक्षांची परवानगी घेऊन अभिनंदनपर प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या वेळेनंतर कोणत्याही वेळी मांडता येतो. अभिनंदनपर प्रस्ताव मान्य होण्यासंबंधी पुढीलप्रमाणे निकष आहेत.

(१) विवक्षित बाबींशी शासनाचा संबंध असला पाहिजे. (२) बाब केवळ औपचारिक स्वरूपाची असावी व (३) बाब वादातीत असली पाहिजे. प्रस्ताव मान्य होण्यासाठी प्रस्तावाधीन विषयाबाबत सभागृहातील सर्व गटांमध्ये एकवाक्यता होणे आवश्यक असते. एकवाक्यता असल्यासच अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येतो. *(दोन्ही सभागृहांत सन १९६९ पासून मांडण्यात आलेल्या अभिनंदनपर प्रस्तावांची यादी* ***परिशिष्ट क्रमांक-२३*** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

(५२) शोक प्रस्ताव (Motion of Condolence) **(म.वि.स. नियम १४ अन्वये) :-**

विधिमंडळाच्या सभागृहाचे कामकाज, सर्वसाधारणपणे कामकाज पत्रिकेवर ठरवून दिलेल्या बाबींप्रमाणे चालते. सभागृहाच्या बैठकीस प्रारंभ होण्यापूर्वी अध्यक्षांची परवानगी घेऊन शोक प्रस्ताव प्रश्नोत्तराच्या वेळेनंतर कोणत्याही वेळी मांडता येतो. महाराष्ट्र विधिमंडळाचे दिवंगत सदस्य वा देशातील तसेच राज्यातील महनीय व्यक्तींच्या निधनाबद्दल सभागृहात मांडण्यात येणाऱ्या शोकप्रस्तावांसंबंधीचे सर्व कामकाज या सचिवालयातील ग्रंथालय कक्षामार्फत करण्यात येते. *(दोन्ही सभागृहांत, सन १९४८ पासून महाराष्ट्र विधिमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त, मान्यवरांच्या मांडण्यात आलेल्या शोक प्रस्तावांची यादी* ***परिशिष्ट क्रमांक-२४*** *वर दर्शविण्यात आली आहे.)*

(५३) विनंती अर्ज (Petitions) **(म.वि.स. नियम २७२ अन्वये) :-**

सदस्यांना सर्वसाधारणपणे लोकहिताची बाब असलेला विनंती-अर्ज सभागृहाला सादर करता येतो. तथापि, यात विधानसभा नियम २६६ मध्ये नमूद केलेल्या बाबींचा समावेश नसावा. सदरहू अर्ज सभागृहाला सादर झाल्यानंतर असा विनंती अर्ज, विधानसभा विनंती-अर्ज समितीकडे (नियम २७२) विचारार्थ पाठविण्यात येतो. समिती त्यावर विचार करून सभागृहास अहवाल सादर करीत असते.

(५४) अशासकीय विधेयके (Private Member's Bills/Non-Official Bills) **(म.वि.स. नियम १११ अन्वये) :-**

अधिवेशन कालावधीत दर शुक्रवारी सभागृहाच्या बैठकीचे शेवटचे अडीच तास अशासकीय कामकाजासाठी नेमून दिले जातात. हा वेळ आळीपाळीने अशासकीय ठराव आणि अशासकीय विधेयके यांना देण्यात येतो. सभागृहाच्या नेत्यांच्या संमतीने शुक्रवार व्यतिरिक्त अन्य दिवस अशासकीय कामकाजासाठी नेमून देण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे तसेच ज्या शुक्रवारी सभागृहाची बैठक नसेल त्या आठवड्यातील इतर कोणत्याही दिवशी अशासकीय कामकाज घेण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतात. (महाराष्ट्र विधानसभा नियम १२ (१))

महाराष्ट्र विधानसभा नियम १११ अन्वये अशासकीय विधेयकाची सूचना खाजगी सदस्यांकडून देण्यात येते. अशासकीय विधेयकासाठी १५ दिवसांची सूचना देणे आवश्यक असते. अशासकीय विधेयकाचा मसुदा तयार करण्याच्याबाबतीत विधानमंडळ सचिवालयातील संबंधित कक्षाद्वारे आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते. मात्र, सदस्याने विधेयकाची सूचना देताना विधेयकाच्या प्रारुपासोबत उद्देश व कारणे यांचे निवेदन संक्षिप्त स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच, त्यात प्रक्षोभक, अप्रस्तुत व बदनामीकारक मजकूर असता कामा नये.

सदस्यांनी दिलेल्या विधेयकाचा मसुदा उद्देश व कारणे यांचे निवेदन यात वर्णरचनेतील आणि अशासारख्या इतर चुकांच्या दुरुस्तीव्यतिरिक्त खालील बाबतीत विधेयकाची छाननी केली जाते.

(१) विधेयकाच्या माध्यमातून सदस्यांना एखाद्या अधिनियमात सुधारणा अभिप्रेत असल्यास ती सुधारणा मूळ अधिनियमांतर्गत तरतुदीस बाधक आहे का?

(२) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ (१) व (३) खालील तरतुदीनुसार राज्यपालांच्या शिफारशींची आवश्यकता आहे काय?

(३) विधेयकाला भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०४ (ख) खालील तरतुदीनुसार राष्ट्रपतींच्या पूर्वमंजुरीची आवश्यकता आहे काय?

याबाबतीत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अभिप्राय विचारात घेऊन विधेयकाचे प्रारूप, उद्देश व कारणे यांच्या निवेदनासह स्वीकृतीसाठी मा. अध्यक्षांपुढे ठेवण्यात येते व अशाप्रकारे स्वीकृत केलेले विधेयक संबंधीत सदस्य विधानसभेत पुर:स्थापित करतात. महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये पुर:स्थापित करण्यात आलेली विधेयके राज्य शासनाच्या **राजपत्रात** शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध केली जातात. यानंतर अशी विधेयके बॅलटनुसार विचारार्थ सभागृहापुढे ठेवली जातात.

महाराष्ट्र विधानसभा नियम १५६ (१) मधील तरतुदीनुसार एखादे विधेयक संमत होण्यापूर्वी जर त्या विधेयकासंबंधात एका वर्षाच्या कालावधीत कोणताही प्रस्ताव आणण्यात आला नाही तर असे विधेयक व्यपगत होते. तथापि, सदरहू तरतूद अशासकीय विधेयकास लागू नाही, अशीही तरतूद सदर नियमात करण्यात आलेली आहे.

(५५) औचित्याचा मुद्दा (Point of Propriety) :-

औचित्याच्या मुद्दाबाबत विधानसभा नियमात तरतूद नाही. औचित्याच्या मुद्दाबाबत विधानसभा नियमात तरतूद नसल्यामुळे अध्यक्ष त्यांच्या अधिकारात सदस्यांना काही महत्त्वाचे विषय औचित्याच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित करण्यास अनुमती देतात. सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात शासनाकडून नोंद घेऊन संबंधित सदस्यांना ३० दिवसांच्या आत त्याबाबत माहिती/उत्तरे, मा.मंत्री/राज्यमंत्री महोदय यांच्यामार्फत कळविण्यात येतात.

*****

प्रकरण पाचवे

विधी विधान (Legislation)

(५६) शासकीय विधेयके (Government Bills) :-

प्रत्येक अधिनियमाला यथास्थिती संसद/विधानमंडळाची मान्यता असणे आवश्यक आहे कारण, लोकशाही व्यवस्थेमध्ये फक्त या संस्थाच जनमताचे प्रतिनिधीत्त्व करतात.

विधानमंडळाच्या कामकाजापैकी विधीविषयक कामकाज हे प्रमुख काम समजले जाते. कोणताही कायदा अंमलात येण्यापूर्वी तो विधेयकाच्या स्वरुपात सभागृहात येणे जरुरीचे असते. विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केल्यानंतरच त्यावर आवश्यकतेनुसार संविधानांतर्गत तरतुदींन्वये राज्यपाल किंवा राष्ट्रपती शिक्कामोर्तब करतात व त्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होते. संविधानाच्या अनुच्छेद २४६ अन्वये संसद किंवा राज्य विधानमंडळाने संमत करावयाच्या अधिनियमाच्या विषयाबाबत परिसीमा स्पष्ट केलेल्या आहेत. संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची-१ (संघ सूची-Union List) मधील विषयांसंबंधी फक्त संसद कायदा करू शकते, सूची-२ (राज्य सूची-State List) मधील विषयांसंबंधी राज्य विधानमंडळ कायदा करू शकते, तर सूची-३ (समवर्ती सूची - Concurrent List) मधील विषयांबाबत संसद व राज्य विधानमंडळे कायदे करू शकतात. *(The constitutional provisions in India on the subject of distribution of legislative powers between the Union and the States are defined under several articles; the most important in this regard being specifically under articles 245 & 246 of the Constitution of India. The Seventh Schedule to the Constitution of India defines and specifies allocation of powers and functions between Union & States. It contains three lists; i.e. 1) Union List, 2) State List and 3) Concurrent List. Originally there was 97 subjects in union list but now it is 100 subjects in union list. And in state list there was 66 subjects but now it is 61 subjects. And in concurrent list there was 47 subjects but now it is 52 subjects in concurrent list.)*

विधेयकाचे शासकीय व अशासकीय असे दोन प्रकार असतात. शासनातर्फे (मंत्र्यांमार्फत) मांडण्यात येणारे ते शासकीय व दुसऱ्या कोणत्याही सदस्यामार्फत (मंत्र्यांव्यतिरिक्त) मांडलेले ते अशासकीय विधेयक होय.

विधेयकाचे (१) सर्वसाधारण विधेयक, (२) धन विधेयक (Money Bill), (३) वित्तविषयक विधेयक (Financial Bill) असे प्रकार असतात.

ज्या विधेयकांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ (१) व (३) च्या तरतुदी लागू होतात त्यांच्याबाबतीत राज्यपालांची शिफारस आवश्यक असते. ज्या विधेयकांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०४ (ख) च्या तरतुदी लागू होतात त्यांच्या बाबतीत राष्ट्रपतींच्या पूर्वमंजूरीची आवश्यकता असते.

एचबी १५९९—१०अ

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९९ मध्ये धन विधेयकाची (Money Bill) व्याख्या दिलेली आहे. धन विधेयक फक्त विधानसभेमध्येच पुर:स्थापित करता येते. संविधानाच्या अनुच्छेद १९८ (५) अन्वये विधानसभेने धन विधेयक संमत केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे शिफारशीकरिता पाठविले जाते. अशा प्रकारे विधानपरिषदेकडे शिफारशीकरिता पाठविलेले धन विधेयक १४ दिवसांच्या कालावधीत विधानसभेकडे परत पाठविण्यात आले नाही तर उक्त कालावधी संपल्यानंतर ते विधेयक विधानसभेने संमत केले होते त्याच स्वरुपात दोन्ही सभागृहांनी संमत केले असल्याचे मानण्यात येते. धन-विषयक विधेयकात संविधानाच्या अनुच्छेद १९९ (१) मधील (अ) ते (फ) अन्वये कर लादण्याची किंवा कर कमी करण्याची तरतूद असेल किंवा एखादे कर्ज काढण्याबद्दल हमी घेण्याची तरतूद असेल किंवा भारित (Charged) खर्च घोषित करावयाचा असेल तर अशा प्रकारे त्या अनुच्छेदातील फक्त (अ) ते (फ) संबंधीची तरतूद अशा विधेयकात असते. मात्र वित्तविषयक विधेयकात (Financial Bill) उपरोल्लेखित (अ) ते (फ) संबंधीच्या तरतुदीशिवाय आणखी काही तरतुदी असतात. ही दोन्ही विधेयके प्रथम विधानसभेत मांडणे जरुर असते, फरक एवढाच की, धनविषयक विधेयक विधानपरिषदेच्या फक्त शिफारशीकरिता पाठविले जाते तर वित्तविषयक विधेयकात विधानपरिषद सुधारणा सूचवू शकते.

जेथे विधानपरिषद आहे अशा राज्यांच्या विधानमंडळामध्ये प्रस्तुत केलेले एखादे विधेयक हे धन विधेयक आहे किंवा नाही असा प्रश्न उद्‌भवल्यास त्यावरील अंतिम निर्णय विधानसभा अध्यक्षांचा असेल [कलम १९९(३)]

महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये विधेयक मांडल्यानंतर ते उद्देश व कारणे यांच्या निवेदनासह **राजपत्रात** त्वरित प्रसिद्ध केले जाते. त्यानंतर किमान ४ दिवसांनी ते चर्चेसाठी सभागृहात येऊ शकते. नियमान्वये विधेयक विचारात घेण्यात यावे, प्रवर समितीकडे अथवा संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठवावे तसेच अभिप्राय मागविण्यासाठी प्रसृत करावे असे विविध प्रस्ताव मांडता येतात (महाराष्ट्र विधानसभा नियम १२३) विधेयकावरील सर्वसाधारण चर्चेनंतर त्यावर तपशीलवार खंडशः चर्चा होते. यावेळी सदस्यांना एका दिवसाच्या मुदतीची सूचना देऊन सुधारणा सूचविता येतात. म.वि.स. नियम १३४ अन्वये त्याकरिता विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक असते. विधेयकासंबंधी कार्यपद्धतीची तपशिलवार माहिती म.वि.स. नियम १११ ते १५८ मध्ये अंर्तभूत करण्यात आली आहे.

सुधारणा निकालात काढून विधेयकाचे खंडशः वाचन पूर्ण झाल्यानंतर विधेयक संमत करण्याच्या अवस्थेत येते. त्यालाच विधेयकाचे **तिसरे वाचन** असे म्हणतात. त्यावेळी विधेयक सुधारणेसह किंवा मूळ स्वरुपात संमत करावे असा प्रस्ताव मांडण्यात येतो व तो संमत झाल्यानंतर विधेयक संमत झाले असे समजण्यात येते.

प्रभारी सदस्यास विधेयकाच्या कोणत्याही टप्प्यावर सभागृहाच्या अनुमतीने ते विधेयक मागे घेता येईल. (म.वि.स.नियम १५४)

विधेयक मांडल्यानंतर तत्संबंधातील कोणताही प्रस्ताव एक वर्षाच्या आत न मांडल्यास ते विधेयक व्यपगत (Laps) होते [म.वि.स.नियम १५६ (१)].

विधानसभेने एखादे विधेयक चर्चेअंती फेटाळल्यानंतर त्याच विषयासंबंधीचे दुसरे विधेयक सहा महिन्यांच्या आत सभागृहात पुन्हा मांडता येत नाही (म.वि.स.नियम १५७).

(५७) राज्य विधानमंडळाने विविध विषयांवरील संमत केलेले महत्त्वाचे अधिनियम :-

मागील कामकाजाचे सिंहावलोकन केले तर या कालावधीत महत्त्वपूर्ण व जिव्हाळ्याच्या विषयांवर विधानमंडळाने देशांतर्गत अन्य राज्यांना पथदर्शी स्वरुपाचे कायदे संमत केले आहेत. त्यामध्ये विधानसभेचे महत्त्वाचे योगदान आहे. असे उल्लेखनीय तरतुदींविषयक अधिनियम पुढे दर्शविले आहेत :-

१. महाराष्ट्र जलसंधारण अधिनियम.

२. मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम.

३. महाराष्ट्र व्यवसाय कर अधिनियम.

४. महाराष्ट्र देवस्थान अधिनियम.

५. महाराष्ट्र कापूस एकाधिकार खरेदी योजना अधिनियम.

६. महाराष्ट्र माथाडी हमाल कल्याणसंबंधी अधिनियम.

७. महाराष्ट्र सहकारी सोसायट्या अधिनियम.

८. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम.

९. महाराष्ट्र राज्य महिलांसाठी आयोग अधिनियम.

१०. महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा अधिनियम.

११. मुंबई देवदासी संरक्षण अधिनियम.

१२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७५.

१३. महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम.

१४. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.

१५. महाराष्ट्र खार जमीन अधिनियम.

१६. महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम.

१७. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.

१८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१.

१९. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९४.

२०. महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, १९७६.

२१. महाराष्ट्र कमाल जमीन धारणा अधिनियम.

२२. महाराष्ट्र गलिच्छ वस्ती सुधारणा अधिनियम.

२३. महाराष्ट्र जलप्रदूषण प्रतिबंध अधिनियम.

२४. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम.

२५. महाराष्ट्र खाजगी उद्योग क्षेत्रांमधील नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवण्यासंबंधी अधिनियम.

२६. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९८.

२७. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९.

२८. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९.

२९. महाराष्ट्र देवदासी प्रथा नाहिशी करणे अधिनियम, २००५.

३०. महाराष्ट्र घरेलू कामगार संरक्षण अधिनियम, २००८.

३१. महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले व औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार घातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८८.

३२. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) अधिनियम, १९९५.

३३. महाराष्ट्र "बॉम्बे" हे नाव पूर्ववत "मुंबई" असे करण्याबाबत अधिनियम, १९९६.

३४. महाराष्ट्र सागरी मंडळ अधिनियम, १९९६.

३५. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७.

३६. कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, १९९७.

३७. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७.

३८. महाराष्ट्र पशू आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.

३९. महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८.

४०. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८.

४१. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम, १९९८.

४२. महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, १९९९.

४३. महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद अधिनियम, १९९८.

४४. राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग अधिनियम, २००४.

४५. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४.

४६. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन अधिनियम, २००५.

४७. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.

४८. महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५.

४९. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००६.

५०. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००६.

५१. महाराष्ट्र लॉटऱ्यावरील कर अधिनियम, २००६.

५२. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६.

५३. महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अधिनियम, २००६.

५४. महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) अधिनियम, २००६.

५५. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अर्हता (सुधारणा) अधिनियम, २००६.

५६. महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६.

५७. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००७.

५८. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम, २००७.

५९. महाराष्ट्र मुल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २००७.

६०. फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००७.

६१. महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड हातभट्टीवाले, औषधिद्रव्येविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विधायक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २००७.

६२. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन (सुधारणा) अधिनियम, २००८.

६३. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अधिनियम, २०१०.

६४. महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, २०११.

६५. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग (सुधारणा) अधिनियम, २०१२.

(१) सन १९८७ चे वि.स.वि. क्रमांक २२-महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्याबाबत प्रतिबंध) विधेयक, १९८७, दिनांक १७ एप्रिल, १९८७ रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. समितीने आपला अहवाल दिनांक १४ मार्च, १९८८ रोजी सभागृहात सादर केला. सदरहू विधेयक दिनांक १५ मार्च, १९८८ रोजी विधानसभेत व दिनांक २९ मार्च, १९८८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. (सन १९८८ चा अधिनियम क्रमांक ६).

(२) सन १९८८ चे वि.प.वि. क्रमांक ८-महाराष्ट्र प्रसव-पूर्व निदान तंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत विधेयक, १९८८ सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, १९८८ रोजी विधानपरिषदेत व दिनांक १६ एप्रिल, १९८८ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये गर्भजल निदानावर बंदी घालण्यात आली आहे (सन १९८८ चा अधिनियम क्रमांक १५).

(३) सन १९९१ चे वि.प.वि. क्रमांक १३-महाराष्ट्र भुजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) विधेयक, १९९१, दिनांक १८ डिसेंबर, १९९१ रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे सोपविण्यात आले होते. समितीचा अहवाल सभागृहात दिनांक १९ जुलै, १९९३ रोजी सादर करण्यात आले. सदरहू विधेयक दिनांक २१ जुलै, १९९३ रोजी विधानपरिषदेत व दिनांक ३० जुलै, १९९३ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या साठ्यांचे जतन करण्यासाठी भूजल वापराचे विनियमन करण्यासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. (सन १९९३ चा अधिनियम क्रमांक २८).

(४) सन १९९२ चे वि.स.वि. क्रमांक ४८-महाराष्ट्र विद्यापीठ विधेयक १९९२, दिनांक ७ डिसेंबर, १९९२ रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे सोपविण्यात आले होते. समितीने आपला अहवाल दिनांक १२ जुलै, १९९४ रोजी सभागृहात सादर केला. सदरहू विधेयक दिनांक १८ जुलै, १९९४ रोजी विधानसभेत व दिनांक २० जुलै, १९९४ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये राज्यातील सर्व विद्यापीठांकरिता समान कायदा तयार करण्यात आला आहे (सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ३५).

(५) सन १९९४ चे वि.स.वि. क्रमांक ४- मराठवाडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, १९९४. सदरहू विधेयक संमत करताना सभागृहांची बैठक दिनांक २१ एप्रिल, १९९४ रोजी दुपारी १२.०० वाजता सुरू झाली होती ती दुसऱ्या दिवशी सकाळी ९.०७ पर्यंत चालू राहिली व विधेयकावरील चर्चा संपवून विधेयक दिनांक २२ एप्रिल, १९९४ रोजी विधानसभेत व दिनांक २५ एप्रिल, १९९४ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये मराठवाडा विद्यापीठास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे नाव देण्यात आले आहे (सन १९९४ चा अधिनियम क्रमांक २५).

(६) सन १९९४ चे वि.स.वि. क्रमांक २९-हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, १९९४.

सदरहू विधेयक दिनांक २८ जुलै, १९९४ रोजी विधानसभेत व दिनांक २९ जुलै, १९९४ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये हिंदू मुलगी अथवा स्त्रीयांना वडीलांच्या मिळकतीत वारसाहक्काच्या बाबतीत मुलाएवढाच समान हक्क देण्यात आला आहे. (सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ४०).

(७) सन १९९५ चे वि.स.वि. क्रमांक २५-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, १९९५. सदरहू विधेयक दिनांक १८ डिसेंबर, १९९५ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले. दिनांक २१ डिसेंबर, १९९५ रोजी विधानपरिषदेकडून फेटाळण्यात आले. दिनांक २१ जानेवारी, १९९६ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केले आहे असे मानण्यात आले.

या अधिनियमान्वये दोनपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती ग्रामपंचायतीचा किंवा जिल्हापरिषदेचा सदस्य म्हणून निवड होण्यास किंवा सदस्य असण्यास निरर्ह ठरविण्यात आले आहे (सन २००० चा अधिनियम क्रमांक ४४).

(८) सन १९९५ चे वि.स.वि. क्रमांक २७-महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, १९९५. सदरहू विधेयक दिनांक १८ डिसेंबर, १९९५ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले. दिनांक २१ डिसेंबर, १९९५ रोजी विधानपरिषदेकडून फेटाळण्यात आले. दिनांक २१ जानेवारी, १९९६ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केले आहे असे मानण्यात आले.

या अधिनियमान्वये दोनपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती महानगरपालिकेचा किंवा नगरपरिषदेचा सदस्य म्हणून निवड होण्यास किंवा सदस्य असण्यास निरर्ह ठरविण्यात आले आहे (सन २००० चा अधिनियम क्रमांक ४३).

(९) सन १९९६ चे वि.स.वि. क्रमांक ७-महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ विधेयक १९९६. सदरहू विधेयक दिनांक २२ मार्च, १९९६ रोजी विधानसभेत व दिनांक २२ मार्च, १९९६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये कृष्णा खोऱ्यात पाणी अडवून व जिरवून ते शेतीच्या उपयोगात आणण्याच्या दृष्टीने तरतूदी करण्यात आल्या आहेत. (सन १९९६ चा अधिनियम क्रमांक १५).

(१०) सन १९९८ चे वि.स.वि. क्रमांक ५-मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, १९९८ आणि सन १९९८ चे वि.स.स. क्रमांक ६-नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, १९९८.

वरील पैकी विधेयक क्रमांक ५, दिनांक १७ मार्च, १९९८ रोजी विधानसभेत व दिनांक १६ एप्रिल, १९९८ रोजी विधानपरिषदेत आणि विधेयक क्रमांक ६, दिनांक २२ एप्रिल, १९९८ रोजी विधानसभेत व दिनांक २४ एप्रिल, १९९८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

उपरोक्त दोन्ही अधिनियमांद्वारे मुंबई व नागपूर महानगरपालिकेत महापौर परिषदेची तरतूद करण्यात आली होती (सन १९९८ चे अधिनियम क्रमांक १० व १२).

त्यानंतर सन १९९९ चे वि.स.वि. क्रमांक २५-मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, १९९९ व सन १९९९ चे वि.स.वि. क्रमांक २६-नागपूर शहर महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, १९९९ अन्वये महापौर परिषदेसंबंधातील तरतूद रद्द करण्यात आली आहे (सन १९९९ चे अधिनियम क्रमांक २६ व २७).

(११) सन १९९९ चे वि.स.वि. क्रमांक ९-महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण विधेयक, १९९९. सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, १९९९ रोजी विधानसभेत व दिनांक १५ एप्रिल, १९९९ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी, विवक्षित परिस्थितीत दूरध्वनी इलेक्ट्रानिक किंवा मौखिक संदेशावरील संदेश पकडण्याच्या तरतुदींसह अधिक कडक आणि जरब बसविणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत (सन १९९९ चा अधिनियम क्रमांक ३०).

(१२) सन १९९९ चे वि.प.वि. क्रमांक ९-महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई करणे विधेयक, १९९९. सदरहू विधेयक दिनांक ७ एप्रिल, १९९९ रोजी विधानपरिषदेत व दिनांक २३ एप्रिल, १९९९ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये महाविद्यालयात रॅगिंग करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे (सन १९९९ चा अधिनियम क्रमांक ३३).

(१३) सन २००१ चे वि.स.वि. क्रमांक ७१-महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) आणि महानगरपालिकांच्या निवडणूका घेण्यासाठी तात्पुरत्या तरतूदी विधेयक, २००१. सदरहू विधेयक दिनांक ६ डिसेंबर, २००१ रोजी विधासभेत व दिनांक ६ डिसेंबर, २००१ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, जी व्यक्ती राज्य विधानमंडळ किंवा संसदेची सदस्य असेल ती पालिका सदस्य बनण्यास अनर्ह ठरेल (सन २००२ चा अधिनियम क्रमांक ८).

(१४) सन २००२ चे वि.स.वि. क्रमांक ४९-महाराष्ट्र माहितीचा अधिकार विधेयक, २००२. सदरहू विधेयक दिनांक १० मार्च, २००३ रोजी विधानसभेत व दिनांक १३ मार्च, २००३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रितीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी तरतूद करण्यात आली होती (सन २००३ चा अधिनियम क्रमांक ३१).

माहितीचा अधिकार या विषयावर संपुर्ण भारतात एकसमान कायदा असावा याकरिता संसदेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) केला असून उक्त अधिनियम दिनांक १२ ऑक्टोबर, २००५ पासून संपूर्ण भारतभर अंमलात आला असल्याने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ निरसित करण्यात आला आहे (सन २००६ चा महा. अधिनियम क्रमांक १).

(१५) सन २००३ चे वि.स.वि. क्रमांक ३०-महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २००३ हे दिनांक १० एप्रिल, २००३ रोजी पुर:स्थापित झालेले विधेयक विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय दिनांक १० एप्रिल, २००३ रोजी

संमत केले व विधानपरिषदेकडे शिफारशीसाठी पाठविले. विधानपरिषदेने विधेयक शिफारशींसहित विधानसभेत परत पाठविले. परंतु, त्यादिवशी विधेयकावरील ही शिफारस विधानसभेस प्राप्त होण्यापूर्वीच विधानसभेचे अधिवेशन संस्थगित झाले होते. त्यामुळे उक्त शिफारशींचा विचार विधानसभेत होऊ शकला नाही. या शिफारशींवर विचार करण्यासाठी विधानसभेची बैठक पुन्हा बोलाविणे अनिवार्य झाले, **त्यानुसार पुनश्च महाराष्ट्र विधानसभेचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन घेऊन सदरहू विधेयक दिनांक ८ मे, २००३ रोजी शिफारशीसहित संमत करण्यात आले. (सन २००३ चा अधिनियम क्रमांक १९).**

(१६) सन २००४ चे वि.प.वि. क्रमांक ९-श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) विधेयक, २००४, सदरहू विधेयक दिनांक २ जून, २००४ रोजी विधानपरिषदेत व दिनांक ११ जून, २००४ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये श्री. साईबाबा संस्थानच्या (शिर्डी) प्रभावी व कार्यक्षम व्यवस्थापनासंबंधातील तरतूदी करण्यात आल्या आहेत (सन २००४ चा अधिनियम क्रमांक १४).

(१७) सन २००४ चे वि.प.वि. क्रमांक ३-मुंबई दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक २००४-विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २००५ रोजी संमत केले व विधानसभेने दिनांक १६ एप्रिल, २००५ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये (१) मुंबई शहरातील वाणिज्यिक आस्थापनांसाठी बंद करण्याची वेळ रात्री ८.३० वरुन ९.३० पर्यंत वाढविण्यात आली आहे. (२) महिला कर्मचाऱ्यांना रात्री ९.३० पर्यंत काम करण्याची मुभा देण्यात आली आहे. (३) अतिकालिक कामाच्या तासांची कमाल मर्यादा तीन तास राहील अशी तरतूद करण्यात आली आहे (सन २००५ चा अधिनियम क्रमांक ३४).

(१८) सन २००५ चे वि.प.वि. क्रमांक १९-मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २००५ विधानपरिषदेने दिनांक २२ जुलै, २००५ रोजी संमत केले. विधानसभेने दिनांक २३ जुलै, २००५ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये, जी इमारत बृहन्मुंबई विकास नियंत्रण विनियमन, १९९१ याच्या विनियम ३३ (७) अन्वये तलपृष्ठ निर्देशांक (एफएसआय बेनिफिट) याचा लाभ मिळण्यास हक्कदार आहे आणि जी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ द्वारे नियमन करण्यात आलेली उपकरपात्र इमारत आहे आणि जिचे विद्यमान भाडेकरुंनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून पुनर्बांधकाम किंवा पुनर्विकास करण्यात आला आहे किंवा जी महानगरपालिकेच्या मालकीची असून १९४० पूर्वी पहिल्यांदा बांधण्यात आली होती व जिची तिच्या रहिवाशांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास करण्यात आला आहे अशा मुंबई शहरातील इमारतीतील ३५० चौ. फुटांहून अधिक फरसबंद क्षेत्र (चटई क्षेत्र) नसलेल्या निवासी गाळयांच्या बाबतीत राज्य शासन अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा, कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल. तसेच वेगवेगळया कालावधींसाठी आणि वेगवेगळया गाळयांसाठी वेगवेगळे दर निश्चित करता येतील अशी तरतूद करण्यात आली आहे (सन २००५ चा अधिनियम क्रमांक ४४).

(१९) सन २००५ चे वि.स.वि. क्रमांक ६०-मुंबई पोलीस (सुधारणा) विधेयक, २००५ विधानसभेने दिनांक २१ जुलै, २००५ रोजी संमत केले व विधानपरिषदेने दिनांक २३ जुलै, २००५ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये मुंबई शहरातील खाद्यगृहे किंवा परमीट रुम किंवा बियर बार यामध्ये नृत्याविष्कार आयोजित करण्यावर बंदी घालण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे (सन २००५ चा अधिनियम क्रमांक ३५).

(२०) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक १४-महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयक, २००६-विधानसभेने दिनांक १२ एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या विधेयकान्वये राज्यात सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन, पडीक जमीन, जलाशय तसेच, लोकांना दिसतील अशा जागा अशा ठिकाणी अविघटनशील कचरा फेकणे किंवा जमा करून ठेवणे यास प्रतिबंध करण्यासाठी व संपूर्ण राज्य प्लॅस्टिक पिशव्या मुक्त राज्य करण्यासाठी अधिनियम करण्यात आला आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक १०).

(२१) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक १६-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २००६-विधानसभेने दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या विधेयकान्वये राज्यात कंत्राटी शेती पद्धतीला चालना देऊन त्यान्वये अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात आणि किरकोळ माल साखळी उद्योग यांना दर्जेदार उत्पन्न देणे शक्य व्हावे यादृष्टीने अधिनियम करण्यात आला आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक २५).

(२२) सन २००५ चे वि.प.वि. क्रमांक २५-महाराष्ट्र देवदासी प्रथा (नाहीशी करणे) विधेयक, २००५-विधानसभेने दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २० एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या विधेयकान्वये राज्यातील देवदासी पद्धत नाहीशी करण्यासाठी तसेच, या सामाजिक अनिष्ट प्रथेस प्रभावीपणे हाताळून तिचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि देवदासींना प्रतिष्ठा व सन्मानाने तथा आदरपूर्वक जीवन जगता यावे यास्तव अधिनियम करण्यात आला आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक २५).

(२३) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक २८-उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे विधेयक, २००६-विधानसभेने दिनांक ४ एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक १० एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या विधेयकान्वये उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे (रस्ते, जलप्रवाह व जलाशय, नैसर्गिक निःस्सारण मार्ग इ. वरील विकासकामांव्यतिरिक्त) विकासकामांच्या वर्गवारीनुसार प्रशमन फी व विकास आकार घेऊन नियमाधीन करण्याकरीता तरतूद करण्यात आली आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक ९).

(२४) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक ४३-मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २००६-विधानसभेने दिनांक १३ एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये अप्रतिभूत कर्जाच्या संलेखांवरील मुद्रांक शुल्क ७% नी कमी करण्यात आले असून हक्कलेख निक्षेप, हडप, तारण किंवा तारणग्राहण संलेखांकरीता आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क ८०% नी कमी करण्यात आले आहे. तसेच, सामान्य नागरीकास स्वतःच्या मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण करणे सुलभ व्हावे यास्तव निवासी जागांच्या संबंधातील अभिहस्तांतरण पत्रावर आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क पहिल्या अडीच लाखाकरीता ०.५ टक्क्यांवरुन १०० रुपयावर आणण्यात आले आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक १२).

(२५) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक ५१-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक, २००६-विधानसभेने दिनांक २१ एप्रिल, २००६ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २१ एप्रिल, २००६ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये अशी तरतूद करण्यात आली आहे की, राज्य विधानमंडळाचे जे सदस्य आपला संपूर्ण पदावधी पूर्ण होण्याआधी मरण पावले होते किंवा जे अपात्रतेच्या कारणाव्यतिरिक्त अन्य कारणांकरीता आपला कालावधी पूर्ण करु शकले नव्हते अशा माजी सदस्यांच्या विधवांना निवृत्तीवेतन मिळण्याचा हक्क शाबूत राहावा यास्तव त्यांना निवृत्तीवेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे (सन २००६ चा अधिनियम क्रमांक १५).

(२६) सन २००७ चे वि.स.वि. क्रमांक ५४-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २००७. विधानसभेने दिनांक २६ नोव्हेंबर, २००७ रोजी व विधानपरिषदेने दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ रोजी संमत केले.

या अधिनियमान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७३ क चे पोट-कलम (५) वगळण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे जेणेकरुन सहकारी क्षेत्रातील कामाचा मौलिक अनुभव असणारा सहकारी संस्थेचा कार्यक्षम संचालक आणि पदाधिकारी, जोपर्यंत त्या संस्थेच्या सदस्यांचा त्याच्यावर विश्वास आहे तोपर्यंत त्या संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून राहू शकेल (सन २००७ चा अधिनियम क्रमांक ३०).

(२७) सन २००७ चे वि.स.वि. क्रमांक ७४-महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २००७. विधानसभेने दिनांक १७ एप्रिल, २००८ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २१ एप्रिल, २००८ रोजी संमत केले.

प्रा. वैद्यनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या टास्क फोर्सच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, भारत सरकार व राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांनी केलेल्या सामंजस्य करारानुसार राज्यातील प्राथमिक कृषी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँक यांचा पत व्यवसायामुळे झालेला तोटा भरून काढण्यासाठी भारत सरकारने १००% अनुदान उपलब्ध करून देण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार भारत सरकारकडून वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी महाराष्ट्र शासनास, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये विवक्षित सुधारणा करण्याकरीता सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबतची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत (सन २००८ चा अधिनियम क्रमांक ११).

(एक) सहकारी पतसंरचना संस्था, ठेवी व कर्जे यांवरील व्याजदराच्या बाबतीत, भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुरुन अशा त्यांच्या स्वतःच्या धोरणांचा अंगीकार करतील.

(दोन) सहकारी पतसंरचना संस्था, भारतीय रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वांना अधीन राहून, भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेईल.

(तीन) प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, नाबार्डने विनिर्दिष्ट केलेल्या निकषांना अनुसरुन निबंधकाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, तिच्या सदस्यांना लाभांश देईल.

(चार) प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था, ठेवीदार व वित्तीय सेवा उपभोक्ते यांना संस्थेचे सदस्य म्हणून घेता येईल व त्यांना मत देण्याचा हक्क असेल.

(पाच) सहकारी पतसंरचना संस्थेला, तिच्या निवडीनुसार कोणत्याही संघीय संरचनेशी संलग्न होण्याचे स्वातंत्र्य असेल.

(सहा) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँक यांच्या संचालक मंडळावर व्यावसायिक संचालकांची नियुक्ती करणे.

(सात) भारतीय रिझर्व बँकेशी अगोदर विचारविनिमय करून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची किंवा राज्य सहकारी बँकेची समिती बरखास्त करणे किंवा दूर करणे.

(२८) सन २००७ चे वि.स.वि. क्रमांक ७५-महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २००७. विधानसभेने दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी व विधानपरिषदेने दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ रोजी संमत केले.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये संस्थेच्या कार्यक्षेत्रात किंवा संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर संस्थेच्या परवानगीशिवाय संस्था चालवित असलेल्या धंद्यासारखाच धंदा त्या सदस्यांनी चालविला असेल तर किंवा संस्था चालवित असलेल्या धंद्यासारखाच धंदा चालविणाऱ्या एखाद्या कंपनीचा तो संचालक असेल किंवा तशा एखाद्या भागीदारी संस्थेचा भागीदार असेल तर, केवळ तो सदस्यच संस्थेच्या समितीवर सदस्य म्हणून नेमला जाण्यास, नामनिर्दिष्ट होण्यास, स्वीकृत केला जाण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास पात्र असणार नाही अशी तरतूद मूळ अधिनियमात करण्याकरिता उक्त सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून तरतूद करण्यात आली आहे (सन २००७ चा अधिनियम क्रमांक ३१).

(२९) सन २००८ चे वि.स.वि. क्रमांक ५७-मुंबई पोलिस (सुधारणा) विधेयक, २००८. विधानसभेने दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी व विधानपरिषदेने दिनांक ३० नोव्हेंबर, २००७ रोजी संमत केले.

राज्यात विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि अशासकीय संघटनांकडून त्यांच्या समस्यांबाबतीत असंतोष प्रकट करण्यासाठी आंदोलने होत असतात त्यावेळी प्रसंगी उग्र रुप धारण करून संबंधितांकडून जिवित हानी तसेच सार्वजनिक किंवा खाजगी मालमत्तेचे नुकसान करण्यात येते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांकडून नुकसानीची भरपाई मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती तरतूद सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे (सन २००७ चा अधिनियम क्रमांक ३१).

(३०) सन २००८ चे वि.स.वि. क्रमांक ५१-महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ विधेयक, २००८.

विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २९ डिसेंबर, २००८ रोजी संमत केले.

राज्यातील घरेलू काम करणाऱ्या कामगारांची सामाजिक सुरक्षितता विचारात घेऊन त्यांना संघटितरित्या विविध लाभ मिळविता यावेत इ. करिता घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने सदरहू अधिनियम करण्यात आला आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक १).

(३१) सन २००८ चे वि.स.वि. क्रमांक ५९-तुळजापूर विकास प्राधिकरण विधेयक, २००८. विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी संमत केले.

राज्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजाभवानी मंदिर हे महत्त्वाचे क्षेत्र असल्याने व तेथे वर्षभर मोठ्या संख्येने यात्रेकरु येत असल्याने यात्रेकरुना मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या दृष्टीने तुळजापूर शहराचा नियोजनबद्ध विकास करण्याकरिता व तुळजापूर नगरपालिका क्षेत्राच्या हद्दिपासून ५ कि.मीटर पर्यंतच्या परिसराचा विकास करण्याकरिता विशेष विकास प्राधिकरणाची तरतूद उक्त अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक ३).

(३२) सन २००८ चे वि.स.वि. क्रमांक ६१-मुंबई ग्राम पंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २००८. विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी व विधानपरिषदेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी संमत केले.

राज्यातील ग्राम पंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या राखीव जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तींनी नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु जिला नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकाला वैधता प्रमाणपत्र मिळाले नसेल, ती व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत, तीने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा पुरावा सादर करील आणि ते निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची हमी घेईल अशी तरतूद अलीकडेच करण्यात आली होती. तथापि, या सवलतीमुळे बऱ्याच सदस्यांकडून वैधता प्रमाणपत्र राहून गेल्याने ते सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरले असे निदर्शनास आल्याने व मोठ्या प्रमाणावर पोट-निवडणुका घेणे आवश्यक झाल्याने राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्रासोबत जातीचे प्रमाणपत्र आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्याची तरतूद प्रस्तुत सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक ५).

(३३) सन २००६ चे वि.स.वि. क्रमांक ७२-मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, २००६. विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर, २००८ रोजी व विधानपरिषदेने दिनांक १९ मार्च, २००९ रोजी संमत केले.

महानगरपालिकेला घालून दिलेली तिची सर्व आवश्यक व स्वेच्छाधिन कामे पार पाडण्यासाठी पुरेशी तरतूद करणे, रस्ते, गटारे, पाणीपुरवठा मार्ग बांधणे व त्याची देखभाल करणे तसेच इतर आवश्यक नागरी सोई व सुविधा उपलब्ध करून देणे यावरील खर्च कर्मचारी व कामगार यांचे वेतन व पगार यावरील खर्च यामध्ये कमालीची वाढ झाली आहे.

सदरहू खर्च भागविण्याकरिता मालमत्ता कर पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात येऊन पट्टीयोग्य मुल्य यापद्धतीऐवजी भांडवलीमुल्य धारित निर्धारण पद्धतीचा अवलंब करण्याबाबतची तरतूद उक्त सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक ११)

(३४) सन २००९ चे वि.प.वि. क्रमांक ३-यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ व कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ सुधारणा) विधेयक, २००९. विधानपरिषदेने दिनांक ९ जून, २००९ रोजी व विधानसभेने दिनांक ९ जून, २००९ रोजी संमत केले.

विद्यापीठांच्या कोणत्याही प्राधिकरणांचा सदस्य होण्यासाठी पात्रतेच्या कोणत्याही शर्ती विनिर्दिष्ट करणे, कुलगुरु म्हणून नियुक्ती करण्यासाठीच्या पात्रतेच्या शर्तींचा त्यात समावेश करण्याबाबतचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्याबाबत तरतूद उक्त सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक १४).

(३५) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४-महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन) विधेयक, २००९. विधानसभेने दिनांक १३ जून, २००९ रोजी व विधानपरिषदेने दिनांक १६ जून, २००९ रोजी संमत केले.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कापूस बी-बियाण्यांच्या प्रकारांचा पुरवठा, वितरण आणि विक्रीची किंमत निश्चित करून त्यांची विक्री करण्याबाबत विनियमन करण्याबाबत तरतूद उक्त अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा महा. अधिनियम क्रमांक १९).

(३६) सन २००९ चे वि.प.वि. क्रमांक ८-महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २००९ सदरहू विधेयक दिनांक ९ डिसेंबर, २००९ रोजी विधानपरिषदेत व दिनांक २२ डिसेंबर, २००९ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम १७ अनुसार, जमीन संपादन करणारी एखादी संस्था, जेव्हा विकसित जमीन निकालात काढण्याचा प्रस्ताव करते तेव्हा राज्य शासनाने विहित केलेली रक्कम भरल्यावर संबंधित प्रकल्पबाधित व्यक्तीला त्याच्याकडून संपादित केलेल्या जमिनीपैकी साडेबारा टक्क्यांएवढी विकसित जमीन मिळण्याचा हक्क असेल. जास्तीत जास्त प्रकल्पबाधित व्यक्तींना लाभ मिळण्याच्या दृष्टीने, प्रकल्पाचे स्वरुप व स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन, अधिसूचित करण्यात येईल असे पर्यायी लाभ विकसित जमिनींच्याऐवजी प्रकल्पबाधित व्यक्तींना देणे शक्य व्हावे यासाठी, तरतूद प्रस्तुत सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २००९ चा अधिनियम क्रमांक २८).

(३७) सन २०१० चे वि.प.वि. क्रमांक ३-महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक ७ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत व दिनांक ९ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, प्रमुख प्रतिष्ठापने, वित्तीय संस्था, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक संस्था, वैद्यकीय संस्था, मॉल, मल्टिप्लेक्स, क्लब, हॉटेल, इत्यादि आस्थापनांसह वाणिज्यिक आस्थापना तसेच खाजगी बंदरे, लहान धक्के, पूल, धरणे, द्रुतगती मार्ग, विशेष आर्थिक क्षेत्रे इत्यादींना अधिक चांगली सुरक्षा पुरविण्याकरिता सुरक्षा दल घटित करण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी हा अधिनियम करण्यात आला आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक ६).

(३८) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ६६-मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) विधेयक, २००९ सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक १९ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

ज्या विवक्षित दराने मालमत्ता कर आकारावयाचा, तो दर निर्धारित करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाने वार्षिक भाडे मूल्याऐवजी भांडवली मूल्य आधार म्हणून घ्यावयाचे आहे. असे आधारमूल्य हे, मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजारमूल्य ठरवणे) नियम, १९९५ अन्वये तयार केलेल्या, त्या त्या काळी अंमलात असलेल्या मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये दर्शविल्याप्रमाणे, कोणत्याही इमारतींचे अथवा जमिनीचे मूल्य म्हणून स्वीकारण्याचे आणि त्यानंतर त्या मालमत्तेचे ठिकाण, चटई क्षेत्र, बांधकामाचा प्रकार, मालमत्तेचा कालावधी आणि तिचा वापरकर्ता इत्यादी घटक विचारात घेऊन मालमत्तेच्या भांडवली मूल्याची गणना करता येऊ शकेल. या पद्धतीमध्ये जुनी किंवा कायमस्वरूपी नसलेली बांधकामे आणि चाळी यांचा यथायोग्य विचार करून त्यांना योग्य सवलत दिली जाईल. तसेच भांडवली मूल्याधारित कर पद्धत स्वीकारल्यामुळे होणाऱ्या मालमत्ता कराच्या वाढीवर योग्य तो अटकाव घालण्याची खबरदारीही घेण्यात आली. वेळेवर मालमत्ता कराचे प्रदान करण्याच्या संबंधातील विवक्षित तरतुदी मुख्य प्रवाहात आणण्याची संधी घेण्यात आली आहे. अशा तरतुदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक १०).

(३९) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक २९-महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक ९ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक २३ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

वैद्यकीय सेवा-व्यक्तींच्या विरोधात हिंसाचार करणाऱ्या, किंवा वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणाऱ्या अपराध्यांना, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची शिक्षा आणि तसेच पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतका दंड करण्याचे तसेच, वैद्यकीय सेवा-संस्थांच्या मालमत्तेची केलेली हानी किंवा नुकसान यासाठी, केलेली हानी किंवा नुकसान यांच्या दुप्पट रकमेइतकी नुकसानभरपाई वसूल करण्याचे, वैद्यकीय निष्काळजीपणामुळे किंवा गैरव्यवस्थापनामुळे बळी पडलेल्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि योग्य मदत मिळण्याकरिता समुचित मंचाचा त्यांनी अवलंब करावा यासाठी त्यांना साह्य व सल्ला देण्यासाठी वैद्यकीय, कायदा, ग्राहक चळवळ आणि आरोग्य व्यवस्थापन या क्षेत्रातील प्रत्येकी एक याप्रमाणे तज्ज्ञांचे मिळून बनलेले प्राधिकरण स्थापण्याचीदेखील तरतूद सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक ११).

(४०) सन २०१० चे वि.प.वि. क्रमांक ४-महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता (सुधारणा) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक ५ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत व दिनांक २२ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम, १९८३ (१९८८ चा महा. २३) अन्वये देय असलेल्या घरभाडे भत्त्याची रक्कम काही मालक कामगारांना देत नाहीत किंवा अंशतः देऊन कामगारांची पिळवणूक करतात. तसेच वैधानिक दायित्त्वे टाळता यावीत व कामगारांना त्यांच्या वैधानिक लाभांपासून वंचित ठेवता यावे यासाठी असे मालक कायद्यान्वये आवश्यक असलेले वैधानिक अभिलेख ठेवत नव्हते. अशा अनुचित कामगार प्रथांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने कामगारांना देण्यात येणारा घरभाडे भत्ता कामगारांच्या नावावर त्याच्या खात्यात देय असलेला धनादेश काढून त्याद्वारे किंवा अशा कामगारांच्या बँक खात्यात ती रक्कम जमा करून देण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक १४).

(४१) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ४०-मुंबई ग्रामपंचायत व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक २१ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक २३ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

राज्य निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून, लोक प्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १०क मध्ये असलेल्या तरतुदींच्या धर्तीवर, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई ३) व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६० चा महा. ५) यांच्या संबंधित तरतुदींमध्ये योग्य त्या सुधारणा करून, जे उमेदवार विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आपापल्या निवडणूक खर्चाची विवरणे सादर करण्यात कसूर करतील, त्यांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी निरर्ह करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्रदान करण्याची आणि अशी निरर्हता दूर करण्याचा किंवा निरर्हतेचा कालावधी कमी करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगाला प्रदान करण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक १६).

(४२) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ५३-मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक २३ जुलै, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक २६ जुलै, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

केबल दूरचित्रवाणी व थेट घरपोच प्रसारण सेवा यांसारख्या घरगुती करमणुकीकरिता इंटरनेट प्रोटोकॉल दूरचित्रवाणीवर करमणूक शुल्क तसेच ग्राहकांच्या मनोरंजनासाठी प्रत्यक्ष वाद्यवृंदांचा कार्यक्रम असलेल्या परमिट रुम किंवा बिअर बार यांवर करमणूक शुल्क बसविणे पबमध्ये सर्व प्रकारची मद्ये, वाईन व पेये यांसह मनोरंजनाकरिता डिजे संगीत, पाश्चिमात्य संगीत आणि आवश्यक ती प्रकाश योजना या सारख्या पुरविण्यात आलेल्या करमणूक सुविधेवर शुल्क बसविण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक २२).

(४३) सन २०१० चे वि.प.वि. क्रमांक ५-महाराष्ट्र वेतन प्रदान व किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक १२ एप्रिल, २०१० रोजी विधानपरिषदेत व दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्याच्या क्षेत्राव्यतिरिक्त कोणतेही क्षेत्र, ज्या क्षेत्रातील कारखान्यांमध्ये किंवा औद्योगिक किंवा इतर आस्थापनांमध्ये कामावर असलेल्या रोजगारी व्यक्तींना आणि ज्या क्षेत्रातील अनुसूचित कामधंद्यामध्ये कामावर ठेवलेल्या कामगारांना, कृषि कामगार व ऊस तोडणी कामगार वगळता-मग त्याची औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याच्या कलम २५-ख मध्ये करारनिविष्ट केल्याप्रमाणे सलग सेवा झालेली असो वा अन्यथा-आणि त्यांना देण्यात येणारी वेतनाची रक्कम विचारात न घेता, त्यांना देय असलेले सर्व वेतने देखील रोजगारी व्यक्तीच्या आणि कामगाराच्या नावे त्याच्या खात्यातच जमा होणाऱ्या धनादेशाद्वारे किंवा रोजगारी व्यक्तीच्या आणि कामगाराच्या बँक खात्यात वेतन जमा करून प्रदान करण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक २६).

(४४) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ७६-महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक १० डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक १३ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

विकास नियंत्रण विनियमांखाली अतिरिक्त तळजमीन निर्देशांक मंजूर करण्यासाठी किंवा विशेष परवानगी देण्यासाठी किंवा स्वेच्छाधिकारांचा वापर करण्यासाठी, राज्य शासन किंवा नियोजन प्राधिकरण वेळोवेळी निश्चित करील अशा दराने लादावयाची फी, आकार व अधिमुल्य यांकरिता विकास नियंत्रण विनियमांमध्ये तशी स्पष्ट तरतूद करता येईल. बसविण्यात व वसूल करण्यात आलेली फी, आकार व अधिमुल्य हे वैधरित्या तयार करण्यात आले असल्याचे मानण्यात आलेल्या संबंधित विकास नियंत्रण विनियमांद्वारे वैधरित्या बसविण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल अशी विधीग्राह्यीकरण करण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक २९).

(४५) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ७९-मुंबई मोटार वाहन कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१० सदरहू विधेयक दिनांक ३ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेत व दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

जुन्या वाहनांमुळे होणाऱ्या पर्यावरणविषयक प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना म्हणून, वाहतूक आणि वाहतुकेतर वाहनांवर पर्यावरण कर बसविण्याची तसेच शासन, पर्यावरण कराचे उत्पन्न, या निहीत प्रयोजनांसाठी वापरील, अशा तरतुदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१० चा अधिनियम क्रमांक ३०).

(४६) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ७-महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०११ सदरहू विधेयक दिनांक ६ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेत व दिनांक ७ एप्रिल, २०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

१३ व्या वित्त आयोगाने करारनिविष्ट केलेल्या सुधारणा, ज्यात इतर अनेक गोष्टींबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्यामार्फत करण्याच्या तरतुदीचा अंतर्भाव आहे यांची पूर्तता केल्याशिवाय राज्यास सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान प्राप्त होणार नाही अशा १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीचे अनुपालन करण्याच्या हेतूने महानगरपालिकांचे लेखापरीक्षण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचेमार्फत करण्याबाबत तसेच महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा मधील योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक पदावर प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्याची तरतूद आणि अशा लेखापरीक्षेचा अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याबाबतच्या तरतूदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०११ चा अधिनियम क्रमांक १२).

(४७) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ११-महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक, २०११ सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेत व दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

महानगरपालिका व नगरपरिषदाविषयक कायद्यांमध्ये सुधारणा करुन, महारनगरपालिका आणि नगरपरिषदांमधील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या पालिका सदस्यांच्या एक-तृतीयांश इतक्या महिला आरक्षणामध्ये वाढ करून ते एक-द्वितीयांश इतके करण्याची तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०११ चा अधिनियम क्रमांक २०).

(४८) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक १०-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०११ सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेत व दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या, पंचायत समित्यांच्या व जिल्हा परिषद सदस्यांच्या जागा तसेच ग्रामपंचायतींच्या सरपंचांची, जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांची आणि पंचायत समित्यांच्या सभापतींची पदे, महिलांसाठी पन्नास टक्के राखून ठेवण्यासाठी तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०११ चा अधिनियम क्रमांक १९).

(४९) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक २७-मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०११ सदरहू विधेयक दिनांक ३ ऑगस्ट, २०११ रोजी विधानसभेत व दिनांक ४ ऑगस्ट, २०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

नागरी स्थानिक संस्थांमध्ये महिलांना एक-द्वितीयांश आरक्षण देण्याचे धोरण योग्य रीतीने राबविण्यासाठी नगरपालिका कायद्यांमध्ये यथोचित सुधारणा करून बहुसदस्यीय प्रभाग पद्धती पुर:स्थापित करण्याच्या प्रयोजनांसाठी तरतुदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०११ चा अधिनियम क्रमांक २६).

(५०) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ४८-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, २०११ सदरहू विधेयक दिनांक १५ डिसेंबर,२०११ रोजी विधानसभेत व दिनांक १७ डिसेंबर,२०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

जी व्यक्ती आपल्या मालकीच्या घरात राहत असून त्या घरामध्ये शौचालय आहे व ती त्याचा नियमितपणे वापर करीत आहे. किंवा ती जेथे राहते ते घर तिच्या अशा मालकीचे नूसन त्या घरामध्ये शौचालय आहे व ती त्याचा नियमितपणे वापर करीत आहे. किंवा तिच्या अशा घरामध्ये शौचालय नाही मात्र ती नियमितपणे सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत आहे, असे प्रमाणित करणाऱ्या ग्रामसभेच्या ठरावांसोबत संबंधित ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र नव्वद दिवसांच्या आत सादर करण्यात कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती, ग्रामपंचायतीचा किंवा पंचायत समितीचा सदस्य किंवा जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरेल, सदर नव्वद दिवसांचा कालावधी वाढवून तो एक वर्ष इतका करणे आणि असे प्रमाणपत्र कोणत्या प्राधिकाऱ्याला सादर करण्यात येईल त्या बद्दलची विनिर्दिष्ट तरतूद या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०११ चा अधिनियम क्रमांक ३९).

(५१) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक ५४-महाराष्ट्र (विवक्षित मुंबई अधिनियमांच्या संक्षिप्त नावात बदल करणे)विधेयक, २०१२ सदरहू विधेयक दिनांक २३ जुलै,२०१२ रोजी विधानसभेत व २४ जुलै,२०१२ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

अधिनियमांचा भविष्यकाळात अधिक योग्य संक्षिप्त नावाने उल्लेख करणे सुकर होण्यासाठी त्यांच्या संक्षिप्त नावात "मुंबई अधिनियम" या ऐवजी "महाराष्ट्र अधिनियम" असा बदल करण्यासाठी आणि विवक्षित परिणामस्वरूप व आनुषंगिक तरतुदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत.(सन २०१२ चा अधिनियम क्रमांक २४).

(५२) सन २०१२ चे वि. प. वि.क्रमांक ७-महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, २०१२ सदरहू विधेयक दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी विधानपरिषदेत व १८ डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित शाळा सुरू करण्याबाबतच्या तरतुदी या अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक १).

(५३) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १३-महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक १७ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेत व १८ एप्रिल, २०१३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

हिंदू वारसा अधिनियमातील सुधारणानुसार मुलींना पुत्राच्या बरोबरीने देण्यात आलेल्या वारसा हक्कांचा अनुषंगाने प्रकल्पबाधित व्यक्तींना देण्यात येणारे लाभ बहिणींना तसेच बहिणींच्या मुलांना तसेच दिवंगत भावाच्या मुलांना देण्याची समर्थकारी तरतूद सदरहू सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे . (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक १०).

(५४) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २०-महाराष्ट्र कृषी विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक २३ जुलै, २०१३ रोजी विधानसभेत व २६ जुलै, २०१३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

मराठवाडा कृषी विद्यापीठाला वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ असे नाव देण्याची तरतूद सदरहू सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक १३).

(५५) सन २०१३ चे वि. प. वि.क्रमांक २-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी विधानपरिषदेत सुधारणेसह व संयुक्त समितीने सादर केल्याप्रमाणे दिनांक ३० जुलै, २०१३ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले. विधानसभेने सुचविलेल्या सुधारणांना दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी विधानपरिषदेने संमती दिली.

९७ व्या घटना दुरस्तीच्या अनुषंगाने सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या असून सहकारी संस्थेच्या सदस्यांची कमाल संख्या ही एकवीस असेल व त्यापैकी राखून ठेवलेल्या इतर जागांसह दोन जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येतील, समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी त्यांच्या निर्वाचनाच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल, संस्थाच्या निवडणूकांचे पर्यवेक्षण, नियंत्रण व निवडणूक घेणे याकरिता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्याची, समितीचा पदावधी तिच्या मुळ पदावधीच्या निम्म्यापेक्षा कमी असेल तर नामनिर्देशनाद्वारे नैमित्तिक रिक्त पद भरण्याची तरतूद, तज्ञ संचालक व कार्यसंचालक स्विकृत करून घेण्याची तरतूद, शासनाने किंवा त्याद्वारे प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या नामिकेमधून सहकारी संस्थेच्या अधिमंडळाद्वारे नियुक्त केलेल्या लेखापरिक्षक किंवा लेखापरिक्षण व्यवसायी संस्था यांच्याकडून प्रत्येक वित्तीय वर्षात संस्थेच्या लेखांची लेखापरिक्षा करण्याची तरतूद, वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत प्रत्येक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची तरतूद तसेच लवाद किंवा समेट याद्वारे आणि लोकअदालतीच्या मध्यस्थीने विवाद मिटविण्यासाठी आणि गाऱ्हाण्यांचा समझोता करण्यासाठी गाऱ्हाणी समझोता व निवारण समित्यांची नेमणूक करण्याची तरतूद अशा तरतुदी या सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक १६).

(५६) सन २०१३ चे वि. प. वि.क्रमांक ८-महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक २६ जुलै, २०१३ रोजी विधानपरिषदेत व ३१ जुलै, २०१३ रोजी विधानसभेत संमत करण्यात आले.

नवीन महाविद्यालय, नवीन परिसंस्था, नवीन अभ्यासक्रम व नवीन तुकडी चालू करणे–मग ते अनुदान तत्त्वावर असोत किंवा नसो- सुरू करण्यासाठी शासनाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक करणे तसेच सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता अशी मान्यता शासन दिनांक १५ जुलै, २०१३ पूर्वी देऊ शकेल अशी तरतूद सदरहू सुधारणा अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक १७).

(५७) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक २७-महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक २६ जुलै, २०१३ रोजी विधानसभेत व २९ जुलै, २०१३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

समुचित प्राधिकरणाच्या पुर्व मान्यतेशिवाय कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था काढण्यास किंवा अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम प्रतिबंध करण्याबाबतच्या तरतुदी सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक २०).

(५८) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४२-महाराष्ट्र भुजल विकास व व्यवस्थापन विधेयक, २००९ सदरहू विधेयक दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी विधानसभेत व २० एप्रिल, २०१२ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनांमार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे, समन्यायी आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामूहिक सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे; आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींच्या तरतुदी सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक २६).

(५९) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ३५-महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजी विधानसभेत व १८ डिसेंबर, २०१३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

सदरहू अधिनियमान्वये नरबळी, जादूटोणा व अन्य अमानवी प्रथांना प्रतिबंध घालण्याबाबतच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३०).

(६०) सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक ४२-महाराष्ट्र ऊस (खरेदी व पुरवठा याचे विनियमन) विधेयक, २०१३ सदरहू विधेयक दिनांक १७ डिसेंबर, २०१३ रोजी विधानसभेत व १९ डिसेंबर, २०१३ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

राज्यातील साखर कारखान्यांमध्ये वापर करण्यासाठी आवश्यक असलेल्या ऊसाची खरेदी व पुरवठा याचे विनियमन करण्यासाठी ऊस नियंत्रण मंडळ स्थापन करण्याची तरतूद सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३३).

(६१) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १५-महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, २०१२ सदरहू विधेयक दिनांक १६ जुलै, २०१२ रोजी विधानसभेत व १८ जुलै, २०१२ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

मालकी हक्कांच्या सदनिकांसंदर्भात गृहनिर्माण आयोगाची स्थापना करणे इ. बाबींची तरतूद सदरहू अधिनियमाच्या माध्यमातून करण्यात आली आहे. (सन २०१४ चा अधिनियम क्रमांक २).

(६२) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक २४-महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक, २०११. सदरहू विधेयक दिनांक ३ ऑगस्ट, २०११ रोजी विधानसभेत व ८ ऑगस्ट, २०११ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, पदविका महाविद्यालये यांसारख्या शैक्षणिक संस्थांमध्ये आकारल्या जाणाऱ्या फीचे नियमन करणे. (सन २०११ चा महा. अधिनियम क्रमांक ७).

(६३) सन २०१४ चे वि.स.वि. क्रमांक ४-महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ विधेयक, २०१४. सदरहू विधेयक दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधानसभेत व २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये विधिविषयक शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करणे, पद्धतशीर शिक्षण देणे, प्रशिक्षण देणे व संशोधन करणेविषयक तरतुदी केलेल्या आहेत. (सन २०१४ चा महा. अधिनियम क्रमांक ६).

(६४) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक २६-महाराष्ट्र लोकसेवा हक्क विधेयक, २०१५. सदरहू विधेयक दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी विधानसभेत व ३१ जुलै, २०१५ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा निश्चित कालावधीत देण्यात येतील याबाबत तरतूद करण्यात आली आहे. (सन २०१५ चा महा. अधिनियम क्रमांक ३१).

(६५) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ३३-महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) विधेयक, २०१५. सदरहू विधेयक दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी विधानसभेत व ३० जुलै, २०१५ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था यामधील प्रवेश व फी यांचे विनियमन करण्याकरिता दोन स्वतंत्र प्राधिकरणे स्थापन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. (सन २०१५ चा महा. अधिनियम क्रमांक २८).

(६६) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ५६-महाराष्ट्र ॲक्युपंक्चर चिकित्सा पद्धती विधेयक, २०१५. सदरहू विधेयक दिनांक १० डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेत व १० डिसेंबर, २०१५ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये ॲक्युपंक्चर पद्धतीचे विनियमन करणे या संदर्भातील तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक २५).

(६७) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३-महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील अश्लील नृत्यांवर प्रतिबंध घालण्याबाबत व त्यामध्ये (काम करणाऱ्या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी विधानसभेत व ११ एप्रिल, २०१६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये सार्वजनिक हिताकरिता अश्लील असतील अशा नृत्यांवर बंदी घालणे व डान्सबारमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे तसेच त्यांच्या प्रतिष्ठेची सुनिश्चिती करण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांच्या शोषणास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद केलेली आहे. (सन २०१६ चा महा. अधिनियम क्रमांक १२).

(६८) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक १६-महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेत व ८ डिसेंबर, २०१६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये सार्वजनिक विद्यापीठासंदर्भात नवीन अधिनियम तयार करण्यात आलेला आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६).

(६९) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक २३-महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी विधानसभेत व १३ एप्रिल, २०१६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये "जात पंचायती", "समाज पंचायती" इत्यादीसारख्या संस्थांकडून बहिष्कार टाकणे अशा प्रथांना आळा घालण्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ४४).

(७०) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३२-महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी प्रथम व दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दुसऱ्यांदा विधानसभेत व दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये मुंबई महानगर प्रदेशाव्यतिरिक्त अन्य महानगर प्रदेशामध्ये MMRDA च्या धर्तीवर विकास प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ३).

(७१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३४-महाराष्ट्र विद्युत शुल्क विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी विधानसभेत व ३ ऑगस्ट, २०१६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये विद्युत नियम, २००३ चा केंद्रीय अधिनियमात करण्यात आलेल्या व्यापार, विजेची देवाणघेवाण, खुला प्रवेश, विद्युत निर्मिती याबाबतच्या तरतुदीच्या अनुषंगाने वितरण लायसन्स धारकाव्यतिरिक्त अन्य स्त्रोताकडून विजेचा वापर, देवाणघेवाण किंवा निर्मिती यामार्फत करण्यात आलेल्या विजेच्या वापरावर शुल्क बसविण्यासंबंधी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. (सन २०१६ चा महा. अधिनियम क्रमांक २६).

(७२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५०-महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) विधेयक, २०१६. सदरहू विधेयक दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेत व १५ डिसेंबर, २०१६ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये केंद्र सरकारच्या आधार अधिनियम, २०१६ (१८/२०१६) च्या तरतुदीच्या अनुषंगाने राज्य शासनाकडून दिले जाणारे वित्तीय आणि अन्य अनुदान, लाभ व सेवा यांचे लाभार्थ्यांना वितरण करण्याकरिता बाबी विनियमित करण्यात आल्या आहेत. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक १८).

(७३) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २०-भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी व दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दुसऱ्यांदा विधानसभेत संमत करण्यात आले. सदर विधेयक विधानपरिषदेच्या पटलावर दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी ठेवण्यात आले. परंतु विधानपरिषदेने एक महिन्याहून अधिक कालावधीत ते संमत न केल्याने दोन्ही सभागृहांनी दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी संमत केले असे मानण्यात आले.

या अधिनियमान्वये लोकसेवकाच्या संदर्भातील भारतीय दंड संहितेमधील कलमे ३३२ व ३५३ या खालील गुन्ह्यांमध्ये कडक शिक्षेची तरतूद करणे, असे गुन्हे सत्र न्यायालयात चालविले जातील अशी तरतूद केली आहे. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ४०).

(७४) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २९-प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी विधानसभेत व ६ एप्रिल, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये महाराष्ट्र राज्यातील बहुतांश भागातील बैलगाडा शर्यत, शंकरपट इ. सांस्कृतिक व पारंपरिक प्रथांचे जतन करतांना बैलाच्या मूळ प्रजाती टिकवून ठेवण्यात याव्यात जेणेकरुन राज्यातील बैलगाडा शर्यतीच्या आयोजनामुळे उक्त केंद्रीय अधिनियम, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना त्याच्या तरतुदीचे उल्लंघन होणार नाही अशा तरतूदी केलेल्या आहेत. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ४५).

(७५) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३१-महाराष्ट्र शेतजमीन पट्टयाने देण्याबाबत विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी विधानसभेत व ७ एप्रिल, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या विधेयकाच्या माध्यमातून भूमिहीन गरीब, अल्पभूधारक व अत्यल्पभूधारक शेतकरी व इतरांना शेतजमीन पट्टयाने देण्यात यावी याकरिता परवानगी देणे तसेच ती पट्टयाने देणे सुलभ करणे या संदर्भातील तरतुदी केल्या आहेत.

(७६) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३२-महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये आणि मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी विधानसभेत व ७ एप्रिल, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या विधेयकाच्या माध्यमातून पत्रकारांवरील हल्ले रोखण्याबाबत विशेष तरतुदी केलेल्या आहेत.

(७७) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३३-महाराष्ट्र वस्तु व सेवा कर विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक २२ मे, २०१७ रोजी विधानसभेत व २२ मे, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये राज्य शासन विविध कर आकारत असतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते म्हणून हे सर्व कर वस्तु व सेवा कर म्हणून संबोधल्या जाणाऱ्या एकल करात समाविष्ट करण्याची तरतूद केली आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ४३).

(७८) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३४-महाराष्ट्र वस्तु व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक २० मे, २०१७ रोजी विधानसभेत व २० मे, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये विविध अधिनियमांखाली कार्यरत असलेली स्थानिक प्राधिकरणे जकात कर, उपकर व स्थानिक संस्था कर आकारत होती. संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम, २०१६ द्वारे स्थानिक प्राधिकरणांना वरील कर आकारण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले नसल्याने स्थानिक प्राधिकरणाची होणारी हानी भरुन काढण्यासाठी या अधिनियमाच्या माध्यमातून तरतूद करण्यात आलेली आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ४१).

(७९) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३५-महाराष्ट्र वस्तु व सेवा करविषयक कायदे (सुधारणा, विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती) विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक २० मे, २०१७ रोजी विधानसभेत व २१ मे, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये राज्य शासन व केंद्र शासन विविध कर आकारावयाचे ते टाळण्यासाठी, संविधान (एकशे एकावी सुधारणा) अधिनियम, २०१६ अन्वये एकल वस्तु व सेवा कर आकारण्याची तरतूद केली तसेच राज्य शासनाला महाराष्ट्र राज्य व्यवसाय व्यापार आजीविन व नोकऱ्या यावरील कर तसेच पेट्रोलियम पदार्थ, अल्कोहोल यांच्या विक्रीस कर आकारण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ४२).

(८०) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७-महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभेत व २२ डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये साक्षीदारांच्या संरक्षणासाठी विशेष कायदा करण्यात आला आहे. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ९).

(८१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७५-महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग विधेयक, २०१७. सदरहू विधेयक दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी विधानसभेत व २१ डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारची उद्‌वाहने, सरकते जिने, सरकते मार्ग व त्याच्याशी संबंधी सर्व यंत्रसामग्री व साधनसाम्रगी यांची बांधणी, उभारणी, परिक्षण व सुरक्षित वापर यांचे विनियमन करणे संदर्भातील तरतुदी. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक १५).

(८२) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७-भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी विधानसभेत व २३ मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये राज्याच्या आर्थिक विकासाला आणखी गती मिळणेसाठी भूसंपादनाच्या केंद्रीय अधिनियमातील तरतूदी योग्य अशा फेरफारांसह राज्य अधिनियमातील तरतूदीखालील भूसंपादनाच्या प्रक्रियेस लागू करण्यात आल्या आहेत. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ३७).

(८३) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक १०-महाराष्ट्र पायाभूत सुविधा सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी विधानसभेत व २८ मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणी करण्यासाठीच्या तरतुदी. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक २८).

(८४) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३०-सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी विधानसभेत व २८ मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये हुक्काबारचे कायद्याद्वारे नियमन करण्यात आले आहे. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ६०).

(८५) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३३-महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर (कोल्हापूर) विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी विधानसभेत व २८ मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये मंदिराचे अधिक चांगले व्यवस्थापन करण्याकरिता मंदिराच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याकरिता तसेच श्रीपुजकाचे आनुवंशिक हक्क नाहीसे करण्यासाठीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ३५).

(८६) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ३७-महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी विधानसभेत व २० जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये स्थापन केलेले भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत प्राधिकरण यास विवादाचे निराकरण करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ४९).

(८७) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ५५-श्री शनैश्चर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक १९ जुलै, २०१८ रोजी विधानसभेत व २० जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये श्री शनैश्वर देवस्थानाच्या उत्तम प्रशासनासाठी व उत्तम व्यवस्थापनासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ५८).

(८८) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ७८-महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण विधेयक, २०१८. सदरहू विधेयक दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानसभेत व २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानपरिषदेत संमत करण्यात आले.

या अधिनियमान्वये उन्नत व प्रगत गटाखालील मागास वर्गातील व्यक्तींना सार्वजनिक नोकरी व शिक्षणात आरक्षणाची तरतूद करण्यात येवून सध्याच्या काळात पुढे आणण्यासाठीच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. (सन २०१८ चा महा. अधिनियम क्रमांक ६२).

विधानसभेने विधेयक संमत केल्यानंतर ते विधानपरिषदेकडे पाठविण्यात येते. जर विधानपरिषदेने ते फेटाळले किंवा तीन महिन्यांच्या आत परत केले नाही तर विधानसभा ते पुन्हा संमत करू शकते. अशा प्रकारे दुसऱ्यांदा संमत केलेले विधेयक विधानपरिषदेने फेटाळले किंवा सुधारणेसह संमत केले परंतु, सदरहू सुधारणा विधानसभेत असंमत केल्या किंवा ते विधेयक विधानपरिषदेसमोर ठेवल्याच्या दिनांकापासून ते विधानपरिषदेत संमत न होता एक महिन्याहून अधिक काळ लोटला तर ते विधेयक विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केले त्या प्रारुपात ते राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केले असल्याचे मानण्यात येते (महाराष्ट्र विधानसभा नियम १४६).

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९७ (२) व महाराष्ट्र विधानसभा नियम १४६ अन्वये दोन्ही सभागृहांनी संमत केली आहे असे मानण्यात आलेली विधेयके.

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ५८-मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ३-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१६.

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ४-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २०१६.

(४) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ७-महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६.

(५) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५४-महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.

(६) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २०-भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

(७) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७१-महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७.

(८) सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ६१-महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.

(५८) अध्यादेश (Governor's Ordinances) **(म.वि.स. नियम १५९ अन्वये):-**

विधानमंडळाच्या नि:सत्र कालावधीत कोणत्याही वेळी, राज्यपालांनी तात्काळ कारवाई करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्त्वात असल्याबाबत राज्यपालांची खात्री झाल्यास, त्यांना त्या परिस्थितीनुसार जरुर वाटतील असे अध्यादेश भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (१) अन्वये प्रख्यापित करता येतात. मा.राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश (Ordinance Promulgated by the Governor) अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येतात. सदस्यांना त्या अध्यादेशाच्या छापील प्रती यावेळी वितरीत करण्यात येतात. महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये कोणत्याही सदस्यास विधानसभेच्या बैठकीपासून सहा आठवड्यांच्या आत विधानसभेच्या सचिवांना पूर्ण तीन दिवसांची पूर्वसूचना देऊन अध्यादेशाबाबत नापसंतीचा ठराव मांडता येतो. अध्यादेशाचे विधानसभेच्या बैठकीपासून सहा आठवड्यात विधेयकात रुपांतर न केल्यास तो व्यपगत होतो.

(५९) सांविधान सुधारणेचे अनुसमर्थन (संमती देणे) (Ratification of Amendment to the Constitution) **(म.वि.स. नियम १६० अन्वये):-**

एखाद्या संविधान सुधारणेसाठी राज्य विधानमंडळाची संमती घेणे तरतुदीनुसार आवश्यक असल्यास संसदेकडून तशा आशयाचा संदेश सभागृहापुढे मांडण्यात येतो. त्यानंतर तीन दिवसांची नोटीस देऊन त्या सुधारणेस संमती देणारा ठराव मांडता येतो. त्यावरील चर्चेसाठी अध्यक्ष वेळ ठरवितात. या ठरावास सुधारणा देता येत नाहीत. अशा प्रकारचे ठराव संमत झाल्यास संसदेच्या सभागृहास तसा संदेश पाठविला जातो. *(संविधान सुधारणा संदर्भातील विधानसभा सभागृहात सन १९७१ पासून मांडण्यात आलेल्या ठरावांची यादी* ***परिशिष्ट क्रमांक २१*** *वर दर्शविण्यात आली आहे.)*

*****

प्रकरण सहावे

वित्तीय कामकाज (Financial Business)

(६०) अर्थसंकल्पीय प्रक्रिया :-

भारताने स्वातंत्र्यानंतर संसदीय लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून देशाच्या सर्वांगिण विकासाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कल्याणकारी राज्य संकल्पनेचा अंगिकार केला. पूर्वी शासनाचे कामकाज कायदा व सुव्यवस्था राखणे आणि देशाचे रक्षण करणे, यापुरतेच मर्यादित होते. परंतु त्यानंतर कल्याणकारी राज्याची संकल्पना (Concept of Welfare State) दृढमूल होऊ लागली. संसदीय लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये जनता ही सार्वभौम असते व तिच्या कल्याणासाठी शासनाने कार्य करावयाचे असते, अशा या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये शासनाच्या कामकाज पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल होऊन, स्वातंत्र्यानंतर जनकल्याणाच्या वेगवेगळया योजना राबविल्या जाऊ लागल्या. किंबहुना योजनाबद्ध विकासाचा पाया (Planned Development of nation) एकप्रकारे घातला गेला. कोणतीही योजना राबवावयाची असल्यास निधीची उपलब्धता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे राज्य चालविण्यासाठी निधीची उपलब्धता करून घेणे व त्याचा विनियोग योग्य प्रकारे व जनकल्याणासाठी करणे हे कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट ठरले, विविध मार्गाद्वारे विकासासाठी साधनसामग्री (Resources) उभी करणे हे राज्य शासनाला क्रमप्राप्त ठरले. अशा महत्प्रयासाने मिळविलेल्या उत्पनाचा विनियोग अत्यंत योग्य प्रकारे कार्यक्षमरित्या करणे व त्यामधून कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवणे, ही राज्य प्रशासनाची प्रमुख जबाबदारी ठरली व त्यातच या संकल्पनेला स्वातंत्र्यानंतर नियोजनबद्ध विकास कार्यक्रमाची जोड मिळाली. नियोजनबद्ध विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध पंचवार्षिक योजना आखल्या जाऊ लागल्या आणि जनकल्याणाची कामे योजनेत समाविष्ट करण्यात आली. अशा निधीचा विनियोग काटकसरीने करणे व ज्या प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला ते उद्दिष्ट/प्रयोजन साध्य झाले किंवा कसे याची तपासणी करण्याच्या निकडीमधून "प्रशासनावर वित्तीय नियंत्रण" ही संकल्पना पुढे आली (Financial Control of Legislature on Executive) या संकल्पनेची प्रामुख्याने खालील उद्दिष्टे आहेत :-

(१) उपलब्ध साधनसामग्री वाया जाऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी. (That no wastage of resources occurs.)

(२) जनतेच्या पैशांचे अपयोजन टाळणे (Public money is not misapplied).

(३) निधीच्या विनियोगामधून अपेक्षित असलेले परिणाम मिळतात किंवा कसे याबाबत काटेकोरपणे सनियंत्रण ठेवणे (That for the money spend adequate results are obtained).

सध्या अस्तित्त्वात असलेल्या राज्य पद्धतीमध्ये लोकशाही राज्यपद्धती ही अत्यंत खर्चिक अशी राज्य पद्धती म्हणून ओळखली जाते. लोकनियुक्त विधिमंडळाचे सार्वजनिक खर्चावरील नियंत्रण हे या राज्यपद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. लोकांना त्यांनी शासनास प्रदान केलेल्या कराचा पुरेपूर मोबदला मिळणे व त्यांचे कल्याण साधणे हा मुलभूत विचार या मागे आहे.

प्रशासनावर विधीमंडळाचे वित्तीय नियंत्रण हे खालील चार मूलभूत संकल्पनांमधून स्पष्ट होईलः-

(१) संसद अथवा विधीमंडळाचे करावर (Taxation) नियंत्रण -
कोणताही कर विधीमंडळ अथवा संसदेच्या अधिकाराशिवाय लादता येणार नाही.
(Parliamentary or Legislative control over taxation; no tax can be, imposed except with the authority of the legislature.)

(२) खर्चावर संसद अथवा विधीमंडळाचे नियंत्रण -
प्रशासनाला कोणताही खर्च विधीमंडळाच्या अनुमतीशिवाय करता येणार नाही. (Parliamentary or Legislative control over expenditure; no expenditure can be incurred except with the sanction of the legislature.)

(३) कार्यकारी प्रशासनाने वित्तीय बाबींमध्ये घ्यावयाचा पुढाकार -
कोणताही कर लादणे किंवा खर्च मंजूर करणे हे कार्यकारी प्रशासनाला, आवश्यकता असल्याशिवाय करता येणार नाही.
(Financial initiative of the executive Government; no tax can be imposed or expenditure sanctioned unless asked for by the executive.)

(४) सर्व खर्चासाठी प्रती वर्षी मंजुरी घेण्याची आवश्यकता -
(Principal of annuality; all expenditure except that specifically charged by any enactment requires to be sanctioned on an annual basis)

वरील सर्व मूलभूत संकल्पनांमधूनच अर्थसंकल्प, रचना व कार्यपद्धतीचा उगम झाला. प्रशासनाच्या खर्चावर आर्थिक नियंत्रण ठेवणे हे अर्थसंकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

(६१) अर्थसंकल्प (Annual Financial Statement-Budget) :-

पुढील वर्षी सर्वसाधारण होणाऱ्या उत्पन्नाचे व सर्व बाबींवर होणाऱ्या खर्चाच्या विवरणास संविधानाच्या अनुच्छेदाप्रमाणे 'अंदाजपत्रक' म्हणण्यात येते. सभागृहास अंदाजपत्रक सादर करण्यासाठी जाणाऱ्या अर्थमंत्र्याच्या हातात असणाऱ्या लहान बॅंगेवरुन 'बजेट' हा शब्द रुढ झाला आहे. बजेट या मूळ फ्रेंच भाषेतील शब्दाचा अर्थ 'लहानशी कातडी बॅग' असा आहे. परंतू तो शब्द बॅगेतील कागदपत्राना संबोधण्यात येऊ लागला.

भारताच्या राज्यघटनेत अर्थसंकल्प व त्या संबंधीत बाबींसंदर्भात अनुच्छेद १०९, ११०, ११२ ते ११७, १५०, १५१, १९८, १९९, २०२ ते २०७, २४३, २६५, २६६, २६७, २७५, २८०, २८१, २९२ यामध्ये विविध तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. आगामी वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया साधारणपणे सप्टेंबर महिन्यात सुरू होते. याबाबतच्या प्रक्रियेचे वेळापत्रक व सुचना वित्त विभागामार्फत जारी करण्यात येतात. सन २०१५ मध्ये निती आयोगाची स्थापना करण्यात आली. यापूर्वी नियोजनाची प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावर नियोजन आयोग, राष्ट्रीय विकास परिषद व राज्य स्तरावर राज्य नियोजन मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असे. पंचवार्षिक

योजना आखून विकासाचे नियोजन करण्यात येत असे. अर्थसंकल्पात योजनांतर्गत (पंचवार्षिक योजनेमध्ये नमूद केलेल्या विकासकामावरील खर्च) व योजनेतर खर्च अशी विभागणी होत असे. परंतु याऐवजी आता विकास खर्च व विकासेतर खर्च अशी खर्चाची विभागणी करण्यात येत असून राज्यपातळीवर नियोजन उपसमिती अर्थसंकल्पातील विकास योजनांसंदर्भात निर्णय घेते.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २६६ अन्वये राज्य शासनाला मिळालेला सर्व महसूल व कर्जे यांचा मिळून राज्याचा 'एकत्रित निधी' (Consolidated Fund) तयार होतो. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २६६ (३) मध्ये असे निर्धारित केले आहे की, कायद्यान्वये आणि संविधानात ज्यासाठी आणि ज्या रीतीने तरतूद केली असेल तर त्याखेरीज करून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आणि इतर कोणत्याही रीतीने, राज्याच्या एकत्रित निधीतील कोणतीही रक्कम खर्च करता येणार नाही. याप्रमाणे राज्य विधानमंडळाकडून विनियोजन अधिनियमांच्या स्वरुपात मिळणाऱ्या अधिकृत मंजुरीशिवाय एकत्रित निधीतून कोणतीही रक्कम काढता व खर्च करता येत नाही. ही संविधानात्मक स्थिती असल्याने, शासनाने केलेल्या खर्चाच्या सर्व रकमांसाठी विधानमंडळाची मान्यता घ्यावी लागते. म्हणून प्रत्येक वर्षी वित्त विभागाला वर्षातील अंदाजित जमेच्या व खर्चाच्या रकमांचे विवरणपत्र तयार करून ते संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) अनुसार विधानमंडळास मान्यतेसाठी सादर करावे लागते.

विधानमंडळाने मान्यता दिल्याशिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. या तत्त्वानुसार आगामी 'आर्थिक वर्षात' शासनाला सर्व मार्गांनी आणि साधनांद्वारे उपलब्ध होणारे उत्पन, तसेच हे उत्पन शासन कोणकोणत्या बाबींवर खर्च करणार आहे, याचे एक विवरण शासन दरवर्षी तयार करते आणि शासनाच्या विविध खात्यांनी केलेल्या पैशांच्या मागण्यांना विधानमंडळाची मान्यता मिळावी यासाठी ते विधानमंडळासमोर सादर करीत असते. महाराष्ट्र विधानसभा नियम २४५ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या विवरणास 'अंदाजपत्रक' (A statement of the estimated receipts and expenditure of the State for that year), 'वार्षिक आर्थिक विवरण' (Annual Financial Statement) किंवा त्यालाच सामान्यत: 'अर्थसंकल्प' असे म्हटले जाते. एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून दुसऱ्या वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपर्यंतचा कालावधी 'आर्थिक वर्ष' म्हणून ठरविण्यात आला आहे. एका 'आर्थिक वर्षात' होणार असलेला खर्च, त्याच्या आधीचे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी, पूर्णपणे किंवा अंशत: विधानमंडळाकडून मंजूर करून घ्यावा लागतो याचाच अर्थ असा की, आगामी आर्थिक वर्षात खर्च करण्यासाठी लागणाऱ्या रकमा, त्याच्यामागील वर्षाच्या मार्च महिन्याच्या एकतीस तारखेपूर्वी मंजूर करून घ्याव्या लागतात व याच दृष्टीने एकतीस मार्चपूर्वी राज्याचा 'अर्थसंकल्प' आणि 'विनियोजन विधेयक' (Appropriation Bill) यांना विधानमंडळाची मान्यता मिळणे अत्यावश्यक आहे.

(६२) अर्थसंकल्पाची रचना-(एकत्रित निधी, आकस्मिकता निधी व लोकलेखा) :-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५० अन्वये, भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी राष्ट्रपतींच्या संमतीने विहित केलेल्या नमुन्यात केंद्र शासन व राज्य शासन यांचे लेखे ठेवावे लागतात. अशा रीतीने विहित केलेला लेखाविषयक नमुना हा अर्थसंकल्प तयार करण्यास आधारभूत होतो. सन १९७३-७४ च्या अखेरपर्यंत अंमलात असलेले वर्गीकरण हे पूर्वी शासनाकडून पार पाडल्या जाणाऱ्या मर्यादित स्वरुपाच्या कामांसाठी पुरेसे असल्याचे

समजले जात असे. तथापि, विविध क्षेत्रांतील शासनाच्या विकासविषयक कार्यामध्ये फार मोठया प्रमाणावर वाढ झाल्यामुळे शासनाच्या कामात मोठया प्रमाणावर विविधता आलेली आहे आणि आता केवळ खर्चाच्या उद्दिष्टांनुसार खर्चाचे हिशेब ठेवणे व खर्चाचे नियंत्रण ठेवणे याऐवजी कार्यक्रम व कार्य यांचे संनियंत्रण व वर्गीकरण यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी विभागांमध्ये वित्तीय व्यवस्थापन व नियंत्रण असावे यासाठी आणि शासनाच्या कार्याचे योग्यरित्या पृथ:क्करण व्हावे यासाठी शासकीय लेख्यांचे यथोचित वर्गीकरण करणे आवश्यक आहे. या गोष्टी विचारात घेऊन भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याशी विचारविनिमय करून भारत सरकारने सन १९७४-७५ पासून अर्थसंकल्प व लेखे यांच्या रचनेमध्ये काही सुधारणा केलेल्या आहेत. शासनाची कार्ये, कार्यक्रम आणि योजना यांच्या संदर्भात झालेल्या शासकीय व्यवहारांचे स्वरूप स्पष्ट करणे आणि लेखांकन वर्गीकरण व विकासविषयक योजना शीर्षे यांच्यामध्ये अनुरुपता आणणे या दोन उद्देशांनी हे व्यवहारोपयोगी वर्गीकरण तयार करण्यात आले होते. कार्यात्मक दृष्टीकोन ही बाब आता स्थायी स्वरुपाची झालेली असली तरी, मुख्यत्त्वेकरुन सामाजिक बाबींना द्यावयाचे अग्रक्रम व तंत्रज्ञानातील प्रगती यामध्ये बदल झालेला असल्यामुळेच, केवळ योजनेसंबंधीचे वर्गीकरण आणि लेखांकन वर्गीकरण यामधील विसंगती वर्षानुवर्षे वाढत गेली आहे. तत्कालीन लेखांकन वर्गीकरण पद्धतीचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार भारत सरकारने लेखा महानियंत्रक, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक आणि नियोजन आयोग यांच्याशी विचारविनिमय करून लेखांकन वर्गीकरणाची नवी पद्धती आणि प्रधान व गौण लेखाशीर्षाची यादी विहित केली व ती दिनांक ०१ एप्रिल, १९८७ पासून लागू करण्यात आली असून, सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून योजनांशी संबंधित आठ अंकी संगणक सांकेतांक लेखांकन पद्धतीचा वापर करण्यात येत आहे. नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहीत केलेली, जमा व खर्च या दोन्ही बाजूच्या प्रधान शीर्षांच्या पाच स्तरीय वर्गीकरणाचा त्यात समावेश होतो.

एकूण अर्थविषयक व्यापकता सुलभ रितीने अजमावता यावी म्हणून खर्चाच्या प्रत्येक बाबीच्या वर्गीकरणाच्या अंतिम स्तरावर खर्चाचे स्वरूप सहज दिसेल अशा रितीने खर्चाची प्रमाण उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. विद्यमान लेखांकन वर्गीकरणात प्रधान शीर्षे, गौण शीर्षे, उपशीर्षे व प्राथमिक घटक (Major Heads, Minor Heads, Sub- Heads and Priamary Units) यांचे विभाजन अशा प्रकारे करण्यात आले आहे की, ते कार्यक्रम अंदाजपत्रकातील खर्चाची कार्ये, कार्यक्रम, कामे व उद्दिष्टे यानुसार प्रत्येक विभागात केल्या जाणाऱ्या एकूण कामाचा विभागणीशी सुसंगत राहील. प्रचलित वर्गीकरण पद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे लेखा शीर्षांना दिलेले चार अंकी संकेतांक (Four Digit Codification) हे होय. या संकेतांक पद्धतीनुसार, एखादे प्रधान शीर्ष हे जमा भागात येते, की महसुली लेख्यांवरील खर्चात येते, की भांडवली लेख्यांवरील खर्चात येते, की कर्जे व अग्रिमे आणि सार्वजनिक ऋण किंवा लोक लेखा भाग यांमध्ये येते, हे त्या प्रधान शीर्षाच्या पहिल्या अंकावरून समजते. निरनिराळ्या भागातील अनुरूप प्रधान शीर्षाकरीता शेवटचे तीन अंक सारखेच असतात. या सुचीप्रमाणे जमेची प्रधान शीर्षे गट ००२० ते १६०६, महसूली लेख्यावरील खर्चाची प्रधान शीर्षे २०११ ते ३६०६, भांडवली जमेचे लेखाशीर्ष ४०००, भांडवली लेख्यावरील खर्चाची प्रधान शीर्षे ४०५५ ते ५४७५, सरकारी ऋणामधील शीर्षे ६००३ व ६००४, कर्जे व आगाऊ रकमा, आंतरराज्यीय व्यवहार, आकस्मिकता निधीतील हस्तांतरणे व आकस्मिकता निधी यांकरिता प्रधान शीर्षे ६२०२ ते ८००० पर्यंत तसेच लोकलेखा वरील प्रधान शीर्षे ८००९ ते ८७९३ याप्रमाणे आहेत.

शासनाचे हिशेब खाली दिलेल्या तीन प्रमुख भागात ठेवले जातात-(अनुच्छेद-२६६ व २६७)

(१) भाग एक-राज्याचा एकत्रित निधी (Consolidated Fund),

(२) भाग दोन-राज्याचा आकस्मिकता निधी (Contengency Fund) आणि

(३) भाग तीन-राज्याचा लोकलेखा (Public Account)

एकत्रित निधी (Consolidated Fund) :-राज्याचा एकत्रित निधी हा महसुली जमा, राज्य शासनाने उभारलेली कर्जे व शासनाने दिलेल्या कर्जाची व आगाऊ रकमांची वसुली या सर्वांचा मिळून बनतो व त्यातून शासनाच्या विविध कार्यांवर होणारा खर्च भागवला जातो. त्याकरिता, वित्तीय वर्षाच्या प्रारंभापूर्वी विधानमंडळापुढे आवश्यक त्या अनुदानांसाठी मागण्या प्रस्तुत केल्या जातात आणि वित्तीय वर्षाच्या कालावधीत वेळोवेळी पूरक मागण्याही सादर केल्या जातात. विधानमंडळाने अशा रीतीने संमत केलेली अनुदाने, विनियोजन अधिनियमात किंवा पूरक विनियोजन अधिनियमात अंतर्भूत करून त्याद्वारे एकत्रित निधीतून खर्चासाठी आवश्यक ती विनियोजने प्राधिकृत करण्यात येतात. ही अनुदाने मंत्रालयाच्या संबंधित प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रत्येक प्रधान लेखाशीर्षाच्या संबंधात विभागवार देण्यात येतात. मात्र इमारतींची बांधकामे, जनजाति क्षेत्र उपयोजन यांवरील खर्च आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी असलेल्या योजनांतर्गत तरतुदी यांसाठी मंत्रालयाच्या संबंधित विभागांखाली संयुक्त मागणीची रक्कम मिळविणे शक्य नसेल त्याबाबतीत आवश्यक त्या तरतुदी संबंधित कार्यात्मक प्रधानशीर्षाखाली स्वतंत्रपणे दाखविण्यात येतात. 'एकत्रित निधी' वर विधानमंडळाचे संपूर्ण नियंत्रण असते.

एकत्रित निधीची महसुली (Revenue), भांडवली (Capital) व ऋण (Debt) अशा आणखी तीन उप विभागांत विभागणी केलेली असते.

(अ) यातील पहिला उप विभाग महसुली लेखा म्हणून ओळखला जातो. महसुली विभागाच्या जमेच्या बाजूमध्ये कर व शुल्क, विविध प्रकारच्या सेवा फीद्वारे मिळालेल्या जमा रकमा व केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने यांचा अंतर्भाव होतो. महसुली विभागाच्या खर्चाच्या बाजूमध्ये करवसुलीचा खर्च, प्रशासकीय सेवांवरील खर्च, संस्थाची देखभाल करण्याबाबतचा खर्च, शासनाने कर्जाऊ घेतलेल्या रकमेवरील व्याज इत्यादींचा अंतर्भाव असतो. महसुली जमा व महसुली खर्च यांमधील फरक, महसुली शिल्लक (Revenue Surplus) किंवा महसुली तूट (Revenue Deficit) दर्शवितो.

(ब) हा दुसरा उप विभाग महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च ओळखला जातो. ज्यामुळे भौतिक स्वरूपाच्या संपत्तीत वाढ होते अशा प्रकारच्या खर्चाचा अंतर्भाव यामध्ये असतो. भांडवली विभागामध्ये भांडवली स्वरुपाच्या खर्चाचा व जमेच्या रकमांचा अंतर्भाव होतो. महत्त्वाच्या आणि कायमस्वरुपाच्या मालमत्ता निर्माण करण्याच्या किंवा त्यात भरीव वाढ करण्याच्या उद्देशाने केलेला खर्च अशी भांडवली खर्चाची सर्वसाधारण व्याख्या करण्यात आली आहे.

(क) या तिसऱ्या उप विभागामध्ये ऋण भागामध्ये शासनाने खुल्या बाजारात उभारलेली कर्जे, अर्थोपाय आणि शासनाने वितरीत केलेली कर्जे व दिलेल्या आगाऊ रकमा आणि आंतरराज्यीय तडजोड यांचा अंतर्भाव होतो.

भारित (Charged) **व दत्तमत** (Voted) **खर्च-**एकत्रित निधीतून होणाऱ्या खर्चाचे दत्तमत्त किंवा भारित खर्च म्हणून वर्गीकरण करण्यात येते. विधानमंडळाची मतदानाद्वारे अनुमती घेऊन करण्यात येणाऱ्या खर्चास दत्तमत म्हणतात. भारित खर्च म्हणजे अशा अनुमतीची आवश्यकता नसलेला व राज्याच्या एकत्रित निधीवर आकारावयाचा म्हणून भारतीय संविधानाचे अनुच्छेद २०२ (३) व ३२२ अन्वये घोषित केलेला खर्च. या अनुच्छेदान्वये खर्चाच्या खालील बाबी **'भारित'** म्हणून समजण्यात आल्या आहेत :—

(१) राज्यपालांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेला इतर खर्च;

(२) विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच विधानपरिषदेचे सभापती व उप सभापती यांचे वेतन व भत्ते;

(३) व्याज, कर्जनिवारण निधी आणि ऋणविमोचन भार यासह ज्याकरिता राज्य जबाबदार ठरत असेल असा ऋण भार आणि कर्जे उभारणे आणि ऋण सेवा व ऋण विमोचन यांच्याशी संबंधित असा इतर खर्च;

(४) उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन व भत्ते;

(५) कोणत्याही न्यायालयाच्या किंवा लवाद न्यायाधिकरणाचा निर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा यांनुसार द्यावयाच्या रकमा;

(६) संविधानाने किंवा राज्य विधानमंडळाने कायद्यान्वये भारित म्हणून घोषित केलेला कोणताही इतर खर्च;

(७) राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च यांमध्ये आयोगाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतने यांचाही समावेश होतो.

राज्य विधानमंडळाने संमत केलेल्या निरनिराळ्या कायद्यान्वये महसुलातील काही विहित केलेल्या रकमा ह्या रोजगार हमी निधी यांसारख्या राखीव निधीकडे हस्तांतरीत करण्यात येतात. अशा रकमा भारित म्हणून समजण्यात येतात. भारित खर्चाच्या बाबींवर जरी विधानमंडळ मतदान करीत नसले तरी त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकते. विधानमंडळाकडून मागण्या संमत झाल्यानंतर दत्तमत खर्चाच्या मागण्या आणि भारित खर्चाची विनियोजने (Appropriations) विनियोजन विधेयकात (Appropriation Bill) समाविष्ट करण्यात येतात व ते विधेयक विधानमंडळास सादर केले जाते.

आकस्मिकता निधी (Contengency Fund)-विधानमंडळाचे अधिवेशन सबंध वर्षभर चालू नसते व अर्थसंकल्पामध्ये पूर्वकल्पित नसलेल्या खर्चाच्या अनपेक्षित बाबींवर शासनाला खर्च करण्याचे प्रसंग येतात. वर्षभरामध्ये काही वेळा खर्चाच्या विवक्षित बाबींकरिता केलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून येते किंवा अर्थसंकल्पात ज्यासाठी तरतूद करण्यात आलेली नसेल अशा काही तातडीच्या आणि निकडीच्या बाबींवर खर्च करावा लागतो. अशा प्रसंगी, त्याच अनुदानातील इतर बाबींखाली बचत उपलब्ध असल्यास, त्या बचतीचे पुनर्विनियोजन करून खर्चाच्या मान्यताप्राप्त बाबींच्या संबंधातील अतिरिक्त खर्च भागविण्याचे अधिकार शासनाला प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा बचतीच्या रकमा उपलब्ध नसतील किंवा विधानमंडळाची मान्यता मिळण्याच्या अपेक्षेने

खर्चाच्या एखाद्या नवीन बाबीसाठी वित्तव्यवस्था करावयाची असेल त्या बाबतीत, संविधानाच्या अनुच्छेद २६७ (२) अन्वये स्थापण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतून खर्च प्रथमतः भागविला जातो. (आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये १५० कोटी आहे) विधानमंडळाची मान्यता मिळण्याच्या अपेक्षेने करण्यात आलेल्या खर्चाच्या सर्व तपशिलांसह, पूरक मागण्या विधानमंडळाला सादर करुन, आकस्मिकता निधीतून काढलेल्या रकमांची निधीत भरपाई केली जाते. या निधीतून आगाऊ रकमा घेऊन करण्यात आलेल्या खर्चाची भरपाई विधानमंडळाला पूरक मागण्या सादर करून करावयाची असते.

लोकलेखा (Public Account)-या तिसऱ्या भागाचा तपशील राज्यघटनेच्या २६६ (२) या कलमात देण्यात आला आहे. या लेख्याचे दोन उप विभाग असून पहिल्या उप विभागात भविष्यनिर्वाह निधी, राखीव निधी आणि कर्जे व आगाऊ रकमा यासंबंधी भाग १ मध्ये (एकत्रित निधी मध्ये) अंतर्भूत झालेल्या व्यतिरिक्त कर्जविषयक देवघेवी यांचा समावेश होतो तर दुसऱ्या उप विभागात वित्तप्रेषण (Remittances) याचा समावेश होतो. लोकलेखामध्ये एकत्रित निधीमध्ये अंतर्भूत केलेल्या रकमा वगळून शासनाला किंवा शासनाच्या वतीने मिळालेल्या इतर सर्व रकमा जमा करण्यात येतात. यातील व्यवहार बँकिंग व समायोजनाच्या स्वरुपाचे असल्याने यातून खर्च करण्यासाठी विधानमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता नसते. शासकीय लेख्यांचा या तिसऱ्या भागात, म्हणजे लोकलेख्यात सरकारी पैशांसंबंधी वर नमूद केलेल्या व्यवहारांव्यतिरिक्त इतर व्यवहारांची नोंद केली जाते. हे व्यवहार राज्य मार्ग निधी, विद्युत निधी, शिक्षण उपकर निधी, आरोग्य व पोषण निधी, रोजगार हमी निधी इत्यादींसारख्या शासनाने उभारलेल्या राखीव निधीसंबंधीचे असतात. तसेच, शासनाशी व्यवहार करताना लोकांनी तात्पुरत्या ठेवी म्हणून ठेवलेल्या रकमा, स्थानिक संस्थांच्या ठेवी यांसारख्या बँक व्यवसायाच्या स्वरुपाच्या व्यवहारांची आणि निरनिराळी शासने किंवा राज्य शासनाची विविध कोषागारे यांच्यामधील वित्तप्रेषणाच्या (Remittances) व्यवहारांची नोंद देखील लोकलेख्यात केली जाते. राज्याच्या अतिरिक्त रोख शिल्लकीची गुंतवणूकही याच लेख्यातून केली जाते.

(६३) लेखानुदान (Vote on Account) :-

सन १९८१-८२ या वर्षापासून केंद्र सरकारचा अर्थसंकल्प संसदेला सादर झाल्यानंतर, राज्य शासनाचा अर्थसंकल्प मार्च महिन्यात राज्य विधानमंडळाला सादर केला जाण्याची प्रथा आहे. साधारणपणे संपूर्ण वर्षाचा अर्थसंकल्प नवीन बाबींवरील तरतुदींसह मार्च महिन्यात सादर केल्यानंतर त्यावर चर्चा व मतदान होऊन दिनांक ३१ मार्च पूर्वी विधानमंडळ त्यास आपली मान्यता देते. मागण्यांवर चर्चा करण्याची व त्या संमत करण्याची प्रक्रिया वित्तीय वर्ष उलटून गेल्यावर पार पडते म्हणून एक किंवा दोन महिन्यांच्या कालावधीसाठी 'लेखानुदान' घेणे आवश्यक ठरते. परंतु ज्यावेळी निवडणुका वगैरेसारख्या काही अपरिहार्य कारणास्तव मार्च महिन्यात संपूर्ण अर्थसंकल्प सादर करणे अशक्य असते त्यावेळी कायमस्वरुपाच्या खर्चासाठी व विद्यमान खर्चाच्या पातळीवर साधारण वाढ गृहीत धरुन अगोदरच कार्यान्वित असलेल्या योजनांसाठी यांवरील अर्थसंकल्प मार्चमध्ये सादर केला जातो त्यावेळी काही महिन्यांच्या खर्चासाठी लेखानुदान (Vote on Account) (म्हणजेच अंतरिम अर्थसंकल्प सादर केला जातो) घेण्यात येते. नंतर पुढे नवीन योजनांसाठी व सध्या कार्यवाहीत असलेल्या योजनांच्या विस्तारावरील अतिरिक्त तरतुदीसाठी विधानमंडळाच्या पुढील अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्पाद्वारे तरतुदी करण्यात येतात.

नवीन बाबींसह अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा व मतदान होते. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक*** **१९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.).*

(६४) अर्थसंकल्पीय भाषण :- शासनाची आर्थिक स्थिती आपल्या भाषणामधून स्थूलमानाने स्पष्ट करून वित्त मंत्री वार्षिक अर्थसंकल्प म्हणजेच वित्तविषयक वार्षिक विवरणपत्र सादर करतात.

आपल्या भाषणामध्ये वित्त मंत्री पुढील गोष्टी विधानमंडळाच्या निदर्शनास आणतात-

(१) शासनाने पूर्वी हाती घेतलेल्या महत्त्वाच्या योजनांसंबंधात पार पाडलेली कामे;

(२) आगामी वर्षात हाती घ्यावयाची महत्त्वाची कामे;

(३) शासनाचे धोरणविषयक महत्त्वाचे निर्णय, कर बसविण्यासंबंधी काही प्रस्ताव असल्यास त्याचाही भाषणामध्ये उल्लेख करण्यात येतो *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक*** **१९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.).*

(६५) अर्थसंकल्पीय प्रकाशने :- वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय विधानमंडळाच्या सदस्यांना वित्त विभागाकडून खालील अनुक्रमांक १ ते २४ वरील अर्थसंकल्पीय प्रकाशने एकत्रितरित्या सूटकेसमधून देण्यात येतात :-

(१) महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे

(२) संक्षिप्त अर्थसंकल्प (पिंक बुक)

(३) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग एक-महसूल व जमा यांचे अर्थसंकल्पीय अंदाज

(४) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग दोन-खर्चाचा प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा

(५) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग दोन-खर्च-विभागवार प्रकाशने (व्हाइट बुक)

(यामध्ये सर्वसाधारणत : ३४ पुस्तके असतात) (या प्रकाशनांमध्ये कार्यक्रम व अनिवार्य खर्चाच्या तपशीलवार अंदाजाचाही समावेश असतो.)

(६) भाग-तीन परिशिष्ट-अ-महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना अनुदाने व कर्जे देय आहेत अशा बदली केलेला कर्मचारी वर्ग, कार्यक्रम व बांधकामे यावरील खर्चाचा तपशिल (ग्रामविकास विभाग)

(७) भाग-तीन परिशिष्टे-अ-ची पुरवणी-राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत पंचायत राज संस्थांना गौण शिर्ष १९६, १९७ व १९८ अंतर्गत तपशिलवार व जिल्हानिहाय वितरीत करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चावरील निधीचा तसेच केंद्र पुरस्कृत व राज्य अर्थसंकल्पाबाहेरील अनुदानाचा तपशील दर्शविणारी पुरवणी

(८) भाग-तीन परिशिष्ट-बी (१) बांधकामे-रस्ते व पूल (सा.बां.वि.)

(९) भाग-तीन परिशिष्ट-बी (२) बांधकामे-इमारती (सा.बां.वि.)

(१०) भाग-तीन परिशिष्ट-क-जलसंपदा विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामासंबंधीच्या तरतुदीचा तपशिल

(११) भाग-तीन परिशिष्ट-ड-आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामासंबंधीच्या तरतुदीचा तपशिल

(१२) भाग-तीन परिशिष्ट-ई-ची पुरवणी-राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना गौण शिर्ष १९१, १९२ व १९३ अंतर्गत तपशिलवार व जिल्हानिहाय वितरीत करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चावरील निधीची तसेच केंद्र पुरस्कृत व राज्य अर्थसंकल्पाबाहेरील अनुदानाचा तपशील दर्शविणारी पुरवणी

(१३) भाग-तीन परिशिष्ट-फ-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील

(१४) भाग-तीन परिशिष्ट-ग-आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील

(१५) वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक)

(१६) विनियोजनांची अनुसूची

(१७) अर्थसंकल्पविषयक निवेदन (नवीन बाबी) (ब्ल्यु बुक)

(१८) विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य विकास खर्च

खालील अर्थसंकल्पीय प्रकाशने संबंधित विभागांकडून सदस्यांना वितरीत करण्यात येतात :-

(१९) वार्षिक कार्यक्रम-संक्षिप्त विवरणपत्रे (मराठी)

(२०) वार्षिक कार्यक्रम-संक्षिप्त विवरणपत्रे (इंग्रजी)

(२१) वार्षिक कार्यक्रम-विभागवार (मराठी)

(२२) वार्षिक कार्यक्रम-विभागवार (इंग्रजी)

(२३) वार्षिक कार्यक्रम-मा.राज्यपाल महाराष्ट्र यांचे निदेश (विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११ च्या कलम ७ अन्वये)

(२४) नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशिल जिल्हानिहाय अर्थसंकल्पीय अंदाज भाग-दोनची प्रकाशने-एकूण ३६

(२५) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (Economic survey of Maharashtra)

(२६) कार्यक्रम अंदाजपत्रक (Performance Budget) (विभाग निहाय)

तथापि, ज्यावर्षी लोकसभेची अथवा /आणि विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक घेण्यात येते त्यावर्षी विधानसभेत अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात येऊन लेखानुदान (Vote on Account) *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक*** **१९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)* **मंजूर करून घेण्यात येते. संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्यात येत नाही त्यामुळे साधारणपणे वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय फक्त खालील प्रकाशने देण्यात येतात.**

(१) संक्षिप्त अर्थसंकल्प

(२) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग एक-महसूल व जमा यांचे अर्थसंकल्पीय अंदाज

(३) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग दोन-खर्चाचा प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा

(४) अर्थसंकल्पीय अंदाज-भाग दोन-खर्च-विभागवार प्रकाशने

(यामध्ये सर्वसाधारणतः ३३ पुस्तके असतात) (या प्रकाशनांमध्ये कार्यक्रम व अनिवार्य खर्चाच्या तपशीलवार अंदाजाचाही समावेश असतो)

(५) भाग-तीन परिशिष्ट-अ-महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना अनुदाने व कर्जे देय आहेत अशा बदली केलेला कर्मचारी वर्ग, कार्यक्रम व बांधकामे यावरील खर्चाचा तपशिल (ग्रामविकास विभाग)

(६) भाग-तीन परिशिष्टे-अ-ची पुरवणी-राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत पंचायत राज संस्थांना गौण शिर्ष १९६, १९७ व १९८ अंतर्गत तपशिलवार व जिल्हानिहाय वितरीत करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चावरील निधीचा तसेच केंद्र पुरस्कृत व राज्य अर्थसंकल्पाबाहेरील अनुदानाचा तपशील दर्शविणारी पुरवणी

(७) भाग-तीन परिशिष्ट-बी (१) बांधकामे-रस्ते व पूल (सा.बां.वि.)

(८) भाग-तीन परिशिष्ट-बी (२) बांधकामे-इमारती (सा.बां.वि.)

(९) भाग-तीन परिशिष्ट-क-जलसंपदा विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामासंबंधीच्या तरतुदीचा तपशिल

(१०) भाग-तीन परिशिष्ट- ड-आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामासंबंधीच्या तरतुदीचा तपशिल

(११) भाग-तीन परिशिष्ट-ई-ची पुरवणी-राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना गौण शिर्ष १९१, १९२ व १९३ अंतर्गत तपशिलवार व जिल्हानिहाय वितरीत करावयाच्या अनिवार्य व कार्यक्रम खर्चावरील निधीची तसेच केंद्र पुरस्कृत व राज्य अर्थसंकल्पाबाहेरील अनुदानाचा तपशील दर्शविणारी पुरवणी

(१२) भाग-तीन परिशिष्ट-फ-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील

(१३) भाग-तीन परिशिष्ट-ग-आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील

(१४) वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक)

(१५) विनियोजनांची अनुसूची

(१६) विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य विकास खर्च

खालील अंतरिम अर्थसंकल्पीय प्रकाशने संबंधित विभागांकडून सदस्यांना वितरीत करण्यात येतातः-

(१७) वार्षिक कार्यक्रम-संक्षिप्त विवरणपत्रे (मराठी)

(१८) वार्षिक कार्यक्रम-संक्षिप्त विवरणपत्रे (इंग्रजी)

(१९) वार्षिक कार्यक्रम-विभागवार (मराठी)

(२०) वार्षिक कार्यक्रम-विभागवार (इंग्रजी)

(२१) वार्षिक कार्यक्रम-मा.राज्यपाल महाराष्ट्र यांचे निदेश (विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे आदेश, २०११ च्या कलम ७ अन्वये)

(२२) नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशिल जिल्हानिहाय अर्थसंकल्पीय अंदाज भाग-दोनची प्रकाशने-एकूण ३६

अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सदस्यांना वित्त मंत्र्यांच्या भाषणाशिवाय अनुक्रमांक १ ते ५ वरील प्रकाशने एकत्रितरित्या सूटकेसमधून देण्यात येतात :-

१. संक्षिप्त अर्थसंकल्प (पिंक बुक)

२. अतिरिक्त खर्चाचे तपशिलवार अर्थसंकल्पीय अंदाज (नवीन बाबी)

३. अतिरिक्त अर्थसंकल्पीय अंदाज (अतिरिक्त खर्चाचा सारांश आणि विनियोजन अनुसूची)

४. महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे

५. भाग-दोन खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज, एच-(एक) सार्वजनिक बांधकाम विभाग (नवीन कामे)

६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी

७. कार्यक्रम अंदाजपत्रक (विभाग निहाय)

महत्त्वाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्यूहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरणे_:- यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो :-

- राजकोषीय निर्देशकांची आधारभूत गृहितके, महसूली जमा, महसूली खर्च, भांडवली जमा, भांडवली खर्च, राजकोषीय तूट, महसूली तूट व आगामी २ वर्षासाठी प्रक्षेपण.
- राज्य शासनाला प्राप्त होणाऱ्या महसूली जमा व कर्जाच्या प्रमुख स्तोत्रांची माहिती तसेच करण्यात येणाऱ्या खर्चाच्या प्रमुख बाबी.
- राज्य शासन पुढील गोष्टींचे प्रकटीकरण करते :-

  (१) निर्धारीत केलेला परंतु वसूल न झालेला कर महसूल.

  (२) करेतर महसूलाची थकबाकी.

  (३) शासनाने दिलेली हमी.

  (४) कर्मचाऱ्यांची संख्या व वेतनावरील खर्च.

  (५) राज्य शासनावर असलेले दायित्त्व.

  (६) फलनिष्पत्तीवर आधारीत गुंतवणूकीचे प्रकार.

  (७) माफ केलेला महसूल.

(२) **संक्षिप्त अर्थसंकल्प (पिंक बुक)** (Budegt in Brief) **:-** राज्याने सादर केलेल्या अर्थसंकल्पातील आकडेवारीचा थोडक्यात गोषवारा सादर करण्यात येतो :-

(१) प्रमुख वित्तीय निर्देशांक महसूली तूट, राजकोषीय तूट, प्राथमिक तूट, राज्यावरील कर्ज व त्यांचे मागील १० वर्षातील स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण.

(२) वेतन, निवृत्तीवेतन व व्याज यांच्यावर होणारा खर्च व त्याचे महसूली उत्पन्नाशी प्रमाण यांचा समावेश होतो.

(३) अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या महसूली व भांडवली जमा व खर्चाचे क्षेत्रनिहाय वर्गीकरण.

(४) महसुलात झालेली वाढ व विकासकार्यावरील खर्चातील वाढ दाखविण्यासाठी या प्रकाशनात निरनिराळे आलेख (Graphic Charts) समाविष्ट करण्यात येतात. ही माहिती अर्थसंकल्पाचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते.

(३) **अर्थसंकल्पीय अंदाज (व्हाईट बुक) :-** भारताच्या राज्यघटनेनुसार राज्याचा **अर्थसंकल्प तीन भागांमध्ये** विभागण्यात आलेला आहे. यामध्ये एकत्रित निधी, आकस्मिकता निधी व लोकलेखा यांचा समावेश होतो. यामध्ये सदर तिन्ही स्त्रोतांन्वये प्राप्त होणाऱ्या जमा रकमा व देण्यात येणाऱ्या परताव्याच्या तपशिलवार माहितीचा अंतर्भाव आहे. ही माहिती महालेखापाल कार्यालयाने निश्चित केलेल्या १५ अंकी लेखा वर्गीकरणानुसार उपलब्ध आहे.

व्हाईट बुक या नावाने ओळखण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय अंदाजात जमा रक्कमा व संवितरित रक्कमा यासंबंधीचे तपशीलवार अंदाज अंतर्भूत असतात. वर्गीकरणाच्या सुधारित रचनेमुळे योजनेतील स्वीकृत लेखाशीर्षे व विकास शीर्षे यांमध्ये निकट संबंध स्थापन करणे शक्य झाल्याने १९७४-१९७५ पासून योजनेत्तर व योजनांतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, या दोहोंचा एकत्रित तपशील दर्शविणारे एकच प्रकाशन तयार करण्यात येत होते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला. त्यानुसार राज्यानेही दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयानुसार योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण केले असून आता कार्यक्रम व अनिवार्य असे खर्चाचे वर्गीकरण दर्शविण्यात येते.

सन १९७५-१९७६ या वर्षापासून अर्थसंकल्पीय अंदाज हे तीन भागांत छापण्यात येत आहेत. **अर्थसंकल्पीय अंदाजाच्या पहिल्या भागात** महसूल व जमा यांचे मागील वर्षाचे जमा रक्कमांचे लेखे, चालू वर्षाचे अर्थसंकल्पीय व सुधारित अंदाज आणि आगामी वर्षासंबंधीचे अंर्थसंकल्पीय अंदाज दर्शविण्यात येतात. उदाहरणार्थ, २०४० विक्रीकर या प्रधान शीर्षाखाली सदर वर्षाच्या विक्रीकराच्या जमा रकमा दाखविल्या जातात. त्याचप्रमाणे २०४५, विक्रेय वस्तुंवरील व सेवांवरील इतर कर व शुल्क या शीर्षाखाली करमणूक करापासून मिळालेल्या जमा रकमा दाखविल्या जातात. ६००३, राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण या प्रमुख शीर्षाखाली आणि ६००४, केंद्र सरकारकडून कर्ज व आगाऊ रक्कमा या लेखा शीर्षाखाली केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने व कर्जे दाखविली जातात.

व्हाईट बुकच्या दुसऱ्या भागात मंत्रालयाच्या प्रत्येक प्रशासनिक विभागानुसार योजनांतर्गत व योजनेत्तर खर्चाचा तपशील, प्रधान शीर्ष, गौण शीर्ष व उप शीर्ष आणि तपशीलवार उद्दिष्टे याप्रमाणे दिले जातात. (तपशीलवार शीर्षनिहाय खर्चाची प्रमाण उद्दिष्ट्ये साधारणपणे ७२ आहेत.) दिनांक ०१ एप्रिल, १९५१ पासून भारताने, जलद गतीने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी, नियोजनाचा (पंचवार्षिक योजनांचा) मार्ग स्वीकारला होता. या पंचवार्षिक योजनांनुसार, शासकीय खर्चाचे, तो योजनांतर्गत प्रस्तावांमुळे उद्‌भवलेला आहे किंवा नाही, याच्या मूलभूत फरकावरुन योजनांतर्गत खर्च (Plan Expenditure) व योजनेत्तर खर्च (Non-Plan Expenditure) यामध्ये वर्गीकरण करण्यात येत होते.

खर्चाचे योजनांतर्गत योजना व योजनेत्तर योजना यामध्ये वर्गीकरण करण्याचा संविधानामध्ये उल्लेख केलेला नसला तरी, असे वर्गीकरण नियोजन प्रक्रियेमधून विकसित झालेले होते. काळाच्या ओघात योजनांतर्गत व योजनेतर यांमधील फरकामधून अनेक प्रश्न उद्‌भवत असल्यामुळे ही पद्धती कुचकामी वा प्रभावहीन ठरत होती व फलनिष्पत्तीवर आधारित असलेल्या अर्थसंकल्पामध्ये अडथळा ठरत होती. जसे की, साधारणपणे ७५ टक्के खर्च हा योजनेत्तर असून २५ टक्के खर्च हा योजनांतर्गत असतो. तथापि, त्याप्रमाणात योजनेत्तर खर्चाकडे लक्ष

दिले जात नाही. सर्वसाधारणपणे योजनांतर्गत खर्चाकडे सर्वस्तरावर संनियंत्रण करण्यात येते. योजनांतर्गत खर्चाद्वारे नवीन मत्ता निर्मिती केली जाते. परंतु मागील ७० ते ७२ वर्षात निर्माण केलेल्या मत्तांच्या देखभाल व दुरुस्तीकडे (योजनेत्तर) मात्र आवश्यकतेप्रमाणे लक्ष दिले जात नाही. दरवर्षी केंद्र व राज्य शासनावर प्रत्येक वर्षी योजनांतर्गत खर्च वाढविणेबाबत आग्रह असतो. योजनांतर्गत खर्च चांगला असल्याचे समजले / दर्शविले जाते व योजनेत्तर खर्च हा नेहमीचा / नियमित खर्च समजला जातो., हा दृष्टीकोन बदलणे आवश्यक असल्याने तसेच भारतीय संविधानात अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने असलेल्या तरतुदी विचारात घेता भारतीय संविधानातील अनुच्छेद २०२ अंतर्गत राज्याचे वार्षिक वित्तीय विवरणपत्र (अर्थसंकल्प) सादर करताना खर्चाचे महसूली खर्च व इतर खर्च असे वर्गीकरण करणे बंधनकारक आहे. योजनांतर्गत व योजनेत्तर वर्गीकरणाबाबत भारतीय राज्यघटनेत उल्लेख नाही. अनुच्छेद २०२ नुसार फक्त महसुली व इतर (भांडवली व ऋण) खर्च असे वर्गीकरण दर्शविणे बंधनकारक आहे.

प्रशासकीय सुधारणा आयोग व डॉ.रंगराजन यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय तज्ज्ञ समिती तसेच १२ व्या वित्त आयोगाने योजनांतर्गत व योजनेत्तर खर्चाचे एकत्रीकरण करण्याबाबत केलेल्या शिफारशी आणि योजना आयोगाचे निती आयोगात केलेले रुपांतर, परिणामी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या समाप्ती बरोबरच १२ वी पंचवार्षिक योजना संपुष्टात येणे या सर्व बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेत्तर खर्चाचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन केंद्र शासनाप्रमाणे राज्यातही योजनांतर्गत व योजनेत्तर खर्चाचे एकत्रीकरण करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये तद्नुषंगिक बदल करण्यात आला आहे.

सुधारित व्यवस्थेप्रमाणे सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये योजनांतर्गत/ योजनेत्तर (Plan/ Non Plan) असे विभाजन वित्त विभागाच्या विनंतीनुसार व अंदाज समितीच्या मान्यतेने दर्शविणे बंद करून अर्थसंकल्पीय खर्चाचे यापुढे अनिवार्य खर्च व कार्यक्रमांवरील खर्च तसेच महसुली व इतर (भांडवली व ऋण) खर्च याप्रमाणे वर्गीकरण दर्शविले आहे. योजनेत्तरमध्ये असलेल्या जुन्या विकास कामाच्या योजना आता कार्यक्रम खर्चाकडे वर्ग करण्यात आल्या तसेच योजनांतर्गत खर्चामधील वेतन व आस्थापना विषयक बाबींच्या योजना अनिवार्य खर्चाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. त्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे :-

(अ) **अनिवार्य खर्च :- यामध्ये दोन उप घटक असतील**

(१) मूळ आस्थापनाविषयक खर्च (Base Establishment Expenditure)

- वेतन
- कार्यालयीन खर्च
- निवृत्तीवेतन
- कर्जावरील परतफेड
- भारित खर्च

(२) इतर अनिवार्य खर्च (other committed Expenditure)

- स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक अधिनियमांतर्गत द्यावयाचा निधी
- नगरपालिकांना द्यावयाचा निधी
- स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाच्या करातील द्यावयाचा हिस्सा (उदा. मुद्रांक शुल्क)
- नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ खर्च
- इतर खर्च जो राज्याच्या विकासासाठी आवश्यक असेल

(ब) **कार्यक्रमावरील खर्च** (Scheme Expenditure)

- सन २०१६-२०१७ च्या योजनांतर्गत बाबीवरील खर्च
- सन २०१७-२०१८ पासूनच्या नवीन योजनांवरील खर्च
- सध्याच्या योजनेत्तर मधील जुन्या योजनांवरील खर्च

शासनाचे वेगवेगळे विभाग व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे एकत्रित निधीतून खर्च करण्यास योग्य अशा खर्चाचे अंदाज प्रत्येक विभागाकरिता स्वतंत्रपणे छापले जातात. (एकूण ३४ प्रकाशने) यामुळे इमारती व बांधकामे यांवरील खर्चाव्यतिरिक्त, विभागाशी संबंधित असणाऱ्या सर्व योजनांवरील खर्चाची तरतूद एकाच ठिकाणी पहावयास मिळते. अशा खर्चाचा सारांश प्रत्येक पुस्तिकेच्या सुरूवातीला देण्यात येतो व तपशील त्यानंतरच्या पृष्ठांवर देण्यात येतो.

मंत्रालयीन विभागाशी संबंधित असणाऱ्या खर्चाच्या प्रत्येक प्रधान शीर्षाच्या बाबतीत अंदाजित खर्चाचा गौण शीर्षवार सारांश व त्यानंतर गौण शीर्षे, उप-शीर्षे आणि खर्चाची तपशिलवार उद्दिष्टे यांनुसार खर्चाचे तपशील देण्यात येतात. प्रत्येक प्रधान शीर्षाच्या सारांशाच्या शिरोभागी खर्च ज्याच्याशी संबंधित असेल तो मागणी क्रमांक दत्तमत व भारित असा दोन्ही प्रकारचा स्थूल खर्च व वसुलीची एकूण रक्कम कोणतीही असल्यास, वेगवेगळी दर्शविण्यात येते. ग्रीन बुकामध्ये अंतर्भूत केलेल्या मागण्यांच्या अनुसूचीत, दत्तमत व भारित असे स्थूल खर्चाचे दोन्ही आकडे समाविष्ट करण्यात येतात. खर्चातील वजाती म्हणून लेख्यांमध्ये ज्या रक्कमा समायोजित करण्यात आल्या असतील अशा वसुलीच्या रक्कमांचा तपशील हा शेवटी स्वतंत्रपणे देण्यात येतो.

लेख्यांच्या महसुली व भांडवली अशा दोन्ही लेखा शीर्षाखाली, (१) प्रशासकीय व विवक्षित कार्यासाठी बांधावयाच्या (Functional) इमारती आणि (२) निवासी इमारती, यांची दोन वेगवेगळया मागण्यांद्वारे तरतूद करण्यात येते. रस्त्यांच्या बांधकामासाठी केलेल्या महसुली व भांडवली लेख्यांखालील तरतुदी दोन वेगवेगळया मागण्यांखाली दाखविण्यात येतात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ती बांधकामे पार पाडण्यात येत असल्यामुळे हया सर्व तरतुदी त्या विभागाखाली दर्शविण्यात येतात.

व्हाईट बुकाच्या तिसऱ्या भागात कामांचा अंदाजित खर्च, मागील वर्षापर्यंत झालेला खर्च, आगामी वर्षाकरिता केलेली तरतूद इत्यादींसारखा तपशील संबंधित विभागांखाली दाखविण्यात येतो. या भागात याशिवाय जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या हस्तांतरीत करण्यात आलेल्या योजना व कामे यांचा योजनानिहाय खर्चाचा

तपशीलही दाखविण्यात येतो. अर्थसंकल्पीय अंदाजाच्या (व्हाईट बुक) पहिल्या भागात व दुसऱ्या भागात लोक लेख्याखालील विविध प्रधान शीर्षे व गौण शीर्षे यांखालील अनुक्रमे जमा रकमा व खर्च दाखविण्यात येतो.

विभागवार अर्थसंकल्प तयार करण्याच्या पद्धतीमुळे व्हाईट बुकात एका प्रधान शीर्षाखालील खर्च, त्या खर्चाशी संबंधित असणाऱ्या निरनिराळया विभागांखाली दाखविण्यात येतो. तथापि, खर्चाच्या प्रधान लेखाशीर्षावार-नि-विभागवार सारांश व्हाईट बुकात भाग दोनमध्ये देण्यात येतो. उत्पन्न व खर्च यांवर आधारलेली **राज्याची सर्वसाधारण वित्तीय स्थिती फक्त ग्रीन बुकाच्या भाग एक मध्ये** देण्यात येते.

(४) **वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक) :-** सर्वसाधारणपणे ग्रीन बुक या नावाने ओळखण्यात येणाऱ्या वित्तविषयक विवरणपत्रात भाग चार असतात. ग्रीन बुकाच्या पहिल्या भागात मागील वर्षाची, चालू वर्षाची तसेच आगामी वर्षाची राज्याची एकंदर वित्तीय स्थिती स्पष्ट करणारी प्रास्ताविक टीप असते. यात मागील वर्षाच्या ज्या जमा व खर्चाच्या मुख्य शीर्षाखालील अर्थसंकल्पीय अंदाज आणि सुधारित अंदाज यातील तफावत फार मोठी आहे अशा काही प्रमुख लेखाशीर्षाखालील तफावतीचे स्पष्टीकरण देण्यात येते. ग्रीन बुकमध्ये मागील वर्षाचे सुधारित अंदाज व या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज यांमधील महत्त्वाच्या तफावती आणि चालू वर्षातील जमा व खर्च यांच्या अंदाजासंबंधीच्या महत्त्वाच्या बाबी यांचे स्पष्टीकरण दिले जाते. ग्रीन बुकमधील दुसऱ्या भागात मागील वर्षाचे लेख्यासंबंधीचे प्रधान शीर्षवार आकडे, चालू वर्षाचा अर्थसंकल्प व सुधारित अंदाज आणि आगामी वर्षाचा अर्थसंकल्प यांचा समोवश असतो. तिसऱ्या भागात विधानमंडळाच्या मतास टाकावयाच्या एकूण स्थूल मागण्या सादर करण्यासंबंधीच्या कार्यपद्धतीबद्दल ची एक टिप्पणी समाविष्ट करण्यात येते तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विकास कार्यक्रमाची क्षेत्रनिहाय व विकासमंडळ निहाय माहिती देण्यात येते.

(५) **विनियोजनांची अनुसूची :-** आगामी वर्षातील अर्थसंकल्प विधानमंडळासमोर विभागाच्या मागणी क्रमांकानुसार सादर करण्यात येतो. एका मागणी क्रमांकामध्ये एक किंवा अनेक प्रधान शीर्षांचा समावेश होतो व हे प्रकाशन महसूली व भांडवली खर्च याप्रमाणे विभागण्यात आलेले आहे. मा.मंत्री महोदय आपल्या विभागाशी संबंधित मागणी क्रमांकातील रक्कम विधानमंडळाकडून विनियोजन विधेयकांन्वये खर्च करण्यासाठी मंजूर करून घेतात.

(६) **अर्थसंकल्पविषयक निवेदन (नवीन बाबी) :-** अर्थसंकल्प नियम पुस्तिकेनुसार नवीन सेवा वा सेवेचा नवीन प्रकार या बाबींचा अर्थसंकल्पामध्ये समावेश केलेला असल्यास त्याची माहिती विधानमंडळाला वेगळी दर्शविणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा बाबींची तपशिलवार माहिती विस्तृत स्वरुपात या प्रकाशनाद्वारे देण्यात येते. विधानमंडळाने संमत केल्यानंतर आगामी वित्तीय वर्षात कार्यान्वित करावयाच्या सर्व कार्यक्रमांतर्गत तसेच अनिवार्य खर्चाच्या 'नवीन बाबींची' माहिती दिलेली असते. या सर्व नवीन बाबी विभागानुसार व प्रधान लेखा शीर्षावार दिलेल्या असतात. संबंधित भागाच्या प्रारंभी या 'नवीन बाबी' ची अनुक्रमणिका दिलेली असते.

जेव्हा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात येतो तेव्हा अर्थसंकल्पविषयक निवेदन नवीन बाबी अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या स्वरुपात असतात.

(७) **विभागनिहाय व विकास मंडळनिहाय अनिवार्य विकास खर्च :-** वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक) या प्रकाशनामध्ये राज्य शासनाच्या विकास खर्चाची विकासमंडळ निहाय माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मात्र यामध्ये अनिवार्य खर्चाद्वारे होणाऱ्या विकास खर्चाची माहिती समाविष्ट नसल्याने ती वगेळ्याने या प्रकाशनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येते.

(८) **नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा योजना संबंधीच्या निरनिराळ्या तरतुदींचा जिल्हानिहाय तपशील अर्थसंकल्पीय अंदाज भाग-दोन (३६ प्रकाशने) :-** राज्य शासनाच्या विकास कार्यक्रमाचे वर्गीकरण, राज्य योजना व जिल्हा योजना असे करण्यात येते. जिल्हा योजनेची जिल्हानिहाय माहिती महालेखापाल कार्यालयाने विहित केलेल्या १५ अंकी लेखा वर्गीकरणानुसार यामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२-खर्च-नियोजन विभाग व प्रकाशनातील जिल्हा योजनेची आकडेवारी विस्तृत स्वरुपात या प्रकाशनांमध्ये देण्यात येते.

(९) **भाग-३-परिशिष्टे (९ प्रकाशने) :-** अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२-खर्च-विभागवार प्रकाशने यामध्ये प्रशासकीय विभागांद्वारे करण्यात येणाऱ्या खर्चाची एकत्रित आकडेवारी देण्यात येते. ही आकडेवारी महालेखापाल कार्यालयाने विहित केलेल्या वर्गीकरणानुसार असते. त्यामुळे विभागांद्वारे खर्च करण्यात येणाऱ्या काम निहाय, स्थानिक स्वराज्य संस्था निहाय, जिल्हा निहाय व कार्यक्रम निहाय बाबींच्या माहितीचा समावेश सदर प्रकाशनामध्ये करण्यात आलेला आहे.

(१०) **वार्षिक कार्यक्रम :-** आगामी वित्तीय वर्षात राबवावयाच्या प्रस्तावित विकास कार्यक्रमांची तपशीलवार माहिती या प्रकाशनामधून मिळते. हया प्रकाशनाद्वारे वार्षिक योजनेत समाविष्ट केलेल्या प्रत्येक योजनेचे चालू व मागील वर्षात झालेले कार्य व वित्तीय तरतुदी यांच्या अनुरोधाने कार्यक्रमातील प्रमुख वैशिष्ट्ये समजू शकतात. अर्थसंकल्पात ज्यासाठी तरतूदी करण्यात आल्या आहेत, त्या योजनांसंबंधीचाच, तपशील अर्थसंकल्पीय अंदाजात देण्यात येतो, तर "वार्षिक कार्यक्रम" या प्रकाशनात वर्षभरात हाती घ्यावयाच्या सर्व योजनांसंबंधीचा तपशील देण्यात येतो.

(११) **महाराष्ट्राची आर्थिक पाहणी** (Economic survey of Maharashtra) **(आर्थिक समालोचन) :-** सदर प्रकाशन नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून (Directorate of Economics and Statistics, Planining Department, Government of Maharashtra) वितरीत करण्यात येते. राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची ठळक वैशिष्ठये या प्रकाशनात नमूद केलेली असतात. राज्याच्या सामाजिक नि आर्थिक विकासाची गती दाखविणारी आकडेवारी आणि इतर राज्यांशी विकासाबाबत सुलभरित्या तुलना करता यावी म्हणून इतर राज्यांचे विवक्षित सामाजिक-नि-आर्थिक स्थितीदर्शक निर्देशांक (Socio-economic indicators) सुद्धा यात दिलेले असतात.

या प्रकाशनाच्या पहिल्या भागात राज्याचे उत्पन्न, शेती, उद्योग, राहणीमान इत्यादींसारख्या विविध गोष्टींचा आढावा घेतला जातो. या प्रकाशनाच्या दुसऱ्या भागात (एक) महाराष्ट्रातील कामगारांचे आर्थिक वर्गीकरण, (दोन) मुख्य पिकांखालील क्षेत्रे, (तीन) पाटबंधाऱ्यांखालील क्षेत्रे व (चार) शेतीचे उत्पादन इत्यादींबाबतची आकडेवारी विविध आलेख/तक्त्यांद्वारे देण्यात येते.

(१२) **कार्यक्रम अंदाजपत्रक** (Performance Budget) **:-** सध्या अर्थसंकल्पीय गरजा जरी वास्तव लक्ष्यांच्या आधारे ठरविण्यात येत असल्या तरी अर्थसंकल्प मात्र वित्तीय परिभाषेत सादर करण्यात येतो. एखाद्या विभागाकडून काय कार्य केले जात आहे, किती प्रमाणावर ते केले जात आहे व त्यासाठी किती खर्च केला जात आहे ते शोधून काढण्याचे एक साधन उपलब्ध करून देणे हे कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्यामागील मुख्य प्रयोजन आहे. म्हणून कार्यक्रम अंदाजपत्रकात ज्यासाठी आर्थिक तरतुदीची आवश्यकता आहे अशी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करावयाचा खर्च आणि पूर्ण कामाचे मूल्यमापन करणारी परिमाणात्मक आधारसामग्री देण्यात येते.

शासनाच्या ज्या विभागाकरिता कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्यात येते, अशा शासनाच्या निरनिराळ्या कार्याखाली केलेल्या एकूण कामाची स्थूल प्रवर्गात विभागणी करण्यात येते. या स्थूल विभागणीला "कार्यक्रम" असे म्हणतात. प्रत्येक कार्यक्रमांचे उपविभागात विभाजन करण्यात येते आणि अशा प्रत्येक पोट-विभागाला "कार्य" असे संबोधण्यात येते. "कार्य" हे कामाचा एकजिनसीपणा दर्शवते आणि कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करण्याचा हा सर्वात लहान घटक आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रकातील कार्यामध्ये कार्याची उद्दिष्टे, रचनात्मक प्रकार इत्यादींची माहिती आणि एखाद्या विशिष्ट कार्याखाली वर्गीकरण केलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांसंबंधी कार्याची रुपरेषा दर्शविणारा संपूर्ण कार्यक्रम यांचा समावेश असतो.

उदाहरणार्थ, सहकार विभागाच्या एकंदर कामाची कार्यक्रमांमध्ये पुढीलप्रमाणे विभागणी करण्यात आली आहे :- (१) संचालन व प्रशासन, (२) पत संस्था, (३) पणन (Marketing) इत्यादी. "पत संस्था" हया कार्यक्रमांची आणखी आठ कार्यात विभागणी करण्यात आली आहे, जसे – (१) प्राथमिक कृषि पत संस्था, (२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इत्यादी.

प्रत्येक कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या, पहिल्या भागात प्रास्ताविक माहिती देण्यात येते, नंतरच्या दुसऱ्या भागात वित्तीय गरजासंबंधीचा तपशील देण्यात येतो. वित्तीय गरजांची विभागणी वेगवेगळ्या तीन प्रकारे करण्यात येते : (एक) त्या कार्यक्रमाचा भाग असलेल्या निरनिराळ्या कार्यानुसार, (दोन) आस्थापना (Establishment), प्रवास, साधनसामग्री, भू-विकास इत्यादींवरील खर्चाप्रमाणे खर्चाच्या उद्दिष्टांनुसार, (तीन) विद्यमान वेगवेगळ्या अर्थसंकल्पीय शीर्षानुसार तिसऱ्या भागात कार्यक्रमात अंतर्भूत असलेल्या महत्त्वाच्या कार्याखालील विद्यमान कार्यभार (कार्यक्रम) आणि आगामी वित्तीय वर्षातील अपेक्षित कार्यक्रम यासंबंधी अधिक माहिती देण्यात येते. चौथ्या भागात कार्यक्रमासाठी असलेल्या विद्यमान कर्मचारीवर्गाचा तपशील वेतनमानाच्या तपशीलासह देण्यात येतो.

(१३) **मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व त्यासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी :-** या पुस्तिकेत मागासवर्गाच्या हिताच्या विविध योजना आणि त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित असलेली तरतूद यासंबंधीची माहिती देण्यात येते.

(६६) पूरक मागण्या (Supplementary Demands) :-

एखाद्या वित्तीय वर्षात विधानमंडळाने विनियोजन अधिनियमाखाली मंजूर केलेली विनियोजने त्या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काही सेवांवरील व उद्दिष्टांवरील खर्च भागविण्याच्या दृष्टीने पुरेशी नसल्याचे आढळून आल्यास किंवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल असा "नवीन बाबींवरील खर्च" त्या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असेल त्यावेळी शासनाने असा खर्च करण्यासाठी विधानमंडळाची संमती घेणे आवश्यक ठरते. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक २०*** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

संविधानाच्या अनुच्छेद २०५ अन्वये पुढीलपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात वित्तीय वर्षामध्ये विधानमंडळाला पूरक मागण्या सादर करण्यात येतात :-

(१) शासनाने आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची भरपाई करणे.

(२) वित्तीय वर्ष संपेपावेतो, एखाद्या विशिष्ट सेवेवरील खर्च भागवण्याच्या प्रयोजनार्थ वा मंजूर केलेली विनियोजने अपुरी आहेत असे आढळून आले तर, विनियोजन अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेली विनियोजने वाढविणे, आणि

(३) ज्या नवीन बाबींवरील वार्षिक आवर्ती खर्च रुपये २,००,००० किंवा त्यापेक्षा जास्त असेल किंवा अनावर्ती खर्च रुपये २०,००,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा नवीन बाबींवरील खर्च.

(६७) अधिक खर्चाच्या मागण्या (Excess Demands) :-

अधिक अनुदानाकरिता केलेली मागणी ही पूरक अनुदानाकरिता केलेल्या मागणीपेक्षा भिन्न स्वरूपाची असते. पूरक अनुदानाची मागणी ही मूलतः ज्या अनुदानाच्या गरजेचा पूर्व अंदाज चालू वर्षीच करण्यात येतो, अशा अनुदानाकरिता केलेली असून, ती संबंधित वर्षातच सादर केली जाते, तर अधिक अनुदानाकरिता केलेली मागणी ही, कोणत्याही मागील वर्षातील मंजूर अनुदानापेक्षा झालेला अधिक खर्च नियमांत बसविण्यासाठी सादर केली जाते.

वर्षाच्या सर्व खर्चाची लेखा परीक्षा करण्यात येऊन आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्या वर्षाचे विनियोजन लेखे संकलित केल्यानंतर आणि विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने त्यावर विचार केल्यानंतरच अधिक अनुदानाच्या मागण्या विधानसभेपुढे मांडता येतात.

अपेक्षित खर्चाचा अंदाज शक्य तितका बिनचूक व्हावा यासाठी सर्वप्रकारे काळजी घेतली जात असली तरी वित्तीय वर्षाच्या अखेरच्या काही महिन्यांमध्ये काही अनपेक्षित खर्च संबंधित अर्थसंकल्पीय शीर्षामध्ये खर्चखाती घातला जातो. त्यामुळे मंजूर अनुदाने व विनियोजने यापेक्षा अधिक खर्च होतो. अशाप्रकारे निरनिराळ्या शीर्षाखाली झालेला जादा खर्च वित्तीय वर्ष संपल्यावर भारतातील नियंत्रक व महालेखापालाकडून शोधून काढण्यात येतो व तो लेखापरीक्षा अहवालात दाखवण्यात येतो. हा लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येतो. हा अधिक खर्च कोणत्या परिस्थितीत झाला याबाबत विधिमंडळाच्या लोकलेखा समितीकडून त्याची तपशीलवार

छाननी करण्यात येते आणि जर त्या समितीचे समाधान झाले असेल तर ती तो अधिक खर्च नियमानुकूल करण्याची शिफारस करते. त्यानंतर शासनाकडून या अधिक खर्चाचे विवरणपत्र खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या पद्धतीने तयार केले जाते. ते संविधानाच्या अनुच्छेद २०५ (१) (ब) अन्वये विधानमंडळाला सादर केले जाते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४९ व १५० अन्वये शासनाचे लेखे व त्याचे लेखा परिक्षण यासंबंधीचे अधिकार प्राप्त झाले आहेत ते लेख्यांचे व त्यांच्या परीक्षणाचे स्वरूप व व्याप्ती यासंबंधात एकमेव प्राधिकारी आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि महालेखापाल यांची भूमिका-काही अपवादात्मक बाबी वगळता राज्याचे लेखे ठेवण्याचे काम त्यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. संविधानाच्या अनुच्छेद १५० अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी राष्ट्रपतींची मान्यता घेऊन विहित केलेल्या स्वरूपात राज्याचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. हे लेखे ठेवण्याचे काम त्यांचा राज्यातील प्रतिनिधी म्हणून महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (Accountant General – Audit) यांच्याकडून करण्यात येते.

राज्यातील अधिकारी वित्तीय बाबतीत संविधानानुसार आणि अधिनियम व त्याखालील नियम व आदेश यांनुसार खर्च करीत आहेत किंवा नाहीत हे पाहणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे काम आहे. त्यांच्या वतीने हे काम राज्याचे महालेखापाल (लेखापरीक्षा) पाहतात. राज्याच्या लेख्यासंबंधीचे अहवालही नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वतीने राज्याचे महालेखापाल (लेखापरीक्षा) (Accountant General) (Audit) तयार करतात. हे अहवाल नियंत्रक व महालेखापरीक्षक राज्यपालांना सादर करतात व राज्यपाल ते राज्याच्या विधानमंडळापुढे मांडण्याची तजवीज करतात.

(६८) अर्थसंकल्पावरील चर्चा :-

विधानसभेत अर्थसंकल्पाचा विचार दोन टप्प्यात केला जातो. (एक) सर्वसाधारण चर्चा, आणि (दोन) अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान.

(एक) अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा-अर्थसंकल्प विधानसभेस सादर झाल्यानंतर सात दिवस उलटून गेल्यावर, विधानसभेत अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्त्वांच्या तसेच राज्याच्या कृषी, आर्थिक व करविषयक धोरणांच्या अनुषंगाने सर्वसाधारण चर्चा केली जाते. अशा चर्चेसाठी जास्तीत जास्त सहा दिवस नेमून देता येतात. या चर्चेच्या वेळी कोणताही प्रस्ताव मांडता येत नाही अथवा अर्थसंकल्पावर कोणत्याही प्रकारे मतदान घेतले जात नाही (म.वि.स. नियम २४६), चर्चेच्या शेवटच्या दिवशी वित्त मंत्री चर्चेला उत्तर देतात व चर्चा समाप्त होते. (म.वि.स. नियम २५०) अर्थसंकल्पात समाविष्ट असणाऱ्या विविध बाबींवर तपशीलवार चर्चा अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेच्या वेळी करता येते. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक १९*** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

(दोन) **अर्थसंकल्पातील अनुदानांच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान-**अर्थसंकल्प विधानसभेला सादर केल्यानंतर लवकरात लवकर दहा दिवसांनंतर, त्यात समाविष्ट करण्यात आलेल्या अनुदानाच्या मागण्यांवर सभागृहात चर्चा व मतदान केले जाते. अशा चर्चेसाठी जास्तीत जास्त अठरा दिवस नेमून देता येतात. (महाराष्ट्र विधानसभा नियम २५१[१]) ही चर्चा व मतदान विभागवार अनुदानाच्या मागण्यांच्या संबंधात असते. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक* १९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

अर्थसंकल्पातील अनुदानांच्या विभागवार मागण्यांवरील चर्चेच्यावेळी संबंधित सदस्य त्या-त्या विभागांच्या ध्येय धोरणांवर, योजनांवर विस्ताराने बोलून मुद्दे उपस्थित करतात किंवा जनतेची एखादी निश्चित मागणी सभागृहासमोर मांडतात. चर्चेला संबंधित विभागांचे मंत्री उत्तर देतात. चर्चा समाप्त झाल्यानंतर मागण्या मतास टाकून त्या संमत केल्या जातात.

अनुदानाच्या विभागीय मागण्यांच्या चर्चेसाठी नेमून देण्यात येणाऱ्या दिवसात सर्वच विभागाच्या मागण्यांवर चर्चा होणे अशक्यप्राय असल्यामुळे कोणत्या विभागांच्या मागण्यांवर व कोणत्या प्राथम्यक्रमाने चर्चा व मतदान घ्यावयाचे ते विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्यांशी विचारविनिमय करून ठरविण्यात येते. अर्थसंकल्पातील मागण्यांवरील चर्चेसाठी विभागांचा प्राथम्यक्रम (Priority of Departments) सर्व सदस्यांना विधानसभा पत्रक भाग दोनद्वारे कळविण्यात येतो.

साधारणपणे कोणत्याही एका विभागाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान यासाठी दोन दिवसांपेक्षा अधिक वेळ दिला जात नाही व त्या मागण्यांसाठी त्या दिवशी ठरवून दिलेला वेळ संपताच त्या मतास टाकण्यात येतात. (महाराष्ट्र विधानसभा नियम २५२)

(६९) चर्चारोध (Guillotine) :-

पार्लमेंट या शब्दाचा अर्थ बोलण्याची जागा. सुरुवातीस ब्रिटिश संसदेमध्ये चर्चा वा वादविवाद यावर कसलेही नियंत्रण नव्हते. कामकाजाची व्याप्ती जशी वाढू लागली तशी कामकाज विशिष्ट मुदतीत संपविण्याची गरज भासू लागली. काही सदस्यांनी अडवणूकीचे धोरण स्वीकारण्यास सुरुवात केली. साहजिकच वादविवादावर नियंत्रण ठेवण्याचे मार्ग शोधून काढण्यात आले. एखाद्या प्रश्नावर बराच वेळ चर्चा झाल्यानंतर कोणत्याही सदस्यांस 'चर्चा समाप्ती प्रस्ताव' (Closure) मांडता येतो. हा प्रस्ताव बहुमताने मंजूर झाल्यास प्रस्तावावरील चर्चा थांबवून त्यावर मतदान घेतले जाते. २ फेब्रुवारी, १८८१ रोजी ब्रिटिश लोकसभा अध्यक्ष ब्रँड यांनी अशा प्रस्तावाचा प्रथम अवलंब केला. अशा प्रस्तावाने वाजवी चर्चेच्या हक्कास बाध येत असेल तर मा. पीठासीन अधिकारी तो प्रस्ताव मांडण्यास परवानगी देत नाहीत. एखाद्या प्रश्नावरील चर्चा बंद करण्यास समाप्ती प्रस्तावाचा उपयोग करता येत असे, पण एखाद्या विधेयकावरील किंवा अनेक प्रश्नांवरील चर्चा थांबविण्यास तो पुरेसा नव्हता, म्हणून १८८७ मध्ये चर्चाबंदीचा दुसरा प्रकार शोधून काढण्यात आला व त्यास 'गिलोटिन' (चर्चारोध) हे नाव प्राप्त झाले. *(१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी विरोधकांची मुंडकी उडविण्यासाठी सुचविलेल्या धारदार हत्याराचा वापर शिरच्छेदासाठी करावा असे डॉ. जोसेफ गिलोटिन १७३८-१८१४ याने सुचवले म्हणून*

ते हत्यार गिलोटिन नावाने ओळखले गेले.) चर्चाबंदीचा तिसरा प्रकार म्हणजे कांगारु. हा प्रकार १९१९ पासून अंमलात आला. एखाद्या विधेयकावर अनेक उपसूचना देण्यात येतात. या सर्व उपसूचनांवर चर्चा करणे वेळेअभावी शक्य नसल्याने महत्त्वाच्या उपसूचना निवडण्याचा अधिकार मा.पीठासीन अधिकारी यांना देण्यात येतो. कांगारु ज्याप्रमाणे उड्या मारीत असतो त्याप्रमाणे या उपसूचना अधूनमधून निवडल्या जातात.

या तीन प्रकारांपैकी "चर्चा समाप्ती प्रस्ताव" (Closure), "चर्चारोध" (Guillotine), हे दोन चर्चाबंदीचे प्रकार मध्यवर्ती असेंब्लीत १९०९ पासून नियमात समाविष्ट करण्यात आले.

अर्थसंकल्पातील विभागवार अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेसाठी दिवस ठरविलेले असतात. अनुदानांच्या मागण्यांवरील चर्चेसाठी नेमून दिलेल्या दिवसांपैकी शेवटच्या दिवशी बैठकीचे कामकाज संपण्याची जी वेळ असेल (उदा. सायंकाळी ६.००) त्या वेळेपूर्वी **अर्धा तास अगोदर** (म्हणजे **सायंकाळी** ५.३० वाजता) चर्चा थांबविण्यात येते आणि त्या वेळेपर्यंत अर्थसंकल्पातील ज्या विभागांच्या मागण्यांवर चर्चा किंवा मतदान झालेले नसेल त्या सर्व मागण्यांवर केवळ मतदान घेऊनच त्या मागण्या, एका मागून एक संमत करण्यांत येतात. या कार्यवाहीला **'चर्चारोध' (Guillotine)** असे म्हणतात. [महाराष्ट्र विधानसभा नियम २५१ (२)]

ज्या दिवशी कामकाजपत्रिकेवर"चर्चारोध' दर्शविण्यात आला असेल त्या दिवशी कामकाजाच्या शेवटच्या अर्धा तासाच्या वेळेत स्थगन प्रस्तावाद्वारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दिरंगाईचा किंवा विलंबकारी प्रस्ताव (Dilatory Motion) मांडून कामकाजात अडथळा आणता येणार नाही [महाराष्ट्र विधानसभा नियम २५१ (२)].

(७०) कपात-सूचना (Cut Motions) **:-**

शासकीय खर्चाच्या (१) दत्तमत (Voted) आणि (२) भारित (Charged) या प्रकारांपैकी 'दत्तमत' या शीर्षाखाली अर्थसंकल्पात ज्या रकमा दाखविल्या जातात त्यावरच सभागृहात मतदान केले जात असल्यामुळे 'दत्तमत' रकमांच्या अनुदानांच्या संबंधात कोणतेही अनुदान (१) कमी करण्यासाठी किंवा (२) त्यातील कोणतीही बाब वगळण्यासाठी किंवा (३) एखादी बाब कमी करण्यासाठी सदस्य 'कपात सूचना' देऊ शकतात. परंतु अनुदान वाढविण्यासाठी किंवा त्याचा मूळ उद्देश बदलण्यासाठी असे प्रस्ताव (कपात सूचना) देता येणार नाहीत (म.वि.स. नियम २५६).

कपात सूचना, ती ज्या मागणीशी संबंधित आहे ती मागणी सभागृहात चर्चेसाठी व मतदानासाठी ज्या दिवशी येणार असेल त्याच्या चार पूर्ण दिवस आधी द्यावयाची असते. (विधानसभा नियम समितीच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार एका सदस्याला प्रत्येक विभागासाठी कमाल १० सूचना देता येतात.) कपात-सूचना ज्या नमुन्यात द्यावयाच्या असतात त्याच्या छापील प्रती (फॉमर्स) विधानमंडळ सचिवालयाच्या 'ड-३' **कक्षाकडून देण्यात येत होत्या. आता जुलै, २०१७ पासून संगणकीय आज्ञावलीद्वारे** Online **पद्धतीने कपात सूचना स्वीकारण्यात येतात.**

कपात सूचनांचे पुढीलप्रमाणे तीन प्रकार आहेत :-

(एक) एक रुपयाची कपात (धोरणविषयक कपात) (Disapproval of Policy Cut)-अत्यंत महत्त्वाचे धोरणविषयक प्रश्न त्यात शासनाला आलेले अपयश इ. विषय यात मांडता येतात ही कपात-सूचना अविश्वासाचा प्रस्ताव निदर्शक म्हणून समजली जाते आणि म्हणून शासनावर अविश्वास व्यक्त करावयाचा असेल तरच अशी सूचना दिली पाहिजे. ही सूचना सभागृहात मांडण्यात येऊन मंजूर झाल्यास मान्य संसदीय प्रथेप्रमाणे मंत्रीमंडळाला त्वरित राजीनामा द्यावा लागतो.

(दोन) लाक्षणिक कपात (Token Cut)-शासनाच्या सर्वसाधारण कारभारावर किंवा संबंधित विभागाच्या सर्वसाधारण धोरणावर चर्चा उपस्थित करावयाची असेल, तर कोणत्याही मागणीला नाममात्र (लाक्षणिक) १०० रुपयांची कपात सूचना दिली पाहिजे. अशी कपात सूचना सभागृहाने मंजूर केल्यास त्याचा अर्थ सभागृहाने शासनाच्या धोरणावर असमाधान व्यक्त केले असा होतो.

(तीन) विशिष्ट रकमेची कपात (Economy Cut)-विभागाच्या मागणीत किंवा त्यातील एखाद्या बाबीच्या संबंधात विशिष्ट रकमेची कपात जेव्हा सुचवावयाची असते त्यावेळी त्या विशिष्ट रकमेची कपात-सूचना दिली पाहिजे. अशी सूचना देतेवेळी सदरहू कपात कशी करता येईल हे त्या सदस्याने दाखवून दिले पाहिजे. अशी सूचना सभागृहाने मंजूर केल्यास फक्त कमी केलेल्या रकमेच्या अनुदानासाठीच्या मागणीवरच मतदान केले जाते.

जेव्हा एकाच मागणीसंबंधीने निरनिराळ्या (कपात-सूचना) देण्यात येतात तेव्हा अध्यक्ष निदेश देतील त्या अनुक्रमाने त्यावर चर्चा केली जाते [म.वि.स. नियम २५६ (५)]

(७१) कपात सूचना देण्यासंबंधीचे काही संकेत :-

(१) सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी कपात सूचना देऊ नयेत.

(२) 'एक रुपयाची कपात सूचना' अविश्वासाचा प्रस्ताव निदर्शक म्हणून समजली जात असल्यामुळे ती देताना सदस्यांनी गांभीर्यपूर्वक विचार करून दिली पाहिजे.

(३) कपात सूचनेत चर्चेचा विषय स्पष्टपणे व थोडक्यात नमूद केला पाहिजे.

(४) निरनिराळया सूचना एकत्रित करण्यात येऊ नयेत. उदाहरणार्थ एकाच प्रस्तावाद्वारे अनेक बाबी कमी करण्यास सुचविण्यात येऊ नये. मागणीतील एखादी बाब वगळण्याचे सुचवून त्याद्वारे एकूण मागणीत त्या बाबी इतकी कपात सुचविणे योग्य ठरणार नाही. थोडक्यात म्हणजे प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र कपात सूचना देणे आवश्यक असते.

(५) विभागाच्या मागणीत किंवा मागणीतील एखाद्या विशिष्ट बाबीमध्ये कपात सुचवितेवेळी किती रकमेची कपात सुचवावयाची आहे ते स्पष्ट केले पाहिजे. केवळ एक-तृतीयांश किंवा '२५' टक्के किंवा गत वर्षीच्या अंदाजापेक्षा जेवढी वाढ अधिक दर्शविली आहे तेवढी रक्कम कमी करावी असे सुचवू नये.

(६) एका नमुन्यात (Form) एकापेक्षा अधिक कपात सूचना सुचवू नयेत.

(७२) महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २५६ खालील प्रस्ताव (कपात सूचना) तयार करण्याबाबतचे अनुदेश :-

१. म.वि.स. नियम २५६ (१) मधील तरतुदीनुसार कोणत्याही अनुदानात कपात करण्यासाठी किंवा त्या अनुदानातील कोणतीही बाब गाळण्यासाठी किंवा तीत कपात करण्यासाठी प्रस्ताव सुचविता येतील. पण त्या अनुदानाच्या पूर्व नियोजनात वाढ किंवा बदल करण्यासाठी प्रस्ताव सुचविता येणार नाही. संपूर्ण बाब गाळण्याबाबतचे प्रस्ताव योग्य ठरणार नाहीत.

२. नियम २५६ (२) मधील तरतुदीनुसार एका मंत्रालयीन विभागासाठी दहापेक्षा अधिक नाहीत इतक्या प्रस्तावाची नोटीस ज्या मागणीशी संबंधित आहेत ती मागणी करण्यात येण्याचे चार पूर्ण दिवस आधी देण्यात आली पाहिजे. *(विधानसभा नियम समितीच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार)* विहित केलेल्या प्रपत्राद्वारे अशा सूचना देण्यात आल्या पाहिजेत. **सदर सूचना जुलै, २०१७ पासून संगणकीय प्रणालीद्वारे Online पद्धतीने स्वीकारण्यात येत आहेत.**

३. नियम २५६ (३) मधील तरतुदीनुसार भारित (Charged) खर्चाशी संबंधित असलेल्या बाबी गाळण्यासाठी किंवा त्यात कपात करण्यासाठी प्रस्ताव मांडता येणार नाही. परंतु मागणीतील मुख्य शीर्ष किंवा शीर्षाखालील भारित व दत्तमत (Voted) खर्चाच्या एकूण रकमेपैकी दत्तमत खर्चापेक्षा अधिक नाही एवढ्या रकमेची कपात करण्याकरिता प्रस्ताव सुचविता येतील.

४. कपात सूचना देताना सदस्यांनी खालील संकेत पाळावेत, अशी त्यांना विनंती आहे -

(अ) मागणीत किंवा एखाद्या बाबतीत ठराविक रकमेची कपात करण्याच्या प्रस्तावाचा हेतू असेल तर, त्या विशिष्ट रकमेची कपात सुचविण्यात यावी अशावेळी कपात सुचविणाऱ्या सदस्याने त्या विशिष्ट रकमेची कपात कशी करता येईल ते दाखवून द्यावे अशी अपेक्षा आहे.

(ब) असा कपात प्रस्ताव करण्यामागे जर सर्वसाधारण कारभारावर किंवा संबंधित विभागाच्या सर्वसाधारण धोरणावर चर्चा करण्याचा हेतू असेल तर १०० किंवा १,००० रुपयांची पण त्यातल्या त्यात १०० रुपयांची कपात सुचविणे अधिक योग्य. असा प्रस्ताव सभागृहात मान्य झाल्यास त्याचा अर्थ शासनावर अविश्वास असा केला जाणार नाही, तरीपण संबंधित विभागाच्या धोरणाबाबत विधानसभेने असमाधान व्यक्त केले आहे असा त्याचा अर्थ होईल.

(क) एक रुपया कपात करण्यासाठी सुचविलेला प्रस्ताव, अविश्वासाचा प्रस्ताव म्हणून समजला जातो आणि ह्या अर्थाने प्रस्ताव सुचवावयाचा असल्याशिवाय तसे करण्यात येऊ नये.

५. अशा एखाद्या प्रस्तावाची सूचना देताना संबंधित सदस्याने ह्या प्रस्तावाद्वारे उपस्थित करावयाचा चर्चेचा विषय (स्पष्टपणे व थोडक्यात) नमूद करावा [म.वि.स. नियम २५६ (४)]

६. अर्थसंकल्पविषयक निवेदन आणि अर्थसंकल्पीय अंदाज ह्या पुस्तकांचा उल्लेख करतांना 'निळे पुस्तक' व 'पांढरे पुस्तक' असे शब्दप्रयोग वापरु नयेत. त्याऐवजी अनुक्रमे 'अर्थसंकल्पविषयक निवेदन' आणि 'अर्थसंकल्पीय अंदाज' या शब्दप्रयोगांचा उपयोग करावा.

७. असे प्रस्ताव नवीन वाढीबाबत असतील तरच अर्थसंकल्पविषयक निवेदनाचा उल्लेख करावा. इतर बाबतीत अर्थसंकल्पीय अंदाजातील नोंदीचाच उल्लेख करण्यात यावा.

८. निरनिराळे प्रस्ताव एकत्रित करण्यात येऊ नयेत. उदाहरणार्थ कोणतीही एखादी बाब वगळण्याचे सुचवून त्याद्वारे एकूण मागणीत त्या बाबीइतकी कपात सुचविणे बरोबर होणार नाही. अशा प्रकारचा प्रस्ताव दोन प्रस्तावात विभागला पाहिजे. बाब वगळण्यासाठी एक आणि एकूण मागणीत कपात सुचविण्यासाठी दुसरा तसेच एका प्रस्तावात अनेक बाबी वगळण्यास सुचविणे बरोबर होणार नाही. प्रत्येक बाबीसाठी एक याप्रमाणे सर्व बाबींसाठी वेगवेगळे प्रस्ताव सुचविण्यात यावेत. मागणीत किंवा एखाद्या बाबीत किती कपात करावयाची ते स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. केवळ १/३ किंवा २५ टक्के कपात किंवा गेल्या सालच्या अंदाजात जेवढी वाढ केली असेल तितकी रक्कम कमी करणे असे लिहू नये.

९. म.वि.स. नियम २५६ खालील सर्व प्रस्ताव कपात सूचनांच्या एकत्रित यादीच्या स्तंभात देण्यात येतील. पहिल्या स्तंभात प्रस्तावाचा अनुक्रमांक, दुसऱ्या स्तंभात मागणी व प्रस्तावाशी संबंधित असलेल्या बाबी, तिसऱ्या स्तंभात कपात सूचनेची रक्कम (बाब 'गाळा' किंवा अमूक रुपयांची कपात), चौथ्या स्तंभात प्रस्ताव मांडताना उपस्थित करावयाचे विषय आणि पाचव्या स्तंभात सदस्यांची नावे देण्यात येतील.

१०. अर्थसंकल्पीय अंदाजात ज्या क्रमाने मुख्य लेखा शीर्ष असतील त्या क्रमानेच मुख्य लेखा शीर्षाखालील प्रस्ताव एकत्रित करण्यात येतील.

११. प्रत्येक मुख्य लेखा शीर्षाखालील -

(अ) (अर्थसंकल्पविषयक निवेदन) नवीन बाबीसंबंधीचे प्रस्ताव प्रथम देण्यात येतील त्यासाठी स्तंभ २ मध्ये मुख्य लेखा शीर्ष, नवीन बाबीचा क्रमांक आणि पृष्ठ क्रमांक देण्यात यावेत. उदाहरणार्थ २२९, जमीन महसूल, बाब क्रमांक एक, पृष्ठ ....

(ब) (एक) त्यानंतर प्रस्ताव, त्याद्वारे उपस्थित करावयाचे विषय, ज्या बाबींशी संबंधित असतील त्या बाबी, अर्थसंकल्पीय अंदाजात ज्या क्रमाने दिलेल्या असतात त्या क्रमानेच देण्यात येतील.

(दोन) एकूण मागणीत कपात सुचवून त्याद्वारे विभागाच्या एकंदरीत धोरणाची चर्चा करण्याचा उद्देश असेल तर असे प्रस्ताव शेवटी देण्यात येतील.

(तीन) अशा प्रस्तावाबाबत स्तंभ २ मध्ये पुढील गोष्टी नमूद करण्यात येतील -

मुख्य लेखा शीर्ष, बाबींचे वर्णन, त्यासाठी केलेली तरतूद आणि अर्थसंकल्पीय अंदाजात ज्या पृष्ठावर ही बाब छापली आहे ते पृष्ठ.

(क) कपात प्रस्तावाच्या संकलित यादीत कपात प्रस्तावांचा क्रम खालीलप्रमाणे असेल.-

(एक) मागणीतील कोणत्याही बाबीवर सुचविलेले एक रुपयाचे कपात प्रस्ताव.

(दोन) बाबी वगळण्याचे प्रस्ताव.

(तीन) इतर कपात प्रस्ताव, इतर सर्व प्रस्तावात अधिकतर कपात सुचविणारे प्रस्ताव प्रथम नमूद करण्यात येतील.

(चार) लाक्षणिक कपात प्रस्ताव.

(७३) पूरक मागण्या/लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या/अतिरिक्त मागण्या :-

पूरक मागण्या (Supplementary Demands)-(म.वि.स. नियम २६०) राज्याचा अर्थसंकल्प हा भविष्यातील जमाखर्चाच्या अंदाजावर आधारित असून त्यातील तरतुदी प्रत्यक्षात पुरेशा राहतीलच असे म्हणता येत नाही. त्यामुळे एखाद्या वित्तीय वर्षात विधानमंडळाने मंजूर केलेली विनियोजने पुरेशी नसल्याचे आढळून आल्यास किंवा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना ज्या खर्चाची कल्पना करण्यात आली नसेल अशा नवीन बाबींवरील खर्च या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असेल त्यावेळी शासनाने असा खर्च करण्यासाठी विधानमंडळाची संमती घेणे आवश्यक ठरते व त्यासाठी ज्या मागण्या केल्या जातात त्यांना 'पूरक किंवा पुरवणी मागण्या' म्हणतात.

अर्थसंकल्पाप्रमाणेच पूरक मागण्याही राज्यपाल नेमून देतील अशा दिवशी विधानसभेला सादर केल्या जातात. पूरक मागण्या सभागृहाला सादर झाल्यानंतर तीन दिवस उलटून गेल्यावर, त्यावर सभागृहात चर्चा व मतदान केले जाते. अशा चर्चेसाठी एक किंवा अधिक दिवस नेमून देण्यात येतात.

पूरक मागण्यांवरील चर्चा ही ज्या विशिष्ट बाबी मिळून ती मागणी बनलेली असेल. त्या बाबीपुरतीच मर्यादित असते व त्यावेळी मूळ अनुदान किंवा त्या अनुदानामागील धोरण यावर चर्चा करता कामा नये [नियम २६० (३)]

अर्थसंकल्पीय मागण्यांवरील चर्चेच्या संबंधात कपात सूचना, चर्चेसाठी विभागांचा प्राथम्यक्रम, चर्चारोध इत्यादी ज्या तरतुदी आहेत त्या सर्व पूरक मागण्यांवरील चर्चा व मतदान यासाठीही लागू आहेत. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक २०*** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

लाक्षणिक अनुदानाच्या मागण्या (Token Demands)-ज्या मागणीस ज्या कारणासाठी अगोदरच विधानसभेची मंजुरी मिळाली आहे, अशा मागणीतील काही शिल्लक रकमा नवीन कामासाठी किंवा पूर्वी ज्या कामासाठी तरतूद करण्यात आली होती, त्या कामाच्या स्वरुपात बदल करण्यात येऊन त्यावर खर्च करावयाची असेल तर त्यास विधानसभेची मंजुरी घेणे आवश्यक असते. तेव्हा ह्या कामासाठी जी मागणी करण्यात येते तिला लाक्षणिक अनुदान म्हणतात. याकरिता १० रुपये रकमेची नाममात्र मागणी करण्यात येते. या मागणीला विधानसभेने मंजुरी दिल्यास पुनर्विनियोजन (Re-appropriation) करून रक्कम उपलब्ध करून देता येते. (म.वि.स. नियम २६१)

अतिरिक्त मागण्या (Excess Demand)-कोणत्याही आर्थिक वर्षात विधानसभेने मंजूर केलेल्या मागणीपेक्षा जादा रक्कम खर्च झाली असेल तर त्या खर्चाच्या जादा रकमेस या वर्षाकरिता विधानसभेची मंजूरी घेणे आवश्यक असते. अशा मागणीस अतिरिक्त मागणी म्हणतात. विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने याबाबत आवश्यक छाननी करून केलेल्या शिफारशीनुसार या मागण्या असल्याने त्यावर सभागृहात सहसा चर्चा होत नाही. अशा मागण्या विधानसभेस सादर करण्याचा दिवस राज्यपाल नेमून देतात. अनुदानाच्या मागण्यांवर ज्याप्रमाणे कार्यवाही केली जाते त्याप्रकारे या मागण्यावरही कार्यवाही केली जाते (म.वि.स. नियम २५९).

(७४) लेखानुदान/विनियोजन अधिनियम :-

(अ) लेखानुदान (Vote on Accounts)**-**एखाद्या वित्तीय वर्षाच्या काही भागाकरताच विधानमंडळात वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करण्यासंबंधात घालून दिलेली कार्यपद्धती न अनुसरता, राज्याच्या एकत्रित निधीतून काही रक्कम काढून घ्यावी लागते असे काही प्रसंग येतात. अशा प्रकरणांत आगामी वित्तीय वर्षाच्या एखाद्या भागातील अपेक्षित खर्चाकरिता 'लेखानुदान' मंजूर करण्याची विधानमंडळात विनंती केली जाते. संविधानाच्या अनुच्छेद २०३ व २०४ यामध्ये विहित केलेली कार्यपद्धती पूर्ण केली जाईपर्यंत वित्तीय वर्षाच्या कोणत्याही भागाच्या अंदाजित खर्चाच्या बाबतीत आगाऊ अनुदान देण्याचे अधिकार राज्याच्या विधानसभेला संविधानाच्या अनुच्छेद २०६ अन्वये देण्यात आले आहेत. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक*** **१९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

(ब) विनियोजन अधिनियम-वित्त मंत्र्यांनी सादर केलेल्या अंदाजात काही फेरबदल करून किंवा कोणतेही फेरबदल न करता, वार्षिक अर्थसंकल्पाला विधानमंडळाकडून अंतिमरित्या मान्यता मिळाल्यानंतर किंवा आगामी वित्तीय वर्षाच्या एखाद्या भागाकरिता असलेल्या अंदाजित खर्चाच्या बाबतीत आगाऊ अनुदाने देण्याबाबतचा लेखानुदान प्रस्ताव विधानमंडळाने मंजूर केल्यानंतर विनियोजन विधेयक किंवा विनियोजन (लेखानुदान) विधेयक विधानमंडळाला सादर करावे लागते. अशा विधेयकांमध्ये विशिष्ट उद्दिष्टे व सेवा आणि आगामी वित्तीय वर्षात किंवा यथास्थिती, वर्षाच्या काही भागात या उद्दिष्टांवर व सेवांवर एकत्रित निधीतून ज्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येण्याची शक्यता असेल ती खर्चाची मर्यादा स्पष्ट करणाऱ्या अनुसूची असतात. विधेयके विधानमंडळाने संमत केल्यानंतर आणि राज्यपालांनी त्यास संमती दिल्यानंतर, ती विधेयके अनुक्रमे विनियोजन अधिनियम किंवा विनियोजन (लेखानुदान) अधिनियम बनतात. *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक*** **१९** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

(७५) विनियोजन विधेयकावरील चर्चेवेळी उपस्थित करावयाचे मुद्दे/वेळेची मर्यादा :-

विनियोजन विधेयकांवरील चर्चा ही, विधेयकातील अनुदानाच्या संबंधात अभिप्रेत असलेल्या आणि संबंधित अनुदानाच्या मागण्या विचाराधीन असताना पूर्वीच उपस्थित न करण्यात आलेल्या, सार्वजनिक महत्त्वाच्या किंवा प्रशासनविषयक धोरणाच्या बाबीपुरती मर्यादित असेल.

म.वि.स. नियम २६४(५) मधील तदरतूदीनुसार चर्चेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून विनियोजन विधेयकावरील चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सदस्यांना जे कोणते विशिष्ट मुद्दे उपस्थित करावयाचे असतील त्या मुद्दयांची पूर्वसूचना विनियोजन विधेयकावरील चर्चेच्या आदल्या दिवशी (म.वि.स. नियम २६४ (४) मधील तरतूदीनुसार) संध्याकाळी ५-०० वाजेपर्यंत देता येईल. (विधानसभा नियम समितीच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार) *(याबाबतची सन मार्च, १९८५ पासूनची सांख्यिकीय माहिती* ***परिशिष्ट क्रमांक १९*** *मध्ये दर्शविण्यात आली आहे.)*

(७६) स्थूल मागण्या :-

विधानमंडळाने संमत केलेल्या कायद्यानुसार केलेल्या विनियोजनाव्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमधून काढणे संविधानाच्या अनुच्छेद २६६ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय नाही. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी घालून दिलेल्या एखाद्या विवक्षित प्रधान शीर्षाखालील खर्च कमी करून जमा रकमा किंवा वसूल केलेल्या रकमा लेखांकनाच्या तत्त्वांनुसार समायोजित केलेल्या असल्या तरी राज्याच्या एकत्रित निधीमधून एखाद्या वित्तीय वर्षात प्रत्येक प्रधान लेखा शीर्षाखाली करण्यात यावयाचा निश्चित खर्च किंवा मागणी विधानमंडळाने विनिर्देशपूर्वक प्राधिकृत केलेली असणे आवश्यक आहे. म्हणून विधानमंडळाला सादर करावयाच्या मागण्या, प्रस्तुत अर्थसंकल्पीय शीर्षकाखालील खर्चातून वजा दाखवलेल्या अंदाजित जमा रकमा व वसूलीच्या रकमा विचारात न घेता अंदाजित स्थूल खर्चाच्या स्वरुपात असल्या पाहिजेत.

(७७) खर्चाचे पूरक विवरणपत्र/अधिक खर्चाचे विवरणपत्र :-

खर्चाचे पूरक विवरणपत्र-विनियोजन अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या विनियोजनाप्रमाणे सर्व बाबतीत खर्च मर्यादित करणे शक्य होणार नाही. काही बाबींकरिता किंवा सेवांकरिता केलेली विनियोजने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना कल्पना नसलेल्या कारणामुळे अपुरी असल्याचे आढळून येईल किंवा वार्षिक वित्तीय विवरणपत्र तयार करताना कल्पना नसलेल्या अशा एखाद्या नवीन सेवेवरील खर्चाकरिता तरतूद करण्याची आवश्यकता वित्तीय वर्षात निर्माण होऊ शकेल. तसेच एखाद्या तातडीचा व अकल्पित खर्च भागविण्याकरिता आकस्मिकता निधीतून मंजूर केलेल्या आगाऊ रकमांची आकस्मिकता निधीमध्ये भरपाई करणेही आवश्यक असते. अशा सर्व, प्रकरणांच्या बाबतीत एकत्रित निधीतून आवश्यक विनियोजने करण्यासाठी विधानमंडळाला खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करावे लागते. खर्चाच्या पूरक विवरणपत्राच्या संकलनाकरिता आवश्यक असलेली माहिती मंत्रालयाच्या संबंधित प्रशासनिक विभागाकडून वित्त विभागाला योग्य वेळी पुरविली गेली पाहिजे. पूरक विवरणपत्रात समाविष्ट केलेला खर्च प्राधिकृत करण्यासाठी अर्थसंकल्प मंजूर करण्यासाठी घालून दिलेली कार्यपद्धतीच अनुसरण्यात येते. विधानसभेने मागण्यांवर मतदान केल्यानंतर एकत्रित निधीतून रकमा काढण्याचा प्राधिकार देणारा पुरवणी विनियोजन अधिनियम विधानमंडळ संमत करते.

अधिक खर्चाचे विवरणपत्र-कोणत्याही आर्थिक वर्षासंबंधीचे रोखीचे व्यवहार हे ३१ मार्च रोजी बंद करण्यात येतात. मात्र आंतरशासकीय समायोजनांचे व्यवहार याला अपवाद असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला हे व्यवहार २७ एप्रिलपर्यंत करण्याची परवानगी आहे. ह्या तारखेनंतर रोखीच्या व्यवहाराची नोंद घेतली जात नाही. त्या

वर्षाचे लेखे बंद केले जातात. तथापि, लेखापरिक्षाविषयक तपासणी आणखी काही काळ चालू राहते आणि महालेखापाल यांच्याकडून लेखा अंतिमरित्या बंद करण्यात येण्यापूर्वी वर्गीकरणातील चुका काढून टाकण्याकरिता व अंतिम आकडेवारीच्या आधारे रकमाचे लेखांतरण करण्याकरिता निरनिराळया शीर्षामध्ये अंतर्गत समायोजने केली जातात. नंतर अंतिमरित्या बंद केलेल्या व लेखा परीक्षा केलेल्या लेख्यांचे महालेखापाल, महाराष्ट्र यांच्याकडून संकलन केले जाते व ते भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेमार्फत व शासनाला (एक) वित्त लेखे व (दोन) विनियोजन लेखे या स्वरुपात सादर केले जातात. वित्तीय वर्ष चालू असताना काही बाबीवर व सेवांवर विधानमंडळाने मंजूर केलेल्या विनियोजनापेक्षा जास्त खर्च करण्यात आला असल्याचे विनियोजन लेख्यांवरील अहवालावरुन दिसून येते. या जादा खर्चाबाबत विचार करतेवेळी मंत्रालयाच्या विभागांना नियंत्रक अधिकाऱ्यांकडून सविस्तर कारणे मिळवून ती लोकलेखा समितीपुढे ठेवावी लागतात. अधिक खर्चाच्या पुष्ट्यर्थ दिलेले समर्थन विधिमंडळाच्या लोकलेखा समितीला समाधानकारक वाटले तर तो अधिक खर्च नियमानुकूल करावा अशी शिफारस समिती करते. चुकीच्या वर्गीकरणामुळे विशिष्ट अधिक खर्च किंवा बचत विनियोजन लेख्यांत बरोबर दाखविली गेली नाही असे सिद्ध झाल्यास, समिती या वस्तुस्थितीची नोंद घेते व त्यानुसार शिफारस करते. समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे, वित्त विभागामार्फत, विधानमंडळाच्या विचारार्थ ठेवण्यासाठी अधिक मागण्यांचे विवरणपत्र तयार करण्यात येते. विधानमंडळात अधिक मागण्यांवर मतदान झाल्यानंतर विधानमंडळापुढे अधिक विनियोजन विधेयक मांडण्यात येते व ते संमत झाल्यानंतर त्याचे अधिक विनियोजन अधिनियमात रुपांतर होते.

(७८) नवीन खर्च :-

पूर्वी ज्या बाबी रीतसर मान्य करण्यात आल्या असतील आणि दरवर्षी विशिष्ट नवीन मंजुरीशिवाय ज्यांचा वार्षिक अर्थसंकल्पात समावेश करणे आवश्यक असेल, अशा बाबींच्या संबंधातील करावयाच्या तरतुदीशिवाय अशा काही बाबी असू शकतील की, त्यासाठी मागील वर्षात तरतूद करण्यात आली नव्हती आणि आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी विनिर्देशपूर्वक तरतूद करून त्यांवर खर्च करणे आवश्यक असेल. अशा बाबींना खर्चाच्या 'नवीन बाबी' म्हणतात. अंतर्भूत खर्चाचे स्वरुप व व्याप्ती यास अनुसरुन 'नवीन बाबींवर' करावयाच्या खर्चास विधानमंडळाची किंवा शासनाची विशिष्ट मंजुरी घेणे आवश्यक असते.

अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने एखादी खर्चाची बाब "नवीन" आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी मागील वर्षामध्ये तशा स्वरुपाचा खर्च अर्थसंकल्पात समाविष्ट केला होता का? ही प्रमुख कसोटी आहे, दुसऱ्या शब्दात, नवीन धोरणाचा स्वीकार, होणारा खर्च, नवीन सवलतींची तरतूद किंवा विद्यमान सवलतीच्या स्वरुपात भरीव फेरबदल या बाबी सर्वसाधारणपणे नवीन म्हणून समजण्यात याव्या. तथापि, एखाद्या प्रकरणात मान्यताप्राप्त सेवेवरील खर्चातील वाढ ही त्यातील व्याप्तीमुळे नवीन बाब समजण्याइतकी महत्त्वाची समजली जाऊ शकते. उदाहरणार्थ पुरवठा सेवा, सहायक अनुदान इत्यादी यासाठी असलेल्या तरतुदीत भरीव वाढ.

*****

प्रकरण सातवे

विशेषाधिकार (Privileges)

(७९) विशेषाधिकार :-

विधानमंडळाची निर्मिती ही भारतीय संविधानामधून झालेली असून विधानमंडळाची सभागृहे व विधानमंडळाच्या सदस्यांना प्राप्त झालेल्या विशेषाधिकारांचा एकमेव स्रोत भारतीय संविधान हा आहे. विशेषाधिकारांबाबत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९४ मध्ये स्पष्टपणे तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदींद्वारे विधानमंडळाचे विशेषाधिकार संविधानात अधिनियमित करण्यात आलेले आहेत.

भारतीय संविधानामध्ये राज्य विधानमंडळ व त्यांचे सदस्य यांचे विशेषाधिकारांसंदर्भात पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत :—

अनुच्छेद १९४. (१) या संविधानाच्या तरतुदी आणि विधानमंडळाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळास भाषण स्वातंत्र्य असेल.

(२) राज्य विधानमंडळाचा कोणताही सदस्य, विधानमंडळात किंवा त्याच्या कोणत्याही समितीत त्यांनी केलेल्या कोणत्याही वक्तव्याच्या किंवा त्याने केलेल्या कोणत्याही मतदानाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयात कोणत्याही कार्यवाहीस पात्र होणार नाही आणि कोणतीही व्यक्ती अशा विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या प्राधिकाराद्वारे किंवा त्यान्वये कोणताही अहवाल, कागदपत्र, मतदान किंवा कामकाजवृत्त यांच्या प्रकाशनाबाबत याप्रमाणे कार्यवाहीस पात्र होणार नाही.

(३) अन्य बाबतीत, राज्य विधानमंडळाचे सभागृह, आणि अशा विधानमंडळाच्या सभागृहांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार व उन्मुक्ती या, ते विधानमंडळ कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित करील अशा असतील आणि याप्रमाणे निश्चित होईपर्यंत, [त्या सभागृहाला आणि त्याच्या सदस्यांना व समित्यांना संविधान (चव्वेचाळीसावी सुधारणा) अधिनियम, १९७८ याचे कलम २६ अंमलात येण्याच्या लगतपूर्वी जशा होत्या तशा असतील.]

(४) खंड (१), (२) व (३) यांच्या तरतुदी, जशा त्या राज्य विधानमंडळाच्या सदस्यांच्या संबंधात लागू आहेत तशाच त्या या संविधानाच्या आधारे त्या विधानमंडळाच्या सभागृहात किंवा तिच्या कोणत्याही समितीत भाषण करण्याचा आणि तिच्या कामकाजात अन्यथा भाग घेण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीच्या संबंधात लागू असतील.

उक्त अनुच्छेदांमध्ये उल्लेख असलेल्या संविधानाच्या ४४ व्या विशोधनामधील कलम १५ व कलम २६ ही कलमे दिनांक २० जून, १९७९ पासून अंमलात आली आहेत. त्यापूर्वी, संविधानाचा प्रारंभ होण्याच्या दिनांकाला म्हणजेच २६ जानेवारी, १९५० रोजी, ब्रिटिश पार्लमेंटला जे विशेषाधिकार होते तेच भारतीय संसदेला व राज्य विधानमंडळांना असतील, अशा प्रकारची तरतूद संविधानात होती. परंतु, स्वतंत्र भारताच्या संविधानात ब्रिटिश पार्लमेंटचा उल्लेख अप्रस्तुत वाटल्याने संविधानातील उक्त विशोधनाद्वारे सदर उल्लेख वगळण्यात आला. मात्र असे असले तरी या तरतुदीतील मूळ आशय, म्हणजेच, ब्रिटिश पार्लमेंटला जे विशेषाधिकार आहेत तेच भारतीय संसदेला व राज्य विधानमंडळांना आहेत, तो बदललेला नाही. थोडक्यात, ब्रिटिश पार्लमेंटला जे विशेषाधिकार उपलब्ध होते, तेच राज्य विधानमंडळांना उपलब्ध आहेत.

सर आरस्किन मे यांनी त्यांच्या 'पार्लमेंटरी प्रॅक्टीस' (Erskine May : Parliamentary Practice), **या ग्रंथात (१६ वी आवृत्ती, पृ.४२ वर) विशेषाधिकारांची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे :—**

"Parliamentary privilege is the sum of the peculiar rights enjoyed by each House collectively as a constituent part of the High Court of Parliament, and by members of each House individually, without which they could not discharge their functions and which exceed those possessed by other bodies or individuals. Thus privilege, though part of the law of the land is, to a certain extent an exemption from the ordinary law."

अर्थातच विशेषाधिकार हा सभागृहाच्या अशा विशिष्ट मूलभूत अधिकारांचा संग्रह आहे जो विधानमंडळ सभागृहांद्वारे सामूहिकरित्या व सदस्याद्वारे व्यक्तीगतरित्या सभागृहाचे घटनात्मक अधिकारांचा भाग म्हणून वापरला जातो. ज्याच्याशिवाय ते सदस्य त्यांची सभागृहाप्रती असलेली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यास सक्षम नसतात, हे अधिकार म्हणजेच सभागृहाचे व सदस्यांचे मूलभूत अधिकार आहेत.

(८०) मूळ विशेषाधिकार :—

संसदीय कर्तव्य पार पाडताना सर्वांत महत्त्वाचा आणि मूलभूत विशेषाधिकार म्हणजे भाषण स्वातंत्र्याचा आहे. अनुच्छेद १९ मध्येही नागरिकांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु, अनुच्छेद १०५ आणि १९४ मध्ये संसद व विधानमंडळांच्या सदस्यांच्या भाषण स्वातंत्र्यावर अधिक भर दिला आहे. अनुच्छेद १९ खाली दिलेल्या भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर रास्त बंधने आहेत. जसे, लाइबल (Libel) कायदा, निंदाजनक वक्तव्याबद्दल सामान्य व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कार्यवाही तात्काळ सुरू करता येणे. परंतु, विधानमंडळ सभागृहामध्ये किंवा विधानमंडळाच्या एखाद्या समितीमध्ये विधानमंडळ सदस्याचे वक्तव्य, निंदा करणारे किंवा बदनामी करणारे आहे, या कारणावरून त्याच्यावर कोणतीही कारवाई करता येत नाही. तो अशा कारवाईपासून संरक्षित असतो. एकूणच सदस्यांनी सभागृहात केलेले कोणतेही वक्तव्य अथवा भाषण हे कोणत्याही न्यायालयात कार्यवाहीस पात्र होऊ शकत नाही. तसेच कोणतीही व्यक्ती सभागृहाच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखालील प्रकाशित झालेला कोणताही अहवाल, कागदपत्र वा कार्यवाही वृत्ताच्या प्रकाशनाबाबत कोणत्याही कारवाईस पात्र ठरू शकत नाही.

(८१) विशेषाधिकारांची आवश्यकता :-

संसदीय भाषेमध्ये विशेषाधिकार [Privileges] म्हणजे सभागृह आणि त्याच्या समित्या यांना सामूहिकपणे [Collective] आणि सभागृहाच्या सदस्यांना वैयक्तिकरित्या [Individual] प्रदान करण्यात आलेले खास अधिकार होय. या विशेषाधिकारांचा मुख्य उद्देश सभागृहाचे स्वातंत्र्य, सभागृहाचा अधिकार आणि शान व प्रतिष्ठा अबाधित राहावी हा आहे. संविधानाने सदस्यांवर सुपूर्द केलेली जबाबदारी आणि कर्तव्ये व्यवस्थितपणे सभागृहांत तसेच सदस्यांना वैयक्तिकरित्या पार पाडता यावी याकरिता विशेषाधिकार आवश्यक आहेत व म्हणून ते सभागृहास व सदस्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

(८२) विशेषाधिकारांबाबत निकष :-

दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय संविधान अस्तित्वात येताना ब्रिटिश पार्लमेंटला जे विशेषाधिकार होते, त्यातीलच काही विशेषाधिकार भारतीय संसद व विधानमंडळांना प्राप्त झाले असून त्या ज्ञात (known)

विशेषाधिकारांव्यतिरिक्त नवीन विशेषाधिकार निर्माण करता येणार नाहीत व उपलब्ध ज्ञात विशेषाधिकारांच्या कार्यकक्षेतच विशेषाधिकारांसंदर्भातील कार्यवाही पार पाडता येईल हे १० व्या लोकसभेच्या विशेषाधिकार समितीने स्पष्ट केले आहे.

त्यानुषंगाने विधानमंडळाचा किंवा विधानमंडळाच्या एखाद्या सदस्याचा एखाद्या प्रकरणात अवमान किंवा विशेषाधिकार भंग झाल्याचे तेव्हाच सिद्ध होऊ शकते, जेव्हा तो सदस्य त्या प्रकरणात त्याचे विधानमंडळाच्या सभागृहाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीशी (Proceedings) संबंधित असलेले कर्तव्य पार पाडत असेल, किंवा एक विधानमंडळ सदस्य म्हणून तो पार पाडत असलेल्या भूमिकेशी, कर्तव्यांशी व कार्यवाहीशी त्याचा त्या प्रकरणात निकटचा संबंध असेल आणि त्यामध्ये प्रत्यक्ष अडथळा निर्माण होऊन तो विधानमंडळ सभागृहाच्या कार्यवाहीतील त्याचे सदस्य म्हणून असलेले मूळ कर्तव्य पार पाडू शकला नसेल तरच सभागृहाच्या विशेषाधिकारांचे उल्लंघन होऊन विशेषाधिकार भंग व अवमानाची बाब निर्माण होऊ शकते.

(८३) भारतीय संविधानातील विशेषाधिकार संदर्भातील अन्य तरतुदी :—

अनुच्छेद १९४. विधानमंडळाची सभागृहे आणि त्यांचे सदस्य व समित्या यांचे अधिकार, विशेषाधिकार इत्यादी :—या संविधानाच्या तरतुदी आणि विधानमंडळाच्या कार्यपद्धतीचे विनियमन करणारे नियम व स्थायी आदेश यांना अधीन राहून, प्रत्येक राज्याच्या विधानमंडळास भाषणस्वातंत्र्य असेल.

अनुच्छेद २०८. कार्यपद्धतीचे नियम :—या संविधानाच्या तरतुदींना अधीन राहून, राज्य विधानमंडळाच्या सभागृहास, आपली कार्यपद्धती आणि आपले कामकाज चालविणे यांचे विनियमन करण्याकरता नियम करता येतील.

अनुच्छेद २१२. न्यायालयांनी विधानमंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी न करणे :—

(१) कार्यपद्धतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरून राज्य विधानमंडळातील कोणत्याही कामकाजाची विधिग्राह्यता प्रश्नास्पद करता येणार नाही.

(२) राज्य विधानमंडळातील कार्यपद्धतीचे किंवा कामकाजचालनाचे विनियमन करण्याचे, अथवा विधानमंडळात सुव्यवस्था राखण्याचे अधिकार या संविधानाद्वारे किंवा तदन्वये ज्याच्या ठायी निहित करण्यात आले आहेत अशा, विधानमंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा सदस्याने त्या अधिकारांच्या केलेल्या वापराबाबत, तो कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणार नाही.

(८४) विविध अधिनियम व नियमांमधील तरतुदी :—

विविध अधिनियम व नियमांमधील विशेषाधिकारांच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे तरतुदी आहेत :—

(१) सत्रकाळात तसेच सत्र सुरु होण्यापूर्वी ४० दिवस व सत्र समाप्तीनंतर ४० दिवस सदस्यांना दिवाणी प्रकरणांमध्ये [Civil Cases] अटक करता येत नाही [Civil Procedure Code-section 135-A].

(२) सभागृहाच्या कार्यवाही वृत्तांचा मूलतः वस्तुनिष्ठ वृत्तांत प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीस दिवाणी वा फौजदारी कारवाईपासून संरक्षण [Parliamentary proceedings Protection Act, 1956, section 3].

सभागृहाच्या नियमांमध्ये नमूद करण्यात आलेले विशेषाधिकार हे खालीलप्रमाणे आहेत :—

(अ) सदस्यांना करण्यात आलेल्या अटक, अटकाव, स्थानबद्धता आणि सुटका इत्यादीबाबतची माहिती सभागृहाला ताबडतोब मिळण्याचा हक्क. [महाराष्ट्र विधानसभा नियम २८५-२८६].

(ब) अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात कोणत्याही प्रकारे अटक करण्यात येणार नाही. [नियम २८८]

(क) अध्यक्षांची परवानगी मिळाल्याशिवाय सभागृहाच्या आवारात फौजदारी स्वरूपाची किंवा दिवाणी स्वरूपाची अशी कोणतीही वैध आदेशिका बजावण्यात येणार नाही. [नियम २८९]

(ड) अध्यक्षांची आगाऊ परवानगी मिळाल्याशिवाय, कोणताही सदस्य सभागृहापुढील किंवा सभागृहाच्या कोणत्याही समितीपुढील कोणत्याही कामकाजासंबंधीचा कोणताही पुरावा कोणत्याही न्यायालयापुढे किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्यापुढे देणार नाही. [नियम ३१५ (३)].

(इ) सभागृहाच्या परवानगीशिवाय सभागृहाचे सदस्य किंवा अधिकारी हे दुसऱ्या सभागृहापुढे किंवा त्या सभागृहाच्या समितीपुढे अथवा इतर राज्याचे विधीमंडळ किंवा अशा विधीमंडळाच्या समितीपुढे साक्ष देण्यासाठी साक्षीदार म्हणून हजर राहू शकत नाहीत. तसेच अशी साक्ष देण्यासाठी सदस्यांची स्वतःची संमती असणेदेखील आवश्यक असते.

उपरोक्तप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या विशेषाधिकार आणि उन्मुक्ती या व्यतिरिक्त सभागृहास आपल्या विशेषाधिकारांचे आणि उन्मुक्तींचे संरक्षण करण्याकरिता खालीलप्रमाणे अधिकार आहेत :—

(१) सभागृहाचे विशेषाधिकार भंग किंवा अवमान प्रकरणी कोणत्याही व्यक्तीला ताब्यात घेणे मग ती व्यक्ती सभागृहाचे सदस्य असो अथवा नसो.

(२) साक्षीसाठी हजर रहाण्यास भाग पाडणे, तसेच संबंधित कागदपत्रे, माहिती देण्यास भाग पाडणे.

(३) सभागृहास आपली कार्यपद्धती आणि कामकाज-चालन यांचे विनियमन करण्याकरिता नियम तयार करणे.

(४) सभागृहाचे कामकाज, चर्चेचा वृत्तांत प्रकाशित करण्यावर बंधन.

(५) अनोळखी, अनाहूत व्यक्तीस सभागृहात येऊ देण्यास प्रतिबंध करणे.

(८५) विशेषाधिकार भंग :—

विशेषाधिकार म्हणून उपलब्ध असलेल्या वैयक्तिकरित्या सदस्यांच्या आणि सामुदायिकरित्या सभागृहाच्या कोणत्याही विशेषाधिकाराचा आणि उन्मुक्तीचा मान राखण्यात येत नाही किंवा त्यावर टीका करण्यात येते अशी कोणतीही बाब की, जी सभागृहाला, समितीला किंवा सदस्यांना त्यांचे कार्य निर्भिडपणे, त्वरेने व परिणामकारकपणे बजावताना किंवा करताना आडकाठी, अडथळा किंवा अडवणूक करते ती बाब म्हणजे विशेषाधिकार भंग होय.

म्हणूनच एखाद्या सदस्याला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यास प्रतिबंध करणे किंवा सदस्यांना सभागृहात वा सभागृहाच्या समितीच्या कामकाजात सहभागी होता येणार नाही अशी परिस्थिती निर्माण करणे वा तसा प्रयत्न करणे ही विशेषाधिकार भंगाची बाब ठरू शकते. तसेच एखाद्या सदस्याला सभागृहातील कार्यवाहीवर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम साधण्यास प्रवृत्त करण्यासाठी प्रलोभन दाखविणे किंवा अवैध लाभ प्राप्त करून देणे ही बाबसुद्धा विशेषाधिकार भंगाची व अवमानाची ठरू शकते. (विधानसभा सदस्यांना निलंबित केल्याबाबत सन १९६४ पासूनची सांख्यिकीय माहिती **परिशिष्ट क्रमांक-२२** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

(८६) सभागृहाचा अवमान :—

विधानमंडळाची दोन्ही सभागृहे, त्यांचे सदस्य, वा त्यांच्या समित्या व त्यांचे अधिकारी यांना आपली कार्ये आणि कर्तव्ये परिणामकारकपणे आणि दक्षतेने पार पाडण्यात प्रतिबंध करण्याची वा अडथळा आणण्याची कोणतीही कृती वा अकृती किंवा सभागृह, त्याचे सदस्य वा समित्या यांची प्रतिष्ठा व सन्मान यांना क्षती पोहचविणारी कृती वा अकृती सभागृहाचा अवमान म्हटली जाते. विशेषाधिकार भंग आणि सभागृहाचा अवमान यांतील फरक सूक्ष्म आहे. सर्वसाधारणपणे, विशेषाधिकराचा भंग हा सभागृहाचा अवमान ठरू शकतो. त्याचप्रमाणे सभागृहाच्या अवमानात विशेषाधिकाराचा भंग असेलच असे नाही. तरीही, 'सभागृहाचा अवमान' या संकल्पनेची व्याप्ती मोठी आहे. कदाचित, कोणत्याही विशेषाधिकाराचा भंग न होताही सभागृहाचा अवमान होऊ शकतो.

(८७) विशेषाधिकाराचे प्रश्न :—

महाराष्ट्र विधानसभा नियम २७३ ह्या नियमाच्या अधीन राहून सदस्याला अध्यक्षांच्या संमतीने ज्यात सदस्यांच्या किंवा सभागृहाच्या किंवा सभागृहाच्या एखाद्या समितीच्या विशेषाधिकाराचा भंग अंतर्भूत असेल असा प्रश्न विशेषाधिकार भंग प्रस्तावाद्वारे उपस्थित करता येतो. **सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर सदस्याने विशेषाधिकार भंग प्रस्तावाच्या लेखी सूचनांच्या तीन प्रती विधिमंडळ सचिवांकडे दिल्या पाहिजेत.**

सदस्यांस पुढील निर्बंधाच्या अधीन राहून विशेषाधिकार भंगाचा प्रश्न उपस्थित करता येईल :-

(१) एका बैठकीत एकापेक्षा अधिक प्रश्न उपस्थित करण्यात येणार नाहीत.

(२) असा प्रश्न नुकत्याच घडलेल्या विशिष्ट बाबीपुरताच मर्यादित असेल.

अध्यक्षांनी विशेषाधिकाराचा प्रश्न म्हणून बाब सभागृहात उपस्थित करण्याची संमती दिल्यावर ज्या सदस्यांनी नोटीस दिली असेल त्यांनी विशेषाधिकार भंगाचा प्रश्न उपस्थित करण्यासाठी सभागृहाची अनुमती मागताना संबंधित सदस्यांना विशेषाधिकार भंगाच्या प्रश्नासंबंधी थोडक्यात निवेदन करण्याची परवानगी दिली जाते. अशी अनुमती देण्यास हरकत घेण्यात आली तर अध्यक्ष, जे सदस्य अनुमती देण्यास अनुकूल असतील अशा सदस्यांना उभे राहण्याची विनंती करतात. २० किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य उभे राहिल्यास सभागृहाने विशेषाधिकार भंगाची बाब उपस्थित करण्यास अनुमती दिली आहे असे समजून अध्यक्ष, अनुमती असल्याची घोषणा करतात अन्यथा अध्यक्ष बाब उपस्थित करण्यास परवानगी नाही असे सदस्यांना कळवितात.

सभागृहाने परवानगी दिल्यानंतर अध्यक्ष, उक्त प्रश्न विधानसभा विशेषाधिकार समितीकडे किंवा निर्णयासाठी सभागृहाकडे सोपवितात. अध्यक्ष, प्रश्न; समितीकडे सोपविताना अहवाल सादर करण्यासाठी कालावधी ठरवून देतात. प्रथेनुसार समितीला अहवाल पुढील अधिवेशनात सादर करण्याचा निदेश देण्यात येतो. काही वेळा असा

निर्णय घेण्यापूर्वी अध्यक्ष असे सांगू शकतात की, बाब विधानसभा विशेषाधिकार समितीकडे सोपविण्यापूर्वी ते विवक्षित मुद्यांवर संबंधितांकडून खुलासा मागवू इच्छितात व असा खुलासा आल्यावर तो विचारात घेऊन बाब विशेषाधिकार समितीकडे अहवाल सादर करण्यासाठी सोपवावी किंवा नाही याचा निर्णय घेण्यात येतो.

(८८) सदस्यांना अटक, स्थानबद्धता, सुटका इत्यादी :—

विधानमंडळाच्या सदस्यांना अटक झाल्यास अथवा त्यांना स्थानबद्ध करण्यात आल्यास किंवा अटकाव करण्यात आल्यास त्याबद्दलची घोषणा अधिवेशन कालावधीत सभागृहात करण्यात येते. अधिवेशन सुरू नसल्यास म्हणजेच नि:सत्र कालावधीत ही माहिती पत्रक भाग दोनद्वारे सर्व सदस्यांना कळविण्यात येते.

अटक झालेल्या, स्थानबद्ध, अटकाव तसेच सुटका करण्यात आलेल्या सदस्यांविषयी आवश्यक ती माहिती विधानसभा नियमातील अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये संबंधितांना तात्काळ संबंधित पीठासीन अधिकाऱ्यांना कळवावी लागते.

(८९) सभागृहाचे विशेषाधिकार व फौजदारी कार्यवाही :—

सर आर्स्किन मे यांनी त्यांच्या 'पार्लमेंटरी प्रॅक्टीस' (Erskine May : Parliamentary Practice) या ग्रंथात (१५ वी आवृत्ती, १९५०, पृ. ७८) तसेच विशेषाधिकारांसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध न्यायनिर्णयांच्या अधीनतेने असे स्पष्ट होते की, दिनांक २६ जानेवारी, १९५० रोजी भारतीय संविधान अस्तित्वात आल्यावर ब्रिटिश पार्लमेंटला जे विशेषाधिकार होते तेच भारतीय संसद व विधानमंडळाची सभागृहे व त्यांच्या सदस्यांना प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने ब्रिटिश पार्लमेंटला एखादी फौजदारी स्वरूपाची चौकशी थांबविण्याचा वा फौजदारी प्रकरणातील अटकेपासून संरक्षणाचा वा फौजदारी प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करण्याचा विशेषाधिकार प्राप्त झालेला नाही. त्याच धर्तीवर भारतीय संसद व विधानमंडळाच्या सभागृहांना वा सदस्यांना फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये, प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेमध्ये तसेच फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यामध्ये अटकेपासून संरक्षणासाठी सभागृहाच्या विशेषाधिकाराचा वापर करता येणार नाही हे तत्त्व सुप्रस्थापित झाले आहे.

*****

प्रकरण आठवे

समिती पद्धती (Committee System)

(९०) समिती पद्धती (Committee System) :—

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार संसदीय शासनपद्धती आपण स्वीकारली आहे. संसदीय शासन प्रणालीचे तीन अंगे आहेत. (Institutional Components)

(१) विधिमंडळ (Legislature)

(२) कार्यकारी मंडळ (Executive)

(३) न्यायमंडळ (Judiciary)

या मंडळाची कामे खालीलप्रमाणे आहेत :-

लोकशाही राज्य व्यवस्थेत जनता ही सार्वभौम असते. (Will of the People is Supreme) आणि जनतेच्या मताचे प्रतिबिंब लोकनियुक्त विधानमंडळात पडते. अतः सार्वभौम अशा जनतेच्या आशाआकांक्षा फलद्रूप करण्याच्या उद्देशाने व प्रशासन चालविण्यासाठी जनकल्याणार्थ असे कायदे करण्याचे काम विधीमंडळाकडे सोपविले आहे. कायद्याची म्हणजेच अधिनियमाची अंमलबजावणी कार्यकारी मंडळ करते व त्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपविली आहे. शासनाच्या तीन अंगापैकी विधिमंडळाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे.

संसदीय शासन प्रणालीमध्ये (Parliamentary form of Government) कार्यकारी प्रशासन म्हणजेच मंत्रीमंडळ (Council of Ministers) हे विधीमंडळास जबाबदार असते (Responsible to the Legislature) व ते संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वाने कार्य करते (Principal of Collective Responsibility). यासाठी विधीमंडळाला कार्यकारी मंडळाच्या कामावर नियंत्रण ठेवावे लागते. अशा प्रकारचे नियंत्रण वैधानिक (Legislative) आर्थिक (Financial) व टीकात्मक (Critical) या माध्यमातून ठेवले जाते, ही कार्ये पार पाडण्यासाठी विधानमंडळ सदस्यांना विविध संसदीय आयुधांचा वापर करावा लागतो.

भारताने आपल्या संविधानानुसार संसदीय लोकशाहीचा व शासनासाठी जबाबदार मंत्रीमंडळ पद्धतीचा अवलंब केला आहे (Responsible Cabinet System) प्रशासनातील सर्व महत्त्वाच्या बाबी विधानमंडळात चर्चेसाठी याव्यात यासाठी संविधानात तरतुदी केल्या आहेत. तसेच विधीमंडळाच्या सभागृहाच्या कार्यपद्धतीविषयक नियमानुसार सभागृहाचे कामकाज चालते. संविधानानुसार अर्थसंकल्प विधिमंडळाच्या सभागृहांना सादर करावा लागतो. विधीमंडळाच्या संमतीशिवाय शासनाला कोणताही कर बसविता येत नाही अगर कोणतीही रक्कम खर्च करता येत नाही. शासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर चर्चा करताना निरनिराळ्या विभागांच्या कारभारावर टीका करता येते. तसेच स्थगन प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे इत्यादी संसदीय आयुधांद्वारे शासनावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विधीमंडळ पार पाडीत असते. याशिवाय राज्य शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळ समित्या नियुक्त करण्यात येतात. या समित्या म्हणजे विधीमंडळाचे दोन चक्षू व एक लगाम आहेत.

संसद ही जनतेच्या आशा-आकांक्षा साकार करीत असते. म्हणून सार्वजनिक धोरण जनतेच्या आशा-आकांक्षानुरूप राबविले जाते किंवा नाही या दृष्टीने त्यावर देखरेख ठेवण्यास संसद समर्थ असणे जरुरीचे आहे. तथापि, राज्याच्या सध्याच्या कामकाजाच्या विस्तारित आणि गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे संसद किंवा विधानमंडळ प्रशासनाची छाननी परिणामकारक रितीने करू शकत नाही किंवा त्यांच्यापुढे येणाऱ्या, गुंतागुंतीच्या, प्रशासकीय, वैधानिक आणि शासकीय समस्यांसाठी पुरेसा वेळ व लक्ष देऊ शकत नाही. सभागृहापुढे कामकाजासाठी उपलब्ध असलेला कालावधी मर्यादित असतो आणि त्यातील बराचसा वेळ विधी विधानविषयक प्रस्ताव विचारात घेण्यात किंवा कार्यसूचीपत्रिकेवरील नेहमीच्या बाबी निकालात काढण्यात खर्च होतो. विधानमंडळासमोर येणारी शासनाची पुष्कळशी वित्तीय आणि अन्वेषक स्वरूपाची कामे तांत्रिक स्वरूपाची असल्याने त्यावर अर्थपूर्ण रीतीने व परिणामकारकपणे चर्चा आणि विचार करणे संपूर्ण सभागृहाला कठीण जाते. विधीविधान, अशासकीय सदस्यांची विधेयके यासह संसदीय कामकाजाचा बराचसा भाग तसेच शिक्षण, समाजकल्याण आणि आरोग्य इत्यादी बाबींवरील चर्चादेखील व्यवस्थितरित्या पार पाडणे शक्य होत नाही त्यामुळे उपयुक्त पर्याय म्हणून समिती पद्धतीचा अंगीकार विधीमंडळात करण्यात येतो.

समिती पद्धतीचा हेतू हा आहे की, प्रशासनाच्या गुंतागुंतीच्या व तांत्रिक स्वरूपांच्या बाबींचा विचार करण्याची जबाबदारी सभागृहातील ठराविक सदस्यांवर (न्यूक्लिअस) सोपविण्यात यावी व त्यायोगे समितीचा संसदीय आयुध वा सभागृहाच्या हातचे साधन म्हणून वापर करावा. सर्व लोकशाही राज्यामध्ये समिती पद्धत सारखीच असली तरी वेगवेगळ्या देशात या पद्धतीची रचना वेगवेगळी असल्याचे दिसून येते. तथापि, त्यामध्ये एक समान वैशिष्ट्य असे आहे की, समित्या ह्या विधानमंडळाची निर्मिती असून त्या साहजिकच विधानमंडळास दुय्यम असतात. समित्यांना सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त होतात (They derive authority from the Legislature) या समित्यांनाच "Mini Legislature' सभागृहाची छोटी प्रतिकृती असे संबोधले जाते. सदर समित्या विधानमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत काम करतात आणि आपले अहवाल विधानमंडळाला सादर करतात.

संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये समिती पद्धती निर्माण करण्यास जे घटक कारणीभूत ठरले त्यापैकी काही घटक खालीलप्रमाणे आहेत :—

(१) विधानमंडळ सभागृहाच्या सदस्यांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांना कुठलेही प्रकरण मुद्देसूद आणि सखोल छाननी करून तपासणे कठीण असते.

(२) सभागृहातील चर्चेवर बहुधा पक्षीय राजकारणाचा प्रभाव असतो. याउलट समितीला, राजकारण आड येऊ न देता पक्षविरहित पद्धतीने आपले काम पार पाडणे शक्य होते.

(३) समितीमध्ये सर्वसाधारण गुणवत्तेच्या आधारावर निष्कर्ष काढले जातात त्यामुळे समिती स्थापन करण्याचा उद्देश अधिक चांगल्याप्रकारे साध्य होतो.

(४) समित्यांकडे सोपविलेल्या निरनिराळ्या विषयांचे परीक्षण करताना विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेणे शक्य होते. तथापि, सभागृहास तसे करणे शक्य नसते.

(५) समित्यांना प्राप्त झालेल्या विस्तृत माहितीचा अभ्यास करण्याची संधी याद्वारे प्राप्त होते आणि शासनाचा कारभार आणि समस्या यातील गुंतागुंतीची माहिती करून घेणे सदस्यांना शक्य होते. विविध

विषयांवरील कागदपत्रांचा अभ्यास आणि शासनाच्या प्रतिनिधींची तपासणी केल्यानंतर सदस्यांना जनतेच्या गाऱ्हाण्यासंबंधात सुधारात्मक उपाययोजना शोधून काढणे आणि प्रशासनात सुधारणा घडविण्यासाठी मार्ग सुचविणे सुकर होते.

(६) सभागृहाच्या तुलनेत समितीला प्रशासनाच्या विविध विषयांचा अभ्यास करण्यासाठी आणि गुणदोषांचे सम्यकदृष्टीने मूल्यमापन करण्यासाठी भरपूर वेळ असतो, आणि

(७) सदस्यांचा जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी सतत संपर्क येतो. परिणामी सदस्यांना लोकांच्या अडचणी आणि गाऱ्हाणी चांगल्या रीतीने माहिती असतात. त्यामुळे अशा अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने त्या शासनाच्या प्रतिनिधीकडे ते योग्य रीतीने मांडू शकतात.

समित्या पक्षविरहित पद्धतीने काम करतात. त्यामुळे त्यांच्याकडे आलेल्या बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात. याच कारणांसाठी अहवालाला भिन्न मतपत्रिका जोडण्याची मुभा देण्यात येत नाही. समित्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली कामकाज करतात, साक्षीदारांना बोलाविण्याचा आणि त्यांची तपासणी करण्याचा समित्यांना हक्क आहे. समित्या शासनाकडून कोणतीही माहिती, दस्तऐवज, कागदपत्रे इत्यादी मागवू शकतात. समितीचे कामकाज गोपनीय असते. त्यामुळे कामकाजाचा तपशील प्रसिद्धीकरिता देता येत नाही. समिती किंवा समितीच्या उप समित्यांसमोर सादर करण्यात आलेली कागदपत्रे, समितीपुढे देण्यात आलेला साक्षीपुरावा किंवा कामकाजाच्या वेळी त्यांच्या बैठकींमध्ये झालेली चर्चा प्रसिद्ध करता येत नाही. अशासकीय सदस्य हा नेहमी समिती प्रमुख असतो आणि तो अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित केला जातो. लोकलेखा समितीचा समिती प्रमुख हा संकेतानुसार विरोधी पक्षाचा असतो. सर्वसाधारणपणे मंत्री विधानमंडळ समित्यांचे सदस्य नसतात. समित्यांच्या रचनेचे घटक म्हणून अनेक प्रकारच्या समित्यांचे वर्गीकरण केले जाऊ शकते. पीठासीन अधिकाऱ्यांकडून स्थायी समित्या (Standing Committee), वैधानिक समित्या (Statutory Committee), प्रवर समित्या (Select Committee), संयुक्त समित्या (Joint Committee of both Houses - JPC) आणि तदर्थ समित्या (*Ad-Hoc* Committee) वेळोवेळी नामनिर्देशित केल्या जातात. वित्तीय समित्या (लोकलेखा समिती, अंदाज समिती व सार्वजनिक उपक्रम समिती) कार्यपद्धतीविषयक समित्या, (नियम व कामकाज सल्लागार समिती), विशेष हक्क समिती, सुखसोयी समिती, (आवास व सदस्यांचे वेतन व भत्ते) दक्षता समिती, (प्रत्यायोजित विधिविधान आश्वासन समिती), महिलांचे हक्क व कल्याण समिती (महिला व बालकल्याण विषयक समिती) इत्यादी वेगवेगळया विषयासंबंधीच्या समित्या देखील आहेत.

ह्या समित्यांना संसद/विधानमंडळ सचिवालयाकडून सचिवालयीन सहाय्य पुरविले जाते. संसदेच्या काही समित्यांची प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पद्धतीनुसार निवड केली जाते. तर उर्वरित समित्या अध्यक्ष/सभापती यांच्याकडून नामनियुक्त केल्या जातात.

स्टॅफोर्ड क्रीप्स यांच्या मते, समिती पद्धतीची कार्यक्षमता खालील बाबींवर अवलंबून असते :—

(१) संबंधित विषयामध्ये खरी आस्था दाखवून काम करण्याची तयारी असणाऱ्या सर्व पक्षांच्या पुरेशा सदस्यांना समितीत एकत्र आणणे.

(२) विषयाचे गाढे आणि विस्तृत ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीकोनातून सदस्यांचे सदस्यत्व व त्यांची उपस्थिती याबाबतच्या सातत्याची खात्री करणे.

(३) उत्तम असे उत्कृष्ट प्रशासन निर्माण करण्याची अपेक्षा ठेवून समित्यांमध्ये सामुहिक प्रयत्नाचे वातावरण तयार करणे.

उपरोक्त पद्धतीनुसार समिती पद्धत अधिक परिणामकारक होण्यासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे :—

(अ) समित्या गठीत करताना ज्या सदस्यांना कायद्याचे पुरेसे ज्ञान आहे अशा सदस्यांना उपविधान समितीवर नेमण्यात यावे आणि ज्या सदस्यांची स्वाभाविक प्रवृत्ती अर्थशास्त्राकडे असून त्यामध्ये त्यांना विशेष रस आहे अशा सदस्यांना वित्तीय समित्यांवर नेमण्यात यावे. ज्या सदस्यांना स्थानिक किंवा नगरपालिकेच्या ग्रामपंचायतीच्या कार्यामध्ये पुरेशी आस्था आहे अशा सदस्यांना पंचायती राज समितीसारख्या समितीवर नेमण्यात यावे. समाजशास्त्र, महिला आणि बालकल्याण या विषयात ज्यांना रस आहे. विशेषतः महिला सदस्यांना महिलांचे व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीवर नेमण्यात यावे. अशाप्रकारे विशिष्ट समितीवर योग्य सदस्य नेमणे ही त्या समितीचे कार्य परिणामकारक रितीने चालण्यासाठी अत्यावश्यक बाब आहे.

(ब) शासकीय विभागांनी आवश्यक ती कागदपत्रे योग्य त्या नमुन्यात आणि नियत वेळेत पाठविण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी अशी कागदपत्रे विषयसूची किंवा पृष्ठ क्रमांक देऊन योग्य त्या क्रमाने लावण्यात यावीत आणि ती वाचण्याजोगी असावीत.

(क) अनेकदा सदस्य समितीच्या बैठकीला तयारी न करताच उपस्थित राहतात आणि समितीचे काम घाईघाईने संपवून त्यांच्या मतदार संघातील कामासाठी मंत्रालयात जाण्यास उत्सुक असतात ही गोष्ट समिती पद्धतीच्या मूळ संकल्पनेच्या विरुद्ध आहे. म्हणून समिती पद्धतीच्या परिणामकारक कामकाजासाठी सदस्यांचा समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग असणे जरुरीचे आहे.

(ड) समितीने एक एक प्रश्न हाती घ्यावा जेणेकरून प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा करता येईल, तसेच सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन करावे. एका सदस्यांना त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची सवय जोपासली पाहिजे. समिती प्रमुखाने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालवावे.

(ई) समितीने त्यांचेकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करावेत आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करावे. विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणीवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक असला पाहिजे. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने सुधारणात्मक उपाय सुचवावेत, मागील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठीदेखील समिती उपाययोजना सुचवू शकते. शासनाच्या प्रतिनिधी प्रति सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील असावे. तथापि, कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यास, समितीने त्यांचेविरुद्ध कारवाई सुचवावी.

समितीची बैठक बोलाविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलाविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्यांच्या बाबतीत असे आढळून आले आहे की, साक्षीदारांना अगदी अल्पावधीची नोटीस देऊन बोलाविण्यात येते आणि म्हणून त्यांना तपासणीसंबंधी तयारी करण्यास पुरेसा अवधी मिळत नाही म्हणून साक्षीदारांना पुरेशी आगाऊ नोटीस देणे आवश्यक आहे, जेणेकरून ते चांगली तयारी करून समितीपुढे येऊ शकतील.

विधानमंडळाच्या सदस्यांना जे विशेषाधिकार प्राप्त झाले आहेत तसे अधिकार विधानमंडळाचे अधिकारी यांनादेखील आपले कर्तव्य बजावित असताना प्राप्त होतात. म्हणून समितीच्या सदस्यांनी समितीचे अधिकारी किंवा कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावित असतांना अडथळा आणू नये. अधिकारी व कर्मचारी यांचेबरोबर काम करतांना सदस्यांनी कोणत्याही प्रकारचे अप्रिय वातावरण निर्माण करु नये. कार्यपद्धतीविषयक नियमांनुसार समित्यांना राज्यात आणि कधी कधी राज्याबाहेरदेखील अभ्यासदौरे करण्यासाठी परवानगी दिली जाते. संबंधित माहिती घेणे आवश्यक असेल तर माहितीसाठी सविस्तर अभ्यासदौरा नियोजित करावा आणि याबाबत सविस्तर अभ्यास केल्यानंतर साक्षीदाराच्या तपासणीसाठी मुद्दे तयार केले जावेत. समिती आपले विचार व्यक्त करु शकते व अहवालाच्या स्वरूपात शिफारशी करु शकते. परंतु एखादी विशिष्ट कृती करावी किंवा करु नये किंवा विवक्षित कृती विशिष्ट पद्धतीने करावी असा आदेश शासनाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला समिती देऊ शकत नाही. समितीने दौऱ्याच्या कालावधीत अशा प्रकारची काळजी घेणे आवश्यक असते.

(९१) महाराष्ट्र विधानमंडळाच्या तद्‌र्थ समित्या (*Ad-hoc* Committees) **:—**

सभागृहात उपस्थित झालेल्या एखाद्या विषयाच्या संदर्भात विधीमंडळाच्या सदस्यांच्या समितीमार्फत चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सभागृहास विहीत कालावधीत सादर करण्याबाबतचा प्रस्ताव संमत करून ज्या समित्या गठीत करण्यात येतात त्या समित्यांना **'तदर्थ समित्या'** असे म्हणतात. सदर प्रस्तावात तदर्थ समितीवर नियुक्त करावयाच्या सदस्यांची नांवे, समितीची कार्यकक्षा व कार्यकाल इत्यादी बाबी अंतर्भूत करण्यात येतात. महाराष्ट्र विधानमंडळात दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावानुसार खालील तदर्थ समित्या नियुक्त करण्यात आलेल्या आहेत.

तद्‌र्थ समितीचे विषय

(१) ठाणे जिल्ह्यातील गवत एका अधिकार खरेदी चौकशी समिती

(२) डोर्ली (जि.नांदेड) येथील एस.टी. अपघात चौकशी समिती

(३) जवाहर रोजगार योजना चौकशी समिती

(४) भटक्या जमातीच्या मुलांच्या आश्रमशाळांची चौकशी समिती

(५) आदिवासी क्षेत्रातील तूरडाळ एकाअधिकार खरेदी चौकशी समिती

(६) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या अंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात शुश्रूषालय, प्रसूतिगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो.) शासनातर्फे देण्यात आलेली मदत, सूट, माफी इत्यादी आणि या रुग्णालयामार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादीसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठीत करण्यात

आलेली समिती

(७) सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी व इतर विषयांच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका या संदर्भात गठीत केलेली समिती

(८) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यात यावे या संदर्भातील समिती.

सदर समित्यांनी विहित कालावधीत त्यांचेकडे सोपविलेल्या विषयांबाबतचे अहवाल दोन्ही सभागृहांत सादर केलेले आहेत.

बर्डी, ता.अक्कलकुंवा, जि.धुळे येथील शासकीय आश्रमशाळेमध्ये आदिवासी मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची चौकशी करण्यासाठी मा. महिला व बालविकास राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहांच्या महिला सदस्यांच्या नियुक्त केलेल्या तदर्थ समितीने आपल्या दोन वर्षांच्या कालावधीत दोन्ही सभागृहांना दोन अहवाल सादर केले आहेत. सदर समितीची मुदत दहाव्या विधानसभेच्या मुदतीपर्यंत वाढविण्यात आली होती.

राज्यात कांद्याचे भाव घसरणे, रेल्वे वॅगन उपलब्ध न होणे, कांदा निर्यातबंदी उठविणे इत्यादी विषयाबाबत मा. पणन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विधानसभेच्या ९ सदस्यांची **'विधानसभा कांदा तदर्थ समिती'** नियुक्त केली होती. सदर तद्र्थ समितीने राज्य शासनाच्या कक्षेतील मुद्यांबाबत अंतरिम अहवाल (Interim Report) विधानसभा सभागृहाला दिनांक २५ जुलै, २००३ रोजी सादर केला आणि केंद्र शासनाच्या कक्षेतील मुद्यांबाबतचा अंतिम अहवाल (Final Report) विधानसभा सभागृहाला दिनांक ८ डिसेंबर, २००३ रोजी सादर केला.

माजी सैनिकांच्या विविध प्रश्नासंदर्भात विचारविनिमय करून शिफारशी करण्यासाठी फक्त महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांची **'माजी सैनिकांच्या कल्याणासाठी तद्र्थ समिती'** विधानपरिषद सभागृहाने दिनांक १७ डिसेंबर, २००३ रोजी प्रस्ताव संमत करून नियुक्त केली आहे. सभागृहास अहवाल सादर करण्यासाठी सदर तद्र्थ समितीने आपला कार्यकाल विधानपरिषद सभागृहाकडून वाढवून घेतला होता. सदर तद्र्थ समितीने राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना सुचविण्याच्या संदर्भात नेमलेल्या माजी सैनिकांचे कल्याण तद्र्थ समितीचा अंतिम अहवाल दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी विधानपरिषद सभागृहास सादर करण्यात आला.

आरे दुग्ध वसाहतीमधील जागेचा भाडेपट्टा करार संपुष्टात येऊनही शासनाने जागा ताब्यात न घेणे या संदर्भात नेमलेल्या समितीने दिनांक १ ऑगस्ट, २००७ रोजी विधानसभा सभागृहास सादर केला.

अध्यापक शिक्षण पदविकेतील आंतरवासिता अमलबजावणी संबंधात संभाव्य त्रुटी व त्या दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या तद्र्थ समितीने दिनांक २६ जुलै, २००८ रोजी विधानसभा सभागृहास अहवाल सादर केला.

चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यात यावे या संदर्भात नेमलेल्या तद्र्थ समितीने दिनांक १६ जून, २००९ रोजी विधानसभा सभागृहास अहवाल सादर केला.

*****

प्रकरण नववे

विधानमंडळ समित्या

(९२) विधानमंडळ समित्या :-

(अ) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या

(१) अंदाज समिती

(२) लोकलेखा समिती

(३) सार्वजनिक उपक्रम समिती

(४) पंचायत राज समिती

(५) रोजगार हमी योजना समिती

(६) उपविधान समिती

(७) अनुसूचित जाती कल्याण समिती

(८) अनुसूचित जमाती कल्याण समिती

(९) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

(१०) महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

(११) इतर मागासवर्ग कल्याण समिती

(१२) अल्पसंख्यांक कल्याण समिती

(१३) मराठी भाषा समिती

(ब) विधानसभेच्या समित्या

(१४) कामकाज सल्लागार समिती.

(१५) विशेषाधिकार समिती.

(१६) विनंती अर्ज समिती.

(१७) आश्वासन समिती.

(१८) नियम समिती.

(१९) सदस्य अनुपस्थिती समिती.

(२०) अशासकीय विधेयके व ठराव समिती.

(क) विधानपरिषदेच्या समित्या

(२१) कामकाज सल्लागार समिती.

(२२) विशेषाधिकार समिती.

(२३) विनंती अर्ज समिती.

(२४) आश्वासन समिती.

(२५) नियम समिती.

(२६) सदस्य अनुपस्थिती समिती.

(२७) अशासकीय विधेयके व ठराव समिती.

(ड) अधिनियमानुसार संयुक्त समित्या

(२८) सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत संयुक्त समिती.

(२९) विधानमंडळाच्या माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत संयुक्त समिती.

(ई) तद्‌र्थ स्वतंत्र समित्या

(३०) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तद्‌र्थ समिती (विधानसभा)

(३१) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तद्‌र्थ समिती (विधानपरिषद)

(३२) राज्यातील कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याबाबत तद्‌र्थ समिती (विधानपरिषद)

(३३) राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत तद्‌र्थ समिती (विधानसभा)

(फ) तद्‌र्थ संयुक्त समित्या

(३४) ग्रंथालय समिती.

(३५) आमदार निवास व्यवस्था समिती.

(३६) आहार व्यवस्था समिती.

(३७) "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील समिती

(३८) महाराष्ट्र विधिमंडळ 'एड्स' चर्चापीठ (Maharashtra Legislature's Forum on AIDS)

(३९) वातावरणीय बदलासंदर्भातील संयुक्त तद्‌र्थ समिती

(४०) आमदार निवास येथील निवासव्यवस्था याबाबत उच्चाधिकार समिती

या सर्व समित्यांवरील सदस्य महाराष्ट्र विधिमंडळाचे मा. पीठासीन अधिकारी यांचेकडून सभागृहातील विविध पक्षांच्या सदस्य-संख्येच्या प्रमाणात आणि सभागृहाचे नेते व विरोधी पक्ष/गट प्रमुख यांच्याशी विचारविनिमय करून नामनियुक्त करण्यात येतात. त्यांची मुदत सर्वसाधारणपणे एक वर्षाची किंवा नवीन समिती अस्तित्वात येईपर्यंत असते.

*****

(अ) दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समित्या

(१) अंदाज समिती (Committee on Estimates)

उद्दिष्टे आणि कार्यपद्धती :—

संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाला जागत्या (Watch Dog) **म्हणून** जबाबदारी पार पाडावी लागते. त्या अनुषंगाने **ध्येयधोरणे निश्चित करणे** (to lay down Govt. Policies) **कायदे तयार करणे व प्रशासनावर देखरेख ठेवणे** (to oversee administration) इत्यादी कर्तव्ये पार पाडावी लागतात. आधुनिक युगात **कायदे करण्याची किचकट प्रक्रिया** तसेच शासनाच्या विविध कामकाजाचा **वाढलेला व्याप** (Enormous range and complexity) लक्षात घेता **विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे केवळ अशक्य झाले आहे.** एकीकडे शासन यंत्रणेकडे उक्त किचकट/ प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते तर दुसरीकडे त्याच तोलामोलाची यंत्रणा ही विधानमंडळाकडे नसते. परिणामी **प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी सभागृहात प्रश्नोत्तरे, इत्यादी विविध संसदीय आयुधावरील चर्चा या माध्यमातून तुरळक स्वरूपाची** देखरेख (Spordic supervision) ठेवणेच केवळ विधानमंडळाला शक्य होते. खरे पाहता संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी **सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या संसदीय समित्या निर्माण करून** त्याद्वारा सातत्याने व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे काम समित्यांद्वारा केले जाते. **त्यादृष्टीने समित्यांद्वारा नियंत्रण** (Control through Committees) अशी संकल्पना अस्तित्वात आली व त्यातून भारतात **समिती पद्धत** विकसित झाली. या पद्धतीचे वैशिष्ट्य हे आहे की, **सभागृहात पक्षीय ध्येयधोरणाचा सदस्यांवर प्रभाव** पडतो. तथापि, **समित्यांचे कामकाज पक्ष विरहित तत्त्वावर** (Non party basis) चालत असल्यामुळे समितीसमोरील विषयाचा अभ्यास नि:पक्षपणे, तौलनिक स्वरूपाचा व गुणवत्तेच्या आधारे होतो व विषयाला पूर्णत: न्याय मिळतो. हा समिती पद्धतीचा विशेष फायदा आहे. अशाप्रकारे शासनावर प्रशासकीय व वित्तीय स्वरूपाचे प्रभावी नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने समिती पद्धत विशेष उपयुक्त ठरली आहे.

१९१९ चा भारत शासन कायदा (Govt. of India Act 1919) अंमलात असताना मुंबई प्रांतात १९२८ मध्ये लोकलेखा समितीची स्थापना झाली. लोकलेखा समिती ही कार्यकारी प्रशासनाच्या वित्तीय बाबींवर नियंत्रण ठेवणारी अतिशय महत्त्वाची वित्तीय समिती म्हणून काम करीत होती. तथापि, **अर्थसंकल्पीय तरतुदी खर्च झाल्यानंतर लोकलेखा समितीचे कामकाज त्या अनुषंगाने सुरुवात होत असे.** त्यामुळे अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्यानंतर लगेच अर्थसंकल्पाची छाननी करण्यासाठी एखाद्या समितीची आवश्यकता भासू लागली होती. कारण लोकलेखा समितीचे काम पोस्टमार्टेम समितीसारखेच झाले होते व या समितीच्या तपासणीला मर्यादा पडल्या होत्या. **म्हणून १९५१ साली अंदाज समितीची स्थापना करण्यात आली.** (इंग्लंड मध्ये १९१२ मध्ये हाऊस ऑफ कॉमन्स मधील पारित केलेल्या प्रस्तावानुसार अंदाज समितीचे स्थापना करण्यात आली होती.) या समितीचे मुख्य कामकाज म्हणजे **अर्थसंकल्पीय अंदाज व मागण्या ज्या धोरणावर आधारलेल्या असतील त्या धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे**

उपाय सुचविणे तसेच खर्चाच्या अंदाजाची तपशीलवार छाननी करून शासनाची उद्दिष्टे अत्यंत काटकसरीने व कार्यक्षमरितीने पार पाडली जाण्याची खात्रीलायक तरतूद करण्यासाठी शासनाला शिफारशी करणे असे होते. या समितीचे सचिवालयीन कामकाज सुरुवातीपासूनच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे होते. तथापि, या दोन्ही समितीचे, समिती प्रमुख वित्त मंत्री होते. सुरुवातीला अंदाज समितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित होती. तथापि, राज्य पुनर्रचनेनंतर नियमात व कार्यपद्धतीत बदल करण्यात येऊन या समितीची व्याप्ती वाढविण्यात आली.

अंदाज समिती खर्चाच्या अंदाजाची तपशिलवार छाननी करु शकते व शासनाची उद्दिष्टे अत्यंत काटकसरीने व कार्यक्षमरितीने पार पाडण्यासाठी शिफारस करु शकते. या प्रयोजनासाठी समितीला आवश्यक असलेली कोणतीही माहिती मागविण्याचा अधिकार ठामपणे आहे. समितीच्या या अधिकारावर निश्चितच बंधन घालता येणार नाही. भारतीय राज्य व्यवस्था संघ राज्यात्मक (फेडरल) सिद्धांतावर आधारलेली असून शासनाच्या तीनही अंगाची म्हणजे **कार्यकारी प्रशासन, न्यायपालिका व विधानमंडळ यांचे अधिकार क्षेत्र** घटनेने निश्चित करून दिलेल्या तत्त्वानुसार चालते. कोणतीही संस्था ही घटनेने घालून दिलेल्या सिद्धांताचे उल्लंघन करु शकत नाही. प्रत्येक संस्थेचे अधिकार हे मर्यादित आहेत त्यामुळे विधानमंडळाच्या **समित्यांचे अधिकार हे विधानमंडळाला प्राप्त झालेल्या अधिकारापेक्षा निश्चितच मोठे असू शकत नाहीत.** कारण, या समित्या अधिकाराच्या बाबतीत संपूर्णपणे विधानसभेच्या अधिकारावर अवलंबून असतात. शासनाची ही तीनही अंगे सार्वभौम आहेत. तथापि, घटनेने घालून दिलेल्या बंधनाच्या (Restrictions) पलिकडे त्यांच्या अधिकार कक्षा ते वाढवू शकणार नाहीत. याचा अर्थ असा नव्हे की, विधीमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये **शासन** हे प्रत्येक बाबतीत **विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार** असते आणि **शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण** हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे. तथापि, याबाबत एक बाब स्पष्ट होते की, शासनाला जनतेकडून राज्य करण्याचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर शासन जनतेला आश्वासन दिल्याप्रमाणे योजना राबवित असते. कारण, शेवटी या लोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेचे मत हे सर्वोच्च असे मत म्हणून गणले जाते. त्यामुळे एखादी योजना किंवा एखादे धोरण आर्थिकदृष्ट्या व राज्याच्या साधनसंपत्तीचा विचार करता वर्धनक्षम (व्हायेबल) नसू शकेल अथवा अशी योजना राबविण्यात येऊ नये या संदर्भात प्रशासकीय व्यवस्थेने शासनाला सल्ला दिलेलासुद्धा असेल, तरीसुद्धा असा सल्ला धुडकावून लावून शासन या योजना राबविण्यास संपूर्णपणे सक्षम आहे. कारण, जनतेने त्यांना असा अधिकार मतपेटीच्या माध्यमातून दिलेला आहे त्यामुळे या योजना किंवा एखादे धोरण आखण्यापूर्वी याबाबतीत प्रशासकीय व्यवस्थेने मंत्रिमंडळाला कोणता सल्ला दिलेला आहे, हा विषय समितीने तपासणे तसे आवश्यक दिसत नाही. कारण एखादी योजना किंवा धोरण राबविण्यापूर्वी प्रशासनाने सदर योजनेला कोणत्याही कारणास्तव विरोध केल्यास तसा विरोध डावलूनसुद्धा मंत्रिमंडळाला योजनेबाबत निर्णय घेता येतो. तथापि, याबाबतीत एखादी योजना राबविण्याबाबत मंत्रिमंडळाची चूक झाली आहे व प्रशासनच याबाबतीत बरोबर आहे अशाप्रकारचे अभिप्राय व्यक्त करणे हे संसदीय लोकशाहीच्या सिद्धांताच्या विरुद्ध आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती याप्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना

अगदी अनावश्यक आहे काय? त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दिष्टे साध्य झाली आहे काय? योजना आर्थिकदृष्टया सक्षम नाही काय ? किंवा याउप्पर जाऊनही एखादी योजना आर्थिकदृष्टया सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी. या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करु शकेल व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार असेल. तत्कालीन राष्ट्रपती मा.नारायणन यांनी १९९२ साली संसदेच्या विभाग संलग्न समित्यांचे उद्‌घाटन करताना पुढीलप्रमाणे म्हटले होते :- "समित्यांमुळे त्यांच्या कामाचा तसेच एकूण संसदेच्या चर्चेचा दर्जा उंचावतो, कार्यक्षमता वाढते कारण यामध्ये शासनाचे उत्तरदायीत्व महत्त्वाचे असते. केवळ प्रशासन दुर्बल करणे किंवा टीका करणे हा हेतू नसतो."

अंदाज समितीने १९७८ साली पाठ्यपुस्तक मंडळाची तपासणी केली तेव्हा मंडळ शासनाकडून निधी घेत नाही, स्वत: उभारते तसेच समितीपुढे साक्ष देण्यापूर्वी नियामक मंडळाच्या अध्यक्षांना तसेच सर्वसाधारण सभेला अवगत करावे लागेल असा पवित्रा पाठयपुस्तक मंडळाने घेतला असता, त्यावर समितीने तीव्र आक्षेप घेऊन यापुढे कोणत्याही विभागाने समितीपुढे असा हास्यास्पद मुद्दा उपस्थित करु नये असा अभिप्राय व्यक्त केला होता. समितीची त्यावेळची शिफारस पुढीलप्रमाणे होती :–

"यासंदर्भात एक अत्यंत महत्त्वाची अशी बाब समितीला शासनाच्या नजरेस आणून द्यावयाची आहे ती ही की, खात्याचे मंत्री ह्या मंडळाचे पदसिद्व अध्यक्ष असल्यामुळे मंडळाच्या कारभारात शिथिलता निर्माण झाली. कोणत्याही बाबीमध्ये मंत्र्यांनी एकदा निर्णय दिल्यानंतर तो योग्यच असून कायम स्वरुपाचा असतो अशा मन:स्थितीत वागण्याची अधिकारी वर्गाची प्रवृत्ती असते. या गोष्टीचे प्रत्यंतर मंडळाच्या कारभाराची तपासणी करताना अनेकवार झाले. संचालकांनी अगर कोणी एखादा चुकीचा निर्णय घेतला असला तरी त्या निर्णयावर नियामक मंडळाने शिक्कामोर्तब केले की, तो निर्णय वज्रलेप झाला असे समजून त्याचे समर्थन करण्याची प्रवृत्ती या संदर्भात आढळून आली. आणखी एक गोष्ट म्हणजे मंत्र्यांना मंडळाच्या कारभारात लक्ष घालण्यासाठी पुरेसा वेळही नसतो. परिणामी मंडळाची सर्व यंत्रणा अधिकारी वर्गाच्याच हातात गेल्याने अशा मंडळाचा कारभार मनमानी वृत्तीने केला जाणे क्रमप्राप्त होते आणि या मंडळाच्या बाबतीत नेमके हेच घडले आहे. तेव्हा समितीची शासनास अशी शिफारस आहे की, इत:पर मंत्री हे ह्या मंडळाचे अध्यक्ष असू नयेत व अशा तऱ्हेच्या इतर मंडळावरही अध्यक्षांची नियुक्ती करताना ह्या धोरणाचा अवलंब करावा."

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीच्या कामकाजातील स्वरुप पुढीलप्रमाणे आहे :—

(अ) समितीस आवश्यक वाटेल अशा रीतीने खर्चाच्या अंदाजाची तपशीलवार छाननी करणे आणि शासनाची उद्दिष्टे अत्यंत काटकसरीने व कार्यक्षम रीतीने पार पाडली जाण्याची खात्रीलायक तरतूद करण्यासाठी सल्ला देणे.

(ब) त्याच रीतीने पूरक अनुदानासाठीच्या मागण्याची छाननी करणे व

(क) समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नावर सरकारला सल्ला देणे.

बिहार विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. राधा नंदन झा यांनी त्यांच्या "Some Aspects of Parliamentary Procedure" पुस्तकात पुढीलप्रमाणे म्हटले आहे :–

"अंदाज समितीला या वर्षीच्या अंदाजाचा विचार करताना गतवर्षातील तरतूद तपासता येते व त्या आधारावर चालू वर्षाचा अंदाज हा विभागाची कार्यक्षमता व गुणवत्ता या संदर्भात होतो किंवा कसे हेही तपासता येते."

लोकसभेचे माजी महासचिव श्री.शकधर यांनी, १९५० साली लोकसभेचे पहिले मा.अध्यक्ष श्री.गणेश वासुदेव मावळंकर यांनी अंदाज समितीची स्थापना केली त्यावेळी मा.अध्यक्षांनी काढलेल्या निदेशाचा उल्लेख केला आहे तो पुढीलप्रमाणे :—

"यासंबंधात मा.अध्यक्षांनी काढलेल्या निदेशामध्ये धोरण म्हणजे काय याचे विश्लेषण केलेले आहे. त्यात असे म्हटले आहे की, "धोरण म्हणजे शासनाने कायदा संमत करून किंवा विवक्षित प्रस्ताव मान्य करून आखलेले धोरण व अशाप्रकारे आखलेल्या धोरणावर समिती चर्चा करु शकते" त्यातील उपखंड (ब) मध्ये पुढीलप्रमाणे म्हटले आहे :—

"संविधानाने मान्य केलेल्या धोरणाच्या विरोधात समिती शिफारस करु शकणार नाही. परंतु ज्यावेळी विवक्षित धोरणाची अपेक्षेप्रमाणे फलश्रुती होत नसेल किंवा त्याद्वारे अपव्यय होत असेल तर समिती अहवालाद्वारे ती बाब सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात बदल करणे आवश्यक आहे असे सुचवू शकते."

लोकसभेचे पहिले मा. उपाध्यक्ष तथा त्यानंतर तत्कालीन लोकसभेचे मा. अध्यक्ष श्री. एम. ए. अय्यंगार यांनी १९५९ साली अंदाज समितीचे उद्घाटन करताना पुढीलप्रमाणे म्हटले होते :—

"धोरण ठरविणे हे आपल्या समितीचे काम नाही, परंतु संसदेपुढे धोरण आल्यानंतर असे धोरण राबविताना त्याला वेगळीच दिशा किंवा आर्थिक परिणामांच्या संदर्भात त्यास वेगळे स्वरुप प्राप्त होते किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी आपली आहे हे करीत असताना आपण नेहमीच ध्यानात ठेवावे की, तुम्ही वित्तीय समिती आहात व ज्या ज्या ठिकाणी पै-पै चा संबंध येतो ते पाहणे तुमचे काम आहे. जेथे पैशाचा अपव्यय होत आहे तेथे त्यावर योग्य मार्गाने टीका करण्याचा तुमचा अधिकार आहे."

ज्या "हाऊस ऑफ कॉमन्सला" **संसदेची जननी म्हटली जाते तेथील समितीबाबत सर गिल्बर्ट कॅम्पीयन ज्यांनी काही काळ "आरस्कीन मे" यांनी लिहिलेल्या "पार्लमेंटरी प्रॅक्टीस"** या आदर्श ग्रंथाचे संपादन केले होते त्यांनी पुढीलप्रमाणे म्हटले होते :—

> "Committee of the House of Commons of administrative matters are, in fact; advisory bodies used by the House for inquiry and to obtain information, and they generally inquire into definite happenings and criticize after the eventh though as a result of the lessons they have learnt they may make suggestions for the future. It is difficult to see how such bodies could impair ministerial responsibility, even if matters of policy' a very indefinite word were assigned to them. If the House is not free to use them as it wishes, it is deprived, or deprives itself, of the most natural means of obtaining information and advice."

संसदीय कामाचा गाढा अभ्यास असलेले नागालँड विधानसभेचे **माजी सचिव श्री.परांजपे म्हणतात -** आपली अंदाज समिती ही "हाऊस ऑफ कॉमन्स" च्या धर्तीवर अस्तित्वात आलेली आहे. परंतु तेथील समिती पर्यायी धोरण सुचवू शकत नाही. परंतु आपल्या देशातील अंदाज समिती ते करु शकते."

भारताचे माजी अर्थमंत्री सी.डी.देशमुख यांनी दिनांक १० एप्रिल, १९५१ रोजी अंदाज समितीच्या कामाबाबत पुढीलप्रमाणे म्हटले होते - "अंदाज समितीला आम्ही आमचे स्नेही समजतो. कारण आमच्याकडे असलेली साधनसामुग्री जास्तीत जास्त उत्तमरित्या कशी जपून वापरता येईल व ती सर्वांच्या भल्यासाठी असेल याबद्दल ती मार्गदर्शन करते."

प्रसिद्ध इंग्लिश विचारवंत व लेखक **श्री. हर्बट मॉरीसन यांनी आपल्या "गव्हर्नमेंट ऑफ पार्लमेंट"** या पुस्तकात समितीच्या कामाबद्दल पुढीलप्रमाणे म्हटले आहे :- नियोजनाचा मुख्य गाभा हा, असलेली साधनसामुग्री जनतेच्या हिताच्या दृष्टीने उत्तमरित्या वापरावी हा असतो. त्याकरिता एकीकडे उपलब्ध असलेली साधनसामुग्री तर दुसरीकडे खर्चाची बाब यांचा उत्तम मेळ घालून जास्तीत जास्त उपयुक्तता साधेल हे पाहणे गरजेचे असते."

एकंदरीत वरील वस्तुस्थितीचा विचार करता **अंदाज समिती एक अत्यंत महत्त्वाची वित्तीय समिती** म्हणून मान्यता पावली आहे.

मुंबई विधानसभेची अंदाज समिती सर्वप्रथम सन १९५१ साली गठीत करण्यात आली. सुरुवातीला अंदाज समितीमध्ये वित्त मंत्र्यांसह विधानसभेच्या १५ सदस्यांचा समावेश होता. इतर १४ सदस्य प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्वानुसार एकलसंक्रमणीय मतदान पद्धतीने निवडले जाते. वित्त मंत्री जरी समितीचे पदसिद्ध समिती प्रमुख असले तरी वित्त मंत्री बैठकीस अनुपस्थित असल्यास इतर सदस्यांमधून तेवढ्या बैठकीपुरते समिती सदस्यांमधून एका सदस्याची समितीप्रमुख म्हणून नियुक्ती केली जाई. १ नोव्हेंबर १९५६ पासून राज्य पुनर्रचना करण्यात आली. राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ अस्तित्वात आल्यानंतर लोकलेखा समिती, अंदाज समिती या समितींच्या सदस्य संख्येत वाढ करण्यात आली. त्यानुसार अंदाज समितीची एकूण सदस्य संख्या २७ करण्यात आली. त्यामध्ये विधानपरिषदेच्या सहा सदस्यांचा समावेश केला गेला. यावेळीही वित्त मंत्रीच पदसिद्ध समितीप्रमुख म्हणून काम पाहतील अशी तरतूद कायम राहिली. सदस्यांची निवड प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्वानुसार एकलसंक्रमणीय पद्धतीने केली जाईल. वित्त मंत्र्यांच्या अनुपस्थितीत इतर सदस्यांमधून समितीप्रमुख निवडण्याची तरतूद यावेळीही अस्तित्वात होती. समितीचा अहवाल समिती प्रमुख किंवा त्यांच्या अनुपस्थितीत समितीचे इतर सदस्य सभागृहात सादर करीत आणि **तो अहवाल विचारात घ्यावा असा प्रस्ताव मांडत असत.**

सन १९६० मध्ये भाषावार राज्य पुनर्रचना करण्यात आल्यानंतर महाराष्ट्र विधानसभा नियमामध्ये बदल करण्यात आलेल्या बदलानुसार अंदाज समितीची सदस्य संख्या १९ करण्यात आली. यामध्ये १५ विधानसभा व ४ विधानपरिषद सदस्यांचा समावेश असे. यावेळीही सदस्यांची निवड प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्वानुसार एकलसंक्रमणीय मतदान पद्धतीने केली जात असे. यावेळी झालेला महत्त्वाचा बदल म्हणजे आतापर्यंत अंदाज समितीवर वित्त मंत्री पदसिद्ध समिती प्रमुख म्हणून काम पहात असत. परंतु, नियमामध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार बिनसरकारी सदस्य या समितीवर समिती प्रमुख म्हणून काम पाहतील अशी तरतूद करण्यात आली. सन १९५१ ते १९६० पर्यंत समिती प्रमुख म्हणून या पदावर मा.वित्त मंत्री काम पहात होते. श्री. एस.के.वानखेडे, वित्त मंत्री यांनी समितीचा तिसावा अहवाल (१९६०) सभागृहास सादर केला. त्यानंतर समिती प्रमुख या पदावर समिती सदस्य म्हणून एका विधानसभा सदस्याची नियुक्ती करण्यात येऊ लागली. सर्वप्रथम श्री.एल.एम. पाटील, वि.स.स. यांची समितीप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली व त्यांनी प्रथम १९६० चा एकतिसावा अहवाल सभागृहास सादर केला. त्यानंतर आजतागायत समिती प्रमुख या पदावर एका विधानसभा सदस्याची नियुक्ती करण्यात येते. समितीला सुपूर्द करण्यात आलेल्या विषयांची छाननी करणे, सुलभ जावे म्हणून समिती समोर व्यक्तींना बोलावण्याची व कागदपत्रे व अभिलेख मागविण्याची शक्ती प्रदान

करण्यात आली. तसेच समुचित संसदीय व्यवहारांत सुसंवाद राखण्यासाठी या **समितीच्या अहवालाच्या चर्चेविषयीच्या तरतुदी यामधून वगळण्यात आल्या.**

सन १९७६ ते १९७८ या कालावधीत अंदाज समिती अंदाजपत्रकाची मतदानपूर्व छाननी करण्याचे काम करीत होती. या प्रयोजनार्थ वेगवेगळया प्रस्तावाद्वारे समितीच्या सदस्य संख्येत दरवर्षी १९ ते २९ पर्यंत वाढ करण्यात आली होती. जेणेकरून अंदाजपत्रकाचा अभ्यास करण्यासाठी समितीला सोईस्कर अशा गटामध्ये विभागणी करता येईल. अंदाजपत्रकाच्या मतदानपूर्व छाननीला कायमस्वरुप प्राप्त झाल्यानंतर सदस्यांच्या वाढीव संख्येच्यासंबंधात कायम स्वरुपाची तरतूद करणे आवश्यक वाटले व या प्रयोजनार्थ संबंधित नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली.

लोकलेखा समिती, अंदाज समिती, सार्वजनिक उपक्रम समिती यासारख्या महत्त्वाच्या वित्तीय समित्यांवरील सदस्यांची नियुक्ती प्रदीर्घ निवडणूक कार्यपद्धतीने करण्यात येत होती. त्याऐवजी सर्व समित्यांवर सदस्य नामनियुक्त करण्याचे अधिकार अध्यक्षांना देण्यात आले. मात्र सभागृहात विरोधी पक्ष आणि गट यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात समित्यांवर प्रतिनिधीत्व मिळेल या विषयीची दक्षता घेण्याच्या दृष्टीने असे करत असताना अध्यक्षांनी/सभापतींनी सभागृहाचे नेते, विरोधी पक्ष नेता आणि सभागृहाच्या मान्यता प्राप्त गटाचे नेते यांच्याशी विचारविनिमय करणे आवश्यक ठरविण्यात आले.

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८, २०९ व २१० तसेच महाराष्ट्र विधानपरिषद नियम २०८ यामध्ये अंदाज समितीची स्थापना, कामे, अधिकार व कार्यपद्धती तसेच विधानपरिषद सदस्यांना प्रतिनिधीत्व याबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे.

(अ) **महाराष्ट्र विधानसभा नियम.—**

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८, २०९ व २१० मध्ये अंदाज समितीची स्थापना, कामे, अधिकार व कार्यपद्धतीबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे.

अंदाज समितीची स्थापना - २०८ (१) दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती, नव्याने स्थापन करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, अर्थसंकल्पीय अंदाज आणि पूरक अनुदानासाठीच्या मागण्यांची छाननी करण्यासाठी आणि असे अंदाज व मागण्या ज्या धोरणावर आधारलेल्या असतील त्या धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे उपाय सुचविण्यासाठी आणि अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधीमंडळात सादर करावयाचा तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समिती स्थापन करण्यात येईल.

(२) अंदाज समिती ही जास्तीत जास्त एकोणतीस सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त तेवीस सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रीतीने सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त सहा सदस्य नामनिर्देशित करतील.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची स्थापना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

अंदाज समितीची कामे - २०९ (१) पुढील कामे करणे हे अंदाज समितीचे कर्तव्य असेल.

(अ) समितीस आवश्यक वाटेल अशा रीतीने खर्चाच्या अंदाजाची तपशीलवार छाननी करणे आणि शासनाची उद्दिष्टे अत्यंत काटकसरीने व कार्यक्षम रीतीने पार पाडली जाण्याची खात्रीलायक तरतूद करण्यासाठी सल्ला देणे.

(ब) त्याच रीतीने पूरक अनुदानांसाठीच्या मागण्यांची छाननी करणे. व

(क) समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे.

(२) अंदाज समितीने अर्थसंकल्पीय अंदाज किंवा पूरक अनुदानांसाठीच्या मागण्या यांच्या केलेल्या छाननीमुळे विधानसभेत जे अंदाज किंवा मागण्या विचारात घेण्यास किंवा त्यावर मत घेण्यास कोणत्याही रीतीने बाधा येणार नाही किंवा ती बाब पुढे ढकलली जाणार नाही. अर्थसंकल्पीय अंदाजाची किंवा पूरक अनुदानांसाठीच्या मागण्यांची छाननी करण्याचा व विधानसभेने त्यात असलेली अनुदाने अगोदरच मंजूर केली असली तरीही त्याबाबत सल्ला देण्याचा समितीस हक्क आहे.

परंतु समिती, या नियमान्वये सार्वजनिक उपक्रम समितीच्या कक्षेत येत असतील अशा सार्वजनिक उपक्रमासंबंधीची आपली कामे पार पाडणार नाही.

अंदाज समितीचे अधिकार व कार्यपद्धती - २१० - समितीला छाननी करावयाच्या कोणत्याही बाबीच्या संबंधात अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेता येईल किंवा तज्ञांकडून पुरावा घेता येईल. समितीपुढे दिलेला कोणताही पुरावा गुप्त वा गोपनीय समजणे हे समिती प्रमुखांच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल.

(ब) **महाराष्ट्र विधानपरिषद नियम**

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २०८ मध्ये अंदाज समितीवरील विधानपरिषदेच्या सदस्यांच्या प्रतिनिधीत्वाबाबत पुढीलप्रमाणे तरतुद केली आहे.

अंदाज समिती - २०८ - दरवर्षी विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, विधानसभेने केलेल्या नियमान्वये स्थापन केलेल्या अंदाज समितीवर प्रतिनिधित्व करण्यासाठी, सभापती जास्तीत जास्त सहा सदस्य नामनिर्देशित करतील.

परंतु समिती, सार्वजनिक उपक्रम समितीच्या कक्षेत येत असतील अशा सार्वजनिक उपक्रमासंबंधीची कामे पार पाडीत नाही. समितीला, तिने छाननी करावयाच्या कोणत्याही बाबीच्या संबंधात अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेता येते किंवा तज्ञांकडून पुरावा घेता येतो.

अंदाज समितीचे कामकाज - अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या वेगवेगळया बाबींवरील आर्थिक तरतुदी, त्यामागील उद्दिष्टे साध्य झाली किंवा कसे, याची तपासणी झाली नसल्यास तत्संबंधी कारणे व या अनुषंगाने सखोल आढावा घेऊन शासनाने करावयाच्या प्रशासकीय व आर्थिक उपाययोजनासंबंधी अंदाज समिती विशेष लक्ष पुरविते. समितीच्या शिफारशी शासनावर बंधनकारक नसल्या तरी शासनाला त्या विचारात घ्याव्या लागतात. लोकलेखा समिती व अंदाज समिती या दोन प्रमुख आर्थिक समित्या मानल्या जातात. **लोकलेखा समितीचे परीक्षण हे अर्थसंकल्पात**

केलेली तरतूद खर्च झाल्यानंतर होते. परंतु अंदाज समितीचे परिक्षण, तरतूद खर्च होत असतांना वा तरतूद खर्च होण्यापूर्वी होते.

समितीला एक किंवा अधिक उप समित्या नेमता येतात. अशा प्रत्येक उप-समितीकडे निर्णयार्थ पाठविण्यात येणाऱ्या कोणत्याही बाबींची तपासणी करण्यासाठी अविभक्त समितीच्या शक्ती असतात आणि अशा उप समित्यांच्या अहवालास जर संपूर्ण समितीच्या बैठकीत अनुमती दिलेली असेल तर संपूर्ण समितीचे अहवाल आहेत असे मानले जाते. उप समितीकडे कोणतीही बाब निर्णयासाठी पाठविण्याच्या आदेशात चौकशी करावयाचा मुद्दा किंवा मुद्दे स्पष्टपणे नमूद केले जातात आणि उप समितीच्या अहवालाचा संपूर्ण समितीकडून विचार करण्यात येतो.

मतदान पूर्व छाननी पद्धती (Pre Voting Scrutiny) - समितीने मतदान पूर्व छाननीची पद्धती सन १९७६ मध्ये अवलंबिली होती. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सर्वसाधरण चर्चा होऊन वित्त मंत्र्यांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार अर्थसंकल्प अंदाज समितीकडे तपासणी व छाननीसाठी पाठविला जातो व समितीने एका ठराविक तारखेस अहवाल सादर करावयाचा असतो. अधिवेशन कालावधीत समितीस तपासणीचे काम पूर्ण करून ठराविक तारखेस अहवाल सादर करता यावा म्हणून चार महिन्यांसाठी लेखानुदान घेण्याची प्रथा होती. ही प्रथा सन १९७६-७७, ७७-७८, ७९-८० मध्ये अवलंबिण्यात आली. सन १९७८-७९ मध्ये सार्वजनिक निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे ही प्रथा पाळण्यात आली नाही. तद्नंतर १९८१-८२ पासून ही पद्धती बंद करण्यात आली. तथापि, सन १९८७-८८ व ८८-८९ या कालावधीत ही पद्धती पुन्हा अवलंबिण्यात आली. मात्र सन १९८९-९० नंतर या पद्धतीचा अवलंब केला गेला नाही. महाराष्ट्र विधानसभेच्या या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा पद्धतीच्या अनुषंगाने पुढे लोकसभेमध्ये (Department Related Parliamentary Standing Committees - DRSCs) पद्धत अस्तित्वात आली या अनुषंगाने या विधानसभेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

ह्या प्रथेऐवजी अर्थसंकल्पाची छाननी आता खालील पद्धतीने तीन टप्प्यात करण्यात येते.

पहिला टप्पा - वर्षाच्या सुरुवातीला त्या वर्षाच्या अर्थसंकल्पातील काही प्रमुख नवीन बाबींची तपासणी करण्यांत येते. तपासणीसाठी नवीन बाबींची निवड करताना सर्व विभागांच्या प्रमुख नवीन बाबी विचारात घेतल्या जातील असे पाहिले जाते. विभागाकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात येते. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर सदर माहितीचा अभ्यास करून विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी दुसरी प्रश्नावली तयार करण्यात येते. तद्नंतर विभागीय सचिवांच्या साक्षी घेऊन अहवाल तयार केला जातो. यासंबंधीचा अहवाल पावसाळी अधिवेशनात सादर करण्यात येतो जेणेकरून आगामी वर्षासाठी अर्थसंकल्प तयार करताना अहवालात अंतर्भूत असलेल्या सूचना/शिफारशी यांची शासनाला त्वरित दखल घेता येईल. या शिफारशींची दखल शासनाने घेतली आहे काय, या बाबींचे परिक्षण समितीने केल्यानंतर त्याचा अहवाल त्याच वित्तीय वर्षामध्ये नवीन अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सादर केला जातो.

दुसरा टप्पा - प्रत्येक वर्षी सर्व विभागांची तपशीलवार तपासणी करणे शक्य नसते. दरवर्षी दोन/तीन प्रमुख विभाग (Core sector Departments) व दोन/तीन उर्वरित विभाग (Non-Core sector Departments) यांची तपशीलवार छाननी करण्यात येते. याचप्रमाणे विधानसभेच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात सर्व विभागांची तपशीलवार तपासणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. अभ्यासगट निर्माण करून/एकत्रितपणे या विभागांच्या

तरतुदींची तपशीलवार छाननी करून एक प्रश्नावली तयार करण्यात येते. 'कार्यक्रम अंदाजपत्रक' या प्रकाशनाचा याबाबतीत अतिशय उपयोग होतो. प्रश्नावलीची उत्तरे/माहिती विभागाकडून आल्यानंतर माहितीचा अभ्यास करून विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी दुसरी प्रश्नावली तयार करण्यांत येते. तद्नंतर विभागीय सचिवांची साक्ष घेऊन अहवाल तयार केला जातो.

तिसरा टप्पा - पूर्वीच्या अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची तपशीलवार तपासणी या टप्प्यात केली जाते. या 'अनुपालन' (Action Taken Report - ATR) अहवालावरील कार्यवाहीचा अहवाल समितीकडून तयार केला जात नाही. सर्वसाधारणपणे कामाच्या सोयीसाठी दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचे काम एका वेळी केले जाते.

अंदाज समितीने निरनिराळया विभागाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर अभ्यासपूर्ण असे अहवाल सभागृहास सादर केलेले आहेत.

उदाहरणार्थ :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (शिक्षण विभाग) यासंबंधीचा सत्ताविसावा अहवाल, १९७८.

(२) अर्थसंकल्पीय प्रकाशनाचे सुलभीकरण (वित्त विभाग) यासंबंधीचा चौदावा अहवाल, १९९४.

(३) विधानमंडळास पुरवणी मागण्या पूर्ण रुपये हजारांत सादर करण्याबाबत वित्त विभागाने अंदाज समितीच्या मान्यतेसाठी पाठविलेल्या प्रस्तावाच्या संदर्भातील अहवाल (वित्त विभाग) या संबंधीचा नववा अहवाल, १९९७.

(४) राज्य शासनाच्या "झुणका भाकर" योजनेसंबंधी अहवाल (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) या संबंधीचा अकरावा अहवाल, १९९७.

(५) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासंबंधी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग) या संबंधीचा सतरावा अहवाल, १९९८.

(६) एकाधिकार कापूस खरेदीसंबंधी अहवाल (सहकार व वस्त्रोद्योग विभाग) यासंबंधीचा एकोणिसावा अहवाल, १९९८.

(७) राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालये, न्यायालयातील रिक्त पदे व प्रलंबित प्रकरणे याबाबतचा पाचवा अहवाल, डिसेंबर, २०००.

(८) राज्यातील पिके, पर्यायी पिके, खते व खतांचा वापर, पिकांचे उत्पादन व उत्पादन क्षमता यासंबंधीचा आठवा अहवाल, एप्रिल, २००१.

(९) शालेय पोषण आहार योजना याबाबतचा नववा अहवाल, एप्रिल, २००१.

(१०) राज्यातील धरणे व कालवे यामधील पाण्याचा झिरपा, पाझर, वहनव्यय, बाष्पीभवन, चोरी इत्यादी मार्गाने होणारे नुकसान याबाबतचा दहावा अहवाल, जुलै, २००१.

(११) अर्थसंकल्प पारदर्शक व जनसुलभ करण्याबाबतच्या समितीच्या अहवालावरील अकरावा अहवाल, ऑगस्ट २००१.

(१२) राज्यातील क्षारपड जमिनीसंबंधी बावीसाव्या अहवालातील (१९९८-९९) शिफारशींवरील अनुपालन अहवाल, डिसेंबर २००२.

(१३) शिवछत्रपती क्रीडापीठ, महाळुंगे-बालेवाडी, जिल्हा पुणे याबाबतचा सोळावा अहवाल, जुलै २००३.

(१४) सर्व शिक्षण अभियानांतर्गत राज्यातील मुलामुलींना मोफत पुस्तके पुरविण्याच्या योजनेबाबतचा अठरावा अहवाल, डिसेंबर २००३.

(१५) सन २००३-२००४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह [पर्यटन] विभागाच्या "शिवनेरी किल्ला आणि त्याच्या सभोवताली सुशोभिकरण करणे" या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात विसावा अहवाल, मार्च २००४.

(१६) अर्थसंकल्पातील प्रधान लेखाशीर्षे २२३५ व ७६१० ही संबंधित विभागांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांत न दर्शविता पूर्वीप्रमाणेच सर्व विभागांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात दर्शविण्याबाबत वित्त विभागाने पाठविलेल्या अनौपचारिक संदर्भावरील एकविसावा अहवाल, मार्च २००४.

अंदाज समितीने निरनिराळ्या विभागांशी संबंधीत महत्वाच्या विषयांवर सन २००४ ते २००९ (अकरावी विधानसभा) या कालावधीत एकूण २७ अहवाल, सन २००९ ते २०१४ (बारावी विधानसभा) या कालावधीत एकूण ३३ अहवाल तर सन २०१४ ते २०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत एकूण ३ अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर केले आहेत याबाबतची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे :—

सन २००४ ते २००९ (अकरावी विधानसभा) या कालावधीत अंदाज समितीने सभागृहांस सादर केलेले एकूण २७ अहवाल पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक या संस्थेबाबतचा पहिला अहवाल, डिसेंबर, २००५

(२) जलसंपदा विभागांतर्गत जल व भूमी व्यवस्थापनक संस्था (वाल्मी), औरंगाबाद व संस्थेबाबतचा दूसरा अहवाल, डिसेंबर, २००५

(३) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या प्रशिक्षण संस्थेबाबत तिसरा अहवाल, डिसेंबर, २००५

(४) सार्वजनिक न्यास कायद्याखाली नोंदणी झालेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही खाटा राखून ठेवण्याची योजना याबाबत चौथा अहवाल, मार्च, २००६

(५) सन २००३-२००४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह (पर्यटन) विभागाच्या "शिवनेरी किल्ला आणि त्याच्या सभोवताली सुशोभिकरण करणे" या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधातील समितीच्या विसाव्या अहवालातील (२००३-२००४) शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईबाबत पाचवा अनुपालन अहवाल, एप्रिल २००६

(६) सन २००६-२००७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात सहावा अहवाल, जुलै, २००६.

(७) राज्यातील पोलीस दल-गृह विभाग या विषयाबाबत सातवा अहवाल, डिसेंबर, २००६.

(८) सन २००६-२००७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या "योजनेतर योजनेकडे हस्तांतरित केलेल्या योजनांतर्गत योजनेचा बांधील खर्च म्हणून शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमासाठी तरतूद करणे" या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात आठवा अहवाल, डिसेंबर, २००६.

(९) राज्यातील गृहनिर्माणाच्या संदर्भात करण्यात येणारी तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) तर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना यासंबंधीचा अहवाल, डिसेंबर, २००६.

(१०) राज्यातील पर्यटनाच्या संदर्भात करण्यात येणारी तरतूद, प्रत्यक्ष खर्च व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना या संबंधीचा अहवाल, डिसेंबर, २००६.

(११) सन २००७-२००८ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या सार्वजकि बांधकाम विभागाच्या "राज्यातील विविध ठिकाणच्या तहसील कार्यालयांसाठी प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने केलेल्या तरतुदीबाबत" या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात अकरावा अहवाल, डिसेंबर, २००७.

(१२) अर्थसंकल्पातील प्रधान लेखाशीर्षे २२३५ व ७६१० ही संबंधित विभागांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात न दर्शविता पूर्वीप्रमाणेच सर्व विभागांच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात दर्शविण्याबाबत वित्त विभागाने पाठविलेल्या अनौपचारिक संदर्भाबाबतच्या समितीच्या एकविसाव्या (सन २००३-२००४) अहवालावरील बारावा अनुपालन अहवाल, डिसेंबर, २००७.

(१३) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) नाशिक या संस्थेबाबतच्या पहिल्या अहवालातील (२००५-२००६) शिफारशींवर शासनाकडून प्राप्त झालेल्या कार्यवाही संदर्भातील तेरावा अनुपालन अहवाल, डिसेंबर, २००७.

(१४) जलसंपदा विभागांतर्गत जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद या संस्थेबाबतच्या दुसऱ्या अहवालातील (२००५-२००६) शिफारशींवर शासनाकडून प्राप्त झालेल्या कार्यवाही संदर्भातील चौदावा अनुपालन अहवाल., डिसेंबर २००७.

(१५) जिल्हा वार्षिक योजनेचा निधी नियोजन विभागामार्फत अर्थसंकल्पित करून तो जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरित करण्याच्या सुधारित कार्यपद्धतीबाबत नियोजन विभागाने पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भातील पंधरावा अहवाल, एप्रिल २००८.

(१६) पुंरदर किल्ल्याचे (जिल्हा पुणे) जतन व संवर्धन करणे तसेच किल्ल्यावर संभाजी महाराजांचे स्मारक उभारणे याबाबत शासनाच्या आर्थिक तरतुदी संदर्भात समितीचा अहवाल, एप्रिल २००८

(१७) गृह विभागांतर्गत राज्यातील पोलीस दल, पोलिसांच्या विविध अडचणी याबाबत समितीच्या सातव्या (२००५-२००६) अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भातील समितीचा सतरावा अनुपालन अहवाल, एप्रिल २००८.

(१८) एस.टी. व शहर बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून मिळणाऱ्या अधिभाराची रक्कम आदिवासी विभागातील कुपोषित बालके व माता यांचे संगोपनाकरिता खर्च करणेबाबत समितीचा अठरावा अहवाल, एप्रिल २००८.

(१९) राज्यातील शहरी व ग्रामीण भागासाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात राज्य शासनाकडून करण्यात येत असलेली आर्थिक तरतूद, केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान यावर समितीचा एकोणीसावा अहवाल, जुलै, २००८.

(२०) वांद्रे-वरळी सागरी मार्ग प्रकल्पाचे बांधकाम या विषयासंदर्भातील विसावा अहवाल, डिसेंबर, २००८.

(२१) कोल्हापूर चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करणे या विषयासंदर्भातील एकविसावा अहवाल, डिसेंबर २००८.

(२२) बेलापूर गावठाण (नवी मुंबई) किल्ल्याचे जतन व संवर्धन करणे या विषयासंदर्भातील बाविसावा अहवाल, डिसेंबर २००८.

(२३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवधर मध्यम पाटबंधारे प्रकल्प, (कुर्ली-घोणसरी (फोंडा) धरण), नरडवे मध्यम पाटबंधारे प्रकल्प (महंमदवाडी) धरण तसेच तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प या विषयासंदर्भातील तेविसावा अहवाल, डिसेंबर २००८.

(२४) पुरंदर तालुक्यातील ऐतिहासिक स्थळे/पुरातन मंदिरे यांचे जतन व संवर्धन तसेच क्रांतीकारक व थोर विभुतींची स्मारके उभारणे याकरिता शासनाने केलेली आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च याबाबत समितीचा चोविसावा अहवाल, जून २००९.

(२५) हवेली तालुक्यातील (जि.पुणे) मौजे फुरसुंगी व उरळी देवाची येथील घन कचरा डेपो, राज्य मार्ग परिवहन महामंडळा अंतर्गत बसस्थानक सुधारणा तसेच तालुका क्रीडा संकुल याबाबत शासनाने केलेली आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च याबाबत समितीचा पंचविसावा अहवाल, जून २००९.

(२६) पुणे जिल्ह्यातील गुंजवणी प्रकल्प, निरा देवघर प्रकल्प, पुरंदर उपसा सिंचन योजना व जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना याकरिता शासनाने केलेली आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च व त्यासंदर्भात उपाययोजना सुचविणे याबाबत समितीचा सव्विसावा अहवाल, जून २००९.

(२७) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर या कृषि विद्यापीठास राज्य/केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान व प्रत्यक्ष खर्च यासंदर्भातील समितीचा सत्ताविसावा अहवाल, जून २००९.

सन २००९ ते २०१४ (बारावी विधानसभा) या कालावधीत अंदाज समितीने सभागृहांस सादर केलेले एकूण ३३ अहवाल पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात पहिला अहवाल, जुलै, २०१०.

(२) सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधातील दुसरा अहवाल, डिसेंबर, २०१०.

(३) सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधातील तिसरा अहवाल, डिसेंबर, २०१०.

(४) सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या आदिवासी विकास विभागाशी संबंधित खर्चाच्या नवीन बाबीसंबंधातील चौथा अहवाल, डिसेंबर, २०१०.

(५) प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे, ठाणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयांना शासनाकडून मिळणारे अनुदान व निधी, त्यानुसार मनोरुग्णांवर होणारे उपचार व रुग्णांना मिळणाऱ्या सोयीसुविधा या विषयासंदर्भातील पाचवा अहवाल, डिसेंबर, २०१०.

(६) १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार व केंद्र शासनाच्या निर्देशान्वये अर्थसंकल्पाच्या मुळ दस्तऐवजासोबत राज्याच्या विविध प्रशासकीय विभागामार्फत पंचायत राज संस्थांना व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची जिल्हानिहाय तपशिल दर्शविणारी पुरवणी लावणेबाबत ग्रामविकास विभाग व नगरविकास विभागांनी पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भातील सहावा अहवाल, एप्रिल, २०११.

(७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील औद्योगिक विकास क्षेत्र, उद्योजकांना उपलब्ध करण्यात येणाऱ्या सोई-सुविधा व याकरीता शासनाने केलेली आर्थिक तरतूद, झालेला प्रत्यक्ष खर्च व त्यासंदर्भात उपाययोजना सुचविणे या संदर्भातील सातवा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(८) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील अनुक्रमे तारकर्ली व गणपतीपुळे पर्यटन स्थळांच्या विकासासंदर्भात राज्य/केंद्र शासन व वित्तीय संस्था इ. कडून प्राप्त झालेला निधी, करण्यात आलेली तरतूद, झालेला खर्च व पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा यासंदर्भातील आठवा अहवाल, ऑगस्ट २०११.

(९) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास राज्य व केन्द्र शासन, वित्तीय आयोग इ.कडून प्राप्त निधी व झालेला विनियोग व रुग्णांना मिळणाऱ्या सोई-सुविधा यासंदर्भातील नववा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१०) मुंबई महानगर प्रदेश विकास (MMRDA) प्राधिकरणातर्फे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) याअंतर्गत राबविण्यात येत असलेले विविध प्रकल्प/योजनांकरिता राज्य/केंद्र शासन व वित्तीय संस्था इ. कडून प्राप्त निधी व झालेला विनियोग यासंदर्भातील दहावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(११) नागपूर येथील नागपूर महानगरपालिके अंतर्गत राबविण्यात येत असलेले प्रकल्प/कामे, इ. बाबत राज्य व केंद्र शासन व अन्य वित्तीय संस्था यांचेकडून प्राप्त झालेला निधी, करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदी, झालेला खर्च व त्याबाबत उपाययोजना सुचविणे या संदर्भातील समितीचा अकरावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१२) पुणे महानगरपालिकेमार्फत शहरात राबविण्यात येणारे प्रकल्प/योजना वा कामे यासाठी राज्य/केंद्र शासन व अन्य वित्तीय संस्था/आयोग यांचेकडून प्राप्त झालेला निधी व झालेला विनियोग या संदर्भातील समितीचा बारावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१३) जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील इस्माईल युसुफ शासकीय महाविद्यालयातील विकास कामे व शैक्षणिक सोई-सुविधासंदर्भात राज्य/केंद्र शासन तसेच अन्य संस्थांकडून मिळालेला निधी व झालेला विनियोग त्याबाबत उपाययोजना सुचविणे याबाबत समितीचा तेरावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१४) पिंपरी-चिंचवड महानगरपालिके अंतर्गत राबविण्यात येत असलेले प्रकल्प/कामे/नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा इत्यादीबाबत करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदी, झालेला खर्च व त्याबाबत उपाययोजना सूचविणे या विषयावरील समितीचा चौदावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१५) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणा अंतर्गत राबविण्यात येत असलेले प्रकल्प/कामे/ नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोई-सुविधा इत्यादीबाबत करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदी, झालेला खर्च व त्याबाबतची सद्यःस्थिती या विषयावरील समितीचा पंधरावा अहवाल, ऑगस्ट, २०११.

(१६) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या नियोजन विभाग व वित्त विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात सोळावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(१७) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग व रोजगार व स्वयंरोजगार विभाग या विभागांच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात सतरावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(१८) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या विधि व न्याय व सामान्य प्रशासन विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात अठरावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(१९) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नवीन बाबीसंदर्भात एकोणिसावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(२०) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग या विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात विसावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(२१) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या आदिवासी विकास विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात एकविसावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(२२) सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात बाविसावा अहवाल, डिसेंबर, २०११.

(२३) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी या कृषि विद्यापीठास राज्य/ केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, झालेला प्रत्यक्ष खर्च, राबविण्यात येणारे प्रकल्प यासंदर्भातील समितीचा तेविसावा अहवाल, एप्रिल, २०१२.

(२४) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राज्यातील शहरी व ग्रामीण भागासाठी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासंदर्भात राज्य शासनाकडून करण्यात येत असलेली तरतूद, केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान याबाबत समितीच्या एकोणिसाव्या (२००७-२००८) अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भातील समितीचा चोविसावा अनुपालन अहवाल, एप्रिल, २०१२.

(२५) "कोल्हापूर चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करणे" याबाबत समितीच्या एकविसाव्या (२००८-२००९) अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भातील समितीचा पंचविसावा अनुपालन अहवाल, एप्रिल, २०१२.

(२६) गोरेगाव (मुंबई) येथील आरे दुग्धवसाहत व त्या परिसरातील आदिवासींना सोई सुविधा पुरविणे व या वसाहतीतील जमिनीचा होत असलेला वापर याबाबतचा सव्विसावा अहवाल, डिसेंबर, २०१२.

(२७) मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या कृषि विद्यापीठास राज्य/केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, झालेला प्रत्यक्ष खर्च, राबविण्यात येणारे प्रकल्प यासंदर्भातील समितीचा सत्ताविसावा अहवाल, डिसेंबर, २०१२.

(२८) माहिम (मुंबई) येथील नवीन पोलीस वसाहतीबाबत समितीचा अठ्ठाविसावा अहवाल, डिसेंबर, २०१२.

(२९) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत नांदेड व परभणी औद्योगिक क्षेत्राबाबत समितीचा एकोणतिसावा अहवाल, एप्रिल, २०१३.

(३०) नांदेड-वाघाळा महानगरपालिके अंतर्गत शहरात राबविण्यात येत असलेले विविध प्रकल्प/योजना व विकासाची कामे यासंदर्भातील समितीचा तिसावा अहवाल, एप्रिल, २०१३.

(३१) राज्यातील विविध ठिकाणी असलेली पाणी टंचाई व दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने शासनाकडून करण्यात आलेल्या विविध उपाययोजनासंदर्भातील एकतिसावा अहवाल, ऑगस्ट, २०१३.

(३२) पुणे येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासंदर्भातील समितीचा बत्तिसावा अहवाल, ऑगस्ट, २०१३.

(३३) गोरेगाव (मुंबई) येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी संदर्भातील समितीचा तेहत्तिसावा अहवाल, डिसेंबर, २०१३.

सन २०१४ ते २०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत अंदाज समितीने सभागृहांस सादर केलेले एकूण ०३ अहवाल पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेस केंद्र व राज्य शासन यांचेकडून प्राप्त झालेला निधी, झालेला खर्च व योजनेच्या सद्य:स्थितीसंदर्भातील समितीचा पहिला अहवाल.

(२) सन २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरणामुळे अनुसरुन विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत करावयाच्या बदल तसेच सामाजिक न्याय व विशष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागाकडील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी स्वतंत्र अर्थसंकल्पीय प्रकाशनाद्वारे अर्थसंकल्पीत करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त व नियोजन विभागाच्या प्रस्तावासंदर्भातील समितीचा दुसरा अहवाल.

(३) सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त विभागाच्या प्रस्तावासंदर्भातील समितीचा तिसरा अहवाल.

अंदाज समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :–

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस **सन २००४-२००९ (अकरावी विधानसभा)** या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील **अंदाज समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी** :—

(अंदाज समिती २०००-२००१ आठवा अहवाल, राज्यातील पिके, पर्यायी पिके, खते व खतांचा वापर, पिकांचे उत्पादन व उत्पादन क्षमता अहवाल - पृ.क्र.-८६,८८,९७)

(१) कृषि विभागासाठी खात्याच्या अर्थसंकल्पात मोठया प्रमाणात तरतूद केल्याशिवाय राज्यातील शेतकरी वर्गाचा व कृषि उत्पादनाचा विकास होणार नाही. म्हणून राज्य शासनाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये कृषि विभागासाठीच्या तरतूदी एकूण रकमेच्या किमान १० टक्के पर्यंत करण्याची आवश्यकता आहे. असे समितीचे मत आहे. शासनाने याबाबत अतिशय गांभिर्याने विचार करून पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात कृषि विभागासाठी किमान १० टक्के रकमेची तरतूद करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

कृषि उत्पादनाचा संबध कृषि विभागाशी येतो. तथापि, कृषि उत्पादनाला बाजारपेठ मिळण्याची बाब ही पणन विभागाअंतर्गत येते. या दोन बाबी वेगवेगळया विभागात येत असल्यामुळे त्यांचा एकमेकांशी समन्वय राहत नाही व पर्यायाने शेतक-यांच्या कृषि मालाला योग्य भाव मिळत नाही व त्यांचे आर्थिक नुकसान होते. सबब, कृषि मालावर प्रक्रिया, विक्री, इ. पणन विभागातील बाबी कृषि विभागाच्या अंतर्गत आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कृषि मालावर प्रक्रिया विक्री व तद्नुषंगीक बाबी कृषि विभागांतर्गत आणण्यात याव्यात असे समितीचे स्पष्ट मत आहे. सध्या सहकार व वस्त्रोद्योग विभगांतर्गत असलेला पणन विषय हा कृषि विभागांतर्गत आणल्यास तो योग्य होईल असे मत कृषि सचिवांनी देखील समितीच्या साक्षीच्या बैठकीत व्यक्त केले आहे. **तेव्हां सहकार व वस्त्रोद्योग विभागून पणन विषय काढून तो कृषि विभागास जोडण्यात यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

राज्यामध्ये हिरवळीचे खत, कपोंस्ट खत व गांडुळ खताचा वापर वाढविण्यासाठी अनुदान देण्याची योजना अस्तित्वात नाही. केंद्र पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम व कडधान्य विकास कार्यक्रम यातून शेतक-यांना जैविक खताच्या अनुदानावर वाटप केले जाते. केंद्र पुरस्कृत योजनेतील उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेतच हा कार्यक्रम राबवावा लागतो. त्यामुळे जैविक खताचा कार्यक्रम शेतक-यांकडून प्राप्त झालेल्या मागणीवरच अवलंबून असतो. एकूण रासायनिक खताच्या अति वापरामुळे राज्यातील नापीक जमिनीचे वाढते क्षेत्र हे एक कृषि विभागापुढील भविष्यातील फार मोठे आव्हान आहे. मात्र त्या प्रमाणात शासनाच्या पातळीवरील विविध यंत्रणेचे याकडे पुरेसे लक्ष वा गांभीर्य असल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही. ही एक अत्यंत गंभीर समस्या असून येत्या काही वर्षात ही समस्या आक्राळ-विक्राळ स्वरूप धारण करण्याची शक्यता आहे. याबाबत वेळीच लक्ष देऊन हया समस्येवर परिणामकारक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता समितीला वाटते. **या समस्येचा धोका लक्षात घेऊन अर्थसंकल्पातसुद्धा या योजनेवर काही विशिष्ट अशी तरतूद करण्याची निकड समितीला वाटते, व केंद्र पुरस्कृत योजनेवर अवलंबून न राहता राज्यातील अर्थसंकल्पातसुद्धा रासायनिक खतांच्या अति वापरामुळे शेती व्यवसायावर झालेले परिणाम व त्यावर उपाय या संदर्भात एक वेगळी अशी भरीव आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात यावी तसेच याबाबत एक योजनाआखून कालबद्ध अंमलबजावणी करावी अशीही समितीची शिफारस आहे.सेंद्रिय खतांचा मोठया प्रमाणावर वापर करण्यासाठी राज्यातील शेतक-यांची मानसिकता**

तयार करण्याची आणि त्यादृष्टीने सदर खतांचा राज्यातील ग्रामीन भागातील शेतक-यांमध्ये प्रसार करण्याची नितांत गरज आहे.शासनाने या संदर्भात देखील एक योजना आखावी अशी समितीची शिफारस आहे.

महाराष्ट्र राज्यात उत्पादित होणाऱ्या कांद्यामध्ये मात्र उपरोक्त दोन्ही दोष असल्याचे कृषि सचिवांनी समितीच्या बैठकीत स्पष्ट केले. यासाठी राज्यातील कृषि विद्यापीठांनी कांद्याची निरनिराळया टिकावू व जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीबाबत संशोधन करण्याची आवश्यकता आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने या संदर्भात संशोधन करून सुवर्ण नावाची एक नवीन कांद्याची जात शोधून काढली आहे. तथापि, या संदर्भात अधिक संशोधन होण्याची गरज आहे. **राज्यामध्ये कांद्याचे उत्पादन फार मोठया प्रमाणावर होत असल्याने कांदा उत्पादकांना त्यांच्या कांद्यासाठी योग्य दर मिळाल्यास ते त्यांच्या हिताचे ठरेल. म्हणून परदेशात निर्यातयोग्य कांद्याच्या जाती शोधण्यासाठी राज्यातील कृषी विद्यापीठांनी संशोधन करण्याची योजना आखावी अशी समितीची शिफारस आहे.**

बियाणांसंदर्भात भारत सरकारचा १९६६ चा सीड ॲक्ट आहे. एखाद्या खाजगी कंपनीने 'ट्रूथ फूल' या सदराखाली बियाणे बाजारात विक्रीसाठी आणले आणि त्या बियाणांच्या जाती जरी प्रमाणित नसल्या तरी सदरहू कायदा केंद्र शासनाचा असल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले तरी काही कारवाई करु शकत नाही. यासाठी राज्यात घडणाऱ्या अशा गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा स्वतंत्र बियाणे कायदा करावयाचा राज्य शासनाने ठरविले आहे. सदरहू कायदा अंमलात आल्यानंतर महाराष्ट्रात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक बियाणांची राज्य सरकारकडे नोंद करणे बंधनकारक होणार आहे. खाजगी बियाणे कंपनीकडून राज्यातील शेतकऱ्यांची फार मोठया प्रमाणावर फसवणूक आहे. **ही फसवणूक टाळण्यासाठी व खाजगी बियाणे उत्पादकावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा स्वतंत्र बियाणे कायदा राज्य शासनाने लवकरात लवकर तयार करून अंमलात आणावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

*****

(अंदाज समिती २००३-२००४ अठरावा अहवाल, सर्व शिक्षण अभियानांतर्गत राज्यातील मुलामुलींना मोफत पुस्तके पुरविण्याच्या योजनेबाबत अहवाल - पृ.क्र.- ९)

(२) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर २००३ रोजीच्या पत्राद्वारे केंद्र शासनास ओबीसी व बीपीएल अंतर्गत येणाऱ्या मुलांच्या योजनेत समावेश करण्याबाबत निकषात सुधारणा करण्याची विनंती करण्यात आली आहे. **एकाच वर्गातील काही मुलांना मोफत पुस्तके मिळतात आणि काही विद्यार्थ्यांना मिळत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव निर्माण होतो सदर योजनेमुळे लहान मुलांच्या बालमनावर विपरित परिणाम होऊन बालपणीच सामाजिक विषमतेची भावना निर्माण होण्याची भीती समिती सदस्यांनी साक्षीच्या बैठकीत व्यक्त केली आहे.** वास्तविक पाहता या योजनेचा लाभ न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाभ मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहता अत्यंत अल्प अंदाज ४८ लाख एवढी आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच द्यावयाचे झाल्यास त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम शालेय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पाची एकूण रक्कम पाहता अत्यंत अल्प स्वरुपाची म्हणजे अंदाजे ५० कोटी यापेक्षाही कमी आहे. या विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच देण्यासाठी ही रक्कम शासनाने आपल्या अर्थसंकल्पातून दिल्यास सदर योजनेमुळे मुलांमध्ये बालपणीच सामाजिक विषमतेची भावना निर्माण होणार नाही. त्या अनुषंगाने सदर योजनेत बदल करून योजनेची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता आहे. राज्यातील मुला-मुलींमध्ये कोणताही भेदभाव न करता ही

योजना राज्यातील सर्व शाळांमधील अनुसूचित जाती/जमाती विमुक्त जाती/जमाती, इतर मागासवर्गीय यांचेसह सर्वच मुला-मुलींना लागू केल्यास ते सर्वार्थाने सामाजिक व शैक्षणिक विषमता दूर होईल. समाजात **एकजिनसीपणा निर्माण करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल पडणार आहे. अशा आशयाची मागणी लोकप्रतिनिधींनी देखील शासनाकडे तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेत केलेली आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनातर्फे याबाबतचा प्रस्ताव तयार करून तो मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही चालू असल्याची माहिती विभागाने समितीला दिली आहे. तरी सदर प्रस्तावास त्वरेने मान्यता देऊन त्याची पुढील शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

*****

(अंदाज समिती २००५-२००६ चौथा अहवाल सन २००५-२००६ या वर्षाच्या सार्वजनिक न्यास कायद्याखाली नोंदणी झालेल्या रुग्णालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही खाटा राखून ठेवण्याची योजना याबाबत अहवाल - पृष्ठ क्रमांक २३)

(३) सार्वजनिक न्यास कायद्याखाली नोंदणी झालेल्या रुग्णालयामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी काही खाटा राखून ठेवण्याची योजना. सदर योजना ही राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णांना मोफत अथवा सवलतीच्या दराने आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे. तथापि, या योजनेची माहिती मात्र राज्यातील जनतेला कितपत आहे याबाबत समिती साशंक आहे. कारण सदर योजनेची प्रसिद्धी मात्र राज्यात विशेषतः ग्रामीण भागात केली नसल्याचे समितीला आढळून आले. ज्यांच्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे त्यांना या योजनेची माहिती उपलब्ध करून देणे हे राज्य शासनाचे कर्तव्य होते. सदर योजनेची फारशी प्रसिद्ध न केल्याची कबुली सार्वजनिक आरोग्य विभागाने पुरविलेल्या माहितीवरुन समितीला दिसून आली. हे पाहता राज्य शासन सदर योजनेबाबत किती उदासिन आहे हे दिसून येते. **दिवसेंदिवस प्रसिद्धी माध्यमे, दूरदर्शन, वृत्तपत्रे इ. विविध अद्ययावत माध्यमांद्वारे सदर योजनेची प्रसिद्धी राज्य सर्वदूर भागात करणे आवश्यक आहे की, जेणेकरून या योजनेचा लाभ राज्यातील गरीब मागसलेल्या जनतेला होईल. तरी यासंदर्भात संबंधित शासकीय रुग्णालयाच्या प्रवेशद्वारीसुद्धा या योजनेची माहिती देणारा फलक लावणे आवश्यक आहे. शासनाच्या सदर योजनेची वर नमूद केल्याप्रमाणे प्रसिद्धी देण्याबाबत व प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात सादर योजनेसंबंधी मुख्य प्रवेशद्वारी फलक लावण्याबाबत शासनाने योजना आखून त्याची विनाविलंब अंमलबजावणी करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

*****

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस **सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा)** या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील **अंदाज समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी** :—

(अंदाज समिती २०१०-११ तिसरा अहवाल, सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या गृह विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात अहवाल - पृ.क्र. ३६)

(१) **नक्षलग्रस्त भागातील तरुणांची पोलीस दलात भरती करण्याबाबत : -** राज्यात नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांच्या होत असलेल्या हिंसक कारवाया व त्या भागातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न व तेथील परिस्थिती

काबूत ठेवून निर्भयतेचे व सुरक्षितेचे वातावरण निर्माण करण्यासाठी सध्याच्या परिस्थितीत अपुरे असणारे मनुष्यबळ तसेच राज्यातील इतरत्र भागातील पोलीस कर्मचारी / अधिकारी वा सुशिक्षित बेरोजगार यांची या नक्षलग्रस्त भागात सेवारत रहाण्याची नाखुषी याबाबत विचारणा केली असता राज्यामध्ये कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना सरसकट नियम आहेत नक्षलग्रस्त भागांमध्ये जोपर्यंत स्थानिक तरुणांना नोकरीत सामावून घेतले जात नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटू शकणार नाही या भागातील साधारणपणे ७० टक्के लोक आदिवासी आहेत. नक्षलग्रस्त भागातील जास्तीत जास्त स्थानिक तरुणांना नोकरीमध्ये सामावून घेण्याची परवानगी मिळाली तर हा प्रश्न सुटू शकेल असे अप्पर मुख्य सचिवांनी सांगितले **अप्पर मुख्य सचिवांच्या मताशी समिती पूर्णतः सहमती दर्शवते व ज्याप्रमाणे डोंगरी व अतिदुर्गम भागातील शाळांमध्ये शिकवण्यासाठी पूर्वी शिक्षक जात नसत त्यावेळी राज्य शासनाने शासन निर्णय काढून त्यानुसार अधिकाधिक स्थानिक तरुणांना नोकऱ्या दिल्या व त्यानिर्णयानुसार दहावी, अकरावी झालेल्या मुलांची शिक्षक या पदावर नियुक्ती केली गेली. त्यानंतर त्यांना डी.एड. व बी.एड. पूर्ण करण्याची परवानगी देण्यात आली. त्याचधर्तीवर नक्षलग्रस्त भागामध्ये देखील तेथील स्थानिक तरुणांची पोलीस पदावर भरती करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(अंदाज समिती २०१०-११ सतरावा अहवाल, सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग व रोजगार व स्वयंरोजगार विभाग या विभागांच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात अहवाल - पृ.क्र.१५)

(२) सन २००७ पूर्वी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून ज्या लाभार्थ्यांनी कर्जे घेतली त्यापैकी काही लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड केली व ज्यांनी परतफेड केली नाही, त्यांची महामंडळाकडून कर्जे माफ करण्यात आली. **मात्र ज्यांनी प्रामाणिपणे कर्जाची परतफेड केली त्यांना कोणताही फायदा झालेला नाही उलट ज्यांनी कर्ज फेडले नाही, त्यांचे मात्र कर्ज माफ केले त्यामुळे त्यांचा फायदा झाला आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी कर्जाची प्रामाणिकपणे परतफेड केली त्यांना पुन्हा कर्ज देतांना त्यांच्या अर्जांचा प्राथम्यक्रमाने विचार करण्यात यावा तसेच त्यांनी परतफेड केलेल्या रकमेवरील वसूल केलेल्या व्याजाची रक्कम परत देता येईल याचा शासनाने गांभिर्याने विचार करावा तसेच यापुढे त्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाऊ रकमेच्या व्याजाचा दर इतर लाभार्थ्यांपेक्षा २ टक्क्यांनी कमी करावा, अशीही समितीची शिफारस आहे.**

*****

(अंदाज समिती २०१०-११ एकविसावा अहवाल, सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या आदिवासी विकास विभागाच्या खर्चाच्या नवीन बाबीसंबंधात अहवाल - पृ.क्र.२७)

(३) **आदिवासी भागात बदलत्या काळानुसार जुने कोर्स बंद करून नवीन कोर्सेस सुरु करण्याबाबत -** शासनाने सर्व जिल्ह्यांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था काढल्या आहेत. परंतु या संस्थांमध्ये शिकविले जाणारे अनेक कोर्सेस कालबाह्य झालेले आहेत. बदलत्या काळाबरोबर कोर्सेसही बदलले पाहिजेत व जुने कोर्सेस बंद केले पाहिजेत. आज वेगवेगळ्या प्रकारच्या टेक्निकल कोर्सेसची आवश्यकता आहे. परंतु, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अनेक

वर्षापासून फिटर, नळजोडणी हे कोर्सेस शिकविले जात आहेत. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे. आदिवासी भागामध्ये जी साधनसंपत्ती आहे, त्या अनुषंगाने कोर्सेस सुरु केले पाहिजेत. या साधनसंपत्तीचा कसा उपयोग करून घेता येईल याचाही विचार केला पाहिजे. हस्तकला व औषध निर्मिती यामध्येही काही कोर्सेस सुरु करता येतील तथापि, तसे न करता अन्य कोर्सेस सुरु केले जात आहेत परिणामी लोकजीवनाला सहाय्यभूत होतील असे कोर्सेस सुरु केले पाहिजेत असे समितीचे मत आहे. सबब, **आदिवासी लोक ज्या ठिकाणी राहतात तेथील परिसराला व परिस्थितीला अनुषंगून कोणते व्यवसाय करता येतील हे निश्चित करून तशा प्रकारचे शिक्षण देऊन त्यांना उपजिवीकेचे साधन उपलब्ध करून दिले पाहिजेत. तरी त्यादृष्टीने शासनाने गांभिर्याने विचार करून तरी कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(४) कृषि क्षेत्राचा विकास व्हावा, संशोधन व्हावे, हवामान, पर्जन्यमान, पिके, फळबागा, भाजीपाला, शेतीसाठी उपयुक्त अवजारे, खते, बि-बियाणे, इ. संदर्भात अभ्यास करून शेतकऱ्यांचा विकास व्हावा, पारंपारिकरित्या करण्यात येणारी शेती आधुनिक पद्धतीने करून उत्पादन वाढविता यावे यासाठी शासनाने विभाग निहाय कृषि विद्यापीठाची स्थापना केलेली असून या माध्यमातून मुलांना शिक्षणसुद्धा देण्यात येते. कृषि विद्यापीठांनी त्यांच्या क्षेत्रात येणारी पिके, फळबागा, भाजीपाला व इतर शेतीवर अवलंबून असणारे उद्योग यावर संशोधन, शेतकऱ्यांना आवश्यक असणारे वेगवेगळ्या प्रकारची अवजारे तयार करून त्याचा प्रसार करणे अपेक्षित आहे.

यासंदर्भात डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी तयार केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या अवजारांची समितीने पाहणी केली असता शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त अवजारे विद्यापीठाने तयार केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदर अवजारे विद्यापीठामध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेली होती. मात्र सर्वसामान्य शेतकरी विद्यापीठामध्ये जाऊन अवजारे विकत घेईल याची शाश्वती नाही. अनेक शेतकऱ्यांना विद्यापीठाने कोणती अवजारे तयार केली आहेत याची माहितीच होत नाही. तसेच सदर अवजारे बाजारात विक्रीसाठी अथवा शेतकऱ्यांच्या माहितीसाठी तयार केलेल्या अवजारांचा शेतकऱ्यांना उपयोग होत नाही. **यास्तव कृषि विद्यापीठानी तयार केलेली अवजारे शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होण्यासाठी व पाहण्यासाठी शेतकऱ्यांचे मेळावे, जत्रा, बाजारपेठ इ. ठिकाणी प्रदर्शनामधून प्रसार करण्यासाठी व विक्रीसाठी ठेवण्यात यावीत अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच भात लावणी यंत्र, भात झोडणी यंत्र व भात कापणी यंत्र व अन्य आवश्यक अवजारे विद्यापीठाने तयार करावीत, अशीही समितीची शिफारस आहे.**

*****

(अंदाज समिती २०१२-१३ सव्विसावा अहवाल, गोरेगाव (मुंबई) येथील आरे दुग्धवसाहत परिसरातील आदिवासींना सोई सुविधा पुरविणे व या वसाहतीतील जमिनीचा होत असलेला वापर याबाबतचा अहवाल - पृ.क्र.३२,३३)

(५) गोरेगांव (पुर्व), मुंबई येथील आरे कॉलनीसाठी शासनाने एकूण १२८७ हेक्टर (३१६२ एकर) जमिन संपादीत केली असून सदर जमिन पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या काही संस्था व इतर

संस्थांना शासनाने ४३० हेक्टर जमिन दिलेली आहे. उर्वरित जमिन पदूम विभागांच्या अंतर्गत आहे. कृषी विभागातंर्गत पॅराग्रास व सकस वैरणीची २३२ हेक्टर वर लागवड करून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यात येत आहे. दुग्ध वसाहतीत ५०० ते ५५० जनावरांची क्षमता असलेले ३० गोठे आहेत. हे गोठे ३६७ परवानाधारकांना भाडेतत्त्वावर देण्यात आले आहेत. या ३० गोठ्यात १६१६० जनावरे ठेवण्यात आली आहेत. एकूण १३९७ निवासस्थानापैंकी ८५९ निवासस्थाने परवाना धारकांना देण्यात आली आहेत ४४८ निवासस्थाने शासकीय कर्मचारी / अधिकारी यांना देण्यात आली आहेत. इतर ९० निवास्थाने रिक्त आहेत.

आरे कॉलनीमध्ये मुंबई शहरात दूधाची गरज भागविण्यासाठी म्हशींचे संगोपन करण्यासाठी शासनाने तबेल्यांना जागा दिली. यावेळी शासनाने तबेलेधारकांना सोई-सुविधा उपलब्ध करून दिल्या. नाममात्र भाड्याच्या किंमतीत जागा, जनावरांसाठी मूबलक पाणी, चारा, निवासस्थान इ. सोई उपलब्ध करून दिल्या त्या मोबदल्यात तबेलेधारक शासनाला एक म्हशीचे रु.७५/- एवढे भाडे प्रतिमहिना देतात. तबेलेधारकांना प्रत्येकी ५ एकर प्रमाणे ३६७ तबेलल्यामध्ये काम करणाऱ्या कामगारांनी चाळी बांधाल्या आहेत. मालकांनी बंगले बांधले आहेत तर परराज्यातील लोक त्या ठिकाणी अनधिकृत झोपड्या बांधून राहतात असे असतांना **ज्या उद्देशाकरिता शासनाने तबेलेधारकांना जमिनी दिलेल्या आहेत. तो उद्देश बाजूला झाला असून ते तबेलेधारक आता शासनाला दूध पूरवठा न करता खाजगीरित्या दूधाचा व्यवसाय करून मोठ्या प्रमाणावर नफा कमवित आहेत आणि सूविधा सवलती मात्र त्याच घेत आहेत. त्यामूळे शासनाचे फार मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे शासनाने त्या जमिनी तात्काळ ताब्यात घेणे आवश्यक होते. तसेच त्यांच्या सोई-सुविधाबाबत पूनर्विचार करण्याची आवश्यकता होती. मुंबईतील अतिशय मौल्यावान जागा अशा प्रकारे तबेलेधारकाच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे काय याबाबत शासनाने फेर विचार करून धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे व या जागेचा शासनाला अन्य कारणासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(६) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची एकूण २७३ औद्योगिक विकास क्षेत्रे आहेत. त्यापैकी २३६ विकास क्षेत्रे कार्यरत असून सर्व औद्योगिक विकास क्षेत्राची एकूण जागा ६० हजार हेक्टर आहे. सन १९६० पासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वेळोवेळी उपरोक्त जमिनी संपादित करून उद्योगांसाठी वितरित केलेल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रात उद्योगांसाठी जागा मिळावी म्हणून अनेक ठिकाणी प्रतिक्षासूची तयार करण्यात आलेली आहे. सदर प्रतिक्षा सूची ही त्या त्या क्षेत्रातील भूखंडाच्या मागणीप्रमाणे कमी जास्त प्रमाणात आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगजकांना भूखंड वितरित केल्यानंतर उद्योग उभारणीसाठीचा कालावधी क्षेत्रनिहाय वेगवेगळा ठरवून दिलेला आहे. विदर्भातील नागपूर व मराठवाड्यातील औरंगाबाद वगळता या विभागातील इतर उर्वरित क्षेत्रे ही 'ड+' झोन मध्ये असल्याने तेथे उद्योग उभारण्यासाठीचा कमाल कालावधी पाच वषांर्चा विहीत केलेला आहे. उद्योजकाने विहित कालावधीत उद्योग उभारला नाही, तर तो भुखंड परत घेवून प्रतिक्षा सूचीनुसार दुसऱ्या उद्योजकाला भूखंड देणे आवश्यक आहे. मात्र सर्रासपणे उद्योजक महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पाच वर्षात उद्योग न उभारण्याबाबत वेगवेगळी कारणे देवून मुदतवाढ घेत असतात. त्यामुळे एकदा भूखंड वितरित केल्यानंतर वर्षानुवर्षे भूखंड उद्योजकांच्या ताब्यात राहूनहि उक्त भूखंडावर उद्योग सुरु होवू शकत नाहीत. हि बाब समितीच्या निदर्शनास आलेली आहे. परिणामी प्रतिक्षा सुचीवरील इच्छूक उद्योजक आहेत त्यांना भूखंड उपलब्ध होवू शकत नाही व त्यांना वर्षानुवर्षे भूखंड प्राप्तीसाठी प्रतिक्षा सूचीवरच रहावे लागते. **परिणाम स्वरूप अशा**

प्रकरणांमुळे राज्यातील उद्योग वाढीला खीळ बसते. यास्तव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योजकाला भूखंड वितरित केल्यानंतर पाच वर्षात उद्योग सुरु करून प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात झाली नाही तर पाच वर्षानंतर सदरहू भूखंड महामंडळाने परत ताब्यात घ्यावा व तो प्रतिक्षा सूचीवरील दुसऱ्या उद्योजकांला विनाविलंब वितरित करण्यात यावा. ज्या उद्योजकांना भूखंड वितरित होवूनही त्यांनी विहीत कालावधीत उद्योग उभारणी केली नाही त्यांना यापुढे कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यात येवू नये. याबाबत विभागाने निश्चित नियम यथाशीघ्र तयार करावेत व यासंदर्भात केलेली कार्यवाही तीन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

*****

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस **सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा)** या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील **अंदाज समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी** :-

(अंदाज समितीचा २०१५-२०१६ पहिला अहवाल, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसंदर्भातील अहवाल पृष्ठ क्र.२८ ते ३०)

(१) राज्यातील गोरगरीब व प्रामुख्याने ग्रामीण भागातील रुग्णांना बऱ्याचदा पैशाच्या अडचणीमुळे योग्य उपचार मिळत नाहीत. अशा रुग्णांना योग्य उपचार वेळेत मिळण्यासाठी सुरु करण्यात आलेली 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य विमा योजना' ही नाविण्यपूर्ण असून अत्यंत उत्कृष्ट अशी योजना आहे. या योजनेत ३० विशेषज्ञांच्या ९७२ आजारांचा व १२१ पाठपुरावा सेवांचा समावेश आहे. विमा कंपनीच्या सहयोगाने सदरची योजना राबविण्यात येत असून विम्याचा हप्ता शासनाकडून भरण्यात येतो. सदर योजनेत पात्र लाभार्थ्याला ९७२ आजारांवर व १२१ पाठपूरावा सेवांवर निवडलेल्या रुग्णालयातून निःशुल्क सेवा देण्यात येत असल्यामुळे राज्यातील गोरगरीब रुग्णांना फार मोठा दिलासा मिळाला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सदर योजना प्रथमतः प्रायोगिक तत्वावर आठ जिल्ह्यांत व आता संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आरोग्य ओळखपत्र किंवा पिवळे किंवा नारंगी रेशनकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे. त्या आधारे निवडलेल्या रुग्णालयांमध्ये रुग्णांवर कोणतेही पैसे न घेता मोफत उपचार करण्यात यावेत हा योजनेचा उद्देश आहे. यामध्ये विमा कंपनीला जोखिम स्विकारण्याकरिता (To cover risk) निवडण्यात आले असून विमा कंपनी विम्याचा हप्ता भरणार आहे.

या योजनेमध्ये रुग्ण ज्यावेळी उपचार घेण्यासाठी रुग्णालयात जातील त्यावेळी तेथे असलेले आरोग्यमित्र त्या लोकांना मार्गदर्शन करतील, रुग्णांना या योजनेचा चांगल्या प्रकारे लाभ घेता यावा यासाठी आरोग्य मित्र त्या लोकांची मदत करतील अशा प्रकारची सुविधा या योजनेत आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना गोरगरीब, दारिद्र्य रेषेखालील लोकांना तसेच गंभीर आजारांवरील महागडे उपचार/शस्त्रक्रिया करून घेणे केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या लोकांसाठी अत्यंत उपयुक्त असून या योजनेची अद्यापही व्हावयास पाहिजे त्याप्रमाणात प्रसिद्धी झालेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **त्यामुळे सर्व सामान्य लोकांपर्यंत तसेच तळागाळातील खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहचणे आवश्यक असून त्यांना या योजनेची माहिती होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने सदर योजनेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करावी व करण्यात आलेली कार्यवाही समितीला तीन महिन्यात अवगत करावी,अशी समितीची शिफारस आहे.**

(२) (I) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा मुख्य उद्देश गोरगरीब जनतेला वैद्यकीय उपचार मिळावेत, केवळ पैसे नाहीत म्हणून कोणताही रुग्ण उपचाराविना राहू नये असा आहे. या योजनेसंदर्भात समितीने काही रुग्णालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यावेळी या योजनेसंदर्भात आलेल्या अनुभवावरुन तसेच समिती सदस्यांच्या या योजनेसंदर्भातील पुर्वानुभवावरुन समितीच्या असे निदर्शनास आले की, काही रुग्णालये उपचारासाठी पैसे असल्याशिवाय उपचार करण्यास नकार देतात. याचे मुंबईतील टाटा मेमोरिअल व नागपूर येथील सुपर स्पेशालीटी रुग्णालयाचे उदाहरण घेता येईल. तसेच पेसमेकर निकृष्ट दर्जाचा व स्वस्तातील खरेदी करून त्यानुसार रुग्णास उपचार देऊन रुग्णाच्या जीवाशी खेळ करण्यात येतो. तसेच या योजनेच्या माध्यमातून ॲन्जिओप्लास्टी व बायपास झाल्यानंतर चांगल्या दर्जाचा स्टेंट व व्हॉल्व्ह न बसविल्यामुळे रुग्णांना अनेक प्रकारचे त्रास होत असल्याच्या तक्रारी समितीसमोर आल्या आहेत. हृदयरोगावरील उपचार घेतलेल्या रुग्णांच्या शरीरामध्ये कमी दर्जाचे स्टेंट व व्हॉल्व्ह बसविल्याने रुग्णाच्या शरीरामध्ये रक्ताचा संसर्ग होऊन त्याची रक्त चाचणी आठवड्याने करावी लागत असल्याने असा खर्च रुग्णांना परवडत नाही. त्यामुळे याबाबतीत चांगल्या दर्जाचे शस्त्रक्रिया साहित्य वापरणे आवश्यक आहे. श्रीमंत व गरीब अशा प्रकारचा रुग्णांमध्ये भेदभाव करु नये अशी समितीची सूचना आहे. या बाबी विचारात घेता राज्यातील ज्या शासकीय अथवा खाजगी रुग्णालयात राजीव गांधी योजनेमधून उपचार करण्यात येतात त्या सर्व रुग्णालयांना या योजनेबाबतची सर्व तपशिलवार माहिती शासनाने देणे आवश्यक आहे. **यासंदर्भात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत नमूद अटी व शर्तीचे खाजगी रुग्णालयांनी पालन करणे आवश्यक आहे. तथापि, जी खाजगी रुग्णालये अटी व शर्तीचे पालन करीत नसतील असे संबंधित दोषी रुग्णालय/डॉक्टरांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. यासंदर्भात योग्य त्या ठोस उपाययोजना शासनाने तातडीने कराव्यात व केलेली कार्यवाही समितीस अवगत करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(II) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समितीच्या निदर्शनास आलेली आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे खाजगी किंवा शासकीय रुग्णालयामध्ये गरीब रुग्णांवर उपचार करण्यासाठी जे साहित्य वापरले जाते ते हलक्या दर्जाचे असते. गरीब रुग्णांवर हलक्या दर्जाच्या साहित्याचा वापर केल्यामुळे अनेक दुष्परिणामांना त्यांना सामोरे जावे लागते, प्रसंगी जीवही गमवावा लागतो. याकरिता विभागाने योग्य तो धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये एकाच रुग्णावर तीन वेळा बलूनचा वापर केला जातो. कन्झुमेबल प्रोडक्टचा एक पेक्षा अधिक वेळा वापर केला जातो. दिल्ली येथील **"ड्रग कंट्रोल डायरेक्टर ऑफ इंडिया"** यांनी मान्यता दिलेली औषधे व साहित्य, शासकीय किंवा खाजगी रुग्णालयांकडून गरीब रुग्णांवर उपचार करण्याकरिता वापरली जातात. वापरुन झाल्यावर विल्हेवाट लावता येण्याजोगा बलूनचा फक्त एकदाच वापर करणे अपेक्षित आहे. परंतु तालुका पातळीवर हे उत्पादन सहज उपलब्ध होत नाही. जास्तीत जास्त दोन वेळा विल्हेवाट लावता येण्याजोगा बलूनचा वापर केला जातो. परंतु तीन वेळा विल्हेवाट लावता येण्याजोगा बलूनचा वापर करणे योग्य नाही. हा **तांत्रिक मुद्दा असल्यामुळे यासंदर्भात वरिष्ठ डॉक्टरांची एक समिती नियुक्त करण्यात आलेली असून समितीच्या अहवालातील शिफारशीनुरुप पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीस आश्वस्त करण्यात आले होते. प्रस्तुतचा अहवाल शासनाने तातडीने प्राप्त करून घेऊन अहवालातील शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करावी व केलेली कार्यवाही समितीस यथाशिघ्र अवगत करावी.**

(३) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी २० लाख लाभार्थ्यांना आरोग्य ओळखपत्राचे वाटप माहे जानेवारी, २०१२ पर्यंत करण्यात आले होते. मात्र त्याचवेळी ४९ लाख कुटूंबाचा विम्याचा हप्ता शासनाने भरला होता. ज्या व्यक्तीकडे आरोग्य ओळखपत्र नाही मात्र ज्यांच्याकडे वैध पिवळ्या किंवा केशरी रंगाच्या शिधापत्रिका, बीपीएल कार्ड, अंत्योदय शिधापत्रिका, अन्नपूर्णा शिधापत्रिका अथवा वार्षिक एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी कौटुंबिक उत्पन्न असलेल्या व्यक्ती या योजनेचा लाभ घेवू शकतात. शासनाला उपलब्ध पर्यायापैकी शिधापत्रिकांचा पर्याय चांगला वाटल्याने त्यांचा आधार घेण्यात आला आहे. मात्र राज्यात बोगस शिधापत्रिकांचे वाटप झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून सदरचे बोगस शिधापत्रिकाधारक या योजनेचा लाभ घेवू शकतील परिणामी खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहतील हे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले. **या योजनेची अंमलबजावणी योग्य व प्रभावीपणाने व्हावी याकरिता समितीची अशी आग्रही शिफारस आहे की, शासनाने केवळ शिधापत्रिकेवर अवलंबून न राहता विम्याचा हप्ता भरण्यात येणाऱ्या व्यक्तीची संख्या देखील विचारात घेवून त्या सर्व व्यक्तींना आरोग्य ओळखपत्राचे वाटप करण्यात यावे वा अन्य एखाद्या प्रभावी पर्यायाची निवड करावी जेणेकरून या योजनेचा गैरवापर होणार नाही व खरे लाभार्थी उपचारास वंचित राहणार नाहीत. त्यानुषंगाने शासनाने योग्य ती उपाययोजना सत्त्वर करावी व केलेली कार्यवाही तीन महिन्यांच्या आत समितीला अवगत करावी.**

(४) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये रुग्णांना माहिती व्हावी यासाठी राज्य शासनाने विमा कंपनीशी केलेल्या करारानुसार विमा कंपनीने प्रत्येक रुग्णालयात आरोग्य मित्रांची नियुक्ती केली आहे. तथापि, आरोग्य मित्रांशी संपर्क साधण्यासाठी जे दुरध्वनी क्रमांक देण्यात आले आहेत ते सतत बदलत असतात अशा अनेक लोकांच्या तक्रारी आहेत. याबाबत विभागीय सचिवांनी यापुढे आरोग्य मित्रांचे संपर्क क्रमांक बदलणार नाहीत याबाबत दक्षता घेण्यात येईल असे आश्वासन दिले.

आरोग्य मित्रांना विमा कंपनीकडून मानधन दिले जाते. सबब, त्यांच्यावर शासनाचे कोणतेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असे नियंत्रण नसते. आरोग्य मित्र विमा कंपनीचा अधिकाधिक फायदा कसा होईल याच दृष्टीने काम करतात. अनेकदा खर्च कमी होण्याकरिता रुग्णांवर उपचार करण्यात येत नाही. त्यामुळे आरोग्य मित्रांवर शासनाचे नियंत्रण असणे आवश्यकत आहे असे समितीचे मत आहे.

ह्या बाबी विचारात घेता विभागीय सचिवांनी आश्वासित केल्यानुसार आरोग्य मित्रांचे संपर्क क्रमांक सातत्याने बदलण्यावर कडक निर्बंध आणावेत व त्याचबरोबर आरोग्य मित्रात्रांर शासनाचे नियंत्रण रहावे यासाठी सुनिश्चित व्यवस्था निर्माण करावी तद्वतच ज्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात एक समन्वयक असतो त्याच धर्तीवर प्रत्येक तालुकास्तरावर देखील एका समन्वयकाची नियुक्ती करण्यात यावी. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली एका आरोग्य मित्राची नेमणूक करावी. तालुका वैद्यकीय अधिकारी त्यांचेवर नियंत्रण ठेवतील. शासनाने त्यानुरुप सत्त्वर कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यांच्या आत अवगत करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(५) समितीने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येते हे प्रत्यक्ष तपासण्यासाठी मुंबईतील काही रुग्णालयांस भेटी दिल्या तसेच यासंदर्भातील सविस्तर माहिती देखील विभागाकडून

मागविली होती. त्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सध्या गोरगरीब रुग्णांना उपचार घेण्यासाठी एका रुग्णालयामधून दुसऱ्या रुग्णालयामध्ये फिरावे लागत आहे, त्यांच्याकडे कोणीच लक्ष देत नाही. या रुग्णांना योजनेची योग्य माहिती नसल्याने त्यांचे अतिशय हाल होत आहेत. उदाहरणच द्यावयाचे झाले तर समितीने सन २०१३ मध्ये अंधेरी (मुंबई) येथील सेव्हन हिल्स रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली असता तेथे गरीब रुग्णांवर उपचार केला जात नाही, त्यांना तेथून परत पाठविण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. होली स्पिरीट रुग्णालयाने या योजनेमध्ये समाविष्ट होण्यास नकार दिला तसेच नानावटी रुग्णालयाचा सुद्धा या योजनेत समावेश नाही. मुंबईतील रुग्णालयांची नफा जास्त मिळावा अशी अपेक्षा असते त्यामुळे खाजगी रुग्णालये या योजनेतंर्गत सेवा देण्यास नकार देतात. नियमाप्रमाणे खाजगी रुग्णालयांनी सेवा पुरविणे बंधनकारक आहे. परंतु तसे होत नाही.

शासन रुग्णालयांना जागा उपलब्ध करून देते, इतरही सेवा, सुविधा पुरविते. शासनाच्या सर्व सोई-सुविधा घेवून देखील गोरगरीब रुग्णांना अत्यंत उपयुक्त असलेली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्याकडे अशी रुग्णालये उदासिन असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. ही बाब निश्चितच गंभीर स्वरुपाची आहे. सबब, समिती अशी आग्रहाची शिफारस करते की, शासनाकडून विविध सोई-सुविधा घेऊनही प्रस्तुत लोकाभिमुख योजना राबविण्यात राज्यभरातील कोणकोणती रुग्णालये नकार देत आहेत हे पडताळून पाहण्यासाठी शासनाने एक व्यापक तपास मोहिम शासनस्तरावर राबविण्यात यावी. प्रस्तुतची योजना राबविण्यास नकार देणाऱ्या रुग्णालयांकडून त्याबाबतची नेमकी नकार देण्यामागील कारणमिमांसा लेखी स्वरुपात विनाविलंब घ्यावी. ज्या रुग्णालयांची कारणमिमांसा नियमांच्या कसोट्यांवर टिकणारी नसेल अशा सर्व रुग्णालयांना प्रस्तुत योजना विनाविलंब राबविण्याबाबत बाध्य करावे. याप्रकरणी जी रुग्णालये यासंदर्भात योग्य प्रतिसाद देत नसतील अशा रुग्णालयांवर उचित अशी कठोर कारवाई करावी व यासंदर्भात केलेली कार्यवाही तीन महिन्याच्या आत समितीस अवगत करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

(६) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये मुंबईच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये शासनाने १०० बेड, २५ बेड दिलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेने काही रुग्णालयांमध्ये पीपीपी मॉडेलवर तरतूद केलेली आहे. त्या ठिकाणी तेवढे बेड्स महानगरपालिकेच्या दराप्रमाणे द्यावयाचे आहेत. त्या ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून रुग्ण दाखल करून घेण्यात येतात आणि दुसऱ्या योजनेमधून त्यांच्यावर उपचार केले जातात. यामुळे रुग्णालयांना दोन्ही योजनांचा फायदा मिळतो असे होत असेल तर ती निश्चितच फसवणूक आहे. सेव्हन हिल्स रुग्णालयांमध्ये २० टक्के बेड गरीब रुग्णांना मुंबई महापालिकेच्या दराने उपलब्ध करून द्यावेत असे कराराप्रमाणे बंधनकारक असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. मुंबई महानगरपालिकेचे दर एकदम कमी आहेत. त्या दरामध्ये उपचार करणे त्यांना परवडत नाही. त्यापेक्षा राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये नक्कीच जास्त दर आहेत. आपण रुग्णाला कोणत्या योजनेमध्ये फायदा घ्यावयाचा आहे याचा पर्याय देतो. रुग्णाला असे वाटते की, आपण मुंबई महानगरपालिकेच्या योजनेमध्ये नोंदणी केली तर पैसे द्यावे लागतील आणि राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजनेमध्ये नोंदणी केली तर पैसे द्यावे लागणार नाहीत त्यामुळे तो राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये नोंदणी करतो. त्यांना कोणत्या बेडवर ठेवले हे न बघता रुग्णालय दोन्ही योजनांचा फायदा घेतात असे होत असेल तर ही शुद्ध फसवणूक असून ही बाब समिती फार गांभीर्याने घेत आहे.

समितीने रुग्णालयांना दिलेल्या भेटीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सेव्हनहिल्स व ब्रम्हकुमारी रुग्णालयांमध्ये २० टक्के बेड्स प्रस्तुत योजनेतंर्गत गरीब रुग्णांना उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. मुंबई महानगरपालिकेच्या दराने २० टक्के बेड्स उपलब्ध करून देणे बंधनकारक असूनही तसे होत नाही. ब्रम्हकुमारी रुग्णालय करार व अटी शर्तीचे पालन करीत नसेल तर उक्त रुग्णालयांत दिलेल्या सोई-सुविधा काढून घ्याव्यात अशा तीव्र भावना समिती सदस्यांनी व्यक्त केल्या होत्या. सेव्हन हिल्स रुग्णालयाला जागा उपलब्ध करून देण्यात आली त्या ठिकाणी असलेले जुने रुग्णालय तोडून त्या ठिकाणी व्यावसायिक अत्याधुनिक रुग्णालयाची उभारणी केली मात्र करारान्वये २० टक्के बेड्स गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याचे बंधन मात्र पाळलेले नाही. **शासनाने या सर्वच प्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस यथाशिघ्र सादर करावा.**

(७) अनेकदा आपातकालीन परिस्थितीमध्ये रुग्णालयामध्ये दाखल केलेल्या रुग्णांच्या बाबतीत अशी अडचण येते की, त्याला राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत प्राधिकृतरित्या मंजुरी मिळाली नाही तर, दरम्यानच्या कालावधीतील बिल रुग्णालाच भरावे लागते असे प्रसंग उद्भवू नयेत म्हणून प्राधिकृतरित्या मंजुरीची जबाबदारी रुग्णालयाची असून, रुग्णाला रुग्णालयामध्ये दाखल केल्यानंतर त्याला ज्या चाचण्या करण्याबाबत सल्ला दिला जातो त्याची माहिती व रुग्णाची कागदपत्रे ऑनलाईन मंजुर केली जातात. नंतर सर्व माहिती आरोग्यमित्रांमार्फत विमा कंपनीकडे पाठविली जाते. विमा कंपनीचे डॉक्टर्स प्रक्रिया पूर्ण केली आहे का ते पाहतात. त्यानंतरच २४ तासात त्या प्रकरणास मंजुरी देण्यात आली पाहिजे किंवा ते प्रकरण नाकारले पाहिजे. यासंदर्भात इंटरनल टेक्नीकल कमिटीमध्ये विमा कंपनीचे अधिकारी व योजनेचे सहायक प्रमुख मिळून देखील नियमाप्रमाणे सर्व प्रक्रिया पूर्ण केली आहे का ते पाहतात. प्रक्रिया पूर्ण केली नसेल तर पूर्वस्थितीत आणले जाते. **एखाद्या रुग्णाला काही कारणांमुळे प्राधिकृतरित्या मंजुरी मिळत नाही, अशा वेळेस मधल्या काळातील खर्च संबंधीत रुग्णालय रुग्णाकडूनच घेते असे समितीस अवगत करण्यात आले. ही बाब गरीब रुग्णांसाठी निश्चितच जाचक व आर्थिक दृष्ट्या गैरसोयीचे ठरणारी आहे.**

सबब, समितीचे असे आग्रहाचे मत झालेले आहे की, एखाद्या रुग्णाला काही कारणांमुळे प्राधिकृतरित्या मंजुरी मिळत नसेल तर रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्या ७२ तासांमधील कालावधीचे रुग्णालयाचे देयक अदा करण्यासाठी "कॉर्पस फंडाची" उभारणी करण्याबाबत किंवा उक्त रक्कम "मुख्यमंत्री सहायता निधी" मधून देता येईल किंवा कसे किंवा या प्रयोजनार्थ अन्य एखादी व्यवस्था उभी करता येईल किंवा कसे याबाबत शासनाने पडताळणी करून योग्य तो निर्णय तातडीने घ्यावा व घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस अवगत करावी, अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.

*****

(अंदाज समितीचा २०१५-२०१६ दुसरा अहवाल सन २०१७-१८ पासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरणामुळे अनुसरुन विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत करावयाच्या बदल तसेच सामाजिक न्याय व विशष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागाकडील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी स्वतंत्र अर्थसंकल्पीय प्रकाशनाद्वारे अर्थसंकल्पीत करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त व नियोजन विभागाच्या प्रस्तावासंर्भातील अहवाल पृष्ठ क्र.१८ ते २०)

(२) १) दिनांक १ एप्रिल, १९५१ पासून भारताने, जलद गतीने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी, नियोजनाचा (पंचवार्षिक योजनांचा) मार्ग स्वीकारला आहे. या पंचवार्षिक योजनांनुसार, शासकीय खर्चाचे, तो योजनांतर्गत प्रस्तावांमुळे उद्‌भवलेला आहे किंवा नाही, याच्या मूलभूत फरकावरून योजनांतर्गत खर्च (Plan expenditure) व योजनेतर खर्च (Non-Plan expenditure) यामध्ये वर्गीकरण केले जाते.

खर्चाचे योजनांतर्गत योजना व योजनेतर योजना यामध्ये वर्गीकरण करण्याचा संविधानामध्ये उल्लेख केलेला नसला तरी, असे वर्गीकरण नियोजन प्रक्रियेमधून विकसित झालेले आहे. काळाच्या ओघात योजनांतर्गत व योजनेतर यामधील फरकामधून अनेक प्रश्न उद्‌भवत असल्यामुळे ही पद्धती कुचकामी वा प्रभावहीन ठरत आहे व फलनिष्पत्तीवर आधारित असलेल्या अर्थसंकल्पामध्ये अडथळा ठरत आहे. जसे की, साधारणपणे ७५% खर्च हा योजनेत्तत असून २५% खर्च हा योजनांतर्गत असतो. तथापि, त्याप्रमाणात योजनेत्तत खर्चाकडे लक्ष दिले जात नाही. सर्वसाधारणपणे योजनांतर्गत खर्चाकडे सर्वस्तरावर संनियंत्रण करण्यात येते. योजनांतर्गत खर्चाद्वारे नवीन मत्ता निर्मिती केली जाते. परंतु मागील ६५ वर्षांत निर्माण केलेल्या मत्तांच्या देखभाल व दुरुस्तीकडे (योजनेतर) मात्र आवश्यकतेप्रमाणे लक्ष दिले जात नाही. दरवर्षी केंद्र व राज्य शासनावर प्रत्येक वर्षी योजनांतर्गत खर्च वाढविणेबाबत आग्रह असतो. योजनांतर्गत खर्च चांगला असल्याचे समजले/दर्शविले जाते व योजनेतर खर्च हा नेहमीचा/नियमित खर्च समजला जातो, हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानात अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने असलेल्या तरतुदी विचारात घेता भारतीय संविधानातील अनुच्छेद २०२ अंतर्गत राज्याचे 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' (अर्थसंकल्प) सादर करताना खर्चाचे 'महसुली खर्च' व 'इतर खर्च' असे वर्गीकरण करणे बंधनकारक आहे. योजनांतर्गत व योजनेत्तत वर्गीकरणाबाबत भारतीय राज्यघटनेत उल्लेख नाही. अनुच्छेद २०२ नुसार फक्त 'महसुली' व 'इतर (भांडवली व ऋण)' खर्च असे वर्गीकरण दर्शविणे बंधनकारक आहे.

प्रशासकीय सुधारणा आयोग व डॉ. रंगराजन यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती तसेच १२ व्या वित्त आयोगाने योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याबाबत केलेल्या शिफारशी आणि योजना आयोगाचे निती आयोगात केलेले रूपांतर, परिणामी २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाच्या समाप्तीबरोबरच १२ वी पंचवार्षिक योजना संपुष्टात येणे या सर्व बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून केंद्र शासनाप्रमाणे राज्यातही योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून अर्थसंकल्पीय प्रकाशनामध्ये तद्‌नुंषगिक बदल करण्याबाबत वित्त विभागाने मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

अपर मुख्य सचिव, वित्त विभाग यांनी साक्षीच्यावेळी असे स्पष्ट केले की, नवीन बदललेल्या पद्धतीनुसार प्रत्येक विभागास उपलब्ध होणारा एकूण निधी, कार्यक्रमावरील खर्च व अनिवार्य खर्च यांचा आढावा घेणे शक्य होणार आहे. आढाव्याअंती अनिवार्य खर्चविषयक बाबींवर होणारा अनावश्यक खर्च कमी करणे विभागांस शक्य होणार आहे. सर्व विभाग जुन्या मालमत्तांची देखभाल व जुन्या दुर्लक्षित योजनांचे आवश्यकतेबाबत आढावा घेण्याच्या कामी लक्ष केंद्रित करू शकतील. सध्याच्या पद्धतीनुसार फक्त योजनांतर्गत खर्चाचा विचार न करता प्रत्येक विभाग त्यांच्या एकूण खर्चाचा एकत्रितपणे सर्वसाधारण आढावा घेऊ शकेल. विभागांचा, योजनांतर्गत

खर्चामध्ये वाढ करण्याचा अनावश्यक आग्रह थांबू शकेल. शासनास भविष्यात भांडवली खर्चावर जास्त लक्ष केंद्रित करता येईल.

सुधारित व्यवस्थेप्रमाणे सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये योजनांतर्गत / योजनेतर असे विभाजन दर्शविले जाणार नसून अर्थसंकल्पीय खर्चाचे यापुढे 'अनिवार्य खर्च' व 'कार्यक्रमांवरील खर्च' तसेच 'महसुली' व 'इतर (भांडवली व ऋण) खर्च' याप्रमाणे वर्गीकरण दर्शविले जाणार असून त्याची विभागणी खालीलप्रमाणे राहील.

- (अ) **अनिवार्य खर्च :-** यामध्ये दोन उपघटक असतील.

  मूळ आस्थापनाविषयक खर्च (Base Establishment Expenditure)

  - वेतन
  - कार्यालयीन खर्च
  - निवृत्ती वेतन
  - कर्जावरील परतफेड
  - भारित खर्च.

(i) **इतर अनिवार्य खर्च** (Other Committed Expenditure)

- स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक अधिनियमांतर्गत द्यावयाचा निधी
- नगरपालिकांना द्यावयाचा निधी
- स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाच्या करातील द्यावयाचा हिस्सा (उदा. मुद्रांक शुल्क)
- नैसर्गिक आपत्ती निवारणार्थ खर्च
- इतर खर्च जो राज्याच्या विकासासाठी आवश्यक असेल.

- (ब) **कार्यक्रमावरील खर्च** (Scheme Expenditure)
  - सन २०१६-१७ च्या योजनांतर्गत बाबीवरील खर्च
  - सन २०१७-१८ पासूनच्या नवीन योजनांवरील खर्च
  - सध्याच्या योजनेतरमधील जुन्या योजनांवरील खर्च
  - यामुळे अदलाबदल व नव्याने वर्गीकरण आवश्यक असून ते पुढीलप्रमाणे असेल :—

- सध्या योजनेतरमध्ये असलेल्या जुन्या विकासकामाच्या योजना आता कार्यक्रम खर्चाकडे वर्ग करण्यात येतील.

- तसेच योजनांतर्गत खर्चामधील वेतन व आस्थापनाविषयक बाबींच्या योजना अनिवार्य खर्चाकडे वर्ग करण्यात येतील.

उपरोल्लेखित अर्थसंकल्पीय प्रकाशनामध्ये होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने सध्याच्या योजनेतर योजनांचे कार्यक्रमावरील खर्चाकडे व योजनांतर्गतच्या योजनांचे अनिवार्य खर्चाकडे वर्गीकरण करताना नवीन संगणक संकेतांक घेण्याची आवश्यकता नाही तसेच प्रस्तावित बदलामुळे या योजनांना नवीन प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असणार नाही. तसेच त्यास अर्थसंकल्पीय नवीन बाब प्रस्ताव म्हणून समजले जाणार नाही. अपर मुख सचिव (वित्त) यांनी समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेल्या बाबी तसेच साक्षीचे वेळी समितीसमोर केलेले विवेचन तसेच सदरहू अर्थसंकल्पीय प्रकाशनातील बदल सर्व मंत्रालयीन विभागांच्या निदर्शनास आणून त्यांची घेण्यात आलेली संमती ह्या सर्व बाबी जाणून घेतल्यानंतर सुधारित व्यवस्थेनुसार योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रीकरण करण्यास अनुसरून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेत करावयाच्या तद्नुषंगिक बदलास वित्त विभागाने केलेल्या विनंतीनुरूप समिती मान्यता दर्शवीत आहे. तथापि, विभागांना यापुढे त्यांच्या महत्त्वपूर्ण व विकासात्मक खर्चाच्या नियोजनात अधिक लवचिकता जरी राहणार असली तरी सर्वच विभागांवर उक्त प्रयोजनार्थ एक प्रभावी संनियंत्रण ठेवण्याकरिता एक स्वतंत्र सक्षम यंत्रणा वित्त विभागाने निर्माण करावी व केलेली कार्यवाही यथाशीघ्र समितीस अवगत करावी. तसेच योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण केल्यानंतर आवश्यक असणारा अनिवार्य खर्च करून उर्वरित निधी कार्यक्रमांतर्गत बाबींवर खर्च करण्याबाबत व कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च वाढविण्याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडील अनुक्रमे अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी घटक कार्यक्रमाच्या जिल्हा वार्षिक योजनेचा निधी जिल्हानिहाय व योजनानिहाय स्वतंत्रपणे दर्शविण्यासाठी तसेच जिल्ह्यांतर्गत पुनर्विनियोजन करणे सुलभ होऊन त्याचा मागोवा घेणे व कालापव्यय न होता निधीचा पर्याप्त व वेळेवर वापर होण्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय प्रकाशनास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडील अनुक्रमे अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी घटक कार्यक्रमाच्या जिल्हा वार्षिक योजनेचा निधी सन २०१७-२०१८ पासून जिल्हानिहाय व योजनानिहाय स्वतंत्र प्रकाशनाद्वारे दर्शविण्यात येणार आहे.

उपरोक्तप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणेसाठी व तो जिल्हानिहाय/योजनानिहाय स्वतंत्र प्रकाशनाद्वारे दर्शविणाऱ्या पद्धतीबाबत अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेल्या बाबी तसेच साक्षीचे वेळी सदर बदलाबाबत समितीसमोर केलेले सादरीकरण लक्षात घेता, प्रस्तुत जिल्हा वार्षिक योजनेचा निधी जिल्हानिहाय/योजनानिहाय स्वतंत्र प्रकाशनाद्वारे दर्शविण्यासाठीची वित्त विभागाची विनंती समिती मान्य करीत आहे. तसेच कार्यक्रम खर्चाखाली उपलब्ध होणारा निधी हा विकासात्मक कामांसाठीच करणेबाबत निकषांचे पालन करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात याव्यात. तसेच

जिल्हा वार्षिक योजनेतील कामांची अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता विहित मुदतीत देण्यासंदर्भात तसेच जिल्हांतर्गत पुनर्विनियोजन करते वेळेस ते आवश्यकतेनुसार योग्य घटक वा कार्यक्रमासाठीच व्हावे व जिल्ह्यामधील खर्चाचा समतोल बदलणार नाही यांसदर्भात नियोजन विभागामार्फत सविस्तर मार्गदर्शक सूचना संबंधितांना देण्यात याव्यात व सदरहू मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा कसे याची दक्षता घेण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व या प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही समितीस तीन महिन्यांच्या आत अवगत करावी, अशी समितीची शिफारस आहे.

*****

(अंदाज समितीचा २०१७-२०१८ तिसरा अहवाल सन २०१८-२०१९ पासून विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेतील बदलास तसेच अर्थसंकल्प निवेदन खंड-१ बंद करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत वित्त विभागाच्या प्रस्तावासंर्भातील अहवाल पृष्ठ क्र. ५ ते ८)

(३) (१) सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षापासून, केंद्र शासनाने योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण केल्यामुळे तसेच त्यानुषंगाने राज्य शासनास निदेश दिल्याने, राज्य शासनानेही योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेतला. एक वर्षाच्या अनुभवानंतर विधानमंडळास सादर होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या रचनेत त्यानुरूप बदल करणे आवश्यक झाले आहे. या अनुषंगाने काही अर्थसंकल्पीय प्रकाशनातील माहितीमध्ये कोणताही बदल न करता फक्त रचनेतील बदलामुळे प्रकाशनामधील मजकुरात सुट सुटीतपणा येऊन माहितीचे अवलोकन करणे सुलभ होणार आहे. तसेच इंग्रजी व मराठी प्रकाशने एकाच प्रकाशनाद्वारे एकत्रितरित्या प्रकाशित केल्यास प्रकाशनांची व त्यातील पृष्ठांची संख्या कमी होऊन प्रशासकीय खर्चात बचत व प्रकाशने तयार होण्यास कमी वेळ लागणार आहे. सदर सुधारित करण्यात येणारी प्रकाशने नव्याने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीवर स्वयंप्रकट (Automatic Generation) होणार असल्याने प्रकाशनांमध्ये अचूकता येण्यास मदत होणार आहे. अर्थसंकल्पाच्या काही प्रकाशनांमध्ये यामुळे रचनात्मक बदल होणार असल्याने विधानसभा नियम २०८ (१) अन्वये यांस विधानमंडळाच्या अंदाज समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत प्रस्ताव वित्त विभागाने अंदाज समितीकडे सादर केला आहे. उपरोक्तप्रमाणे बदल केल्यास निश्चित कोणत्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये बदल होणार आहे तसेच असा बदल केल्यामुळे प्रकाशनांच्या मजकुरात कशाप्रकारे सुसूत्रता व अचूकता येणार आहे यासंदर्भात विस्तृत माहिती घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग व प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीदरम्यान प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे खालील अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेत बदल होणार आहे :—

(अ) अर्थसंकल्पीय प्रकाशनातील रकान्याची संख्या कमी करून रचनेमध्ये बदल :— यामध्ये खालील प्रकाशने आहेत :-

(१) अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज. (Department wise White Book)

(२) अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-दोन) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज. (Districtwise White Book)

(३) खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा (Major Head-cum-Department wise Summary of Expenditure and Public Account)

(४) प्रस्तावित केलेल्या विनियोजनांची अनुसूची (Schedule of Appropriations)

उपरोक्त १ ते ३ मधील प्रकाशनांमध्ये सद्यस्थितीत एकूण १० रकान्यांमध्ये आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येते. अंदाज समितीने यापूर्वीच दिलेल्या मान्यतेप्रमाणे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या प्रकाशनामध्ये १० ऐवजी ६ रकान्यांमध्ये ही आकडेवारी अंर्तभूत करावी लागेल. मात्र सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या वर्गीकरणाची आकडेवारी योजनांतर्गत व एकूण खर्च अशा तीन रकान्यात न दर्शविता ती एकाच रकान्यामध्ये दर्शविल्यास फक्त चार रकन्यांमध्येच अर्थसंकल्पीय अंदाजाची आकडेवारी दर्शविता येईल व यामुळे प्रकाशनामधील मजकुरात सुटसुटीतपणा दिसून येईल.

तसेच अ. क्र. ३ च्या प्रकाशनातील सुरुवातीच्या खर्चाच्या विवरणपत्रामधील प्रधानशीर्ष (Major Head) व प्रशासकीय विभाग (Administrative Department) हे दोन रकाने एकत्रित केले आहेत तर अ. क्र. ४ च्या प्रकाशनातील सुरुवातीच्या विवरणपत्रामधील विनियोजनाशी संबंधित असलेली कामे व प्रयोजने (Services & Purpose to which the Appropriation relates) व लेखाशीर्ष (Head of Accounts) हे दोन रकाने एकत्रित केले आहेत.

सद्य:स्थितीत वरील प्रकाशनातील आकडेवारी दोन पृष्ठांवर उभ्या स्वरूपात समोरासमोर दिसते तथापि, वरीलप्रमाणे रकाने कमी झाल्यामुळे सदर आकडेवारी एकाच पृष्ठावर आडव्या स्वरूपात दर्शविल्याने ती सुलभपणे वाचणे शक्य होऊन प्रकाशनांच्या पृष्ठांमध्ये बचत होऊन सदर प्रकाशने संगणकीय प्रणालीवर स्वयंप्रकट (Automatically Generated) करण्याचे प्रस्तावित असल्याने बिनचूक प्रकाशन तयार होण्यासदेखील मदत होईल.

(ब) वित्तविषयक विवरणपत्र (Financial Statement) :

सध्याच्या प्रकाशनामध्ये महसुली जमा/खर्च तसेच भांडवली जमा/खर्च हे समोरासमोरील पृष्ठावर दर्शविण्यात येतात. तथापि, केंद्र शासनाच्या धर्तीवर प्रथम महसुली जमा/खर्च व त्यानंतर भांडवली जमा/खर्च याप्रमाणे बदल सुचविण्यात आलेला आहे.

(क) इंग्रजी व मराठी अर्थसंकल्पीय प्रकाशने एकत्रित करून सदर प्रकाशनांच्या रचनेमध्ये बदल :—

(१) खर्चाचे पूरक विवरणपत्र (Supplimentary Statement of Expenditure)

(२) अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-२, नवीन बाबी) (Budget Memorandum Volume- II)

(३) अधिक खर्चाचे विवरणपत्र (Statement of Excess Expenditure)

सद्यस्थितीत उक्त प्रकाशने मराठी व इंग्रजी भाषेत स्वतंत्रपणे सभागृहांस सादर करण्यात येतात. आता सदर प्रकाशने संगणकीय प्रणालीवर मराठी व इंग्रजी भाषेमध्ये एकाच प्रकाशनाद्वारे स्वयंप्रकट करण्याचे (Automatically Generated) प्रस्तावित असून माहितीमध्ये कोणताही बदल न करता कमी पृष्ठसंख्येत बिनचूक प्रकाशन तयार होणार आहे.

तसेच, खर्चाचे पूरक विवरणपत्र या प्रकाशनातील प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश (Major Head-cum-Department wise Summary) या विवरणपत्रातील माहिती खर्चाचे पूरक विवरणपत्र या विवरणपत्रात होत असल्याने सदर माहितीच्या दुरुक्तीमुळे प्रधानशीर्षवार-नि-विभागवार सारांश (Major Head-cum-Department wise Summary) हे विवरणपत्र वगळण्यात येत आहे.

(ड) **अर्थसंकल्प प्रकाशन वगळणे/बंद करणे :–**

अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-१ (Budget Memorandum Volume-I)

अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील परिच्छेद १३५ मध्ये अर्थसंकल्पीय निवेदनाबाबतची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे :–

अर्थसंकल्प निवेदन :- या प्रकाशनामध्ये मूलत: मागील वर्षाच्या लेख्याचे आकडे चालू वर्षाचा अर्थसंकल्प व सुधारित अंदाज आणि आगामी वित्तीय वर्षांकरिता प्रस्तावित केलेले अर्थसंकल्पीय अंदाज यातील मोठ्या तफावतीची स्पष्टीकरणे असतात. त्या त्या प्रधान शीर्षाखालील गौण लेखा शीर्षांनुसार ही स्पष्टीकरण देण्यात येतात. निवेदनाच्या पहिल्या भागात जमा शीर्षाच्या संबंधातील तफावतीची स्पष्टीकरणे तर दुसऱ्या भागात खर्चाच्या संबंधातील तफावतींची स्पष्टीकरणे विभागावार दिलेली असतात. त्यानंतर शासनाकडे असलेले राज्य टंचाई निवारण निधी राज्य मार्ग निधी इत्यादींसारख्या निरनिराळ्या निधीचे प्रपत्र लेखे, लोकलेख्यांमध्ये दर्शविण्यात येतात.

सदर प्रकाशन बंद करण्याबाबत मुख्यत्वे खालील बाबी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या :–

i. वित्तविषयक विवरणपत्र (ग्रीन बुक) या प्रकाशनामध्ये मागील वर्षाच्या प्रत्यक्ष रकमा, चालू वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज तसेच चालू वर्षातील सुधारित अंदाज व पुढील वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाज यातील मोठ्या तफावतीची प्रधान शीर्षावर कारणे दर्शविण्यात येतात. त्यामुळे या माहितीची दुरुक्ती अर्थसंकल्प निवेदन या प्रकाशनामध्ये दिसून येते. तसेच सदर प्रकाशनामध्ये विविध विभागांखालील एकाच प्रधानशीर्षाखाली मोठ्या प्रमाणावर गौण शीर्ष निर्माण झाल्याने प्रत्येक गौण शीर्षाखालील तफावतीची कारणेदेखील नमूद करणे शक्य होत नाही.

ii. सदर प्रकाशनामध्ये विविध कार्यक्रमांवर होणाऱ्या खर्चाचा तपशील विस्तृत स्वरूपामध्ये देण्यात येतो. मात्र या योजनांची माहिती त्या-त्या विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रकमध्येच अंतर्भूत करण्यात येत असल्याने सदर माहितीची पुनरावृत्ती होते.

iii. सदरहू प्रकाशनामधील समाविष्ट माहिती ही वित्तविषयक विवरणपत्र अथवा ग्रीन बुक, अर्थसंकल्पीय अंदाज (भाग-एक) - महसूल व जमा यांचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज, अर्थसंकल्पीय अंदाज : (भाग-दोन) - खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा आणि अर्थसंकल्पीय अंदाज : (भाग-दोन) - खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज (व्हाईट बुक) यामध्ये मुळातच अंतर्भूत असल्याने माहितीची होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरहू

प्रकाशन बंद करणे इष्ट होईल. अर्थसंकल्पीय निवेदन खंड-१ हे प्रकाशन बंद केल्यानंतर 'अर्थसंकल्पीय निवेदन खंड-२ (नवीन बाबी)' या प्रकाशनाचे नाव 'अर्थसंकल्पीय निवेदन (नवीन बाबी)' असे राहील.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यशासनाने योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण केल्यानंतर त्यानुरूप काही अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या रचनेत वर नमूद केल्याप्रमाणे बदल केल्यास अर्थसंकल्पीय प्रकाशनातील माहिती व विवेचनामध्ये कोणत्याही स्वरूपात बदल वा काटछाट न करता फक्त रचनात्मक स्वरूपात बदल होणार आहे. दोन पृष्ठांवर प्रकाशनातील उभ्या स्वरूपात समोरासमोर असलेली आकडेवारी वरील बदलांमुळे आता एकाच पृष्ठावर आडव्या स्वरूपात दर्शविली जाणार आहे. इंग्रजी व मराठी भाषेत स्वतंत्रपणे विधानमंडळास सादर होणारी वर उल्लेखित प्रकाशने आता संगणकीय प्रणालीवर एकाच प्रकाशनात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत स्वयंप्रकट (Automatic Generated) होणार आहेत तसेच अर्थसंकल्पविषयक निवेदन खंड-१ हे प्रकाशन बंद होणार आहे. उक्त सुधारणांमुळे प्रकाशनांची व पृष्ठांची संख्या कमी होऊन प्रकाशने कमी खर्चात व अल्पवेळेत तयार होतील. प्रकाशनांमध्ये अधिक अचूकता व सुटसुटीतपणा येऊन त्यांचे वाचन अधिक सुलभ होईल यास्तव वित्त विभागाने प्रस्तावित केलेल्या उपरोक्त सुधारणांना समिती मान्यता देत आहे. मात्र अर्थसंकल्पीय निवेदन खंड-१ हे प्रकाशन बंद केल्यामुळे तसेच अर्थसंकल्पीय रचनेत बदल केल्यामुळे सन्मा. सदस्य कोणत्याही अर्थसंकल्पीय माहितीपासून वंचित राहणार नाहीत याची वित्त विभागाने दक्षता घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(२) विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या सदस्यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, विधानमंडळ सभागृहात अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सन्मा. सदस्यांना अर्थसंकल्पीय प्रकाशने त्याच दिवशी वितरित करण्यात येतात. तथापि, अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सन्मा. सदस्यांना काही प्रकाशने तातडीने उपलब्ध करून देण्यात येत नाहीत. विशेषतः **कार्यक्रम अंदाजपत्रक** हे प्रकाशन अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी विभागांनी उपलब्ध करून देणे अपेक्षित असतांना सदरहू प्रकाशन विभागांकडून अत्यंत विलंबाने उपलब्ध करून देण्यात येते. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा तसेच अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा करतांना सन्मा. सदस्यांना संदर्भासाठी कार्यक्रम अंदाजपत्रक हे प्रकाशन अत्यंत उपयुक्त असते. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा, अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा करताना मा. सदस्यांना कार्यक्रम अंदाजपत्रकामधून संबंधित विभागाच्या योजना, अर्थसंकल्पामध्ये संबंधित विभागांवर केलेली तरतूद इ.बाबतच्या माहितीचा सूक्ष्मपणे अभ्यास करून त्याचा सभागृहात भाषण करताना आधार घेता येतो. तथापि, सदरहू प्रकाशन अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपेपर्यंत काही विभागाकडून उपलब्धच करून देण्यात येत नाही. तर काही विभागाकडून अनुदानाच्या मागण्यावरील चर्चा व मतदान ज्या दिवशी असतो त्या दिवशी किंवा त्या अगोदर एक दिवस आधी कार्यक्रम अंदाजपत्रक हे प्रकाशन सदस्यांना उपलब्ध करून देण्यात येते. परिणामी मा. सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्यावेळी व अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेच्यावेळी अडचणी उद्‌भवतात. यासंदर्भात मा. सदस्यांकडून अनेकवेळा सभागृहात हरकतीचे मुद्दे उपस्थित करण्यात येतात, सभागृहात गोंधळ सदृश्य परिस्थिती निर्माण होते परिणामी काही वेळा सभागृहाची बैठक स्थगित करावी लागते. सदरहू बाब लक्षात घेता समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून सर्व मंत्रालयीन विभागांनी **कार्यक्रम अंदाजपत्रक** हे प्रकाशन मा. सदस्यांना अर्थसंकल्प सादर केल्यानंतर कार्यक्रम अंदाजपत्रकासह सर्वच प्रकाशने तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत व यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत वित्त विभागाच्या विभागीय सचिवांना समितीने निर्देशित केले होते. वित्त विभागाच्या विभागीय सचिवांनी समितीच्या निर्देशानुसार, कार्यक्रम अंदाजपत्रक हे प्रकाशन विधानमंडळ सभागृहात विहित कालमर्यादेत सादर

होईल याची प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी कटाक्षाने काळजी घ्यावी व ही जबाबदारी विभागाच्या संबंधित सचिवाची राहील असे त्यांच्या दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व मंत्रालयीन विभागांना कळविले आहे. तथापि, **अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशने सन्मा. सदस्यांना तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत तसेच कार्यक्रम अंदाजपत्रक हे प्रकाशन सर्व विभागांनी विहित कालावधीत मा. सदस्यांना उपलब्ध करून देण्याबाबतची वित्त विभागाने समितीस आश्वासित केल्याप्रमाणे दक्षता घ्यावी व याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांशी वित्त विभागाने समन्वय साधावा तसेच ज्या विभागांनी विहित कालमर्यादेत कार्यक्रम अंदाजपत्रकासह अन्य अर्थसंकल्पीय प्रकाशने मा. सदस्यांना उपलब्ध करून दिली नाहीत तर त्याबाबतची जबाबदारी संबंधित विभागाच्या सचिवांवर निश्चित करून आवश्यक ती योग्य कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(२) लोकलेखा समिती (Public Accounts Committee)

समितीची रचना :—

दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिति, नव्याने स्थापन झालेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य असेल तितक्या लवकर, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (The Comptroller and Auditor General of India) यांच्या राज्याच्या विनियोजन लेख्यासंबंधातील अहवालाचे व सभागृहासमोर ठेवण्यात येतील अशा अन्य लेख्यांचे आणि वित्त विभाग, अध्यक्षांच्या परवानगीने समितीकडे विचारार्थ पाठवतील अशा अन्य बाबींचे काम करण्यासाठी लोकलेखा समिती स्थापन करण्यात येईल. लोकलेखा समितीमध्ये जास्तीतजास्त पंचवीस सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष, त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त वीस सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करतील आणि त्याच रीतीने सभापती, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीतजास्त पाच सदस्यांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करतील. समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

पार्श्वभूमी :—

लोकलेखा समिती सर्वप्रथम सन १९२१ मध्ये गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया ॲक्ट, १९१९ च्या कलम ७२ (३) अन्वये मुंबई विधानपरिषदेच्या नियम ३३ व ३४ मधील तरतुदीनुसार गठीत करण्यात आली. त्यानंतर लोकलेखा समितीची रचना व अधिकार यात बदल होत गेला. सन १९२१ मध्ये या समितीमध्ये शासकीय व अशासकीय सदस्य मिळून एकूण १० सदस्य संख्या होती. त्यामध्ये सन १९५४ मध्ये वाढ होऊन ती १५ एवढी झाली. हे सर्व सदस्य विधानसभेने निवडून दिलेले सदस्य होते. सन १९३५ ते १९३७ या काळात वित्तीय लेखे तपासण्यासाठी लोकलेखा समिती अस्तित्वात नव्हती. सन १९३९ ते १९४३-४४ या कालावधीत तत्कालीन राज्यपालांनी एक तदर्थ समिती नेमली होती. नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यामुळे तसेच, विधीमंडळ सदस्यांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन, विधानमंडळाच्या सुधारित नियमानुसार दिनांक २३ नोव्हेंबर, १९५६ रोजी लोकलेखा समितीची सदस्य संख्या समिती प्रमुखांसह २१ करण्यात आली. दिनांक २७ डिसेंबर, १९५७ मध्ये विधानसभा व विधानपरिषद नियमात सुधारणा झाल्यामुळे या समितीवर विधानपरिषद सदस्यांना प्रतिनिधीत्व देणे आवश्यक ठरले व त्यानुसार विधानपरिषदेच्या सहा सदस्यांचा समितीत समावेश करण्यात आल्याने समितीची सदस्य संख्या २७ करण्यात आली, त्याचबरोबर वित्तमंत्र्यांची

या समितीचे पदसिद्ध समिती प्रमुख म्हणून नियुक्ती सुरु राहिली. त्यानंतर प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्वानुसार **एकलसंक्रमणीय** मतदान पद्धतीनुसार समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यासाठी निवडणुकीचे तत्व अंगिकारण्यात आले व त्यानुसार दिनांक २४ ऑगस्ट, १९६० रोजी १९ सदस्यांची (१५ विधानसभा सदस्य व ४ विधानपरिषद सदस्य) लोकलेखा समिती नव्याने गठीत करण्यात आली तेव्हापासून या समितीचा कार्यकाल सन १९९९ पर्यंत १ वर्षाचा होता. तथापि, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या दिनांक १२ व १८ एप्रिल, २००० रोजीच्या पत्रान्वये लोकलेखा समितीचा कार्यकाल २ वर्षांचा करण्यात यावा अशी विनंती केली होती. त्यानुसार मा.पीठासीन अधिकारी, यांच्या अनुमतीने **सन २०००-२००१ या वर्षापासून गठीत करण्यात आलेल्या समितीचा कार्यकाल हा २ वर्षांचा करण्यात आला आहे.**

महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषद नियमांमध्ये एप्रिल, १९८१ मध्ये बदल करण्यात आला व त्यानुसार लोकलेखा समितीची सदस्य संख्या २५ करण्यात आली (२० विधानसभा सदस्य व ५ विधानपरिषद सदस्य) व समितीवरील सदस्यांची नियुक्ती वर उल्लेखिलेल्या **एकलसंक्रमणीय** मतदान पद्धतीनुसार निवडणुकीने न करता मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांना दोन्ही सभागृहांतील पक्षांचे बलाबल विचारात घेऊन या समितीवरील विधानसभा व विधानपरिषदेच्या सदस्यांची सदस्य म्हणून नामनियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले.

सन १९६० पूर्वी मा. वित्त मंत्री, लोकलेखा समितीचे पदसिद्ध समिती प्रमुख म्हणून काम पहात असत. परंतु ऑगस्ट, १९६० मध्ये विधानसभा व विधानपरिषद नियमांमध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार या समितीवर अशासकीय सदस्य, अध्यक्ष अथवा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली. त्यानंतर **मार्च-एप्रिल, १९६९ पासून संसदेतील कार्यपद्धतीच्या प्रथेप्रमाणे लोकलेखा समितीवर विरोधी पक्षातील सदस्यांची "समिती प्रमुख" म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.** तसेच, या समितीला सुपूर्द केलेल्या विषयांची छाननी करणे सुलभ जावे म्हणून साक्षीदारांना समितीसमोर बोलाविण्याची तसेच साक्षीचेवेळी कागदपत्रे व अभिलेख मागविण्याची शक्ती या समितीला प्रदान करण्यात आली.

लोकलेखा समितीचे शताब्दी वर्ष :—

सुमारे शंभर वर्षांचा अभिमानास्पद व गौरवशाली इतिहास असणाऱ्या संसदेची लोकलेखा समिती (Public Accounts Committee) सर्वप्रथम सन १९२१ मध्ये गठीत करण्यात आल्यानंतर समितीच्या स्थापनेस सन १९७१ मध्ये ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सन १९७१ मध्ये नवी दिल्ली येथे संसद तसेच देशातील राज्य व केंद्रशासित प्रदेशांतील लोकलेखा समिती प्रमुखांची सुवर्णमहोत्सवी अखिल भारतीय परिषद आयोजित करण्यात आली होती. संसदेच्या लोकलेखा समितीच्या स्थापनेस सन २०२१ मध्ये १०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने दिनांक ०४ व ०५ डिसेंबर, २०२१ या कालावधीत मध्यवर्ती सभागृह, संसद भवन, नवी दिल्ली येथे या घटनेचा स्मरणोत्सव म्हणून शताब्दी सोहळ्याचे (Centennial Celebrations) कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सदर शताब्दी सोहळ्याचे उद्घाटन दिनांक ०४ डिसेंबर, २०२१ रोजी भारताचे महामहिम राष्ट्रपती यांचे शुभहस्ते झाले, या प्रसंगी भारताचे मा.उप राष्ट्रपती, मा.अध्यक्ष, लोकसभा, मा.उप सभापती, राज्यसभा, राष्ट्रकुलातील देशांच्या संसदेचे मा.पीठासीन अधिकारी, सी.पी.ए. कार्यकारीणीचे अध्यक्ष/सह-अध्यक्ष, भारतातील सर्व राज्यांच्या विधिमंडळांचे मा.पीठासीन

अधिकारी, केंद्रीय मंत्रीमंडळातील मंत्री/राज्यमंत्री, ससंदेच्या लोकलेखा समितीचे समिती प्रमुख, सर्व राज्यातील लोकलेखा समित्यांचे समिती प्रमुख तसेच देश/विदेशातील अन्य मान्यवर उपस्थित होते. सदर शताब्दी सोहळ्याच्या समारोप प्रसंगी दिनांक ०५ डिसेंबर, २०२१ रोजी मा. लोकसभा अध्यक्ष यांचे उपस्थित मान्यवरांना मार्गदर्शन लाभले.

समिती प्रमुखांची नियुक्ती :—

मा.अध्यक्षांकडून लोकलेखा समितीच्या समिती प्रमुखांची नियुक्ती केली जाते. प्रथेनुसार विरोधी पक्षाच्या सदस्यांमधून या समितीच्या समिती प्रमुखांची नियुक्ती केली जाते.

मंत्री समितीचा सदस्य असत नाही :—

मंत्रीपदावर काम करणारी व्यक्ती या समितीचा सदस्य असत नाही. एखाद्या समिती सदस्यांची मंत्रीपदावर नियुक्ती झाल्यास ज्या तारखेपासून त्याची मंत्री म्हणून नियुक्ती झाली असेल, त्या तारखेपासून समितीवरील त्याचे सदस्यत्व संपुष्टात येते.

समितीचा कालावधी :—

समितीचा कालावधी दोन वर्षांचा ठेवण्याची प्रथा सन २००० पासून मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदेशानुसार सुरू करण्यात आली आहे. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात. समिती सदस्यांस स्वतःच्या स्वाक्षरीने मा.अध्यक्ष/मा.सभापतींना लेखी कळवून समिती सदस्यत्वाचा राजीनामा देता येतो.

समितीच्या बैठका :—

समितीच्या बैठका सर्वसाधारणपणे प्रत्येक आठवड्यात विधान भवन, मुंबई येथे होतात. तथापि, समितीसमोर विचारार्थ असलेल्या एखाद्या प्रकल्प/बांधकाम योजनेच्या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी आवश्यकतेनुसार समितीच्या बैठका मा.अध्यक्ष, विधानसभा यांच्या अनुमतीने (म.वि.स.नियम १७६) विधान भवन, मुंबई प्रसीमेच्या बाहेर सुद्धा आयोजित करण्यात येतात. समितीच्या बैठकीची गणपूर्ती होण्यासाठी समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्येपैकी १/४ (एक चतुर्थांश) इतके सदस्य (सहा) उपस्थित असणे आवश्यक आहे.

उप समितीची /अभ्यास गटाची नियुक्ती :—

समितीने निवडलेल्या एखाद्या विषयावर विस्तृत छाननी होण्यासाठी मा. समिती प्रमुख, उप समितीची/अभ्यासगटाची नियुक्ती करु शकतात. उप समितीकडे/अभ्यासगटाकडे सोपविण्यात आलेल्या विषयाच्या परिनिरीक्षणासाठी उप समितीला समितीचे संपूर्ण अधिकार असतात. उप समितीने/अभ्यासगटाने तयार कलेले अहवाल समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतात व त्यानंतर समितीचे अहवाल म्हणून ते सभागृहाला सादर केले जातात.

समितीच्या कामाची गोपनीयता :—

१. समितीचे कामकाज गोपनीय असते त्यामुळे त्या कामाचा अहवाल सभागृहाला सादर होईपर्यंत उघड करता येत नाही अथवा त्याबाबत सदस्यांना सभागृहात प्रश्नदेखील उपस्थित करता येत नाही.

२. समितीसमोर विचारार्थ असलेल्या विषयांच्या संदर्भात संबंधितांना साक्षीसाठी बोलविता येते. तसेच त्या विषयाची कागदपत्रे व अभिलेख शासनाकडून मागविता येतात. मा.अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने एखाद्या विशिष्ट विषयाच्या संदर्भात त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींनादेखील साक्षीसाठी बोलविण्याचे समितीला अधिकार आहेत.

३. मा. समिती प्रमुखांच्या अनुमतीने समितीच्या बैठकीचा कार्यक्रम निश्चित करण्यात येतो.

४. समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे शब्दशः कार्यवृत्त तयार केल्यानंतर मा. समिती प्रमुखांच्या मान्यतेसाठी ते सादर करण्यात येते.

५. अहवालांचे प्रारूप तयार करताना कार्यवृत्ताचा आधार घेण्यात येतो.

६. समितीच्या अहवालाचे प्रारूप मा. समिती प्रमुखांनी मान्य केल्यानंतर सदरहू अहवाल समितीच्या बैठकीत अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येतो.

७. समितीने प्रारूप अहवालास मान्यता दिल्यानंतर तो अहवाल छापण्यासाठी शासकीय मुद्रणालयात पाठविण्यात येतो व त्यानंतर मा.समिती प्रमुख सभागृहाला अहवाल सादर करतात.

समितीची कामे व अधिकार :—

महाराष्ट्र विधानसभा नियम २०६ मधील तरतुदीनुसार तसेच भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५१ (२) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे पुढील अहवाल सभागृहाला सादर केले जातात :—

१. विनियोजन लेखा अहवाल वित्तीय लेख्यांसह

२. महसुली क्षेत्र अहवाल

३. सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल

४. स्थानिक संस्था अहवाल

५. राज्य वित्त व्यवस्था अहवाल

६. आर्थिक क्षेत्र अहवाल

उक्त अहवाल सभागृहास सादर झाल्यानंतर त्यांची छाननी करण्याचे काम महाराष्ट्र विधानसभा नियम २०७ अन्वये लोकलेखा समिती करीत असते. त्याशिवाय समितीकडून (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (२) महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ व (३) महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळाचे वार्षिक अहवाल व लेखा विवरणाची छाननी करण्याचे कामदेखील केले जाते तसेच महालेखापालांनी एखाद्या बाबींसंदर्भात विशेष अहवाल सादर केला असल्यास त्याची छाननीदेखील लोकलेखा समितीकडून करण्यात येते.

महालेखापालांनी तयार केलेले विनियोजन लेखे अहवाल वित्तीय लेख्यांसह, सामान्य आणि सामाजिक क्षेत्र, महसुली क्षेत्र या संबंधातील अहवाल, स्थानिक संस्था अहवाल, राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल व आर्थिक क्षेत्र अहवाल शासनाकडून विधानमंडळाला सादर झाल्यानंतर संबंधित अहवालातील लेखापरीक्षा आक्षेपांबाबतची स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापालांच्या तपासणीनंतर सर्व संबंधित मंत्रालयीन विभागांकडून समितीकडे पाठविण्यात येतात.

संबंधित मंत्रालयीन विभागांकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने प्राप्त झाल्यानंतर महालेखापालांशी विचारविनिमय करून विचारात घ्यावयाच्या काही परिच्छेदांची समिती निवड करते. त्यानुसार मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या आधारे महालेखापालांच्या अहवालातील परिच्छेदाबाबत संबंधित विभागाच्या सचिवांची समिती साक्ष घेते. मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीचेवेळी महालेखापालांकडून समितीला मार्गदर्शन केले जाते, तसेच आवश्यकता भासल्यास साक्षीच्या वेळी एखाद्या विशिष्ट मुद्यासंदर्भात वित्त विभागाच्या सचिवांचेदेखील मत जाणून घेतले जाते.

विनियोजन लेखे तसेच, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालाचे परिनिरीक्षण करताना - विधानसभा नियम २०७ मधील खालील तरतुदींचे पालन केले जाते :—

१. (अ) खर्च केलेल्या लेख्यामध्ये ज्या रकमा दर्शविलेल्या असतील त्या रकमा ज्या सेवांकरिता किंवा प्रयोजनांकरिता वापरण्यात किंवा खर्च करण्यात आल्या, त्या सेवांकरिता किंवा कामांकरिता कायदेशीररीतीने उपलब्ध होणाऱ्या व वापरात येणाऱ्या होत्या,

(ब) ज्या प्राधिकरणाद्वारे खर्चाचे नियंत्रण होते त्या प्राधिकरणास अनुसरुन असा खर्च आहे, आणि—

(क) प्रत्येक पुनर्विनियोजन सक्षम प्राधिकाऱ्याने विहित केलेल्या नियमांस अनुसरुन करण्यात आले आहे, याबद्दल खात्री करून घेणे हे लोकलेखा समितीचे कर्तव्य आहे.

२. तसेच –

(अ) राज्य शासनाच्या वित्त लेख्यांचे व त्यावरील लेखापरीक्षा अहवालाचे परिनिरीक्षण करणे.

(ब) राज्याची महामंडळे, व्यापारविषयक व उत्पादनाविषयक योजना व प्रकल्प यांचे उत्पन्न व खर्च दाखविणारी लेखा विवरणे आणि मा. राज्यपालांनी तयार करण्याविषयी फर्माविले असेल, असा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यांच्या लेख्याची विवरणे किंवा एखाद्या विशिष्ट महामंडळ, व्यापारी संस्था किंवा प्रकल्प यांना भांडवल पुरविण्यासंबंधात नियमन करणाऱ्या वैधानिक नियमांच्या तरतुदी अन्वये तयार केलेला ताळेबंद नफा व तोटा पत्रक यांच्या लेख्यांची विवरणे व त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल तपासणे.

(क) ज्या बाबतीत मा.राज्यपालांनी कोणत्याही जमा रकमांचे लेखापरीक्षण करण्यासंबंधात किंवा साठा व मालासंबंधी लेखे तपासण्याबाबत नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना फर्माविले असेल, त्याबाबतीत त्यांच्या अहवालाचा विचार करणे हे देखील लोकलेखा समितीचे कर्तव्य आहे. परंतु समिती, सार्वजनिक उपक्रम समितीच्या कक्षेत येत असतील अशा सार्वजनिक उपक्रमासंबंधीची कामे पार पाडणार नाही.

३. कोणत्याही वित्तीय वर्षात कोणत्याही कामावर सभागृहाने त्यासाठी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम खर्च करण्यात आली असेल तर समिती अशी अधिक रक्कम ज्या परिस्थितीत खर्च झाली, त्या परिस्थितीचा प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या अनुरोधाने विचार करून तिला योग्य वाटेल अशी शिफारस करील.

(१) **विनियोजन लेखे व वित्तीय लेखे -छाननी**

समिती विनियोजन लेख्यांची छाननी करताना प्रामुख्याने खालील बाबी लक्षात घेते :—

(१) विधानमंडळाने मंजूर केलेल्या मागणीच्या मर्यादेत खर्च झाला आहे काय आणि मागणीमध्ये अभिप्रेत नसलेल्या प्रयोजनासाठी रकमा विनियोजित करण्यात आलेल्या नाहीत, याची तपासणी करणे.

(२) विधिमंडळाने ज्या उद्दीष्टांसाठी, जितक्या रकमेस मंजुरी दिली आहे त्यापेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात आली असल्यास अशा प्रकारची जादा रक्कम खर्च होण्यास कारणीभूत झालेल्या परिस्थितीची तपासणी करणे आणि झालेला अधिक खर्च नियमानुकूल करण्याबाबत शिफारस करणे.

या प्रयोजनार्थ विभागाची आकडेवारी आणि महालेखापालांनी नोंदविलेला खर्च यामध्ये ताळमेळ असला पाहिजे, तरच समितीला कोणत्याही अनुदानित सेवेवर प्रत्यक्षात किती रक्कम खर्च झाली आहे याची परिपूर्ण माहिती मिळू शकते. उक्त मेळ बसविण्यासाठी अर्थसंकल्प नियमावलीमध्ये (Budget Manual) एक पद्धती ठरवून दिलेली आहे. या पद्धतीमध्ये विभागीय लेखे, बिनचूक असल्याची खात्री करण्याचा उद्देश असतो. विभागीय नियंत्रण ख-या अर्थाने परिणामकारक करण्यासाठी आणि लेख्यातील गैरवर्गीकरण आणि इतर चुका यांना प्रतिबंध करण्यासाठी आकडेवारीचा मेळ घालण्याचे काम आवश्यक असते. अचूक आकडेवारी समितीला उपलब्ध झाल्यास अनुदानात प्रत्यक्षात किती बचत झाली किंवा किती अधिक खर्च झाला त्यानुसार बचत व अधिक खर्चाची कारणमिमांसा करून, त्यासंबंधी योग्य ती शिफारस समितीला करता येते.

विधानमंडळाने एकूण अनुदानाला मान्यता दिल्यावर, त्या अनुदानामध्ये समाविष्ट झालेल्या विविध प्रकल्पांसाठी वा कार्यक्रमासाठी तरतुदींना मान्यता मिळते. तथापि, आवश्यक ती तरतूद करूनही रक्कम खर्च न झाल्यास विभागाकडून एका प्रकल्पावरुन रक्कम काढून दुस-या प्रकल्पाचा अधिक खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजन केले जाते व असे पुनर्विनियोजन काही नवीन खर्चाच्या बाबीसाठी (New Items) केले असल्यास वर्षभरातील अशी पुनर्विनियोजनांची माहिती वर्ष संपण्यापूर्वी विधानमंडळापुढे ठेवणे आवश्यक आहे.

नवीन सेवा :- "नवीन सेवा" म्हणजे खर्चाची नवीन बाब होय. नवीन सेवेमध्ये नवीन धोरणाच्या कार्याचा स्विकार, नवीन सवलती किंवा सध्या असलेल्या सवलतीमध्ये मोठे बदल यांचा समावेश होतो. त्यामुळे नवीन सेवेमध्ये "सेवेचा नवीन प्रकार" किंवा "सेवेचे नवीन निमित्त" यांचासुद्धा समावेश होतो. थोडक्यात "नवीन सेवा" म्हणजे एखादी सेवा अथवा प्रयोजन यावरील जो खर्च विधानमंडळाकडून पूर्वी कधी मान्य केलेला नाही असा खर्च. अशा प्रकरणामध्ये कितीही खर्चाचा अंतर्भाव असला तरी त्यास विधानमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता असते. "सेवेतील नवीन निमित्त" या संज्ञेचा अर्थ एखाद्या विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त खर्चाच्या बाबी असा समजला जातो. एखादी बाब "सेवेचे नवीन निमित्त" ठरविल्यानंतर त्यावरील खर्च करण्यापूर्वी त्यास विधानमंडळाची अधिकृत मंजुरी मिळविण्यासाठी ती बाब "सेवेचा नवीन प्रकार" समजून त्यावर कार्यवाही करावयाची असते. बहुतेक प्रकरणांत खर्चाच्या नवीन बाबी हे "सेवेतील नवीन निमित्त" असते. खर्चाची एखादी बाब "सेवेतील नवीन निमित्त" ठरते किंवा नाही, हे ठरविण्यासाठी काही वित्तीय मर्यादा असतात. लोकलेखा समितीने अलिकडेच खर्चाच्या नवीन बाबी आणि नवीन प्रमुख कामे याकरिता असलेल्या खर्चविषयक मर्यादांमध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार महत्वाच्या वस्तुंच्या किंमतीत झालेली सर्वसाधारण वाढ लक्षात घेऊन समितीने सध्या अस्तित्वात असलेल्या वित्तीय मर्यादेत पुढीलप्रमाणे वाढ करण्याची शिफारस आपल्या सन १९९४-९५ च्या २६ व्या अहवालात केली आहे :-

आवर्ती	रु. २,००,०००	(रु.दोन लाख)
अनावर्ती	रु. २०,००,०००	(रु.वीस लाख)
नवीन प्रमुख कामे	रु. २०,००,०००	(रु.वीस लाख)

त्याचप्रमाणे समितीने आणखी अशीही एक शिफारस केली आहे की, मंजूर करण्यात आलेल्या उपरोक्त मर्यादेपेक्षा नवीन कामावरील खर्च कमी असला तरी, अशा कामांच्या बाबींपुढे तपशीलवार अंदाजपत्रक भाग-२ यात दर्शविला पाहिजे, जेणेकरून अर्थसंकल्पीय प्रकाशनातून अशा बाबी शोधून काढणे विधीमंडळाच्या सदस्यांना सोईचे होईल.

(२) **महसुली क्षेत्र अहवाल :—**

सन १९७२-७३ पासून महसुली लेखापरीक्षण करण्याची कार्यपद्धती समितीने सुरु केली असून त्यानुसार महसुली क्षेत्राचा वेगळा अहवाल सभागृहाला सादर करण्यास सुरुवात झाली.

महसुली क्षेत्र अहवालात राज्यातील विक्रीकर, राज्य उत्पादन शुल्क, जमीन महसूल, वाहनांवरील कर, मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी तसेच, इतर करप्राप्त व करेतर जमा रकमा (Other Tax And Non-Tax Receipts) यांच्या लेखापरीक्षणामध्ये महालेखापरीक्षकांच्या निदर्शनास आलेली काही विशिष्ट प्रकरणे व महत्त्वाचे मुद्दे यांचा परामर्श घेण्यात आलेला असतो.

महसुली क्षेत्र अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर संबंधीत विभागांकडून अहवालातील लेखा आक्षेपांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मागविली जातात. अहवालाचे परीक्षण करताना महालेखापालांच्या सल्ल्याने समिती त्यातील काही विभागांची निवड करते, तसेच त्या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येते व त्याआधारे अहवाल तयार करून तो विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केला जातो.

(३) **सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल :—**

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालात राज्याच्या एका विशिष्ट वर्षासाठीच्या वित्तीय व विनियोजन लेख्यांवरील महालेखापरीक्षकांचे अभिप्राय असलेली प्रकरणे आणि शासनाच्या काही निवडक योजना व कार्यक्रम यांचे तसेच वित्तीय व्यवहारांचे लेखापरीक्षण यांवर आधारीत असलेली लेखापरीक्षणांची प्रकरणे समाविष्ट असतात.

पूर्वी लेखापरीक्षण हे अनियमितता, निधीचा अपहार अथवा वित्तीय नियमांचे पालन न करणे अशा प्रकरणापुरतेच मर्यादीत होते. परंतु लेखापरीक्षण करण्याच्या स्वरूपात मध्यंतरी बदल करण्यात आला असून त्यानुसार आता लेखापरीक्षणामध्ये राज्यातील अनेक योजनांचा/कार्यक्रमांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी व कामगिरीवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने प्रामुख्याने भर दिला जातो.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल सभागृहांना सादर झाल्यानंतर संबंधीत विभागाकडून अहवालातील लेखा आक्षेपांवरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मागविली जातात. अहवालाचे परीक्षण करताना महालेखापालांच्या सल्ल्याने समिती त्यातील काही परिच्छेदांची निवड करते व त्या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येते. सचिवांच्या साक्षीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे समितीचा अहवाल तयार करून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केला जातो.

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालात उल्लेखित एखादा प्रकल्प, बांधकाम वा योजनेच्या संदर्भात महालेखापालांनी दिलेले अभिप्राय व त्या संदर्भात संबंधित विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाद्वारे पुरविलेली लेखी माहिती तसेच साक्षीच्यावेळी समितीने विचारात घेतलेल्या विषयासंदर्भात एखाद्या प्रकल्पाची अथवा योजनेची प्रत्यक्ष जागेवर जाऊन

पहाणी करून त्याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे असे समितीला वाटले तर समिती त्या प्रकल्पाला/ योजनेला/ठिकाणाला प्रत्यक्ष भेट देऊन त्याचे काम कसे चालते, त्यावर होणारा खर्च यथायोग्य आहे किंवा नाही, याची पहाणी करते. अशा प्रत्यक्ष भेटीमुळे समितीला त्या विषयाच्या संदर्भात इत्थंभूत माहिती मिळते व त्यामुळे अहवालात परिपूर्ण शिफारशी करण्यास मदत होते. समितीला विभागीय प्रतिनिधीच्या साक्षीद्वारे मिळालेली माहिती व स्पष्टीकरणात्मक ज्ञापने यांच्याआधारे समितीचे अभिप्राय व शिफारशींचा समावेश असलेला अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर करता येतो.

समितीने आतापर्यंत तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प, मिठी नदी आकुंचन पावणारे जलग्रहण, पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यामध्ये होणारा विलंब (मोरबे धरण), शेतकरी पॅकेजेसचे कार्यसिद्धी लेखापरीक्षण इत्यादी विषयावर आपले अहवाल सभागृहाला सादर करून सदरहू अहवालामध्ये महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत. अहवालातील शिफारशींवर शासनाकडून अग्रक्रमाने कारवाई केली जाते. त्यामुळे एकप्रकारे शासकीय यंत्रणेस समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने भावी काळात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या कामकाजात सुधारणा करण्यास मदत होते.

(४) **स्थानिक संस्था अहवाल :—**

सन २००५-०६ पासून स्थानिक संस्था लेखापरीक्षण करण्याची कार्यपद्धती सुरु करण्यात आली असून, त्यानुसार स्थानिक संस्थांचा वेगळा अहवाल सभागृहांना सादर करण्यास सुरुवात झाली आहे.

स्थानिक संस्था अहवालात पंचायत राज संस्था व महानगरपालिका यांच्या लेक्षापरीक्षणाबाबत महालेखापरीक्षकांनी परामर्श घेतला आहे.

स्थानिक संस्था अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर संबंधित विभागाकडून अहवालातील लेखा आक्षेपावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मागविली जातात. अहवालाचे परिक्षण करताना महालेखापालांच्या सल्ल्याने समिती त्यातील काही विभागांची निवड करते, त्या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या आधारे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येते व त्या आधारे अहवाल तयार करून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केला जातो.

(५) **राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल :—**

सन २००८-०९ पासून राज्य वित्त व्यवस्थेवरील स्वतंत्र अहवाल सभागृहांस सादर करण्याची सुरुवात झालेली आहे.

राज्य शासनाच्या वित्तीय लेख्यांच्या आणि विनियोजन लेख्यांच्या तपासणीतून उद्‌भवलेल्या बाबीमधून लेखापरीक्षा निष्कर्षाचा समावेश सदर अहवालात असतो.

राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल सभागृहाला सादर झाल्यानंतर संबंधित विभागाकडून अहवालातील समाविष्ट बाबींसंबंधी स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखाकार यांच्याकडून संमत करून वित्त विभागामार्फत या सचिवालयाकडे मागविण्यात येतात.

(६) **आर्थिक क्षेत्र अहवाल :—**

सन २०११-१२ पासून आर्थिक क्षेत्रावरील स्वतंत्र अहवाल सभागृहांस सादर करण्याची सुरुवात झालेली आहे.

हा अहवाल आर्थिक क्षेत्रांतर्गत येणाऱ्या शासकीय विभागांचे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेद्वारे निर्गमित नियंत्रक - महालेखापरिक्षक (कर्तव्य, शक्ती आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ आणि त्याअंतर्गत निर्गमित लेखा व लेखापरिक्षा विनियम, २००७ यांच्या तरतुदींतर्गत केलेल्या लेखापरिक्षणाशी संबंधित आहे.

हा अहवाल महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक क्षेत्रामध्ये निवडक कार्यक्रम आणि कार्ये यांच्या कार्यसिद्धी लेखापरिक्षण आणि शासकीय विभाग व स्वायत्त संस्था यांच्या अनुपालन लेखापरिक्षणातून उद्‌भवलेल्या बाबींसंदर्भात असतो.

अनुपालन अहवाल :-

समितीचा अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर झाल्यानंतर त्याच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी शासनाच्या संबंधित विभागांना पाठविल्या जातात. सदरहू अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती ज्ञापनाद्वारे महालेखापालांकडून तपासून घेऊन विभागाकडून समितीला पाठविली जाते. ही सर्व ज्ञापने नियोजित वेळेत समितीसमोर विचारार्थ सादर केली जातात. समितीने केलेल्या शिफारशींवर शासनाने केलेली कार्यवाही समाधानकारक न वाटल्यास त्याबाबतचा सविस्तर खुलासा विभागाकडून मागविण्यात येतो व आवश्यकता भासल्यास संबंधित विभागाच्या सचिवांना समितीसमोर साक्षीसाठीही बोलाविले जाते. शासनाने पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाच्या आधारे आवश्यकता भासल्यास त्यावरील समितीचा अनुपालन अहवाल (Action Taken Report) विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात येतो.

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या राज्याच्या हिशेबांवरील लेखापरीक्षण अहवालाच्या सहाय्याने शासनाच्या खर्चाची छाननी करण्याचे काम समितीकडून प्रामुख्याने केले जात असले तरी समितीने केवळ अनियमितता, आर्थिक नियमांचा भंग आणि अशा अन्य बाबी विचारात घेण्यापर्यंतच आपले काम सिमित न ठेवता खर्चाच्या औपचारिकतेपलीकडे जाऊन त्या खर्चाची विश्वासार्हता, त्या खर्चात काटकसर करता येणे शक्य होते काय ? याबाबींचा विवेकपूर्ण विचार करून त्यांचे परीक्षण करण्यापर्यंत आपल्या कामाची व्याप्ती वाढविली आहे.

आर्थिक नियमांचे अधिक काटेकोरपणे पालन करण्याचा आग्रह :-

समितीने आता आर्थिक औचित्याच्या नियमांचे अधिक काटेकोरपणे पालन करण्याचा आग्रह धरण्यास सुरुवात केली आहे. पूर्वी लेखापरीक्षा भाष्य (comments) ही अनियमितता, अफरातफरी आणि विहित आर्थिक नियमांचे पालन न करणे याबाबतच्या प्रकरणांपर्यंतच मर्यादित होती. तथापि, आता राज्यातील यथास्थिति, संपादणूक किंवा तूट ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी प्रत्येक कामाचा योजनाबद्ध आढावा घेण्यासाठी लेखापरीक्षकांनी सुरुवात केली आहे. महसुली लेखापरीक्षणास प्रारंभ केल्यापासून राज्याचा महसुली जमा रकमांचा वेगळा अहवाल सन १९७२-७३ पासून सभागृहाच्या पटलावर ठेवला जातो.

समितीच्या शिफारशी या स्थूलमानाने शासनाच्या महसूली रक्कमांची वसूली, पाटबंधारे प्रकल्प आणि उपलब्ध सिंचनक्षमतेचा अनुकूल वापर, एकात्मिकृत ग्रामीण विकास कार्यक्रम, पोषण आहार कार्यक्रम यासारख्या सामाजिक, आर्थिक कार्यांशी संबंधित अशा योजनांतर्गत कामांचे मूल्यमापन आणि खर्चावर प्रभावी नियंत्रण, याप्रकारच्या विषयासंबंधी केल्या आहेत.

समितीने आपले काम लेखापरीक्षणाच्या अभिप्रायांपुरते मर्यादित न ठेवता शासनाच्या कार्यक्षमतेत सुधारणा होण्याच्या दृष्टीनेही अनेक महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत. समितीच्या बहुतेक सर्व शिफारशी शासनाने स्विकारलेल्या आहेत आणि काही प्रकरणे वगळता त्या सर्व प्रकरणांवर कार्यवाही केलेली आहे याची देखील नोंद घेणे उल्लेखनीय ठरेल.

लोकलेखा समितीच्या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस **सन २००४-२००९ (अकरावी विधानसभा) सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा)** या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील **लोकलेखा समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी** :-

लोकलेखा समितीने **सन २००४-२००९ (अकरावी विधानसभा)** या कालावधीत महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस एकूण **१५ अहवाल** सादर केले असून या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत:-

(१) **चौथा अहवाल (२००५-२००६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन १९९८-९९ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील.)**

जलसंपदा विभाग :- तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प :- सन १९९० मध्ये झालेल्या आंतरराज्य करारानुसार या प्रकल्पाचा खर्च महाराष्ट्र व गोवा राज्यांकडून अनुक्रमे २६.७० व ७३.३ या प्रमाणात करावयाचा आहे. त्यातील ५८ टक्के पाणी गोवा सरकारला देण्यात येणार आहे आणि महाराष्ट्र सरकारला ४२ टक्के पाणी या प्रकल्पातून उपलब्ध होणार आहे. गोवा शासनाकडून या प्रकल्पाच्या कामाचे १९५ कोटी रुपये यावयास पाहिजे. गोवा सरकारने १९५ कोटी रुपये न दिल्यामुळे व त्या ठिकाणाच्या साधनसंपत्तीमध्ये आपल्याला मर्यादा असल्यामुळे या प्रकल्पांच्या कामासाठी महाराष्ट्र शासन संपूर्णपणे अनुदान उपलब्ध करून देऊ शकत नाही. गोवा राज्याकडून आतापर्यंत २००.९५ कोटी रुपये प्राप्त झाले असून, १९७.६१ कोटी रुपये अद्याप मिळावयाचे आहे. प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने रुपये १९७.६१ कोटी रुपये जास्तीचे खर्च केले असून गोवा शासनाने त्यांच्या हिश्याची रक्कम देणे गरजचे आहे. सदर रक्कम मिळाली तरच हा पाटबंधारे प्रकल्प पूर्ण होऊ शकेल. तथापि, गोवा राज्याने मागील तिन्ही वर्षी या प्रकल्पाला निधी दिलेला नाही. असे मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग कोकण प्रदेश मंडळ यांनी समितीस सांगितले.

लोकलेखा समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २००५ रोजी गोवा राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सदर प्रकल्पाबाबत चर्चा केली चर्चेच्या वेळी याबाबत माहिती देताना मा.समिती प्रमुख, लोकलेखा समिती महाराष्ट्र विधानमंडळ यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने दिनांक २० सप्टेंबर, २००५ रोजी तिलारी प्रकल्पाला भेट दिली आहे.

तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्पाचे काम सन १९७९ पासून सुरु असून आतापर्यंत हा प्रकल्प पूर्ण झालेला नाही, हे लक्षात घेऊन समितीने या प्रकरणी सविस्तर माहिती घेतली असता, समितीच्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र व गोवा राज्याचा हा संयुक्त प्रकल्प असून, एकूण खर्चाच्या ७३.३०% रक्कम गोवा राज्याने द्यावयाची आहे

व २६.७०% रक्कम महाराष्ट्र राज्याने द्यावायाची आहे. त्यानुसार महाराष्ट्राने आपल्या हिश्श्याचा सर्व खर्च केलेला आहे. सदरहू प्रकल्पाचे ८०% काम पूर्ण झाले आहे. गोवा राज्याला या प्रकल्पात जे पाणी जमा होईल, त्यातील ५८% पाणी देण्यात येणार आहे, असे असूनही याबाबत गोवा राज्याकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने प्रकल्पाला होत असलेला विलंब लक्षात घेऊन समितीने सदरहू प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करावी व मा.मुख्यमंत्री, गोवा राज्य यांची भेट घेऊन गोवा राज्याचे १९६ कोटी रुपयांचे येणे आहे ते त्यांच्याकडून मिळविण्याचा प्रयत्न करावा, या हेतूने समितीने तिलारी प्रकल्पाला भेट दिली. त्यानंतर मा.मुख्यमंत्री, गोवा राज्य यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यामध्ये गोवा राज्याचा जास्तीत जास्त कसा फायदा आहे हे त्यांना पटवून दिले. त्यांची फलनिष्पत्ती म्हणून गोव्याच्या मुख्यमंत्र्यांनी बैठकीच्या वेळी ताबडतोब १५ कोटी देऊ व त्यानंतर २-३ महिन्यात ३५ कोटी रुपये देऊ अशा प्रकारे ५० कोटी रुपये देण्यात येतील असे आश्वासन दिले

लोकलेखा समितीच्या इतिहासात समितीने एखाद्या परराज्यातील मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष भेटून अशा प्रकारे मदत मिळवून, अडलेला प्रकल्प मार्गी लावल्याचे असे उदाहरण क्वचितच असेल. **गोवा राज्याकडून त्यांचा देय असलेला निधी मिळणार असल्याने निधीच्या उपलब्धतेनुसार प्राथम्यक्रम ठरवून घेण्याची कार्यपद्धती अवलंबून विभागाने सत्वर पावले उचलून, सदरहू प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे अशी ही समिती शिफारस करते.**

(२) **दहावा अहवाल (२००७-२००८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी अहवालावरील.)**

नगरविकास/महसूल व वन (महसूल) विभाग :- मिठी नदी आकुंचन पावणारे जलग्रहण :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या नागरी (महाराष्ट्रातील पूर पूर्व तयारी व प्रतिसाद यांचे कार्यसिद्धी लेखापरिक्षण) अहवालामधील परिच्छेद क्रमांक २.२.२ मिठी नदी आकुंचन पावणारे जलग्रहण याबाबत पुढील अभ्रिपाय व्यक्त केले आहेत.

मुंबई मधून वाहणाऱ्या मिठी नदीवरील अतिक्रमणामुळे दिनांक २६ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा न झाल्याने मिठी नदीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वित्त व मनुष्यहानी झाली. यावर तातडीचे उपाय म्हणून शासनाने मिठी नदीतील गाळ काढणे व पात्राचे रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार २००६ च्या पावसाळ्यापूर्वी गाळ काढणे व नदीचे पात्र रुंद करण्याचा ठेका देण्यात आला. ठेकेदारांनी व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने केलेल्या कामामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या. **महालेखापालांनी काढलेल्या त्रुटींवर मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण समाधानकारक उत्तरे देवू शकले नाही तर अहवाल लोकलेखा समिती समोर चर्चेला आल्यानंतर राबोळी, जिल्हा ठाणे येथे केलेल्या राशिपातन** (Dumping) **संदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या १० मुद्यांबाबत चौकशी करून कारवाई करण्याबाबत समितीने शिफारस केली.**

(३) **तेरावा अहवाल (२००८-२००९) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०००-२००१ या वर्षाच्या नागरी अहवालावरील.)**

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग:- पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यामधील विलंब (मोरबे धरण) - या योजनेसाठी सिडकोने निधी उपलब्ध करून देण्याचे थांबविल्यामुळे, या योजनेची कामे एप्रिल, १९९९ पासून निधी अभावी पूर्णतः बंद आहेत.

या योजनेवर मंजूर रूपये १७०.३९ कोटी खर्चापैकी सिडकोचा खर्चाचा वाटा रूपये १३०.६३ कोटी इतका होता. परंतु सिडकोने रूपये ४६.४१ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करून दिली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या योजनेकरिता इतर स्त्रोतातून रक्कम उभारुन योजनेवर खर्च केला आहे.

सिडकोकडून मोरबे धरणासाठी निधी न देण्याच्या बऱ्याच कारणांपैकी प्रमुख कारण हे की, नवी मुंबईची सिडकोने अंदाज केल्याप्रमाणे लोकसंख्या वाढली नसल्याने प्रत्यक्षातील पाण्याची गरज अपेक्षिल्यापेक्षा कमी झाली. तसेच सिडकोने मोरबे धरण योजनेस मान्यता दिल्यानंतर, हेटवणे धरणातील १०० द.ल.लि. पाणी नवी मुंबई भागात आणण्याकरिता मोठ्या प्रमाणात निधी गुंतवणूक करून ती योजना पूर्ण केल्यामुळे व त्या योजनेतील पाणी आधी वापर करावयाचे धोरण अवलंबल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे.

नवी मुंबई आणि त्या भागाचा विकास करताना तेथील पाणीपुरवठ्याची गरज वाढेल, म्हणून शासनाने सन १९८५ मध्ये मोरबे धरणाच्या नियोजनाला सुरुवात केली. मोरबे धरणाची मूळ किंमत २७.७५ कोटी रुपये होती. परंतु या धरणाच्या भूसंपादनाच्या बाबतीत वाद निर्माण झाला तसेच त्याठिकाणी पूरही आला. त्यामुळे लगेचच या धरणाच्या कामाला सुरुवात होऊ शकली नाही. त्यामुळे सन १९८९ मध्ये या धरणाचे अंदाजपत्रक सुधारित करण्यात आले.

सिडको हे त्या भागाचे नियोजन प्राधिकरण असल्यामुळे, सिडकोने हे शहर विकसित करण्यासाठी सन १९९१-९२ मध्ये या प्रकल्पातून पाणी घेण्याची इच्छा प्रकट केली. त्यामुळे या प्रकल्पावर जो खर्च होईल तो करण्यास सिडकोने सहमती दर्शविली. त्यानुसार करार झाला व त्या करारानुसार सन १९९७ मध्ये सुरुवातीला सिडकोने पैसे दिले, पण नंतर माघार घेतली. कारण नवी मुंबईची लोकसंख्या २००० सालापर्यंत ११ लाखापर्यंत वाढावयास पाहिजे होती तेवढी लोकसंख्या वाढली नाही म्हणून सन १९९९ मध्ये सिडकोने निधी देण्याचे पूर्णपणे बंद केले त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी बंद करण्यात आली. ही बाब लक्षात घेता **सिडकोचा हा निर्णय विवेकशून्य होता असे समितीला वाटले.** कारण सिडको त्या भागाचे नियोजन प्राधिकरण असल्यामुळे **तेथे सिडकोला शहर विकसित करावयाचे होते त्यासाठी तेथील लोकांना पाणी ही प्राथमिक सुविधा प्राधान्याने देणे सिडकोचे आद्यकर्तव्य असतानाही सिडकोने ही जबाबदारी पार पाडलेली नाही.** अजूनही नवी मुंबईतील काही भागातील रहिवाश्यांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. पाण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर अवलंबून राहावे लागत आहे. दिवसातून सकाळी एक तास व संध्याकाळी एक तास एवढा अल्प पाणीपुरवठा करण्यात येतो. असे असतानाही नवी मुंबईतील लोकसंख्या वाढली नाही, असे म्हणणे समितीची दिशाभूल करणारे आहे. सबब, **याप्रकरणी केलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करून ते पूर्णात्वाने तडीस न नेण्यास जबाबदार असणाऱ्या सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यावर नगरविकास विभागाने तातडीने कारवाई करावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.** या योजनेची मूळ किंमत टप्पा क्र.१ मध्ये २७.७५ कोटी रुपये होती. परंतु ही रक्कम ३८३.४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. ही बाब लक्षात घेता **या प्रकरणी सिडकोला जबाबदार धरण्यात यावे असे समितीचे स्पष्ट मत आहे. अशी शिफारस समितीने आपल्या सन २००८-२००९ या वर्षाच्या तेराव्या अहवालात परिच्छेद क्र.३.४९ मध्ये केली आहे. या प्रकल्पाचे काम रखडल्यामुळे या प्रकल्पाची किंमत ७० कोटी रुपयांवरुन ३८३ कोटी रुपयांवर गेली. म्हणजे शासनाच्या निधीचा अपव्यय या प्रकरणी झाला असे समितीचे स्पष्ट मत आहे.**

(४) **पंधरावा अहवाल (२००८-२००९) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या नागरी (शेतकरी पॅकेजेस्चे कार्यसिद्धी लेखा परिक्षण) अहवालावरील.)**

कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय (कृषी) विभाग :- शेतकरी पॅकेजेस्चे कार्यसिद्धी लेखा परिक्षण :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २००६-२००७ या वर्षाचा नागरी अहवाल (शेतकरी पॅकेजेस्चे कार्यसिद्धी लेखापरिक्षण) दिनांक २५ एप्रिल, २००८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात आला होता. शेतकऱ्यांसाठीच्या पॅकेजेस्चे कार्यसिद्धी लेखापरीक्षण असलेला भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल संविधानाच्या अनुच्छेद १५१ अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपाल महोदयांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांनी महाराष्ट्राच्या विदर्भ भागातील शेतकऱ्यांवरील कृषीजन्य तणाव कमी करण्याकरिता शेतकऱ्यांसाठी घोषित केलेल्या पॅकेजेस्चे कार्यान्वयन करणाऱ्या विविध यंत्रणा, महसूल आणि वन, मदत व पुनर्वसन, कृषि व पदुम, सहकार व वस्त्रोद्योग, महिला व बालविकास, जलसंपदा इत्यादी विभागांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीद्वारे मार्च २००७ पर्यंतच्या कामाचे हे लेखापरीक्षण करण्यात आले.

विदर्भातील सहा जिल्ह्यांत २००३-२००४ मध्ये आत्महत्यांची संख्या १४६ पासून २००४-२००५ मध्ये ४५५ पर्यन्त वेगाने वाढली. परिणामी शासनाने डिसेंबर,२००५ मध्ये रुपये १,०७५ कोटींची तरतुद असलेले शेतकऱ्यांसाठीचे "विशेष पॅकेज" जाहीर केले. तरीही आत्महत्या वाढतच राहिल्या आणि सन २००६-२००७ मध्ये तर आत्महत्यांचा हा आकडा १४१४ पर्यन्त वाढला. भारत सरकारने शेतकऱ्यांचा तणाव कमी करण्यासाठी विशेष पुनर्वसन पॅकेज जाहीर केले. त्यामध्ये महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ आणि वर्धा या सहा जिल्हयांचा अंतर्भाव करण्यात आला होता. या कार्यक्रमाअंतर्गत करण्यात आलेली रूपये ३,७५० कोटींची रक्कम ३ वर्षात वापरावयाची होती. त्यात विदर्भातील आत्महत्याग्रस्त ६ जिल्हयांतील कृषीजन्य तणाव नाहीसा करून शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करण्याकरीता दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या उपाययोजनांचा समावेश होता. या पॅकेजमध्ये कर्जाचे पुनर्निर्धारण, बियाणे बदलून देणे, आश्वासित सिंचन सुविधा, शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न वाढविण्याकरीता आर्थिक सहाय्य, सामुहिक विवाह, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने मदत, पंतप्रधानांच्या राष्ट्रीय मदत निधीमधून शिक्षणाकरीता व वैद्यकीय गरजा भागविण्याकरीता शेतकऱ्यांना सानुग्रह मदत देणे इत्यादीचा समावेश होता.

लोकलेखा समितीने **२००९-२०१४ (बारावी विधानसभा)** या कालावधीत महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर केलेल्या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :—

(५) **अकरावा अहवाल (२०१२-२०१३) (महाराष्ट्र शासनाच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी.)**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग :- मध्यान्होत्तर भोजन योजनेचा लाभ सर्वच विद्यार्थ्यांना मिळणे :- शिक्षणाचा अधिकार हा केंद्र शासनाचा कायदा असून राज्य शासनाचा या योजनेमध्ये ४५% हिस्सा असून ५५% केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होतो. मध्यान्होत्तर भोजन योजना ही खाजगी विना अनुदानित विद्यालयांमध्ये दिली जात नाही. परंतु, हा भेदभाव विना अनुदानित व अनुदानित विद्यालयांमध्ये करणे उचित नाही त्यामुळे सर्व **विद्यार्थ्यांना मध्यान्होत्तर भोजन योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

(६) **बारावा अहवाल (२०१२-२०१३) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ करिता पायाभूत सुविधा विकास अहवालावरील.)**

शालेय शिक्षण व क्रीडा (क्रीडा) विभाग :- युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्याचे क्रीडा धोरण योग्य प्रकारे अंमलात आणणे :- क्रीडा संकुलात ज्या-ज्या खेळांसाठी सभागृहे/क्रीडांगणे तयार केली आहेत. त्यांचा राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेनंतर योग्य प्रमाणात वापर न झाल्याने अस्तित्वात असलेली यंत्रणा पूर्णत: कार्यान्वित नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींकडे निधीबाबत समितीने चौकशी केली असता या क्रीडा संकुलाच्या देखभाल/दुरूस्तीकरिता अत्यंत कमी निधी प्राप्त होतो असे कळाले. त्यामुळे रुपये ५००-५५० कोटी एवढा खर्च एखाद्या स्पर्धेदरम्यान करून जी मालमत्ता तयार करण्यात येते त्या मालमत्तेची देखभाल निधीअभावी होत नाही. राज्याचा क्रीडा विभाग याबाबत किती अनुत्साही आहे याचे शिव छत्रपती क्रीडा संकुल हे उत्तम उदाहरण आहे. युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्याचे क्रीडा धोरण अत्यंत योग्य प्रकारे अंमलात आणणे आवश्यक आहे व या करीता शासनाचा यात मोठा वाटा आहे. त्यामुळे **शासनाने शिव छत्रपती क्रीडा संकुलाची देखभाल होण्यासाठी क्रीडा विभागास आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना आवश्यक त्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.** तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी देखील क्रीडा संकुलातील साधनांचा वापर उत्तम प्रकारे होण्यासाठी या सोयीसुविधांचा वापर करण्यास इच्छुक असणाऱ्या खाजगी व्यक्ती वा संस्था यांचेकडून विहित प्रमाणात शुल्क आकारुन त्याचा वापर करु दिल्यास आपल्या मालमत्तेची देखभाल होण्यास मदतच होईल. तसेच **रायफल शुटींग खेळामध्ये ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील स्पर्धक व विशेषत: मुली आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे नाव उंचावित आहेत. या स्पर्धकांना याचा फायदा होईल व त्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती पाऊले उचलावीत, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(७) **पंधरावा अहवाल (२०१२-२०१३) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ च्या महसुली अहवालावरील.)**

महसूल व वन (वन) विभाग :- वनक्षेत्र आगीपासून वाचविण्याकरिता फायर लाईन्सची उभारणी करण्याकरिता निधी उपलब्ध करणे :- समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाच्या निदेशानुसार एकूण अर्थसंकल्पाच्या दोन टक्के निधी वनविभागासाठी अर्थसंकल्पामध्ये उपलब्ध करण्यात येतो ही बाब समितीच्या निदर्शनास आणली. राज्यामध्ये सन २०१२-१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४९३ कोटी इतकी वन विभागाने मागणी करूनही केवळ ९४ कोटी इतकाच निधी उपलब्ध करून दिला गेला. फायरलाईन्स उभारण्यासाठी जवळपास ९२ कोटी निधी आवश्यक असताना केवळ १२.८५ कोटी निधी मिळाल्याचे समितीच्या निदर्शनास आणले गेले. **वनक्षेत्रास आगीच्या भक्ष्यस्थानी जाण्यापासून रोखायचे असल्यास फायर लाईन्सची उभारणी फार मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. त्याकरिता निधी अपुरा पडत आहे असे समितीचे मत आहे. वन विभागाकरिता अर्थसंकल्पामध्ये भरीव निधीची तरतूद करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(८) **सोळावा अहवाल (२०१२-२०१३) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसुली जमा अहवालावरील.)**

महसूल व वन (महसुल) विभाग :- अनधिकृत केबल व्यवसायास प्रतिबंध करणे :- महसूल विभागाने करमणूक करासंबंधी योग्य नियंत्रण ठेवल्यास शासनाचा जवळपास १ हजार कोटी रुपयांचा कर वाढणार आहे, असा समितीचा प्राथमिक अंदाज आहे. कराद्वारे शासनाच्या महसूलात वाढ करणे शासकीय अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. तांत्रिक ज्ञान नसणाऱ्या व्यक्तींकडून कामे केली जात असल्यामुळे शासनाचा कर बुडत आहे. हॉस्पिटल, हॉटेल या ठिकाणी एकाच केबल कनेक्शनवर ५०-१०० टिव्हींकरिता अंतर्गत केबल कनेक्शन दिली जातात. नोंद होताना फक्त एका केबल कनेक्शनचीच नोंद होते. अशा प्रकारे **हॉटेल्स, हॉस्पिटल्स या संस्था मोठ्या प्रमाणात करमणूक कर बुडवित आहेत. त्यांचेकडे असलेल्या केबलची नोंदच होत नाही,** हा मुद्दा महत्त्वाचा आहे. **त्यामुळे विभागाने या संदर्भातील कायद्यात दुरूस्ती करण्याबाबत पावले उचलली पाहिजेत, अशी समितीची शिफारस आहे.**

महसूल विभागाकडे कुशल तांत्रिक कामगार नाहीत. त्यामुळे **महसूल विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सेट टॉप बॉक्स, डीटीएच संदर्भात कर वसुली करण्यासाठी एक सल्लागार समिती तात्काळ नेमावी. मुंबई शहर व उपनगरे वगळता राज्यातील इतर भागांत कर वसुली करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्याच्या दृष्टीने देखिल विचार करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

या प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे, गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी थैमान घातले आहे, सरकार या संदर्भात पूर्णपणे उदासीन आहे. केबल कनेक्शन्सच्या माध्यमातून शासनाला करमणूक करापोटी फक्त ९४ कोटी रुपये उत्पन्न मिळते. वास्तविक एवढे उत्पन्न एकट्या मुंबई शहरातून मिळावयास हवे. संपूर्ण महाराष्ट्रात कमीत कमी ५०० कोटी रुपये उत्पन्न केबल कनेक्शनच्या माध्यमातून सरकारला मिळणार आहे, परंतु त्यावर महसूल विभाग पाणी सोडत आहे. सर्वसामान्यांच्या खिशातून पैसे जात आहेत, त्याचा फायदा नको त्या वर्गाला मिळत आहे. कायद्यामध्ये शासनाने सुधारणा केली नाही. विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण करण्यात आले आहे. केंद्र सरकारने चार मेट्रो शहरांना डिजिटायझेशन सक्तीने लागू केले. महसूल विभागाने मात्र वसुलीबाबत अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याऐवजी केंद्रीकरण केले आहे. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात करमणूक कर शाखा असताना त्या त्या जिल्ह्यातील जिल्ह्याधिकाऱ्यांना केबल कनेक्शन्सच्या संदर्भातील करमणूक कर वसूल करण्याचे अधिकार दिले जात नाहीत यामध्ये शासनाची उदासिनता दिसून येते.

मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये केबलबाबत मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स हे प्रमुख प्लेयर्स झालेले आहेत. या ऑपरेटर्सची कनेक्शन ॲक्टीव्हेट केल्याशिवाय केबल दुरचित्रवाणी संचावर चॅनेल दिसत नाहीत. परंतु मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स ही संकल्पना नव्यानेच अस्तित्वात आली असल्याने करमणूक कर कायद्यामध्ये त्यांचा अद्यापपर्यंत समावेश झालेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले. **त्यामुळे या मल्टी सिस्टिम ऑपरेटर्सना करमणूक कर कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी करमणूक कर कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

बरेचसे केबल चालक स्वत:ची केबल कंपनी सुरू करून त्यांच्या माध्यमातून केबल व्यवसाय करीत आहेत. हे केबल चालक त्यांच्या अंतर्गत असलेल्या केबलवर जाहिराती देवून प्रचंड उत्पन्न मिळवित आहेत. केबल चालक स्थानिक चॅनेल्सवर सिनेमा, जाहिराती, स्थानिक बातम्या इ.दाखवितात. या माध्यमातून मिळणारे उत्पन्न केबल चालक शासनास न दर्शविता स्वत:च्या तिजोरीत जमा करीत आहेत. यामुळे शासनास महसूल तर मिळत नाहीच परंतु या केबल

चालकांवर कोणाचे नियंत्रण देखिल नाही. तसेच यांचेद्वारे दाखविण्यात येणारे चित्रपट देखिल बऱ्याच वेळा अश्लिल स्वरुपाचे असतात. **केबल व्यवसायधारकांवर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नसल्यामुळे त्यांचे उद्योग अविरतपणे चालू आहेत. असे अनधिकृतरित्या केबलचा व्यवसाय करणाऱ्या केबल चालकांवर कारवाई करण्याकरिता महसूल विभागाने गृह विभागाशी समन्वय साधावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

खाजगी चॅनेल्स सुरू करण्याकरीता 'ट्राय' ची परवानगी आवश्यक असते. परंतु खाजगी चॅनल्स सुरु करणाऱ्या केबल चालकांवर महसूल व गृह विभागाचा अंकुश नसल्यामुळे स्थानिक चॅनेल्सवर नियंत्रण ठेवून त्यांच्यामार्फत महसूल शासनास जमा होण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी समितीची शिफारस आहे.

राज्यातील किती घरांमध्ये टिव्ही व इतर कनेक्शन्स आहेत, त्यानुसार शासनास कराची किती रक्कम प्राप्त होवू शकते, यासंदर्भात विभागास रेडी रेकनरप्रमाणे माहिती मिळणे आवश्यक आहे. याबाबत वस्तुनिष्ठ माहिती प्राप्त झाल्यास राज्याच्या महसूल विभागाची कर वसुलीची रक्कम १० पट वाढू शकते. परंतु याकरीता टेक्निकल एक्सपर्ट शासन खाती असणे आवश्यक आहे. टेक्निकल एक्सपर्टकरीता एक कंत्राटदार नेमण्याची आवश्यकता आहे. परंतु विभागाकडे तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्ती कार्यरत नाहीत. तांत्रिक क्षेत्रात मोठी क्रांती झाली असल्याने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागातील व्यक्ती खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यातील व्यक्ती, अशासकीय संस्था यातील काही व्यक्ती अशा जणांची मिळून प्रत्येक जिल्ह्यात एक समिती गठीत करण्यात आल्यास फायदा होवू शकतो. ही समिती सर्व पातळ्यांवर माहिती घेवून सेंट्रल डेटाबेस तयार करील व त्याप्रकारे शासनास विविध माध्यमातून कर गोळा करण्यास सहाय्य होऊ शकेल. **अतः जिल्हानिहाय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभाग, खाजगी क्षेत्रातील तसेच अशासकीय संस्था यांचे प्रतिनिधी यांनी मिळून समित्या नेमण्यात याव्यात, अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

मुंबई शहर आणि उपनगरामध्ये डीटीएच आणि केबल दोन्ही मिळून १३,६८,७२१ कनेक्शन्स आहेत. डिजिटायझेशन आणि सेट टॉप बॉक्सची सक्ती करण्यापूर्वीची आकडेवारी ११,४५,४४३ होती. मुंबई शहरामध्ये सुमारे २० टक्के आणि उपनगरामध्ये ३३ टक्के वाढ दिसून आली आहे. ही माहिती देखील परिपूर्ण आहे असे नाही. विभागाचे प्रतिनिधी माहिती घेण्यासाठी जातात, त्यांच्याशी बैठक घेतात तेव्हा मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून सांगितले जाते की, ग्राहकांकडून फॉर्म भरुन दिले जात नाहीत. सत्य माहिती उपलब्ध करून देण्याकरिता विभागाने त्यांना आणखी काही कालावधी दिलेला आहे. मल्टी सिस्टीम ऑपरेटरकडून जेवढी कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली जातील तेवढ्या प्रमाणात प्रत्येकी ४५ रुपयांप्रमाणे कर भरण्याची जबाबदारी त्यांची राहील. ग्राहकांनी कॉम्बिनेशन काय घेतले हा महसूल विभागाचा विषय नाही. **केंद्रीकरणाऐवजी विकेंद्रीकरण करण्याची सूचना समितीने केली याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

तालुका आणि जिल्हा पातळीवर विकेंद्रीकरण करावे लागेल. महसूल विभागाला फक्त करमणूक कर गोळा करण्याचा अधिकार आहे. आज विभागाकडे केबल कनेक्शन्सबाबत डे टू डे माहिती प्राप्त होत नाही. असे दिसून आले की, १०० टक्के वस्तुनिष्ठ माहिती ते देत नाहीत. त्यांनी पुरविलेली माहिती केबल चालक १०० टक्के सत्य आहे का हे सध्या जी टेक्नॉलॉजी आली आहे त्या माध्यमातून कळून येईल. केबल चालकास कंट्रोल रुममधून ही माहिती मिळू

शकते की, त्यांनी किती कनेक्शन्स ॲक्टिव्हेट केली आहेत. महसूल विभागाला सॉफ्टवेअर किंवा माहिती व तंत्रज्ञान विषयक आवश्यक ती माहिती व तंत्रज्ञान विभागाने द्यावी. **महसूल विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग या दोन्ही विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून केबल व सेटटॉप बॉक्स संदर्भात अद्ययावत माहिती मिळण्यासाठी जी काही मदत अपेक्षित आहे ती मदत समन्वयाने करावी तसेच या संदर्भातील कायदा लवकरात लवकर अस्तित्वात आणावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(९) **सतरावा अहवाल (२०१२-२०१३) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या नागरी अहवालावरील.)**

(I) **ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग :- दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादींची शहानिशा करणे :-** सन २००२ मध्ये केंद्र शासनाच्या आदेशानुसार दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले होते. ते काम राज्यात सन २००३ मध्ये पूर्ण करण्यात आले. त्यावेळी अंगणवाडी सेविका, सुशिक्षित बेरोजगार यांच्याकडून सर्वेक्षण करून घेण्यात आले होते. याचे कारण त्यावेळी ग्रामसेवक व शिक्षक संघटनेचा बहिष्कार असल्याचे समितीस साक्षीदरम्यान सांगितले गेले. सर्वेक्षणात अनेक त्रुटी असल्याने अनेक लोकांनी तक्रारी केल्या होत्या. अनेक ग्रामसभेत याद्या फेटाळल्या गेल्या, सामाजिक संस्था/संघटना न्यायालयात गेल्या. याद्या तयार करतांना ज्या अप्रशिक्षित व्यक्तींकडे काम सोपविले होते त्यांना प्रशिक्षण दिले गेले नाही यामध्ये मार्गदर्शक तत्त्वाची त्यांना परिपूर्ण माहिती दिली गेली नाही, शासनाच्या नियंत्रणाचा व नियोजनाचा अभाव असल्याने अद्यापपावेतो दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या नावाची यादी अद्ययावत होऊ न शकल्याने निश्चित लाभार्थ्यांना अनेक कल्याणकारी योजनांच्या फायद्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे समितीचे अभिप्राय आहेत. **दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमधील लाभार्थ्यांची पडताळणी करतांना जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांसमवेत जिल्हा पातळीवरील शासनाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. यादीच्या प्रारुपास अंतिम मान्यता देण्यापूर्वी यादीची शहानिशा ग्रामीण भागात ग्रामसेवक व सरपंच व शहरी भागात नगरपालिका व महानगरपालिकेचे अधिकारी यांच्याकडून निश्चित केली जावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(II) **सार्वजनिक आरोग्य विभाग:- शासकीय रुग्णालयांमध्ये मुलभूत सोयीसुविधा व औषधे पुरविणे :-** समितीपुढील साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी सध्या सर्व गट मिळून २४ टक्के पदे रिक्त असून त्यामध्ये डॉक्टरांची १५ टक्के पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. एम.बी.बी.एस.डॉक्टरांना सेवेत येण्यापूर्वी एक वर्षाचा बॉन्ड द्यावा लागतो त्यामुळे दरवर्षी २५० ते ३०० उमेदवार मिळतात असेही समितीच्या निदर्शनास आणले गेले. परंतु, ही तात्पूरती व्यवस्था असून बॉन्ड संपल्यानंतर कोणताही उमेदवार ग्रामीण स्तरावर काम करण्यास इच्छूक नसतात असे समितीचे मत आहे. खाजगी रुग्णालये व शासकीय रुग्णालयाची तुलना करतांना शासकीय रुग्णालयात काही ठिकाणी योग्य मुलभूत सोयी सुविधा, प्रशिक्षित डॉक्टर व इतर सुविधा खाजगी रुग्णालयापेक्षा अधिक चांगल्या असताना सुद्धा कार्यक्षमतेतील कमी असलेल्या सोयीसुविधांचा योग्य प्रकारे वापर करण्याचा अभाव यामुळे शासकीय रुग्णालयांची अवस्था बिकट होत चालली आहे. याकरिता **शासकीय रुग्णालयात काम करणाऱ्या डॉक्टरांना आर्थिक व इतर सोयी सवलती देण्यात याव्यात व त्याचबरोबर डॉक्टरांच्या सेवेचे मूल्यामापन रुग्णांकडून करून त्याचा अहवाल शासनास देण्यात यावा व त्याप्रमाणे जिल्हास्तरीय रुग्णालये सशक्त करण्यात यावी तसेच जिल्हा रुग्णालयाचा स्तर वैद्यकीय महाविद्यालयासारखा उंचविण्याकरिता विशेष कार्ययोजना आखण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(१०) **विसावा अहवाल (२०१२-२०१३) (महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील.)**

सामान्य प्रशासन विभाग :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील ग्रंथसंपदांचे जतन करण्यासंदर्भात उपाययोजना करणे :- राज्यात अनेक ठिकाणी ग्रंथालये आहेत. पुण्यातील मराठी ग्रंथ सभा या संस्थेकडे सन १८७३ पासून तसेच **पेशवेकालीन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील** काही महत्त्वाची ग्रंथसंपदा जतन केलेली आहे. मात्र कालानुरुप या ग्रंथामधील पाने जीर्ण होऊ लागली असून वाळवी व इतर कारणामुळे या संस्थेला आता त्यांचे जतन करणे शक्य होणारे नाही. **हे वाङ्.मय अतिशय पुरातन असून अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे त्याचे जतन करण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(११) **सोळावा अहवाल (२०१२-२०१३) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाचा महसुली जमा अहवालावरील.)**

महसूल व वन (महसूल) विभाग :- केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे/कमी करणे :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००७-२००८ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२ 'केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे/कमी करणे' याबाबत पुढील अभिप्राय समितीने व्यक्त केले आहे.

महसूल विभागाचा व्याप मोठ्या प्रमाणात असताना केबल कनेक्शनच्या संदर्भातील जाणकार किंवा तज्ञ मनुष्यबळ विभागाकडे उपलब्ध नाही. केबल कनेक्शन्सचे जाळे कसे असते, ऑपरेटर्सची केबिन कशी असते, चॅनेल्सवरील कार्यक्रम कसे ट्रान्सफर केले जातात याची आज विभागाला काही माहिती आहे असे वाटत नाही. केवळ मुंबई शहरातून संपूर्ण राज्यातील केबल चालकांवर नियंत्रण ठेवणे हे चुकीचे आहे. केंद्रीकरण केल्यामुळे करमणूक कर वसुलीमध्ये सुधारणा होत आहे की वाईट परिणाम होत आहे याचा विभागाने अभ्यास करावा. केंद्रीकरण करण्याऐवजी विकेंद्रीकरण करण्याची सूचना समितीने केली आहे. यासंदर्भात ६ ते ७ प्लेयर्स आहेत आणि त्यांची मुख्यालये याच ठिकाणी आहेत. त्यांच्याकडील माहिती सर्व जिल्हयांना मिळेल अशी व्यवस्था केली आहे. विकेंद्रीकरण आणखी करण्याची मुभा आहे का याची शासनाने तपासणी करावी.

सन १९२३ च्या करमणूक कर कायद्यात सुधारणा करणारी समितीने बैठकीत सूचना केली होती. त्यासंदर्भात कायद्यात अपेक्षित बदल करण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये केबलबाबत मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स हे प्रमुख प्लेयर्स झालेले आहेत. या ऑपरेटर्सची कनेक्शन ॲक्टीव्हेट केल्याशिवाय केबल दुरचित्रवाणी संचावर चॅनेल दिसत नाहीत. परंतु मल्टी सिस्टिम ऑपरेटर्स ही संकल्पना नव्यानेच अस्तित्वात आली असल्याने करमणूक कर कायद्यामध्ये त्यांचा अद्यापपर्यंत समावेश झालेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे **या मल्टी सिस्टिम ऑपरेटर्सना करमणूक कर कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी करमणूक कर कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

लोकलेखा समितीने सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना एकूण ६८ अहवाल सादर केले असून हे सर्व अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या *www.mls.org.in* या संकेतस्थळावर PDF स्वरूपात उपलब्ध आहेत. या एकूण ६८ अहवालांतील अहवालनिहाय निवडक महत्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :-

(१२) **पहिला अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००६-२००७ या वर्षाच्या 'महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे व्यवस्थापन यावरील कार्यसिद्धी लेखापरीक्षण' याबाबतचा.)**

सहकार विभाग :- सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन :- सहकारी साखर कारखान्यांच्या लिलावाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेतून प्रथमतः शेतकऱ्यांच्या शेअर्सच्या रकमेची व्याजासह परतफेड करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

(१३) **सातवा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वर्षाच्या विनियोजन लेखे यासंदर्भात.)**

वित्त विभाग :- (अ) अचानक उद्‌भवलेल्या किंवा योजना व मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या बाबींकरीता काही प्रमाणात ठोक तरतूद अंदाजपत्रकात ठेवण्यात येते. या ठोक तरतूदींचे नियोजन, या निधीचा वापर त्याची कार्यपद्धती व यात कोणत्या कामांचा व खर्चाचा समावेश राहील याबाबत कुठेही स्पष्टता व पारदर्शकता नसते व त्यामुळेच या निधीच्या वापराबाबत अधिक पारदर्शकता येणेसाठी व न्याय पद्धतीने त्याचे वाटप होणेकरिता कार्यपद्धती ठरविण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

(ब) ज्या कामांसाठी वारंवार निधी मिळत आहे अशा कामांसाठी त्या निधीचा वापर न होता तो निधी परत जाणे ही गंभीर बाब असून समितीच्या मते ही आर्थिक अनियमितताच आहे. अर्थसंकल्पात तरतूद करताना अशा विभागांच्या वित्तीय नियोजनाचा सखोल आढावा घ्यावा व त्या विभागांनी त्यांना दिलेल्या निधीतून गत तीन वर्षात सतत बचत असेल अशा विभागांच्या मागण्यांवर निधी उपलब्ध करताना यथोचित विचार करून अर्थसंकल्पीय तरतूद करावी अशी शिफारस करण्यात आली आहे.

(१४) **आठवा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात.)**

नगरविकास विभाग :- अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कारवाई :- इमारतीवर मोबाईल टॉवर उभारण्यासाठी परवानगी देताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत विभागाने विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने परिपत्रक काढले नाही. मोबाईल टॉवर्स व त्याचा आरोग्यास असलेला धोका याबाबत सुस्पष्ट धोरण ठरवून त्याची कडक अंमलबजावणी करावी, अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कारवाई करावी, मा.उच्च न्यायालयासमोर शासनाने योग्य ती भक्कम बाजू मांडावी व अशा अनधिकृत टॉवर्सना संरक्षण देणे कसे धोकादायक आहे हे देखील मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावे अशी शिफारस करण्यात आली आहे.

(१५) **नववा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११च्या वर्षाच्या महसूली जमा अहवालासंदर्भात.)**

महसूल व वन (महसूल) विभाग:- शासकीय जमीन देताना सुस्पष्ट धोरण आणणेबाबत :-शासनाने विहित प्रयोजनासाठी शासकीय जमिन देण्याबाबतच्या धोरणाचा फेरविचार करावा, केवळ काही विशिष्ट लोकांचे हित डोळ्यासमोर ठेवूनच अशा प्रकारच्या धोरणांची अंमलबजावणी होत आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. शासनाने याबाबत सुस्पष्ट, पारदर्शक व शासनाचे हित लक्षात घेऊन नविन सुस्पष्ट धोरण आणावे अशी शिफारस केली आहे.

(१६) **दहावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-११ च्या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील अहवालासंदर्भात.)**

(I) **उद्योग विभाग:-** सुशिक्षित बेरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना राबविण्यास शासनास आलेले अपयश :— सुशिक्षित बेरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमात शासनाचा उद्देश किती टक्के साध्य झाला तसेच विभागाने दिलेल्या प्रशिक्षणाचा दर्जा काय व याची फलनिष्पती किती आहे याचा शोध घेणारी यंत्रणा तयार करण्यात यावी. विभागाने उद्योगाकरिता संपादित केलेल्या सर्व जागांचा आढावा घेण्याची शिफारस करण्यात आली आहे.

(II) **आदिवासी विकास विभाग :** आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व ग्रामविकास विभाग या विभागातील निधी काही तांत्रिक बाबींमुळे अखर्चित राहणे ही बाब अत्यंत गंभीर असून या विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या योजनांचा उद्देशच असफल करणारी ठरते. आदिवासी विकास विभागाने या सर्व अडचणी समांतर पातळीवर दूर करून संबंधित विभागांशी योग्य तो समन्वय साधून निधी खर्चाबाबत निश्चित उपाययोजना करावी व त्या आर्थिक वर्षात मंजूर निधी १००% खर्च होईल याची दक्षता घ्यावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

(१७) **अकरावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ च्या वर्षाच्या विनियोजन लेख्यांवरील अहवालासंदर्भात.)**

(I) **मत्स्यव्यवसाय विकास विभाग :-** मच्छिमार योजना राबविण्यासाठी मच्छिमार संस्थेची निवड करताना त्या संस्थेमध्ये किमान पाच स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या समाजाच्या लोकांचा समावेश असावा. संस्थेचे सर्व सभासद महाराष्ट्रातील निवासी असावे या अटीचा समावेश असावा, अशी शिफारस करण्यात आली आहे.

(II) **अल्पसंख्यांक विकास विभाग :** अल्पसंख्यांकांना मुख्य प्रवाहात आणावयाचे असल्यास, त्यांना उर्दूच्या प्रसाराशिवाय इंग्रजी कसे शिकता येईल, त्यांचे बाकीचे पर्सनल डेव्हलपमेंट कसे होईल यावर लक्ष केंद्रीत केले पाहिजे तरच ते सिस्टम मध्ये येतील याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(१८) **बारावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१०-२०११ च्या वर्षाच्या नागरी अहवालासंदर्भात.)**

(I) **गृह विभाग :-** शासनाच्या एका विभागाने जर एखाद्या कंपनीला काळ्या यादीत टाकले तर शासनाच्या अन्य कुठल्याही विभागामार्फत या कंपनीस पात्र ठरविण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत, अशी शिफारस करण्यात आली आहे.

(II) **उच्च व तंत्रशिक्षण विभाग :** सन १९८० च्या जनगणनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत, आता लोकसंख्या व प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता असल्यामुळे यासंदर्भात विभागाने तातडीने कार्यवाही करावी. राज्यभरातील प्राचार्यांची तसेच शासकीय आयटीआय मधील प्राचार्य व प्रशिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा अभ्यासक्रम व यंत्रसामुग्रीचा आढावा घ्यावा व ते अभ्यासक्रम अद्ययावत व यंत्रसामुग्री उन्नत करून विद्यार्थ्यांना अद्ययावत प्रशिक्षण द्यावे जेणेकरून कालानुरुप आवश्यक तांत्रिक ज्ञान व आधुनिक यंत्र त्यांना हाताळता येईल, अशी समितीने शिफारस केली आहे.

(१९) **पंधरावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ महसूली जमा या अहवालासंदर्भात.)**

वित्त विभाग :- विभागाकडून ज्याप्रमाणे विलंबाने भरलेल्या रकमेवर व्याज आकारले जाते त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांना देय असलेल्या परताव्याच्या रकमेवर देखील आयकरच्या धर्तीवर विभागाने व्याज देण्याची तरतूद करावी त्यासाठी विभागाने अशा परताव्याची रक्कम परत करण्यासाठी एक Atomization यंत्रणा उभारावी. त्यामध्ये व्यापाऱ्यांची नोंदणी होईल. प्रत्येक व्यापाऱ्याला वेगळा कोड देण्यात यावा. सदर कोडनुसार व्यापाऱ्यांना परताव्याची येणे रक्कम दिसू शकेल. सदर रकमेमधून १०% रक्कम विभागाने राखून ठेवावी व ९०% रक्कम परत करता येईल व राखीव रक्कम पुढील वर्षामध्ये समायोजित करता येईल. **विक्रेता आणि खरेदीदार यांना एकमेकांचे कोड माहित असले पाहिजेत आणि त्यांना एकमेकांचे कोड टाकल्यानंतर cross tally होत नसेल तर त्यासंबंधी संगणकावर तपासणीची व्यवस्था असावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२०) **सोळावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ महसूली जमा या अहवालासंदर्भात.)**

महसूल व वन (महसूल) विभाग : जलक्रिडा आणि मनोरंजनात्मक क्रीडा प्रकाराच्या करमणूक शुल्काची आकारणी न होणे :—शासनाने करमणूक कराची केलेली आकारणी (Fixation) योग्य व नियमानुसार केली की नाही याची पुन:श्च तपासणी करण्यात यावी. नियमानुसार असे करमणूक शुल्क आकारणी व वसुली न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. तसेच **सद्य:स्थितीत ज्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाकरीता परवानगी देय नसेल असे कार्यक्रम बंद करण्यात यावेत व ज्या प्रकरणात रितसर परवाना घेतलेला आहे अशा सर्व परवानाधारकांकडून अनुज्ञेय करमणूक शुल्काची संपुर्ण वसुली करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२१) **सतरावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या वर्षीच्या नागरी अहवालासंदर्भात.)**

गृहनिर्माण विभाग:- झोपडपट्ट्यांबाबतची अपर्याप्त माहिती :— मुंबईतील बऱ्याच जागा या महाराष्ट्र शासनाच्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. त्यांचे अभिलेख हे पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतात. यासाठी त्या त्या विभागाचे कॉलनी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी आहेत. कायद्यामध्ये त्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील करावयाचे असल्यास ते विभागीय आयुक्तांकडे करावे लागत होते, परंतु आता शासनाने ते अधिकार अतिरिक्त जिल्हाधिकारी

यांचेकडे प्रदान केलेले आहेत. त्यांचेकडे अपील प्राप्त झाल्यानंतर निर्णयासाठी दिवसांची कालमर्यादा घालून देण्यात आली आहे. परंतू त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यासंदर्भात **पात्रतेसंदर्भातील अपील प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम कालमर्यादा घालणेबाबत शासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. शासनाकडून महानगरपालिका व राज्य शासनाच्या जागेसंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विशेष नियम करण्यात यावेत व त्याची जनहिताच्यादृष्टीने अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरु करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२२) **एकविसावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

सार्वजनिक बांधकाम विभाग :- निविदांना प्रसिद्धी ही डीजीआयपीआर विभागाकडून देण्यात येते. अशावेळी शासनस्तरावरुन सामायिक आदेश शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता असून त्याअनुषंगाने शासन निर्णय/मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येऊन त्या महसूली विभागात व्यापक व सर्वात जास्त खपत (wide circulating) असलेल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातूनच या निविदा प्रक्रिया प्रसिद्ध करण्यात याव्यात व निविदा प्रसिद्धीची प्रक्रिया ही अत्यंत अद्ययावत व पारदर्शक करून याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी. पंचलीस्ट मधील कामे पूर्ण अथवा दर्जेदार न झाल्यास कंत्राटदारावर दंड आकारण्याची अथवा सवलत कालावधी कमी करण्याचे पूर्ण अधिकार अबाधित ठेवण्याची तरतूद करारामध्येच स्पष्टपणे नमूद असावी. राज्यात राबविण्यात आलेल्या अनेक रस्त्यांच्या प्रकल्पांमध्ये पंचलिस्टप्रमाणे कामे झाली आहेत किंवा नाही याची शासनाने सखोल तपासणी करावी, कामे झाली नसतील तर ती कंत्राटदाराकडून पूर्ण करून घ्यावी अथवा प्रकल्प किंमतीतून ती कामे कमी करून रकमेची वसुली करावी अथवा सवलत कालावधी कमी करावा तसेच जेथे बायबॅक असेल त्या ठिकाणी कंत्राटदारास देय असलेल्या अंतिम रकमेतून ते कापून घेण्यात यावे व केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी शिफारस केली.

(२३) **बाविसावा अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात.)**

(I) **ग्रामविकास व जलसंधारण विभाग :-** २५ वर्षापूर्वी जे व्यवसाय कराचे संकलन होते ते आता १०० पटीने वाढले असतानाही अनुदान मात्र जुन्या आकरणीप्रमाणे देण्यात येत आहे. विभागाने वाढीव व्यवसाय कराच्या प्रमाणात वाढीव कर प्रदानाच्या रकमेची मागणी वित्त विभागाला केल्यानंतर वित्त विभागाने यास नकार दिला असला तरीही ही मागणी योग्य आहे व ती विभागाने केलीच पाहिजे असे समितीचे मत आहे. अनेक जिल्हापरिषदा व ग्रामपंचायती या आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे या कराचे प्रदान वाढीव दराने व नियमितपणे देण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. अत: या संदर्भात शासनाने थकीत व्यवसाय कराचे प्रदान तातडीने करावे व वाढीव व्यवसाय कराबाबत ठोस उपाययोजना करून योग्य निर्णय शासनस्तरावर घेवून आवश्यकता पडल्यास कायद्यात याबाबतची सुधारण करावी तसचे देशात नव्याने लागू झालेल्या GST कायद्यामुळे या कर प्रणालीमध्ये बदल होणार असून या अनुदानाच्या रकमेचा पुर्नआढावा शासनाने घ्यावा व GST अंतर्गत राज्यास प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणात जिल्हापरिषदांना अनुदान मिळणेबाबत आवश्यक ती पुढील उपाययोजना करण्यात यावी व संविधानाच्या ३६८ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थानिक संस्थांना प्राप्त झालेला स्वायत्त दर्जा व निधीचा नियमित स्त्रोत अबाधित ठेवावा, अशी समितीने शिफारस केली आहे.

(II) **ग्रामविकास व जलसंधारण विभाग :** ग्रामपंचायतीनी त्यांच्या सीमेत उभारलेल्या व्यवसायिक मोबाईल टॉवरच्या कराची वसुली योग्य रित्या केली तर १० टक्के इंन्सेंटीव्ह दिला जाईल व १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत देय असलेल्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषामध्ये मोबाईल टॉवरच्या वसूलीचा देखील समावेश करणेबाबत तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकांचे प्रत्येक वर्षी जे लेखापरिक्षण होत असते त्याआधारे करण्यात आलेल्या वर्गवारीचा अहवाल हा शासनामार्फत स्थानिक पातळीपर्यंत सर्व स्तरावर शासनाने पोहचविण्याची व्यवस्था करावी व त्याआधारे निधीची गुंतवणूक करण्याची कार्यपद्धती, निकष व मार्गदर्शक तत्त्वे शासनस्तरावरच विहित करून देण्यात यावीत व त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यासाठी जिल्हापरिषद स्तरावर मुख्य लेखा वित्तीय अधिकारी आणि डीडीआर यांचा वस्तुनिष्ठ अहवाल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावर निर्णय घ्यावा व बँक देत असलेली सेवा, बँकेतील ठेवी, बँकेतील गुंतवणुकीवर मिळत असलेले व्याज, सुरक्षिततेचा विचार करून जमा निधी कुठे गुंतवावा याबाबतचा निर्णय जिल्हापरिषदांनी घ्यावा. बँकेसंदर्भातील आर्थिक वर्षात निश्चित केलेल्या वर्गवारीचा अहवाल त्या त्या बँकेच्या शाखेमध्ये सहज दिसू शकेल अशा दर्शनी भागात दर्शवावा, अशी समितीने शिफारस केली आहे.

(२४) **सव्वीसावा "विशेष" अहवाल (२०१५-२०१६) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१३ चा भाडेपट्टीवर दिलेल्या शासकीय जमिनीचे संपादणूक लेखापरिक्षण अहवाल क्र. ५ या अहवालासंदर्भात.)**

महसूल विभाग :- शासकीय जमिनींचे भाडेपट्टीवर प्रदान होण्यात पारदर्शकतेचा अभाव :— भाडेपट्टीवर जमीनी वितरित करण्याच्या सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धतीचा पुनर्विचार करण्यात यावा. जमीन वाटप प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी व निकोप स्पर्धेच्या माध्यामातून पात्र व्यक्तीची निवड होण्यासाठी अशा मोकळ्या जागा भाडेपट्टीवर देण्यासाठी उपलब्ध असल्याचे मोठ्या प्रमाणात जाहिरातीद्वारे तसेच संकेतस्थळावरुन तसेच अन्य आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कळविण्यात यावे. केवळ लिलाव पद्धतीने जास्तीत जास्त रकमेच्या बोलीधारकास जमीनीचे प्रदान व्हावे व तशी तरतूद कायद्यात करण्यात यावी तसेच शासनाने तसेच अन्य संस्थांनी भाडेपट्टी प्रकरणाच्या नुतनीकरणाचे काम तातडीने पूर्ण करावे तसेच नुतनीकरण हे सरसकट न करता भाडेपट्टाधारकांनी केलेले शर्तभंग, व्यावसायिक वापर, जागेच्या प्रयोजनातील बदल, त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध निर्माण करणे, भाडेपट्टीची रक्कम नियमित न भरणे तसेच अन्य अटी भंगांचा पूर्णपणे गुणवत्तेवर विचार करूनच अस्तित्वात असलेल्या तरतुदी न्यायालयानी वेळोवेळी दिलेल्या निर्णयांच्या अधिन राहून करण्यात यावे व या अनुषंगाने घेण्यात येणारे निर्णय हे व्यक्तीनिहाय व प्रकरणनिहाय न घेता नियमानुसार व प्रकरणाच्या गुणवत्तेवर घेण्यात यावे. तसेच करारामध्ये अटी व शर्ती अतिशय सुस्पष्ट व शासनाच्या हिताच्या असल्या पाहिजेत तसेच याच्या उल्लंघनासंदर्भात शास्ती करण्याची तरतूद त्यात नमूद असली पाहिजे, अशी समितीने शिफारस केली आहे.

(२५) **सत्ताविसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

(I) **पाणीपुरवठा विभाग :-** पाण्याचा स्त्रोत, पाण्याची उपलब्धता, पाण्याची निकड, योजना राबविण्यासाठी येणारा खर्च, ग्रामपंचायत अथवा जिल्हापरिषदांची आर्थिक परिस्थिती, तेथील लोकसंख्या व त्यांना वित्त आयोगामार्फत मिळणारा निधी, नैसर्गिक स्त्रोत सुकल्यास पर्यायी व्यवस्था या सर्व बाबींचा विचार करूनच व तांत्रिकदृष्ट्या या योजनांची व्यवहार्यता तपासूनच योजना मंजूर करण्यात याव्यात, अशी समितीने शिफारस केली आहे.

(II) **नगरविकास विभाग (एम.एम.आर.डीए.):** एमएमआरडीए व महानगरपालिका या दोन्ही प्राधिकरणांनी एकमेकांशी योग्य तो समन्वय ठेवून कामाची निकड, तातडी, व्यवहार्यता, उपयोगिता, सार्वजनिक महत्व व निधीची उपलब्धता लक्षात घेऊन त्या आधारे प्राध्यान्यक्रम निश्चित करून सामंजस्य व समन्वयाच्या भूमिकेतून कामे पूर्ण करावी प्राधिकरणाने मोकळ्या व बोजाविरहीत जागांच्या उपलब्धतेची खात्री करून आवश्यक इतर प्राधिकरणाशी चर्चा व नियोजन करून कार्यादेश द्यावेत किंवा अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही प्रथम करून नंतर कार्यादेश द्यावेत, अशी समितीने शिफारस केली आहे.

(२६) **एकोणतिसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

गृहनिर्माण विभाग :- विभागाने सर्व उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण करण्यासाठी यंत्रणा निर्माण करून सर्व इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण करावे, इमारतींची त्यांच्या दर्जानुसार विभागणी करून धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात यावी व त्याआधारे इमारत दुरुस्तीचा प्राधान्यक्रम निश्चित करून ही यादी जनतेसाठी अधिकृतरित्या खुली व उपलब्ध करण्यात यावी तसेच संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावी. जेणेकरून या इमारतींमधील रहिवाशांना देखील ही माहिती व इमारतीच्या स्थितीचे गांभीर्य वेळेत लक्षात येऊ शकेल व त्या घोषित प्राधान्यक्रमाने इमारतींची दुरुस्ती करण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

(२७) **बत्तिसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महिला व बालविकास विभाग : महिलांवर होणाऱ्या अत्याचारांबद्दल जिल्हा पातळीवर अथवा विभागीय पातळीवर फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याबद्दल विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणांवर वेळीच निर्णय होण्यासाठी व गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण वाढण्यासाठी विभागाने विधी अधिकाऱ्यांचे पॅनेल नेमणे अथवा अन्य समांतर सक्षम यंत्रणा तयार करावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(२८) **तेहत्तीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या महसुली जमा अहवालासंदर्भात.)**

गृह विभाग (परिवहन) :- विभागाने राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागात संगणकीकृत प्रणाली लागू होण्यापूर्वीच्या काळापर्यंत आयात केलेल्या व नोंदणी झालेल्या परदेशी बनावटीच्या गाड्यांच्या कर वसूलीची विशेष पथकामार्फत तपासणी करण्यात यावी त्यात अनियमितता निदर्शनास आल्यास वसूलीची कारवाई करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(२९) **अडतीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग :- (I) विभागाने सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश २००१ ची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व अंत्योदय कुटुंबाच्या यादीचे दरवर्षी पुनर्विलोकन करून अपात्र कुटूंबे वगळावीत व पात्र कुटूबांचा यादीत समावेश करावा, अशी समितीने शिफारस केली आहे.

(II) अन्नधान्याचा साठा, वितरण व लाभार्थ्यांची माहिती जनतेसाठी खुली करावी जेणेकरून ही व्यवस्था अधिक पारदर्शकपणे कार्यरत राहील व काही आक्षेपार्ह बाबी झाल्यास यासंदर्भातील तक्रारीदेखील शासनाकडे प्राप्त होतील यासाठी अद्ययावत संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करावा, डीजीटल रेशनकार्ड देण्याच्या पर्यायांचा अवलंब करावा तसेच राज्यात AePDS प्रणाली अंतर्गत स्वस्त धान्य वाटप योजनेची सक्षमतेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

(३०) **एकोणचाळीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

कृषी विभाग :- वेगवेगळ्या पिकांसाठी आणेवारीचे नियम व निकष वेगवेगळे असले पाहिजेत व आणेवारीची निश्चिती ही ग्रामस्तरावरुन करण्यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी करावी. नविन व्यवस्थेप्रमाणे दुष्काळ जाहीर करण्यासाठी सूचकांक, आद्रता, पर्जन्यमान इ.बाबींच्या आधारावर दुष्काळ जाहीर करण्यात येतो, सर्व प्रकारच्या पिकांसाठी हे निकष सरसकट लावल्यामुळे शेतकऱ्यांसाठी हे नियम व निकष अन्यायकारक ठरत असून त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, शासनाने आणेवारी ठरविण्याची पद्धत, निकष व नियम हे पीकनिहाय करणेबाबत देखील योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घ्यावा तसेच, कृषी पीक विमा योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच करण्यात यावी, राज्य शासनाने ग्रामपंचायतींना विमा क्षेत्र घटक म्हणून अंमलात आणण्यासाठी योग्य ते पाऊल उचलावे, विमा क्षेत्र घटक म्हणून ग्रामपंचायतीचा अनिवार्यरित्या अवलंब करण्यात यावा, शेतकऱ्यांचे दावे गुणवत्तेनुसार व वस्तुतः झालेल्या नुकसानीवर निकाली काढण्यात यावेत, अशी समितीने शिफारस केली आहे.

(३१) **चाळीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

विधी व न्याय विभाग :- राज्यातील न्यायालयीन इमारतीची आवश्यकता लक्षात घेता त्यांची यादी लवकरात लवकर तयार करण्यासंदर्भातील विनंती विधी व न्याय विभागाने माननीय उच्च न्यायालयाकडे करावी व मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त होणाऱ्या प्राथम्यक्रमाच्या यादीनुसार कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व त्यास पायाभूत सुविधा समितीची मान्यता घेऊन शासनास सादर करण्यात यावी व त्यास मान्यता मिळाल्यावर प्राधान्यक्रमानुसार या कामांसाठी वाढीव निधी उपलब्ध करून देऊन ती टप्प्याटप्प्याने पुर्ण करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(३२) **एकेचाळीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभाग (ट्रॉमा केअर सेंटर्स) : (I) ट्रॉमा केअर सेंटर तेथील ग्रामीण व जिल्हा रुग्णालयाशी संलग्न करून कार्यान्वित असल्यामुळे ट्रॉमा केअर सेंटरचा मूळ हेतू व उद्देशच बाजूला सारल्या सारखा होवून समांतर ग्रामीण रुग्णालय चालविल्यासारखी परिस्थिती आहे, जे कदापि या योजनेंतर्गत अभिप्रेत नाही, अपघातग्रस्तांना वेळेवर ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना तातडीने

करावी. ज्या उदात्त हेतूने केंद्र व राज्य शासनाने ही ट्रॉमा केअर सेंटर्स राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे ती सर्व केंद्रे उत्कृष्टरित्या व सुसज्ज पद्धतीने चालविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागाने योग्य समन्वय साधून उत्कृष्टरित्या हे संनियंत्रण ठेवून या ट्रॉमा केअर सेंटर्सचे कामकाज सुधारण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच संनियंत्रण समितीच्या बैठका नियमितरित्या घेऊन ट्रॉमा केअर सेंटर्सच्या कामांचा आढावा घेऊन ती अधिक सुसज्ज व अद्ययावत करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(II) डॉक्टरांची संख्या जास्तीत जास्त उपलब्ध होण्यासाठी NRHM च्या माध्यमातून शासनाने प्रायोगिक तत्त्वावर एक वेगळ्या स्वरुपाचे मानधन निश्चित करून डॉक्टरांच्या नियुक्त्या करण्याची जी पद्धत अवलंबिलेली आहे त्याची उपयोगिता व यशस्वीतेची तपासणी करून ट्रॉमा केअर सेंटर्ससाठी देखील या पर्यायाचा अवलंब करण्याबाबत शासनाने विचार करावा, तसेच ज्या ठिकाणी डॉक्टर सहसा जाण्यास इच्छूक नसतात अशा ठिकाणी डॉक्टरांच्या नियुक्तीसाठी काही विशेष प्रोत्साहनपर भत्ता लागू करण्याच्या पर्यायांचादेखील शासनाने विचार करावा, राज्यात मुळात भूलतज्ञांची संख्या अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे त्यांचेअभावी ही ट्रॉमा केअर सेंटर्स चालविणे अडचणीचे झाले आहे, यावर उपाययोजना करणेसाठी व ही कमतरता दूर करणेसाठी मेडीकल कॉन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेने वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी भूलतज्ज्ञासंदर्भात एक डिप्लोमा कोर्स सुरू करणेबाबत विभागाने योग्यरित्या अंमलबजावणी करावी, अशी समितीची शिफारस आहे.

(३३) **बेचाळीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय (मत्स्यव्यवसाय) विभाग : बंदिस्त जलाशयात जोपासन (Cage Culture) करणे (भूजलाशयीन मत्स्य व्यवसायासाठी), सागरी किनारी बंदिस्त जोपासना करणे (सागरी मत्स्य व्यवसायासाठी) यास प्रोत्साहन देऊन, उबवणी केंद्राचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करून, निमखाऱ्या पाण्यात माशांचे संवर्धन क्षेत्र वाढवून राज्यातील मत्स्योत्पादनातील दरी साधण्यासाठी आणि उत्पादन अधिकतम क्षमतेत करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करण्याची आवश्यकता असून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(३४) **त्रेचाळीसावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ आर्थिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

सार्वजनिक बांधकाम विभाग : विभागाने यापुढे दरवर्षी हेरिटेज इमारती व अन्य महत्त्वाच्या इमारती यांचे दुरुस्तीचे स्वतंत्र अंदाजपत्रक करूनच देखभाल दुरुस्तीची कामे करावी. प्रेसीडेन्सी विभाग मुंबई येथील अनेक शासकीय इमारतींमध्ये राहणाऱ्या व्यक्ती या अतिमहत्त्वाच्या व उच्च पदावरील असल्यामुळे अशा इमारतींबाबत व्यावहारीक निर्णय घेणे विभागाला बऱ्याचदा अडचणीचे ठरते ही जरी वस्तुस्थिती असली तरीही इमारत नव्याने बांधकाम करण्याच्या खर्चापेक्षा दुरुस्तीचा खर्च अधिक येत असेल तर विभागाने व्यावाहारीक भुमिका घेणेसंदर्भात आग्रही

राहण्याची आवश्यकता आहे. अशा इमारतींबाबत विभागाने सर्वांना विश्वासात घेऊन उच्च स्तरावरून व्यावहारीक व योग्य निर्णय भविष्यात घ्यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(३५) **एकोणपन्नासावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात.)**

नगरविकास विभाग :- राज्य शासनाने राज्यातील अग्निशमन सेवांच्या सध्याच्या पायाभूत सुविधांचा आढावा घ्यावा आणि नवीन भांडवली मत्तांसाठी आणि जुन्या मत्ता बदलण्यासाठी/पुनरुज्जीवीत करण्यासाठी सातत्याने निधीची तरतूद करून या त्रुटी कमी कराव्या. राज्यातील सर्व व्यावसायिक आस्थापनांमधील अग्निलेखापरिक्षण तातडीने पूर्ण करण्यात यावे व असलेल्या त्रुटींची पुर्तता कालबद्ध पद्धतीने करून घेण्यात यावी. ज्या आस्थापनांनी फायर एनओसी न घेता कामकाज सुरू ठेवलेले आहे त्यांचेवर अधिनियमातील तरतुदीनुसार कडक कारवाई करण्यात यावी व अग्निसुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही तडजोड यात होऊ नये यादृष्टीने नियमांची अंमलबजावणी करण्यात यावी. यासाठी सामायिक मार्गदर्शक सूचना सर्व महानगरपालिकांसाठी निर्गमित करण्यात याव्यात व आवश्यक ती यंत्रणा तातडीने कार्यान्वित करण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

(३६) **बावन्नावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महिला व बालविकास विभाग :- शासनाने काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांचे सर्वेक्षण करून शोध घेण्यासाठी एक भक्कम पथदर्शी आराखडा आखून याकामी एक सक्षम व्यवस्था तातडीने उभारणे नितांत आवश्यक आहे ज्या बालगृहांमधून बालके फरार होण्याच्या घटना घडलेल्या आहेत अशा बालगृहांवर, त्यांच्या व्यवस्थापनांवर कडक कारवाई करावी बालगृहातील बालकांच्या फरार होण्याच्या सातत्यपूर्ण घटना विचारात घेऊन राज्यातील बालगृहांतील सुरक्षा व्यवस्थेचा फेर आढावा घेऊन अभेद्य व भक्कम अशी सुरक्षा व्यवस्था निर्माण करून नव्याने धोरण आखावे, अशी समितीने शिफारस केली आहे.

(३७) **त्रेपन्नावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या महसुली क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महसूल (मुद्रांक शुल्क) विभाग : मुद्रांक शुल्क कार्यालयातील व्यवहारांची जास्तीत जास्त माहिती ऑनलाईन उपलब्ध होण्याच्यादृष्टीने तसेच मालमत्तेची अद्ययावत सद्यःस्थिती दर्शविण्यासंदर्भात व खरेदी विक्रीमध्ये अनियमितता अथवा परवानगीशिवाय दुबार खरेदी विक्री टाळण्यासाठी शासनाच्या सर्व विभागांच्या जमिनींची व मालकी हक्काची माहिती अद्ययावत स्वरुपात जिल्हा निबंधक कार्यालयाशी लिंक करण्यात यावी, विभागाला मुद्रांक शुल्क घेण्याचा अधिकार असून अतिरिक्त शुल्काचा परतावा देण्याचे बंधन देखील विभागाने स्वीकारावे, अशी शिफारस समितीने केली आहे.

(३८) **चोपन्नावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या महसुली क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महसूल व उद्योग (खनिकर्म) विभाग :- खाणपट्टेधारकाला भाडेपट्टयामधील मंजूर उत्खननाच्या परिमाणापेक्षा जास्त केलेल्या उत्खननास अवैध समजण्यात यावे. अशा प्रकरणांमध्ये प्रलंबित असलेली वसूलपात्र रक्कम तात्काळ

वसूल करावी. तसेच राज्यात अन्यत्रही अतिरिक्त उत्खन्नाबाबतच्या सर्व प्रकरणांची विभागाने तपासणी करून त्याची वसुली करावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

(३९) **छप्पन्नावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ च्या महसुली क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महसूल विभाग :- एखाद्या संस्थेला विशिष्ट हेतूसाठी जमीन दिली असेल तर त्याच उद्देशासाठी तिचा वापर केला पाहिजे अन्य हेतूसाठी वापर करावयाचा असल्यास शासनाने त्याबाबतचे धोरण निश्चित करावे तसेच भाडेपट्टा नुतनीकरणासंदर्भातील निर्णय घेताना एका संस्थेला एक न्याय व दुसऱ्या संस्थेला दुसरा न्याय अशाप्रकारे स्वेच्छाधिकाराचा वापर सध्या करण्यात येत आहे. यामध्ये समान न्यायाचा वापर करावा, अशी समितीची शिफारस आहे.

(४०) **अठ्ठावन्नावा अहवाल (२०१७-२०१८) (भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-१७ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालासंदर्भात.)**

महसूल विभाग :- मुंबई शहरे व मुंबई उपनगरांमध्ये भाडेपट्टीची प्रलंबित असणारी सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी कालबद्ध नियोजन विभागाने करावे. सचिव स्तरावर ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी १ वर्षाची मुदत विहित करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर जिल्हाधिकारी स्तरावरूनसुद्धा प्रकरणे निकाली काढण्यासाठी १ वर्षाची मुदत विहित करण्यात यावी. तसेच, त्यामुळे जी जमीन शासनजमा करण्याचा निर्णय झालेला असेल ती जमीन वस्तुतः ताब्यात घेण्याची कारवाई तातडीने करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली आहे.

लोकलेखा समितीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर केलेल्या शिफारशींचा सारांश :-

समितीने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणारी जीवनदायी योजना व त्यासारख्या अन्य योजनांचा लाभ जास्तीत जास्त सर्वसामान्य रुग्णांना मिळण्याबाबत, तसेच राज्यात सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करणे, राज्यातील वनक्षेत्र वाढविणे व अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्राचे संवर्धन करणे, रोजगार हमी योजनेअंतर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे, सर्वशिक्षा अभियानाच्या निधीचा योग्य वापर करणे, राज्यातील पाणीपुरवठा विभागाच्या महत्त्वाच्या योजनांच्या निधीचा योग्य वापर करणे, स्वामित्व धनाची वसुली न करणे, वाल्मिकी, आंबेडकर मलीन वस्ती आवास योजना, सेतू केंद्राचा माहिती तंत्रज्ञान आढावा, पुलाच्या बांधकामावर निष्फळ खर्च, कृषि विभागातील संगणकीकरण, महिला व बालविकास विभागातील अंतर्गत नियंत्रण यंत्रणा, पोलीस दलाचे संगणकीकरण व विशेष पोलीस दलाबाबत, राज्यातील जलसंपदा प्रकल्पांचा आराखडा व धरणांचे संरक्षण, आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये सुधारणा करणे, शहरी गरिबांकरिता मूलभूत सोयी उपलब्ध करणे, केबलचालक/नृत्यबार चालकांकडून करमणूक कराची वसुली न करणे/ कमी करणे तसेच महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते २००६-०७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९९५-९६ ते २००६-०७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल क्र. ६ राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ करीता पायाभूत सुविधा विकास अहवाल इत्यादी विषयांवर अहवाल सभागृहास सादर करून महत्वाच्या शिफारशी त्यात केल्या आहेत. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या भाडेपट्टीवर दिलेल्या शासकीय जमिनीचे संपादणूक लेखापरीक्षण या

अहवालावरील लोकलेखा समितीच्या विशेष अहवालात समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने भाडेपट्टीवर दिलेल्या जमिनींबाबत भाडेपट्टीची थकबाकीची वसुली मोठ्या प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आले. लोकलेखा समितीच्या अहवालातील शिफारशींवर शासनाकडून अग्रक्रमाने कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे एक प्रकारे समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने भावी काळात राबविण्यात येणारे प्रकल्प/योजना यांच्या कामकाजात सुधारणा करण्यास शासकीय यंत्रणेस मदत होते.

*****

(३) सार्वजनिक उपक्रम समिती

(Committee on Public Undertakings)

समितीची रचना, कार्यपद्धती, उद्दीष्टे व कामकाज :—

प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी शासनाने अनेक शासकीय महामंडळे व कंपन्या स्थापन केलेल्या आहेत. अशी महामंडळे आणि कंपन्या यांच्या भागभांडवलात शासनाचा मोठा (किंवा जवळ-जवळ संपूर्ण) हिस्सा असतो. सदर महामंडळे व कंपन्या शासनाने नेमलेल्या संचालकांद्वारे चालविण्यात येतात. अशा महामंडळाचे व कंपन्यांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर वेळोवेळी ठेवण्यात येतात. त्याचप्रमाणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेही सार्वजनिक उपक्रमासंबंधातील लेखापरीक्षा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात येतात. सदर अहवालांची छाननी करून त्यासंबंधीचे आपले अभिप्राय आणि शिफारशींची प्रतिवेदने विधानमंडळास सादर करण्याच्या उद्देशाने दिनांक १६ सप्टेंबर, १९६६ रोजी सार्वजनिक उपक्रम समितीची स्थापना करण्यात आली. सदर समितीचा कालावधी सुरुवातीच्या काही काळात विधानसभेच्या कालावधी इतकाच म्हणजे ५ वर्षाचा होता. नंतर हा कालावधी विधानमंडळाच्या इतर समित्यांप्रमाणे एक वर्षाचा करण्यात आला.

या समितीवर सध्या एकूण २५ सदस्य आहेत. महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २११ व महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २०९ अन्वये मा.अध्यक्ष व मा.सभापती यांचेकडून अनुक्रमे विधानसभेचे २० सदस्य व विधानपरिषदेचे ५ सदस्य असे एकूण २५ सदस्य नामनियुक्त करण्यात येतात.

सार्वजनिक उपक्रम समितीची रचना :- (विधानसभा नियम २११)

(१) दरवर्षी विधानसभेच्या किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर सार्वजनिक उपक्रम समितीची रचना करण्यात येईल. ही समिती अध्यक्षांनी विधानसभा सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले वीस सदस्य आणि सभापतींनी विधानपरिषद सदस्यांमधून तशाच प्रकारे नामनिर्देशित केलेले पाच सदस्य यांची मिळून होईल :

परंतु, कोणत्याही सार्वजनिक उपक्रमामध्ये ज्यांचा आर्थिक हितसंबंध असेल असा कोणताही सदस्य, समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केला जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही.

(२) समितीचे सदस्य, नवीन समितीची स्थापना होईपर्यंत पद धारण करतील.

सार्वजनिक उपक्रम समितीची कामे :- (विधानसभा नियम २१२)

(एक) तिसऱ्या अनुसूचित निर्दिष्ट केलेले सार्वजनिक उपक्रम आणि सभागृहांकडून वेळोवेळी ठरविण्यात येतीत असे इतर उपक्रम यांचे अहवाल आणि लेखे तपासणे.

(दोन) उक्त उपक्रमासंबंधी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे काही अहवाल असल्यास ते तपासणे.

(तीन) उक्त उपक्रमांची स्वायतत्ता आणि कार्यक्षमता यांच्या संदर्भात त्या उपक्रमाचे व्यवहार सुस्थिर व्यापारी तत्त्वावर आणि दूरदृष्टीच्या वाणिज्य प्रथांनुसार करण्यात येत आहेत किंवा कसे याचे परीक्षण करणे, आणि

(चार) उक्त उपक्रमांच्या बाबतीत लोकलेखा समितीकडे आणि अंदाज समितीकडे विहित केलेली तथापि वरील खंड (एक), (दोन) आणि (तीन) खाली न येणारी आणि अध्यक्ष वेळोवेळी ह्या समितीकडे नेमून देतील अशी इतर कामे.

परंतु, समिती खालीलपैकी कोणत्याही बाबींचे परीक्षण किंवा तपासणी करणार नाही.

(एक) उक्त उपक्रमांच्या व्यापारी किंवा वाणिज्य कामाव्यतिरिक्त शासनाच्या प्रमुख धोरणासंबंधीच्या बाबी

(दोन) दैनंदिन प्रशासनाच्या बाबी, आणि

(तीन) कोणत्याही परिनियमान्वये ज्या बाबी विचारात घेण्यासाठी खास यंत्रणा स्थापन करण्यात आली असेल अशा बाबी.

समितीस सामान्य नियम लागू असणे :—

इतर बाबतीत समितीसंबंधीच्या या सभागृहाच्या कार्यपद्धतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यासह ते लागू होतील.

*****

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यकक्षेतील
सार्वजनिक उपक्रमांची यादी तृतीय अनुसूची
(विधानसभा नियम २१२ पहा)

गृह विभाग

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित.

गृह (परिवहन) विभाग

(२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

गृहनिर्माण विभाग

(३) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित.

महसूल विभाग

(४) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित.

वन विभाग

(५) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित

नगरविकास विभाग

(६) महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ.

(७) महाराष्ट्र नागरी पायाभूत विकास कंपनी मर्यादित.

(८) महाराष्ट्र नागरी पायाभूत निधी विश्वस्त कंपनी मर्यादित.

(९) नागपूर मास ट्रान्सपोर्ट कंपनी मर्यादित.

(१०) मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित.

वैद्यकीय शिक्षण विभाग

(११) हाफकिन अंजिठा औषध निर्माण मर्यादित.

(१२) हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ.

उद्योग विभाग

(१३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

(१४) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ.

(१५) महाराष्ट्र विक्रीकर रोखे प्राधिकरण मर्यादित.

(१६) कोकण विकास महामंडळ मर्यादित.

(१७) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित.

(१८) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित.

(१९) कृपानिधी मर्यादित.

उद्योग (खनिकर्म) विभाग

(२०) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित.

(२१) महा तामिल कोलरिज मर्यादित.

(२२) एमएसएमसी अडकोली नैसर्गिक स्त्रोत मर्यादित.

(२३) एमएसएमसी वरोरा कोलरीज मर्यादित.

ऊर्जा विभाग

(२४) औरंगाबाद ऊर्जा कंपनी मर्यादित.

(२५) एमएसईबी सूत्रधारी कंपनी मर्यादित.

(२६) महाराष्ट्र ऊर्जा विकास कंपनी मर्यादित.

(२७) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी.

(२८) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी.

(२९) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी.

(३०) महागुज कॉलरीस मर्यादित.

(३१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

कृषी विभाग

(३२) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित.

(३३) महाराष्ट्र किटकनाशके मर्यादित.

(३४) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित.

पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३५) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित.

(३६) महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ मर्यादित.

सहकार विभाग

(३७) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित.

पणन विभाग

(३८) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.

वस्त्रोद्योग विभाग

(३९) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित.

(४०) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित.

सांस्कृतिक कार्य विभाग

(४१) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित.

पर्यटन विभाग

(४२) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित.

सामाजिक न्याय विभाग

(४३) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित.

(४४) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ.

(४५) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित.

(४६) संत रोहिदास चर्मोद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग

(४७) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित.

(४८) शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित.

(४९) वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित.

कौशल्य विकास विभाग

(५०) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित.

जलसंधारण विभाग

(५१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ.

जलसंपदा विभाग

(५२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ.

(५३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ.

(५४) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ.

(५५) तापी पाटबंधारे विकास महामंडळ.

(५६) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ.

नियोजन विभाग

(५७) महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित.

अल्पसंख्याक विभाग

(५८) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित.

आदिवासी विकास विभाग

(५९) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित.

सामान्य प्रशासन विभाग

(६०) महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ.

सामान्य प्रशासन विभाग (नागरी उड्डाण)

(६१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित.

(६२) मिहान इंडिया लि.

(६३) नागपूर उड्डाण क्लब.

सार्वजनिक बांधकाम विभाग

(६४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ.

महिला व बालविकास विभाग

(६५) महिला आर्थिक विकास महामंडळ.

समितीच्या कार्यकक्षेतील उपक्रम :—

सुरुवातीला समितीकडे फक्त तीन उपक्रमांचे कामकाज सोपविण्यात आले होते. त्यानंतर दहा उपक्रमांचे कामकाज सोपविण्यात आले आणि दिनांक ६ ऑगस्ट, १९८० रोजी विधानसभेने संमत केलेल्या ठरावानुसार त्यावेळी अस्तित्वात असलेली सर्व महामंडळे/उपक्रम, सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यकक्षेत आणली. त्याचबरोबर सदर ठरावान्वये भावी काळात स्थापन होणारी अशा प्रकारची महामंडळे वा उपक्रमांच्या परीक्षणाचे कामही या समितीकडे सोपविण्यात आले. सध्या राज्यात ६५ शासकीय कंपन्या अस्तित्वात आहेत. सदर उपक्रमाची यादी विधानसभा नियमावलीतील तृतीय अनुसूचित नमूद करण्यात आलेली आहे.

समितीची सर्वसाधारण कार्यपध्दती :—

विधानसभा नियमावलीत नियम १६३ ते १९३ मध्ये तसेच विधानपरिषद नियमावलीतील नियम १५८ ते १८८ मध्ये समित्यांच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीची माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे समितीने आपली स्वत:ची पध्दत अवलंबिण्यासंबंधी अंतर्गत कामकाजासंबंधीचे नियम केलेले आहेत. वरील पध्दतीनुसार कामकाज करण्याबाबत समिती साधारणपणे आपला वर्षाचा एकंदर कार्यक्रम ठरवित असते. समितीकडे सोपविण्यात आलेल्या ६५ मंडळाच्या/ महामंडळाच्या तपासणीचे काम करण्यासाठी कार्यक्रम ठरविला जातो. सदर कार्यक्रम ठरविताना या उपक्रमांचे वार्षिक प्रशासन अहवाल आणि महालेखापरीक्षकांनी दिलेले लेखापरीक्षा अहवाल यांचा विशेष उपयोग होतो. तूर्त मा.अध्यक्षांनी कोणत्याही विशिष्ट उपक्रमाबाबत तपासणी करण्याचे आदेश समितीला दिलेले नाहीत.

सार्वजनिक उपक्रम समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस **सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा)** या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील **सार्वजनिक उपक्रम समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी** :-

(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ :- तिसरा अहवाल (२०१०-२०११)

डेक्कन ओडीसीचे कार्यचालन :— "डेक्कन ओडीसी" प्रवासी रेल्वे गाडी की जी महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील पर्यटन व्यवसायास अधिक चालना मिळण्यासाठी पर्यटन विकास महामंडळाकडून सुत्र संचालन करण्यासाठी तयार करण्यात आली होती. सन २००४-०५ या कालावधीमध्ये व्यवसाय तोटयामध्ये असताना डेक्कन ओडीसीमध्ये प्रवासी आरक्षण करण्यासाठी सुसाहय अहवालानुसार आरक्षण अभिकर्त्याला एकूण प्रवास किंमतीच्या १० टक्के ठरवून देण्यात आलेली रक्कम देणे अपेक्षित असताना जास्त म्हणजे १७ टक्के देण्यात आली. महामंडळाचा व्यवसाय तोटयामध्ये असताना असे करणे अत्यंत अवाजवी होते. आरक्षण अभिकर्त्याला जादा अधिक सात टक्के रकमेचे केलेले वाटप देणे हे योग्य नव्हते हे शासनाच्या व्यापारी व वाणिज्यिक धोरणाशी सुसंगत नव्हते.

एकंदर अनुभव लक्षात घेऊन पुढील काळामध्ये धोरणात्मक बदल करून फायदेशीर बाबींचा विचार करून भविष्यकाळामध्ये ते करणे अधिक उचित होईल. शासनाच्या धोरणानुसार शासकीय उपक्रमांच्याबाबत व्यापारी व वाणिज्यिक तत्वांचा पुर्ण वापर करून महामंडळ तोट्यात असताना ठरलेल्या रकमेपेक्षा अधिक दलाली देणे हे संयुक्तीक नव्हते. अशा बाबींचा पुढील काळामध्ये विचार करावा व तसा धोरणात्मक बदल करून महामंडळास कुठलाही तोटा होणार नाही याचा प्राथम्याने विचार करून निर्णय घ्यावा व तशी अंमलबजावणी करावी. महामंडळाकडून आरक्षणाबाबत संपुर्णत: आरक्षण अभिकर्त्यावर अवलंबुन राहणे चुकीचे आहे. आजच्या आधुनिक काळामध्ये प्रसिध्दी व प्रचाराच्या अनेक सुविधा आहेत. इंटरनेट सुविधा, भ्रमणध्वनीद्वारे एस.एम.एस. करून प्रसिध्दी व प्रचार करण्यासाठी महामंडळाकडून काही प्रयत्न करण्यात आले असले तरी महामंडळास फायदेशीरदृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टीने इंटरनेट आणि संगणक याचा अधिक कार्यक्षमपणे उपयोग करावा.

भारतातील पर्यटकांसाठी हिन्दी भाषेमध्ये व मराठी पर्यटकांसाठी मराठी भाषेमध्ये व परदेशातील पर्यटकांसाठी ज्या भागापासुन पर्यटक "डेक्कन ओडीसीस" भेट देत असतील ते देश तसेच इतर देशातील

भाषेमध्ये संकेतस्थळे त्या-त्या स्थानिक भाषेमध्ये विकसित करावीत. तसेच परदेशामध्ये देखील आरक्षण करण्याची सुविधा दिल्यास व्यवसाय अधिक फायदेशीर ठरण्याची शक्यता अधिक आहे.

महाराष्ट्र पर्यटन व्यवसाय अधिक समृध्द होण्यासाठी केंद्र शासनाकडून मिळणारा निधी जास्तीत जास्त प्रमाणामध्ये मिळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायदयाच्या चौकटीमध्ये त्याचे आरेखन करून पर्यटन स्थळांचा विकास साधावा.

(२) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ :— तिसरा अहवाल (२०१०-२०११)

अग्निशामके खरेदीमधील जादा खर्च :— राज्यातील शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबतचा निर्णय तामिळनाडूमधील शाळेतील विद्यार्थ्यांच्याबाबतीत घडलेल्या आकस्मिक घटनेनंतर व तदनंतर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून शालेय शिक्षण विभागामार्फत मंत्रीमंडळस्तरावर निर्णय घेतला गेला व त्याची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने खरेदीसाठी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाला नेमण्यात आले होते. **लघु उद्योग विकास महामंडळाकडून निविदा प्रक्रियेची जाहिरात देण्यासाठी राज्यस्तरीय वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्याची मागणी माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडे केल्यानंतर एका जिल्ह्यातील स्थानिक कमी खपाच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द झाल्याने स्पर्धात्मक दर मागविण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय वृत्तपत्रामधून जाहिरात देण्याची प्रथम काळजी न घेणे ही अतिशय गंभीर बाब असल्याचे समितीला दिसून आले. समिती अशी शिफारस करीत आहे की, महत्वाच्या प्रश्नावर खरेदी करीत असताना वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्द करण्याबाबत अनुसरण्यात आलेली पध्दत संशयास्पद दिसून येते यामध्ये व्यापारी व वाणिज्यिक पध्दतीचा संपूर्णपणे अभाव दिसतो, तरी याबाबत पुढील काळात महाराष्ट्रातील सर्व जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर वृत्तपत्रातून अशी निविदा प्रक्रियेच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात, माहिती व जनसंपर्क संचालक मंडळाकडून आवश्यक ते नियम बदलून कार्यवाही करण्याची सतर्कता राखावी. सुरुवातीच्या काही महत्वाच्या बाबी काटेकोरपणे पाळण्याकडे लघु उद्योग विकास महामंडळाकडून दुर्लक्ष झाल्यामुळे पुढील प्रश्न याप्रकरणी उपस्थित झाले होते. यामुळे लघु उद्योग विकास महामंडळाकडून यापुढे कार्यपध्दती अवलंबिताना अधिक सतर्कता बाळगावी.**

तामिळनाडू मधील घटनेनंतर शासनाने शाळेमध्ये अग्निशामक यंत्रणा बसविण्याबाबत निर्णय घेतला. महाराष्ट्रातील एकूण शाळांची संख्या पाहता सर्व शाळांमध्ये अग्निशामक नळकांड्या उपलब्ध करून देता येतील किंवा नाही व अशा महत्वाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्थानिकस्तरांवर सक्षमता आहे की नाही याचा विचार होणे अत्यंत गरजेचे होते. अग्निशामक नळकांड्या पुरविण्यात आल्यानंतर त्याच्या पुर्नभरणीकडे झालेले दुर्लक्ष व त्याचा वापर करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण न घेतल्यामुळे सर्व योजना पुर्णपणे सफल झाली नसल्याचे समितीस दिसून आले आहे. शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने इतक्या महत्वाचा निर्णय अवलंबण्यामधील या अनियमित बाबी समिती दुर्लक्षित करु शकत नाही.

(३) शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित :— सातवा अहवाल (२०१०-२०११)

(I) **लेखापरीक्षणाची व्याप्ती :—** शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील विकास कामे केली जात असताना प्राप्त होणारा टी.डी.आर. व त्याची विक्री करण्यासाठी अनुसरावयाची पध्दत याबाबत समितीने दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी आपल्या उपरोक्त अहवालातील शिफारशीबाबत फेरविचार करून टी.डी.आर. विक्रीसाठी बाजारातील चढ

उताराचा जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी टी.डी.आर. विक्रीचे स्पष्ट पारदर्शक धोरण ठेवून निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा व विक्रीप्रक्रियेसाठी विकेंद्रीकरण ठेवण्यास हरकत नसावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(II) **सेवाकरांची अनियमित प्रतिपूर्ती :—** शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकडून करण्यात आलेल्या कराराप्रमाणे समंत्रणा फी प्रकल्प खर्चाच्या १.५ ते २.२५ टक्के दराने वास्तुरचनाकारांना प्रदान करावयास पाहिजे होती. सेवा कर हा अप्रत्यक्ष कर होता व सेवा प्राप्त करणारा सेवाकरांची प्रतिपुर्ती करण्यास बांधिल होता व याप्रकरणी करण्यात आलेली प्रतिपुर्ती करार बांधिलकीच्या व्याप्तीच्या बाहेर होती.

ज्यादा सेवाकर अदा करताना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी याचा अभ्यासपुर्वक विचार न करता रक्कम अदा केली असल्याचे दिसून येत असल्याने याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार कडक कारवाई देखील करण्यात यावी. तसेच विभागीय सचिवांनी मान्य केल्याप्रमाणे परिपुर्ती केलेल्या रकमेची एक महिन्याच्या आत संबंधितांकडून वसुली करण्यात यावी. यापुढील काळात अशा प्रकारचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून निर्णय घेण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(४) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ मर्यादित :— आठवा अहवाल (२०१०-२०११)

पोलीस गृहनिर्माणाची आवश्यकता :– पोलिसांकरिता बांधलेल्या निवासस्थानांच्या जुन्या इमारतींची देखभाल/ दुरुस्ती देखील निधी अभावी व्यवस्थित होत नाही. या इमारती देखील अत्यंत जिर्णअवस्थेत असून, तेथे राहणे देखील धोकादायक झालेले आहे. या इमारतींची योग्यरित्या देखभाल होण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. पुनर्वसनासाठी निधींची कमतरता भासत असल्यामुळे जुन्या इमारतींचा विकास करताना त्याचा खाजगी विकासकामार्फत विकास केल्यास शासनाला आर्थिक बोजा देखील पडणार नाही व निवासस्थाने देखील जास्त प्रमाणात व कमी कालावधीत उपलब्ध होतील. यासाठी शासनाने यावर देखील साकल्याने विचार करावा व निर्णय घ्यावा. तसेच महामंडळाकडे उपलब्ध असलेली अतिरिक्त जमीन व्यवसायिकदृष्ट्या विकसित करून त्यातून निधी महामंडळास प्राप्त होवू शकेल काय, यासाठी शासन निर्णयांतर्गत देखील विचार करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(५) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ :– आठवा अहवाल (२०१०-२०११)

बोलींना अंतिमरुप देण्यामधील व करार अंमलबजावणीतील विलंबामुळे महसूलाचे नुकसान :- मुंबई-पुणे दृतगती माहामार्गावरील दोन्ही बाजुला जाहिरातीचे हक्क पाच वर्षासाठी भाडेपट्टयानी देण्यासाठी मे, २००७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा दिनांक १५ जून, २००७ रोजी उघड्यात येवून त्याला संचालक मंडळाने दिनांक २९ ऑगस्ट, २००७ रोजी मान्यता दिली. आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या या निर्णयावरती महामंडळ स्तरावरील कार्यालयातच विलंब झालेला होता. सदर प्रस्तावास संचालक मंडळाची आवश्यकता असल्यामुळे विलंब कालावधीत संचालक मंडळाच्या चार बैठका होवून देखील संचालक मंडळासमोर सदर प्रस्ताव सादर केलेला नव्हता संचालक मंडळाने ऑगस्ट, २००७ रोजी मान्यता दिल्यानंतरही प्रत्यक्ष कामाचा आदेश देण्यापर्यंतचा कालावधी लक्षात घेता यामध्ये महालेखाकारांच्या आक्षेपानुसार विलंब झालेला होता ही वस्तुस्थिती स्पष्ट झालेली आहे. महामंडळाने आर्थिक

फायदेशीर बाबीसंबंधी विहित कालावधीत निर्णय घेणे आवश्यक होते. जाहिरातीची बाब नव्यानेच करण्याचा निर्णय झाल्यानंतर महामंडळ स्तरावर देखील याची पडताळणी करणे आवश्यक होते. **यासंदर्भात ठेकेदाराकडून वसुल व्हावयाच्या रक्कमेबाबत कारवाई त्वरीत करण्यात यावी, जेणेकरून आर्थिक नुकसान होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शासनाने महामंडळाला आर्थिक हित संबंध जोपासण्याच्या दृष्टीने कार्यपध्दतीमध्ये आमुलाग्र बदल सुचवावेत अशी समितीची शिफारस आहे.**

(६) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :- दहावा अहवाल (२०१२-२०१३)

प्रवास मार्गाचे कार्यचालन व प्रवास मार्गाचे कार्यचालन आणि अमितव्ययी मार्गाच्या कार्यचालनामुळे झालेला तोटा :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून तोट्यात चालणाऱ्या मार्गाची मुल्यमापन करून मुल्यवर्धित महसूल मिळविणाऱ्या मार्गाचे सुसूत्रीकरण करून अनुकूलतम सुधारणा करून तोट्याच्या मार्गाचा नियतकालीक आढावा घेण्यासाठी महालेखाकारांनी आक्षेप नोंदविला होता तसेच बंधनकारक फेऱ्यामुळे झालेल्या तोट्याची प्रतिपुर्ती होण्यासाठी काय प्रगती झालेली आहे याबाबत देखील महालेखाकारांनी आपले अभिप्राय व्यक्त केले होते. **विद्यार्थी वृध्द व काही घटकांसाठी विशेष प्रवासी सवलत देण्यासाठी शासनाकडून शिफारस केली असल्याने सदर प्रवाशांसाठी देखील शासनाकडून महामंडळास आर्थिक मदत केली जात असुन सदर मदतीकरिता शासनाकडून महामंडळाला देय असणारी आर्थिक मदत अद्यापही महामंडळाला दिली गेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले असुन, सदर आर्थिक मदत त्वरेने देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करावी. अवैध वाहतुकीमुळे राज्य परिवहन सेवेला होणारा तोटा लक्षात घेता त्यावर करावयाच्या उपाययोजनेसाठी कडक नियम करण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता आहे. महामंडळाच्या बसेसना राज्यात विविध मार्गावर टोल लावला जातो. सदर टोल हा प्रवाशांवर लादला जातो. महामंडळाच्या बसेसनी सर्वसाधारण प्रवाशी किंवा गरीब प्रवाशी प्रवास करीत असल्याने महाराष्ट्राच्या बसेसना टोल आकारण्या संदर्भात शासनाने पूर्व विचार करून तो रद्द करण्याच्या दृष्टीने अथवा माफक प्रमाणात टोल आकारण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.**

महामंडळाकडून इलेक्ट्रॉनिक तिकिट छपाईसाठी देण्यात आलेला ट्रॉयमॅक्स या कंपनीकडून इतर राज्यातील त्याच कंपनीकडून देण्यात येणाऱ्या छपाई दरामध्ये तफावत पहाता याबाबत सुसुत्रता आणण्यासाठी आवश्यक वाटल्यास स्पर्धात्मक बोलीद्वारे निवड करून कार्यवाही करावी.

(७) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ :- तेरावा अहवाल (२०१५-२०१६)

वाहनांची परिरक्षा (प्रतिबंधात्मक परिरक्षा) :- महामंडळाला इंजिन ऑईलची प्रमाणभूत पातळी योग्यरित्या (मेंटेन) ठेवण्यासाठी ऑईलची भर टाकून (टॉप अप) करावे लागते, सन २०१५-२०१६ मध्ये १२ लाख लीटर ऑईल मूळ इंजिन ऑईलसाठी लागले व ४ लाख लीटर इंजिन ऑईल टॉपअपसाठी लागले आहे.

इंजिन ऑईल टॉपअपसाठी लागणारे ऑईलचे प्रमाण व्यवहार्य नाही. त्यामुळे ईओसी (इंजिन ऑईल चेंज) मध्ये एस.टी. महामंडळाच्या डेपोमध्ये अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे ऑईल खरेदी केल्यानंतर प्रत्येक डेपोला किती ऑईल देण्यात आले व त्या डेपोने टॉपअपसाठी किती ऑईलचा वापर केला आहे. याबाबतची सविस्तर माहिती महामंडळाने अद्ययावत स्वरुपात ठेवावी व प्रमाणकानुसार (नॉर्म्स)

इंजिन ऑईलचा वापर न करणाऱ्या डेपोच्या संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांविरुध्द व डेपो व्यवस्थापकाविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(८) महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ :— सोळावा अहवाल (२०१७-२०१८)

रेडिमिक्स प्लॅन्टसाठी जमिनीचे वाटप :— महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळाने ५ एकर जमीन ३३ वर्षाच्या भाडेपट्ट्याने रेडिमिक्स काँक्रिट प्लॅन्टसाठी माहे मे, २००६ मध्ये दिली होती. नंतर ६ एकर जमीन तात्पुरत्या स्वरुपात ७ वर्षांच्या कालावधीसाठी देण्याची विनंती माहे जुलै, २००७ मध्ये केली आहे. याकरिता आगाऊ भूईभाडे रुपये १.४९ कोटी देण्याचे ठरले. कंपनीने फक्त रुपये ८५.१० लक्ष वसूल केले यासंदर्भात विकासकासमवेत करारसुध्दा केला नाही. वाटप पत्रानुसार कंपनीने आगाऊ वसुली केली नसल्यामुळे रुपये ४८ लाख व त्यावरील व्याज असे एकूण रुपये १.२५ कोटी वसूल होणे बाकी होते.

समितीने अशी शिफारस केली की, भाडेपट्ट्यापोटी पैसे दिले आहेत. त्याचा कोणताही लेखी करार नाही. एवढे होऊनही पूर्ण भाडेपट्टा वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे याप्रकरणी आर्थिक गुन्हा घडलेला आहे. यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी.

(९) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ :— एकोणिसावा अहवाल (२०१७-२०१८)

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना जादा प्रदान :— कंपनीने दोन निविदा प्रक्रियेद्वारे प्रकल्प कामाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती केली आहे त्यापैकी मे.घेरजी इस्ट्रन मर्यादित प्रा.लि. या कंपनीची कंत्राट किंमत ९३.५० लक्ष रुपये इतकी असतांना कंत्राटाचा कालावधीत दोन महिने वाढ झाल्याने प्रकल्प सल्लागाराचे शुल्क प्रकल्पाच्या अंदाजित खर्चाच्या २.४९ टक्के दराने नियमित करणे आवश्यक असतांना ते प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर प्रदान करण्यात आले. तसेच टेक्नोजेम्स कंपनीची निविदा किंमत १४.९० लक्ष निश्चित करण्यात आले असून बांधकामांच्या कालावधीला दोन वेळा मुदतवाढ दिली असल्याने प्रकल्प सल्लागाराच्या शुल्कात वाढ झाली आहे.

समितीने अशी शिफारस केली की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची जबाबदारी कंत्राट वेळेत पूर्ण करून घेण्याची असतांना कंत्राटदाराने कामामध्ये विलंब केल्यामुळे कंत्राटदारांचा लाभ झाला आहे व प्रकल्प सल्लागाराला अधिकची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे ती रक्कम वसूल करण्यात यावी व कामामध्ये झालेल्या विलंबाप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी.

(१०) महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ :- विसावा अहवाल (२०१७-२०१८)

अतिरिक्त अधिमूल्याची न झालेली वसुली :- रस्त्यालगत असलेल्या ११ ते ३० मीटर भूखंडावर मूळ किंमतीच्या १० टक्के अधिक व ३० मीटरहून अधिक रस्त्यालगतच्या भूखंडावर २० टक्के अधिक व कॉर्नर भूखंडावर २५ टक्के अधिक अतिरिक्त अधिमूल्य आकारणे आवश्यक असताना ५ भूखंड हे सेवा मार्ग ३२ मीटर रुंदीच्या रस्त्याच्याकडेला काढले असतानाही भूखंड वाटपादरम्यान रुपये १.०४ कोटीचे अतिरिक्त अधिमूल्य आकारण्यात आले नाही. कारण खारघरच्या प्रकरणात रस्त्यालगत असलेल्या भूखंडाच्या रहदारीला प्रवेश नसताना २० टक्के अधिमूल्य आकारण्यात आले होते. त्यामुळे त्याच नियमाप्रमाणे महामंडळाने रु.१.०४ कोटीचे अतिरिक्त अधिमूल्य आकारावयास पाहिजे होते.

खारघर येथील भूखंडाबाबत रस्त्याच्या रुंदीनुसार किंवा कॉर्नर भूखंड असेल तर जादा रक्कम वसूल करणे गरजेचे आहे. परंतु या प्रकरणामध्ये रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. सदरच्या प्रकरणात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा करण्यात आलेला असल्यामुळे त्याची चौकशी करून जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे अर्थशास्त्र विभागाच्या मूल्यांकनाशिवाय संचिका थेट शहर सेवा विभागाने मंजूर केल्या असतील तर अशा संचिका शोधून अर्थशास्त्र विभागामार्फत पुर्नतपासणी करून दंडासह अधिमूल्याची रक्कम वसुली करण्यात यावी व यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी.

*****

(४) पंचायती राज समिती (Committee on Panchayati Raj)

समितीची रचना, कार्यपद्धती व कामकाज :-

समितीची स्थापना :-

कार्यकारी प्रशासनाचा संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण प्रभावी व अर्थपूर्ण (Effective and meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने विधानमंडळ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि राज्यघटनेत अंतर्भूत असलेली न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वे गावपातळीपासून आचरणात आणण्यासाठी ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सत्तेचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागातील जनतेला शासनाच्या कामकाजामध्ये सहभागी होता यावे या उद्देशाने पं.जवाहरलाल नेहरु यांनी सन १९५६ मध्ये बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली. श्री.बलवंतराय मेहता यांनी दिनांक ०२ ऑक्टोबर, १९५९ रोजी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अशा त्रिस्तरीय पद्धती असावी असा अहवाल शासनाला सादर केला, या अहवालात गावपातळीच्या विकासासाठी गावकऱ्यांचा सहभाग तसेच सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. हा प्रस्ताव शासनाने स्वीकारला. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात सन १९६२ मध्ये जिल्हा परिषदा स्थापन करण्यात आल्या. शासनाकडून जिल्हा परिषदांना विविध योजना व कार्यक्रम राबविण्यासाठी दरवर्षी अनुदानाच्या रुपाने रकमा दिल्या जातात. या रकमांचा विनियोग योग्य प्रकारे करून योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करून शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील लोकांना मिळण्याच्या उद्देशाने या संस्थांची स्थापना झाली.

जिल्हा परिषदांच्या कारभारावर विधिमंडळाचे नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विधान कार्य मंत्र्यांनी दिनांक २८ मार्च, १९७३ रोजी विधानसभेत पुढीलप्रमाणे ठराव मांडला :–

हे सभागृह असा ठराव करीत आहे की,–

(अ) एकलसंक्रमणीय मतदानाने आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्वानुसार दोन्ही सभागृहातील सदस्यांमधून निवडून द्यावयाच्या, विधानसभेतील १५ व विधानपरिषदेतील ४ अशा १९ सदस्यांची 'पंचायती राज समिती' या नावाच्या एका समितीची रचना करण्यात यावी आणि त्यासाठी मतदान हे गुप्त मतदान पद्धतीनुसार घेण्यात यावे. सदर १५ सदस्यांपैकी दोन सदस्य अनुसूचित जातीचे व दोन सदस्य अनुसूचित जमातीचे असावेत आणि त्यांची निवडही एकलसंक्रमणीय मतदानाद्वारे व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार करण्यात यावी.

(ब) कोणताही मंत्री या समितीचा सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही आणि एखादा सदस्य, समितीवरील आपल्या निवडीनंतर मंत्री म्हणून नियुक्त झाल्यास, तो अशा नियुक्तीच्या तारखेपासून समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

उपरोक्त ठरावावर दिनांक २८ व २९ मार्च, १९७३ रोजी विधानसभेत चर्चा झाली. चर्चेअंती दिनांक २९ मार्च, १९७३ रोजी ठराव संमत झाला.

विधानपरिषदेत या ठरावावर दिनांक ३० मार्च, १९७३ रोजी चर्चा होऊन ठराव संमत झाला. महाराष्ट्र विधानमंडळाने मार्च, १९७३ मध्ये पारित केलेल्या या ठरावानुसार पंचायती राज समितीची स्थापना करण्यात आली.

समितीची रचना :- (म.वि.स. नियम २३९)

(१) दर वर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती, नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य असेल तितक्या लवकर पंचायती राज समितीची रचना करण्यात येते.

(२) पंचायती राज समिती ही पंचवीसपेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल. त्यापैकी वीसपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य हे, विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतात आणि त्याचप्रमाणे, पाचपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून सभापतीद्वारे, नामनिर्देशित करण्यात येतात :

परंतु, विधानसभेमधून नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या वीस सदस्यांमधील दोन सदस्य हे अनुसूचित जातीचे व दोन सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

(सन १९८०-८१ पर्यंत समिती निवडणुकीद्वारा गठीत होत असे आणि समितीची सदस्य संख्या १९ असे. परंतु १९८१-८२ पासून समिती मा. अध्यक्षांकडून नामनिर्देशित होत असून समितीच्या सदस्यांची संख्या देखील आता १९ ऐवजी २५ इतकी आहे.)

समितीची कामे :- (म.वि.स. नियम २४०)

पंचायती राज समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम १४२ (४) अन्वये विधानमंडळास सादर करण्यात येणाऱ्या, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तपासणी करणे ;

(ब) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुंबई यांनी तयार केलेल्या व शासनाने विधानमंडळाला सादर केलेल्या जिल्हा परिषदांच्या वित्तविषयक एकत्रित लेख्यांची व जिल्हा परिषदांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाची तपासणी करणे;

(क) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या अर्थसंकल्पासंबंधात व लेख्यासंबंधात लोकलेखा समितीची व अंदाज समितीची कामे करणे :

परंतु, समिती पुढील बाबींपैकी, कोणत्याही बाबीसंबंधात तपासणी व अन्वेषण करणार नाही :–

(एक) शासनाच्या महत्त्वाच्या धोरणविषयक बाबी.

(दोन) जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या दैनंदिन प्रशासनविषयक बाबी ; व

(तीन) ज्यांच्या विचारार्थ विशेष यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे अशा बाबी :

आणखी असे की, नियम १७६ च्या तरतुदींच्या अधीन राहून,–

(अ) शासनाचा ग्रामविकास विभाग हा समितीस आवश्यक असेल अशी माहिती व कागदपत्रे जिल्हा परिषदांकडून वेळोवेळी मागवील व ती समितीच्या उपयोगासाठी विधानमंडळ सचिवालयाकडे सादर करील.

(ब) समितीस, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, जिल्हा परिषदांच्या विषय समित्यांचे सभापती, पंचायत समित्यांचे सभापती व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर कोणतेही अधिकारी यांची तपासणी करता येईल.

समितीचा पदावधी-विधानसभा नियम १६५

(१) अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेली समिती, या भागात समाविष्ट केलेल्या नियमात अन्यथा विनिर्दिष्ट केलेले नसेल तर, त्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीसाठी किंवा नवीन समिती नामनिर्देशित करण्यात येईपर्यंत अधिकारावर राहील.

(२) समितीचा सदस्य नामनिर्देशनाद्वारे पुन्हा नियुक्ती होण्यास पात्र असेल.

समितीवरील सदस्यत्वाचा राजीनामा :—

सदस्यास स्वत:च्या सहीने अध्यक्ष/सभापती यांना लेखी कळवून समिती सदस्यत्वाचा राजीनामा देता येतो. तसेच जर एखादा सदस्य समितीच्या लागोपाठच्या दोन किंवा अधिक बैठकीस समिती प्रमुखांच्या परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास अशा सदस्यांस समितीतून काढून टाकण्याबाबत समिती प्रमुख अध्यक्ष/सभापती यांना शिफारस करू शकतात.

समितीच्या बैठकी :—

विधानसभा नियमातील नियम १७३ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकी, समिती प्रमुख निश्चित करतील अशा दिवशी व अशा वेळी भरतील. परंतु समिती प्रमुख सहजगत्या उपलब्ध नसतील तर सचिवांना बैठकीचा दिनांक व वेळ ठरविता येईल. तसेच विधानसभा नियमातील नियम १७६ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकी विधान भवनाच्या प्रसीमेत भरविण्यात येतील आणि बैठकीची जागा बदलून ती विधान भवनाच्या बाहेर ठेवणे आवश्यक असेल तर ती बाब अध्यक्षांकडे विर्निदिष्ट करण्यात येईल आणि याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असतो.

उप समिती नेमणे :—

समितीचा कालावधी एक वर्षाचा असतो आणि या कालावधीत राज्यातील एकूण ३४ जिल्हा परिषदांपैकी काही निवडक जिल्हा परिषदा अभ्यासभेटीसाठी निवडल्या जातात. निवडलेल्या जिल्हा परिषदांच्या पंचायत समित्यांची तपासणी करण्यासाठी तीन किंवा चार सदस्यांचा याप्रमाणे एक किंवा अधिक अशा उप समित्या नेमल्या जातात. उप समितीने दिलेला अहवाल समिती विचारात घेते.

समितीच्या बैठका गुप्त असणे :—

विधानसभा नियम क्रमांक १७५ अन्वये समितीच्या बैठका गुप्तपणे भरविण्यात आल्या पाहिजेत.

समितीच्या कामकाजाची गोपनियता (म.वि.स. नियम १८१) :—

(१) समितीला, संपूर्ण पुरावा किंवा त्याचा भाग किंवा त्याचा गोषवारा पटलावर ठेवण्यात यावा असा निदेश देता येईल.

(२) समितीच्या तोंडी किंवा लेखी पुराव्याचा अहवालाचा किंवा कामकाजाचा जो भाग पटलावर ठेवण्यात आला नसेल असा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीला अध्यक्षांच्या अधिकारपत्रावाचून तपासणीसाठी खुला असणार नाही.

(३) समितीपुढे ठेवण्यात आलेला पुरावा सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात येईपर्यंत, समितीचा कोणतीही सदस्य किंवा इतर कोणतीही व्यक्ती, तो प्रसिद्ध करणार नाही :

परंतु, अध्यक्षांना स्वविवेकानुसार, असा पुरावा, तो औपचारिकपणे पटलावर ठेवण्यात येण्यापूर्वी, सदस्यांस गुप्तपणे उपलब्ध करून देण्यात यावा असा निदेश देता येईल.

महाराष्ट्र विधानसभा नियम क्रमांक १७७ अनुसार, जेव्हा जेव्हा समिती चर्चा करीत असेल तेव्हा तेव्हा समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व व्यक्तींनी तेथून निघून गेले पाहिजे.

महाराष्ट्र विधानसभा नियम १७८ अनुसार, समितीला एखाद्या विषयाच्या तपासणी संबंधात आवश्यक असलेल्या व्यक्तींना बोलविण्याचा आणि त्यासंबंधीचे कागदपत्र व अभिलेख मागविण्याचा अधिकार आहे.

वार्ताहरांसाठी माहिती :—

समितीच्या बैठका वृत्तपत्राच्या वार्ताहरांकरिता खुल्या नसतात. तथापि, समिती प्रमुखांनी निदेश दिले तर फक्त समितीने त्या दिवशी परिक्षिलेल्या विभागाची नावे, जिल्हा परिषदांची नावे याबाबतची माहिती वार्ताहरांसाठी देता येते.

साक्षीदारांनी अनुसरावयाची वागणूक व शिष्टाचार :—

१. साक्षीदारांनी आपल्या जागेवर बसताना किंवा जागेवरून उठताना समिती प्रमुख व अभ्यास गट किंवा उप समितीबद्दल योग्य तो आदर दर्शविला पाहिजे.

२. साक्षीदाराने त्यास समिती प्रमुखांनी किंवा एखाद्या सदस्याने विचारलेल्या विशिष्ट प्रश्नास उत्तर दिले पाहिजे.

३. समिती प्रमुख व समितीसमोर मांडावयाचे सर्व मुद्दे सभ्य व विनयशील भाषेत व स्पष्ट शब्दात मांडणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील तरतुदींच्या अधीन राहून पुढील कृत्यांमुळे समितीचा विशेष हक्कभंग व अवमान होतो :–

(अ) विचारण्यात आलेली माहिती उघड न करणे, राज्याच्या सुरक्षिततेस किंवा हितसंबंधास अपायकारक ठरेल या कारणांखेरीज इतर कोणत्याही कारणांवरून प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देणे.

(ब) खोटी साक्ष तयार करणे किंवा जाणूनबुजून खोटी साक्ष देणे किंवा सत्य दडवणे किंवा समितीची दिशाभूल करणे.

(क) क्षुल्लक गोष्टींसाठी समितीचा वेळ घेणे किंवा अपमानकारक उत्तर देणे.

(ड) चौकशीच्या संबंधित असा एखादा महत्त्वाचा दस्तऐवज नष्ट करणे किंवा त्याची नुकसानी करणे.

जिल्हा परिषदांच्या प्रशासनविषयक बाबीसंबंधी तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात तपासणी करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात येते :—

शासनाकडून जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर झाल्यानंतर :–

(एक) जिल्हा परिषदेच्या कामकाजाची स्थूलमानाने तपासणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेल्या विषयासंबंधात सर्वसाधारण स्वरूपाची प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात येते.

(दोन) सखोल तपासणी करण्यासाठी निवडण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या बाबतीत त्यांच्या वार्षिक प्रशासन अहवालातील माहितीच्या आधारे विशेष मुद्यांवर अधिक माहितीकरिता प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती संबंधित जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येते.

(तीन) जिल्हा परिषदेच्या प्रशासनात पंचायत समितीच्या कामकाजाचे महत्त्वाचे स्थान असते हे लक्षात घेऊन पंचायत समितीच्या कामकाजाविषयी सर्वसाधारण स्वरूपाची प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात येते.

(चार) याशिवाय सर्वसाधारण प्रश्नावलीच्या अनुषंगाने स्थूलमानाने तपासणी करण्यात येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही पंचायत समितीच्या कामकाजाची पाहणी, पंचायत समितीकरिता असलेल्या प्रश्नावलीच्या अनुरोधाने करावयाची ठरल्यास अशी प्रश्नावली संबंधित जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येते.

(पाच) जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील एखाद्या ग्रामपंचायतीच्या कामकाजाची पाहणीदेखील ग्रामपंचायतीकडे, जिल्हा परिषदेने सोपविलेल्या कामाच्या तसेच तद्नुषंगिक बाबीसंबंधात ग्रामपंचायतीकरिता तयार केलेल्या,

सर्वसाधारण स्वरूपाच्या प्रश्नावलीनुसार समितीकडून पाहणी करण्यात येते अशी पाहणी विशेषकरून सखोल परीक्षणाकरिता निवडलेल्या जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या संबंधात करण्याची प्रथा आहे.

लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल दोन्ही सभागृहांस सादर झाल्यानंतर त्यातील परिच्छेदावर संबंधित जिल्हा परिषदेकडून माहिती व खुलासे प्राप्त होतात.

जिल्हा परिषदांच्या कामकाजाचे परीक्षण करण्याकरिता तयार केलेल्या प्रश्नावलीची उत्तरे संबंधित जिल्हा परिषदेकडून साधारणः २ ते ३ महिन्याच्या कालावधीत प्राप्त होतात. अशाप्रकारे प्राप्त झालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने ठरविलेल्या जिल्हा परिषदांना भेट देऊन समिती जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी यांची साक्ष घेते. तसेच आवश्यकतेनुसार जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती संबंधित मंत्रालयीन विभागीय सचिवांचीही साक्ष घेते. साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती आपला अहवाल तयार करून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर करते.

याशिवाय पूर्वीच्या समितीने सभागृहांस सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईच्या संदर्भात समिती मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व मिळालेल्या माहितीच्या आधारे अनुपालन अहवाल तयार करून तोदेखील विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर करीत असते.

निरनिराळ्या विषयांचा तपशीलवार अभ्यास व तपासणी करण्यासाठी समिती एक किंवा अधिक अभ्यासगट आणि /किंवा उप समित्या वेळोवेळी नियुक्त करू शकते.

अभ्यास गटाची आणि/किंवा उप समितीची कामे, इतर गोष्टींबरोबर पुढीलप्रमाणे असतात :—

(एक) ग्रामविकास विभागाकडून मिळालेल्या किंवा विभागाने पुरविलेल्या माहितीचा सखोल अभ्यास करणे.

(दोन) समिती प्रमुखाने मान्यता दिल्यानंतर ग्रामविकास विभागाला पाठवावयाची प्रश्नावली तयार करणे.

(तीन) ग्रामविकास विभागाकडून आलेल्या उत्तराची तपासणी करणे व विचारात घेणे.

(चार) समितीने किंवा समिती प्रमुखाने पाठविलेल्या कोणत्याही प्रकरणाचा अभ्यास करणे व त्यावर अहवाल सादर करणे.

(पाच) अभ्यासदौरे आयोजित करणे व त्यावरील अभ्यास टिपणी तयार करणे.

(सहा) ज्याच्या आधारावर अहवालाचे प्रारूप तयार करता येईल असे ठळक मुद्दे तयार करणे.

(सात) अहवालाचे प्रारूप संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

(आठ) यापूर्वी सभागृहांना सादर केलेल्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत ग्रामविकास विभागाकडून आलेल्या उत्तरांची छाननी करणे.

(नऊ) यापूर्वी सभागृहांना सादर केलेल्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत त्यांच्या आधारावर अहवालाचे प्रारूप तयार करता येईल असे मुद्दे काढणे.

(दहा) यापूर्वी सभागृहांना सादर केलेल्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत अहवालाचे प्रारूप संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

अभ्यासगट आणि/किंवा उप समिती ही, आवश्यक वाटेल त्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या विषय समितीचा प्रमुख, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर अधिकारी किंवा शासनाच्या संबंधित विभागाचे प्रतिनिधी यांची तोंडी तपासणी करू शकते.

शब्दशः कार्यवृत्त :–

१. शब्दशः कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील आणि फक्त सभागृहासमोर ठेवण्यात आलेले केवळ अशा प्रकारचे कागदपत्र जनतेसाठी उपलब्ध राहतील.

२. सबंध पुरावा किंवा त्याचा कोणताही भाग मुद्रित करण्याचे समिती ठरवील तेव्हा तो वेगळ्या खंडाच्या स्वरूपात मुद्रित करण्यात येईल आणि समिती हाताळीत असलेल्या विषयावरील अहवालाचा तो एक भाग होईल.

बैठकीचे कार्यवृत्त :- समिती प्रमुखांच्या अनुमोदनासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय समितीच्या अभ्यासगटाच्या/ उप समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्ताचे प्रारूप तयार करील.

कार्यवृत्त परिसृत करणे :- समितीच्या प्रत्येक बैठकीचे कार्यवृत्त समितीच्या सदस्यांकडे परिसृत करण्यात येईल. समितीच्या सहमतीने असे कार्यवृत्त अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

अहवालाचे प्रारूप तयार करणे :-

समितीने केलेल्या शिफारशींच्या अहवालाचे प्रारूप तयार करण्यात येऊन ते प्रारूप समिती प्रमुखांना सादर करण्यात येईल.

अहवाल सादर करणे :-

प्रत्येक अहवालाचे प्रारूप किंवा त्याचा भाग समितीच्या बैठकीमध्ये विचारात घेण्यात येतो आणि उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या बहुसंख्य सदस्यांच्या निर्णयाचा यात अंतर्भाव असतो. त्यानंतर समिती प्रमुख समितीच्या वतीने त्यावर स्वाक्षरी करतात व ते मुद्रित करण्यात येते आणि त्यानंतर सदर अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात येतो.

अहवालाचे वितरण :-

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना अहवाल सादर केल्यानंतर त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानसभा/ विधानपरिषद सदस्य आणि संबंधित विभाग इत्यादींना उपलब्ध करून देण्यात येतात.

पंचायती राज समितीच्या अहवालातील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :–

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालातील पंचायती राज समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

(१) **तिसरा अहवाल (२०१०-२०११) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सन २००३-०४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील चंद्रपूर, वर्धा व सोलापूर जिल्हा परिषदांच्या संदर्भातील परिच्छेदाबाबत - प्रकरण क्रमांक - ३.१ (परिच्छेद क्रमांक ३.४४७) पृष्ठ क्र.२४)**

मागासवर्गीयांचे घरावरील गवती छप्पर बदलून पन्हाळी पत्रे घालणे या योजनेवरील खर्चाबाबत :- लेखा परिक्षणाच्या वेळी पंचायत समिती बार्शी उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माळशिरस, करमाळा यांच्याकडील लाभार्थी प्रस्ताव, लाभार्थी नोंदवही, साठा नोंदवही इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. परंतु जि.प.कडून प्राप्त झालेल्या माहितीवरून असे दिसून आले की, पंचायत समिती माळशिरस वगळता इतर तालुक्यांमध्ये अभिलेखे लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देण्यात आले होते व त्यावर लेखापरीक्षकांनी तपासल्याबाबतच्या स्वाक्षऱ्या होत्या. असे असतांनादेखील लेखापरीक्षकांनी त्यांच्या आक्षेपात माळशिरस वगळता इतर तालुक्यांची नावे कशाच्या आधारावर नमूद केली यांचा खुलासा झाला नाही. सबब **लेखापरीक्षकांनी एखादा आक्षेप नोंदवताना त्याबाबत योग्य ती खात्री करून घ्यावी.**

तसेच माळशिरस तालुक्यातील संबंधितांनी लेखापरीक्षकांना कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत. त्याबाबत समिती असे मत व्यक्त करते की, शासनामार्फत लेखापरीक्षकांना आवश्यक असणारी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके काढून निर्देश दिले आहेत. परंतु त्या निर्देशाचे पालन सदर प्रकरणी झाल्याचे दिसून आले नाही. **सबब समिती अशी शिफारस करते की शासनाच्या परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून अशा सूचनांचे ज्या क्षणी उल्लंघन झाल्याचे आढळून येईल त्याचवेळी संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.**

(२) **सातवा अहवाल (२०१०-२०११) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या सन २००३-२००४ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत - प्रकरण क्रमांक - १.१ (परिच्छेद क्रमांक ३.५६८) पृष्ठ क्र.१)**

सन २००३-२००४ या वर्षात जिल्हा परिषदांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी :- जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत असलेल्या सामान्य प्रशासन विभाग, वित्त व बांधकाम विभागात अनुक्रमे अफरातफर, जिल्हा परिषद रोखवही व बँक पासबुक यांच्या शिल्लकेतील तफावत व सिमेंट, स्टील व डांबर इत्यादी संदर्भात लेखापरीक्षणात आक्षेप घेण्यात आला असून त्यात विभागनिहाय अनुक्रमे २,६७,९९,६३१/- १,७९,४५,४९४/- व १२,८३,५१६/- एवढी रक्कम गुंतलेली आहे. सदर प्रकरणांपैकी वित्त व बांधकाम विभागातील अफरातफरीच्या प्रकरणासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेला लेखी खुलासा समाधानकारक आहे. परंतु, सामान्य प्रशासन विभागातंर्गत असलेल्या अफरातफरीची प्रकरणे ही प्रामुख्याने ग्रामनिधी व जरोयो संदर्भातील असून त्याबाबत विशेष लेखापरीक्षण करून घेण्यात आले होते व त्यानुसार ग्रामनिधीची एकूण २२६ प्रकरणे असून त्यात रु. ४३,७९,५७६.७३ व जरोयोची एकूण १८२ प्रकरणे असून त्यात रु. २,२४,२०,०५४.७७ एवढी रक्कम गुंतलेली आहे. ग्रामनिधी व जरोयोत गुंतलेली एकूण रक्कमेपैकी अनुक्रमे रु. १०,९०,२४४.३३ व ६७,४०,४७९.२३ वसूल करण्यात आली असून उर्वरित रक्कम वसूल करण्याची कार्यवाही पंचायत स्तरावर सुरू आहे.

अफरातफरीच्या प्रकरणात गुंतलेली रक्कम व वसूल करण्यात आलेली रक्कम यात फारच तफावत दिसून आली याबाबत खुलासा करताना ग्रामविकास विभागमार्फत असे सांगण्यात आले की, यातील सगळीच प्रकरणे अफरातफरीची नसून त्यामध्ये मूल्यांकनाच्या अभावामुळे तफावत दिसून येत आहे. मूल्यांकन करून घेण्यात आल्यावर सदर रक्कमांचे समायोजन करणे शक्य होणार आहे. परंतु, समितीला प्राप्त झालेल्या तोंडी व लेखी माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जिल्हा परिषदेमार्फत सदर प्रकरणी कारवाई करण्यास विलंब झाल्याने अशा प्रकरणात वाढ झालेली दिसून येते. अफरातफरीच्या प्रकरणांची तात्काळ चौकशी तसेच मूल्यमापन करण्यात आले असते तर अशा प्रवृत्तीस आळा बसला असता व त्याच्या प्रमाणातदेखील घट झाली असती परंतु जिल्हा परिषद, धुळेमार्फत अफरातफरीच्या प्रकरणाचा निपटारा करण्यात विलंब लागल्याने सदर प्रकरणात दोषी असलेल्या संबंधितावर कारवाई करण्यास विलंब झालेला आहे. तसेच, अशा प्रकारच्या विलंबामुळे संबंधित दोषी व्यक्तींविरुद्ध कारवाई करणेदेखील कठीण होत असल्याचे समितीला प्राप्त झालेल्या माहितीवरून दिसून येत आहे. सबब, **समिती अशी शिफारस करीत आहे की, अफरातफरीच्या प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा आढावा घेऊन एक कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात यावा व संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई प्रस्तावित करण्यात यावी व करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला देण्यात यावी. तसेच, अशा प्रकरणाच्या अनुषंगाने समिती शासनाच्या निदर्शनास असेदेखील आणू इच्छिते की, राज्यातील सर्व जिल्हापरिषदातंर्गत अफरातफरीच्या प्रकरणांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे व त्यामागची कारणेदेखील जवळजवळ एकसारखीच आहेत. त्यामुळे शासनस्तरावर प्रकरणे प्रलंबित राहण्याचा आढावा घेऊन ती निकालात काढण्यासाठी ठोस व कालबद्ध उपाययोजना करावी. त्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेकडून अफरातफरीच्या प्रकरणाबाबतचा दर तिमाही अहवाल मागविण्याची कार्यपद्धती शासनाने यापुढे सुरू करावी, अशी ही शिफारस समिती करीत आहे.**

(३) **आठवा अहवाल (२०१०-२०११) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सिंधुदुर्ग, धुळे, लातूर व अमरावती जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - २.१ / पृष्ठ क्र.६)**

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी माफी (उच्च शिक्षण) :- सन २००४-२००५ या वित्तीय वर्षात धुळे जिल्हा परिषदेने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्राप्त अनुदानापैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजेच रुपये २७ लाख २४ हजार एवढ्या अनुदानातून रुपये १५ लाख ७२ हजार एवढी रक्कम अखर्चित ठेवली होती.

पंचायती राज समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडून याबाबत घेतलेल्या माहितीत शाळा व कॉलेजांकडून पुरेसे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत व प्राप्त प्रस्तावात त्रुटी आढळून आलेल्या होत्या. यास्तव शाळेचे मुख्याध्यापक व महाविद्यालयाचे प्राचार्य व विश्वस्त यांच्याकडून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कोणतेही प्रयत्न वा पाठपुरावा केल्याचे आढळून आले नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिलेल्या माहितीत तफावत आढळून आली होती.

सदर योजना गोरगरीबांच्या मुलांसाठी असल्यामुळे हा एकप्रकारे गोरगरिबांचा प्रश्न आहे. अहवाल वर्षात प्रस्तावातील त्रुटींचे निराकरण करून ते प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कसल्याही प्रकारचा पाठपुरावा किंवा प्रयत्न न केल्यामुळे, बहुतांश विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिले. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या

पालकांच्या मुलांना फी माफी योजनेपासून वंचित ठेवल्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी असे आदेश दिले. प्रत्यक्षात मागासलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांकडून प्रस्ताव प्राप्त करून घेण्याबाबत प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी कसल्याही प्रकारे प्रयत्न केल्याचे दिसत नाही, असे मत समितीने भेटीच्या वेळी व्यक्त केले.

सदर त्रुटीयुक्त प्रस्तावामधील त्रुटीची पूर्तता करून ते पुन्हा सादर करणे आवश्यक होते, असे समितीचे मत झाले आहे.

याप्रकरणी दोषी असलेल्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी तसेच प्रस्तावातील त्रुटी दूर करण्यात याव्यात व अप्राप्त प्रस्ताव प्राप्त करून घेण्यात यावेत व प्रत्येक मागासवर्गीय विद्यार्थ्यास फी माफी वेळेवर मिळेल यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही सर्व संबंधितांनी वेळीच करावी यासाठी शासनाने सविस्तर सूचना यानिमित्ताने सर्व जिल्हा परिषदांना परिपत्रकाद्वारे द्याव्यात व सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(४) **दहावा अहवाल (२०१०-२०११) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - १.२ / पृष्ठ क्र.७)**

(I) **ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण :-** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ क नुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे नियमित लेखा परीक्षण करण्याची तरतुद आहे. तथापि, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण करण्याबाबतची तरतूद नसून त्याखाली करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम, १९६१ मधील नियम ७ (एक) नुसार हिशेब तपासनीसाने वर्षातून साठ ग्रामपंचायतीची तसेच पोट-नियम (दोन) नुसार जिल्ह्यातील सर्व पंचायतींच्या हिशेब तपासणी पाच वर्षाच्या कालावधीत पूर्ण केली पाहिजे अशी तरतूद आहे.

तथापि, सदर तरतूद ग्रामपंचायत अधिनियमात केलेली नसल्यामुळे, ग्रामपंचायती नियमातील तरतुद आवश्यक त्या गांभीर्याने घेत नाहीत, त्यामुळे शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा केलेला विनियोग योग्यप्रकारे झाला आहे काय, त्याचा वापर पूर्णांशाने झाला आहे काय, याची शासन स्तरावर शहानिशा होत नाही, त्यामुळे तेथे अनियमितता व भ्रष्टाचार यास प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या खतपाणी घातल्यासारखे झालेले आहे. ग्रामपंचायतीच्या लेख्यांचे परीक्षण जिल्हा परिषदा वा पंचायत समित्यांप्रमाणे नियमितरित्या होत नाही त्यामुळे ग्रामसेवकाने त्यांच्या कार्यकाळात केलेला भ्रष्टाचार वा अनियमितता विलंबाने उघडकीस येत असल्यामुळे, दोषी ग्रामसेवकांची बदली होते, निवृत्त होतात वा ते मयत होत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध आवश्यक कारवाई प्रलंबित राहते असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे.

त्यास्तव ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण जिल्हा परिषदा वा पंचायत समित्यांप्रमाणे नियमितरित्या होण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे अशी समितीची धारणा झाली आहे.

अतः जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांप्रमाणेच राज्यातील ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण नियमितरित्या होऊन त्यांच्या कारभारात नियमितता, सुसुत्रता व पारदर्शकता येण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाप्रमाणेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियमामध्ये ग्रामपंचायतींच्या लेखा परिक्षणाबाबत तातडीने सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

(II) **प्रकरण क्रमांक - ३.३ / पृष्ठ क्र.३५ - उपविभागाला शासनाची मान्यता मिळण्याबाबत :-** जिल्हा परिषदेने साक्षीचेवेळी दिलेली माहिती व ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी समितीला साक्षीचे वेळी दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्हा परिषदेने सन १९९० मध्ये ठराव संमत करून पन्हाळा, राधानगरी, शिरोळ, गगनबावडा, कागल, भुदरगड, आजरा व इमारत असे ८ उपविभाग प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्रपणे निर्माण केले होते. मात्र उपविभाग वाढवितांना त्यांनी त्यासाठी कर्मचारी वर्ग न वाढविता उप अभियंत्याचे काम कनिष्ठ अभियंत्यांना दिलेले होते. सदर उप विभागाना मंजूरी मिळण्यासाठी शासनाकडे १५ वेळा पत्राद्वारे पाठपुरावा केला असताही त्यास शासनाने प्रतिसाद दिलेला नाही.

जिल्हा परिषदेने शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय कर्मचारी वर्ग न वाढविता उपविभाग तयार करणे हे शासनाच्या धोरणाच्या विरोधात आहे, त्यामुळे असे प्रस्ताव शासन मान्य करू शकत नाही, कारण खर्चावर अधिक भार पडू शकतो. सध्या राज्य शासनाने ३५ उपविभागांना मान्यता दिलेली असुन, त्यातील काही उपविभाग कोल्हापूर जिल्हा परिषदेसे मिळू शकतात.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत लघुपाटबंधारे व सार्वजनिक विभाग हे दोन विभाग एकच असल्याने ते एकत्र काम करतात, त्यामुळे लघुपाटबंधारे विभागाकडे हे काम दिले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले. त्यावर लघुपाटबंधारे हा एक विभाग नसुन उपविभाग आहे, त्यामुळे त्यास बांधकामाची कामे देणे शक्य नाही असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडुन समितीस सांगण्यात आले.

वास्तविक पहाता केंद्र सरकार व राज्य शासनाने आज जिल्हा परिषदाकडे अनेक योजना व कामे सोपविण्यात आली असून १० व्या, ११ व्या व १२ व्या वित्त आयोगाने मंजूर केलेल्या अनुदानातून विविध प्रकारची बांधकामे जिल्हा परिषदांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीकडे सोपवली असून जिल्हा परिषदाकडील बांधकाम विभाग व लघुपाटबंधारे विभागाकडील कामाचा व्याप मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मंजूर झालेली कामे विहीत कालावधीत पूर्ण व्हावीत तसेच कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी तसेच त्याचा लाभ स्थानिक जनतेला त्वरीत होण्यासाठी त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणा व पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे नितांत गरजेचे आहे, असे समितीचे स्पष्ट मत आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेने कामाची निकड विचारात घेवून ठरावाद्वारे ८ उपविभाग मंजूर केले असून त्यांना शासनाची मंजूरी मिळण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून देखील त्यास शासनाच्या मान्यतेशिवाय जिल्हा परिषदेने उपविभाग निर्माण केले असल्याने तसेच त्याचा आर्थिक भार शासनावर पडेल या कारणावरुन एक धोरण म्हणून शासनाने त्यास मान्यता दिलेली नाही. या विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी व्यक्त केलेल्या मताशी समिती सहमत होवू शकत नाही, उलट समितीचे असे मत आहे की, अलिकडे जिल्हा परिषदेवर सोपविण्यात येत असलेल्या जबाबदाऱ्या विचारात घेवून शासनाने स्वतःहून राज्य स्तरावरुन या संदर्भात एक सर्वंकष आढावा घेवून आणि जिल्हा परिषदांना बांधकाम व लघुपाटबंधाऱ्याच्या कामासाठी आवश्यक असलेल्या उपविभागाचा आढावा घेवून त्यांना मागणी प्रकरणी उपविभाग मंजूर करण्याचे दृष्टीने यापूर्वीच धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक होते.

सध्या संपूर्ण राज्यात १८८ उपविभाग असून आणखी १६८ उपविभाग मंजूर करण्याबाबत जिल्हा परिषदांनी मागणी केली आहे. त्यापैकी आतापर्यंत केवळ ३५ उप विभाग शासनाने मंजूर केले असले तरी अद्याप १२८ उपविभाग निर्माण करणे बाकी आहेत. ही बाब विचारात घेता शासनाने याबाबत त्वरीत निर्णय घेण्याचे दृष्टीने वित्त विभाग, नियोजन विभाग व ग्रामविकास विभागाने एकत्रित बसून त्वरीत निर्णय घ्यावा तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेने उपविभागांना मंजूरी मिळण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार शासनाने मंजूर केलेल्या ३५ उपविभागांपैकी काही उपविभाग कोल्हापूर जिल्हा परिषदेला मंजूर करावेत अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

(५) **तेरावा अहवाल (२०१२-२०१३) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत - प्रकरण क्रमांक - एक (परिच्छेद क्रमांक ३.५८७) पृष्ठ क्र.१)**

लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत :- मुंबई स्थानिक निधी परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ४ नुसार लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. कलम ७ नुसार कायदेशिररित्या तिला कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणून बुजून दुर्लक्ष करील किंवा तिचे अनुपालन करण्यास नाकारील तर रुपये २५०००/- इतक्या दंडास पात्र होईल अशा प्रकारची कायद्यामध्ये तरतुद करण्यात आली आहे. तथापि या तरतुदीनुसार आजपर्यंत कार्यवाही करण्यात आल्याचे दिसुन आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग तुमसर यांनी सदरचे अभिलेख रोहयोचे अनुदान उपलब्ध करण्यासाठी सादर केले होते. दुसऱ्या प्रकरणात कार्यकारी अभियंता श्री. मेश्राम यांना अर्धसमासाची तीन ज्ञापने देऊन प्रत्यक्ष भेटून चर्चेद्वारे अभिलेख उपलब्ध करून देण्यासाठी विनंती करण्यात आली होती. तथापि, याकडे त्यांनी दुर्लक्ष केले व संपुर्ण लेखा परिक्षण होईपर्यंतच्या कालावधीत सादर करण्यात आले नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असुन श्री.मेश्राम यांचा बेजबाबदारपणा दिसुन येतो. विहिरीच्या कामाचे अभिलेखे आणि ग्रामिण पाणी पुरवठा विभाग यांचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात येतील असे नमूद केले आहे. म्हणजेच त्यावेळी उपलब्ध करून दिले नाही त्यामुळे उक्त प्रकरणी संबंधिताचा निष्काळजीपणा असल्याचे दिसून येते. कनिष्ठ सहायक निलंबित झाल्यामुळे त्यांचा पदभार असणारे औषध निर्मात्याला लिपिक पदाचा अनुभव नसल्याने व लिपिक रजेवर गेला असल्याने अभिलेख दाखविण्यात आले नाहीत अशी विविध न पटणारी कारणे सांगितली आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणेचा यातून बेजबाबदारपणा दिसून येतो. विभागीय सचिवांची साक्षीत नमूद केल्यानुसार संबंधितांनी कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत. विभागीय चौकशी करण्यात येत आहे, निलंबित करण्यात आले आहे अशा प्रकारे विविध प्रकारची कारवाई करण्यात येत असल्याचे समितीला सांगितले तथापि, या प्रकारची कारवाई समितीने भेट देऊन एक वर्षाच्या अंतराने साक्ष घेण्यात आली. एक वर्षाच्या कालावधीत संबंधितांविरुद्ध कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीला साक्षीच्या वेळी सादर करणे सहज शक्य होते तथापि, तसे न करता संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचे टाळत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले असुन समिती याबाबत नाराजी व्यक्त करीत आहे.

या संदर्भात असेही निदर्शनास आले की, उपरोक्त अधिनियमाच्या तरतूदीनुसार ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांनी अभिलेखे लेखा परिक्षणाला सादर केली नाही त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यासाठी संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी सदरचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापि, याबाबतची कार्यवाही स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडून वेळीच झाल्याची दिसून येत नाही.

समिती अशी शिफारस करते की, लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणारे व त्यासाठी विविध कारणे सांगणारे अधिकारी/कर्मचारी यांचेवर मुंबई स्थानिक निधी परिक्षा अधिनियम १९३० अन्वये दंडात्मक तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ च्या शिस्त व अपिल यामधील नियम ७, ८ व १० अन्वये प्रशासकीय कारवाई करण्यात यावी तसेच स्थानिक निधी लेखा कार्यालयाने दंडात्मक कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत संस्थाचे लेखा परिक्षण संपल्यानंतर १ महिन्याचे आत आयुक्तांकडे वेळीच सादर करण्याची काळजी घ्यावी व लेखा परिक्षण विभागाचे जे अधिकारी/कर्मचारी दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव यापुढे आयुक्तांकडे वेळेवर सादर करणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

स्थानिक स्वराज्य संस्थाचे जे अधिकारी/कर्मचारी अभिलेख लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांकडे सादर करणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचारी यांचेवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाईस आयुक्तांनी त्यांचेकडे लेखा परिक्षकांकडून दंडात्मक व प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव प्राप्त झाले पासुन २ महिन्यांच्या आत कारवाईस मंजूरी देणे बंधनकारक करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा. समितीच्या उपरोक्त शिफारशी बाबत शासनाने केलेली कार्यवाही समितीस २ महिन्यांत सादर करण्यात यावी.

(६) **पाचवा अनुपालन अहवाल (२०१३-२०१४) : (दहाव्या महाराष्ट्र विधानसभेच्या कालावधीत पंचायती राज समितीने (सन १९९६-९७) सभागृहांना सादर केलेल्या सातव्या अहवालातील चंद्रपूर व जळगांव जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधी - प्रकरण क्रमांक - एक (परिच्छेद क्र.३.८८) पृष्ठ क्र.१)**

(I) **वनसडी-नारडा-अंतरगाव (जिल्हा परिषद चंदपूर अंतर्गत) रस्ता डांबरीकरण :-** समितीने सन २००१ मध्ये राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाला सातवा अहवाल सादर केला. अहवाल सादर करीत असताना, समितीने सभागृहास अहवाल सादर केल्यानंतर संबंधित विभागाने अहवालातील शिफारशींवर काय कारवाई केली याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविणे आवश्यक आहे. तथापि, उक्त माहिती समितीस सन २०१३ मध्ये पाठविण्यात आली यावरुन विभाग समितीने केलेल्या शिफारशींसंदर्भात किती संवेदनशील आहे हे दिसून येते. संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये विधानमंडळाच्या समितीचे एक अनन्यसाधारण महत्व आहे. समित्यांना प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागत्या म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या संसदीय समित्या निर्माण करून त्याद्वारा सातत्याने व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे काम समित्यांद्वारा केले जाते.

उक्त प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेताच कामाची देयके संबंधितांना अदा करण्यात आली व कामे केली. त्यामुळे सदर प्रकरण अत्यंत गंभीर आहे. अशाप्रकारे कामांना मान्यता न घेताच कामे होत असल्यामुळे त्यात आर्थिक अनियमितता व निधीचा गैरव्यवहार अथवा अधिकाऱ्यांकडून मनमानीपणा केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन २००० ते २०१० या कालावधीत अशी अनेक प्रकरणे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेताच मंजूर केल्याची साधार भीती समितीला आहे व म्हणूनच समिती शासनाने परिपत्रक निर्गमित करण्यास

दाखविलेल्या दिरंगाईबद्दल अतिव खेद व्यक्त करते व **तत्कालीन सर्व संबंधित जबाबदार अधिकारी यांचेविरुद्ध (परिपत्रक निर्गमित करण्यास विलंब) निष्काळजीपणा, कर्तव्यात कसूर समितीने केलेल्या शिफारशींची अवमानना प्रशासकीय जबाबदारीची विश्वासार्हता घालविणे, इत्यादी प्रकरणी चौकशी करून जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रशासनातील अधिकारी समितीने केलेल्या शिफारशींकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणी सुमारे ९ वर्षे कार्यवाही न होणे व विभाग प्रमुखांनी केवळ आमच्याकडून चूक झाली एवढेच समितीपुढे नमुद करणे. तथापि, या प्रकरणी समितीने केलेल्या शिफारशींच्या संदर्भात विहित वेळेत कार्यवाही न करणारे जे कोणी जबाबदार आहेत त्यांचेविरुद्ध कुठलीही कार्यवाही न करणे याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. यापुढे समितीने केलेल्या शिफारशीं संदर्भात शासनाने वेळीच व प्रभावीपणे कारवाई करावी व संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये समितीला असलेले अनन्यसाधारण महत्व विचारात घेता शासन स्तरावरील सर्व संबंधितांना परिपत्रक काढून याबाबतच्या योग्य त्या कडक स्वरुपाच्या सूचना द्याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(II) **मूल येथील आरोग्य केंद्र सुधार समिती रकमेची संशयित अफरातफर (प्रकरण क्रमांक - दोन (परिच्छेद क्र.३.१६८) पृष्ठ क्र.४) :-** समितीने केलेल्या शिफारशी नुसार श्री.नक्षिणे व डॉ.कु. एस.एस. झुरमुरे यांचेकडून वसुल पात्र रक्कमेची वसुली करण्यात आली असुन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई देखील करण्यात आली आहे. असे समितीला निदर्शनास आणुन देण्यात आले आहे. तथापि, सदरची कार्यवाही खूपच विलंबाने केली असल्यामुळे समिती याबाबत खेद व्यक्त करते. समितीने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध त्वरेने कार्यवाही केल्यास त्याचा धाक इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील राहते असे समितीला प्रकर्षाने वाटते. सबब, **यापुढे लेखा आक्षेपात नमुद वसुल पात्र रकमेची वसुलीची कारवाई तत्परतेने करून कोणत्याही स्थितीत कर्मचारी सेवानिवृत्त होणे पुर्वीच त्यांचेकडून सेवा कालावधीतील अनियमिततेबाबत वसुल करावयाची रक्कम वसुल करणेची कारवाई करणेबाबत शासनाने सर्व विभागांना परिपुर्ण परिपत्रक काढून कडक स्वरुपाच्या सुचना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी.**

(III) **पंचायत समिती, मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालये बांधकामात झालेली अनियमितता (प्रकरण क्रमांक - तीन (परिच्छेद क्र.३.५) पृष्ठ क्र.६) :-पंचायत** समिती मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत शौचालय बांधकामाबाबत व अपहारातील १६ लाख ९५ हजार रुपयाची वसूली करण्यात यावी असे निदेश दिले होते. त्यावर यासंदर्भात चौकशी करून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषींपैकी काहींवर एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याची कारवाई केली आहे. या प्रकरणामध्ये रु.२,८७,९२२ तसेच रु.१,३२,४००/- इतकी वसूली झालेली आहे. यापैकी दोन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. न्यायप्रविष्ठ प्रकरणामध्ये ८ लाख ७३ हजार रुपयाच्या वसूलीच्या प्रकरणाचा समावेश आहे. याचा अर्थ १७ लाख रुपयांपैकी ३ लाख रुपयाची वसूली झालेली असून १४ लाख रुपये वसूली अद्यापही बाकी असल्याचे दिसून आलेले आहे. उपरोक्त कारवाईमध्ये अपहारित रक्कमेची वसूली करण्याची कारवाई केलेली नाही. सचिवांनी दिलेल्या माहितीवरुन लक्षात आले की, अद्याप १४ लाख रुपयांची वसुली होणे बाकी आहे.

मुक्ताईनगर तालुक्यात शौचालयाच्या बांधकामात रूपये १६,९५,०००/- एवढ्या रक्कमेचा अपहार झाल्याचे समितीला सांगण्यात आले असून रूपये ८ लाख ७३ हजार इतक्या वसुलीची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तर काही दोषींवर सेवानिवृत्त झाल्यावर पोलीस कारवाई करण्यात आली आहे. श्री.निकम यांना सक्तीने सेवानिवृत्त केले असून त्यांच्याकडे दोन प्रकरणामध्ये रूपये २,८७,९२२/- तसेच रूपये १,३२,०००/- इतक्या रक्कमेची वसूली झालेली आहे. तर दोन प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच श्री.निकम यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला असून त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले आहे.

शासनाने अनेक अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुद्ध कार्यवाही केली असून काही जणांवर फौजदारी कारवाई देखील केली असल्याने याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापी अजूनही १४ लाख रक्कम वसूल होणे बाकी आहे. याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त करते. **या प्रकरणी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करत असताना शासनाची या गैरव्यवहार प्रकरणी हडप केलेली रक्कम त्वरेने वसूल होणे आवश्यक आहे. सदर अपहारित रक्कम प्राधान्य क्रमाने व्याजासह वसूल करावी अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच बरेच वेळा समितीसमोर साक्षीला येताना अधिकारी संबंधीत नस्तीचा व्यवस्थित अभ्यास करून येत नाहीत व समितीला उत्तरे देताना परिपुर्ण व अभ्यास पुर्ण उत्तरे देत नाहीत. त्यामुळे समितीने विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीत राहतात. माहिती पाहून सांगतो, नंतर पाठवितो इत्यादी सबबी सांगितल्या जातात. समिती केवळ प्रकरणाधीन बाबी संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांना विचारणा करीत असते, अशा वेळी त्या अधिकाऱ्यांने उक्त प्रकरणातील संभाव्य माहिती अवगत करून हजरजबाबीपणे समितीला देणे आवश्यक आहे. परंतु बरेच अधिकारी वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करतात विभागीय सचिवांनी तर कल्पना शक्तीलाही मर्यादा असते, असे म्हणून एक प्रकारे प्रशासनातील अधिकाऱ्यांची पाठराखन केली असून समितीचा अनादरच केल्याचे दिसून येते. **सबब, समिती समोर उत्तरे देताना किंवा एखादी बाब मांडताना अधिकाऱ्यांनी संसदीय प्रथेपरंपरेचे भान राखून त्यांच्यावर असलेली जबाबदारी पाळणे देखील महत्वाचे आहे. विधानमंडळाच्या समितीसमोर साक्ष देताना सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रकरणाधिन बाबींचा सखोल, सर्वंकष अभ्यास करून व संबंधीत नस्ती बैठकीत सोबत ठेवून समितीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे वस्तुनिष्ठ, अभ्यासपूर्ण व परिपूर्ण माहिती समितीला द्यावी व तशा प्रकाराच्या कडक स्वरुपाच्या सूचनांचे परिपत्रक काढून सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना निर्गमित करावे अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी.**

पंचायती राज समितीने तेराव्या विधानसभेच्या (सन २०१४-१९) कालावधीत एकूण ३३ अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केले असून सर्व अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर PDF स्वरुपात उपलब्ध आहेत. या अहवालांतील काही महत्वपूर्ण निवडक शिफारशी खालीलप्रमाणे आहेत

(७) **पहिला अहवाल (२०१५-२०१६) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या गोंदिया व सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत)(प्रकरण क्रमांक - २.३ (परिच्छेद क्रमांक ३.१४८) पृष्ठ क्र.४२)**

नेरुर कार्यात नारुर रस्ता डांबरीकरण तथा नूतनीकरण :- ग्रामीण भागातील डांबरी रस्ते प्रवासासाठी सुरक्षित नाहीत. कारण राज्यातील डांबरी रस्त्याच्या कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या डांबरात फर्नेस ऑईल आणि रॉकेल

यांची भेसळ केलेली असल्यामुळे त्याद्वारे तयार केलेले रस्ते निकृष्ट दर्जाचे व तकलादू असतात. सबब, डांबरातील भेसळ तपासणे व रस्त्यांचा दर्जा चांगला राहावा यासाठी समिती खालील प्रमाणे शिफारशी करीत आहे.

(१) **केंद्र शासनाच्या ३ ऑईल कंपन्यांचेच डांबर विकत घेणे तसेच या पुढील काळात शासकीय कंत्राटदारांवर उक्त कंपन्यांचे खरेदी देयक जोडणे अनिवार्य करण्यात यावे,**

(२) **रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी (साईटवर) डांबर तपासण्यासाठी फिरत्या (मोबाईल) प्रयोगशाळा निर्माण करून, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय महाविद्यालयातूनच डांबराची गुणवत्ता तपासणी करणे अनिवार्य करावे अथवा प्रत्येक जिल्ह्यात दर्जा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा व त्याद्वारे डांबर तपासणी वेळोवेळी करण्यात यावी,**

(३) **ज्या रस्त्याचे डांबरीकरण झाले आहे त्या रस्त्यावरील डांबरीकरणाची स्थिती व त्याची तपासणी कुठे केली इ. तपशील उक्त रस्त्याच्या दर्शनी भागावर एका लोखंडी फलकावर लावून परिसरातील जनतेला रस्त्याच्या कामाची डांबरीकरणाच्या साहित्य तपासणीची माहिती उपलब्ध करून देणे अनिवार्य करावे.**

(४) **राज्यातील रस्त्याचे काम कंत्राटातील मुदतीपूर्वी खराब / निकृष्ट दर्जाचे झाल्यास संबंधित कंत्राटदार व संबंधित अभियंत्यांवर जबाबदारी (defect liability) निश्चित करण्यात यावी,**

(५) **प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये (PMGSY) ज्याप्रमाणे रस्त्याची गुणवत्ता व दर्जा चांगला राहावा यासंबंधाने तरतूदी आहेत. त्या सर्व जशाच्या तशा राज्यातील रस्त्यांच्या कंत्राटामध्ये देखील लागू करण्यात याव्यात.**

उर्वरित शिफारशी विचारात घेऊन एकच सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी.

(८) **चौथा अहवाल (२०१५-२०१६) - (महाराष्ट्रातील हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - सहा, पृष्ठ क्र.४३)**

(अ) ग्रामपंचायतींना कर आकारणीस होत असलेला प्रतिबंध :- पंचायती राज समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारिक चर्चा केली असता, पुणे जिल्हा परिषदेसह राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील ग्रामपंचायतींना कर आकारणी करण्यास बंदी घातल्यामुळे अनेक ग्रामपंचायतींना त्यांचे स्वत:चे उत्पन्न मिळत नाही, पर्यायाने त्यांचा विकास होण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

राज्यातील ग्रामपंचायतीने कर आकारणी करणे हे ग्रामपंचायतीचा विकास होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या करप्रणालीमधून ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन, नागरिकांना सोयी-सुविधा इत्यादीबाबत सदर कर वसुली तुटपुंजी असल्यामुळे शासन स्तरावरुन या संदर्भात मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायतींना अनुदान देणे यावर ही मर्यादा असून आर्थिक बाबीसंदर्भात ग्रामपंचायतींना मोठया प्रमाणावर अडचणीस सामोरे जावे लागत असल्याची वस्तुस्थितीदेखील समितीसमोर आली.

या सर्व बाबींचा विचार करता शासनाने ग्रामपंचायतीतील प्रस्तावित क्षेत्रातील कर आकारणी धोरणाबाबत ठोस भूमिका घेऊन सुधारित कर आकारणी करण्यासंदर्भात जनतेच्या हरकती व सूचना विचारात घेऊन एक

सर्वंकष धोरण निश्चित करुन समितीस आश्वासित केल्याप्रमाणे ते जनतेच्या अभिप्रायासाठी त्वरेने प्रसिध्द करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

चौथा अहवाल (२०१५-२०१६) - (महाराष्ट्रातील हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - सात, पृष्ठ क्र.५४).

(ब) पी.एम.आर.डी.ए. च्या स्थापनेनंतर अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामाच्या नोंदी होत नसल्यामुळे ग्रामपंचायतींना घरपट्टीच्या महसूलापासून मुकावे लागत असणे :- पंचायती राज समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली असता, उक्त भेटीच्या वेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेत पुणे जिल्हयातील ग्रामपंचायत क्षेत्रात अधिकृत/अनधिकृत बांधकामाच्या नोंदी घेण्यासंदर्भात पुणे जिल्हयातील असलेल्या अडचणीसंदर्भात माहिती प्राप्त झाली. पुणे जिल्हयात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नियंत्रण सुधारणा अधिनियम लागू झाला असल्यामुळे या जिल्ह्यात होत असलेल्या ग्रामीण क्षेत्रातील बांधकामास जिल्हाधिकारी यांची अनुमती आवश्यक असुन गावठाणमध्ये नोंदी करू नये असा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्यामुळे काही ठिकाणी गावठाणमध्ये नोंदी होत नाहीत आणि गावाच्या बाहेरही नोंदी होत नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे. याबाबत आयुक्त, पुणे विभाग यांनी देखील दिनांक २२ डिसेंबर, २०१० रोजी अनधिकृत बांधकामास आळा घालण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामाच्या घरपट्टीला ग्रामपंचायतीला मुकावे लागते. अवैध बांधकामाच्या नोंदी आणि त्यावरील कर आकारणी हा केवळ पुणे जिल्हा परिषदेचा प्रश्न नसून संपूर्ण राज्यात अशी परिस्थिती थोड्याफार फरकाने भेडसावीत आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ अन्वये कर आकारणी व कराची वसुली करणे हे अधिकार ग्रामपंचायतीला असल्यामुळे त्यावर कुठलीही बाधा येऊ न देता ते अधिकार ग्रामपंचायतीकडेच ठेवण्यात यावेत, कारण गावातील निवास करणाऱ्या नागरिकांना विविध सोयी सवलती या ग्रामपंचायतीद्वारेच पुरविल्या जातात. उदा. गटारे, पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन, दिवाबत्ती, रस्ते इत्यादी. सदरच्या सोयीसुविधा ग्रामपंचायत हद्दीत असल्यामुळे संपूर्ण ग्रामपंचायत क्षेत्रातील कर आकारणीचे अधिकारदेखील हे ग्रामपंचायतीलाच असले पाहिजेत, असे समितीला प्रकर्षाने वाटते.

आयुक्त, पुणे आणि जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांच्या पत्रात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतीने कराची आकारणी अथवा वसुली करू नये असे कुठेही नमूद केले नाही. तेव्हा या कालावधीत काही ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायत क्षेत्रातील अधिकृत/अनधिकृत बांधकाम आकारणीच्या अथवा घरपट्टी वसुली इत्यादी कर स्वरुपात आकारणी अथवा वसुली ग्रामपंचायतीच्या हिताच्या दृष्टीने केली असल्यास, अशा ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करणे हे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ मधील तरतुदींच्याविरुध्द आहे असेही समितीला प्रकर्षाने वाटते.

त्यामुळे आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी या बाबीस प्रतिपादन केले नसल्यामुळे अनौपचारिक चर्चेत कर आकारणी थोपविली असल्याबाबतची जी माहिती समितीला देण्यात आली, त्या अनुषंगाने विभागाने सत्वर कार्यवाही करुन उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ अन्वये ग्रामपंचायतीला असणाऱ्या कर आकारणी व वसुलीचे अधिकार संदर्भात शासनाने तातडीने जनमानसात व जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याबाबत परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

चौथा अहवाल (२०१५-२०१६) - (महाराष्ट्रातील हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - अठरा पृष्ठ क्र.१४४)

(क) महिला व बालकल्याण समितीमार्फत प्रशिक्षणाकरिता मोठ्या प्रमाणात निधी खर्च करणे बंधनकारक असल्याबाबत :- पंचायती राज समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पूणे जिल्ह्यातील आंबेगाव पंचायत समितीस भेट देवून पंचायत समिती पदाधिकाऱ्यांशी अनौपचारिक चर्चे दरम्यान समितीच्या निदर्शनास काही बाबी आणून देण्यात आल्या. जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समिती मार्फत दीड कोटी रुपये प्रशिक्षणासाठी ठेवणे बंधनकारक असून अशा प्रशिक्षणाचा काहीही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले, महिला व बालकल्याण समिती अंतर्गत पिठाची गिरणी आणि सौरकंदील अशा योजना कालबाह्य झाल्या असून इतर आधुनिक योजनांचा समावेश करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले.

शासन निर्णय दिनांक २४ जानेवारी, २०१४ मधील प्रशिक्षण व सक्षमीकरण योजना समवेत महिला व मुलींना इतर योजना उदा. उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण तसेच ब्युटीपार्लर प्रशिक्षण इत्यादी व गट-अ खालील पूर्णपणे ५० टक्के तरतूद खर्च करण्याबाबत शासन विचाराधीन आहे. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता जिल्हा **परिषदेने केवळ प्रशिक्षणावर सुमारे दीड कोटी रुपयांची तरतूद करणे हे अत्यंत गंभीर असून अनाकलनीय आहे. ज्या उद्देशाने शासनाने महिलांच्या विविध कल्याण योजना राबविण्याची जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात तरतुदीतून १० % निधी राखुन ठेवला जातो. त्याच्या उद्देशाला ठेच लागत आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते.** राज्यातील जिल्हा परिषदा मोठया प्रमाणावर महिलांच्या प्रशिक्षणासाठी निधी राखुन ठेवीत असुन असे प्रशिक्षण हे अशासकीय संस्थाव्दारा दिले जाते. **समितींचा या अशासकीय संस्थाव्दारा प्रशिक्षण देण्यास तीव्र आक्षेप आहे कारण यातुन अनेक गैरव्यवहार जन्मास येत आहेत असे समितीचे ठाम मत आहे. तेव्हा प्रशिक्षण देण्यात केवळ शासन मान्य संस्थाकडूनच जसे यशदा, वनामती इ. द्वारा देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. तसेच पुणे जिल्हा परिषदेने सुमारे दीड कोटी रुपये प्रशिक्षणासाठी खर्च करणे अथवा राखून ठेवणे या प्रकरणी कोणत्याही प्रकारची जिल्हा परिषदेने चौकशी केली नाही. याबाबतची सखोल चौकशी करण्यात यावी व तरतूद केली असल्यास आणि अशी तरतूद खर्च केली नसल्यास ती महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी खर्च करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

त्याचप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेने ज्या सदर योजनांचा शासन निर्णयात समावेश करावा असे पत्राव्दारे कळविले आहे त्या योजनांचा उक्त शासन निर्णयात समावेश करण्याबाबत शासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन विचार करावा, अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे.

चौथा अहवाल (२०१५-२०१६) - (महाराष्ट्रातील हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - बावीस, पृष्ठ क्र.१७१)

(ड) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी

व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे, म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने, तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरूध्द कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल. परंतू एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

(९) **दहावा अहवाल (२०१७-२०१८) - (महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत - प्रकरण क्रमांक - पाच, पृष्ठ क्र.२१)**

लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करणेबाबत :- महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० कलम ७ नुसार दंड करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार असून त्यांचेकडून वेळेवर कारवाई होत नसेल तर शासनाने असा विलंब होण्याचे कारण शोधणे आवश्यक आहे. **महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ प्रमाणे आयुक्तांचे अधिकार हे न्यायीकवत *(Quasi Judicial)* अधिकार असल्यामुळे समिती त्यांचेवर कारवाईची शिफारस करणार नाही. परंतु कार्यबाहुल्यामुळे आयुक्तांना हे अधिकार वापरता येत नसतील तर त्यांचे अधिकारांचे विकेंद्रीकरण करून ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर देता येतील काय, यावर वित्त विभागाने विचार करावा आणि त्यासंबंधात आवश्यक वाटल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमात यथोचित सुधारणा करून कलम ७ अन्वये करावयाची कार्यवाही तातडीने निकाली काढण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(१०) **अकरावा अहवाल (२०१७-२०१८) - (महाराष्ट्रातील नागपूर जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात - प्रकरण क्रमांक - सहा, पृष्ठ क्र.२८)**

राज्यातील शाळांमधील गुणवत्ता व पटसंख्या वाढविण्याबाबत :- कॉर्पोरेट सोशल रिस्पोन्सीबीलीटी (सीएसआर) अंतर्गत नागपूर जिल्हा परिषद आणि रोटरी क्लब यांनी एम.ओ.यु. अर्थात करार करून जिल्ह्यातील २५० शाळांमधील पायाभूत सोयी जसे शौचालय, संगणक पुरविण्यात येऊन ब्रिटीश कौन्सीलच्या लायब्ररीमार्फत दरवर्षी १५६६ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. समितीला ही बाब निश्चितच उल्लेखनिय वाटते. महाराष्ट्र शासनाने सन २००० पासून इयत्ता पहिली पासून इंग्रजी विषय शिकविणे अनिवार्य केलेले आहे. सदर निर्णयामागील शासनाचे उद्दीष्ट साध्य झाले किंवा कसे याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे, असे समितीला वाटते.

सध्याच्या स्पर्धेच्या काळात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकणारी विशेषतः ग्रामीण भागातील मुले टिकून रहावीत याकरीता नागपूर जिल्हा परिषदेने रोटरीसारख्या अशासकीय सामाजिक संस्थेबरोबर भागीदारी करून सी.एस.आर च्या निधीतून अशा प्रकारची नाविन्यपूर्ण योजना राबविली असल्यास विभागाने याचा अभ्यास करून संपूर्ण राज्यात अशी योजना राबविण्याबाबत निर्णय घ्यावा, घेतलेल्या निर्णयाबाबत समितीस अवगत करावे, अशी समितीची शिफारस आहे.

(११) **सतरावा अहवाल (२०१७-२०१८) - (महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील - प्रकरण क्रमांक -सहा, पृष्ठ क्र.१७)**

उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणाबाबत :- जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग जात असून सदरील महामार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या ठिकाणी रुग्णवाहिका कार्यरत आहेत. आपत्कालीन अत्यावश्यक अंतर्गत टोल फ्री क्र.१०८ च्या रुग्णवाहिका संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या रुग्णवाहिकांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा दिल्या असल्याचे समितीला सांगितले. याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापि, **काही गावे हायवेवर असून या ठिकाणी ट्रॉमा सेंटरची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची संख्या जास्त असल्यामुळे ट्रॉमा सेंटरची उभारणी केल्यास तेथे अपघात झालेल्या व्यक्तींना त्वरेने आरोग्य सेवा मिळू शकेल व अनेकांचे प्राण वाचतील. सदर महामार्गावर प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत नसल्याने यापैकी काही ठिकाणी ट्रॉमा सेंटरची उभारणी करण्यासंदर्भात शासनाने सकारात्मक विचार करून त्याबाबत कार्यवाही करून समितीस तीन महिन्यात अहवाल पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(५) रोजगार हमी योजना समिती

(Committee on Employment Guarantee Scheme)

पार्श्वभूमी :-

भारतीय संविधानाच्या भाग ४ मध्ये राज्य संस्थेने राज्य कारभार करताना अंगिकारावयाची मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत. त्यातील अनुच्छेद ४१ अन्वये राज्य संस्थेने प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करून देण्याबद्दल प्रयत्नशील रहावे असे सांगण्यात आले आहे. संविधानात नमूद केलेल्या या तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने सन १९७२ मध्ये '१५ कलमी कार्यक्रम' तयार केला होता. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचाही समावेश होता.

अंगमेहनतीचे काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळवून देऊन स्वाभिमानाने जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. ही राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरु करण्यामागील भूमिका आहे. महाराष्ट्रातील शेतमजुरांना शेतीच्या हंगामात वर्षभरात सरासरीचे चार ते साडेचार महिने काम मिळते. शेतीचा हंगाम नसतो तेव्हा कामाअभावी त्यांची श्रमशक्ती वाया जात असते आणि काम नसते म्हणून त्यांना उपाशीपोटी रहावे लागते. वाया जाणाऱ्या श्रमशक्तीचा उपयोग करून उत्पादक स्वरुपाच्या विकासाच्या अनेक योजना पूर्ण करणे व त्याचबरोबर शेतमजुरांना काम देऊन त्यांची उपासमार रोखणे अशा दुहेरी हेतूने राज्य शासनाने रोजगार हमी या योजनेचा अंगिकार केला.

ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार पुरविण्याच्या उद्दिष्टांचा एक भाग म्हणून प्रथम सन १९६९ मध्ये पागे योजनेत रोजगार हमी योजनेचा समावेश करण्यात आला. ही योजना राज्याच्या विविध जिल्ह्यात प्राथमिक स्वरुपात राबविताना आलेल्या अनुभवाच्या आधारावर दिनांक २८ मार्च, १९७२ पासून ग्रामीण भागात सर्वत्र या योजनेअंतर्गत रोजगाराची हमी देऊन पुढेच पाऊल टाकण्यात आले.

योजनेच्या सुरुवातीलाच म्हणजे सन १९७२ ते १९७४ या काळात राज्यात अनेक ठिकाणी अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आणि शासनाला रोजगार हमी योजना बऱ्याच मोठ्या प्रमाणात निलंबित करून दुष्काळी कामे सुरु करावी लागली.

ही योजना सन १९७४-७५ मध्ये पुनः सर्वत्र नव्याने सुरू करण्यात आली व त्यायोगे संबंध देशात महाराष्ट्र राज्याने बेरोजगाराला रोजगाराची हमी मिळवून देण्याच्या दिशेने प्रथम पाऊल टाकले.

दिनांक २९ सप्टेंबर १९७४ रोजी विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती माननीय श्री.वि.स.पागे यांनी राज्यातील सर्व पक्षांच्या प्रतिनिधीची एक बैठक निमंत्रित केली. या बैठकीत या योजनेसंबंधी एक सर्वसाधारण आराखडा निश्चित करण्यात आला व त्यास अनुसरुन विधानमंडळाच्या उभय सभागृहात दिनांक २० डिसेंबर, १९७४ रोजी मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले. मुख्यमंत्र्याच्या या निवेदनाला उभय सभागृहांनी एकमुखी पाठिंबा दिला. या योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी खास कर आकारावा अशी सूचनाही या निवेदनामध्ये करण्यात आली होती.

रोजगार हमी योजनेत मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम हे सूत्र अवलंबिण्यात आले आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७, दिनांक २६ जानेवारी, १९७९ पासून अंमलात आला आणि योजनेला वैधानिक आधार प्राप्त झाला. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक मूलगामी योजना सुरु करण्यात महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात अग्रणी राहिले आहे. या योजनेने देशातील इतर राज्यांचेसुद्धा लक्ष वेधून घेतले आहे. या योजनेनुसार अकुशल बेरोजगारांना त्यांच्या मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून दिला जातो. उत्पादनभिमुख कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या या योजनेमुळे स्थायी स्वरुपाची संपत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण केली जात आहे.

रोजगार हमी योजनेचा उद्देश व हेतू :-

सुयोग्य ग्रामीण विकासाचे धोरण आखून ग्रामीण भागातील संपत्तीच्या विकासाचा गंभीर प्रश्न सोडविणे या बाबीला नियोजनात दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी महत्व असणे आवश्यक आहे. ग्रामीण कामांचा कार्यक्रम, ग्रामीण रोजगारांचा धडक कार्यक्रम, पथदर्शी एकात्मिक ग्रामीण रोजगार कार्यक्रम, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम यासारखे क्षेत्रविकास कार्यक्रम आणि लहान सीमांत शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागीर यांना सहाय्य करण्यासाठी घेतलेले कार्यक्रम

यासारखे रोजगार निर्मिती कार्यक्रम हे मर्यादित व प्रायोगिक स्वरुपात होते. म्हणून या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचा प्रश्न परिणामकारकरित्या सुटू शकला नाही. मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पासहित मृद व जलसंधारण व ग्रामीण विद्युतीकरण हे कार्यक्रम घेण्यात आले. परंतु पुरेशा साधनसंपत्ती अभावी ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचे कामी म्हणावे तितके यश आले नाही. महाराष्ट्रातील ग्रामीण तसेच 'क' वर्ग नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन समाजातील गरीब वर्गाला रोजगाराची हमी उपलब्ध करून देऊन दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सन १९७२ मध्ये रोजगार हमी योजनेची सुरुवात करण्यात आली.

"क" वर्ग नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन ग्रामीण भागातील कामाची गरज असलेल्या व कष्टाचे काम करण्याची तयारी असलेल्या पण स्वत:हून ते न मिळवू शकणाऱ्या सर्व अकुशल व्यक्तींना उत्पादक रोजगार मिळवून देणे हा रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश आहे. व्यक्तीला उपयुक्त व राज्याच्या अर्थव्यवस्थेला उत्पादक असा रोजगार पुरविला जातो. कामाची हमी ही अकुशल श्रमाच्या कामापुरती मर्यादित आहे. हाती घेतलेल्या कामातून टिकाऊ सामूहिक मालमत्ता निर्माण व्हावी व मजूरांना दिलेली मजूरी केलेल्या कामाच्या परिमाणाशी निगडीत असावी हा योजनेचा मूलभूत हेतू आहे.

राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या अंमलबजावणीनुसार दोन योजना सुरू होत्या.

(१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व

(२) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम ७ (२) (दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या

योजना.

सदरहू योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव-महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा अधिनियम ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र, राज्य विधानमंडळाने केंद्राच्या अधिनियमास अनुसरून राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरू आहेत :-

(अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजूरीच्या खर्चासाठी निधी पुरविते. प्रति कुटुंब १०० दिवसांवरील मजूरांच्या मजूरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

(ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारित कलम (१२) (इ) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा :- (१) जवाहर/धडक सिंचन विहीर योजना.

(२) मागेल त्याला शेततळे योजना

या शिवाय राज्य शासनाचा निधी राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता वापरला जातो.

महाराष्ट्र शासनाने राज्य रोजगार हमी योजनेच्या नावात बदल करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र असे नामकरण केले असून सध्या केंद्र शासनाची ही योजना राज्यात सर्वत्र राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम १९७७ सुधारणा २००६ अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र :- ठळक बाबी

देशात ग्रामीण मजुरांना अकुशल रोजगाराची हमी सन १९७७ पासून कायद्यान्वये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य होते.

भारत सरकारने ग्रामीण रोजगाराचे विविध कार्यक्रम (जवाहर रोजगार एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इ.) निधीच्या उपलब्धतेनुसार राबविले होते मात्र या कार्यक्रमात रोजगाराची हमी नव्हती. तर फक्त रोजगारांची उपलब्धता होती.

महाराष्ट्राचा रोहयो कायदा, त्याची यशस्वी अंमलबजावणी, व सद्य:स्थितीच्या अनुषंगाने अभ्यास करून केंद्र शासनाने संपूर्ण देशासाठी दिनांक ५ सप्टेंबर, २००५ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अंमलात आणला.

संपूर्ण देशातील ग्रामीण कुटुंबांना वित्तीय वर्षात १०० दिवस प्रति कुटुंब अकुशल रोजगाराचा हक्क प्राप्त झाला.

राष्ट्रीय अधिनियमाची अंमलबजावणी सुरूवातीला देशातील २०० जिल्ह्यांत दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात राज्यातील १२ जिल्ह्यांचा (धुळे, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, हिंगोली, नांदेड, अमरावती, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली) समावेश करण्यात आला. तद्नंतर दिनांक १ एप्रिल, २००७ मध्ये आणखी ६ जिल्ह्यांचा (बुलढाणा, अकोला, वाशिम,ठाणे, उस्मानाबाद व वर्धा,) समावेश करण्यात आला व दिनांक १ एप्रिल, २००८ पासून महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लागू करण्यात आलेली आहे.

एकात्मक व प्रमुख कायदेशीर बाबी :-

केंद्राच्या अधिनियमाच्या कलम २८ प्रमाणे राज्याचा अधिनियम केंद्राच्या अधिनियमापेक्षा कमी दर्जाचा नसावा व तो केंद्रीय कायद्याशी सुसंगत असावा अन्यथा संसदेने संमत केलेला अधिनियम राज्याला आपोआप लागू होतो. त्यामुळे, महाराष्ट्र शासनाने केंद्राच्या अधिनियमाच्या कलम २८ प्रमाणे राज्य अधिनियम सुसंगत करणे व केंद्र व राज्याच्या अधिनियमाच्या ज्या बाबी मजूरांसाठी अधिक हितावह आहेत त्या तशाच पुढे चालू ठेवणे व अशाप्रकारे राज्य कायद्यातील सुधारणा करण्याचा व अशा सुधारित राज्य अधिनियमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेस महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना संबोधण्याचा निर्णय डिसेंबर, २००५ मध्ये घेतला.

राज्याच्या अधिनियमात सुधारणा करणारा अध्यादेश दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६ रोजी निर्गमित करण्यात आला.

अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर विधेयक दिनांक २९ डिसेंबर, २००६ रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहानी संमत केले व याला मा.राज्यपालांनी अधिसंमती दिली.

केंद्राच्या अधिनियमाखाली ज्या दिनांकास राज्यातील ज्या जिल्ह्याचा समावेश त्या दिनांकास सुधारित राज्य अधिनियमाच्या कलम १६(ब) त्या जिल्ह्यास लागू व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना त्या जिल्ह्यात सुरु झाली आणि माहे एप्रिल, २००८ पासून सर्व जिल्ह्यांना लागू करण्यात आली.

राज्याच्या अधिनियमांच्या सुधारणांमुळे महाराष्ट्र हे देशातील इतर सर्व राज्यांप्रमाणे केंद्रीय निधी मिळण्यास पात्र ठरले आहे.

दिनांक २६ जुलै, २०११ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र** असे संबोधण्यात येत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट :-

अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे. जिल्हयात हाती घेण्यात येणाऱ्या सर्व कामांच्या एकूण किंमतीच्या प्रमाणात कमीतकमी ६० टक्के कामे ही, उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणारी असावीत व अशी कामे ही भूमी, जल व वृक्ष यांचा विकास करणारी कृषि व कृषिसंलग्न क्षेत्राशी निगडीत असावीत.

राज्य रोहयो आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यामधील फरक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना	**राज्य रोजगार हमी योजना**
• खर्चाच्या किमान ५० टक्के ग्रामपंचायतीमार्फत व त्यास ग्रामसभेची मान्यता	• लाईन डिपार्टमेंटकडून अंमलबजावणी ग्रामपंचायतीची भूमिका नगण्य
• कंत्राटदारावर बंदी	• कुशल कामाकरिता कंत्राटदारांचा वापर
• बँक/पोस्टामार्फत मजूरीचे वाटप	• रोखीने मजूरी वाटप
• संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन रिपोर्टिंग व सनियंत्रण	• ऑनलाईन रिपोर्टिंग नाही
• सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता	• सामाजिक अंकेक्षण नाही
• जॉब कार्डची आवश्यकता	• जॉबकार्ड बंधनकारक नाही
• ग्रामीण कुटुंबाला १०० दिवस रोजगाराची केंद्र शासनाद्वारे हमी व उर्वरित दिवसांसाठी राज्य शासनाची हमी	• ३६५ दिवस प्रति मनुष्य रोजगाराची हमी
• लेबर बजेट व जिल्हा परिषदेची मान्यता	• जिल्हाधिकारी मार्फत कामाचे नियोजन
• भूसंपादनाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद नाही	• भूसंपादनाकरिता निधीची तरतूद

राज्य रोहयोंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना - फरक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना	राज्य रोजगार हमी योजना
(१) केंद्रीय कायद्याच्या परिशिष्ट १ मधील कलम १ (IV) प्रमाणे	(१) राज्य रोहयो कायद्याच्या कलम (१२) (इ) प्रमाणे
(२) योजना	(२) योजना
(अ) महात्मा गांधी रा.ग्रा.रोहयो विहिरी	(अ) जवाहर/धडक सिंचन विहिरी
(ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता)	(ब) मागेल त्याला शेततळ
(क) फळबाग लागवड	(क) नागपूर विभागात ११००० विहिरींचा धडक कार्यक्रम
	(ड) भूसुधारणा
(३) प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो	(३) अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना
(४) जॉब कार्ड आवश्यक आहे	(४) जॉब कार्ड आवश्यक नाही.
(५) ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी/तहसिलदार प्रशासकीय मान्यता देतात	(५) विविध स्तरावर मान्यता
(६) सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी	(६) विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी
(७) यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा नाही.	(७) प्रतिपूर्ती योजना असल्याने यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा आहे.
(८) १५ दिवसांत मजूरी प्रदान करणे	(८) प्रतिपूर्ती योजना असल्यामुळे १५ दिवसांत अनुदान देणे बंधनकारक नाही.
(९) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक	(९) राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्राची वैशिष्ट्ये :-

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :- महाराष्ट्राखाली नोंदणीकृत ग्रामीण घरातील १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तींना १०० दिवस प्रति कुटुंब अकुशल रोजगाराची हमी.
- नोंदणीकृत कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान १०० दिवस प्रती कुटुंब केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी आवश्यक ज्यादा दिवसांसाठी राज्य निधीतून अकुशल रोजगाराची हमी.
- कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची.

- प्रतिदिन मजुरीचे दर केंद्र शासन निश्चित करेल.
- केंद्र शासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे मजुरास मजुरी मिळेल. अशा प्रकारचे दरपत्रक राज्य शासन निश्चित करेल. कामाप्रमाणे दाम स्त्री-पुरूष समान दर.
- काम केल्यावर जास्तीत जास्त १५ दिवसात मजुरी वाटप.
- कामासाठी नाव नोंदणी केलेल्या मजूराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक.
- एका ग्रामपंचायत हद्दीत काम सुरू करण्यासाठी किमान १० मजूर आवश्यक ही अट डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी शिथिलक्षम.
- मजूरीचे वाटप मजूराच्या बँक वा पोस्ट बचत खात्यात.
- गावाच्या ५ कि.मी. परिसरात रोजगार देणे. कोणत्याही परिस्थितीत पंचायत समिती क्षेत्राबाहेर नाही.
- कामावर कंत्राटदार लावण्यासही बंदी.
- कामात किमान ६० टक्के भाग अकुशल तालुका व जिल्हास्तरावर अकुशल-कुशलाचा हिशोब ठेवता येईल.
- मजुरामार्फत करता येण्यासारख्या कामावर मशीनरी लावण्यास बंदी.
- राज्य शासनास सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद.
- सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायत व वेबसाईटवर उपलब्ध करून देणार.
- कामाचे सामाजिक अंकेषण (Social audit) व पारदर्शकता.
- तक्रार निवारण.

मजुरांची नोंदणी व जॉबकार्ड :-

- रोजगार मिळविण्याकरिता जॉब कार्ड आवश्यक
- जॉब कार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक
- १५ दिवसांत जॉब कार्ड मिळणार
- प्रत्येक कुटुंबाला विनामूल्य फोटोसह एक जॉब कार्ड
- जॉब कार्डची एक प्रत ग्रामपंचायतीमध्ये व एक प्रत कुटुंबाकडे

कामाची मागणी व अर्ज :-

- रोजगार आवश्यक असणाऱ्या नोंदणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमूना क्रमांक ४ मध्ये अर्ज करणे आवश्यक
- नमूना क्रमांक ४ ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मिळतील.

- नमूना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोच पावती देणे आवश्यक.
- रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमूना क्रमांक ४ मध्ये करू शकतो.
- मजुराने किमान १४ दिवस कामाची मागणी करणे आवश्यक.
- मागणी केल्यानंतर मजूराला १५ दिवसांत ग्रामपंचायतीने रोजगार पुरविणे आवश्यक, अन्यथा बेरोजगार भत्ता मिळेल.
- कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ कळवावे.
- गावापासून ५ कि.मी. परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल अन्यथा जास्त अंतराकरिता प्रवास खर्चाची तरतूद.

सोयी व सुविधा :-

- कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, विश्रांतीसाठी शेड, ५ पेक्षा जास्त लहान मुले असल्यास दाईची सोय.
- कामाच्या अनुषंगाने मजुरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रूग्णास सर्व रूग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्केपर्यंत रक्कम सानुग्रह रूग्ण भत्ता. अपंगत्व वा मृत्यू आल्यास रूपये ५०,००० पर्यंत सानुग्रह अनुदान.
- कुटुंब नियोजनाकरिता सवलती.
- मजुरीचे विलंब प्रदाने टाळण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ग्रामपंचायत स्तरावरुन ई-मस्टर काढण्याबाबत शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
- बँकेद्वारे अथवा पोस्टामार्फत १५ दिवसात मजुरीचे प्रदान, अन्यथा ०.०५ टक्के विलंब आकार देय.
- मजुरांना वेतन चिठ्ठीचे वाटप.

मजुरीचे दर :-

- रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणाऱ्या मजुरीचा दर केंद्र शासन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मधील कलम ६ नुसार प्रत्येक वर्षी निश्चित करते.
- केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजुरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) अदा केले जाते.
- केंद्र शासनाने सन २०११-२०१२ पासून प्रत्येक वर्षी राज्यासाठी खालीलप्रमाणे मजुरीचे दर निश्चित केले आहेत.

अ. क्र.	वर्षा	केंद्र शासनाचे निश्चित केलेले दर (रु.)
०१	२०११-१२	१२७/-
०२	२०१२-१३	१४५/-
०३	२०१३-१४	१६२/-
०४	२०१४-१५	१६८/-
०५	२०१५-१६	१८१/-
०६	२०१६-१७	१९२/-
०७	२०१७-१८	२०१/-
०८	२०१८-१९	२०३/-
०९	२०१९-२०	२०६/-
१०	२०२०-२१	२४८/-

बँक/पोस्टात मजुरांची खाती :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची मजुरी, त्यांच्या बँक/पोस्टात असलेल्या खात्यामध्ये जमा केली जाते.

महिलांचा सहभाग :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत महिला व पुरूषांमध्ये भेदभाव न ठेवता समान मजुरीचे दर ठेवण्यात आले आहेत. योजनेमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणे (किमान ३३ टक्के) गरजेचे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत जबाबदाऱ्या :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रमुख जबाबदारी पंचायत राज संस्थांची असून त्यात जिल्हा परिषद, समिती, ग्राम पंचायत व ग्रामसभा यांचा अंतर्भाव आहे.

ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या :-

(१) कुटुंबाची नोंदणी, (२) रोजगार उपलब्ध करणे, (३) ग्रामसभेच्या माध्यमातून रोजगाराच्या गरजेच्या पूर्व वार्षिक अंदाज घेणे, त्याचप्रमाणे नियोजन आराखडा व कामाचे प्राधान्य ठरविणे, (४) सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता, (५) दक्षता समिती, (६) रोजगार दिवस

पंचायतराज संस्थांना त्यांची कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास मदत करणारे अधिकारी:-

जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) योजनेचे जिल्हा प्रमुख :-

(१) सनियंत्रण, (२) नियोजन, (३) निधीवाटप, (४) प्रशासकीय, (५) मान्यता, (६) तपासणी, (७) माहिती समन्वयक.

सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद) :-

(१) जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत, (२) नियोजन, (३) निधी, (४) प्रशासकीय मान्यता, (५) तपासणी.

कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) :-

(१) प्रशासकीय मान्यता, (२) तहसीलमधील नियोजन, (३) समन्वय, (४) वेळेवर मजूरी वाटप, (५) सामाजिक अंकेक्षण, (६) तक्रार निवारण, (७) जिल्हा कार्यक्रम समन्वयाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील. त्याचप्रमाणे कार्य करणे.

सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) :-

(१) प्रशासकीय मान्यता, (२) पंचायत समिती क्षेत्रातील मग्रारोहयो संदर्भात सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकास त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील त्याप्रमाणे कार्य करणे, (३) कार्यक्रम अधिकाऱ्यास मदत.

कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचे अधिकारी :-

जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता मदत.

ग्रामसेवक :-

(१) ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या पार पाडणे, (२) निधी, (३) अभिलेख, (४) ग्राम रोजगार सेवक, (५) ग्रामपंचायतीला मदतनीस.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत करावयाच्या कामांचे स्वरूप कामाची प्राधान्यता व अंमलबजावणी बाबत ठळक मार्गदर्शक तत्त्वे :-

अकुशल रोजगाराची पूर्तता, दिर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल अशा प्रकारे योजनेची अंमलबजावणी करणे.

(अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत कामाचे स्वरूप व प्राधन्यता (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ मधील परिशिष्ट १ नुसार) :-

- जलसंधारण व जलसंवर्धन कामे.
- दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरण व वृक्ष लागवडीसह).
- जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचन कामासहित).
- अनुसूचित जाती/जमाती, दारिद्र्यरेषेखालील, भुसुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, लहान व सीमांत शेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळबाग लागवड व भूसुधार कामे.

- पारंपारिक पाणीसाठ्यांच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.
- भूविकासाची कामे.
- पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात चऱ्याची कामे.
- ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे.
- राजीव गांधी भवन.
- केंद्र शासनाशी सल्लामसलत करून राज्य शासनाने ठरविलेली कामे.

(ब) परिशिष्ट १ मधील अनुज्ञेय कामांच्या यादीत समाविष्ट केलेली नवीन कामे (मे, २०१२ पासून) :-

- **कृषि संदर्भातील कामे (वैयक्तिक लाभार्थी) :-**

  नाडेप कंपोस्टींग, गांडूळखत तयार करणे (Vermi Composting), जैविक खते (Liqid Biomanures).

- **पशुधन संदर्भातील कामे (वैयक्तिक लाभार्थी) :-**

  कुक्कुटपालनासाठी शेड, शेळ्या बकऱ्यांसाठी शेड, कोबा करणे (Construction of Pucca Floor), गुराढोरांकरिता युरीन टँक, चारा साठवण्याची व्यवस्था, अझोला पुरक पशुखाद्य देण्याची व्यवस्था.

- **मत्स्य व्यवसाय अनुषंगिक कामे :-**

  सार्वजनिक जमिनीवर मत्स्य व्यवसाय, मासे सुकविण्यासाठी क्षेत्र (Fish Drying Yards), बेल्ट व्हेजिटेशन.

- **ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्यासंबंधी कामे :-**

  पिण्याच्या पाण्यासाठी साठवण खड्डे (Soak Pits), पिण्याच्या पाण्यासाठी पुनर्भरण खड्डे (Recharge Pits).

ग्रामीण स्वच्छतेसंबंधित कामे :-

वैयक्तिक घरगुती शौचालय, अंगणवाडी व शाळेतील शौचालय व घन कचरा व्यवस्थापन.

(क) पंचायत युवा क्रीडा आणि खेळ अभियानांतर्गत खेळाची मैदाने :-

कामाचे वार्षिक नियोजन :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नियोजनाला महत्वाचे स्थान आहे. योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे अनिवार्य असून त्याला लेबर बजेट संबोधण्यात येते.

कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे :-

- राज्याच्या अधिनियमाच्या कलम ६, ७, २ च्या पोट-कलम (तीन) (चार) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असून, कलम ६, १, ६, ३(ब) व कलम १६-ब (सुधारित) नुसार राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियोजन व कार्यवाही करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या प्रमुख यंत्रणा आहेत.

- योजनेंतर्गत मजूरांना स्थानिक पातळीवर रोजगार देण्यासोबतच गावातील पायाभूत सोयींच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जलसंधारण, वृक्षारोपण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील शेतकरी तसेच इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीचा विकास करणे आणि गावातील अंतर्गत रस्ते, पांदण रस्ते इत्यादी कामांचा समावेश, कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना असणे आवश्यक आहे.

- कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना मागील वर्षात निर्माण झालेले मनुष्यदिवस, रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या, प्रति कुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती, मजुरी दर (कुशल व साहित्यावरील खर्च) इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक असते.

- योजनेंतर्गत पुढील आर्थिक वर्षात ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात, ग्रामपंचायतीमार्फत व इतर यंत्रणेमार्फत करावयाच्या कामाचे नियोजन करून, शेल्फवर ठेवण्याच्या कामाची यादी तयार करण्यात येते व नियोजित दिवशी दिनांक १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेऊन त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कामांना मंजूरी प्राप्त करून घेणे आवश्यक असते.

- योजनेंतर्गत ग्रामपंचायत व यंत्रणेमार्फत घ्यावयाच्या कामांचा प्राथम्यक्रम ठरवून ग्रामसेवकामार्फत प्रस्ताव सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सादर केला जातो. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर, तो कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे पाठविला जातो. तद्नंतर कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) त्यांच्या गटातील सर्व ग्रामपंचायतीच्या नियोजन आराखड्यांचा एकत्रित प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सादर करतात. जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्यामार्फत प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर, तो मंजूरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येतो. जिल्हा परिषदेकडून मान्यता मिळाल्यानंतर, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांचेमार्फत कामाचे लेबर बजेट शासनास सादर केले जाते व शासन त्याला केंद्र शासनाची मंजुरी घेते. मंजूर केलेल्या लेबर बजेटप्रमाणे गावात योजनेंतर्गत कामे घेण्यात येतात.

कामाचा वार्षिक आराखडा तयार करण्याकरिता वेळापत्रक :-

दिनांक	कार्यवाही
१५ ऑगस्ट	ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करून घेऊन, कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर करणे.
१५ सप्टेंबर	कार्यक्रम अधिकारी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करेल.
२ ऑक्टोबर	पंचायत समिती गटनिहाय वार्षिक आराखडा तयार करून, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांना सादर करेल.
१५ नोव्हेंबर	जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) जिल्ह्याचा वार्षिक आराखडा व लेबर बजेट जिल्हा परिषदेला सादर करेल.
१ डिसेंबर	जिल्हा परिषद जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यास मंजूरी देईल.
१५ डिसेंबर	जिल्हा कार्यक्रम समन्वयक प्रत्येक ग्रामपंचायतीत घ्यावयाच्या कामांचे शेल्फ तयार करतील.
३१ डिसेंबर	सर्व जिल्हे त्यांचे लेबर बजेट, आयुक्त नरेगा यांना सादर करतील. आयुक्त नरेगा ते शासनामार्फत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करतील.
जानेवारी	केंद्र शासनाद्वारे लेबर बजेटचे परीक्षण व त्रूटींची पूर्तता करणे.
फेब्रुवारी	केंद्रीय प्राधिकृत समितीची बैठक व राज्याच्या लेबर बजेटला मान्यता.
फेब्रुवारी/मार्च	मंजूर लेबर बजेट राज्यास वितरित करणे व राज्याद्वारे महिनानिहाय व जिल्हानिहाय एम.आय.एस.मध्ये नोंद घेऊन त्याची माहिती जिल्हा, गट व ग्रामपंचायतीस देणे.
७ एप्रिल पूर्वी	राज्य शासन वर्षाच्या सुरूवातीचा शिल्लक निधी केंद्र शासनास कळविल व केंद्र शासन निधीचा पहिला हप्ता राज्यास वितरीत करेल.

निधीचे व्यवस्थापन :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत वित्तीय वर्षात कुटुंबाला १०० दिवसांची अकुशल मजूरीची हमी केंद्र शासनाने दिलेली आहे, तर १०० दिवसांवरील मजूरीची हमी राज्य शासनाने दिली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम,२००५ च्या तरतुदीनुसार योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा भार केंद्र शासन व राज्य शासन खालीलप्रमाणे उचलते :-

(अ) केंद्र शासन खालील बाबींवरील मनरेगा अंतर्गत खर्चाचा भार उचलते :-

(१) वित्तीय वर्षात कुटुंबाच्या १०० दिवसाच्या अकुशल मजूरीवरील खर्च.

(२) साधन सामुग्री, कुशल व अर्धकुशल मजुरांच्या रोजंदारीवरील एकूण खर्चाच्या ७५ टक्के खर्च.

(३) केंद्र सरकारने निश्चित केलेला ६% प्रशासकीय खर्च, यामध्ये योजनेसाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिकारी, त्यांना सहाय्य करणारे कर्मचारी यांचे वेतन तसेच प्रशासकीय खर्चामध्ये बाह्यस्थ मनुष्यबळावरील खर्च (कंत्राटी कर्मचारी), लेखन साहित्यावरील खर्च, प्रवास खर्च, संगणकीकरण, प्रशिक्षण, सामाजिक अंकेक्षण, कामाच्या ठिकाणावरील सुविधा योजनेच्या जाहिरात व प्रसिध्दीवरील खर्च इत्यादींचा समावेश होतो.

(ब) राज्य शासन खालील बाबींवरील खर्चाचा भार उचलते :-

(१) राज्य रोहयोकरिता वैयक्तिक लाभांच्या योजनांवरील खर्च (उदा. जवाहर/धडक सिंचन विहिरी, फलोत्पादन).

(२) नरेगा अंतर्गत १०० दिवसांवरील प्रति कुटुंबावर होणारा मजुरीचा खर्च.

(३) नरेगांतर्गत २५% कुशल खर्च.

(४) राज्यात योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी ६ टक्के प्रशासकीय खर्चाच्या व्यतिरिक्त ३ टक्के निधी प्रशासकीय खर्च म्हणून राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय राज्य शासनाने मे २०१० मध्ये घेतलेला आहे व तो आवश्यकतेनुसार जिल्ह्यांमध्ये वितरीत केला जातो.

(५) केंद्र शासनाने विहित केलेल्या मजूरी दरापेक्षा जास्त दराने अदा करण्यात येणाऱ्या मजूरीचा खर्च.

(६) मजूराने कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांत काम उपलब्ध करू न शकल्यास देय बेरोजगार भत्त्याचा खर्च.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशनची स्थापना :-

सदरहू योजनेच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वापरण्यात येणाऱ्या निधीसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशनची स्थापना केली आहे. त्यान्वये योजनेच्या सर्व निधीचे वितरण नागपूर नरेगा कार्यालयामार्फत जिल्ह्यांना वितरित करण्यात येते. यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये योजनेसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

मजूरी व साधन सामुग्रीवरील ६०:४० खर्चाचे प्रमाण (Wage & Material Ratio) :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या मजुरी व साहित्याचे प्रमाण ६०:४० निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच, अकुशल मजुरीवरील खर्च कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के पेक्षा कमी असू नये, तर साधन सामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण ४० टक्क्यांच्या मर्यादेत राखणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाची अंमलबजावणी यंत्रणा :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरावर नियोजन विभागांतर्गत स्वतंत्र रोहयो प्रभाग असून, सचिव हे रोहयो प्रभागाचे प्रमुख आहेत. तसेच, या प्रभागाकरीता एक सह सचिव, एक उप सचिव व एक अवर सचिव, सहाय्यक संचालक (लेखा), संशोधन अधिकारी, कक्ष अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत.

(२) योजनेची अंमलबजावणी गतीशील होण्याच्या दृष्टीने व योग्य सनियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने नागपूर येथे आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून, आयुक्त नरेगा हे आयुक्तालयाचे प्रमुख आहेत. संपूर्ण राज्याकरिता

योजनेचे वार्षिक नियोजन करणे, सर्व जिल्ह्यांचे लेबर बजेट शासनास सादर करणे, निधीचे जिल्ह्यांना वितरण करणे, **MIS** चा नियमित अहवाल केंद्र शासनास ऑनलाईन पुरविणे इत्यादी महत्वाची कामे आयुक्तालयामार्फत पार पाडली जातात.

(३) शासन व जिल्हायंत्रणा यांच्यातील समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने तसेच, योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयामध्ये उपआयुक्त (रोहयो) हे पद निर्माण करण्यात आले असून, या कार्यालयामध्ये आवश्यक ते अधिकारी, कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(४) या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा पातळीपासून सुरु होत असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

- यंत्रणेचे व योजनेचे सनियंत्रण, नियोजन, निधी वाटप, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आल्या आहेत. त्यांच्या मदतीकरिता उपजिल्हाधिकारी (रोहयो) व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत कार्यान्वित होणारी किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायती मार्फत घेणे बंधनकारक असल्याने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्याकडे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यांना सहायक म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), गट विकास अधिकारी (नरेगा) व आवश्यक अधिकारी कर्मचारी वर्ग पुरविण्यात आलेला आहे. जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत, मजुर आराखडा (Labour Budget) मंजूर करून घेणे, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत

(५) तालुका पातळीवर या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) व सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

- यंत्रणेमार्फत कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देणे, सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

- ग्रामपंचायती मार्फत कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देणे, मजुरीचे प्रदान, कामाची तपासणी, ग्रामपंचायतीकडून कामाचा आराखडा तयार करून घेणे, योजनेबाबत जनजागृती करणे सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

- वन विभाग, सामाजिक वनीकरण, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, कृषी व इतर तसेच ग्रामपंचायत या यंत्रणांद्वारे या योजनेंतर्गत कामे पार पाडली जातात.

(६) ग्रामपंचायत ही योजनेची मुख्य यंत्रणा आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील मजुरांची नोंद करणे, त्यांना जॉबकार्ड वितरित करणे, हजेरी पत्रक ठेवणे, मागणीनुसार मजूरांना रोजगार उपलब्ध करून देणे, कामाचा आराखडा तयार करणे, मजूर आराखडा तयार करणे, स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, योजनेविषयी जनजागृती करणे, इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आलेल्या आहेत.

- या कामी ग्रामसेवक व त्यास मदतनीस म्हणून ग्रामरोजगार सेवक यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

(७) नरेगाच्या अंमलबजावणीत सुलभता यावी व ग्रामपंचायत / पंचायती समिती / जिल्हा परिषद यांना प्रभावीपणे काम करता यावे यासाठी बाह्यस्थ मुनष्यबळ (Out Sourced Man Power) घेण्यात आला आहे. यामध्ये सहायक कार्यक्रम अधिकारी (APO), तांत्रिक अधिकारी (TO), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, MIS समन्वयक, लिपिक व डेटा एन्ट्री ऑपरेटर (Clerk-Cum Data Entry Operatar) इत्यादी बाह्यस्थ मनुष्यबळाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत २९०० हून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आलेली आहे. तसेच ग्रामसेवक यांना मदतीसाठी २७, ००० पेक्षा जास्त ग्राम रोजगार सेवक कार्यरत आहेत.

केंद्र शासनाची माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS) :-

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने तसेच, सनियंत्रणासाठी केंद्र शासनाच्या MIS प्रणालीमार्फत माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. या कार्यप्रणालीवर योजनेबाबतची सांख्यिकीय माहिती व योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाची माहिती देण्यात येते. यामध्ये रोजगाराची स्थिती, रोजगार पुरविण्याबाबत माहिती, विविध प्रवर्गातील कामे, लेबर बजेट, मुनष्यदिवस निर्मिती, उपलब्ध निधी, झालेला खर्च इत्यादी इत्थंभूत माहिती या कार्यप्रणालीवर उपलब्ध होते. सदर कार्यप्रणाली ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा कणा असून, या योजनेचे यश या कार्यप्रणालीवर प्रतिबिंबीत होते. योजनेंतर्गत MIS कार्यप्रणालीमध्ये काम करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात MIS समन्वयकाची व माहिती नोंदणीकरिता लिपिक - डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची नेमणूक करण्यात आली आहे. ही माहिती *www.nrega.nic.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

रोजगार हमी योजनेचे नवीन संकेतस्थळ :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची संगणकीय माहिती केंद्र शासनाच्या एम.आय.एस. या कार्यप्रणालीवर उपलब्ध होत आहे. परंतु योजनेंतर्गत विविध माहिती, शासन निर्णय, परिपत्रक, साप्ताहिक मजूर उपस्थिती इत्यादी सर्व माहिती एकाच संकेतस्थळावर उपलब्ध होण्याकरिता राज्य शासनामार्फत *www.mahaegs.gov.in* हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे.

सामाजिक अंकेक्षण पथदर्शी प्रकल्प :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव पातळीवरील कामांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता आणणे व उत्तरदायित्व निश्चित करणे यासाठी केंद्र शासनाने दि. ३० जून, २०११ च्या अधिसूचनेन्वये योजनेचे अंकेक्षण नियम २०११ तयार करून सामाजिक अंकेक्षणाबाबत धोरण निश्चित केले आहे. या धोरणानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत हद्दीमध्ये झालेल्या अथवा सुरु असलेल्या कामांची पाहणी व देखरेख ग्रामसभा करु शकेल तसेच या कामांचे सामाजिक अंकेक्षण करणेसाठी राज्य शासनाने सामाजिक अंकेक्षण संचालनायाची स्थापना करून सामाजिक अंकेक्षण करण्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.३२/रोहयो-६ अ, दि. ४ डिसेंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर सोसायटीची नोंदणी धर्मदाय आयुक्त, मुंबई यांचेकडे करण्यात आली असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली दि. १७ जानेवारी, २०१८ रोजी नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

सामाजिक अंकेक्षण प्रक्रिये अंतर्गत लाभार्थी स्वत: व योजनेतील सहभागी घटक त्या योजनेचे अथवा कार्यक्रमाचे मुल्यमापन करतात. सामाजिक अंकेक्षण एक निरंतर प्रक्रिया असून लाभार्थ्यांच्या सहभागातून योजनेचे अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता व सामाजिक उत्तरदायित्व राखण्यासाठी सामाजिक अंकेक्षण आवश्यक आहे. या योजनेतील प्रत्यक्ष काम करणारे मजुर तसेच गावातील इतर नागरीक गावात झालेल्या कामांची स्वतंत्ररित्या पडताळणी करतात.

सामाजिक अंकेक्षण संचालनालयामार्फत वर्षनिहाय सन २०१३-१४ मध्ये ७२०, सन २०१४-१५ मध्ये १९४, सन २०१५-१६ मध्ये २८१, सन २०१६-१७ मध्ये ७२०, सन २०१७-१८ मध्ये ६१४ आणि सन २०१८-१९ मध्ये आतापर्यंत १,६४१ अशा एकूण ४,१७० ग्रामपंचायतींमध्ये सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविली आहे.

तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman) **:-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजुरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, याकरिता सदरहू अधिनियमाच्या कलम २७ (१) अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तक्रार निवारण प्राधिकाऱ्यांची (Ombudsman) ची नियुक्ती करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशान्वये दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक जिल्ह्यात तक्रार निवारण प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिनांक २४ मे, २०१३ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये तक्रार निवारण प्राधिकारी यांच्या वयाची मर्यादा ६५ ऐवजी आता ६८ वर्षांपर्यंत करण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्या मानधनात रु.५००/- ऐवजी रु.१०००/- (प्रति बैठक) एवढी वाढ करण्यात आलेली आहे. त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना दोन वर्षांपर्यंत मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. अर्जदारास तक्रार निवारण प्राधिकारी यांचे निर्णय मान्य नसल्यास अथवा सदर निर्णयाने समाधान होत नसल्यास तक्रार निवारण प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपील करण्याची तरतूद आहे. सदर अपिलावर निर्णय

घेण्यासाठी दिनांक २१.७.२०१४ अन्वये त्रिस्तरीय अपिलीय प्राधिकारणाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार अपिलीय प्राधिकारणातील अध्यक्ष व सदस्य यांना प्रत्येक बैठकीसाठी रु. १५००/- इतका बैठक भत्ता व रु. २९०/- इतका दैनिक भत्ता तसेच वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता अनुज्ञेय आहे.

महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनिमय, २००५ च्या कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य रोजगार हमी परिषदेची स्थापना करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या कलम ४ (सुधारणा २०१४) पोट-कलम (१) अन्वये याबाबत तरतूद आहे. तद्नुसार शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ अन्वये महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेची पुनर्रचना गठीत करण्यात आली असून परिषदेवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे :–

(१) मा. मुख्यमंत्री - अध्यक्ष

(२) मा. मंत्री (रोहयो) - कार्यकारी अध्यक्ष

(३) मा. मंत्री (ग्राम विकास) - सदस्य

(४) मा. मंत्री (जलसंधारण) - सदस्य

(५) मा. मंत्री (कृषि) - सदस्य

(६) प्रधान सचिव/सचिव (रोहयो व जलसंधारण) - सदस्य

(७) प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास) - सदस्य

(८) प्रधान सचिव/सचिव (कृषि) - सदस्य

(९) आयुक्त नरेगा - सदस्य.

महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेची कर्तव्ये व कामे :-

(१) राज्य शासनास या योजनेविषयी आणि राज्यातील योजनेच्या अंमलबजावणीबाबत सल्ला देणे.

(२) सुचविलेली कामे निश्चित करणे.

(३) संनियंत्रण व निवारण यंत्रणेचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे आणि सुधारणा सुचविणे.

(४) अधिनियम व योजनेविषयी व्यापक प्रसार करण्यास प्रवृत्त करणे.

(५) राज्यात अधिनियम व योजना अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे आणि केंद्रीय रोजगार हमी परिषदेशी अंमलबजावणी विषयी समन्वय करणे.

(६) विधानमंडळापुढे राज्य शासनाकडून सादर करणेसाठी वार्षिक अहवाल तयार करणे.

योजनेच्या अंमलबजावणीस चालना देण्याकरिता शासनस्तरावर करण्यात आलेल्या उपाययोजना :-

- योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या हक्काची जाणीव करून द्यावी तसेच, योजने विषयी माहिती देण्यासाठी केंद्रशासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्यातील पहिल्या शनिवारी ग्रामरोजगार दिन आयोजित करण्यात येतो. ग्रामीण मजुरांना इतरही योजनांची माहिती व योजनांचे प्रत्यक्ष लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यास ग्रामरोजगार दिवसाचे आयोजन अधिक लाभदायक ठरेल ही बाब विचारात घेऊन "एक दिवस मजुरासोबत" या संकल्पनेंतर्गत दिनांक ३० एप्रिल व दिनांक १ ऑक्टोबर या दिनांकास म्हणजे वर्षभरात दोनदा "ग्रामरोजगार दिनी" विविध उपक्रम, योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आलेली व मोठ्या प्रमाणात मजूर उपस्थिती असलेली गावे तसेच, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेली गावे यामध्ये आयोजित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. सदरील उपक्रमांतर्गत योजनेची माहिती व कामे, वैयक्तिक लाभाच्या योजना, जनजागृतीच्या योजना यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ मधील कलम २ (म-१) नुसार ग्रामीण क्षेत्राच्या व्याख्येत "क" वर्ग नगरपरिषद क्षेत्राचा समावेश होते. दिनांक ३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात "क" वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (सुधारणा २०१४) अन्वये "क" वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात राबविण्यास तसेच रेशीम किटक संगोपन गृहाचे बांधकाम करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

- योजनेंतर्गत कृषि विभागामार्फत भूस्तराप्रमाणे शेततळे खोदण्याचा कार्यक्रम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या/विमुक्त जमाती, दारिद्रय रेषेखालील इतर कुटुंबे, महिलाप्रधान/शारीरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटुंबे, भुसूधार योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी इत्यादी प्रवर्गातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शेतात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (नरेगा) ऑपरेशनल मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद १०.१२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, या कार्यक्रमांतर्गत कामे सुरू असतांना, कामांची प्रगती आणि गुणवत्ता यांच्या संनियंत्रणाखाली जिथे कामे चालू आहेत तेथील स्थानिक लोकांचा सहभाग असलेली ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यातचे निर्देश आहेत. त्यानुसार नरेगांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यात आली आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजुरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याकरिता सदर कायद्याच्या कलम २७ च्या पोट-कलम (१) नुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी Ombudsman ची नियुक्ती करण्यात आली आहे.

- "क" वर्ग नगरपरिषदेत व नगरपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजनेंतर्गत कामाची मागणी प्राप्त झाल्यास तेथे योजना राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

- योजनेंतर्गत पारदर्शकता वाढीस लागण्याच्या दृष्टीने तसेच मजुरांच्या कामाची अचूक नोंद हजेरीपटावर होऊन मजुरी वाटप जलदगतीने होण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यात हस्तलिखीत हजेरीपत्रकाऐवजी इलेक्ट्रॉनिक हजेरी पत्रक (ई-मस्टर) अंमलात आणण्यात आले आहे.

ई-मस्टरचे फायदे :-

(१) कामकाज सुलभ व सोपे झाले.

(२) सुरू असलेल्या कामांची संख्या, मजूर उपस्थिती, कामाचा प्रकार इत्यादी माहिती मिळणे सोपे झाले.

(३) कामाचा कालावधी, आवश्यक हजेरीपत्रक संख्या यांचा ताळमेळ घालणे सोपे झाले.

(४) काम पूर्ण होऊन मजुरांना मजुरी वेळेत अदा होण्यास मदत झाली.

(५) MIS वेळीच पूर्ण करण्यासाठी नियंत्रण ठेवता आले.

- योजनेंतर्गत मजुरांना मजुरी वेळेत मिळण्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी EFMS (Electronic Fund Management System) ही कार्यप्रणाली सुरू करण्यात आली असून, प्रायोगिक तत्त्वावर पुणे, नंदुरबार, वर्धा व अमरावती या जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली व येत्या वर्षात उर्वरित जिल्ह्यांत लागू करण्यात येईल.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्रांतर्गत जॉबकार्ड नूतनीकरण करण्याची विशेष मोहीम घेण्यात आली.

- केंद्र शासनाने अनुज्ञेय केलेल्या नवीन ३० कामांचा समावेश योजनेंतर्गत करण्यात आला.

- पंचायत युवा क्रीडा आणि खेळ अभियांनांतर्गत खेळाची मैदाने निर्माण करणे या कामांचा योजनेंतर्गत समावेश करण्यात आला.

- योजनेंतर्गत विहिरीची कामे अत्यंत लोकप्रिय आहेत. मजुरी दरात व विहिरीच्या कामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या दरात झालेली वाढ विचारात घेऊन, राज्य शासनाने विहिरीच्या कामासाठी लागणारी खर्चाची मर्यादा रुपये २ लाखावरून रुपये ३ लाखापर्यंत वाढविली आहे.

- योजनेंतर्गत प्रत्येक दुष्काळी जिल्हे किंवा ज्या जिल्ह्यात मजुरांची कामाची मागणी आहे, अशा जिल्ह्यातील दहा ते पंधरा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात (साधारणपणे ५,००० ते ७,५०० हेक्टर क्षेत्र) पाणलोट क्षेत्र विकसित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच सदर पाणलोट विकासाचे काम एक पथदर्शी प्रकल्प म्हणून राज्यातील १५ जिल्ह्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

- योजनेंतर्गत अनुसचित जमाती राहत असलेल्या ठिकाणची पडीक जमीन लागवडी योग्य करण्यासाठी डोंगराळ भागात / पडकईंतर्गत दगडी बांधासह मजगीची काम घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

योजनेची फलनिष्पत्ती :-

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र ही योजना राज्यात दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत आहे. या योजनेंतर्गत नाविन्यपूर्ण कल्पक नियोजन व अंमलबजावणी केल्याने जसे की, क्षेत्रीय स्तरावरील कार्यान्वयीन यंत्रणांमध्ये व्यापक जागृती, कर्मचाऱ्यांचे प्रभावी प्रशिक्षण, कार्यपध्दतीचे सुलभीकरण, प्रशासकीय सुधारणा, एम.आय.एस. बळकटीकरण, बाह्यस्थ मनुष्यबळाची नेमणूक इत्यादी केल्याने योजनेचा पूर्णत: कायापालट झाला व ही योजना सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचली आहे. सदर योजनेंतर्गत रोजगार पुरविणे, त्यानुषंगाने जीवनमान सुरक्षा प्रदान करणे व चिरस्थायी मालमत्ता निर्माण करणे या उद्दिष्टांच्या अनुषंगाने गावांचा संपूर्ण विकास होऊ शकतो. या योजनेच्या माध्यमातून गावे स्वयंपूर्ण करून ग्रामीण भागाच्या विकासाच्या मूलभूत संकल्पनेस चालना मिळत आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक जीवनमानात कायापालट होण्याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र ही योजना निश्चितच उपयुक्त ठरत आहे.
- या योजनेंतर्गत पुरुष व महिला मजुरांना समान मजूरी अदा करण्यात येते, त्यामुळे स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट होण्यास चालना मिळते.
- योजनेंतर्गत मजुरांना स्थानिक ठिकाणी कामे मिळत असल्याने कामासाठी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात घट झालेली आहे.
- ई-मस्टर व ई.एफ.एम.एस. (Electronic Fund Management System) मुळे योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांच्या बँक/पोष्ट खात्यावर १५ दिवसात मजुरी जमा करणे शक्य झाले आहे.
- योजनेंतर्गत कामाची मागणी, तक्रार नोंदविण्याकरिता मदतवाहिनी (Helpline-१८०० २२३८३९) सुरू करण्यात आलेली आहे. यामुळे मजुरांना घरबसल्या कामाची नोंदणी करणे शक्य झाले आहे.

रोजगार हमी योजना समिती :-

(१) रोजगार हमी योजना समितीची स्थापना :-

रोजगार हमी योजनेखाली श्रमिकांना शासनाने उपलब्ध केलेल्या सोयी सवलतीचा कितपत लाभ होतो, योजनेचा श्रमिकावर काय परिणाम होतो व योजनेचे उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टिने काय करणे आवश्यक आहे यासंबंधी शासनास सूचना करण्याच्या हेतूने दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहाने संमत केलेल्या प्रस्तावानूसार महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४१ आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम २१३ अन्वये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांची रोजगार हमी योजना समिती प्रथम दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी गठित करण्यात आली.

सुरूवातीला या समितीची सदस्य संख्या विधानसभेचे ११ व विधानपरिषदेचे ४ अशी मिळून १५ होती. सन १९८१-८२ पासून विधानसभेचे २० आणि विधानपरिषेदेचे ५ अशी मिळून २५ करण्यात आली आहे. मा.अध्यक्ष आणि मा.सभापती या समितीवरील सदस्यांना नामनियुक्त करतात.

मा. अध्यक्ष विधानसभा समितीच्या सदस्यांमधून एका सदस्याची समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करतात.

समितीचा पदावधी सर्वसाधारणपणे एक वर्षाचा असून नवीन समितीची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती होईपर्यंत तिला अधिकारावर राहता येते. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

(२) रोजगार हमी योजना समितीच्या स्थापनेबाबतचे प्रस्ताव :-

दोन्ही सभागृहांची रोजगार हमी योजना समिती स्थापन करण्यासंबंधी **मा.मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव.**

(दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी विधानसभेने संमत केलेला प्रस्ताव.)

'रोजगार हमी योजना समिती' या नावाची दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती गठित करून त्यामध्ये, अध्यक्षांनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानसभेचे ११, आणि सभापतींनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानपरिषदेचे ४ असे एकूण १५ सदस्य राहतील. तिचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील. मा. अध्यक्ष समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्याला समिती प्रमुख म्हणून नामनियुक्त करतील :–

(१) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेनुसार रोजगार मिळालेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्या लोकांवर सदरहू योजनेचा झालेला परिणाम यांच्या विशेष संदर्भात सदरहू योजनेचे निर्धारण व मुल्यमापन करणे आणि या योजनेत काही त्रुटी व दोष असल्यास ते शोधून काढणे व ते दूर करण्यासाठी सदरहू योजनेत सुधारणा करण्याचे उपाय सुचविणे आणि ;

(२) या योजनेतील कामे अधिक चांगल्या रीतीने पार पडावीत आणि सदरहू योजनेत अभिप्रेत असलेली अत्युत्कृष्ट फलिते मिळावी म्हणून सर्वसाधारणपणे शिफारशी करणे.

समितीचे सदस्य समिती गठित झाल्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत आपली पदे धारण करतील.

इतर सर्व बाबतीत समितीच्या कामकाजाशी संबंधित असे विधानसभेचे कार्यपध्दतीविषयक नियम मा. अध्यक्षांनी त्या केलेल्या फेरबदलानुसार किंवा सुधारणानुसार लागू होतील.

विधानपरिषदेने देखील या समितीच्या कामकाजात सहभागी व्हावे अशी शिफारस हे सभागृह विधानपरिषदेला करीत आहे.

(२) उभय सभागृहांची रोजगार हमी योजना समिती स्थापन करण्यासंबंधी **विधान कार्य मंत्र्यांचा प्रस्ताव.**

(दिनांक १३ ऑगस्ट १९७५ रोजी विधानपरिषदेने संमत केलेला प्रस्ताव)

'रोजगार हमी योजना समिती' या नावाची दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती गठित करून, त्यामध्ये अध्यक्षांनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानसभेचे ११, आणि सभापतींनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानपरिषदेचे ४, असे एकूण १५ सदस्य राहतील. तिचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील. मा. अध्यक्ष समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्याला समिती प्रमुख म्हणून नामनियुक्त करतील.

(१) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेनुसार रोजगार मिळालेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्या लोकांवर सदरहू योजनेचा झालेला परिणाम याच्या विशेष संदर्भात सदरहू योजनेचे निर्धारण व मूल्यमापन करणे आणि या योजनेत काही त्रुटी व दोष असल्यास, ते शोधून काढणे व ते दूर करण्यासाठी सदरहू योजनेत सुधारणा करण्याचे उपाय सुचविणे, आणि

(२) या योजनेतील कामे अधिक चांगल्या रीतीने पार पडावीत आणि सदर योजनेत अभिप्रेत असलेली अत्युत्कृष्ट फलिते मिळावी म्हणून सर्वसाधारणपणे शिफारशी करणे.

समिती सदस्य समिती गठित झाल्यातारखेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत आपली पदे धारण करतील.

इतर सर्व बाबतीत समितीच्या कामकाजाशी संबंधित असे विधानसभेचे कार्यपध्दतीविषयक नियम, मा. अध्यक्षांनी त्यात केलेल्या फेरबदलानुसार किंवा सुधारणेनुसार लागू होतील, आणि

ज्याअर्थी, विधानसभेने दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी ठराव पारित करून हया सभागृहाचे सदरहू समितीच्या कामकाजात सहभागी व्हावे अशी शिफारस केली आहे. त्याअर्थी हे सभागृह त्या समितीच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी याद्वारे आता ठराव करीत आहे.

(३) रोजगार हमी योजना समितीची रचना (म.वि.स. नियम, २४१) :-

(१) प्रत्येक वर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिती, नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, रोजगार हमी योजना समितीची रचना करण्यात येईल.

(२) समिती ही पंचवीसपेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल, त्यापैकी वीसपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि पाचपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून तिच्या सभापतीद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

(४) रोजगार हमी योजना समितीची कामे (म.वि.स. नियम, २४२) :-

(१) समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :-

(एक) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेअन्वये कामावर असलेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्यांच्यावर झालेला परिणाम यांच्या संदर्भात उक्त योजनेच्या कामकाजाचे विशेषकरून परीक्षण करणे, तत्संबंधात अंदाज घेणे आणि मूल्यमापन करणे, तसेच त्याबाबतीत कोणत्याही त्रुटी वा उणिवा असल्यास, त्या शोधून काढणे व त्या दूर करण्यासाठी आणि उक्त योजनेत सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचवणे; व

(दोन) समितीचे कामकाज अधिक चांगले चालविण्यास हितावह ठरतील अशा सर्वसाधारण शिफारशी करणे व त्या शिफारशींद्वारे योजनेची उद्दिष्टे अधिकाधिक प्रमाणात साध्य करणे.

(२) नियमाप्रमाणे दिलेली कामे साध्य करण्यासाठी समितीला प्रामुख्याने दोन बाबींचा अभ्यास करावा लागतो :-

(एक) राज्याच्या महसूल विभागीय ठिकाणी बैठकी घेऊन विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेतील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत रोजगार हमी योजनेच्या धोरणात्मक बाबी

आणि ही योजना राबविताना त्यांना येणाऱ्या अडचणी यासंबंधात त्याच्याशी चर्चा करणे, यासाठी विभागीय बैठकीची प्रश्नावली तयार करून नियोजन (रोहयो) विभागामार्फत सर्व विभागीय आयुक्त यांना पाठविली जाते व त्यासंदर्भात विभागीय आयुक्तांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने समिती विभागीय बैठकीच्या वेळी चर्चा करते.

(दोन) विभागीय बैठकीचा कार्यक्रम संपल्यानंतर समिती जिल्ह्यांना भेट देत असते. हा जिल्हा बैठकीचा कार्यक्रम दोन दिवसांचा असतो. जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन समिती कामावरील मजुरांसमवेत चर्चा करते व मजुरांना मिळणाऱ्या सोयी सवलती व मजुरी संदर्भात त्यांच्या अडीअडचणी जाणून घेते. दुसऱ्या दिवशी समितीची बैठक जिल्ह्याच्या ठिकाणी होत असते. या बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांचे समवेत समिती सदस्यांना कामावरील भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी तसेच जिल्हा बैठकीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती यासंदर्भात चर्चा केली जाते.

(तीन) विभागीय व जिल्हा बैठकीनंतर सदर बैठकीत आढळून आलेल्या त्रुटी व महत्त्वाच्या मुद्यांबाबत प्रश्नावली तयार करून मंत्रालयीन विभागाच्या संबंधित सचिवांची साक्ष घेण्यात येते व त्या अनुषंगाने योजनेत सुधारणा होण्याच्या दृष्टीने अहवाल तयार करून तो समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येतो. समितीने मान्यता दिल्यानंतर सदर अहवाल मुद्रित करून सभागृहास सादर करण्यात येतो.

समितीच्या वरील कामाव्यतिरिक्त मागील समितीने सभागृहास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधात मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समिती विचार करते. आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची पुन्हा साक्ष घेण्यात येते. व तद्नंतर त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल तयार करून समितीने मान्यता दिल्यानंतर सभागृहास सादर करण्यात येतो.

(५) रोजगार हमी योजना समितीच्या अंतर्गत कामकाजासंबंधीचे नियम :-

समिती ही माननीय अध्यक्ष यांच्या अधिपत्याखाली असून त्यांचा अधिकार व विधानसभा नियमातील तरतुदीनुसार आतापर्यंत समितीचे अंतर्गत कामकाज करण्यात येत होते. कालांतरे महाराष्ट्र विधानसभा नियम १८९ अन्वये समितीच्या अंतर्गत कामकाजाबाबतचे नियम करणे आवश्यक असल्याने माननीय अध्यक्षांनी मान्यता दिल्यानंतर रोजगार हमी योजना समितीचे अंतर्गत कामकाजविषयक स्वतंत्र नियम तयार करण्याची आवश्यकता भासली व त्यानुसार हे नियम तयार करण्यात आले. माननीय अध्यक्षांनी त्यामध्ये सुचविलेल्या सुधारणा विचारात घेण्यात आल्या व त्यावर समितीच्या दिनांक ११ ऑक्टोबर, १९९५ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय करून ते मान्य करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र विधासभा नियमावलीतील नियम २४१ व २४२ मधील तरतुदी रोजगार हमी योजना समितीच्या घटनेसंबंधी व तिच्या कामकाजाच्या व्याप्तीसंबंधी असून त्या तरतुदींना खालील नियम पूरक आहेत :-

१. लघुशीर्षक आणि प्रारंभ - (अ) या नियमांना रोजगार हमी योजना समितीअंतर्गत कामकाजासंबंधीचे नियम असे संबोधण्यात यावे.

(ब) हे नियम दिनांक ११ ऑक्टोबर, १९९५ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

२. समितीच्या बैठकी - समिती प्रमुख ठरवतील त्या दिवशी समितीच्या बैठकी मुंबई व राज्यात जिल्ह्याच्या व विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी होतील. समिती प्रमुखांनी अन्यथा निदेश दिल्याखेरीज, रविवारी आणि इतर सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी बैठकी होणार नाहीत. आणखी असे की, समिती प्रमुख सहज उपलब्ध नसल्यास, बैठकीची तारीख व वेळ सचिवांना निश्चित करता येईल.

३. समितीच्या बैठकीची सूचना - समितीच्या बैठकीचे ठिकाण, तारीख व वेळ समिती प्रमुखांनी निश्चित केल्यानंतर समितीच्या सभासदांना तशी सूचना देण्यात येईल.

४. विभागीय व जिल्हा बैठकीसाठी प्रश्नावली तयार करणे - रोजगार हमी योजनेची कामे करताना कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना आलेल्या अडचणी, उणिवा विचारात घेऊन रोजगार हमी योजनेच्या कार्यप्रणालीसंबंधात विधानमंडळ सचिवालयाकडून विभागीय व जिल्हा बैठकीसाठी प्रश्नावली तयार केल्या जातील. सदरहू प्रश्नावली प्रत्येक वर्षी नवीन समिती गठीत झाल्यानंतर तयार केली जाईल व समितीच्या मान्यतेनंतर ती सर्व विभागीय आयुक्तांना व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल.

५. विभागीय व जिल्हा बैठकींची माहिती सदस्यांना पुरविणे - विधानमंडळ सचिवालयाने विभागीय व जिल्हा बैठकीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांकडून/जिल्हाधिकाऱ्याकडून आलेली माहिती बैठकीच्या अगोदर किमान दहा दिवस समिती सदस्यांना पाठविण्यात येईल.

६. रोजगार हमी योजनेअंतर्गत चालू असलेल्या कामांना समितीच्या भेटी - जिल्हा बैठकीच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील तालुका स्तरावरील सध्या सुरू असलेल्या कामांना भेटी देण्याच्या दृष्टीने समिती प्रमुखांच्या निदेशानुसार समितीचे तीन गट केले जावेत व प्रत्येक गटामध्ये समितीचे किमान तीन सदस्य असावेत. सदरहू गट त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या तालुक्यातील कामास प्रत्यक्ष भेटी देतील. या भेटीत गट सदस्य मजुरांबरोबर चर्चा करतील व त्यांना नियमानुसार मजुरी व इतर सोयी सवलती पुरविल्या जातात काय याची माहिती घेतील तसेच त्यांच्या अडचणी समजावून घेतील व दुसऱ्या दिवशी जिल्हा बैठकीत भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी/उणिवा याबाबत अहवाल सादर करतील.

७. जिल्हा बैठक - जिल्ह्यातील कामाची प्रत्यक्ष पाहणी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी जिल्हा बैठकीत कामाच्या गटनिहाय पाहणीचा अहवाल समितीसमोर ठेवला जाईल. तसेच जिल्हा बैठकीसाठी प्रश्नावलीव्दारे जी माहिती मागविली जाते त्यावर संबंधित अधिकाऱ्यांशी सदर बैठकीत चर्चा केली जाईल. सदरहू बैठकीत जिल्हाधिकारी व रोजगार हमी योजनेची कामे करणाऱ्या विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित राहतील.

८. विभागीय बैठक - रोजगार हमी योजनेच्या विभागीय पातळीवरील कामाचा आढावा विभागीय बैठकीत घेण्यात येईल. या बैठकीस महसूल आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच कार्यान्वयीन यंत्रणेचे सर्व संबंधित अधिकारी हजर राहतील. विभागीय प्रश्नावलीसंदर्भात प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात समिती महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर कार्यान्वयीन यंत्रणाच्या पदाधिकाऱ्यांची साक्ष घेईल.

९. मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेणे - समितीच्या विभागीय व जिल्हा बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सचिव समितीचा प्रारुप अहवाल तयार करतील. तत्पूर्वी आवश्यकता वाटल्यास काही मुद्यांवर अधिक माहिती घेण्याच्यादृष्टीने मंत्रालयीन सचिवांची समिती समोर साक्ष घेतली जाईल.

१०. समितीचा अहवाल तयार करणे - विभागीय व जिल्हा बैठकीत झालेली चर्चा व आवश्यकतेनुसार विभागीय सचिवांची साक्ष घेतल्यानंतर समिती सचिव अहवालाचा मसुदा तयार करून समिती प्रमुखांना सादर करतील. समिती प्रमुखांनी त्यास मान्यता दिल्यानंतर सदर अहवाल समिती सदस्यांना प्रसृत (Circulate) करण्यात येईल. समिती सदस्यांनी केलेल्या सूचना समितीच्या बैठकीमध्ये विचारात घेण्यात आल्यानंतर अहवालाचा अंतिम मसुदा तयार केला जाईल. समितीच्यावतीने समिती प्रमुख त्यावर स्वाक्षरी करतील व सदरहू अहवाल सभागृहाला सादर करतील.

११. समितीकडे प्रसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजणे - समितीकडे प्रसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजण्यात येतील व त्यातील मजकूर दुसऱ्या कोणासही कळविण्यात येणार नाही. किंवा त्याचा उल्लेख समितीच्या बाहेर कोणत्याही वेळी करण्यात येणार नाही. सभागृहासमोर ठेवलेल्या कागदपत्रात किंवा अभिलेखात असलेल्या माहितीचाच फक्त उल्लेख करता येईल.

१२. कागदपत्रे सादर करणे - (१) महाराष्ट्र विधानसभा नियमानुसार समिती एखाद्या विषयाच्या तपासणी संबंधात आवश्यक असलेल्या व्यक्तींना बोलावतील आणि त्यासंबंधीची कागदपत्र व अभिलेख मागवील. समितीला आवश्यक असलेले गुप्त कागदपत्र त्याचा गौप्यस्फोट राज्याच्या सुरक्षिततेच्या किंवा हिताचे दृष्टीने हानीकारक असल्याच्या कारणावरुन उपलब्ध करणे शक्य नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र संबंधित मंत्र्यांनी दिले नसल्यास, तसे कागदपत्र शासन/नियोजन विभाग गुप्तरितीने, प्रथमत: समिती प्रमुखांना उपलब्ध करून देईल.

(२) समितीच्या सदस्यांना कोणताही गुप्त दस्तऐवज उपलब्ध करून देण्यापूर्वी समिती प्रमुख, शासनाच्या नियोजन विभागाच्या इच्छेचा योग्य तो विचार करतील शासन/ नियोजन विभाग आणि समिती प्रमुख यांमधील कोणताही मतभेद चर्चा करून मिटवण्यात येईल व एखाद्या प्रकरणात कोणताही समेट न झाल्यास ते प्रकरण मा. अध्यक्षांसमोर त्यांच्या निर्णयासाठी ठेवण्यात येईल.

१३. अहवाल सादर करणे - सर्वसाधारणपणे समिती प्रमुख सभागृहाला अहवाल सादर करतील आणि त्यांच्या अनुपस्थितीत समितीचा कोणताही सदस्य सभागृहाला अहवाल सादर करू शकेल.

१४. अहवालाचे वितरण - सभागृहाला अहवाल सादर केल्यानंतर त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानसभा / विधानपरिषद सदस्यांना वितरित केल्या जातील व त्यानंतर अहवालाच्या प्रती प्रशासकीय अधिकारी व कार्यान्वयीन यंत्रणाचे अधिकारी यांना उपलब्ध करून दिल्या जातील.

१५. भिन्न मतपत्रिका नसणे - समितीच्या अहवालात भिन्न मतपत्रिका राहणार नाही.

१६. अहवालावर केलेल्या कार्यवाहीच्या विवरणाची छाननी - समितीने अहवालात केलेल्या शिफारशीवर शासनाने केलेली कार्यवाही दर्शविणारे विवरण अभिप्रायासह समितीसमोर ठेवण्यात येईल. शासनाच्या अभिप्रायावर समितीच्या बैठकीत विचार करण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास काही मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेतल्यानंतर अनुपालन अहवालाचा मसुदा तयार करण्यात येईल. सदरहू मसुद्यास समितीची मान्यता घेतल्यानंतर अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल.

१७. वार्ताहरासाठी माहिती - समितीच्या बैठकी वर्तमानपत्रांच्या वार्ताहराकरिता खुल्या राहणार नाहीत. तथापि, जिल्ह्यातील माहिती व जनसंपर्क कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी बैठकीस उपस्थित राहू शकतील.

१८. समितीच्या बैठकींना समिती सदस्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींची उपस्थिती - समितीचे सभासद नसलेल्या विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य किंवा कोणतीही अन्य व्यक्ती, साक्षी घेण्याचे काम चालू असताना उपस्थित राहू शकेल. परंतु समिती विचारविमर्श करीत असताना ती उपस्थित राहू शकणार नाही.

१९. कामकाजासंबंधीच्या मुद्यांचा नियमांत अंतर्भाव करणे - या नियमांत वेळोवेळी घालण्यात आलेला कोणताही जादा मजकूर किंवा फेरबदल योग्य ते अनुमोदन मिळाल्यानंतर या नियमांत अंतर्भूत करण्यात येईल.

२०. साक्षीदारांनी अनुसरावयाची वागणूक व शिष्टाचारविषयक नियम -

भाग एक

समिती किंवा समितीच्या गटासमोर उपस्थित राहणाऱ्या संबंधित यंत्रणेच्या साक्षीदारांनी खालीलप्रमाणे वागणूक व शिष्टाचारविषयक नियम पाळले पाहिजेत :-

(१) साक्षीदारांनी प्रथम आपला परिचय करून दिला पाहिजे तसेच आपल्या जागेवर बसताना किंवा जागेवरुन उठताना समिती प्रमुख व समिती सदस्यांबद्दल योग्य तो आदर दाखविला पाहिजे.

(२) साक्षीदाराने समिती प्रमुखासमोरच जागेवर बसले पाहिजे.

(३) साक्षीदाराने त्यास समिती प्रमुखाने किंवा समितीच्या सदस्याने विचारलेल्या विशिष्ट प्रश्नास उत्तरे दिली पाहिजेत.

(४) समिती प्रमुख व समितीसमोर मांडांवयाचे मुद्दे सभ्य व विनयशील भाषेत स्पष्ट शब्दात मांडण्यात आले पाहिजेत.

भाग दोन

महाराष्ट्र विधानसभा नियमाच्या तरतुदीच्या अधीन राहून खालील कृत्यामुळे समितीचा विशेष हक्कभंग व अवमान होईल याची साक्षीदाराने नोद घ्यावी:-

(अ) विचारण्यात आलेली माहिती उघड करणे, राज्याच्या सुरक्षितेस किंवा हितसंबंधास अपायकारक ठरेल या कारणाखेरीज इतर कोणत्याही कारणावरुन प्रश्नांचे उत्तर देण्यास नकार देणे.

(ब) खोटी साक्ष तयार करणे, किंवा जाणून बुजून खोटी साक्ष देणे किंवा सत्य दडविणे किंवा समितीची दिशाभूल करणे.

(क) क्षुल्लक गोष्टींसाठी समितीचा वेळ घेणे किंवा अपमानकारक उत्तरे देणे.

(ड) चौकशीशी संबंधित असा एखादा महत्वाचा दस्तऐवज नष्ट करणे किंवा त्याची नुकसानी करणे.

२१. शब्दशः कार्यवृत्त - शब्दशः कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील.

२२. कार्यवृत्ताचे अभिलेख - समितीच्या / अभ्यास गटाच्या प्रत्येक बैठकीच्या कार्यवृत्ताचा अभिलेख सचिव ठेवतील.

२३. कार्यवृत्ताचे निश्चितकरण - कार्यवृत्तातील संबंधित भाग समितीसमोर साक्ष देणाऱ्या सदस्याकडे व अधिकाऱ्यांकडे निश्चित करण्यासाठी पाठविण्यात येईल आणि तो भाग त्यांना मिळाल्यानंतर पाच दिवसांच्या आत किंवा लवकरात लवकर तो परत करतील आणि अशा रीतीने तो भाग परत न आल्यास, प्रतिवेदकांची प्रत अंतिम व निर्णायक समजण्यात येईल.

२४. बैठकीचे वृत्तांत - समितीच्या / अभ्यास गटाच्या संमतीने विधानमंडळ सचिवालय बैठकीचे वृत्तांत तयार करील.

रोजगार हमी योजना समितीने सभागृहांस सादर केलेले अहवाल :—

रोजगार हमी योजना **समितीच्या स्थापनेपासून** (दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ पासून) समितीने आज रोजीपर्यंत (दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजीपर्यंत) **एकूण १२७ अहवाल** महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर केले आहेत.

रोजगार हमी योजना समितीच्या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील रोजगार हमी योजना समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी .—

(१) सातवा अहवाल, (धुळे जिल्ह्याच्या संबंधात) (२०१०-२०११) - भूसंपादनाचा मोबदला :—

पाझर तलावांच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून २० वर्षाचा कालावधी होऊनही शेतकऱ्यांना त्यांच्या भूसंपादनाचा मोबदला दिला गेलेला नाही असे समितीच्या निदर्शनास आले आहे. यंत्रणांकडून जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यास विलंब लावण्यात येतो. त्यानंतर भूसंपादन अधिकाऱ्याकडून विलंबाने प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविले जातात व नंतर विलंबाने जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन भूसंपादनाच्या प्रस्तावाच्या बाबतीत कार्यवाही सुरू होते, ही अतिशय गंभीर बाब आहे. भूसंपादनाच्या मोबदल्याच्या प्रस्तावाच्या बाबतीत मुळात संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष केले जाते असे समितीचे स्पष्ट मत आहे.

समिती अशी शिफारस करते की, यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसोबत वाटाघाटी करून त्यानंतरच जमिनी संपादित कराव्यात तसेच वाटाघाटी करताना गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच साक्षीदार यांना उपस्थित ठेवण्याची देखील व्यवस्था करण्यात यावी. बाजार भावानुसार वा शासनाच्या रेडी रेकनरप्रमाणे शेतकऱ्यांच्या जमीनी घेण्यात याव्यात तसेच शेतकऱ्यांना मोबदला दिल्याशिवाय त्या जमिनीवर कामास सुरुवात करू नये व यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा. ज्या शेतकऱ्यांना मोबदला दिला गेला नसेल त्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून त्या शेतकऱ्यांना ताबडतोब मोबदल्याचा लाभ देण्यात यावा व शेतकऱ्यांना जमिनींचा मोबदला तात्काळ कसा दिला जाईल

या गोष्टीकडे जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जातीने लक्ष घालावे व भूसंपादनाची विविध स्तरावरील प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाल काढावीत.

(२) अकरावा अहवाल, (लातूर जिल्ह्याच्या संबंधात) (२०१०-२०११) - निधीचा पुरवठा व खर्च .—

समितीला देण्यात आलेल्या माहितीनुसार निधीची मागणी करताना मागील तीन वर्षाचा आढावा घेऊन वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करून यंत्रणांनी कामाचे स्वरुप व कामाकरिता आवश्यक असेल त्याप्रमाणे निधीची मागणी करण्यात गरज असताना यंत्रणांनी अवास्तव निधीची मागणी करून प्राप्त झालेल्या निधीपैकी काही रक्कम अखर्चित राहून ती रक्कम जिल्हाधिकारी पातळीवर समर्पित केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. जिल्हाधिकारी आणि जिल्ह्यातील यंत्रणांनी निधीच्या मागणी आणि पुरवठ्याबाबत एकमेकांशी पूर्ण समन्वय ठेऊन निधीची मागणी करावी, जेणेकरून यंत्रणांच्या आवश्यकतेनुसार योग्य प्रमाणात निधी उपलब्ध होण्यास मदत होईल. यासंदर्भात उप जिल्हाधिकारी (रोहयो) यांनी जिल्ह्यातील यंत्रणांच्या निधीच्या मागणी आणि पुरवठ्याबाबत समन्वय असण्यासाठी यंत्रणाच्या संपर्कात असणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी, लातूर यांनी जिल्ह्यातील तलावामधील गाळ लोकसहभागातून काढून तो शेतामध्ये टाकण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. तसेच जिल्ह्यातील गावातील शेतरस्ते, पाणंद रस्ते तयार करण्यासाठी त्या त्या गावातील सरपंच, तंटा मुक्ती समितीचे अध्यक्ष व शासनाचे अधिकारी यांची समिती नेमून लोकसहभागातून शेतरस्ते व पाणंद रस्ते तयार केले आहेत. जिल्हाधिकारी यांनी केलेल्या प्रशंसनीय व उत्कृष्ट कामाबाबत समिती त्यांचे अभिनंदन करते व लातूर पॅटर्न प्रमाणे मग्रारोहयो अंतर्गत राज्यातील प्रत्येक अभियंत्याकडे कमीत कमी एक किलोमीटरचा पाणंद रस्ता करणे बंधनकारक करण्याबाबत तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यातील तलावातील गाळ काढून शेतामध्ये टाकण्यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा अशी समितीने शिफारस केली आहे.

एनआरईजीएस योजना देशभरात सुरु केल्यानंतर त्याप्रमाणे देशातील सर्व राज्यांनी त्यांची अंमलबजावणी तातडीने केली. महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना सुरू असल्याने मग्रारोहयो अंतर्गत अद्याप पाहिजे तसे काम सुरू झालेले नाही. तरी राज्यामुळे मग्रारोहयो अंतर्गत कामाचे नियोजन मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी जास्तीत जास्त निधी केंद्र शासनाकडून मिळविण्याच्या संदर्भात शासनामार्फत पाठपुरावा करण्यात यावा अशीही समितीने शिफारस केली आहे.

(३) चौथा अहवाल, (उस्मानाबाद जिल्ह्याच्या संबंधात) (२०१५-२०१६) - मजुरीचे वाटप .—

उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्या कार्यकाळात कामे अपूर्ण अवस्थेत असणे त्यासंदर्भात स्थानिक लोकांकडून तक्रारी येणे, रोहयोच्या कुशल कामांचे पैसे परस्पर ठेकेदारास वाटप करणे, कॅशबुकमध्ये खाडाखोड करणे, हजेरीपटात नावे बदलणे व एका तालुक्याच्या हजेरीपटाची दुय्यम प्रत (Duplicate) करून दुसऱ्या तालुक्यात वापरणे, इत्यादीबाबी समितीने साक्षीच्या वेळी निदर्शनास आणल्या असता जिल्हाधिकारी यांनी परांडा तालुक्याच्या तत्कालिन तहसीलदार यांच्या उपरोक्त आरोपासंदर्भात सहमती दर्शवली व चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत, असे समितीला सांगितले. उपरोक्त प्रकरणी परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्याविरुध्द चालू असलेली विभागीय चौकशी विहित कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापि, अद्यापपर्यंत

त्यांची विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तरी, याप्रकरणी परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसिलदार यांच्यासंदर्भात विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करून त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी जेणेकरून त्यांना पुनःस्थापित करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही, अशी समितीने शिफारस केली.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये इतर तालुक्यातील संगणकाचे पासवर्ड वापरुन पैश्याचा अपहार करण्यात आला असल्याचे समितीला भेटीच्या वेळी निदर्शनास आले. त्याबाबत समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, हे प्रकरण कळंब तहसील क्षेत्रातील असून याप्रकरणी संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर भारतीय दंड संहितेमधील कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १६७ आणि ३४ तसेच अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यापैकी काही लोकांना अटक झालेली आहे तसेच याप्रकणात जे कंत्राटी कर्मचारी होते त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले असून त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेतलेले नाही. याप्रकरणी संबधित अधिकारी/कर्मचारी यांची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. अशा प्रकारे संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांची मालमत्ता जप्ती व दंडाची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात आल्यास त्यांना आर्थिक फटका बसेल, असे समितीचे मत आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून संबधितांवर कार्यवाही करावी अशी समितीने शिफारस केली आहे.

*****

(६) उप विधान समिती

(Committee on Subordinate Legislation)

पार्श्वभूमी

संविधानाव्दारे प्रदान केलेल्या किंवा संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने सोपविलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने केलेले आणि सभागृहासमोर मांडलेले नियम, विनियम, उपविधि इत्यादी तत्संबंधित अधिनियमांच्या तरतुदींशी अथवा सामान्य उदिष्टांशी सुसंगत आहेत किंवा नाहीत यांची छाननी करणे व विधानसभेला व विधानपरिषदेला अहवाल सादर करणे हे उप विधान समितीचे काम आहे. राज्यातील लोकांचे कल्याणाकरिता आणि विकासाकरिता शासनाकडून विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. सदर योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विधिमंडळात विविध प्रकारचे कायदे करण्यात येतात. (कायद्याची वा अधिनियमाची अंमलबजावणी प्रशासकीय स्तरावर करण्यात येते व त्याचा अर्थ लावण्याची जबाबदारी न्यायमंडळाकडे सोपविली आहे.) तथापि, विधानमंडळात कायदे करताना कायद्यातील प्रत्येक तरतुदीवर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे अधिवेशनाच्या कालावधीत शक्य होत नाही. तसेच कायद्यातील तरतूदीवर अर्थपूर्ण व परिपूर्णपणे विचार करणे विधानमंडळास शक्य नसते. त्यामुळे कायदा व त्या कायद्यातील तरतूदी या तांत्रिकदृष्ट्या तपासून नियम तयार करण्याचे काम प्रशासकीय यंत्रणेकडे सोपविण्यात येते. प्रशासकीय यंत्रणेकडून तयार करण्यात आलेले नियम, विनियम उपविधी इ. संसदेने वा विधानमंडळाने दिलेल्या अधिकारांतर्गत तयार केले आहेत की नाही व अधिनियमातील तरतूदींशी सुसंगत आहेत की नाही, हे तपासण्याकरिता उपविधान समितीची स्थापना करण्यात आली आहे.

उप विधान समितीची रचना :—

संसदेमध्ये दिनांक २४ एप्रिल १९५१ रोजी उप विधान समितीची स्थापना झाली व समिती दिनांक ०१ डिसेंबर १९५३ रोजी पासून कार्यरत झाली. महाराष्ट्र विधानमंडळामध्ये उप विधान समितीची स्थापना दिनांक १७ एप्रिल १९५८ रोजी करण्यात आली. उप विधान समिती १९ सदस्यांची संयुक्त समिती असून सदर समितीवर मा.अध्यक्ष, विधानसभेचे १४ सदस्य नामनियुक्त करतात व मा.सभापती, विधानपरिषदेचे ५ सदस्य नामनियुक्त करतात. मा.अध्यक्ष समितीच्या सदस्यामधून समिती प्रमुखांची नेमणूक करतात.

उप विधान समितीच्या स्थापनेमागील उद्देश

संविधानाव्दारे प्रदान केलेल्या किंवा संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने सोपविलेल्या अधिकाराचा वापर करून राज्यशासनाने तयार केलेले नियम, विनियम याचे परिक्षण करणे हे प्रमुख कार्य असून असे परिक्षण किंवा छाननी करताना समिती सदर अधिकारांचा वापर हा कार्यकारी मंडळाकडून योग्यरितीने करण्यात आला आहे किंवा नाही. तसेच सदर नियम हे ज्या अधिनियमानुसार करण्यात आले आहेत त्या अधिनियमाच्या सामान्य उद्दिष्टांशी सुंसगत आहेत किंवा नाहीत याबाबींची तपासणी करते. संविधानानुसार किंवा त्यास अनुसरून ते करण्यात आले असतील तर त्या अधिनियामव्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा कोणताही अकल्पित किंवा अनपेक्षित वापर करण्यात आला आहे किंवा नाही याबाबींचा विचार करून सभागृहास अहवाल सादर करते.

सर्वसाधारणपणे शासनाच्या कार्यकारी मंडळाकडे नियम तयार करण्याचे वैधानिक अधिकार सोपविण्यात आले आहेत. त्यांच्याकडून मुलभूत बाबी हातळल्या जातात ज्यांचा परिणाम जनतेचे अधिकार व जीवनावर होत असतो. नियम तयार करण्याच्या कार्यपध्दतीत एकसमान राहील. व ते संबंधित अधिनियमाशी सुसंगत राहतील याची खात्री करणे ह्या प्रमुख उद्देशाने समिती काम करत असते. संबंधित अधिनिमयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या मर्यादेत राहूनच कार्यकारी मंडळाने नियम करणे अपेक्षित असते तथापि, काही वेळा सदर मर्यादेचे उल्लंघन त्यांच्याकडून होण्याची शक्यता असते. अशावेळी त्यांना अधिनियमान्वये दिलेल्या अधिकाराची जाणीव करून देणे व याअनुषंगाने मार्गदर्शन करणे हे उपविधान समितीचे मुख्य काम आहे. विधानमंडळास अधिनियमाखालील नियम तयार करण्यास पुरेसा वेळ उपलब्ध नसतो. त्यामुळे काही मर्यादेपर्यंत नियम तयार करण्याचे अधिकार कार्यकारी वा प्रशासकीय यंत्रणेकडे द्यावे लागतात व अशा देण्यात आलेल्या अधिकाराचा प्रशासनाकडून योग्य वापर केला जातो की नाही ह्या बाबी तपासणे हे विधानमंडळाच्या उप विधान समितीचे काम आहे.

विधानमंडळाचे कार्यकारी मंडळावर नियम, उप नियम करताना नियंत्रण ठेवणे आवश्यक असते विभागाने तयार केलेले नियम, विनियम इ.तयार करून ते राजपत्रात प्रसिध्द केल्यानंतर ते सभागृहापुढे सादर केले आहेत की नाही हे तपासण्याचे काम उप विधान समितीमार्फत केले जाते.

उप विधान समितीचे कामकाज :—

संविधानाने किंवा लोकसभेने किंवा राज्य विधानमंडळाने दिलेले अधिकाराचा वापर करून तयार केलेले नियम, विनियम, पोट-नियम वगैरेंचा समावेश असलेली प्रत्येक अधिसूचना, **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत समितीकडे परीक्षणासाठी पाठविली आहे किंवा नाही याचा पाठपुरावा करते. या अधिसूचना, नियम, उप नियम, विनियम शासनाकडून वेळेवर काढण्यात आल्या किंवा नाही यावर समिती नियंत्रण ठेवते.

प्रशासकीय यंत्रणेकडून तयार करण्यात आलेले नियम, विनियम उपविधी इ. संसदेने वा विधानमंडळाने दिलेल्या अधिकारांतर्गत तयार केले आहेत की नाही व अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहेत की नाही. हे उप विधान समितीचे मुख्य काम आहे.

समितीची कार्यकक्षा :—

उप विधान समितीच्या स्थापनेचा उद्देश म्हणजे नियम करण्याच्या कार्यपध्दतीत एकसमानता राहील व ते संबंधित अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत राहील याची खात्री करणे हा आहे. विभागाने विधानमंडळास अपेक्षित असलेले नियम विनियम बनविणे आवश्यक असते. परंतु काहीवेळा त्यांच्याकडून नियम तयार करताना काही त्रुटी राहू शकतात त्यामुळे समितीने तिचे काम करताना शासकीय अधिकाऱ्याशी सुसंवाद साधून सखोल चर्चा करून काम करणे अपेक्षित असते. समितीचे महत्त्वाचे काम म्हणजे प्रशासनाकडून चुका दुरूस्त करून त्यांना त्यांचे काम करताना ते जनतेच्या हितार्थ कसे होईल याबाबत मार्गदर्शन करणे हे आहे.

सामान्यतः शासनाचे अधिकारी किंवा प्रशासनाचे सचिव जे नियम, विनियम, उपविधी आणि आदेश तयार करतात त्यांना गावपातळीवरील वा क्षेत्रीय स्तरावरील वास्तविकतेबद्दल जास्त माहिती नसते. नियम तयार करताना त्यांचा स्वतंत्र दृष्टीकोन असतो. त्यामुळे त्यांच्या कृतीचा किंवा त्यांनी तयार केलेल्या नियमांचा जनतेवर विपरित

परिणाम होऊ शकतो. विधानमंडळाचे सदस्य जे जनसमुदायाचे प्रतिनिधीत्व करतात त्यांना जनतेच्या समस्यांची जाणीव असते ते असे तयार केलेले नियम व्यवस्थितरित्या तयार केले आहेत की नाही हे तपासण्याचे व ते सर्व सामान्य जनतेच्या हिताचा विचार करून त्या नियमातील दोष दूर करून विधानमंडळाच्या सार्वभौमत्वावर अतिक्रमण होऊ न देण्याचे काम उप विधान समितीमार्फत करण्यात येते.

समितीच्या मते आवश्यक वाटल्यास समिती एखाद्या अधिसूचनेतील विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेते. शासनाकडून प्रारूप व अंतिम अशा दोन्ही प्रकारच्या अधिसूचना काढण्यात येतात व या दोन्ही अधिसूचना समितीकडून तपासल्या जातात. एखाद्या प्रारूप नियमात सुधारणा सुचवावयाची असल्यास ती सुधारणा समिती सुचवू शकते. समितीने सुचविलेली सुधारणा विभागाने मान्य केल्यास अंतिम अधिसूचनेत समितीने केलेल्या सुधारणेचा समावेश करून ती अधिसूचना परत समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येते.

उपविधान समितीची स्थापना (म.वि.स. नियम २१९ व म.वि.प. नियम २०६) :—

(१) दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, उप विधान समिती स्थापन करण्यात येते.

(२) समितीत जास्तीत जास्त १९ सदस्यांचा समावेश असतो. अध्यक्ष त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त १४ सदस्य नामनिर्देशित करतात आणि विधानपरिषदेचे सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त ०५ सदस्य नामनिर्देशित करतात.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची स्थापना करण्यात येईपर्यंत, पद धारण करतात.

नियम, विनियम, उपविधी इत्यादी समितीपुढे मांडणे (म.वि.स. नियम २२०) :—

संविधानाद्वारे प्रदान केलेल्या किंवा संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने सोपविलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाने केलेले आणि सभागृहापुढे मांडणे आवश्यक असलेले नियम, विनियम, उप विधि, इत्यादी ते करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर, समितीपुढे मांडण्यात येतात.

समितीची कामे (म.वि.स. नियम २२१) :—

(१) नियम २२० मध्ये निर्देश केलेले नियम, विनियम, उप विधि करण्याच्या अधिकारांचा योग्यरितीने वापर करण्यात आला आहे किंवा नाही याची छाननी करणे व विधानसभेला अहवाल सादर करणे हे समितीचे कर्तव्य असेल.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता समिती पुढील गोष्टी विचारात घेईल.

(एक) उक्त नियम, विनियम, उप विधि वगैरे संविधानाच्या किंवा ज्या अधिनियमानुसार ते करण्यात आले असतील त्या अधिनियमाच्या सामान्य उद्दिष्टांशी सुसंगत आहेत किंवा नाहीत.

(दोन) समितीच्या मते, संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात अधिक योग्य रीतीने विचारात घेण्यात यावी अशा कोणत्याही बाबींचा समावेश त्यात आहे किंवा नाही,

(तीन) संविधानाद्वारे किंवा अधिनियमाद्वारे ज्या कोणत्याही तरतुदीच्या संबंधात भूतलक्षी प्रभावाने अंमलात आणण्यासारखे कोणतेही अधिकार स्पष्टपणे देण्यात आले नसतील अशा कोणत्याही तरतुदीच्या बाबतीत त्यामध्ये भूतलक्षी प्रभाव देण्यात आला आहे किंवा नाही,

(चार) संविधानानुसार किंवा ज्यास अनुसरून ते करण्यात आले असतील त्या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा कोणताही अकल्पित किंवा अनपेक्षित वापर केल्याचे त्यावरून दिसून येते किंवा नाही,

(पाच) ते प्रसिध्द करण्यात किंवा विधानमंडळापुढे मांडण्यात असमर्थनीय विलंब लागला असल्याचे दिसून येते किंवा नाही,

(सहा) कोणत्याही कारणासाठी त्यांच्या स्वरूपाबद्दल किंवा आशयाबद्दल कोणतेही विषदीकरण आवश्यक आहे किंवा काय,

विभागाच्या सचिवांनी बैठकींना हजर राहणे (म.वि.स. नियम २२२) :-

संबंधित विभागाचा सचिव समितीच्या चर्चेत समितीला मदत करण्यासाठी बैठकींना हजर राहील आणि समितीला इष्ट वाटेल अशी माहिती पुरवील.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २०६ :-

दरवर्षी, विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, विधानसभेने केलेल्या नियमान्वये रचना केलेल्या उपविधान समितीवर प्रतिनिधित्व करण्यासाठी मा. सभापती, विधानपरिषदेचे जास्तीत जास्त पाच सदस्य नामनिर्देशित करतील.

उप विधान समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील उप विधान समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

(१) तिसरा अहवाल - सन २०१३ - उद्योग,ऊर्जा व कामगार(उद्योग) विभाग

महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारीत) नियमावली, २००९ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक आयडीसी २००८/प्र.क्र.५५१/ड-१४, दिनांक ८ जून, २००९) :— "औद्योगिक प्रयोजनासाठी अधिसूचित करण्यात आलेले व महामंडळास आवश्यकता नसलेले क्षेत्र विनाअधिसूचित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास नियमावली, १९६२ च्या नियम ३० च्या पोट-नियम (१) व (२) अन्वये पूर्वी असलेली अनुक्रमे २० वर्षे व १० वर्षांची कालमर्यादा ही मुळातच अधिक असून ती आणखी अनुक्रमे ४० वर्षे व ३५ वर्षांपर्यंत वाढविल्याने जमीन विनाअधिसूचित करण्याच्या प्रक्रियेतील दफ्तरदिरंगाई वाढून परिणामी मूळ जमीन मालक /शेतकऱ्याला प्रदीर्घकाळ जमिनीबाबतच्या निर्णयाची प्रतिक्षा करावी लागेल व तेवढा वेळ जमिनीवर कोणत्याही स्वरुपाची विकासात्मक कामे करता येणार नाहीत.

सबब, अधिसूचित क्षेत्राबाबतचा निर्णय त्वरेने घेण्यासाठी सदर कालमर्यादा उलट आणखी कमी करण्यात यावी व ते शक्य नसल्यास किमान अधिसूचनेपूर्वी जेवढी कालमर्यादा होती तेवढीच ठेवण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

(२) **दुसरा अहवाल- सन २०१६- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :-**

***(i)* अंतिम अधिसूचना क्रमांक ९९ : आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१०, प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ओएएच-२००९/प्र.क्र. ४६/ सुधार- १, दिनांक २३ जून, २०१० :-** पाल्य जर आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा वृध्दापकाळात सांभाळ करीत नसेल तर सदर नियमातील तरतूदीनुसार आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या चरितार्थासाठी पाल्यांकडून निर्वाह भत्ता मागणी करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे. तथापि, समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, या नियमांतर्गत असलेल्या तरतूदींची माहिती अद्यापी सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचलेली नाही. तरी शासनाने या नियमांची सर्वदूर प्रसिद्धी करण्याकरिता नगरपरिषदा, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालये, तहसीलदार कार्यालये इत्यादींच्या सहकार्याने तसेच प्रसिद्धी माध्यमांतर्फेही सदरहू नियमांचा प्रचार व प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

***(ii)* प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-१५ : महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी. १० / २०१२ / प्र.क्र.१६५ / मावक, दिनांक २१ जुलै, २०१२**

आणि

अंतिम अधिसूचना क्रमांक २३ : महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी.१० / २०१२ / प्र.क्र.१६५ / मावक, दिनांक १ सप्टेंबर, २०१२

जातीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांच्या आत देण्यात यावे व जातीचे वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये देण्यात यावे अशी तरतूद नियमात करण्यात आलेली आहे. तथापि, विहित कालावधीत जातीचे प्रमाणपत्र वा जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र अर्जदारास मिळत नाहीत त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होते. **विहित मुदतीत जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता या बाबींचा समावेश सेवा हमी कायद्यात करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत सदर प्रमाणपत्रे अर्जदारास उपलब्ध न झाल्यास तसेच प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांना शास्ती लावण्याबाबतची तरतूद सेवा हमी कायद्यात करण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

(३) पाचवा अहवाल- सन २०१८ वित्त विभाग :-

***(i)* अंतिम अधिसूचना क्रमांक ११५ : महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम, २००२ च्या कलम ९ च्या उप-कलम (१) व्दारे उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची "घ" मध्ये केलेली सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मूवक १५१६/ प्र.क्र. ७७/ कराधान-१, दिनांक ३१ मे, २०१६**

राज्यातील सर्व भागात तसेच देशातील सर्व राज्यात पेट्रोल व डिझेलच्या दरात एकसमानता येण्याच्या दृष्टीने पेट्रोल व डिझेलचा समावेश वस्तू व सेवा करामध्ये करण्याबाबत जी.एस.टी कौन्सिलला शिफारस करून पेट्रोल व डिझेलच्या दरात आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या चढउतारामुळे महसूली उत्पन्नावर होणाऱ्या परिणामाचे सखोल व तौलानिक, आर्थिक व सांख्याकीय परिक्षण करून देशपातळीवर राज्याच्या महसूलावर परिणाम न करता कशा पध्दतीने एक समानता ठेवता येईल व संविधानाला अपेक्षित असलेल्या समान अधिकारांचे प्रत्यंतर देशभरातील जनतेला कशाप्रकारे देता येईल, यादृष्टीने राज्यामार्फत विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

तसेच राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे दुष्काळ निवारण्यासाठी आकारण्यात आलेला कर अद्यापही सुरु ठेवण्यात आला आहे. एखाद्या विशिष्ट नैसर्गिक आपत्तीसाठी राज्यातील जनतेकडून कर वसूल करणे याचे समर्थन होवू शकते. तथापि, अशा परिस्थितीचे निवारण झाल्यानंतरही तो कर तसाच चालू ठेवणे म्हणजे जनतेची एक प्रकारे फसवणूक केल्यासारखे आहे. असे करून शासनाने एक प्रकारे त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा अमर्याद वापर केल्याचे दिसून येते. **ही बाब गंभीर असून अधिनियमान्वये एखादे अधिकार शासनाला देताना त्याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे इथूनपुढे एखाद्या अधिनियमान्वये शासनास किंवा कोणत्याही शासकीय प्राधिकरणास अधिकार देताना ते मर्यादित स्वरूपात किंवा अधिनियमातच त्या सर्व नियमांचा अंतर्भाव करून देण्यात यावे. जेणे करून शासन व संबंधित प्राधिकरण त्याचा अमर्याद वापर करणार नाही, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

(*ii*) उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग :- अंतिम अधिसूचना क्रमांक ७८: महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/१३२/ २००५/०७३६, दिनांक २१ एप्रिल, २००५ व त्यास काढलेले शुद्धीपत्र क्र.मविनिआ/ लिगल/१३२/२००५/ २०८३, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.

समितीने सन २०१३ च्या चौथ्या अहवालात केलेली शिफारस विचारात घेता, सन २००३ पूर्वीच्या १६ लाख कृषी पंपावर मीटरच्या धर्तीवर वीज आकारणी करण्याचा भार शेतकऱ्यांवर न टाकता व पायाभूत यंत्रणा उभारण्याबाबत आवश्यक त्या निधीची तरतूद शासनाकडून प्राप्त होण्यासाठी ऊर्जा विभागाने वित्त विभागास पाठविलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाने तातडीने कार्यवाही करून सदर प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक त्या निधीची तरतूद करण्याचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

*****

(७) अनुसूचित जाती कल्याण समिती

(Committee on Welfare of Schedule Castes)

समितीची रचना, कार्यपद्धती व कामकाज :-

समिती स्थापना :-

लोकसभेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समितीची निर्मिती झाल्यानंतर त्याच पद्धतीने महाराष्ट्र राज्य विधानमंडळात (तिसरी महाराष्ट्र विधानसभा) देखील लोकसभेच्या धर्तीवर अशी समिती स्थापन करावी असा ठराव सभागृहात एकमताने मंजूर झाल्यावर दिनांक ६ मे, १९७१ रोजी सदरहू समिती गठीत करण्यात आली.

या समितीची निर्मिती करण्याचा उद्देश असा होता की, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या सर्वस्पर्शी विकासाकरीता घटनेतील तरतुदीच्या व शासनाच्या विविध निर्णयांत व त्यासंदर्भात घटनेने घालून दिलेली कर्तव्ये पार पाडण्याची तसेच त्याबाबत काटेकोर अंमलबजावणी व्हावी याबाबत देखरेख ठेवणे, शासनाला तत्संबंधी वेळोवेळी सूचना देणे जेणेकरून या अनुसूचित जाती/जमातीच्या सर्वांगिण विकास होऊन त्यांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती साधणे शक्य व्हावे लोकसभेमध्ये संसदीय समिती म्हणून ही समिती इतर महत्त्वाच्या संसदीय समित्यांच्या बरोबर उल्लेखिली जाते.

सुरूवातीस अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व भटक्या जमाती कल्याण समिती महाराष्ट्र विधानमंडळाने दिनांक ६ मे १९७१ रोजी महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २३३ (१) (२) आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २१० अन्वये गठीत करण्यांत येऊन एकूण १५ सदस्यांची निवड करण्यात आली. सदरहू समितीमध्ये ११ विधानसभा सदस्य व ४ विधानपरिषदेचे सदस्य असे एकूण १५ सदस्य होते. सन १९७१-७२ मध्ये (तिसरी महाराष्ट्र विधानसभा) पहिल्यांदा गठीत केलेल्या समितीने आपले पहिले प्रतिवृत्त सभागृहास दिनांक ८ ऑक्टोबर १९७१ रोजी सादर केले.

सन १९७९ पर्यंत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशी एकच संयुक्त समिती होती. परंतु, अनुसूचित जमातीच्या लोकांच्या विकासासाठी तसेच भटक्या व विमुक्त जमातीसाठी अशा दोन स्वतंत्र समित्यांची आवश्यकता भासल्यामुळे त्यांच्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट १९७९ रोजी तसेच दिनांक २३ जुलै १९८१ रोजी अनुक्रमे (१) अनुसूचित जमाती कल्याण समिती तसेच (२) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशा दोन वेगवेगळ्या स्वतंत्र समित्या गठीत करण्यात आल्या व त्यानुसार महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेच्या नियमांत योग्य तो बदल करून दिनांक ८ मे १९८१ रोजी अनुसूचित जातीच्या लोकांच्या कल्याणासाठी **अनुसूचित जाती कल्याण समिती** या नावाने एक स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली.

सन १९८१ पर्यंत या समितीवरील सदस्यांची नियुक्ती प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीनुसार एकलसंक्रमणीय मतदानाने झालेल्या निवडणुकीच्या पध्दतीनुसार केली जात होती. तथापि त्यानंतर विधानसभा नियमात दुरुस्ती करण्यात येऊन १९८१ पासून समितीवरील सदस्यांची नियुक्ती प्रत्येक वर्षी मा. अध्यक्ष यांचेकडून नामनिर्देशनाद्वारे केली जाते.

समितीची कार्यकक्षा :-

या समितीच्या कार्यकक्षेत अनुसूचित जाती यांचेवर होत असलेले अन्याय, अत्याचार व त्यासंबंधी शासनाकडून केली जाणारी उपाययोजना तसेच या समाजाचा प्रत्येक क्षेत्रातील मागासलेपणा दूर करण्यासाठी करावयाचे प्रयत्न व या जाती करीता शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांसंबंधी विचार विनिमय करून त्याबाबत शासनास योग्य त्या शिफारशी करणे, त्यांच्या शैक्षणिक विकासाचा प्रश्न, त्यांच्या संर्वांगिण विकासासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी, त्यांचे शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी क्षेत्रातील उपक्रम आणि शासकीय अनुदानावर चालविल्या जाणाऱ्या इतर संस्था यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे भरती, बढती, आरक्षण व अनुशेष यांसंबंधीचे प्रश्न इत्यादी बाबी प्रामुख्याने येतात.

महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम क्रमांक २३३ व २३४ मध्ये समितीची रचना व कामे यासंबंधी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती कल्याण समितीची रचना :- (म.वि.स. नियम २३३)

(१) दरवर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिती, नव्याने रचना केलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष, त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून, जास्तीत जास्त अकरा सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रीतीने सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त चार सदस्य नामनिर्देशित करतील.

(२) या समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

समितीची कामे (म.वि.स. नियम २३४) :-

अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील;-

(एक) संविधानाच्या अनुच्छेद ३३८ (२) अन्वये आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांनी सादर केलेल्या अहवालांवर जेथवर महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीशी त्यांचा संबंध येत असेल तेथवर, विचार करणे आणि राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी याविषयीची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे;

(दोन) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे;

(तीन) अनुच्छेद ३३५ च्या तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (यात सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांतील, सांविधिक व निमसरकारी संस्थांमधील नियुक्त्यांचाही समावेश आहे. अनुसूचित जातीच्या उमेदवारांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे;

(चार) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या अनुसूचित जातीच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींचा सर्वसाधारणतः विचार करणे व दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल देणे;

(पाच) सभागृहाने अथवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

अनुकमांक (एक) ते (पाच) वरील बाबीसंबंधी समिती सातत्याने कार्य करत असते, तथापि समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंदर्भात एखादी विशेष घटना घडली तर त्या घटनेबाबतची सविस्तर चौकशी करून त्याबाबतचा आपला अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्याचा अधिकार या समितीला महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद नियमानुसार प्राप्त झालेला आहे.

समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत उपलब्ध करून घेतली जाते. सर्वसाधारणपणे समितीच्या प्रारंभिक बैठकीमध्ये अथवा त्यानंतर होणाऱ्या बैठकीमध्ये समितीसमोर असलेल्या कामकाजाच्या आधारे कोणते विषय अग्रक्रमाने विचारात घेऊन कामकाज करावयाचे याबाबतचा निर्णय समितीमध्ये सर्वानुमते घेतला जातो व त्यानुसार वर्षभरात समिती आपले कामकाज करून त्याबाबतचा आपला अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करीत असते.

अनुसूचित जाती कल्याण समिती मागील दोन-तीन वर्षापासून राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्दांकरिता उक्त संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते काय ? या विषयी संबंधित जिल्हा परिषदांना, महापालिकांना व इतर संस्थांना जो निधी वर्गीकृत केला जातो त्या निधीचा पुरेपूर विनियोग होतो की नाही, ज्या कामासाठी जो निधी खर्च करावयास पाहिजे त्या कामासाठी तो खर्च केला जातो की नाही याचीही तपासणी समिती करीत आहे.

अनुसूचित जाती कल्याण समिती दिनांक ८ मे, १९८१ रोजी स्वतंत्रपणे अस्तित्वात आल्यापासून समितीने आतापर्यंत म्हणजे जुलै, २००४ पर्यंत मूळ व अनुपालन असे एकूण ७४ अहवाल सभागृहांना सादर केले आहेत.

यानंतर समितीने खालीलप्रमाणे आपले अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केले आहेत :-

समितीने अकराव्या विधानसभेच्या (सन २००४ ते २००९) कालावधीत ३ मूळ व ६ अनुपालन असे एकूण ९ अहवाल, बाराव्या विधानसभेच्या (सन २००९ ते २०१४) कालावधीत ४ मूळ अहवाल तसेच तेराव्या विधानसभेच्या (सन २०१४ ते २०१९) कालावधीत १० मूळ अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केले आहेत.

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील अनुसूचित जाती कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

(१) पहिला अहवाल (सन २००९ -२०१०) -

(*i*) **जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे यांच्या अनुपस्थितीबाबात :-** समितीने दिनांक १३ जुलै २००९ रोजी पुणे महानगरपालिकेस भेट दिली असता त्या बैठकीच्या वेळी विभागीय समाजकल्याण अधिकारी व समाजकल्याण अधिकारी हे उपस्थित नव्हते, त्यामुळे मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी बोलविण्यात यावे असे सदर बैठकीच्या वेळी समितीने निर्णय घेतला होता. असे असतानांही ज्यावेळी विभागीय सचिवांची साक्ष मुंबई येथे समितीने घेतली त्यावेळी विभागीय साक्षीच्या बैठकीलासुध्दा ते उपस्थित राहिले नाहीत. वास्तविक पाहता, मागासवर्गीय उमेदवाराच्या मुलाखतीचे वेळी समाजकल्याण अधिकारी हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे शासनाने परिपत्रकाद्वारे सूचित केले आहे. बैठकीला उपस्थित राहण्यासंबंधीचे पत्र त्यांना दिले असल्याचे

आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. ही गंभीर बाब आहे असे समितीचे स्पष्ट मत असून या संदर्भात **अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी विभागीय समाजकल्याण अधिकारी व समाज कल्याण अधिकारी हे उपस्थित नव्हते. त्याचबरोबर विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीसाठी देखील ते उपस्थित राहिले नाहीत. ही बाब विचारात घेता, शासनाने या संदर्भात संबंधितांची चौकशी करून त्यांना योग्य ती समज देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(*ii*) **गत तीन वर्षाचे अंदाजपत्रक व वैयक्तिक व सामुहिक विकासाच्या योजना :-** सन २००९-२०१० साठी ९७८ कोटी रूपयांची तरतूद आहे. कर्मचाऱ्यांना पगाराचा खर्च १९५ कोटी, बांधील खर्च ६३० कोटी, महसुली उत्पन्न ३४८ कोटी रुपये असून ५ टक्क्यांप्रमाणे १७.४३ लाख रुपये होतात, त्याचप्रमाणे २२.८२ लाख रुपयांची तरतूद केली आहे. अशी आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी समितीला माहिती दिली. **त्यावर मागील वर्षी अपेक्षित अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा बांधील खर्च कमी झालेला असेल तर पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात मागील वर्षातील फरकाच्या रकमेवरील ५% मागासवर्गीयांवर खर्च करावयाची रक्कम कॅरी फॉरवर्ड करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(*iii*) झोपडपट्टीमध्ये राहणारे सगळेच मागसवर्गीय असतात, असे नाही. झोपडपट्टी परिसरात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी दवाखाने व बी.पी.एल. रुग्णांना वैद्यकीय बिलात दिलेली सवलत यासाठी मागासवर्गीय निधीतून खर्च करण्यात आला आहे, असे दाखविले आहे. परंतु, या झोपडपट्ट्यांमध्ये १०० टक्के लोक मागासवर्गीय नाहीत. काही झोपडपट्ट्यांमध्ये २५ टक्के काही ठिकाणी ५० टक्केच मागसवर्गीय असतात. तसेच सगळेच बी.पी.एल. मधील मागासवर्गीय असतात असे नाही. त्यामुळे हा खर्च १०० टक्के मागासवर्गीयांवर खर्च झाला आहे, असे म्हणता येणार नाही. असे समितीचे स्पष्ट मत आहे. मागासवर्गीय कल्याण निधीमधील निधी खर्च करण्याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनानुसार हा निधी मागासवर्गीयांसाठी खर्च झाला पाहिजे. एखाद्या योजनेच्या माध्यमातून खर्च केला म्हणजे तो मागासवर्गीयांवर खर्च झाला असे म्हणता येणार नाही. **५० टक्के मागासवर्गीय असतील तर तो खर्च मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेल्या निधीतून केला जाऊ नये. शासनाच्या यासंदर्भात परिपत्रकाद्वारे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(२) दुसरा अहवाल (सन २०१० -२०११) :-

(*i*) **महानगरपालिकेतील सरळसेवेतील मंजूर पदे व अनुशेष :-** समितीने औरंगाबाद महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी सन २००७-०८, २००८-०९ व २००९-१० या तीन वर्षांचा वर्ग-१ व वर्ग-४ या संवर्गातील अनुशेष भरण्यात आलेला नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यावेळी समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू अनुशेष तात्काळ भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. बिंदुनामावली प्रमाणित करून घेऊन अनुशेष भरण्यासाठी जाहिरात काढणे आवश्यक होते. सहायक आयुक्त, विशेष मागासवर्ग कक्ष, तसेच आयुक्तालय, औरंगाबाद यांनी महानगरपालिकेला अनुशेष भरण्यासाठी माहिती पुरविणे आवश्यक होते. परंतु, तसे काहीही करण्यात आलेले नाही, **तरी अनुसूचित जातीचा वर्ग-१ ते वर्ग-४ चा अनुशेष भरण्याबाबत जाहिरात काढून तीन महिन्यांच्या आत भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी व यासंबंधीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(*ii*) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नगर अभियंता या पदावर बऱ्याच कालावधीपासून तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे. महानगरपालिकेमध्ये सेवा ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीयांना नगर अभियंता या पदावर कायम करणे आवश्यक आहे. नगर अभियंता या पदावर त्यांना बढती न देता केवळ त्यांच्यावर कार्यभार सोपावून काम करून घेणे व त्यांना बढती मिळण्यापासून वंचित ठेवणे हे निश्चितच योग्य नाही. सबब, **नगर अभियंत्यांना दिलेला तात्पुरता कार्यभार नियमित करण्यात यावा व हे पद कायम करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(*iii*) **मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना :-** औरंगाबाद माहानगरपालिकेने, मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी सन २००६-०७ ते सन २००९-१० या चार वित्तीय वर्षाच्या कालावधीत पूर्वी सादर केलेल्या खर्चाच्या तरतूदीचे विवरण पत्रात व **विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी सादर केलेल्या तरतुदीच्या सुधरित विवरणपत्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे खर्च नेमका कोणत्या बाबीवर किती केला याचा उलगडा होत नाही. यासंदर्भात संपूर्ण चौकशी करून समितीला सविस्तर अहवाल तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

(३) तिसरा अहवाल (सन २०१२ -२०१३) :-

समितीला सूत गिरण्यांच्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीवरून असे दिसून येते की, कोणत्याही सूतगिरण्यांमध्ये विशिष्ट टक्केवारीनुसार अनुसूचित जातीच्या उमेदवारांची भरती केलेली नाही. अनुसूचित जातीच्या उमेदवारांची विहित टक्केवारीनुसार शासकीय, निमशासकीय अनुदानप्राप्त संस्था व सुतगिरण्यामध्ये भरती करण्याबाबत वेळोवेळी सर्व संबंधितांना परिपत्रकाद्वारे सूचना दिली असतानाही त्यांच्या अंमलबजावणी संबंधित संस्थांकडून अद्याप केली जात नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. सबब, **उपरोक्त सूतगिरण्यामध्ये विहित टक्केवारीनुसार अनुसूचित जातीच्या उमेदवारांची तांत्रिक व अतांत्रिक पदावर भरती करून केलेल्या कार्यवाही करावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

आजमितीस राज्यात ६३ सूतगिरण्या सुरू आहेत. त्यापैकी १३ सूतगिरण्या या मागासवर्गीयांच्या आहेत. ही बाब विचारात घेता, उक्त सर्व सूत गिरण्यांमध्ये गिरणीनिहाय तांत्रिक / अतांत्रिक पदांची एकूण संख्या त्यांपैकी **अनुसूचित जातीच्या उमेदवारासाठी राखीव असलेली पदे व प्रत्यक्षात भरण्यात आलेली पदे व रिक्त पदाची सद्यःस्थिती याबाबतची सविस्तर माहिती घेऊन रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यांत पाठविण्यात यावी.**

याच संदर्भात विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहायक मागासवर्ग कक्ष यांनी व विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी संयुक्तपणे **सूतगिरण्यांतील नोकर भरतीच्या संदर्भातील बिंदू नामावली (रोस्टर) प्रस्तिकेची तपासणी करून ते अद्ययावत करून त्याबाबतची सूतगिरणीनिहाय माहिती समितीला पाठविण्यात यावी, समितीची अशी शिफारस आहे.**

सन २००७ मधील समितीने बिंदूनामावली (रोस्टर) तपासण्यास सांगितले असताना एकाही सूतगिरणीने बिंदूनामावली (रोस्टर) तपासून घेतलेले नाही. वस्त्रोद्योग विभागाच्या अधिकाऱ्यांनी सूत गिरण्यांना भेट देऊन याबाबत

तपासणी करून समितीला अहवाल सादर करावा. **मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी बिंदू नामावली (रोस्टर) ची तपासणी केली पाहिजे. समितीसमोर यासंबंधीचा अहवाल अद्याप आलेला नाही, ही बाब गंभीर आहे यासंदर्भात शासनाने लक्ष घालून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावे, अशी शिफारस समिती करीत आहे.**

(४) चौथा अहवाल (सन २०१३ -२०१४) :-

(*i*) राज्यातील सर्व महानगरपालिकेतील सेवाप्रवेश नियमावलीमध्ये सुसूत्रता व समानता असावी यादृष्टीने सेवाभरती नियम तयार करण्यासाठी शासनाने सर्व महानगरपालिकेकडून माहिती मागविलेली आहे. नाशिक महानगरपालिकेने सुध्दा शासनाकडे दिनांक २० नोव्हेंबर, २००८ रोजी माहिती पाठविलेली असून त्याबाबत त्यांची अंतिम सुनावणी देखील झाली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. परंतु अद्याप पर्यंत सेवाप्रवेश नियम तयार झालेली नाहीत. परिणामी राज्यात महानगरपालिकांमध्ये अस्तित्वात असलेल्या सेवा प्रवेश नियमान्वये महानगरपालिकेतील भरती, बढती, आरक्षण या संदर्भात निश्चित कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत संभ्रम निर्माण होत असून त्यामुळे राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेत वेगवेगळ्या कार्यपध्दतीचे अवलंबन करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. वेळ प्रसंगी प्रकरणपरत्वे शासनाकडे मार्गदर्शनासाठी यावे लागते. त्यामुळे महानगरपालिकेस पदे भरण्यास विलंब होत आहे. सबब **मागासर्गीयांची भरती, बढती व आरक्षण यास महानगरपालिकास्तरावर विलंब होत असल्याची बाब लक्षात घेता शासनाने लवकरात लवकर सर्व महानगरपालिकांसाठी आदर्श सेवाप्रवेश नियम तयार करावेत, अशी शिफारस समिती करीत आहे.**

(*ii*) समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, नाशिक महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील अनुसूचित जातीकरीता आरक्षित असलेल्या ३५ गाळ्यांपैकी ६ गाळ्यांचे वाटप करण्यात आले नव्हते. त्या गाळ्यांचे वाटप करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने समितीने दिले होते, तथापि, साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, समितीने दोन वर्षापूर्वी दिलेले निदेशाचे पालन अद्यापर्यंत करण्यात आले नव्हते. यावरुन समितीने दिलेले निदेश महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्षित केले असल्याचे स्पष्ट होत असून मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना राबविण्यात अधिकाऱ्यांना स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही, सदरहू कृती समितीचा अवमान करणारी ठरत असून याबद्दल समिती तीव्र खेद व्यक्त करते व **मागासवर्गीयांसाठी राखीव असलेले उर्वरीत ६ गाळे वितरित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करून, त्याचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत विलंबाच्या कारणासह सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(*iii*) तसेच नाशिक येथील समाजकल्याण कार्यालयाने मान्यता दिलेल्या १०९ गटई कामगारांना स्टॉल पुरविण्यात अनुमती दिली असताना फक्त ८२ जणांना स्टॉल देण्यात येऊन उर्वरित २७ जणांना रोजंदारीवर परवाने देण्यात आले आहेत. गटई कामगार यांच्या कामाचे स्वरुप पाहता व त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याची बाब लक्षात घेवून त्यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. **महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेले स्टॉल सर्व अर्जदार गटई कामगारांना कायमस्वरुपी कशा पध्दतीने लवकरात लवकर उपलब्ध करून देता येतील याबाबत तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी ही समिती शिफारस करीत आहे.**

(५) आठवा अहवाल (सन २०१५-२०१६) :-

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये काही शासकीय वसतीगृहे भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत असून सदर इमारतीचे ३ ते ४ लाख रुपये प्रतीमहा भाडे आहे. समाजकल्याण विभागाने नविन वसतीगृहांच्या बांधकामासाठी तीन जागांसंदर्भात जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर वसतीगृहांच्या बांधकामासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पैसा/निधी देखील उपलब्ध आहे. तसेच शासनाच्या स्वमालकीचे वसतीगृह बांधण्याबाबत शासनाची योजना आहे. ही बाब विचारात घेता, **शासनाने याबाबतीत प्राधान्याने लक्ष घालून भाडयाच्या इमारतीतील वसतीगृहांऐवजी शासनाच्या मालकीची वसतीगृहे बांधण्याबाबत संबंधितांना तातडीने आदेश निर्गमित करावेत. अशी समितीची शिफारस आहे.**

(६) नववा अहवाल (२०१७-२०१८) :-

(*i*) अनुसूचित जाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना घरकूल योजनेंतर्गत लाभ देत असताना योजनेतील काही जाचक अटी मुळे अनुसूचित जातीच्या लोकांना घरे उपलब्ध होत नाही. सबब, **अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांना पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास घरकुल योजनेंतर्गत लाभ प्राप्त होण्याच्या दृष्टीने नियमावलीत असलेल्या जाचक अटी रद्द करून नविन नियमावली तयार करण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत कार्यवाही करण्यात यावी व अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.**

(*ii*) रमाई आवास योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांचे स्वत:चे घर किंवा जागा आहे अशा लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. अशा शासनाच्या जाचक अटीमुळे अनुसूचित जातीतील अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित आहेत तेव्हा समितीने दिलेल्या निदेशानुसार **घर किंवा जागेच्या अटी ऐवजी लाभार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे रमाई घरकूल आवास योजनेचा लाभ देण्यात यावा. त्याप्रमाणे घरकुलाचे वाटप करण्यात येणाऱ्या नियमावलीमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करून जातवैधता प्रमाणपत्राची अट घालण्यात यावी या व्यतिरिक्त लाभार्थ्यांवर अन्य कोणत्याही अटी लावू नये अन्यथा अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही अशी समितीची शिफारस आहे.**

(७) दहावा अहवाल (२०१८-२०१९) :-

(*i*) महानगरपालिकेकडून अनुसूचित जातीच्या घटकांसाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या योजनेसाठी राखून ठेवण्यात आलेला ५% निधीतून रस्ते, वीज, पाणी, नळ कनेक्शन व शौचालय या कामांबरोबर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी **ग्रंथालये, अभ्यासिका, व्यायामशाळा, युपीएसी / एमपीएससी प्रशिक्षण इत्यादी कामावर रक्कम खर्च करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(*ii*) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील युवकांसाठी शासनाकडून देण्यात येणाऱ्या पोलिस भरतीपुर्व प्रशिक्षणाचे कार्यक्रम जिल्ह्यापासून खुप दूर असल्याकारणाने उमेदवारांना प्रवास करून येणे-जाणे त्रासाचे होते. तसेच या उमेदवारांना प्रशिक्षण कार्यक्रमापर्यंत येण्या-जाण्याचे भाडेही देण्यात येत नाही, असे समितीच्या निदर्शनास आले. सबब, **पोलिस भरतीपुर्व प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हानिहाय खाजगी संस्थांना आवश्यक ती मान्यता देऊन पोलिस भरतीपुर्व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावेत अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(८) अनुसूचित जमाती कल्याण समिती
(Committee on Welfare of Schedule Tribes)

समितीची स्थापना :-

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३३५ मध्ये संघराज्य किंवा राज्य यांच्या कामकाजाच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करताना, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या व्यक्तींचे हक्क, प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेण्यात येतील आणि अनुच्छेद १६ (१) मध्ये राज्याच्या अखत्यारीतील कोणत्याही पदावरील सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्या संबंधातील बाबतीत सर्व नागरिकांस समान संधी असेल अशी तरतूद आहे. असे असले तरी संविधानाच्या अनुच्छेद १६ (४) मध्ये कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या अखत्यारीतील सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व मिळालेले नाही अशा वर्गाकरिता नियुक्त्या किंवा पदे आरक्षित ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यापासून राज्याला प्रतिबंध होणार नाही, अशी देखील स्पष्ट तरतूद आहे.

भारतीय संविधानातील वरील तरतुदी आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या सर्वांगीण विकासाबाबत शासनाने ज्या सोयी-सवलती उपलब्ध केलेल्या आहेत, त्या प्रत्यक्षात त्यांना मिळतात किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी तसेच त्या वर्गाच्या कल्याणाच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी लोकसभेने व इतर काही राज्यांच्या विधीमंडळांनी निर्मित केलेल्या संसदीय समितीच्या धर्तीवर महाराष्ट्र विधिमंडळातही अशी समिती स्थापन करण्याचा प्रश्न विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक ३० एप्रिल १९७१ रोजी विधानसभेत आणि दिनांक ४ मे १९७१ रोजी विधानपरिषदेत एक प्रस्ताव पारित करण्यात येऊन महाराष्ट्र राज्यात दिनांक ६ मे १९७१ रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समितीची निर्मिती करण्यात आली. या समितीवर विधानसभेतील ११ सदस्य व विधान परिषदेतील ४ सदस्य अशा एकूण १५ सदस्यांची निवड करण्यात येत होती.

या समितीच्या (दिनांक ६ मे, १९७१ रोजी अस्तित्वात आल्यानुसार) कार्यकक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमातीचा अंतर्भाव होता. परंतू, या समितीच्या नावावरुन तसा स्पष्ट बोध होत नव्हता. त्यामुळे सन १९७३ मध्ये दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावानुसार सदरहू समितीचे नाव "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" असे करण्यात आले. सन १९७९ पर्यंत अनुसूचित जाती, अनसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशी एकच संयुक्त समिती राज्य विधिमंडळात अस्तित्वात होती.

तथापि, अनुसूचित जमातीच्या लोकांच्या विकासासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता वाटल्यामुळे दिनांक ११ ऑगस्ट, १९७९ रोजी **अनुसूचित जमाती कल्याण समिती** अशी स्वतंत्र समिती घटित करण्यात आली.

सदर समितीच्या कार्यकक्षेत अनुसूचित जमाती यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचार व त्यासंबंधी शासनाकडून केली जाणारी उपाययोजना तसेच या समाजाचा प्रत्येक क्षेत्रातील मागासलेपणा दूर करण्यासाठी करावयाचे प्रयत्न व या जमातीकरिता शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनांचा विचार-विनिमय करून त्याबाबत शासनास योग्य त्या शिफारशी करणे, त्यांच्या शैक्षणिक विकासाचा प्रश्न, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसंकल्पात करावयाच्या तरतुदी, त्यांचे शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, वैधानिक

मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी क्षेत्रातील उपक्रम, शासकीय अनुदानावर चालणाऱ्या इतर संस्था याबाबत शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारी प्रमाणे जागांचे आरक्षण, सरळसेवा भरती, पदोन्नती व अनुशेष इत्यादी बाबींचा प्रामुख्याने समावेश होतो.

समितीची रचना (म.वि.स. नियम २३५ व म.वि.प. नियम २११) :-

(१) महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २३५ मधील तरतूदीनुसार ही समिती दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये जास्तीत जास्त पंधरा सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त अकरा सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रीतीने सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त चार सदस्य नामनिर्देशित करतील,

(२) अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या समिती प्रमुखांची मा. अध्यक्षांकडून नियुक्ती केली जाते.

(३) या समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

समितीची कामे :-

विधानसभा नियमांतील नियम २३६ मधील तरतूदी नुसार अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :-

(एक) संविधानाच्या अनुच्छेद ३३८ अ (७) अन्वये आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांनी सादर केलेल्या अहवालांवर महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींशी जेथवर त्यांचा संबंध येत असेल तेथवर, विचार करणे आणि राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी, या विषयीची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे ;

(दोन) समितीने सुचविलेल्या उपयोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे ;

(तीन) अनुच्छेद ३३५ च्या तरतूदी विचारात घेऊन राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सरकारी क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निमसरकारी संस्था यांतील नेमणुका धरुन) अनुसूचित जमातींना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे ;

(चार) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या, अनुसूचित जमातीच्या कल्याणासंबंधीच्या, सर्व बाबींवर सर्वसाधारणत: विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल सादर करणे ;

(पाच) सभागृहाने अथवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे ;

वरील बाबीसंबंधी समिती सातत्याने कार्य करीत असते. तथापि, समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंदर्भात एखादी विशेष घटना घडली तर त्या घटनेबाबतची सविस्तर चौकशी करून त्याबाबतचा आपला अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्याचे अधिकार वा शक्ती समितीला महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद नियमानुसार प्राप्त झालेली आहे.

समितीच्या कामकाजाची कार्यपध्दती :-

प्रारंभिक बैठकीच्यावेळी समितीच्या कामकाजासंबंधातील टिप्पणी, समितीने ज्या बाबी वा विषय विचारात घेणे आवश्यक आहे, अशा बाबींची यादी संकलित करून समितीसमोर ठेवली जाते व समितीने निवड केलेल्या विषयानुसार प्रश्नावली तयार करून राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत संबंधितांना पाठविली जाते.

समितीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संबंधित ठिकाणी समितीच्या भेटीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. प्रत्यक्ष भेटीच्यावेळी समितीने तयार केलेल्या प्रश्नांच्या आधारे समिती संबंधितांची साक्ष घेते. भेटी दरम्यान झालेल्या बैठकीच्यावेळी संबंधितांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या काही मुद्दयांबाबत समिती संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेते.

समितीने दिलेल्या भेटीच्यावेळी मिळालेली माहिती तसेच मंत्रालयीन विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या आधारे प्रारुप अहवाल तयार केला जातो. प्रारुप अहवाल समितीने संमत केल्यानंतर मा. अध्यक्षांची अनुमती घेऊन सदर अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्यात येतो.

समितीने सभागृहांना सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर कार्यवाही करण्यासाठी सर्व संबंधित मंत्रालयीन विभागांना अहवाल पाठविला जातो. अहवालातील शिफारशींवर संबंधित मंत्रालयीन विभागाने केलेल्या कार्यवाहीसंबंधीची माहिती ३ महिन्यात मागविली जाते. सदरहू कार्यवाहीच्या संदर्भात संबंधित मंत्रालयीन विभागीय सचिवांची समितीसमोर साक्ष घेतली जाते व त्या संदर्भातील अनुपालन अहवाल सभागृहांस सादर केला जातो.

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

(१) नववा अहवाल (२००८-२००९) :- सहकारी बँकासंदर्भात प्रशासकीय विभाग या नात्याने सहकार विभागाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९-अ (१) प्रमाणे सहकारी बँकेतील अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, पदोन्नती करताना अनुसूचित जमातीच्या लोकांकरिता जागा राखून ठेवणे व मागील अनुशेष भरुन काढणे याबाबत केव्हा आदेश काढलेले आहेत व या आदेशांचे स्वरुप काय आहे? तसेच सहकारी बँकांच्या सेवांमध्ये अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आरक्षण ठेवण्याबाबत शासनाने निर्गमित केलेले आदेश सहकारी बँकावर बंधनकारक करण्याबाबत सहकार विभागाने केव्हा व कोणती कार्यवाही केलेली आहे अशी समितीने माहिती विचारली असता सहकारी संस्थांमधील मागासवर्गीयांच्या भरतीसंदर्भात व त्यांचा अनुशेष भरुन काढण्यासंदर्भात प्रशासकीय विभाग या नात्याने सहकार विभागाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम - ७९ (अ) (१) प्रमाणे दिनांक २५/०८/१९७७, दिनांक २९/०५/१९८१, दिनांक ०५/०८/१९९१, दिनांक ३०/६/१९९९ च्या शासन निर्णयानुसार व दिनांक ०८/०८/१९८९ च्या शासन परिपत्रकानुसार सर्व संबंधिताना आदेश दिलेले असून हे आदेश ज्या सहकारी संस्थामध्ये १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत अशा सर्व संस्थांवर बंधनकारक आहेत. व हे आदेश अधिनियमांतर्गत असल्यामुळे त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याची माहिती

समितीस देण्यास आलेली आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक संस्थामध्ये शासनाच्या या आदेशानुसार कार्यवाही होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. **सन १९९७ पासून सन १९९९ पर्यंत निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचा व कायदेशीर तरतुदींचा संदर्भ देवून व त्यानुसार कार्यवाही न केल्यास होऊ शकणाऱ्या कारवाईचा उल्लेख करून पुन्हा राज्यातील सर्व सहकारी संस्थांना आदेश देण्यात यावेत व या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते किंवा कसे याचा आढावा घेण्यासाठी तसेच शासन व सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्यासाठी एखादी विशिष्ट अशी यंत्रणा निर्माण करण्यात यावी आणि त्यामार्फत आवश्यक त्यावेळी परिणामकारक अशी कारवाई करण्यात यावी व या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांचे कालावधीत कळविण्यात यावी, अशी समितीस शिफारस आहे.**

(२) दुसरा अहवाल (२०१०-२०११) :- शिक्षकांची पदे भरताना त्या त्या विषयाचे शिक्षक जर मिळत नसतील तर आदिवासींमधीलच सुशिक्षीत लोकांना अप्रशिक्षीत शिक्षण घेण्याचा अधिकार आपल्याला दिलेला आहे. यापूर्वी व्हीजेएनटी या प्रवर्गात असाच प्रकार शासनाने सुरु केलेला आहे. परंतु, एखाद्या विषयात प्राविण्य असलेल्या विषयाचाच शिक्षक पाहिजे म्हणून इतर कॅटेगरीजचे शिक्षक भरायचे व ज्यांच्यासाठी जागा रिक्त आहेत त्यांच्यावर अन्याय करायचा याला आळा घालणे आवश्यक आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सुध्दा अशा संस्थांच्या प्रस्तावावर सही करण्यापूर्वी त्या संस्थेतील अनुसूचित जमातीचा अनुशेष भरलेला आहे की नाही याची शहानिशा केल्याशिवाय सही करु नये असे केले तरच अनुशेष भरण्याची काळजी त्या संस्था घेतील अशी समितीची सूचना आहे. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस असे आश्वासित केले की, समितीने सुचविलेली सूचना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात येतील. तसेच याबाबत शिक्षण विभागाच्या सचिवांची देखील मान्यता घेण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. **समितीला दिलेल्या आश्वासनानुसार ग्रामविकास विभागाकडून लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(३) तिसरा अहवाल (२०१०-२०११) :- आदिवासी जनतेच्या विकासासाठी शासनाकडून मिळालेली अर्थसंकल्पामधील परत दर्शविलेली रक्कम आदिवासी उपयोजनेंतर्गत व आदिवासी उपयोजनेच्या बाहेर असलेल्या आदिवासी जनतेने कल्याण व हित जोपासण्याच्या दृष्टीने खर्च होणे आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागा व्यतिरिक्त इतर विभागाकडून खर्च करण्यात आलेल्या रकमेवर आदिवासी विकास विभागाचेच नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यासाठी **आदिवासी विकास विभागाने तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करून आदिवासी जनतेच्या हितासाठी व विकासासाठी इतर विभागाकडे दिलेल्या रकमेवर व झालेल्या खर्चावर विभागीय पातळीवर आदिवासी विभागाकडून नियंत्रण ठेवण्यात यावे व आदिवासींच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या योजनांचा व झालेल्या खर्चाचा तसेच आर्थिक व्यवहाराचा तपशील दर तीन महिन्यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

शासनाकडून आदिवासींच्या विकासासाठी जो निधी दिला जातो तो निधी आदिवासींच्या पर्यंत पोहचवून त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुलभूत आणि वैयक्तिक लाभांच्या योजनेवर खर्च करणे आवश्यक आहे. सदर निधीचा लाभ खऱ्या अर्थाने गरीब आदिवासींपर्यंत पोहचऊन त्यांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्याचे काम प्रकल्प

अधिकारी, अतिरिक्त आदिवासी विकास अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर आहे. जर आदिवासींचा पैसा त्यांच्या कल्याणासाठी खर्च केला नसेल किंवा आदिवासींच्या नावाने अन्य कामाकडे वळविला असेल तर त्या **संबंधित प्रकल्प अधिकारी, अतिरिक्त आदिवासी विकास अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा सुध्दा दाखल करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(४) सहावा अहवाल (२०१०-२०११) :- (i) जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागामध्ये सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग व बांधकाम विभाग या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदूनामावली नोंदवही अद्यावत स्वरुपात ठेवण्यात आलेली नाही तसेच या विभागातील संवर्गात अनुसूचित जमातीच्या पदांचा अनुशेष शिल्लक आहे. जिल्हा बैठकीच्यावेळी जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या विभागातील बिंदूनामावली नोंदवही अद्यावत स्वरुपात ठेवण्यात आली आहे असे सांगण्यात आले होते. तथापि, साक्षीच्या वेळी उक्त विभागाची बिंदूनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच काही विभागातील बिंदूनामावली नोंदवह्या तपासणीसाठी मागासवर्गीय कक्षाकडे सादर केल्या असता त्यामध्ये त्रुटी असल्याचे आढळून आलेले असल्याने त्रुटीची पुर्तता करून पुन्हा बिंदूनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणेबाबतची कार्यवाही सुरु आहे असे समितीला सांगण्यात आले. समितीने साक्षीसाठी बैठक आयोजित केली असल्यामुळे बैठकीपूर्वी बिंदूनामावली नोंदवही तपासणीसाठी नस्ती आयुक्ताकडे सादर केल्या आहेत. बिंदूनामावली नोंदवही प्रत्येक विभागाने शासन निर्णयानुसार दर तीन वर्षांनी अद्यावत करणे आवश्यक आहे परंतु जिल्हापरिषद बीड या कार्यालयातील संबंधित विभागांनी बिंदूनामावली नोंदवह्या मागासवर्गीय कक्षाकडे तपासणीसाठी दर तीन वर्षांनी सादर न करता विलंबाने सादर केल्या आहेत. बिंदूनामावली नोंदवही तपासणीसाठी मागासवर्गीय कक्षाकडे सादर करण्यात ज्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून विलंब झालेला आहे. **विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.** तसेच संबंधित विभागाची बिंदूनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासण्यात आली असता विभागनिहाय संवर्गात अनुसूचित जमाती पदाचा अनुशेष शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. **जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय शिल्लक असलेला अनुसूचित जमातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(ii) बीड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खाजगी शिक्षण संस्थांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. खाजगी संस्थामधील कर्मचाऱ्यांचा अनुशेष तपासण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषदेची आहे. खाजगी शाळांवर शिक्षणाधिकाऱ्यांची कोणतेही नियंत्रण नसून अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरली जात नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे. **नियमानुसार अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेली पदे भरली जात नाहीत. तोपर्यंत अशा शैक्षणिक संस्थांना मान्यता देण्यात येऊ नये.** अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्राथमिक शिक्षण संवर्गात बी.एस.सी., बी.एड., विज्ञान, गणित, इंग्रजी या विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे माध्यमिक शिक्षकांची १३ पदे रिक्त आहेत. काही शैक्षणिक संस्था वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यानंतर अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत असे कारण दर्शवून त्याठिकाणी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची भरती करतात. त्यामुळे **योग्य शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक उपलब्ध होत नसल्यास खुल्या प्रवर्गाची पदे अनुसूचित**

जमातीच्या उमेदवारांसाठी ट्रान्सफर करून माध्यमिक शिक्षकांची रिक्त असलेली १३ पदे त्वरित भरण्यात यावीत तसेच अनुसूचित जमातीतील अप्रशिक्षित शिक्षक घेऊन अशा शिक्षकांना विषयासंबंधित प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही केल्यास अनुसूचित जमातीचे शिक्षक प्रशिक्षण घेऊन उपलब्ध करून देता येतील. **त्यादृष्टीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(५) सातवा अहवाल (२०१२-२०१३) :- (*i*) आदिवासी विभागात पाच लाख मुले/मुली शिक्षण घेतात, त्यासाठी विभागातर्फे दोन हजार कोटी रुपये खर्च होतात. प्रकल्प अधिकाऱ्यांचा ८० टक्के वेळ आश्रमशाळांमध्ये जातो तरी सुध्दा त्या व्यवस्थित चालविता येत नाहीत. शासन या बाबींवर पुरेसा निधी खर्च करीत असतानाही जर त्यांचा दर्जा सुधारत नसेल तर, प्रशासकीय योजनेमध्ये काही त्रुटी आहेत असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे आदिवासी विकास विभागात शिक्षणासाठी एक वेगळे आयुक्त पद निर्माण केल्यास आदिवासी भागात शिक्षणाच्या दर्जात सुधारणा होईल. त्यानुसार **आदिवासी विभागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी वेगळे आयुक्त पद निर्माण करण्याबाबत तसेच शालेय शिक्षण विभागाप्रमाणे गट शिक्षणाधिकारी या पदाशी समकक्ष असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत आदिवासी विकास विभागाकडून त्वरित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(*ii*) आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयाअंतर्गत जवळपास ५५० आश्रमशाळा व ४५० वसतीगृहे कार्यरत आहेत. या आश्रमशाळा व वसतीगृहाची देखभाल, दुरुस्ती व बांधकामाकरिता वेगळी यंत्रणा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता परंतु, तो यशस्वी झाला नाही. आदिवासी विकास विभागाकडे याकरिता निधी उपलब्ध असून त्या विभागाची स्वतःची इमारत नाही अशी परिस्थिती आहे. वन विभागाने व पाटबंधारे विभागाने काही जमीन आश्रमशाळांकरिता उपलब्ध करून दिली आहे. परंतु या बाबतीत निधी व जमीन दोन्ही उपलब्ध असूनही बांधकामाचे अंदाजपत्रक तयार नसल्याने हे काम होऊ शकत नाही. याकरिता बांधकाम विभागाची नवीन यंत्रणा तयार केल्यास आश्रमशाळा व वसतीगृहाची देखभाल, दुरुस्ती व नवीन बांधकामाची कामे लवकरात-लवकर करणे शक्य होईल व त्याचा दर्जा निश्चितच सुधारेल. आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध विभागांमार्फत विकासाची कामे सुरु असतात. वेगवेगळया विभागामार्फत कामे सुरु असल्यामुळे आदिवासी विभागाचे त्यावर नियंत्रण नसते. प्रकल्प अधिकारी किंवा आदिवासी विकास विभागाकडून देण्यात येणाऱ्या रक्कमेवर पूर्णतः या विभागाचे नियंत्रण नसते. त्यामुळे **अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या नियंत्रणाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे कार्यकारी अभियंता, उप अभियंता, शाखा अभियंता असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत आदिवासी विकास विभागाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(*iii*) आदिवासी विकास विभागाने सुरक्षिततेच्या दृष्टीने गॅस शेगडयांची जोडणी करणेः- आदिवासी विकास महामंडळाने गॅस शेगडया अगोदर खरेदी केलेल्या असून नंतर गॅस कनेक्शन घेण्यात आले आहे. त्यामुळे ३२६ गॅस शेगडया गॅस कनेक्शन नसल्यामुळे पडून आहेत. गॅस शेगड्यांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर अडचण आहे. याबाबत बीपीसील, एचपीसीएल, आयपीसीएल या गॅस एजन्सीजचे अधिकारी आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची

एकत्रित समिती गठीत केली होती, त्या समितीच्या मार्फत गॅस कंपन्यांनी कनेक्शन द्यावे असे ठरले आहे. आदिवासी विकास महामंडळाचे जे कर्मचारी आहेत त्यांनी गॅस शेगड्यांची जोडणी करणे अपेक्षित आहे. परंतु एक व्यक्ती सर्वच ठिकाणी जाऊन हे काम करु शकत नाही. त्यामुळे वीजतंत्री यांना घरपोच पाठवून गॅस शेगड्यांची जोडणी केली जाते. प्रत्येक शेगडी जोडण्यापूर्वी गॅस एजन्सीकडून मान्यता मिळाली पाहिजे. जर गॅस कंपनीची मान्यता नसेल आणि एखादी दुर्घटना घडली तर नुकसानभरपाई मिळणार नाही. वन विभागाने गॅस शेगड्यांच्या कनेक्शनबाबत जसे धोरण आखले आहे त्याच पद्धतीचे धोरण आदिवासी विकास विभागाच्या बाबतीत सुध्दा अवलंबण्यात यावे अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी वन विभागाच्या माध्यमातून ४० हजार गॅस शेगड्यांचे वाटप केले आहे. ३० हजार लोकांच्या शेगड्या सुरु झाल्या आहेत. गॅस शेगड्यांची जोडणी गॅस एजन्सीच्या माध्यमातून केली आहे. कारण ते सुरक्षिततेची हमी घेतात. वन विभागाच्या माध्यमातून वन क्षेत्रात मोहीम हाती घेतली होती. वन विभाग १२ सिलेंडरपर्यंत सबसिडी देणार असून, शेगडी विनाशुल्क देणार आहे. त्यामुळेच एक वर्षाची सबसिडी कायम केली आहे. असे समितीला सांगितले. समितीने, **या दृष्टीकोनातून जी काही कार्यवाही करावयाची असेल ती कार्यवाही करावी व गॅस शेगड्यांच्या जोडणीबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी, असे निदेश दिले. वन विभागाने गॅस शेगड्यांच्या कनेक्शनबाबत जसे धोरण आखले आहे. त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाने सुरक्षिततेच्या दृष्टीने गॅस शेगड्यांच्या जोडणीबाबत धोरण तयार करून आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(*iv*) समितीच्या बैठकीच्या संबंधित अधिकारी वर्ग अनुपस्थित राहणे:– समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, समितीच्या बैठकीसंबंधित नसलेल्यांनादेखील विभागातर्फे समितीच्या बैठकीस बोलावण्यात आले होते. उदा- एम.एस.ई.बी., एस. टी. महामंडळ इत्यादीचे अधिकारी आले होते. याबाबत कोण जबाबदार आहे याचा खुलासा करावा असे निदेश दिले. प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हा बैठकीकरिता ज्यांना आमंत्रित करण्यात आले होते त्यांनाच बैठकीकरिता सांगण्यात आले आहे, असे समितीला सांगितले. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिकेवरील सुनावणीसाठी जावे लागल्याने संबंधित अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीमध्ये उपस्थित राहता येत नसल्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले आहे असे कार्यालयाने निदर्शनास आणले. या संदर्भात असे सांगावयाचे आहे की, बऱ्याचदा असे दिसून येते की, ज्या दिवशी समितीची बैठक असते, त्याच दिवशी कोर्टामध्ये सुनावणीदेखील असते. त्यामुळे अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीस उपस्थित राहता येत नाही. समितीने बैठकीची पुढील तारीख जरी दिली तरी, त्यावेळेसही असे होणार नाही याची खात्री नसते. त्यामुळे अशाप्रकारे वारंवार तारखा दिल्यावरही समितीचे कामकाज होत नाही. अधिकाऱ्यांना न्यायालयामध्ये सुनावणीकरिता जावे लागते व त्यासाठी त्यांनी गेले पाहिजे हे जरी बरोबर असले तरी, समितीला देखील घटनात्मक अधिकार आहेत व समितीचे कामकाजही झाले पाहिजे. त्यामुळे **अधिकाऱ्यांना समितीची बैठक व सुनावणी करीता उपस्थित राहता यावे यासाठी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करणे आवश्यक आहे. जसे की, जर प्रथम समितीच्या बैठकीची नोटीस मिळाली असेल तर, प्रथम समितीच्या बैठकीस हजर राहणे इत्यादी. याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा, अशी समितीची सूचना आहे. याबाबत, अधिकाऱ्यांना समितीची बैठक**

व सुनावणी यांस उपस्थित राहता यावे या करता प्रथम कोणत्या बैठकीस प्राधान्य देण्यात यावे याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून काही मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात यावीत अशी समिती शिफारस करीत आहे.

(६) आठवा अहवाल (२०१३-२०१४) :– (i) जिल्हा परिषदेने ग्राम पाणीपुरवठा समितीला कामांचे संपूर्ण अधिकार दिलेले आहेत, परंतु जबाबदारी काहीही ठेवलेला नाही. सरपंचांना या समितीचे अध्यक्ष नेमले पाहिजे. मध्यंतरी ग्रामसेवकांना सचिव नेमण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. ग्रामसेवक शासकीय कर्मचारी असल्याने जबाबदारीने काम करु शकतात परंतु ते परिपत्रक आता रद्द केले आहे. ठाणे जिल्ह्यातील अपूर्ण असलेल्या १४५५ नळ पाणीपुरवठा योजनांपैकी २१४ योजना पूर्ण झाल्या आहेत. परंतु आदिवासी उपयोजना क्षेत्रात नळ पाणीपुरवठा योजनांची २१४ कामे पूर्ण झाले असतील असे वाटत नाही. **पूर्ण झालेल्या कामांची तपासणी उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(ii) आदिवासी जमातीच्या लोकांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुलाबाबत लाभार्थ्यांना शासनातर्फे जे काही अनुदान दिले जाते. त्यामध्ये घरकुलासाठी देय अनुदानापेक्षा किती जादा रक्कम खर्च करावयाची हे लाभार्थी ठरवतो. घरकुल योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोठे घर बांधावयाचे असल्यास घराचे मूल्यांकन करून त्याला देय असलेले पैसे दिले जावेत. इंदिरा आवास योजनेंतर्गत जी घरकुले बांधली जातात त्यांची जिल्हा परिषदेच्या संबंधित यंत्रणेच्या अभियंत्याकडून तपासणी केली जाते व बांधकामाच्या टप्प्यानुसार लाभार्थ्यांना पैसे दिले जातात. आदिवासी विकास विभागात घरकुल योजने अंतर्गत बांधकाम अभियंत्याची व्यवस्था केलेली नाही. लाभार्थी स्वत: घर बांधत असताना त्याला शासनाच्या वतीने अभियंत्याचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले तर त्याच्या घराचे बांधकाम चांगल्या प्रकारे होईल. **आदिवासी विभागातंर्गत घरकुलांच्या बांधकामासाठी शासनाने स्वतंत्र तांत्रिक बांधकाम यंत्रणा निर्माण केल्यास आदिवासी भागातील लाभार्थ्याच्या घराचे बांधकाम चांगल्या प्रकारे होईल त्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(७) पहिला अहवाल (२०१५-२०१६) :- सन १९९५ नंतर सेवेत रुजू झालेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना सेवेत संरक्षण नसतानादेखील बरेचसे कर्मचारी सेवेत रुजू झाल्यानंतर शासन निर्णयान्वये सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत अशा कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्याप्रमाणात असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई केल्यास सदर कर्मचारी न्यायालयात याचिका सादर करतात म्हणजेच समितीच्या मते न्यायालयात जाणारे कर्मचारी बिगर आदिवासी आहेत असे म्हणण्यास पुरेसा वाव आहे. न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे आदिवासी जमातीची जागा रिक्त होत नाही.

समितीच्या मते, अनुसूचित जमाती प्रवर्गातून शासकीय/निमशासकीय सेवेत रुजू झालेल्या बरेचसे कर्मचारी बोगस म्हणून कार्यरत असून बोगस कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्याप्रमाणात असतांना सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजीचा निर्गमित करण्यात आलेला शासन परिपत्रक एक प्रकारे मूळ आदिवासी असलेल्या लोकांवर अन्याय करणारा आहे परिणामी पात्र आदिवासी अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती मिळू शकत

नाही. याबाबत शासन निर्णयामध्ये तरतूद करण्याऐवजी कोणतीही तातडी नसतांना शासनास दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये बिगर आदिवासी कर्मचाऱ्यांनी संरक्षण देऊन मूळ आदिवासी जमातीतील कर्मचाऱ्यांवर अन्याय केलेला आहे. सबब, **आदिवासी प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची शासकीय/निमशासकीय सेवेत बिंदूनामावली प्रमाणे नियुक्ती होण्यासाठी व बिगर आदिवासींना सदर शासन परिपत्रकामध्ये देण्यात आलेले गैरवाजवी संरक्षण काढून घेण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे शासन परिपत्रक तात्काळ रद्द करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

(८) दुसरा अहवाल (२०१६-२०१७) :– केंद्र शासनाची इंदिरा आवास योजना मागील २५ वर्षांपासून राज्यात कार्यान्वित आहे. आदिवासी लोकांसाठी शबरी घरकुल योजना राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येत आहे. ही सर्व कामे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून राबवित असताना इंदिरा आवास घरकुल शक्यतो द्रारिद्र्यरेषेखालील (BPL) कार्डधारक लोकांना दिली जाते. तर आदिवासी भागातील द्रारिद्र्यरेषेवरील (APL) कार्डधारकांना शबरी घरकुल योजनेतून लाभ दिला जातो. शासन लवकरच घरकुल प्रकरणी नवीन धोरण आखणार आहे. या नवीन घरकुल योजनेमध्ये दारिद्रयरेषेखालील (BPL) कार्डधारकांसमवेत दारिद्रयरेषेवरील (APL) कार्डधारकांचा समावेश केल्यास आदिवासी लाभार्थ्यांना त्यांचा लाभ घेता येईल. सबब, **समितीच्या सुचनेनुसार द्रारिद्र्यरेषेवरील** (APL) **कार्ड धारकाच्या व्याखेत असलेल्या तांत्रिक अडचणी प्रकरणी लवकरातलवकर निर्णय घेण्यात यावा व इंदिरा आवास योजनेतून आदिवासी भागातील द्रारिद्र्यरेषेवरील** (APL) **कार्डधारकांना घरकुल मंजूर करण्याची कारवाई करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(९) तिसरा अहवाल (२०१६-२०१७) :– व्यवसायभिमुख शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विशेषत: वैद्यकीय शिक्षण आणि अभियांत्रिकी शिक्षणाकरिता महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. या विद्यार्थ्यांपैकी बऱ्याचशा विद्यार्थ्यांना वेळेवर जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे त्यांना व्यवसाय शिक्षणाच्या प्रवेशापासून वंचित रहावे लागते. **जातवैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थी वंचित राहू नये याबाबत राज्यातील विभागनिहाय आयुक्तस्तरावरुन आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत भागात अनुसूचित जमाती जात पडताळणी समितीकडून व्यवसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वीच "विशेष शिबीर" घेऊन या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एका महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, जेणे करून या घटकातील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाहीत, अशी समितीची शिफारस आहे.**

(१०) पाचवा अहवाल (२०१६-२०१७) :- जिल्हा परिषद कार्यालयाने ३६ शाळांचे प्रवेश निर्गम नोंदवहीची तपासणी केली असता जातीच्या रकान्यात मोठ्याप्रमाणात खाडाखोड करण्यात आली आहे. शाळांच्या रजिस्टरमध्ये

केलेली खाडाखोड हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे. त्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे दस्ताऐवज प्रथमतः तपासून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच नांदेड जिल्ह्यामध्ये शाळेतील दस्ताऐवज मोठ्याप्रमाणात जाळल्याची प्रकरणे उघडकीस आलेली आहे. शासनाकडून जिल्हाधिकारी यांना या सर्व प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आधिकारीस्तरावर समिती नेमून अहवाल सादर करण्याची सूचना दिली आहे. **त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी प्राथमिक चौकशी अहवाल लवकरातलवकर प्राप्त करून घेण्यात यावा व अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाईसाठी 'एसआयटी' यंत्रणेकडे सुर्पूद करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

(११) सहावा अहवाल (२०१७-२०१८) :- जिल्हा परिषद कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात कार्यरत असलेले श्री. बी. आर सिंग यांची अनुसूचित जमातीच्या बिंदूवर बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे सन १९९४ मध्ये वरिष्ठ सहाय्यक पदावर नियुक्ती झालेली आहे. त्यांना सेवेत संरक्षण असले तरी, त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नसताना त्यांना अनुसूचित जमातीच्या बिंदूवर ऑगस्ट, २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्यात आली आहे. पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र ऑक्टोबर, २०१५ मध्ये अवैध ठरविले असता त्यांची पदोन्नती काढून घेण्यात आली व त्यांना खुल्या प्रवर्गात दर्शवून ज्येष्ठतेनुसार ऑगस्ट, २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा ऑगस्ट, २००८ मध्ये दुसऱ्यांदा पदोन्नती देण्यात आली आहे. श्री. सिंग यांनी सन २०१३ मध्ये इतर मागासवर्गाचे प्रमाणपत्र सादर केले त्यानंतर अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला.

समितीच्या मते जात वैधता प्रमाणपत्र वैध-अवैध होणे हा नंतरचा भाग आहे परंतु सन २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्याच्या पूर्वी शासन निर्णयान्वये अन्य भागास प्रवर्गातील प्रमाणपत्र सादर करून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करणे आवश्यक होते परंतू त्यावेळी अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त झाला नाही. सबब, **समिती शिफारस करते की, याप्रकरणी चौकशी करून जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी तसेच श्री. सिंग यांनी कार्यालयाची वारंवार दिशाभूल केलेली असल्याने या प्रकरणी चौकशी करून त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

तसेच श्री. सिंग यांची अनुसूचित जमाती प्रवर्गातून प्रथम सेवेत नियुक्ती झाली असल्याने अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला नाही. सन २०१३ मध्ये बिंदू रिक्त केलेला असून त्या कालावधीपर्यंत त्यांना २००४, व सन २००८ या कालावधीत दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त न करता खुल्या प्रवर्गातून दोनदा पदोन्नती देण्यात आली आहे. सबब **श्री. सिंग यांना पदोन्नतीच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अधिक आर्थिक लाभाची वसुली करण्याबाबतची कारवाई करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

(१२) सातवा अहवाल (२०१७-२०१८) :- (i) **जात प्रमाणपत्र पडताळणी :–** जिल्हाधिकारी पुणे यांच्या कार्यालयातील सन २०१६ ते २०१८ या कालावधीतील अधिकारी व कर्मचारी यांची बिंदूनामावली तपासणे, जात प्रमाणपत्र तपासणी, सरळसेवा व पदोन्नतीने करावयाची नियुक्ती या सर्व बाबीमध्ये मोठ्याप्रमाणात अनियमितता, विलंब व गोंधळ असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे विशेषतः बिंदूनामावली व जात प्रमाणपत्र तपासणी आणि त्याआधारे द्यावयाच्या नेमणुका याबाबत एकसूत्रीपणा येणे अत्यंत आवश्यक आहे.

सन १९९५ पूर्वीच्या व सन १९९५ नंतरच्या भरतीसाठी दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. परंतु या शासन निर्णयाचे राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासह इतर महत्वाच्या आस्थापनांमध्ये पूर्णपणे पालन झाल्याचे कुठेही आढळून येत नाही. दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या निर्णयाची कठोरपणे अंमलबजावणी न झाल्यामुळे अनेक अधिकारी व कर्मचारी मा.न्यायालयात प्रकरण नेऊन वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्याची वृत्ती मोठ्याप्रमाणात वाढली आहे. त्यातच यासंदर्भात शासन अनेकदा वेगवेगळे निर्णय किंवा परिपत्रके पारित करीत असल्यानेही विलंब होतो. या विलंबामुळे पात्र उमेदवारास संधीपासून वंचित राहावे लागते. यासाठी **अशा प्रकरणांबाबत शासनाने मुंबई उच्च न्यायालयात विशेष सरकारी वकील नेमून प्रकरणे निकाली काढण्यासाठी त्वरीत निर्णय घ्यावा. तसेच यामध्ये काही त्रुटी असल्यास संबंधीत कर्मचाऱ्यांस त्या तात्काळ पुर्ण करण्यास पाठपुरावा करावा. अशी प्रकरणे न्यायालयात नेऊन वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्याच्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांच्या वृत्तीस आळा घालण्यासाठी उपाययोजना आखून दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आदिवासी विकास विभाग, महसूल विभाग व सामान्य प्रशासन विभागाने एक परिपूर्ण प्रस्ताव तयार करून धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी समितीने शिफारस केली आहे.**

(*ii*) सबलीकरण व स्वाभिमान योजनाः- भूमिहीन दारिद्रयरेषेखालील आदिवासींसाठी सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यासाठी शासनातर्फे जमिनी देण्यात येतात. अशाच प्रकारची योजना समाजिक न्याय विभागामध्ये राबविण्यात येते. ही योजना राबवितांना त्याचे वेगळे निकष आहेत त्यामुळे **या योजनेमध्ये समानता व सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने भुसंपादन अधिग्रहण कायदयांच्या प्रक्रियेचा अवलंब करून भूमिहीन आदिवासींसाठी ही योजना राबविण्याच्या दृष्टीने आदिवासीं विभाग व महसूल विभागाने धोरणात्मक निर्णय घेऊन समितीस ३ महिन्यात माहिती सादर करावी अशी शिफारस ही समिती शासनास करीत आहे.**

(*iii*) आदिवासींसाठी राबवावयाच्या घरकुल योजना :- घरकुल योजनांसाठी १५ वर्षांपूर्वी फक्त २८ हजार ५०० रुपये मिळत होते. आता त्याच घरांसाठी सुमारे दीड लाखांपर्यंत निधी दिला जातो. पूर्वी बांधलेली घरे कच्च्या मातीची असल्याने ती जीर्ण व मोडकळीस आलेली आहेत, त्या घरांना दुबार लाभ देण्यात येत नाही. मात्र १५ वर्षांपूर्वीच्याच शाळा किंवा सरकारी इमारतींच्या दुरुस्तीसाठी मुबलक निधी दिला जातो. हा विरोधाभास आहे. सबब, **१५ वर्षांपूर्वी उक्त योजनांतर्गत बांधलेल्या कच्च्या घरांच्या लाभार्थ्यांना पुन्हा लाभ देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने राज्य व्यवस्थापन कक्षाकडे प्रस्ताव पाठवून धोरणात्मक निर्णय घ्यावा व घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी, अशी शिफारस ही समिती शासनास करीत आहे.**

(*iv*) घोडेगाव प्रकल्पातंर्गत येणाऱ्या नामांकित शाळा :- आदिवासी विकास विभागाकडून नामांकित शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करण्यात येतो. तथापि, त्या पैशाचा संस्थाकडून आदिवासी विद्यार्थ्यांवर योग्य विनियोग न करता दुरुपयोग केला जातो. त्याच पैशाचा आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर वापर केला तर त्याचा सदूपयोग झाल्यासारखे होईल. नामांकित शाळेबाबत संस्थांची मनमानी चालू राहिली तर विद्यार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान बंद करून आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत प्रवेश न देता आदिवासी आश्रमशाळेतच प्रवेश देण्याच्या निर्णयापर्यंत समिती आली आहे. दिनांक २५ एप्रिल, २०१८ व १९ जून, २०१८ रोजी

समितीने घेतलेल्या विभागीय साक्षीच्यावेळी नामांकित शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना वेगळयावर्गात बसवून शिक्षण दिले जाते. त्यांना वेगळे बसवून जेवण दिले जाते. आदिवासी मुलांना बिगर आदिवासी मुलांबरोबर राहून जेवण करणे, शिक्षण घेणे, या गोष्टी पासून दूर ठेवले जाते.

आश्रमशाळांसाठी वेगळे आणि नामांकित शाळांसाठी वेगळे निकष शाळा संस्थाकडून लावले जातात. आणि त्याला संबंधित विभागाची ही साथ असते. आदिवासी विद्यार्थी आणि बिगर आदिवासी विद्यार्थी यांच्यामध्ये दुजाभाव होत असल्याचे असे समितीच्या निदर्शनास आले आहे. म्हणून **समिती अशी शिफारस करीत आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांबरोबर दुजाभाव केल्यास नामांकित शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी तसेच नामांकित शाळेला मान्यता देताना त्याशाळेमध्ये उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुल्यांकनाचे निकष अधिक कठोर करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा व घेतलेल्या निर्णयांची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

(*ט*) ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजना :- ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजनेसाठी आदिवासी विकास विभागाकडून मोठ्याप्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो या योजनेअंतर्गत सामाजिक सभागृह, रस्त्याचे काँक्रिटीकरण, ग्राम सचिवालय, पाणी, वीज, किंवा सभामंडप इ. कामे जातात. ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमातर्गंत आदिवासी उपयोजना क्षेत्रात करावयाच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत परंतु या कामांसाठी आदिवासी विकास विभागाकडून शासनाच्या यंत्रणांना निधी पुरवला जातो मात्र प्रशासकीय मंजुरीचे अधिकार विभागाला नाहीत असे समितीस भेटीच्या व साक्षीच्यावेळी आढळून आले आहे **यास्तव ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना मंजूर करण्याचे अंतिम अधिकार हे अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे असावेत तसेच याबाबतचा निधी खर्च करण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी निश्चित करण्याबाबत शिफारस केली आहे.**

(१३) आठवा अहवालः-(२०१७-२०१८) :- सिंधुदूर्ग जिल्हापरिषदेमार्फत जननी सुरक्षा, सावित्रीबाई कन्या योजना या योजनांसह शालेय विदयार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशाचे वाटप करण्यात येते. सर्व शिक्षा अभियानातंर्गत विद्यार्थ्यांना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन १ रुपया दराने २२० दिवस उपस्थिती भत्ता देण्याची योजना आहे. **विद्यार्थ्यांना देण्यात येणारा सदर भत्ता हा फारच कमी तो वाढविण्याची आवश्यकता असल्याने सदर उपस्थिती भत्ता १० रुपये प्रतिदिन करण्यात यावा. तसेच जननी सुरक्षा व सावित्रीबाई कन्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात अशी समितीची शिफारस आहे.**

(१४) दहावा अहवालः-(२०१७-२०१८) :- ठाणे जिल्हापरिषदेत सॅम व मॅम बालकांची संख्या २१४ इतकी असून त्यापैकी ११३ बालकांचे श्रेणीवर्धन झाले आहे. सद्यस्थितीत १०१ बालके सॅम व मॅम मध्ये असल्याचे सन २०१६ मध्ये दिलेल्या भेटीच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले. पण त्यानंतर याबालकांना वेळीच रुग्णालयात दाखल करून त्याच्यामध्ये सुधारणा घडवून आण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेने केल्याचे दिसून येते. तसेच डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम योजनेद्वारे स्तनदा मातांना पुरविण्यात येणाऱ्या आहारासाठी २५ रुपये दिले जातात. यामध्ये लाडू, अंडी व केळी यासह चौरस आहार देणे आवश्यक आहे. परंतू खर्चाचे प्रमाण वाढले असून अनुदान वाढवून देण्याची गरज आहे. **जिल्हा परिषदेतर्फे पुरविण्यात येणारा अतिरिक्त आहार तसेच डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम योजनेद्वारे पुरविण्यात येणारी केळी, अंडी, दूध व इतर आहारासाठी लागणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात यावी. तसेच बालकांसाठी**

लागणाऱ्या आहाराचा मुबलक प्रमाणात पुरवठा करून बालकांच्या श्रेणीवर्धनाबाबत उपाययोजना करण्याची शिफारस आहे.

(१५) अकरावा अहवालः-(२०१७-२०१८) :- (i) अनुसूचित जमाती कल्याण समितीने केलेल्या पाहणी दौऱ्यात विभागाच्या अनेक आश्रमशाळा बंद/ समायोजीत करून या शाळेतील विद्यार्थी नामांकित शाळेत पाठविण्यात येत असल्याचे समितीस आढळून आले. राज्यातील अनेक नामांकित शाळांसह पाचगणी येथील रोझलँड इंटरनॅशनल शाळेमध्येही नामांकितचे निकष पूर्ण केले जात नाहीत. तेव्हा नामांकित शाळेमध्ये असणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, आरोग्यमान यामध्ये सुधारणा झाली आहे किंवा नाही याचा आढावा दर तीन महिन्यांनी आयुक्त कार्यालयातर्फे घेण्यात यावा या नामांकित शाळांचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य विषयक सुविधा व या शाळामध्ये नेमणूक केलेल्या शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा, प्रयोगशाळा सहाय्यक व विज्ञानाचे शिक्षक इत्यादी निकषांचे परिक्षण न करता नामांकित शाळांना दर्जा देण्यात येत असल्याने मुलांच्या शिक्षणावर याचा विपरित परिणाम होत आहे. काही शाळांमध्ये तर क्रिडांगणाची व खेळाच्या साहित्यांची सुविधा नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **सबब, नामांकित शाळांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक दर्जा, आरोग्यमान यासह सर्वांगिण प्रगती झाली आहे किंवा नाही याची दर तीन महिन्यांनी तपासणी करून आढावा घ्यावा, तसेच शासकीय आश्रमशाळा बंद न करता आदिवासी विद्यार्थ्यांनी इतर विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धेत टिकून राहावे यासाठी या आश्रमशाळांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे विद्यार्थी संख्या कमी असल्यास त्या आश्रमशाळा समायोजित करून आदिवासी विकास विभागाने आपल्या खात्यामार्फत चालविण्यासाठी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी शासनास शिफारस आहे.**

(ii) आदिवासीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाच्या निधीचा विनियोग करणेबाबत :– जिल्हा परिषदाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध यंत्रणा व राज्य शासनाच्या जिल्हास्तरावर असणाऱ्या यंत्रणांना आदिवासी विकास विभाग, केंद्र शासनाच्या विविध योजना तसेच चौदाव्या वित्त आयोगाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. सदर निधीचा विनियोग जिल्हा परिषदेच्या व शासनाच्या विविध यंत्रणांनी योग्यरितीने करणे अपेक्षित आहे. तथापि, आदिवासीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर करावयाचा खर्च पूर्णपणे न करता खर्च कमी करण्यात येतो. उर्वरित निधी म्हणजेच अखर्चित निधी संबंधित यंत्रणांकडे वर्षानुवर्ष तसाच ठेवला जातो. संबंधितांकडून निधी अखर्चित राहिल्यास त्यांनी तो निधी प्रकल्प अधिकारी वा अपर आयुक्त यांच्याकडे प्रत्यापित करणे गरजेचे आहे. उक्त निधी त्याच आर्थिक वर्षात संबंधित यंत्रणांकडून खर्च होऊन काम पूर्ण झाले आहे किंवा नाही याचा अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ज्या कामासाठी निधी दिला जातो ते काम त्याच आर्थिर्क वर्षात पूर्ण केल्यास निधी शिल्लक राहणार नाही. परंतु यामध्ये नियोजनाचा अभाव असल्याने निधी मोठ्याप्रमाणात अखर्चित राहतो. निधी उपलब्ध करून दिल्यानंतर त्या निधीचा विनियोग करण्याची सर्व प्रक्रिया संबंधित यंत्रणांकडून पार पाडली जाते किंवा नाही यांची प्रकल्प अधिकारी किंवा अपर आयुक्तांकडून तपासणी केली जात नाही. याशिवाय विभागाकडून पुरविण्यात आलेला निधी संबंधित यंत्रणांकडून खर्च होतो की नाही यांची तपासणी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. आदिवासी विभागातर्फे दर तीन महिन्यांनी उक्त यंत्रणांनी केलेल्या कामांचा तसेच निधी खर्च झाला आहे किंवा नाही याचा आढावा घेणे आवश्यक आहे. सबब, **जिल्हा परिषदेच्या यंत्रणा व जिल्हा स्तरावरील शासकीय यंत्रणा यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कामांवर त्या-त्या**

आर्थिक वर्षात निधी खर्च होऊन काम पूर्ण झाले आहे किंवा नाही याची तपासणी करून त्यावर देखरेख करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(*iii*) आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी स्पर्धापरिक्षा तसेच कौशल्य विकास योजनेतंर्गत प्रशिक्षण देण्याची योजना राबविण्यासाठी मोठ्याप्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यासाठी संबंधित यंत्रणांनी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना योग्य दर्जाचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्पर्धापरिक्षेसाठी प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तके व तद्नंनुषगिक साहित्य व प्रशिक्षण, अपर आयुक्त कार्यालय ठाणे क्षेत्रातंर्गत येणाऱ्या विविध संस्थाकडून देण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तके विद्यार्थ्यांना आश्रमशाळा तसेच वसतीगृहांमध्ये सहज उपलब्ध होतील यादृष्टीने प्रयत्न करावेत जेणे करून मोठ्याप्रमाणात अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शासकीय सेवेत अधिकारी पदावर नियुक्तीस पात्र ठरतील. तसेच परदेशी शिष्यवृततीसाठीही त्याचा उपयोग होईल. आदिवासी विभागातर्फे पुरविण्यात येणारी परदेशी शिष्यवृत्तीची रक्कम फारच तुटपुंजी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. परदेशी शिष्यवृत्तीसाठी पाठवावयाच्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्यादेखील कमी असते. म्हणून **परदेशी शिष्यवृत्तीसाठी पाठवावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या व अनुदानात शासनाने वाढ करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(*iv*) राज्यातील अपर आयुक्त, कार्यालयातंर्गत येणाऱ्या प्रकल्प कार्यालयामधील प्रकल्प अधिकारी पदांवर पूर्ण वेळ प्रकल्प अधिकाऱ्यांची नेमणूक न करता त्याच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे अनेकदा समितीच्या बैठकीस सदर अधिकाऱ्यांना उपस्थित राहता येत नाही. उक्त अधिकारी भारतीय प्रशासन सेवेतील असल्याने त्याना महसूल विभागाच्या कामाचादेखील अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे विभागाचे कामकाज करणे अडचणीचे ठरत आहे. वास्तविक पाहता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे आदिवासींसाठी राबवावयाच्या कल्याणकारी योजना व त्या योजनेव्दारे आदिवासीचा विकास व प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झाले आहेत. हा विभाग म्हणजे आदिवासींच्या जिव्हाळयाचा भाग असून समितीने वारंवार ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तरीदेखील पूर्ण वेळ प्रकल्प अधिकारी पदांवर आय.ए.एस अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली नाही. सबब, **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयातील प्रकल्प अधिकाऱ्यांची लवकरात-लवकर पूर्ण वेळ अधिकारी म्हणून नेमणूक करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(*v*) आदिवासी विकास विभागातर्फे शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जेवण उपलब्ध करून देण्यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकगृहांची निर्मिती करण्यात आली आहे. या मध्यवर्ती स्वयंपाकगृहांतर्फे आसपासच्या आश्रमशाळांना पुरविण्यात येणारे जेवण वेळेत पोहचत असल्याने ते जेवण ताजे असते. परंतु काही आश्रमशाळा खूप दूरच्या अंतरावर असून त्या डोंगराळ भागात आहेत. त्यामुळे तेथे वेळेत जेवण पोहचविणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना ताजे जेवण मिळत नाही. यासाठी पर्याय म्हणून शाळेच्या आसपासच्या गावातील महिला बचत गटांना जेवण पुरविण्याचे कंत्राट दिल्यास तेथील महिलांना रोजगार उपलब्ध होईलच, त्याचबरोगर शाळेतील मुलांना ताजे व गरम जेवण वेळेवर मिळण्यास मदत होईल. म्हणून **डोंगराळ भागातील आश्रमशाळांना जेवण पुरविण्याचे कंत्राट त्या त्या गावातील महिला बचत गटांना देण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

*****

(९) विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

(Committee on Welfare of Vimukta Jatis and Nomadic Tribes)

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३३५ मध्ये "संघराज्य किंवा राज्य" यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यामधील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेतले जातील आणि अनुच्छेद १६ (१) मध्ये राज्याच्या अखत्यारीतील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल अशी तरतूद आहे. असे असले तरी संविधानाच्या अनुच्छेद १६ (४) मध्ये कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही अशीदेखील स्पष्ट तरतूद आहे.

संविधानातील वरील तरतुदी आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या सर्वांगिण विकासाबाबत शासनाने ज्या सोयी सवलती उपलब्ध केलेल्या आहेत, त्या प्रत्यक्षात त्यांना मिळतात किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी तसेच त्या वर्गाच्या कल्याणाच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी लोकसभेने व इतर काही राज्यांच्या विधिमंडळानी निर्मित केलेल्या संसदीय समितीच्या धर्तीवर महाराष्ट्र विधानमंडळातही अशी समिती स्थापन करण्याचा प्रश्न विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक ३० एप्रिल, १९७१ रोजी विधानसभेत आणि दिनांक ४ मे, १९७१ रोजी विधानपरिषदेत एक प्रस्ताव पारित करण्यात येऊन महाराष्ट्र विधानमंडळात दिनांक ६ मे, १९७१ रोजी **अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समिती** अस्तित्वात आली.

सदर समितीच्या कार्यकक्षेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचार व त्यासंबंधी करावयाच्या प्रयत्नांची मीमांसा तसेच या जाती जमातीकरिता कल्याणकारी योजनांचा विचार, त्यांच्या शैक्षणिक विकासाचा प्रश्न, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसंकल्पात करावयाच्या तरतुदी, त्यांना सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी अनुदानावर चालणाऱ्या इतर संस्था यात शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे जागांचे आरक्षण, पदोन्नतीसंबंधीचे त्यांचे प्रश्न इत्यादी बाबी आणण्यात आल्या, मे, १९७१ मध्ये अस्तित्वात आलेल्या या समितीच्या कार्यकक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमातींचा जरी अंतर्भाव असला तरी या समितीच्या नावावरून तसा स्पष्ट बोध होत नव्हता. **त्यामुळे सन १९७३ मध्ये दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावानुसार सदरहू समितीचे नाव "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" असे करण्यात आले.**

सन १९७९ पर्यंत सदर समिती कार्यरत होती. परंतु अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या विकासासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता वाटल्यामुळे दिनांक ११ ऑगस्ट, १९७९ रोजी "अनुसूचित जमाती कल्याण समिती" अशी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली. त्यानंतर सन १९८१ मध्ये अनुसूचित जाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या विकासासाठी स्वतंत्र समित्या निर्माण करण्याची आवश्यकता वाटल्यामुळे विधानसभा व विधानपरिषद नियमात योग्य तो बदल करण्यात येऊन, **दिनांक ८ मे १९८१ रोजी "अनुसूचित जाती कल्याण समिती" आणि दिनांक २३ जुलै, १९८१ रोजी "विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" अशा दोन स्वतंत्र समित्या गठीत**

करण्यात आल्या. विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती स्वतंत्रपणे गठीत केली त्यावेळी समितीची सदस्य संख्या ७ होती (५ विधानसभा सदस्य व २ विधानपरिषद सदस्य). तथापि, माहे मार्च, २००९ मध्ये विधानसभा व विधानपरिषद नियमांमध्ये बदल करण्यात आला व त्यानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची सदस्य संख्या ७ ऐवजी १५ करण्यात आली. त्यापैकी ११ सदस्य माननीय अध्यक्ष, विधानसभेच्या सदस्यांतून तर ४ सदस्य मा. सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांतून नामनिर्देशित करतात. या समितीचा कालावधी हा सर्वसाधारणपणे एक वर्षाचा असतो.

समितीची रचना :- (म.वि.स. नियम २३७(१) व म.वि.प. नियम २१४)

दरवर्षी विधानसभेच्या प्रथम अधिवेशनाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिति सार्वत्रिक निवडणुकीनंतर अस्तित्त्वात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर " विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती " नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात येते. या समितीत एकूण १५ सदस्य असतील. त्यापैकी ११ सदस्य माननीय अध्यक्ष, विधानसभेच्या सदस्यांतून नामनिर्देशित करतात तर ४ सदस्य मा. सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांतून नामनिर्देशित करतात.

या समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील. सर्वसाधारणपणे हा कालावधी एक वर्षाचा असतो.

समितीची कामे (म.वि.स. नियम २३८) :-

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करून त्याबाबतचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(दोन) राज्य शासनाच्या सेवेत शासनाच्या नियंत्रणाखालील पदांवर सरकारी क्षेत्रातील उपक्रम, सांविधानिक आणि निमशासकीय संस्था यांतील नेमणुका धरून विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळवून देण्याकरिता शासनाने केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे.

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारण विचारविनिमय करून त्याबाबत दोन्ही सभागृहांना अहवाल सादर करणे.

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना अवगत करणे.

(पाच) सभागृहाने किंवा मा. अध्यक्षांनी समितीकडे विशेषकरून निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती संबंधित विभागामार्फत उपलब्ध करून घेतली जाते. सर्वसाधारणपणे समितीच्या प्रारंभिक बैठकीमध्ये अथवा त्यानंतर होणाऱ्या बैठकीमध्ये समितीसमोर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो व त्या आधारे कोणते विषय अग्रक्रमाने विचारात घेऊन कामकाज करावयाचे याबाबतचा निर्णय समितीमध्ये सर्वानुमते घेतला जातो. त्यानुसार वर्षभरात समिती आपले कामकाज करून त्याबाबतचे आपले अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करीत असतात.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती स्वतंत्रपणे अस्तित्वात आल्यापासून (दिनांक २३ जुलै, १९८१ रोजीपासून) समितीने [आतापर्यंत म्हणजे] जुलै, २०१९ पर्यंत एकूण ६८ अहवाल सभागृहाला सादर केले आहेत.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

(१) **पाचवा अहवाल (सन २०१२-१३) - (बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी / कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनासंबंधी.) :-** मुंबई महानगरपालिकेकडे जात वैधता प्रमाणपत्र सादर न करण्यात आलेल्या प्रलंबित प्रकरणांची संख्या १८३ होती त्यानंतर या प्रकरणांची संख्या आता ८३ वर आलेली आहे. ४२ उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची ६ महिन्यांची वेळ निघून गेल्यानंतरही प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अशा प्रकारे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या मुदतीचे पालन न केल्यास बोगस उमेदवार वर्षानुवर्षे वंचितांच्या पदावर काम करून अन्याय करीत असतात ही बाब योग्य नसल्याचे मत समितीने व्यक्त केले. वास्तविक पाहता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ३ डिसेंबर, २०११ रोजीच्या काढलेल्या परिपत्रकानुसार नोकरीवर रुजु झालेल्या उमेदवाराने ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे क्रमप्राप्त आहे. काही प्रकरणांमध्ये जात वैधता प्रमाणपत्रे मिळण्यामध्ये जास्त तांत्रिक अडचणी येत असतील तर या संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी त्यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, नगरविकास विभाग अशा संबंधित अनेक विभागांनी या संदर्भात एकत्रित प्रस्ताव तयार करून माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या पातळीवर पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा खरोखर वंचित आदिवासी व इतर जाती जमातीवर अन्याय होण्याची शक्यता आहे. जात वैधता प्रमाणपत्र संदर्भातील कायदा बनविण्यामागे शासनाचा हेतूच हा होता की, खरोखर पाड्या व तांड्यातील जमातींवर अन्याय न होता त्यांना त्याच्या न्याय हक्काचा वापर करण्याची मुभा मिळावी. तसेच उमेदवाराने ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्या उमेदवारावर कोणती कार्यवाही करावी याबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून कोणतेही स्पष्ट आदेश नाहीत. काही प्रकरणामध्ये जात पडताळणी समितीकडून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त होत नाहीत. अशा प्रकरणामध्ये ६ महिन्याच्या आत संबंधित कर्मचाऱ्याला सेवेत सातत्यिक (Continue) ठेवण्यात यावे किंवा कसे याबाबतचे निर्देश आवश्यक आहेत. हा प्रश्न फक्त मुंबईमहानगरपालिकेपुरता मर्यादित नाही तर अनेक शासकीय कार्यालयांमध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे. **उमेदवाराने ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर संबंधित विभागाने काय करावे, याबाबत सामान्य प्रशासन विभागाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. उमेदवाराने ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्या उमेदवाराला नोकरीत ठेवावयाचे किंवा नाही याबाबत सामान्य प्रशासन विभागाने धोरणात्मक निर्णय घेऊन त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यांत कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) **दुसरा अहवाल (सन २०१५-१६) - (जिल्हा परिषद, भंडारा यांच्या सेवेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनासंबंधी.):-** राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळांची संख्या वाढविण्यात आली तर विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यार्थ्यांना ते लाभदायक होईल. राज्यभरामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या अनुदानित वसतिगृहांची असलेली गरज व याचा लोकसंख्यानिहाय अभ्यास होणे आवश्यक आहे. या अभ्यासातून वस्तुस्थिती शासनाच्या समोर आली तर त्यावर साकल्याने विचार होईल. **राज्यभरातील सर्व जिल्ह्यांमधील जातनिहाय जनगणनेची माहिती समितीला प्राप्त झाली तर त्यावर विचार करणे सुकर होईल. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचा जातीनिहाय सर्वेक्षण होत नाही तोपर्यंत विमुक्त जाती व भटक्या जमातीची अचूक आकडेवारी समजणार नाही. विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून प्रवर्गाची आकडेवारी बनविण्याचा प्रयत्न केला गेलेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अतः विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

*****

(१०) महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती

(Committee on Rights and Welfare of Women and Child)

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये **दिनांक ८ मार्च, १९९६** रोजी संमत केलेल्या "ठरावानुसार महिलांच्या हक्कासंबंधी **" पार्लमेंटरी कमिटी ऑन दि एम्पॉवरमेंट ऑफ वुमेन "** (Parliamentary Committee on Empowerment of Women) अशी संसदीय समिती दिनांक २९ एप्रिल, १९९७ पासून अस्तित्वात आली आहे. ही संसदीय समिती आपल्या कार्यपद्धतीच्या नियमानुसार केंद्र शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या महिलांच्या विषयासंबंधी विचार करते. परंतु महिलांचे हक्क व कल्याण याबाबतीत राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेल्या बाबींच्या संदर्भातदेखील विचार करणे आवश्यक आहे, ही बाब तत्कालीन लोकसभेचे मा. अध्यक्ष, श्री. पी. ए. संगमा यांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून राज्य विधानमंडळामध्ये देखील महिलांच्या कल्याणासंदर्भात स्वतंत्र संसदीय समिती गठीत करण्याबाबत अपेक्षा व्यक्त केली होती. मा. अध्यक्ष, लोकसभा यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार महाराष्ट्र विधानमंडळाची अशा प्रकारची स्वतंत्र समिती गठीत करण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत अनुक्रमे दिनांक २० एप्रिल, १९९८ रोजी व दिनांक २१ एप्रिल, १९९८ रोजी मा. संसदीय कार्य मंत्री यांनी मांडलेले प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आले.

स्त्रियांना समाजात, सुयोग्य दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेऊन स्त्रियांना शैक्षणिक व वैधानिक संस्था तसेच, अन्य क्षेत्रात पर्याप्त प्रतिनिधित्वाची संधी मिळते किंवा कसे याबाबत सखोल अभ्यास करणे, स्त्रियांना सर्व क्षेत्रात पर्याप्त समान संधी उपलब्ध करून देण्याबाबत उपाययोजना सुचविणे, तसेच, स्त्रियांच्या हितासंबंधी शासकीय पातळीवर अंगीकृत केलेल्या धोरणांची अंमलबजावणी होते किंवा कसे याची तपासणी करून उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावाच्या

आधारे महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेच्या नियमात योग्य ते बदल करून **दिनांक १ मार्च, १९९९** रोजी **" महिलांचे हक्क व कल्याण समिती "** या नावाने एक स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली. *दिनांक २२ मार्च, २०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या कार्यकक्षेत बदल करुन त्यात " बालकांचे " या शब्दाचादेखील समावेश करण्यात आला असून सदर समितीचे नामाभिधान आता **" महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती "** असे करण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र विधानसभा नियमात सुधारणा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम क्रमांक २४३ व २४४ मध्ये समितीची रचना आणि समितीची कामे यासंबंधी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे :-

समितीची रचना (महाराष्ट्र विधानसभा नियम २४३) :-

(१) प्रत्येक वर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा व यथास्थिति, नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीची रचना करण्यात येईल.

(२) ही समिती पंधरापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल. यापैकी अकरापेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि चारपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून सभापतीद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील. विधानसभेच्या अकरा सदस्यांपैकी सहा महिला सदस्य असतील व त्यापैकी एक महिला सदस्य समिती प्रमुख राहील.

(३) समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

समितीची कामे (महाराष्ट्र विधानसभा नियम २४४) :-

(१) राज्य महिला आयोगाने सादर केलेल्या अहवालांवर विचार करणे आणि महिलांचा दर्जा व स्थिती सुधारण्याबाबत व त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी, याविषयी दोन्ही सभागृहांना अहवाल सादर करणे;

(२) महिलांना, समाजात समानता, दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी सभागृहाला माहिती देणे;

(३) महिलांच्या कल्याणासाठी शासकीय पातळीवर अंगीकृत केलेल्या धोरणांची व त्यांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी आखण्यात आलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी होते की नाही, याची पाहणी करणे व तत्संबंधी उपाययोजनेसंदर्भात सभागृहाला माहिती देणे;

(४) राज्य शासनाच्या सेवांमध्ये (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधानिक निमसरकारी संस्था यातील नेमणुका धरून) महिलांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे. तसेच तत्संबंधी अंमलबजावणीसंदर्भात उपाययोजना सुचविणे.

**(५) बालकांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण व मूलभूत हक्क इत्यादीकरिता केंद्र शासनाचा बाल न्याय अधिनियम, २०१५ तसेच केंद्र शासनाच्या बालकांचे लैंगिक शोषणापासून प्रतिबंध कायदा (POCSO Act), २०१२ व तदनुषंगिक विहित नियमानुसार राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधात राज्य शासनाने केलेल्या उपाययोजना व अंमलबजावणी संदर्भात दोन्ही सभागृहांना माहिती देणे.

**(६) बालकांच्या विकासासाठी शासकीय पातळीवर अंगीकृत केलेल्या बाल न्याय अधिनियम, २०१५ च्या अनुषंगाने बाल धोरणांची अंमलबजावणी संदर्भात शासनस्तरावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

**(७) राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या बालकांच्या कल्याणार्थ योजनांची तपासणी करून तत्संदर्भात शासनास सुयोग्य उपाययोजना सुचविणे.

**(८) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी/सभापतींनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती संबंधित विभागामार्फत उपलब्ध करून घेतली जाते. सर्वसाधारणपणे समितीच्या प्रारंभिक बैठकीमध्ये अथवा त्यानंतर होणाऱ्या बैठकामध्ये समितीसमोर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो व त्या आधारे कोणते विषय अग्रक्रमाने विचारात घेऊन कामकाज करावयाचे याबाबतचा निर्णय समितीमध्ये सर्वानुमते घेतला जातो. त्यानुसार वर्षभरात समिती आपले कामकाज करून त्याबाबतचे आपले अहवाल सभागृहाला सादर करीत असते.

महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :-

(१) चौथा अहवाल (२०१२-१३) (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष, पदोन्नती तसेच महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणबाबतच्या योजना याबाबत.) :-

(I) राज्यात कुपोषणाच्या संदर्भातील परिस्थिती विचारात घेता प्रामुख्याने ग्रामीण त्यातही आदिवासी भागातील कुपोषित बालकांचा विचार प्रामुख्याने केला जातो. अशा बालकांचे सर्वेक्षणदेखील केले जाते व त्यांना योग्य त्या सोयीसुविधादेखील दिल्या जातात. ग्रामीण क्षेत्रात कुपोषित बालकांच्या योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात, तर नागरी क्षेत्रात आयुक्त, एकात्मिक बाल विकास विभाग यांच्यामार्फत कुपोषित बालकांच्या योजना राबविल्या जात

**महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांकित २२ मार्च, २०१८ या अधिसूचनेव्दारे विधानसभा नियमात " महिला हक्क व कल्याण समिती " ऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " अशी सुधारणा करण्यात आली.*

*** महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांकित २२ मार्च, २०१८ या अधिसूचनेव्दारे विधानसभा नियमात " महिला हक्क व कल्याण समिती " ऐवजी " महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती " अशी नावांत बदल करण्याची सुधारणा करण्यात आली असून त्याप्रमाणे नियम २४३ व २४४ मधील पोट-नियम ४ नंतर पोट-नियम ५, ६, ७ व ८ यांचा नव्याने समावेश करण्यात आला असून त्याप्रमाणे समितीच्या अंतर्गत कामकाजाच्या नियमातदेखील बदल करण्यात आला आहे.*

आहेत. नागरी क्षेत्रातील कुपोषित बालकांसाठी योजना राबविण्यास सध्या कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. विभागीय सचिवांनी समितीसमोर असे सांगितले की, नागरी क्षेत्रात आयुक्त, एकात्मिक बाल विकास विभाग यांच्यामार्फत पर्यवेक्षण करणे आवश्यक आहे. पूर्वी त्यांचे कार्यालय नवी मुंबई येथे होते आता त्यांचे कार्यालय पुणे येथे आहे. महानगरपालिकेकडे ही योजना वर्ग करावी कारण यामध्ये स्थानिक पर्यवेक्षक असणे आवश्यक आहे. ग्रामीण किंवा आदिवासी क्षेत्रामध्येच कुपोषित बालके आहेत असे नाही तर शहरी क्षेत्रातसुद्धा कुपोषित बालके आहेत. **ग्रामीण क्षेत्रात ज्याप्रमाणे कुपोषित बालकांना जिल्हा परिषदेमार्फत संदर्भसेवा पुरविली जाते, त्याचप्रमाणे नागरी क्षेत्रातील बालकांना महानगरपालिका यांच्याद्वारे सोयीसुविधा पुरविल्या जाणे आवश्यक आहे. नागरी क्षेत्रातील कुपोषित बालकांचे पर्यवेक्षण आयुक्त, एकात्मिक बाल विकास विभाग यांच्यामार्फत करण्यात यावे. तसेच या संदर्भसेवा नगरपालिका/नगर परिषदा व महानगरपालिका यांच्याद्वारे पुरविण्याबाबत शासनाने योग्य ते आदेश निर्गमित करावेत अशी समितीची शिफारस आहे.**

(II) महानगरपालिकेमार्फत महिलांकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात याद्वारे महिलांचा आर्थिक विकास होऊन त्यांची प्रगती व्हावी व त्यांच्यात आत्मसन्मान निर्माण व्हावा हा उद्देश आहे. **महानगरपलिकेच्या एकूण अर्थसंकल्पापैकी ५ टक्के रक्कम महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महानगरपालिकेने निधी राखून ठेवावयाचा शासन निर्णय आहे.** या ५ टक्के निधीमधून महिलांच्या कल्याणार्थ नगरपालिकेने योजना राबविणे अपेक्षित आहे. परंतु समितीला असे आढळून आले आहे की, महानगरपालिकेद्वारे असा **५ टक्के निधी राखून ठेवल्यानंतर तो महिलांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी पूर्णपणे खर्च केला जात नाही व तरतूद केलेली रक्कम महिलांच्या योजनांकरिता खर्च केली जात नाही.** ही बाब अत्यंत गंभीर आहे. शासनाच्या धोरणानुसार महिलांच्या विकासासाठी सदरची ५ टक्के रक्कम एकूण अर्थसंकल्पामधून महिलांच्या विविध योजनांसाठी राखून ठेवली जाते. तथापि, त्यातील पूर्णपणे रक्कम खर्च होत नसल्याने शासनाचे धोरण सफल होताना दिसून येत नाही. समितीपुढे अशीही माहिती आली की, **जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमधून जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्के निधी जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांकरिता राखून ठेवला जातो.** तथापि, महानगरपालिकेमार्फत मात्र ५ टक्केच निधी राखून ठेवला जातो व असा निधी खर्च करण्याबाबत शासन निर्णय असल्यामुळे महानगरपालिकांमार्फत या शासन निर्णयाची गंभीरपणे दखल घेतली जात नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. म्हणून **जर शासनाला खरोखरच महिलांच्या कल्याणकारी योजना राबवावयाच्या असतील तर जिल्हा परिषदेमार्फत ज्याप्रमाणे १० टक्के निधी राखून ठेवला जातो त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महिलांसाठीदेखील १० टक्के निधी राखून ठेवण्यात यावा व असा निधी राखून ठेवण्याबाबतची तरतूद महानगरपालिकेच्या अधिनियमात सुधारणा करून करावी जेणेकरून अधिनियमातील तरतुदीमुळे एकूण अर्थसंकल्पापैकी राखून ठेवलेला १० टक्के निधी हा महिलांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांसाठी खर्च केला जाईल हे संबंधित महानगरपालिकेवर बंधनकारक करण्यात यावे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(२) पहिला अहवाल (२०१५-१६) (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष, पदोन्नती तसेच महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणबाबतच्या योजना याबाबत.) :-

समितीने महानगरपालिकेच्या महिला सदस्यांसमवेत अनौपचारिक चर्चा करताना महानगरपालिका क्षेत्रात निराधार व असहाय महिलांची संख्या विचारात घेता त्या मानाने आधार केंद्राची संख्या फारच कमी आहे समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुंबईमध्ये महिला आधार केंद्राची संख्या किती आहे? अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण पाच महिला आधार केंद्र असून ही पाचही आधार केंद्र अत्यंत सक्षम पद्धतीने सुरू असून ती पालवे रोड-मालाड, महावीर नगर-कांदिवली, विलेपार्ले (पूर्व), लालुभाई पार्क-अंधेरी आणि अंधेरी-कुर्ला रोड, कुर्ला या पाच ठिकाणी आहेत. महानगरपालिकेचे प्रत्येक वॉर्डात एक तरी आधार केंद्र असावे अशी जनतेतून त्याचप्रमाणे नगरसेवकांकडून मागणी आहे. महानगरपालिकेने सदरची आधार केंद्रे प्रो-ॲक्टीव्हपणे सुरु करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी शासनाची भूमिका आहे. तसेच मुंबई शहरामध्ये जागेची अडचण असून आधार केंद्रासाठी किमान १००० ते १५०० स्क्वेअरफूट जागेची आवश्यकता आहे अशा जागा उपलब्ध होण्यात खूप अडचणी आहेत. तथापि, सदस्यांच्या मागणीवरुन समितीची सूचना विचारात घेता मुंबई महागनरपालिकेत प्रत्येक वॉर्डात किमान एक आधार केंद्र स्थापित करण्यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात येईल. त्याचप्रमाणे या पाच आधार केंद्रामध्ये ए.सी. बसविलेले नसून कुठल्याही लग्न समारंभाला किंवा अन्य समारंभाला ही आधार केंद्रे वापरण्यास अथवा भाड्याने दिली जात नाहीत. या आधारकेंद्रात महिला बचत गटाची दुकाने, प्रशिक्षण वर्ग, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, योगासने, भाषण, इ. बाबी घेतल्या जातात याचा दुरुपयोग केला जात नाही. असेही विभागीय सचिवांनी साक्षीमध्ये सांगितले. महिला नगरसेविकांसमवेत झालेल्या अनौपचारिक चर्चेत अनेक महिला नगरसेविकांनी आधार केंद्राच्या आवश्यकतेवर भर दिल्याने तसेच विभागीय सचिवांनी महानगरपालिकेच्या अनेक सन्माननीय सदस्यांकडून मागणी होत आहे. मुंबईत निराधार व असहाय्य महिला तसेच वृध्द व्यक्तींची संख्या विचारात घेता तसेच विभागीय सचिवांनी समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे **नगर विकास विभागाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आधार केंद्र स्थापित करण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रो-ॲक्टीव्हपणे प्रयत्न करून प्रत्येक वार्डात एक याप्रमाणे (आधार केंद्र स्थापन करण्यासंदर्भात) महानगरपालिकेच्या जागेवर धडक कृती कार्यक्रम आखावा व त्यानुसार प्रत्येक वॉर्डात एक आधार केंद्र स्थापन करण्यासंदर्भात कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

(३) पाचवा अहवाल (२०१५-१६) (जळगाव महानगरपालिका/जिल्हा परिषद, जळगाव यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आराक्षण, अनुशेष व पदोन्नती आणि जळगाव महानगरपालिकेतर्फे जळगांव, जिल्हा परिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.) :-

जळगाव, महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाड्या :- आयुक्त, महानगरपालिका यांनी भेटीच्या वेळी दिलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी दिलेली माहिती यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. भेटीच्या वेळी दिलेली माहिती परिपूर्ण नसल्यामुळे समितीला नेमक्या निष्कर्षापर्यंत जाता आले नाही. अंगणवाड्यांचे मोठ्या प्रमाणावरील बांधकाम प्रलंबित असल्यामुळेच आयुक्तांनी जाणीवपूर्वक समितीला वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर केली नाही असे समितीचे मत आहे. एकूण ४० अंगणवाड्यांपैकी २५ अंगणवाड्यांची निविदा प्रक्रिया भेटीच्या वेळी पूर्ण झाली होती. त्याचप्रमाणे ४ अंगणवाड्यांचे बांधकाम जागेअभावी अपूर्ण होते. याबाबतचा संपूर्ण अहवाल विभागीय सचिवांची साक्ष झाल्यानंतर समितीला पाठविणे आवश्यक होते. तथापि, विभागाने याबाबतचा अहवाल समितीला पाठविला नसल्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या अंगणवाड्यांच्या बांधकामाची माहिती समितीला प्राप्त न

झाल्यामुळे स्थायी समितीने निर्णय घेतला किंवा कसे तसेच तसा निर्णय घेतला नसल्यास महानगरपालिकेने पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी शासनाकडे शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविला किंवा कसे याची समितीला माहिती प्राप्त झाली नाही. यावरुन विभागीय सचिव तसेच महानगरपालिकेचे आयुक्त या प्रकरणी किती गांभीर्याने घेतात हे दिसून येते. समितीला भेटीच्या वेळी अनेक सन्माननीय महिला नगरसेविकांनी अंगणवाड्यांच्या बांधकाम व दुरुस्ती संदर्भात तसेच अंगणवाड्या घरांमध्ये भरल्या जातात, अनेक ठिकाणच्या अंगणवाड्यांची छते गळकी आहेत, अधिकारी ऐकत नाहीत अशा तक्रारी केल्या या तक्रारीत तथ्य असल्याचे विभागाच्या तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या वागणुकीवरून समितीला दिसून येते. नगरपालिकेच्या नगरसेविका यादेखील लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांच्या सनदशीर मागणीला शासनाने सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे. तथापि, या प्रकरणी शासनाच्या अधिकाऱ्यांनी तसेच महानगरपालिकेच्या आयुक्तांनी महानगरपालिकेतील अंगणवाड्यांच्या बांधकामासंदर्भात सर्वंकष माहिती समितीला सादर न केल्यामुळे नगरसेविकांच्या तक्रारीत तथ्य असल्याचे समिती मानते व याबाबत तीव्र खेद व्यक्त करते. **जळगांव महानगरपालिकेतील** अंगणवाड्यांच्या बांधकामासंदर्भात समितीला विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सांगितल्यानुसार **२५ अंगणवाड्यांच्या बांधकामाच्या निविदा प्रक्रियेबाबतची स्थिती तसेच त्यानंतर स्थायी समितीने प्रस्ताव मान्य केला किंवा कसे व त्यानंतर ९० दिवसांनंतर महानगरपालिकेच्या प्रशासनाने सदरचा प्रस्ताव शासनास पाठविला किंवा कसे याबाबतचा सर्वंकष चौकशी अहवाल समितीस पाठविण्यात यावा.** अद्यापही या निविदेप्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास अथवा उक्त अंगणवाड्यांचे बांधकाम अपूर्ण असल्यास तसेच **शासनाकडून उक्त अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असल्यास शासनाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून नियमानुसार त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(४) नववा अहवाल (२०१७-१८) (पुणे महानगरपालिका, पुणे जिल्हा परिषद, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, पुणे महानगरपालिका पुणे जिल्हा परिषद, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.) :-

मिरा-भाईंदर, महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत .– समितीने महिलांच्या जागेवर पुरुषांची नियुक्ती केल्यामुळे आस्थापनेवर ३५ टक्क्याचे निर्बंध आलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात चौकशी करून समितीला सविस्तर माहिती सादर करतो. असे समितीस सांगण्यात आले. ही पदे न भरण्यामागे एखादा प्रशासकीय अधिकारी जबाबदार असू शकतो. त्यामुळे **या संदर्भात चौकशी नेमून कारवाई करण्यात यावी, तसेच ८१ पदांच्या संदर्भातही चौकशी करण्यात यावी. समांतर आरक्षण कधी वापरले जाते याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.** समांतर आरक्षण आपल्या सोयीसाठी वापरले जाते असा समितीचा आक्षेप आहे. समांतर आरक्षण वापरुनही पदे रिक्त असतील तर ते ही बाब गंभीर आहे. महिलांची जी पदे सहज उपलब्ध असताना ती पदे भरली नाहीत ही बाब अतिशय गंभीर आहे, असे समितीने मत नोंदविले आहे. समितीने समांतर आरक्षण पुढे न ओढता तेथे पुरुषांची भरती केली जाते यावर विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला आश्वासित केली की, समांतर आरक्षणाच्या शासन निर्णयात योग्य त्या सुधारणा करून त्यात महिलांसाठी आरक्षित असलेली पदे महिलांसाठीच कशी भरली जातील याबाबत निर्णय घेण्यात येईल. यावर समितीने सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे **समांतर आरक्षणाचा**

शासन निर्णयात सुधारणा करून समांतर आरक्षणाचा शासन निर्णय न वापरता महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागा रिक्त ठेवण्यात याव्यात व त्या जागेवर महिला उमेदवारांचीच भरती प्रक्रिया राबवावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. समितीने केलेल्या या शिफारशीवर शासनाने तात्काळ अंमलबजावणी करून समांतर आरक्षणाचा महिलांसाठीचा शासन निर्णय सुधारित करून तात्काळ प्रसिद्ध करावा अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला २ महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

(५) दहावा अहवाल (२०१७-१८) (मुंबई विद्यापीठ, मुंबई शहर व उपनगरातील बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेले रुग्णालये, मुंबई जिल्हा महिला कारागृह, भायखळा तसेच बाल सुधारगृह, मानखुर्द येथे दिलेल्या भेटींबाबत.) :-

मुंबई शहर व उपनगरातील बृहन्मुंबई महानगरपालिका व राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेले रुग्णालये :- समितीने भाभा रुग्णालय, मुंबई येथे भेट देऊन वैद्यकीय अधीक्षक यांना रुग्णालयांमध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सुविधा, आहार, रुग्णांमधील अधिकारी/कर्मचारी, उपचारासाठी आलेल्या महिला व बालके यांच्यासाठी वैद्यकीय सेवेची सद्यःस्थिती इत्यादी बाबत माहिती विचारली असता या रुग्णालयात वर्षाला ३ ते ४ मातांचा मृत्यू होत असणे हे प्रमाण तुलनात्मक अल्प असल्याचे स्त्रीरोगतज्ज्ञ यांनी सांगितले. या रुग्णालयामध्ये संदर्भित करण्यात आलेल्या हाय रिस्क केसेसमध्येच माता मृत्यू होत असल्यामुळे सदरचे माता मृत्यू आणखी कमी कसे होतील याबाबतही काळजी घेण्याबाबतच्या सूचना समितीने रुग्णालय प्रशासनास दिल्या.

या रुग्णालयांमध्ये येणाऱ्या महिलांसाठी संपूर्ण बॉडी चेकअप करण्याची योजना नाही, तसेच स्वच्छतागृहाच्या ठिकाणी आजूबाजूच्या ठिकाणी अस्वच्छता आढळून येणे, सीसीटीव्ही, जेनेरीक औषधांबाबत उदासीनता असणे, मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असणे इत्यादीबाबत समितीला त्रुटी आढळून आल्या व या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत समितीने रुग्णालय प्रशासनास सूचित केले. त्याचप्रमाणे या रुग्णालयासाठी काही वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून त्याबाबतही पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव त्याचप्रमाणे वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून सुमारे १३८८ पदांची भरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समितीला दिली. याबाबत समितीने समाधान व्यक्त केले असून सदरची **भरती प्रक्रिया कायदेशीररित्या राबविण्यासाठी महिलांची ३० टक्के जागांची भरती कशी केली जाईल व महिलांना यामध्ये कशा प्रकारे प्रतिनिधीत्व दिले जाईल याबाबतची काळजी रुग्णालय प्रशासनाने घेऊन महिलांकरिता ३० टक्के आरक्षणाची अंमलबजावणी सत्वर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने नायर रुग्णालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय रुग्णालय, केईएम रुग्णालय, कस्तुरबा रुग्णालय, कुपर रुग्णालय इत्यादी ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली व संबंधितांसमवेत चर्चा सुद्धा करण्यात आली. या महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये तसेच राज्य शासनाच्या कामा रुग्णालयांमध्ये ज्या बालकांच्या मातांना बाळ जन्मताच दूध कमी येते व अशी बालके दुधाच्या कमतरतेमुळे दगावण्याची शक्यता जास्त असल्याने त्याचप्रमाणे त्यांना नैसर्गिक जीवनसत्व कमी मिळत असल्याने **" ह्युमन मिल्क बँक "** ही संकल्पना उदयास आली. त्याद्वारे ज्या मातांना अतिरिक्त दूध उपलब्ध आहे अशा मातांद्वारे दूध देऊन, ज्या बालकांना त्यांचे मातेकडून दूध मिळत नाही अथवा अल्प दूध मिळते अशा बालकांना या अतिरिक्त दूध देणाऱ्या मातांकडून दूग्धदान करण्यात येते. **ही संकल्पना अत्यंत चांगली असून समिती या संकल्पनेचे स्वागत करते.** ज्या उदात्त हेतूने ही संकल्पना मांडण्यात आली व त्याची अंमलबजावणी करण्यात येते त्याबाबतही समिती समाधान व्यक्त करते. त्याचबरोबर अतिरिक्त दूग्धदान देणाऱ्या महिलांचे समिती अभिनंदन करून समिती त्यांना प्रोत्साहन देते व अशा अतिरिक्त दूध देणाऱ्या महिलांचे समिती स्वागत करून त्यांच्या

या पवित्रदानाचा आदर करून अशा दूग्धदान करणाऱ्या मातांना मुख्यत्वे प्रशासनाकडून सकस आहार याबरोबरच ठराविक रुपये १५०० इतके मानधन देण्यात यावे असे समितीला वाटते. यामध्ये दुग्धदान ही संकल्पना दातृत्वाची जरी असली तरी यामागे शासनाचीही काही भूमिका आवश्यक असल्याने या अतिरिक्त दुग्धदान करणाऱ्या मातांना शासनाने निश्चित असे अनुदान देऊन उपकृत करावे असे समितीला वाटते. जेणेकरून अशा अतिरिक्त दुग्धदान करणाऱ्या मातांचे प्रमाण वाढेल व ज्या बालकांना त्यांच्या मातेपासून दूध मिळत नाही अथवा अल्प दूध मिळते अशा बालकांना अतिरिक्त व्हीटॅमिन्स मिळून बालके सुदृढ होण्यास मदत होईल असे समितीला वाटते. या अतिरिक्त **दुग्धदान देणाऱ्या मातांना शासनाने ठराविक रुपये १५०० इतकी मानधन स्वरुपी रक्कम देऊन उपकृत करावे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावा.**

(६) अकरावा अहवाल (२०१८-१९) (नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती, नवी मुंबई महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सांगली महानगरपालिका, सांगली जिल्हा परिषद, डहाणू नगरपरिषद तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.) :-

नवी मुंबई महानगरपालिकेची अंदाजपत्रक व महिलांसाठी कल्याणकारी योजना :– शाळेमध्ये मुलांसाठी व महिलांसाठी टॉयलेटस नाहीत. काही शाळेतील मुलींना टॉयलेट साठी दुसऱ्या शाळेमध्ये जावे लागते. ही गंभीर बाब आहे. तसेच टॉयलेट संबंधी स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या सुचना दिल्या असतानाही हायवेवर टॉयलेट उभारण्यात आलेले नाहीत. याबाबत विचारणा केली असता, आयुक्तांनी ई-टॉयलेट ही नवीन संकल्पना महानगरपालिकेने ठाणे, बेलापुर आणि पाम बिच रोडवर राबविली असून १५ ई-टॉयलेट मंजूर केले असून त्यापैकी ७ ई-टॉयलेट सुरू करण्यात आले आहेत. महानगरपालिकेमार्फत महानगरपालिकेच्या कार्यालयासमोर १ ई-टॉयेलेटचे मॉडीफिकेशन करून ई-टॉयलेटमध्ये रूपांतर करण्यात येत असून त्यामध्ये सॅनटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच महिलांसाठी हायवेवर टॉयलेट उभारण्याबाबत एक सर्व्हे करून १३० जागा निवडल्या आहेत. त्यामध्ये महिलांसाठी २५ ई-टॉयलेट उभारण्यात येतील. ही जागा सिडकोची आहे व तेथे टॉयलेट बसविण्याची परवानगी घेण्यात येणार आहे.

सबब, याप्रकरणी महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत महामार्गालगत स्वच्छतागृहांची सोय नसल्याने महिलांची गैरसोय होते. त्यामुळे **महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानार्गत महानगरपालिकेच्या क्षेत्रात महामार्गालगत महिलांसाठी स्वच्छतागृहे उभारून त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला ३ महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

(७) तेरावा अहवाल (२०१८-१९) (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यकरीत असलेले ब्रम्हकुमारी रुग्णालय, अंधेरी (पश्चिम) यांना समितीने दिलेल्या भेटीसंदर्भात.) :-

समितीने दिनांक २३ मे, २०१८ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी संबंधित रूग्णालयाकडे सन २०१२ नंतर रुग्णालयाचे नूतनीकरण केल्याचे प्रमाणपत्र अद्याप पर्यंत प्राप्त न झाल्याने या रुग्णालयास महानगरपालिकेने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्याचबरोबर या रुग्णालयात कोणतीही दुर्घटना होवू नये यासाठी

आवश्यक असलेले अग्निशमन दलाचे प्रमाणपत्रही रुग्णालयाकडे उपलब्ध नसल्याचे आणि नर्सींग नोंदणी प्रमाणपत्र देखील उपलब्ध नसल्याचे महानगरपालिकेने समितीच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत महानगरपालिकेने संबंधित रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस बजावून रुग्णालयासोबतचे करारपत्र टर्मिनेट करण्यात यावे असे आदेश दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी आयुक्त महानगरपालिका यांनी दिलेले असताना रुग्णालय यावर न्यायालयात गेल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असेही समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. ब्रम्हकुमारी रुग्णालयाने महानगरपालिकेसोबत केलेल्या करारपत्रातील सर्व मुद्यांबाबत मनमानी कारभार करून सदर रुग्णालयाच्या नूतनीकरणाचे तसेच कोणतेही अपघात होवू नये यासाठी लागणारे अग्नीशमन दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि रुग्णालयास आवश्यक असलेल्या नर्सिंग होम नोंदणी प्रमाणपत्र *(कोणत्याही रुग्णाला दाखल करण्यासाठी आणि शस्त्रक्रिया करण्यासाठी लागणारे प्रमाणपत्र)* उपलब्ध नसताना रुग्णालय सुरू असून रुग्णाच्या जीवाशी एकप्रकारे खेळ खेळत आहे. अवैद्यरित्या रुग्णालय चालविले हा एक प्रकारे गुन्हाच आहे असे याबाबत समितीस वाटते.

समितीस प्राप्त झालेल्या माहितीत सन २००२ ते २०१८ या कालावधीत या रुग्णालयात मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या विचारात घेतली असता, सन २०१८ मध्ये एकूण १५१ रुग्ण मृत्यू पावल्याचे रुग्णालयाने समितीस सांगितले आहे. एकूण मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी जास्त असू शकते. शिवाय काही नागरीकांच्या तक्रारी देखील असू शकतात. **या रुग्णालयाची शासनातर्फे वरील सर्व मुद्यांबाबात संपुर्ण चौकशी करून असे बेकायदेशीर रुग्णालय चालवणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी** त्याचप्रमाणे या रुग्णालयात परवानगी देताना अग्नीशमन दलाचे ना हरकत प्रमाणत्र, नर्सींग होम पुर्व नोंदणी प्रमाणपत्र, हया बाबी अत्यंत आवश्यक आहेत साक्षीच्या वेळी या दोन्हीही बाबी रुग्णालय प्रशासनाने दडवून ठेवल्या व पुरेशी माहिती समितीसमोर येऊ शकली नाही. त्यानंतर महानगरपालिकेच्या प्रशासनाने या रुग्णालयाने सन २००२ पासून ते सचिवांच्या साक्षीपर्यंत अग्नीशमन दलाकडून ना हरकत प्रमाणत्र मिळाले नव्हते. ही बाब अत्यंत गंभीर आहे. तसेच नर्सींग होम परवानगी महानगरपालिकेच्या संबंधित कार्यकारी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्र प्राप्त करून देणे आवश्यक होते. तथापि, अद्यापपर्यंत सदरचे नर्सींग होम परवानापत्र संबंधित रुग्णालयास मिळालेले नाही. याबाबत **महापालिकेच्या संबंधित आरोग्य अधिकारी व अग्नीशमन दलाचे संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते** तसेच रुग्णालयाने देखील या कामी त्यांची जबाबदारी ओळखून सतर्क राहून उक्त दोन्ही परवाने घेणे आवश्यक होते.

सबब, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात यावी तसेच या रुग्णालयाने त्रिपक्षीय कारारचे उल्लंघन केले असल्यामुळे संबंधित रुग्णालयासोबत केलेला करार तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावा त्याचप्रमाणे वैद्यकीय नियमानुसार सदर रुग्णालय शासनाने आपल्या ताब्यात घेवून रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या रुग्णालयावर तात्काळ कडक कारवाई करावी तसेच या रुग्णालयातील ज्या डॉक्टरांच्या बेपर्वाईमुळे काही रुग्णांच्या मृत्यूच्या तक्रारी आल्या आहेत अशा सर्व तक्रारीची एका त्रयस्त यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात यावी व संबंधितांवर कडक स्वरूपाची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विधानमंडळास एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

*****

(११) इतर मागासवर्ग कल्याण समिती

(Committee on Welfare of Other Backward Classes)

भारतीय संविधानाच्या ३४० व्या अनुच्छेदाप्रमाणे मागासवर्गीय जातींच्या उन्नतीसाठी आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून स्वातंत्र्यानंतर अगदी सुरुवातीला राष्ट्रपतींनी दिनांक २९ जानेवारी, १९५३ रोजी आचार्य कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली देशातील मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी पहिला आयोग नियुक्त केला होता. आचार्य कालेलकर समितीने आपला अहवाल दिनांक ३१ मार्च, १९५५ रोजी केंद्र शासनाला सादर केला. या आयोगाने सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या देशातील २३९९ जाती मागास ठरविल्या होत्या व त्यांच्या उन्नतीसाठी अनेक कल्याणकारी योजना सुचविल्या होत्या. इतर मागास जातींसाठी सरकारी नोकऱ्या तसेच शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागांची शिफारस आयोगाने केली होती. त्यानंतर दिनांक २० डिसेंबर, १९७८ रोजी केंद्र सरकारने उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री व खासदार श्री. बिंदेश्वर प्रसाद मंडल (बी.पी.मंडल) यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची नियुक्ती केली. सदर आयोगाने महाराष्ट्र राज्यातील २७२ जातींचा इतर मागासवर्गीयांत अंतर्भाव केला आहे. सदर आयोगाने इतर मागासवर्ग जातीतील लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील शिफारशी केंद्र शासनास केल्या होत्या.

मंडल आयोगाच्या शिफारशी —

(१) भारताच्या लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोकसंख्या ही इतर मागासवर्गीयांची आहे. शासकीय, निमशासकीय व अनुदानीत संस्थामधील एकूण पदांपैकी केवळ २७ टक्के पदे ही इतर मागासवर्गीयांसाठी राखून ठेवण्यात यावीत.

(२) ज्या मागासवर्गीय उमेदवाराची निवड ही खुल्या स्पर्धा निवडीमधील गुणानुक्रमे झालेली असेल अशा मागासवर्गीयाचे पद हे खुले पद म्हणून गणले जावे. त्याचा समावेश २७ टक्के राखीव पदामध्ये करण्यात येऊ नये.

(३) वरील राखीव पदांची योजना ही बढतीने होणाऱ्या नेमणुकीसाठी जशीच्या तशी उपयोगात आणली जावी.

(४) भरली न गेलेली राखीव पदे रद्द करण्यात येऊ नयेत. भरतीच्या वेळी योग्य अर्हतेचा मागासवर्गीय उमेदवार जर उपलब्ध झाला नाही तर ते पद ३ वर्षापर्यंत "अनुशेष" म्हणून राखून ठेवावे व त्यानंतरच योग्य उमेदवाराअभावी ते रद्द समजावे.

(५) अनुसूचित जाती व जमाती (SC/ST) यांच्या सरळ सेवा भरतीच्या वेळी देण्यात आलेली वयाची अट शिथिल करण्याची सवलत इतर मागासवर्गीयांना सुद्धा २७ टक्के पदे भरतांना देण्यात यावी.

(६) अनुसूचित जाती व जमाती यांच्या सेवा भरतीसाठी उपयोगात आणली जाणारी बिंदू-नामावली (Roster) पद्धती, इतर मागासवर्गीयांच्या भरतीसाठी सुद्धा उपयोगात आणावी.

मंडल आयोगाच्या बहुतांश शिफारशी भारत सरकारने स्वीकारल्या व दिनांक १३ ऑगस्ट, १९९० रोजी पुढील आदेश निर्गमित केले आहे.

१. केंद्र शासनाच्या सर्व सेवांमध्ये २७ टक्के पदे ही सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास गटासाठी (SCBC) राखून ठेवण्यात येतील.

२. ही २७ टक्के राखीव पदांची योजना केवळ सरळ सेवा भरती (Direct Recruitment) साठीच उपयोगात आणली जाईल. [म्हणजेच बढती व पदोन्नती (Promotion) साठी २७ टक्के राखीव पदांची योजना उपयोगात आणता येणार नाही.]

३. गुणवत्ता यादीमध्ये सर्वसामान्य उमेदवाराप्रमाणेच जर आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीय उमेदवाराची निवड खुल्या पदावर झालेली असेल तर त्याची गणना २७ टक्के राखीव पदांमध्ये करण्यात येऊ नये.

४. मंडल आयोग व राज्य शासन या उभय पक्षांनी तयार केलेल्या इतर मागासवर्गीयांच्या याद्यांमध्ये समाईक असलेला गट किंवा जमात यांची गणना इतर मागासवर्गीय म्हणून केली जाईल.

५. वरील मागासवर्गीय राखीव पदांची योजना ही दिनांक ७ ऑगस्ट, १९९० पासून अंमलात येईल.

महाराष्ट्र विधिमंडळात इतर मागासवर्ग कल्याण समितीची स्थापना :—

इतर मागासवर्गीय जातीतील लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने शासकीय सेवेत भरती, बढती, आरक्षण व अनुशेष या संबंधात ज्या सोयी सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत, त्या प्रत्यक्षात त्यांना मिळतात किंवा कसे याची पाहणी करण्यासाठी तसेच या वर्गाच्या कल्याणाच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी लोकसभेत व इतर काही राज्याच्या विधिमंडळात ज्याप्रमाणे एक समिती नेमण्यात आलेली आहे, त्याच धर्तीवर आपल्या राज्यात महाराष्ट्र विधानमंडळाची एक समिती स्थापन करण्याचा प्रश्न विचाराधीन होता. **दिनांक २५ जुलै, २००३ रोजी विधानसभेत व विधानपरिषदेत प्रस्ताव पारित करण्यात येऊन त्यानुसार महाराष्ट्र विधानमंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीची दिनांक २४ मार्च, २००४ रोजी स्थापना करण्यात आली.**

इतर मागासवर्ग कल्याण समितीची रचना व कार्यपद्धती व समितीची कार्ये याबाबतीत महाराष्ट्र विधानसभा नियम क्रमांक २४४ (ड) व २४४ (ढ) मध्ये तर महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियम क्रमांक २१४ (ब) मध्ये तरतूद करण्यात आली आहे.

इतर मागासवर्ग कल्याण समितीची रचना (म.वि.स. नियम २४४-ड व म.वि.प. नियम २१४ ब)

(१) दरवर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल.

(२) या समितीमध्ये जास्तीत जास्त १५ सदस्यांचा समावेश असेल. अध्यक्ष, त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त ११ सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रितीने सभापती, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त ४ सदस्य नामनिर्देशित करतील.

(३) या समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना करण्यात येईपर्यंत पद धारण करतील.

इतर मागासवर्ग कल्याण समितीची कार्ये (म.वि.स. नियम २४४-ढ)

(एक) इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परीक्षण करणे आणि राज्य शासनाने त्या संबंधात काय उपाययोजना करावी याविषयाची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करणे;

(दोन) राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सांविधिक आणि निमसरकारी संस्था यातील नेमुणका धरून) इतर मागासवर्गीयांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे;

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या, इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारणत: विचारविनिमय करणे आणि दोन्ही सभागृहांना त्याबाबत अहवाल देणे;

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे;

(पाच) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

या समितीच्या कार्यकक्षेत इतर मागासवर्गीयांच्या विकासासाठी शासनाकडून केली जाणारी उपाययोजना तसेच या समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातील मागासलेपणा दूर करण्यासाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजनासंबंधी विचारविनिमय करून त्याबाबत अहवालाच्या माध्यमातून शासनास योग्य त्या शिफारशी करणे, शैक्षणिक व सर्वांगिण विकासासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदी तसेच शासकीय, निमशासकीय उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी क्षेत्रातील उपक्रम आणि शासकीय अनुदानावर चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था तसेच इतर संस्थामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे नोकऱ्यांमध्ये पदांचे आरक्षण, भरती, बढती, अनुशेष व कल्याणकारी योजना इत्यादी बाबींची तपासणी करण्याची जबाबदारी इतर मागासवर्ग कल्याण समितीवर सोपविली आहे. त्याशिवाय सभागृहाने अथवा अध्यक्षांनी समितीकडे खास करून विचारार्थ पाठविलेल्या एखाद्या बाबींची अथवा प्रकरणाची तपासणी करून त्याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर करण्याचे अधिकार या समितीला आहेत.

समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती संबंधित विभागामार्फत उपलब्ध करून घेतली जाते. सर्वसाधारणपणे समितीच्या प्रारंभिक बैठकीमध्ये अथवा त्यानंतर होणाऱ्या बैठकीमध्ये समितीसमोर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो व त्या आधारे कोणते विषय अग्रक्रमाने विचारात घेऊन कामकाज करावयाचे याबाबतचा निर्णय समितीमध्ये सर्वानुमते घेतला जातो. त्यानुसार समिती आपले कामकाज करते व आवश्यक त्या शिफारशींसह अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर केला जातो.

इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :–

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

(१) **दुसरा अहवाल (२०१०-२०११) - (औरंगाबाद, हिंगोली, परभणी जिल्हा परिषद सेवेतील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सदर जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.)**

परभणी जिल्हा परिषद :- समितीला परभणी जिल्ह्यांमध्ये असे आढळून आले की, जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळेतील मुलांना शिष्यवृत्ती व परीक्षा फीचे वाटप नियमित होत असते मात्र शासन अनुदानित खाजगी शाळामधील संस्थाचालक प्रवेशाच्या वेळीच विद्यार्थ्यांकडून फॉर्मवर सह्या करून घेतात त्याला शिष्यवृत्ती व फी चे पैसे देत नाहीत. विद्यार्थ्यांना पैसे दिले जातात की नाही याची व्यवस्थित तपासणी जिल्हापरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जात नाही. जिल्हापरिषदेचा याबाबतीतला कारभार समितीस संशयास्पद वाटतो व यामूळे **गरीब विद्यार्थी त्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व फी पासून वंचित राहतात व त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासूनही दूर जातात त्यामुळे समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून अशी शिफारस करते की, जिल्हापरिषदेतील अशा संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांची वेतनवाढ रोखण्यात यावी आणि यापुढे जिल्हापरिषदेने एक पथक तयार करून दर वर्षी अशा शाळांची तपासणी करावी व विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करावा. याबाबत शासनाने कोणती कारवाई केली याबाबतची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी.**

(२) **चौथा अहवाल (२०१०-२०११) - (नाशिक जिल्हा परिषद सेवेतील इतर मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच सदर जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.)**

नाशिक जिल्हा परिषद, जात पडताळणी :- समितीने सन २००८-२००९ या कालावधीत सुमारे १० जिल्हा परिषदांना व सहकारी बँकाना प्रत्यक्ष भेटी दिल्या त्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सर्व जिल्हा परिषदेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची जात पडताळणीची अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांबाबत कोणताही निर्णय शासनास घेता येत नाही. समितीच्या असेही निदर्शनास आले की, सन २००४ च्या पूर्वीची इतर मागासवर्गीय उमेदवारांनी आपली जात पडताळणी करून घेतलेली नाही. तर अनेकांनी जात पडताळणीसाठी समितीकडे कागदपत्रे सादर केलेली नाहीत त्यामुळे गेली ६ वर्षे शासनास कोणताही निर्णय घेता आलेला नाही ही बाब अतिशय गंभीर असून अशा कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

तरी ज्या कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीसाठी जाणूनबुजून जात पडताळणी समितीकडे कागदपत्रे सादर केली नसतील त्यांना ३ ते ४ महिन्यांची मुदत "जात पडताळणी" प्रमाणपत्र सादर करण्यासाठी द्यावी त्यानंतर त्यांचा जातीचा दाखला बोगस आहे असे समजून त्यांना नोकरीतून कमी करण्याची कारवाई करण्यात यावी. तसेच याबाबतीत केलेल्या कारवाईची माहिती एक महिन्यात समितीला सादर करावी.

जात पडताळणी समितीकडून लवकरात लवकर जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासनाने ६ जात पडताळणी समित्यांची संख्या वाढवून १२ समित्या निर्माण केल्या आहेत. तथापि, जात पडताळणीचे वाढलेले काम पहाता या समित्याही अपुऱ्या आहेत. तरी **आता प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समिती निर्माण करावी अशी आग्रहाची शिफारस समिती शासनास करीत आहे. तरी शासनाने याबाबत त्वरीत कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी.**

(३) **सहावा अहवाल (२०१३-२०१४) - (नवी मुंबई महानगरपालिका सेवेतील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच महानगरपालिका कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.)**

नवी मुंबई महानगरपालिका :- नवी मुंबईतील जास्तीत जास्त नागरिक महानगर क्षेत्रात राहतात. शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना एखाद्या योजनेचा लाभ घ्यावयाचा झाल्यास त्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख ८० हजार रुपये असावयास पाहिजे. वास्तविक पहाता ही मर्यादा अतिशय कमी आहे. महानगर क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न यापेक्षा जास्त असते. त्यामुळे बहुतांश गरजू लोकांना त्या योजनांचा फायदा घेता येत नाही. त्यादृष्टीने **नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या जास्तीत जास्त नागरिकांना महापालिकेच्या योजनांचा लाभ मिळण्यासाठी त्यांच्या वार्षिक उत्पन्नाची सध्याची १ लाख ८० हजार रुपयांची मर्यादा वाढवून उक्त मर्यादा ३ लाख रुपयापर्यंत करण्यासंदर्भातचा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेने तात्काळ राज्य शासनाकडे पाठवावा व वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाख ८० हजार रुपयांऐवजी ३ लाख रुपये इतकी वाढविण्यातबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सत्वर कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लोकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण द्यावयाचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. **नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत इतर मागासवर्गीय प्रवर्गासह सर्व प्रवर्गातील, कमी उत्पन्न असलेल्या, लाभार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजनांचा अभ्यास करून अशा तऱ्हेच्या योजना राज्यातील इतर महानगरपालिकांमार्फत राबविण्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेऊन राज्यातील सर्व महानगरपालिकांना सूचना द्याव्यात व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत अवगत करण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

(४) **पहिला अहवाल (२०१५-२०१६) - (बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव, जळगाव-जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद तसेच जिल्हा परिषद, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा बुलढाणा या कार्यालयातील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.)**

समाजकल्याण विभाग, बुलढाणा :- समितीच्या निदर्शनास आले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरिता शैक्षणिक दृष्ट्या १७०० अभ्यासक्रम आहेत. परंतू इतर मागास प्रवर्गासाठी फक्त ५४३ अभ्यासक्रम आहेत. समितीच्या मते, काळाच्या ओघात कला, वाणिज्य व विज्ञान या तसेच अनेक विद्या शाखा उदयास आलेल्या आहेत. **सबब, समितीची अशी शिफारस आहे की, काळाची गरज ओळखून इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांमधील नाविन्य पूर्ण व उद्योजकता विकासासाठी हातभार लागेल अशा स्वरुपाचे अभ्यासक्रम सुरू करण्यात यावेत. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी असणारे सर्वच्या सर्व म्हणजेच १७०० अभ्यासक्रम इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीही उपलब्ध करून देण्यात यावेत जेणेकरून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज पूर्ण होईलच शिवाय त्यांना लगेच रोजगार उपलब्ध होईल.**

(५) **दुसरा अनुपालन अहवाल (२०१७-२०१८) - [इतर मागासवर्ग कल्याण समितीने (२०१५-२०१६) बुलडाणा जिल्ह्यातील शेगांव, जळगाव जामोद, मलकापूर व बुलढाणा नगरपरिषद तसेच जिल्हापरिषद, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जिल्हाधिकारी, जिल्हा बुलढाणा या कार्यालयातील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सादर केलेल्या पहिल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत.]**

समाजकल्याण विभाग, बुलढाणा :- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना वास्तविकत: केंद्र शासनाची असून केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्यामुळे राज्य शासनावर आर्थिक भार वाढत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **सबब, समिती शिफारस करते की, सदर शिष्यवृत्तीची रक्कम केंद्र शासनाकडून प्राप्त करून घेण्यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाकडे व्यक्तिगत स्तरावर प्रयत्न करून सदर निधी लवकरात लवकर प्राप्त करून घ्यावा. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजना इतर मागासवर्गीयांनाही लागू करणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरून शिष्यवृत्ती अभावी विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड होणार नाही.**

(६) **तिसरा अहवाल (२०१८-२०१९) - (महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि कृषि आयुक्तालय, पुणे येथील इतर मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत.)**

(अ) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ :- (i) इतर मागासवर्ग महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांना मिळण्याकरिता सदर योजना ऑनलाईन कार्यरत कराव्यात, **अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या पोर्टलप्रमाणे नविन पोर्टल तयार करून अर्ज स्वीकारणे व योजनांची अंमलबजावणी ही सर्व कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(ii) गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा व तेलंगणा अशा सीमावर्ती भागात जर एखादा विद्यार्थी शिकत असेल तर त्यास शैक्षणिक कर्ज मिळणेबाबत काय करता येईल अशी समितीने विचारणा केली असता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ हे महाराष्ट्रासाठीच असल्याने शैक्षणिक कर्जाचा लाभ घेणारा विद्यार्थी महाराष्ट्रातीलच असावा, असे समितीच्या निदर्शनास आले. समितीच्या मते, **महाराष्ट्रातील विद्यार्थी शिक्षणाकरिता सीमावर्ती भागात जातात. सीमावर्ती भागातील विद्यार्थी शिक्षणाकरिता महाराष्ट्रात येतात. त्यांनाही महामंडळाच्या योजनेचा लाभ मिळाला पाहिजे. विद्यार्थी योजनेपासून वंचित राहता कामा नये.**

सबब, महामंडळाच्या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील व सीमावर्ती भागातील विद्यार्थी यांना मिळाला पाहिजे, **यासंदर्भात जी प्रस्तावित योजना आहे त्यात योग्य त्या सुधारणा करून प्रस्ताव शासनाकडे पुन्हा सादर करावा व वेळोवेळी पाठपुरावा करून सदर योजना मंजूर करून घेण्यात तर यावीच शिवाय सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(ब) कृषि आयुक्तालय, पुणे :- राज्यात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी कृषि आयुक्तालयातंर्गत जिल्हानिहाय १४ जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील केलेल्या कुटुंबनिहाय पाहणीनुसार **कायमस्वरुपी कोणत्या उपाययोजना केल्या तसेच यवतमाळ आणि उस्मानाबाद जिल्ह्यात नागरिकांना पाण्याची सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी, अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

*****

(१२) **अल्पसंख्याक कल्याण समिती**

(Committee on Welfare of Minority)

पार्श्वभूमी व स्थापना :—

महाराष्ट्र विधानमंडळात ज्याप्रमाणे अनुसूचित जाती कल्याण समिती; अनुसूचित जातीच्या समाजासाठी शासनाने राबविलेल्या योजना/कार्यक्रम, त्यासाठी केलेल्या आर्थिक तरतुदींचा आढावा घेऊन अहवालाद्वारे उपाययोजना सुचविते त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेण्यासाठी आणि यावर शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी त्याचप्रमाणे अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी "अल्पसंख्याक कल्याण समिती" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात दिनांक २५ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रिमंडळाने अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी "अल्पसंख्याक कल्याण समिती" स्थापन करण्यासाठी एकमताने निर्णय घेतला. त्यानुसार राज्य शासनामार्फत विधानमंडळ सचिवालयास विनंती करण्यात येऊन राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडलेल्या प्रस्तावानुसार दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली अल्पसंख्याक कल्याण समिती गठित करण्यात आली.

त्यानुसार राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यू) विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करून या समाजाचा सर्वांगिण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रिय स्तरावरील कार्यालयामार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे, शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन या विषयीची माहिती व अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने **दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी विधानसभेत व विधानपरिषदेत प्रस्ताव पारित करण्यात येऊन त्यानुसार "अल्पसंख्याक कल्याण समिती" या नावाची महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त समिती दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी गठीत करण्यात आली.**

अल्पसंख्याक कल्याण समितीची रचना व समितीची कामे याबाबतीत महाराष्ट्र विधानसभा आणि महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियमावलीमध्ये तरतूद करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक कल्याण समितीची रचना (म.वि.स. नियम २४४ - ण व २४४ - त)

१. दरवर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनानंतर किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, अल्पसंख्याक कल्याण समितीची रचना करण्यात येईल.

२. ही समिती पंधरापेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल. यापैकी अकरापेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि त्याच रीतीने चारपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून, सभापतींद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील. विधानसभेच्या सदस्यांपैकी सहा सदस्य अल्पसंख्याक समाजातील असतील. उर्वरित सदस्यांपैकी एक महिला सदस्या अल्पसंख्याक समाजातील असतील. अल्पसंख्याक समाजातील महिला सदस्या नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्या असतील. विधानपरिषदेतील चार सदस्यांपैकी तीन सदस्य हे अल्पसंख्याक समाजातील असतील. चारपैकी एक सदस्य अल्पसंख्याक महिला सदस्या असतील. महिला सदस्या नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्या असतील. या सदस्यांपैकी विधानसभेतील अल्पसंख्याक समाजातील सदस्य या समितीचे समितीप्रमुख राहतील.

३. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

अल्पसंख्याक कल्याण समितीची कार्ये (म.वि.स. नियम २४४-त)

१. राज्यातील अल्पसंख्याकांच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व ज्यू) विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करून या समाजाचा सर्वांगिण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयामार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे.

२. शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उदिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन व योजनेच्या यशस्वीतेसंबंधी मूल्यमापन करून राज्य शासनाला सुयोग्य अशा उपाययोजना सूचविणे. या विषयीची माहिती व अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

३. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाययोजना सुचविणे.

समितीच्या संदर्भात विधानपरिषद नियमातील तरतूद (विधानपरिषद नियम क्रमांक २१४-क व २१५)

२१४.क "दरवर्षी, विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभी व त्यानंतर, शक्य तितक्या लवकर, सभापती विधानसभेच्या नियमान्वये घटीत करण्यात आलेल्या "अल्पसंख्याक कल्याण समितीचे" प्रतिनिधीत्व करण्यासाठी चारपेक्षा अधिक नाहीत इतक्या सदस्यांना नामनिर्देशित करतील. या चार सदस्यांपैकी तीन सदस्य हे अल्पसंख्याक समाजातील असतील. चारपैकी एक सदस्य अल्पसंख्याक महिला सदस्या असतील. महिला सदस्या नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्या असतील."

२१५. "अल्पसंख्याक कल्याण समिती यांतील कार्यपद्धती विधानसभेने त्याबाबत केलेल्या नियमान्वये विनियमित करण्यात येईल."

अल्पसंख्याक कल्याण समितीच्या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी :–

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील अल्पसंख्याक कल्याण समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

(१) पहिला अहवाल (सन २०१३-२०१४) :– (राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) सर्वंकष विकासासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा आढावा घेऊन त्यात योग्य त्या सुधारणा सुचविण्याबाबत.)

(I) राज्यात अल्पसंख्याक संचालनालय उभारण्याबाबत :— राज्यात अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्यात यावे. संचालनालयाची कार्यकक्षा ठरविण्यात यावी. अल्पसंख्याक संचालनालयासाठी शासनाने तीन महिन्यात जमीन उपलब्ध करुन द्यावी. तसेच संचालनालयाचे कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक तो अधिकारी व कर्मचारी वर्ग पुरविण्यात यावा तसेच वर्ग १ ते वर्ग ४ ची पदसंख्या निर्धारित करुन उक्त पदे नव्याने अथवा प्रतिनियुक्तीने सत्वरतेने भरण्यात यावीत व याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्यात अवगत करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

(II) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह उभारण्याबाबत.

अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक वसतिगृह उभारण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने चंद्रपूर, औरंगाबाद, नंदूरबार, परभणी, अमरावती, रायगड, कोल्हापूर व भंडारा जिल्ह्यांमधील वसतीगृहांच्या बांधकामासाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये वसतीगृह उभारण्यासाठी तात्काळ निधी वितरीत करण्यात यावा तसेच संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ जमिनी उपलब्ध करुन द्याव्यात यासाठी विभागामार्फत पाठपुरावा करण्यात यावा व त्याअनुषंगाने वसतीगृहांचे बांधकाम सत्वरतेने पूर्ण करुन याचा लाभ जास्तीत जास्त मुलींना कसा मिळेल याबाबत शासनाने योग्य व तातडीने नियोजन करुन याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत द्यावी.

उपरोक्त वसतिगृहांचे शासनामार्फत फक्त बांधकाम करण्यात येणार असून वसतीगृहे चालविणे आणि त्यांची देखभाल करणे ही कामे एन.जी.ओ. मार्फत करण्यात येणार आहेत. तथापि, या योजनेत अनेक बाबी संदिग्ध असल्यामुळे याबाबत सुस्पष्टता असणारी योजना अल्पसंख्याक विभागाने तीन महिन्यात तयार करुन समितीच्या अवलोकनार्थ पाठवावी, अशी समितीची शिफारस आहे.

(III) राज्यात जिल्हानिहाय अल्पसंख्याक कल्याण समिती नेमण्याबाबत :— शासन निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक कल्याण समिती नेमणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत राज्यात केवळ १५ जिल्ह्यात अल्पसंख्याक कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब, उर्वरीत जिल्ह्यात तात्काळ अल्पसंख्याक कल्याण समित्या स्थापण्यात याव्यात

व याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस तीन महिन्याच्या आत अवगत करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

(**IV**) **वक्फ बोर्डासंदर्भात :—** (१) समितीने वक्फ बोर्डासमवेत घेतलेल्या बैठकांमध्ये समितीस असे आढळून आले की, वक्फ जमीनींवर प्रचंड प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. वक्फ बोर्डाच्या किती जमीनींवर अतिक्रमणे झालेली आहेत ते सुनिश्चित करण्यात यावे. तसेच सदर अतिक्रमणे त्वरीत हटविण्यात यावीत व अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी. उर्वरीत जमीनींवर अतिक्रमण होऊ नये यासाठीही तात्काळ उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. यासाठी सदर जमीनींचा तात्काळ व्हिडीयोग्राफिक सर्वे करण्यात यावा व त्यासाठी आवश्यक निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा.

(२) वक्फ बोर्डामध्ये होत असलेले गैरव्यवहार व अनियमितता रोखण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे तसेच निधीअभावी व कर्मचाऱ्यांअभावी वक्फ बोर्डाला काम करण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना शासनस्तरावरुन करण्यात येऊन बोर्डाचे सबलीकरण करण्याच्या दृष्टीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून उपाययोजना करण्यात यावी, अशीही शिफारस ही समिती करीत आहे.

(३) वक्फ बोर्डाची खरी मालमत्ता ही वक्फ बोर्डाच्या जमीनी हीच असून त्यावर मोठया प्रमाणात झालेले अतिक्रमण, ते हटविण्यास येत असलेले अपयश, शिल्लक जमिनीवर अधिक अतिक्रमण भविष्यात होऊ नये याबाबत शासनाकडून तातडीने करावयाची उपाययोजना तसेच या जमिनींच्या माध्यमातून वक्फ बोर्डाला काही निधी उभा करता येईल किंवा कसे यासंदर्भात नियोजन करणे त्याअनुषंगाने तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात.

(२) पहिला अहवाल (सन २०१५-२०१६) - (राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) सर्वंकष विकासासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत)

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ :- मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जासाठीच्या वार्षिक उत्पन्नात वाढ करणे, शैक्षणिक कर्जाच्या अटी व शर्थी शिथिल करण्यासंदर्भात संचालक मंडळाची व वित्त विभागाची परवानगी घेणे तथा निकष बदलणे, इंटरनेटच्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध होण्यासाठी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये म्हणून कार्यवाही करणे, यास्तव अल्पसंख्याक समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळणे सुलभ करण्यात येऊन हे महामंडळ "विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणारे महामंडळ" म्हणून नावारुपास यावे. याकरिता शासनाने तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

*****

(१३) मराठी भाषा समिती

(Committee on Marathi Language)

समितीची स्थापना :—

महाराष्ट्र राज्याची दिनांक १ मे, १९६० रोजी स्थापना झाल्यानंतर राज्याची राजभाषा मराठी ही शासन व्यवहाराची भाषा राहील हे धोरण राज्य शासनाने जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४५ च्या तरतुदीन्वये मराठीला राजभाषेचा कायदेशीर दर्जा प्राप्त झाला. महाराष्ट्र राजभाषा अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व प्रशासनिक कार्यालयीन वापराकरिता मराठीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या नियमात नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व प्रशासनिक कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्याचे राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातील शासकीय कार्यालयीन कामकाजामध्ये मराठीच्या वापराबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांची संयुक्त समिती घटित करण्याचा प्रस्ताव बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला असता मंत्रिमंडळाने, राज्य शासकीय कार्यालये व राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली प्राधिकरणे, महामंडळे इ. यांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये शासन व्यवहारात मराठीच्या वापराबाबत तसेच केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या शासकीय/निमशासकीय कार्यालयातून मराठीच्या वापराबाबत आढावा घेऊन याबाबत राज्य शासनाला सूचना देण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असलेली नियमित संयुक्त "मराठी भाषा समिती" घटित करण्याचा प्रस्ताव मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मांडण्यात आला व सदर प्रस्ताव संमत करण्यात आला. दरम्यानच्या कालावधीत मराठी भाषा समितीचे नियम तयार करण्याची कार्यवाही विधानमंडळाच्या नियम समितीकडून सुरु करण्यात आली. तथापि, बाराव्या विधानसभेचा कार्यकाळ संपल्याने आणि दिनांक ८ ऑक्टोबर, २०१४ रोजी तेरावी विधानसभा अस्तित्वात आल्याने तेराव्या विधानसभेत दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी मराठी भाषा विभागाच्या मा.मंत्री महोदयांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत प्रस्ताव सादर केला. "मराठी भाषा समिती" स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दोन्ही सभागृहांनी एकमताने संमत केल्यानंतर मराठी भाषा समितीचे नियम व इतर अनुषंगिक बाबी पूर्ण करुन महाराष्ट्र विधानसभा नियम २४४ (थ) व २४४ (द) अन्वये दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या ज्ञापनाद्वारे प्रथमच ही समिती घटित करण्यात आली आहे.

समितीची रचना (म.वि.स. नियम - २४४ (थ) अन्वये) :—

(१) विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनानंतर किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, मराठी भाषा समितीची रचना करण्यात येईल.

(२) या समितीमध्ये सदस्यांची एकूण संख्या १५ असेल. यापैकी ११ सदस्य विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि त्याच रितीने ४ सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून, सभापतींद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

मराठी भाषा समितीची कार्ये (म.वि.स. नियम - २४४ (द)) :—

(१) कार्यालयीन कामकाजांमध्ये मराठी भाषेच्या वापराबाबत आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.

(२) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये "मराठी" ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने मराठीच्या वापराचा आढावा घेण्यासाठी राज्यातील राज्य शासकीय/निम शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आढावा घेऊन त्याबाबत राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.

(३) इतर बाबतीत या सभागृहाच्या समितीसंबंधीत कार्यपद्धतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यांनाही ते नियम लागू होतील.

समिती प्रमुखांची नियुक्ती :— मराठी भाषा समितीच्या समिती प्रमुखांची मा.अध्यक्षांकडून नियुक्ती केली जाते.

समितीचा कालावधी :— समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत त्या पदावर राहतात. मंत्री समितीचा सदस्य असत नाही. एखादा सदस्य मंत्री म्हणून नियुक्त झाल्यास ते अशा नियुक्तीच्या दिनांकापासून समितीचा सदस्य असल्याचे स्थगित होते.

समितीवरील सदस्यत्वाचा राजीनामा :— सदस्यांना स्वत:च्या सहीने अध्यक्ष यांना लेखी कळवून समिती सदस्यत्वाचा राजीनामा देता येतो. तसेच जर एखादा सदस्य समितीच्या लागोपाठच्या दोन किंवा अधिक बैठकीस समिती प्रमुखांच्या परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास अशा सदस्यांस समितीतून काढून टाकण्याबाबत समिती प्रमुख अध्यक्ष यांना शिफारस करु शकतात.

समितीच्या बैठका :— विधानसभा नियमांतील नियम १७३ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठका, समिती प्रमुख निश्चित करतील अशा दिवशी व अशा वेळी भरतात. परंतु समिती प्रमुख सहजगत्या उपलब्ध नसतील तर, सचिवांना बैठकीचा दिनांक व वेळ ठरविता येतो. तसेच विधानसभा नियमांतील नियम १७६ मधील तरतूदीनुसार समितीच्या बैठका विधान भवनाच्या प्रसीमेत भरविण्यात येतील आणि बैठकीची जागा बदलून ती विधान भवनाच्या बाहेर ठेवणे आवश्यक असेल तर ती बाब अध्यक्षांच्या परवानगीसाठी ठेवण्यात येते व याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असतो.

समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजणे :— समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजण्यात येतील व त्यातील मजकूर दुसऱ्या कोणासही कळविण्यात येणार नाही किंवा त्याचा उल्लेख समितीच्या बाहेर कोणत्याही वेळी करण्यात येणार नाही. सभागृहासमोर ठेवलेल्या कागदपत्रात किंवा अभिलेखात असलेल्या माहितीचाच फक्त उल्लेख करता येईल.

शब्दश: कार्यवृत्त :—

(१) शब्दश: कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील आणि सभागृहासमोर ठेवण्यात आलेले अशा प्रकारचे कागदपत्र केवळ, जनतेसाठी खुले राहतील.

(२) संबंध पुरावा किंवा त्याचा कोणताही भाग मुद्रित करण्याचे समिती ठरवील तेव्हा तो वेगळ्या खंडाच्या स्वरुपात मुद्रित करण्यात येईल आणि समिती हाताळीत असलेल्या विषयावरील अहवालाचा तो एक भाग होईल.

बैठकीचे कार्यवृत्त :— समिती प्रमुखांच्या अनुमोदनासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय समितीच्या अभ्यासगटाच्या/उप समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्ताचे प्रारुप तयार करील.

कार्यवृत्त परिसृत करणे :— समितीच्या प्रत्येक बैठकीचे कार्यवृत्त समितीच्या सदस्यांकडे परिसृत करण्यात येईल.

अहवालाचे प्रारुप तयार करणे :— समितीने केलेल्या अहवालाचे प्रारुप तयार करण्यात येऊन ते समिती प्रमुखांना सादर करण्यात येईल.

अहवाल सादर करणे :— प्रत्येक अहवालाचे प्रारुप किंवा त्याचा भाग समितीच्या बैठकीमध्ये विचारात घेण्यात येईल आणि उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या बहुसंख्य सदस्यांच्या निर्णयाचा यात अंतर्भाव असेल. त्यानंतर समिती प्रमुख समितीच्या वतीने त्यावर स्वाक्षरी करतील व तो मुद्रित करण्यात येऊन सभागृहाला सादर करण्यात येईल.

अहवालाचे वितरण :- सभागृहात अहवाल सादर केल्यानंतर त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानसभा सदस्य आणि संबंधित विभाग इत्यादींना उपलब्ध करुन देण्यात येतात.

मराठी भाषा समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील मराठी भाषा समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

पहिला अहवाल (२०१७-२०१८) - (समितीने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई तसेच सातारा जिल्ह्यातील पुस्तकांचे गाव-भिलार व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई येथील कार्यालयांना दिलेल्या भेटी व बैठकीसंदर्भात) :—
(१) राज्यातील दिवाणी न्यायालयांच्या दाव्यांचे निकाल मराठीतून देण्यात येतात. माननीय उच्च न्यायालयामध्ये साक्षीच्या कामकाजाकरिता मराठीचा वापर करण्यात यावा अशी शासनाची मागणी आहे. याप्रकरणी माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित करण्यात आली आहे. परंतु न्यायालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत फारशी प्रगती झालेली नाही. याप्रकरणी राज्य सरकार आग्रही आहे. देशाच्या राज्यघटनेमध्ये अशी तरतूद आहे की, संबंधित राज्य शासनाने मागणी केल्यास त्या राज्य शासनाचे कामकाज स्थानिक भाषेत करता येईल. माननीय उच्च न्यायालयाच्या संमतीनेच हे कामकाज करता येणार आहे. पक्षकारांची बाजू मांडणे किंवा उलट तपासणी घेणे, मराठीतून कागदपत्रे सादर करणे यास माननीय उच्च न्यायालयाने संमती दिली तर त्याचा फायदा पक्षकारांना होऊ शकेल असे समितीच्या निदर्शनास आले.

सदर प्रकरणी मराठी भाषा विभागाने माननीय उच्च न्यायालयाने घटित केलेल्या समितीसमवेत तात्काळ बैठक आयोजित करुन कनिष्ठ न्यायालयांच्या कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्याबाबत चर्चा करावी व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(२) राज्यातील काही शाळा संपूर्णपणे इंग्रजी माध्यमांच्या आहेत. त्यामध्ये आयसीएसई, सीबीएसई व आयबी या शाळांचा समावेश असून त्यांचा कारभार केंद्रीय मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत चालतो. तथापि, आयसीएसई, सीबीएसई व आयबी शाळांमध्ये त्रिभाषा सुत्रानुसार मराठी भाषा व्दितीय किंवा तृतीयस्तरावर असणे आवश्यक असतानाही मराठी भाषेऐवजी जर्मन, फ्रेंच व तत्सम भाषा विद्यार्थ्यांचा गुणांक (स्कोअर) वाढविण्यासाठी पर्याय म्हणून निवडल्या जातात, असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

राज्यातील आयसीएसई, सीबीएसई व आयबी शाळांच्या अभ्यासक्रमामध्ये प्राथमिकस्तरापासून मराठी भाषा अनिवार्य करणे आवश्यक आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ यासारख्या संस्थांनी देखील याबाबतचा आग्रह धरलेला आहे. या शाळांमध्ये दुसरी भाषा ही मराठीच असली पाहिजे असा आग्रह या शाळांना मान्यता देताना व तद्नंतरच्या काळामध्येही धरणे आवश्यक आहे ही बाब विचारात घेता शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन यासंदर्भात वैधानिक (अधिनियम) तरतूद करावी, अशी समितीची शिफारस आहे.

(३) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव मराठी भाषा विभागाद्वारे केंद्र शासनाकडे सन २०१३ मध्ये पाठविण्यात आला होता. **अभिजात भाषेचा दर्जा** देण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयाला हरकत घेणारी एक याचिका मद्रास उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेचा निकाल माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये लागलेला असून, सदर प्रकरण खारीज झाल्यामुळे अभिजात भाषेच्या दर्जासाठी कोणत्याही प्रकारच्या न्यायालयीन प्रक्रियेची आवश्यकता नसल्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाद्वारे मराठी भाषा विभागास कळविण्यात आली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री व मा. मराठी भाषा मंत्री यांनी केंद्र शासनाच्या संबंधित विभागास आणि माननीय पंतप्रधान महोदयांना देखील पत्रे पाठविलेली आहेत.

केंद्र शासनाकडून देशातील ज्या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे त्याच धर्तीवर मराठी भाषेला देखील अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी मराठी भाषा विभागाने केंद्र शासनाच्या संबंधित विभागाकडे तात्काळ पाठपुरावा करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.

(४) मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखाली चार कार्यालये कार्यरत असून त्यांची उद्दिष्टे स्वतंत्र आहेत. मराठी भाषा विभागांची जिल्हापातळीवर कोणतीही कार्यालये कार्यरत नाहीत, त्यामुळे मराठी भाषा विभागाला उपक्रम राबविताना विविध अडचणी येतात. तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धनाबाबतचे उपक्रम राबविण्याकरीता विभागाला शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाची मदत घ्यावी लागते. त्यामुळे संचालक, ग्रंथालय कार्यालय हे मराठी भाषा विभागाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव मराठी भाषा विभागाने दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सादर केला आहे असे समितीच्या निदर्शनास आले.

मराठी भाषा विभागाला जिल्हास्तरावर उपक्रम राबविण्याकरिता शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाची मदत घ्यावी लागते. त्यामुळे संचालक, ग्रंथालय कार्यालय हे मराठी भाषा विभागाला जोडण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सादर

करण्यात आला आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करावी जेणेकरुन मराठी भाषा विभागाला मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत विविध उपक्रम राबविण्याकरिता अडचणी येणार नाहीत, अशी समिती शिफारस करीत आहे.

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी / तिच्या संवर्धनासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम साजरे करण्यात आले आहेत.

१) श्री. वि.वा.शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी जन्मदिवस **" मराठी भाषा गौरव दिन "** म्हणून साजरा करण्यात येतो.

अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२० मध्ये महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विद्यमाने **" मराठी भाषा गौरव दिन "** गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.४५ वाजेपर्यंत विधान भवन प्रांगणात तसेच मध्यवर्ती सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणे, तसेच ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ दिंडी, १२ बलुतेदारांचे चित्रमय दर्शन इत्यादीचे आयोजन करण्यात आले. मध्यवर्ती सभागृहामध्ये मराठी भाषेसंदर्भात मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री तसेच मराठी भाषेचे अभ्यासक यांची मा.महसूल मंत्री, मा.मराठी भाषा मंत्री, मा.संसदीय कार्य मंत्री तसेच दोन्ही सभागृहातील मा.विरोधी पक्षनेते यांच्या सन्माननीय उपस्थितीत भाषणे व **" इये मराठीचिये नगरी "** हा मराठी भाषाविषयक सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

२) "माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम " यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस **"वाचन प्रेरणा दिन "** म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयात वाचन प्रेरणा दिन शुक्रवार, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत: वाचलेल्या उत्कृष्ट मराठी साहित्याबद्दलची तसेच अन्य भाषेतील असे साहित्य की, ज्याचा मराठी भाषेत अनुवाद उपलब्ध आहे अशा साहित्याबद्दलची माहिती उपस्थितांसमोर सादर करण्यात आली.

*****

(ब) दोन्ही सभागृहांच्या स्वतंत्र समित्या

(१४) कामकाज सल्लागार समिती

(Business Advisory Committee - Legislative Assembly)

समितीची स्थापना :-

महाराष्ट्र विधानसभा नियम २०० अन्वये अध्यक्षांनी विधानसभा कामकाज सल्लागार समितीची नियुक्ती विधानसभा अधिवेशनाच्या सुरुवातीस किंवा यथास्थिती, वेळोवेळी करावयाची असते. म्हणून प्रत्येक अधिवेशनापूर्वी समिती पुर्नगठित करावयाची किंवा कसे यासंबंधीचे आदेश अध्यक्षांकडून योग्य त्या वेळेस प्राप्त करून घेण्यात येतात.

महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी अधिवेशन कालावधीत सभागृहात करावयाच्या कामकाजासंबंधी निर्णय घेण्यासाठी विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक; शक्यतोवर विधानसभेचे प्रत्येक अधिवेशन सुरु होण्यापूर्वी १५ दिवस अगोदर आयोजित करण्यात येते. सदर बैठकीत सर्वसाधारणपणे विधानसभा अधिवेशन कालावधीत नियमित (प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना इ.) कामकाजाव्यतिरिक्त उपलब्ध असलेल्या कालावधींमध्ये कोणत्या दिवशी कोणते कामकाज करण्यात यावे. (उदा. मा.अध्यक्षांतर्फे मांडण्यात येणारा प्रस्ताव, सभागृहाचे नेते यांचा प्रस्ताव, मा. मुख्यमंत्री यांचा शासकीय ठराव, सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातर्फे मांडण्यात येणारे ठराव, प्रस्ताव, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, अभिनंदनपर प्रस्ताव (अभिष्टचिंतन प्रस्तावासह), एखाद्या विशेष महत्वाच्या विषयावर विशेष चर्चा, अशासकीय कामकाज - अशासकीय विधेयके व ठराव, अर्धा तास चर्चा इ.) व कोणत्या कामकाजासाठी किती वेळेचे नियत वाटप करण्यात यावे याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात येतो.

अशा प्रकारे निःसत्र कालावधीत विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित केल्यानंतर सदर बैठकीत विधानसभेच्या त्या-त्या अधिवेशन कालावधीत करावयाच्या कामकाजासंबंधी कार्यक्रम निश्चित केल्यानंतर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची व बैठकींच्या दिनदर्शिकेची प्रत विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांना पत्राद्वारे पाठविण्यात येते.

तसेच अधिवेशन सुरू असताना सभागृहासमोरील कामकाजाचे विनियमन करण्याकरिता अध्यक्ष यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार समितीची बैठक आयोजित करण्यात येते. अधिवेशन कालावधीत कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित केल्यास, अशा बैठकीत घेतलेल्या निर्णयासंबंधीच्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्यात असा प्रस्ताव समितीचे बैठकीनंतर त्याचदिवशी मा. संसदीय कार्य मंत्री विधानसभा सभागृहात मांडतात. सर्वसाधारणपणे सदर प्रस्ताव एकमताने/बहुमताने संमत करण्यात येतो.

महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत राज्यात/देशात वेगाने पसरत चाललेल्या कोरोना-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर सभागृहासमोरील कामकाजाचे विनियमन करण्याकरिता बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजी विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेण्यात आलेला **निर्णय** व त्या अनुषंगाने मा. संसदीय कार्यमंत्री यांनी विधानसभा सभागृहात, समितीने घेतलेल्या निर्णयासंबंधीच्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्यात असा **सभागृहात मांडलेला प्रस्ताव** उदाहरणादाखल खालील दर्शविल्याप्रमाणे आहे :–

मा. संसदीय कार्यमंत्री : महोदय, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन गुरुवार, दिनांक १२ मार्च ते शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२० पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला :-

गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२० :—	(१) शासकीय कामकाज.
	(२) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).
	(३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव.
शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२०:—	(१) शासकीय कामकाज.
	(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).
	(३) अशासकीय कामकाज (विधेयके).
शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२०:- सुट्टी	
रविवार, दिनांक १५ मार्च, २०२०:- सुट्टी	
सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२०:—	(१) शासकीय कामकाज
	(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस).
मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२०:—	(१) शासकीय कामकाज.
	(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस)
	(३) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव.
बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२०:—	(१) शासकीय कामकाज.
	(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा दिवस)
गुरुवार, दिनांक १९ मार्च, २०२०:—	(१) शासकीय कामकाज.
	(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा व शेवटचा दिवस) (चर्चारोध)

(३) विनियोजन विधेयक

(४) अंतिम आठवडा प्रस्ताव

शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२०:- (१) शासकीय कामकाज

(२) अशासकीय कामकाज (ठराव)

समितीने घेतलेल्या निर्णयासंबंधीच्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्यात असा मा. संसदीय कार्य मंत्री यांनी सभागृहात मांडलेला प्रस्ताव :—

मा. संसदीय कार्य मंत्री : महोदय, कामकाज सल्लागार समितीने केलेल्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्यात असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो. (प्रस्तावाला प्रस्तुत अहवाल कामकाज सल्लागार समितीला परत पाठविला जावा अशा आशयाची सुधारणा दिली जाऊ शकते व प्रस्तावावरील चर्चेला अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ दिला जाऊ नये व प्रत्येकाला ५ मिनिटे बोलण्यासाठी दिली जाऊ शकतात). (म.वि.स. नियम २०३)

मा. अध्यक्ष : प्रश्न असा आहे की, कामकाज सल्लागार समितीने केलेल्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्या. "अनुकूल" असतील त्यांनी "होय" म्हणावे, (थोडे थांबून) "प्रतिकूल" असतील त्यांनी "नाही" म्हणावे, (थोडे थांबून) "होय" चे बहुमत आहे, "होय" चे बहुमत आहे, प्रस्ताव संमत झाला.

या समितीत मा. अध्यक्ष यांचेसह जास्तीत जास्त बारा सदस्य असतात. मा. अध्यक्ष हे या समितीचे प्रमुख असतात. तसेच या समितीत मा. मुख्यमंत्री, संसदीय कार्यमंत्री. विरोधी पक्षनेता आणि विरोधी पक्षातील अन्य पक्ष प्रमुख यांचा अंतर्भाव असतो.

तसेच, मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार या समितीत मा. उपाध्यक्ष. महाराष्ट्र विधानसभा, मा. संसदीय कार्य राज्यमंत्री (असल्यास) व विधानसभेचे माजी अध्यक्ष, विधानसभेचे सदस्य म्हणून असल्यास त्यांचा निमंत्रित म्हणून अंतर्भाव करण्यात येतो.

*****

(१५) **विशेषाधिकार समिती**

(Committee on Privileges - Legislative Assembly)

पूर्वेतिहास :—

विशेषाधिकार समिती प्रथमतः तत्कालीन मुंबई राज्यात दिनांक ३० मार्च, १९५३ रोजी स्थापन करण्यात आली. त्यावेळी ह्या समितीचे समिती प्रमुख, श्री. के. के. शहा हे होते. लोकसभेत ही समिती प्रथमतः दिनांक ०१ एप्रिल, १९५० रोजी स्थापन करण्यात आली.

समितीची रचना - विधानसभा नियमातील नियम २७८ अन्वये यथास्थिती, विधानसभेच्या अधिवेशनाच्या सुरुवातीस, किंवा वेळावेळी, अध्यक्ष विधानसभेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त पंधरा सदस्यांची विधानसभा विशेषाधिकार समिती नामनिर्देशित करतात. समिती सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

समितीचे कार्य - विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रश्नाची तपासणी समितीने केल्यानंतर, संबंधित व्यक्तीस आपले मुद्दे स्पष्ट करण्याची संधी दिल्यावर, प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीच्या संदर्भात त्यात विशेषाधिकाराचा भंग होतो किंवा कसे आणि होत असल्यास त्याचे स्वरुप व तो होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती, ठरविते आणि त्याविषयी आपल्या शिफारशींसह अहवाल सभागृहास सादर करते.

विधानसभा विशेषाधिकार समितीपुढे प्रकरण चौकशीसाठी आल्यावर अशा चौकशीसाठी साक्षीदारांस बोलविण्यात येते किंवा त्यांना समितीच्या उपयोगासाठी आवश्यक ते कागदपत्र हजर करावे लागतात.

समितीपुढे सादर करण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांचा अभ्यास करुन त्यात सकृतदर्शनी विशेषाधिकार भंग झाला नसल्याचे समितीचे मत झाले असेल तर त्यानुसार समिती सभागृहास कळविते.

अशा प्रकरणी सकृतदर्शनी विशेषाधिकार भंग झाल्याचे आढळल्यास व या संदर्भात अधिक चौकशीची आवश्यकता आहे असे समितीचे मत झाले तर समिती ज्या व्यक्तीविरुद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला असेल त्याला कारणे दाखवा नोटीस पाठवून लेखी निवेदन मागवू शकते. अशा प्रकारे संबंधितांकडून लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतर त्यावर विचारविनिमय करुन समिती प्रकरणाबाबत विचारार्थ मुद्दे निश्चित करते. आवश्यक तेव्हा साक्षीपुराव्यासाठी संबंधितांना बोलविले जाते. साक्ष झाल्यावर किंवा पुराव्याचे कागदपत्र बघितल्यानंतर आणि विचारविमर्श पूर्ण झाल्यावर समिती प्रत्येक मुद्यांवर निष्कर्ष काढते. त्यानंतर अंतिम अहवाल तयार करुन त्यास समिती प्रमुखांची मान्यता घेऊन अहवाल सभागृहात चर्चेसाठी ठेवला जातो. त्यानंतर सभागृहाने अहवालावर घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यक ठरणारी पुढील कार्यवाही केली जाते.

समिती एखाद्या प्रकरणी विशेषाधिकार भंग झाला असल्याचे निष्कर्षाप्रत आल्यास दोषी ठरविण्यात आलेल्या व्यक्तींना देण्यात यावयाच्या शिक्षेची शिफारस अहवालाद्वारे करते. सर्वसाधारणपणे शिक्षांचे स्वरुप खालीलप्रमाणे असते :-

(अ) सभागृहाची नापसंती दोषी व्यक्तीस कळविणे.

(ब) दोषी व्यक्तीस सभागृहासमोर आणून समज देणे.

(क) दोषी व्यक्तीस कारावासाची शिक्षा देणे.

(ड) वृत्तपत्रांबाबत - जाहीर दिलगिरी प्रदर्शित करणे/वार्ताहर गॅलरी पास रद्द करणे.

दोषी व्यक्तींनी क्षमायाचना केल्यास शिक्षेची शिफारस करण्यात येऊनही सभागृह त्याप्रकरणी सुनावलेली शिक्षा मोठ्या मनाने माफ करते अथवा कमी करते.

विशेषाधिकारांचा वापर अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये करणे अपेक्षित असून सभागृहाला व सदस्यांना त्यांची सभागृहाशी संबंधित कर्तव्ये पार पाडताना प्रत्यक्ष हस्तक्षेप होत असेल वा जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असतील वा तसा प्रयत्न करण्यात येत असेल तरच सभागृहाने आपली विशेषाधिकारांतर्गत असलेली दंडात्मक अधिकारीता वापरणे उचित ठरते आणि तेही शक्यतो अत्यंत अल्प प्रमाणात वापरावी कारण लोकशाही पद्धतीमध्ये विशेषाधिकार हे लोकांच्या वतीने वापर करावयाचे अधिकार असून त्याचा लोकांविरुद्ध वापर करणे अपेक्षित नाही.

विधानमंडळ ही लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेली लोकशाहीतील सर्वोच्च संस्था असल्याने या संस्थेने विशेषाधिकारांची दंडात्मक अधिकारीता वापरताना अधिक संयम बाळगणे उचित ठरेल.

विशेषाधिकार समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :–

महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवालांतील विशेषाधिकार समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

सभागृहाने विशेषाधिकार भंग व अवमानाबद्दल शिक्षात्मक कार्यवाही केलेली काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) "मराठा" प्रकरण (कालावधी १९६४-६६) — "दै.मराठा" या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै.मराठाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्र. के. अत्रे यांना समज देण्यात यावी अशी शिफारस समितीने केली. तथापि, श्री. अत्रे यांनी सभागृहाची बिनशर्त माफी मागितल्यानंतर प्रकरण संपविण्यात आले.

(२) श्री.ढाकणे प्रकरण (कालावधी सन १९६८) — श्री. बबनराव ढाकणे यांनी मा.अध्यक्षांच्या गॅलरीतून सभागृहामध्ये घोषणा देऊन व पत्रके फेकून सभागृहाच्या कामकाजात अडथळा व व्यत्यय आणल्याप्रकरणी श्री. ढाकणे यांना ७ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(३) "मुंबई सकाळ" प्रकरण (कालावधी १९८१-८४) — दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रात लिहिलेल्या लिखाणातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्राचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. माधव गडकरी यांना सभागृहाची तीव्र नापसंती कळविण्यात आली होती.

(४) "आपलं महानगर" प्रकरण (कालावधी १९९२-९४) — "आपलं महानगर" या सायंदैनिकात प्रसिद्ध केलेल्या लिखाणातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग प्रकरणी "आपलं महानगर" या सायंदैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. निखिल वागळे यांना ३ दिवसांची कारावासाची शिक्षा तसेच विशेषाधिकार समितीच्या अधिकाराचा अधिक्षेप करणारे आव्हानात्मक पत्र लिहिल्याबद्दल अतिरिक्त एक दिवस अशी एकूण ४ दिवस कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(५) "दै. देशोन्नती" प्रकरण (कालावधी २००१-२००३) — "दै.देशोन्नती" या अकोला येथून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रात पंचायत राज समितीसंबंधातील आक्षेपार्ह मजकुरातून उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. प्रकाश पोहरे यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलाविण्यात येऊन समज देण्यात आली.

(६) "दै. मापदंड" प्रकरण (कालावधी २००१-२००४) — "दै.मापदंड" या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या संपादकीयात विधीमंडळाच्या पंचायत राज समितीवर करण्यात आलेल्या टिकाटिप्पणीमुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी सदर दैनिकाचे संपादक श्री. संजय जेवरीकर यांनी समितीसमोर व्यक्त केलेली माफी तसेच प्रसिद्ध केलेली जाहीर दिलगिरी विचारात घेऊन प्रकरण संपविण्यात आले.

(७) "श्री.मनजितसिंग सेठी" प्रकरण (कालावधी २००५) — राज्याचे उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, मंत्री यांनी विधानसभेत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने श्री. मनजितसिंग सेठी, अध्यक्ष, बार मालक असोसिएशन यांनी धमकीवजा शब्दात त्याचा निषेध केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. मनजितसिंग सेठी यांना ९० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(८) "साप्ताहिक ससेमिरा" प्रकरण (कालावधी २००६-२००७) — मा. अध्यक्ष, विधानसभेचे अध्यक्ष या नात्याने आपले कर्तव्य बजावत असताना मा.अध्यक्षांविषयी टिकाटिप्पणी करणारी, त्यांची बेअदबी व अवमान करणारी तसेच त्यांची जनमानसातील प्रतिमा डागाळणारी वस्तुस्थितीशी विसंगत विधाने प्रसिद्ध केल्यामुळे उद्‌भवलेल्या मा.अध्यक्षांच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी साप्ताहिक ससेमिराचे संपादक व प्रकाशक श्री. मधुकर लोंढे यांना १० दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

(९) "श्री. नंद लाल" प्रकरण (कालावधी २००६-२००८) — विधानसभा विशेषाधिकार समितीने मागविलेला खुलासा स्वत:चे स्वाक्षरीने पाठविण्यास टाळाटाळ करुन तसेच सदरहू सूचनेच्या अनुषंगाने समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहण्यास नकार दिल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. नंद लाल, तत्कालीन राज्य निवडणूक आयुक्त यांना २ दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील विशेषाधिकार समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी तसेच सभागृहाने विशेषाधिकार भंग व अवमानाबद्दल शिक्षात्मक कार्यवाही केलेली काही प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

(१०) श्री. श्रीनिवास कर्वे प्रकरण (कालावधी २०१०-१३) — श्री. श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांना महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या बैठकीस साक्षीसाठी उपस्थित राहण्याबाबत समितीने कळविले असतानाही त्यांनी वेगवेगळी कारणे दाखवून समितीच्या बैठकीस हेतूपुरस्सर गैरहजर राहिल्याने उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणी श्री. श्रीनिवास कर्वे यांना तीन दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस समितीने अहवालात केली. तद्‌नंतर श्री. श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांना ३ दिवसांऐवजी १ दिवसाची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी, असा सुधारीत प्रस्ताव सभागृहाने संमत केला. त्यानुसार श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांनी दिनांक ३१/०७/२०१३ रोजी १ दिवसाची दिवाणी कारावासाची शिक्षा भोगली.

(११) मे. ट्रिटॉप प्रकरण (कालावधी २०१०-१४) — सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश महेता, श्री. देवेंद्र फडणवीस तसेच श्री. एकनाथराव खडसे-पाटील, माननीय विरोधी पक्षनेते, विधानसभा व इतर सन्माननीय सदस्यांनी दिनांक ८ एप्रिल, २०१० रोजी विधानसभेत "गॅमन नीळकंठ रिॲलिटी कॉर्पोरेशन" या भागीदारी संस्थेच्या नीळकंठ किंग्डम, विद्याविहार या प्रोजेक्टच्या संदर्भात लक्षवेधी सूचना दिल्याने संतापून मे. ट्रिटॉप हौसिंग ॲण्ड इस्टेट डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या कंपनीने सन्माननीय सदस्यांना व मा. गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना

वकिलामार्फत नोटीस पाठविल्याने व त्यायोगे सभागृहाच्या कामकाजावर टीकाटिप्पणी केल्याने तसेच श्री. दिनेश पटेल, संचालक, मे. ट्रीटॉप हौसिंग ॲण्ड इस्टेट डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांनी यासंदर्भातील लेखी खुलाशात सन्माननीय सदस्यांना संसदीय आयुधाचा वापर करण्याबाबतचा अनाहूत सल्ला दिल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. दिनेश पटेल, संचालक, मे. ट्रीटॉप हौसिंग ॲण्ड इस्टेट डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांना सभागृहाचे न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी अशी शिफारस समितीने केली होती व तो प्रस्ताव सभागृहाने एकमताने संमत केला. त्यानुसार श्री. दिनेश पटेल यांना दिनांक १२ जून २०१४ रोजी सभागृहाचे न्यायासनासमोर बोलविण्यात येऊन मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचेद्वारे समज देण्यात आली.

(१२) "श्री. जी. एन. वळवी प्रकरण" (कालावधी २०११-१२) — आदिवासी विकास विभागाच्या नंदुरबार व यावल येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारामध्ये श्री. जी. एन. वळवी, प्रकल्प अधिकारी यांचा सहभाग असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेते व इतर सदस्यांनी विधानसभेत लक्षवेधी सुचनेवरील चर्चेच्या वेळी केल्याने श्री.जी. एन. वळवी यांनी चिडून जाऊन आकसाने मा.विरोधी पक्षनेत्यांविरुद्ध जिल्हा पोलीस प्रशासनाकडे अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची तक्रार करुन तसेच ह्या विषयी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. जी. एन. वळवी यांना ३ (तीन) दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी अशी शिफारस समितीने अहवालात केली. तद्‌नंतर श्री. जी. एन. वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगांव यांना ३ दिवसांऐवजी २ दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा देण्यात यावी, असा सुधारीत प्रस्ताव सभागृहाने संमत केला. त्यानुसार श्री. जी. एन. वळवी, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल, जि.जळगांव यांनी दिनांक १४ एप्रिल २०१२ ते १५ एप्रिल २०१२ रोजी २ दिवसांची दिवाणी कारावासाची शिक्षा भोगली.

(१३) श्री.चंद्रकांत गुडेवार प्रकरण (कालावधी २०१६-१८) — श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी अमरावती महानगरपालिका क्षेत्राकरिता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांचा प्रस्ताव सादर करताना या योजनेसंदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना क्र.८.६ नुसार स्थानिक विधानसभा सदस्य डॉ.सुनिल देशमुख यांच्याशी विचारविनिमय करणे आवश्यक असतानाही सन्माननीय सदस्य यांचे मत विचारात न घेतल्याने व या प्रक्रियेमध्ये सहभागी करुन न घेतल्याने तसेच त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य लोकांना देत असलेली माहिती चुकीची असून व योजनेला अंतिम मंजूरी देण्याचे अधिकार राज्य शासनाचे असल्याचे वृत्तपत्रात जाहिर केल्याने उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणी श्री. चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना सभागृहाचे न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी. तसेच विधीमंडळ सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाद्वारे निर्गमित केलेल्या दिनांक २७ जुलै, २०१५ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्वाचे उल्लंघन केल्याबाबत त्यांच्या गोपनीय अभिलेखात प्रतिकूल नोंदी घ्याव्यात व त्यांना सन्माननीय विधानमंडळ सदस्यांचा अवमान केल्याबद्दल मुख्य सचिवांद्वारे त्यांना समज द्यावी तसेच त्यांच्या उर्वरित सेवाकाळात प्रशासनातील कोणत्याही कार्यकारी पदावर नेमण्यात येऊ नये अशी शिफारस समितीने अहवालात केली. त्यानुषंगाने मा. मुख्यमंत्री यांनी श्री. चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना

सन्माननीय सदस्यांचा पर्यायाने सभागृहाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अवमान केल्याबद्दल वा अवमान घडवून येईल अशी परिस्थिती उद्‌भवेल अशी कृती वा अकृती केल्याबद्दल सभागृहाचे न्यायासनासमोर बोलावून समज देण्यात यावी असा सुधारित प्रस्ताव सभागृहाने संमत केला. त्यानुसार श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलवून समज देण्यात आली.

*****

(१६) **विनंती अर्ज समिती**

(Committee on Petitions - Legislative Assembly)

रचना व कार्यपद्धती :—

समितीची रचना (म.वि.स. नियम - २७१) :— विधानसभा विनंती-अर्ज समितीची रचना सर्वप्रथम १५ मार्च, १९५७ रोजी झाली. प्रत्येक वर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिती नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य असेल तितक्या लवकर विनंती-अर्ज समितीची रचना करण्यात येईल. विनंती-अर्ज समितीवर मा.उपाध्यक्ष, विधानसभा हे नियमानुसार समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समिती प्रमुख राहतील व इतर दहा सदस्यांची नियुक्ती नामनिर्देशनाद्वारे मा.अध्यक्ष करतील. परंतु उपाध्यक्षांचे पद रिक्त असेल तर अध्यक्ष, असे पद भरेपर्यंत कार्यकारी समिती प्रमुख म्हणून काम करण्यासाठी समितीच्या सदस्यांमधून एका सदस्यास नामनिर्देश करतील. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

समितीची कर्तव्ये (म.वि.स. नियम-२७२)(३) :— मा.अध्यक्षांनी नियम २७२ (१) अन्वये समितीकडे विचारार्थ पाठविलेल्या विनंती अर्जात समाविष्ट तक्रारी/सूचनासंबंधी विधानसभा सभागृहास अहवाल सादर करतेवेळी परिक्षणाधीन बाबीस लागू होतील असे निश्चित स्वरुपातील उपाय सूचविणे किंवा यापुढे अशा बाबींना कसा प्रतिबंध घालता येईल, त्याबाबत उपाययोजना सुचविणे हे विनंती-अर्ज समितीचे प्रमुख कर्तव्य आहे.

समितीच्या कामकाजाचे स्वरुप (नियम २६६ ते २७२) :— एखाद्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीसंबंधी काही तक्रारी असल्यास अथवा त्याबाबत विधायक स्वरुपाच्या काही सूचना असल्यास त्यासंबंधी विनंती-अर्ज विधानमंडळाला सादर करण्याचा उपजत हक्क जनतेला आहे. या तत्वानुसार जनतेने लोकप्रतिनिधी मार्फत विधानसभा सभागृहाला विनंती-अर्ज सादर करण्यासंबंधी व त्या अर्जावर सभागृहाने विचार करण्यासंबंधी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीच्या नियमांचा समावेश विधानसभा नियमांत करण्यात आला आहे.

साधारणतः पुढील बाबीसंबंधी विनंती-अर्ज मा.अध्यक्षांच्या संमतीने सभागृहाच्या सदस्यांमार्फत सभागृहाला सादर करता येतो :—

(१) **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेली अथवा सभागृहात पुरःस्थापित करण्यात आलेली विधयके.

(२) सभागृहासमोर अनिर्णित असलेले कामकाज.

(३) न्यायालयाच्या कक्षेत न येणाऱ्या बाबी.

(४) ठराव, विधेयके इत्यादी प्रकारे कोणत्याही स्वरुपात सभागृहात येऊ न शकणाऱ्या बाबी.

(५) कायदा, नियम याद्वारे कोणत्याही स्वरुपाची उपाययोजना उपलब्ध नसलेल्या बाबी.

विनंती-अर्जात उपस्थित केलेला विषय राज्य शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असेल तरच विनंती-अर्ज समिती त्यासंबंधी शासनाला शिफारस करु शकते. मात्र सामान्यतः ज्या बाबी सभागृहात अन्य मार्गाने उपस्थित करता येतात त्यासंबंधीचा विनंती-अर्ज विधानसभेस सादर करण्यास संमती दिली जात नाही.

विनंती-अर्जातील विषय हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कसा महत्त्वाचा आहे. त्या विषयाला लोक किती महत्व देतात आणि त्या विषयाकडे अथवा तक्रारीकडे शासनाने त्वरीत लक्ष देणे कसे आवश्यक आहे. या बाबींचा उल्लेख अर्जदाराने आपल्या विनंती-अर्जात करणे आवश्यक असते. विनंती-अर्ज विधानसभेस उद्देशून असणे आणि त्यात तक्रारीचा साक्षेपाने उल्लेख असणे आवश्यक आहे. विनंती-अर्जावर अर्जदाराचे नाव, पत्ता व सही असली पाहिजे.

विनंती-अर्जात अन्य सदस्यांच्या खाजगी जीवनाचा उल्लेख असता कामा नये. तसेच ज्या विधेयकांवर वा ठरावावर पूर्वीच्या वर्षभरात चर्चा झाली असेल असा विषय विनंती-अर्जात असू नये. विनंती-अर्जात निश्चित स्वरुपाच्या तक्रारी किंवा सूचना नसेल, किंवा राजकीय हेतू प्रतिबिंबीत होत असेल किंवा व्यक्तिगत तक्रारसंबंधी उल्लेख असेल तर विनंती-अर्ज अस्वीकार्य ठरतो. केंव्हा केंव्हा विनंती-अर्जातील बाबीसंबंधात वस्तुस्थिती शासनाकडून जाणून घेणे आवश्यक असल्यास तसे केल्यानंतर विनंती अर्जाची स्विकार्हता ठरविण्यांत येते.

विधानसभेला सादर करावयाचा विनंती-अर्ज सभागृहाच्या एखाद्या सदस्यानेच सादर केला पाहिजे. मात्र तो सादर करण्यापूर्वी त्याकरीता प्रथम मा.अध्यक्षांची संमती घेणे आवश्यक आहे. विनंती-अर्ज सादर करणारा सदस्य अर्जातील तपशीलाबाबत व त्याच्या सत्यतेबाबत जबाबदार असतो (म.वि.स. नियम-२६८). विनंती-अर्ज विधानसभेत सादर झाल्यानंतर तो मा.अध्यक्षांकडून विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ निर्देशित करण्यात येतो. विनंती अर्जात नमूद केलेल्या तक्रारी किंवा अडचणी याबाबतची माहिती संबंधित मंत्रालयीन विभागाकडून ३० दिवसांत मागावून ती माहिती समिती विचारात घेत असते व त्या माहितीचे परिशीलन करताना समिती संबंधित अधिकारी, विनंती-अर्ज सादर करणारे सदस्य व विनंती-अर्जावर सह्या करणाऱ्या व्यक्ती यांची आवश्यकतेनुसार साक्ष घेत असते. समिती विनंती-अर्जात उल्लेखिलेल्या स्थळांनाही आवश्यक वाटल्यास, प्रत्यक्ष भेट देऊनही पाहणी करु शकते. विभागाने पाठविलेली माहिती साक्षीदारांनी साक्षीच्या वेळी पुरविलेली माहिती व प्रत्यक्ष पाहाणी करुन मिळालेली माहिती याच्या आधारे समिती संबंधीत विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती आपला अहवाल विधानसभा सभागृहाला सादर करीत असते.

विनंती अर्ज समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील विनंती अर्ज समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

(१) नागपूर शहरातील मौजा परसोडी येथील कामगार कॉलनी व संत तुकडोजी नगर येथील नागरिकांना जामिनीचे मालकी हक्काचे पट्टे मिळणे या विषयावरील श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांच्या

विनंती अर्जावरील विधानसभा विनंती अर्ज समितीचा अहवाल.) (अहवाल दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला) :—

(I) शासनाने याप्रकरणी जलद गतीने काम करणे आवश्यक होते, मात्र त्या गतीने काम होतांना दिसत नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करते. त्याचप्रमाणे उर्वरित पात्र व्यक्तींना लवकरात लवकर पट्टे देण्यासंदर्भात शीघ्रतेने कालबद्ध कार्यक्रम आखुन तीन महिन्यांत किती प्रकरणे प्राप्त झाली व त्यापैकी किती निकाली काढण्यात आली याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्यात यावा. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(II) स्थानिक लोकांचे सहकार्य घेवून लवकरात लवकर उर्वरित प्रकरणांचा निपटारा करण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.

(III) उर्वरित ठिकाणी सर्व संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या नावे करार करून प्रत्येकाची व्यक्तीगत नोंद करण्यात यावी व प्रत्येकाच्या नावावर किती भाडेपट्टा आहे याची नोंद असलेली प्रत प्रत्येक वैध पट्टेधारकास अथवा लाभार्थ्यास देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.

(२) **सिन्नर तालुक्यातील (जि.नाशिक) गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजनेस कर्जमाफी मिळणेबाबत या विषयावरील श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानसभा विनंती अर्ज समितीचा अहवाल.) (अहवाल दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला):—** गोदावरी उपसा जलसिंचन योजनेच्या कर्जदार शेतकरी शासनाच्या कोणत्याही कर्ज माफी योजनेच्या निकषात बसत नसल्याने शासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यावर असलेल्या कर्जाचा बोजा त्वरीत कमी करावा, ७/१२ वरील बोजा कमी करून त्यांना शक्य तितक्या लवकर कर्ज पुरवठा होईल असे पहावे. सदरील शेतकऱ्यांना कर्जातून व दुष्काळातून बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने कर्जमुक्ती घोषणा केली आहे. त्याचा लाभ या शेतकऱ्यांना होईल अशा प्रकारचे योग्य ते आदेश शासनाने द्यावेत. सदर उपसा जलसिंचन योजना जर काही प्रयत्न करून आर्थिक भार शासनाने उचलून सुरू होत असेल तर तेही तपासून पहावे जेणे करून गेली ३५ वर्षांपासून पाण्यापासून वंचित असलेला शेतकरी खऱ्या अर्थाने मुक्त होईल व नव्याने तो कामास सुरूवात करेल व आपले आर्थिक आयुष्य सुधारेल. कर्जामुळे काही शेतकऱ्यांच्या मुलांना आपले शिक्षण पूर्ण करता आलेले नाही. त्यांच्या मुलांसाठी काही सोईसुविधा देऊन ते जर आपल्या पायावर उभे रहात असतील तर शासनाने त्यांना अल्पदरात बँकेकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करून द्यावा.

सबब, समिती शिफारस करते की, शासनासाठी राज्यातील सर्वच शेतकरी, एकसमान असल्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील धुळे व जळगाव या जिल्ह्यांतील उपसा जलसिंचन योजेनांस केलेल्या कर्जमाफी प्रमाणे गेली ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतकऱ्यांचा प्रश्न त्वरित निकाली काढण्यासाठी राज्य शासानाने हा विषय अत्यंत तातडीचा व शेतकऱ्यांच्या हिताचा आणि महत्त्वाचा समजून तो राज्य मंत्रिमंडळापुढे आणून विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीच अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा.

*****

(१७) आश्वासन समिती

(Committee on Government Assurances-Legislative Assembly)

समितीची रचना, कार्यपद्धती व कामे :—

(अ) समितीची स्थापना :— कार्यकारी प्रशासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण (Effective and meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने विधानमंडळ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. सभागृहात विविध संसदीय आयुधाद्वारे उपस्थित केलेल्या चर्चेस उत्तरे देताना मा. मंत्रिमहोदयांकडून संबंधित बाबींसंबंधी वेगवेगळी कार्यवाही, निदर्शक, आश्वासने, अभिवचने (Assurances/ Promises, Undertakings) दिली जातात. अशी आश्वासने एखाद्या समस्येसंबंधी/प्रश्नासंबंधी विचार करण्यात येईल, कार्यवाही करण्यात येईल, सभागृहाला माहिती सादर करू, कायदे करू, नियम करण्यात येईल अशा स्वरूपाची असतात. संसदीय लोकशाहीमध्ये सभागृहात दिलेल्या आश्वासनांना एक प्रकारचे पावित्र्य व गांभीर्य असते (Solemn) त्यामुळे अशा आश्वासनांची, अभिवचनांची पूर्तता प्रशासन यंत्रणेमार्फत करण्यात येते किंवा कसे यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी (In order to watch the implementation of such assurances) आश्वासन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

आश्वासन समिती ही सभागृहाची महत्त्वाची समिती आहे. तत्कालीन विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार नामनियुक्त केलेल्या नियम समितीच्या शिफारशीनुसार लोकसभेच्या धर्तीवर दिनांक २ डिसेंबर, १९५९ रोजी विधानसभा आश्वासन समिती प्रथम गठीत करण्यात आली. सुरुवातीस या समितीचे एकूण १५ सदस्य होते. नियमात सुधारणा करुन समितीची सदस्य संख्या १९ इतकी करण्यात आली. विधानसभा नियम २२७ (१) नुसार सध्या या समितीची सदस्य संख्या १९ आहे. प्रत्येक वर्षी होणाऱ्या पहिल्या अधिवेशनात मा.अध्यक्ष, समिती सदस्यांची तसेच समिती प्रमुखांची नामनियुक्ती करतात. समितीची मुदत एक वर्षापेक्षा अधिक नसते.

(ब) समितीकडे सुपूर्द केलेली कामे :—

(१) विधानसभेत प्रश्नोत्तराच्या वेळी तसेच प्रस्तावाच्या वेळी मा.मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनांची, वचनांची व हमीची छाननी करणे.

(२) अशी आश्वासने, वचने व हमी शासनाने कितपत कृतीत अथवा कार्यवाहीत आणली आहेत, आणि

(३) आश्वासने, वचने इत्यादी कमीत कमी कालावधीत कृतीत अथवा कार्यवाहीत आणली गेली आहेत काय याबाबतचा समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.

(क) समितीची कार्यपद्धती :— विधानसभा नियम १६३ ते १९३ हे समित्यांच्या सर्वसाधारण कार्यपद्धती संबंधात आहेत. सदर नियम विधानसभा आश्वासन समितीस लागू आहेत. सन १९५९ साली नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विधानसभा आश्वासन समितीने दिनांक १८ मार्च, १९६० रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत आश्वासनांची प्रमाण यादी संमत केली आहे :—

(१) ह्या बाबींवर विचार करण्यात येत आहे.

एचबी १५९९—२६अ

(२) मी ह्याबाबत लक्ष घालीन.

(३) चौकशी करण्यात येत आहे.

(४) माननीय सदस्यांना मी कळवीन.

(५) हे मुख्यतः केंद्र सरकारचे काम आहे. परंतु त्याबाबत मी चौकशी करीन.

(६) मी ह्यासंबंधी केंद्र सरकारला लिहीन.

(७) सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या सर्व सूचनांचा काळजीपूर्वक विचार केला जाईल, असे मी सभागृहाला आश्वासन देतो.

(८) माझ्या दौऱ्यांचे वेळी त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊनच मी परिस्थितीचा अभ्यास करीन.

(९) मी या बाबींवर विचार करीन.

(१०) मी ह्यावर विचार करीन.

(११) मी केंद्र सरकारला सुचवीन.

(१२) आम्ही याबाबत ठराव करु.

(१३) ह्याबाबत काय करता येईल ते मी पाहीन.

(१४) ह्यासंबंधी काही बोलण्यापूर्वी मला या बाबींची चौकशी करावी लागेल.

(१५) ही सूचना विचारात घेण्यात येईल.

(१६) ..... रोजी भरणाऱ्या .....सभेच्यावेळी ह्या बाबींचा विचार करण्यात येईल.

(१७) ह्या बाबींचे अजूनही परीक्षण चालू आहे व ह्याबाबत काही करावयास पाहिजे असल्यास ते नक्कीच करण्यात येईल.

(१८) .....सरकारकडे ही बाब नेण्यात येईल.

(१९) मला ह्यासंबंधी माहिती नाही, परंतु ह्याबाबत लक्ष घालण्याची माझी तयारी आहे.

(२०) आवश्यक ती माहिती गोळा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(२१) नियम तयार करतेवेळी ही सूचना ध्यानात ठेवू.

(२२) माननीय सदस्यांची तशीच इच्छा असेल तर मी फिरुन सूचना करीन.

(२३) अंतिम अहवाल तयार करण्यात आल्यावर त्याची एक प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(२४) माननीय सदस्यांना मी ते पुरवीन.

(२५) ते करता येईल असे मला वाटते.

(२६) माननीय सदस्यांचा आरोप खरा असेल तर ह्या बाबीची मी नक्की चौकशी करण्यास लावीन.

(२७) आम्हाला ते शोधून काढावे लागेल.

(२८) ह्याकडे मला ..... सरकारचे लक्ष वेधावे लागेल आणि मला आशा आहे की, सरकार त्या दिशेने उपाययोजना करील.

(२९) कारवाई करण्याकरिता ही सूचना आहे व त्यावर विचार करण्यात येईल.

(३०) माहिती गोळा करण्यात येत आहे व ती विधानसभेच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(३१) मी परिस्थितीचे पुनर्विलोकन करीत आहे.

(३२) ज्याबाबत मंत्र्यांनी काही कारवाई करण्याची जरुरी आहे असे अध्यक्षांनी/उपाध्यक्षांनी — अथवा सभाध्यक्ष तालिकेवर असणाऱ्या सदस्यांनी दिलेले निदेश.

(३३) ज्या सर्व मुद्यांबद्दल माहिती मागण्यात आली आहे व जी देण्याचे कबूल करण्यात आले आहे असे सर्व मुद्दे.

संबंधित विभागातून आश्वासनांची तातडीने परिपूर्ती होण्याच्या दृष्टीने विधानसभेच्या दिवसाच्या कार्यवाहीची असुधारित प्रत संसदीय कार्य विभाग, मंत्रालय यांना पाठविण्यात येते. संसदीय कार्य विभागाकडून या कार्यवृत्तामधील आश्वासनांची निवड केली जाते व निवड केलेली आश्वासने अधोरेखित करून ती आश्वासन समितीकडे मान्यतेसाठी पाठविली जातात. अधोरेखीत केलेली आश्वासने योग्य आहेत काय, याची आश्वासन समिती कक्षात तपासणी केली जाते. या व्यतिरिक्त काही आश्वासने असल्यास ती अधोरेखित करून अशी सर्व आश्वासने ज्या विषयासंदर्भात दिली आहेत तो विषय तसेच कार्यवृत्ताच्या ज्या पृष्ठावर आश्वासन अधोरेखित केले आहे त्या पृष्ठाचे क्रमांक नमूद करून शाखा अधिकाऱ्यांनी मान्यता दिल्यानंतर ही आश्वासने संसदीय कार्य विभागास पाठविण्यात येतात व संसदीय कार्य विभागाकडून ज्या विभागाशी संबंधित आश्वासने असतील ती त्या विभागास कार्यवाहीसाठी पाठविली जातात. सभागृहात दिलेल्या आश्वसनांची परिपूर्ती ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक असते.

आश्वासनांची विवरणे विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवल्यानंतर संबंधित विभागाकडून आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आश्वासन समितीस पाठविली जाते. समिती या माहितीवर विचार करते व आपले अभिप्राय व्यक्त करते. आश्वासनाच्या परिपूर्तीबाबत समितीचे समाधान न झाल्यास या आश्वासनाच्या संदर्भात समिती संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व आश्वासनाच्या परिपूर्ततेबाबत विभागीय सचिवांकडून अधिक खुलासा घेते व त्यानुसार अंतिम अहवालात समिती आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त करते.

मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांना अत्यंत महत्व असते. या आश्वासनांचा पाठपुरावा करण्याचे काम आश्वासन समिती करते. यामुळे अनेक सार्वजनिक महत्वाच्या प्रकरणांची तड लागली जाते. तसेच आश्वासनांच्या परिपूर्तीसंबंधात विभागीय सचिवांनी पाठविलेली माहिती व साक्षीच्या वेळी केलेला खुलासा समितीस समाधानकारक न वाटल्यास समिती विशिष्ट प्रकल्प वा कामाच्या ठिकाणास भेट देऊन स्थानिक अधिकाऱ्यांकडून आश्वासानाबाबत अधिक माहिती घेते व त्यावर आधारित आपल्या अहवालात अभिप्राय व शिफारशी व्यक्त करते.

आश्वासन समितीच्या अहवालांतील निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधानसभा सभागृहांस सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील आश्वासन समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

(१) पाचवा अहवाल (२०१५-२०१६) - (सन २००५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासनासंबंधी):- "खोपोली तालुक्यातील खालापूर संदर्भात जमीन महसूल कायदा १९६६ बदलण्याबाबत" या विषयावर सभागृहात श्री.देवेंद्र साटम वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयावर मा.महसूल राज्यमंत्री यांनी "**याची नोंद घेण्यात येईल".** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ४५७)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

खोपोली गावठाण क्षेत्रातील काही व्यापारी घराच्या पुढील भागात व्यवसाय करून त्याच घरात मागील भागात रहात आहेत. तथापि काही लोकांनी त्यांच्या घरातील गाळे भाड्याने दिलेले आहेत. तहसिलदार खालापूर यांनी या ५२३ गाळेधारकांना नोटीसा बजावल्या असून त्यांचेकडून सुमारे रुपये १२,८५,०२० इतकी रक्कम येणे अपेक्षित आहे. खोपोली नगर परिषद हद्दीतील ३३९ बांधकामे सर्वे नंबर मधील असून त्यांनी अनधिकृत वाणिज्य वापर सुरु केला आहे. त्यामुळे सदरहू धारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ६७ तसेच ४५ मधील तरतुदी लागू होतात व अशा खातेदारांना बजावलेल्या नोटीसाप्रमाणे त्यांनी अकृषिक आकारणीची रक्कम भरणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे १२३ (अ) मध्ये शहरी भागातील रहिवासी वापराकरिता सारा माफी देण्याची तरतूद आहे. खालापूर तालुक्यातील भागात पूर्णपणे रहिवासी वापर केलेला नसून तेथे एका भागात दुकाने व त्या नंतरच्या मागील भागात रहिवासी वापर केल्यामुळे अशा ठिकाणी सारा माफी करता येणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम लागू होण्यापूर्वी सारामाफी करता येणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे १२३ (अ) होण्यापूर्वी सारामाफी होती. मात्र त्यासंदर्भातील कागदपत्रे सदरचा अधिनियम लागू होण्यापूर्वी जमीनधारकाने सादर न केल्यामुळे त्यांना सारामाफी दिलेली नाही. या प्रकरणात एकूण रुपये १२,८५,०२० एवढी रक्कम वसूल करण्याबाबत विभागाने सन २००५ मध्ये संबंधितांना नोटीसा देऊनही अद्यापपर्यंत या बाबतची सारा वसुली संबंधित अधिकाऱ्यांनी केली नाही, ही वस्तुस्थितीदेखील समितीला प्राप्त झाली. या प्रकरणी विभागीय सचिवांनी संबंधितांना सारा वसुली करण्याबाबत सूचना दिल्या असल्याचे समितीला सांगितले आहे.

उपरोक्त माहिती विचारात घेता दिनांक ३१ मार्च, २०१६ तारखेपर्यंत म्हणजेच विभागीय सचिवांची साक्ष होईपर्यंत सर्व संबंधितांकडून सारा वसुली करण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे व यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सुमारे १० वर्षापासून जास्त विलंब केला असल्याचेसुद्धा दिसून येते. संबंधित जागेवर वाणिज्यिक वापर त्याचप्रमाणे अधिनिवास वापरदेखील होत असल्याचे समितीसमोर आले आहे. निव्वळ तो निवासी असता तरी त्याबाबतची सारामाफीची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील नियमात आहे. तथापि, अधिनियमाच्या कलम १२३ मध्ये वाणिज्यिक वापराबरोबरच अधिनिवास वापर होत असल्यास त्याबाबतचा सारा वसूल करण्याची आवश्यकता असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरचा विषय सभागृहात २००५ मध्ये उपस्थित झाला होता. सदरची बाब उपस्थित झाल्यानंतर मा.महसूल राज्यमंत्री महोदयांनी **हा सारा वसूल करण्याबाबतची नोंद घेण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले होते.** सभागृहात मा.महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर त्या बाबतची कार्यवाही वेळीच होणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. सदरचा प्रश्न हा सारा वसूल करण्याचा असून तो वसूल केल्यानंतर तो राज्याच्या तिजोरीत जमा होतो ही वस्तुस्थिती आहे. सदरची बाब ही आपण एका गावापुरती मर्यादित न करता ती राज्यस्तरावर विचारात घेतल्यास अशा प्रकारच्या सारा वसुलीची अवैध प्रकरणे प्रलंबित असल्याचे नाकारता येणार नाही. त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपये महसूल वसुलीविना प्रलंबित असण्याची शक्यता नाकारता येत नाही व सदरचा सारा वसूल करण्याची सर्व जबाबदारी ही सर्व संबंधित वसुली अधिकाऱ्यांची आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात इतरत्रदेखील जागेचा वाणिज्यिक व निवासी वापर करणाऱ्यांकडून सारा वसूल होतो किंवा कसे याबाबत परिपत्रकाद्वारे संबंधितांच्या निदर्शनास आणून देणे अगत्याचे असल्याचे समितीचे मत आहे. **त्यानुसार शासनाने परिपत्रक निर्गमित करून वाणिज्यिक वापराबरोबरच निवासी जागेचा वापर होत असल्यास त्यांचेकडून महाराष्ट्र महसूल संहितेमध्ये नमूद असलेल्या तरतुदीनुसार सारा वसूल करण्याबाबत कळविण्यात यावे.** तसेच मा.मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर अशा आश्वासनांवर जे पाळणे सहज शक्य आहे त्यावर १० वर्षापर्यंत कारवाई न होणे ही निश्चितच गंभीर बाब आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे **या प्रकरणात सन २००५ पासून सारा वसूल करण्याप्रकरणी जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील अशा सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी करून त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) पाचवा अहवाल (२०१५-२०१६) - (सन २०१० च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनासंबंधी):–

"शेतकरी आत्महत्येसंदर्भात केंद्र सरकारच्या पंतप्रधान पॅकेज अंतर्गत होत असलेला भ्रष्टाचार" या विषयावर श्री.प्रकाश डहाके, वि.स.स यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा.महसूल मंत्री यांनी **"डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे. याबाबतीतील माहिती पटलावर ठेवण्यात येईल".** असे आश्वासन सभागृहात देण्यात आले होते. **(आश्वासन क्र. ४९५)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी नमूद केले आहे की, सदरहू पॅकेज वाटप उपक्रम राज्याच्या कृषी विभागाकडून राबविण्यात आला होता. शेतकरी आत्महत्येसंदर्भात एकूण दोन पॅकेजेस जाहीर करण्यात आले होते. एका पॅकेजमध्ये अनेक योजनांचा समावेश होता. यासंदर्भात ४६१ तक्रारी आलेल्या होत्या या तक्रारी विविध विभागाशी निगडीत होत्या. डॉ.गोपाळ रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभागासंदर्भातील भ्रष्टाचार व तक्रारी संबंधी एक समिती नेमण्यात आली होती. ही समिती दिनांक १३ डिसेंबर, २००७ रोजी स्थापन झाली होती. या समितीने आपला अहवाल दिनांक १ सप्टेंबर, २००८ रोजी शासनाला सादर केलेला आहे. तक्रारीचे स्वरुप गंभीर असल्यामुळे कृषी विभागातील अधिकाऱ्यांचीही या तक्रारीच्या निपटाऱ्याकरिता समिती स्थापन करण्यात आली होती. याचा अहवाल दिनांक १५ एप्रिल, २०११ रोजी शासनाला सादर केलेला आहे. राज्य शासनाला अहवाल सादर केल्यानंतर असे आढळून आले की, काही संबंधित अधिकाऱ्यांवर शंका होती अशा सर्व अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. एकूण ४०५ प्रकरणांपैकी ३५१ अधिकारी होते. त्यापैकी ७० अधिकाऱ्यांनी कर्तव्य नीट बजावले नाही, असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यापैकी ६ कर्मचारी व ८ अधिकाऱ्यांना निलंबीत केले गेले. एक

अधिकारी इतर काही कारणामुळे यापूर्वीच निलंबीत झालेला होता. तसेच ४ अधिकारी सेवानिवृत्त झाले होते. अशा प्रकारे एकूण १९ अधिकाऱ्यांवर कारवाई करून आरोप ठेवण्यात आले. ११ अधिकारी व ५ कर्मचाऱ्यांवर कारवाई पूर्ण करण्यात आली. या सर्व कर्मचारी, अधिकाऱ्यांची एक किंवा दोन वेतनवाढ थांबविण्यात आली आहे. अद्याप चौकशी सुरु आहे. या करीता विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांना नियुक्त केले आहे. विभागीय चौकशी अधिकारी हा महसूल विभागाचा असल्यामुळे ही चौकशी पूर्ण होण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. मात्र ५१ अधिकाऱ्यांची चौकशी असल्यामुळे कालावधी लागत आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी राज्य शासनाने रु.१०७५ कोटी व केंद्र सरकारने रु.३७५० कोटी इतक्या रकमेचे घोषित केलेल्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करून राज्य शासनाने डॉ.नरेंद्र जाधव यांची एक सदस्य समिती नेमली होती. शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी, २००९ अन्वये उक्त समितीने विविध उपाय योजनांपैकी १३ उपाय योजनेची कार्यपूर्ती अहवालास मान्यता देऊन संबंधित विभागाने करावयाच्या कार्यवाहीस मंजुरी देण्यात आली. केंद्र सरकार व राज्य शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजेसची अनुक्रमे १५६% व १२८% अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. सदर पॅकेजेसमध्ये नमूद केलेली रक्कम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रवण क्षेत्रात वापरण्याबाबत सुमारे ४६१ तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या विविध विभागाशी निगडीत होत्या. या तक्रारींमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. तथापि, सन २००९ मध्ये सुमारे ४६१ तक्रारी प्राप्त होऊनही सन २०१६ पर्यंत या तक्रारींवर प्रशासनाद्वारे ठोस अशी कार्यवाही करण्यात आली नाही याबाबत समिती अतीव खेद व्यक्त करते.

नापिकी व कर्जबाजारी इत्यादी विविध कारणांनी शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी उपरोक्त नमूद केलेला निधी मंजूर केला आहे. या निधी व्यतिरिक्त शासनाने आणखी शिलकीचा निधी मंजूर करून खर्च केला असल्याचे सांगितले आहे. तथापि, गैरव्यवहाराच्या एकूण ४०५ प्रकरणांपैकी ३५१ प्रकरणांमध्ये अधिकारी असल्याचे आणि त्या पैकी ७० अधिकाऱ्यांनी कर्तव्य नीट बजावले नसल्याचे निष्कर्ष चौकशी अधिकाऱ्यांनी काढले आहेत. त्यापैकी ६ कर्मचारी व ८ अधिकाऱ्यांना निलंबीत केले. १९ अधिकाऱ्यांवर कारवाई करून आरोप ठेवण्यात आले आहेत. ११ अधिकारी व ५ कर्मचाऱ्यांवर कारवाई पूर्ण करण्यात आली. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) वर्तणूक ८ नियमानुसार २२ अधिकारी व २९ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. ज्यांच्या किरकोळ चुका होत्या त्यांची चौकशी पूर्ण झाली आहे. मात्र ज्यांच्यावर गंभीर आरोप आहेत त्यांची चौकशी अद्यापही सुरू असून सुमारे ५१ अधिकाऱ्यांची चौकशी सुरू असल्यामुळे यासाठी कालावधी लागत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

शासनाने दिलेल्या पॅकेजमध्ये अधिकाऱ्यांद्वारे गैरव्यवहार होणे ही अत्यंत दुर्दैवाची बाब असून अशा अधिकाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ करू नये अशी समितीची भूमिका आहे. असे असतानादेखील महाराष्ट्र नागरी सेवा नियम ८ नुसार केवळ २२ अधिकारी व २९ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरू असल्याचे समितीला सांगितले आहे. ४६१ तक्रारींमध्ये सुमारे ५१ अधिकाऱ्यांचीच चौकशी सुरू असल्याचे समितीला सांगितले आहे. यावरून गैरव्यवहारात सामील असलेल्या अधिकाऱ्यांना शासनाद्वारे पाठीशी घालण्याचा दाट संशय समितीला येत असून या अधिकाऱ्यांच्या चौकशीस विलंब होणे म्हणजेच गुन्हेगाराला मोकळीक देणे असाच त्याचा अर्थ होत आहे. अशाप्रकारे आर्थिक अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कसलीही दया-माया न दाखवता त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

सबब, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनाने दिलेल्या रकमेच्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीत ज्या अधिकारी /कर्मचारी यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप आहेत अशा सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात अक्षम्य विलंब केल्यामुळे ते प्रशासनात चौकशी अधिकाऱ्यांवर या ना त्या कारणावरून दबाव आणू शकतात. सदर बाब या अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार दाबून टाकण्याचा दाट संशय समितीला असल्यामुळे **ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमान्वये दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत अशा सर्व संबंधित दोषी अधिकारी / कर्मचाऱ्यांची तातडीने चौकशी करून ते दोषी आढळल्यास त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) दहावा अहवाल (२०१७-२०१८) - (सन २०१४ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासनासंबंधी):—

(१) "सन २०१४-२०१५ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागणी" या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती थोडीशी जरी सुधारली तरी अनुकंपा तत्वावरील भरतीबाबत नक्की विचार करण्यात येईल असा मी शब्द देतो"** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ३५७)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

विभागाने सदरहू आश्वासन पुर्तीबाबत "शा.नि. सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दिनांक २/०५/२०१४ नुसार वर्ग "क" व वर्ग "ड" मधील मंजूर पदांपैकी दरवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% प्रमाणात अनुकंपा तत्वावर पदभरती अनुज्ञेय आहे.

अकोला महानगरपालिकेत सध्या अनुकंपा तत्वावरील भरतीसाठी ३८ अनुकंपाधारक पात्र आहेत. अकोला महानगरपालिकेचा सध्याचा प्राप्त होणारा एकूण महसूल रु. १०५.६९ कोटी इतका असून, यापैकी वेतनासाठी रु.५८.६४ कोटी एवढा वार्षिक खर्च आहे. अकोला महानगरपालिकेचा आस्थापना खर्च ५५.४८% इतका असून तो शासनाने ठरवून दिलेल्या (३५%) मर्यादेपेक्षा जास्त आहे. अकोला महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांचे फेरमूल्यांकन सन २००२-२००३ मध्ये करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत फेरमूल्यांकन करण्याची कार्यवाही सुरू आहे. तो पूर्ण झाल्यानंतर अकोला महानगरपालिकेच्या उत्पन्नात निश्चित भरीव वाढ होणार आहे.

सन २०१६-१७ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% प्रमाणे पात्र ३८ वारसदारांमधून २४ वारसदारांचा टप्प्याटप्प्याने समावेश करण्याची व उर्वरित १४ अनुकंपाधारकांना महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे. असे आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या कार्यवाहीच्या अनुषंगाने समितीने महापालिकेचे उत्पन्न कमी असताना आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी पुरेसा पगार नसताना महानगरपालिका सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार ३८ अनुकंपाधारक अनुकंपा तत्वावरील कसे काय पात्र ठरतात अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सन २०१६-२०१७ च्या प्रतिक्षा यादीतील कोणालाही नियुक्ती दिलेली नसून अकोला महानगरपालिकेचे उत्पन्न कमी असल्यामुळे आर्थिक परिस्थितीही हलाखीची आहे. त्यामुळे महापालिकेची वसुलीही कमी झाली असून कर्मचाऱ्यांचे पगार विशेष अनुदानातून होत आहे अशी समितीला माहिती दिली. समितीने यावर महानगरपालिकेने पूर्ण भरती बंद केलेली आहे ते योग्य नाही तसेच सन २००२ मध्ये जी अवास्तव भरती केली गेली याबाबत नाराजी व्यक्त केली.

या संपूर्ण प्रकरणाचा विचार करता महानगरपालिकेच्या उत्पन्नातून आस्थापनावर ५५.४८% इतका खर्च होत असल्याने महानगरपालिकेस विकासात्मक कामाकडे तसेच नोकर भरतीकडे लक्ष देता येत नाही. **महानगरपालिकेने आपल्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेचा आस्थापना खर्च कमी होण्यास मदत होईल. यासाठी मालमत्तांचे फेरमूल्यांकन करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांची भरती करताना अनुकंपा तत्वावर भरतीचा असणाऱ्या अनुशेषास प्राधान्य देऊन नंतर इतर भरती करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) "उत्तर महाराष्ट्रासह अन्य ठिकाणी वादळी पाऊस व गारपिटीने शेतकरी उद्ध्वस्त होणे" या विषयावर झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मा. मंत्री महोदयांनी **"राज्य सरकारने या आच्छादनाच्या फ्रेमिंगसंबंधी किती अनुदान द्यावयाचे याबाबत राज्य सरकार विचार करील"** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ३५९)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

याबाबत करण्यात आलेली कार्यवाही ही एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून गारपीट विरोधक जाळी (Anti Hailnet) करीता रु. ३५ प्रती चौ.मी. या मापदंडानुसार ५०% अनुदान, ५००० चौ.मी. मर्यादेपर्यंत देय आहे.

तथापी, फळबागांवर, प्लॅस्टिक आच्छादन टाकल्यास त्यांचे अवकाळी पाऊस/गारपीट यापासून संरक्षण होऊ शकते. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आहेत. त्यामध्ये प्लास्टीक आच्छादन या घटकाचा समावेश नाही. प्लास्टीक आच्छादन या घटकाकरिता आवश्यक मापदंड व अनुदानाची टक्केवारी निश्चित करून, सदर घटकाचा समावेश राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालय, (फलोत्पादन विभाग) यांस दिनांक ०५ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.

याबाबत आश्वासन पूर्तीसाठी करण्यात आलेली कार्यवाही ही विभागाने केलेली आहे. याबाबत बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे नाशिक येथे जी गारपीट विरोधक जाळी (ॲन्टी हेल्मेट) बसविण्यात आली आहे. या जाळीसाठी किती लोकांनी अनुदान घेतलेले आहे व या योजनेचा लाभ किती शेतकरी घेत नाहीत अशी विचारणा केली असता सदर जाळी ही वादळामध्ये टिकत नाही त्यामुळे द्राक्ष बागा उद्ध्वस्त होत आहेत अशी समितीला माहिती देण्यात आली आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २५ हजार रुपये मदतही दिलेली आहे. सबब (ॲन्टी हेल्मेट) गारपीट विरोधक जाळी बसविण्यासाठी एखाद्या जिल्ह्याची निवड करून याबाबत त्याची संपूर्ण गुणवत्ता तपासल्यानंतरच ही जाळी शेतकऱ्यांना देण्यात यावी. म्हणून समिती अशी शिफारस करते की,

गारपीट विरोधक जाळी (ॲन्टी हेल्मेट) द्राक्ष बागांच्या ट्रायलसाठी एखाद्या जिल्ह्याची निवड करावी व ही जाळी प्लॅस्टीक हार्ड क्लोटेड असावी जेणेकरून सुर्यप्रकाश देखील परावृत्तीत होऊन शेतकऱ्यांच्या पीकावर कोणताही दुष्परिणाम होणार नाही यासाठी शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात यावे अशी शासनाने केंद्र शासनाला शिफारस करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यात सादर करावा.

(४) **बारावा अहवाल (२०१७-२०१८) - (सन २०१५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासनासंबंधी):-**

(१) "सन २०१५-१६ या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला मा.वित्त मंत्री यांचे उत्तर" या विषयावर मा. मंत्री महोदयांनी **"प्रत्येक जिल्ह्यामध्ये शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन करण्यासाठी मंजुरी द्यावयाची आहे. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध होईल, तेथे प्राधान्याने कृषि महाविद्यालय शासनाच्या माध्यमातून सुरु केले जाईल. एका ठिकाणी फलोत्पादन महाविद्यालय असेल, एका ठिकाणी पशुसंवर्धनाच्या संदर्भात महाविद्यालय असेल. निरनिराळे फॅकल्टी तयार करण्यात येतील."** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ५८८)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

उपरोक्त आश्वासनाच्या अनुषंगाने मंगळवार दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय स्थापन करण्यात आले असून मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगली व यवतमाळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली आहे. तसेच बुलढाणा आणि पालघर येथे कृषी महाविद्यालय उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे असे समितीस विदित केले.

यावेळी समितीने सन २०१६ च्या अर्थसंकल्पामध्ये मा.मंत्री महोदयांनी पाल, ता.रावेर, जि.जळगांव येथे फलोत्पादन महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार पाल येथे फलोत्पादन महाविद्यालय स्थापन करण्यासाठी ४० एकर जमिनीची आवश्यकता असून सध्या २० हेक्टर जमीन आयडेन्टीफाय केलेली आहे. पाल येथे फलोत्पादन महाविद्यालय उभारण्यासाठी २० हेक्टर जमीन उपलब्ध आहे. परंतु त्यासाठी ४० हेक्टर जागेची आवश्यकता आहे. परंतु तेथील जमीन वरकस व डोंगराळ असल्यामुळे तत्कालीन मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत कुलगुरुंनी सदर जागा योग्य नसल्याचे सांगितले. यावेळी मा.मंत्री श्री.एकनाथ खडसे यांनी दुसरी जागा देण्यात येईल असे सांगितले. आयसीआरच्या नॉर्मनुसार स्टपिंग पॅटर्नसंबंधी कृषि परिषदेची आणि विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने असल्यामुळे प्रस्ताव आल्यानंतर तो मंत्रीमंडळापुढे ठेवण्यात येईल. तसेच फलोत्पादन महाविद्यालयाची आवश्यकता असल्यामुळे खिरोंदा येथे सोलर युनिट उभे रहाणार होते परंतु तो प्रकल्प रद्द करून ती जमीन फलोत्पादन महाविद्यालय सुरू करण्यासाठी देत आहेत तेथे शैक्षणिक संकुल उभे राहिल. फलोत्पादन महाविद्यालयासाठी पर्यायी जमीन उपलब्ध आहे.

शासनाने सन २०१५ मध्ये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कृषी महाविद्यालय, फलोत्पादन महाविद्यालय व पशुसंवर्धन महाविद्यालय स्थापन करण्यात येईल अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. त्यानुसार **राज्यातील किती जिल्ह्यात सदर महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत तसेच किती जिल्ह्यांत प्रस्तावित आहेत. तसेच पाल, ता.रावेर जि.जळगाव येथे जागा उपलब्ध करून त्वरीत फलोत्पादन महाविद्यालय कार्यान्वित करणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

(२) "सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील सर्वसाधारण चर्चा" या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"या पुढे अंगणवाड्यामध्ये जे खाद्य दिले जाते त्यात ही दुधाची पावडर देता येईल का, याची तपासणी वैद्यकिय क्षेत्रातील नामवंताकडून करून ही दुधाची पावडर देण्याची प्रक्रिया सुरु करण्याच्या विचारात आहेत असे आश्वासन दिले होते". (आश्वासन क्र. ५९४)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

विभागाने सदरहू आश्वासन पुर्तीबाबत शालेय पोषण आहारामध्ये दुध भुकटीचा समावेश करण्याबाबत आदिवासी विकास, महिला व बालविकास, शालेय शिक्षण विभाग व समाजकल्याण विभाग यांना आयुक्त दुग्धव्यवसाय विभाग कार्यालयाकडून विचारणा करण्यात आलेली असून त्यांची सहमती अद्याप अप्राप्त आहे अशी समितीस माहिती होती तसेच उपरोक्त आश्वासनासंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत दुधाची भुकटी तयार करण्याची योजना राबविण्यासाठी एकूण किती खर्च येईल तसेच सन २०१५ मध्ये ५ हजार ६२५ मे.टन भुकटी होती. त्यातील २६२४ मे.टन भुकटी शालेय पोषण आहारासाठी देण्याचा निर्णय घेतला होता. या बाबत मा.मंत्री महोदयांच्या समवेत घेण्यात आलेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक घेण्यात यावी व अंतिम निर्णय घेण्यात यावा. दुधाची भुकटी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये विकली असून भुकटीचा साठा नसल्याचे बैठकीच्या वेळी समितीला सांगण्यात आले. त्याचप्रमाणे टेट्रापॅकमध्ये अंगणवाड्यांना दूध देण्याचा निर्णय झाला असून या संबंधी मुख्य सचिवांकडे बैठक होणार आहे असेही समितीस विदित करण्यात आले.

सन २०१५ मध्ये सभागृहातील चर्चेच्या वेळी अंगणवाडीतील बालकांना दुधाची पावडर देण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी आश्वासित केले होते. यासंदर्भात आश्वासनाचे वाचन करताना अंगणवाड्यांना टेट्रापॅकमध्ये दुध देण्याचा निर्णय घेण्यात आला असून याबाबत मुख्य सचिवांसोबत बैठक घेण्यात येणार आहे असे समितीस सूचित करण्यात आले होते. त्यावेळी दुधाची प्रतिलिटर किंमत २७ असून त्यावर ३ रुपये सबसिडी होती असे समितीस सांगण्यात आले. तसेच दुध भुकटीची निर्यात सबसिडी बंद केल्याने दुधाचे भाव मोठ्या प्रमाणात कमी झाले. सबब, **अंगणवाडीतील बालकांना दुध उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घ्यावा तसेच शासनाने शेतकऱ्यांना प्रतिलिटर कमीत कमी ५ रुपये सबसिडी द्यावी जेणेकरून शेतकऱ्यांना दुधाचा चांगला भाव मिळेल अशी समितीची शिफारस आहे.**

(३) "संजय गांधी निराधार योजनेच्या भत्त्यात वाढ करण्याबाबत" या विषयावरील श्री.योगेश सागर, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १५२३० वरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"यासंदर्भात लवकरात लवकर जिल्हाधिकारी यांना आदेश दिले जातील. ज्याठिकाणी समित्या झाल्या नसतील अशा ठिकाणी समित्या लवकरात लवकर केल्या जातील."** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ८३५, ८३६, ८३७ व ८३८)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

राज्यामध्ये संजय गांधी योजना समिती बऱ्याच जिल्ह्यामध्ये स्थापन केलेली नाही का ? अशी समितीने विचारणा केली असता, अधिकाऱ्यांनी यासंदर्भात राज्यातील सर्व तहसीलदार यांना बैठक घेण्यास सांगितले जाते असे समितीस सांगितले. समितीने काही जिल्ह्यांमध्ये समित्या स्थापन केलेल्या नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच हिंगोली जिल्ह्यात दोन तहसील कार्यालये असून त्यामध्ये एकाच विचारांचे लोक असल्यास तेथील जनतेला न्याय मिळू शकेल. अद्याप फक्त दोन-तीन जिल्ह्यामध्ये समिती स्थापन झालेली आहे असे समितीने सांगितले असता अधिकाऱ्यांनी यासंदर्भात सर्व पालकमंत्री महोदयांना समित्या स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत असे समितीस विदित केले.

संजय गांधी निराधार योजना ही शासनाची निराधारांसाठी अत्यंत महत्वाची समिती असून यात जिल्हा व तालुकास्तरावर समित्या निर्माण केल्या जातात. परंतु समितीला साक्षीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात तालुकास्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. तसेच निराधारांना महिना रुपये ६०० इतकी अत्यल्प रक्कम देण्यात येते तसेच सदर रक्कम वेळेवर देण्यात येत नसल्याचे समितीला आढळून आले. सबब, **शासनाने निराधारांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत ६०० रुपयांवरून रु.२००० वाढ करावी तसेच सदर रक्कम वेळेवर मिळण्याच्या दृष्टीने तात्काळ अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात द्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(४) "प्रस्तावावरील चर्चा" या विषयावरील झालेल्या चर्चेत मा.मंत्री महोदयांनी **"एखाद्या शाळेतील विद्यार्थी हे विज्ञानामध्ये मागे असतील तर त्यांना फिरत्या विज्ञान शाळेतील विज्ञानामधील पारंगत शिक्षकामार्फत शिक्षण देण्याबाबतची उपाययोजना करता येऊ शकेल का याचा विचार करण्यात येईल"** असे आश्वासन दिले होते. **(आश्वासन क्र. ११७८)**

उपरोक्त विषयाबाबत समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे.

विद्यार्थ्यांच्या पहिली ते पाचवीपर्यंत भाषा, गणित या विषयाची चाचणी, सहावी ते आठवीपर्यंत गणित व इंग्रजी आणि विज्ञान तसेच नववी ते दहावीपर्यंत नैदानिक चाचण्या घेतलेल्या आहेत. इयत्ता आठवीपर्यंत त्या विद्यार्थ्यांमध्ये मुलभूत क्षमता आहे की नाही त्याची माहिती नैदानिक चाचणीद्वारे घेतली जाते. प्रत्येक चाचणीचे गुण ऑनलाईन भरले जाणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यांची तालुकानिहाय, जिल्हानिहाय आणि केंद्रनिहाय प्रगती केली जाणार आहे. यामुळे शाळांमधील अप्रगत विद्यार्थी कोणकोणत्या विषयामध्ये कच्चे आहेत त्याकडे लक्ष देऊन तालुकास्तरावर, केंद्रस्तरावर तसेच गणित, भाषा सोप्या पद्धतीने शिकविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे असे विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीस विदित केले. त्यावर समितीने ही मुले गणित आणि विज्ञानामध्ये कच्ची आहेत त्यांच्यासाठी विशेष पथक तयार केले आहे का अशी विचारणा केली. त्यावर आदिवासी भागातील काही तालुके शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले असून अप्रगत मुलांचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी भागातील बोलीभाषा आणि शिकविण्यात येणारी भाषा यामध्ये खूप तफावत असल्यामुळे ती मुले चौथीनंतर शाळाबाह्य होतात. त्यामुळे स्थानिक शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी बोलीभाषेत संवाद साधावा असे समितीस सांगण्यात आले. त्यावर समितीने ऊस तोडणी कामगार तसेच अनेक कामगार आपल्या उदरनिर्वाहासाठी बाहेर गावी स्थलांतरीत होतात, पावसाळ्यात १०० टक्के पटसंख्या असते. परंतु पावसाळ्यानंतर ती ५० टक्के पेक्षा खाली जाते. तसेच जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये हंगामी वसतिगृह सुरु केलेली असून त्यांना कमी अनुदान मिळत असल्यामुळे कोणतेही संस्था चालक संस्था चालविण्यास तयार होत नाही. अनुदान हंगामी वसतिगृहासाठी वाढवून दिले तर अनेक संस्था काम करतील व वसतिगृहात राहून तेथील मुले शिक्षण घेऊ शकतील. तसेच पावसाळ्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या कमी होण्याचे प्रमाणही कमी होईल.

फिरत्या विज्ञान शाळेतील विद्यार्थ्यांना विज्ञानामधील पारंगत शिक्षक देण्याबाबत तसेच जिल्हापरिषदेच्या शाळेमधील हंगामी वसतिगृहांना वाढीव अनुदान तात्काळ देण्यात यावे अशी आग्रहाची शिफारस समिती करीत आहे. याची तात्काळ अंमलबजावणी करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठवून देण्यात यावा.

*****

(१८) नियम समिती

(Committee on Rules - Legislative Assembly)

समितीची रचना व कार्यपद्धती (म.वि.स. नियम २२३ ते २२५) :—

विधानसभा नियम समितीत ११ सदस्यांचा समावेश असून मा.अध्यक्ष हे या समितीचे पदसिद्ध समिती प्रमुख असतात. सभागृहातील कामकाजाची पद्धती व ते चालविण्याची रीती यांचे नियमन करण्यासाठी असलेल्या नियमांचा विचार करुन त्यात आवश्यक वाटतील अशा सुधारणा सुचविणे तसेच सदस्यांनीही सुचविलेल्या सुधारणा यांचा विचार करुन नियमात बदल सुचविणे हे या समितीचे काम आहे.

समितीच्या शिफारशी सभागृहापुढे मांडण्यात येतात आणि अशा रीतीने मांडण्यात आल्यानंतर त्या दिनांकापासून सुरु होणाऱ्या दहा दिवसांच्या मुदतीत, कोणत्याही सदस्यास अशा शिफारशींमध्ये कोणतीही सुधारणा करण्याची नोटीस देता येते. अशाप्रकारे देण्यात आलेली कोणतीही सूचना समितीकडे विचारार्थ सोपविण्यात येते आणि समिती, त्यावर विचार करुन समितीस योग्य वाटतील असे बदल त्या शिफारशीमध्ये करण्यात येतात. सदस्यांनी सुचविलेल्या सुधारणा विचारात घेतल्यानंतर समितीचा अंतिम अहवाल विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतो. त्यानंतर, समितीच्या सदस्याने मांडलेल्या प्रस्तावावरील अहवालास सभागृहाने मान्यता दिल्याप्रमाणे नियमातील सुधारणा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच अशा सुधारणांची नोटीस दहा दिवसांच्या आत देण्यात आली नाही तर, समितीच्या शिफारशी सभागृहाने मान्य केल्या आहेत असे मानले जाऊन उक्त मुदत संपल्यावर समितीने शिफारस केल्याप्रमाणे नियमांतील सुधारणा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतात. अशाप्रकारे नियमांतील सुधारणा त्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यावर अंमलात येतात.

विधानसभा नियम समितीच्या अहवालांतील समितीने विचारात घेतलेल्या आणि मान्य केलेल्या सूचना/सुधारणा :—

महाराष्ट्र विधानसभा सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) व सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालांतील विधानसभा नियम समितीने विचारात घेतलेल्या आणि मान्य केलेल्या सूचना/सुधारणा पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) **अहवाल -२०१० (दिनांक १५ जुलै, २०१० रोजी विधानसभेस सादर करण्यात आला.) :—** समितीने एकूण ०५ सुधारणा विचारात घेऊन मान्य केल्या आहेत.

(I) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०१- महाराष्ट्र विधानसभा नियम ७२ (२) संबंधी

(II) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०२- महाराष्ट्र विधानसभा नियम ८४ (३) संबंधी

(III) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०३- महाराष्ट्र विधानसभा नियम ८८ संबंधी

(IV) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०४- महाराष्ट्र विधानसभा नियम ८९ वगळण्यात येईल व

(V) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०५- महाराष्ट्र विधानसभा नियम २४४-ढ नंतर नियम २४४-ण व २४४-त *(नव्याने अस्तित्वात आलेल्या अल्पसंख्यांक कल्याण समिती संबंधी)* हे नवीन नियम दाखल करण्यात येतील.

हा अहवाल व महाराष्ट्र विधानसभा नियमात सुचविण्यात आलेल्या सुधारणा सभागृहाने स्वीकाराव्यात अशी समितीची शिफारस आहे.

(२) **अहवाल -२०१६ (दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला) :-** समितीने एकूण ०३ सुधारणा विचारात घेऊन मान्य केल्या आहेत.

(I) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०१- महाराष्ट्र विधानसभा नियम ०४ (२) संबंधी

(II) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०२- महाराष्ट्र विधानसभा नियम ७२ (२) संबंधी व

(III) समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०३- महाराष्ट्र विधानसभा नियम २४४-त नंतर नियम २४४ - थ व २४४-द *(नव्याने अस्तित्वात आलेल्या मराठी भाषा समिती संबंधी)* हे नवीन नियम दाखल करण्यात येतील.

हा अहवाल व महाराष्ट्र विधानसभा नियमात सुचविण्यात आलेल्या सुधारणा सभागृहाने स्वीकाराव्यात अशी समितीची शिफारस आहे.

(३) **अहवाल-२०१८ (दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला) :-** समितीने एकूण ०१ सुधारणा विचारात घेऊन मान्य केली आहे.

समितीने मान्य केलेली सुधारणा क्रमांक ०१- महाराष्ट्र विधानसभा नियम २४२ यानंतर (र) मध्ये, नियम २४३ ची समास टिप, नियम २४३ (१), २४४ व २४४ चा पोटनियम (५) ऐवजी नवीन नियम दाखल करण्यात येईल यासंबंधी *(महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती असे सुधारीत नामाभिधान व समितीची कार्यकक्षा सुधारणा इ. संबंधी)*

हा अहवाल व महाराष्ट्र विधानसभा नियमात सुचविण्यात आलेली सुधारणा सभागृहाने स्वीकारावी अशी समितीची शिफारस आहे.

*****

(१९) अशासकीय विधेयके व ठराव समिती

(Committee on Private Member's Bills and Resolutions - Legislative Assembly)

पार्श्वभूमी :—

अधिवेशन कालावधीत विधानसभा सभागृहातील अशासकीय कामकाजासाठी सर्वसाधारणपणे दर शुक्रवारी बैठकीच्या अखेरचे अडीच तास - (१५० मिनिटे) देण्यात येतात. पहिल्या शुक्रवारी अशासकीय विधेयके आणि त्यापुढील शुक्रवारी अशासकीय ठराव असा क्रम नेमून देण्यात आला आहे. विधानसभा अशासकीय विधेयके व ठराव समिती, सभागृहातील चर्चेसाठी एका वेळी किती अशासकीय विधेयके किंवा अशासकीय ठराव दिवसाच्या कामकाजाच्या क्रमांत दर्शविण्यात यावेत याबाबत नियमन करते. अशासकीय विधेयके व ठराव यांचा प्राथम्यक्रम

समितीच्या बैठकीत बॅलटद्वारा निश्चित करण्यात येतो. तसेच समिती सभागृहातील अशासकीय कामकाजाच्या चर्चेसाठी उपलब्ध असलेल्या वेळेचे वाटप अशासकीय विधेयकांना व अशासकीय ठरावांना त्यांच्या संख्येनुसार समान पद्धतीने करीत असते. समितीची बैठक झाल्यानंतर समितीने अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या वाटपासंबंधी घेतलेल्या निर्णयाबाबत केलेल्या शिफारशीचे प्रतिवृत्त समितीचे समिती प्रमुख विधानसभा सभागृहात मान्यतेसाठी प्रस्ताव रूपाने मांडतात. ज्यावेळी अशासकीय विधेयके प्राप्त झालेली नसतील अशा वेळी उपलब्ध असलेला सर्व वेळ अशासकीय ठरावांना देण्यात येतो. जेव्हा अशासकीय विधेयके व ठराव समिती गठित केलेली नसते अशा वेळी अशासकीय विधेयके व ठराव यांच्या सभागृहातील चर्चेसाठी वेळेचे वाटप मा.अध्यक्ष यांचेकडून करण्यात येते.

समितीची रचना व कार्यपद्धती (म.वि.स. नियम २१४):—

विधानसभा अशासकीय विधेयके व ठराव समितीमध्ये अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेल्या जास्तीत जास्त अकरा सदस्यांचा समावेश असतो. या समितीची कामे मुख्यत्वेकरून पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) अशासकीय सदस्यांच्या प्रत्येक विधेयकाच्या एका किंवा अनेक टप्प्यांसंबंधात त्यांचे स्वरूप, निकड व महत्व यानुसार वर्गीकरण करून चर्चा करण्यासाठी द्यावयाच्या वेळ वाटपासंदर्भात शिफारस करणे.

(२) अशासकीय सदस्यांचे ठराव आणि इतर सहाय्यभूत बाबी यांच्यावरील चर्चेसाठी कालमर्यादेची शिफारस करणे. अशासकीय कामकाज अधिवेशन कालावधीत दर शुक्रवारी (बैठकीच्या अखेरचे अडीच तास) होत असल्याने समितीची बैठक सर्वसाधारणपणे आदल्या दिवशी म्हणजेच प्रत्येक गुरुवारी घेण्यात येते.

शुक्रवार, दिनांक ०६ जुलै, २०१८ रोजीच्या विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता विधानसभा अशासकीय विधेयके व ठराव समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

समितीच्या सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार समितीने केलेल्या शिफारशींबाबत तत्कालिन समिती प्रमुख यांनी समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याबाबत विधानसभा सभागृहात, मांडलेला प्रस्ताव व त्या अनुषंगाने समितीने घेतलेल्या निर्णयासंबंधीच्या शिफारशी सभागृहाने संमत कराव्यात असा सभागृहात मांडलेला प्रस्ताव उदाहरणादाखल खालील दर्शविल्याप्रमाणे आहे :—

वाक्संहिता

अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याबाबत कार्यपद्धती (म.वि.स. नियम २१४)

समिती प्रमुख : (किंवा समितीचे कोणतेही सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे पहिले प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता समितीची बैठक झाली.

अशासकीय कामकाजासाठी एकूण अडीच तासाचा वेळ उपलब्ध आहे. १५० मिनिटांचा वेळ पुढीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा.

(१) प्रा. राहुल बोंद्रे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २४५ - ५० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(२) श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१ - ५० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(३) श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २ - ५० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात यावा, अशीही समितीने शिफारस केली आहे.

अध्यक्ष : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे पहिले प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले.

समिती प्रमुख : (किंवा समितीचे कोणतेही सदस्य) : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे पहिले प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष : प्रस्ताव असा आहे की, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे पहिले प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे.

(भाषणे झाल्यास त्यानंतर)

अध्यक्ष : प्रश्न असा आहे की, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे काय ?

अनुकूल असतील त्यांनी **"होय"** म्हणावे (थोडे थांबून) प्रतिकूल असतील त्यांनी **"नाही"** म्हणावे (थोडे थांबून) **"होय"** चे बहुमत आहे, **"होय"** चे बहुमत आहे.

प्रतिवृत्त संमत आहे.

"नाही" चे बहुमत आहे, **"नाही"** चे बहुमत आहे.

प्रतिवृत्त असंमत आहे.

विधानसभा अशासकीय विधेयके व ठराव समिती अस्तित्वात नसल्याने अध्यक्षांनी केलेली घोषणा खालील दर्शविल्याप्रमाणे आहे :–

शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२० रोजीच्या अशासकीय कामकाजाची घोषणा

अध्यक्ष : शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२० रोजी अशासकीय विधेयके घेण्यात येणार आहेत. विधानसभेपुढे दोनच अशासकीय विधेयके "विचारार्थ" आहेत. अशासकीय कामकाजासाठी द्यावयाचा वेळ हा अशासकीय विधेयके व ठराव समितीमार्फत निश्चित करण्यात येतो. तथापि, सध्या प्रस्तुत समिती अस्तित्वात नसल्याने मी शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२० रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी ३० मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ विचारार्थ असलेल्या खालील दोन विधेयकांना देत आहे.

(१) श्री. प्रताप सरनाईक वि.स.स. यांचे सन २०१९ चे : ६० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

वि.स.वि. क्र. ५० - भारतीय दंड संहिता व फौजदारी

प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ : ६० मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे वि.स.वि. क्र. ५१

- महाराष्ट्र धर्मांतर बंदी कायदा विधेयक, २०१९

वरीलपैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यात येईल.

*****

(२०) सदस्य अनुपस्थिती समिती

(Committee on Absence of Members from the Sittings of the House - Legislative Assembly)

समितीची रचना व कार्यपद्धती (म.वि.स. नियम २२९ ते २३२) :—

महाराष्ट्र विधानसभा सदस्यांकडून विधानसभा सभागृहाच्या बैठकीस अनुपस्थित राहण्याच्या परवानगीसाठी आलेल्या अर्जावर विचार करणे, ज्या प्रकरणी ६० दिवसांपासून अधिक काळ गैरहजेरी असेल त्या प्रत्येक प्रकरणाची तपासणी करून गैरहजेरी माफ करणे किंवा त्या परिस्थितीत सभागृहात सदस्यांची जागा रिकामी झाली असे जाहीर करणे हे कितपत समर्थनीय ठरते याबाबतचा अहवाल सभागृहास सादर करण्याचे कामकाज या विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीकडे सोपविण्यात आले आहे. या समितीत एकूण ११ सदस्यांचा समावेश असतो. याबाबत समितीने विधानसभा सभागृहास सादर केलेला अहवाल (१९८२-८३) मार्गदर्शक ठरेल. सभागृहाच्या बैठकीस अनुपस्थित राहण्यासाठी परवानगी संदर्भात म.वि.स. नियम ३०६ ते ३११ यामध्ये तरतूदी करण्यात आल्या आहेत.

सन १९८१-८२ या कालावधीत गठीत करण्यात आलेल्या सदस्य अनुपस्थिती समितीने तयार केलेल्या अहवालामध्ये भारतीय संविधानातील अनुच्छेद १९० (४) मधील तरतुदीनुसार अनुपस्थित राहणाऱ्या सदस्यांच्या रजेसाठी ग्राह्य कारणांची यादी व रजेबाबत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सन २००९ या वर्षात या समितीने सुधारणा करून त्यात आणखी खालील सात तत्त्वांचा व रजेसाठी सोळा ग्राह्य कारणांच्या यादीचा समावेश केला आहे :—

मार्गदर्शक तत्त्वे :—

(१) रजेचा अर्ज माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा अगर समिती प्रमुख, सदस्य अनुपस्थिती समिती यांचे नावे पाठवावा. याव्यतिरिक्त आलेले अर्ज सदस्यांकडे परत पाठवून त्यांना यापैकी एकाच्या नावे अर्ज पाठविण्यास सांगण्यात यावे.

(२) एकापेक्षा अधिक अधिवेशनाच्या कालावधीत सभागृहाच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्याची परवानगी मागणारे अर्ज वेगवेगळे असावेत.

(३) पंधरा दिवसांपेक्षा कमी दिवसांच्या कालावधीत अनुपस्थित राहावयाचे असल्यास, अनुपस्थितीची परवागनी मागण्याची आवश्यकता नाही.

(४) क्षुल्लक कारणांसाठी की ज्यामुळे सभागृहाची प्रतिष्ठा कमी होऊ शकेल अशा कारणांसाठी रजेची अनुमती मागण्यात येऊ नये.

(५) ज्या सदस्यांनी शपथ घेतली नाही त्या सदस्यांनी रजा मागितल्यास मंजुरीबाबत विचार करण्यास प्रत्यवाय नाही.

(६) जर एखादा सदस्य सलग ४० दिवस गैरहजर राहिल्यास अशा सदस्यांना रजेचा अर्ज पाठविण्यासाठी कळविण्यात यावे. उक्त सदस्यांकडून ५० दिवसांपर्यंत गैरहजर राहून रजेचा अर्ज न आल्यास पुनःस्मरणपत्र पाठविण्यात यावे. जर असा सदस्य ६० अगर त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी गैरहजर राहिल्यास पत्र पाठवून घटनेतील तरतुदींकडे त्यांचे लक्ष वेधावे व त्यांना रजेचा अर्ज करण्यासाठी कळविण्यात यावे.

(७) सदस्यास गंभीर अपघात किंवा दूर्धर आजार झालेला असेल की ज्यामुळे सदस्य स्वतः अर्ज लिहिण्याच्या अवस्थेत नसेल किंवा कोमामध्ये असेल अशा स्थितीत त्या सदस्याला अर्ज करता येत नसेल तर अशा सदस्याच्या कुटुंबियांना रजेचा अर्ज करता येईल.

रजेसाठी ग्राह्य कारणांची यादी .—

(१) सदस्य स्वतः आजारी असल्यास, वैद्यकीय प्रमाणपत्रासहीत.

(२) सदस्यांच्या ***कुटुंबामध्ये** कोणी आजारी असल्यास, कोणास अपघात झाल्यास अगर कुटुंबामध्ये एखादी दुर्घटना घडल्यास.

(३) सदस्यांच्या ***कुटुंबामध्ये** कोणती मृत्यू पावल्यास.

(४) सदस्याचे स्वतःचे किंवा ***कुटुंबामधील** व्यक्तीचे लग्न असल्यास.

(५) तुरुंगात स्थानबद्धता झाली असल्यास.

(६) यात्रेकरिता किंवा धार्मिक उत्सवात सहभागी होण्यासाठी.

(७) पुढील कारणांसाठी परदेशात गेल्यास (अ) परिषद किंवा शिष्टमंडळात सहभागी होण्यासाठी (ब) अभ्यास दौरा, (क) व्याख्यान देण्यासाठी किंवा (ड) खेळांमध्ये समावेश झाल्यास.

(८) महापूर, अवर्षण, आग अगर भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्ती मतदार संघात किंवा देशाच्या कोणत्याही भागात ओढवल्यास त्यात मदत कार्य करण्यासाठी.

(९) निर्वाचन क्षेत्रांचे परिसीमन किंवा मतदारांची यादी तयार करणे अशा कामांसाठी.

(१०) चौकशी आयोगांशी संबंधित कामे.

(११) मतदारसंघात हुतात्मा दिन, शताब्दी असे महोत्सव साजरे करण्यासाठी किंवा राज्य शासनाच्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यासाठी जेव्हा सदस्यांवर प्रमुख भूमिका सोपविली असल्यास.

(१२) मतदारसंघात निवडणूक किंवा पोट-निवडणूक असल्यास.

(१३) पक्षाच्या अधिवेशनासाठी किंवा बैठकीसाठी.

(१४) मतदार संघात आंदोलन किंवा अशांतता पसरली असल्यास.

(१५) दळणवळणाचे साधन तुटल्यास.

(१६) महिला सदस्य प्रसुत झाल्यास (प्रसूती झाल्यापासून तीन महिन्यांसाठी प्रसूती रजा)

विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीने सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) या कालावधीत खालील नमूद केल्याप्रमाणे एकूण अकरा अहवाल महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सादर केले आहेत :-

(१) पहिला अहवाल (२०१०-११) :– सर्वश्री प्रदिप जयस्वाल, बाळा नांदगांवकर व राजीव सातव, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(२) दुसरा अहवाल (२०१०-११) :– सर्वश्री विजय बाबू घोडमारे, कल्याण काळे, शिरीष कोतवाल, सुधीर पारवे व हर्षवर्धन जाधव, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(३) तिसरा अहवाल (२०१०-११) :– श्री. प्रकाश (बाळा) सावंत, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(४) पहिला अहवाल (२०११-१२) :– श्रीमती विमलताई मुंदडा, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(५) दुसरा अहवाल (२०११-१२) :– सर्वश्री अनिल राठेड, राजीव सातव व दिलीप वाघ, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(६) तिसरा अहवाल (२०११-१२) :– सर्वश्री हर्षवर्धन रायभान जाधव, बबन घोलप, ए.टी. पवार व वल्लभ बेनके, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(७) पहिला अहवाल (२०१२-१३) :– सर्वश्री भारत भालके व बाबसाहेब पाटील, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(८) दुसरा अहवाल (२०१२-१३) :– सर्वश्री वसंतराव गीते व केवलराम काळे, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(९) तिसरा अहवाल (२०१२-१३) :– सर्वश्री वंसतराव गीते, केवलराम काळे व सुरेशदादा जैन, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(१०) चौथा अहवाल (२०१२-१३) :– सर्वश्री शिवाजी कर्डिले, हर्षवर्धन जाधव, सुरेशदादा जैन, मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिफ व राजीव सातव, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(११) पहिला अहवाल (२०१३-१४) :– श्री. सुरेशदादा जैन, पै.संभाजी पवार व रमेश पाटील, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

विधानसभा सदस्य अनुपस्थिती समितीने सन २०१४-२०१९ (तेरावी विधानसभा) या कालावधीत खालील नमूद केल्याप्रमाणे एकूण दहा अहवाल महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सादर केले आहेत :–

(१) पहिला अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री मनोहर नाईक व संग्राम थोपटे, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(२) दुसरा अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री सुरूपसिंग नाईक, मनोहर नाईक व श्रीमती मोनिका राजाळे, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(३) तिसरा अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री रमेश कदम, सुरूपसिंग नाईक, चंद्रदिप नरके, क्षितीज ठाकूर व संग्राम जगताप, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(४) चौथा अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री राजेश टोपे, गणपत गायकवाड, संजय भेगडे, छगन भुजबळ व लखन मलिक, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(५) पाचवा अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री छगन भुजबळ, पंकज भुजबळ व रमेश कदम, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(६) सहावा अहवाल (२०१५-१६) :– सर्वश्री छगन भुजबळ, रमेश कदम, मनोहर नाईक, सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, वसंतराव चव्हाण, सुरूपसिंग नाईक व मोहन फड, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(७) सातवा अहवाल (२०१७-१८) :– सर्वश्री छगन भुजबळ, अमित झनक, रमेश कदम, कालिदास कोळंबकर व मकरंद जाधव-पाटील, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(८) आठवा अहवाल (२०१७-१८) :– सर्वश्री छगन भुजबळ, विलासराव जगताप, वि.स.स. श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स., सर्वश्री सुरूपसिंग नाईक, रमेश कदम व बंटी भांगडिया, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

(९) नववा अहवाल (२०१७-१८) :– सर्वश्री रमेश कदम, संजय पोतनीस, सुरूपसिंग नाईक, सिद्धाराम म्हेत्रे, क्षितीज ठाकूर, हितेंद्र ठाकूर, मोहन फड, हर्षवर्धन जाधव, विजयकुमार गावित, संग्राम जगताप, चंद्रकांत सोनावणे व योगेश टिळेकर, वि.स.स. यांचे रजेसंबंधी आणि

(१०) दहावा अहवाल (२०१७-१८) :– सर्वश्री भास्कर जाधव, मनोहर नाईक व रमेश कदम, वि.स.स. यांचे रजेसंबंधी.

*****

(क) अधिनियमानुसार संयुक्त समित्या

(२१) सदस्यांचे वेतन व भत्ते संयुक्त समिती

(Joint Committee on Members Salary and Allowances)

समितीची रचना व कार्यपद्धती .—

महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ८ अन्वयेच्या तरतुदीनुसार त्या कलमान्वये नियम किंवा आदेश करण्याच्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांची "सदस्यांचे वेतन व भत्ते" याबाबत एक संयुक्त समिती प्रस्थापित करण्यात येते. या समितीमध्ये मा.सभापती, महाराष्ट्र विधापरिषद यांनी नामनिर्देशित केलेले विधानपरिषदेतील ०५ सदस्य आणि मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी नामनिर्देशित केलेले विधानसभेतील १० सदस्य असतात. मा.वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य हे या समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समिती प्रमुख असतात.

सदस्यांचे वेतन व भत्ते यासंबंधी पाहणी करून सुधारणा सूचविणे हे या समितीचे कामकाज असते. सदर समितीस राज्य सरकारशी विचारविनिमय करुन महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ याबाबतची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम किंवा आदेश देता येऊ शकतील. याप्रमाणे करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश महाराष्ट्र विधिमंडळाच्या मा.पीठासीन अधिकारी यांचेकडून मान्य करण्यात येई पर्यंत तसेच **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येई पर्यंत अंमलात येत नाहीत आणि नियमांची किंवा आदेशांची अशी प्रसिद्धी ही, ते यथोचितरित्या करण्यात आल्याचे निर्णायक प्रमाण असते. (विद्यमान सदस्यांचे वेतन आणि भत्ते तसेच इतर सुविधांबाबतची संक्षिप्त माहिती **परिशिष्ट क्रमांक २६** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

*****

(२२) माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत संयुक्त समिती

(Joint Committee on Ex. Members Pension)

समितीची रचना व कार्यपद्धती .—

'माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत संयुक्त समिती' माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत अधिनियम, १९७६ अन्वये अस्तित्वात आलेली आहे. सदर समितीमध्ये मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा.सभापती, महाराष्ट्र विधापरिषद यांनी नामनियुक्त केलेल्या एकूण १५ सदस्यांचा समावेश असतो. मा.वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य हे समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* प्रमुख असतात. माजी सदस्यांच्या निवृत्तीवेतनाबाबतीत पाहणी करुन आवश्यक त्या सुधारणा सुचविणे हे या समितीचे काम आहे.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या माजी सदस्यांच्या गटाकडून अथवा वैयक्तिकरित्या त्यांचेकडून माजी सदस्यांचे निवृत्तीवेतन अथवा सोईसुविधा मिळणे इत्यादी बाबत मा.मुख्यमंत्री / महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी / मा.वित्त, मंत्री अथवा या सचिवालयास निवेदने प्राप्त झाल्यानंतर अशी सर्व निवेदने 'माजी सदस्यांच्या निवृत्ती वेतनाबाबत संयुक्त समिती' समोर विचारार्थ ठेवण्यात येऊन माजी सदस्यांकडून करण्यात आलेल्या मागण्यांवर समितीकडून विचारविनिमय केला जातो. समितीच्या बैठकीत घेतलेले निर्णयाबाबतचे प्रतिवृत्त तयार करुन योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यात येते. (माजी सदस्यांना मिळणाऱ्या इतर सुविधांबाबतची संक्षिप्त माहिती **परिशिष्ट क्रमांक २६** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

*****

(ड) तद्‌र्थ स्वतंत्र समित्या

(२३) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत समिती

(*Ad-hoc* Committee on Papers Laid on the Table of the House - Legislative Assembly)

समितीची रचना व कार्यपद्धती .—

भारतीय संविधानाला जबाबदार प्रशासन अभिप्रेत असून संसदीय लोकशाही पद्धतीत कार्यकारी प्रशासनाच्या कारभारावर नियंत्रण/अंकुश ठेवण्याचे काम विधीमंडळाच्या सभागृहांच्या माध्यमातून आणि नि:सत्र कालावधीत संसदीय समित्यांच्या माध्यमातून करण्यात येत असते.

भारतीय संविधान, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादींच्या तरतुदींच्या अनुषंगाने विधीमंडळाच्या सभागृहांत वेगवेगळ्या महामंडळाचे अहवाल सादर केले जातात. तथापि, असे अहवाल विधानसभेस सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानसभेत विवक्षित असे निदेश देवूनही काही कागदपत्रे ठेवण्यासंबंधीची आश्वासने, कपात सूचनेवरील उत्तरे इत्यादी संदर्भातही विलंब होतो.

या कार्यपद्धतीवर योग्यप्रकारे संनियंत्रण ठेवण्याकरिता; मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी सभागृहात व्यक्त केलेल्या अभिमतानुसार महाराष्ट्र विधानसभा नियम, १६३ (१) अन्वये लोकसभा व राज्यसभेच्या धर्तीवर **"सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत समिती " (Committee on Papers Laid on the Table of the House)** असे नामाभिधान असलेली **विधानसभा तदर्थ *(Ad-hoc)* समिती** दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी गठीत करण्यात आली आहे. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे या समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समिती प्रमुख राहतील. मा.संसदीय कार्य मंत्री वा मा.संसदीय कार्य राज्यमंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील. समितीमध्ये दहा विधानसभा सदस्यांचा समावेश असेल. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचेकडून सभागृहाचे नेते व विरोधी पक्ष/गट प्रमुख यांचेसमवेत विचारविनिमय करुन या समितीवरील सदस्यांची नामनियुक्ती, करण्यात येते. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय हे या समितीवर निमंत्रित म्हणून तर प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून काम पाहतील. समिती सदस्यत्वाची मुदत सर्वसाधारणपणे एक वर्ष किंवा नवीन समिती अस्तित्वात येईपर्यंत असते.

सद्य:स्थितीत अशाप्रकारची समिती लोकसभा व राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहांत तसेच देशातील १५ विधीमंडळामध्ये कार्यरत आहे.

भारताचे संविधान, महाराष्ट्र विधानसभा नियम, केंद्र व राज्य शासनाचे विविध अधिनियम इत्यादीमध्ये असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने विधानसभा सभागृहात राज्य शासनाच्या वेगवेगळ्या महामंडळांचे, मंडळांचे, विविध विद्यापीठांचे वार्षिक अहवाल सादर केले जातात. तथापि, असे अहवाल सभागृहास सादर करण्यास बराच विलंब होतो. तसेच विधानसभेत विवक्षित असे निदेश देऊनही काही कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासंबंधीची आश्वासने, जमा खर्चाचे विवरण, अतारांकित प्रश्नांवरील उत्तरे, कपात सूचनेवरील उत्तरे, लक्षवेधी सूचनेवरील निवदने इत्यादी संदर्भातही विलंब होतो. मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची अधिक माहिती मा.मंत्री महोदय यांचेकडून बऱ्याच कालावधीनंतर अनेक वर्षांची कागदपत्रे एकाचवेळी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात

येतात. त्यावेळी सभागृहात अनेक मा.सदस्य आक्षेप घेऊन विलंबाची कारणांची विचारणा करतात अथवा नाराजी सुद्धा व्यक्त करतात. अशावेळी संबंधित मंत्री महोदय यासंदर्भात योग्य तो खुलासा करून याबाबत पुढच्यावेळी दक्षता घेण्यात येईल, असे सभागृहास आश्वस्त करतात. अनेकदा अहवाल वेळच्यावेळी सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत, मा.पीठासीन अधिकारी संबंधित मा.मंत्री महोदयांना आदेश देतात. परंतु या संदर्भातील विलंबाच्या करणांची छाननी करणे, तसेच सदर कारणे योग्य आहेत किंवा कसे ? याबाबतची समाधानकारक कारणमिमांसा सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे काय ? याबाबतची तपासणी, सखोल परिक्षण विधीमंडळाकडून करणे शक्य होत नाही, तसेच त्यावर नियंत्रण ठेऊन त्या बाबींचे नियमन करणेसुद्धा आवश्यक आहे.

अशाप्रकारे विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांबाबत तसेच अहवालासंदर्भात होणारा विलंब टाळण्यासाठी, तसेच यांसदर्भात कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास विलंब का होतो ? याबाबतची कारणमीमांसा काय आहे ? ही कारणमीमांसा नियमाप्रमाणे समर्थनीय आहे किंवा कसे ? यासंदर्भात सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यपद्धतीत कोणते बदल अपेक्षित आहेत ? या कार्यपद्धतीवर योग्य प्रकारे संनियंत्रण कशाप्रकारे ठेवता येईल ? इत्यादी बाबींचे परिनिरिक्षण करून तसेच या सर्व बाबींचा साकल्याने विचारविनिमय करून आणि सदस्यांच्या मागणीनुसार सभागृहात अहवाल सादर करण्यासाठी लोकसभा व राज्यसभेच्या धर्तीवर "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत समिती" (Committee on Papers Laid on the Table of the House) या नावाची, दहा विधानसभा सदस्यांचा समावेश असलेली विधानसभेची तदर्थ *(Ad-hoc)* समिती महाराष्ट्र विधानसभा नियम, १६३(१) अन्वये दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी गठीत करण्यात आली.

विधानसभा सभागृहात राज्य शासनाच्या वेगवेगळ्या महामंडळांचे, मंडळांचे, विविध विद्यापीठांचे वार्षिक अहवाल सादर केले जातात. सभागृहास सादर होणाऱ्या अहवालांपैकी किमान एखाद्या अहवालावर सभागृहात चर्चा व्हावी अशी देखील अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली आहे. परंतु त्या-त्यावेळी सभागृहासमोर असणाऱ्या एकूण कामकाजाचे स्वरुप व उपलब्ध असलेला मर्यादित वेळ यास्तव अशी चर्चा सभागृहात करणे शक्य होत नाही. यामुळे या समितीमध्ये एखाद्या महामंडळाच्या अहवालावर चर्चा करणे ही समितीची महत्त्वाची जबाबदारी आहे.

समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांचे, अहवालांचे खालील बाबतीत परिक्षण करणे हे समितीचे काम असेल :-

(१) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे, अहवाल, कपात सूचनांची उत्तरे इत्यादी संविधानातील तरतुदी, अधिनियम, नियमांतील तरतुदी, निदेश इत्यादी अन्वये ठेवण्यात आली आहेत काय व असे करताना संबंधित तरतुदींचे पालन झाले आहे किंवा कसे ?

(२) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे, अहवाल सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवले गेले असल्यास असा विलंब होण्याची कारणे काय आहेत ? अशी कागदपत्रे, अहवाल इत्यादी सभागृहाच्या पटलावर ठेवताना शासनाने झालेल्या विलंबाची कारणे दिली आहेत काय व दिलेली कारणे समर्थनीय आहेत काय ?

(३) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणाऱ्या सर्व कागदपत्रांबाबत, अहवालांबाबत होणारा विलंब टाळण्यासाठी विशिष्ट कार्यपद्धती आखून देणे.

(४) सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्यासंदर्भात मा. अध्यक्ष वेळोवेळी विवक्षितपणे समितीकडे नेमून देतील अशी अन्य कामे.

मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने समितीची प्रारंभिक बैठक दिनांक १२ मे, २०१० रोजी होऊन समितीच्या कामकाजास औपचारिक सुरुवात करण्यात आली.

सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत तदर्थ समितीच्या अहवालांतील निवडक महत्वाच्या शिफारशी .—

महाराष्ट्र विधानसभा सभागृहास सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या पहिल्या अहवालातील "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवणेबाबत" तदर्थ समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी .—

अहवाल (हा अहवाल विधानसभा सभागृहास दिनांक ०६ जून, २०१४ रोजी सादर करण्यात आला) - सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या औचित्याच्या मुद्यांना उत्तरे पाठविण्याबाबतचा कालावधी ०७ दिवसांचा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

याचबरोबर विविध संसदीय आयुधांच्या संबंधातील प्रलंबित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास होत असलेला विलंब याबाबत समिती समोर विचारार्थ असलेल्या, राज्य शासनाच्या विविध विभागांशी संबंधित लक्षवेधी सूचनांसंबंधी निवेदने, कपात सूचना, अतारांकित प्रश्नांची उत्तरे, महामंडळांचे तसेच विद्यापीठांचे प्रलंबित अहवाल, औचित्याच्या मुद्यांवरील निवेदने तसेच स्थगन प्रस्तावाच्या सूचनांवरील निवेदने इत्यादी बाबतची माहिती त्या-त्या विभागांनी त्वरीत सादर करण्याबाबत समितीने निदेश दिले आहेत.

*****

(ई) तद्‌र्थ संयुक्त समित्या

(२४) ग्रंथालय समिती

(Committee on Library)

समितीची रचना व कार्यपद्धती .—

ग्रंथालय समिती ही तद्‌र्थ संयुक्त समिती *(Joint Ad-Hoc Committee)* असून या समितीमध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांचा समावेश असतो. समितीची मुदत समिती घटित झाल्यानंतर एक वर्षांसाठी असते. नवीन समिती घटित होईपर्यंत पूर्वीची समिती कार्यरत राहते. समितीमध्ये सध्या २० सदस्यांचा समावेश आहे. मा. सभापती, महराष्ट्र विधानपरिषद हे समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समितीप्रमुख तसेच मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे पदसिद्ध *(Ex-Officio)* सह-समितीप्रमुख असतात. उर्वरित १८ सदस्यांमध्ये विधानसभेचे १३ व विधानपरिषदेचे ०५ सदस्य, दोन्ही सभागृहांच्या मा.पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशित केलेले असतात. महाराष्ट्र विधिमंडळाच्या ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासंबंधी मार्गदर्शन करणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ व इतर वाचनीय साहित्याची निवड, त्यांचे जतन व उपयुक्तता वाढविण्यासाठी मार्गदर्शन व उपाययोजना या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. समितीच्या बैठका साधारणतः निःसत्र कालावधीमध्ये होतात. विधिमंडळाच्या सत्रकालामध्येही आवश्यकतेनुसार समितीची बैठक आयोजित करण्यात येते.

*****

(२५) आमदार निवास व्यवस्था समिती

(Committee on Management of Hostel for Members of the Maharashtra Legislature)

समितीची रचना .—

आमदार निवास व्यवस्था समिती ही तदर्थ संयुक्त समिती *(Joint Ad-Hoc Committee)* आहे. या समितीमध्ये एकूण १७ सदस्यांचा समावेश असून त्यापैकी १२ सदस्य मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्याकडून तसेच ५ सदस्य मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडून नामनियुक्त करण्यात येतात. मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य हे या समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समिती प्रमुख असतात.

समितीची कामे .—

महाराष्ट्र विधीमंडळाच्या मुंबई व नागपूर येथील अधिवेशन कालावधील विधानमंडळ सदस्यांना मुंबई व नागपूर येथील आमदार निवासातील कक्षांचे वाटप करणे हे कामकाज मुख्यतः या समितीकडे असते. तथापि, सन १९८१ पासून मुंबई येथील चारही आमदार निवासातील कक्ष सदस्यांना कायम स्वरुपात (सदस्यत्वाची मुदत संपेपर्यंत) देण्यात येत असल्यामुळे प्रत्येक अधिवेशनापूर्वी मुंबई येथील आमदार निवासातील कक्षांचे वाटप करण्याचे कामकाज बंद झाले असून विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर गठीत झालेल्या विधानसभेतील फक्त नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना आमदार निवासातील कक्षांचे वाटप या समितीमार्फत आता करण्यात येते.

त्याचप्रमाणे विधानसभा/विधानपरिषद पोटनिवडणूकीत तसेच विधानपरिषदेच्या द्विवार्षीक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांना देखील कक्षांचे वाटप समितीमार्फत करण्यात येते. आमदार निवासातील कक्षांमधील गैरसोई दूर करणे, सदस्यांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे याबाबतची व्यवस्था कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडून करून घेण्याच्या दृष्टीने योग्य त्या सूचना या समितीकडून करण्यात येतात. आमदार निवास व्यवस्था समितीची बैठक मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्याच्या निदेशानुसार आयोजित करण्यात येते.

महाराष्ट्र विधीमंडळाच्या मा.सदस्यांच्या सोईसाठी सद्य:स्थितीत मुंबई येथे मुख्य आमदार निवास (आकाशवाणीजवळ) व जुने विधान भवन, विस्तारीत आमदार निवास असे दोन आमदार निवास आहेत.

सदर दोन आमदार निवासात खालीलप्रमाणे एकूण २२९ कक्ष आहेत .–

(१) आकाशवाणी आमदार निवास - १९१ कक्ष

(२) विस्तारित आमदार निवास - ३८ कक्ष

*****

(२६) आहार व्यवस्था समिती

(Committee on Catring Services)

समितीची रचना :–

आहार व्यवस्था समिती ही तद्र्थ संयुक्त समिती *(Joint Ad-Hoc Committee)* आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांच्या सोईसाठी मुंबई येथील आमदार निवासामध्ये उपहारगृहाची व्यवस्था करण्यात आली असून त्यावर आहार व्यवस्था समितीमार्फत सर्वसाधारण नियंत्रण ठेवले जाते. आहार व्यवस्था समिती ही विधानमंडळाची एक अस्थायी स्वरुपाची समिती असून या समितीमध्ये एकूण १५ सदस्यांचा समावेश आहे. त्यापैकी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचेकडून ११ सदस्य तर मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडून ४ सदस्य प्रत्येक वर्षी या समितीवर नामनियुक्त करण्यात येतात. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे विधानसभा सदस्यांमधून समिती प्रमुखाची नामनियुक्ती करतात. आहार व्यवस्था समितीची बैठक समिती प्रमुखाच्या निदेशानुसार सर्वसाधारणपणे विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वी आयोजित करण्यात येते.

समितीची कामे :–

(१) मॅजेस्टीक हॉस्टेल आमदार निवास, जुने विधान भवन विस्तारित आमदार निवास, मनोरा आमदार निवास, मुंबई तसेच नागपूर येथील आमदार निवास, या सर्व आमदार निवासांतील सदस्यांच्या आहार व्यवस्थेसाठी असलेल्या उपहारगृहासाठी खाद्यपेय प्रबंधकांकडून निविदा मागविणे व खाद्यपेय प्रबंधकाची निवड करणे.

(२) उपहारगृहातील खाद्यपेय पदार्थाचे दर, दर्जा व प्रमाण निश्चित करणे.

(३) उपहारगृहात सदस्यांना दर्जेदार खाद्यपदार्थ तसेच, चविष्ट, सकस व उत्कृष्ट प्रतीचे शाकाहारी व मांसाहारी भोजन उपलब्ध होईल यादृष्टीने खाद्यप्रबंधकांना सूचना देणे.

(४) उपहारगृहासंबंधी सदस्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही यादृष्टीने खबरदारी घेण्याबाबत खाद्यपेय प्रबंधकांवर निगराणी ठेवणे.

(५) उपहारगृहासंदर्भात सदस्यांकडून आलेल्या तक्रारींची व सूचनांची दखल घेवून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना आदेश देणे.

*****

(२७) 'धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे' संदर्भात समिती

(Joint Ad Hoc Committee on Inspection of Charitable Private Hospitals)

पार्श्वभूमी व समितीची स्थापना :–

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभागृहात श्री.मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी दिनांक २५ जुलै, २००७ रोजी "मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ कक (इंग्रजी आवृत्तीनुसार 41 AA) चे मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इ.धर्मादाय रुग्णालयांनी पालन न करणे" या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. सदरहू लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्यावेळी मा.सदस्यांनी विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन याप्रकरणी सखोल छाननी होणे आवश्यक असल्यामुळे यासंदर्भात विधानपरिषद सभागृहातील मा. सदस्यांची समिती गठीत करण्याची मागणी केली असता समिती गठीत करण्याचा निर्णय प्रथम विधानपरिषदेत घेण्यात आला. त्यानुषंगाने मा. विधी व न्याय, राज्यमंत्री यांनी ०९ मा.समिती सदस्यांचा समावेश असलेली तदर्थ समिती गठीत करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ०२ ऑगस्ट, २००७ रोजी विधानपरिषद सभागृहात मांडला व सभागृहाने सदर प्रस्ताव संमत केला.

त्यानुसार मा. विधी व न्याय राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली विधानपरिषद सदस्यांची तद्र्थ समिती प्रथम गठीत करण्यात आली. या समितीच्या एकूण ०८ ते ०९ बैठका झाल्या. तसेच समितीने मुंबई व पुणे येथील अनेक धर्मादाय रुग्णालयांना भेटी देऊन त्यांचे व्यवस्थापनाशी चर्चाही केली. परंतु समितीच्या नंतर असे निदर्शनास आले की, सदरहू तदर्थ समितीची व्याप्ती ही अत्यंत मर्यादीत स्वरुपाची असून समितीची व्याप्ती ही मुंबईपुरती मर्यादीत न ठेवता ती राज्यव्यापी करण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला. दरम्यानच्या कालावधीत विधानसभेतही याच विषयावर दिनांक २६ डिसेंबर, २००८ रोजी लक्षवेधी सूचना चर्चेला आली असता समितीची कार्यकक्षा मुंबईपुरती मर्यादित न ठेवता ती राज्यव्यापी करण्याकरीता तसेच या समितीमध्ये विधानसभेच्या सदस्यांचा समावेश करून दोन्ही सभागृहांची संयुक्त तदर्थ समिती गठीत करण्याबाबत सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार सन २००८ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक ३० डिसेंबर, २००८ रोजी मा.विधी व न्याय, राज्यमंत्री यांनी (श्री. हसन मुश्रीफ) समिती सदस्यांच्या नावासह प्रस्ताव विधानसभेत व विधानपरिषदेत मांडला असता, समिती गठीत करण्याबाबतचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. सभापती यांना देण्यात आले व त्यानुसार दिनांक १३ जानेवारी, २००९ रोजी मा. सभापती यांच्या समवेत त्यांच्या दालनात मा.अध्यक्ष व मा. विधी व न्याय, राज्यमंत्री यांची बैठक

होऊन मा. सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सह अध्यक्षतेखाली व मा. विधी व न्याय, राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येऊन कार्यकारी समिती सदस्यांची नावे व समितीच्या कार्यकक्षा निश्चित करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील एकूण २३ (मा. सभापती, विधानपरिषद, मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. विधी व न्याय, राज्यमंत्री यांचे व्यतिरिक्त १३ विधानसभा सदस्य व ७ विधानपरिषद सदस्य) मा.सदस्यांची तदर्थ समिती गठीत करण्यात आली. धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे या संदर्भातील समिती, ही तदर्थ संयुक्त समिती *(Joint Ad-Hoc Committee)* आहे.

समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल :—

(१) मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० च्या अंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक न्यासांमार्फत चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांना (ज्यात नर्सिंग होम, मॅटरनिटी होम, दवाखाने किंवा औषधोपचार देणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो.) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत (Concession), मदत (Relief), माफी (Exemption), इत्यादी तसेच

(२) सदरहू रुग्णालयांतर्फे दारिद्रय रेषेखालील (Below Powerty Line) कुटूंबातील रुग्णांसाठी आरक्षित केलेल्या खाटा व त्यांना सवलतीच्या दराने देण्यात येणारे औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी करावयाचा व प्रत्यक्षात करण्यात आलेला खर्च.

(३) मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० या कायद्यामधील तरतूदींचा तसेच या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या नियमांचा आढावा घेणे व त्यात आवश्यक त्या सुधारणा (Amendements) सुचविणे.

टीप :-समितीच्या उपरोक्त कार्यकक्षेमध्ये मुद्दा क्र.२ मध्ये "दारिद्रय रेषेखाली कुटूंबातील रुग्णांसाठी" (Below Powerty Line) असा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये "निर्धन व्यक्ती" तसेच "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती" यासाठी नमूद केलेल्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करून "निर्धन व्यक्तींसाठी" वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये २५,००० पर्यंत तसेच "समाजातील दुर्बल घटकांकरीता" असलेली वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये २५,००० पेक्षा जास्त व रुपये ५०,००० पर्यंत इतकी वाढविण्यात आल्याचे व त्याबाबतची अधिसूचना (Notification) निर्गमित करण्यात आल्याचे बैठकीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणण्यात आल्यामुळे कार्यकक्षेमध्ये नमूद करण्यात आलेला "दारिद्रय रेषेखालील" (Below Powerty Line) हा उल्लेख याप्रकरणी लागू होत नाही व त्यामुळे समितीच्या पुढील कामकाजातून वगळण्यात आलेला आहे व त्या ठिकाणी केवळ "निर्धन व्यक्ती" व "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती" असाच उल्लेख करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त तद्र्थ समितीची प्रारंभीक बैठक दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये समितीच्या कामकाजाची रुपरेषा ठरविण्यात आली. या बैठकीमध्ये मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेबाबतची वस्तुस्थितीही समितीने जाणून घेतली. तसेच सदरहू प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने प्रस्तावित केलेली योजना (Scheme) याबाबतही समितीने सविस्तर माहिती घेतली. त्याचप्रमाणे उपरोक्त मा. उच्च न्यायालयाच्या योजनेसंदर्भात तसेच न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक

तत्त्वावर व मूळ अधिनियमातील तरतुदींबाबत समितीस सविस्तर माहिती देण्यासाठी दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या बैठकीत राज्याचे महाअभिवक्ता यांना बोलविण्यात आले असता त्यांनी समितीसमोर अनेक बाबी स्पष्ट केल्या.

"धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तद्र्थ समितीने आपला अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांस दिनांक ५ जून, २००९ रोजी सादर केला होता. (अकरावी महाराष्ट्र विधानसभा २००८-२००९) सदर अहवालामध्ये समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे : "मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१-कक तसेच मा. उच्च न्यायालयाच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होते किंवा कसे हे पाहण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने देखरेख समिती (Monitaring Committee) देखील स्थापन केलेली आहे. परंतु एकंदरीतच ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडते आहे किंवा कसे तसेच गरीबांना धर्मादाय रुग्णालयांकडून मोफत अथवा सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार प्राप्त होत आहेत किंवा कसे तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत या संपूर्ण प्रक्रियेवर असणारे नियंत्रण या संपूर्ण बाबींचा सर्वंकष आढावा घेण्याचीही नितांत आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्याअनुषंगाने या संपुर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्याकरिता विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील मा. सदस्यांचा समावेश असलेली एक समिती गठीत करण्याबाबतही समितीचा मानस आहे व त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल असेही या ठिकाणी समिती स्पष्ट करीत आहे.'' **त्या अनुषंगाने सदर समितीच्या पुढीलप्रमाणे कार्यकक्षा ठरविण्यात आल्या आहेत :-**

"मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ कक (इंग्रजी आवृत्तीनुसार ४१AA) मधील तरतुदी व मा. उच्च न्यायालयाच्या या संदर्भातील योजनेच्या अनुषंगाने खाजगी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये व निर्धन रुग्णांसाठी १०% + १०% खाटा सवलतीच्या दराने व मोफत उपचारांसाठी राखून ठेवण्याच्या योजनेचा सर्वंकष आढावा घेणे, सदर योजनेतील त्रुटी तसेच विद्यमान कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रुग्णांना अधिकाधिक सोयी-सुविधा व योग्य रितीने औषधोपचार मिळावेत यासाठी शासनास शिफारशी/उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल सभागृहास सादर करणे."

राज्यात एकूण ४३० धर्मादाय रुग्णालय आहेत. समितीने पुणे येथे दिनांक ४ व ५ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत विविध धर्मादाय खाजगी रुग्णालयांना भेटी दिल्या असून भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात दिनांक १५ मे, २०१८ रोजी साक्ष घेण्यात आली. समितीच्या विधानभवन, मुंबई येथे दिनांक ०९ जानेवारी, २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत, निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी तयार केलेल्या योजनेच्या अनुषंगाने सादरीकरण (Power Point Presentation) करण्याबाबत निदेश देण्यात आले होते. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी सादरीकरण करण्यात आले. निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांच्या माहितीसाठी सर्व जिल्ह्यांमध्ये स्मार्ट टिव्ही लावण्याबाबतचे निदेश समितीने दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत दिले होते. त्यानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये स्मार्ट टिव्ही लावण्यात आलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधी यांनी समितीच्या निदर्शनास आणले. समितीने सदर बैठकीत, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम, १५१ चे नियम २५ अ मध्ये नमूद केलेल्या Schedule X-AAA या प्रपत्रातील स्तंभ १ व २ मध्ये अंतर्भूत असलेल्या अनुक्रमे निर्धन व दुर्बल घटकांच्या रुग्णांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेसंदर्भातील अधिनियमात सुधारणा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली ? अशी विचारणा विभागीय प्रतिनिधींना केली असता, **आता निर्धन व दुर्बल घटकाच्या**

रुग्णांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादा ५० हजाराहून ८५ हजारापर्यंत केली आहे आणि ज्यामध्ये १ लाखांची मर्यादा होती ती आता १ लाख ६० हजार रुपयापर्यंत केली आहे, असे समितीस सांगण्यात आले आहे. समितीने सर्व धर्मादाय रुग्णालयांनी आपल्या नावाच्या फलकामध्ये "धर्मादाय" रुग्णालय अशा उल्लेख करावा असे निदेश दिले होते. त्यानुसार दिनांक १३ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये धर्मादाय आयुक्त यांनी, राज्यातील अनेक खाजगी रुग्णालये धर्मादाय रुग्णालये असून सर्व धर्मादाय रुग्णालयांनी आपल्या नावाच्या फलकामध्ये "धर्मादाय" असे नमूद करण्यात आल्याबाबत समितीच्या निदर्शनास आणले आहे. समितीने सर्व धर्मादाय रुग्णालयामध्ये गरीब व निर्धन रुग्णांसाठी १०% + १०% बेड सवलतीच्या दराने व मोफत उपचारांसाठी राखून ठेवण्याच्या योजनेचा तपशील दर्शनी भागामध्ये लावण्यात यावा, असे सुचविले होते. त्यानुसार सर्व धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या दर्शनी भागामध्ये तपशील दर्शविण्यात आल्याचे कळविले आहे.

धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे या संदर्भातील तद्र्थ समितीच्या अहवालातील निवडक महत्वाच्या शिफारशी :—

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांस सन २००९-२०१४ (बारावी विधानसभा) या कालावधीत सादर करण्यात आलेल्या अहवालातील धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे या संदर्भातील तद्र्थ समितीच्या निवडक महत्त्वाच्या शिफारशी :—

अहवाल - २००८-०९ (सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांस दिनांक ५ जून, २००९ रोजी सादर करण्यात आला.)

(१) धर्मादाय आयुक्तांनी प्रथमतः सर्व धर्मादाय रुग्णालयांच्या व्यवस्थापनाला अधिनियमातील तरतूदीचा व योजनेचा स्पष्ट अर्थ, त्याची अंमलबजावणी व अंमलबजावणीची कार्यपद्धती पुन्हा एकदा लेखी स्वरुपात निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे जेणेकरुन धर्मादाय रुग्णालयांना कायद्यातील तरतूदींचा व योजनेचा सोयीस्कर अर्थ लावता येणार नाही अशी समितीची शिफारस आहे.

(२) सदरहू अधिनियमाअंतर्गत "निर्धन व्यक्ती" व "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींकरीता" नमूद करण्यात आलेली उत्पन्न मर्यादा ही शासनाने अधिसूचना निर्गमित करुन वाढविलेली आहे. सद्यःस्थितीत "निर्धन व्यक्ती" ची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही ३,६०० रुपयांवरुन २५,००० रुपये इतकी करण्यात आलेली आहे व "समाजातील दुर्बल घटकांतील व्यक्तींकरीता" ची वार्षिक उत्पन्न मर्यादा ही १५,००० रुपयांवरुन ५०,००० रुपये इतकी वाढविण्यात आलेली आहे. परंतु या योजनेचा जास्तीत-जास्त गरिब रुग्णांना लाभ घेता यावा तसेच आजमितीस प्रत्येक व्यक्तीची असलेली उत्पन्न क्षमता व आर्थिक उलाढाल लक्षात घेता यासाठी "निर्धन व्यक्ती" व "समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींकरीता" शासनाने आखून दिलेली उत्पन्नाची मर्यादाही वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा या योजनेचा लाभ जनसामान्यांना घेता येणे शक्य होणार नाही. त्यामुळे **उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत व तशी सुधारणा अधिनियमात करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे.**

(३) धर्मादाय रुग्णालयांमध्ये मोफत अथवा सवलतीच्या दराने उपचार होण्याकरीता सर्वात अधिकृत व अंतिम कागदपत्र म्हणजे तहसीलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला तसेच रेशनकार्ड (शिधावाटप पत्रिका) व दारिद्रय रेषेखालील दाखला हा आहे. हा **उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरुनच या रुग्णांवर रुग्णालयांमध्ये उपचार होणार असल्यामुळे असे दाखले देताना त्यासंबंधीची पूर्ण शहानिशा, छाननी करुनच असे दाखले तहसीलदारांनी अथवा संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावे व यात कुठलीही अनियमितता होऊ नये याची पूरेपूर काळजी घेण्याबाबत शासनाने स्पष्ट निर्देश संबंधितांना द्यावे अशीही समितीची शिफारस आहे. अशी शिफारस करण्यामागे समितीचा केवळ एवढाच उद्देश आहे की, या योजनेचा लाभ हा योग्य लाभार्थीपर्यंत पोहोचावा व त्याचा कुठलाही गैरफायदा अन्य लोकांनी घेता कामा नये.**

(४) धर्मादाय रुग्णालये अधिनियमातील तरतूदीचे सर्रासपणे उल्लंघन करीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले याचे मूळ कारण धर्मादाय रुग्णालयाच्या व्यवस्थानाच्या मनात कुठेही शिक्षेचे भय राहिलेले नाही असे समितीचे स्पष्ट मत झालेले आहे. अधिनियमात नमूद केलेली शिक्षा ही अत्यंत नाममात्र व क्षुल्लक स्वरुपाची असल्यामुळे तसेच उल्लंघन करणे रुग्णालयांना सोपे जाते. कलम ४१ कक चे उल्लंघन केल्यास धर्मादाय आयुक्त अशा रुग्णालयांना नोटीस जारी करु शकते व तरीही त्यांनी अंमलबजावणी केली नाही तर त्यांना जास्तीत जास्त २,००० रुपये दंड ठोठवायचे अधिकार धर्मादाय आयुक्तांना प्रदान करण्याबाबतची तरतूद अधिनियमात केलेली आहे. ही दंडाची रक्कम अत्यंत नाममात्र असल्यामुळे कित्येक रुग्णालयांना कलम ४१ कक ची अंमलबजावणी करण्यापेक्षा दंड भरणे अधिक सोयिस्कर होते हे लक्षात घेता **समितीची अशी शिफारस आहे की, अधिनियमातील तरतूदींच्या उल्लंघनासाठी द्यावयाच्या शिक्षेचे स्वरुप हे अत्यंत कठोर करणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. त्यामुळे अधिनियमात नमूद केलेली दंडाची रक्कम ही २,००० रुपयांवरुन वाढविण्यात यावी. ही बाब केवळ दंडापुरतीच मर्यादित नसून त्यात ३ वर्षांच्या सक्तमजुरीच्या शिक्षेची तरतूद देखील समाविष्ट करण्यात यावी. एवढेच नव्हे तर कुठलीही रुग्णालये या तरतूदीचे उल्लंघन करण्यास धजावणार नाही यासाठी अशा रुग्णालयांची नोंदणी** (Registration) **रद्द करण्याच्या शिक्षेची देखील तरतूद अधिनियमात करणे समितीला आवश्यक वाटते. परंतु या सर्व बाबींसाठी मूळ अधिनियमात सुधारणा करणे आवश्यक आहे.**

(५) धर्मादाय रुग्णालय यांना शासनाकडून खालीलप्रमाणे सोयी सवलती दिल्या जातात :–

१. आयकरातून सूट मिळविणे.

२. धर्मादाय रुग्णालयांना देणगी स्वरुपात करण्यात आलेल्या रकमेवर आयकर बसविण्यात येत नाही. त्यामुळे अशा रुग्णालयांना देणगीच्या स्वरुपात मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होणे.

३. महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या वस्तूंवर, वैद्यकीय उपकरणांवर तसेच औषधांवर जकात व सीमा शुल्क माफ करण्यात येणे.

४. वीज देयकात सवलत मिळविणे.

५. अशा रुग्णालयासाठी लागणाऱ्या जमिनी या मोफत अथवा सवलतीच्या दरात शासनाकडून प्राप्त करुन घेणे.

६. किंवा १/- रुपया नाममात्र भाडेतत्व करारावर अशा जमिनी वर्षानुवर्षे या रुग्णालयांकडून वापरल्या जाणे.

७. रुग्णालयांच्या इमारतींसाठी वाढीव अतिरिक्त एफ.एस.आय. शासनाकडून मिळविणे.

८. पिण्याच्या पाण्याच्या देयकात सूट मिळविणे.

परंतु रुग्णालयातील सेवेच्या वापर मात्र व्यावसायिक दृष्टीकोन समोर ठेवनूच केला जातो. त्यामुळे अशाप्रकारच्या सुविधा देतानादेखील आता शासनाने पुनःविचार करण्याची आवश्यकता आहे. यापुढे अशा सवलती रुग्णालयांना देताना शासनाने अधिक सखोल शहानिशा करावी अशी समितीची शिफारस आहे तसेच जी रुग्णालये कलम ४१ कक व मा.उच्च न्यायालयाच्या योजनेची अंमलबजावणी करीत नाही त्यांचेकडून उपरोक्त प्रमाणे शासनाने दिलेल्या सर्व सोयी-सवलती, सूट व माफी शासनाने काढून घ्याव्यात अशीही समिती शिफारस करीत आहे.

(६) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१-कक तसेच मा.उच्च न्यायालयाच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होते किंवा कसे हे पाहण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने देखरेख समिती (Monitaring Committee) देखील स्थापन केलेली आहे. **परंतु एकंदरीतच ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडते आहे किंवा कसे तसेच गरिबांना धर्मादाय रुग्णालयांकडून मोफत अथवा सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार प्राप्त होत आहेत किंवा कसे तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत या संपूर्ण प्रक्रियेवर असणारे नियंत्रण या संपूर्ण बाबींचा सर्वकष आढावा घेण्याचीही नितांत आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.**

*****

(२८) महाराष्ट्र विधिमंडळ "एड्स" चर्चापीठ

(Maharashtra Legislature's Forum on AIDS)

पार्श्वभूमी व चर्चापीठाची स्थापना :-

"एड्स" या रोगाचा हा प्रश्न सर्व राष्ट्रांच्या समोर गंभीर आरोग्याची समस्या घेऊन उभा ठाकला असून देशाच्या आर्थिक आणि सामाजिक वाढीवर देखील याचा विपरीत परिणाम झालेला आहे. सार्वजनिक आरोग्याच्या खर्चावरही त्यामुळे प्रतिकूल परिणाम होत आहे. "एड्स" या रोगास कारणीभूत ठरणाऱ्या एच.आय.व्ही. या विषाणूमुळे आज केवळ अतिधोका पत्करणाऱ्या व्यक्ती आणि अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तीच बाधित होत आहे असे नाही तर लहान मुले, पौगंडावस्थेतेतील मुले, तरुण, वृद्ध, गृहिणी देखील बाधित होत आहेत. जेव्हा एड्सग्रस्त रुग्णांना लांच्छन लावले जाते, त्यांना बहिष्कृत केले जाते त्यावेळी निश्चितच मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते.

सदरहू रोगाचा सक्षमपणे मुकाबला करण्यासाठी व कार्यकारी प्रशासन आणि विधीमंडळ यांना यासंदर्भात मार्गदर्शन करुन या भंयकर रोगाविषयीच्या त्यांच्या दृष्टीकोनात बदल घडवून आणण्यासाठी महत्वाची भूमिका बजाविण्याकरीता राष्ट्रीय स्तरावर पक्षभेद विचारात न घेता (Irrespective of Party Affiliation) संसद सदस्यांचा समावेश असलेले एक चर्चापीठ स्थापन करण्यात आलेले आहे. राज्यातील जिल्हा व स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वामार्फत या रोगाला परिणामकारकरित्या आळा घालण्यासाठी राज्यस्तरांवर एकूण १४

राज्यांमध्ये (जुलै, २०१० अनुसार) देखिल अशा प्रकारे विधीमंडळ सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या चर्चापीठांची स्थापना करण्यात आलेली आहे. उपरोक्तप्रमाणे चर्चापीठांची स्थापना करण्याच्या प्रश्नासंबंधी राष्ट्रीय चर्चापीठाचे (National Forum) मुख्य निमंत्रक (Chief Convenor) हे सर्व राज्यांकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.

एचआयव्ही/एड्स(पी.एल.एच.ए.) मुळे अंदाजे ४.५ लक्ष लोक बाधित असून या रोगाने अतिशय प्रभावित झालेल्या सहा संवेदनशील राज्यांपैकी महाराष्ट्र हे ही एक राज्य आहे. (जुलै, २०१० अनुसार) राज्यातील २०% लोक पी.एल.एच.ए.ने बाधित असून राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी ३२ जिल्हे "अ" श्रेणीत म्हणजे संवेदनशील गटात मोडतात. हा रोग ग्रामीण भागात पसरला असून, यात सर्वसाधारण जनता विशेषतः निष्पाप स्त्रिया प्रभावित झालेल्या आहेत. या रोगाला आळा घालण्यासाठी यासंदर्भात सजगता आणून एक परिणामकारक कार्यक्रम आखण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. राज्यातील एचआयव्ही/एड्स या रोगास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्था यांच्या मार्फत विविध प्रतिबंधात्मक कार्यक्रम - सल्ला व चाचणी केंद्र माहिती, शिक्षण, व संवाद, उपचार व देखभाल केंद्रे इ. विविध आघाड्यांवर कार्य सुरू आहे.

राज्याचे तत्कालीन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी उपरोक्तप्रमाणे सर्व बाबींचा आपल्या पत्रात ऊहापोह करुन संसदेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील वरील उद्देशार्थ विधीमंडळ सदस्यांचा अंतर्भाव असलेल्या एका चर्चापीठाची स्थापना करण्याबाबतच्या प्रक्रियेची सुरुवात करण्यासाठी विनंती केली होती.

जागतिक पतळीवर एड्स या रोगाला प्रभावीपणे रोखण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू असून संसदेमध्ये राष्ट्रीय स्तरावर या संदर्भात स्थापन करण्यात आलेले चर्चापीठ, महाराष्ट्र विधीमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी यांनी या संदर्भात निर्णय घेऊन दिलेले निदेश, तत्कालीन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी केलेली प्रस्तुतची विनंती, तसेच अनेक राज्यात याबाबत अस्तित्वात आलेले चर्चापीठ या सर्व बाबींचा साकल्यांने विचारविनिमय करुन एचआयव्ही/एड्स नियंत्रणासाठी कार्यक्रम आखण्याच्यादृष्टीने व प्रामाणिमकारक अंमलबजावणीसाठी, या रोगावर प्रभावीरित्या आळा घालण्यासाठी आवश्यक असलेला लोकप्रतिनिधींचा सक्रीय सहभाग व पाठिंबा प्राप्तीसाठी महाराष्ट्र राज्यात देखील "एड्स" संदर्भात सजगता आणून एक परिणामकारक कार्यक्रमाची सुरुवात व्हावी या उद्देशार्थ महाराष्ट्र विधीमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निदेशानुसार विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांचा अंतर्भाव करुन संरचना असलेल्या महाराष्ट्र विधीमंडळ "एड्स" चर्चापीठाची (Maharashtra Legislature's Forum on AIDS) स्थापना करण्यात आली आहे. उपरोक्त चर्चापीठाचे कामकाज परिणामकारकरित्या होण्यासाठी राष्ट्रीय चर्चापीठाद्वारे (National Forum), वित्तीय सहाय्य तसेच ३ ते ४ कर्मचाऱ्यांची सेवा पुरविण्याबाबत त्यावेळी प्रस्तावित करण्यात आले होते.

सदर महाराष्ट्र विधीमंडळ "एड्स" चर्चापीठाची (Maharashtra Legislature's Forum on AIDS) संरचना पुढीलप्रमाणे आहे :– मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा - मुख्य आश्रयदाते (Chief Patrons), मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य - अध्यक्ष (Chairman), मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य - उपाध्यक्ष (Vice Chairman), मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य - निमंत्रक (Convenor), मा.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य - सह निमंत्रक (Joint Convenor), संसदीय कार्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्ष नेते, संसदीय कार्य राज्यमंत्री - सदस्य असे एकूण १० पदसिद्ध *(Ex-Officio)* मान्यवर या व्यतिरिक्त विधानसभेचे १२ व विधानपरिषदेचे ०६ सदस्य अशा एकूण २८ मान्यवरांचा या चर्चापीठामध्ये समावेश आहे.

महाराष्ट्र विधीमंडळ सदस्यांच्या 'एड्स' चर्चापीठाची (Maharashtra Legislature's Forum on AIDS) स्थापना सर्वप्रथम दिनांक २९ जानेवारी, २०१० रोजी करण्यात आली. (त्यानंतर नव्याने राज्य मंत्रीमंडळ अस्तित्वात आल्याने दिनांक २० जानेवारी, २०११ रोजी सदरहू चर्चापीठाची नव्याने संरचना करण्यात आली.)

या चर्चापीठाचा उद्घाटन समारंभ सोमवार, दिनांक १९ जुलै,२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. चर्चापीठाचे उद्घाटन तत्कालीन केंन्द्रीय मंत्री, जलस्त्रोत व संसदीय कार्य, नवी दिल्ली यांच्या शुभहस्ते, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र विधीमंडळाचे पीठासीन अधिकारी, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, तत्कालीन मा.संसद सदस्य (राज्यसभा) व अध्यक्ष एचआयव्ही/ एड्स ससदीय चर्चापीठ, नवी दिल्ली, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्ष नेते, संसदीय कार्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य, राज्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. उद्घाटन समारंभ प्रसंगी विधीमंडळाचे मा.सदस्य व या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

चर्चापीठाची प्रारंभिक बैठक दिनांक २२ फेब्रुवारी, २०११ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर चर्चापीठाच्या बैठकी दिनांक २५ मे, २०११ रोजी व १६ नोव्हेंबर, २०११ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या.

चर्चापीठाच्या प्रारंभिक बैठकीमध्ये एड्सविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. सदर चर्चापीठाच्या दिनांक २५ मे, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा. आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना चर्चापीठाचे कार्याध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. तसेच चर्चापीठाचे कार्यालयासाठी जागा, बँक खाते उघडणे, विधीमंडळ सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी बाबत विचारविनिमय करण्यात आला.

चर्चापीठाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये शासनाने 'एड्स' नियंत्रित करण्यासाठी केलेल्या उपाययोजना, 'ॲव्हर्ट' संस्थेच्या कामकाज, चर्चापीठाकरीता कक्ष उपलब्ध करून देणे यासंदर्भात विचारविनिमय करण्यात आला तसेच चर्चापीठासाठी विधीमंडळ सदस्यांकडून प्रत्येकी रुपये एक लाख इतका मदत निधी मिळण्यासंदर्भात विनंती करण्यात निर्णय घेण्यात आला. चर्चापीठाच्या बैठकीमध्ये चर्चापीठाचे कार्यक्षेत्र (Terms of Reference) तसेच अंगीकारावयाची कार्यपद्धती यासंदर्भात ठोस निर्णय झाल्याचे निदर्शनास येत नाही. चर्चापीठाचे कार्यक्षेत्र निश्चित करण्यासंदर्भात माहिती मिळविण्याकरीता या सचिवालयामार्फत लोकसभा सचिवालयास पत्र व्यवहार करण्यात आला असून त्यानुषंगाने लोकसभा सचिवालयाने त्यांच्या दिनांक ०२ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या पत्रान्वये लोकसभेतील "Population and Public Health" या फोरमसंदर्भातील दिशा निदेर्शक तत्वे या संदर्भात माहिती दिली आहे.

*****

(२९) वातावरणीय बदलासंदर्भातील संयुक्त तदर्थ समिती

(Joint *Ad Hoc* Committee on Climate change)

पार्श्वभूमी व समितीची स्थापना :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत वेळोवेळी वेगवेगळया संसदीय आयुधांद्वारे 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयाबाबत सर्वसाधारणपणे सन २०१४ पासून चर्चा झालेली आहे. तसेच विधिमंडळाच्या सदस्यांनी मा.पीठासीन

अधिकारी यांना पत्राद्वारे अशी विनंती केली होती की, 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयासंदर्भात विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती गठीत करण्यात यावी.

वातावरणातील बदल आणि "ग्लोबल वॉर्मिंग" हे विषय या शतकातील अत्यंत महत्त्वाचे व गंभीर असे विषय आहेत. अलिकडच्या काळात निसर्गचक्र कमालीचे अनियमित व बेभरवशाचे झाले आहे. यामुळे अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट, ढगफुटी (Cloudburst), महापूर (Flash Flood), चक्रीवादळे, अवर्षण, ओला/कोरडा दुष्काळ, भूगर्भातील पाण्याची पातळी खालावणे, जंगलांना लागणाऱ्या आगी व वणवे, ग्लेशियरर्स वितळणे, तापमानातील होणारे वारंवार बदल इत्यादी नैसर्गिक आपत्तिंना आपणा सर्वांना सतत सामोरे जावे लागते, परिणामी अन्नधान्य निर्मिती, शेती वाहून जाणे, शेतीचा कस/पोत कमी होणे, शेत जमीन नापीक होणे, प्रदूषण पातळीत वाढ होणे अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

जागतिक स्तरावर औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या, प्रदुषण, बेसुमार जंगलतोड, नैसर्गिक व मानवनिर्मित घडामोडींमुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड व मिथेन इत्यादी यासारख्या हरीत वायूंचे प्रमाण नैसर्गिक प्रमाणापेक्षा अधिक वाढल्यामुळे पृथ्वीच्या तापमानात सन १८८० पासून सरासरी ०.८ अंश सेल्सिअस इतकी वाढ झाल्याने वातावरणात बदल होत आहेत. पृथ्वीवर औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली तेव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान जितकं होतं त्यापेक्षा तापमानाची सरासरी दीड डिग्री सेल्सियसहून अधिक होणं हे पृथ्वीसाठी योग्य ठरणार नाही असे तज्ञांचे मत आहे. वातावरणीय बदलामुळे जागतिक स्तरावर समुद्राच्या पातळीत वाढ होत असल्याचे आढळून येत आहे. वातावरणीय बदलामुळे मुख्यतः अनियमित पाऊस, तीव्र दुष्काळ, मोठे पूर, जमिनीतील पोषक द्रव्यांचा असमतोल, वॉटर लॉगींग, अन्न सुरक्षा, रोगराईत होणारी वाढ, जंगल जैवविविधता, जंगलांचा ऱ्हास, पाण्याची उपलब्धता व उपयुक्तता, सागरी किनाऱ्यांची धूप, सागर किनाऱ्यावरील लोकवस्ती, मासेमारी इत्यादींवर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. आकस्मिक अतिवृष्टी होऊन पूर येणे किंवा काही ठिकाणी तीव्र दुष्काळ पडणे अशा घटनांची जागतिक स्तरावर वाढ झालेली आहे.

तापमानवाढीच्या संकटाचा जागतिक पातळीवर सामना करण्यासाठी पहिली आंतरराष्ट्रीय बैठक सन १९९५ मध्ये भरली होती. त्यावेळी खनिज इंधनांच्या वापरामुळे वातावरणात कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढते आहे, हरितगृह परिणाम तीव्र होत आहे, पृथ्वीच्या हवामान प्रणालीत अपरिवर्तनीय बदल होत आहेत, एवढ्याच विषयांसबंधी चर्चा झाली होती. यातूनच सर्वांच्या दृष्टीने या महत्त्वाच्या विषयासंदर्भात सन १९९७ मध्ये क्योटो-जपान येथे जागतिक परिषद झाली होती व क्योटो करार झाला. यामध्ये १०० पेक्षा जास्त देश सहभागी झाले होते. यानंतर बऱ्याच वाटाघाटींनंतर डिसेंबर, २०१५ मध्ये पॅरीस येथे झालेल्या जागतिक परिषदेमध्ये १९६ देशांनी सहभाग नोंदविला होता. या सहभागी देशांनी कर्बउत्सर्जन घटवण्याचे उद्दीष्ट निश्चित करुन झालेला हवामान करार 'पॅरीस करार' म्हणून प्रसिद्ध आहे.

हवामान बदल या महत्त्वाच्या प्रश्नावर सुरुवातीला १९९५ मध्ये पहिली जागतिक परिषद झाल्यानंतर बर्लिन १९९५, क्योटो १९९७, बाली २००७, कोपनहेगन २००९, डर्बन २०११, पॅरिस २०१५ व ग्लासगो २०२१ मध्ये अशी संमलने आणि परिषदा सातत्याने होत आहेत.

तापमान वाढ आणि हवामान बदल व त्यांचे गंभीर परिणाम या प्रश्नावर नुकतीच दिनांक ३१ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत संयुक्त राष्ट्राची जवळपास २०० देशांच्या उच्चपदस्थ प्रतिनिधींची ग्लासगो येथे परिषद झाली. *(United Nations Climate Change Conference, more commonly referred to as COP26, was the 26th United Nations Climate Change conference, held at the SEC Centre in Glasgow, Scotland, United Kingdom, from 31 October to 12 November 2021.)*

या परिषदेत बऱ्याच देशांनी आपण हरितगृह उत्सर्जन/कर्बउत्सर्जनाचे उद्दिष्ट 'नक्त शून्य' (Net Zero) स्थितीला कधी आणणार याबाबत घोषणा केल्या आहेत. ही वचने २०५० किंवा त्यानंतरसाठी आहेत. उदा. भारताने २०३० पर्यंत जीवाश्म इंधनाचा वापर लक्षणियरीत्या कमी करुन अक्षय उर्जेचा वापर वाढवून २०७० पर्यंत आपण हे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहोत अशी घोषणा केली आहे.

ग्लासगो, स्कॉटलंड येथे भरलेल्या *COP 26* या वातावरण बदल परिषदेत अंडर २ कोअलिशन Under2Coalition लीडरशीप अवॉर्ड्स २०२१ च्या अंतर्गत 'प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व' (Inspiring Regional Leadership Award for Proactive Climate Change Actions by U2C (Under2Coalition) या पुरस्काराने सम्मानित होणारे महाराष्ट्र हे एकमेव भारतीय राज्य ठरले आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्राचे मा. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी स्विकारला.

रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सने या वर्षीचा (१९२१) भौतिकशास्त्रातील प्रतिष्ठेचा नोबेल पुरस्कार हवामान आणि तापमानवाढ बदलातील संशोधनासाठी तसेच ग्लोबल वार्मिंगचे संकट हेरणारे जपान-अमेरिकन हवामानतज्ञ स्यूकुरो मनाबे (९०), जर्मनीचे समुद्रशास्त्रज्ञ क्लॉस हॅसलमन (८९) व इटलीचे भौतिकशास्त्रज्ञ जॉर्जियो पारिसी (७३) यांना जाहीर केला आहे. या शास्त्रज्ञांनी पृथ्वीवरील जलवायुचे भौतिक मॉडेल तयार केले. अणूपासून ते ग्रहांच्या जटिल भौतिक प्रणालीमध्ये वेगाने होणारे बदल आणि विकारांमधील होणारे चढ-उतार यातील परस्परसंबंध या संदर्भातील संशोधनामुळे जलवायूमध्ये होणारे बदल आणि जागतिक तापमानवाढीचा विश्वसनीय अचूक अंदाज वर्तवण्यास मदत होणार आहे.

वातावरणातील बदल आणि ग्लोबल वॉर्मिंग यामुळे अलीकडच्या काळात निसर्गचक्र कमालीचे अनियमित झाल्याचे अनुभवाला येत आहे. एकूणच पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे मानवी जीवनासाठी अत्यावश्यक बनले आहे. जल-वायुसारखे नैसर्गिक स्त्रोत आज संकटग्रस्त झाले आहेत. सगळ्यात गंभीर प्रश्न शेतीच्या संदर्भात निर्माण झाले आहेत. अवेळी येणारा पाऊस, वादळ, तापमानातील वारंवार बदल यामुळे एकूणच अन्नधान्य निर्मितीवर खुप मर्यादा येऊ लागल्या आहेत. शेतीवरची संकटे दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे आपल्या लोकसंख्येला पुरेल इतकी धान्यनिर्मिती सातत्याने होणे कठीण होत आहे. सर्वसामान्याच्या आरोग्यावरही मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम झाले आहेत. नव्या रोगांचा/साथींचा प्रार्दुभाव वाढला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे महानगरांमध्ये कचऱ्यांची विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रिया इत्यादी सारख्या जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात तर साथीच्या रोगाची सतत भर पडत आहे. आपल्या जगण्याशी संबंधित अशा सर्वच घटकांवर अतिशय गंभीर संकट निर्माण झाले आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने वैज्ञानिक पद्धतीने कामाची आखणी करणे आवश्यक झाले आहे. केवळ राज्याचे प्रदुषण नियंत्रण मंडळ हे सर्व विषय हाताळण्याइतके सक्षम नाही.

पर्यावरण सक्षमीकरणाकरिता व्यापक पातळीवर सातत्यपूर्ण प्रयत्नशील राहणे व या कामी संशोधनाकरिता नवीन यंत्रणा निर्माण करुन त्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करणे आवश्यक झाले आहे. वाढत्या शहरीकरणाने महानगरांचे असंख्य प्रश्न ज्यामध्ये कचऱ्याची विल्हेवाट, सांडपाण्यावर प्रक्रिया, नदयांचे संरक्षण, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, जमिनीचा पोत सुधारण्याचा कार्यक्रम या व अशा इतर काही बाबींचा/घटकांचा यामध्ये समावेश होऊ शकतो.

राज्य सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फतसुद्धा या संदर्भात 'माझी वसुंधरा' ही योजना राबविण्यात येत आहे

वातावरणात होत असलेले सातत्याने बदल तसेच पर्यावरणाचा प्रश्न हे दिवसेंदिवस गंभीर स्वरुप धारण करीत आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच याबाबत संशोधन व अभ्यास करुन पर्यावरण संक्षमीकरणाकरिता व्यापक पातळीवर यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यासाठी समिती गठीत करणे अत्यंत आवश्यक असल्याने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली वातावरणीय बदलासंदर्भातील दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची संयुक्त तद्र्थ समिती गठीत करण्यात यावी, असा प्रस्ताव मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेत व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी महाराष्ट्र विधानसभेत, अर्थसंकल्पीय अधिवेशनात शुक्रवार, दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी मांडलेला प्रस्ताव महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत एकमताने संमत करण्यात आला.

'वातावरणीय बदलासंदर्भातील संयुक्त तदर्थ समिती' वर मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, हे समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* समिती प्रमुख, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* सह-समिती प्रमुख राहतील तसेच मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य व पर्यावरण, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे या समितीचे पदसिद्ध *(Ex-Officio)* सदस्य राहतील. सदर समितीची सदस्य संख्या १५ इतकी निश्चित करण्यात आली असून पदसिद्ध समिती प्रमुख, सह-समिती प्रमुख, पदसिद्ध सदस्य यांचे व्यतिरिक्त विधानसभेचे ११ आणि विधानपरिषदेचे ४ सदस्य राहतील.

समितीची रचना व कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे :-

समितीची रचना :

१. मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद, समिती प्रमुख

२. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, सह-समिती प्रमुख

३. मा.पर्यावरण, मंत्री व मा.पर्यावरण, राज्यमंत्री, पदसिद्ध सदस्य यांचे व्यतिरिक्त विधानसभेचे ११ सदस्य व विधानपरिषदेचे ४ सदस्य मिळून एकूण १५ सदस्य असतील.

निमंत्रित :

१. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई

२. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

३. संचालक, महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई

समितीची कार्यकक्षा :

१. महाराष्ट्र राज्याच्या वातावरणीय बदल अनुकूलन धोरणामध्ये नमूद शिफारशींच्या अनुषंगाने राबविलेल्या उपाययोजनांची माहिती घेवून शिफारशी करणे.

२. महाराष्ट्र राज्याच्या वातावरणीय बदल अनुकूलन धोरणामध्ये विभागनिहाय नमूद शिफारशींच्या अनुषंगाने स्थानिक स्तरावर करावयाच्या प्रभावी अंमलबजावणीस्तव विविध उपाययोजनांची शिफारस करणे.

३. राज्यस्तरावर लोकप्रतिनिधींमध्ये वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने चर्चा व जनजागृती होण्याच्या दृष्टीने अभ्यासवर्ग तसेच राज्य व राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा राबविणे व तद्नुषंगाने शिफारस करणे व धोरण निश्चितीमध्ये सहाय्य करणे.

४. महाराष्ट्र राज्य व इतरत्र "ग्लोबल वार्मिंग" या विषयाखालील अद्ययावत माहिती घेत राहणे.

उपरोक्तप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीने वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठकांमध्ये पर्यावरणासंबंधी विविध विषयासंदर्भात उहापोह केला आहे.

*****

(३०) आमदार निवास येथील निवास व आहार व्यवस्था याबाबत उच्चाधिकार समिती

(High Power Committee on Management of Hostel and Catring Services for Members of the Maharashtra Legislature)

पार्श्वभूमी व समितीची स्थापना :—

आमदार निवास येथील निवास व्यवस्था व आहार व्यवस्था याबाबत उच्चाधिकार समिती, ही तद्र्थ संयुक्त समिती *(Joint Ad Hoc Committee)* आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या सदस्यांसाठी मुंबई/नागपूर येथील आमदार निवास तसेच आमदार निवासांतील उपहारगृहांची व्यवस्था करण्यात आली असून, याबाबतचे कामकाज विधिमंडळाच्या १) आमदार निवास व्यवस्था समिती व २) आहार व्यवस्था समिती या दोन समित्यांमार्फत करण्यात येते. याबाबतची विस्तृत माहिती संबंधित समित्यांच्या नावाखाली या पुस्तिकेत समाविष्ट करण्यात आली आहे.

विधिमंडळाच्या सदस्यांना मुंबई/नागपूर येथील आमदार निवासांतील कक्ष आवश्यक सोईसुविधांसह उपलब्ध करणे, सदस्यांना आमदार निवासांतील उपहारगृहांत सकस व उत्कृष्ट प्रतीचे खाद्यपदार्थ/भोजन व्यवस्था करणे इ. कामकाज या दोन समित्यांकडून करण्यात येते. तथापि, या दोन्ही समित्या 'तदर्थ समित्या' असल्यामुळे त्यांच्या कामकाजात प्रशासकीय दृष्टीकोनातून काही अडचणी निर्माण होतात. यामुळे महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार या दोन्ही समित्यांना प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने १२ व्या विधानसभेच्या कार्यकालावधीत "आमदार निवास व आहार व्यवस्था उच्चाधिकार समिती" गठीत करण्याचा निर्णय नोव्हेंबर, २०१३ मध्ये घेण्यात आला व समिती गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या आमदार निवास व्यवस्था समिती व आहार व्यवस्था समिती या तद्र्थ संयुक्त समित्यांना प्रशासकीय बाबीवर मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या निर्णयामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी खालील प्रमाणे "आमदार निवास व आहार व्यवस्था उच्चाधिकार समिती" गठीत करण्यात आली आहे. १४ वी विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर सद्य:स्थितीत त्यानुसार दिनांक ०६ मार्च, २०२१ रोजी पुनर्गठीत करण्यात आलेल्या समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

आमदार निवास, आहार व्यवस्था उच्चाधिकार समिती

अ.क्र.	विद्यमान पद	समितीवरील पदसिध्द (*Ex-Officio*) पद
(१)	सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद	अध्यक्ष
(२)	रिक्त (अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा)	सह अध्यक्ष
(३)	सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य	सदस्य
(४)	संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	सदस्य
(५)	सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	सदस्य
(६)	समिती प्रमुख, आहार व्यवस्था समिती	सदस्य
(७)	प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	सदस्य - सचिव
(८)	विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	कायमस्वरुपी निमंत्रित
(९)	अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई/नागपूर	कायमस्वरुपी निमंत्रित
(१०)	कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई/नागपूर	कायमस्वरुपी निमंत्रित
(११)	अवर सचिव (ग-१ कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	कायमस्वरुपी निमंत्रित

नव्याने गठीत करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीच्या नियंत्रणाखाली १) आमदार निवास व्यवस्था समिती व २) आहार व्यवस्था समिती या दोन्ही समित्यांचे कामकाज चालेल. उच्चाधिकार समितीची कार्यकक्षा व कामकाज पुढील प्रमाणे असेल.

समितीची कार्यकक्षा :-

(१) मुंबई येथील आकाशवाणी आमदार निवास, जुने विधान भवन विस्तारित आमदार निवास, मनोरा आमदार निवास व मॅजेस्टिक आमदार निवास तसेच नागपूर येथील आमदार निवास त्याचप्रमाणे विधान भवन, मुंबई व नागपूर येथील उपाहारागृह या ठिकाणी खाद्यपेय प्रबंधकांची निवड करणे या अनुषंगिक प्रशासकीय बाबींवर निर्णय घेणे.

(२) सदस्यांसाठी असलेल्या उपाहारगृहांतील खाद्यपदार्थांचा दर, दर्जा व प्रमाण निश्चित करणे.

(३) सदस्यांना उपाहारगृहाच्या माध्यमातून सकस व उत्कृष्ट प्रतीचे भोजन मिळेल याची दक्षता घेणे.

(४) मुंबईतील चारही आमदार निवास व नागपूर येथील आमदार निवास येथे सदस्यांना कक्षांचे वितरण करणे, सदर कक्षांमध्ये विविध स्वरुपाच्या सोईसुविधा पुरविणे. आमदार निवासातील देखभाल-दुरुस्तीचे कामकाज, नवीन आमदार निवास बांधणे, यासंदर्भातील प्रशासकीय बाबींवर निर्णय घेणे.

(५) मुंबईतील चारही आमदार निवास तसेच नागपूर येथील आमदार निवास व विधानमंडळ परिसर या ठिकाणी असलेल्या व्यावसाईक गाळयांच्या संदर्भात निविदा मागविणे, त्याबाबत अंतिम निर्णय घेणे.

मा.सदस्यांना विधान भवन तसेच आमदार निवास येथील उपाहारगृहात चवीष्ट, सकस व उत्कृष्ट प्रतीचे खाद्यपदार्थ आणि भोजन मिळेल, याबाबत दक्षता घेणे, उपाहारगृहांत सदस्यांची गैरसोय होणार नाही यासाठी खाद्यपेय प्रबंधकावर नियंत्रण ठेवणे, सदस्यांकडून आलेल्या तक्रारी / सूचनांची दखल घेणे इत्यादी संबंधी तद्नुषंगिक

कामकाज आहार व्यवस्था समितीतर्फे करण्यात येते. तसेच सदसस्यांना आमदार निवासात उपलब्ध करुन द्यावयाच्या साई सुविधांबाबत निर्णय घेणे तसेच त्यासंदर्भात सदस्यांच्या तक्रारींची दखल घेवून आवश्यक त्या सुधारणा करणे इत्यादी बाबतचे कामकाज आमदार निवास व्यवस्था समिती मार्फत करण्यात येईल. प्रशासकीय स्वरुपाच्या निर्णयांच्या संदर्भात आहार व्यवस्था समिती व आमदार निवास व्यवस्था समिती या समित्यांचे कामकाज उच्चाधिकार समितीच्या नियंत्रणाखाली चालेल.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई/नागपूर हे वरील बाबीसंदर्भातील सर्व माहिती, वेळोवेळी त्यावरील निर्णयासाठी समितीचे "सदस्य-सचिव" यांचेकडे सादर करतील. समितीचे सदस्य-सचिव सदर माहिती समिती समोर सादर करतील. त्यावर उच्चाधिकार समिती अंतिम निर्णय घेईल. समितीच्या अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार समितीचे सदस्य-सचिव "आमदार निवास व्यवस्था व आहार व्यवस्था उच्चाधिकार समितीच्या" बैठकांचे आयोजन करतील. समिती समोर सादर करण्यात आलेल्या उक्त बाबीसंदर्भात समितीने अंतिम निर्णय घेतल्यानंतर समितीचे सदस्य-सचिव सदर निर्णयाची अंमलबजावणी करतील.

आमदार निवास व आहार व्यवस्था उप समिती :—

महाराष्ट्र विधानमंडळाच्या आमदार निवास व्यवस्था समिती व आहार व्यवस्था समिती या दोन तद्र्थ संयुक्त समित्यांना प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या निर्णयामध्ये सुसुत्रता आणण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या "आमदार निवास व आहार व्यवस्था उच्चाधिकार समितीस" शिफारशी करण्यासाठी "आमदार निवास व आहार व्यवस्था उप समिती" प्रथमतः नोव्हेंबर, २०१३ मध्ये गठीत करण्यात आली होती. सद्यःस्थितीत त्यानुसार दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी पुर्नगठीत करण्यात आलेल्या उप समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

(१) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(२) विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(३) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(४) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(५) आयुक्त, अन्न व औषधी द्रव्ये, प्रशासन विभाग, मुंबई.

(६) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई.

(७) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर.

(८) अवर सचिव (ग-१ कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

उप समितीची कार्यकक्षा :—

(१) मुंबई येथील आकाशवाणी आमदार निवास, जुने विधान भवन विस्तारित आमदार निवास, मनोरा आमदार निवास व मॅजेस्टिक आमदार निवास तसेच नागपूर येथील आमदार निवास त्याचप्रमाणे विधान भवन, मुंबई व नागपूर येथील उपाहारागृह या ठिकाणी खाद्यपेय प्रबंधकांची निवडीसंदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण करुन या बाबतच्या शिफारशी उच्चाधिकार समितीस सादर करणे या अनुषंगिक प्रशासकीय बाबींवर निर्णय घेणे.

(२) सदस्यांसाठी असलेल्या उपाहारगृहांतील खाद्यपदार्थांचा दर, दर्जा व प्रमाण निश्चित करणे व त्यानुषंगाने सर्व कामकाज.

(३) सदर उप समिती उपरोल्लेखित कामकाजासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन याबाबतच्या शिफारशी अंतिम निर्णयासाठी उच्चाधिकार समितीकडे सादर करेल.

*****

एक सुवर्ण क्षण....

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सोमवार, दिनांक २९ जून, २००९ रोजी विधान भवन, मुंबई येथे मा.राज्यपाल श्री. एस.सी.जमीर यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्याचे अनावरण, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार लिखित 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य' या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांतील चरित्रग्रंथाचे प्रकाशन तसेच राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या वतीने उत्कृष्ट संसदपटू, उत्कृष्ट भाषण व जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करतांना आदरणीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील व अन्य मान्यवर

प्रकरण दहावे

(९३) राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा

(Commonwealth Parliamantary Association – CPA - Maharashtra Branch)

पार्श्वभूमी :—

राष्ट्रकुल संसदीय मंडळाची स्थापना दिनांक १८ जुलै, १९११ रोजी एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशन या नावाने प्रथम इंग्लंडमध्ये झाली. सुरुवातीला या मंडळाचे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यु फाऊंडलंड, न्युझिलंड, दक्षिण आफ्रिका व युनायटेड किंगडम हे देश सदस्य होते. या मंडळाने ऑक्टोबर, १९४८ मध्ये "राष्ट्रकुल संसदीय मंडळ" (Commonwealth Parliamantary Association – CPA) असे नाव बदलून त्याप्रमाणे आपल्या घटनेमध्ये दुरुस्ती केली आहे. या मंडळाचे मुख्य कार्यालय लंडन येथे आहे. संसदीय मंडळ आज राष्ट्रीय, राज्य, प्रांतिक, प्रादेशिक स्वरुपात १८० शाखांमध्ये कार्यरत असून या मंडळाचे जवळ जवळ सतरा हजार पेक्षा जास्त संसद, विधानमंडळ सदस्य सभासद आहेत.

या मंडळामध्ये विकसित तसेच अविकसित राष्ट्रे, विविध धर्म, भाषा, विभिन्न संस्कृती असलेली राष्ट्रे सभासद आहेत. हे मंडळ म्हणजे शांतता व समृद्धी, प्रतिष्ठा, समता, व्यक्तीस्वातंत्र्य, कायदा व सुव्यवस्था तसेच प्रत्येक राष्ट्राच्या समाजजीवनात आवश्यक असलेल्या निष्ठा इत्यादी बाबतीत सर्व राष्ट्रांना एकत्रित बांधून ठेवणारा महत्त्वाचा दुवा आहे. साधारणतः १९३ राष्ट्रांचा "संयुक्त राष्ट्र संघ" (United Nations Organization - UNO) व १२० राष्ट्रांचा "अलिप्त राष्ट्र संघ" (Non-Aligned Movement - NAM) या खालोखाल राष्ट्रकुलाच्या ०९ विभागांतील ५४ राष्ट्रकुल देशांच्या सुमारे १८० संसद/राज्य विधिमंडळे यांचा समावेश असलेली "राष्ट्रकुल संसदीय संघटना" (Commonwealth Parliamantary Association – CPA) ही एक मोठी जागतिक राष्ट्र संघटना म्हणून ओळखली जाते. या संघाचे सभासदत्व स्वीकारलेल्या राष्ट्रांनी केवळ शासकीय स्तरावर नव्हे तर अशासकीय स्तरावरील सदस्य राष्ट्रांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक जिव्हाळ्याच्या समस्यांवर विचारविनिमय करुन परस्पर सहकार्य करण्याचे धोरण अंगिकारले आहे. संसदीय शासन प्रणालीमध्ये संसदीय शासन अधिक समृद्ध व बळकट करुन सर्वसामान्य जनतेमध्ये संसदीय शासन पद्धतीबाबत जागृती, प्रेम आणि आदर निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करणे, परस्परांतील विविध संसदीय प्रथा - पद्धतींचा अभ्यास करुन प्रत्येक राष्ट्राला आपापली संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक समृद्ध करण्यास प्रवृत्त करणे, संसद सदस्यांची कर्तव्ये, त्यांचे अधिकार व जबाबदारी ह्यामध्ये येणाऱ्या अडचणींच्या संदर्भात विविध विषयांवर विचारांची देवाण-घेवाण हे कार्य देखील या मंडळामार्फत केले जाते. सभासद राष्ट्रांच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या परिषदा, परिसंवाद, चर्चा, भेटी इत्यादी विविध उपक्रमांद्वारे सदस्य राष्ट्रांच्या संसदीय प्रथा, प्रणाली याबाबत विचारविनिमय करुन यामध्ये सुधारणा करण्यासाठी चालना दिली जाते. त्यामुळे संसदीय लोकशाही अधिक प्रबळ व समृद्ध करण्यास मदत होत असते.

एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशनची स्थापना झाल्यापासून म्हणजेच सन १९११ ते १९२३ पर्यंत "एम्पायर पार्लमेंटरी परिषदा" लंडन येथे आयोजित होत असत. सन १९२४ नंतर अशा परिषदा लंडन बाहेर आयोजित

करण्यास सुरुवात झाली. सन १९४८ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ अस्तित्वात आल्यानंतर पहिली "राष्ट्रकुल संसदीय परिषद" (Commonwealth Parliamentary Conference - CPC) युनायटेड किंग्डम येथे आयोजित करण्यात आली होती. सुरुवातीस सन १९४८ ते १९५९ या कालावधीत राष्ट्रकुल संसदीय परिषद द्विवार्षिक पद्धतीने आयोजित करण्यात येत होत्या. सन १९६१ पासून आज रोजीपर्यंत राष्ट्रकुल संसदीय परिषद प्रत्येक वर्षी राष्ट्रकुलातील देशांमध्ये ठिकठिकाणी आयोजित करण्यात येते. (सन २०१५, सन २०१८, सन २०२० व सन २०२१ मध्ये राष्ट्रकुल संसदीय परिषदेचे आयोजन करण्यात आले नव्हते.) या वार्षिक आंतरराष्ट्रीय राष्ट्रकुल संसदीय परिषदा साधारणपणे देशाच्या राजधानीत आयोजित करण्यात येतात. भारतात नवी दिल्ली येथे सन १९५७ (०५ वी राष्ट्रकुल संसदीय परिषद), सन १९७५ (२१ वी राष्ट्रकुल संसदीय परिषद), सन १९९१ (३७ वी राष्ट्रकुल संसदीय परिषद) व सन २००७ (५३ वी राष्ट्रकुल संसदीय परिषद) अशा एकूण ०४ राष्ट्रकुल संसदीय परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या. यापुढील ६५ वी राष्ट्रकुल संसदीय परिषद (65th Commonwealth Parliamentary Conference - CPC) हॅलिफॅक्स, नोव्हा - स्कॉटीया, कॅनडा येथे दिनांक २० ते २६ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाची राज्य पातळीवर शाखा स्थापन करुन त्याद्वारे उपयुक्त उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. द्विभाषिक मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री, श्री.मोरारजी देसाई यांनी दिनांक १५ जुलै, १९५२ रोजी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या स्थापनेचा ठराव सभागृहात मांडला व सभागृहाने तो दिनांक १८ जुलै,१९५२ रोजी संमत केला. तेंव्हापासून राष्ट्रकुल संसदीय मंडळाची, महाराष्ट्र शाखा आपल्या राज्यात कार्यरत आहे.

हेतु व उद्देश :—

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेचे हेतु व उद्देश खालील प्रमाणे आहेत :—

(अ) शाखेच्या सदस्यांमधील वैयक्तिक संबंध वृद्धिंगत करणे.

(ब) महाराष्ट्र विधानमंडळासमोर येऊ शकणाऱ्या सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी विचारविनिमय करणे.

(क) राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांवर महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य आणि त्या-त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे.

(ड) राष्ट्रकुलातल्या इतर देशांचे अभ्यासदौरे आयोजित करुन संसदीय शासन प्रणाली व प्रशासन यावरील विचारांची, माहिती देवाण-घेवाण करुन सदस्य राष्ट्रांमधील वैयक्तिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

पदाधिकारी व कार्यकारिणी

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद आणि मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेचे पदसिद्ध *(Ex-Officio)* सह-अध्यक्ष असतात. शाखेचे पाच उपाध्यक्ष असतात. (१) मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य (२) विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद (३) विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा (४) संसदीय

कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य (५) शाखेच्या सदस्यांमधून निवडून आलेले. शाखेचे खजिनदार देखील शाखेच्या सदस्यांमधून निवडून आलेले असतात. शाखेच्या कार्यकारणीत ३१ सदस्य असतात. त्याच प्रमाणे सह-अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार आणि महाराष्ट्र विधानमंडळाचे उप-पीठासीन अधिकारी यांचा पदसिद्ध *(Ex-Officio)* सदस्य म्हणून समावेश असतो, उर्वरित सदस्य निवडून आलेले असतात.

सभासद वर्गणी

प्रत्येक विद्यमान तसेच माजी सदस्यांस रुपये १०००/- वर्गणी भरुन शाखेचे आजीव सदस्य होता येते अथवा प्रत्येक विद्यमान तसेच माजी सदस्यांस रुपये २००/- वर्गणी भरुन शाखेचे वार्षिक सभासद होता येते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे राबविण्यात येणारे / आलेले उपक्रम :—

नागपूर येथे प्रतिवर्षी होणाऱ्या विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या विद्यमाने सन १९६४ पासून दरवर्षी *(काही अपरिहार्य कारणास्तव ऐनवेळी रद्द करण्यात आलेल्या ७ अभ्यासवर्गांचा अपवाद वगळता)* **राज्यातील सर्व विद्यापीठांतील "राज्यशास्त्र व लोक-प्रशासन" या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी "संसदीय कार्यप्रणाली व प्रथा" या विषयांबाबत एक संसदीय अभ्यासवर्ग आयोजित केला जातो.** या अभ्यासवर्गाच्या माध्यमातून संसदीय शासन प्रणालीची विद्यार्थ्यांना ओळख करुन दिली जाते. त्यासाठी संसदीय शासन प्रणालीशी ज्यांचा जवळून संबंध आला आहे व ती बळकट करण्यासाठी ज्या नामवंतांचा हातभार लागत आहे अशा नामवंत संसदपटू व मान्यवरांची व्याख्याने आयोजित करुन त्यांचा लाभ अभ्यासवर्गामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना करुन दिला जातो. याचबरोबर वृत्तपत्र क्षेत्रातील दिग्गज तसेच रुळलेल्या वाटेवरुन न जाता स्वतः नव्याने निर्माण केलेल्या मार्गाने, समाजासाठी ज्यांनी आयुष्य वेचले आहे, अशा मान्यवर व्यक्तींची सुद्धा व्याख्याने आयोजित करुन त्यांच्या समृद्ध अनुभवाचा लाभ व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जातो. असा अभ्यासवर्ग संसदीय लोकशाहीच्या संदर्भात सैद्धांतिक ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना व सर्व संबंधितांना उपयुक्त ठरतो व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात संसदीय शासन प्रणालीची जाण प्रगल्भ होण्यास मदत होते, असा अनुभव आहे.

भारतातील संसदीय लोकशाही कशा पद्धतीने कार्यरत आहे, कार्यकारी मंडळावर विधानमंडळामार्फत कशाप्रकारे नियंत्रण ठेवले जाते, त्यासाठी कोणकोणत्या संसदीय आयुधांचा वापर केला जातो, इत्यादी बाबतची प्रत्यक्ष माहिती नामांकित संसदपटू व तज्ञांच्या व्याख्यानांमधून तसेच सभागृहाच्या प्रत्यक्ष कामकाज अवलोकनातून विद्यार्थ्यांना मिळत असते.

नव्याने निवडून येणाऱ्या विधानसभा/विधानपरिषदेच्या मा.सदस्यांना सभागृहांतील कामकाजाची तोंडओळख करुन देण्यासाठी विधानसभेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर विधानमंडळाच्या सर्व सदस्यांकरिता उजळणी अभ्यासवर्ग देखील सन १९६९ पासून सतत आयोजित केला जातो व अशा उजळणी अभ्यासवर्गामधून विविध संसदीय आयुधांची माहिती सदस्यांना नामवंत संसदपटू तसेच वरिष्ठ अधिकारी यांची व्याख्याने आयोजित करुन त्याद्वारे दिली जाते.

सर्वसाधारणपणे विधानसभेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर लोकसभा सचिवालयाच्या मदतीने महाराष्ट्रातील विधानसभा व विधानपरिषद सदस्यांकरिता संसद भवन, नवी दिल्ली येथे अशाच पद्धतीचा संसदीय अभ्यासवर्ग आयोजित केला जातो.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाद्वारे आयोजित केलेले परिसंवाद, परिषदा इत्यादी उपक्रमांत सहभागी होण्यासाठी देशात विविध ठिकाणी होणाऱ्या परिषदा व परिसंवादासाठी या शाखेमार्फत सदस्यांना पाठविले जाते. सदस्यांना या परिषदांचा निश्चितच उपयोग होतो. त्याशिवाय राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या लंडन येथील मुख्यालयामार्फत प्रतीवर्षी परदेशात आयोजित केलेल्या परिषदेसाठी तसेच भारत विभागामार्फत आयोजित केलेल्या परिषदा, परिसंवाद चर्चासत्रासाठी मा.अध्यक्ष, विधानसभा व मा.सभापती, विधानपरिषद हे महाराष्ट्र शाखेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहतात.

"उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार :-

विधानसभा व विधानपरिषदेतील सदस्यांनी विविध संसदीय आयुधांच्या माध्यमांतून लोकप्रतिनिधी म्हणून विधानमंडळात बजावलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सदस्यांचा गौरव व्हावा या उद्देशाने लोकसभेच्या धर्तीवर **"उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण" असे पुरस्कार विधानसभा व विधानपरिषदेच्या प्रत्येकी २ सदस्यांना प्रदान करण्याचा उपक्रम १९९६ पासून महाराष्ट्र शाखेमार्फत सुरु करण्यात आला आहे.** "उत्कृष्ट संसदपटू" व "उत्कृष्ट भाषण" या पुरस्काराचे निकष खालील प्रमाणे आहेत :-

उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारासाठी निकष :—

(१) सदस्यांचा अनुभव

(२) वक्तृत्व शैली

(३) राज्याच्या व एकूण देशाच्या प्रश्नांची जाण

(४) विषयाच्या मांडणीतील विविधता व वैचारिक प्रगल्भता

(५) भाषेवरील प्रभुत्व

(६) सभागृहाचे नियम व पद्धती तसेच सभ्यता व शिष्टाचार यांचे पालन

(७) विविध समित्यांच्या कामाचा अनुभव

सभागृहातील उक्तृष्ट भाषणाच्या पुरस्कारासाठी निकष :—

(१) वकृत्व शैली

(२) विषयाची मांडणी व भाषेवरील प्रभुत्व

(३) नियत वेळेत जास्तीत जास्त सुविहितपणे विषय मांडण्याची क्षमता

सन १९९५-९६ ते सन २०१७-१८ या कालावधीत विधानसभेच्या १८ व विधानपरिषदेच्या १७ सदस्यांना उत्कृष्ट संसदपटू तसेच विधानसभेच्या १८ व विधानपरिषदेच्या २३ उत्कृष्ट भाषण पुरस्काराने मा.सदस्यांना गौरविण्यात आले आहे.

सन १९९५-९६ पासून सुरु करण्यात आलेले उत्कृष्ट संसदपटू व उत्कृष्ट भाषण हे पुरस्कार खालील तक्त्यात दर्शविलेल्या मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले :–

अ.क्र.	वर्ष	पुरस्कार वितरण समारंभाचा दिनांक व ठिकाण	शुभहस्ते
१.	१९९६	सोमवार, दि.१६ डिसेंबर १९९६ विधान भवन, मुंबई	मा.श्री.शिवराज पाटील, महाराष्ट्र विधानसभा तसेच लोकसभेचे माजी अध्यक्ष व विद्यमान लोकसभा सदस्य.
२.	१९९८	मंगळवार, दि.२१ एप्रिल १९९८ विधान भवन, मुंबई	मा.श्री.मनोहर जोशी, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
३.	१९९९	बुधवार, दि.७ एप्रिल, १९९९ विधान भवन, मुंबई	मा.श्री.पी.सी.अलेक्झांडर, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य
४.	२००१	गुरुवार,दि.२६ जुलै, २००१ विधान भवन, मुंबई	मा.श्री.विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
५.	२००३	गुरुवार, दि.१८ डिसेंबर, २००३ विधान भवन, नागपूर	मा.श्री.चंद्रशेखर, लोकसभा सदस्य व माजी पंतप्रधान
६.	२००९	सोमवार, दि.२९ जून,२००९ विधान भवन, मुंबई	मा.राष्ट्रपती, श्रीमती प्रतिभाताई पाटील
७.	२०२१	मंगळवार, दि.०६ जुलै,२०२१ विधान भवन, मुंबई	मा.श्री.उध्दव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळयाचे अनावरण, कोल्हापूर येथील थोर इतिहास संशोधक श्री. जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : जीवन आणि कार्य' या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील चरित्रग्रंथाचे प्रकाशन तसेच राष्ट्रकुल संसदीय महाराष्ट्र शाखेच्या वतीने उत्कृष्ट संसदपटू, उत्कृष्ट भाषण व जीवनगौरव पुरस्कारांचा वितरण सोहळा आदरणीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते व मा. राज्यपाल, श्री. एस. सी. जमीर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक २९ जून, २००९ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. या समारंभात सन २००३-०४ ते २००८-०९ या कालावधीतील विधानसभेतील ०७ व विधानपरिषदेतील ०६ सदस्यांना "उत्कृष्ट संसदपटू" तसेच विधानसभेतील ०७ सदस्यांना व विधानपरिषदेतील ११ सदस्यांना "उत्कृष्ट भाषण" पुरस्काराने मा.राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या कार्यकारीणीने घेतलेल्या निर्णयानुसार ज्या ज्येष्ठ सदस्यांनी महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक व आर्थिक जडणघडणीमध्ये संसदीय प्रणालीच्या माध्यमातून हातभार लावला अशा एकूण १३ मा. सदस्यांना "जीवनगौरव" पुरस्कार देऊन मा.राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते सन्मानीत करण्यात आले.

जीवन गौरव पुरस्कार

१. मा.श्री.शरदचंद्र पवार, कृषी मंत्री, भारत सरकार व माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

२. मा.श्री.सुशीलकुमार शिंदे,ऊर्जा मंत्री, भारत सरकार व माजी मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य.

३. मा.श्री.विलासराव देशमुख,अवजड उद्योग मंत्री,भारत सरकार व माजी मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य.

४. मा.श्री.अशोकराव चव्हाण, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

५. मा.श्री.शिवाजीराव देशमुख, सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

६. मा.श्री.मनोहर जोशी,संसद सदस्य (राज्यसभा) व माजी मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,माजी अध्यक्ष,लोकसभा

७. मा.श्री.नारायण राणे, उद्योग मंत्री, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

८. मा.श्री.गोपीनाथ मुंडे,संसद सदस्य (लोकसभा),माजी उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.

९. मा.श्री.विजयसिंह मोहिते पाटील, ग्रामविकास मंत्री व माजी उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

१०. मा.श्री.छगन भुजबळ, उप मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य.

११. मा.श्री.गणपतराव देशमुख,महाराष्ट्र विधानसभा सदस्य व माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य.

१२. मा.श्री.बी.टी.देशमुख, महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.

१३. मा.श्री.दत्ताजी नलावडे, महाराष्ट्र विधानसभा सदस्य व माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

❖ विधानसभेचे अध्यक्ष म्हणून उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल श्री.बाबासाहेब कुपेकर मा.अध्यक्ष, विधानसभा यांचा सर्व पक्षीय सदस्यांच्या वतीने मा.राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

❖ संसदीय कार्यमंत्री म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल मा.श्री.हर्षवर्धन पाटील यांना उत्कृष्ट संसदीय कार्यमंत्री म्हणून मा.राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

केंद्र सरकारने मंजूर केलेल्या "राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचा" आराखडा महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेवर आधारित आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अत्यंत अभिमानास्पद घटना असल्याने रोजगार हमी योजनेचे जनक व महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती, कै.वि.स.पागे यांच्या स्मृतीस दिनांक १ मार्च,२००५ रोजी "रोजगार हमी योजनेची फलश्रुती" याविषयावर परिसंवाद आयोजित करण्यात येवून अभिवादन करण्यात आले. यावेळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, श्री. विलासराव देशमुख यांच्या हस्ते कै.वि.स.पागे यांची भाषणे, लेख आदींचे संकलन असणारा ग्रंथही शाखेतर्फे प्रकाशित करण्यात आला. त्याचप्रमाणे ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, कीर्तन परंपरेचे अध्वर्यु आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री.बाळासाहेब भारदे यांच्या भाषणांचे संकलन असलेल्या ग्रंथाचे प्रकाशन तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या शुभहस्ते दिनांक २० एप्रिल,२००६ रोजी करण्यात आले. मा.सभापती, श्री.शिवाजीराव देशमुख व मा.अध्यक्ष, श्री.बाबासाहेब कुपेकर तसेच राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेचे खजिनदार श्री. उल्हास पवार, वि.प.स. यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन मा.श्री.भारदे यांचा यावेळी हृद्य सत्कारही करण्यात आला.

अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत दिनांक १८ एप्रिल, २००६ रोजी "पॉप्युलेशन फौंडेशन ऑफ इंडिया" या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या विनंतीनुसार,राज्यातील मुलींच्या घटत्या जन्मदरासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या सहकार्याने राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे मा.सदस्यांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) दक्षिण आशिया कार्यालय, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन, यशदा, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा व लोक विकास संस्था यांचे संयुक्त विद्यमाने "बाल हक्क संवर्धन व बाल कामगार प्रथा निर्मुलन" या संदर्भात महाराष्ट्र विधानमंडळांच्या सदस्यांसाठी गुरुवार, दिनांक दिनांक २९ नोव्हेंबर,२००७ रोजी विधान भवन, नागपूर येथे एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

अन्य प्रगत देशांनी शेती, माहिती व तंत्रज्ञान, उद्योग व्यवसायात केलेली प्रगती इत्यादींची माहिती घेण्यासाठी व या देशांच्या संसदीय प्रणालींचा अभ्यास, वैचारिक देवाण-घेवाण याद्वारे भारतीय संसदीय लोकशाही बळकट करुन याचा लाभ समाजातील प्रत्येक माणसापर्यंत पाहोचविण्याच्या उद्देशाने भारतातील अनेक राज्यांची संसदीय शिष्टमंडळे अनेक राष्ट्रांना भेटी देत असतात. त्याचप्रमाणे, जगातील अनेक राष्ट्रांची संसदीय शिष्टमंडळे याच हेतूने प्रेरित होऊन भारतास व भारतातील महाराष्ट्रासह अन्य राज्यांना भेट देत असतात. या सर्व बाबींचा विचार करुन राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन १९९७ मध्ये एक व सन २००६ ते सन २०१८ या कालावधीत तेरा अशा एकूण चौदा परदेश अभ्यासदौऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे विधानमंडळाच्या सदस्यांकरिता आयोजित केलेल्या परदेश अभ्यास दौऱ्यांदरम्यान विविध देश, संसद, शासकीय/ निमशासकीय संस्था, फलोत्पादन, फुलशेती, रस्ते विकास, विविध खाजगी कंपन्या, एसईझेड, वायनरीज इ. ठिकाणी भेटी देण्यात आल्या. या देशांतील जनजीवन, त्या-त्या देशातील सामान्य जनतेचे जीवनमान उंचविण्यासाठी शासनाने निर्माण केलेली यंत्रणा व दिलेल्या सोई-सुविधा, देशाची विविध क्षेत्रातील उदा. आर्थिक, सामाजिक, इत्यादी संदर्भातील एकंदर प्रगती, संसदीय कार्यप्रणाली अधिक बळकट करण्यासाठी त्या - त्या देशाचे योगदान इ. अनेकविध दृष्टीकोणातून मा.सदस्य अवलोकन करतात व त्याचा विधायक समाजकारणासाठी त्यांना उपयोग व्हावा हा अशा परदेश दौऱ्यांच्या आयोजनामागील मुख्य हेतु आहे.

त्या अनुषंगाने त्या-त्या देशांतील रहाणीमान, संस्कृती, सार्वजनिक जीवनांतील कार्यक्रम इत्यादींच्या निरीक्षणामुळे प्रत्येक सदस्यांचा दृष्टीकोन विशाल होऊन विचार-आचारांत प्रगल्भता येऊन आपल्या देशात त्या प्रगतीच्या दृष्टीने काय काम करता येईल, या दृष्टीने विचारांना व कृतीस चालना मिळू शकते. परदेश दौऱ्यात सदस्यांनी केलेल्या अभ्यासाचा वापर आपल्या सदस्य म्हणून कार्यकाळात त्यांनी करणे अभिप्रेत आहे.

विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना अन्य देशांतील संसदीय लोकशाही पद्धतीच्या कामकाजाबाबत माहिती व्हावी या उद्देशाने सुरुवातीस विधानसभा/विधानपरिषदेच्या १५ सदस्यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाचा दिनांक २७ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर, १९९७ या कालावधीत लंडन, बेल्जीयम, नेदरलँड, जर्मनी व स्वीत्झर्लंड या देशांचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांसाठी परदेश अभ्यासदौरे आयोजित करण्यासाठी राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेस, राज्य शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून तसेच मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या पुढाकाराने राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन २००६ ते सन २०१८ या कालावधीत विधानमंडळ सदस्यांसाठी पुढीलप्रमाणे एकूण १३ परदेश अभ्यासदौऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित करण्यात आलेल्या परदेश अभ्यासदौऱ्यांमध्ये विधिमंडळाचे सर्वसाधारपणे एकूण २०० सदस्य सहभागी झाले होते. या परदेश अभ्यासदौऱ्यांसाठी राज्य शासनाने

वेळोवेळी अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे निधी उपलब्ध करून दिला, त्यामुळेच या परदेश अभ्यासदौऱ्यांची संकल्पना पूर्णत्वास जाऊ शकली. अशाप्रकारे राष्ट्रकुल संसदीय संघाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आणि संसदीय लोकशाही प्रणाली अधिक प्रभावी करण्यासाठी ही शाखा सुरुवातीपासूनच कार्यरत आहे.:-

क्र.	अभ्यास दौरा
१.	**युरोप** (इटली, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड, जर्मनी, नेदरलँडस्, बेल्जियम, फ्रान्स व युनायटेड किंग्डम) - दिनांक ०४ ते १९ ऑक्टोबर, २००६
२.	**ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड व सिंगापूर** - दिनांक २९ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर, २००६
३.	**चीन, हाँगकाँग, थायलंड व मलेशिया** - दिनांक २५ जून, ते ०७ जुलै, २००७
४.	**चीन, व्हिएतनाम व हाँगकाँग** - दिनांक १७ ते ३० जानेवारी, २००८
५.	**ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड व सिंगापूर** - दिनांक १३ ते २८ फेब्रुवारी, २००८
६.	**युरोप** (फ्रान्स, मोनॅको, इटली, व्हॅटीकन सिटी, स्वित्झर्लँड, ऑस्ट्रिया, लायचेंस्टाईन, जर्मनी, नेदरलँडस्, बेल्जियम, व युनायटेड किंग्डम) - दिनांक २७ मे ते १२ जून, २००८.
७.	**युरोप** (युनायटेड किंग्डम, इटली, फ्रान्स, नेदरलँडस् व स्वीत्झर्लँड) - दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट, २०११
८.	**ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड व सिंगापूर** - दिनांक ०१ ते १६ मे, २०१७
९.	**चीन व हाँगकाँग** - दिनांक १६ ते २५ जानेवारी, २०१८
१०.	**युरोप** (युनायटेड किंग्डम, इटली, फ्रान्स, नेदरलँडस्, बेल्जियम, ऑस्ट्रिया व स्वीत्झर्लँड) - दिनांक १० ते २४ फेब्रुवारी, २०१८
११.	**युरोप** (युनायटेड किंग्डम, रशिया, इटली, स्वीत्झर्लँड, डेन्मार्क, नार्वे, स्वीडन व फिनलंड) - दिनांक ११ ते २७ एप्रिल, २०१८
१२.	**युरोप** (युनायटेड किंग्डम (लंडन), नेदरलँडस् (ॲमस्टरडॅम) व फ्रान्स (पॅरिस) - दिनांक ०४ ते १२ सप्टेंबर, २०१८
१३.	**युरोप** (युनायटेड किंग्डम (लंडन) आणि स्वीत्झर्लँड (जिनीव्हा) - दिनांक ०१ ते ०८ डिसेंबर, २०१८

राष्ट्रकुल संसदीय मंडळ, मुख्यालय, लंडन व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, भारत शाखेने तसेच विविध राष्ट्रांनी आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदा, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादींसाठी प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणारे महाराष्ट्र विधानमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मुंबईस भेट देणारी आंतरराष्ट्रीय संसदीय शिष्टमंडळे, महाराष्ट्रात

अथवा मुंबईत येणारे वा मुंबईमार्गे परदेशात निर्गमन करणाऱ्या अथवा परदेशातून मुंबईमार्गे भारतात येणाऱ्या भारतातील मा.पीठासीन अधिकारी, तसेच लोकसभा/राज्यसभेच्या शिष्टमंडळांसाठी स्वागत, निरोप, वाहन, निवास, सुरक्षा इत्यादी व्यवस्था राजशिष्टाचार विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने जनसंपर्क कक्षातर्फे करण्यात येते.

सन १९९५-९६ पासून विधानसभा व विधानपरिषदेतील
"उत्कृष्ट संसदपटू", "उत्कृष्ट भाषण" पुरस्कारांचे व "जीवन गौरव" पुरस्काराचे मानकरी

अ.क्र.	वर्ष	विधानसभा	विधानपरिषद
१.	१९९५-१९९६	१. श्री.आर.आर.पाटील (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.बी.टी.देशमुख (उत्कृष्ट संसदपटू)
		२. स्व.श्री.रायभान जाधव (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.दि.बा.पाटील (उत्कृष्ट भाषण)
२.	१९९६-१९९७	१. श्री.वामनराव चटप (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.अशोक मोडक (उत्कृष्ट संसदपटू)
		२. श्री.अरुण गुजराथी (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.वसंत चव्हाण (उत्कृष्ट भाषण)
३.	१९९७-१९९८	१. श्री.दिलीप वळसे-पाटील (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.व्यंकाप्पा पतकी (उत्कृष्ट संसदपटू)
		२. श्री.सुधीर मुनगंटीवार (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.अरविंद सावंत (उत्कृष्ट भाषण)
४.	१९९८-१९९९	१. श्री.रोहिदास पाटील (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.प्रकाश जावडेकर (उत्कृष्ट संसदपटू)
		२. श्री.सोहेल लोखंडवाला (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.अरुण मेहता (उत्कृष्ट भाषण)
५.	१९९९-२०००	१. श्रीमती शोभाताई फडणवीस (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.प्रमोद नवलकर (उत्कृष्ट संसदपटू)
		२. श्री. भास्कर जाधव (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.अनिल पटेल (उत्कृष्ट भाषण)
६.	२०००-२००१	१. श्री. प्रसाद तनपूरे (उत्कृष्ट संसदपटू)	१. श्री.शिशिर शिंदे (उत्कृष्ट संसदपटू)
		२. श्री.एकनाथ खडसे-पाटील (उत्कृष्ट भाषण)	२. श्री.शिवाजीराव देशमुख (उत्कृष्ट भाषण)

अ.क्र.	वर्ष	विधानसभा	विधानपरिषद
७.	२००१-२००२	१. श्री.बाळा नांदगांवकर (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.वसंत पुरके (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.हुसेन दलवाई (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.अण्णा डांगे (उत्कृष्ट भाषण) ३. श्रीमती निशिगंधा मोगल (उत्कृष्ट भाषण)
८.	२००२-२००३	१. श्री. देवेंद्र फडणवीस (उत्कृष्ट संसदपटू) २. प्रा.जनार्दन चांदूरकर (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.दिवाकर रावते (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.जयंत पाटील (उत्कृष्ट भाषण)
९.	२००३-२००४	१. श्री.गिरिष बापट, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.राजेंद्र दर्डा, (उत्कृष्ट भाषण)	१. डॉ.दीपक सावंत, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्रीमती फौजिया खान (उत्कृष्ट भाषण)
१०.	२००४-२००५	१. श्री.चंद्रकांत छाजेड, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.शशिकांत शिंदे, (उत्कृष्ट भाषण)	१. ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.मुझफ्फर हुसेन (उत्कृष्ट भाषण) ३. श्री.विलास अवचट (उत्कृष्ट भाषण)
११.	२००५-२००६	१. श्री. सचिन अहिर, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, (उत्कृष्ट भाषण)	१. श्री. संजय दत्त, (उत्कृष्ट संसदपटू) २. डॉ.(श्रीमती) निलम गोऱ्हे, (उत्कृष्ट भाषण) ३. श्रीमती मंदा म्हात्रे, (उत्कृष्ट भाषण)
१२.	२००६-२००७	१. श्रीमती वर्षा गायकवाड (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री. बशिर पटेल (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.पांडुरंग फुंडकर, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.चंद्रकांत रघुवंशी, (उत्कृष्ट भाषण) ३. श्री.रामनाथ मोते, (उत्कृष्ट भाषण)

अ.क्र.	वर्ष	विधानसभा	विधानपरिषद
१३.	२००७-२००८	१. डॉ.रामचंद्र साळे (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.शंभूराज देसाई (उत्कृष्ट संसदपटू) ३. श्री.नरसय्या आडम (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.उल्हास पवार, (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.कपिल पाटील, (उत्कृष्ट भाषण) ३. श्री.मधु चव्हाण, (उत्कृष्ट भाषण)
१४.	२००८-२००९	१. श्री.रामदास कदम (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.सुधाकर परिचारक (उत्कृष्ट भाषण) ३. श्री.गजानन किर्तीकर (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.अरुण गुजराथी (उत्कृष्ट संसदपटू) २. श्रीमती उषा दराडे (उत्कृष्ट भाषण) ३. श्री.सय्यद पाशा पटेल (उत्कृष्ट भाषण)
१५.	२०१५-२०१६	१. डॉ.अनिल बोंडे (उत्कृष्ट संसदपटू) २. प्रा.(श्रीमती) वर्षा गायकवाड (उत्कृष्ट भाषण)	१. ॲड. अनिल परब (उत्कृष्ट संसदपटू) २. ॲड. राहूल नार्वेकर (उत्कृष्ट भाषण)
१६.	२०१६-२०१७	१. श्री.सुभाष साबणे (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री. राजेश टोपे (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.कपिल पाटील (उत्कृष्ट भाषण)
१७.	२०१७-२०१८	१. श्री. राहुल कुल (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री.धैर्यशिल पाटील (उत्कृष्ट भाषण)	१. श्री.संजय दत्त (उत्कृष्ट संसदपटू) २. श्री. प्रविण दरेकर (उत्कृष्ट भाषण)

*****

प्रकरण अकरावे

(९४) पीठासीन अधिकाऱ्यांची परिषद

(All India Presiding Officers' Conference - AIPOC)

पीठासीन अधिकारी व विधानमंडळाचे सचिव यांची परिषद :-

पीठासीन अधिकारी व विधानमंडळाचे सचिव यांच्या आयोजित करण्यात येणाऱ्या परिषदांना (All India Presiding Officers' Conference - AIPOC and Conference of Secretaries) सुमारे शंभर वर्षांचा अभिमानास्पद व गौरवशाली इतिहास आहे. या संदर्भात लोकसभा/राज्यसभा तसेच देशातील सर्व राज्य विधिमंडळांनी सप्टेंबर, २०२० ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत शताब्दी सोहळ्याचे (Centennial Celebrations) कार्यक्रम आयोजित केले होते. देशांतर्गत सर्व राज्यांच्या विधानमंडळ सचिवालयातील प्रशासकीय व वैधानिक कार्यपद्धतीत एकरुपता व सुसूत्रता ठेवण्याच्या दृष्टीने चर्चा करण्याकरिता संसद व राज्य विधानमंडळाचे पीठासीन अधिकारी व विधानमंडळांच्या सचिवांची परिषद ठरविलेल्या क्रमानुसार सर्वसाधारणपणे दरवर्षी देशातील विविध राज्यांत लोकसभा सचिवालयाच्या सुचनेनुसार आयोजित करण्यात येते. संसद व राज्य विधानमंडळांचे पीठासीन अधिकारी व विधानमंडळाचे सचिव यांची परिषद देशांतर्गत विविध राज्यांपैकी एका राज्यात वर्षातून एकदा घेण्यात येते. देशांतर्गत विधानमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांची परिषद दोन दिवस व सचिवांची परिषद एक दिवस असते. या परिषदेत एक दिवस एखाद्या महत्वाच्या वैधानिक विषयावर अथवा त्या-त्या वेळी एखादी घटनात्मक वादविवादाची बाब उपस्थित झाली असल्यास त्यावर परिसंवाद/चर्चासत्र आयोजित करण्यात येते.

संसदीय कार्यप्रणालीत आलेले विविध संसदीय व वैधानिक विषयासंबंधी अनुभव व त्या बाबतीतील विचारांची देवाण-घेवाण करुन या परिषदेच्या माध्यमातून संसदीय कार्यपद्धतीतील उणीवांची सोडवणूक करण्यात येते. देशात संसदीय कार्यप्रणाली, तत्संबंधातील संकेत व परंपरा यांचे पालन करुन योग्य रीतीने कार्यरत आहे का, या बाबींची तसेच संसद व राज्य विधानमंडळे यांच्या कामात एकरुपता व सुसूत्रता आहे का, याचे अवलोकन केले जाते.

लोकसभेचे अध्यक्ष हे या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात, तसेच, लोकसभेचे महासचिव हे या परिषदेचे पदसिद्ध सचिव असतात. संसद व संसदेच्या समित्या यांच्या कामकाजाच्या संबंधी मुद्दे या परिषदेत चर्चेस घेण्यात येतात. सदरहू परिषद ज्यावेळी संसद किंवा राज्य विधानमंडळाची अधिवेशने नसतात अशा वेळी सर्वसाधारणपणे आयोजित करण्यात येते. जेणे करुन, पीठासीन अधिकारी या परिषदेस उपस्थित राहू शकतील. या परिषदेत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय संकलित करुन त्यांच्या अंमलबजावणीकरिता सर्व राज्यांच्या विधानमंडळ सचिवालयांना स्वतंत्रपणे वितरीत करण्यात येतात व तत्संबंधातील प्रगतीचे अवलोकन करण्यात येते. (सन १९२१ ते २०२१ या कालावधीत अखिल भारतीय पीठासीन अधिकारी व विधानमंडळाचे सचिव - All India Presiding Officers' Conference - AIPOC and Conference of Secretaries - यांच्या आयोजित करण्यात परिषदांची यादी **परिशिष्ट क्रमांक २७** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

*****

प्रकरण बारावे

(९५) ग्रंथालय व संदर्भ सेवा :-

प्रास्ताविक :—

महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालयाची स्थापना दिनांक १८ मार्च, १९२२ रोजी झाली. सन १९१९ च्या कायद्याप्रमाणे १९२१ मध्ये त्यावेळच्या मुंबई प्रांताचे पहिले लोकनियुक्त कायदेमंडळ अस्तित्वात आले व विधानमंडळ सदस्यांच्या माहितीसंबंधीच्या अनेकविध गरजा भागविण्यासाठी तसेच वेगवेगळे कायदे करताना आवश्यक ते सर्व संदर्भसाहित्य, माहिती उपलबध करून देण्यासाठी या ग्रंथालयाची स्थापना झाली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे ग्रंथालय हे अतिशय समृध्द व सुसज्ज असून पुर्णतः वातानुकुलित आहे. विधानभवन इमारतीमध्ये ५ व्या व ६ व्या मजल्यावर ते व्यवस्थापित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील हे एक महत्त्वाचे व विशेष स्वरूपाचे संदर्भ ग्रंथालय असून हे ग्रंथालय प्रामुख्याने केवळ विधानमंडळाच्या मा.सदस्यांसाठी आहे. मात्र, विशेष अभ्यासक, संशोधक, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी यांना आवश्यक असणारी संदर्भसेवा व अन्य प्रकारच्या ग्रंथालयांमध्ये उपलबध होऊ न शकणारी अशा आणि केवळ विधिमंडळामधूनच मिळू शकणारी अशा स्वरूपाची माहिती, मागणीनुसार अन्य कोणालाही या ग्रंथालयामधून उपलबध करून दिली जाते. विधानमंडळाच्या मा.सदस्यांना आवश्यक असणारी पुस्तके, सभागृहाच्या मागील कामकाजाची कार्यवाहीवृत्ते (Debates), अहवाल, वृत्तपत्रांतील विविध विषयांवरील महत्त्वाच्या बातम्या व लेखांची कात्रणे तसेच, नियतकालिकांतील लेख इत्यादी माहिती मा.सदस्यांच्या मागणीनुसार त्यांना उपलबध करून देऊन त्यांची संसदीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या परिणामकारकरित्या व समाधानकारकपणे पार पाडण्यास त्यांना सहाय्य करणे हा या ग्रंथालय सेवेच्या व्यवस्थेमागील प्रमुख उद्देश आहे.

ग्रंथालयाचे कार्य :- विविध विषयांवर नवनवीन प्रकाशित होणारी उपयुक्त पुस्तके/ग्रंथ आणि इतर वाचनीय साहित्य इत्यादी प्राप्त करणे, त्यावर तांत्रिक सोपस्कार करणे, त्यातील माहितीच्या नोंदी ठेवणे, त्यांची देवाण-घेवाण करणे आणि त्यांचे जतन/संवर्धन करणे व त्या साहित्याच्या आधारे महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा.सदस्य व विधिमंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी यांना आवश्यक असणारी माहिती अपेक्षित वेळेत पुरविणे हे या ग्रंथालयाचे मुख्य कामकाज आहे.

कामाच्या वेळा :- निःसत्र कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०६.१५ या कार्यालयीन वेळेत व सत्र कालावधीत दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू होण्यापुर्वी एक तास ते सायंकाळी सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत किंवा ०६.३० या दोन्हीपैकी जी वेळ नंतरची असेल त्या वेळेपर्यंत ग्रंथालयीन संदर्भसेवा उपलबध असते.

अंदाजपत्रकीय वार्षिक तरतूद :- ग्रंथालयासाठी दरवर्षी ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादींच्या खरेदी व बांधणीसाठी रूपये २५ लाख इतकी अंदाजपत्रकीय आर्थिक तरतूद करण्यात येते.

ग्रंथालयातील अधिकारी/कर्मचारी वर्ग :- ग्रंथालयामध्ये सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या एकूण २४ इतकी आहे. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी : ०१

उप ग्रंथपाल (संदर्भ व संशोधन) : ०१

उप ग्रंथपाल (ग्रंथालय व माहिती) : ०१

तांत्रिक सहायक : ०४

सहायक कक्ष अधिकारी : ०५

लिपिक-टंकलेखक : ०६

दफ्तरी : ०२

शिपाई/मदतनीस : ०४

ग्रंथालयातील साहित्य संग्रह :-

ग्रंथालयामध्ये डिसेंबर, २०२१ अखेर

(१)**पुस्तके** (खरेदी केलेली व भेट प्रती) एकूण .. ८९,०००

(२) **ग्रंथेतर साहित्य :-** (अ + ब + क + ड + इ) .. १ लाखाच्या वर

(अ) कार्यवाहीवृत्ते -

महाराष्ट्र विधानपरिषद
महाराष्ट्र विधानसभा
राज्यसभा
लोकसभा

(१८६२ पासूनची कार्यवाहीवृत्ते उपलब्ध आहेत.)

घटना समितीची कार्यवाहीवृत्ते ९ डिसेंबर, १९४६ ते २६ डिसेंबर, १९४९

(ब) राजपत्रे -

भारत सरकार १९३७ पासून

महाराष्ट्र शासन १९२३ पासून

(क) समित्यांचे अहवाल -

संसद व महाराष्ट्र राज्य विधिमंडळ

(ड) **नियतकालिकांचे बांधीव खंड -**

महत्त्वाची नियतकालिके

(इ) **वृत्तपत्रे फाईल्स -**

(मुंबईतील महत्त्वाच्या ९ वृत्तपत्रांच्या महिनानिहाय फाईल्स)

म्हणजे एकूण १,८९,००० च्या वर इतके ग्रंथ व ग्रंथेत्तर संदर्भ साहित्य ग्रंथालयाच्या संग्रही आहे व हे सर्व साहित्य विधानभवनाच्या ५ व्या व ६ व्या मजल्यावर व्यवस्थापित केलेले असून ते संदर्भासाठी उपलब्ध आहे.

वृत्तपत्रे व नियतकालिके :- ग्रंथालयामध्ये सध्या राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवरील सुमारे ५७ वृत्तपत्रे व ११९ नियतकालिके घेण्यात येतात, त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

तपशील	..	वर्गणीद्वारे	भेटीदाखल	एकूण
वृत्तपत्रे	..	३२	२५	५७
नियतकालिके				
साप्ताहिके	..	१९	०२	२१
पाक्षिके	..	०४	०१	०५
मासिके	..	६१	१०	७१
द्वैमासिके	..	०१	-	०१
त्रैमासिके	..	१२	-	१२
संकिर्ण (अर्धवार्षिक)	..	०४	-	०४
न्यायालयीन निर्णयांच्या सीडीज्	..	०५	-	०५
एकूण	..	१३८	३८	१७६

उपरोक्तप्रमाणे नुमूद केलेली वृत्तपत्रे व नियतकालिके विधानभवन, मुंबइ येथे ६ व्या मजल्यावरील कक्ष क्रमांक ६०२ व ६०३ मध्ये सदस्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध आहेत.

ग्रंथ देवाण-घेवाण :- ग्रंथालयामध्ये घेण्यात येणारे ग्रंथ व इतर वाचनीय साहित्य हे साधारणत: कायदा, विधीविधान, राज्यशास्त्र व लोकप्रशासन, संसदीय प्रथा व पध्दती, अर्थशास्त्र, शिक्षण, समाजशास्त्र, धर्म, कृषी, सिंचन, चरित्र, संस्कृती, आत्मचरित्र इत्यादी तसेच वार्षिके, शब्दकोश, ज्ञानकोश इत्यादी सर्व ज्ञानशाखांना व्यापणारे आहे व त्यांची व्यवस्था प्रचलित ग्रंथालय शास्त्रानुसार करण्यात आली आहे. सदर ग्रंथ व अपेक्षित माहिती ग्रंथालयाच्या नियमांनुसार महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी, मा.सदस्य, विधानमंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध करून देण्यात येतात. सदस्यांना एका वेळेस साधारणत: दोन पुस्तके वाचणाकरिता घेता येतात. सदर पुस्तके परत करण्याच्या बाबतीत सत्र कालावधीत सात दिवस तर नि:सत्र कालावधीत १५ दिवसात परत करावी असे अपेक्षित आहे. मात्र संदर्भग्रंथ व महत्त्वाचे अहवाल ग्रंथालयाबाहेर आपल्या सोबत नेता येत नाहीत, त्यामुळे असे अत्यंत दुर्मिळ व मौलिक संदर्भग्रंथ सदस्यांनी ग्रंथालयामध्येच अभ्यासावेत अशी अपेक्षा आहे.

वाचन कक्ष :- मा.सदस्यांना सभागृहातील त्यांच्या भाषणांच्या तयारी करिता ग्रंथालयामध्ये बसून काही टिपणे काढता यावीत, अभ्यास करता यावा, संदर्भ पाहता यावेत जेणेकरून त्यांची सभागृहातील कामगिरी अभ्यासपूर्ण व उपयुक्त व्हावी या दृष्टीने मा.सदस्यांसाठी सुसज्ज, प्रशस्त व वातानुकुलित अभ्यासिकाही संगणक तसेच इंटरनेटच्या सुविधांसह ग्रंथालयाच्या ६ व्या मजल्यावर कक्ष क्र. ६०३ मध्ये उपलबध आहे. मा.सदस्यांनी अभ्यासिकेचा अधिकाधिक लाभ घ्यावा अशी अपेक्षा आहे.

ग्रंथालयामधून देण्यात येणाऱ्या संदर्भ सेवा :-

(अ) **वृत्तपत्रे कात्रणे विभाग :** मा.सदस्यांना सभागृहात विविध चर्चांमध्ये भाग घेताना सुविहितपणे व प्रभावीपणे काम करता यावे या दृष्टीने उपयुक्त असे संदर्भ मिळण्यासाठी वृत्तपत्रांतील बातम्या, लेख, अग्रलेख इत्यादी समाविष्ट असणारा वृत्तपत्रे कात्रणांचा विभाग आहे.

या ग्रंथालयात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रे व नियतकालिके येतात. त्यातील उपयुक्त बातम्या व लेखांची कात्रणे वेगळ्या कोऱ्या कागदावर चिकटवून, खास तयार केलेल्या वर्गीकरण पद्धतीप्रमाणे त्याला विषय क्रमांक देऊन, त्या-त्या विषयांची कात्रणे त्या-त्या विशिष्ट विषयांच्या फोल्डर्समध्ये एकत्रित ठेवण्यात येतात. प्रत्येक कात्रणावर वृत्तपत्राचे नाव, दिनांक, विषय क्रमांक यांची नोंद असते. ह्या विषयवार कात्रणांच्या संग्रहामुळे एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी उदा. झोपडपट्टीबाबत समस्या, महिलांवरील अत्याचार, राज्यातील कायदा व सुव्यवस्था, महागाईची समस्या, पाणीटंचाई, जलसंधारण, बेरोजगारी, सार्वजनिक वितरणप्रणाली, लोकसंख्या, शिक्षण, कृषी, व्यापार, समाजकारण, राजकारण इत्यादींची अद्ययावत माहिती मा.सदस्यांना तात्काळ उपलब्ध होते व त्याआधारे त्यांना आपला विषय सभागृहामध्ये वा सभागृहाच्या बाहेर सुध्दा अधिक प्रभावीपणे मांडण्यास निश्चितच मदत होते.

(ब) **कामकाजविषयक संदर्भ :-** अनेकवेळा मा.सदस्यांना सभागृहात निरनिराळ्या विषयांवर; यापूर्वी सभागृहामध्ये झालेल्या महत्त्वाच्या चर्चा, जसे अशासकीय ठराव, अविश्वास ठराव, अल्पकालीन चर्चा, अर्धा-तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, विधेयके, लक्षवेधी सूचना, महत्त्वाची निवेदने इत्यादींबाबत कार्यवाहीवृत्तांतील माहितीची त्वरित गरज असते. अशी माहिती मा.सदस्यांना त्वरीत उपलबध करून देण्यासाठी ग्रंथालयामध्ये त्या-त्या विषयांच्या नोंदी समाविष्ट असणाऱ्या अद्ययावत फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदस्यांना ही सेवा त्वरित उपलब्ध करून देण्यात येते. आजपर्यंतच्या अनुभवावरून या नोंदफाईल्स त्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरल्या असून सदस्यांचा अमूल्य वेळ त्यामुळे वाचतो.

(क) अद्ययावत महाराष्ट्र अधिनियम :- राज्याचे विधिमंडळ ही कायदे संमत करणारी संस्था आहे. उपलब्ध सर्व अधिनियम अद्ययावत ठेवणे हे एक महत्त्वाचे तसेच एका दृष्टीने अतिशय तांत्रिक स्वरूपाचे असे हे कामकाज आहे. मूळ अधिनियमात वेळोवेळी बदल किंवा सुधारणा करण्यात येतात आणि हे सर्व बदल किंवा सुधारणा मूळ अधिनियमात योग्य त्या ठिकाणी समाविष्ट करून तो अधिनियम सदस्यांना संदर्भासाठी अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक असते. हे कामकाज अतिशय काटेकोरपणे व जागरूकतेने करण्यात येते.

ग्रंथालयामध्ये "महाराष्ट्र अधिनियम" या कायद्याच्या संहिततेच्या १ ते १० खंडांच्या प्रती अद्ययावत करण्यात येऊन संदर्भासाठी ठेवण्यात येतात. केंद्रीय अधिनियमांसाठी ए.आय.आर. (All India Reporter) या प्रकाशनाच्या प्रती ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. सदर संहिता सदस्यांना फक्त ग्रंथालयात बसून पाहण्यासाठी उपलब्ध

करून देण्यात येतात. सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निर्णयांच्या डेटाबेस असलेले AIR SC, AIR HC व SSC Online, Legitquest व manupatra हे पाच डेटाबेस ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

(ड) संशोधकांना संदर्भ सहाय्य :- एखाद्या विशिष्ट विषयाचा विशेष अभ्यास करणारे संशोधक किंवा विद्या वाचस्पती पदवीसाठी (पीएच.डी.) अभ्यास करणारे संशोधक यांना त्यांच्या विषयांच्या अभ्यासासाठी लागणारे उपलब्ध संदर्भ रितसर पूर्वमान्यता घेऊन या ग्रंथालयातून उपलब्ध करून देण्यात येतात.

संकीर्ण :-

"सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" प्रकाशन :- नव्याने अस्थित्वात येणाऱ्या प्रत्येक विधानसभेच्या कालावधीकरिता सभागृहाच्या "सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" हे प्रकाशन ग्रंथालयामार्फत प्रकाशित करण्याची व्यवस्था करण्यात येते. या प्रकाशनासाठी सदस्यांची वैयक्तिक परिचय असणारी माहिती विहित प्रकारच्या फॉर्ममधून सदस्यांकडून लेखी स्वरूपात मागविण्यात येऊन ती संक्षिप्त स्वरूपात संपादित केली जाते. विधानपरिषदेच्या सदस्यांच्या बाबतीतही नियत कालावधीनंतर अशाच प्रकारची पुस्तिका प्रकाशित करण्यात येते. मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार या प्रकाशनाच्या प्रती सदस्यांना वितरीत करण्यात येतात व विधिमंडळाच्या संकेतस्थळावरही दर्शविण्यात येतात.

शोक प्रस्ताव व अभिनंदनपर प्रस्ताव :- महाराष्ट्र विधिमंडळाचे दिवंगत सदस्य वा अन्य महनीय व्यक्तींच्या निधनाबद्दल सभागृहात सादर करण्यात येणाऱ्या शोक प्रस्तावांसंबंधीचे सर्व कामकाज ग्रंथालय कक्षामार्फत करण्यात येते. तसेच राज्यातील/देशातील प्रसिद्ध व्यक्तींच्या गौरवपुर्ण कारकिर्दीबाबतचा अभिनंदनपर (या दोन्ही प्रस्तावांबाबतची अधिक माहिती या पुस्तिकेतील **मुद्दा क्रमांक ५१ व ५२** देण्यात आली आहे.) प्रस्तावाबाबतची कार्यवाही ग्रंथालयामार्फत करण्यात येते. (सभागृहात दिनांक २९ जुलै, १९६९ रोजीपासून मांडण्यात आलेल्या अभिनंदनपर प्रस्तावाची यादी **परिशिष्ट क्रमांक २३** मध्ये व महाराष्ट्र विधिमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त सभागृहात मांडण्यात आलेल्या अन्य मान्यवरांच्या दिनांक १६ फेब्रुवारी, १९४८ रोजीपासून शोक प्रस्तावाची यादी **परिशिष्ट क्रमांक २४** वर दर्शविण्यात आली आहे.)

झेरॉक्स सेवा :- सभागृहांचे कामकाज सुरू असताना मा.सदस्यांना कामकाजासंदर्भात आवश्यक असणारी माहिती विनाविलंब उपलब्ध करून देता यावी तसेच, ग्रंथालयातून बाहेर देता येणे शक्य नसणाऱ्या दुर्मिळ ग्रंथांतील वा अन्य साहित्यातील हवी असणारी माहिती मा.सदस्यांना छायांकित प्रती करून प्रति प्रत ५० पैसे प्रमाणे देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर रक्कम त्यांच्या सदस्यत्वाची मुदत समाप्त होताना एकत्रितपणे घेतली जाते.

पुस्तके व नियतकालिके माहिती पद्धती आज्ञावली - Libsys Software :- ग्रंथालयातील दैनंदिन कामकाज उदा. पुस्तके व नियतकालिके पसंती तत्त्वावर विकत घेणे, खरेदी केलेल्या पुस्तकांवर तांत्रिक सोपस्कार करणे व त्यांची देवाण-घेवाण इत्यादी करण्यासाठी व त्याद्वारे माहिती देण्यासाठी तसेच, पुस्तकांतील व नियतकालिकांतील लेखांचा विषय, लेखक, शीर्षक, शीर्षकातील महत्त्वाचे शब्द, आवृत्ती, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व महिना, वर्गांक, (विषय क्रमांक + लेखकाचे नाव) पृष्ठे इत्यादींची माहिती या आज्ञावलीद्वारे नोंद करण्यात येऊन डेटाबेस तयार केला जातो व या डेटाबेसद्वारे नोंद केलेले प्रत्येक पुस्तक व लेख व त्या अंतर्गत विषय वा अन्य विविध वा अन्य विविध बाबींच्या उपलब्धतेची माहिती प्राप्त होऊ शकते.

या आज्ञावलीद्वारे डिसेंबर, २०२१ पर्यंत सुमारे ६६,००० पुस्तकांच्या तसेच, सुमारे १३,००० नियतकालिकांतील लेखांच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत.

*****

(९६) संगणकीय व्यवस्था :-

प्रास्ताविक :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याचा निर्णय महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत दिनांक २४ डिसेंबर, १९९८ रोजी जाहीर करण्यात आला होता. संगणकीकरणासाठी तीन कोटी रूपयांचा निधी मंजूर झाल्याबाबत तसेच सदरहू कामकाज 'सी-डॅक', पुणे या संस्थेच्या माध्यमातून करावयाचे ठरविले असल्याबाबतची घोषणाही त्यावेळी उभय सभागृहांत करण्यात आली होती.

विधानमंडळाचा संगणकीकरण प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा तसेच विधानमंडळाचे ८ मा.सदस्य यांचा समावेश असलेली "विधानमंडळ संगणक समिती" घटित करण्यात येऊन या समितीने विधानमंडळाच्या संगणकीकरणाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, संगणकीय कामकाजाचा आढावा घेणे याचबरोबर विधानमंडळाच्या मा.सदस्यांना शासन निर्णयानुसार, स्थानिक विकास निधी कार्यक्रमांतर्गत केंद्रीभूत पध्दतीने उपलब्ध करून द्यावयाच्या लॅपटॉप/डेस्कटॉप संगणक व प्रिंटर्सचे Configuration मध्ये एकसूत्रता आणण्याचे दृष्टीने शासनास आवश्यक शिफारस करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या समितीने घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने संगणकीकरणाचे कामकाज अधिक तत्परतेने होणे, कामकाज गतीने पूर्ण करण्यासाठी योजना आखणे, इ.साठी या सचिवालयात "क-२ (संगणक)" कक्षाची स्थापना करण्यात आली. सध्या संगणक कक्ष, कक्ष क्रमांक ८०५, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे कार्यरत आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याकरिता, सी-डॅक, पुणे या संस्थेने विधानमंडळाच्या सभागृहांतील कामकाजासाठी आवश्यक असणारी विविध संसदीय आयुधे उदा. प्रश्न, विधेयके, ठराव, प्रस्ताव, सभागृहातील कार्यवाहीवृत्त (प्रतिवेदन, संपादन), ग्रंथालयीन कामकाज (डिबेट्स, वृत्तपत्र कात्रणे, ॲक्ट्स, सदस्य माहिती), विधानमंडळ समित्यांचे कामकाज, याचबरोबर नियमित कार्यालयीन कामकाज याकरिता आवश्यक असणाऱ्या निरनिराळया आज्ञावल्या विकसित करून या सचिवालयाकडे सोपविण्यात आल्या होत्या. सन २०१५ पर्यंत सदरहू अज्ञावल्या कार्यरत होत्या मात्र या सर्व अज्ञावल्या Offline स्वरूपाच्या असल्याने तसेच काळानुरूप Online आज्ञावल्यांची गरज भासल्याने नव्याने आज्ञावल्या तयार करणे आवश्यक झाले होते. सबब दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी MKCL - Maharashtra Knowledge Corporation Limited (महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या.) या संस्थेची सदर कामकाजासाठी करारान्वये "सल्लागार" म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदरहू करारान्वये सभागृहांशी निगडीत तसेच कार्यालयीन कामकाजास उपयुक्त अशा Online आज्ञावल्या नव्याने विकसित करण्याचे कामकाज MKCL यांचेकडे सोपविण्यात आले होते.

विधिमंडळाचे कामकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करण्याकरिता MKCL यांनी संगणकीकरणाचे विविध टप्पे सूचविले होते. त्यानुसार प्रथम टप्पात नविन आज्ञावल्या तयार करून कार्यालयीन स्तरावर तपासणे, दुसऱ्या टप्पात मा. सदस्यांकडून Online स्वरूपात विविध संसदीय आयुधांचे Submission करून घेणे, तृतीय टप्पात संबंधित राज्य शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडुन Online स्वरूपात विविध संसदीय आयुधांची उत्तरे प्राप्त करून घेणे आणि विधानमंडळ तसेच सभागृहांतील कामकाज ' पेपरलेस ' होण्याकरिता दोन्ही सभागृहांत मा. सदस्यांच्या पुढ्यात Notebook स्थापित करणे असे एकूण चार टप्पे करण्यात आले होते.

सद्य:स्थितीत प्रथम, द्वितीय तसेच तृतीय टप्प्यातील कामकाज पूर्ण झाले असून प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यात दोन्ही सभागृहांतील मा.सदस्यांच्या पुढ्यात Notebook स्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यात राज्य विधिमंडळाच्या माहे मार्च, २०१७ मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात तर माहे मार्च, २०२१ मध्ये विधानसभा सभागृहात सदस्यांच्या वापराकरिता Laptops स्थापित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या सचिवालयातील प्रधान सचिव ते कक्ष अधिकारी पदापर्यंतच्या अधिकाऱ्यांना Online कामकाज करणे सुलभ व्हावे याकरिता Laptops उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

एम.के.सी.एल. यांचेशी करण्यात आलेल्या करारानुसार, दोन्ही सभागृहांशी निगडीत तसेच कार्यालयीन कामकाजास उपयुक्त Online आज्ञावल्या तयार करण्याचे कामकाज एम.के.सी.एल. यांनी परिपूर्ण केले असून या संदर्भातील कार्यरत असलेल्या Online आज्ञावल्याबाबतची माहिती पुढील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

अ. क्र.	Online आज्ञावलीचे नाव	विधानसभा	विधानपरिषद
१.	तारांकित प्रश्न (Starred Questions)	होय	होय
२.	अतारांकित प्रश्न (Unstarred Questions)	होय	होय
३.	अल्प सूचना प्रश्न (Short Notice Questions)	होय	होय
४.	अर्धा-तास चर्चा - प्रश्नातून उद्‌भवलेली (Half-an-Hour Discussion from Questions)	होय	होय
५.	अशासकीय ठराव (Non-Official Resolution)	होय	होय
६.	शासकीय ठराव (Government Resolution)	होय	होय
७.	लक्षवेधी सूचना (Calling Attention)	होय	होय
८.	कपात सूचना - अर्थसंकल्प (Cut Motions - Budget)	होय	- - -
९.	कपात सूचना - पूरक मागण्या (Cut Motions - Supplementary Demands)	होय	- - -
१०.	नियम स्थगित करणे (Suspension of Rules)	नाही	होय
११.	स्थगन प्रस्ताव (Adjournment Motions)	होय	होय
१२.	अल्पकालीन चर्चा (Short Duration Discussion Notices)	होय	नाही
१३.	अंतिम आठवडा प्रस्ताव (Last Week Motion)	होय	नाही
१४.	सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा - प्रस्ताव (Public Importance Motions)	होय	नाही
१५.	अर्धा-तास चर्चा - सर्वसाधारण (Half-an-Hour Discussion - General)	होय	होय
१६.	विशेष उल्लेख (Special Mention Notices)	- - -	होय
१७.	औचित्याचा मुद्दा (Point of Propriety)	होय	नाही

अ. क्र.	Online आज्ञावलीचे नाव	विधानसभा	विधानपरिषद
१८.	अशासकीय विधेयके (Non-Official Bills)	होय	होय
१९.	शासकीय विधेयके (Government Bills)	होय	होय
२०.	विधेयक सुधारणा सूचना (Bill Amendments Notices)	होय	होय

वरील आज्ञावल्यांव्यतिरीक्त या सचिवालयातील ग्रंथालय कक्षाच्या नियमित व सर्वसामान्य कामकाजासाठी आवश्यक असणारी LIBSYS ही आंतरराष्ट्रीय स्तरावर वापरात असणारी आज्ञावली कार्यरत आहे.

नेटवर्क (Network) :- विधान भवन, मुंबई येथे ५०० नेटवर्क पॉइन्टस व विधान भवन, नागपूर येथे ४०० नेटवर्क पॉइन्टस स्थापित करण्यात आलेले आहेत. या सचिवालयातील स्थापित करण्यात आलेले विविध कक्षातील संगणक व सर्व्हर्स नेटवर्किंगच्या सहाय्याने एकमेकांस जोडण्यात आले आहेत.

वेबसाईट (Website) :- महाराष्ट्र विधानमंडळाची www.mls.org.in ही वेबसाईट कार्यरत आहे. या वेबसाईटचे उद्घाटन मंगळवार, दिनांक ३० जुलै, २००२ रोजी श्री. विलासराव देशमुख तत्कालिन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्र विधमंडळाचे मा. पीठासीन अधिकारी तसेच अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या वेबसाईटमध्ये महाराष्ट्र विधानमंडळाबाबतची माहिती तसेच विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मा. सदस्यांकडून वापरात येणाऱ्या विविध संसदीय आयुधांची स्टॅटीक स्वरुपातील माहिती उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे दोन्ही सभागृहांचे सर्व मा. सदस्य, विधानमंडळ आणि मंत्रालयीन अधिकारी तथा कर्मचारी यांना Online आज्ञावल्यांना आवश्यक असलेले Online Login page उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे विविध कक्षांकडून प्राप्त होणारी सार्वत्रिक उपयुक्त अशी माहिती या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येते. अगामी कालावधी डायनॉमिक फिचरसह नविन वेबसाईट लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे.

संगणक प्रशिक्षण (Computer Training) :- सध्या वापरात असलेल्या Online आज्ञावल्या हाताळण्याकरिता आवश्यक असलेले प्रशिक्षण मा. सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहाय्यक याचबरोबर विधिमंडळातील व मंत्रालयातील अधिकारी/कर्मचारी यांना गरजेनुसार वेळोवेळी देण्यात येते.

दैनंदिन उपस्थितीची नोंद घेण्याकरीता बायोमेट्रिक यंत्रणेचा वापर (Biometric Attendance System) :- मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकींमध्ये या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी असलेला स्वाक्षरी स्वरुपातील हजेरीपट बंद करून बायोमेट्रीक (Biometric Attendance System) यंत्रणेचा वापर माहे ऑगस्ट, २००८ पासुन सुरू करण्यात आला आहे. सदर Biometric Attendance System चे उद्घाटन श्री. शिवाजीराव देशमुख, तत्कालिन मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीची नोंद घेण्याकरिता मुख्य उद्वाहनाजवळ बायोमेट्रीक यंत्रे स्थापित करण्यात आली आहेत.

लघुसंदेशु - एसएमएस (SMS) - **सुविधा** :- महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना अधिवेशन कालावधीत प्रत्येक दिवसासाठी सभागृहाच्या रोजच्या कामकाजाची वेळ, सभागृहातील होणारे कामकाज, समित्यांच्या बैठका, विधानमंडळातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रम याबाबतची संपूर्ण माहिती विनाविलंब प्राप्त होण्याकरिता लघुसंदेश -एसएमएस- सेवा कार्यान्वित आहे. या सेवेच्या माध्यमातून सदस्यांना तात्काळ माहिती उपलब्ध करून देणे तसेच सदस्यांना व्यक्तीशः माहिती मिळावी हा हेतू आहे.

थेट प्रक्षेपण सेवा (Live Telecast Service) :- राज्य विधिमंडळाच्या विधान भवन, मुंबई आणि नागपूर येथे होणाऱ्या अधिवेशनात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत होणाऱ्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण ससंद टिव्ही *(या पूर्वी - लोकसभा LSTV आणि राज्यसभा RSTV)* धर्तीवर मराठी, हिंदी, इंग्रजी वृत्तवाहिन्यांना सन २०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येते.

त्याचप्रमाणे दोन्ही सभागृहांतील कामकाजाचे थेट प्रक्षेपण सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावे याकरिता Maharashtra Assmbly Live आणि Maharashtra Council Live या दोन You Tube Channel ची निर्मिती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर दोन्ही सभागृहांतील कामकाजांचे थेट प्रक्षेपण करण्यात येते.

विधानमंडळाचा Maharashtra Legislature Secretariat या नावे स्वतंत्र You Tube Channel उपलब्ध असून याव्दारे विधानमंडळात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण मा. पीठासीन अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने करण्यात येते.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत Wi-Fi Internet **सुविधा :-** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत गत पाच वर्षांपासून मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार विधानपरिषद आणि विधानसभा या दोन्ही सभागृहांत मा.सदस्यांच्या वापराकरिता Wi-Fi इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

ऑडिओ/व्हिडीओ रेकॉर्डिंग (Audio / Video Recording Studio) :- महाराष्ट्र विधानसभा तसेच महाराष्ट्र विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये अधिवेशन कालावधीत झालेल्या कामकाजाचे ऑडिओ/व्हिडीओ रेकॉर्डिंग संगणकाच्या सहाय्याने ध्वनिफितमुद्रण कक्षामार्फत करण्यात येते. सन २०१३ पासून सदर सेवा कार्यान्वित करण्यात आली असून सन २०१३ पासून विधानसभा तसेच विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये झालेल्या कामकाजाचे अधिकृत ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग या सचिवालयाकडे उपलब्ध आहे. दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी लेखी पत्राद्वारे मागणी केल्यास महाराष्ट्र विधिमंडळाच्या मा.पीठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने व्हिडिओ रेकॉर्डिंग DVD च्या माध्यमातून मा.सदस्यांना उपलब्ध करून देण्यात येते.

कार्यालयीन वापराकरिता State NIC Video Conferencing **व्यवस्था :-** मा.पीठासीन अधिकारी, उप पीठासीन अधिकारी, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेता, मा.प्रधान सचिव यांचे कार्यालय तथा समिती दालन क्रमांक ७१२, १९०१ आणि २००१ इत्यादी ठिकाणी कार्यालयीन वापराकरिता State NIC Video Conferencing यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

पत्रकारांकरिता पुरविण्यात येणाऱ्या संगणकीय सेवा :- महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत उपस्थित राहणाऱ्या मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकारांकरिता विधान भवन इमारतीत उपलब्ध करून देण्यात आलेल्या दोन्ही दालनात संगणक तथा इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्यात येते. या व्यतिरिक्त दोन्ही सभागृहांत नियमितपणे उपस्थित राहणाऱ्या पत्रकारांना सभागृहांत सदस्यांच्या वापराकरिता उपलब्ध असलेल्या इंटरनेट सेवेचा एक विशेषबाब म्हणून वापर करता येतो.

या व्यतिरिक्त राज्य विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई/नागपूर येथे ज्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचे कॅमेरे ठेवण्यात येतात. त्या ठिकाणी संबंधित माध्यमांच्या प्रतिनिधींना सभागृहांतील थेट प्रक्षेपण त्यांच्या कार्यालयांना/न्युज चॅनेलना पाठविण्यासाठी HIGH SPEED इंटरनेट सेवा उपलब्ध करून देण्यात येते.

*****

प्रकरण तेरावे

(९७) अनुवाद तथा संपादन (Transalation *cum* Editing) :–

महाराष्ट्र राज्याची सन १९६० मध्ये निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्र राजभाषा अधिनियमान्वये मायबोली मराठी सिंहासनाधिष्ठित झाली. त्यावेळेपासून शासन व्यवहारात मराठीला हक्काचे स्थान प्राप्त झाले. तथापि, शासन व जनता यांना परस्परांपासून दूर ठेवणारी इंग्रजीची भिंत लोकप्रतिनिधींना संसदीय कामकाज पार पाडताना अडसर ठरत होती. हा अडसर दूर करण्यासाठी विधानमंडळ सचिवालयात अनुवाद तथा संपादन कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या कक्षामार्फत हाताळण्यात येणाऱ्या कामकाजाची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

(१) कागदपत्रांचा अनुवाद :- महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन व अधिवेशनानंतरच्या कालावधीत दोन्ही सभागृहांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांचा मराठी-इंग्रजी अनुवाद किंवा त्याचप्रमाणे इंग्रजी-मराठी अनुवाद करणे, यामध्ये विशेषकरून विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम, बैठकीची दिनदर्शिका, लोकलेखा समिती, सार्वजनिक उपक्रम समिती यांच्या अहवालातील शासनास केलेल्या शिफारशींचा अनुवाद, विशेषाधिकार समितीच्या महत्वपूर्ण अहवालांचा इंग्रजी अनुवाद, विधानसभा/विधानपरिषद नियम, समित्यांचे अहवाल, इंग्रजी भाषेतील विधेयकांच्या परिशिष्टांचा मराठी अनुवाद या व्यतिरिक्त माननीय पीठासीन अधिकारी व प्रधान सचिव, म.वि.स. यांचे निदेशानुसार वेळोवेळी सोपविण्यात येणारे अनुवादाचे अन्य कामकाज या कक्षाकडून पार पाडले जाते.

(२) पत्रक भाग एक :- विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत विधानसभा/विधानपरिषद सभागृहाच्या प्रत्येक दिवशीच्या बैठकीचे कामकाज सभागृहात ज्या क्रमाने झाले असेल त्या क्रमानुसार त्याचा संक्षिप्त वृत्तांत पत्रक भाग एक मध्ये समाविष्ट केलेला असतो. प्रत्येक दिवशी सभागृहात किती तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली, किती नियम ९३ अन्वये सूचना मांडण्यात आल्या, विशेष हक्कभंग सूचना, शासकीय विधेयके, अशासकीय विधेयके, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा सभागृहात चर्चिल्या गेल्या, विविध ठराव, प्रस्ताव यावरील चर्चेत कोणत्या सदस्यांनी भाग घेतला त्यांची नावे इत्यादी बाबतचा गोषवारा पत्रक भाग एकमध्ये देण्यात येतो. पत्रक भाग एकच्या प्रती अधिवेशन काळात सर्व सदस्यांना सभागृहातील टपाल खणाद्वारे वितरीत करण्यात येतात.

विधिमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर सर्व पत्रक भाग एकचे संकलन व संपादन करून संक्षिप्त अहवालात समाविष्ट करण्यासाठी संबधित कक्षांकडे पाठविण्यात येते.

(३) कार्यवाहीचे संकलन, संपादन व मुद्रण :- महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागृहांच्या (विधानसभा/विधानपरिषद) दैनंदिन बैठकींच्या कामकाजाचे प्रतिवेदन (Reporting) पूर्ण झाल्यावर प्रत्येक दिवसाच्या कार्यवाहीच्या प्रती, या सचिवालयातील प्रतिवेदन कक्षाद्वारे अनुवादन तथा संपादन कक्षाकडे पाठविल्या जातात. दोन्ही सभागृहांतील प्रत्येक दिवसाच्या कार्यवाहीची (Proceedings) एक असुधारित प्रत दुसऱ्या दिवशी; सदस्यांच्या संदर्भासाठी ग्रंथालयात ठेवण्यात येते. एक प्रत संसदीय कार्य विभागास पाठविली जाते. प्रत्येक सभागृहांतील प्रत्येक दिवसाच्या कामकाजासंबंधी सर्व आवश्यक ती कागदपत्रे संकलित करून कार्यवाहीमध्ये योग्य त्या ठिकाणी समाविष्ट करून एक परिपूर्ण अशी मुद्रणालय प्रत तयार केली जाते. ह्या मुद्रणालय प्रतीचे संपादन करून छापण्यासाठी शासकीय मुद्रणालयास पाठविली जाते. त्या कार्यवाहीची मुद्रिते मुद्रणालयाकडून या सचिवालयाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येतात. सदर मुद्रिते तपासून अंतिम मुद्रणासाठी मुद्रणालयाकडे परत पाठविली जातात. सभागृहाच्या प्रत्येक दिवसाच्या कार्यवाहीचे अंतिम मुद्रण झाल्यावर त्याच्या छापील प्रती शासकीय मुद्रणालयाकडून सदस्यांना परस्पर पाठविल्या जातात.

सदस्यांनी सभागृहांत केलेल्या प्रत्येक दिवसाच्या भाषणाची असुधारित प्रत, ज्यादिवशी भाषण केलेले असेल त्याच्या पुढील कामकाजाच्या दिवशी, सदस्यांच्या टपाल खणात ठेवण्यात येते. अधिवेशनाच्या शेवटच्या दोन-तीन दिवसांच्या भाषणांच्या प्रती सदस्यांना टपालाव्दारे पाठविण्यात येतात.

प्रत्येक दिवसाची भाषणे दुरूस्त करून, विधिमंडळ बोधिकेतील भाग-चार मधील 'सदस्यांची भाषणे दुरूस्त आणि परत करणे', आणि परत करणे या शीर्षकाखालील समादेश ३ व ४ अनुसार ७ दिवसांच्या आत आणि शेवटच्या दिवसाची भाषणे दुरूस्त करून १० दिवसांच्या आत या सचिवालयाकडे परत पाठवावयाची असतात. सदस्यांनी भाषणे दुरूस्त करून परत न पाठविल्यास नोंदवले गेलेले भाषण बव्हंशी बरोबर आहे समजून त्याप्रमाणे ते अधिकृत प्रतिवेदनात छापण्यात येते.

भाषणाच्या दुरूस्तीसंबंधी तत्कालिन मुंबई विधानपरिषदेच्या अध्यक्षांनी दिनांक २९ सप्टेंबर, १९२१ रोजी एक निर्णय दिलेला होता, त्यानुसार सदस्यांकडे जेव्हा दुरूस्तीकरिता भाषणे पाठविली जातात तेव्हा त्यांना काही शबद बदलण्याची, वाक्ये वगळण्याची आणि त्या जागी नवीन वाक्ये घालण्याची मुभा असते. मात्र जो भाग वगळावयाचा असेल तो अतिशयोक्तिपूर्ण अथवा अयोग्य असला पाहिजे तसेच तो शिष्टाचार किंवा संदर्भ यांच्याशी तसेच व्याकरणदृष्ट्या विसंगत असला पाहिजे. शिवाय सुचविलेली दुरूस्ती, सदस्यांच्या कल्पना चांगल्या रितीने व अधिक स्पष्टतेने व्यक्त करणारी असली पाहिले. मात्र मूळ भाषणात न वापरलेला युक्तिवाद, घटना किंवा आकडे दुरूस्तीच्या रूपाने भाषणामध्ये जोडता येणार नाहीत. हे सदस्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. अधिकृत प्रतिवेदकांनी उतरवून घेतलेली वाक्ये किंवा मुद्दा सदस्यांनी केलेल्या भाषणातील युक्तिवादाच्या दृष्टीने महत्वाचा असल्यास तो वगळण्यात येणार नाही. हे सर्व असले तरी सदस्यांना आपल्या भाषणाच्या, प्रतिवेदकांनी केलेल्या प्रतिवेदनात मोठ्या प्रमाणात दुरूस्त्यांच्या स्वरूपात बदल करता येणार नाही हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भात काही शंका निर्माण झाल्यास त्याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल.

(४) सभागृहातील कामकाजाची विषयसूची तयार करणे :- संसदीय आयुधांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी विधानमंडळाच्या अधिवेशनात सार्वजनिक हिताचे अनेकविध विषय उपस्थित करून ते मार्गी लावून जनतेला न्याय मिळवून देतात. अशावेळी पूर्वोदाहरण म्हणून महत्वाच्या विषयाचा संदर्भ आधीच्या कार्यवाहींमध्ये पाहणे सुकर व्हावे यास्तव प्रत्येक विषयातील महत्वाचा शब्द घेऊन विषयसूची वर्णक्रमानुसार तयार केली जाते. (उदा.लातूर येथे झालेला भूकंप या विषयातील भूकंप हा महत्वाचा शब्द निवडला जातो) त्याचप्रमाणे, सदर प्रकाशनात वर्णक्रमानुसार सर्व सन्माननीय सदस्यांच्या विषयसूचीचा देखील समावेश करण्यात येतो व त्याखाली त्यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित केलेल्या विषयातील महत्वाचे शब्द घेऊन त्याचा देखील विषयसूचीत समावेश केला जातो. प्रत्येक अधिवेशननिहाय वेगळी विषयसूची तयार करून, मुद्रित करून संदर्भ शोधण्यासाठी ग्रंथालयात ठेवण्यात येते.

*****

(९८) प्रतिवेदन (Reporting) :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत होणाऱ्या दैनंदिन कामकाजाची शब्दशः नोंद प्रतिवेदन कक्षातील अधिकृत प्रतिवेदकांमार्फत (Reporters) केली जाते. ही नोंद घेणाऱ्या अधिकृत प्रतिवेदकांना सोयीचे जावे म्हणून सदस्यांनी, प्रतिवेदक सदस्यांच्या नावाशी परिचित होईपर्यंत सुरूवातीच्या काळात सभागृहात भाषणास सुरूवात करण्यापूर्वी अथवा कामकाजात भाग घेताना प्रथमतः आपली नावे सांगितल्यास प्रतिवेदकांचे काम सुकर होईल.

माननीय सदस्यांनी सभागृहात लेखी निवेदन केले असेल किंवा फाईल्स, पुस्तके, वर्तमानपत्रे यामधून काही भाग उद्धृत केला असेल तर जशी टिपणे, फाईल्स वगैरे विधानसभा बोधिका भाग-४ मधील "सदस्यांची भाषणे" (दुरूस्ती आणि परत करणे) या शीर्षकाखाली समादेश - ६ नुसार ताबडतोब संबंधित प्रतिवेदक किंवा प्रतिवेदक (निवडश्रेणी) (पूर्वीचे पद मुख्य प्रतिवेदक) यांच्याकडे देण्याची व्यवस्था करावी.

दोन्ही सभागृहांच्या कामकाजाच्या प्रतिवेदनाप्रमाणेच विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या मुख्यालयात आणि मुख्यालयाबाहेर होणाऱ्या बैठकांच्या कामकाजाचे प्रतिवेदनही अधिकृत प्रतिवेदकांमार्फत केले जाते.

राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेने आयोजित केलेल्या भाषणांचे तसेच महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे राज्यातील विद्यापीठांतील राज्यशास्त्र व लोकप्रशासन यांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणारा संसदीय अभ्यासवर्ग याचबरोबर केंद्र सरकार आणि राज्य सरकारतर्फे आयोजित करण्यात आलेल्या परिषदांचे अथवा नियुक्त करण्यात आलेल्या समित्यांच्या कामकाजाचे प्रतिवेदनही अधिकृत प्रतिवेदकांमार्फत केले जाते.

विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या समिती प्रमुखांकरिता मराठी व इंग्रजी लघुलेखकांच्या सेवा प्रतिवेदन कक्षामार्फत उपलब्ध करून दिल्या जातात.

या सचिवालयातील विविध अधिकाऱ्यांना त्यांचे काम करणे सुकर व्हावे यादृष्टीने लघुलेखकांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येतात व हे सर्व लघुलेखक प्रतिवेदन कक्षाच्या नियंत्रणाखाली काम करतात.

विधानमंडळ सचिवालयातून विविध कक्षांकडून प्राप्त होणारे टंकलेखनाचे कामकाज या सचिवालयातील टंकलेखन शाखेमार्फत करण्यात येते. टंकलेखन शाखा प्रतिवेदन कक्षाच्या नियंत्रणाखाली काम करते.

(९९) फीतध्वनी मुद्रण व्यवस्था (Audio-Video Recordings) **:-** महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील संपूर्ण दिवसाच्या कामकाजाचे दृक-श्राव्य मुद्रण (Audio-Video Recordings) प्रतिवेदन कक्षाच्या अंतर्गत असलेल्या अधिकृत फीतध्वनी मुद्रकांमार्फत केले जाते. मा.सदस्य व खाजगी व्यक्तींना मा.पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने नियम, मार्गदर्शक तत्वे व हमींच्या अधिन राहून दृक-श्राव्य मुद्रणाची सीडी देण्यात येते.

*****

(१००) टंकलेखन (Typing) **:-**

या सचिवालयातील टंकलेखन कक्ष, प्रतिवेदक (निवडश्रेणी) (पूर्वीचे पद मुख्य प्रतिवेदक व अतिरिक्त मुख्य प्रतिवेदक) व कार्यवाही संपादक यांच्या नियंत्रणाखाली काम करतो.

टंकलेखन कक्षातील कामाचे वाटप मुख्य टंकलेखक यांचेमार्फत केले जाते. तसेच काही महत्वाच्या कक्षांना टंकलेखकांची कायम स्वरूपाची सेवा उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु ज्या कक्षांना टंकलेखकांची सेवा उपलब्ध करून दिलेली नाही अशा विधानमंडळातील विविध कक्षांकडून येणारे टंकलेखनाचे काम टंकलेखन कक्षामार्फत केले जाते.

विधिमंडळाच्या सत्र कालावधीमध्ये विधानसभा व विधानपरिषद प्रश्न कक्षात टंकलेखकांमार्फत प्रश्न टंकलिखित करण्याचे काम केले जाते. तसेच अर्थसंकल्पीय मागण्यांवरील कपात सूचना, राज्यपालांच्या अभिभाषणावर सदस्यांनी दिलेल्या सुधारणा, जास्तीच्या लक्षवेधी सूचना तसेच सभागृहाशी संबंधित इतरही महत्त्वाचे कामकाज टंकलेखन कक्षामार्फत करण्यात येते.

या सचिवालयातील दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त अधिवेशन कालावधीत सदस्यांच्या सोयीसाठी नवीन आमदार निवास व मनोरा आमदार निवास येथे मराठी व इंग्रजी टंकलेखनाची व्यवस्था सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० आणि सायंकाळी ५-०० ते ७-०० वाजेपर्यंत तसेच मॅजेस्टिक आमदार निवास व जुने विधान भवन आमदार निवास या ठिकाणीही मराठी टंकलेखनाची व्यवस्था सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत उपलब्ध करून दिली जाते. त्याचप्रमाणे विधानमंडळ सचिवालयातील पहिल्या मजल्यावर दुपारी १-०० ते सायंकाळी ७-०० या वेळेत मराठी व इंग्रजी टंकलेखनाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत अशा प्रकारची टंकलेखनाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाते व त्याबद्दलचा तपशील सदस्यांना पत्रक भाग-२ द्वारे कळविला जातो.

सदस्यांना दोन्ही सभागृहांच्या कामकाजाशी प्रत्यक्ष संबंधित असलेली कागदपत्रे/टिपणे/पत्रे इ. टंकलिखित करून देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे व्यवस्था उपलब्ध करून दिली असल्यामुळे, केवळ सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित असलेले टंकलेखनाचे कामकाज सदस्यांना करून देण्यात यावे, अशाप्रकारच्या सूचना त्या ठिकाणी काम करणाऱ्या टंकलेखकांना दिलेल्या असतात.

*****

(१०१) वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र (V. S. Page Parliamentary Training Centre):—

राष्ट्रीय स्तरावर संसद आणि राज्य विधिमंडळाच्या सदस्यांसाठी प्रबोधन, प्रशिक्षण,व्याख्यान व चर्चासत्र इत्यादी उद्‌बोधनपर कार्यक्रमांचे आयोजन संसदीय अभ्यास आणि प्रशिक्षण केंद्रातर्फे (Bureau of Parliamentary Studies and Training Centre- BPST) करण्यात येते. BPST या संस्थेची स्थापना १ जानेवारी, १९७६ रोजी झाली असून ही संस्था लोकसभा सचिवालयाचा अविभाज्य घटक आहे. ही संस्था संसद सदस्य, संसदेचे अधिकारी/कर्मचारी/ संसदीय संस्था, संसद सदस्यांचे स्वीय सहायक, देशातील राज्य विधानमंडळाचे सदस्य, पत्रकार, अखिल भारतीय केंद्रीय सेवेत प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी, सरकारी अधिकारी, विद्यार्थी, तसेच विदेशी संसदेतील पीठासीन अधिकारी, सदस्य व अधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण व अभ्यास दौरे यांचे आयोजन करते.

राष्ट्रीय स्तरावर BPST आताचे नाव 'पार्लमेंटरी रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिस्ट्यूट फॉर डेमॉक्रॉसिस' — PRIDE (Erstwhile BPST) या संसदेतील प्रशिक्षण आणि अभ्यासकेंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्र विधानमंडळात वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राची स्थापना सोमवार, दिनांक १४ मार्च, २०११ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे आयोजित केलेल्या उद्‌घाटन सोहळा प्रसंगी करण्यात आली. विधिमंडळ सदस्यांना सभागृहाच्या कामकाजाची माहिती चांगल्याप्रकारे व्हावी व सभागृहाचे कामकाज अधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी या प्रशिक्षण केंद्रातर्फे विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तसेच विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे नियमित आयोजन करण्यात येते. विधिमंडळातील कामकाजाची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी व त्यांचे प्रबोधन व्हावे

तसेच जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका व अन्य निर्वाचित सदस्यांनाही स्थानिक प्राधिकरणाच्या कामकाजाबरोबरच विधिमंडळाच्या कामकाजाच्या प्रथा, परंपरांची तज्ज्ञांमार्फत माहिती करून देणे, लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन करणे त्याचबरोबर पदव्युत्तर शिक्षण घेणारे स्नातक व प्रसिध्दी/ प्रसारमाध्यमात काम करणारे मान्यवर पत्रकार, विधिमंडळ सदस्यांचे स्वीय सहायक यांना संसदीय कामकाजाची ओळख व्हावी यासाठी विविध उपक्रम/ प्रशिक्षण वर्ग केंद्रामार्फत राबिवले जातात. विधिमंडळ सदस्यांसोबतच राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समितीतील निर्वाचित झालेल्या सदस्यांना देखील संसदीय कामकाजाचे प्रशिक्षण मिळावे हे या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट आहे.

भारतीय संसदीय लोकशाहीच्या गौरवशाली आणि अभिमानास्पद परंपरेचे प्रतीक म्हणजे महाराष्ट्र विधानमंडळ होय. येथील वाद-प्रतिवाद-सुसंवाद ही परंपरा आणि त्यातून व्यक्त होणारे विचारवैभव महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेहमीच एक पाऊल पुढे ठेवत आले आहे. वैधानिक कामकाजाची सकारात्मक बाजू प्रसिध्दीमाध्यमांद्वारे जनसामान्यांपर्यंत पूर्णांशाने पोहोचतेच असे नाही. बऱ्याचदा अपवादात्मक घटना जणू नियम बनल्याप्रमाणे सादर होत असल्याने व्यवस्थेविषयीची नकारात्मकता वाढीस लागते. टीकात्मक परीक्षण आवश्यक असले तरी नकारात्मकतेचा सततचा मारा जनसामान्यांमध्ये नैराश्य व वैफल्यता निर्माण करू शकतो. ही बाब संसदीय लोकशाहीच्या सुदृढ आणि निकोप वाढीसाठी योग्य ठरणारी नाही. या पार्श्वभूमीवर वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रासारख्या उपक्रमांची अत्यंतिक आवश्यकता आहे.

त्यानुसार वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे विधिमंडळ सदस्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वाच्या कार्यक्रमांची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

(१) अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे ८५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन चंद्रपूर येथे दिनांक ३ ते ५ फेब्रुवारी, २०१२ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात दिनांक ५ फेब्रुवारी, २०१२ रोजी 'मराठीच्या दूरवस्थेला प्रसार माध्यमे सुध्दा कारणीभूत आहेत' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादास वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्यावतीने तत्कालीन संचालक यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

(२) थोर स्वातंत्र्य सैनिक तथा महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे माजी जेष्ठ सदस्य श्री. दत्ताजी ताम्हणे यांचे १०० व्या वर्षात पदार्पणानिमित्त विधिमंडळातर्फे मा. पीठासीन अधिकारी व माजी तसेच विद्यमान सदस्यांच्या उपस्थितीत दिनांक १३ एप्रिल, २०१२ रोजी त्यांचा सत्कार करण्यात आला.

(३) 'कायदा संमत होण्याची कार्यपध्दती' या विषयांवर श्री. अ.मा. शिंदेकर माजी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे, विधिमंडळ सदस्यांसाठी दिनांक १२ जुलै, २०१२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

(४) 'मंत्रालय प्रशासनाचा विधिमंडळाशी असलेला अन्योन्य संबंध' या विषयांवर श्री. द. म. सुकथनकर, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे, विधिमंडळ सदस्यांसाठी दिनांक २३ जुलै, २०१२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

(५) 'कॅगचे स्वरूप, कामकाजाची प्रक्रिया, कॅगचे महत्त्व व त्यांचे संविधानिक अधिकार, कॅगकडून प्राप्त होणारे अहवाल व शासनाची भूमिका' या विषयांवर श्री. यशवंत कुमार, महालेखाकार-२, नागपूर, महाराष्ट्र यांचे, विधिमंडळ सदस्यांसाठी दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

(६) 'मंत्रालयीन कामकाज आणि विधिमंडळाशी असलेला संबंध' या विषयांवर डॉ. एस.के. गोयल, अपर मुख्य सचिव, कृषी व पणन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे, विधिमंडळ सदस्यांसाठी दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

(७) विधिमंडळ सदस्यांच्या स्वीय सहायकाना विधानमंडळातील विविध संसदीय आयुधे, अर्थसंकल्प, शासन कार्यपध्दती या विषयांची माहिती व्हावी यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक ७ मे, २०१३ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेस डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, श्री. नागेश केसरी, संचालक, वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र यांनी मार्गदर्शन केले.

(८) विधिमंडळ सदस्यांना राज्य सरकारच्या गॅझेटिअर (दर्शनिका) विभागाची माहिती व्हावी व प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून योग्य ते मार्गदर्शन व्हावे यासाठी दिनांक २९ जुलै, २०१३ रोजी डॉ. अरूणचंद्र पाठक, कार्यकारी संपादक व सचिव, गॅझेटिअर विभाग, महाराष्ट्र शासन यांचे 'गॅझेटिअरची (दर्शनिका) संकल्पना' या विषयांवर विधिमंडळ सदस्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

(९) वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर (वनामती) आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट-ब अधिकाऱ्यांचे एकत्रित पायाभूत प्रशिक्षण शिबीर विधान भवन, नागपूर येथे दिनांक ५ ते ७ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

(१०) महाराष्ट्र इंटरनॅशनल स्टडीज् असोसिएशन (MISA) आणि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ पॉलिटिकल सायन्स, नेदरलँड या संस्थेमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभ्यासगटाने विधान भवन, मुंबई येथे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी भेट दिली त्यावेळी भारतातील व महाराष्ट्रातील संसदीय कार्यप्रणालीविषयी विधानमंडळ अधिकारी वर्गाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

(११) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांसाठी जेष्ठ कृषीतज्ज्ञ प्रा.डॉ.बुधाजीराव मुळीक यांचे 'महाराष्ट्रातील शेती व सिंचन प्रगती, उद्दिष्टे आणि आव्हान' या विषयावर नागपूर अधिवेशन कालावधीत दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

(१२) सामाजिक न्याय विभागातील सहायक आयुक्त गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यासांठी 'यशदा' पुणे येथे पदोन्नतीनंतरच्या प्रशिक्षणादरम्यान 'विधानमंडळाचे कामकाज' या विषयावर दिनांक १८ मे, २०१७ रोजी एक दिवसीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले.

(१३) युवक बिरादरी भारत या संस्थेतर्फे राष्ट्रीय स्वरूपाच्या लीडरशीप ट्रेनिंग उपक्रमांतर्गत देशातील विविध भागातून आलेल्या युवा प्रतिनिधींनी दिनांक १ जून, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे भेट दिली. यावेळी श्री. रामराजे नाईक निंबाळकर, मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी उपस्थित युवक युवतींना उद्‌बोधनपर मार्गदर्शन केले. युवकांनी 'अभिरूप संसद' या कार्यक्रमांतर्गत संसदेत होणाऱ्या सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्या कामकाजाचे प्रतिकात्मक स्वरूपात सादरीकरण केले.

(१४) यंग लीडर फॉर ॲक्टीव सिटीझनशिप या संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १९ जून, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे तत्कालीन उप सभापती मा. श्री. माणिकराव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

(१५) विधिमंडळ सदस्यांच्या स्वीय सहायकासांठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विधान भवन, मुंबई येथे दिनांक २३ जुलै, २०१७ रोजी करण्यात आले होते. सदरहू कार्यशाळेस श्री. रामराजे नाईक- निंबाळकर, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, श्री. हरिभाऊ बागडे, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. गिरीश बापट, मा. संसदीय कार्य मंत्री यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. प्रफुल्ल मारपकवार, ज्येष्ठ पत्रकार, टाइम्स ऑफ इंडिया यांनी 'विधिमंडळ कामकाज, मतदार संघातील विकासकामे आणि प्रसिध्दीकार्य' या विषयावर तर श्री. उत्तमसिंग चव्हाण, सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी 'विविध संसदीय आयुधे' आणि प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे यानी 'संसदीय लोकशाही प्रणालीत विधिमंडळ कामकाजाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या उद्घाटनसत्रात वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक श्री. निलेश मदाने लिखित 'लोकप्रतिनिधींसाठी लोकसंपर्क : स्वीय सहायकांची कर्तव्ये आणि जबाबदारी' या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

(१६) पीआरएस लेजिस्लेटीव्ह रिसर्च, नवी दिल्ली यांच्यातर्फे नवी दिल्ली येथे दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत 'भारतातील आरोग्य सेवा' या राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेत वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयाने महाराष्ट्र विधिमंडळ सदस्य सहभागी झाले होते.

(१७) 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' (दिनांक १ ते १५ जानेवारी) अंतर्गत मायबोली मराठी या परिसंवादाचे आयोजन दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले. सदरहू कार्यक्रमास मा. पीठासीन अधिकारी व मंत्रीगण उपस्थित होते. परिसंवादात अर्थतज्ज्ञ श्री. जयराज साळगावकर यांनी 'महाराष्ट्र आणि मराठी भाषा', ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी 'मराठी भाषेचा विकास- कृतीशीलतेची गरज', ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांनी 'चित्रपट, रंगभूमी या क्षेत्राचे मराठी भाषा विकासातील योगदान', श्री. भानू काळे यांनी 'वाचन संस्कृती संवर्धन', ज्येष्ठ पत्रकार श्री. दिलीप चावरे यांनी 'माध्यमांमुळे मराठी भाषा बिघडत आहे का? तसेच विधान परिषदेचे ज्येष्ठ सदस्य श्री. हेमंत टकले यांनी 'मराठी : ज्ञानभाषा, राजभाषा आणि लोकभाषा' या विषयावर तसेच परिसंवादात मांडल्या गेलेल्या विविध मुद्दयांचा एकत्रित आढावा आपल्या व्याख्यानात घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधानसभा सदस्य श्री. आशिष शेलार यांनी केले. या कार्यक्रमास दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य, विधिमंडळ आणि मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारीवर्ग, मुंबई विद्यापीठातील तसेच मुंबईतील विविध महाविद्यालयातील मराठी भाषा विभागाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'विकिपीडियावर मराठी' या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि मराठी भाषा विभाग, मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी करण्यात आले होते. विकिपीडियातील प्रादेशिक भाषा विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष, प्रचारक आणि आय.आय.टी., मुंबईचे प्राध्यापक श्री. राहूल देशमुख व त्यांचे सहकारी यांनी या कार्यशाळेत सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून प्रात्यक्षिकासह सराव करून घेत मार्गदर्शन केले. या उपक्रमात मंत्रालय, विधानमंडळ सचिवालय आणि भाषा संचालनालय येथील १०० पेक्षा अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी भाग घेतला होता.

(१८) कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. त्याचे औचित्य साधून 'मराठीभाषा गौरव दिनाचे' आयोजन वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि मराठीभाषा विभाग, मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा. पीठासीन अधिकारी, मा. मुख्यमंत्री, मा. मराठीभाषा मंत्री, मा. संसदीय कार्यमंत्री तसेच दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेते, मा. मंत्री, राज्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य, पुरस्कार प्राप्त मान्यवर साहित्यिक, पत्रकार तसेच मंत्रालय व विधिमंडळातील अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिध्द गायक श्री. कौशल इनामदार व त्यांच्या समवेत असलेला विद्यार्थीवृंद यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी मराठी अभिमान गीत समूहगान पद्धतीने सादर केले. दुपारच्या सत्रात 'विशाखा' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेचे अभिवाचन आणि पत्रकारांच्या कविता सादरीकरणाचा कार्यक्रम पत्रकार कक्षात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन-संचालक श्री. निलेश मदाने यांनी केले. मा. मंत्री श्री. विनोद तावडे आणि श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांची आणि पत्रकारांची विशेष उपस्थिती या उपक्रमास लाभली.

(१९) जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर विधिमंडळ सदस्य आणि वरिष्ठ सनदी अधिकारी यांच्यासाठी वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि पर्यावरण विभाग, मंत्रालय तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने एक संवाद विधिमंडळ सदस्यांशी - 'बदलते हवामान-आव्हाने आणि उपाययोजना' या परिसंवादाचे आयोजन दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आले होते. या परिसंवादास श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, मा.सभापती, विधानपरिषद, श्री. हरिभाऊ बागडे, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. रामदास कदम, मा. पर्यावरण मंत्री, श्री. माणिकराव ठाकरे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, श्री. आदित्य ठाकरे, युवासेना अध्यक्ष, श्री. अजिंक्य राहाणे, आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू, श्रीमती सँण्डी शिअर्ड, कॉऊन्सिलर, उर्जा व हवामान बदल, ब्रिटीश उच्चायुक्तालय, भारत, श्री. क्रिस्पीन सायमन, ब्रिटीश उप उच्चायुक्त, मुंबई, श्री. सतीश गवई, अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग, डॉ. पी. अनबलगन, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे मंत्री, राज्यमंत्री, महाराष्ट्रातील खासदार, दोन्ही सभागृहांचे सदस्य व पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर उपस्थितीत होते. परिसंवादात पर्यावरण तज्ज्ञ श्री. अतुल देऊळगावकर आणि श्री. अभिजित घोरपडे यांनी 'हवामान बदलः शाश्वत विकासासमोरील आव्हान' या विषयावर तर डॉ. क्रिस्पीनो लोबो, सह संस्थापक, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट यांनी हवामान बदलाच्यासंदर्भात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पध्दती व यशस्वी प्रकल्पांचे सादरीकरण केले. डॉ. गजानान डांगे, अध्यक्ष, योजक सेंटर फॉर रिसर्च ॲण्ड स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट यांनी बदलत्या हवामानाच्या अनुषंगाने 'ग्रामीण विभागाचे संरक्षण व विकास' या विषयांवर मार्गदर्शन व सादरीकरण केले. पर्यावरण क्षेत्रात प्रत्यक्ष काम करून गावाचा विकास करणारे श्री. चैतराम पवार हे सुद्धा या कार्यक्रमास उपस्थित होते.

(२०) पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, नवी दिल्ली आणि वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र यांच्या समन्वयाने नागपूर अधिवेशनात दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी मा. विधिमंडळ सदस्यांसाठी `१५ वा वित्त आयोग आणि विधिमंडळ सदस्य' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले यावेळी पीआरएस लेजिस्लेटिव्ह रिसर्च, या संस्थेचे सह-संस्थापक तथा अध्यक्ष डॉ. एम. आर. माधवन यांनी मा. विधिमंडळ सदस्यांना मार्गदर्शन केले.

(२१) नक्षलवादी चळवळ ही देशापुढे मोठे आव्हान असल्यामुळे त्या आव्हानाला सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी 'संसदीय लोकशाहीपुढे नक्षलवादी चळवळीचे आव्हान' या विषयावर नागपूर अधिवेशनात दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर आणि नक्षलवादी विरोधी पथकाचे माजी पोलीस महानिरीक्षक श्री. शिवाजीराव बोडखे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

(२२) समाजमाध्यमांवर व इतर ठिकाणी अफवांवर विश्वास ठेवून त्याचे विपरित परिणाम होताना दिसून येतात. अफवांच्या पिकांमुळे समाजव्यवस्थेला धोके उद्‌भवू शकतात. या पार्श्वभूमीवर 'अफवांचे पीक... समाज व्यवस्थेला धोका' या विषयावर नागपूर अधिवेशनात दिनांक १८ जुलै, २०१८ रोजी श्री. ब्रिजेश सिंह (आय.पी.एस.) महासंचालक माहिती व जनसंपर्क यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

(२३) पीआरएस लेजिस्लेटीव्ह रिसर्च, नवी दिल्ली यांच्यातर्फे नवी दिल्ली येथे दि. १७ व १८ जानेवारी, २०१९ रोजी राष्ट्रीय स्तरावरील आयोजित करण्यात आलेल्या राज्यातील विधिमंडळ सदस्यांसाठी 'राज्य अर्थव्यवस्था' या विषयावरील कार्यशाळेस वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयाने विधिमंडळ सदस्य उपस्थित होते.

(२४) मा.मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या विविध क्षेत्रातील ५० युवकांनी दिनांक २८ जानेवारी, २०१९ रोजी दिलेल्या विधान भवन, मुंबई येथील अभ्यासभेटीच्या वेळी विधानमंडळातील अधिकाऱ्यांनी विधिमंडळाच्या कामकाजाविषयी 'फेलोज'ना माहिती करून दिली.

या प्रमुख कार्यक्रमांव्यतिरिक्त विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी, पत्रकार, स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी आदिंच्या अभ्यासगटासाठी श्री. निलेश मदाने, संचालक, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र यांच्या संकल्पनेतून एक दिवसीय कार्यशाळांचे आयोजन सातत्याने होत आहे. यामध्ये तिन्ही सभागृहांना समालोचनासह भेटी तसेच संचालक आणि विधानमंडळातील अधिकारी यांची व्याख्याने या अभ्यासभेटी दरम्यान आयोजित केली जातात तसेच विविध महाविद्यालयांना, संस्थांना, शासकीय आस्थापनांना भेटी देऊन भारतीय राज्यघटना, विधिमंडळ कामकाज, लोकशाहीची गौरवशाली परंपरा, विविध संसदीय आयुधे, समिती पध्दती इ. बाबत संबंधितांना माहिती दिली जाते.

वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे खालील ४ ग्रंथांची निर्मिती व प्रकाशन करण्यात आले आहेः-

(१) दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते विधानमंडळाच्या (सन १९३७ ते २०११) अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी व विद्यमान सदस्य यांच्या विधिमंडळाच्या कामकाजाच्या आठवणींचा संग्रह असलेला 'स्मृतिगंध' व विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील माजी व विद्यमान सदस्य यांनी सभागृहात केलेल्या निवडक भाषणांचा संग्रह असलेला 'नोंदी' हे दोन ग्रंथ तसेच टेबल व भिंतीवरील दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

(२) दिनांक १ जुलै, २०१३ रोजी ज्येष्ठ नेते, हरित क्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने त्यांच्या विधिमंडळातील निवडक भाषणांचा संग्रह असलेला 'चतुरस्त्र' हा ग्रंथ भारताचे महामहीम राष्ट्रपती मा. श्री. प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला.

(३) दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिवंगत माजी राज्यपाल मा.रा.सू.गवई (दादासाहेब) यांचे जीवनकार्य व त्यांच्या विधिमंडळ आणि संसदीय कामकाजाच्या योगदानावर आधारित 'अजातशत्रू' हा स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्यात आला.

(अ) महाराष्ट्र राज्याचे दिवंगत कृषी मंत्री मा. भाऊसाहेब तथा पांडुरंग फुंडकर यांचे जीवनकार्य, 'भूमिपुत्र' या त्यांच्या विधिमंडळ आणि संसदीय कामकाजाच्या योगदानावर आधारित स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करण्याचे प्रस्तावित आहे.

(ब) या शिवाय महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मा. विलासराव देशमुख यांचे जीवनकार्य व त्यांच्या विधिमंडळ आणि संसदीय कामकाजाच्या योगदानावर आधारित 'दिलखुलास' या स्मृतिग्रंथ निर्मितीचे काम सुरू आहे.

*****

(१०२) महिला तक्रार निवारण समिती :-

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना काही मूलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. त्यायोगे नागरिकांचा सामाजिक, आर्थिक विकास घडून येण्यात भरीव सहाय्य झाले आहे. मूलभूत हक्कांमध्ये समानतेचा हक्क हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. घटनेने नागरिकांना बहाल केलेल्या मूलभूत हक्कांमध्ये समानतेचा मूलभूत हक्क हा महिलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असा विकासाचा मुलाधार आहे. या मूलभूत हक्काबरोबरच राज्य घटनेमध्ये महिलांकरिता काही विशेष उल्लेखनिय तरतुदींचाही समावेश आहे. राज्य शासनाने घटनेतील तरतुदींनुसार महिलांचा विकास साधण्याचा प्रयत्न अनेक योजनातून अवलंबिला आहे. एवढेच नव्हे तर महिलांच्या विकासाच्या योजना आखत असताना त्यामध्ये महिलांचा सहभाग जास्तीत जास्त कसा राहील या बाबीकडेही कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीनेच किंबहुना काही क्षेत्रात पुरूषांपेक्षा अधिक कार्यक्षमरित्या व सामाजिक जाणिवेतून जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

महिलांबाबत पुरूषप्रधान समाजाचा पारंपारिक दृष्टीकोन दूर व्हावा व त्यायोगे त्यांना त्या समाजाचा महत्त्वाचा घटक असल्याची पुर्नजाणीव व्हावी, त्या पुरोगामी राष्ट्राच्या विकसित नागरिक बनाव्यात, त्यांच्या अंगी असलेल्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन मिळावे इत्यादी बाबींवर भर देऊन केंद्र/राज्य शासनाने महिलांच्या विकासाचे, त्यांच्या बलशालीकरणाचे धोरण स्वीकारले आहे. महिलांना त्यांचे हक्क बहाल करून त्यांचे परिपूर्ण कल्याण व्हावे या पुरोगामी उदात्त दृष्टीकोनातून राज्य शासनाने मंत्रालयीन स्तरावर स्वतंत्र असा महिला व बालविकास विभागही स्थापन केला असून महिलांकरिता शासकीय, निम-शासकीय सेवांमध्ये ३० टक्के आरक्षण ठेवलेले आहे.

निरनिराळ्या क्षेत्रांत महिला प्रकर्षाने पुढे येत असून शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये कनिष्ठ पदापासून ते उच्च पदापर्यंत महिला नोकरी करत आहेत. असे असले तरी पुरूषप्रधान समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला नसल्याने व काही अनिष्ट प्रवृत्तीच्या घटकांमुळे कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक सतावणूक ही प्रगल्भ व सुजाण समाजाच्या दृष्टीने चिंतेची बाब झाली आहे.

या संदर्भात 'कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र.६६६/७०/९२ (विशाखा व इतर विरूद्ध राजस्थान शासन व इतर)' बाबतची पार्श्वभूमी पुढील प्रमाणे आहे.

राजस्थानमध्ये कार्यरत असलेल्या एका सामाजिक कार्यकर्तींवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या भीषण घटनेची दखल घेऊन विशाखा व इतर स्वयंसेवी संघटनांचे कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रात असलेल्या काही महिलांनी सर्वोच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल केली होती. यानिमित्ताने कामाच्या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या लैंगिक

शोषणाकडे, सध्याच्या न्यायप्रक्रियेत याबाबत अस्तिवात असलेल्या कायद्यांमध्ये पुरेशा तरतुदी उपलब्ध नाहीत ही बाब मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणली. या याचिकेची नोटीस केंद्र शासन व राजस्थान शासनाला देण्यात आली होती. सदर याचिका राज्य घटनेतील अनुच्छेद १४, १५, १९, २१ या खाली दाखल करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिकेची दखल अनुच्छेद ३२ खाली घेऊन याप्रकरणी दिनांक १३ ऑगस्ट, १९९७ रोजी निकाल देऊन कायद्याच्या अभावी याबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतची एकूण १२ मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिलेली आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या असे निदर्शनास आले की, सद्या अस्तित्वात असलेल्या दिवाणी व भारतीय दंड संहितेत अशी प्रकरणे हाताळणसाठी पुरेशी तरतूद उपलब्ध नाही व त्यामुळे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण होणाऱ्या महिलांना पुरेसे संरक्षण मिळत नाही. याकरिता आवश्यक कायदे तयार करण्यासाठी बराच कालावधी लागेल यासाठी सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली आहेत. याबाबत जोपर्यत केंद्र शासन आवश्यक असा कायदा पारित करीत नाही तोपर्यंत ही मार्गदर्शक तत्त्वेच कायदा समजून मालकांवर आणि शासनावर बंधनकारक राहतील. सर्व राज्यांनी या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे व केंद्र तसेच राज्य शासनास यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कृती करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत :-

१. कामाच्या ठिकाणी किंवा संस्थेमध्ये लैंगिक छळास प्रतिबंध करण्याची जबाबदारी मालकांची किंवा संस्था प्रमुखाची राहील.

२. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले व्याख्येनुसार मालकाने किंवा संस्थाप्रमुखाने कामाच्या ठिकाणी काम करण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे आणि लैंगिक शोषण अशाप्रकारच्या प्रकरणांना प्रतिबंध घालण्यासाठी कडक उपाययोजना करणे.

३. सर्व खाजगी, सार्वजनिक, शासकीय संस्था प्रमुखांनी अशाप्रकरणी आळा घालण्यासाठी त्यांच्या संस्थेच्या सेवानियमांमध्ये सुधारणा करणे व शिक्षेची तरतूद करणे.

४. शासनाने कायद्यामध्ये तरतूद करणे, दोषी व्यक्तींविरूद्ध कार्यवाही करण्याची व शिक्षा ठोठावण्याची कायद्यात तरतूद करणे.

५. शासकीय संस्थामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांविरूध्द अपिल नियमाखाली शिस्त भंगाची कार्यवाही करण्याची तरतूद आहे.

६. शासकीय कर्मचाऱ्यांविरूद्ध ज्या तक्रारी प्राप्त होतात त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे.

७. पिडीत महिलांच्या तक्रारी नोंदवून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यासाठी तक्रार निवारण समिती स्थापन करणे.

८. कर्मचारी संघटनांना हा प्रश्न उपस्थित करण्याची मूभा देणे आणि कर्मचारी संघटना व व्यवस्थापन यांच्या बैठकीत त्यावर चर्चा करणे.

९. महिला कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्या हक्काच्याबाबत जाणीव जागृती निर्माण करणे.

१०. कार्यालयाबाहेर अशी घटना घडली असल्यास व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यास सर्वतोपरी सहाय्य करणे.

११. केंद्र/राज्य शासनाने यावर नियंत्रण घालण्यासाठी विविध पावले उचलणे आणि कायद्यांमध्ये सुधारणा करणे.

१२. वरील मार्गदर्शक तत्त्वांची सर्व कामाच्या ठिकाणी व सार्वजनिक ठिकाणी अंमलबजावणी करणे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात सर्व राज्य शासनाकडून व केंद्र शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे हे जाणून घेण्यासाठी श्रीमती मेघा कोतवाल व इतर यांनी केंद्र शासन व इतर यांना प्रतिवादी करून रिट विनंती अर्ज क्रमांक १७३-१७९/१९९९ सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी दिलेल्या आदेशात सर्व शासकीय व निम-शासकीय कार्यालयात व इतर संस्थेत 'महिला तक्रार निवारण समिती' गठीत करणे बंधनकारक केले आहे.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र.६६६/७० (विशाखा व इतर विरूद्ध राजस्थान शासन व इतर) मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रस्तुत करण्यात आली असून राज्य स्तरावर राज्य महिला तक्रार निवारण समितीकडून सदर मार्गदर्शक तत्वांच्या आधारे लैंगिक छळवादाबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी करून त्यानुसार करावयाच्या कारवाईची शिफारस समितीकडून संबंधित विभागास करण्याबाबतच्या सुचना राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार लैंगिक सतावणुकींशी संबंधित तक्रारीचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयात एकूण ०५ महिला अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असलेली अशी महिला तक्रार निवारण समिती प्रथमतः दिनांक २८ ऑगस्ट, २००६ रोजी स्थापन करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत समितीचे पुनर्गठन करण्यात येऊन सदर समितीवर एकूण ०८ अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश असलेली महिला तक्रार निवारण समिती दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१ रोजी पासून अस्तित्वात आहे. महिला तक्रार निवारण समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे.

(अ) केंद्र शासनाने प्रसिध्द केलेली मार्गदर्शक तत्त्वे तसेच शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक) नियमात सुधारणा केलेल्या सूचनांना म्हाणजेच लैंगिक सतावणुकीस प्रसिध्दी देणे.

(ब) लैंगिक सतावणुकीच्या तक्रारीची दखल घेणे.

(क) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरिता शिफारस करणे.

(ड) शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

(इ) कार्यालयाला यासंबंधी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

*****

(१०३) सभागृहातील ध्वनिक्षेपण, भाषांतर व मतदान यंत्रणा :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत मार्च २०११ पासून अत्याधुनिक पध्दतीची नवीन ध्वनीक्षेपक, भाषांतर व मतदान डेलिगेट युनिट यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे.

(१) सभागृहांत सदस्यांना बोलण्यासाठी मायक्रोफोनची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(२) सदस्यांना मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेपैकी एका भाषेतून भाषण ऐकण्याची इच्छा असल्यास आपल्या पसंतीच्या एका भाषेत मूळ भाषणांचे स्वैर भाषांतर आपल्या जागेवर असून ऐकण्याची सुविधा आहे.

(३) सभागृहात मतदान करण्यासाठी अत्याधुनिक पध्दतीची यंत्रणादेखील बसविण्यात आलेली आहे.

वरीलपैकी क्रमांक (२) स्वैर भाषांतर यंत्रणा व क्रमांक (३) मतदान यंत्रणा काही अपरिहार्य स्वरूपाच्या व्यवहारिक अडचणीमुळे अद्यापपोवतो अंमलात आलेली नाही हे सदस्यांनी कृपया लक्षात ठेवावे.

(१) महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत मा. पीठासीन अधिकारी यांचेसाठी स्थापित करण्यात आलेल्या नवीन यंत्रणेच्या डेलिगेट युनिटबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1. **Microphone socket –** Connects a DCN-MICL or DCN-MICS Pluggable Microphone to the Concentus delegate unit
2. **Loudspeaker –** Gives the audio signal from the floor to the delegate. When the microphone is enabled, the signal of the loudspeaker is muted.
3. **Microphone LED –** Comes on when the microphone is enabled.
4. **Card Reader –** Can give access to the Concentus delegate unit.
5. **Channel selector –** Selects the channel that is sent to the headphones.
6. **Microphone button –** Enables or disables the microphone. The microphone button has a LED that shows the condition of the microphone.
7. **Voting buttons –** Operate the Concentus delegate unit. Each voting button has a yellow LED. The LED shows the condition of the voting button.
8. **Display –** Shows the menu of the Concentus delegate unit.

विधानसभा आणि परिषद सभागृहाठी बसविलेल्या नवीन ध्वनीक्षेपण यंत्रणेच्या मा. पीठासीन अधिकाऱ्यांसाठीच्या डेलिगेट युनिटची माहीती



(२) महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांत सदस्यांसाठी स्थापित करण्यात आलेल्या नवीन यंत्रणेच्या डेलिगेट युनिट वापराबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(१) माईक्रोफोन सॉकेट : सदर सॉकेटमध्ये काढता येणारा माईक्रोफोन जोडला जातो.

(२) स्पीकर : सदर स्पीकर युनिट मधून सभागृहात बोलणाऱ्या सदस्याचा आवाज ऐकता येतो.

(३) माईक्रोफोन एलईडी इंडीकेटर : माईक्रोफोन चालू झाल्यावर माईक्रोफोन एलईडी इंडीकेटर लागतो.

(४) कार्ड वाचक : सुविधा उपलब्ध केलेली नाही.

(५) भाषांतर निवड : **हेडफोनला जोडणाऱ्या भाषा बटनांद्वारे निवडता येतात.**

(I) प्रथम मा. सदस्याने पुरविलेला हेडफोनचा जॅक भाषांतर यंत्रावरील हेडफोन सॉकेटमध्ये बसविणे.

(II) हेडफोनचा जॅक भाषांतर यंत्रामध्ये पूर्ण बसल्यावर भाषांतर यंत्र कार्यान्वयीत होते (छोट्या एलसीडी डिस्प्ले कार्यान्वयीत होतो)

(III) भाषांतर यंत्रावरील छोट्या एलसीडी डिस्प्लेवर चॅनल क्रमांक दर्शविला जातो-

"0" - सभागृहात बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे सरळ संभाषण

"१" - सभागृहात बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे भाषणाचा मराठी अनुवाद (अनुवादक बसविल्यास)

(IV) मा. सदस्यास पाहीजे असलेली भाषा निवडण्यासाठी भाषांतर चॅनल क्रमांक बटनाचा (वर/खाली) वापर करावा.

(V) हेडफोनचा आवाजाची तीव्रता जास्त/कमी करण्यासाठी हेड फोनच्या जॅक शेजारील बटनाचा (वर/खाली) वापर करावा.

(६) माईक्रोफोन बटन : **(I)** सदर बटनाची उजवी बाजू दाबल्यावर बंद असलेला माईक्रोफोन चालू करता येतो. माईक्रोफोन चालू झाल्यावर बटनाभोवती लाल रंगाचा एलईडी लागतो. **(II)** सदर बटनाची उजवी बाजू पुन्हा दाबल्यावर चालू असलेला माईक्रोफोन बंद करता येतो. माईक्रोफोन बंद झाल्यावर बटनाभोवताली रंगाचा एलईडी बंद होतो.

(III) सदर बटनाची डावी बाजू (Priority switch) दाबल्यावर सभागृहातील चालू असलेले सर्व माईक्रोफोन बंद करता येतात व माईक्रोफोन बंद झाल्यावर त्यांचा माईक/बटनाभोवतालचा लाल रंगाचा एलईडी बंद होतो.

माईक्रोफोन व बटन दाबल्यावर बंद असलेला माईक्रोफोन चालू करता येतो व पुन्हा दाबल्यावर चालू असलेला माईक्रोफोन बंद करता येतो:-

(I) बोलण्यासाठी माईक्रोफोनचे बटन दाबावे.

(II) माईक्रोफोन चालू करण्याची विनंतीची नोंद मा.पीठासीन अधिकारी यांचेपर्यंत पोहोचल्यावर बटन व माईक भोवताली हिरव्या रंगाचा एलईडी लागतो.

(III) माईक्रोफोन बटन पुन्हा दाबल्यावर सन्माननीय सदस्यांनी नोंदविलेली विनंती रद्द करता येते. विनंती रद्द झाल्यावर बटन व माईक भोवताली चालू असलेला हिरव्या रंगाची एलईडी बंद होतो अथवा

(IV) माईक्रोफोनचा हिरव्या रंगाची एलईडी फ्लॅश झाल्यावर बोलण्यासाठी सज्ज राहण्याचे सूचवितो.

(V) माईक्रोफोन चालू झाल्यावर बटन व माईक भोवताली लाल रंगाची एलईडी लागतो.

(VI) तद्नंतर लगेचच सन्माननीय सदस्याचे माईक भोवताली लाल रंगाची एलईडी सुरू असेपर्यंत बोलण्यास सुरवात करावी.

(VII) माईक्रोफोन बटन पुन्हा दाबल्यावर चालू असलेला माईक्रोफोन बंद करता येतो.

(VIII) माईक्रोफोन बंद झाल्यावर बटनाभोवताली लाल रंगाचा एलईडी बंद होतो.

(७) मतदान यंत्र : मतदान करण्यासाठी मा. पीठासीन अधिकाऱ्यांसाठी असलेले कंसेण्टस डेलिगेट युनीट वर पिवळ्या रंगाचा एलईडी मतदानासाठीच्या बटनाची सद्यस्थिती दर्शवितो.

(I) मा. पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांच्या मतदान यंत्राच्या सर्वात डावीकडील क्रमांक १ चे बटन

दाबल्यावर मतदान यंत्र कार्यान्वीत होते.

(II) मा. पीठासीन अधिकारी व सर्व मा. सदस्यांच्या मतदान यंत्रावरील क्रमांक १ चे शेजारील पिवळ्या रंगाचा एलईडी लागतो.

(III) मा. पीठासीन अधिकारी व सर्व मा. सदस्यांनी आपली "उपस्थिती" नोंदविण्यासाठी मतदान यंत्रावरील क्रमांक १ दाबावे.

(IV) मतदान करण्यासाठी खालीलप्रमाणे पर्याय उपलब्ध आहेत.

(V) उपस्थिती नोंदविल्यावर इतर बटन क्र. २, ३ व ४ शेजारील पिवळ्या रंगाचा एलईडी फ्लॅश होऊ लागतात.

(VI) बटन क्र. २ "होय"

(VII) बटन क्र. ३ "तटस्थ"

(VIII) बटन क्र. ४ "नाही"

(IX) मा.सदस्यांना उपरोक्त तीन पर्यायांपैकी त्यांना आवडलेला योग्य पर्याय बटन दाबून मतदान करू शकतात.

(X) मतदानाचा कालावधी संपेपर्यंत आपले मा. सदस्य त्यांचे मत सुधारून योग्य पर्यायाची निवड करू शकतात व मतदान त्या पर्यायाशेजारील पिवळ्या रंगाचा एलईडी लागेल.

(XI) बटन क्र.५ "थांबविणे" मतदानाचा कालावधी संपविण्यासाठी फक्त मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध आहे.

(XII) मतदानाचा कालावधी संपल्यावर मतदानाचा निकाल सभागृहात दोन्ही बाजूस बसविण्यात येणाऱ्या एलईडी डिस्प्ले फलकावर पाहावयास मिळु शकतात तसेच ६५" आकाराचा एलसीडी टीव्हीवर पाहता येऊ शकतात.

(८) एलसीडी डिस्प्ले : सदर स्क्रीनवर कंसेण्टस डेलिगेट युनीटचा मेन्यु दिसतो.

(९) आवाज नियंत्रित बटन : कंसेण्टस डेलिगेट युनीटच्या दोन्ही बाजूस हेडफोन जॅकच्या शेजारी एक आवाजाची तीव्रता नियंत्रित करण्यासाठी बटन आहे.

विधानसभा आणि परिषद सभागृसाठी बसविलेल्या नवीन ध्वनीक्षेपण यंत्रणेच्या मा. सन्माननीय सदस्यांकरिता असलेल्या अधिकाऱ्यांसाठीच्या डेलिगेट युनिटची माहीती



(१०४) ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक कक्ष (Mic Oprator cum Mechanic) **:-**

पार्श्वभूमी :-

विधान भवन, मुंबई तसेच नागपूर येथील महाराष्ट्र विधिमंडळाची महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा ही दोन्ही सभागृहे, विधान भवन, मुंबई येथील मध्यवर्ती सभागृह तसेच, दोन्ही ठिकाणी असलेल्या विविध समित्यांच्या दालनात अत्याधुनिक ध्वनिक्षेपक यंत्रणा स्थापित करण्यात आलेली आहे. यापुर्वी या ध्वनिक्षेपक यंत्रणेची देखभाल, दुरूस्ती, कार्यान्वयन व अन्य स्वरूपाचे सर्व कामकाज विशेष बाब म्हणून या सचिवालयातील स्वतंत्र कार्यालय असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागातील रोजंदारी/कार्यव्ययी आस्थापनेवरून नंतर रूपांतरीत आस्थापनेवर नियमित झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेद्वारे करण्यात येत होते. सदर कर्मचारी या सचिवालयाच्या आस्थापनेवर कार्यरत नसल्यामुळे त्यांचे वेतन/भत्ते इत्यादी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अदा करण्यात येत होते.

सदर कामकाजासाठी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागातील नियुक्त करण्यात आलेल्या ध्वनीयंत्रणाचालकांच्या पदांवरील कार्यरत असलेले कर्मचारी नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यानंतर पदे आपोआप व्यपगत होणे, अपुरा कर्मचारीवर्ग, विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत मुंबई/नागपूर येथील दोन्ही सभागृहांतील सदर अद्ययावत तांत्रिक यंत्रणा पूर्ण क्षमतेने व अत्यंत जबाबदारीने तसेच विश्वासार्हतेने आणि सुरक्षिततेने सांभाळणे/नियंत्रित करणे अत्यावश्यक असणे, विधिमंडळाच्या समित्यांच्या एकंदरीतच संख्येत झालेल्या वाढीमुळे या सचिवालयात वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या समित्यांच्या बैठकांतील कामकाजातील कालानुरूप झालेली वाढ व बदल, मा.पीठासीन अधिकारी यांचेकडे वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या महत्वाच्या विषयांवरील बैठका तसेच अन्य तांत्रिक व प्रशासकीय

बाबी लक्षात घेता उपरोक्त प्रयोजनार्थ, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या संपूर्ण प्रभुत्वसंपन्त्र प्राधिकारी *(Sovereign Authority)* मा. मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या सचिवालयात 'ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक' कक्ष निर्माण करण्यात आला. तसेच यासाठी या सचिवालयातील आस्थापनेवर जून, २०१० मध्ये एकूण १५ 'ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक' पदांची निर्मिती करण्यात आली. या पदावरील संबंधित कर्मचारी यांची कायमस्वरूपी नियुक्ती माहे नोव्हेंबर, २०१४ पासून करण्यात आली आहे.

विधान भवन, मुंबई तसेच नागपूर येथील महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानसभा व विधापरिषद सभागृहांत, विधान भवन, मुंबई येथील मध्यवर्ती सभागृहात तसेच, दोन्ही ठिकाणी असलेल्या विविध समित्यांच्या दालनात अत्याधुनिक ध्वनिक्षेपक यंत्रणा अस्तित्वात आहे. या ध्वनिक्षेपक यंत्रणेची देखभाल, दुरूस्ती, कार्यान्वयन, सर्व व्यवस्था सुस्थितीत ठेवणे व इतर तदनुषंगिक तांत्रिक स्वरूपाचे सर्व कामकाज यासाठी 'ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक' पदांची निर्मिती करण्यात आली आहे.

'ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक' यांचेकडे सोपविण्यात आलेल्या कामकाजाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :-

या सचिवालयातील ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिक या पदावरील कर्मचारी यांचे कामकाज विधान भवन, मुंबई तसेच नागपूर येथील महाराष्ट्र विधिमंडळाची महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा ही दोन्ही सभागृहे, विधान भवन मुंबई येथील मध्यवर्ती सभागृह तसेच, दोन्ही ठिकाणी असलेल्या विविध समित्यांच्या दालनात स्थापित करण्यात आलेल्या ध्वनीक्षेपक यंत्रणेसंबंधी आहेत.

(१) विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागृहात तसेच मा.राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या वेळी याचबरोबर आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य कार्यक्रमाचे वेळी मध्यवर्ती सभागृहात ध्वनीक्षेपक यंत्रणा, सभागृहांतील कॅमेरा व्यवस्था तसेच ध्वनीचित्रमुद्रण व्यवस्था यांचे कार्यान्वयन/नियंत्रण करणे.

(२) विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागहांतील मा.सदस्यांकडून ध्वनीक्षेपण यंत्रणेसंबंधी प्राप्त होणाऱ्या तक्रारी/सूचना यांची दखल घेऊन त्वरीत कार्यवाही करण्याची व्यवस्था करणे.

(३) या सचिवालयातील अधिकारी व सभागृहांशी संबंधित कक्षांना थेट प्रक्षेपण/टू चॅनल ऑडियो उपलब्ध करून देणे.

(४) विधान भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या बैठकीचेवेळी ध्वनीक्षेपक यंत्रणेचे कार्यान्वयन/नियंत्रण करणे.

(५) विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत दोन्ही सभागृहांतील कामकाजाचे थेट प्रक्षेपण संदर्भात विधान भवन येथील मा.पीठासीन अधिकारी/मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/राज्यमंत्री/दोन्ही मा.विरोधी पक्ष नेते यांचे दालनात व सर्व पक्ष कार्यालयांत थेट प्रक्षेपण/टू चॅनल ऑडियोची तपासणी करून यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची व्यवस्था करणे तसेच या संदर्भातील टी.व्ही.ट्युनर कार्ड कार्यान्वीत करून सुस्थितीत ठेवणे.

(६) विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत मा.पीठासीन अधिकारी/मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/राज्यमंत्री/दोन्ही मा. विरोधी पक्ष नेते व अन्य महनीय व्यक्ती यांचे विधान भवन इमारतीच्या बाहेरील आवारात असलेल्या वाहनांना मुख्य प्रवेशद्वाराजवळ बोलविण्यासाठी कार कॉलिंग यंत्रणेचे कार्यान्वयन/नियंत्रण करणे.

(७) विधान भवनातील वार्ताहर दालनातील ध्वनीक्षेपक यंत्रणेचे कार्यान्वयन/नियंत्रण करणे.

(८) विधान भवन, मुंबई येथे प्रजासत्ताक दिन दिनांक २६ जानेवारी, स्वातंत्र्य दिन दिनांक १५ ऑगस्ट व महाराष्ट्र राज्य स्थापना दिन दिनांक ०१ मे निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या दिवशी राष्ट्रगीत वाजविणे तसेच त्यावेळी मा.पीठासीन अधिकारी यांनी करावयाच्या भाषणासंदर्भात ध्वनीक्षेपण यंत्रणा इ. व्यवस्था करणे.

(९) मध्यवर्ती सभागृहामध्ये वेळोवळी आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम/चर्चासत्रे/परिसंवाद/ बैठकांचेवेळी तसेच विधान भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या बैठकीचेवेळी आवश्यकतेनुसार लॅपटॉपव्दारे प्रोजेक्टरच्या सहाय्याने चित्रफीत अथवा स्लाईडस् संदर्भातील सादरीकरण (Power Point Presentation) व ध्वनीक्षेपक यंत्रणेचे कार्यान्वयन/नियंत्रण करणे.

(१०) सध्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विधान भवन येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विधिमंडळाच्या काही समित्यांच्या बैठकी आवश्यकतेनुसार दूरदृष्य प्रणालीव्दारे (Video Conferencing) आयोजित करण्यात येतात. दूरदृष्य प्रणालीव्दारे आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकींसाठी Weblink/ Dial Code राष्ट्रीय सूचना केंद्र (NIC - National Informatics Centre) यांचे समवेत संपर्क साधून ई-मेलव्दारे प्राप्त करून संबंधित समिती कक्षास उपलब्ध करून देणे तसेच समित्यांच्या दूरदृष्य प्रणालीव्दारे होणाऱ्या बैठकीचेवेळी ध्वनीक्षेपक यंत्रणेचे कार्यान्वयन/ नियंत्रण करणे.

(११) या सचिवालयात वेळोवेळी आयोजित करण्यात येणारे विविध कार्यक्रम/चर्चासत्र/परिसंवाद/शासकीय सत्कार समारंभ/जयंती व पुण्यतिथी इ. बाबतची परिपत्रके व विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या बैठकीचे वेळापत्रक तळ मजल्यावरील डिसप्ले बोर्डवर दर्शविणेबाबतची व्यवस्था इत्यादी.

*****

प्रकरण पंधरावे

(१०५) सुरक्षा व्यवस्था (Security System) :-

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे विधानभवन, मुंबई व नागपूर या ठिकाणी अस्तित्वात असून त्या ठिकाणी रात्रंदिन सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्र विधिमंडळाची अर्थसंकल्पीय, पावसाळी व हिवाळी अशी एकुण तीन अधिवेशने येथे होतात. (कधीकधी चार अधिवेशने सुद्धा होतात.) सदर अधिवेशनामध्ये संसदीय लोकशाहीच्या परंपरेप्रमाणे महत्वाचे ठराव, महत्वाच्या विधिनियमांची कायद्यामध्ये रूपांतर होण्यापूर्वीची चर्चा होत असते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या विधानसभा/विधानपरिषदेवर निवडून आलेले मा.सदस्य या चर्चेमध्ये भाग घेत असतात. त्यामुळे महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीमध्ये विधानभवनाच्या परिसरात सर्व महत्वाच्या व्यक्तींची ये-जा/वावर सुरू असतो व त्यांचा अधिक कालावधी विधानभवन परिसरात व्यतीत होतो. एकाच वेळी एकाच ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व लोकप्रतीनिधी व शासनाचे वरिष्ठ अधिकारी विधिमंडळाच्या कामकाजानिमित्त एकत्र जमत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याला अनन्यसाधारण महत्व येते. विधानभवनाच्या बाहेर बंदोबस्ताची जबाबदारी स्थानिक पोलीसांवर सोपविण्यात आलेली असते. तथापी, अंतर्गत सुरक्षा व्यवस्था ही विधानभवन सुरक्षा कक्षाकडे सोपविण्यात आलेली आहे. विधानभवन ही इमारत सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने सदर इमारतीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी सुरक्षा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये मुख्य सुरक्षा अधिकारी हे पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त दर्जाचे असून उप मुख्य सुरक्षा अधिकारी हे पोलीस उप अधीक्षक/सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाचे आहेत व त्यांच्या मदतीसाठी वरिष्ठ सुरक्षा अधिकारी हे बृहन्मुंबई पोलीस दलातील पोलीस निरीक्षक दर्जाचे व सुरक्षा अधिकारी हे सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक, व सुरक्षा सहाय्यक हे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक/पोलीस हवालदार/पोलीस नाईक/पोलीस शिपाई दर्जाचे असून प्रतिनियुक्तीवर विधानमंडळाच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत. महाराष्ट्र विधिमंडळाचे मा.पीठासीन अधिकारी मा.सभापती व मा.अध्यक्ष यांचे सोबत अधिवेशनाचेवेळी नेमण्यात आलेले मार्शल हे पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत. मुंबई शहर हे महाराष्ट्राच्या राजधानीचे व देशाच्या आर्थिक राजधानीचे शहर मानले जाते. या ठिकाणी घडणाऱ्या प्रत्येक बाबींवर लक्ष ठेऊन देशद्रोही, अतिरेकी, विविध दहशतवादी संघटना घातपात करण्याच्या दृष्टीने नेहमी प्रयत्न करीत असतात म्हणून सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा कक्षाला विशेष खबरदारी घ्यावी लागते.

विधानभवन परिसरातील सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी महत्वाच्या ठिकाणांची निवड करून त्या ठिकाणी निगराणीसाठी पहारे तैनात करण्यात आलेले आहेत. विधानभवन परिसरात आगमन व निर्गमन होत असलेल्या पुढील व मागील प्रवेशद्वारावर अत्यंत कडक तपासणीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये कामकाज सुरू असताना मा. सदस्यांकडुन गैरवर्तन घडल्यास मा. सभापती किंवा मा. अध्यक्षांच्या आज्ञेनुसार सुरक्षा अधिकाऱ्यांना (मार्शल) व सुरक्षा कर्मचाऱ्यांना त्यांच्यावर कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणुन सभागृहांमध्ये देखील प्रवेशद्वारावर सुरक्षा कवच निर्माण करण्यात आले आहे.

विधानभवनाच्या परिसरामध्ये स्थित असलेली इतर कार्यालये व इमारतीची महत्वाची ठिकाणे व प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा व्यवस्था असुन त्यामध्ये सुरक्षा विभाग तसेच बाहेरून प्राप्त मनुष्यबळातून महिला व पुरूष सुरक्षा सहाय्यकांची

नेमणूक करण्यात आलेली असते. विधिमंडळाचे मा.सदस्य यांचा योग्य तो मान व आदर राखुन कर्तव्य करण्याच्या सुचना सुरक्षा कर्मचाऱ्यांना दिलेल्या असल्या तरीही विधिमंडळ सचिवालयाने घालुन दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करीत असताना सदस्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांस सहकार्य करावे अशी अपेक्षा आहे.

सुरक्षा व्यवस्थेसंबंधी विधानभवनामध्ये येणाऱ्या सर्व मा.सदस्य, अधिकारी/कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी खालील नियम केले असुन त्यांची अंमलबजावणी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा कर्मचारी करीत असतात व त्यांना सहकार्य व्हावे म्हणुन खालील नियमांची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहेः-

(१) विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून फक्त मा.पीठासीन अधिकारी/मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/ दोन्ही सभागृहांचे मा. विरोधी पक्ष नेते/राज्यमंत्री/दोन्ही सभागृहांचे मा.सदस्य/विधिमंडळाचे व मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी व वृत्तपत्र तसेच खाजगी दूरचित्रवाहिन्यांचे प्रधिनिधी यांना प्रवेश देण्यात येईल. त्यांच्या समवेत असणाऱ्या अन्य प्रवेशपत्रिका धारकांना विधानभवनाच्या मागील प्रवेशद्वाराने प्रवेश दिला जाईल.

(२) सुरक्षा तपासणी ही मा. सदस्यांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने केल्या जाणाऱ्या तपासणीच्या संदर्भात सुरक्षा कर्मचाऱ्यांना सहकार्य करणे गरजेचे आहे.

(३) विधानभवन परिसरात प्रवेश करताना मा. सदस्यांनी त्यांना विधानसभा/विधानपरिषद सदस्य असल्याबद्दल दिलेला बिल्ला सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

(४) सुरक्षा अधिकारी/सुरक्षा सहाय्यक यांनी ओळखपत्रांची मागणी केल्यास ओळखपत्र दाखविण्याची दक्षता घ्यावी.

(५) मा. सदस्यांनी स्वतः सोबत इतर व्यक्तींना प्रवेशपत्रिका नसल्यास विधानभवन परिसरात त्यांना घेऊन येऊ नये व प्रवेशपत्रिकेशिवाय संबंधित व्यक्तीला विधानभवनात प्रवेश देण्यासाठी प्रवेशद्वारावरील सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे आग्रह धरू नये.

(६) मा. सदस्यांनी विधानसभा/विधानपरिषदेमध्ये प्रेक्षक गॅलरी प्रवेशाकरीता परिचय नसलेल्या व्यक्तींची शिफारस करू नये.

(७) विधान भवन इमारतीच्या आवारात कोणत्याही मान्यवरांना/अभ्यागतांना शासकीय वा अशासकीय वाहनाने प्रवेश करता येणार नाही.

(८) मा. सदस्यांनी आपले वाहन त्यांना नेमून दिलेल्या पार्किंगच्या ठिकाणीच पार्क करावे. आपले वाहन नेमून दिलेल्या जागेव्यतिरीक्त इतरत्र पार्क करू नये.

(९) मा. सदस्यांनी त्यांच्या वाहन चालकांना वाहनाजवळ थांबण्यास सांगावे व कोणतीही संशयित वस्तू वाहनामध्ये ठेवली जाणर नाही यादृष्टीने सतर्क राहण्यास सांगावे. मा.सदस्य वाहनामध्ये बसण्यापुर्वी वाहन चालक अथवा अंगरक्षकाने पुन्हा वाहनाची तपासणी करून सुरक्षेची खात्री करावी.

(१०) मा.सदस्य तसेच त्यांचे अंगरक्षकांनी अग्निशस्त्र किंवा शस्त्र म्हणून वापर होऊ शकेल अशी कोणतीही वस्तू (उदा. लाठी, काठी, धातूचे रॉड अगर धारदार वस्तू इ.) घेऊन विधान भवनमध्ये प्रवेश करू नये.

(११) मा. सदस्य तसेच विधान भवनमध्ये प्रवेश कराणाऱ्या सर्व व्यक्तींस कोणत्याही व्यक्तीरेखेची वेशभूषा किंवा इतर कोणत्याही प्रकारची वेशभूषा करून विधानभवनामध्ये प्रवेश करण्यास मनाई आहे.

(१२) विधानभवनातील कामकाज निर्भयतेने होण्यासाठी सर्वांची सुरक्षा ही महत्वाची बाब मानुन सर्व मा. सदस्यांनी सुरक्षा व्यवस्थेत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना सहकार्य करावे. तसेच विधानभवनामध्ये प्रवेश करणाऱ्या सर्वांशी कसे वागावे याबद्दल सुरक्षा कर्मचारी यांना शिष्टाचाराचे तसेच आणिबाणीचे प्रसंगी कसे वागावे यासंबंधीचे नियम अवगत करून देण्यात आलेले आहेत.

(१३) महाराष्ट्र विधिमंडळाचे मा. पीठासीन अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानुसार विधानसभा/विधानपरिषद सभागृहांच्या लॉबीमध्ये सदस्यांव्यतीरिक्त अन्य व्यक्तीस प्रवेश दिला जाणार नाही. याबाबत मा.सदस्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.

(१४) अधिवेशन कालावधीत मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी विभागीय अधिकारी यांना ब्रिफिंगसाठी विधानभवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात बोलवावे.

(१५) मा.मंत्री/राज्यमंत्री यांनी अधिवेशन कालावधीत विधान भवनातील त्यांच्या दालनात कोणतीही बैठक आयोजित करू नये.

(१६) विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी कोणत्याही प्रकारच्या शिष्टमंडळांना भेटीसाठी विधानभवनातील त्यांच्या दालनात न बोलाविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात त्यांची भेट घ्यावी.

(१७) सत्तारूढ अथवा विरोधी पक्षातील मा. सदस्यांना सभागृहात चर्चा झालेल्या संवेदनशील विषय अथवा अन्य विषयांवर आपल्या पक्षाची बाजू स्पष्ट करण्यासाठी प्रसारमाध्यमांना मुलाखत द्यावयाची असेल अशा वेळी प्रसारमाध्यमे व पत्रकारांनी मा.सभापती/मा.अध्यक्ष यांच्या निदेशानुसार निश्चित केलेल्या ठिकाणीच जर मुलाखत दिली तर मा.पीठासीन अधिकारी, मंत्री/राज्यमंत्री/सदस्य/ कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी/अभ्यागत यांना आगमन/ निर्गमनामध्ये अडथळा/अडचण निर्माण होणार नाही.

(१८) विधिमंडळाच्या सत्र/नि:सत्र कालावधीत पत्रकार यांनी नेमून दिलल्या ठिकाणाहून वृत्तांकन करावे. पूर्वपरवानगीशिवाय पत्रकारांना कॅमेरा घेवून विधानभवन इमारतीमध्ये प्रवेश करण्यास मनाई आहे. तसेच मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय विधानभवनामध्ये वृत्तांकन करता येणार नाही. विधानभवनाच्या आतील परिसरामध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या मा. सदस्यांशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीची मुलाखत घेता येणार नाही. अधिवेशन कालावधीत तसेच इतरवेळी वेब पोर्टलचे रिपोर्टर/ऑनलाईन पेज चे रिपोर्टर यांना पत्रकार गॅलरीमधून फोटोग्राफी/व्हिडीओ रेकॉर्डींग करता येणार नाही.

(१९) विधिमंडळाच्या सत्र कालावधीमध्ये विधानभवन इमारतीमध्ये कोणत्याही गणवेशधारी सेवेमध्ये असणाऱ्या (पोलीस/संरक्षण दल/निमलष्करी दल यांसारख्या कोणत्याही गणवेश असणाऱ्या) अधिकारी/कर्मचारी यांना गणवेश परिधान करून प्रवेश करता येणार नाही.

(२०) विधिमंडळाच्या मा. सदस्यांचे स्वीय सहाय्यक वगळून इतरांना सहा महिने/एक वर्ष कालावधीसाठी विधानभवन इमारतीत प्रवेशकरीता देण्यात आलेले प्रवेशपत्रिका सत्र कालावधीमध्ये ग्राह्य राहणार नाहीत.

(२१) मा. मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री यांना भेटावयास येणाऱ्या शिष्टमंडळाला परवानगी मिळाल्यास फक्त पाच व्यक्तींना मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री यांना विधान भवनातील दालनात भेटता येईल. इतर अभ्यागतांना विधान भवनात प्रवेश दिला जाणार नाही.

(२२) सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोणीही अग्निशस्त्र/शस्त्र तसेच शस्त्र म्हणून वापर होऊ शकेल अशी कोणतीही वस्तू (उदा. लाठी, काठी, कोणतीही धारदार वस्तू इ.) घेऊन विधानभवनामध्ये प्रवेश करू नये.

(२३) निःसत्र कालावधीत अभ्यागतांना किंवा मा.सदस्यांसोबत असलेल्या व्यक्तींना दुपारी २-०० पूर्वी विधान भवनात प्रवेश दिला जाणार नाही. विधान भवनात भेटण्याची वेळ दुपारी २-०० ते संध्याकाळी ५-०० पर्यंत राहील. सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर अभ्यागतांची योग्य ती चौकशी व तपासणी करून फक्त फोटो प्रवेशपास घेऊन अथवा विधानभवनाचे पत्र असल्यास त्यांचे ओळखपत्र तपासूनच प्रवेश दिला जाईल. अभ्यागतांना ओळखपत्र नसल्यास विधानभवनामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

(२४) प्रेक्षक गॅलरी/विद्यार्थी गॅलरी/अधिकारी गॅलरीमध्ये मोबाईल, चप्पल, पेपर/छत्री/काठी तसेच इतर कोणतेही साहित्य घेऊन जाण्यास मनाई आहे.

(२५) अधिवेशन कालावधीत सभागृहाचे कामकाज सुरू असताना विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सर्व गॅलरीमध्ये बसणाऱ्या व्यक्तींनी मोबाईल वापरण्यास मनाई आहे तसेच त्यांनी योग्य ते संकेत पाळावेत. (सदर व्यक्तींनी पायावर पाय ठेवून बसू नये/ आपआपसात बोलू नये.)

(२६) निःसत्र कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी मुंबई विधानभवन इमारतीचे मागील प्रवेशद्वार सकाळी ०८-०० ते १९-०० वाजे पर्यंत आणि पुढील प्रवेशद्वार हे सकाळी ०६-०० ते २३-०० वाजे पर्यंत (आपत्कालीन परिस्थिती वगळून) खुले राहील. सार्वजनिक सुट्टी दिवशी मागील प्रवेशद्वार बंद राहील, तसेच पुढील प्रवेशद्वार हे सकाळी ०८-०० ते २३-०० वाजे पर्यंत खुले राहील. सत्र कालावधीत सभागृहाचे कामकाज सुरू असेपर्यंत विहीत वेळेनंतरही विधानभवन इमारतीचे मागील व पुढील प्रवेशद्वारे खुले राहतील.

(२७) विधानभवन मुख्य प्रवेशद्वार पोर्च येथील पायऱ्यांवर मा. पीठासीन अधिकारी, मा.मंत्री/राज्यमंत्री, मा. सदस्य याचेशिवाय कोणालाही छायाचित्रे काढता येणार नाही.

(२८) विधानभवनात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींजवळ असलेली हँडबॅग, पिशवी व इतर जड साहित्य प्रवेशव्दारा जवळ क्ष-किरण यंत्राव्दारे अथवा अन्य पध्दतीनुसार तपासणी पथकाकडून तपासून घ्यावे.

(२९) विधान भवन इमारत व परिसराच्या सुरक्षिततेसाठी सर्व ठिकाणची टेहळणी करण्यासाठी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

(३०) सुरक्षेच्या दृष्टीने विधानभवन इमारत आतील परिसरात कोणत्याही प्रकारची फोटोग्राफी किंवा छायाचित्रण करण्यास मनाई आहे.

(३१) विधानसभा सभागृह व विधानपरिषद सभागृह लॉबीमध्ये त्याचप्रमाणे इमारत परिसरात धूम्रपान तसेच पान-तंबाखू खाऊन थुंकण्यास सक्त मनाई असल्याने सदर वस्तू घेऊन विधानभवनामध्ये प्रवेश करता येणार नाही.

*****

(१०६) अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting System) :-

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन ही शासकीय प्रतिष्ठीत भव्य व उंच इमारत नरीमन पॉइन्ट परिसरात नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे बांधिल असून या इमारतीचे बांधकाम मे, १९७४ मध्ये सुरू होऊन एप्रिल, १९८१ मध्ये कार्यालयीन कामकाजासाठी सुरू झाले. या इमारतीची तीन भागात रचना असून ७९ मीटर उंचीची २० मजली कार्यालयीन उंच इमारत, ५० मीटर उंचीची सभागृहांची ५ मजली गोलाकार इमारत तसेच इमारतीचा तळघराचा विस्तीर्ण परिसर आहे. या व्यतिरिक्त इमारतीच्या सभोवतालचा भव्य बाग परिसराचा भाग असून इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर २ मोठे लोखंडी गेट व पाठीमागील भागात एक मोठे लोखंडीगेट व मा. सदस्यांकरिता वातानूकुलीत उपहारगृहांची व्यवस्था आहे.

अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने या इमारतीमध्ये फायर प्रोटेक्शन (FIRE PROTECTION), फायर डिटेक्शन (FIRE DETECTION) व फायर एक्स्टिंग्शन (FIRE EXTINGTION) च्या यंत्रणा देण्यात येऊन इमारतीच्या तळमजला रूम नं. (०२८अ) येथे अग्निशमन नियंत्रण कक्ष स्थापित आहे. अग्निशमन विभागामार्फत अग्निसुरक्षा राखण्याकरिता २४ तासांच्या तीनही पाळ्यांमध्ये रात्रं-दिवस या सचिवालयाचा अग्निशमन दल, समादेशक अग्निशमन अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली (१४) व्यक्तींचा अधिकारी, कर्मचारी वर्ग कार्यरत आहे.

अग्निशमन नियंत्रण कक्षात अग्निसुरक्षे अंतर्गत सर्व सोयी-सुविधा उपलब्ध असून संपूर्ण इमारतीमध्ये स्थायी स्वरूपाची यंत्रणा (FIXED FIRE FIGHTING INSTALLATION) बसविण्यात आले आहे. या इमारतीचे वादळ, चक्रीवादळ, वीज, इ., नैसर्गिक आपतींपासून संरक्षण व्हावे म्हणून उंच इमारतीच्या मागे व पुढील सज्जा परिसरात षट्कोनी आकाराच्या (HEXAGONAL) आर.सी. सी. (RCC) जाळ्या इमारतीच्या बांधकामात देण्यात आल्या आहेत, तर इमारतीच्या टेरेस व अर्थिंगचीही व्यवस्था आहे. उंच इमारतीसाठी चार, पैकी दोन तळघरापर्यंत जाण्या-येण्यासाठी उद्‌वाहने असून, टेरेसवर लिफ्ट मशिनरूम आहे व तीन सुरक्षित व संरक्षित जीना मार्गही देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे डोम या गोल इमारतीत सभागृहांची व्यवस्था असून चार उद्‌वाहनांसह कॅटवॉकचा भाग आहे. मध्यवर्ती सभागृहांची कॅटवॉकच्या भागात उद्‌वाहने, मशिनरूमही देण्यात आले आहेत व दोन सुरक्षित जीना मार्गांची सुविधा आहे. उंच इमारतीच्या पाठीमागील भागात ११ KVA चे तीन ट्रान्सफॉर्मर युनिट व मुख्य प्रवेशद्वारासमोर हाय व लो प्रेशरचे फायर ब्रिगेड इनलेटची व्यवस्था आहे.

इमारतीचा तळघर परिसर हा विस्तिर्ण परिसर असून या परिसरात सा.बां. स्थापत्य विद्युत, ग-शाखा, गोडावून, सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट रूम, उपहारागृह गोडावून, जनरेटर कक्ष B.E.S.T. कंट्रोल रूम, विद्युत डिस्ट्रीब्युशन पॅनल्स, अग्निशमन पंपरूम ५५,००० गॅलन क्षमतेची फायर वॉटर टँक/ सिव्हील वॉटर टँक व पंपरूम, प्रेशराईच्या जीना मार्ग, ए.एच.यु युनिट्स व रॅम्पसह विस्तृत कार पार्किंग परिसर इ., भाग आहेत. या सर्व भागांचे आगीपासून संरक्षण व सुरक्षितता राखण्याकरिता विविध यंत्रणा आहेत व त्यांचे नियंत्रण अग्निशमन विभागाकडून केले जाते.

या इमारतीमध्ये अग्निसुरक्षा व्यवस्थे अंतर्गत पुढील व्यवस्था करण्यात आल्या आहेत :—

(१) अत्याधुनिक संगणकीकृत अग्निसूचक यंत्रणा.

(२) मध्यवर्ती वातानूकुलीत यंत्रणेकरीताची डॅम्पर (DAMPER) यंत्रणा.

(३) धोक्याची सूचना वा माहिती प्रसारीत करण्यासाठी तसेच संवाद साधण्यासाठी ध्वनीक्षेपण यंत्रणा (TWO WAY COMMUNICATION SYSTEM) प्रस्तावित आहे.

(४) उद्‌वाहन विमोचन कार्यासाठी (उद्‌वाहन) इंटरफोन, बजर अलार्म आणि मॉनिटर व्यवस्था.

(५) अतिरिक्त मदतीकरिता, नरीमन पॉईन्ट अग्निशमन केंद्राशी थेट संपर्क साधण्याकरीताची हॉट लाईन व्यवस्था.

(६) अंतर्गत वॉकी-टॉकी थेट वायरलेस सुविधा.

(७) पाण्याने आग विझवण्यासाठी "वेट रायझर" ची हैड्रन्ट व्यवस्था (६९ हैड्रन्ट पॉइन्ट)

(८) तळघरातील अग्निसुरक्षिततेकरिता स्वयंचलित स्प्रिंकलर यंत्रणा.

(९) अग्निशमन पंपरूम

१. अग्निशमन पंप ०१ नग (१२५ HP)

२. स्प्रिंकलर पंप ०१ नग (७५ HP)

३. डिझेल पंप ०१ नग (१३२ HP)

४. बुस्टर पंप ०२ नग (२० HP) (गच्चीवर)

५. जॉकी पंप ०२ नग (२० HP)

(१०) इमारतीमध्ये बसविण्यात आलेल विविध रासायनिक पोर्टेबल फायर एस्टिंग्युशर्स.

(११) तळघरात लोखंडी अग्निरोधक दरवाजे.

(१२) संपूर्ण इमारतीत बसविलेले वूडन स्मोक / फायर डोअर्स.

(१३) अग्निशमन पाण्याची टाकी क्षमता २,४०,००० लिटर.

(१४) स्प्रिंकलर यंत्रणेची ओव्हरहेड टँक क्षमता- २२,००० लिटर.

(१५) फायर लिफ्ट - ३.

(१६) २ जनरेटर क्षमता २५० KVA.□

(१७) विविध प्रकारच्या ब्रँचेस.

(१८) सभागृहातील बीम डिटेक्टर्स.

(१९) सा.बां. (विद्युत) विभागामार्फत अग्निसूचक नियंत्रण कक्ष सध्य:स्थितीत चालविण्यात येत आहे.

याच नियंत्रण कक्षात संवाद साधण्यासाठी ध्वनीक्षेपण यंत्रणा कार्यान्वित आहे.

या व्यतिरिक्त या इमारतीत काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना आपत्कालीन वेळी आग लागल्यावर तसेच आणीबाणीच्या प्रसंगी सुरक्षित ठिकाणांची माहिती व सराव होण्याच्या दृष्टीने आणि अशा प्रसंगी गडबड गोंधळ

न करता काय करावे व काय करू नये याची उद्‌बोधक माहिती मिळण्याकरीता प्रतिवर्षी इमारत खाली करण्याची कवायत व त्यासंबंधीचे प्रात्यक्षिके घेतली जातात. या कवायतीमध्ये या विभागाकडून विविध प्रात्यक्षिकांचा समावेश करून लोकांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

"अग्निसुरक्षे" व्यवस्थे अंतर्गत या विभागास आग विझविणे, विमोचन कार्ये करणे, प्रथमोपचार करणे तसेच मालमत्ता व जीवित हानी होणार नाही याची दक्षता घेवून सतत कार्यशील व कार्यतत्पर राहून शिस्तीचे पालन करून कर्तव्ये व जबाबदारीची कामे या विभागाकडून नियमितपणे पार पाडली जातात.

*****

विधिमंडळाच्या सदस्यांकरीता विविध सोयी व सुविधा

(१०७) विद्यमान सदस्यांना ओळखपत्र, मार्ग प्रवासपत्र / बॅज व्यवस्था :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील प्रत्येक विद्यमान सदस्यांना एक ओळखपत्र आणि मार्ग प्रवासपत्र पुरविण्यात येते. या सुविधेमुळे सदस्यांना एकतर एकट्याने किंवा आपल्या पत्नीसह/पतीसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई (एस.टी.) आणि मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम, मुंबई (बेस्ट) बसने यांच्या सर्व प्रकारच्या बसेसने विनामूल्य प्रवास करण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील नवनिर्वाचित प्रत्येक विद्यमान सदस्यास सदस्यत्वाचा बॅज पुरविण्यात येतो.

(१०८) लेखनसामग्री पुरवठा व्यवस्था :-

विधिमंडळाच्या सदस्यांना पत्रव्यवहार तसेच अन्य वापरासाठी राजचिन्ह असलेली अधिकृत लेखनसामग्री (नोट पेपर्स, लेटर हेड्स, इत्यादी) पुरविण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ही लेखनसामग्री वाजवी दर आकारून विधान भवन इमारतीच्या तळ मजल्यावर खोली क्रमांक ०१७ येथे कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापकामार्फत मिळू शकते. या लेखनसामग्रीवर सदस्य केवळ आपले नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक छापून घेऊ शकतात. सदर लेखनसामग्रीवर कोणाचेही छायाचित्र, राजकीय पक्षाचे घोषवाक्य किंवा निशाणी तसेच ॲडव्होकेट सुप्रिम कोर्ट/ हायकोर्ट, फिजीशियन आणि सर्जन, संपादक, विशेष कार्यकारी अधिकारी (एस.ई.ओ.) यासारखा हुद्दा वा व्यवसाय निदर्शक मजकूर त्यावर छापता येत नाही. सदस्यांनी याबाबत योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदस्यांखेरीज अन्य कोणत्याही व्यक्तीला या लेखनसामग्रीचा वापर करता येणार नाही, तथापि लेखनसामग्रीचा गैरवापर झाल्याचे काही प्रकार निदर्शनास आलेले असल्याने सदस्यांनी लेखनसामग्री सुरक्षित जागी ठेवून ती कुणाही अनधिकृत व्यक्तींच्या हाती पडणार नाही याची कृपया काळजी घ्यावी. ही लेखनसामग्री सदस्यांना खालील दराने पुरविण्यात येते :-

(१) लेटरहेड मोठी (१०० नगास) :- रूपये ४७.००

(२) लेटरहेड मध्यम (१०० नगास) :- रूपये २४.००

(३) लेटरहेड लहान (१०० नगास) :- रूपये १३.००

(४) पाकिटे लहान (१०० नगास) :- रूपये २.५०

(५) पाकिटे मोठी (१०० नगास) :- रूपये ७.००

(६) फाईल कव्हर (नगास) :- रूपये १.००

(१०९) अधिवेशन कालावधीत सदस्यांना सभागृहात त्यांचेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाव्दारे (पिजन होल) विविध कागदपत्रे, प्रकाशने पुरविणे :-

विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या कालावधीत सदस्यांना सभागृहातील कामकाजाशी संबंधित विविध कागदपत्रे तसेच प्रकाशने पुरविण्यात येतात. त्याकरिता सभागृहाच्या लॉबीत ठिकठिकाणी प्रत्येक सदस्यांचे नाव नमूद करून सदस्यांसाठी स्वतंत्र टपाल खण (पिजन होल) असलेली व्यवस्था करण्यात आलेली आहे. विधानसभा सभागृहाच्या दररोजच्या बैठकीची कामकाजाची कागदपत्रे बैठक सुरू होण्यापूर्वी या टपाल खणात या सचिवालयातील संबंधित कक्षांकडून ठेवण्यात येतात. त्याचप्रमाणे सभागृहाची बैठक सुरू असतांना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे वेळोवेळी कामकाजानुसार या खणात ठेवण्यात येतात. शासनाकडून प्रकाशित होणारी विविध प्रकाशने याच पध्दतीने सदस्यांना देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र प्रकाशनांची संख्या फार मोठी असल्यास वा खणातून वाटप करणे गैरसोईचे असल्यास ती लॉबीमध्ये असलेल्या वितरण केंद्रावरून देण्यात येतात. त्यासंबंधीची सूचना सदस्यांना वेळोवेळी पत्रक भाग-२ द्वारे देण्यात येते. सभागृहाची बैठक सुरू असतांना सभागृहात शक्यतोवर कोणतीही कागदपत्रे वितरीत करण्यात येत नाहीत. आठवड्याभरातील सर्व कागदपत्रे या खणात असतात. मात्र शनिवारी हे सर्व खण स्वच्छ करण्यात येतात. त्यावेळी ज्या सदस्यांनी आपली कागदपत्रे नेलेली नसतील त्यांची कागदपत्रे खणांच्या वरच्याबाजूला स्वतंत्रपणे बांधून ठेवण्यात येतात व सदस्यांनी मागणी केल्यास त्यांना देण्यात येतात. एका आठवड्याची कागदपत्रे पुढील आठवडाभर ठेवण्यात येतात व त्यानंतर सदस्यांना त्यांची आवश्यकता नाही, असे समजून त्या कागदपत्रांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात येते. अतः सदस्यांनी आपापल्या खणातील कागदपत्रे नियमितपणे काढून नेणे इष्ट आहे.

(११०) सदस्यांकरिता निवास, वाहन, वैद्यकीय सोयी, इ. व्यवस्था :-

मुंबई येथे सदस्यांची निवास व्यवस्था आकाशवाणी जवळील आमदार निवास, व जुने विधान भवन विस्तारीत आमदार निवास या ठिकाणी असलेले कक्ष सदस्यांना विनाभाडे तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येतात. महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत अथवा ज्यावेळी नागपूर येथे विधिमंडळाचे अधिवेशन असेल, त्या अधिवेशन कालावधीपूरत्याच नागपूर येथील आमदार निवासातील कक्षांचे वाटप आमदार निवास व्यवस्था समितीकडून करण्यात येते, वरील सर्व आमदार निवासामध्ये सदस्यांकरिता भोजन, चहापान, इत्यादीची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

विधिमंडळाच्या मुंबई येथील अधिवेशन कालावधीत सदस्यांकरिता विधान भवनाच्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर तसेच विधान भवन प्रांगणात उपाहारगृहाची तात्पुरती व्यवस्था केली जाते. सदर ठिकाणी सदस्यांसाठी भोजन व्यवस्था देखील करण्यात आलेली आहे. ही व्यवस्था केवळ सदस्यांकरिता असून ही उपाहारगृहे शासनाच्या आहार व्यवस्था यंत्रणेकडून चालविण्यात येतात व त्याकरिता शासनाने ठरवून दिलेले सवलतीचे दर आकारण्यात येतात तसेच कर्मचारी व इतर व्यक्ती यांच्याकरिता दुसऱ्या मजल्यावर उपाहारगृहाची व्यवस्था आहे.

नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशन कालावधीत आमदार निवास, नागपूर ते विधान भवन, नागपूर, तसेच नागपूर रेल्वे स्टेशन ते आमदार निवास अशी एस.टी.बसची व्यवस्था सदस्यांकरिता करण्यात येते.

विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत सदस्यांना मुंबई व नागपूर येथील विधान भवनात प्राथमिक स्वरूपाची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येते. अन्य वेळेत तसेच निःसत्र कालावधीत सदस्यांना आकाशवाणी जवळील

आमदार निवास येथे पूर्णकालीन दवाखान्यात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याशिवाय तातडीच्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक वाटल्यास शासकीय सेंट जॉर्जेस रूग्णालय, मुंबई येथे तातडीने वैद्यकीय सोयी उपलब्ध आहेत.

(१११) पोस्ट ऑफिस, स्टेट बँक इत्यादी व्यवस्था :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या मुंबई व नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत सदस्यांच्या सोयीसाठी विधान भवन इमारतीमध्ये पोस्ट ऑफिस उघडण्यात येते. या सुविधेचा लाभ सदस्य अधिवेशन कालावधीत घेऊ शकतात. सदस्यांच्या सोयीसाठी विधान भवन, मुंबई येथे १७ व्या मजल्यावर स्टेट बँक ऑफ इंडियाची एक शाखा कायमस्वरूपी स्वरूपात उघडण्यात आली असून, विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीत विधान भवन आवारात स्टेट बँक ऑफ इंडियाची एक शाखा अस्थायी स्वरूपात उघडण्यात येते. सदर बँकेमध्ये सदस्यांना खाते उघडून धनादेश/धनाकर्ष इत्यादी सुविधांचा लाभ घेता येतो. त्याशिवाय सदस्यांसाठी विधान भवन, मुंबई येथे इमारतीच्या आवारात स्टेट बँक ऑफ इंडियाची एटीएम सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(११२) विधानमंडळाचे विद्यमान तसेच माजी सदस्य व त्यांच्या कुटुंबियांसाठी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती :—

महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान तसेच माजी सदस्य व त्यांच्या कुटूंबियांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या देयकांची छाननी करण्यासंबंधी उच्चाधिकार (High Power) समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीवर मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सर्वसाधारण नियंत्रण असून उक्त समिती महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान व माजी सदस्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय देयकांची, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या तरतूदी व त्या अंतर्गत करण्यात आलेले महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वैद्यकीय मदत) नियम, १९६६ तसेच महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांतील तरतुदींनुसार काटेकोरपणे छाननी करून सदर प्रकरणे प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवते.

उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर सदर बैठकीच्या कार्यवृत्तास मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांची मंजुरी घेतली जाते व त्यानंतर मंजुरी आदेश निर्गमित करण्यात येतात.

सदस्यांकडून प्राप्त झालेले देयक, उच्चाधिकार समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येत असल्यामुळे सदस्यांकडून देयक सादर करतेवेळी देयकाच्या व त्यासोबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांच्या ५ छायांकित प्रती स्वीकारण्यात येतात.

तथापि, सद्यःस्थितीत वैद्यकीय सुविधेमध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

"महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व विद्यमान व माजी सदस्यांना तसेच त्यांच्या कुटूंबियांसाठी दिनांक ०१ फेब्रुवारी २०१८ रोजीपासून आरोग्य विमा योजना (CASHLESS MEDICAL THROUGH THE INSURANCE SCHEME) लागू करण्यात आली आहे." (विद्यमान व माजी सदस्यांचे वेतन आणि भत्ते तसेच इतर सुविधांबाबतची संक्षिप्त माहिती **परिशिष्ट क्रमांक २६** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

(११३) मा. सदस्यांच्या स्वीय सहायकांना ओळखपत्र व्यवस्था :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांनी स्वीय सहायक म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्तीस ओळखपत्र देण्यासाठी, संबंधित सदस्यांने ठराविक नमुन्यात स्वीय सहायकाच्या सहीसह प्रधान सचिव/सचिव यांच्या नावाने अर्ज करावयाचा असतो व त्यासोबत स्वीय सहायकाने दोन छायाचित्रे, संपूर्ण नाव व पत्ता इत्यादी तपशील ठराविक नमुन्यात स्वतःच्या स्वाक्षरीने सादर करावयाचा असतो.

(११४) माजी सदस्यांना ओळखपत्र व्यवस्था :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील माजी सदस्यांना या सचिवालयाकडून ओळखपत्र पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी सर्व माजी सदस्यांकडून ओळखपत्रासाठी ठराविक नमुन्यात माहिती भरून घेतली जाते. ज्यामध्ये माजी सदस्यांचे संपूर्ण नांव, पत्ता, मतदारसंघ, निवडून आलेला कालावधी नमूद केलेला असतो.

(११५) विधिमंडळाच्या माजी सदस्यांसाठी निवृत्तीवेतन किंवा कुटुंबवेतन व्यवस्था :-

(१) निवृत्तीवेतन :- (अ) राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून ज्यांनी "सदस्य" म्हणून शपथ घेतली आहे अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, त्यांनी विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर दरमहा रूपये पन्नास हजार निवृत्तीवेतन देण्यात येते.

परंतु असे की, ज्यावेळी एखाद्या व्यक्तीने पाच वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी सदस्य म्हणून सेवा केली असेल, त्यास त्याच्या पाच वर्षावरील प्रत्येक वर्षासाठी दरमहा रूपये २,०००/- या प्रमाणात जादा निवृत्तीवेतन देण्यात येते. परंतु आणखी असे की, जर एखादी व्यक्ती भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १९१ च्या खंड (१) अन्वये राज्य विधानमंडळाचा सदस्य असण्यास अपात्र ठरली तर, तिला निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही.

(ब) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी वर्षाची गणना करताना एखाद्या व्यक्तीने विधान परिषदेच्या किंवा विधानसभेच्या आपल्या सदस्यत्वाच्या आधारे विधान परिषदेचा सभापती किंवा उप सभापती किंवा विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा मंत्री, राज्यमंत्री, उप मंत्री किंवा संसद सचिव म्हणून किंवा त्यापैकी एकापेक्षा अधिक पदावर ज्या मुदतीत सेवा केली असेल ती मुदत जमेस धरली जाईल.

(२) कुटुंबवेतन :- (अ) महाराष्ट्र विधानमंडळाच्या मृत्यू पावलेल्या सदस्याच्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या कायदेशीर वारसदार विधवेस किंवा विधुरास किंवा अशा मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्युपश्चात त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर अशा अज्ञान अपत्यास किंवा अपत्यांना दिनांक १ ऑगस्ट २०१३ पासून दरमहा चाळीस हजार रूपये या दराने निवृत्तीवेतन देण्यात येईल.

(ब) मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्युच्या पश्चात त्या सदस्यांचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या कायदेशीर अज्ञान अपत्याला किंवा अपत्यांना कायदेशीर विहित नमुन्यात अर्ज केल्यानंतर, कुटुंबवेतन देण्यात येते.

(क) जेव्हा अशा विधवेने किंवा विधुराने पुनर्विवाह केला असेल त्याबाबतीत, ती किंवा तो, तिने किंवा त्याने पुनर्विवाह केल्याच्या दिनांकापासून, या कलमान्वये निवृत्तिवेतन मिळण्यास हक्कदार असणार नाही. (विद्यमान व माजी सदस्यांचे वेतन आणि भत्ते तसेच इतर सुविधांबाबतची संक्षिप्त माहिती **परिशिष्ट क्रमांक २६** मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

(११६) गॅलरीसाठी प्रवेशपत्रिका :-

विधानसभा/विधान परिषद सभागृहाचे कामकाज अवलोकन करण्यासाठी मा. राज्यपाल गॅलरी, मा. राजदूत, मा. सभापती/अध्यक्ष गॅलरी, वार्ताहर गॅलरी, प्रेक्षक गॅलरी, विद्यार्थी व अधिकारी गॅलरी इत्यादी विविध गॅलरी आहेत.

मा. राज्यपाल गॅलरी :- महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, त्यांचे कुटूंबीय व पाहुण्यांसाठी तसेच मा. राष्ट्रपती, मा. प्रधानमंत्री, अन्य राज्यांचे मा. राज्यपाल किंवा त्यांचे कुटुंबीय व पाहुणे, अन्य राज्यांचे मुख्यमंत्री व त्यांचे कुटुंबीय तसेच अन्य राज्यांचे मा. पीठासीन अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी राज्यपाल गॅलरी राखून ठेवण्यात आलेली आहे.

मा. राजदूत गॅलरी :- परदेशी राजदूत वा त्यांचे कुटुंबीय अथवा पाहुणे यांना राजदूत गॅलरीत प्रवेश देण्यात येतो. तर मा. सभापती/अध्यक्ष यांनी नामनिर्देशित केलेल्या अति महत्त्वाच्या व्यक्ती व विशेष अभ्यांगत यांना या गॅलरीत प्रवेश देण्यात येतो.

मा. सभापती /मा. अध्यक्ष गॅलरी :- मा. सभापती/मा. अध्यक्ष यांचे नातेवाईक/पाहुणे तसेच त्यांच्याकडे कामानिमित्त येणारे अभ्यांगत व अन्य महत्त्वाच्या व्यक्तींकरिता या गॅलरीत प्रवेश दिला जातो.

प्रेक्षक गॅलरी :- प्रेक्षक गॅलरी सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी असून त्याकरिता प्रवेशपत्रिका मिळण्यासाठी सदस्यांना विहित नमुन्यात अर्ज करावा लागतो. या प्रवेश अर्जामध्ये सदस्यांचे संपूर्ण नाव, प्रेक्षकाचे नाव, मुंबईतील वास्तव्याचा व कायमचा पत्ता/व्यवसाय/प्रवेशाचा दिनांक, सदस्यांची स्वाक्षरी इत्यादी तपशील नमुद करावा लागतो. प्रेक्षक गॅलरीची प्रवेशपत्रिका देण्यासाठी अधिवेशन कालावधीत विधान भवनाच्या मागील प्रवेशद्वारानजिक असलेल्या कक्षामध्ये प्रवेशपत्रिका वितरण केंद्र सुरू केले जाते. या केंद्रावरून विधानमंडळ सचिवालयाच्या कर्मचाऱ्यांतर्फे प्रवेशपत्रिका देण्यात येतात. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या अर्जाचा नमुना या केंद्रावरून मिळू शकतो. सर्वसाधारणपणे एका सदस्याला दररोज दोन प्रवेशपत्रिका मिळू शकतात.

प्रेक्षक गॅलरीच्या प्रवेशपत्रिका बाळगणाऱ्या व्यक्तींना संबंधित गॅलरीखेरीज विधान भवनाच्या परिसरात अन्यत्र कोठेही जाता येत नाही. प्रेक्षक गॅलरीची प्रवेशपत्रिका सर्वसाधारणपणे ज्या दिवशी अर्ज केला असेल त्या दिवसाकरिताच देण्यात येते. आगाऊ प्रवेशपत्रिका सर्वसाधारणपणे देण्यात येत नाही.

अधिकारी गॅलरी :- विधिमंडळाच्या त्या-त्या सभागृहात सुरू असलेल्या कामकाजाशी संबंधित मंत्रालयीन विभागांचे व इतर शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता विधानसभा व विधान परिषदेमध्ये स्वतंत्र गॅलरीची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिकारी गॅलरीमध्ये प्रवेश मिळण्याकरिता संबंधितांनी लेखी पत्राद्वारे विनंती केल्यानंतर त्यांना अधिकारी गॅलरीची प्रवेशपत्रिका दिली जाते.

(११७) अधिवेशनाच्या कालावधीत वृत्तपत्र प्रतिनिधींना वार्ताहर गॅलरीत प्रवेश व्यवस्था :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या मुंबई/नागपूर येथील अधिवेशनाच्या कामकाजाचे वार्तांकन करण्यासाठी राज्यातील विविध वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना त्या-त्या सभागृहातील वार्ताहर गॅलरीत मर्यादित स्वरूपात प्रवेश देण्यात येतो. अधिवेशन कालावधीत विधानसभा/विधानपरिषद वार्ताहर गॅलरीत प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या वृत्तपत्र संपादकांनी विहित नमुन्यातील माहिती भरून प्रधान सचिव, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२, यांच्या नावे पाठविण्याबाबतचे पत्र सर्व वृत्तपत्रांचे संपादकांना

अधिवेशनापूर्वी सर्वसाधारणपणे एक महिना अगोदर पाठविण्यात येते. वृत्तपत्र संपादकांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिवेशनापूर्वी या सचिवालयाचे संबंधित अधिकारी, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचे अधिकारी तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पदाधिकाऱ्यांसमवेत एकत्रित बैठक आयोजित करण्यात येते. सदर बैठकीतील घेण्यात आलेल्या निर्णयास मा. सभापती, विधान परिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी मंजुरी दिल्यानंतर संबंधितांना वार्ताहर गॅलरी प्रवेशपत्रिका देण्यात येतात. वार्ताहर गॅलरीत वृत्तपत्र प्रतिनिधीखेरीज इतर कोणालाही प्रवेश दिला जात नाही.

*****

(११८) महत्त्वाची प्रकाशने :-

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन कालावधीत तसेच अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर विधिमंडळाच्या सदस्यांना दोन्ही सभागृहांच्या बैठकींमध्ये झालेले कामकाज उदा. शासकीय विधेयके, अध्यादेश, अर्थसंकल्प/पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदान, कपात सूचना, लेखानुदान, अन्य वित्तीय कामकाज, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, अध्यक्ष/उपाध्यक्षांची निवडणूक, नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी, मंत्र्यांचा/सदस्यांचा परिचय, मंत्रीमंडळावरील अविश्वास/विश्वासदर्शक प्रस्ताव, सदस्यांना अटक/सूटका, स्थगन प्रस्ताव, प्रश्नोत्तरे, लक्षवेधी, ठराव, प्रस्ताव, अर्धा-तास चर्चा, अल्पकालीन चर्चा, अशासकीय कामकाज, सभागृहातील निर्णयानुसार घटीत करण्यात आलेल्या समित्या, विधिमंडळाच्या समित्यांचे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले विविध अहवाल, चौकशी अहवाल व अन्य कागदपत्रे, विविध समित्यांवरील नेमणूका, विशेषाधिकारभंगाची सूचना, शासनाने घेतलेले निर्णय, हरकतीचा/औचित्याचा मुद्दा, मंत्र्यांचे निवेदन, सदस्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण, अधिवेशन कालावधीतील कामकाजाचा आढावा तसेच कोणते कामकाज झाले याबाबतची माहिती संक्षिप्त अहवाल, पत्रक भाग-१ व पत्रक भाग-२ या प्रकाशनांव्दारे सदस्यांना कळविण्याची व्यवस्था करण्यात येते.

(१) संक्षिप्त अहवाल :-

विधानसभेचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर सर्व कक्षांना त्यांच्याशी संबंधित असलेल्या ज्या विविध बाबींसंबंधीचे कामकाज अधिवेशनात झाले असेल त्या बाबींविषयीची संक्षिप्त माहिती पाठविणेबाबत कळविण्यात येते. ही माहिती संकलित करून अधिवेशनाचा 'संक्षिप्त अहवाल' पुस्तक रूपाने कार्यालयीन वापरासाठी छापून घेण्यात येतो. तसेच सदर अहवाल सदस्यांच्या माहितीसाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या संकेतस्थळवर उपलब्ध करून देण्यात येतात.

(२) सदस्यांसाठी पत्रके (बुलेटिन्स) प्रकाशने इत्यादी :-

सदस्यांना अधिवेशनासंबंधीची तसेच अन्य माहिती त्वरीत मिळावी याकरीता विधानमंडळ सचिवालयाकडून वेळोवेळी पत्रक भाग-१ व पत्रक भाग-२ ही पत्रके (बुलेटिन्स) प्रकाशित करण्यात येतात. याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे. :-

(अ) पत्रक भाग एक :- विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या प्रत्येक दिवशीच्या बैठकीचे कामकाज सभागृहात ज्या क्रमाने झाले असेल त्या क्रमानुसार त्याचा संक्षिप्त वृत्तांत पत्रक भाग एक मध्ये समाविष्ट केलेला असतो. प्रत्येक दिवशी त्या-त्या सभागृहांत तारांकित प्रश्नांची देण्यात आलेली उत्तरे, सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नाच्या याद्या, विविध समित्यांचे/महामंडळांचे/चौकशी अहवाल व कागदपत्रे, विशेष हक्कभंग सूचना, नियम ९३ अन्वये मांडण्यात आलेल्या सूचना, लक्षवेधी सूचना, शासकीय विधेयके, विविध ठराव, प्रस्तावावरील भाग घेणाऱ्या सदस्यांची नावे, अशासकीय विधेयके, अर्धा-तास चर्चा, राज्यपालांचे अभिभाषण/अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण/विभागाच्या मागण्यांवरील/पुरवणी मागण्यांवरील चर्चेत कोणत्या सदस्यांनी भाग घेतला त्यांची नावे इत्यादी बाबींचा संक्षिप्त गोषवारा पत्रक भाग एकमध्ये समाविष्ट करण्यात येतो. अधिवेशन कालावधीत पत्रक भाग एकच्या प्रती सर्व सदस्यांना सभागृहातील टपाल खणाद्वारे वितरीत करण्यात येतात. विधिमंडळाचे अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर सर्व पत्रक भाग एकचे संकलन व संपादन करून संक्षिप्त अहवालात समाविष्ट करण्यासाठी संबधित कक्षांकडे पाठविण्यात येते.

(ब) पत्रक भाग २ :- सदस्यांना अधिवेशन कालावधीत तसेच इतर वेळी (नि:सत्र कालावधीत) विविध प्रकारची सर्वसाधारण माहिती देणे आवश्यक असते. त्यासाठी सदस्यांना प्रत्येक वेळी पत्र पाठविण्याऐवजी या पत्रक भाग-२ च्या माध्यमातून अशी माहिती देण्यात येते. अधिवेशनाच्या कालावधीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी पत्रक भाग-२ प्रकाशित करण्यात येते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी संपूर्ण अधिवेशनात झालेल्या कामाचा गोषवारा दर्शविणारे एक पत्रक प्रकाशित करण्यात येते. नि:सत्र कालावधीत प्रत्येक आठवडयातील सर्व बाबींचा आढावा घेऊन त्याबाबींचा समावेश पत्रक भाग-२ मध्ये करण्यात येतो. सदर पत्रक सर्वसाधारणपणे आठवड्यातून सोमवार व गुरूवार या दोन दिवशी प्रकाशित करण्यात येते. पत्रक भाग-२ सदस्यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येते. त्याचप्रमाणे विधिमंडळाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र महत्त्वाच्या व तातडीच्या कारणास्तव हे पत्रक अन्य दिवशीही प्रकाशित करण्यात येते.

*****

एचबी १५९९—३२

(११९) संसदीय सभ्याचार, रितीरिवाज, संकेत व शिष्टाचार आचारसंहिता पार्श्वभूमी आणि दृष्टिक्षेप :-

भारताने स्वातंत्र्यानंतर ब्रिटीश संसदीय लोकशाहीचा *(The Westminster system or Westminster model. - The term comes from the Palace of Westminster, the current seat of the Parliament of the United Kingdom.)* अंगीकार केला आहे. संसदीय लोकशाही व कार्यपध्दती ही भारतीय संविधानाचा गाभा आहे. ब्रिटीश संसद म्हणजे 'हाऊस ऑफ लॉर्डस्' आणि 'हाऊस ऑफ कॉमन्स' या सभागृहांच्या प्रथा, परंपरा, संकेत याबाबतचे ज्ञान सदस्यांना असणे आवश्यक आहे. नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना संसदीय रीतीरिवाज आणि संकेत तसेच शिष्टाचार यांची माहिती असणे आवश्यक आहे. हे संकेत आणि रीतीरिवाज पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथा, रूढी व संकेत तसेच पीठासीन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेले निर्णय आणि विधानमंडळाच्या अलिखित परंपरा यावर मुख्यतः आधारित आहेत. या बाबत सर आर्स्किन मे यांचा 'पार्लमेंटरी प्रॅक्टीस' (Erskine May: Parliamentary Practice) तसेच कौल आणि शकधर यांचा ' संसदीय प्रथा परंपरा' हे दोन्ही ग्रंथ या प्रकरणी आधारभूत मानले जातात.

विधिमंडळाची प्रतिष्ठा जतन करणे आणि तिच्या उचित कार्यशीलतेची हमी देण्यासाठी, सदस्यांचे वर्तन आणि शिष्टाचार महत्त्वाचे असून त्यासाठी त्यांनी विवक्षित नियमांचे अनुपालन करावे. हे नियम कामकाजासंबंधीच्या नियमांवर आधारित असून क्रमशः संकेतानुसार आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार अस्तित्वात आले आहेत.

सदस्यांना सभागृहात काम करताना मिळणाऱ्या स्वानुभवातून त्याची वेळोवेळी माहिती होईलच. सदस्यांच्या माहितीकरिता या ठिकाणी नमुन्यादाखल काही उदाहरणे नमूद करण्यात येत आहेत.

संसदीय शिष्टाचार :-

- सदस्यांनी बैठकीसाठी येताना आपले ओळखपत्र नेहमी जवळ ठेवावे. कोणाही अनोळखी व्यक्तीला विधानभवनात प्रवेश देऊ नये अशी सुरक्षा कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद असून, सदस्यांची नावे व चेहरा यांच्याशी पुरेसे परिचित होणे सुरक्षा कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या जागा वेळोवेळी बदलत असल्याने सहजासहजी शक्य नसते. अशा परिस्थितीत कोणताही अनवस्था प्रसंग उद्‌भवू न देता सुरक्षा व्यवस्था राखणे यासारखी कठीण कामगिरी सुरळीतपणे पार पाडणे सुरक्षा कर्मचाऱ्यांना शक्य व्हावे म्हणून सदस्यांनी ओळखपत्र नेहमी जवळ ठेवणे नितांत आवश्यक आहे.

- प्रत्येक सदस्याने बैठकीसाठी सभागृहात जाण्यापूर्वी हजेरीपटावर न चुकता स्वाक्षरी करावी.

- सभागृह सुरू होण्यापूर्वी सदस्यांनी आपले आसन ग्रहण करावे.

- मा.पीठासीन अधिकारी यांचे सभागृहात आगमन झाल्याबरोबर सदस्यांनी आपापल्या जागेवर उभे रहावे आणि मा.पीठासीन अधिकारी जेव्हा एखाद्या बाजूस अभिवादन करतील, तेव्हा त्यांना अभिवादन करून प्रतिसाद द्यावा. मा. पीठासीन अधिकारी यांनी आसन ग्रहण केल्यानंतर स्थानापन्न व्हावे.

● मा.पीठासीन अधिकारी यांच्या आगमनप्रसंगी प्रवेशव्दारात असणाऱ्या सदस्यांनी मा.पीठासीन अधिकारी आसन ग्रहण करीपर्यंत ये-जा करण्याच्या मार्गात (गँगवे) उभे रहावे व त्यानंतर आपल्या जागी यावे. तसेच त्यांनी सभागृहाच्या प्रवेशव्दारात किंवा सभागृहाच्या मार्गिकांमध्ये/त्या जवळील मोकळया जागेत उभे राहू नये. सदस्यांनी उभे राहण्यास मनाई आहे. त्यांनी एकतर आपल्या जागेवर आसनस्थ व्हावे किंवा सभागृहाबाहेर निघून जावे. सभागृहातून जाताना किंवा सभागृहात परत येताना सदस्यांनी पीठासीन अधिकारी यांना अभिवादन करावे.

● बैठक चालू असताना सभागृहाच्या आत/बाहेर जाताना सदस्यांनी कामकाजात अडथळा निर्माण होणार नाही अशा रितीने ये-जा करावी.

● सदस्यांना भेटावयास येणाऱ्या मंडळींची भेट घेण्यासाठी विधान भवनाच्या मागील प्रवेशव्दाराजवळील जागेत व्यवस्था असते. त्यांच्याकडून संबंधित सदस्यांकरिता चिठ्ठ्या घेऊन त्या सदस्यांना सभागृहात पोचविण्यात येतात. त्याप्रमाणे सदस्यांनी त्यांना या प्रयोजनासाठी ठरवून दिलेल्या जागी भेटावे.

● सभागृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारची पत्रके, साहित्य, प्रश्नावली, घोषणापत्र वा तत्सम कागदपत्रे मा. पीठासीन अधिकारी यांची आगाऊ लेखी परवानगी घेतल्याखेरीज वितरण करता येणार नाहीत.

सभागृहाच्या कामकाजावर लक्ष केंद्रित करणे :

● सभागृहात उपस्थित असताना सदस्याने सभागृहातील कामकाजाशी संबंधित बाबींवरच लक्ष केंद्रित करावे. सभागृहात सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजाशी प्रत्यक्षपणे संबंधित नसलेली वा त्यासाठी आवश्यक नसलेली वृत्तपत्रे, नियतकालिके वा अन्य कागदपत्रे वाचण्यास मनाई आहे.

● सभागृहात उपस्थित असताना, सदस्याने एखाद्या पुस्तकातील मजकूर वाचून आणि तो इतर सदस्यांजवळ जाऊन त्यांना दाखवून कामकाजात व्यत्यय आणू नये.

शांतता पाळणे :

● सदस्यांनी सभागृहामध्ये शांतता पाळावी तसेच त्यांनी आपापसात विनोद करणे टाळावे.

● सभागृहाचे कामकाज चालू असताना सदस्यांनी शक्यतोवर आपापसात बोलू नये. आवश्यकता असेल तर सभागृहाच्या कामकाजात अडथळा येणार नाही याची काळजी घेऊन शक्य तितक्या हळू आवाजात बोलावे.

● सदस्यांनी एकमेकांवर ओरडू नये.

● सभागृहाची प्रतिष्ठा आणि कामकाजाचे गांभीर्य राखण्यासाठी सदस्याने सभागृहात कोणत्याही प्रकारे घोषणा देता कामा नये. सभागृहात घोषणा देणे संसदीय सभ्याचाराशी सुसंगत नाही.

● सभागृहात घोरणे निषिद्ध आहे.

व्यत्यय / अडथळा :

- नव्याने निवडून आलेला सदस्य प्रथमच भाषण करीत असेल तेव्हा त्यांच्या भाषणात व्यत्यय आणता कामा नये.

- औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याच्या खेरीज एखाद्या सदस्याला दुसऱ्या सदस्याचे भाषण सुरू असताना सभागृहात भाषण करणाऱ्या सदस्याने अनुमती दिल्याखेरीज व्यत्यय आणण्याचा हक्क नाही.

- सदस्यांनी गोंगाट वा आरडाओरड करून किंवा अन्य प्रकारे गोंधळ निर्माण करून कोणाही सदस्याच्या भाषणात व्यत्यय आणता कामा नये. तसेच भाषण चालू असताना त्यावर टीका टिप्पणी किंवा उपहासात्मक शेरेबाजी करू नये.

- सदस्य भाषण करीत असताना जर इतर सदस्य त्याच्या भाषणात अडथळा आणत असतील तर सभागृहाच्या कामकाजातून अडथळ्याच्या नोंदी काढून टाकण्याचे निदेश मा. पीठासीन अधिकारी देऊ शकतात.

बेशिस्त वर्तणूक :

- सभागृहातील कामकाजात अडथळा आणण्याच्या उद्देशाने मा. पीठासीन अधिकारी यांच्या आसनाजवळ जाणे आणि मा. पीठासीन अधिकारी यांचा माईक ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

- ज्या सदस्यांची सभागृहातील वर्तणूक मा. पीठासीन अधिकारी यांच्या मते अतिशय बेशिस्तीची असेल त्याला ताबडतोब सभागृह सोडून बाहेर जाण्याचा आदेश मा.पीठासीन अधिकारी देऊ शकतात व त्याप्रमाणे त्या सदस्यांनी सभागृहाबाहेर गेले पाहिजे.

- सभागृहातील बाकावर उभे राहण्यास मनाई आहे.

- एकाच वेळी दोन सदस्यांनी बोलण्यास उभे राहू नये.

- जेव्हा सदस्य सभागृहाच्या बाहेरील प्रतिक्षालयात (लॉबीमध्ये) असतील तेव्हा त्यांनी आपला हसण्याचा अथवा बोलण्याचा आवाज सभागृहात ऐकायला येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच लॉबीमध्ये असणाऱ्या सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण होणार नाही अशारीतीने हळू आवाजात बोलावे.

- सदस्यांनी संघटित प्रयत्न करून इतर सदस्यांना सभागृहात प्रवेश करण्यापासून लॉबीमध्ये रोखणे औचित्याला धरून नाही.

- एखाद्या सदस्याने आपले पादत्राण हातात घेऊन दुसऱ्या सदस्यास धमकावणे हे अतिशय आक्षेपार्ह वर्तन आहे.

- सदस्यांना सभागृहात धुम्रपान, पेयपान करणे, हॅट, ओव्हरकोट घालणे यास मनाई आहे.

मा. पीठासीन अधिकाऱ्यांप्रती आदर :

- सभागृहाच्या कार्यवाहीदरम्यान सदस्यांनी मा. पीठासीन अधिकाऱ्यांप्रती योग्य आदर दाखविला पाहिजे.

● अध्यक्षस्थानी विराजमान होण्यासाठी मा. पीठासीन अधिकारी यांनी प्रवेश करताक्षणी किंवा बोलण्यास उभे राहिल्यास किंवा ऑर्डर असे पुकारल्यानंतर तसेच अन्य (पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने) सदस्य बोलण्यासाठी किंवा चर्चेदरम्यान माहितीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी किंवा वैयक्तिक स्पष्टीकरण देण्यासाठी उभा असल्यास प्रत्येक सदस्याने जागेवर बसावे.

● मा. पीठासीन अधिकारी बोलावयास उभे राहिल्यास भाषण करणाऱ्या सदस्यांनी ताबडतोब खाली बसावे. तसेच इतर कोणी सदस्य हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास वा वैयक्तिक स्पष्टीकरण देण्यासाठी उभा राहिल्यास त्याने खाली बसावे.

● सदस्याने मा. पीठासीन अधिकारी यांच्या आसनाच्या दिशेने पाठ करून उभे अथवा बसून राहू नये.

● सदस्यांनी मा. पीठासीन अधिकारी यांच्या आसनासमोरून किंवा सभागृहाच्या एका बाजूकडून दुसरीकडे जाऊ नये.

● सदस्य त्यांना बोलू न दिल्याच्या विरोधात विशिष्ट पवित्रा घेऊन उभे राहू शकत नाहीत.

● निषेध व्यक्त करण्यासाठी कोणत्याही सदस्याने मा. पीठासीन अधिकाऱ्यांकडे धाव घेऊ नये.

● मा. पीठासीन अधिकारी बोलण्यासाठी उभे असताना कोणत्याही सदस्यांनी सभागृहात इकडून तिकडे जाऊ नये, फिरू नये, उभे राहू नये किंवा सभागृहात प्रवेश करू नये किंवा सभागृह सोडून जाऊ नये.

● सभागृहात भाषण करताना ते नेहमी मा. पीठासीन अधिकारी यांना उद्देशून असावे. कोणाही व्यक्तिगत सदस्याला उद्देशून नसावे.

● मा. पीठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावर सभागृहात वा सभागृहाबाहेर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे टीका करू नये.

सभागृहाची प्रतिष्ठा :

● सदस्यांनी सभागृहाची प्रतिष्ठा जपावी.

● मंत्र्यांनी सभागृहामध्ये बोलत असताना आपल्या जागेवरूनच अधिकारी कक्षातील अधिकाऱ्यांचा सल्ला घेणे हे औचित्याला धरून नाही.

● मंत्र्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांनी चेंबरमधील अधिकाऱ्यांचा सल्ला घेणे हे औचित्याला धरून नाही.

● गॅलरीतील अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीची सदस्यांनी दखल घेऊ नये.

● सभागृहातून कोणत्याही सदस्याने गॅलरीकडे पाहून बोलू नये किंवा त्याचा संदर्भ देऊ नये किंवा आवाहन करू नये.

● गॅलरीमधील अभ्यागतांचा उल्लेख सदस्यांनी करू नये.

● एखादी हरकत नोंदविताना सभागृहात कागदपत्रे फाडू नयेत.

सभागृहात काठी घेऊन चालणे :

● मा. पीठासीन अधिकारी यांनी, केवळ अपवादात्मक परिस्थितीत मान्यता दिली असल्यास, अन्यथा सदस्यांनी सभागृहात काठी आणू नये. तसेच छत्री सभागृहात आणता येणार नाही.

● शारीरिक असमर्थतेमुळे सदस्यास व्हीलचेअर अथवा वॉकिंग स्टीक, मा. पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने बाळगता येईल.

शस्त्र इत्यादी बाळगणे :

● सभागृहात शस्त्र बाळगण्यावर प्रतिबंध आहे.

● सदस्यांनी खाद्यपदार्थ आणू नयेत.

● सदस्याने सदस्यांचा बिल्ल्याच्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा बिल्ला (बॅज्) लावू नये, घोषणा चिन्ह किंवा घोषवाक्य लावून बसू नये.

● सभागृहातील आपल्या आसनावर सदस्यांनी झेंडा किंवा चिन्ह मांडू नये.

● सदस्यांनी सभागृहात जाहिरात असलेला पोषाख परिधान करू नये.

● कपडे काढणे आणि सभागृहाच्या हौद्यातून ते दर्शविणे गर्हणीय आहे.

ध्वनिमुद्रिका वाजविणे :

● सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये भाग घेण्यासाठी सक्षम नसलेल्या व्यक्तींचा आवाज सभागृहाच्या नोंदींमध्ये जाऊ शकत नसल्यामुळे सदस्यांना सभागृहामध्ये ध्वनिमुद्रिका वाजविण्यास परवानगी नाही.

सभागृहामधील धरणे :

● कोणत्याही सदस्याने सभागृहात धरणे धरू नये आणि सभागृहाच्या हौद्यात ('वेल' मध्ये) घोषणाबाजी करू नये.

● जोपर्यंत सदस्य त्यांना निश्चित करून दिलेल्या जागेवर उभे राहत नाहीत आणि मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधत नाहीत तसेच त्याचे त्याच्या पक्ष किंवा गटामार्फत नाव पाठविण्यात आलेले असेल तसेच त्यांनी थेट मा. पीठासीन अधिकारी यांना पत्र लिहिले असले तरी तोपर्यंत मा. पीठासीन अधिकारी त्यांना बोलण्याची अनुमती देऊ शकणार नाहीत.

● पक्षांव्दारे किंवा गटांव्दारे किंवा व्यक्तीशः ज्या क्रमाने नावे दिली आहेत त्याच यादीनुसार किंवा क्रमाने नावे घेण्याचे मा. पीठासीन अधिकारी यांना बंधनकारक नाही. यादी ही केवळ त्यांच्या मार्गदर्शनासाठी राहील आणि आवश्यक तेव्हा त्यात बदल करणे हा नेहमीच मा. पीठासीन अधिकारी यांचा अधिकार राहील, जेणेकरून मा. पीठासीन अधिकारी यांनी वेळोवेळी आखून दिलेल्या सर्वसामान्य तत्त्वांनुसार कार्यवाहीचे नियमन करता येईल.

● मा. पीठासीन अधिकारी यांनी बोलण्याची परवानगी दिली नसतानाही जर सदस्य बोलत असेल किंवा भाषण आवरते घेण्याचे निदेश देऊनही ते बोलत राहिल्यास यथास्थिती असे भाषण किंवा त्यासंबंधीचा मजकूर हा सभागृहाच्या कार्यवाहीचा भाग होणार नाही, असे मा. पीठासीन अधिकारी निदेश देऊ शकतात.

मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधणे *(Catching the Speaker's Eye)*:

● बोलण्यासाठी ज्या सदस्याला अनुमती दिली आहे त्याने मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधले आहे असे समजण्यात येईल.

● मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधण्यात एखाद्या सदस्याला यश आल्यास यादीमध्ये त्याचे नाव नसले तरी तो बोलण्यास पात्र ठरतो.

● अधिकार म्हणून कोणताही सदस्य बोलू शकत नाही. त्यासाठी त्याने हात उंचावून मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करावा आणि तोपर्यंत वाट पहावी.

● पक्ष/गटांनी नाव सुचविले असले आणि भाषण करणाऱ्यांच्या यादीत नाव समाविष्ट असले तरी मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

● बोलण्याची अनुमती देण्याची विनंती घेऊन सदस्यांनी मा. पीठासीन अधिकाऱ्यांकडे जाऊ नये. ते आपली विनंती मौखिक किंवा लेखी स्वरूपात मा. पीठासीन अधिकाऱ्यांसमोर बसलेल्या अधिकाऱ्यांना देऊ शकतात.

● चर्चेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सदस्याला त्याचा उद्देश मा. पीठासीन अधिकारी यांना पक्ष प्रतोदांमार्फत किंवा थेट कळविता येतो. एखाद्या सदस्याला आपले नाव मा. पीठासीन अधिकारी यांना आगाऊ कळविण्याची इच्छा नसल्यास तो मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधण्यासाठी आपल्या जागेवर उभा राहू शकतो.

● मा. पीठासीन अधिकारी कोणत्याही सदस्याला त्यांच्या इच्छेनुसार बोलण्यास सांगू शकतात. सदस्याने सांगितल्यानुसार केवळ त्याच वेळी त्याला बोलणे हे आवश्यक नाही.

मा. पीठासीन अधिकाऱ्यांकडून भाषण करणाऱ्यांची निवड आणि कार्यवाहीचे नियमन :

● मा. पीठासीन अधिकारी यांच्या निवडीच्या संदर्भात जी व्यक्ती त्या अध्यक्षपदाचा तात्कालिक भार सांभाळत असेल ती तत्पूर्वी त्या पदावर असलेल्या व्यक्तीच्या कोणत्याही निदेशांचे पालन करण्यास बांधील नसते.

● तालिका सभाध्यक्ष म्हणून मा. पीठासीन असलेल्या सदस्यांना मा. पीठासीन अधिकारी यांनी नेमून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामकाजावर नियमन ठेवावे लागते.

● कोणत्याही चर्चेत सहभागी होणाऱ्या सदस्यांची संख्या व नावे निश्चित करण्याचे विवेकाधिकारही मा. पीठासीन अधिकारी यांना असतात.

● प्रत्येक लहान गटाने प्रत्येक चर्चेत सहभागी करून घेण्याबाबत आग्रही राहू नये.

● पक्षांच्या किंवा गटांच्या प्रतोदांमार्फत मा. पीठासीन अधिकारी यांना विवक्षित विषयावर बोलण्यास इच्छुक सदस्यांच्या नावांची यादी पुरविली जाते, ज्यामुळे नियंत्रित व संतुलित चर्चा सभागृहात घडविण्याची हमी मिळण्याकरिता मा. पीठासीन अधिकारी सदस्यांची निवड करतात. मात्र मा. पीठासीन अधिकारी अशा कोणत्याही यादीकरिता बांधील नसतात.

● पक्ष प्रतोदांकडून पुरविण्यात आलेल्या सदस्यांच्या याद्यांच्या आधारावर मा. पीठासीन अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी तयार केलेल्या याद्या व सदस्यांकडून प्राप्त झालेल्या विनंत्या यात बदल किंवा फेरफार करता येऊ शकतात.

● मा. पीठासीन अधिकारी हे, पक्ष प्रतोदांमार्फत किंवा गटांमार्फत पुरविण्यात आलेल्या सदस्यांच्या याद्यांच्या अनुषंगाने सदस्यांना पाचारण करतात. ज्या सदस्यांचे अशा याद्यांमध्ये नाव नसते त्यांनी यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी आपापल्या पक्ष किंवा गटाकडे संपर्क साधावा.

● एखाद्या चर्चेला उत्तर देण्यासाठी जेव्हा मंत्र्यास पुकारले जाते तेव्हा सदस्यांनी त्यांना बोलण्याची संधी मिळावी म्हणून केलेल्या विनंत्या मा. पीठासीन अधिकारी मान्य करीत नाहीत.

● पक्ष प्रतोदांमार्फत किंवा गटांमार्फत पुरविण्यात आलेल्या सदस्यांच्या याद्यांमध्ये ज्या सदस्यांची नावे समाविष्ट नसतात त्यांना ती यादी पूर्ण झाल्यानंतर कदाचित बोलण्याची परवानगी दिली जाऊ शकते.

● सर्वसाधारण प्रथा अशी आहे की, कोणत्याही विरोधी गटांना बोलण्याची दुसरी संधी देण्यापूर्वी सर्व विरोधी गटांना बोलण्याची पहिली संधी देण्यात येतेच.

● एखाद्या सदस्याने एखाद्या चर्चेच्या प्रसंगी नवी सुधारणा मांडली असेल किंवा चर्चा संपल्यानंतरही त्यास वेळ वाढवून दिली असेल तरीही तो त्याच विषयावरील चर्चेत पुन्हा भाग घेऊ शकत नाही.

अनुपस्थित सदस्यांकरिता संधी :

● एखादा सदस्य अनुपस्थित असेल किंवा गैरहजर असेल आणि मा. पीठासीन अधिकारी यांनी नाव पुकारल्यानंतरही तो भाषण करण्यासाठी आला नसेल तर असा सदस्य त्याची भाषणाची संधी गमावतो.

पक्ष/गट यांच्याकरिता वेळेची निश्चिती :

● सभागृहातील कामकाजावर नियमन ठेवण्यासाठी सभागृहातील विविध पक्ष/गट यांना त्यांच्या यथाक्रम संख्याबळानुसार कामकाजातील बाबींसाठी वेळ नेमून दिला जातो.

● मंत्र्यांकरिता निश्चित केलेल्या वेळेचे सत्तारूढ पक्षाकरिता निश्चित केलेल्या वेळेत मोजमाप होते.

दुसऱ्या सदस्याचे भाषण किंवा वर्तणुकीचा संदर्भ देणे :

● न्यायालयात सिद्ध होत नाही तोपर्यंत किंवा सभागृह अन्यायी ठरवत नाही तोपर्यंत एखादा सदस्य दुसऱ्या

सदस्याच्या वर्तणूकीबाबतचा संदर्भ देणार नाही.

- सदस्यांनी, इतर सदस्यांवर दोषारोप ठेऊ नये.

- सदस्यास अवहेलनापूर्वक नामनिर्देशित सदस्य म्हणून संबोधणे अनुज्ञेय नाही. सभागृहामध्ये नियुक्त आणि नामनिर्देशित अशा दोन्ही सदस्यांना समान हक्क आहेत आणि उभयतांमध्ये कोणताही फरक नाही.

- सदस्याने असे आरोप करणे अयोग्य ठरेल की, एखादा सदस्य बोलत असताना त्याला दुसरा एखादा सदस्य मदत करत आहे.

- सभागृहात भाषण करताना ते नेहमी मा. पीठासीन अधिकारी यांना उद्देशून असावे. सदस्याने, सभागृहात उपस्थित सदस्यांना संबोधून बोलू नये, त्याने केवळ मा. सभापती/मा. अध्यक्ष यांना संबोधून बोलावे आणि मा. सभापती/मा. अध्यक्ष यांच्या माध्यमातूनच इतर सदस्यांच्या बाबतीत भाष्य करावे. कोणाही व्यक्तिगत सदस्याला उद्देशून ते नसावे. तसेच ते गॅलरीतील व्यक्तींना उद्देशून किंवा त्यांच्याकरिता आहे असेही वाटता कामा नये.

असंसदीय शब्द/शब्दप्रयोग मागे घेणे :

- कोणत्याही सदस्याने असंसदीय भाषेचा वापर केल्यावर लवकरात लवकर अशा भाषेकडे मा. पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधावे.

- जेव्हा मा. पीठासीन अधिकारी, एखादा विशिष्ट शब्द किंवा शब्दप्रयोग असंसदीय असल्याचा निर्णय देतात तेव्हा अशा शब्दप्रयोगावर कोणतीही चर्चा उपस्थित करण्याचा प्रयत्न न करता तातडीने ते मागे घ्यावेत.

- सदस्यांनी भाषण करताना निंदानालास्ती करणारे आरोपात्मक किंवा असंसदीय शब्दप्रयोग करू नयेत.

- मा. पीठासीन अधिकारी यांनी एखादा विशिष्ट शब्द किंवा वाक्प्रयोग असंसदीय/आक्षेपार्ह असल्याचा निर्णय दिल्यानंतर असंसदीय शब्द वा वाक्प्रयोग कामकाजातून काढून टाकण्याचा आदेश दिल्यानंतर ते सभागृहाच्या छापील अहवालातून वगळण्यात येतात. तसेच त्याबाबत कोणतीही चर्चा न करता ते मागे घेतले पाहिजेत. एखाद्या सदस्याने असा शब्द किंवा शब्दप्रयोग मागे घेण्यास नकार दिला तर अशा सदस्याला सभागृहाच्या बाहेर जाण्यास देखील सांगण्यात येऊ शकते. सदर आदेशांचे अनुपालन करण्यासही त्या सदस्याने नकार दिला तर त्याला सभागृहाच्या सेवेतून निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला जाऊ शकतो.

- असंसदीय शब्द वा वाक्प्रयोगाची वेळोवेळी तयार करण्यात येणारी यादी ग्रंथालयात संदर्भासाठी मिळू शकते.

सभागृह, सभागृहाचे सदस्य आणि कार्यवाहींवर आक्षेप घेणे :

- सभागृहाच्या निर्णयावर आक्षेप घेण्याचा अधिकार सदस्यांना नसेल.

- इतर सभागृहांवर आक्षेप घेणे अयोग्य आहे.

- इतर सभागृहाच्या सदस्यांना नावाने संबोधणे अयोग्य आहे.

मा. पीठासीन अधिकारी यांचे आक्षेप घेणे :

- सदस्यांनी, मा. पीठासीन अधिकारी यांच्यावर कोणतेही आक्षेप घेऊ नयेत.

- सदस्यांनी मा. पीठासीन अधिकारी यांच्याप्रती अपमानास्पद शब्दप्रयोगाचा वापर करू नये किंवा त्यांच्या हेतुविषयी प्रश्न उपस्थित करू नये.

- राज्य विधिमंडळाच्या मा. पीठासीन अधिकारी यांचेवर चर्चा करणे सभागृहाच्या शिस्तीत बसत नाही.

राष्ट्रपतींच्या/राज्यपालांच्या नावाचा उल्लेख करणे किंवा राष्ट्रपतींवर/राज्यपालांवर आक्षेप घेणे :

- सदस्यांनी चर्चेदरम्यान राष्ट्रपतींच्या/राज्यपालांच्या नावाचा उल्लेख करू नये.

- राज्यांचे मंत्री, राज्य विधानमंडळे किंवा राज्यांचे राज्यपाल यांचेविरूध्द आरोप करणे अयोग्य आहे.

न्यायप्रविष्ट बाबी :

- एखाद्या प्रकरणी कायदेशीर प्रक्रिया जोपर्यंत प्रत्यक्षात सुरू होत नाही तोपर्यंत ते प्रकरण न्यायप्रविष्ट होत नाही.

न्यायालये/न्यायाधीशांचा संदर्भ देणे :

- सदस्यांनी उच्च न्यायालयाच्या संदर्भात योग्य तो शब्दप्रयोग करावा.

- सदस्यांनी उच्च न्यायालयाबाबत किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या वर्तनाबाबत सभागृहात चर्चा करू नये.

- उच्च न्यायालयाने न्यायालयांवरील खर्च घटविण्याबाबतच्या प्रस्तावावर केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीवर टीका-टिप्पणी करणे अनुज्ञेय आहे, परंतु, न्यायालयीन कार्यवाहीवर नाही.

- भारताच्या सरन्यायाधीशांनी विधि आयोगाच्या अहवालात केलेल्या वक्तव्याच्या विरोधात मत व्यक्त करणे म्हणजे भारताच्या सरन्यायाधीशांच्या विरोधात विचार मांडणे असे मानले जात नाही.

- केवळ पूरक प्रस्तावाच्या माध्यमातून न्यायमूर्तींच्या वर्तनावर चर्चा करता येते.

- उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या गुणदोषांवर चर्चा अनुज्ञेय नाही तसेच उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांशी संबंधित बाबींवर सभागृहात झालेल्या चर्चेच्या कार्यवाहीची प्रत न्यायालयास सादर करता येत नाही.

भाषणांसंदर्भात नियम :

- सदस्यांने नेमून दिलेल्या जागेवरून भाषण केले पाहिजे. सदस्यांना बोलावयाचे असल्यास त्यांनी आपल्या जागेवर उभे राहून मा. पीठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घ्यावे. मा. पीठासीन अधिकारी यांनी परवानगी दिल्याखेरीज

सदस्यांनी बोलता कामा नये. मा. पीठासीन अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय आणि त्यांनी नावाने किंवा खूण करून बोलण्यास सांगितल्याशिवाय सदस्यांनी बोलू नये.

● बैठक चालू असताना सदस्यांनी मा. पीठासीन अधिकारी आणि भाषण करणारा वा बोलणारा सदस्य यांच्यामधून जाऊ नये (क्रॉस द फ्लोअर).

● सदस्यांनी आपल्या जागेवरून उठून मा. पीठासीन अधिकारी यांच्या आसनाकडे जाऊ नये, आवश्यक असेल तेव्हा त्यांनी, मा. पीठासीन अधिकारी यांचेसाठी कागदावर आपले म्हणणे लिहून सचिवांकडे चिठ्ठी पाठवावी.

● अगोदर बोललेल्या सभासदाच्या भाषणातील मुद्यांची पुनरूक्ती शक्यतोवर होता कामा नये.

● सदस्यांना त्यांच्या भाषणांमधून जनतेस कायदेभंगाचा सल्ला देता येणार नाही तसेच त्यांना धमकावतादेखील येणार नाही.

● मा. पीठासीन अधिकारी यांना संबोधित करताना हातवारे करणे वा अंगुलिनिर्देश करणे सभ्याचारास सोडून ठरते.

● मा. पीठासीन अधिकारी केवळ काही शारीरिकदृष्ट्या असमर्थ असलेल्या सदस्यास खाली बसून बोलण्याची अनुमती देऊ शकतील.

● सदस्यांनी, आपले भाषण संपल्याबरोबर सभागृहातून निघून जाणे शिष्टाचारसंमत नाही. सदस्यांनी, सभागृहातील चर्चा सुरू असताना, त्यातील केवळ आपल्या भाषणापुरते नव्हे तर चर्चा पूर्ण होईपर्यंत व त्यावरील मंत्रीमहोदयांच्या उत्तराच्यावेळी देखील सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. अगदी आवश्यक असल्यास काही वेळ बसून नंतर त्यांना सभागृहातून निर्गमन करता येईल.

● भाषणाच्या ओघात एखाद्या सदस्यांविरूद्ध किंवा मंत्र्यांविरूद्ध टीका केली असल्यास त्याचे उत्तराच्या वेळी सभागृहात गैरहजर राहणे संसदीय शिष्टाचाराचा भंग समजला जातो.

● कुठल्याही सदस्याचा नावानिशी उल्लेख करताना त्याच्या सद्हेतूबद्दल शंका घेणारे किंवा हेतू चिकटवणारे वक्तव्य करता कामा नये.

● अन्य सदस्यांचा उल्लेख करताना व्दितीय पुरूषी सर्वनाम "तुम्ही" असा उल्लेख करू नये तर "आपण" असा उल्लेख करावा. सदस्यांनी नेहमी तृतीय पुरूषी संबोधने वापरावीत व व्यक्तिगत संदर्भ देणे टाळावे तसेच सभ्य भाषेचा वापर करावा.

● मंत्र्यांखेरीज इतर सदस्यांचा उल्लेख करताना "मा.सदस्य श्री....."असा उल्लेख करावा. "मा.श्री....." असा करू नये.

● सदस्याला आपले लेखी भाषण सभागृहात वाचून दाखविता येणार नाही. तथापि, संदर्भासाठी टिपणांचा उपयोग करता येईल. मंत्री वगळता, सदस्यांनी लिखित भाषणे पूर्वपरवानगीखेरीज वाचून दाखवू नयेत.

● भाषणादरम्यान काव्याच्या काही ओळी वाचता येतील परंतु संपूर्ण भाषण काव्यातून करता येणार नाही.

● सदस्यांना वितरित केलेल्या विधेयकावरील मतप्रदर्शनातून दीर्घ उतारे वाचून दाखविणे निषिद्ध आहे.

● सदस्यांना सभागृहामध्ये निनावी पत्रे वाचून दाखविता येणार नाहीत. माहितीसाठी आधार घेतलेल्या प्राधिकरणाचे नाव उघड करावे लागेल किंवा प्राप्त माहिती आपल्या स्वतःच्या शब्दात मांडावी लागेल.

● सदस्यांना त्यांची लिखित भाषणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास अनुमती देता येईल.

● सभागृहात एखाद्या बाबतीत मत द्यावयाचे असल्यास अनुकूल असलेल्या सदस्यांनी "होय" म्हणावे आणि प्रतिकूल असलेल्यांनी "नाही" म्हणावे.

● कोणतीही सूचना मा.पीठासीन अधिकारी यांनी मान्य करून सदस्यांना प्रसृत झाल्याखेरीज वृत्तपत्रात प्रसिद्ध करता कामा नये. तसेच विचारलेल्या प्रश्नांचे सभागृहात उत्तर दिले गेल्याखेरीज त्याला प्रसिद्धी देऊ नये.

वस्तूंचे प्रदर्शन / कागदपत्रांचे सादरीकरण :

● पुराव्यादाखल एखादी वस्तू सभागृहात सादर करणे अयोग्य आहे. भाषणादरम्यान वस्तू वा कागदपत्रांचे प्रदर्शन वा त्यांचे सभागृहाच्या पटलावर सादरीकरण करता येणार नाही.

● काही वस्तू प्रदर्शित करावयाच्या असल्यास सदस्यांस त्या सभागृहास केवळ दाखविता येतील परंतु त्या सभागृहाच्या पटलावर ठेवता येणार नाहीत.

● सदस्यांना आपल्या भाषणाच्या पुष्ट्यर्थ कागदपत्रे मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे पाठविता येणार नाहीत, कारण विविध बाबींवर मा. पीठासीन अधिकारी नव्हेत तर सभागृह निर्णय घेत असते. भाषणादरम्यान मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे कागदपत्रे देण्याच्या हेतूने जाणेदेखील निषिद्ध आहे.

● कागदपत्रे फाडणे वा त्यांस आग लावणे आदि कृत्ये सभागृहात निषिद्ध आहेत.

मंत्र्यांच्या वर्तनाबाबत चर्चा करणे :

● सदस्यांनी शासनावर टीका करताना चर्चेची पातळी राखावी आणि इतर सदस्यांनी सभ्याचार सोडून केलेल्या शब्दप्रयोगांबद्दल आपली नापसंती दर्शवावी.

● मंत्र्यांच्या वर्तनाबाबत चर्चा केवळ मा. पीठासीन अधिकारी यांनी विहित केलेल्या स्वरूपात योग्य तो प्रस्ताव दिल्यानंतरच करता येईल.

● सदस्यांना सभागृहात भाषणस्वातंत्र्य असले तरीदेखील सदस्यांनी मंत्र्यांविरूद्ध आरोप करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित तथ्यांची खातरजमा करावी व त्याबद्दल शंका असल्यास संबंधित मंत्र्यांशी पत्रव्यवहार करून त्याबद्दल निरसन करून घ्यावे.

● आरोपित सदस्य वा मंत्र्यांनी त्यांच्याविरूद्ध केलेल्या आरोपांस नाकारल्यानंतर आरोप करणाऱ्या सदस्याने, सदर आरोपाच्या अचूकतेबद्दल खात्री नसल्यास आणि सदर आरोपाची संपूर्ण जबाबदारी घेण्याची तयारी नसल्यास, असा नकार साधारणतः स्वीकारावा. दोन्ही पक्ष आपापल्या बाजूंवर ठाम असल्यास व मा.पीठासीन अधिकारी करतील त्या चौकशीस सामोरे जाण्याची त्यांची तयारी असेल तर त्यांना त्यांच्या ताब्यातील अधिक पुरावा देण्यास सांगता येते. प्रकरणातील पुरावे व तथ्यांची तपासणी करून मा. पीठासीन अधिकारी आपले निष्कर्ष सभागृहास कळवतील. तद्नंतर संबंधितांपैकी एका सदस्याने दिलगिरी व्यक्त केल्यास प्रकरण निकाली निघाल्याचे मानण्यात येईल.

● पूर्वसूचना न देता मंत्र्यांचे नाव घेऊन आरोप करण्यात आल्यास मंत्र्यांचे नाव कार्यवाहीतून विलोपित करण्यात येईल.

● सदस्यांना मंत्र्यांची उलटतपासणी घेता येणार नाही.

● गंभीर आरोप करावयाच्या बाबी उपस्थित करण्याची कार्यपद्धती मा. पीठासीन अधिकारी वा संबंधित मंत्री महोदयांस पूर्वसूचना दिल्याखेरीज तसेच, उच्चाधिकारी व मंत्र्यांच्या संबंधात, योग्य त्या प्रस्तावाच्या स्वरूपात असल्याखेरीज मानहानिकारक व दोषारोप करणाऱ्या बाबींवर चर्चा करता येणार नाही.

● सभागृहाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणाऱ्या आरोपांना कार्यवाहीतून विलोपित करण्यात येते.

सदस्यांविरूद्ध आरोप :

● निवडणूकीदरम्यान केलेल्या कथित भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळणे हे न्यायालयांचे काम असून त्यासंदर्भातील आरोप मनमानी पद्धतीने सभागृहाच्या पटलावर करण्यात येऊ नयेत.

● सदस्यांनी, इतर सदस्यांना कोणत्याही परकीय देशाचे दलाल म्हणून संबोधू नये.

● सदस्यांच्या एखाद्या गटाविरूद्धच्या आरोपांप्रकरणी एखाद्या प्रस्तावावर चर्चा सुरू असताना, सदस्यांना त्यांच्या भाषणामध्ये अशा गटाच्या सदस्याविरूद्ध, जरी असा सदस्य सभागृहात उपस्थित नसला तरी, बोलता येईल. परंतु आरोप करणाऱ्या सदस्याने सर्वतोपरी काळजी घ्यावी की त्याचे कथन वस्तुस्थितीवर आधारित आहे.

सरकारी अधिकाऱ्यांवरील दोषारोप :

● सभागृहामध्ये चर्चा सुरू असताना सदस्यांना आणि मंत्र्यांना एखाद्या अधिकाऱ्याची किंवा एखाद्या त्रयस्थ व्यक्तीची स्तुती किंवा निंदा करण्याची अनुमती नाही.

● सदस्यांनी, त्याच्या भाषणामध्ये सरकारी अधिकाऱ्यांच्या नावांचा उल्लेख करू नये.

● सदस्यांनी, बोलतेवेळी राज्याच्या एखाद्या अधिकाऱ्याविरूद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत.

● सदस्यांनी, बोलतेवेळी शासकीय उपक्रमांमधील अधिकाऱ्याविरूद्ध अनैतिकतेचे आरोप करू नयेत.

● ज्या अधिकाऱ्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे अशाच अधिकाऱ्यांचा उल्लेख करण्यात येईल आणि अशा अधिकाऱ्यांच्याविरूद्ध कोणतेही आरोप करण्यात येणार नाहीत.

● शासकीय कर्मचाऱ्यांविरूद्ध आरोपासंबंधीच्या प्रस्तावाची सूचना देणाऱ्या सदस्याने सदर प्रस्ताव मांडण्यासाठी किंवा मागे घेण्यासाठी सभागृहामध्ये आपल्या आसनावर उपस्थित रहावे आणि आरोपामध्ये तथ्य नसेल तर त्यात योग्य त्या सुधारणा कराव्यात. शासकीय अधिकाऱ्यांविरूद्ध केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांबद्दल मंत्र्यांना आगाऊ अवगत करावे जेणेकरून त्यांना त्या प्रकरणी चौकशी करून सभागृहात उत्तर देता येईल.

सभागृहात उपस्थित नसलेल्या प्रतिष्ठीत व्यक्ती आणि इतर व्यक्ती यांचे विरूद्ध केलेली टीका :

● चर्चेदरम्यान राजदूत, इतर सभागृह किंवा इतर विधानमंडळाचे सदस्य किंवा सभागृहात उपस्थित नसलेल्या व्यक्तींवर टीका करू नये.

● सदस्यांनी, सभागृहात उपस्थित नसलेल्या व उत्तरादाखल आरोपांचे खंडन करू न शकणाऱ्या व्यक्तींची नावे अथवा त्यांच्या पदनामांचा संदर्भ देऊ नये. सभागृहास उत्तरदायी असेल अशा प्रभारी मंत्र्यांना उद्देशून टीका असावी.

● एखाद्या अहवालावर चर्चा करण्यात येत असताना त्या अहवालात नमूद न केलेल्या वैयक्तिक अधिकाऱ्यांच्या नावांचा संदर्भ देता येणार नाही. अशा नावांचा संदर्भ वृत्तपत्रांमध्ये दिला असला तरी सभागृहामध्ये त्यांचा संदर्भ देण्यास अनुमती नसेल.

● आरोपांचे खंडन करण्यासाठी सभागृहात उपस्थित नसतील अशा व्यक्तीविरूद्ध आरोप करण्यास अनुमती नसेल. मा.पीठासीन अधिकारी, सदस्यांना अशा प्रकारचे आरोप करण्यास मनाई करतील आणि असे आरोपात्मक भाष्य वगळतील.

● शासकीय गॅलरीमध्ये उपस्थित अधिकारी/व्यक्तींच्या संदर्भात बोलणे अनुज्ञेय नाही.

विधानमंडळ सचिवालयाविरूद्धचे आरोप :

● सदस्यांनी, विधानमंडळ सचिवालयाचा थेट संदर्भ देऊ नये, विधानमंडळ सचिवालयाशी संबंधित कोणतीही बाब सभागृहात उपस्थित करता कामा नये. तसेच सभागृहाच्या अधिकाऱ्यांचा, चर्चेच्या दरम्यान उल्लेख करण्यात येऊ नये. कार्यालयात घडलेल्या कोणत्याही घटनेची संपूर्ण जबाबदारी मा.पीठासीन अधिकारी यांची असते.

यासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास मा.पीठासीन अधिकारी आणि सभागृह यांच्यातील बाब राहील.

विधानपरिषदेतील कार्यवाही :

● विधानसभेत मंत्र्यांनी केलेल्या निवेदनात विसंगती असल्यास, सदस्य, विधानपरिषद सभागृहामध्ये कार्यवाहींचा उल्लेख करू शकतील.

● एखाद्या सभागृहास, कोणत्याही प्रकरणामध्ये इतर सभागृहाच्या निर्णयांची अपेक्षा करून त्या निर्णयांच्या आधारावर आक्षेप नोंदवणे योग्य नाही.

● विधानसभेत विधानपरिषदेच्या व विधानपरिषदेत विधानसभा सदस्यांचा आरोपात्मक संदर्भ देणे अयोग्य आहे.

इतर सदस्यांकरवी प्रश्न विचारणे :

● सदस्यांनी, बोलतेवेळी वैयक्तिक सदस्यांना उद्देशून प्रश्न न विचारता मा. पीठासीन अधिकारी यांना उद्देशून प्रश्न विचारावेत आणि मा. पीठासीन अधिकारी यांच्या माध्यमातून इतर सदस्यांप्रकरणी सर्व भाष्य करावे.

● दुसरा सदस्य बोलत असताना, सदस्याने त्याच्याशी युक्तीवाद करू नये. तथापि, सदस्यास बोलणाऱ्या सदस्याकडून माहिती प्राप्त करण्याच्या हेतूने मा. पीठासीन अधिकारी यांच्या माध्यमातून प्रश्न विचारता येईल. परंतु, मा. पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने, सभागृहात बोलणाऱ्या सदस्याच्या भाषणामध्ये, सर्वसामान्य नियमान्वये, दुसऱ्या सदस्याने व्यत्यय आणू नये.

● मा. पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय सदस्यांकडून होणारे भाष्य कार्यवाहीचा भाग राहणार नाही.

● मा. पीठासीन अधिकाऱ्यांनी वारंवार सांगूनही भाषण आवरते न घेता एखादा सदस्य बोलतच राहिल्यास त्या सदस्याच्या भाषणाची नोंद न करण्याचे निदेश मा. पीठासीन अधिकारी देऊ शकतात आणि पुढील सदस्याला भाषणासाठी पुकारू शकतात.

वैयक्तिक स्पष्टीकरणाचा मसुदा :

● म.वि.प.नियम ४७/म.वि.स.नियम ४८ अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरण - सभागृहासमोर विषय नसतानाही मा. पीठासीन अधिकारी यांच्या परवानगीने एखादा सदस्य वैयक्तिक स्पष्टीकरण देऊ शकतो.

● सदस्याने मा. पीठासीन अधिकारी यांना पुरेसे आगाऊ लेखी वैयक्तिक स्पष्टीकरणाचे निवेदन सादर केले नाही आणि त्याला मा. पीठासीन अधिकारी यांनी मान्यता दिली नाही तर कोणत्याही सदस्याला म.वि.प. नियम ४७/ म.वि.स.नियम ४८ अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरणाच्या माध्यमातून निवेदन करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मा. पीठासीन अधिकारी यांनी मान्य केलेल्या निवेदनात नसलेले परंतु बोलले गेलेले शब्द, वाक्य आणि भाष्य हे सभागृहाच्या कार्यवाहीचा भाग होणार नाही.

● सदस्याद्वारे करण्यात येणारे वैयक्तिक स्पष्टीकरण हे प्रथम वचनी असायला हवे जेणे करून त्यामध्ये उद्धृत सत्यस्थितीची पूर्ण जबाबदारी तो घेईल.

● सभागृहात मंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यात सदस्याच्या नावाचा उल्लेख केला असल्यास, जर त्याला वैयक्तिक स्पष्टीकरण करण्याची इच्छा असल्यास त्याने मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे आगाऊ सादर केलेल्या वैयक्तिक स्पष्टीकरणाची एक प्रत संबंधित मंत्र्यांना पाठवावी.

● सभागृहात आधी केलेल्या वक्तव्यातील काही चुका दुरूस्त करण्यासंदर्भात सदस्याला वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे असल्यास, जे नेमके वक्तव्य करावयाचे आहे त्याची एक प्रत मा. पीठासीन अधिकारी यांना आगाऊ सादर करावी.

● सदस्याच्या वैयक्तिक स्पष्टीकरणानंतर, इतर सदस्य किंवा संबंधित मंत्र्यांना आपली भूमिका स्पष्ट करावयाची असल्यास, त्याची प्रत मा. पीठासीन अधिकारी यांना आगाऊ सादर केल्यानंतरच त्यांना निवेदन करण्याची परवानगी दिली जाऊ शकते.

● तथापि, ज्या सदस्याच्या भाष्याबाबत वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यात येणार आहे त्या सदस्याला वैयक्तिक स्पष्टीकरणाची प्रत आगाऊ देण्याची प्रथा नाही.

वैयक्तिक स्पष्टीकरणाची ग्राह्यता :

● जवळ असलेल्या कागदपत्रांच्या आधारे एखाद्या मंत्र्याने केलेले निवेदन त्याच्या सत्यतेला आव्हान देणारा मुद्दा जाणीवपूर्वक उपस्थित केला नसेल तर सर्वसाधारणपणे खरे मानले जाते.

● सदस्य, सभागृहात करण्यात आलेल्या दोषारोपाबाबत शासनाकडून नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीवरचा सदस्य असल्यास, त्याला आपली भूमिका मांडण्याबाबत वैयक्तिक स्पष्टीकरणासाठी परवानगी देण्यात येईल.

● ज्या सदस्याच्या विरोधात काही मंत्र्यांकडून किंवा सदस्यांकडून चर्चेदरम्यान व्यक्तिशः आरोप करण्यात आले असतील तोच सदस्य वैयक्तिक स्पष्टीकरण करू शकेल.

● सदस्य म्हणून अन्यथा इतर कोणत्याही संदर्भात आरोप झाले असले तरी ज्या सदस्याच्या विरोधात सभागृहामध्ये दोषारोप करण्यात आले असतील त्याला वैयक्तिक स्पष्टीकरण करता येईल.

● सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अहवालामध्ये सदस्याच्या वर्तणुकीचा उल्लेख असल्यास, त्याला आपली भूमिका मांडण्याबाबत वैयक्तिक स्पष्टीकरणासाठी परवानगी देण्यात येईल.

● साधारणतः जेव्हा सदस्याकडून सभागृहामध्ये एखाद्या सदस्याच्या वर्तणुकीबाबत आव्हान देण्यात आले असेल किंवा त्याचा काही निवेदन किंवा उद्देशाशी संबंध लावला गेला असेल तर त्याला वैयक्तिक स्पष्टीकरणाची परवानगी देता येऊ शकते.

● **(अ)** सभागृहामध्ये विशिष्ट राजकीय पक्षाच्या विरोधात दोषारोप करण्यात आले असतील तर त्या पक्षाच्या किंवा गटाच्या प्रमुखाला त्यासंदर्भात निवेदन करता येईल.

● **(ब)** अशा बाबतीत सभागृहाची चौकशी न्यायालय म्हणून भूमिका असणार नाही. मा.पीठासीन अधिकारी यांना वस्तुस्थितीबाबत विरोधी मते आढळून आल्यास, ते सभागृहामध्ये दोन्ही मते व्यक्त करण्यासाठी निवेदन करण्यास मान्यता देऊ शकतात आणि त्याचे निष्कर्ष काढणे सदस्यांवर सोपवितात.

● एखाद्या सदस्याला अन्य सदस्याने दिलेल्या अभिप्रायांवर वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे असल्यास, त्यास स्पष्टीकरणाचा विषय मांडावयास सांगण्यात येते.

प्रतिस्पष्टीकरण :

● जेव्हा सदस्याकडून वैयक्तिक स्पष्टीकरण केले जाते तेव्हा प्रथेनुसार दुसऱ्या सदस्याला प्रतिस्पष्टीकरण करण्याची परवानगी नसते.

भाषणादरम्यान स्पष्टीकरण :

● एखाद्या सदस्याला, अन्य सदस्य भाषण करीत असताना वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे असेल व भाषण करणाऱ्या सदस्याने वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यास परवानगी दिली तर अन्यथा त्या सदस्याचे भाषण पूर्ण होण्याची वाट पहावी लागेल.

● सदस्य भाषणाच्या दरम्यान दीर्घ वैयक्तिक स्पष्टीकरण करू शकत नाही. त्याकरिता त्याला तशी परवानगी मिळवावी लागेल आणि सभागृहामध्ये स्वतंत्रपणे मुद्दा उपस्थित करावा लागेल.

वैयक्तिक स्पष्टीकरण नाकारणे :

● (१) इतर सदस्यांनी व्यत्यय आणल्यामुळे (२) मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी पुरवणी प्रश्नांना परवानगी दिली नसल्याकारणाने, वैयक्तिक स्पष्टीकरण करता येणार नाही.

● कार्यवाहीच्या अखेरीस उत्तरादाखल भाषण करण्याचा अधिकार असल्याकारणाने स्वतंत्रपणे वैयक्तिक स्पष्टीकरणाची परवानगी नाकारली जाऊ शकते.

● स्वत:चे अभिप्रायाबाबत खुलासा देण्यासाठी वैयक्तिक स्पष्टीकरण देऊ नये.

● कामकाजाच्या क्रमामध्ये एखादी बाब समाविष्ट असली तरी सदस्याने केलेल्या विधानात आक्षेपार्ह मजकूर असेल तर, त्या सदस्यास वैयक्तिक स्पष्टीकरण देता येऊ शकत नाही.

सदस्यांची अपूर्ण भाषणे :

● एखाद्या सदस्याने अपूर्ण भाषण केलेले असून जर संबंधित बाबींवरील चर्चेच्या पुर्नप्रारंभाच्या वेळी तो सभागृहात उपस्थित नसल्यास, त्याचे भाषण पूर्ण झाल्याचे समजण्यात येते.

*****

परिशिष्टे

परिशिष्ट क्रमांक - १

विधानमंडळ सचिवालय कार्यालय व्यवस्था, विधान भवन (गोल इमारत)

*****

तळ मजला - विधानसभा सभागृह

तपशील	कक्ष क्रमांक
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा	०४१
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय	०४५
विधानसभा कामकाज सल्लागार समिती कक्ष	०४२ ते ०४४
मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा	०१९
मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय	०१८
प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	०२१
निवडणूक कार्यालय	०२२
मा.मंत्री	०२३,०२४,०२५,०२७
सी.सी.टी.व्ही.यंत्रणा	०२६
समादेशक अधिकारी (अग्निशमन), म.वि.स.	०२८-अ
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद	०२९
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय	०३०
मा.मुख्यमंत्र्यांचे उप सचिव	०४६
माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा	०४८
विधानमंडळ मा.महिला सदस्यांकरीता राखीव	०४९
सामान्य कक्ष (ग-२), सामुग्री वितरण	०१७
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद	०५० व ०५१
रेल्वे आरक्षण कक्ष	०५१-अ (पोटमाळा)

❖ **मागील प्रवेशद्वार येथे स्टेट बँक ऑफ इंडिया ATM जवळ टपाल स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.**

पहिला मजला

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद	१४२ व १४३
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय	१४६
विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती कक्ष व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, समिती कक्ष	१४४ व १४५
मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद	११४ ते ११६
मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे कार्यालय	११६
मा.मंत्री दालन	११७
वार्ताहर दालन (विधानसभा)	११८ व ११९
मा.मंत्री दालन	१२० ते १२५
विधानमंडळ काँग्रेस (आय), पक्ष कार्यालय	१२६ ते १२८
मुख्य सुरक्षा अधिकारी, मविस	१२९
मा.मंत्री दालन	१३०
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा	१३१ ते १३३
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय	१३३ व १४८
विधानसभा गॅलरी	१०१ ते ११३

दुसरा मजला

विधानपरिषद सभागृह

तिसरा मजला

विधानपरिषद गॅलरी

चौथा मजला

मध्यवर्ती सभागृह,

मा.राज्यमंत्री यांची दालने - ४-अे ते ४-एल व

प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, वित्त विभाग व संसदीय कार्य विभाग - कार्यालय

पाचवा मजला

मध्यवर्ती सभागृह, गॅलरी

*****

प्रशासकीय इमारत

तळ मजला

तपशील	कक्ष क्रमांक
मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	०३७
मा.मुख्यमंत्री, यांचे बैठकीचे दालन	०३८
मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव	०३९
मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव	०३६
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव	०४०
मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	०३१ ते ०३४
मा.मंत्री दालन	०३५

पहिला मजला

मा.मंत्री व मा.राज्यमंत्री दालन	१३४ व १३५
मा.मंत्री दालन	१३६ (अ, ब, क, ड)
सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद (सत्र कालावधी) दालन	१४१-अ
मा.मंत्री व मा.राज्यमंत्री दालन	१३७ व १३८
मा.मंत्री व मा.राज्यमंत्री दालन	१४१ - (अ, ब, क, ड)
मा.मंत्री दालन	१३९ (अ, ब, क)

दुसरा मजला

विधानमंडळ कर्मचाऱ्यांकरिता उपाहारगृह	२११ व २१२
मा.मंत्री व राज्यमंत्री दालन	२१३ व २१४

तिसरा मजला

विधिमंडळ बहुजन विकास आघाडी पक्ष कार्यालय	३०१-अ
विधिमंडळ शेतकरी कामगार पक्ष कार्यालय	३०१-ब
विधिमंडळ लोकभारती पक्ष कार्यालय	३०१-क
मा.मंत्री दालन	३०२

विधिमंडळ अपक्ष कार्यालय	३०३ अ, ब
विधिमंडळ शिवसेना पक्ष कार्यालय	३०४, ३०५ व ३०६

चौथा मजला

भारतीय जनता पक्ष बैठकीचे दालन	४१२
विधिमंडळ भारतीय जनता पक्ष कार्यालय	४१३
वार्ताहर दालन (विधानपरिषद)	४१४
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बैठकीचे दालन	४१५
विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय	४१६

पाचवा मजला

श्री.निलेश वडनेरकर, ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी	५११
ग्रंथालय	५१०, ५११

सहावा मजला

ग्रंथालय	६०२, ६०३

सातवा मजला

क्ष - कक्ष (प्रतिवेदन कक्ष)	७०८ व ७०९
संगणक नियंत्रण कक्ष	७१०
समिती कक्ष	७११ व ७१२

आठवा मजला

समिती कक्ष	८०१
श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	८०२ व ८०३
श्री. सुनिल झोरे, अवर सचिव (समिती)	८०४
राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा कार्यालय, राजशिष्टाचार व जनसंपर्क कक्ष	८०४

श्री. अजय सर्वणकर, पद्धती विश्लेषक क-३ - कक्ष (संगणक कक्ष व संगणक प्रशिक्षणवर्ग कक्ष)	८०५

नववा मजला

माजी आमदार समन्वय समिती, दालन	९०१-अ
पुरोगामी लोकशाही आघाडी (विधानपरिषद), दालन	९०१-ब
विधिमंडळ समाजवादी पक्ष कार्यालय	९०१-क
एम.के.सी.एल. कार्यालय	९०२
सचिव, मविस कार्यालय	९०३
श्री. अनिल महाजन, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्यकारी अधिकारी	९०४
सह सचिव, मविस यांचे दालन	९०५
ड-११ कक्ष (उप विधान समिती) व ड-१६ कक्ष (महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती)	९०५

दहावा मजला

श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव	१००१
ड-१ कक्ष (लोकलेखा समिती)	१००१
श्री. अजय अग्रवाल, कार्यवाही संपादक	१००२-अ
उप सचिव (विधी)	१००२-ब
मा. समिती प्रमुख, विनंती अर्ज समिती, विधानपरिषद	१००२-क
सत्तारुढ पक्ष बैठकीचे दालन	१००३ व १००४

अकरावा मजला

माहिती अधिकार कक्ष	११०१ - अ
श्री. विलास आठवले, उप सचिव	११०१ - ब
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव	११०१ - क

श्री. शिवदर्शन साठये, उप सचिव	११०२ - अ
उप सचिव यांचे दालन	११०२ - क
श्रीमती स्वाती ताडफळे, उप सचिव तथा नियंत्रण आधिकारी	११०२ - क
श्री. घननीळ देबडवार, अवर सचिव (समिती)	११०३
अ-कक्ष (विधानसभा)	११०३
श्री. राजेश तारवी, उप सचिव	११०४ - अ
श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव तथा उप सचिव (विधी) अ.का.	११०४ - ब
उप सचिव यांचे दालन	११०४ - क (रिक्त)

बारावा मजला

श्री. उमेश शिंदे, अवर सचिव	१२०१
फ-कक्ष (प्रस्ताव, लक्षवेधी सूचना इ.-विधानसभा)	१२०१
ड-१० कक्ष (विशेष हक्क समिती विधानसभा/विधानपरिषद)	१२०१
ड-३ कक्ष (अंदाज समिती)	१२०२
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव	१२०३
ड-१७ कक्ष (मराठी भाषा समिती)	१२०४
ब-कक्ष (प्रश्न - विधानसभा)	१२०३ व १२०४

तेरावा मजला

श्री. रविंद्र जगदाळे, अवर सचिव	१३०१
क-३ कक्ष (लेखा)	१३०१, १३०२
ई-२ कक्ष (प्रस्ताव, लक्षवेधी सूचना इ.-विधानपरिषद)	१३०३
श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव (समिती)	१३०४
ई-१ कक्ष (प्रश्न - विधानपरिषद)	१३०४

चौदावा मजला

श्री.सुभाष नलावडे, अवर सचिव	१४०१
क-१ कक्ष (आस्थापना)	१४०१

श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव	१४०२
क-१ कक्ष (अर्थसंकल्प)	१४०२
श्री.संतोष पराडकर, अवर सचिव	१४०३
ड-७ कक्ष (रोजगार हमी योजना समिती)	१४०३
ड-१२ कक्ष (इतर मागासवर्ग कल्याण समिती)	१४०३
श्री. आशिष जावळे, अवर सचिव (समिती)	१४०४-अ
अवर सचिव (समिती)	१४०४-ब
श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव (समिती)	१४०४-क
श्री. मोहन काकड, अवर सचिव	१४०४-ड
अवर सचिव (समिती) यांचे दालन	१४०४-ई (रिक्त)

पंधरावा मजला

श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव	१५०१
ड-६ कक्ष (पंचायत राज समिती)	१५०१
ड-९ कक्ष (विनंती अर्ज समिती/ नियम समिती-विधानपरिषद)	१५०१
ड-२ कक्ष (सार्वजनिक उपक्रम समिती)	१५०२
ड-१४ कक्ष (आश्वासन समिती-विधानसभा)	१५०२
ड-९ कक्ष (विनंती अर्ज समिती/ नियम समिती-विधानसभा)	१५०२
ड-४ कक्ष (अनुसूचित जाती कल्याण समिती)	१५०३
ड-५ कक्ष (विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती)	१५०३
ड-८ कक्ष (अनुसूचित जमाती कल्याण समिती)	१५०३
ड-१३ कक्ष (आश्वासन समिती-विधानपरिषद)	१५०३
अभिलेख कक्ष	१५०४

सोळावा मजला

य - कक्ष (अनुवाद तथा संपादन)	१६०१
क्ष - कक्ष (टंकलेखन कक्ष)	१६०२
ग-१ - कक्ष (झेरॉक्स व रोनीओ चालक)	१६०२

अवर सचिव (समिती) यांचे दालन	१६०३ (रिक्त)
श्री. विजय कोमटवार, अवर सचिव	१६०४
ह-१ व ह-२ कक्ष (विद्यमान/माजी सदस्यांचे वेतन,भत्ते,निवृत्तीवेतन इ.)	१६०३, १६०४

सतरावा मजला

समिती प्रमुख, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती	१७०१ - अ
समिती प्रमुख, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती	१७०१ - ब
समिती प्रमुख, मराठी भाषा समिती	१७०१ - क
समिती प्रमुख, इतर मागासवर्ग कल्याण समिती	१७०१ - ड
समिती प्रमुख, रोजगार हमी योजना समिती	१७०१ - इ
श्री. निलेश मदाने, जनसंपर्क अधिकारी तथा संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र (अ.का.)	१७०२
वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र, म.वि.स.	१७०२
ग-१ - कक्ष (सामान्य कक्ष)	१७०३
भारतीय स्टेट बँक	१७०४

अठरावा मजला

मुख्य प्रतोद व प्रतोद यांची दालने	१८०१ ते १८०३
फितध्वनी मुद्रण कक्ष	१८०४ - क
ध्वनीयंत्रणा चालक तथा यांत्रिकी कक्ष	१८०४ - ब
रिक्त	१८०५

एकोणीसावा मजला

समिती कक्ष	१९०१ ते १९०३
समिती प्रमुख, अनुसूचित जाती कल्याण समिती	१९०४ (१)
समिती प्रमुख, लोकलेखा समिती	१९०४ (२)
समिती प्रमुख, आश्वासन समिती (विधानपरिषद)	१९०४ (३)
समिती प्रमुख, अंदाज समिती	१९०४ (४)

समिती प्रमुख, विशेष हक्क समिती (विधानपरिषद)	१९०४ (५)
समिती प्रमुख, आश्वासन समिती (विधानसभा)	१९०४ (६)

विसावा मजला

समिती कक्ष	२००१ ते २००३
समिती प्रमुख, विशेष हक्क समिती (विधानसभा)	२००४ (१)
समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती	२००४ (२)
समिती प्रमुख, रोजगार हमी योजना समिती	२००४ (३)
समिती प्रमुख, उप विधान समिती	२००४ (४)
समिती प्रमुख, पंचायत राज समिती	२००४ (५)
समिती प्रमुख, अनुसूचित जमाती कल्याण समिती	२००४ (६)

*****

परिशिष्ट क्रमांक - २

महाराष्ट्र विधानमंडळाचे दूरध्वनी क्रमांक

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
१.	सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद	२३६७६६३२ २३६७६६७३	२२०२७३७३/४०८६ ११००* ११०३*
२.	अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा	२३६३२७४८ २३६३५६८८	२२०२३१०१/५४२ १०००* १००१*
३.	उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद	२२०२००६७	२२०२३८४८ २२८२५१६७ ११२०* ११२२*
४.	उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा	२२०२९५४९ २२०२६९८७	२२०२३६४६/६४७० १००६* १००८*
५.	विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद	२३६२९९८० २३६२९९९०	२२०४१७०२ २२०२४२६२ १०१४, १०१५*
६.	विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा	२३६१०००९ २३६३०३४४	२२०२८८१६/३५५३ १११५, ११०६*
७.	समिती प्रमुख, अंदाज समिती	---	२२०२७८०१ २९०४*
८.	समिती प्रमुख, लोकलेखा समिती	---	२२०२६९७२ २९०२*
९.	समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती	---	२२०२६८४३ ३००४*
१०.	समिती प्रमुख, उप विधान समिती	---	२२०२६६८२ ३००३*
११.	समिती प्रमुख, विशेष हक्क समिती (विधानसभा)	---	२२०२९८२६ ३०००*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
१२.	समिती प्रमुख, पंचायती राज समिती	---	२२०२७५२५ ३००१*
१३.	समिती प्रमुख, रोजगार हमी योजना समिती	---	२२०२७७३९ ३००५*
१४.	समिती प्रमुख, अनुसूचित जाती कल्याण समिती	---	२२०२७८७० २९०१*
१५.	समिती प्रमुख, अनुसूचित जमाती कल्याण समिती	---	२२०२७०९२ ३००६*
१६.	समिती प्रमुख, आश्वासन समिती (विधानसभा)	---	२२०२७८४७ २९००*
१७.	समिती प्रमुख विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती	---	२२०२७२२४ २५१४*
१८.	समिती प्रमुख विशेष हक्क समिती (विधानपरिषद)	---	२२०२९७९७
१९.	समिती प्रमुख आश्वासन समिती (विधानपरिषद)	---	२२०२७२२० २९०३*
२०.	समिती प्रमुख महिलांचे हक्क व कल्याण समिती	---	२२०२६५३९ २५१७*
२१.	समिती प्रमुख इतर मागासवर्ग कल्याण समिती	---	२२०४८८९६ २५१६*
२२.	समिती प्रमुख आहार व्यवस्था समिती	---	२२०२७२२४
२३.	समिती प्रमुख अल्पसंख्याक कल्याण समिती	---	२२०४७४४० २५१५*
२४.	समिती प्रमुख, विनंती अर्ज समिती (विधानसभा)	---	२२०२६५०९
२५.	समिती प्रमुख, मराठी भाषा समिती	---	२२०२२८५१ २५४०*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
२६.	प्रधान सचिव, श्री राजेन्द्र भागवत	२२८४५२०६ भ्र.९३२३९५३९२९	२२०२६६९३/८२१७ २२८४५०७२ फॅक्स- २२०२४२१२ १८०१* / १०१८*
२७.	सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी (डॉ. अनिल महाजन)	भ्र.९६६४०८९९८८	२२०२७०४५ १९०२*
२८.	उप सचिव (श्री. विलास आठवले)	भ्र.९९६९१४३८८८	२२०२३८५२ २१००*
२९.	उप सचिव (श्रीमती मेघना तळेकर)	भ्र.९८६९३२५६४८	२२०४१२८५ २१०१*
३०.	उप सचिव (श्री. शिवदर्शन साठ्ये)	भ्र.९८९२१४३५०५ भ्र.८१०८९२९८८८	२२८५३५५७ २१०२*
३१.	उप सचिव (श्री. राजेश तारवी)	भ्र.९८६९०५२०६२	२२८२८९२४ २१०४*
३२.	उप सचिव (श्री.ऋतुराज कुडतरकर)	भ्र.८०९७५३८२८१	२२०४७४४१ २४०३*
३३.	उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी लेखा (श्रीमती स्वाती ताडफळे)	भ्र.८८५०५०८८६३	२२८५३५४७ २१०८*
३४.	ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी (श्री.निलेश वडनेरकर)	भ्र.९९६७६३७२१७	२२८२७५६१ १४०५
३५.	कार्यवाही संपादक (श्री. अजय अग्रवाल)	भ्र.९८६९५५७०५१	२२८८१५५२ ३१५१*
३६.	मुख्य सुरक्षा अधिकारी (श्री. प्रदिप चव्हाण)	भ्र.९८२३३९६२९३	२२०२७३५६ ११०९*
३७.	मा.सभापतींचे सचिव (श्री. महेंद्र काज)	भ्र.९८९२६०४७६५	२२०२७३७३ ११०१*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
३८.	मा.अध्यक्षांचे सचिव	----	२२०२३१०१ १००२*
३९.	अवर सचिव (श्री.संतोष पराडकर)	भ्र.८१०८८६९६९६	१०१९
४०.	अवर सचिव तथा उप सचिव (विधी) अतिरिक्त कार्यभार (श्रीमती सायली कांबळी)	भ्र.९८६९४४०३६४	२२८२६५७७ २१०५*
४१.	अवर सचिव (श्री. सुभाष नलावडे)	भ्र.९९६९६८४२०१	२४००*
४२.	अवर सचिव (श्री. सोमनाथ सानप)	भ्र.९५९४९९२२३२	२५००*
४३.	अवर सचिव (श्री. रविंद्र जगदाळे)	भ्र.९८९२८०५००६	२३०५*
४४.	अवर सचिव (श्रीमती पुनम ढगे)	भ्र.९९६९०१८७२४	२००१*
४५.	अवर सचिव (श्री. उमेश शिंदे)	भ्र.९५९४९३२६००	२२००
४६.	अवर सचिव (श्री. प्रकाशचंद्र खोंदले)	भ्र.९८६९२५२६५६	२२०५*
४७.	अवर सचिव (श्री. विजय कोमटवार)	भ्र.९९६७४३२०९८	२६०१
४८.	अवर सचिव (श्री. मोहन काकड)	भ्र.९७०२४०४७५९	२४०५
४९.	अवर सचिव (समिती) (श्री.सुनिल झोरे)	भ्र.९८६९५३४९२३	१८०९*
५०.	अवर सचिव (समिती) (श्रीमती सिमा तांबे)	भ्र.९१६७७९०८२९	२३००*
५१.	अवर सचिव (समिती) (रिक्त)		२४०७*
५२.	अवर सचिव (समिती) (श्री. आशिष जावळे)	भ्र.९८६०८१३७१३	२४०८*
५३.	अवर सचिव (समिती) (श्रीमती पुष्पा दळवी)	भ्र.९९६९५२७३२८	२४०९*
५४.	अवर सचिव (समिती) (श्री.घननिळ देबडवार)	भ्र.९०२८३३१६९५	२१०६
५५.	प्रतिवेदक (निवडश्रेणी) (श्री. भारवी ओटवणेकर)	भ्र.९९६९४९७१३६	१७००*
५६.	प्रतिवेदक (निवडश्रेणी) (श्री. अजित शिगम)	भ्र.९८९२८४८७०८	१७०१*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
५७.	प्रधान सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक (रिक्त)	------	२२८४५०७२, २२०२६६९३, २२०२८२१७ १८०२* / १०१९ *२३१० *
५८.	मा.सभापती, विधानपरिषद यांचे विशेष कार्य अधिकारी	------	
५९.	मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे विशेष कार्य अधिकारी	------	१००५*
६०.	मा.उप सभापतींचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी	------	२२०२३८४८ ११२१*
६१.	मा.उपाध्यक्षांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी	------	२२०२३६४६ १००७* / १००८*
६२.	मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी	------	२२०२८८१६ १११४*
६३.	मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव.	------	२२०४१७०२ १०१५*
६४.	मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे विशेष कार्य अधिकारी	------	१०१४*
६५.	उप कार्यवाही संपादक, (रिक्त)	------	२५०९*
६६.	जनसंपर्क अधिकारी तथा संचालक, (वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र) (अतिरिक्त कार्यभार) (श्री.निलेश मदाने)	भ्र.९३२३७२०३७५	२२०२४१८८ १८०३*
६७.	उप मुख्य सुरक्षा अधिकारी (श्री. चंद्रशेखर सावंत)	भ्र.९८२१२३९८२६	१०३९*
६८.	समादेशक अधिकारी (अग्निशमन) (श्री. बाळासाहेब पाटील)	भ्र.९५२७५९३७००	२२८७२५४१ १०१६*/१०१७*
६९.	मुख्य अनुवादक तथा सहायक कार्यवाही संपादक, (श्री. सिद्धी जोशी)	भ्र.९८९२२७१२२९	२५०८*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
७०.	अवर सचिव (समिती) (श्री.सुनिल झोरे) राष्ट्रकुल संसदीय मंडळ, राजशिष्टाचार, जनसंपर्क कक्ष	भ्र.९८६९५३४९२३	२२८२०८२० १८१८*
७१.	मा.सभापतींचे जनसंपर्क अधिकारी,	------	११०३*
७२.	मा.अध्यक्षांचे जनसंपर्क अधिकारी	------	१००५*
कक्ष अधिकारी			
७३.	श्री दामोदर गायकर	भ्र.९८६९१३०४८२	२२०३*
७४.	श्री मंगेश पिसाळ	भ्र.९०२९८१७६१८	२२०१*
७५.	कु. संगिता विधाते	भ्र.८१०८८०११३३	२५१२*
७६.	श्रीमती प्राजक्ता कुळकर्णी	भ्र.९८२१२७२०९४	२५११*
७७.	श्री विनोद राठोड	भ्र.९६९९९८८००१	२५२९*
७८.	श्री. कैलास पाझारे (विधान भवन, नागपूर येथे कार्यरत)	भ्र.७७३८५२१४१६	
७९.	श्रीमती सुषमा पाठक	भ्र.९८३३६०३३८२	२२०६*
८०.	श्री प्रकाश थिटे	भ्र.९८९२०७८१३२	२२०२*
८१.	श्रीमती जयश्री म्हात्रे	भ्र.९८१९१६१२०९	२५०५*
८२.	श्रीमती रचना परब	भ्र.८१०४७८२०६४	२२०७*
८३.	श्री. नितलेश भालेराव	भ्र.९८१९२१६१५४	२५२८*
८४.	श्री. नितीन आहेर	भ्र.७३०४०४४४६१	२४०६*
८५.	श्री. रविंद्र मेस्त्री	भ्र.९९६९७०५६७६	२००४*
८६.	श्री. चंद्रभान नंदनवार	भ्र.९८९२२१४८६९	२५०३*
८७.	श्री. जीवन गांवकर	भ्र.९८९२७९१६४६	२३१०*
८८.	श्रीमती अलका पराडकर	भ्र.९८६७०१२६५१	२४०१*
८९.	श्री. सुनिल परब	भ्र.८६५२२००९७३	२५०२*
९०.	श्री. पवन म्हात्रे	भ्र.९८९२८४४९१२	२५०६*
९१.	श्री. मधुकर भडेकर	भ्र.९८६९९२६९०२	१९०६*

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
९२.	श्रीमती मीनल भडेकर	भ्र.९८९२००२५७७	२५०४*
९३.	श्रीमती अनुजा कदम	भ्र.७५०६८४१६९४	१८०६*
९४.	श्रीमती सुषमा लोंढे	भ्र.९८६९७८६०४६ / ९८८२७४७५५७	२५०१*
९५.	श्रीमती नेहा काले	भ्र.९००४६८६८९२	१९०५*
९६.	श्री. रोहन कळसे	भ्र.९८९२१४१६४८	३०३४*
९७.	श्री. नागसेन बनसोडे	भ्र.९९७०१०७०४६	२११४*
९८.	श्री. किशोर पाटील	---	---
९९.	श्री. मंदार शेमणकर	भ्र.८१६९६७१०४३	२३०२*
१००.	श्री. अविनाश हाटकर	भ्र.९०८२७५३३५०	२४१०*
१०१.	श्री. मनोज येसनसुरे	भ्र.८९२८७५३८७६	२५३०*
१०२.	श्रीमती धनश्री जगताप	भ्र.९७०२४९४९४१ ७९९२१११४०७	२३०१*
१०३.	श्री. राहुल लिंगरवार	भ्र.७९७२९३२०२२	२५२०* / २५२१*
१०४.	कु. वृषाली देशमुख	भ्र.८२८६३३१४५१	२४०२*
१०५.	कक्ष अधिकारी तथा आहरण व सवितरण अधिकारी (श्री. कचरु डोके)	भ्र.९४२००५३०२५	२३०६*
१०६.	पद्धती विश्लेषक, (श्री.अजय सर्वणकर)	भ्र.९८७०५४४६४०	१८०५*
१०७.	कार्यालय, मुंबई विधान भवन	---	२२०२७३९९
१०८.	कार्यालय, नागपूर विधान भवन	---	०७१२-२५३००१९-२१ २५३००२३-२६
१०९.	स्टेट बँक ऑफ इंडिया विधान भवन, मुंबई	---	२२०२७२०१ २५२२*
११०.	विधानमंडळ सदस्य वसतीगृह, आकाशवाणी, मुंबई	---	२२०२२११६/२२८४ २२८७३०११/०२७३

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
१११.	आमदार निवास (मनोरा), फ्री प्रेस जनरल मार्ग	---	२२८५४५४५/०६९३
११२.	मॅजेस्टिक हॉस्टेल, मुंबई	---	२२०२१५८५
११३.	जुने विधान भवन सदस्य वसतीगृह, मुंबई	---	२२०२७५४१
११४.	विधानमंडळ सदस्य वसतीगृह, नागपूर	---	२५६००८१/८२ २५६१२४३
११५.	मध्य रेल्वे - आरक्षण चौकशी	---	२२६३३५३५ २२६२०४७७ २२०४३५३५/३६
११६.	पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) आरक्षण चौकशी	---	२३०७५९८६ २२०३९८४० २३०७३५३५ १३९
११७.	इंडियन एअर लाईन्स	---	२२०२३०३१ २६१५६६३३ फॅक्स- २२८३०८३२ नि:शुल्क टोल फ्री क्र. १८०० १८० १४०७
११८.	एअर इंडिया	---	२२०२४१४२
११९.	राज्य मार्ग परिवहन महामंडळ (मुंबई सेंट्रल)	---	२३०२३९००
१२०.	राज्य मार्ग परिवहन महामंडळ (परळ)	---	२४२२९९०५
१२१.	नंदागिरी अतिथीगृह, विलेपार्ले (पूर्व), मुंबई	---	२६१८३१६५ २६१८३१००
१२२.	शासकीय परिवहन सेवा	---	२४९३९२५२ २४९३२९७३

अ. क्र.	तपशील	निवासस्थान	कार्यालय/विस्तार क्रमांक
१२३.	सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार), मंत्रालय, मुंबई	---	२२०२३१३२/५३६१ २२०२२३६१
१२४.	विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कार्पर्निकस रोड, नवी दिल्ली,-११० ००१	---	०११-२३३८८०७५ २३३८७२८५ ते ८९
१२५.	राजभवन, मुंबई	---	२३६३२३४३ २३६९४७९९
१२६.	राजभवन, पुणे	---	०२०-२५६८०१८७
१२७.	राजभवन, नागपूर	---	०७१२-२५६५२४५ २५६२८११
१२८.	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई	---	२३६३१७९९
Email : mls_mumbai@rediffmail.com			

*** २२०२७३९९ या दूरध्वनीवर विस्तार (एक्सटेन्शन) व्यवस्था इतरांसह सर्व अधिकाऱ्यांसाठी सुद्धा केलेली आहे.**

*****

परिशिष्ट क्रमांक - ३

राज्यपाल (बॉम्बे प्रेसिडेंसी, मुंबई प्रांत व महाराष्ट्र राज्य)

(सन १६६२ ते २०२१)

Sr.No.	NAME	PERIOD
1.	ABRAHAM SHIPMAN	19 March 1662 to October 1664
2.	HUMPHREY COOKE *(Acting)*	February 1665 to 5 November 1666
3.	GERVASE LUCAS	5 November 1666 to 21 May 1667
4.	CAPTAIN HENRY GARY *(Acting)*	22 May 1667 to 23 September 1668
5.	SIR. GEORGE OXENDEN	23 September 1668 to 14 July 1669
6.	GERALD AUNGIER	14 July 1669 to 30 June 1677
7.	T. ROLT	1677-1681
8.	SIR JOHN CHILD BART.	27 October 1681 to 4 February 1690
9.	BARTHOLOMEW HARRIS	4 February 1690 to 10 May 1694
10.	DANIEL ANNESLEY *(Acting)*	10 May 1694 to 17 May 1694
11.	SIR JOHN GAYER	17 May 1694 to November 1704
12.	SIR NICHOLAS WAITE	November 1704 to September 1708
13.	WILLIAM AISLABIE	September 1708 to 11 October 1715
14.	STEPHEN STRUTT *(Acting)*	11 October 1715 to 26 December 1715
15.	CHARLES BOONE	26 December 1715 to 9 January 1720
16.	WILLIAM PHIPPS	9 January 1720 to 10 January 1728
17.	ROBERT COWAN	10 January 1728 to 22 September 1734
18.	JOHN HORNBY	22 September 1734 to 7 April 1739
19.	STEPHEN LAW	7 April 1739 to 15 November 1742
20.	JOHN GEEKIE *(Acting)*	15 November 1742 to 26 November 1742
21.	WILLIAM WAKE	26 November 1742 to 17 November 1750
22.	RICHARD BOURCHIER	17 November 1750 to 1760
23.	SIR JOHN HOLKELL *(Acting)*	1760 to 28 February 1760
24.	CHARLES CROMMELIN	28 February 1760 to 27 January 1767
25.	THOMAS HODGES	27 January 1767 to 23 February 1771
26.	WILLIAM HORABY	26 February 1771 to 1 January 1784

Sr.No.	NAME	PERIOD
27.	RAWSON HART BODDAM	1 January 1784 to 9 January 1788
28.	ANDREW RAMSAY *(Acting)*	9 January 1788 to 6 September 1788
29.	MAJOR-GENERAL WILLIAM MEDOWS	6 September 1788 to 21 January 1790
30.	MAJOR-GENERAL SIR ROBERT ABERCROMBY, K.C.B.	21 January 1790 to 26 November 1792
31.	GEORAGE DICK *(Acting)*	26 November 1792 to 9 November 1795
32.	JOHN GRIFFITH *(Acting)*	9 November 1795 to 27 December 1795
33.	JONATHAN DUNCAN	27 December 1795 to 11 August 1811
34.	GEORAGE BROWN *(Acting)*	11 August 1811 to 12 August 1812
35.	THE RT.HON: SIR EVAN NEPEAN	12 August 1812 to 1 November 1819
36.	THE HON: MOUNTSTUART ELPHINSTONE	1 November 1819 to 1 November 1827
37.	MAJOR-GENERAL SIR JOHN MALCOLM, G.C.B.	1 November 1827 to 1 December 1830
38.	LT-GENERAL SIR THOMAS SIDNEY BECKWITH, K.C.B. *(Acting)*	1 December 1830 to 15 January 1831
39.	JOHN ROMER *(Acting)*	17 January 1831 to 21 March 1831
40.	THE RT.HON: JOHN FITZGIBBON THE 2nd EARL OF CLARE	21 March 1831 to 17 March 1835
41.	SIR ROBERT GRANT	17 March 1835 to 9 July 1838
42.	JAMES FARISH *(Acting)*	11 July 1838 to 31 May 1839
43.	MAJOR-GENERAL SIR JAMES RIVETT-CARNAC,BART.	31 May 1839 to 27 April 1841
44.	WILLIAM HAY MACNAGHTEN *(Acting)*	27 April 1841 to 28 April 1841
45.	GEORGE WILLAM ANDERSON *(Acting)*	28 April 1841 to 9 June 1842
46.	LT-GENERAL SIR GEORGE ARTHUR, BART., K.C.H.	9 June 1842 to 6 August 1846
47.	LESTOCK ROBERT REID *(Acting)*	6 August 1846 to 23 January 1847

Sr.No.	NAME	PERIOD
48.	SIR GEORGE RUSSELL CLERK, K.C.B. (1ST time) *(Acting)*	23 January 1847 to 1 May 1848
49.	THE RT.HON.VISCOUNT FALKLAND (LUCIUS CARY), G.C.H.	1 May 1848 to 26 December 1853
50.	THE RT. HON.LORD JOHN ELPHINSTONE, G.C.B., G.C.H.	26 December 1853 to 11 May 1860
51.	SIR GEORGE RUSSELL CLERK, K.C.B.(2ND time) *(Acting)*	11 May 1860 to 24 April 1862
52.	SIR H.BARTLE E.FRERE, K.C.B.	24 April 1862 to 6 March 1867
53.	THE HON.SIR WILLIAM R.S.VESEY. FITZGERALD	6 March 1867 to 6 May 1872
54.	SIR PHILIP E.WODEHOUSE, K.C.B.	6 May 1872 to 30 April 1877
55.	SIR RICHARD TEMPLE, BART. G.C.S.I.	30 April 1877 to 13 March 1880
56.	LIONEL ROBERT ASHBURNER *(Acting)*	13 March 1880 to 28 April 1880
57.	SIR JAMES FERGUSSON, BART. K.C.M.G.	28 April 1880 to 27 March 1885
58.	JAMES BRAITHWAITE PEILE *(Acting)*	27 March 1885 to 30 March 1885
59.	THE RT. HON. LORD REAY, G.C.S.I., G.C.I.E.	30 March 1885 to 12 April 1890
60.	THE RT. HON. LORD HARRIS, G.C.S.I., G.C.I.E.	27 March 1890 to 16 February 1895
61.	HERBERT MILLS BIRDWOOD *(Acting)*	16 February 1895 to 18 February 1895
62.	THE RT. HON. LORD SANDHURST, G.C.S.I., G.C.I.E.	18 February 1895 to 17 February 1900
63.	THE RT. HON. LORD NORTHCOTE OF EXETER, G.C.I.E., C.B.	17 February 1900 to 5 September 1903
64.	JAMES MONTEATH *(Acting)*	5 September 1903 to 12 December 1903

Sr.No.	NAME	PERIOD
65.	THE RT. HON. LORD LAMINGTON, G.C.M.G., G.C.I.E.	12 December 1903 to 27 July 1907
66.	JOHN WILLIAM MUIR MACKENZIE *(Acting)*	27 July 1907 to 18 October 1907
67.	BT. COLONEL SIR GEORGE SYDENHAM CLARKE, G.C.M.G., G.C.I.E.	18 October 1907 to 5 April 1913
68.	THE RT.HON.LORD WILLINGDON OF RATTON, G.C.I.E.	5 April 1913 to 16 December 1918
69.	SIR GEORGE A. LLOYD, G.C.I.E., D.S.O.	16 December 1918 to 8 December 1923
70.	MAURICE HAYWARD *(Acting)*	8 December 1923 to 10 December 1923
71.	THE RT.HON.SIR LESLIE ORME WILSON P.C., G.C.I.E., C.M.G., D.S.O.	10 December 1923 to 20 March 1928
72.	SIR HENRY STAVELEY LAWRENCE *(Acting)*	20 March 1923 to 8 December 1928
73.	MAJOR-GENERAL THE RIGHT HON.SIR FREDERICK HUGH SYKES, P.C., G.C.I.E., G.B.E., K.C.B., C.M.G.	9 December 1928 to 9 December 1933
74.	JOHN ERNEST BUTTERY HOTSON *(Acting)*	1931 to 1931
75.	THR RT.HON.LORD BRABOURNE G.C.I.E., M.C.	9 December 1933 to 30 May 1937
76.	ROBERT DUNCAN BELL *(Acting)*	30 May 1937 to 24 March 1943
77.	SIR ROGER LUMLEY, THE EARL OF SCARBROUGH G.C.I.E., T.D.	18 September 1937 to 24 March 1943
78.	THE RT.HON.SIR JOHN COLVILLE P.C., G.C.I.E.	24 March 1943 to 5 January 1948

अ.क्र.	नाव	कालावधी
79.	राजा महाराज सिंग RAJA MAHARAJ SINGH, C.I.E.	०६ जानेवारी, १९४८ ते ३० मे, १९५२
80.	सर गिरीजा शंकर बाजपाई SIR GIRJA SHANKAR BAJPAL, K.C.S.I., K.B.E., C.I.E.	३० मे, १९५२ ते ५ डिसेंबर, १९५४
81.	डॉ. हरेकृष्ण महताब DR. HAREKRUSHNA MAHTAB	०२ मार्च, १९५५ ते १४ ऑक्टोबर, १९५६
82.	श्री.प्रकाश SHRI SRI PRAKASA	(१० डिसेंबर) १९५६ ते १९६० व ०१ मे, १९६० ते १६ एप्रिल, १९६२
83.	डॉ.पी.सुब्बरायण DR. P.SUBBARAYAN	१७ एप्रिल, १९६२ ते ०६ ऑक्टोबर, १९६२
84.	श्रीमती विजयालक्ष्मी पंडित SHRIMATI VIJAYA LAKSHMI PANDIT	२८ नोव्हेंबर, १९६२ ते १८ ऑक्टोबर, १९६४
85.	डॉ.पी.व्ही.चेरियन DR. P.V.CHERIAN	१४ नोव्हेंबर, १९६४ ते ०८ नोव्हेंबर, १९६९
86.	श्री.अली यावर जंग SHRI ALI YAVAR JUNG	२६ फेब्रुवारी, १९७० ते ११ डिसेंबर, १९७६
87.	श्री.सादिक अली SHRI SADIQ ALI	३० एप्रिल, १९७७ ते ०३ नोव्हेंबर, १९८०
88.	एअर चीफ मार्शल ओ.पी.मेहरा AIR CHIEF MARSHAL O.P.MEHRA, PVSM (RETD.)	०३ नोव्हेंबर, १९८० ते ०५ मार्च १९८२
89.	एअर चीफ मार्शल इद्रीस हसन लतीफ AIR CHIEF MARSHAL IDRIS HASAN LATIF, PVSM (RETD.)	०६ मार्च, १९८२ ते १६ एप्रिल, १९८५
90.	श्री.पीर मोहम्मद SHRI PEER MOHAMMED *(Acting)*	१९ एप्रिल, १९८५ ते ३० मे, १९८५
91.	श्री.कोना प्रभाकर राव SHRI KONA PRABHAKAR RAO	३१ मे, १९८५ ते ०२ एप्रिल, १९८६

अ.क्र.	नाव	कालावधी
92.	डॉ.शंकर दयाळ शर्मा DR. SHANKER DAYAL SHARMA	०३ एप्रिल, १९८६ ते ०२ सप्टेंबर, १९८७
93.	श्री.कासू ब्रह्मानंद रेड्डी SHRI KASU BRAHMANANDA REDDY	२० फेब्रुवारी, १९८८ ते १८ जानेवारी, १९९०
94.	डॉ.सी.सुब्रमण्यम DR. C. SUBRAMANIAM	१५ फेब्रवारी, १९९० ते ०९ जानेवारी, १९९३
95.	डॉ.पी.सी.अलेक्झांडर DR.P.C.ALEXANDER	१२ जानेवारी, १९९३ ते १३ जुलै, २००२
96.	श्री.मोहम्मद फझल SHRI MOHAMMED FAZAL	१० ऑक्टोबर, २००२ ते ०५ डिसेंबर, २००४
97.	श्री.एस.एम.कृष्णा SHRI S.M.KRISHNA	०६ डिसेंबर, २००४ ते ०८ मार्च, २००८
98.	श्री.एस.सी.जमीर SHRI S.C. JAMIR	१९ जुलै, २००८ ते २१ जानेवारी, २०१०
99.	श्री.काटीकल शंकरनारायणन SHRI K. SANKARANARAYANAN	२२ जानेवारी, २०१० ते २४ ऑगस्ट, २०१४
100.	श्री.चे.विद्यासागर राव SHRI CHENNAMANENI VIDYASAGAR RAO	३० ऑगस्ट, २०१४ ते ०४ सप्टेंबर, २०१९
101.	श्री.भगत सिंह कोश्यारी SHRI BHAGAT SINGH KOSHYARI	०५ सप्टेंबर, २०१९ पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - ४

मुख्यमंत्री

(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री		
१.	सर धनजीशा बोमनजी कपूर	१९३७
२.	श्री. बाळ गंगाधर खेर	१९ जुलै १९३७ ते ४ नोव्हेंबर, १९३९ * ३ एप्रिल १९४६ ते १५ ऑगस्ट, १९४७ १५ ऑगस्ट, १९४७ ते १६ एप्रिल १९५२
३.	श्री. मोरारजी रणछोडजी देसाई	१७ एप्रिल १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५६
द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री		
४.	श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण	१ नोव्हेंबर १९५६ ते ३० एप्रिल १९६०
महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री		
५.	श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण	१ मे १९६० ते २० नोव्हेंबर, १९६२
६.	श्री. मारोतराव सांबशिव कन्नमवार	२१ नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३ **
७.	श्री. परशुराम कृष्णाजी सावंत (हंगामी)	२५ नोव्हेंबर १९६३ ते ४ डिसेंबर १९६३
८.	श्री. वसंतराव फुलसिंग नाईक	५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५
९.	श्री. शंकरराव भाऊराव चव्हाण	२१ फेब्रुवारी १९७५ ते १६ एप्रिल १९७७ १४ मार्च १९८६ ते २४ जून १९८८
१०.	श्री. वसंतराव बंडूजी पाटील	१७ एप्रिल १९७७ ते ६ मार्च १९७८ ७ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८ २ फेब्रुवारी १९८३ ते ९ मार्च १९८५ १० मार्च १९८५ ते १ जून १९८५
११.	श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार	१८ जुलै १९७८ ते १७ फेब्रुवारी १९८० *** २५ जून १९८८ ते ३ मार्च १९९० ४ मार्च १९९० ते २५ जून १९९१ ६ मार्च १९९३ ते १३ मार्च १९९५

अ.क्र.	नाव	कालावधी
१२.	श्री. अब्दुल रहमान अब्दुल गफूर अंतुले	९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२
१३.	श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले	२० जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३
१४.	श्री. शिवाजीराव भाऊराव पाटील-निलंगेकर	३ जून १९८५ ते ७ मार्च १९८६
१५.	श्री. सुधाकरराव राजूसिंग नाईक	२५ जून १९९१ ते २३ फेब्रुवारी १९९३
१६.	श्री. मनोहर गजानन जोशी	१४ मार्च १९९५ ते ३० जानेवारी १९९९
१७.	श्री. नारायण तातू राणे	१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९
१८.	श्री. विलासराव दगडोजीराव देशमुख	१८ ऑक्टोबर १९९९ ते १८ जानेवारी २००३ १ नोव्हेंबर २००४ ते ७ डिसेंबर २००८
१९.	श्री. सुशिलकुमार संभाजीराव शिंदे	१८ जानेवारी २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४
२०.	श्री. अशोक शंकरराव चव्हाण	८ डिसेंबर २००८ ते ८ नोव्हेंबर २००९ ९ नोव्हेंबर २००९ ते १० नोव्हेंबर २०१०
२१.	श्री. पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण	११ नोव्हेंबर २०१० ते २७ सप्टेंबर २०१४ ****
२२.	श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस	३१ ऑक्टोबर २०१४ ते ०८ नोव्हेंबर २०१९ ***** २३ नोव्हेंबर २०१९ ते २६ नोव्हेंबर २०१९
२३.	श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे	२८ नोव्हेंबर २०१९ पासून

* मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यामुळे भारत सरकार अधिनियम, १९३५ मधील कलम ९३ अन्वये माननीय राज्यपालांनी प्रशासन ताब्यात घेतले व मुख्यमंत्री यांना '' पंतप्रधान '' असे संबोधण्यात आले.

ऑक्टोबर, १९३९ ते ३० मार्च, १९४६ (एकूण ०७ वर्षे) या कालावधीत राज्यपाल राजवट होती.

** सेवेत कार्यरत असताना निधन पावले.

*** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये १७ फेब्रुवारी १९८० पासून ९ जून १९८० पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

**** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये २८ सप्टेंबर २०१४ पासून ३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

***** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३५६ अन्वये १२ नोव्हेंबर २०१९ पासून २३ नोव्हेंबर २०१९ पर्यंत राज्यात राष्ट्रपती राजवट अंमलात होती.

*****

परिशिष्ट क्रमांक - ५

विधानपरिषद सभापती

(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
१.	श्री. मंगलदास मच्छाराम पक्वासा	२२ जुलै १९३७ ते १६ ऑगस्ट १९४७
२.	श्री. रामचंद्र रमेश सोमण	१८ ऑक्टोबर १९४७ ते ५ मे १९५२
३.	श्री. रामराव श्रीनिवासराव हुक्केरीकर	५ मे १९५२ ते २० नोव्हेंबर १९५६
४.	श्री. भोगीलाल धीरजलाल लाला	२१ नोव्हेंबर १९५६ ते १० जुलै १९६०
५.	श्री. विठ्ठल सखाराम पागे	११ जुलै १९६० ते २४ एप्रिल १९७८
६.	श्री. राम मेघे (कार्यकारी सभापती)	१३ जून ते १५ जून, १९७८
७.	श्री. रामकृष्ण सूर्यभानजी गवई	१५ जून १९७८ ते २२ सप्टेंबर १९८२
८.	श्री. जयंत श्रीधर टिळक	२३ सप्टेंबर १९८२ ते ७ जुलै १९८६ ८ जुलै १९८६ ते ७ जुलै १९९२ ८ जुलै १९९२ ते ७ जुलै १९९८
९.	श्री. भाऊराव तुळशीराम देशमुख (अस्थायी सभापती)	२० जुलै १९९८ ते २४ जुलै १९९८
१०.	प्रा. नारायण सदाशिव फरांदे	२४ जुलै १९९८ ते ७ जुलै २००४
११.	श्री. वसंत शंकर डावखरे (अस्थायी सभापती)	९ जुलै २००४ ते १३ ऑगस्ट २००४
१२.	श्री. शिवाजीराव बापूसाहेब देशमुख	१३ ऑगस्ट २००४ ते २४ एप्रिल २००८ २५ एप्रिल २००८ ते २४ एप्रिल २०१४ ८ मे २०१४ ते १६ मार्च २०१५
१३.	श्री. जयंत प्रभाकर पाटील (अस्थायी सभापती)	७ जुलै २०१६ मध्यानोत्तर ते ८ जुलै २०१६ सभापती निवडणूकीपर्यंत
१४.	श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर	२० मार्च २०१५ ते ७ जुलै २०१६ ८ जुलै २०१६ पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - ६

विधानसभा अध्यक्ष

(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९६०)		
१.	श्री. गणेश वासुदेव मावळणकर	२१ जुलै १९३७ ते २० जानेवारी १९४६
२.	श्री. कुंदनमल सोभाचंद फिरोदिया	२१ मे १९४६ ते ३१ जानेवारी १९५२
३.	श्री. दत्तात्रय काशिनाथ कुंटे	०५ मे १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५६
द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)		
४.	श्री. सयाजी लक्ष्मण सिलम	२१ नोव्हेंबर १९५६ ते ३० एप्रिल १९६०
महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)		
५.	श्री. सयाजी लक्ष्मण सिलम	०१ मे १९६० ते १२ मार्च १९६२
६.	श्री. त्र्यंबक शिवराम भारदे	१७ मार्च १९६२ ते १३ मार्च १९६७ १५ मार्च १९६७ ते १५ मार्च १९७२
७.	श्री. शेषराव कृष्णराव वानखेडे	२२ मार्च १९७२ ते २० एप्रिल १९७७
८.	श्री. दौलतराव श्रीपतराव ऊर्फ बाळासाहेब देसाई	०४ जुलै १९७७ ते १३ मार्च १९७८
९.	श्री. शिवराज विश्वनाथ पाटील	१७ मार्च १९७८ ते ०६ डिसेंबर १९७९
१०.	श्री. प्राणलाल हरकिशनदास व्होरा	०१ फेब्रुवारी १९८० ते २९ जून १९८०
११.	श्री. शरद शंकर दिघे	०२ जुलै १९८० ते ११ जानेवारी १९८५
१२.	श्री. शंकरराव चिमाजी जगताप	२० मार्च १९८५ ते १९ मार्च १९९०
१३.	श्री. मधुकरराव धनाजी चौधरी	२१ मार्च १९९० ते २२ मार्च १९९५
१४.	श्री. दत्ताजी शंकर नलावडे	२४ मार्च १९९५ ते १९ ऑक्टोबर १९९९
१५.	श्री. अरुणलाल गोवर्धनदास गुजराथी	२२ ऑक्टोबर १९९९ ते १७ ऑक्टोबर २००४
१६.	श्री. कृष्णराव रखमाजीराव देसाई ऊर्फ बाबासाहेब कुपेकर	०६ नोव्हेंबर, २००४ ते ०३ नोव्हेंबर २००९
१७.	श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील	११ नोव्हेंबर २००९ ते ०८ नोव्हेंबर २०१४
१८.	श्री. हरिभाऊ किसनराव बागडे	१२ नोव्हेंबर २०१४ ते २५ नोव्हेंबर २०१९
१९.	श्री. नाना फाल्गुनराव पटोले	०१ डिसेंबर २०१९ ते ०४ फेब्रुवारी २०२१

*****

परिशिष्ट क्रमांक - ७

विधानसभा अस्थायी अध्यक्ष

(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)		
१.	श्री. रावबहादुर गणेश कृष्णा चितळे	१९ जुलै १९३७ ते २१ जुलै १९३७
२.	सर सोराबजी दोराबजी साकलतवाला	२० मे १९४६ ते २१ मे १९४६
३.	डॉ. एम. यु. मास्कोरेन्हस	३ मे १९५२ ते ५ मे १९५२
द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)		
४.	श्री. एम.सी. शहा	७ नोव्हेंबर १९५६ ते २१ नोव्हेंबर १९५६
५.	श्री. कल्याणजीभाई मेहता	१७ जून १९५७ ते १९ जून १९५७
महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)		
६.	श्री. भानुशंकर याज्ञिक	१५ मार्च १९६२ ते १७ मार्च १९६२
७.	श्री. वसंत नारायण नाईक	१३ मार्च १९६७ ते १५ मार्च १९६७
८.	श्री. रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार	२० मार्च १९७२ ते २२ मार्च १९७२ २२ मार्च १९९५ ते २४ मार्च १९९५
९.	श्री. डी. एस. ऊर्फ बाळासाहेब देसाई	२५ एप्रिल १९७७ ते १ जुलै १९७७ १४ मार्च १९७८ ते १७ मार्च १९७८ ३० जून १९८० ते २ जुलै १९८०
१०.	श्री. पी. के. देशमुख	१ जुलै १९७७ ते ४ जुलै १९७७
११.	श्री. केशवराव शंकरराव धोंडगे	१६ मार्च १९८५ ते २० मार्च १९८५
१२.	श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख	१८ मार्च १९९० ते २१ मार्च १९९० ४ नोव्हेंबर २००४ ते ६ नोव्हेंबर २००४ ९ नोव्हेंबर २००९ ते ११ नोव्हेंबर २००९
१३.	श्री. शंकरराव गेणुजी कोल्हे	२० ऑक्टोबर १९९९ ते २२ ऑक्टोबर १९९९
१४.	श्री. जिवा पांडु गावित	१० नोव्हेंबर २०१४ ते १२ नोव्हेंबर २०१४
१५.	श्री. कालिदास निळकंठ कोळंबकर	२६ नोव्हेंबर २०१९ ते २९ नोव्हेंबर २०१९
१६.	श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील	३० नोव्हेंबर २०१९ ते ०१ डिसेंबर २०१९

*****

परिशिष्ट क्रमांक - ८

विधानपरिषद उप सभापती

(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
१.	श्री. रामचंद्र गणेश सोमण	२२ जुलै १९३७ ते १६ ऑक्टोबर १९४७
२.	श्री. शांतीलाल हरजीवन शहा	१८ ऑक्टोबर १९४७ ते ४ मे १९५२
३.	श्री. व्ही. जी. लिमये	५ मे १९५२ ते १८ ऑगस्ट १९५५
४.	श्रीमती जे. टी. सिपाहीमलानी	१९ ऑगस्ट १९५५ ते २४ एप्रिल १९६२
५.	श्री. व्ही. एन. देसाई	२१ जून १९६२ ते २८ जुलै १९६८
६.	श्री. रामकृष्ण सुर्यभान गवई	३० जुलै १९६८ ते १३ जून १९७८
७.	श्री. अर्जुन गिरीधर पवार	१ डिसेंबर १९७८ ते २४ एप्रिल १९८४
८.	श्री. दाजीबा पर्वत पाटील	१२ जुलै १९८४ ते ७ जुलै १९८६ (१९८६ ते १९८८ रिक्त)
९.	श्री. सुर्यभान रघुनाथ वहाडणे	२९ जुलै १९८८ ते २७ जुलै १९९४
१०.	प्रा. नारायण सदाशिव फरांदे	३० जुलै १९९४ ते २३ जुलै १९९८
११.	श्री. वसंत शंकर डावखरे	२४ जुलै १९९८ ते ११ मे २००४ (१२ मे २००४ ते १२ ऑगस्ट २००४ पर्यंत रिक्त) १३ ऑगस्ट २००४ ते ८ जून २०१० १३ जुलै २०१० ते ८ जून २०१६
१२.	श्री. माणिकराव गोविंदराव ठाकरे	५ ऑगस्ट २०१६ ते २७ जुलै २०१८
१३.	डॉ. (श्रीमती) नीलम दिवाकर गोऱ्हे	२४ जून २०१९ ते २४ एप्रिल २०२० ०८ सप्टेंबर २०२० पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - ९
विधानसभा उपाध्यक्ष
(सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)		
१.	श्री. नारायणराव गुरुराव जोशी	१९३७ ते १९३९
२.	श्री. शनमुगाप्पा निंगाप्पा अंगदी	१९४६ ते १९५२
३.	श्री. शिवलिंगप्पा रुद्रप्पा कंठी	५ मे १९५२ ते ३१ ऑक्टोबर १९५६
द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)		
४.	श्री. शेषराव कृष्णराव वानखेडे	२३ नोव्हेंबर १९५६ ते ५ एप्रिल १९५७
५.	श्री. दिनदयाळ गुप्ता	२० जून १९५७ ते ३० एप्रिल १९६०
महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)		
६.	श्री. दिनदयाळ गुप्ता	१ मे १९६० ते ३ मार्च १९६२
७.	श्री. कृष्णराव तुकाराम गिरमे	२० मार्च १९६२ ते १ मार्च १९६७ १६ मार्च १९६७ ते १३ मार्च १९७२
८.	श्री. रामकृष्ण व्यंकटेश बेत	२३ मार्च १९७२ ते २६ फेब्रुवारी १९७६
९.	श्री. सय्यद फारुक पाशा सय्यद मगदुम पाशा	१२ मार्च १९७६ ते २० एप्रिल १९७७
१०.	श्री. शिवराज विश्वनाथ पाटील	५ जुलै १९७७ ते २ मार्च १९७८
११.	श्री. गजाननराव रघुनाथराव गरुड	२१ मार्च १९७८ ते ५ एप्रिल १९७९
१२.	श्री. सूर्यकांत जागोबाजी डोंगरे	७ एप्रिल १९७९ ते ९ जून १९८०
१३.	श्री. शंकरराव चिमाजी जगताप	३ जुलै १९८० ते ८ मार्च १९८५
१४.	श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम	२१ मार्च १९८५ ते २२ जून १९८६
१५.	डॉ. पद्मसिंह बाजीराव पाटील	२४ जून १९८६ ते २५ जून १९८८
१६.	श्री. बबनराव दादाबा ढाकणे	३० जुलै १९८८ ते ९ डिसेंबर १९८९
१७.	श्री. लक्ष्मण सोनोपंत ऊर्फ अण्णा जोशी	२० डिसेंबर १९९० ते ३ जुलै १९९१
१८.	श्री. मोरेश्वर विठ्ठलराव टेमुर्डे	१९ जुलै १९९१ ते ११ मार्च १९९५
१९.	श्री. शरद मोतीराम तसरे	२८ मार्च १९९५ ते १५ जुलै १९९९
२०.	श्री. प्रमोद भाऊरावजी शेंडे	२३ डिसेंबर १९९९ ते १८ ऑक्टोबर २००४ ९ डिसेंबर २००४ ते ३ नोव्हेंबर २००९
२१.	श्री. मधुकरराव देवराव चव्हाण	१० डिसेंबर २००९ ते १८ नोव्हेंबर २०१०
२२.	प्रा वसंत चिंधुजी पुरके	४ डिसेंबर २०१० ते ८ नोव्हेंबर २०१४
२३.	श्री. विजय भास्करराव औटी	३० नोव्हेंबर २०१८ ते ०९ नोव्हेंबर २०१९
२४.	श्री. नरहरी सिताराम झिरवाळ	१४ मार्च २०२० पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - १०

विधानपरिषद विरोधी पक्ष नेता

(सन १९६० ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
१.	श्री. माधव बयाजी गायकवाड	१४ जुलै १९६० ते २३ मार्च १९६२
२.	श्री. वासुदेव बळवंत गोगटे	२७ जुलै १९६२ ते २८ ऑगस्ट १९६६
३.	श्री. रामजीवन फालुराम चौधरी	२९ ऑगस्ट १९६६ ते २१ जुलै १९६७
४.	श्री. उत्तमराव लक्ष्मणराव पाटील	२२ जुलै १९६७ ते २६ मार्च १९७८
५.	श्री. अर्जूनराव श्रीपतराव कस्तुरे	२७ मार्च १९७८ ते १९ जुलै १९७८
६.	श्री. राम कृष्णा मेघे	२८ जुलै १९७८ ते ९ जुलै १९८०
७.	प्रा. गणेश प्रभाकर प्रधान	९ जुलै १९८० ते ७ सप्टेंबर १९८२
८.	श्री. दत्तात्रय राघोबाजी मेघे	७ सप्टेंबर १९८२ ते १६ नोव्हेंबर १९८४
९.	श्री. देविदास मारोतीराव कराळे	१७ नोव्हेंबर १९८४ ते १२ डिसेंबर १९८६
१०.	श्री. रामकृष्ण सुर्यभान गवई	१२ डिसेंबर १९८६ ते २० डिसेंबर १९८८ २० डिसेंबर १९९० ते १७ जुलै १९९१
११.	श्री. विठ्ठलराव गणपतराव हांडे	२३ डिसेंबर १९८८ ते २० डिसेंबर १९९०
१२.	श्री. प्रमोद सच्चिदानंद नवलकर	१७ जुलै १९९१ ते २ जुलै १९९२
१३.	श्री. रामचंद्र महादेव उर्फ अण्णा डांगे	२ जुलै १९९२ ते ३० जुलै १९९३ ३० जुलै १९९४ ते १८ मार्च १९९५
१४.	श्री. सुधीर गजानन जोशी	३० जुलै १९९३ ते ३० जुलै १९९४
१५.	श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार	२५ मार्च १९९५ ते २१ मे १९९६
१६.	श्री. छगन चंद्रकांत भुजबळ	१० जुलै १९९६ ते १७ ऑक्टोबर १९९९
१७.	श्री. नितीन जयराम गडकरी	२३ ऑक्टोबर १९९९ ते १९ जुलै २००२ २० जुलै २००२ ते ११ एप्रिल २००५
१८.	श्री. पांडुरंग पुंडलिक फुंडकर	११ एप्रिल २००५ ते २२ डिसेंबर २०११
१९.	श्री. विनोद श्रीधर तावडे	२३ डिसेंबर २०११ ते २४ एप्रिल २०१४ ८ मे २०१४ ते २० ऑक्टोबर २०१४
२०.	श्री. धनंजय पंडितराव मुंडे	२२ डिसेंबर २०१४ ते ७ जुलै २०१६ ८ जुलै २०१६ ते २४ ऑक्टोबर २०१९
२१.	श्री. प्रविण यशवंत दरेकर	१६ डिसेंबर २०१९ पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - ११

विधानसभा विरोधी पक्ष नेता (सन १९३७ ते २०२१)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई राज्य विधानसभा (१९३७ ते १९५६)		
१.	श्री. सर अली महंमद खान देहलवी	१९३७ ते १९३९
२.	श्री. ए. ए. खान	१९४६ ते १९५२
३.	श्री. तुळशीदास सुभानराव जाधव	१९५२ ते १९५५
द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा (१९५६ ते १९६०)		
४.	श्री. एस. एम. जोशी	१९५७ ते १९५८
५.	श्री. उध्दवराव साहेबराव पाटील	१९५८ ते १९५९
६.	श्री. विठ्ठल देविदास देशपांडे	१९५९ ते १९६०
महाराष्ट्र विधानसभा (१९६० पासून)		
७.	श्री. रामचंद्र धोंडिबा भंडारे	१९६० ते १९६२
८.	श्री. कृष्णराव नारायणराव धुळप	१९६२ ते १९६७ व १९६७ ते १९७२
९.	श्री. दिनकर बाळू पाटील	०७ एप्रिल १९७२ ते जुलै १९७७ २४ डिसेंबर १९८२ ते १४ डिसेंबर १९८३
१०.	श्री. गणपतराव अण्णासाहेब देशमुख	१८ जुलै १९७७ ते फेब्रुवारी १९७८
११.	श्री. उत्तमराव लक्ष्मणराव पाटील	२८ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८
१२.	श्रीमती प्रभा आनंद राव	फेब्रुवारी १९७९ ते १३ जुलै १९७९
१३.	श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील	१६ जुलै १९७९ ते फेब्रुवारी १९८०
१४.	श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार	०३ जुलै १९८० ते ०१ ऑगस्ट १९८१ १५ डिसेंबर १९८३ ते १३ जानेवारी १९८५ २१ मार्च १९८५ ते १४ डिसेंबर १९८६
१५.	श्री. बबनराव दादाबा ढाकणे	१७ डिसेंबर १९८१ ते १४ डिसेंबर १९८६
१६.	श्री. निहाल अहमद	१४ डिसेंबर १९८६ ते २६ नोव्हेंबर १९८७
१७.	ॲड. दत्ता नारायण पाटील	२७ नोव्हेंबर १९८७ ते २२ डिसेंबर १९८८ २० ऑक्टोबर १९८९ ते ३ मार्च १९९०

१८.	श्रीमती मृणाल केशव गोरे	२३ डिसेंबर १९८८ ते १९ ऑक्टोबर १९८९
१९.	श्री. मनोहर गजानन जोशी	२२ मार्च १९९० ते १२ डिसेंबर १९९१
२०.	श्री. गोपीनाथ पांडुरंग मुंडे	१२ डिसेंबर १९९१ ते १४ मार्च १९९५
२१.	श्री. मधुकरराव काशिनाथ पिचड	२५ मार्च १९९५ ते १५ जुलै १९९९
२२.	श्री. नारायण तातु राणे	२२ ऑक्टोबर १९९९ ते १९ ऑक्टोबर २००४ ०६ नोव्हेंबर २००४ ते १२ जुलै २००५
२३.	श्री. रामदास गंगाराम कदम	०१ ऑक्टोबर २००५ ते ०३ नोव्हेंबर २००९
२४.	श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील	११ नोव्हेंबर २००९ ते ०८ नोव्हेंबर २०१४
२५.	श्री. एकनाथराव संभाजी शिंदे	१२ नोव्हेंबर २०१४ ते ०५ डिसेंबर २०१४
२६.	श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील	२३ डिसेंबर २०१४ ते ०४ जून २०१९
२७.	श्री. विजय नामदेवराव वडेट्टीवार	२४ जून २०१९ ते ०९ नोव्हेंबर २०१९
२८.	श्री. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस	०१ डिसेंबर, २०१९ पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - १२

महाराष्ट्र विधानमंडळ - सचिव/प्रधान सचिव

(सन १९३७ पासून)

अ.क्र.	नाव	कालावधी
मुंबई विधानमंडळाचे सचिव		
१.	श्री. हसमतराय चैनानी	१९३५ ते १९३८
२.	श्री. व्ही.एन.सरदेसाई	१९३८ ते १९३९
३.	श्री. निळकंठ द्रविड	१९३९ ते १९४६
४.	श्री. मोहमद अली मोनानी	१९४६ ते १९४७
५.	श्री. शंकर शेवडे	१९४७ ते १९५३
६.	श्री. श्रीनिवास बेलवडी	१९५३ ते १९६०
महाराष्ट्र विधानमंडळाचे सचिव		
७.	श्री. श्रीनिवास बेलवडी	१९६०-१९७२
८.	श्री. दत्तात्रय अणे	१ एप्रिल १९७२ ते ३१ ऑक्टोबर १९७६
९.	श्री. गुणवंत नांदे, सचिव (१)	१ नोव्हेंबर, १९७६ ते ३१ डिसेंबर, १९८५
१०.	श्री. व्ही.एम.सुब्रह्मण्यम, सचिव (१)	१ जानेवारी, १९८६ ते २९ फेब्रुवारी, १९८८
११.	श्री. भास्कर शेटये, सचिव (१)	१ मार्च, १९८८ ते ३१ मार्च, १९९५
१२.	श्री. रमेश कांबळी, प्रधान सचिव (१)	[सचिव (२)] १३ मे, १९९४ ते ३१ मार्च, १९९५ [सचिव (१)] १ एप्रिल, १९९५ ते २८ एप्रिल, २००० [प्रधान सचिव (१)] २९ एप्रिल, २००० ते ३१ मे, २००१
१३.	श्री. विलास भागवत पाटील प्रधान सचिव (१)	[सचिव (२)] १७ मे, २००० ते ३० नोव्हेंबर, २००१ [सचिव (१)] १ डिसेंबर, २००१ ते १६ जानेवारी, २००३ [प्रधान सचिव] १७ जानेवारी, २००३ ते २५ जुलै, २००६ [प्रधान सचिव (१)] २६ जुलै, २००६ ते ३१ ऑक्टोबर, २००६
१४.	श्री. अभिमन्यु शिंदेकर, सचिव	[सचिव] ३० मे, २००८ ते ३१ मे, २०१०
१५.	डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव	[सचिव] १५ जुलै, २००३ ते २५ जुलै, २००६ [प्रधान सचिव(२)] २६ जुलै, २००६ ते १ मार्च, २००७ [प्रधान सचिव] २ मार्च, २००७ ते ३१ डिसेंबर, २०१८
१६.	श्री.उत्तमसिंग चव्हाण, सचिव	[सचिव] २४ डिसेंबर, २०१४ ते ३० सप्टेंबर, २०१७ [सेवानिवृत्त सचिव] ०१ नोव्हेंबर, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०२०
१७.	श्री.राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव	[सचिव (कार्यभार)] ५ नोव्हेंबर, २०१९ ते २ सप्टेंबर, २०२० [प्रधान सचिव] ३ सप्टेंबर, २०२० पासून

*****

परिशिष्ट क्रमांक - १३

विधानसभा गठीत व विसर्जित केल्याचा दिनांक

विधानसभा (१)	मागील विधानसभा बरखास्त / राष्ट्रपती राजवट लागू केल्याचा दिनांक (२)	नवीन विधानसभा घटित केल्याचा दिनांक (३)	अनुच्छेद १७२ नुसार अधिवेशन बोलविण्याचा पहिला दिवस (४)	अनुच्छेद १७४ नुसार विधानसभेची मुदत संपण्याचा दिनांक (५)	नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतल्याचे दिनांक (६)	राज्यपालांच्या अभिभाषणाचा दिनांक (७)	अध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या घोषणेचा दिनांक (८)
१९५२	एप्रिल, १९५२	१७ एप्रिल, १९५२	३ मे, १९५२	२ मे, १९५२	३, ५ व ६ मे, १९५२	६ मे, १९५२	५ मे, १९५२
द्विभाषिक	--	१९ नोव्हेंबर, १९५६	१९ नोव्हेंबर, १९५६	२ मे, १९५७	२१ नोव्हेंबर, १९५६	२१ नोव्हेंबर, १९५६	२१ नोव्हेंबर, १९५६
पहिली १९५७ ते १९६२	५ एप्रिल, १९५७	५ एप्रिल, १९५७	१७ जून, १९५७	१६ जून, १९६२	१७ व १८ जून, १९५७	१९ जून, १९५७	१९ जून, १९५७
दुसरी १९६२ ते १९६७	३ मार्च, १९६२	३ मार्च, १९६२	१५ मार्च, १९६२	१४ मार्च, १९६७	१५ व १६ मार्च, १९६२	१७ मार्च, १९६२	१७ मार्च, १९६२
तिसरी १९६७ ते १९७२	१ मार्च, १९६७	१ मार्च, १९६७	१३ मार्च, १९६७	१२ मार्च, १९७२	१३ व १४ मार्च, १९६७	१५ मार्च, १९६७	१५ मार्च, १९६७
चौथी १९७२ ते १९७७	------	१३ मार्च, १९७२	२० मार्च, १९७२	१९ मार्च,१९७७	२० व २१ मार्च, १९७२	२२ मार्च, १९७२	२२ मार्च, १९७२
पाचवी १९७८ ते १९८०	*१७ मार्च, १९७७	२ मार्च, १९७८	१५ मार्च, १९७८	१४ मार्च, १९८३	१५ व १६ मार्च, १९७८	२२ मार्च, १९७८	१७ मार्च, १९७८
सहावी १९८० ते १९८५	** ९ जून, १९८०	९ जून, १९८०	३० जून, १९८०	२९ जून, १९८५	३० जून व १ जुलै, १९८०	३ जुलै, १९८०	२ जुलै, १९८०
सातवी १९८५ ते १९९०	** ८ मार्च,१९८५	८ मार्च, १९८५	१८ मार्च, १९८५	१७ मार्च, १९९०	१८ ते २० मार्च, १९८५	२० मार्च, १९८५	२० मार्च, १९८५
आठवी १९९० ते १९९५	** ३ मार्च, १९९०	३ मार्च, १९९०	१९ मार्च, १९९०	१८ मार्च, १९९५	१९ व २० मार्च, १९९०	२१ मार्च, १९९०	२१ मार्च, १९९०
नववी १९९५ ते १९९९	**१४ मार्च,१९९५	१४ मार्च, १९९५	२२ मार्च, १९९५	२१ मार्च, २०००	२२ ते २३ मार्च, १९९५	२४ मार्च, १९९५	२४ मार्च, १९९५

विधानसभा (१)	मागील विधानसभा बरखास्त / राष्ट्रपती राजवट लागू केल्याचा दिनांक (२)	नवीन विधानसभा घटित केल्याचा दिनांक (३)	अनुच्छेद १७२ नुसार अधिवेशन बोलविण्याचा पहिला दिवस (४)	अनुच्छेद १७४ नुसार विधानसभेची मुदत संपण्याचा दिनांक (५)	नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतल्याचे दिनांक (६)	राज्यपालांच्या अभिभाषणाचा दिनांक (७)	अध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या घोषणेचा दिनांक (८)
दहावी १९९९ ते २००४	** १५ जुलै,१९९९	११ ऑक्टोबर, १९९९	२० ऑक्टोबर, १९९९	१९ ऑक्टोबर, २००४	२० व २२ ऑक्टोबर, १९९९	२२ ऑक्टोबर, १९९९	२२ ऑक्टोबर, १९९९
अकरावी २००४ ते २००९	------	४ नोव्हेंबर, २००४	४ नोव्हेंबर, २००४	३ नोव्हेंबर, २००९	४ व ५ नोव्हेंबर, २००४	६ नोव्हेंबर, २००४	६ नोव्हेंबर, २००४
बारावी २००९ ते २०१४	------	२५ ऑक्टोबर, २००९	९ नोव्हेंबर, २००९	*८ नोव्हेंबर, २०१४	९ व १० नोव्हेंबर, २००९	११ नोव्हेंबर, २००९	११ नोव्हेंबर, २००९
तेरावी २०१४ ते २०१९	** २८ सप्टेंबर, २०१४	२१ ऑक्टोबर, २०१४	१० नोव्हेंबर, २०१४	९ नोव्हेंबर, २०१९	१० व ११ नोव्हेंबर, २०१४	१२ नोव्हेंबर, २०१४	१० नोव्हेंबर, २०१४

* **राष्ट्रपती राजवट**

** **मुदतीपूर्व बरखास्त**

*****

परिशिष्ट क्रमांक - १४

महाराष्ट्र विधानसभा अधिवेशनातील बैठकींची एकूण संख्या (सन १९६१ ते २०२१)

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
१.	**१९६१**	पहिले सत्र	२ फेब्रुवारी ते १३ एप्रिल	**४६**
२.		दुसरे सत्र	१४ जुलै व ३० ऑगस्ट	**२५**
३.		तिसरे सत्र	२७ नोव्हेबर ते ८ डिसेंबर	**१०**
४.	**१९६२**	पहिले सत्र	१५ ते ३० मार्च	**१२**
५.		दुसरे सत्र	७ जून ते २७ जुलै	**३७**
६.		तिसरे सत्र	१९ ते ३० नोव्हेंबर	**९**
७.	**१९६३**	पहिले सत्र	११ फेब्रुवारी ते ७ एप्रिल	**३७**
८.		दुसरे सत्र	२ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर	**२३**
९.		तिसरे सत्र	९ ते २० डिसेंबर	**१०**
१०.	**१९६४**	पहिले सत्र	१३ फेब्रुवारी ते ३ एप्रिल	**३६**
११.		दुसरे सत्र	२० जुलै ते १३ ऑगस्ट	**१९**
१२.		तिसरे सत्र	१८ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर	**२३**
१३.	**१९६५**	पहिले सत्र	१५ फेब्रुवारी ते ९ एप्रिल	**३८**
१४.		दुसरे सत्र	१२ जुलै ते १२ ऑगस्ट	**२४**
१५.		तिसरे सत्र	२२ नोव्हेंबर ते १० डिसेंबर	**१५**
१६.	**१९६६**	पहिले सत्र	८ मार्च ते ६ मे	**३९**
१७.		दुसरे सत्र	२९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर	**२४**
१८.	**१९६७**	पहिले सत्र	१३ ते ३१ मार्च	**१३**
१९.		दुसरे सत्र	१४ जून ते ९ ऑगस्ट	**३९**
२०.		तिसरे सत्र	७ ते ३० नोव्हेंबर	**१७**
२१.	**१९६८**	पहिले सत्र	७ फेब्रुवारी ते १२ एप्रिल	**४३**
२२.		दुसरे सत्र	८ जुलै ते २ ऑगस्ट	**१९**
२३.		तिसरे सत्र	१८ नोव्हेंबर ते २७ डिसेंबर	**२८**
२४.	**१९६९**	पहिले सत्र	१० मार्च ते ८ एप्रिल	**२२**
२५.		दुसरे सत्र	१६ जून ते २२ ऑगस्ट	**४९**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
२६.		तिसरे सत्र	१७ नोव्हेंबर ते २० डिसेंबर	**२४**
२७.	**१९७०**	पहिले सत्र	२ मार्च ते ८ मे	**४५**
२८.		दुसरे सत्र	३ ते २७ ऑगस्ट	**१५**
२९.		तिसरे सत्र	७ ते ३१ डिसेंबर	**१८**
३०.	**१९७१**	पहिले सत्र	१५ मार्च ते ७ मे	**३९**
३१.		दुसरे सत्र	६ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर	**२६**
३२.	**१९७२**	पहिले सत्र	२० मार्च ते ७ एप्रिल	**१४**
३३.		दुसरे सत्र	१२ जून ते २६ ऑगस्ट	**४८**
३४.		तिसरे सत्र	२० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	**२०**
३५.	**१९७३**	पहिले सत्र	१२ फेब्रुवारी ते ३१ मार्च	**३३**
३६.		दुसरे सत्र	३० जुलै ते ७ सप्टेंबर	**२६**
३७.		तिसरे सत्र	१२ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर	**२५**
३८.	**१९७४**	पहिले सत्र	११ फेब्रुवारी ते १२ एप्रिल	**४२**
३९.		दुसरे सत्र	५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर	**२२**
४०.		तिसरे सत्र	१४ नोव्हेंबर ते २० डिसेंबर	**२५**
४१.	**१९७५**	पहिले सत्र	२४ फेब्रुवारी ते २६ एप्रिल	**४४**
४२.		दुसरे सत्र	९ मे विशेष अधिवेशन	**१**
४३.		तिसरे सत्र	३० जुलै ते १३ ऑगस्ट	**१३**
४४.		चतुर्थ सत्र	२४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर	**१७**
४५.	**१९७६**	पहिले सत्र	८ मार्च ते ३ एप्रिल	**२४**
४६.		दुसरे सत्र	१ जुलै ते २८ जुलै	**२१**
४७.		तिसरे सत्र	२९ नोव्हेंबर ते १७ डिसेंबर	**१५**
४८.	**१९७७**	पहिले सत्र	२१ मार्च ते ७ एप्रिल	**१५**
४९.		दुसरे सत्र	४ जुलै ते १० ऑगस्ट	**२८**
५०.		तिसरे सत्र	१७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर	**१४**
५१.	**१९७८**	पहिले सत्र	१५ मार्च ते ४ एप्रिल	**१४**
५२.		दुसरे सत्र	१२ जून ते २९ जुलै	**३३**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
५३.		तिसरे सत्र	२७ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	**१४**
५४.	**१९७९**	पहिले सत्र	५ मार्च ते ७ एप्रिल	**२३**
५५.		दुसरे सत्र	९ जुलै ते ११ ऑगस्ट	**२६**
५६.	**१९८०**	पहिले सत्र	२१ जानेवारी ते १ फेब्रुवारी	**९**
५७.		दुसरे सत्र	३० जून ते ८ ऑगस्ट	**३२**
५८.		तिसरे सत्र	१५ ते २६ डिसेंबर	**९**
५९.	**१९८१**	पहिले सत्र	२ मार्च ते २५ एप्रिल	**४०**
६०.		दुसरे सत्र	१७ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर	**१६**
६१.		तिसरे सत्र	३० नोव्हेंबर ते १८ डिसेंबर	**१५**
६२.	**१९८२**	पहिले सत्र	११ मार्च ते २४ एप्रिल	**३२**
६३.		दुसरे सत्र	६ ते २४ सप्टेंबर	**१६**
६४.		तिसरे सत्र	१३ ते २४ डिसेंबर	**१०**
६५.	**१९८३**	पहिले सत्र	७ मार्च ते २२ एप्रिल	**३१**
६६.		दुसरे सत्र	४ ते २९ जुलै	**१९**
६७.		तिसरे सत्र	२८ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर	**१५**
६८.	**१९८४**	पहिले सत्र	१२ मार्च ते २७ एप्रिल	**३२**
६९.		दुसरे सत्र	९ ते २७ जुलै	**१५**
७०.		तिसरे सत्र	१२ ते १७ नोव्हेंबर	**६**
७१.	**१९८५**	पहिले सत्र	१८ मार्च ते २ एप्रिल	**११**
७२.		दुसरे सत्र	२४ जून ते ७ ऑगस्ट	**३२**
७३.	**१९८६**	पहिले सत्र	६ ते २४ जानेवारी	**१५**
७४.		दुसरे सत्र	१७ ते २५ मार्च	**०७**
७५.		तिसरे सत्र	१६ जून ते ८ ऑगस्ट	**४०**
७६.		चौथे सत्र	२४ नाव्हेंबर ते १२ डिसेंबर	**१५**
७७.	**१९८७**	पहिले सत्र	२४ मार्च ते १० एप्रिल	**१५**
७८.		दुसरे सत्र	२२ जून ते २४ जुलै	**२५**
७९.		तिसरे सत्र	९ ते २७ नोव्हेंबर	**१५**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
८०.	**१९८८**	पहिले सत्र	१४ मार्च ते २१ एप्रिल	**२६**
८१.		दुसरे सत्र	३० जून ते २९ जुलै	**२१**
८२.		तिसरे सत्र	५ ते २३ डिसेंबर	**१५**
८३.	**१९८९**	पहिले सत्र	९ मार्च ते २८ एप्रिल	**३०**
८४.		दुसरे सत्र	१७ जुलै ते ११ ऑगस्ट	**१७**
८५.		तिसरे सत्र	१६ ते २० ऑक्टोबर	**०५**
८६.	**१९९०**	पहिले सत्र	१९ ते २३ जानेवारी	**०४**
८७.		दुसरे सत्र	१९ मार्च ते ७ एप्रिल	**१४**
८८.		तिसरे सत्र	२० जून ते १८ ऑगस्ट	**३३**
८९.		चौथे सत्र	३ ते २० डिसेंबर	**१४**
९०.	**१९९१**	पहिले सत्र	६ ते २२ मार्च	**१३**
९१.		दुसरे सत्र	१५ जुलै ते ७ ऑगस्ट	**१७**
९२.		तिसरे सत्र	२ ते २१ डिसेंबर	**१४**
९३.	**१९९२**	पहिले सत्र	१६ मार्च ते २४ एप्रिल	**२४**
९४.		दुसरे सत्र	२३ जून ते १४ जुलै	**१५**
९५.		तिसरे सत्र	३० नोव्हेंबर ते ७ डिसेंबर	**०६**
९६.	**१९९३**	पहिले सत्र	१५ मार्च ते २८ एप्रिल	**२९**
९७.		दुसरे सत्र	१२ ते ३० जुलै	**१५**
९८.		तिसरे सत्र	१३ ते ३० डिसेंबर	**१४**
९९.	**१९९४**	पहिले सत्र	१५ मार्च ते ३० एप्रिल	**३२**
१००.		दुसरे सत्र	११ ते ३० जुलै	**१६**
१०१.		तिसरे सत्र	२१ ते ३० नोव्हेंबर	**०८**
१०२.	**१९९५**	पहिले सत्र	२२ मार्च ते ७ एप्रिल	**१४**
१०३.		दुसरे सत्र	५ जुलै ते ९ ऑगस्ट	**२५**
१०४.		तिसरे सत्र	४ ते २२ डिसेंबर	**१४**
१०५.	**१९९६**	पहिले सत्र	१८ ते २२ मार्च	**०४**
१०६.		दुसरे सत्र	८ जुलै ते ६ ऑगस्ट	**१८**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
१०७.		तिसरे सत्र	९ ते २० डिसेंबर	**१०**
१०८.	**१९९७**	पहिले सत्र	१७ मार्च ते २७ एप्रिल	**२४**
१०९.		दुसरे सत्र	७ ते २३ जुलै	**१०**
११०.		तिसरे सत्र	१७ ते २४ डिसेंबर	**०८**
१११.	**१९९८**	पहिले सत्र	१६ मार्च ते २२ एप्रिल	**२४**
११२.		दुसरे सत्र	२० जुलै ते ७ ऑगस्ट	**१३**
११३.		तिसरे सत्र	१४ ते ३० डिसेंबर	**१२**
११४.	**१९९९**	पहिले सत्र	१७ फेब्रुवारी	**०१**
११५.		दुसरे सत्र	१५ मार्च ते २३ एप्रिल	**२३**
११६.		तिसरे सत्र	२० ते २३ ऑक्टोबर	**०४**
११७.		चौथे सत्र	१३ ते २४ डिसेंबर	**१०**
११८.	**२०००**	पहिले सत्र	१३ मार्च ते २० एप्रिल	**२२**
११९.		दुसरे सत्र	१७ ते २८ जुलै	**१०**
१२०.		तिसरे सत्र	२७ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	**१५**
१२१.	**२००१**	पहिले सत्र	१२ मार्च ते १८ एप्रिल	**२२**
१२२.		दुसरे सत्र	१६ जुलै ते ३ ऑगस्ट	**१५**
१२३.		तिसरे सत्र	३ ते १४ डिसेंबर	**१०**
१२४.	**२००२**	पहिले सत्र	१३ मार्च ते ३० एप्रिल	**१७**
१२५.		दुसरे सत्र	१३ जून	**०१**
१२६.		तिसरे सत्र	२९ जुलै ते ७ ऑगस्ट	**०८**
१२७.		चौथे सत्र	११ ते २० डिसेंबर	**०८**
१२८.	**२००३**	पहिले सत्र	२२ जानेवारी	**०१**
१२९.		दुसरे सत्र	१० मार्च ते १० एप्रिल	**२१**
१३०.		तिसरे सत्र	८ मे	**०१**
१३१.		चौथे सत्र	१४ व २५ जुलै	**१०**
१३२.		पाचवे सत्र	८ ते १९ डिसेंबर	**१०**
१३३.	**२००४**	पहिले सत्र	१५ ते १७ मार्च	**०३**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
१३४.		दुसरे सत्र	२४ मे ते ११ जून	**१५**
१३५.		तिसरे सत्र	४ ते ६ नोव्हेंबर	**०३**
१३६.		चौथे सत्र	६ ते १८ डिसेंबर	**११**
१३७.	**२००५**	पहिले सत्र	१४ मार्च ते १६ एप्रिल	**२४**
१३८.		दुसरे सत्र	११ ते २३ जुलै	**१०**
१३९.		तिसरे सत्र	५ ते १६ डिसेंबर	**१०**
१४०.	**२००६**	पहिले सत्र	१३ मार्च ते २१ एप्रिल	**२३**
१४१.		दुसरे सत्र	३ ते २१ जुलै	**१४**
१४२.		तिसरे सत्र	४ ते १५ डिसेंबर	**१०**
१४३.	**२००७**	पहिले सत्र	१४ मार्च ते १७ एप्रिल	**२१**
१४४.		दुसरे सत्र	१६ जुलै ते २ ऑगस्ट	**१२**
१४५.		तिसरे सत्र	१९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर	**११**
१४६.	**२००८**	पहिले सत्र	१० मार्च ते २५ एप्रिल	**३१**
१४७.		दुसरे सत्र	१६ ते २६ जुलै	**०९**
१४८.		तिसरे सत्र	१५ ते ३० डिसेंबर	**१२**
१४९.	**२००९**	पहिले सत्र	१६ ते १९ मार्च	**०४**
१५०.		दुसरे सत्र	१ ते १६ जून	**१३**
१५१.		तिसरे सत्र	९ ते ११ नोव्हेंबर	**०३**
१५२.		चौथे सत्र	८ ते २३ डिसेंबर	**१०**
१५३.	**२०१०**	पहिले सत्र	१८ मार्च ते २३ एप्रिल	**२५**
१५४.		दुसरे सत्र	१२ ते २७ जुलै	**१२**
१५५.		तिसरे सत्र	१ ते १६ डिसेंबर	**१२**
१५६.	**२०११**	पहिले सत्र	१४ मार्च ते २१ एप्रिल	**२६**
१५७.		दुसरे सत्र	२५ जुलै ते १२ ऑगस्ट	**१५**
१५८.		तिसरे सत्र	१२ ते २३ डिसेंबर	**११**
१५९.	**२०१२**	पहिले सत्र	१५ मार्च ते २० एप्रिल	**२४**
१६०.		दुसरे सत्र	९ ते २५ जुलै	**१३**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
१६१.		तिसरे सत्र	१० ते २१ डिसेंबर	**१०**
१६२.	**२०१३**	पहिले सत्र	११ मार्च ते १८ एप्रिल	**२४**
१६३.		दुसरे सत्र	१५ जुलै ते २ ऑगस्ट	**१४**
१६४.		तिसरे सत्र	९ ते २० डिसेंबर	**१०**
१६५.	**२०१४**	पहिले सत्र	२४ ते २८ फेब्रुवारी	**०४**
१६६.		दुसरे सत्र	२ ते १४ जून	**१३**
१६७.		तिसरे सत्र	१० ते १२ नोव्हेंबर	**०३**
१६८.		चतुर्थ सत्र	८ ते २४ डिसेंबर	**१३**
१६९.	**२०१५**	पहिले सत्र	९ मार्च ते १० एप्रिल, २०१५	**२२**
१७०.		दुसरे सत्र	१३ ते ३१ जुलै	**१४**
१७१.		तिसरे सत्र	७ ते २३ डिसेंबर	**१३**
१७२.	**२०१६**	पहिले सत्र	९ मार्च ते १३ एप्रिल, २०१६	**२३**
१७३.		दुसरे सत्र	१८ जुलै ते ५ ऑगस्ट, २०१६	**१५**
१७४.		तिसरे सत्र	२९ ऑगस्ट, २०१६	**१**
१७५.		चतुर्थ सत्र	५ ते १७ डिसेंबर, २०१६	**१०**
१७६.	**२०१७**	पहिले सत्र	६ मार्च ते ७ एप्रिल, २०१६	**२०**
१७७.		दुसरे सत्र	२० ते २२ मे, २०१७	**३**
१७८.		तिसरे सत्र	२४ जुलै ते ११ ऑगस्ट, २०१७	**१४**
१७९.		चतुर्थ सत्र	११ ते २२ डिसेंबर, २०१७	**१०**
१८०.	**२०१८**	पहिले सत्र	२६ फेब्रुवारी ते २८ मार्च, २०१८	**२२**
१८१.		दुसरे सत्र	४ ते २० जुलै, २०१८	**१३**
१८२.		तिसरे सत्र	१९ ते ३० नोव्हेंबर, २०१८	**०८**
१८३.	**२०१९**	पहिले सत्र	२५ ते २८ फेब्रुवारी, २०१९	**०४**
१८४.		दुसरे सत्र	१७ जून ते २ जुलै, २०१९	**१२**
१८५.		तिसरे सत्र	२७, ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९	**०३**
१८६.		चतुर्थ सत्र	१६ डिसेंबर ते २१ डिसेंबर, २०१९	**०६**

अ.क्र.	वर्ष	सत्र	बैठकीचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या
१८७.	**२०२०**	पहिले सत्र	०८ जानेवारी, २०२०	**०१**
१८८.		दुसरे सत्र	२४ फेब्रुवारी ते १४ मार्च, २०२०	**१४**
१८९.		तिसरे सत्र	०७ व ०८ सप्टेंबर, २०२०	**०२**
१९०.		चतुर्थ सत्र	१४ व १५ डिसेंबर, २०२०	**०२**
१९१.	**२०२१**	पहिले सत्र	०१ ते १० मार्च, २०२१	**०८**
१९२.		दुसरे सत्र	०५ व ०६ जुलै, २०२१	**०२**
१९३.		तिसरे सत्र	२२ ते २८ डिसेंबर, २०२१	**०५**

*****

परिशिष्ट क्रमांक - १५

नागपूर करार (Nagpur Agreement) (दिनांक २८ सप्टेंबर, १९५३)

१. भारतातील सर्व राज्यांची पुनर्रचना किंवा फेरआखणी करण्याच्या प्रश्नावर अहवाल देण्यासाठी एक उच्चाधिकार आयोग नेमण्यात येत असल्याने मराठीभाषिक प्रदेशाच्या विविध भागांमध्ये राहणारे आम्ही लोक अशा सर्व क्षेत्राचा समावेश असलेल्या एका स्वतंत्र राज्याची निर्मिती करण्यासाठी आधारभूत म्हणून पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहोत.

२. विद्यमान मुंबई राज्य, मध्य प्रदेश राज्य आणि हैद्राबाद राज्य यामधील मराठीभाषिक असलेल्या सलग प्रदेशांचे मिळून बनलेले हे राज्य असेल. या राज्याच्या हद्दीमध्ये परराज्याच्या ताब्यातील कोणताही प्रदेशाचा (enclave) अंतर्भाव असता कामा नये. या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे म्हटले जाईल आणि मुंबई शहर ही त्याची राजधानी राहील.

३. सर्व प्रकारचा विकास व प्रशासन यांच्या प्रयोजनार्थ, हे राज्य महाविदर्भ मराठवाडा आणि उर्वरित राज्य हे तीन घटक मिळून बनलेले असेल.

४. एक स्वतंत्र शासन म्हणून त्यांच्या ज्या गरजा असतील त्यांना बाध न येता, निरनिराळ्या घटकांवर करावयाच्या खर्चासाठी पैशांचे नियत वाटप त्या-त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु, मराठवाड्याची अविकसित स्थिती लक्षात घेऊन त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाड्याकडे खास लक्ष पुरविण्यात यावे आणि दरवर्षी राज्य विधानसभेसमोर त्यासंबंधीचा अहवाल ठेवण्यात यावा.

५. सरकार बनवताना या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे.

६. व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैज्ञानिक किंवा अन्य विशेषीकृत (Specialized) पेशासंबंधीचे प्रशिक्षण मिळण्याच्या सुविधा जेथे आहेत अशा सर्व शैक्षिणिक संस्थामध्ये प्रवेश मिळण्यासाठी या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या व पुरेशा सोयी उपलब्ध होतील अशी खात्रीलायक तजवीज करण्यात यावी.

७. नवीन राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायपीठ मुंबई येथे असेल व दुसरे खंडपीठ नागपूर येथे असेल. नागपूर येथील खंडपीठ सर्वसाधारणपणे महाविदर्भ प्रदेशाचे कामकाज पाहील. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका करण्यासाठी शिफारशी करताना महाविदर्भाच्या सेवामधील आणि वकीलवर्गामधील व्यक्तींचीही शिफारस करुन या प्रदेशाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळेल अशी व्यवस्था करावी. हा परिच्छेद, योग्य त्या फेरफारांसह मराठवाडा प्रदेशासही लागू असेल.

८. शासनाकडील व शासननियंत्रित उपक्रमांमधील सर्व श्रेणीतील नोकर भरतीच्या वेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात यावे.

९. वेगवेगळ्या घटकांमधील लोकांचा प्रशासनाशी अधिक चांगल्या प्रकारे सहयोग साधण्याचे परिणामकारक साधन म्हणजे केंद्रीकरण होय असा आमचा विश्वास आहे.

१०. महाविदर्भाच्या लोकांचा त्यांच्या राज्याची राजधानी म्हणून नागपूर शहराशी फार जुन्या काळापासून घनिष्ठ संबंध आहे आणि त्यांना त्या अनुषंगाने विविध फायदेही मिळतात याची आम्हाला जाणीव आहे. एकसंघ राज्याचे प्रशासन परिणामकारक रितीने चालण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बंध पाहूनही, त्यांचे हे फायदे शक्य त्या मर्यादेपर्यंत टिकवण्याची आम्हाला इच्छा आहे. त्यांच्या सल्ल्याने या कलमाच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. शासनाचे कार्यस्थान अधिकृतपणे निश्चित कालावधीकरिता नागपूर येथे हालविण्यात येईल आणि दरवर्षी राज्य विधानमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूर येथे भरविण्यात येईल.

११. अद्ययावत जनगणनेच्या आधारे खेडे हा घटक मानून जिल्ह्याच्या हद्दीमध्ये अशा रितीने फेरबदल करण्यात येतील की, त्यामुळे नवीन राज्यातील सर्व सलग मराठीभाषिक क्षेत्रांचा त्यात अंतर्भाव होईल.

नागपूर

दिनांक : २८/०९/१९५३

सही/-

आर.के.पाटील,

पी.के.देशमुख,

भाऊसाहेब हिरे,

देवकीनंदन,

यशवंतराव चव्हाण,

लक्ष्मणराव भटकर,

पंढरीनाथ पाटील.

सही/-

रामराव देशमुख,

गोपाळराव खेडकर,

शेषराव वानखेडे,

नाना कुंटे.

*****

परिशिष्ट क्रमांक - १६

महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचा कालावधी व बैठकींची एकूण संख्या (सन १९६० ते २०२१)

अ.क्र.	वर्ष	सत्र	विधानसभा / विधानपरिषद अधिवेशनाचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या	
				विधानसभा	विधानपरिषद
१.	१९६०	दुसरे	१० नोव्हेबर ते १६ डिसेंबर	२७	२४
२.	१९६१	दुसरे	विधानसभा - १४ जुलै ते ३० ऑगस्ट विधानपरिषद - २८ जुलै ते ३० ऑगस्ट	२५ ---	--- ०८
३.	१९६४	तिसरे	१८ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर	२३	१७
४.	१९६५	तिसरे	२२ नोव्हेंबर ते १० डिसेंबर	१५	१५
५.	१९६६	दुसरे	२९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर	२४	१७
६.	१९६७	तिसरे	०७ ते ३० नोव्हेंबर	१७	११
७.	१९६८	तिसरे	१८ नोव्हेंबर ते २७ डिसेंबर	२८	२३
८.	१९६९	तिसरे	विधानसभा - १७ नोव्हेंबर ते २० डिसेंबर विधानपरिषद - १७ नोव्हेंबर ते १९ डिसेंबर	२४ ---	--- १८
९.	१९७०	तिसरे	०७ ते ३१ डिसेंबर	१८	१४
१०.	१९७१	दुसरे	विधानसभा - ०६ सप्टेंबर ते ११ ऑक्टोबर विधानपरिषद - ०६ सप्टेंबर ते ०९ ऑक्टोबर	२६ ---	--- २३
११.	१९७२	तिसरे	२० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	२०	२०
१२.	१९७३	तिसरे	१२ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर	२५	२५
१३.	१९७४	तिसरे	१८ नोव्हेंबर ते २० डिसेंबर	२५	२१
१४.	१९७५	चौथे	२४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर	१७	१७
१५.	१९७६	तिसरे	२९ नोव्हेंबर ते १७ डिसेंबर	१५	१५
१६.	१९७७	तिसरे	१७ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर	१४	१४
१७.	१९७८	तिसरे	२७ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	१४	१३
१८.	१९८०	पहिले	२१ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी	९	९
१९.	१९८०	तिसरे	१५ ते २६ डिसेंबर	९	१०

अ.क्र.	वर्ष	सत्र	विधानसभा / विधानपरिषद अधिवेशनाचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या	
				विधानसभा	विधानपरिषद
२०.	१९८१	तिसरे	३० नोव्हेंबर ते १८ डिसेंबर	१५	१५
२१.	१९८२	तिसरे	१३ ते २४ डिसेंबर	१०	१०
२२.	१९८३	तिसरे	२८ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर	१५	१५
२३.	१९८४	तिसरे	१२ ते १७ नोव्हेंबर	६	६
२४.	१९८६	पहिले	०६ ते २४ जानेवारी	१५	१५
२५.	१९८६	चौथे	२४ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर	१५	१५
२६.	१९८७	तिसरे	०९ ते २७ नोव्हेंबर	१५	१५
२७.	१९८८	तिसरे	०५ ते २३ डिसेंबर	१५	१५
२८.	१९८९	तिसरे	१६ ते २० ऑक्टोबर	५	५
२९.	१९९०	चौथे	०३ ते २० डिसेंबर	१४	१४
३०.	१९९१	तिसरे	०२ ते २१ डिसेंबर	१४	१४
३१.	१९९२	तिसरे	३० नोव्हेंबर ते ०७ डिसेंबर	६	६
३२.	१९९३	तिसरे	१३ ते ३० डिसेंबर	१४	१४
३३.	१९९४	तिसरे	२१ ते ३० नोव्हेंबर	८	८
३४.	१९९५	तिसरे	०४ ते २२ डिसेंबर	१४	१४
३५.	१९९६	तिसरे	०९ ते २० डिसेंबर	१०	१०
३६.	१९९७	तिसरे	१५ ते २४ डिसेंबर	८	८
३७.	१९९८	तिसरे	१४ ते ३० डिसेंबर	१२	१२
३८.	१९९९	चौथे	१३ ते २४ डिसेंबर	१०	१०
३९.	२०००	तिसरे	२७ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर	१५	१५
४०.	२००१	तिसरे	०३ ते १४ डिसेंबर	१०	१०
४१.	२००२	चौथे तिसरे	विधानसभा - ११ ते २० डिसेंबर विधानपरिषद - ११ ते २० डिसेंबर	०८ --	--- ०८
४२.	२००३	पाचवे चौथे	विधानसभा - ०८ ते १९ डिसेंबर विधानपरिषद - ०८ ते १९ डिसेंबर	१० ---	--- १०

अ.क्र.	वर्ष	सत्र	विधानसभा / विधानपरिषद अधिवेशनाचा कालावधी	बैठकींची एकूण संख्या	
				विधानसभा	विधानपरिषद
४३.	२००४	चौथे पाचवे	विधानसभा - ०६ ते १८ डिसेंबर विधानपरिषद - ०६ ते १८ डिसेंबर	**११** ---	--- **११**
४४.	२००५	तिसरे	०५ ते १६ डिसेंबर	**१०**	**१०**
४५.	२००६	तिसरे	०४ ते १५ डिसेंबर	**१०**	**१०**
४६.	२००७	तिसरे	१९ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर	**११**	**११**
४७.	२००८	तिसरे	१५ ते ३० डिसेंबर	**१२**	**१२**
४८.	२००९	चौथे	०८ ते २३ डिसेंबर	**१०**	**१०**
४९.	२०१०	तिसरे	०१ ते १६ डिसेंबर	**१२**	**१२**
५०.	२०११	तिसरे	१२ ते २३ डिसेंबर	**११**	**११**
५१.	२०१२	तिसरे	१० ते २१ डिसेंबर	**१०**	**१०**
५२.	२०१३	तिसरे	०९ ते २० डिसेंबर	**१०**	**१०**
५३.	२०१४	चौथे पाचवे	विधानसभा ०८ ते २४ डिसेंबर विधानपरिषद — ०८ ते २४ डिसेंबर	**१३** ---	--- **१३**
५४.	२०१५	तिसरे	०७ ते २३ डिसेंबर	**१३**	**१३**
५५.	२०१६	चौथे पाचवे	विधानसभा - ०५ ते १७ डिसेंबर विधानपरिषद - ०५ ते १७ डिसेंबर	**१०** ---	--- **१०**
५६.	२०१७	चौथे	११ ते २२ डिसेंबर	**१०**	**१०**
५७.	२०१८	दुसरे	०४ ते २० जुलै	**१३**	**१३**
५८.	२०१९	चौथे	१६ ते २१ डिसेंबर, २०१९	**०६**	**०६**

*****

परिशिष्ट क्रमांक - १७

मा. राज्यपालांचे अभिभाषण व अभिभाषणावरील चर्चा (सन १९५२ ते २०२१)

अ.क्र.	अभिभाषणाचा दिनांक	अभिभाषणावरील चर्चेचा दिनांक	एकूण दिवस
१.	१५ जानेवारी,१९५२	१७ व १८ जानेवारी, १९५२	२
२.	०६ मे,१९५२	०९ व १० मे, १९५२	२
३.	१६ फेब्रुवारी,१९५३	१९ व २० फेब्रुवारी, १९५३	२
४.	२० फेब्रुवारी,१९५४	२३ व २४ फेब्रुवारी, १९५४	२
५.	१४ फेब्रुवारी,१९५५	१७ व १८ फेब्रुवारी, १९५५	२
६.	१६फेब्रुवारी,१९५६	२१ व २२ फेब्रुवारी, १९५६	२
७.	२१ नोव्हेंबर,१९५६	२४ नोव्हेंबर, १९५६	१
८.	१९ जून,१९५७	२१ व २२ जून, १९५७	२
९.	१७ फेब्रुवारी,१९५८	२०,२१ व २५ फेब्रुवारी, १९५८	३
१०.	०२ फेब्रुवारी, १९५९	०६ व ०९ फेब्रुवारी, १९५९	२
११.	०६ जुलै,१९६०	१२ व १३ जुलै, १९६०	२
१२.	०२ फेब्रुवारी, १९६१	०६ व ०७ फेब्रुवारी, १९६१	२
१३.	१७ मार्च, १९६२	२० व २२ मार्च, १९६२	२
१४.	११ फेब्रुवारी, १९६३	१८ व १९ फेब्रुवारी, १९६३	२
१५.	१३ फेब्रुवारी, १९६४	१७ व १८ फेब्रुवारी, १९६४	२
१६.	१५ फेब्रुवारी, १९६५	१८ व २२ फेब्रुवारी, १९६५	२
१७.	०८ मार्च, १९६६	१४ व १५ मार्च, १९६६	२
१८.	१५ मार्च, १९६७	२० व २१ मार्च, १९६७	२
१९.	०७ फेब्रुवारी, १९६८	१३ व १४ फेब्रुवारी, १९६८	२
२०.	१० मार्च, १९६९	१७ व १८ मार्च, १९६९	२
२१.	०२ मार्च, १९७०	०९ व १० मार्च, १९७०	२
२२.	१५ मार्च, १९७१	३० व ३१ मार्च, १९७१	२
२३.	२२ मार्च, १९७२	०४ ते ०६ एप्रिल, १९७२	३
२४.	१२ फेब्रुवारी, १९७३	२० व २१ फेब्रुवारी, १९७३	२

अ.क्र.	अभिभाषणाचा दिनांक	अभिभाषणावरील चर्चेचा दिनांक	एकूण दिवस
२५.	११ फेब्रुवारी, १९७४	१९ व २० फेब्रुवारी, १९७४	२
२६.	२४ फेब्रुवारी, १९७५	०३ व ०४ मार्च, १९७५	२
२७.	०८ मार्च, १९७६	१५ व १६ मार्च, १९७६	२
२८.	२१ मार्च, १९७७	२३ व २४ मार्च, १९७७	२
२९.	१७ मार्च, १९७८	३० व ३१ मार्च, १९७८	२
३०.	०५ मार्च, १९७९	०८ व ०९ मार्च, १९७९	२
३१.	२१ जानेवारी, १९८०	२४ व २५ जानेवारी, १९८०	२
३२.	०२ मार्च, १९८१	०५, १० व ११ मार्च, १९८१	३
३३.	११ मार्च, १९८२	१५ व १६ मार्च, १९८२	२
३४.	०७ मार्च, १९८३	१० व ११ मार्च, १९८३	२
३५.	१२ मार्च, १९८४	१५ व १६ मार्च, १९८४	२
३६.	२० मार्च, १९८५	०१ व ०२ एप्रिल, १९८५	२
३७.	०६ जानेवारी, १९८६	०९ व १३ जानेवारी, १९८६	२
३८.	२४ मार्च, १९८७	३१ मार्च व ०१ एप्रिल, १९८७	२
३९.	१४ मार्च, १९८८	०४ व ०५ एप्रिल, १९८८	२
४०.	०९ मार्च, १९८९	१४ व १५ मार्च, १९८९	२
४१.	१९ जानेवारी, १९९०	२२ जानेवारी, १९९०	१
४२.	०६ मार्च, १९९१	१३ व १४ मार्च, १९९१	२
४३.	१६ मार्च, १९९२	१८ व २४ मार्च, १९९२	२
४४.	१५ मार्च, १९९३	१७ व १८ मार्च, १९९३	२
४५.	१५ मार्च, १९९४	१७ व २१ मार्च, १९९४	२
४६.	२४ मार्च, १९९५	३० मार्च व ०३ एप्रिल, १९९५	२
४७.	१८ मार्च, १९९६	२२ मार्च, १९९६	१
४८.	१७ मार्च, १९९७	१९ व २० मार्च, १९९७	२
४९.	१६ मार्च, १९९८	१८ व १९ मार्च, १९९८	२
५०.	१७ फेब्रुवारी, १९९९	१६ व १७ मार्च, १९९९	२
५१.	२२ ऑक्टोबर, १९९९	१३ व १४ डिसेंबर, १९९९	२

अ.क्र.	अभिभाषणाचा दिनांक	अभिभाषणावरील चर्चेचा दिनांक	एकूण दिवस
५२.	१३ मार्च, २०००	२१ व २३ मार्च, २०००	२
५३.	१२ मार्च, २००१	१९ व २० मार्च, २००१	२
५४.	१३ मार्च, २००२	१५ व १६ मार्च, २००२	२
५५.	२२ जानेवारी, २००३	११ व १२ मार्च, २००३	२
५६.	०६ नोव्हेंबर, २००४	०७ व ०८ डिसेंबर, २००४	२
५७.	१४ मार्च, २००५	१६ व १७ मार्च, २००५	२
५८.	१३ मार्च, २००६	१६ व २० मार्च, २००६	२
५९.	१४ मार्च, २००७	१६ व १७ मार्च, २००७	२
६०.	१० मार्च, २००८	१२ व १३ मार्च, २००८	२
६१.	१६ मार्च, २००९	०२ ते ०४ जून, २००९	३
६२.	०६ नोव्हेंबर, २००९	०८ ते १० डिसेंबर, २००९	३
६३.	१८ मार्च, २०१०	१९ व २० मार्च, २०१०	२
६४.	१४ मार्च, २०११	१८ व २१ मार्च, २०११	२
६५.	१५ मार्च, २०१२	१९ ते २१ मार्च, २०१२	३
६६.	११ मार्च, २०१३	१५ व १८ मार्च, २०१३	२
६७.	२४ फेब्रुवारी, २०१४	०५ जून, २०१४	१
६८.	१२ नोव्हेंबर, २०१४	१२ व १५ डिसेंबर, २०१४	२
६९.	०९ मार्च, २०१५	११ व १२ मार्च, २०१५	२
७०.	०९ मार्च, २०१६	१४, १६ व १७ मार्च, २०१६	३
७१.	०६ मार्च, २०१७	१० मार्च, २०१७	१
७२.	२६ फेब्रुवारी, २०१८	२८ फेब्रुवारी व ०५ मार्च, २०१८	२
७३.	२५ फेब्रुवारी, २०१९	१९ व २० जून, २०१९	२
७४.	०१ डिसेंबर, २०१९	१७ व १८ डिसेंबर, २०१९	२
७५.	०८ जानेवारी, २०२०	२६ व २७ फेब्रुवारी, २०२०	२
७६.	०१ मार्च, २०२१	०२ व ०३ मार्च, २०२१	२

*****

परिशिष्ट क्रमांक - १८

नविन विधानसभा अस्तित्वात आल्याचे वर्ष / प्रथम अधिवेशनाचा कालावधी / अध्यक्षांची निवडणूक (सन १९५७ ते २०२१)

अ.क्र.	वर्ष	नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर पहिल्या अधिवेशनाचा कालावधी		बैठकीचे एकूण दिवस	अध्यक्षांची निवड केल्याचा दिनांक	निवड - निवडणूकीने/ बिनविरोध	तत्कालीन
		पासून	पर्यंत				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१.	१९५७	१७ जून, १९५७	५ ऑगस्ट, १९५७	४० दिवस	१९ जून, १९५७	निवडणूक	श्री.एस.एल.सिलम
२.	१९६२	१५ मार्च, १९६२	३० मार्च, १९६२	१५ दिवस	१७ मार्च, १९६२	निवडणूक	श्री.टी.एस. (बाळासाहेब) भारदे
३.	१९६७	१३ मार्च, १९६७	३१ मार्च, १९६७	१९ दिवस	१५ मार्च, १९६७	बिनविरोध	श्री.टी.एस. (बाळासाहेब) भारदे
४.	१९७२	२० मार्च, १९७२	७ एप्रिल, १९६७	११ दिवस	२२ मार्च, १९७२	बिनविरोध	श्री.शेषराव वानखेडे (२२.३.७२ ते १९.३.७७)
५.	१९७८	१५ मार्च, १९७८	४ एप्रिल, १९७८	१४ दिवस	१७ मार्च, १९७८	निवडणूक	श्री.शिवराज पाटील १७.३.७८ ते ५.१२.७९
६.	१९८०	३० जून, १९८०	८ ऑगस्ट, १९८०	३२ दिवस	२ जुलै, १९८०	बिनविरोध	श्री.शरद दिघे
७.	१९८५	१८ मार्च, १९८५	२ एप्रिल, १९८५	११ दिवस	२० मार्च, १९८५	बिनविरोध	श्री.शंकरराव जगताप
८.	१९९०	१९ मार्च, १९९०	७ एप्रिल, १९९०	१४ दिवस	२१ मार्च, १९९०	निवडणूक	श्री.मधुकरराव चौधरी
९.	१९९५	२२ मार्च, १९९५	७ एप्रिल, १९९५	१४ दिवस	२४ मार्च, १९९५	बिनविरोध	श्री.दत्ताजी नलावडे
१०.	१९९९	२० ऑक्टोबर, १९९९	२३ ऑक्टोबर, १९९९	४ दिवस	२२ ऑक्टोबर, १९९९	निवडणूक	श्री.अरुण गुजराथी
११.	२००४	४ नोव्हेंबर, २००४	६ नोव्हेंबर, २००४	३ दिवस	६ नोव्हेंबर, २००४	बिनविरोध	श्री.बाबासाहेब कुपेकर
१२.	२००९	९ नोव्हेंबर, २००९	११ नोव्हेंबर, २००९	३ दिवस	११ नोव्हेंबर, २००९	बिनविरोध	श्री.दिलीप वळसे-पाटील

अ.क्र.	वर्ष	नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर पहिल्या अधिवेशनाचा कालावधी		बैठकीचे एकूण दिवस	अध्यक्षांची निवड केल्याचा दिनांक	निवड - निवडणूकीने/ बिनविरोध	तत्कालीन
		पासून	पर्यंत				
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१३.	२०१४	१० नोव्हेंबर, २०१४	१२ नोव्हेंबर, २०१४	३ दिवस	१२ नोव्हेंबर, २०१४	बिनविरोध	श्री.हरिभाऊ बागडे
१४.	२०१९	२७ नोव्हेंबर, २०१९	१ डिसेंबर, २०१९	३ दिवस	१ डिसेंबर, २०१९	बिनविरोध	श्री.नाना फाल्गुनराव पटोले

*****

परिशिष्ट क्रमांक - १९

अर्थसंकल्पाबाबत वर्षनिहाय माहिती (सन १९८५ पासून)

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१)	१९८५	१) २५ मार्च,१९८५ २) २४ जून,१९८५ **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** २८ मार्च,१९८५ **एकूण ५ दिवस** २,३,४,५ व ८ जुलै,१९८५	२८ मार्च,१९८५ ---- ----	--- **एकूण १२ दिवस** ९,१०,११,१२,१५,१६,१७, १८,२०,२२,२३ व २४ जुलै,१९८५	१) २९ मार्च, १९८५ ---- २) २५ जुलै, १९८५
२)	१९८६	१) १७ मार्च,१९८६ २) १६ जून,१९८६ **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** १९ मार्च,१९८६ **एकूण ५ दिवस** २४,२५,२६,३० जून व १ जुलै,१९८६	२० मार्च,१९८६ ---- ----	----- **एकूण १२ दिवस** २,३,८,९,१०,१४,१५,१६, १७,२१,२२ व २३ जुलै,१९८६	१) २१ मार्च,१९८६ ----- २) २४ जुलै,१९८६
३)	१९८७	२५ मार्च,१९८७	**एकूण १ दिवस** २७ मार्च,१९८७ (नियम स्थगित करण्यात आला)	२७ मार्च,१९८७	**एकूण ८ दिवस** ३० जून, १, २, ६, ७, ८,९ व १० जुलै, १९८७	१) २८ मार्च, १९८७ २) १३ जुलै, १९८७

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
४)	१९८८	१६ मार्च,१९८८	**एकूण ५ दिवस** २२,२३,२४,२६ व २८ मार्च, १९८८	१) २८ मार्च, १९८८ २) १६ एप्रिल, १९८८	-------- **एकूण ७ दिवस** ११,१२,१३,१४,१८,१९ व २० जुलै,१९८८	१) २९ मार्च, १९८८ (ले) २) १६ एप्रिल,१९८८ (ले) ३) २१ जुलै, १९८८ (वि)
५)	१९८९	१० मार्च,१९८९	**एकूण ३ दिवस** २०, २१ व २७ मार्च, १९८९	२७ मार्च,१९८९	**एकूण ९ दिवस** ४, ५, १०, ११, १२, १३, १९, २० व २१ एप्रिल, १९८९	१) २८ मार्च,१९८९ २) २४ एप्रिल, १९८९
६)	१९९०	१) २२ मार्च, १९९० २) २० जून,१९९० **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण २ दिवस** २८ व २९ मार्च,१९९० **एकूण ५ दिवस** २८, २९, ३० जून, ५ व ६ जुलै, १९९०	२९ मार्च, १९९० -----	--------- **एकूण १३ दिवस** ९, १०, ११, १२, १३, १६, १७, १८, १९, २०, २३, २४ व २५ जुलै, १९९०	१) २९ मार्च, १९९० (ले) २) २९ मार्च, १९९० (वि) ३) २६ जुलै,१९९० (वि)
७)	१९९१	७ मार्च,१९९१	**एकूण २ दिवस** १५ व २० मार्च,१९९१	------	**एकूण १ दिवस** २१ मार्च,१९९१	१) ------ २) २२ मार्च,१९९१

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
८)	१९९२	१७ मार्च,१९९२	**एकूण ४ दिवस** २५,२६,२७ व २८ मार्च, १९९२	२९ मार्च,१९९२	**एकूण ८ दिवस** ६,७,८,९,१०,२०,२१ व २२ एप्रिल, १९९२	१) ३० मार्च,१९९२ २) २३ एप्रिल, १९९२
९)	१९९३	१६ मार्च, १९९३	**एकूण २ दिवस** २२ व २३ मार्च,१९९३	२९ मार्च,१९९३	**एकूण १२ दिवस** २,३,६,७,८,१२,१३,१५,१६, १९, २० व २१ एप्रिल,१९९३	१) ३० मार्च,१९९३ २) २६ एप्रिल,१९९३
१०)	१९९४	१६ मार्च,१९९४	**एकूण ४ दिवस** २४,२५,२८ व २९ मार्च, १९९४	२९ मार्च,१९९४	**एकूण ११ दिवस** ७,८,१२,१३,१५,१९,२०,२१, २२, २५ व २६ एप्रिल,१९९४	१) ३० मार्च,१९९४ २) २७ एप्रिल,१९९४
११)	१९९५	१) २५ मार्च,१९९५ **(अंतरिम अर्थसंकल्प)** **(लेखानुदान)** २) ६ जुलै,१९९५ **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** २८ मार्च,१९९५ **एकूण ४ दिवस** ११,१२,१३ व १४ जुलै,१९९५	२८ मार्च,१९९५ ------	---------- **एकूण १० दिवस** १७,१८,१९,२०,२१,२४,२५,२६ ,२७ व २८ जुलै,१९९५	१) २९ मार्च,१९९५ ---- २) २९ जुलै,१९९५

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
१२)	१९९६	१) १९ मार्च,१९९६ (अंतरिम **अर्थसंकल्प)** **(लेखानुदान)** २) ९ जुलै,१९९६ **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** २१ मार्च,१९९६ (नियम स्थगित केला.) **एकूण ३ दिवस** १०,११ व १२ जुलै, १९९६	२१ मार्च,१९९६ ------	---------- **एकूण ९ दिवस** १५,१६,१७,१८,१९,२२,२३, २४ व २५ जुलै, १९९६	१) २२ मार्च,१९९६ २) ३० जुलै, १९९६
१३)	१९९७	१८ मार्च,१९९७	**एकूण २ दिवस** २७ व २८ मार्च,१९९७	२८ मार्च,१९९७	**एकूण १० दिवस** २,३,९,१०,११,१२,२१,२२,२३ व २४ एप्रिल, १९९७	१) २८ मार्च,१९९७ २) २५ एप्रिल,१९९७
१४)	१९९८	२३ मार्च,१९९८	**एकूण २ दिवस** २६ व २७ मार्च,१९९८ (नियम स्थगित केला)	३० मार्च, १९९८	**एकूण ७ दिवस** २,१६,१७,१८,२०,२१ व २२ एप्रिल, १९९८	१) ३० मार्च, १९९८ २) २२ एप्रिल,१९९८
१५)	१९९९	२२ मार्च,१९९९	**एकूण २ दिवस** २४ व ३० मार्च,१९९९ (नियम स्थगित केला)	३१ मार्च,१९९९	**एकूण ९ दिवस** ५,६,७,८,१२,१३,१५,१९ व २० एप्रिल, १९९९	१) ३१ मार्च, १९९९ २) २१ एप्रिल,१९९९

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
१६)	२०००	२२ मार्च,२०००	**एकूण २ दिवस** २७ व २९ मार्च,२००० (नियम स्थगित केला)	२९ मार्च,२०००	**एकूण ८ दिवस** ३,४,६,७,१०,११,१८ व १९ एप्रिल,२०००	१) २९ मार्च, २००० २) २० एप्रिल,२०००
१७)	२००१	२७ मार्च, २००१	**एकूण २ दिवस** २८ व २९ मार्च,२००१ (नियम स्थगित केला)	३० मार्च, २००१	**एकूण ६ दिवस** ९,१०,११,१६,१७ व १८ एप्रिल,२००१	१) ३० मार्च, २००१ २) १८ एप्रिल, २००१
१८)	२००२	२२ मार्च, २००२	**एकूण २ दिवस** २६ व २७ मार्च, २००२ (नियम स्थगित केला)	२७ मार्च, २००२	**एकूण ४ दिवस** २२,२४,२६ व २७ एप्रिल, २००२ **दि.२८ मार्च ते २२ एप्रिल, २००२:- सभागृहाची बैठक स्थायी समित्यांच्या कामकाजासासाठी स्थगित करण्यांत आली.**	१) २७ मार्च, २००२ २) २९ एप्रिल, २००२.
१९)	२००३	२० मार्च, २००३ **(दुपारी २.०० वाजता)**	**एकूण २ दिवस** २६ व २७ मार्च, २००३ (नियम स्थगित केला)	२८ मार्च, २००३	**एकूण ७ दिवस** ३१ मार्च, १,३,७,८,९ व १० एप्रिल, २००३	१) २८ मार्च, २००३ २) १० एप्रिल, २००३

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
२०)	२००४	१) १६ मार्च,२००४ (अंतरिम **अर्थसंकल्प)** **(लेखानुदान)** २) २७ मे,२००४ **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** १७ मार्च,२००४ (नियम स्थगित केला) **एकूण ३ दिवस** ३१ मे व १ जून ,२००४ (२ जून, २००४ रोजी मा.वित्त मंत्र्यांचे उत्तर) (चर्चा एकूण २ दिवस) (मा.वित्त मंत्री यांचे फक्त उत्तर १ दिवस) (नियम स्थगित केला)	१७ मार्च,२००४ ----------	**विभागवार चर्चा झाली नाही** **एकूण ४ दिवस** (१) ३,४,७ व ८ जून, २००४ **(नियम स्थगित केला)** (यापैकी दि. ३ जून,२००४ रोजी चर्चा व मतदानासाठी असलेल्या विभागांवरील मा.मंत्र्यांचे फक्त उत्तर दि. ४ जून, २००४ रोजी झाले.) (२) **सभागृहाच्या संमतीने चर्चारोधाची वेळ ३.३० ऐवजी ४.३० केली.**	१)१७ मार्च,२००४(ले) २) ------ (वि) १) ---- (ले) २) ८ जून,२००४ (वि)
२१)	२००५	२१ मार्च, २००५	**एकूण ३ दिवस** २८, २९, ३० मार्च,२००५	३० मार्च, २००५	**एकूण ६ दिवस** ४, ५ ,६,७,११ व १२ एप्रिल, २००५	१) ३० मार्च,२००५ (ले) २) १२ एप्रिल,२००५ (वि)

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
२२)	२००६	२१ मार्च, २००६	**एकूण २ दिवस** २७ व २९ मार्च, २००६ (नियम स्थगित केला) (२९ मार्च, २००६ रोजी मा. वित्त मंत्र्यांचे उत्तर)	२९ मार्च, २००६	**एकूण ७ दिवस** ३, ४,५,१०,१२,१३ व १८ एप्रिल, २००६	१) २९ मार्च,२००६ (ले) २) १९ एप्रिल,२००६ (वि)
२३)	२००७	२२ मार्च, २००७	**एकूण २ दिवस** २६ व २८ मार्च, २००७ (नियम स्थगित केला) (२९ मार्च, २००७ रोजी मा. वित्त मंत्र्यांचे उत्तर)	२९ मार्च, २००७	**एकूण ७ दिवस** ३,४,५,९,१०,११,१२ एप्रिल, २००७	१) २९ मार्च,२००७ (ले) २) १२ एप्रिल,२००७ (वि)
२४)	२००८	१९ मार्च, २००८ **(दुपारी २.०० वाजता)**	**एकूण २ दिवस** २५ व २६ मार्च, २००८ (नियम स्थगित केला)	२७ मार्च, २००८	**एकूण ८ दिवस** ३१ मार्च,१,२,३,७,८,९,१० एप्रिल, २००८	१) २७ मार्च, २००८ २) ११ एप्रिल, २००८

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
२५)	२००९	१७ मार्च, २००९ **(दुपारी २.०० वाजता)** **(अंतरिम अर्थसंकल्प)** ४ जून, २००९ अतिरिक्त अर्थसंकल्प	**एकूण २ दिवस** १८ व १९ मार्च, २००९ (नियम स्थगित केला) **एकूण २ दिवस** ८ व ९ जून, २००९	१९ मार्च, २००९ -	-- **एकूण ३ दिवस** १०, ११ व १२ जून, २००९	१) १९ मार्च, २००९ २) १२ जून, २००९
२६)	२०१०	२५ मार्च, २०१० (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २९ व ३० मार्च, २०१० (नियम स्थगित केला)	३० मार्च, २०१०	**एकूण १० दिवस** ३१ मार्च, १,५,६,७,१२,१३,१५, १६,१९ एप्रिल, २०१०	१) ३० मार्च, २०१० (ले) २) २० एप्रिल, २०१० (वि)
२७)	२०११	२३ मार्च, २०११ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण ३ दिवस** २८, २९ व ३१ मार्च, २०११ (पहिल्या दिवशी चर्चा झाली नाही.) (नियम स्थगित केला.)	३१ मार्च, २०११	**एकूण ८ दिवस** ३१ मार्च, ५,६,७,११,१३,१८,१९ एप्रिल, २०११	१) ३१ मार्च, २०११ २) २० एप्रिल, २०११

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
२८)	२०१२	२६ मार्च, २०१२ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २८ व २९ मार्च, २०१२ (नियम स्थगित केला.)	२९ मार्च, २०१२	**एकूण १० दिवस** २, ३, ४, ९, १०, ११, १२, १३, १६ व १७ एप्रिल, २०१२	१) २९ मार्च, २०१२ २) १८ एप्रिल, २०१२
२९)	२०१३	२० मार्च, २०१३ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २५ व २६ मार्च, २०१३ (नियम स्थगित केला.)	२६ मार्च, २०१२	**एकूण ८ दिवस** १, २, ३, ४, ८, ९, १० व १५ एप्रिल, २०१३ (एकूण ८ दिवसांपैकी दिनांक ९ व १०, एप्रिल, २०१३ रोजी चर्चा व मतदान न होता ते दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी घेण्यात आले)	१) २६ मार्च, २०१३ २) १६ एप्रिल, २०१३
३०)	२०१४	१) २५ फेब्रुवारी, २०१४ (दुपारी २.०० वाजता) **(अंतरिम अर्थसंकल्प)** **२) ५ जून, २०१४** (दुपारी २.०० वाजता) **(अतिरिक्त अर्थसंकल्प)**	**एकूण १ दिवस** २६ फेब्रुवारी, २०१४ (नियम स्थगित केला) **एकूण २ दिवस** ७ व ९ जून, २०१४ (नियम स्थगित केला)	२८ फेब्रुवारी, २०१४ -----	----- **एकूण २ दिवस** १० व ११ जून, २०१४	२८ फेब्रुवारी, २०१४ १२ जून, २०१४ (विनियोजन विधेयक)

अ.क्र. (१)	वर्ष (२)	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक (३)	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक (४)	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक (५)	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक (६)	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक (७)
३१)	२०१५	१८ मार्च, २०१५ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २३ व २४ मार्च, २०१५ (नियम स्थगित केला)	२५ मार्च, २०१५	**एकूण ५ दिवस** २५, २६, २७, ३०, ३१ मार्च, २०१५	१) २५ मार्च, २०१५ २) १ एप्रिल, २०१५
३२)	२०१६	१८ मार्च, २०१६ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २१ व २२ मार्च, २०१६ (नियम स्थगित केला)	२३ मार्च, २०१६	**एकूण ८ दिवस** २८, २९, ३०, ३१ मार्च व १, ४, ५, ६ एप्रिल, २०१६	१) २३ मार्च, २०१६ २) ७ एप्रिल, २०१६
३३)	२०१७	१८ मार्च, २०१७ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** २२ व २३ मार्च, २०१७ (नियम स्थगित केला)	२३ मार्च, २०१७	**एकूण ४ दिवस** २४, २५, २९ व ३० मार्च, २०१७	१) २३ मार्च, २०१७ २) ३१ मार्च, २०१७
३४)	२०१८	९ मार्च, २०१८ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण २ दिवस** १३ व १४ मार्च, २०१८ (नियम स्थगित केला)	-----	**एकूण ६ दिवस** १५, १६, १९, २०, २१ व २२ मार्च, २०१८	२३ मार्च, २०१८ (विनियोजन विधेयक)

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्प सादर केल्याचा दिनांक	सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण दिवस व दिनांक	लेखानुदान प्रस्ताव संमत केल्याचा दिनांक	विभागवार मागण्यांवर चर्चा व मतदानचे एकूण दिवस व दिनांक	१) लेखानुदान विनियोजन विधेयक तसेच २) विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
३५)	२०१९	१) २७ फेब्रुवारी, २०१९ (दुपारी २.०० वाजता) २) १८ जून, २०१९ (दुपारी २.०० वाजता)	**एकूण १ दिवस** २८ फेब्रुवारी, २०१९ (नियम स्थगित केला.) **एकूण २ दिवस** २४ व २५ जून, २०१९ (नियम स्थगित केला.)	२८ फेब्रुवारी, २०१९ -----	----- **एकूण २ दिवस** २६ व २७ जून, २०१९	२८ फेब्रुवारी, २०१९ २७ जून, २०१९
३६)	२०२०	६ मार्च, २०२० (सकाळी ११.०० वाजता	**एकूण २ दिवस** ११ व १२ मार्च, २०२० (नियम स्थगित केला)	-----	**एकूण २ दिवस** १३ व १४ मार्च, २०२०	१४ मार्च, २०२० (विनियोजन विधेयक)
३७)	२०२१	८ मार्च, २०२१ (सकाळी ११.०० वाजता	**एकूण १ दिवस** ९ मार्च, २०२१ (नियम स्थगित केला)	-----	**एकूण १ दिवस** १० मार्च, २०२१	१० मार्च, २०२१ (विनियोजन विधेयक)

*****

परिशिष्ट क्रमांक - २०

पुरवणी मागण्यांबाबत वर्षनिहाय माहिती (सन १९८५ पासून)

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१)	१९८५	१) २१ मार्च, १९८५	१४७	२६ व २७ मार्च, १९८५	--------	२९ मार्च, १९८५
		२) २६ जुलै, १९८५	४७	३१ जुलै व ५ ऑगस्ट, १९८५	--------	६ ऑगस्ट, १९८५
२)	१९८६	१) ७ जानेवारी, १९८६	५०	१५ व १६ जानेवारी, १९८६	-------	२१ जानेवारी, १९८६
		२) १७ मार्च, १९८६	१३५	१८ मार्च,१९८६	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	१९ मार्च, १९८६
		३) २९ जुलै, १९८६	६७	५ व ६ ऑगस्ट, १९८६	---------	७ ऑगस्ट, १९८६
		४)२५ नोव्हेंबर, १९८६	५७	२ व ३ डिसेंबर, १९८६	---------	४ डिसेंबर, १९८६
३)	१९८७	१) २४ मार्च, १९८७	११८	२६ मार्च, १९८७	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	२७ मार्च, १९८७
		२) १४ जुलै, १९८७	४४	२१ व २२ जुलै, १९८७	---------	२३ जुलै, १९८७
		३) १० नोव्हेंबर, १९८७	४५	१७ व १८ नोव्हेंबर १९८७	---------	१९ नोव्हेंबर, १९८७
४)	१९८८	१) १४ मार्च, १९८८	१३३	१७ व २१ मार्च, १९८८	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	२२ मार्च, १९८८

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
		२) २२ जुलै, १९८८	६४	२६ व २७ जुलै, १९८८	---------	२८ जुलै, १९८८
		३) ६ डिसेंबर, १९८८	५८	१३ व १४ डिसेंबर, १९८८	---------	१५ डिसेंबर, १९८८
५)	१९८९	१)१० मार्च, १९८९	१६६	१७ मार्च, १९८९	--------	२० मार्च, १९८९
		२) १८ जुलै, १९८९	८६	२६ जुलै, १९८९	--------	२७ जुलै, १९८९
		३) १६ ऑक्टोबर, १९८९	९४	१८ ऑक्टोंबर, १९८९	नियम स्थगित केला. **१) चर्चा व मतदानासाठी व २) चर्चारोधासाठी**	१९ ऑक्टोबर, १९८९
६)	१९९०	१) २२ मार्च, १९९०	१८४	२३ व २८ मार्च,१९९०	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	२९ मार्च, १९९०
		२) २६ जुलै, १९९०	८१	७ व ८ ऑगस्ट, १९९०	---------	९ ऑगस्ट, १९९०
		३) ३ डिसेंबर, १९९०	---	५ व ६ डिसेंबर, १९९०	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	७ डिसेंबर, १९९०
७)	१९९१	१) ६ मार्च, १९९१	१६७	११ व १२ मार्च, १९९१	--------	१५ मार्च, १९९१
		२) १६ जुलै, १९९१	१०४	२५ जुलै, १९९१	--------	३० जुलै, १९९१
		३) ३ डिसेंबर, १९९१	६६	११ डिसेंबर, १९९१	----------	१७ डिसेंबर, १९९१

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
८)	१९९२	१) १६ मार्च, १९९२	१६६	२४ मार्च, १९९२	--------	२५ मार्च, १९९२
		२) २४ जून, १९९२	६५	३० जून व ७ जुलै, १९९२	--------	८ जुलै, १९९२
		३) १ डिसेंबर, १९९२	८५	७ डिसेंबर, १९९२	चर्चा व मतदान एकाच दिवशी घेण्यात आले.	७ डिसेंबर, १९९२
९)	१९९३	१) १५ मार्च, १९९३	१७७	१९ मार्च, १९९३	--------	२२ मार्च, १९९३
		२) १३ जुलै, १९९३	८९	२० व २१ जुलै, १९९३	नियम स्थगित केला. **(चर्चारोधासंबंधी)**	२२ जुलै, १९९३
		३) १४ डिसेंबर, १९९३	७८	२१ व २२ डिसेंबर, १९९३	--------	२३ डिसेंबर, १९९३
१०)	१९९४	१) १५ मार्च, १९९४	१६७	२२ व २३ मार्च, १९९४	--------	२४ मार्च, १९९४
		२) १२ जुलै, १९९४	५७	२० व २१ जुलै, १९९४	--------	२२ जुलै, १९९४
		३) २२ नोव्हेंबर, १९९४	८५	२९ नोव्हेंबर, १९९४	--------	३० नोव्हेंबर, १९९४
११)	१९९५	१) २५ मार्च, १९९५	१७२	२७ मार्च, १९९५	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	२९ मार्च, १९९५
		२) २९ जुलै, १९९५	६२	३ ऑगस्ट १९९५		३ ऑगस्ट, १९९५
		३) ५ डिसेंबर, १९९५	१००	१२ व १३ डिसेंबर, १९९५	---------	१४ डिसेंबर, १९९५

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१२)	१९९६	१) १९ मार्च, १९९६	१६९	२१ मार्च, १९९६	नियम स्थगित केला.	२२ मार्च, १९९६
		२) ३० जुलै, १९९६			**चर्चा व मतदानासाठी**	
		३) ९ डिसेंबर, १९९६	६७	५ ऑगस्ट, १९९६	----------	६ ऑगस्ट, १९९६
			८५	१२ व १६ डिसेंबर, १९९६	नियम स्थगित केला.	१८ डिसेंबर, १९९६
					(चर्चा व मतदानासाठी)	
१३)	१९९७	१) १७ मार्च, १९९७	१४३	२५ व २६ मार्च, १९९७	----------	२७ मार्च, १९९७
		२) ८ जुलै, १९९७	७३	२१ व २२ जुलै, १९९७	----------	२२ जुलै, १९९७
		३) १६ डिसेंबर, १९९७	९८	१७ व १८ डिसेंबर, १९९७	नियम स्थगित केला.	१९ डिसेंबर, १९९७
					(चर्चा व मतदानासाठी)	
१४)	१९९८	१) १७ मार्च, १९९८	१४५	२४ व २५ मार्च, १९९८	---------	२५ मार्च, १९९८
		२) २१ जुलै, १९९८	८६	२७ व २८ जुलै, १९९८	---------	२९ जुलै, १९९८
		३) १५ डिसेंबर, १९९८	९८	२१ व २२ डिसेंबर, १९९८	---------	२४ डिसेंबर, १९९८
१५)	१९९९	१) १५ मार्च, १९९९	१४५	२२ व २३ मार्च १९९९,	----------	२४ मार्च, १९९९
		२) २२ ऑक्टोबर, १९९९	९६	२३ ऑक्टोबर, १९९९	नियम स्थगित केला.	२३ ऑक्टोबर, १९९९
				(विभागवार चर्चा झाली नाही.)	(चर्चा व मतदानासाठी)	

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
		३) १४ डिसेंबर, १९९९	७३	२० व २१ डिसेंबर, १९९९	---------	२१ डिसेंबर, १९९९
१६)	२०००	१) १३ मार्च,२०००	१७६	२२ व २३ मार्च,२०००	---------	२४ मार्च, २०००
		२) १८ जूलै,२०००	८२	२५ व २७ जुलै,२०००	दिनांक २५ जुलै रोजीची चर्चा दिनांक २७ जुलै, २००० रोजी घेण्यात आली.	२७ जुलै, २०००
		३) २८ नोव्हेंबर,२०००	८१	४ व ५ डिसेंबर,२०००	--------	५ डिसेंबर, २०००
१७)	२००१	१) १९ मार्च,२००१	१२३	२१ व २२ मार्च,२००१	नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)**	२३ मार्च,२००१
		२) १७ जुलै,२००१	८३	२४ व २५ जुलै,२००१	----------	२६ जुलै,२००१
		३) ४ डिसेंबर,२००१	८५	१० व ११ डिसेंबर,२००१	----------	११ डिसेंबर,२००१
१८)	२००२	१) १४ मार्च,२००२	६२	१८ व १९ मार्च,२००२	----------	२० मार्च, २००२
		२) ३० जुलै,२००२	६९	३१ जुलै, व १ ऑगस्ट २००२	नियम स्थगित केला.	२ ऑगस्ट २००२
		३) १२ डिसेंबर,२००२	७४	१८ व १९ डिसेंबर,२००२	**(चर्चा व मतदानासाठी)** ---------	२० डिसेंबर, २००२

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१९)	२००३	१) १३ मार्च, २००३ २) १५ जुलै, २००३ ३) ९ डिसेंबर, २००३	४४ ६१ ८५	१९ व २० मार्च, २००३ २२ व २३ जुलै, २००३ १६ डिसेंबर, २००३	नियम स्थगित केला. **(चर्चारोधासंबंधी)** --------- नियम स्थगित केला. **(चर्चारोधासंबंधी)**	२१ मार्च, २००३ २४ जुलै, २००३ १७ डिसेंबर, २००३
२०)	२००४	१) १५ मार्च, २००४ २) ८ जून, २००४ ३) ७ डिसेंबर, २००४	५१ ६९ ५६	१६ मार्च, २००४ ९ जून, २००४ १३ व १४ डिसेंबर, २००४	नियम स्थगित केला. **(१)चर्चा व मतदानासाठी व (२)चर्चारोधासंबंधी** १) नियम स्थगित केला. **(चर्चा व मतदानासाठी)** २) सभागृहाच्या संमतीने चर्चारोधाची वेळ ३-३० ऐवजी ४-३० केली.	१६ मार्च, २००४ ९ जून, २००४ १६ डिसेंबर, २००४
२१)	२००५	१) १५ मार्च,२००५ २) १२ जुलै, २००५ ३) ६ डिसेंबर, २००५	६३ ७३ ६५	२२ व २३ मार्च, २००५ १९ व २० जुलै, २००५ १३ व १४ डिसेंबर, २००५	---------- ---------- ----------	२४ मार्च, २००५ २१ जुलै, २००५ १५ डिसेंबर, २००५

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
२२)	२००६	१) १३ मार्च, २००६	७९	२२ व २३ मार्च, २००६	----------	२४ मार्च, २००६
		२) ४ जुलै, २००६	६६	१२ जुलै, २००६	----------	१३ जुलै, २००६
		३) ५ डिसेंबर, २००६	७८	११ व १२ डिसेंबर, २००६	----------	१३ डिसेबर, २००६
२३)	२००७	१) १४ मार्च, २००७	६६	२३ व २४ मार्च, २००७	------	२४ मार्च, २००७
		२) १७ जुलै, २००७	६७	२३ व २४ जुलै, २००७	------	२५ जुलै, २००७
		३) २० नोव्हेंबर,२००७	६९	२७ व २८ नोव्हेंबर,२००७	------	२९ नोव्हेंबर, २००७
२४)	२००८	१) ११ मार्च, २००८	५८	१७ व १८ मार्च, २००८	-------	२४ मार्च, २००८
		२) १६ जुलै,२००८	७४	२२ व २३ जुलै, २००८	------	२४ जुलै, २००८
		३) १६ डिसेंबर, २००८	११०	१७ व १८ डिसेंबर, २००८	नियम स्थगित केला **(चर्चा व मतदानासाठी)**	१९ डिसेंबर, २००८
२५)	२००९	१) १७ मार्च, २००९	६३	१८ मार्च, २००९	नियम स्थगित केला **(चर्चा व मतदानासाठी)**	१९ मार्च, २००९
		२) ११ जून, २००९	१३९	१५ जून, २००९	----	१५ जून, २००९
		३) ९ डिसेंबर, २००९	११३	१४ व १५ डिसेंबर, २००९	----	१६ डिसेंबर, २००९

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
२६)	२०१०	१) १८ मार्च, २०१०	७९	२२ व २३ मार्च, २०१०	-----	२६ मार्च, २०१०
		२) १२ जुलै, २०१०	२४	२० व २३ जुलै, २०१०	-----	२३ जुलै, २०१०
		३) १ डिसेंबर, २०१०	१२६	४ व ७ डिसेंबर, २०१०	------	८ डिसेंबर, २०१०
२७)	२०११	१) १४ मार्च, २०११	६७	२१ व २२ मार्च, २०११	--------	२४ मार्च, २०११
		२) २५ जुलै, २०११	९९	२९ जुलै व १ ऑगस्ट, २०११	-------	२ ऑगस्ट, २०११
		३) १२ डिसेंबर, २०११	९२	१४ व १९ डिसेंबर, २०११	नियम स्थगित केला **(चर्चा व मतदानासाठी)**	२० डिसेंबर, २०११
२८)	२०१२	१) १५ मार्च, २०१२	९३	२१ व २२ मार्च, २०१२	--------	२७ मार्च, २०१२
		२) ९ जुलै, २०१२	६८	१६ व १७ जुलै, २०१२	---------	१८ जुलै, २०१२
		३) ११ डिसेंबर, २०१२	९९	१७ व १८ डिसेंबर, २०१२	---------	१९ डिसेंबर, २०१२
२९)	२०१३	१) ११ मार्च, २०१३	५९	१८ व १९ मार्च, २०१३	---------	२१ मार्च, २०१३
		२) १५ जुलै, २०१३	८०	२२ व २३ जुलै, २०१३	---------	२४ जुलै, २०१३
		३) १० डिसेंबर, २०१३	११५	१६ व १७ डिसेंबर, २०१३	---------	१८ डिसेंबर, २०१३

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
३०)	२०१४	१) २४ फेब्रुवारी, २०१४ २) १२ जून, २०१४ ३) ९ डिसेंबर, २०१४	४१ ८२ ७५	२५ फेब्रुवारी, २०१४ १३ जून, २०१४ १५ व १६ डिसेंबर, २०१४	नियम स्थगित केला. **(१) चर्चा व मतदानासाठी व** **(२) चर्चारोधासंबंधी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** ---	२६ फेब्रुवारी, २०१४ १४ जून, २०१४ १७ डिसेंबर, २०१४
३१)	२०१५	१) १० मार्च, २०१५ २) १३ जुलै, २०१५ ३) ८ डिसेंबर, २०१५	३३ ३३ १२२	१६ व १७ मार्च, २०१५ २० व २१ जुलै, २०१५ १४ व १५ डिसेंबर, २०१५	--- --- ---	१८ मार्च, २०१५ २२ जुलै, २०१५ १६ डिसेंबर, २०१५
३२)	२०१६	१) ९ मार्च, २०१६ २) १८ जुलै, २०१६ ३) ५ डिसेंबर, २०१६	३५ ७९ ९५	१६ व १७ मार्च, २०१६ २५ व २६ जुलै, २०१६ १३ व १४ डिसेंबर, २०१६	--- --- ---	१८ मार्च, २०१६ २७ जुलै, २०१६ १५ डिसेंबर, २०१६
३३)	२०१७	१) ६ मार्च, २०१७ २) २४ जुलै, २०१७ ३) ११ डिसेंबर, २०१७	३० ५४ ८६	१५ मार्च, २०१७ ३१ जुलै व १ ऑगस्ट, २०१७ १८ व १९ डिसेंबर, २०१७	--- --- ---	१८ मार्च, २०१७ २ ऑगस्ट, २०१७ २० डिसेंबर, २०१७

अ.क्र.	सन	पुरवणी मागण्या सादर केल्याचा दिनांक	एकूण मागण्यांची संख्या	विभागीय मागण्यांवर चर्चा व मतदानाचा दिनांक	चर्चा व मतदान/ चर्चारोध (गिलोटीन) संबंधी नियम स्थगित केला असल्यास	पुरवणी विनियोजन विधेयक संमत केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
३४)	२०१८	१) २६ फेब्रुवारी, २०१८ २) ४ जुलै, २०१८ ३) १९ नोव्हेंबर, २०१८	१९ ७० ८७	५ व ६ मार्च, २०१८ ९ व १० जुलै, २०१८ २६ व २७ नोव्हेंबर, २०१८	----- ----- -----	७ मार्च, २०१८ ११ जुलै, २०१८ २८ नोव्हेंबर, २०१८
३५)	२०१९	१) २५ फेब्रुवारी, २०१९ २) २७ जून, २०१९ ३) १६ डिसेंबर, २०१९	५५ ८२ ६१	२६ फेब्रुवारी, २०१९ २८ जून व १ जुलै, २०१९ १९ व २० डिसेंबर, २०१९	नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी**	२८ फेब्रुवारी, २०१९ १ जुलै, २०१९ २० डिसेंबर, २०१९
३६)	२०२०	१) २४ फेब्रुवारी, २०२० २) ७ सप्टेंबर, २०२० ३) १४ डिसेंबर, २०२०	५५ ४६ ७३	२८ फेब्रुवारी व २ मार्च, २०२० ८ सप्टेंबर, २०२० १५ डिसेंबर, २०२०	----- नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी**	३ मार्च, २०२० ८ सप्टेंबर, २०२० १५ डिसेंबर, २०२०
३७)	२०२१	१) १ मार्च, २०२१ २) ५ जुलै, २०२१ ३) २२ डिसेंबर, २०२१	३३ ६१ ११२	४ मार्च, २०२१ ६ जुलै, २०२१ २४ डिसेंबर, २०२१	नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी** नियम स्थगित केला. **चर्चा व मतदानासाठी**	४ मार्च, २०२१ ६ जुलै, २०२१ २७ डिसेंबर, २०२१

*****

परिशिष्ट क्रमांक - २१

संविधान सुधारणा संदर्भातील विधानसभा सभागृहात मांडण्यात आलेल्या ठरावांची यादी (सन १९७१ पासून)

अ.क्र.	अधिवेशन	संदेश पटलावर ठेवण्याचा दिनांक	अनुसमर्थनार्थ ठराव मांडल्याचा दिनांक	विषय	शेरा
१.	सन १९७१ चे दुसरे अधिवेशन	६ सप्टेंबर, १९७१	२३ सप्टेंबर, १९७१	संविधान (चौविसावी सुधारणा), विधेयक १९७१-- **मुलभूत हक्कासंबंधी सुधारणा**	**चर्चा झाली ठराव संमत झाला**
२.	सन १९७२ चे पहिले अधिवेशन	२२ मार्च, १९७२	४ एप्रिल, १९७२	संविधान (पंचवीसावी सुधारणा), विधेयक १९७१- **-मालमत्तांचे संपादन इत्यादीकरिता तरतूद करण्याबाबत**	**चर्चा झाली ठराव संमत झाला**
३.	सन १९७४ चे पहिले अधिवेशन	२१ मार्च, १९७४	२६ मार्च, १९७४	संविधान (बत्तीसावी सुधारणा), विधेयक १९७३-- **महाराष्ट्र व गुजरात या राज्यावर विशेष तरतूद करण्याबाबत**	**गोंधळात ठराव संमत झाला**
४.	सन १९७५ चे विशेष (खास) अधिवेशन	९ मे, १९७५	९ मे, १९७५	संविधान (अडतीसावी सुधारणा), विधेयक १९७५-- **सिक्कीम या भुखंडाला भारताचे बावीसावे राज्य करून घेतले**	**चर्चा झाली ठराव संमत झाला**
५.	सन १९७८ चे पहिले अधिवेशन	१७ मार्च, १९७८	३ एप्रिल, १९७८	संविधान (चव्वेचाळीसावी सुधारणा), विधेयक १९७७-- **कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती आणि प्रसूतीविषयक सहाय्य तरतूद करण्याबाबत**	**चर्चा झाली ठराव संमत झाला**

अ.क्र.	अधिवेशन	संदेश पटलावर ठेवण्याचा दिनांक	अनुसमर्थनार्थ ठराव मांडल्याचा दिनांक	विषय	शेरा
६.	सन १९७९ चे पहिले अधिवेशन	मार्च, १९७९	६ मार्च, १९७९	संविधान (पंचेचाळीसावी सुधारणा), विधेयक १९८०-- **मालमत्तेच्या मुलभूत हक्काविषयी**	**चर्चा झाली** **ठराव संमत झाला**
७.	सन १९८२ चे दुसरे अधिवेशन	७ सप्टेंबर, १९८२	२० सप्टेंबर, १९८२	संविधान (सेहेचाळीसावी सुधारणा), विधेयक १९८२-- **संघराज्याने आकारणी व वसुली केलेले पण राज्यांना नेमून दिलेले कर**	**चर्चा झाली** **ठराव संमत झाला**
८.	सन १९८४ चे तिसरे अधिवेशन	१३ नोव्हेंबर, १९८४	१५ नोव्हेंबर, १९८४	संविधान (त्रेपनावी सुधारणा), विधेयक १९८४-- **लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे.**	**चर्चा झाली** **ठराव संमत झाला**
९.	सन १९८६ चे तिसरे अधिवेशन	२४ नोव्हेंबर, १९८६	२८ नोव्हेंबर, १९८६	संविधान (चौप्पनावी सुधारणा), विधेयक १९८६-- **न्यायाधीशांचे वेतन, इत्यादी**	**चर्चा झाली** **ठराव संमत झाला**
१०.	सन १९८९ चे पहिले अधिवेशन	१० मार्च, १९८९	१७ मार्च, १९८९	संविधान (बासष्टावी सुधारणा), विधेयक १९८८- **लोकसभा व राज्याच्या विधानसभा यांच्या निवडणुका प्रौढ मताधिकाराच्या आधारे होणे**	**चर्चा झाली.** **ठराव संमत झाला**
११.	सन १९९३ चे पहिले अधिवेशन	१५ मार्च, १९९३	३१ मार्च, १९९३	संविधान (बहात्तरावी सुधारणा), विधेयक १९९१ संविधान (त्र्याहत्तरावी सुधारणा), विधेयक १९९१	**चर्चा झाली नाही** **ठराव संमत झाला**
१२.	सन १९९३ चे तिसरे अधिवेशन	१४ डिसेंबर, १९९३	२७ डिसेबर, १९९३	संविधान (सत्याहत्तरावी सुधारणा), विधेयक १९९२	**चर्चा झाली** **ठराव संमत झाला**

अ.क्र.	अधिवेशन	संदेश पटलावर ठेवण्याचा दिनांक	अनुसमर्थनार्थ ठराव मांडल्याचा दिनांक	विषय	शेरा
१३.	सन १९९९ चे तिसरे अधिवशन	------	२२ डिसेंबर, १९९९	संविधान (चौऱ्याऐंशीवी सुधारणा) विधेयक, १९९९	**चर्चा झाली.** **ठराव संमत झाला**
१४.	सन २००१ चे तिसरे अधिवेशन	४ डिसेंबर, २००१	१२ डिसेंबर, २००१	संविधान (एकाण्णवी सुधारणा), विधेयक २०००- **राष्ट्रपती निवडणूक पध्दती, लोकसभा व विधानसभा रचने यांच्यासंबंधीत जनगणनेची आकडेवारी २००१ नुसार घेण्यात येत होती ती सन २०२६ च्या जनगणनेनुसार घेण्याबाबत**	**चर्चा झाली नाही.** **ठराव संमत झाला**
१५.	सन २००३ चे दुसरे अधिवेशन	१६ जुलै, २००३	२४ जुलै,२००३	संविधान (पंच्याण्णवी सुधारणा), विधेयक २००३	**चर्चा झाली नाही.** **ठराव संमत झाला**
१६.	सन २००९ चे तिसरे अधिवेशन	१२ डिसेंबर, २००९	१५ डिसेंबर, २००९	संविधान (एकशे नववी सुधारणा), विधेयक २००९-- **राखीव जागा व विशेष प्रतिनिधीत्त्वाची दहा वर्षांनी मुदतवाढ**	**चर्चा झाली.** **ठराव संमत झाला**
१७.	सन २०१४ चे पाचवे अधिवेशन	११ डिसेंबर, २०१४	१६ डिसेंबर, २०१४	संविधान (एकशे एकशेविसावी सुधारणा), विधेयक २०१४--सर्वोच्च **न्यायालय, उच्च न्यायालये यांच्या न्यायाधिशांच्या नेमणूका व बदल्यासंदर्भात.**	**चर्चा झाली नाही.** **ठराव संमत झाला**
१८.	सन २०१६ चे तृतीय अधिवेशन	२९ ऑगस्ट, २०१६	२९ ऑगस्ट, २०१६	संविधान (एकशे बाविसावी सुधारणा), विधेयक २०१४-- **वस्तू व सेवा कर संदर्भात.**	**चर्चा झाली.** **ठराव संमत झाला**

अ.क्र.	अधिवेशन	संदेश पटलावर ठेवण्याचा दिनांक	अनुसमर्थनार्थ ठराव मांडल्याचा दिनांक	विषय	शेरा
१९.	सन २०२० चे प्रथम अधिवेशन	८ जानेवारी, २०२०	८ जानेवारी, २०२०	संविधान (एकशे सव्वीसावी सुधारणा) विधेयक, २०१९ **राखीव जागा व विशेष प्रतिनिधीत्वाची दहा वर्षांनी मुदतवाढ**	**चर्चा झाली.** **ठराव संमत झाला**

*****

परिशिष्ट क्रमांक - २२

विधानसभा सदस्यांना निलंबित केल्याबाबतची माहिती (सन १९६४ ते २०२१)

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
१)	१३/८/१९६४	(एकूण सदस्य-१) श्री.जाबुवंतराव धोटे	फॉरवर्ड ब्लॉक	दि.१२-८-१९६४ आपला माईक बंद आहे याकारणाने मोडतोड केली व क्रोधाने बाहेर काढले जात असता पेपरवेट फेकला-प्रस्तावावर चर्चा झाली व सभासदत्व कायमचे रद्द करण्यात आले.	सभासदत्त्व कायमचे रद्द करणे	
२)	३१/८/१९६६	(एकूण सदस्य-२०) १) श्री.का.ता जाधव २) श्री.यं.रा.मडूर ३) श्री.सा.गो.पाटकर ४) श्री.धा.पो.सुतार ५) श्री.त्र्यं.सी.कारखानीस ६) श्री.भा.न.गावंडे ७) श्री.ग.अ.देशमुख ८) श्री.शे.आ.देशमुख	संयुक्त महाराष्ट्र समिती व संयुक्त सोशालिस्ट पार्टी	सीमा प्रश्न - सीमा प्रश्नावर सतत बोलत राहण्याचा व कामकाजात अडथळा आणण्याचा इरादा जाहीर केला.	दिनांक ३१ ऑगस्ट, ते ०२ सप्टेंबर, १९६६ पर्यंत	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		९) श्री.कृ.ना.धुळुप १०) श्री.के.शं.धोंडगे ११) श्री.बा.सो.नाईक १२) श्री.का.रा.पाटील १३) श्री.कृ.बा.पाटील १४) श्री.दि.बा.पाटील १५) श्री.स.दौ.पाटील १६) श्री.म.गुं.महाराज १७) श्री.कृ.रा.मुंढे १८) श्री.पां.रा.सानप १९) श्री.बा.ना.नागवडे २०) श्री.श.का.आठल्ये				
३)	७/११/१९६७	(एकूण सदस्य -४३) १) श्री.कृ.ना.धुळुप २) श्री.ना.रा.काळे ३) श्री.ब.द.किल्लेदार	संयुक्त महाराष्ट्र समिती	सीमा प्रश्न-महाजन अहवाल-महाराष्ट्र म्हैसूर सीमावादासंबंधी महाजन मिशाने सादर केलेला अहवाल जाळून टाकून मंत्र्यांनी राजीनामे द्या अशा घोषणा दिल्या आणि कामकाज सल्लागार	संपूर्ण कालावधीसाठी नंतर मा.अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार दिनांक ७ नोव्हेंबर	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		४) श्री.तु.कृ.कोलेकर ५) श्री.अ.रा.गव्हाणे ६) श्री.ग.अ.देशमुख ७) श्री.के.शं.धोंडगे ८) श्री.उध्दवराव पाटील ९) श्री.द.ना.पाटील १०) श्री.दि.बा.पाटील ११) श्री.पा.रा.पाटील १२) श्री.वि.चं.नाईक १३) श्री.उ.र.नान्द्रे (पाटील) १४) श्री.शि.त्रिं.पवार १५) श्री.सा.गो.पाटकर १६) श्री.कृ.गं.देसाई १७) श्री.श.का.आठल्ये १८) श्री.वि.रा.काळदाते १९) श्री.शि.दा.हिरे २०) श्री.ब्र.कृ.माने		समितीमध्ये श्री.धुळप यांनी यासंदर्भात प्रसंगी कामकाज बंद पाडू असे सांगितले.	१९६७ या दिवसाकरिता मर्यादित	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		२१) श्री.द.ना.सामंत २२) श्री.वि.रा.पाटील २३) श्री.गो.तु.कालिकते २४) श्री.त्र्यं.सी.कारखानीस २५) श्री.भा.शि.पाटील २६) श्री.रा.धों.पाटील २७) श्री.सं.मा.पाटील २८) श्री.शं.भि.पोटिडे २९) श्री.सु.रा.राऊत ३०) श्री.अ.प.शेटये ३१) श्री.पां.रा.सानप ३२) श्री.सी.स.सावंत ३३) श्री.नि.वि.उगले ३४) श्री. गु.भा.गुणाचार्य, ३५) डॉ. आर.बी.चौधरी ३६) श्री. वि.अ.दराडे,				

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		३७) श्री. बा.कृ .देशमुख, ३८) श्री.रा.मा.पंगारे, ३९) श्री. ला.भ.जैस्वाल, ४०) श्री. चंद्रकांत आर.पाटील, ४१) श्री. अहमद मौलवी मा.उस्मान निहाल, ४२) श्री. सी.स.भोये, ४३) श्री. गुलाम महमद हाजीनूरमहमंद बनातवाला				
४)	८/११/१९६७	(एकूण सदस्य -४३) १) श्री. कृ.ना. धुळुप, २) श्री. ना.रा.काळे, ३) श्री. ब. द. किल्लेदार, ४) श्री. तु.कृ.कोलेकर, ५) श्री. अ.रा.गव्हाणे,	संयुक्त महाराष्ट्र समिती	सीमा प्रश्नासंबंधी झालेल्या गोंधळातून अविश्वासाचा ठराव प्रथम चर्चेस घेण्यात यावा यासाठीचा आग्रह	दिनांक ८ ते १७ नोव्हेंबर, १९६७ पर्यंत	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		६) श्री. ग.अ.देशमुख, ७) श्री. के . शं. धोंडगे, ८) श्री. उध्दवराव पाटील, ९) श्री. द.ना.पाटील, १०) श्री. दि. बा. पाटील, ११) श्री. पा.रा.पाटील, १२) श्री. वि.चं.नाईक, १३) श्री. उ.र.नान्द्रे (पाटील), १४) श्री. शि. त्रिं. पवार, १५) श्री. सा.गो.पाटकर, १६) श्री. कृ .गं.देसाई, १७) श्री. श.का. आठल्ये, १८) श्री. वि.रा.काळदाते, १९) श्री. शि.दा.हिरे, २०) श्री. ब्र.कृ .माने,				

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		२१) श्री. द.ना.सामंत, २२) श्री. वि.रा.पाटील, २३) श्री. गो. तु.कालिकते, २४) श्री. त्र्यं.सी.कारखानीस, २५) श्री. भा.शि.पाटील, २६) श्री. रा.धों.पाटील, २७) श्री. सं.मा.पाटील, २८) श्री. शं.भि. पोटिडे, २९) श्री. सु.रा.राऊत, ३०) श्री. अ. प. शेटये, ३१) श्री. पां.रा.सानप, ३२) श्री. सी.स.सावंत, ३३) श्री. नि.वि. उगले , ३४) श्री. गु.भा.गणाचार्य, ३५) डॉ. आर.बी.चौधरी, ३६) श्री. वि.अ.दराडे,				

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		३७) श्री. बा.कृ.देशमुख, ३८) श्री. रा.मा.पंगारे, ३९) श्री. ला.भ.जैस्वाल, ४०) श्री. चंद्रकांत आर.पाटील, ४१) श्री. अहमद मौलवी मा.उस्मान निहाल, ४२) श्री. सी.स.भोये, ४३) श्री. गुलाम महमद हाजनूरमहमंद बनातवाला				
५)	२२/३/१९७३	(एकूण सदस्य-२७) १) श्री. त्र्यं. सी. कारखानीस, २) श्री. कृ . स. देशमुख, ३) श्री. के . शं. धोंडगे, ४) श्री. दी. बा. पाटील,	शे.का.प.	महसूल विभागाच्या दुष्काळ व टंचाईच्या निमित्ताने अनुदानाच्या मागण्यांच्यावेळी सदस्यांनी दुष्काळ निवारण आणि इतर चार मागण्यांसाठी शासनाचे आश्वासन नकोकृतीकरावीअशीवारंवारमागणी करुन सभागृहात गोंधळ केल्याने.	दिनांक २२ ते २६ मार्च, १९७३	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		५) श्री. ह. रा. बारकुले ६) श्री. पु. बा. कडू, ७) श्री. वि. चं. म्हस्के, ८) श्री. वि. बा. खाडीवाले, ९) श्री. वा. अं. देशमुख, १०) श्री. गुलाम अहमद हाजीनूरमहमद, बनातवाला, ११) श्री. ज. का. अहेर, १२) श्री. नि. रा. बोरकडे, १३) श्री. दु. सी. पवार, १४) श्री. अ. ना. पाटील, १५) श्री. अं. ना. थोपटे, १६) श्री. अ. टी. पाटील, १७) श्री. स. दा. मंडलिक ,				

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		१८) श्री. श्री. द. नातु, १९) श्री. दि. द. पाडवी, २०) श्री. कृ . धो. भेगडे, २१) श्री. रा. का. म्हाळगी, २२) श्री. अ. अ. वानखेडे, २३) श्री. प्र. नवलकर, २४) श्री. मृ.के. गोरे, २५) श्री. दि. वि. पुरोहित, २६) श्री. गो.रा. शेंडे २७) श्री. ना.की. पाटील				
६)	६/८/१९७४	(एकूण सदस्य - १७) १) श्री. दि. बा. पाटील, २) श्री. का. रा. पाटील, ३) श्री. कि. ना. देशमुख, ४) श्री. वा. आ. देशमुख,	शे.का.प.	महागाई टंचाईबाबत चर्चा जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व महागाई या संदर्भात चर्चा चालू असताना (रॉकेल टंचाई) सभागृहात गोंधळ केल्याने.	दिनांक ६ ते ८ ऑगस्ट, १९७४	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		५) श्री. दि. डों. पाडवी, ६) श्री. कृ .धों. भेंगडे, ७) श्री. श्री. द. नातु, ८) श्री. अ. अ.वानखेडे, ९) श्री. पु. बा. कडू, १०) श्री. व. बा. लंघे, ११) श्री. प्र. नवलकर, १२) श्रीमती मृ. गोरे, १३) श्री. ज. जाधवराव, १४) श्री. ज. मठकर, १५) श्री. डी.व्ही. पुरोहित, १६) श्री. जी.आर. शेंडे, १७) श्री. वि. डी.राजे				
७)	७/८/१९७४	(एकूण सदस्य-५) १) श्री. ग. आ. देशमुख,		जीवनावश्यक वस्तुंची टंचाई व महागाई या संदर्भात दि. ६ ऑगस्ट, १९७४ रोजी	दिनांक ७ ते १२ ऑगस्ट, १९७४	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		२) श्री. एन. के . पाटील, ३) श्री. व्ही. सी. म्हस्के, ४) श्री. श्री. एच.आर.बारकुले, ५) श्री. ए. टी. पवार		सभागृहात गोंधळ घातल्याने.		
८)	२९/३/१९८५	(एकूण सदस्य - १३) १) श्री. के . शं. धोंडगे, २) श्री. ब. दा. ढाकणे, ३) श्री. सु. भि. जैन, ४) श्री. प. बा. पाटील, ५) श्री. ब. भि. पाचपुते, ६) श्री. वि. अ. गव्हाणे, ७) श्री. चं. सो. घोडके, ८) श्री. ह. उ.मोरे, ९) श्री. सु. चिं.खानोरकर, १०) श्री. श. मो. तसरे,		शासनाने शेतकऱ्यांकडील ज्वारी खरेदी करण्याची योजना दिनांक १५ मार्च, १९८५ पासून अकस्मात बंद केली याबाबतच्या स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यास अनुमती न दिल्याने सभागृहात गोंधळ करुन राजदंड पळविल्याबाबत.	संपूर्ण सत्र कालावधीकरिता	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		११) डॉ. श्रा.गो.पराते, १२) श्री. सु. शा. शिंदे, १३) श्री. वै. या आकात				
९)	२६/११/१९८७	(एकूण सदस्य-१) श्री. छगन भुजबळ	शिवसेना	मा.अध्यक्षांची अनुमती न घेता सभागृहात कापडी फलक दाखवून गैरवर्तन केले.	दोन दिवस दि. २६ व २७ नोव्हेंबर, १९८७	
१०)	२४/७/१९९१	(एकूण सदस्य-३) १) श्री. सुर्यकांत महाडिक, २) श्री. कालिदास कोळंबकर, ३) श्री. मारुतीराव शिंदे	शिवसेना	विधानसभा सदस्यांची समिती व निवड न केल्याबद्दल सभागृहाचे कामकाज सुरु असताना मा.मुख्यमंत्र्यांच्या आसनाजवळ जाऊन त्यांना शारिरीक इजा करण्याचा प्रयत्न केल्याबाबत.	संपूर्ण सत्र कालावधी	
११)	३१/३/१९९३	(एकूण सदस्य - ८) १) श्री चंद्रकांत खैरे, २) श्री.नारायण चव्हाण, ३) श्री. हेमेंद्र मेहेता,	शिवसेना व भा.ज.पा.	गडाख-विखे पाटील खटला औरंगाबाद उच्च न्यायालयाचा जो निकाल जाहीर झाला त्या संबंधात नियम ९७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास राखून चर्चा हवी म्हणून एकसारखा गोंधळ केल्याबद्दल	मा.अध्यक्षांनी 'नेम' करुन दोन दिवस सभागृहात बसता येणार नाही असे निदेश दिले.	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		४) श्री.जगन्नाथ पाटील, ५) श्री.राज पुरोहित, ६) श्री.सुरेश नवले, ७) श्री.प्रेमकुमार शर्मा, ८) श्री.गजानन किर्तीकर				
१२)	२/४/१९९३	(एकूण सदस्य -६) १) श्री अर्जुन खोतकर २) श्री. हरिभाऊ लहाने, ३) श्री.सुरेश नवले, ४) श्री.राज पुरोहित, ५) श्री.देवेंद्र साटम, ६) श्री.शाबीर शेख	शिवसेना व भा.ज.पा.	सभागृह सुरु असताना मा.अध्यक्षांच्या टेबलावर हात आपटून कामकाजात अडथळा निर्माण केल्याबाबत.	सात दिवसांसाठी निलंबित	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
१३)	३०/३/१९९५	(एकूण सदस्य - १) श्री. रामभाऊ मोझे	काँग्रेस (आय)	सभागृहाचे कामकाज सुरु असताना राजदंड पळवून तो जमिनीवर फेकल्याबाबत.	चालू अधिवेशन संपेपर्यंत.	संसदीय कार्य मंत्र्यांच्या प्रस्तावास सुधारणा सुचविल्याने व संबंधित सदस्यांनी माफी मागितल्याने फक्त ताकीद देण्यात आली.
१४)	३०/७/१९९६	(एकूण सदस्य– ४) १) श्री. माणिकराव ठाकरे, २) श्री. अशोक धोत्रे, ३) श्री. अनिस अहमद, ४) श्री. दिग्विजय खानविलकर	काँग्रेस (आय)	किणी मृत्यु प्रकरणी सभागृहात घोषणा व कापडी फलक दाखवल्याबाबत.	उर्वरित सत्र कालावधीकरीता	
१५)	२३/७/१९९७	(एकूण सदस्य - ५) १) श्री. नवाब मलिक, २) श्री. सोहेल लोखंडवाला,	समाजवादी व भा.क.प.	रमाबाई आंबेडकर नगरातील गोळीबार प्रकरणी सभागृहामध्ये प्रेतयात्रा काढणे, टेबलावरील पुस्तके व कागदपत्र फाडणे व अन्य गैरवर्तन केल्याबाबत.	१ दिवस (दिनांक २३ जुलै, १९९७)	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		३) श्री. बशीर पटेल, ४) श्री. नरसय्या आडम, ५) श्री. विठ्ठल नाईक				
१६)	१५/१२/१९९९	(एकूण सदस्य-७) १) श्री. दिलिप भोळे, २) श्री. रोहिदास चव्हाण, ३) श्री. भास्कर जाधव, ४) श्री. ज्ञानेश्वर धाने-पाटील, ५) श्री.विनायक राऊत, ६) श्री.गुलाबराव पाटील, ७) श्री. सुभाष वानखेडे	शिवसेना	मंत्री व सत्ताधारी सदस्यांबाबत अनुद्गार काढल्याबाबत.	७ दिवस	दिनांक १७ डिसेंबर १९९९ रोजी निलंबन रितसर ठरावाव्दारे रद्द करण्यात आले.
१७)	२५/०७/२०००	(एकूण सदस्य - १२) **पहिले** १) श्री.. शिवशरण बिराजदार	शिवसेना	श्री. बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्यासंदर्भात शासनाच्या निर्णयाच्या अनुषंगाने सभागृहातील साहित्याची नासधूस, मोडतोड व गैरवर्तन	पहिले ६ सदस्य- १ वर्ष	दिनांक २५ जुलै, २००० रोजी श्री.विनायक राऊत यांचे नाव नजरचुकीने

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		२) श्री. अनिल राठोड, ३) श्री. सुभाष वानखेडे, ४) श्री. अशोक शिंदे, ५) श्री.. सुभाष साबणे, ६) श्री. सुरेश साळोखे **दुसरे** १) श्री. कल्याणराव पाटील, २) श्री. गुलाबराव पाटील, ३) श्री. सिताराम भोईर, ४) श्री. दिलीप भोळे, ५) श्री. रविंद्र माने, ६) श्री. विनायक राऊत		केल्याबाबत.	दुसरे ६ सदस्य- ६ महिने	समाविष्ट केल्यामुळे त्यांची शिक्षा मागे घेण्यात आली व गैरवर्तन करणारे परंतु नांव समाविष्ट करण्याचे राहिलेले श्री.आर.एम.वाणी व श्री.प्रकाश खेडेकर यांचे सदस्यत्व १ वर्षासाठी निलंबित करण्यात आले.
१८)	२७/०७/२०००	(एकूण सदस्य - २) १) श्री. प्रकाश खेडेकर, २) श्री. आर. एम. वाणी	शिवसेना	श्री. बाळासाहेब ठाकरे यांना अटक केल्याप्रकरणी सभागृहातील साहित्याची नासधूस, मोडतोड व गैरवर्तन	१ वर्षाकरिता	दोन सदस्यांना १ वर्षासाठी निलंबित करण्यात आले. व श्री.विनायक राऊत

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
				केल्याबाबत.		यांचे नजरचुकीने समाविष्ट झालेले नाव मागे घेण्यात आले दिनांक ४ डिसेंबर, २००० रोजी रितसर ठरावाव्दारे या प्रकरणात १ वर्ष शिक्षा झालेल्या एकूण आठ सदस्यांचे सदस्यत्व निलंबन सहा महिन्यापर्यंत कमी करण्यात आले.
१९)	२७/०३/२००१	(एकूण सदस्य-९) १) श्री. राज पुरोहित २) श्री. गिरीष बापट, ३) श्री. अरुण अडसड, ४) श्री. साहेबराव घोडे, ५) श्री. अतुल शहा,	भा.ज.पा.	राज्यमंत्री एकनाथ गायकवाड यांचे कथित भ्रष्टाचार प्रकरणी सभागृहात गोंधळ, घोषणा व गैरवर्तन केल्यामुळे.	सत्र कालावधीसाठी	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		६) श्री. देवेंद्र फडणवीस, ७) श्री. हेमेंद्र महेता, ८) श्री. विनय श्रीधर नातू, ९) श्री. गिरीश महाजन				
२०)	०६/१२/२००५	(एकूण सदस्य-०१) श्री.गुलाबराव गावंडे	शिवसेना	सभागृहात विषारी किटकनाशक व एक केरोसिनने भरलेली बाटली आणून अचानक उभे राहून व सभागृहाच्या वेलमध्ये येऊन किटकनाशकाची बाटली तोंडाला लावून केरोसिनची बाटली डोक्यावर ओतण्याचा प्रयत्न केल्यामुळे.	उर्वरित सत्र कालावधीकरीता दिनांक ६ ते १६ डिसेंबर, २००५	
२१)	१३/१२/२००५	(एकूण सदस्य-०३) १) श्री. एकनाथ खडसे-पाटील, २) श्री. गिरीश महाजन, ३) श्री. सुधीर मुनगंटीवार	भा.ज.पा.	मा.अध्यक्षांच्या दालनात येवून मा.उपाध्यक्षांना शिवीगाळ केल्याप्रकरणी सभागृहात प्रस्ताव.	दिनांक १३ डिसेंबर, २००५ पासून सहा महिने	दिनांक १३ मार्च, २००६ रोजी निलंबन मागे घेतले.

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
२२)	०५/१२/२००६	(एकूण सदस्य–१०) १) श्री. देवेंद्र फडणवीस, २) श्री. गिरीश महाजन, ३) श्री. सुनिल धांडे, ४) श्री. रविंद्र गायकवाड, ५) श्री. वामनराव चटप, ६) श्री. एकनाथ शिंदे, ७) श्री. संदीप धुर्वे, ८) श्री. बाबुराव पाचर्णे, ९) श्री. शरद ढमाले, १०) श्री. दिलीप येळगावकर	भा.ज.प.	आक्षेपार्ह मजकूर असलेले फलक सभागृहात फडकविणे, कागदपत्र भिरकावणे व सभागृहामध्ये बेशिस्तिचे वर्तन केल्यामुळे	तीन दिवसांसाठी निलंबित दिनांक ५ ते ८ डिसेंबर, २००६	दिनाक ७ डिसेंबर, २००६ रोजी निलंबन मागे घेतले.
२३)	१/४/२००८	(एकूण सदस्य ०६) १) श्री. वामनराव चटप, २) श्री. संजय चव्हाण, ३) श्री. राज पुरोहित, ४) श्री. बच्चू कडू,	शे.का.प., अपक्ष, भा.ज.पा., शिवसेना	मा.अध्यक्षांच्या आसनासमोरील डायसवरील जाड पुस्तके मा.तालिका अध्यक्षांना फेकून मारली. तसेच टाचण्यांचा बॉक्स मा.तालिका अध्यक्षांच्या रोखाने भिरकावल्याबाबत.	एक वर्षाकरिता	दि. २४ एप्रिल, २००८ रोजी निलंबन मागे घेतले.

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		५) श्री. अर्जुन खोतकर, ६) श्री. संजय कुटे				
२४)	९/११/२००९	(एकूण सदस्य–४) १) श्री.शिशिर शिंदे, २) श्री.रमेश वांजळे, ३) श्री.राम कदम, ४) श्री.वसंतराव गिते	म.न.से.	सभागृहातील शपथविधीचा कार्यक्रम सुरु असताना अनूचित वर्तन केल्याबाबत	दिनांक १० नोव्हेंबर, २००९ पासून चार वर्षांकरिता.	दि.१२ जुलै,२०१० रोजी निलंबन मागे घेतले.
२५)	१/१२/२०१०	(एकूण सदस्य–१) श्री.संजय राठोड,	शिवसेना	सभागृहाचे कामकाज सुरु असताना सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत घृणास्पद व लांछनीय वर्तन व राजदंड पळविल्याबाबत.	डिसेंबर, २०१० चे हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत	दि. १५ डिसेंबर, २०१० रोजी निलंबन मागे घेतले.
२६)	२/१२/२०१०	(एकूण सदस्य–५) १) श्री.संजय राठोड, २) ॲड.आशिष जयस्वाल, ३) कॅप्टन अभिजीत अडसूळ, ४) प्रा.शरद पाटील, ५) श्री.रविंद्र वायकर	शिवसेना	सभागृहाचे कामकाज सुरु असताना सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत घृणास्पद व लांछनीय वर्तन व राजदंड पळविल्याबाबत.	दिनांक २ डिसेंबर, २०१० पासून पुढील वर्षाचे हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
२७)	२४/३/२०११	(एकूण सदस्य-९) १) श्री.विनोद घोसाळकर, २) श्री.हरिष पिंपळे, ३) श्री.विजय शिवतारे, ४) श्री.विजयकुमार देशमुख, ५) श्री.गिरीष महाजन, ६) श्री.एकनाथ शिंदे, ७) श्री.प्रताप सरनाईक, ८) श्री.तारासिंग सरदार, ९) श्री.रविंद्र वायकर	शिवसेना, भारतीय जनता पार्टी, म.न.से.	मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांना अर्थसंकल्प मांडू देण्यास अडथळा आणणे, बॅनर फडकविणे, घोषणाबाजी करणे तसेच मा.अध्यक्षांच्या निदेशाचा अवमान करणे अशा प्रकारे सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय वर्तन केल्याबाबत.	दिनांक २४ मार्च, २०११ पासून दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत	दिनांक २९ मार्च, २०११ रोजी निलंबन मागे घेतले.
२८)	१९/४/२०११	(एकूण सदस्य-१) श्री. विजय शिवतारे	शिवसेना	सभागृहातून विरोधी पक्ष सभात्याग करीत असताना सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.विजय शिवतारे यांनी मा.अध्यक्षांच्या संदर्भात आक्षेपार्ह शब्दांचा वापर करून सर्वोच्च सभागृहाच्या माननीय अध्यक्षांचा अवमान केल्यामुळे	दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी दिवसाचे कामकाज संपेपर्यत निलंबित करण्यात आले.	

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
२९)	१३/१२/२०११	(एकूण सदस्य-२) १) श्री.नितीन भोसले २) श्री.प्रकाश भोईर	म.न.से	सभागृहाच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे, बॅनर फडकविणे, घोषणाबाजी करणे तसेच मा.अध्यक्षांच्या निदेशाचा अवमान केल्याबाबत.	दिनांक १३ डिसेंबर, २०११ रोजी सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत.	सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत
३०)	१३/१२/२०११	(एकूण सदस्य-१) श्री.नाना पटोले	भा.ज.प.	सभागृहात बॅनर्स फडकवून अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे.	दिनांक १३ डिसेंबर, २०११ रोजी पासून सन २०११ चे हिवाळी अधिवेशन समाप्त होईपर्यंत.	दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी निलंबन मागे घेतले.
३१)	१९/१२/२०११	(एकूण सदस्य-५) १) श्री.चंद्रकांत हंडोरे २) श्री.नवाब मलिक ३) श्री.शशीकांत शिंदे ४) श्री.जितेंद्र आव्हाड ५) श्री.प्रशांत ठाकूर	काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस	सभागृहात फलक फडकाविल्यामुळे व मा. अध्यक्षांच्या निदेशांचे पालन न केल्यामुळे.	दिनांक १९ डिसेंबर, २०११ रोजी सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत.	सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत
३२)	३०/०३/२०१२	(एकूण सदस्य-१४)	शिवसेना -१३	सन्माननीय सदस्यांनी डोक्यावर टोप्या घालून, गळयात भगवे	दि. ३० मार्च, २०१२	दि. २० एप्रिल, २०१२

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		१) श्री.प्रताप सरनाईक २) श्री.महादेव बाबर ३) श्री.विजय शिवतारे ४) श्री.एकनाथ शिंदे ५) श्री.विनोद घोसाळकर ६) श्री.राजन विचारे ७) श्री.ज्ञानराज चौगुले ८) श्री.संजय गावंडे ९) डॉ.बालाजी किणीकर १०) कॅ.अभिजीत अडसूळ ११) डॉ.सुजित मिणचेकर १२) श्री.चंद्रकांत मोकाटे १३) श्री.दौलत दरोडा १४) प्रा.राम शिंदे	भाजप -१	दुपट्टे घालून, टाळ वाजवत व घोषणा देत सभागृहात प्रवेश केला व सभागृहाचे कामकाज पार पाडण्यास अडथळा निर्माण केल्याबाबत.	पासून एक वर्षाकरीता निलंबित.	रोजी निलंबन मागे घेतले.
३३)	२०/०३/२०१३	(एकूण सदस्य-५) १) श्री.राम कदम २) श्री.क्षितीज ठाकूर	म.न.से. ब.वि.आ. भा.ज.प.	सभागृहात आक्षेपार्ह वर्तन करुन अत्यंत बेजबाबदार, अशोभनीय तसेच सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा	दिनांक २० मार्च, २०१३ पासून	दिनांक २४ जुलै, २०१३ रोजी निलंबन मागे

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		३) श्री.जयकुमार रावल ४) श्री.प्रदीप जयस्वाल ५) श्री.राजन साळवी	शिवसेना शिवसेना	अवमान करणारे वर्तन केल्यामुळे.	दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत.	घेतले.
३४)	१६/०४/२०१३	(एकूण सदस्य-१) श्री. ओमप्रकाश राजे-निंबाळकर	शिवसेना	सभागृहाचे कामकाजामध्ये अडथळा आणणे, घोषणाबाजी करणे, राजदंड पळविणे तसेच मा.अध्यक्षांचे निदेशाचा अवमान करणारे वर्तन केल्यामुळे	दिनांक १६ एप्रिल, २०१३ पासून १ वर्षाकरिता.	दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी निलंबन मागे घेतले.
३५)	२६/७/२०१३	(एकूण सदस्य-१) श्री. प्रविण दरेकर	म.न.से.	सभागृहाच्या बाहेर जात असतांना अपशब्द वापरुन शिविगाळ करीत अत्यंत आक्षेपार्ह, अशोभनीय व बेजबाबदार वर्तन करुन सर्वोच्च सभागृहाचा अवमान केल्यामुळे.	दिनांक २६ जुलै, २०१३ पासून सन २०१४ च्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत.	दिनांक ३१ जुलै, २०१३ रोजी निलंबन मागे घेतले.
३६)	११/१२/२०१३	(एकूण सदस्य-१) श्री.रवि राणा, वि.स.स.	अपक्ष	सभागृहामध्ये बेशिस्त व अशोभनीय वर्तन केल्याने.	दिनांक ११ डिसेंबर, २०१३ रोजी सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत	निलंबनाचा कालावधी संपल्यानंतर आपोआपच निलंबन रद्द झाले.

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
३७)	१६/१२/२०१३	(एकूण सदस्य-१) श्री.रवि राणा	अपक्ष	कामकाजामध्ये अडथळा आणणे, संत्रा व कपाशीच्या माळा गळयात घालून सभागृहात घोषणाबाजी करणे तसेच मा. उपाध्यक्ष यांच्या निदेशांचा अवमान करणे अशाप्रकारे सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय वर्तन केल्यामुळे.	दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पासून अधिवेशन संपेपर्यंत.	दिनांक २० डिसेंबर, २०१३ रोजी निलंबन मागे घेतले.
३८)	९/६/२०१४	(एकूण सदस्य-२) १) श्री.राजेश क्षीरसागर २) डॉ.सुजित मिणचेकर	शिवसेना	सभागृहाच्या कामकाजामध्ये अडथळा आणून, सभागृहात बॅनर घेऊन वेलमध्ये घोषणाबाजी करून व राजदंड उचलित मा.उपाध्यक्ष यांनी वारंवार दिलेल्या निदेशांचा भंग करून व त्यांचा अवमान करून सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे व सर्वोच्च सभागृहाचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय, बेशिस्त गैरवर्तन केल्यामुळे.	दिनांक ९ जून, २०१४ पासून अधिवेशन संपेपर्यंत.	निलंबनाचा कालावधी संपल्यानंतर आपोआपच निलंबन रद्द झाले.

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
३९)	१२/११/२०१४	(एकूण सदस्य-५) १) श्री. राहुल बोंद्रे २) श्री. अब्दुल सत्तार ३) श्री. अमर काळे ४) श्री. विरेंद्र जगताप ५) श्री. जयकुमार गोरे	काँग्रेस (आय)	मा.राज्यपाल यांचे अभिभाषणासाठी मध्यवर्ती सभागृह, विधानभवन येथे आगमन होत असताना सदस्यांनी मा.राज्यपाल यांच्या नजीक जाऊन त्यांना धक्काबुक्की केल्यामुळे.	दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ पासून दोन वर्षाकरिता.	दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी निलंबन मागे घेण्यात आले.
४०)	१२/१२/२०१४	(एकूण सदस्य-१) श्री. जितेंद्र आव्हाड	राष्ट्रवादी काँग्रेस	महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेला मा. मुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले असतांना श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी सभागृहात खाली बसून अत्यंत आक्षेपार्ह व अशोभनीय अपशब्द वापरुन व बेजबाबदार वर्तन करुन सभागृहाची प्रतिष्ठा मलीन केली व सर्वोच्च सभागृहाचा अवमान केल्यामुळे.	दिनांक १२ डिसेंबर, २०१४ पासून अधिवेशन संपेपर्यंत.	दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी निलंबन मागे घेतले.

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
४१)	१६/०३/२०१६	(एकूण सदस्य-१) ॲड. वारीस पठाण	एम.आय.एम	दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी सभागृहाचे कामकाज सुरु असतांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली भारतमाते विषयी अनादर दर्शवून अत्यंत आक्षेपार्ह गैरवर्तन करुन संसदीय प्रथा, परंपरा व शिष्टाचाराचे उल्लंघन केल्यामुळे	दिनांक १६ मार्च, २०१६ रोजीपासून विद्यमान अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा कालावधी संपेपर्यंत निलंबित करण्यात आले.	निलंबनाच्या कालावधी संपल्यानंतर आपोआपच निलंबन रद्द झाले.
४२)	२२/०३/२०१७	(एकूण सदस्य-१९) १) श्री.अमर काळे २) श्री.भास्कर जाधव ३) श्री.विजय वड्डेटीवार ४) डॉ.मधुसूदन केंद्रे ५) श्री.हर्षवर्धन सपकाळ ६) श्री.कुणाल पाटील ७) श्री.जयकुमार गोरे ८) श्री.संग्राम थोपटे ९) श्री.नरहरी झिरवाळ	काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस	शनिवार, दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी मा.वित्त मंत्री संविधानातील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र राज्याचा २०१७-२०१८ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात मांडत असताना व महत्त्वाचे घटनात्मक कर्तव्य पार पाडत असताना, सदस्यांकडून सभागृहात अभूतपूर्व गोंधळ घालून अडथळा निर्माण केल्याबद्दल	दिनांक २२ मार्च, ते ३१ डिसेंबर, २०१७.	दिनांक ०१ एप्रिल, २०१७ रोजी एकूण-९ सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. श्री.संग्राम थोपटे, वि.स.स., श्री.नरहरी झिरवाळ, वि.स.स., श्री.दिपक चव्हाण, वि.स.स., श्री.दत्तात्रय भरणे, वि.स.स., श्री.अब्दुल सत्तार,

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
		१०) श्री.जितेंद्र आव्हाड ११) श्री.दिपक चव्हाण १२) श्री.राहूल जगताप १३) श्री.दत्तात्रय भरणे १४) श्री.अब्दुल सत्तार १५) श्री.संग्राम जगताप १६) श्री.अवधूत तटकरे १७) श्री.अमित झनक १८) श्री.वैभव पिचड १९) श्री.डी.पी.सावंत				वि.स.स., श्री.अवधूत तटकरे, वि.स.स., श्री.अमित झनक, वि.स.स., श्री.वैभव पिचड, वि.स.स., श्री.डी.पी.सावंत, वि.स.स. दिनांक ०७ एप्रिल, २०१७ रोजी एकूण-१० सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. श्री.अमर काळे, वि.स.स., श्री.भास्कर जाधव, वि.स.स., श्री.विजय वड्डेटीवार, वि.स.स., डॉ.मधुसूदन केंद्रे, वि.स.स.,

अ.क्र (१)	निलंबनाचा दिनांक (२)	निलंबित सदस्यांचे नाव (३)	पक्ष (४)	निलंबनाचे कारण (५)	निलंबनाचा कालावधी (६)	निलंबन रद्द किंवा मागे घेतल्याबाबत (७)
						श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स., श्री.कुणाल पाटील, वि.स.स., श्री.जयकुमार गोरे, वि.स.स., श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स., श्री.राहूल जगताप, वि.स.स., श्री.संग्राम जगताप, वि.स.स.
४३)		(एकूण सदस्य-१२) १) डॉ. संजय कुटे २) अँड. आशिष शेलार ३) श्री. अभिमन्यु पवार ४) श्री. गिरीष महाजन ५) श्री. अतुल भातखळकर ६) ॲड. पराग अळवणी ७) श्री. हरिष पिंपळे ८) श्री. राम सातपुते ९) श्री. जयकुमार रावल १०) श्री. योगेश सागर ११) श्री. नारायण कुचे १२) श्री. किर्तीकुमार ऊर्फ बंटी भांगडीया	भारतीय जनता पार्टी	दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी सभगृहाचे कामकाज सुरु असताना सभागृहात गैरवर्तन केले, सभागृहात पीठासीन अधिकाऱ्यांना उददेशून अर्वाच्च भाषेत संभाषण केले, माईक व राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर सभागृह तहकूब झाल्यानंतर सुद्धा मा.अध्यक्ष यांच्या दालनात पुन्हा एकदा या सर्व सदस्यांनी गैरवर्तन केले आणि तालिका पीठासीन अधिकाऱ्यांना शिवगाळ केली. सभागृहाची प्रतिष्ठा मलीन करणारे अत्यंत अशोभनीय व बेशीस्त गैरवर्तन केल्यामुळे ही विधान सभा ठराव करीत आहे की, त्यांचे सदस्यत्व एका वर्षाकरिता निलंबित करण्यात यावे तसेच निलंबनाच्या कालावधीत त्यांना मुंबई व नागपूर येथील विधानभवनाच्या प्रसीमेत येण्यास बंदी घालण्यात यावी.	१ वर्षाकरिता	

*****

परिशिष्ट क्रमांक - २३

अभिनंदनपर प्रस्ताव (सन १९६९ पासून)

अ.क्र.	तपशील	प्रस्ताव समंत केल्याचा दिनांक
१.	चांद्रविजयाबद्दल अमेरिकन अंतराळवीर, शास्त्रज्ञ, असंख्य कर्मचारी व अमेरिकेचे अध्यक्ष श्री.निक्सन यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव.	२९ जुलै, १९६९ - विधानपरिषद
२.	विधिमंडळाचे माजी सचिव श्री. श्रीनिवास बेलवडी यांच्या कार्याचा गौरव.	०७ सप्टेंबर, १९७३ विधानसभा/विधानपरिषद
३.	विधिमंडळाचे माजी सचिव, श्री. द. मा. अणे यांचा कार्याचा गौरव.	२९ नोव्हेंबर, १९७६ विधानसभा/विधानपरिषद
४.	स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, समाजसुधारक व तत्वज्ञ परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले यांना मॅगसेस् पुरस्कार मिळाल्याबद्दल.	१९ जुलै, १९९६ विधानसभा/विधानपरिषद
५.	टेनिसपटू लिअॅन्डर पेस यांनी अॅटलांटा ऑलिम्पिक स्पर्धेत टेनिसचे वैयक्तिक ब्रॉंझ पदक भारताला मिळवून दिल्याबाबत.	०५ ऑगस्ट, १९९६ - विधानसभा ०६ ऑगस्ट, १९९६ - विधानपरिषद
६.	स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, समाजसुधारक व तत्वज्ञ परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले यांना टेंम्पलटन पुरस्कार मिळाल्याबद्दल.	१७ मार्च, १९९७ - विधानसभा १८ मार्च, १९९७ - विधानपरिषद
७.	राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे सन १९९७ साठी देण्यात आलेले 'उत्कृष्ट संसदपटू' व 'उत्कृष्ट भाषण' हे पुरस्कार अनुक्रमे श्री. अशोक मोडक, वि.प.स. व श्री. वसंत चव्हाण, वि.प.स. यांना प्राप्त झाल्याबद्दल.	२च१ एप्रिल, १९९८ - विधानपरिषद
८.	जगद्विख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रा. अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल.	१४ डिसेंबर, १९९८ विधानसभा/विधानपरिषद
९.	स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर व प्रख्यात सनईवादक उस्ताद बिस्मिला खान यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल.	२० मार्च, २००१ विधानसभा/विधानपरिषद
१०.	श्री. मनोहर जोशी यांची लोकसभेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबाबत.	३० जुलै, २००२ विधानसभा/विधानपरिषद

अ.क्र.	तपशील	प्रस्ताव समंत केल्याचा दिनांक
११.	श्री. गोविंद विनायक करंदीकर ऊर्फ विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल.	१३ मार्च, २००६ विधानसभा १७ मार्च, २००६ विधानपरिषद
१२.	कु. तेजस्विनी सावंत यांनी मेलबर्न येथील १८ व्या राष्ट्रकुल स्पर्धेत दोन सुवर्णपदके पटकावल्याबाबत.	०५ एप्रिल, २००६ विधानसभा/विधानपरिषद
१३.	श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भारताच्या राष्ट्रपती पदावर निवड झाल्याबद्दल.	२३ जुलै, २००७ विधानसभा/विधानपरिषद
१४.	स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल.	१७ मार्च, २००९ विधानसभा/विधानपरिषद
१५.	श्रीमती मीराकुमार यांची लोकसभेच्या (पंधराव्या) पहिल्या महिला अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल.	०५ जून, २००९ विधानसभा/विधानपरिषद
१६.	विख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावांचा विश्वविक्रम केल्याबद्दल.	२१ डिसेंबर, २००९ विधानसभा/विधानपरिषद
१७.	विधानपरिषदेचे मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांची भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल.	२१ डिसेंबर, २००९ विधानपरिषद
१८.	नवी दिल्ली येथे ऑक्टोबर, २०१० मध्ये झालेल्या १९ व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये, तसेच चीनमध्ये झालेल्या १६ व्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या गुणी क्रीडापटूंनी दैदिप्यमान यश संपादन करून पदके प्राप्त केल्याबद्दल.	०३ डिसेंबर, २०१० - विधानसभा ०४ डिसेंबर, २०१० - विधानपरिषद
१९.	सन २०११ मध्ये १० व्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने अजिंक्यपद पटकविल्याबद्दल.	०५ एप्रिल, २०११ विधानसभा/विधानपरिषद
२०.	डॉ. अनंत कळसे, विधानमंडळाचे विद्यमान प्रधान सचिव यांनी पीएच.डी. पदवी संपादन केल्याबाबत.	०७ एप्रिल, २०११ - विधानसभा ०८ एप्रिल, २०११ - विधानपरिषद
२१.	विश्वविख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचे महाशतक केल्याबद्दल.	१९ मार्च, २०१२ विधानसभा/विधानपरिषद
२२.	भारत देशाने कृषी व अन्नधान्य क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल कृषि मंत्री नामदार शरदचंद्रजी पवार यांचा संयुक्त राष्ट्र संघाच्या अन्न व कृषि संघटनेने गौरव केल्याबद्दल.	०३ एप्रिल, २०१२ विधानसभा/विधानपरिषद

अ.क्र.	तपशील	प्रस्ताव समंत केल्याचा दिनांक
२३.	ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी दत्ताजी ताम्हणे, माजी वि.स.स व माजी वि.प.स. यांनी शंभराव्या वर्षात पदार्पण केल्याबाबत.	१३ एप्रिल, २०१२ विधानसभा/विधानपरिषद
२४.	श्री. प्रणब कामदा मुखर्जी यांची भारताचे राष्ट्रपतीपदी निवड झाल्याबाबत.	२५ जुलै, २०१२ विधानसभा/विधानपरिषद
२५.	उत्तराखंडातील भीषण नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्यामध्ये स्वत:चा जीव धोक्यात घालून भारतीय संरक्षण दलाचे अधिकारी व जवानांनी केलेल्या साहसपूर्ण कामगिरीबद्दल.	१८ जुलै, २०१३ - विधानसभा १६ जुलै, २०१३ - विधानपरिषद
२६.	क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर व जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना भारतरत्न पुरस्कार जाहिर करण्यात आल्याबाबत.	११ डिसेंबर, २०१३ विधानसभा/विधानपरिषद
२७.	बृहन्मुंबईतील माटुंगा येथील रामनारायण रुईया महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे कॉलेज ऑफ एक्सलन्स या पुरस्काराने प्रथम मान मिळाला असून असा बहुमान मिळणारे देशातील पहिले महाविद्यालय ठरल्याबाबत.	२८ फेब्रुवारी, २०१४ - विधानसभा
२८.	श्रीमती सुमित्रा महाजन यांची लोकसभा अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्याबद्दल.	११ जून, २०१४ विधानसभा/विधानपरिषद
२९.	भारताचे सुपुत्र व देशातील बालमजूरी विरोधी चळवळीचे प्रणेते समाजसेवक श्री. कैलास सत्यार्थी व तालिबानच्या विरोधाला न जुमानता मुलींच्या शिक्षणासाठी लढा देणारी समाजसेविका मलाला युसूफझाई यांना सन २०१४ या वर्षाचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाल्याबद्दल.	११ डिसेंबर, २०१४ - विधानसभा १२ डिसेंबर, २०१४ - विधानपरिषद
३०.	भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर, २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत '२१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून जगभर साजरा व्हावा हा प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्राच्या महासभेने मान्यता देवून संयुक्त राष्ट्रसंघाने त्यांचा गौरव केल्याबद्दल.	१२ डिसेंबर, २०१४ - विधानसभा
३१.	साऊथ आफ्रिकेमध्ये विल्सन क्रिकेट मैदानावर झालेल्या ब्लाईंड क्रिकेट विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतीय ब्लाईंड क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकल्याबद्दल.	२३ डिसेंबर, २०१४ - विधानसभा

अ.क्र.	तपशील	प्रस्ताव समंत केल्याचा दिनांक
३२.	भारताचे माजी पंतप्रधान आणि जेष्ठ नेते माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी व पंडीत मदनमोहन मालवीय यांना केंद्र सरकारकडून भारतरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबाबत.	२४ डिसेंबर, २०१४ - विधानसभा
३३.	ज्येष्ठ साहित्यिक प्रा. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याबाबत.	२७ मार्च, २०१५ विधानसभा/विधानपरिषद
३४.	महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री श्री. शरदचंद्रजी पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे अभिष्टचिंतन.	२१ डिसेंबर, २०१५ विधानसभा/विधानपरिषद
३५.	रिओ - ब्राझील येथील ऑलिम्पिक क्रिडा स्पर्धेत बँडमिंटनपटू पी. व्ही. सिंधु, कुस्तीपटू साक्षी मलीक, जिमनॅस्टिकपटू दिपा कर्माकर तसेच धावपटू ललीता बाबर व दत्तु भोकनड या सर्व खेळाडूंच्या दैदिप्यमान कामगिरिबद्दल.	२९ ऑगस्ट, २०१६ विधानसभा/विधानपरिषद
३६.	पुणे येथे पार पडलेल्या ६० व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत कुस्तीगीरपटू विजय नथू चौधरी यांनी सलग तिसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी' किताब प्राप्त केल्याबद्दल.	१६ डिसेंबर, २०१६ विधानसभा / विधानपरिषद
३७.	आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे उप विजेतेपद पटकावून भारतीय क्रिकेट महिला संघाने संपूर्ण मालिकेत केलेल्या दैदिप्यमान कामगिरीबद्दल.	२८ जुलै, २०१७ विधानसभा / विधानपरिषद
३८.	माननीय श्री. रामनाथ कोविंद यांची भारताच्या राष्ट्रपती पदी तसेच माननीय श्री. व्यंकय्या नायडू यांची भारताच्या उप राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल.	०९ ऑगस्ट, २०१७ विधानसभा / विधानपरिषद
३९.	भारतीय न्यायाधीश श्री. दलवीर भंडारी यांची हेग येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशपदी फेरनिवड झाल्याबद्दल.	१३ डिसेंबर, २०१७ - विधानसभा १४ डिसेंबर, २०१७ - विधानपरिषद
४०.	प्रसिध्द मराठी कवी श्रीकांत देशमुख व प्रसिध्द मराठी अनुवादक सुजाता देशमुख यांना २०१७ चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाल्याबद्दल.	२२ डिसेंबर, २०१७ विधानसभा / विधानपरिषद
४१.	रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील पार पडलेल्या उपांत्य फेरीतील लढतीत विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या संघाने विजय मिळवून अंतिम फेरीत धडक मारल्याबद्दल.	२२ डिसेंबर, २०१७ विधानसभा / विधानपरिषद

अ.क्र.	तपशील	प्रस्ताव समंत केल्याचा दिनांक
४२.	भारतीय सैन्य दलाच्या वायुसेनेने पाकिस्तानातील दहशतवादी तळावर सर्जिकल स्ट्राईक केल्याबाबत.	२६ फेब्रुवारी, २०१९ विधानसभा / विधानपरिषद
४३.	माननीय न्यायमुर्ती श्री. शरद अरविंद बोबडे यांची भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदी निवड झाल्याबद्दल.	१६ डिसेंबर, २०१९ विधानसभा / विधानपरिषद
४४.	शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च समजला जाणारा जागतिक स्तरावरील 'ग्लोबल टिचर्स अवॉर्ड' सोलापूर जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक श्री. रणजितसिंह डिसले यांना प्राप्त झाल्याबद्दल.	१५ डिसेंबर, २०२० - विधानपरिषद

*****

परिशिष्ट क्रमांक - २४

विधानमंडळाच्या सदस्यांव्यतिरिक्त मान्यवरांचे शोक प्रस्ताव (सन १९४८ पासून)

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
१.	राष्ट्रपिता महात्मा गांधी	१६/०२/१९४८ विधानपरिषद/विधानसभा
२.	श्रीमती सरोजिनी नायडू, मध्य प्रातांच्या राज्यपाल	०२/०३/१९४९ विधानपरिषद/विधानसभा
३.	भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद, शिक्षण मंत्री, भारत सरकार	२४/०२/१९५८ विधानपरिषद/विधानसभा
४.	भारतरत्न गोविंद वल्लभ पंत गृहमंत्री, भारत सरकार	०७/०३/१९६१ विधानपरिषद/विधानसभा
५.	भारतरत्न बी.सी.रॉय, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री	०२/०७/१९६२ विधानपरिषद/विधानसभा
६.	डॉ. राजेंद्र प्रसाद, भारताचे माजी राष्ट्रपती	०१/०३/१९६३ विधानपरिषद/विधानसभा
७.	पंडित जवाहरलाल नेहरु, भारताचे माजी पंतप्रधान	२०/०७/१९६४ विधानपरिषद/विधानसभा
८.	श्री. हशमतराव खूदचंद चैनानी, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	२९/११/१९६५ विधानपरिषद/विधानसभा
९.	श्री. लाल बहादूर शास्त्री, भारताचे माजी पंतप्रधान	०८/०३/१९६६ विधानपरिषद/विधानसभा
१०.	स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर	०९/०३/१९६६ विधानपरिषद/विधानसभा
११.	श्री. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ, माजी केंद्रीय मंत्री	०९/०३/१९६६ विधानपरिषद/विधानसभा
१२.	डॉ. राममनोहर लोहिया, ज्येष्ठ समाजवादी नेते	१४/११/१९६७ विधानपरिषद/विधानसभा
१३.	श्री. पांडुरंग महादेव उर्फ सेनापती बापट, स्वातंत्र्य सेनानी	२८/११/१९६७ विधानपरिषद/विधानसभा
१४.	श्री. मंगलदास पक्वासा, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	१८/११/१९६८ विधानपरिषद/विधानसभा
१५.	श्री. सर होमी मोदी, मुंबईचे हंगामी राज्यपाल	१०/०३/१९६९ विधानपरिषद/विधानसभा
१६.	श्री. झाकीर हुसेन, भारताचे माजी राष्ट्रपती	१६/०६/१९६९ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
१७.	डॉ. पी. व्ही. चेरीयन, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	१७/११/१९६९ विधानपरिषद/विधानसभा
१८.	श्री. श्रीप्रकाश, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	०६/०९/१९७१ विधानपरिषद/विधानसभा
१९.	श्री. दयानंद तथा भाऊसाहेब बांदोडकर, प्रसिद्ध उद्योजक	१३/०८/१९७३ विधानपरिषद/विधानसभा
२०.	श्री. माधवराव सदाशिवराव गोळवलकर, सरसंघचालक	०४/०९/१९७३ विधानपरिषद/विधानसभा
२१.	डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, भारताचे माजी राष्ट्रपती	२१/०४/१९७५ विधानपरिषद/विधानसभा
२२.	श्रीमती. पद्मजा नायडू, पश्चिम बंगालच्या माजी राज्यपाल	०९/०५/१९७५ विधानपरिषद/विधानसभा
२३.	भारतरत्न के. कामराज, अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष	२४/११/१९७५ विधानपरिषद/विधानसभा
२४.	श्री. क्रांतीसिंह नाना पाटील, स्वातंत्र्य सेनानी	०८/१२/१९७६ विधानपरिषद/विधानसभा
२५.	श्री. अली यावर जंग, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	१३/१२/१९७६ विधानपरिषद/विधानसभा
२६.	श्री. फक्रुद्दीन अली अहमद, भारताचे माजी राष्ट्रपती	२१/०३/१९७७ विधानपरिषद/विधानसभा
२७.	लोकनायक जयप्रकाश नारायण, स्वातंत्र्य सेनानी	२१/०१/१९८० विधानपरिषद/विधानसभा
२८.	श्री. संजय गांधी, अखिल भारतीय काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी	०३/०७/१९८० विधानपरिषद/विधानसभा
२९.	श्री. वराहगिरी व्यंकटगिरी, भारताचे माजी राष्ट्रपती	०३/०७/१९८० विधानपरिषद/विधानसभा
३०.	श्री. महम्मदअली करीम छागला, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	०३/०३/१९८१ विधानपरिषद/विधानसभा
३१.	श्री. गोपाळ स्वरुप पाठक, भारताचे माजी उप राष्ट्रपती	०६/०९/१९८२ विधानपरिषद/विधानसभा
३२.	भारतरत्न विनोबा भावे, थोर समाजसेवक	१३/१२/१९८२ विधानपरिषद/विधानसभा
३३.	श्री. सी.डी. देशमुख, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ	१३/१२/१९८२ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
३४.	श्रीमती इंदिरा गांधी, भारताच्या माजी पंतप्रधान	१२/११/१९८४ विधानपरिषद/विधानसभा
३५.	श्री. बाबु जगजीवनराम, माजी उप पंतप्रधान	०७/०७/१९८६ विधानपरिषद/विधानसभा
३६.	श्री. हरेकृष्ण मेहताब, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	२४/०३/१९८७ विधानपरिषद/विधानसभा
३७.	श्री. एस. पी. कोतवाल, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	२४/०३/१९८७ विधानपरिषद/विधानसभा
३८.	श्री. चरणसिंह, भारताचे माजी पंतप्रधान	२२/०६/१९८७ विधानपरिषद/विधानसभा
३९.	भारतरत्न अब्दुल गफार खान उर्फ सरहद गांधी	१४/०३/१९८८ विधानपरिषद/विधानसभा
४०.	श्री. कोना प्रभाकर राव, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	०३/१२/१९९० विधानपरिषद/विधानसभा
४१.	श्रीमती विजया लक्ष्मी पंडित, महाराष्ट्राच्या माजी राज्यपाल	०३/१२/१९९० विधानपरिषद/विधानसभा
४२.	श्री. राजीव गांधी, भारताचे माजी पंतप्रधान	१५/०७/१९९१ विधानपरिषद/विधानसभा
४३.	श्री. मोहम्मद हिदायतुल्ला, भारताचे माजी उप राष्ट्रपती	३०/११/१९९२ विधानपरिषद/विधानसभा
४४.	श्री. अच्युतराव पटवर्धन, स्वातंत्र सेनानी	३०/११/१९९२ विधानपरिषद/विधानसभा
४५.	भारतरत्न जे. आर. डी. टाटा, उद्योग महर्षी	१३/१२/१९९३ विधानपरिषद/विधानसभा
४६.	श्री. शंतनुराव किर्लोस्कर, प्रसिद्ध उद्योगपती	२५/०४/१९९४ विधानपरिषद/विधानसभा
४७.	श्री. ब्रम्हानंद रेड्डी, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	११/०७/१९९४ विधानपरिषद/विधानसभा
४८.	तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, थोर विचारवंत	११/०७/१९९४ विधानपरिषद/विधानसभा
४९.	श्री. ग्यानी झैलसिंग, भारताचे माजी राष्ट्रपती	२४/०३/१९९५ विधानपरिषद/विधानसभा
५०.	श्री. मोरारजी रणछोडजी देसाई, भारताचे माजी पंतप्रधान	०५/०७/१९९५ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
५१.	डॉ. नीलम संजीव रेड्डी, भारताचे माजी राष्ट्रपती	०८/०७/१९९६ विधानपरिषद/विधानसभा
५२.	श्री. बाळासाहेब देवरस, सरसंघचालक	०८/०७/१९९६ विधानपरिषद/विधानसभा
५३.	भारतरत्न अरुणा असफ अली, स्वातंत्र्य सेनानी	३०/०७/१९९६ विधानपरिषद/विधानसभा
५४.	भारतरत्न मदर तेरेसा, थोर समाजसेविका	१५/१२/१९९७ विधानपरिषद/विधानसभा
५५.	श्री. गुलझारीलाल नंदा, भारताचे माजी पंतप्रधान	१६/०३/१९९८ विधानपरिषद/विधानसभा
५६.	श्री वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज, ज्येष्ठ साहित्यिक	१५/०३/१९९९ विधानपरिषद/विधानसभा
५७.	डॉ. शंकर दयाळ शर्मा, भारताचे माजी राष्ट्रपती	१३/०३/२००० विधानपरिषद/विधानसभा
५८.	श्री पु. ल. देशपांडे, ज्येष्ठ साहित्यिक	१७/०७/२००० विधानपरिषद/विधानसभा
५९.	डॉ. सी. सुब्रमण्यम, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	२७/११/२००० विधानपरिषद/विधानसभा
६०.	स्वातंत्र्य सेनानी डॉ. उषा मेहता	२७/११/२००० विधानपरिषद/विधानसभा
६१.	श्री. देवीलाल उर्फ ताऊजी चौधरी, माजी उप पंतप्रधान	१०/०४/२००१ विधानपरिषद/विधानसभा
६२.	श्री. सादिक अली ताहिर अली, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	१८/०४/२००१ विधानपरिषद/विधानसभा
६३.	श्री. गंटी मोहन चंद्र बालयोगी, माजी लोकसभा अध्यक्ष	१३/०३/२००२ विधानपरिषद/विधानसभा
६४.	श्री. बसप्पा धानप्पा जत्ती, भारताचे माजी उप राष्ट्रपती	२९/०७/२००२ विधानपरिषद/विधानसभा
६५.	श्री. धीरुभाई अंबानी, उद्योगपती	२९/७/२००२ विधानपरिषद/विधानसभा
६६.	श्री. कृष्ण कांत, भारताचे माजी उप राष्ट्रपती	२९/७/२००२ विधानपरिषद/विधानसभा
६७.	श्रीमती दुर्गा भागवत, ज्येष्ठ साहित्यिका	७/८/२००२ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
६८.	कवयित्री श्रीमती शांता शेळके, ज्येष्ठ साहित्यिका	७/८/२००२ विधानपरिषद/विधानसभा
६९.	श्री.सुधीर फडके, सुप्रसिध्द गायक	७/८/२००२ विधानपरिषद/विधानसभा
७०.	श्री.गोविंदभाई श्रॉफ, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी	११/१२/२००२ विधानपरिषद/विधानसभा
७१.	श्री. पी. व्ही. नरसिंह राव, भारताचे माजी पंतप्रधान	१४/०३/२००५ विधानपरिषद/विधानसभा
७२.	श्री. के. आर. नारायणन, भारताचे माजी राष्ट्रपती	०५/१२/२००५ विधानपरिषद/विधानसभा
७३.	भारतरत्न बिस्मिल्ला खान, प्रख्यात सनईवादक	०४/१२/२००६ विधानपरिषद/विधानसभा
७४.	श्री. चंद्रशेखर, भारताचे माजी पंतप्रधान	१६/०७/२००७ विधानपरिषद/विधानसभा
७५.	श्री. य. दि. फडके, ज्येष्ठ साहित्यिक	१०/०३/२००८ विधानपरिषद/विधानसभा
७६.	श्री. बाबा आमटे, थोर समाजसेवक	१०/०३/२००८ विधानपरिषद/विधानसभा
७७.	स्वामी गगनगिरी महाराज, परमपुज्य सदगुरू स्वामी	११/०३/२००८ विधानपरिषद/विधानसभा
७८.	श्री. बाबुराव बागुल, ज्येष्ठ साहित्यिक	३१/३/२००८ विधानपरिषद/विधानसभा
७९.	डॉ. सरोजिनी बाबर, ज्येष्ठ साहित्यिका	२२/४/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८०.	फिल्डमार्शल सॅम माणेकशॉ, भारताचे माजी लष्कर प्रमुख	१६/७/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८१.	न्या. यशवंतराव चंद्रचूड, भारताचे माजी सरन्यायाधीश	१६/७/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८२.	श्रीमती निर्मला देशपांडे, ज्येष्ठ गांधीवादी नेत्या	१६/७/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८३.	श्री. विजय तेंडुलकर, ज्येष्ठ साहित्यिक व सुप्रसिध्द नाटककार	१६/७/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८४.	श्री. नाना धर्माधिकारी, ज्येष्ठ निरुपणकार	१६/७/२००८ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
८५.	श्री. विश्वनाथ प्रतापसिंह, भारताचे माजी पंतप्रधान	१५/१२/२००८ विधानपरिषद/विधानसभा
८६.	श्री. रामस्वामी व्यंकटरमन, भारताचे माजी राष्ट्रपती	१६/०३/२००९ विधानपरिषद/विधानसभा
८७.	श्री. गोविंद विनायक उर्फ विंदा करंदीकर, जेष्ठ साहित्यिक	१८/०३/२०१० विधानपरिषद/विधानसभा
८८.	श्री. शेखावत भैरवसिंह, भारताचे माजी उप राष्ट्रपती	१२/७/२०१० विधानपरिषद/विधानसभा
८९.	श्री. मारुती माने, महाराष्ट्राचे तथा देशाचे नामवंत कुस्तीगीर	२७/७/२०१० विधानपरिषद/विधानसभा
९०.	श्री. नारायण गंगाराम सुर्वे, जेष्ठ कवी	१३/१२/२०१० विधानपरिषद/विधानसभा
९१.	लोकशाहीर विठ्ठल उमप	१३/१२/२०१० विधानपरिषद/विधानसभा
९२.	भारतरत्न, स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी	१४/३/२०११ विधानपरिषद/विधानसभा
९३.	श्री. प्रभाकर पणशीकर, ज्येष्ठ नाटककार	१४/३/२०११ विधानपरिषद/विधानसभा
९४.	श्री. बाळ देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार	१३/४/२०११ विधानसभा
९५.	डॉ. पी. सी. अलेक्झांडर, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	११/०८/२०११ विधानपरिषद/विधानसभा
९६.	श्री. माणिक सीताराम गोडघाटे तथा कवी ग्रेस	२६/३/२०१२ विधानसभा २७/३/२०१२ विधानपरिषद
९७.	श्री. बाळासाहेब ठाकरे, शिवसेनाप्रमुख	१०/१२/२०१२ विधानपरिषद/विधानसभा
९८.	श्री. इंद्रकुमार गुजराल, भारताचे माजी पंतप्रधान	१०/१२/२०१२ विधानपरिषद/विधानसभा
९९.	भारतरत्न पंडित रविशंकर, प्रख्यात सतारवादक	१३/१२/२०१२ विधानपरिषद/विधानसभा
१००.	भारतरत्न डॉ. नेल्सन मंडेला, दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष	९/१२/२०१३ विधानपरिषद/विधानसभा
१०१.	श्री. मोहम्मद फजल, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	१२/११/२०१४ विधानपरिषद/विधानसभा
१०२.	कॉम्रेड गोविंदराव पंढरीनाथ पानसरे, सामाजिक कार्यकर्ते	९/३/२०१५ विधानपरिषद/विधानसभा

अ.क्र.	नाव	शोकप्रस्ताव संमत केल्याचा दिनांक
१०३.	डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, भारताचे माजी राष्ट्रपती	२८/०७/२०१५ विधानपरिषद/विधानसभा
१०४.	श्री. ओम प्रकाश मेहरा, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल	०७/१२/२०१५ विधानपरिषद/विधानसभा
१०५.	शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद अनंतराव जोशी	१७/१२/२०१५ विधानपरिषद/विधानसभा
१०६.	डॉ. भवरलाल हिरालाल जैन, आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते	९/३/२०१६ विधानपरिषद/विधानसभा
१०७.	श्रीमती जे. जयललिता, तामिळनाडू राज्याच्या मुख्यमंत्री	०६/१२/२०१६ विधानपरिषद/विधानसभा
१०८.	भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी, भारताचे माजी पंतप्रधान	१९/११/२०१८ विधानपरिषद/विधानसभा
१०९.	भारतरत्न प्रणब मुखर्जी, भारताचे माजी राष्ट्रपती	०७/०९/२०२० विधानपरिषद/विधानसभा

*****

परिशिष्ट क्रमांक - २५

महाराष्ट्र विधानसभा नवनिर्वाचित सदस्यांद्वारे शपथ / दृढकथन - नमुना

(१) निवडून आलेल्या सदस्यांसाठी :-

शपथेचा किंवा दृढकथनाचा नमुना

मी, '' ..... विधानसभेचा

ईश्वरसाक्ष शपथ घेतो

सदस्य म्हणून निवडून आलो असल्याने ----------

गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो

की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रध्दा व निष्ठा बाळगीन, भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन आणि आता जे कर्तव्य मी हाती घेणार आहे ते निष्ठापूर्वक पार पाडीन. ''

****

(२) निवडून आलेल्या महिला सदस्यांसाठी :-

शपथेचा किंवा दृढकथनाचा नमुना

मी, '' ..... विधानसभेची

ईश्वरसाक्ष शपथ घेते

सदस्य म्हणून निवडून आले असल्याने ----------

गांभीर्यपूर्वक दृढकथन करते

की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रध्दा व निष्ठा बाळगीन, भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन आणि आता जे कर्तव्य मी हाती घेणार आहे ते निष्ठापूर्वक पार पाडीन. ''

****

(३) नामनियुक्त झालेल्या सदस्यांसाठी :-

शपथेचा किंवा दृढकथनाचा नमुना

मी, '' ..... विधानसभेचा

ईश्वरसाक्ष शपथ घेतो

सदस्य म्हणून नामनियुक्त झालो असल्याने ----------

गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो

की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रध्दा व निष्ठा बाळगीन, भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन आणि आता जे कर्तव्य मी हाती घेणार आहे ते निष्ठापूर्वक पार पाडीन. ''

(४) नामनियुक्त झालेल्या महिला सदस्यांसाठी :-

शपथेचा किंवा दृढकथनाचा नमुना

मी, '' ..... विधानसभेची

ईश्वरसाक्ष शपथ घेते

सदस्य म्हणून नामनियुक्ती झाले असल्याने ----------

गांभीर्यपूर्वक दृढकथन करते

की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारतीय संविधानाबद्दल मी खरी श्रध्दा व निष्ठा बाळगीन, भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखीन आणि आता जे कर्तव्य मी हाती घेणार आहे ते निष्ठापूर्वक पार पाडीन. ''

*****

(५) निर्वाचित सदस्यों के लिये :-

शपथ या प्रतिज्ञान का प्रारुप

मै, '' ..... जो विधानसभा

ईश्वर की शपथ लेता हूँ

का सदस्य निर्वाचित हुआ हूँ ----------

सत्यनिष्ठा से प्रतिज्ञान करता हूँ

कि, मै विधी द्वारा स्थापित भारत के संविधान के प्रति सच्ची श्रध्दा और निष्ठा रखूँगा, मै भारत की प्रभुता और अखंडता अक्षुण्ण रखुंगा तथा जिस पद को मै ग्रहण करनेवाला हूँ, उसके कर्तव्यों का श्रध्दापूर्वक निर्वहन करुंगा ''

****

(६) निर्वाचित महिला सदस्यों के लिये :-

शपथ या प्रतिज्ञान का प्रारुप

मै, '' ..... जो विधानसभा

ईश्वर की शपथ लेती हूँ

का सदस्य निर्वाचित हुई हूँ ----------

सत्यनिष्ठा से प्रतिज्ञान करती हूँ

कि, मै विधी द्वारा स्थापित भारत के संविधान के प्रति सच्ची श्रध्दा और निष्ठा रखूँगी, मै भारत की प्रभुता और अखंडता अक्षुण्ण रखुंगी तथा जिस पद को मै ग्रहण करनेवाली हूँ, उसके कर्तव्यों का श्रध्दापूर्वक निर्वहन करुंगी ''

****

(7) FOR ELECTED MEMBERS :-

FORM OF OATH OR AFFIRMATON

" I, ... having been elected a member of the Legislative Assembly,

swear in the name of God

do ---------- that I will bear true faith and

Solembly affirm

allegiance to the Constitution of India as by law established, that I will uphold the sovereignty and integrity of India and that I will faithfully discharge the duty upon which I am about to enter."

****

(8) FOR NOMINATED MEMBERS :-

FORM OF OATH OR AFFIRMATON

" I, ... having been nominated a member of the Legislative Assembly,

swear in the name of God

do ---------- that I will bear true faith

Solembly affirm

and allegiance to the Constitution of India as by law established, that I will uphold the sovereignty and integrity of India and that I will faithfully discharge the duty upon which I am about to enter."

*****

(९) राजस्य विधानमंडलस्य सदस्येन :-

कर्तव्यस्य शपथस्य प्रतिज्ञानस्य च प्ररुपम् -

''अहं, ... यः

ईश्वरस्य नाम्ना शपे

विधानसभाया : सदस्यत्वेन निर्वाचितः अस्मि, ----------

सत्यनिष्ठया प्रतिजाने

यद् अहं विधिना स्थापितं भारतस्य संविधान प्रति सत्यां श्रध्दां निष्ठां च धारयिष्ये तथा भारतस्य प्रभुतां अखण्डतां च अक्षुण्णां रक्षिष्यमि तथा यत् पदं ग्रहीतुं अहं उद्यतः अस्मि तस्य कर्तव्यानि श्रध्दापूर्वकं निर्वक्ष्यामि ''

*****

परिशिष्ट क्रमांक -२६

सदस्यांचे वेतन आणि भते तसेच इतर सुविधांबाबतची संक्षिप्त माहिती

१.	**वेतन**	प्रत्येक सदस्यास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे किमान मूळ वेतन व महागाई भत्ता मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. (७ व्या वेतन आयोगाप्रमाणे) अ) मूळ वेतन - रु. १,८२,२००/- ब) महागाई भत्ता - रु. ५१,०१६/- (मूळ वेतनाच्या २८% प्रमाणे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ पासून)
२.	**दूरध्वनी सुविधा भत्ता**	प्रत्येक सदस्याला अधिनियमान्वये विहित केलेली रक्कम दरमहा रुपये ८,०००/- प्रदान केली जाते.
३.	**स्टेशनरी व टपाल सुविधा भत्ता**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ६ (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक सदस्यास स्टेशनरी व टपाल खर्चापोटी दरमहा रुपये १०,०००/- रक्कम प्रदान केली जाते.
४.	**संगणक चालकाची सेवा मिळण्यासाठीचा भत्ता**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ६ (३ अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक सदस्यास संगणक चालकाची सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,०००/- रक्कम प्रदान केली जाते.
एकूण दरमहा वेतन व भत्ते रुपये २,६१,२१६/-		
५.	**दैनिक भत्ते**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक सदस्याला दैनिक भत्त्याची रक्कम प्रदान केली जाते. रुपये २०००/- प्रतिदिन विधानसभा/विधानपरिषदेच्या अधिवेशनाला किंवा समितीच्या बैठकीला उपस्थित राहण्याच्या प्रयोजनार्थ.
६.	**स्वीय सहायकाची विनामूल्य सेवा**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ६ (३) अन्वये प्रत्येक सदस्यास एका स्वीय सहायकाची सेवा विनामूल्य मिळण्याचा हक्क आहे. अशा प्रकारे नियुक्त केलेल्या स्वीय सहायकास दरमहा रुपये २५,०००/- एवढे पारिश्रमिक अनुज्ञेय आहे.
७.	**वाहन चालकाची विनामूल्य सेवा**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ६ (६) अन्वये प्रत्येक सदस्यास एका स्वीय सहायकाची सेवा विनामूल्य मिळण्याचा हक्क आहे. अशा प्रकारे नियुक्त केलेल्या वाहन चालकास दरमहा रुपये १५,०००/- एवढे पारिश्रमिक अनुज्ञेय आहे.
८.	**दूरध्वनींची सोय**	महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ मधील कलम ५क मध्ये तरतदू केल्याप्रमाणेः- १) प्रत्येक सदस्यास, तो सामान्यतः जेथे रहात असेल त्या ठिकाणी किंवा निवासासाठी तो वापरत असेल अशा राज्यातील इतर कोणत्याही ठिकाणी

		शासनाच्या खर्चाने, दूरध्वनी बसवून मिळविण्याचा हक्क असेल (दूरध्वनीच्या) प्रारंभिक ठेवी दाखलची तो बसविण्यादाखलची व भाडे खर्चादाखलची रक्कम राज्य शासनाकडून सोसण्यात येईल. २) सदस्याला निवासाच्या ठिकाणी स्वखर्चाने बसवून घेतलेल्या दूरध्वनीच्या संबंधातील भाडेखर्च शासनाकडून करण्यात येईल.
९.	**रेल्वे प्रवास (विद्यमान सदस्य)**	(अ)प्रत्येक विद्यमान सदस्यास प्रत्येकी रुपये ५,०००/- एवढे मूल्य असणाऱ्या राज्यांतर्गत तीन कुपन पुस्तकांचा (हिरव्या रंगाची) एक संच पुरविण्यात येतो. या कुपन पुस्तकांचा वापर करून सदस्यास महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही रेल्वेने प्रथम वर्गाने किंवा वातानुकूलित टू-टियरने किंवा थ्री-टियरने एकट्याने अमर्यादित रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे. (ब) प्रत्येक विद्यमान सदस्यास प्रत्येकी रुपये ५,०००/- मूल्य असणाऱ्या राज्याबाहेरील तीन कुपन पुस्तकांचा (पिवळ्या रंगाची) एक संच पुरविण्यात येतो. या कुपन पुस्तकांचा वापर करून सदस्यास महाराष्ट्र राज्याच्या बाहेर एकट्याने आणि सदस्याची पत्नी/तिचा पती आणि अज्ञान मुले किंवा सोबती यांना सदस्याबरोबर महाराष्ट्र राज्यात किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील रेल्वे प्रवास एका वित्तीय वर्षात ३०,००० कि.मी. मर्यादेपर्यंत करण्याची सुविधा उपलब्ध आहे.
१०.	**मार्ग परिवहन सेवेने मोफत प्रवास (विद्यमान सदस्य)**	प्रत्येक विद्यमान सदस्यास पुरविण्यात आलेल्या ओळखपत्र-नि-मार्ग प्रवासपत्र एकट्याने किंवा आपल्या पत्नीसह/ पतीसह किंवा सोबत्यासह संयुक्तपणे मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम, मुंबई यांच्या बसने, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या सर्व प्रकारच्या बसने किंवा गाडीने विनामुल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे..
११.	**बोटीने मोफत प्रवास**	प्रत्येक विद्यमान सदस्यास महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात आगबोटीने प्रवास करण्याचा हक्क आहे.
१२.	**विमानाने मोफत प्रवास**	प्रत्येक विद्यमान सदस्यास एका वित्तीय वर्षात पुढीलप्रमाणे विमानप्रवास अनुज्ञेय आहे :- **अ) राज्यांतर्गत :-** एकूण ३२ वेळा एकेरी (राज्यातील कोणत्याही विमानतळापासून राज्यातील कोणत्याही विमानतळापर्यंत) **ब) राज्याबाहेर :-** एकूण ८ वेळा एकेरी (राज्यातील कोणत्याही विमानतळापासून भारताच्या हद्दीतील कोणत्याही विमानतळापर्यंत)
१३.	**संगणक सुविधा**	प्रत्येक सदस्याला स्थानिक विकास निधीमधून एक लॅपटॉप/डेस्कटॉप संगणक, एक लेझर प्रिंटर पुरविण्यात येतो. (सदरहू सुविधा नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून पुरविण्यात येते.)
१४.	**वाहन कर्जावरील व्याजाची प्रतिपूर्ती**	प्रत्येक सदस्याला प्रत्येक टर्ममध्ये एक नवीन मोटारगाडी खरेदी करण्याची सुविधा पुरविण्यात आलेली आहे. त्यास बँक किंवा इतर वित्तीय संस्थांकडून रुपये १०,००,०००/- इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच्या कर्जावरील व्याजाची प्रतिपूर्ती कमाल १० टक्के पर्यंत इतक्या दराने मिळण्याचा हक्क आहे. कर्जाच्या रक्कमेवरील १०

		टक्के व्याजदराची रक्कम किंवा कर्ज त्यापेक्षा कमी दराने उपलब्ध झाले असल्यास, प्रत्यक्षात आकारण्यात आलेल्या व्याजदराच्या रक्कमेची प्रतिपूर्ती, योग्य ती पावती किंवा कागदपत्रे सादर करण्यात आल्यानंतर, कर्ज घेतलेल्या दिनांकापासून कमाल ५ वर्षांच्या कालावधीपुरती किंवा यापैकी जो कालावधी कमी असेल, तेवढ्या मुदतीपुरती शासनाकडून करून देण्यात येईल.
१५.	**स्थानिक विकास निधी**	प्रत्येक सदस्याला प्रत्येक वर्षी रुपये ३,००,००,०००/- (रुपये तीन कोटी) (नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून देण्यात येते.)
१६.	**वैद्यकीय सुविधा**	महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्व विद्यमान व माजी सदस्यांना तसेच त्यांच्या कुटूंबियांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजीपासून आरोग्य विमा योजना (CASHLESS MEDICAL THROUGH THE INSURANCE SCHEME) लागू करण्यात आली आहे.
१७.	**निवृत्ती वेतन**	(अ) राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य म्हणून ज्यांनी 'सदस्य' म्हणून शपथ घेतली आहे अथवा घेतल्यास, अशा व्यक्तीस, दरमहा रुपये पन्नास हजार निवृत्तीवेतन देण्यात येईल. (ब) ज्यावेळी एखाद्या व्यक्तिने पाच वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी सदस्य म्हणून सेवा केली असेल, त्यास त्याच्या पाच वर्षावरील प्रत्येक वर्षासाठी दरमहा रुपये २,०००/- या प्रमाणात जादा निवृत्तीवेतन देण्यात येईल.
१८.	**कुटुंब वेतन**	(अ) मृत्यू पावलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या माजी सदस्याच्या विधवेस किंवा विधुरास दरमहा रुपये ४०,०००/- कुटुंबवेतन देण्यात येईल. (ब) मृत सदस्याच्या विधवेच्या किंवा विधुराच्या मृत्यूच्या पश्चात त्या सदस्याचे अज्ञान अपत्य किंवा अपत्ये हयात असतील तर, अशा अज्ञान अपत्याला किंवा अपत्यांना, विधवा किंवा विधुर यांना ज्याप्रमाणे निवृत्तिवेतन देय होते त्याचप्रमाणे दरमहा निवृत्तिवेतन लागू असेल.
१९.	**रेल्वे प्रवास सुविधा (माजी सदस्य)**	(१) महाराष्ट्रातील माजी विधानमंडळ सदस्यांना रेल्वेच्या प्रथम वर्गाने किंवा वातानुकूलीत व्दितीय शयनयानाने विनामूल्य प्रवास सवलत राज्यात व राज्याबाहेर अशी एकत्रितपणे दरवर्षी ३५,००० कि.मी. इतक्या मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे. (२) माजी विधानमंडळ सदस्यांना एका सोबत्यासह प्रथम वर्गाने अथवा वातानुकूलीत व्दितीय शयनयानाने प्रवास अनुज्ञेय असून त्यांनी केलेल्या प्रवासाच्या खर्चाची प्रतिपूर्ती खाली नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून करण्यात येते:- अ) माजी सदस्यांनी स्वत: अथवा एका सोबत्यासह अनुज्ञेय वर्गाच्या प्रवासाची तिकीटे उपलब्ध नसल्यामुळे, निम्न श्रेणीच्या वर्गाने प्रवास केल्यास, ज्या वर्गाने त्यांनी प्रत्यक्ष प्रवास केला असेल, त्या वर्गाच्या भाडयाची प्रतिपूर्ती त्यांना अनुज्ञेय आहे.

		ब) माजी सदस्यासोबत त्याच्या सोबत्याने केलेल्या प्रवासाची परिगणना सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या किलोमीटर्सच्या मर्यादेमध्ये करण्यात येत नाही. क) प्रस्तुत प्रवास सवलतीच्या प्रतिपूर्तीची मागणी माजी सदस्यांनी प्रवास केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत ते ज्या ठिकाणी निवृत्तीवेतन घेत असतील, त्या जिल्ह्याचे कोषागार अधिकारी अथवा त्या तालुक्याचे उप कोषागार अधिकारी यांच्याकडे देयके सादर करतील. (३) माजी विधानमंडळ सदस्यांनी ३५,००० कि.मी. च्या मर्यादेमध्ये राज्यात व राज्याबाहेर रेल्वेऐवजी विमानाने प्रवास केल्यास, त्यांना अनुज्ञेय असलेल्या रेल्वे भाड्याच्या रकमेची प्रतिपूर्ती जिल्हा कोषागार अथवा उप कोषागार अधिकारी यांच्याकडून करण्यात येईल. प्रस्तुत प्रवासाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करताना त्यांनी विमान प्रवासाचे मूळ तिकीट सादर करावे. (४) माजी सदस्यांना मुंबईतील उपनगरीय रेल्वे गाडीच्या प्रथम वर्गातून प्रवास करण्याकरिता मासिक अथवा त्रैमासिक सिझन तिकीटाची प्रवास सवलत विहित केलेल्या प्रतिवर्षी किलोमीटरच्या मर्यादेच्या अधीन राहून देण्यात येते. त्यांनी सिझन तिकीटाची सवलत घेऊन प्रवास केल्यानंतर, किलोमीटरची परिगणना करताना, संबंधित सदस्यांनी प्रवास केलेल्या अंतरासाठी प्रथम वर्गाच्या तिकीटासाठी आणि सिझन तिकिटासाठी रेल्वेने ज्या पटीमध्ये प्रवासाचा दर विहित केला आहे, त्याच पटीने किलोमीटरची परिगणना करण्यात येऊन तेवढे किलोमीटर अनुज्ञेय किलोमीटरमधून वजा करण्यात येतात.
२०.	**मार्ग परिवहन सेवेने मोफत प्रवास (माजी सदस्य)**	महाराष्ट्र विधानमंडळाच्या माजी सदस्यांना, त्यांचे विवाहसाथी किंवा एक सोबती यांच्यासह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेसमधून अमर्याद विनामूल्य प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

*****

परिशिष्ट क्रमांक - २७

अखिल भारतीय पीठासीन अधिकारी (AIPOC) व सचिव परिषद तपशील

सन १९२१ ते २०२१

अ.क्र.	राज्य	कालावधी	सचिव परिषद क्रमांक	पीठासीन अधिकारी परिषद क्रमांक
१.	शिमला	दिनांक १४ व १६ सप्टेंबर, १९२१	--	१
२.	दिल्ली	दिनांक १२ व १३ जानेवारी, १९२३	--	२
३.	दिल्ली	दिनांक ३ व ४ डिसेंबर, १९२३	--	३
४.	दिल्ली	दिनांक ६ व ७ जानेवारी, १९२५	--	४
५.	दिल्ली	दिनांक ६ ते ८ जानेवारी, १९२६	--	५
६.	शिमला	दिनांक ३ व ४ सप्टेंबर, १९२६	--	६
७.	नवी दिल्ली	दिनांक ११ ते १३ जानेवारी, १९२८	--	७
८.	नवी दिल्ली	दिनांक ५, ७ व ८ जानेवारी, १९२९	--	८
९.	नवी दिल्ली	दिनांक ५ व ६ फेब्रुवारी, १९३२	--	९
१०.	शिमला	दिनांक १६ ते १९ ऑगस्ट, १९३३	--	१०
११.	नवी दिल्ली	दिनांक ६ ते ८ जानेवारी, १९३८	--	११
१२.	शिमला	दिनांक १८ ते २० जुलै, १९३९	--	१२
१३.	नवी दिल्ली	दिनांक ७ ते ९ जानेवारी, १९४७	--	१३
१४.	नवी दिल्ली	दिनांक १० एप्रिल, १९४९ *(Emergent Conference)*	--	१४
१५.	नवी दिल्ली	दिनांक १ ते ३ सप्टेंबर, १९४९	--	१५
१६.	नवी दिल्ली	दिनांक २१ ते २३ ऑगस्ट, १९५०	--	१६
१७.	त्रिवेंद्रम	दिनांक ३० जुलै ते ०१ ऑगस्ट, १९५१	--	१७
१८.	ग्वाल्हेर	दिनांक २३ ते २६ ऑक्टोबर, १९५३	१	१८
१९.	श्रीनगर	दिनांक १४ ते १६ व २१ *(सचिव परिषद)* जून, १९५४	२	१९
२०.	राजकोट	दिनांक ३ ते ५ जानेवारी, १९५५	३	२०

अ.क्र.	राज्य	कालावधी	सचिव परिषद क्रमांक	पीठासीन अधिकारी परिषद क्रमांक
२१.	शिलाँग	दिनांक १ ते ४ नोव्हेंबर, १९५५	४	२१
२२.	मद्रास	दिनांक १६ ते १९ सप्टेंबर, १९५६	५	२२
२३.	जयपूर	दिनांक १३ ते १६ ऑक्टोबर, १९५७	६	२३
२४.	दार्जिलिंग	दिनांक ७ ते १० ऑक्टोबर, १९५८	७	२४
२५.	हैदराबाद	दिनांक २० ते २३ जानेवारी, १९६०	८	२५
२६.	बंगलोर	दिनांक ३० व ३१ डिसेंबर, १९६० आणि दिनांक २ व ३ जानेवारी, १९६१	९	२६
२७.	लखनौ	दिनांक २७ ते ३० डिसेंबर, १९६१	१०	२७
२८.	चंडीगड	दिनांक १० व ११ फेब्रुवारी, १९६३	--	२८
२९.	पटणा	दिनांक ५ ते ७ जानेवारी, १९६४	११	२९
३०.	बॉम्बे	दिनांक १० ते १२ जानेवारी, १९६५	१२	३०
३१.	बंगलोर	दिनांक १४ ते १६ जून, १९६६	१३	--
३२.	नवी दिल्ली	दिनांक २९ व ३० ऑक्टोबर, १९६६	--	३१
३३.	नवी दिल्ली	दिनांक १४ ते १७ ऑक्टोबर, १९६७	१४	३२
३४.	चंडीगड	दिनांक २० व २१ जानेवारी, १९६८	१५	--
३५.	नवी दिल्ली	दिनांक ६ व ७ एप्रिल, १९६८	--	३३
३६.	त्रिवेंद्रम	दिनांक ५ व ६ ऑक्टोबर, १९६८	--	३४
३७.	पणजी	दिनांक २९ ते ३१ डिसेंबर, १९६९	१६	३५
३८.	श्रीनगर	दिनांक १४ ते १६ जुलै, १९७०	१७	३६
३९.	भोपाळ	दिनांक २६ ते २८ ऑक्टोबर, १९७१	१८	३७
४०.	मद्रास	दिनांक ४ ते ७ ऑक्टोबर, १९७२	१९	३८
४१.	गांधीनगर	दिनांक २८, २९ व ३१ डिसेंबर, १९७३	२०	३९
४२.	शिलाँग	दिनांक ४, ५ व ७ नोव्हेंबर, १९७४	२१	४०
४३.	नवी दिल्ली	दिनांक २२ ते २४ ऑगस्ट, १९७५	२२	४१
४४.	शिमला	दिनांक ३० मे ते १ जून, १९७६	२३	४२

अ.क्र.	राज्य	कालावधी	सचिव परिषद क्रमांक	पीठासीन अधिकारी परिषद क्रमांक
४५.	नवी दिल्ली	दिनांक १३ व १४ जानेवारी, १९७७	२४	--
४६.	भुवनेश्वर	दिनांक १७ ते २० जानेवारी, १९७८	२५	४३
४७.	जयपूर	दिनांक २० ते २३ ऑक्टोबर, १९७८	२६	४४
४८.	बंगलोर	दिनांक १६ ते १९ जानेवारी, १९८१	२७	४५
४९.	हैदराबाद	दिनांक २७ ते ३० डिसेंबर, १९८१	२८	४६
५०.	पटणा	दिनांक ६ ते ८ नोव्हेंबर, १९८२	२९	४७
५१.	बॉम्बे	दिनांक १ ते ३ जानेवारी, १९८४	३०	४८
५२.	नवी दिल्ली	दिनांक २५ एप्रिल, १९८४	--	४९
५३.	कलकत्ता	दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर, १९८४	३१	५०
५४.	लखनौ	दिनांक २५ ते २७ ऑक्टोबर, १९८५	३२	५१
५५.	नवी दिल्ली	दिनांक २० ते २२ ऑक्टोबर, १९८६	३३	५२
५६.	श्रीनगर	दिनांक १५ ते १७ सप्टेंबर, १९८७	३४	५३
५७.	दिसपूर	दिनांक १९ ते २१ जानेवारी, १९८९	३५	५४
५८.	भोपाळ	दिनांक १९ ते २१ सप्टेंबर, १९८९	३६	५५
५९.	नवी दिल्ली	दिनांक ११ फेब्रुवारी, १९९२	--	५६
६०.	गांधीनगर	दिनांक २८ ते ३१ मे, १९९२	३७	५७
६१.	मद्रास	दिनांक २४ ते २७ जून, १९९३	३८	५८
६२.	भुवनेश्वर	दिनांक १ ते ४ फेब्रुवारी, १९९४	३९	५९
६३.	नवी दिल्ली	दिनांक ९ ते १२ ऑक्टोबर, १९९६	४०	६०
६४.	शिमला	दिनांक २० ते २३ ऑक्टोबर, १९९७	४१	६१
६५.	नवी दिल्ली	दिनांक २१ ते २४ सप्टेंबर, १९९८	४२	६२
६६.	हैदराबाद	दिनांक २९ ते ३१ मे, २०००	४३	६३
६७.	चंडीगड	दिनांक २७ ते ३० जून, २००१	४४	६४
६८.	बंगलोर	दिनांक १९ ते २२ जून, २००२	४५	६५
६९.	मुंबई	दिनांक ३ ते ६ फेब्रुवारी, २००३	४६	६६

अ.क्र.	राज्य	कालावधी	सचिव परिषद क्रमांक	पीठासीन अधिकारी परिषद क्रमांक
७०.	कोलकत्ता	दिनांक ८ ते ११ ऑक्टोबर, २००४	४७	६७
७१.	नवी दिल्ली	दिनांक २० मार्च, २००५	--	६८
७२.	नवी दिल्ली	दिनांक ३० व ३१ जुलै, २००५	४८	६९
७३.	रायपूर	दिनांक १४ ते १७ नोव्हेंबर, २००५	४९	७०
७४.	नवी दिल्ली	दिनांक ४ फेब्रुवारी, २००६	--	७१
७५.	तिरुअनंतपूरम	दिनांक २४ ते २७ मे, २००७	५०	७२
७६.	चंदीगढ	दिनांक २० ते २३ सप्टेंबर, २००८	५१	७३
७७.	भोपाळ	दिनांक २ ते ६ फेब्रुवारी, २०१०	५२	७४
७८.	श्रीनगर	दिनांक १९ ते २३ जून, २०१०	५३	७५
७९.	जयपूर (राजस्थान)	दिनांक २० ते २४ सप्टेंबर, २०११	५४	७६
८०.	लखनौ (उत्तर प्रदेश)	दिनांक ३० जानेवारी ते ०२ फेब्रुवारी, २०१५	५५	७७
८१.	गांधीनगर (गुजरात)	दिनांक २१ ते २४ जानेवारी, २०१६	५६	७८
८२.	डेहराडून (उत्तराखंड)	दिनांक १७ ते २१ डिसेंबर, २०१९	५७	७९
८३.	केवाडिया (गुजरात)	दिनांक २५ व २६ नोव्हेंबर, २०२०	--	८०
८४.	दूरदृष्य प्रणालीद्वारे	दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ (Virtual Mode)	--	८१
८५.	शिमला (हिमाचल प्रदेश)	दिनांक १६ ते १९ नोव्हेंबर, २०२१	५८	८२

टीप :- (१) पहिला दिवस सचिवांची परिषद.

(२) दुसरा व तिसरा दिवस पीठसीन अधिकारी परिषद.

(३) चौथा दिवस अभ्यास/पाहणी दौरा.

*****

परिशिष्ट क्रमांक - २८

महाराष्ट्र विधानसभा - पक्षनिहाय सदस्य संख्या

(दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजीनुसार)

अ.क्र.	पक्ष	सदस्य संख्या
१.	शिवसेना पक्ष	**५६**
२.	राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष	**५३**
३.	भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष	**४४**
४.	भारतीय जनता पार्टी	**१०६**
५.	बहुजन विकास आघाडी	**०३**
६.	समाजवादी	**०२**
७.	ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीन	**०२**
८.	प्रहार जनशक्ती पक्ष	**०२**
९.	महाराष्ट्र नवनिर्माण सेना	**०१**
१०.	कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी)	**०१**
११.	शेतकरी कामगार पक्ष	**०१**
१२.	स्वाभिमानी पक्ष	**०१**
१३.	राष्ट्रीय समाज पक्ष	**०१**
१४.	जनसुराज्य शक्ती पक्ष	**०१**
१५.	क्रांतिकारी शेतकरी पक्ष	**०१**
१६.	अपक्ष	**१३**
१७.	नामनियुक्त	**रिक्त**
	एकूण	**२८९**

*****

परिशिष्ट क्रमांक - २९

विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम सन-२०२२

अ.क्र.	वार	दिनांक	तपशील
१.	रविवार	२३ जानेवारी, २०२२	बाळासाहेब ठाकरे जयंती
२.	बुधवार	२६ जानेवारी, २०२२	प्रजासत्ताक दिन
३.	रविवार	३० जानेवारी, २०२२	महात्मा गांधी पुण्यतिथी
४.	शनिवार	१९ फेब्रुवारी, २०२२	छत्रपती शिवाजी महाराज जयंती
५.	शनिवार	१२ मार्च, २०२२	यशवंतराव चव्हाण जयंती
६.	रविवार	०३ एप्रिल, २०२२	छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी
७.	सोमवार	११ एप्रिल, २०२२	महात्मा जोतिराव फुले जयंती
८.	गुरुवार	१४ एप्रिल, २०२२	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती
९.	रविवार	०१ मे, २०२२	महाराष्ट्र दिन
१०.	रविवार	२६ जून, २०२२	छत्रपती शाहू महाराज जयंती
११.	शुक्रवार	०१ जुलै, २०२२	वसंतराव नाईक जयंती
१२.	शनिवार	२३ जुलै, २०२२	लोकमान्य टिळक जयंती
१३.	सोमवार	०१ ऑगस्ट, २०२२	लोकमान्य टिळक पुण्यतिथी
१४.	सोमवार	१५ ऑगस्ट, २०२२	स्वातंत्र्य दिन
१५.	शनिवार	१७ सप्टेंबर, २०२२	केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती
१६.	रविवार	०२ ऑक्टोंबर, २०२२	महात्मा गांधी जयंती
१७.	सोमवार	०३ ऑक्टोबर, २०२२	स्वामी रामानंद तीर्थ जयंती
१८.	रविवार	१३ नोव्हेंबर, २०२२	वसंतदादा पाटील जयंती
१९.	सोमवार	१४ नोव्हेंबर, २०२२	पंडित नेहरु जयंती
२०.	शनिवार	२६ नोव्हेंबर, २०२२	संविधान दिन
२१.	मंगळवार	०६ डिसेंबर, २०२२	भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

विधान भवन, नागपूर येथे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम सन-२०२२

अ.क्र.	वार	दिनांक	तपशील
१.	सोमवार	१० जानेवारी, २०२२	मारोतराव कन्नमवार जयंती
२.	शुक्रवार	०१ जुलै, २०२२	वसंतराव नाईक जयंती
३.	शनिवार	२६ नोव्हेंबर, २०२२	संविधान दिन

*****

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई